अथर्ववेद -
मेधाजनन, संगठन आणि विजय

(भाग ५)

लेखक :
म. म. ब्रह्मर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर
विद्या-मार्तण्ड, साहित्य-वाचस्पति, गीतालंकार

मूल्य : रु. Rs 500-

प्रकाशक :

स्वाध्याय मंडळ
किल्ला पारडी,
जि. बलसाड
गुजरात - ३९६ १२५

☆

अनुवादक :

यशवन्त कृष्ण पटवर्धन, एम.ए., एस.टी.सी., बी.टी.,
काव्यतीर्थ

☆

मुद्रक :

विजय शंकर घाटपांडे
जय-भारत प्रिंटिंग प्रेस,
नाईकवाडी, शिवाजी पथ,
ठाणे - ४०० ६०२.

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

भाग पांचवा

मेधाजनन, संगठन आणि विजय

भू मि का

अथर्ववेदाचें सामान्य स्वरूप

'**अथर्वन्**' लोकांचा हा वेद आहे. प्राचीनकाळांत अग्नीच्या उपासकांना '**अथर्वन्**' असें म्हणत असत. अवेस्तामध्येंही अग्नीच्या उपासकाचें नांव '**अथ्रवन्**' असें आहे. प्राचीन भारतीय अग्नीचे कट्टर उपासक होते. भारतीयवाङ्मयांत या वेदाचें प्राचीनतम नांव '**अथर्वांगिरस्**' असें आहे. '**अंगिरस्**' हा 'अग्नि–उपासकांतील एक वर्ग होता.'

काहीं विद्वानांचें असें मत आहे की '**अथर्वन्**' चे मंत्र सुख आणि पवित्रता वाढविणारे आहेत आणि 'अंगिरस' चे मंत्र विनाशक आहेत. म्हणजे अथर्वाऋषीच्या मंत्रांमध्यें बहुतेक औषधि आणि वनस्पति यांच्या सहाय्यानें रोगांचें निवारण कसें होऊं शकेल, याचा उल्लेख आहे आणि अंगिरस्ऋषीच्या मंत्रांमध्यें, आपला द्वेष करणाऱ्यांचा, शत्रूंचा, दुष्टांचा नाश करण्याचें वर्णन आहे. या वेदामध्यें मुख्यतः '**अथर्व** आणि **अंगिरस्**' या दोन विधिचें वर्णन आहे, म्हणून याला '**अथर्वांगिरस्**' असें म्हणतात.

अथर्वाचा अर्थ 'अचंचलता' असाही आहे. '**थर्व इति गतिनाम। न थर्वा इति अथर्वा**' '**थर्व**' या शब्दाचा अर्थ आहे गति म्हणजे चंचलता. ती चंचलता मानसिक असो, बौद्धिक असो किंवा शारीरिक असो, या चंचलतारहित स्थितींत

*

राहणाऱ्या साधकाचें नांव '**अथर्वन्** किंवा **अथर्वा**' असें आहे. या वेदांत ब्रह्मौदन, अयोष्यावर्णन आदि कांहीं सूक्तांमध्यें आत्मज्ञानाचा उपदेश आहे; यांच्या अध्ययनानें आणि मननानें मनुष्य अचंचलतेच्या स्थितीला प्राप्त करूं शकतो; म्हणून या वेदाचें '**अथर्व**' हें नांव सार्थ आहे.

'**अंगिरस्**' याचा अर्थ 'अंगामध्यें वाहणारा रस' असा आहे. शरीराच्या प्रत्येक अवयवामध्यें एक प्रकारचा संजीवन रस वाहतो व तो अवयवांना कार्यक्षम बनवितो. या रसाच्या अभावीं इंद्रियें शिथिल होऊन कार्य करण्यास असमर्थ होतात. या रसाच्या अभावीं इंद्रियें कशीं शिथिल होतात, याचें प्रमाण अर्धांगवायूनें पीडित झालेल्या शरीरामध्यें प्रत्यक्ष होऊं शकेल. अर्धांगवायूनें पीडित असलेल्या अवयवांत हा रस सुकून जातो; किंवा असेंही आम्ही म्हणूं शकूं की, ज्या अंगांत हा रस सुकून जातो तें अंग निर्जीव होतें. जेव्हां हा रस विकृत होतो तेव्हां शरीर रोगग्रस्त होतें, तेव्हां नाना औषधींच्या प्रयोगानें त्या रसामध्यें आलेल्या विकृतीचें निवारण केलें जातें. अथर्ववेदाच्या पुष्कळ सूक्तांमध्यें अनेक औषधींच्या आणि मण्यांच्या प्रयोगानें अनेक रोगांच्या चिकित्सा कशा कराव्या तें वर्णिलें आहे. त्या औषधींच्या प्रयोगानें अंगरसाला शक्तिशाली बनविण्यांत येतें. याप्रमाणें अंगरसाच्या विद्येचें वर्णन केल्यामुळें या वेदाला '**अंगिरस्**' असेंही म्हणण्यांत येतें.

या वेदामध्यें ७२६ सूक्तें आणि ५९७७ मंत्र आहेत. ते वीस कांडांमध्यें विभक्त आहेत. विसाव्या कांडाचीं बरींच सूक्तें ऋग्वेद-संहितेमधूनच घेतलेलीं आहेत, शिवाय अथर्ववेदाचा $\frac{?}{८}$ भागही ऋग्वेदाचाच आहे. दुसरें, चवथें, पांचवें आणि सातवें या कांडांच्या प्रारंभींचीं सूक्तें ब्रह्मविद्येचें वर्णन करणारीं आहेत. चौदाव्या कांडांतले मंत्र विवाहासंबंधीं आहेत आणि अठराव्या कांडांत अंत्येष्टिसंस्काराचे मंत्र आहेत. अथर्ववेदामध्यें छंदाबद्दल ऋग्वेदासारखी काळजी घेतलेली दिसत नाहीं. पंधराव्या आणि सोळाव्या कांडांत पुष्कळ सूक्तें गद्यासारखीं आहेत.

या वेदाचें मुख्य लक्ष्य अनिष्टशांति, इष्टपूर्ति आणि शत्रुनाश हें आहे. पुष्कळ मंत्रांतून याचे उपाय दर्शविलेले आहेत.

मेधाजनन, संगठन आणि विजय

हा या पांचव्या भागाचा विषय आहे. या पूर्वीच्या चारही भागांमध्यें मानवीजीवनासाठीं उपयुक्त अशा पुष्कळ गोष्टी वर्णिल्या आहेत. या पांचव्या भागांतही अभ्युदयाचेंच वर्णन विशेष आहे. समाजाच्या आणि राष्ट्राच्या उन्नतिसाठीं सर्वांत प्रथम '**मेधाजनन**' हें आवश्यक आहे. शिक्षण हा राष्ट्राचा आधार आहे. ज्या राष्ट्राचे लोक सुशिक्षित, सभ्य आणि सुसंस्कृत असतील, तें राष्ट्रच उन्नत होऊं शकेल. अशिक्षण कोणत्याही राष्ट्रासाठीं शापरूपच आहे. याच दृष्टीनें प्राचीन ऋषिमुनींनीं राष्ट्रांत कोणीहि अशिक्षित राहूं नये, असा सार्वत्रिक नियम केला होता. राजाकडून राज्यांत असा प्रबंधही होत होता. त्यावेळीं ठिकठिकाणीं गुरुकुलें होतीं. त्यांत मानवी जीवनाला उन्नत करणारें शिक्षण विद्यार्थ्यांना दिलें जात होतें आणि याप्रमाणें त्यांमध्यें '**मेधाजनना**' चें कार्य केलें जात होतें.

बुद्धि तर सर्वसाधारण मनुष्यांतही असतेच, जनावरेंही बुद्धीनें युक्त असतात; पण येथें ज्या बुद्धीचें वर्णन आहे, ती साधारण नसून '**मेधा**' ही विशिष्ट बुद्धि आहे. मेधाबुद्धीलाच '**प्रज्ञा**' असें म्हणतात. तिचें लक्षण करतांना योगदर्शनकार महर्षि पतंजलि म्हणतात—

ऋतम्भरा तत्र प्रज्ञा ।

'ऋता' ला किंवा सत्याला धारण करणारी बुद्धिच '**प्रज्ञा**' किंवा '**मेधा**' असते. या मेधाबुद्धिला प्राप्त करण्याचा उपाय या पांचव्या भागांत सांगितलेला आहे.

या भागाच्या प्रारंभाचें सूक्तच वाचस्पतीचें आहे. ही वाणी, सरस्वती किंवा मेधा यांची देवता आहे. तिची प्रार्थना करतांना म्हटलें आहे—

सं श्रुतेन गमेमहि मा श्रुतेन विराधिषि ।

'हे ज्ञानाच्या स्वामी प्रभो ! आम्हीं ज्ञानानें युक्त होऊं, आम्ही कधींहि ज्ञानाचा द्वेष करूं नये.'

अहं ब्रह्मण्वतीं ब्रह्मजूतां ऋषिस्तुतां ब्रह्मचारिभिः प्रपीतां मेधां अवसे हुवे । (६।१०८।२)

'श्रेष्ठ ज्ञानानें युक्त, ज्ञान्यांकडून सेवित, ऋषींकडून प्रशंसित आणि ब्रह्मचाऱ्यांनीं स्वीकृत केलेल्या मेधाबुद्धीला आपल्या संरक्षणासाठीं मीं आह्वान करतों.'

या मंत्रांत मेधाबुद्धीची प्रशंसा केली आहे. मेधाबुद्धीचा अर्थ '**धारणावती बुद्धि**' असा आहे. ही बुद्धि ज्या मनुष्यांत जेवढी जास्त असेल तेवढीच त्याची योग्यता वाढलेली दिसेल.

कारागीरांमध्यें एकप्रकारची धारणावती बुद्धि असते. असुरांमध्यें सर्व जगाला जिंकण्याची बुद्धि असते. ऋषिमुनींमध्यें सत्त्वगुणी बुद्धि असते. या सत्त्वगुणी बुद्धीला प्राप्त करण्याकरितां सर्वांनीं प्रयत्न करावा; पण याची प्राप्ति तपस्येशिवाय होत नाहीं.

या मेधाबुद्धीला वाढविण्याचा दुसरा उपाय '**मनाची शक्ति वाढविणें**' हाही आहे. शुद्ध आणि सात्त्विक पदार्थांचा उपयोग केल्यानें मनाची शक्ति वाढते.

याप्रमाणें मेधाजननासंबंधीं या भागांत पुष्कळ सूक्तांनीं केलेलें वर्णन पाहण्याजोगें आहे.

संगठन

मेधाशक्तीनें संपन्न झाल्यावर मनुष्यांमध्यें संघटनाचे भाव उत्पन्न होतात. सात्त्विकवृत्ति ठेवणाऱ्यांमध्यें स्वार्थाची भावना नसते. त्यांच्यासमोर 'मातृभूमीच्या उन्नतिचें एकमेव लक्ष्य असतें आणि संघटित होऊन ते मातृभूमीचें संरक्षण करतात. त्या मातृभूमीच्या भक्तांचा ईश्वरच सहायक होतो—

दितेः पुत्राणामदितेरकारिषं
अव देवानां बृहतामनर्मणाम् ।
तेषां हि धाम गभिषक् समुद्रियं
नैनान्नमसा परो अस्ति कश्चन ॥

'लोकांना परतंत्र करणारे राक्षस किंवा असुर समुद्राच्या अत्यंत खोलभागीं लपून राहतात. मीं त्यांना दूर करतों आणि

मातृभूमीला स्वतंत्र करणाऱ्या आणि दैवीगुणांनीं युक्त अशा अहिंसक मनुष्यांसाठीं योग्य असें स्थान तयार करतों.'

या मंत्रामध्यें दिति आणि अदिति असे दोन शब्द आले आहेत, त्यांचा अर्थ याप्रमाणें आहे—

अदिति- स्वातंत्र्य, अमर्याद, अखंडित, सुखी, पवित्र, पूर्णत्व इत्यादि.

दिति- खंडित, पराधीनता, पारतंत्र्य, दुःखी, अपवित्र, अपूर्णता इत्यादि.

अदितिचे पुत्र देव यांना परमात्मा सहाय्य करतो आणि राक्षसवृत्ति ठेवणाऱ्यांचा नाश करतो. याचें कारण हेंच आहे की आसुरीवृत्ति ठेवणारे जगांत पारतंत्र्य आणि दुःख वाढवितात आणि दैवीवृत्तीचे लोक सुख प्रसरवितात.

राष्ट्रीय ऐक्य

मनुष्यांत उन्नति करण्याची स्वाभाविक इच्छा असते. याबद्दल म्हटलें आहे—

हुवे सोमं सवितारं नमोभिः
विश्वानादित्यां अहमुत्तरत्वे । (३।८।३)

'उच्च होण्यासाठीं सोम, सविता आणि आदित्य हे देव मला मदत देवोत, म्हणून मी त्यांना बोलवितों.'

मीं दिव्यमार्गानें उन्नत व्हावें यासाठीं हे देव मला सहाय्य करोत.

उन्नतीचा मार्ग

मनुष्य सामाजिक प्राणी आहे, म्हणून आपल्या उन्नतीसाठीं त्याला सांघिकजीवनांत राहावें लागते. एकटाच राहून तो उन्नति करूं शकत नाहीं. सामुदायिक उन्नतीसाठीं स्वार्थत्यागाची जेवढी आवश्यकता असते, तेवढी वैयक्तिक जीवनासाठीं नसते; म्हणून समुदायांत राहणाऱ्यांनीं समाजांत विरोध उत्पन्न होऊं नये असा आपला व्यवहार ठेवला पाहिजे. म्हणून म्हटलें आहे—

वः मनांसि सं, वः व्रतानि सं, वः आकूती सं ।

'तुमचीं मनें, तुमचीं व्रतें व तुमचे संकल्प एकता वाढविणारे होवोत.' यांत 'सं' हा उपसर्ग 'उत्तमता' आणि 'एकता' यांचा निदर्शक आहे. मनुष्याची वाणी, मन आणि कर्म हीं सर्व एकता वाढविणारे होवोत. कांहीं मनुष्यें अशींही असतात, कीं तीं बाह्यरूपांत कांहीं वाईट कामें करीत नाहींत, पण मनामध्यें असे संकल्प करतात कीं त्यांमुळें समाजांत विघटन उत्पन्न होतें. यासाठीं म्हटलें आहे कीं संकल्पही उत्तम आणि एकता करणारे होवोत. याप्रमाणें सर्वांमध्यें एकता स्थापित केल्यानें आणि समाजांतून वाईट व्यवहार नष्ट केल्यानें उन्नतीचा मार्ग प्रशस्त होतो. अर्थात् यासाठीं प्रत्येकानें स्वतःचें आचरण शुद्ध ठेवलें पाहिजे. म्हणून उपदेशिलें आहे—

अहं गृभ्णामि मनसा मनांसि
मम वशेषु हृदयानि वः कृणोमि ।

'मीं स्वतःच्या मनानें दुसऱ्यांचीं मनें आकर्षित करतों आणि याप्रमाणें दुसऱ्यांचीं हृदयें स्वतःच्या ताब्यांत ठेवतों.'

या मंत्रांत स्वतःच्या शुभाचरणानें दुसऱ्यांचीं मनें आकर्षित करण्याचा उपदेश आहे; पण हें सामर्थ्य शुभ आणि सत्यसंकल्पामुळेंच उत्पन्न होतें.

संवेश्य राष्ट्र

असे पुण्यात्मा आणि धर्मात्मा ज्या राष्ट्रांत पुष्कळ संख्येनें असतील आणि ज्या राष्ट्राचे लोक आपलें आचरण धर्मानुकूल करीत असतील, त्या राष्ट्राला '**संवेश्य राष्ट्र**' असें म्हणतात. तें राष्ट्र राहण्याजोगें असतें. या प्रकारच्या राष्ट्रासाठीं प्रार्थना केली आहे—

अस्मभ्यं बृहद्राष्ट्रं संवेश्यं दधातु ।

'आम्हां सर्वांस देवगण प्रवेश करण्याजोगें राष्ट्र देवोत.'

या प्रकारच्या संगठनाकरितां सर्वांचें ज्ञान समान असलें पाहिजे. सर्वच आपसांत समभावानें मिळोत. उच्चनीचतेची भावना नष्ट होऊन जावो. सर्वांचीं मनें शुभसंस्कारांनीं युक्त होवोत. सभेमध्यें सर्व लोक समानाधिकारानें व्यवहार करोत. याप्रकारें जर संगठन झालें तर त्या जातीवर कोणीही शत्रु हल्ला करूं शकणार नाहीं. ती जाति किंवा तें राष्ट्र कधींही शत्रूच्या समोर नमूं शकणार नाहीं.

मनुष्य समाजांत राहूनच उन्नत होऊं शकेल, म्हणून समाजांत राहतांना त्याला संगठनही ठेवावें लागेल. जर जाति वा समाजांत ऐक्य नसलें, तर मनुष्याचा नाश निश्चितच आहे. यासाठीं जें राष्ट्र स्वतःची संघशक्ति वाढवितें, तेंच सर्वत्र विजयी होतें. ज्या जातींमध्यें विरोध आहे, ती प्रथम स्वातंत्र्यच मिळवूं शकणार नाहीं आणि जर तिनें स्वातंत्र्य मिळविलें, तर तें त्या जातींमध्यें फार काळपर्यंत टिकूं शकणार नाहीं.

संघशक्ति वाढविण्याचा उपाय

(१) अन्तर्गत सुधारणा

समाजाचें अंग मनुष्य आहे, म्हणून जर या अंगामध्यें बिघाड झाला, कीं समाजरूपी शरीरामध्यें बिघाड होणें साहजिकच आहे. यासाठीं मनुष्यानें सर्वप्रथम स्वतः सुधारणा केली पाहिजे. वैदिकधर्माचें हें वैशिष्ट्य आहे. तो मनुष्याला असा आदेश देतो की समाजसुधारणेचा प्रारंभ प्रथम स्वतःच्या जीवनापासूनच केला पाहिजे. हृदयाच्या सुधारणेनें इतर सर्व गोष्टींची सुधारणा होऊं शकते. अन्तःकरण जर शुद्ध नसलें, तर बाह्यशुद्धिनें कांहींही फायदा होणार नाहीं. म्हणून म्हटलें आहे—

(१) सहृदयं- हृदयाची भावना एक असावी. दुसऱ्याचें सुखदुःख स्वतःचेंच समजणें हीच सहृदयता आहे. जोपर्यंत सुधारक सर्व मनुष्यांना आत्मवत् समजत नाहीं, तोपर्यंत तो समाजाची सुधारणा करूं शकत नाहीं.

(२) सां-मनस्यं- मनें उत्तम भावनांनीं आणि शुभ संस्कारांनीं युक्त असावींत.

इंद्रियें मनावर अवलंबित असतात, म्हणून मनांत जसे विचार उत्पन्न होतात, त्या अनुसार इंद्रियें कामें करतात. यासाठीं इंद्रियांना उत्तम ठेवण्यासाठीं मनांत नेहमीं शुभसंकल्प ठेवले पाहिजेत. सहृदयता आणि सौमनस्यता सिद्ध झाल्यानें मनुष्याचे बाह्यव्यवहारसुद्धां शुद्ध होऊं शकतील.

बाह्यसुधारणा

(१) अ-विद्वेषं- कोणाचाही द्वेष न करणें, परस्पर कलह न करणें.

हा बाह्यव्यवहार शुद्धतेचा मार्ग आहे. मनुष्याचा व्यवहार कसा असावा ! या प्रश्नाचें हें उत्तर आहे कीं त्याचा व्यवहार कोणाचाही द्वेष करणारा असूं नये. हा मनुष्यव्यवहाराचा आदर्श आहे. दोन मनुष्यें कुठेंतरी जमलीं म्हणजे भांडण किंवा कोणाची निंदा सुरू होते. हा स्वभाव दुष्ट लोकांचा आहे. सज्जनांना हा स्वभाव शोभत नाहीं.

निर्वैर व्यवहाराचा येथें अभिप्राय काय आहे ? दोन वृक्ष किंवा दोन दगड शेजारी असूनही निर्वैर असतात, तशी निर्वैरता येथें सांगितलेली आहे की काय ? नाहीं, तशा जड-निर्वैरतेचें वर्णन येथें अभिष्ट नाहीं. येथें ' **अ-विद्वेषं** ' हा शब्द प्रेमपूर्ण व्यवहाराचा बोधक आहे. याचें एक सुंदर उदाहरणही पुढें दिलें आहे—

अन्यो अन्यं अभिहर्यत, वत्सं जातमिवाघ्न्या ॥

' जशी गाय नुकत्याच उत्पन्न झालेल्या वासरावर प्रेम करते, तसेंच मनुष्यांनीं परस्पर प्रेम केलें पाहिजे. ' ' **अविद्वेष** ' शब्दाचा अर्थ केवळ ' वैर किंवा द्वेष न करणें ' एवढाच नाहीं, हें त्याचें निषेधात्मकरूप आहे. ' द्वेष न करणें, हिंसा न करणें ' हे एका सिद्धांताचे निषेधात्मक भाग आहेत. याचे विध्यात्मक आहेत ' प्रेम करणें, दया करणें ' इत्यादि. यांचें आचरण सर्वप्रथम आपआपल्या घरींच केले पाहिजे. त्याची रीति पुढच्या मंत्रांत अशी सांगितलेली आहे—

' (१) पुत्र पित्याला अनुकूल होऊन कर्म करो, मातेशीं उत्तम भाषणें करो, पत्नी पतीशीं मधुरतेनें आणि शांतीनें बोलो. (२) भाऊ भावाचा आणि बहिण बहिणीचा द्वेष न करो, सर्व मिळून मिसळून परस्पर मधुर भाषणें करोत आणि आपआपल्या कल्याणाकडे लक्ष्य देवोत. (३) ज्यामुळें वैर आणि विद्वेष न होईल, असें उत्तम ज्ञान सर्वांनींच प्राप्त केलें पाहिजे. हा एका आदर्श कुटुंबाचा व्यवहार येथें दर्शविलेला आहे.

सामुदायिक कर्म

जाति आणि समाजाबरोबर कशारीतिनें व्यवहार केला पाहिजे, हेंही येथें सांगितलें आहे—

(१) ज्यायस्वन्तः- वृद्धांचा सन्मान केला पाहिजे.

(२) मा वि यौष्ट- आपआपसांत भांडण माजूं नये, किंवा विभक्तता होऊं नये.

(३) सधुरा चरन्तः- एका धुरेखालीं राहून पुढें गेलें पाहिजे. येथें धुरेचा अर्थ धुरीण, नेता असा आहे. नेता देखील एकच असला पाहिजे. एकाच नेत्याच्या नेतृत्वानें सर्व मनुष्यें पुढें जाऊं शकतात. ज्या समाजांत पुष्कळ नेते असतील तेथें नक्कीच भेदभाव आणि भांडणें माजतील.

(४) सध्रीचीनाः- कोणतेंही काम संगठित होऊन केलें पाहिजे.

(५) संराधयन्तः- सर्वांनीं मिळून सिद्धीसाठीं प्रयत्न केला पाहिजे.

(६) अन्यो अन्यस्मै वल्गु वदन्त एत- आपआपसांत प्रेमानें भाषणें करीत सर्वांनी पुढें जावें.

जेव्हां एक मनुष्य समाजांत राहतो, तेव्हां इतर सदस्यांबरोबर

खाण्यापिण्याचे प्रश्नही त्याच्यासमोर असतात. याविषयीं म्हटलें आहे—

' तुमचें पाणी पिण्याचें स्थान एक असो, तुम्हां सर्वांना मी एकाच धुरेखालीं ठेवतों. तुम्हीं सर्व एकाच मनाचे होऊन ईश्वराची उपासना करा. '

' जाति एका चक्रासारखी असते. ' ज्याप्रमाणें चक्राचे आरे एकाच नाभीशीं वा केंद्राशीं जोडलेले असतात, त्याप्रमाणेंच पांचजन वा चारही वर्ण राष्ट्राच्या केंद्राशीं जोडलेले असतात. जनतेंत सर्व मनुष्यांची एकता तशीच असली पाहिजे, ज्याप्रमाणें चाकाच्या आरांमध्यें असते.

सेवाभावानें उन्नति

जेव्हां लोकांमध्यें सेवाभाव असेल, तेव्हांच अशी एकता संभवनीय होईल. ' **संवनन्** ' शब्दाचा अर्थच ' उत्तम प्रकारानें प्रेमपूर्वक सहाय्य करणें ' असा आहे. प्रेमानें एक दुसऱ्याचें सहाय्य करणें हें सेवासमितीचें कार्य आहे. म्हणून म्हटलें आहे—

संवनेन सर्वान् एक श्नुष्टीन् कृणोमि ।

' प्रेमयुक्त सेवेनें सर्वांची मदत करीत मीं सर्वांना एकाच ध्येयाकडे प्रेरित करतों. ' प्रजेची निःस्वार्थ सेवा करणाराच सर्व श्रेष्ठ सेवक आहे. जनसेवा हें एक महान् यज्ञकर्म आहे. ईश्वर निःस्वार्थ भावनेनें सर्वांचें सहाय्य करतो, म्हणूनच तो सर्वश्रेष्ठ म्हटला जातो.

याप्रमाणें सेवा केल्यानें मनुष्याची उन्नति होते. वेदाचा सिद्धान्त असा आहे की ' **क्रतुमयोऽयं पुरुषः** ' म्हणजे हा मनुष्य कर्ममय आहे. मनुष्याची उन्नति कर्माधीन असते, म्हणून त्यानें नेहमीं प्रशस्ततम कर्मच केलें पाहिजे. तीं कर्मे प्रजेंत संगठन करणारीं, एकता वाढविणारीं असलीं पाहिजेत. ' **संव्रताः, संराधयन्तः, सधुराश्चरन्तः, सध्रीचीनः, एकश्नुष्टी** ' इत्यादि शब्दांनीं हाच उपदेश केला आहे.

याप्रमाणें संगठन करून शेवटीं विजयप्राप्तिसाठीं प्रयत्न केला पाहिजे किंवा याप्रमाणें संगठित झाल्यानें विजयप्राप्ति निश्चितच होते असेंही आम्हीं सांगूं शकूं.

विजयप्राप्ति

शत्रुच्या पराजयासाठीं (**ओज**) शारीरिक बल, (**सहः**) शत्रूचे हल्ले परतविण्याचें सामर्थ्य, (**बल**) सैन्य तसेंच अन्य प्रकारचें बल, (**वीर्य**) पराक्रम, वीर्याची शक्ति, (**नृम्ण**) मानवी अनुकूल्याचें सामर्थ्य एवढीं साधनें आवश्यक आहेत. नंतर (**जिष्णुयोग**) विजय प्राप्त करण्याची चातुर्ययुक्त योजना कशी करावी याचें उत्तम ज्ञान असावें. सर्व अन्य बलांचें आनुकूल्य असून जर ' **जिष्णु योगां** ' त न्यूनता झाली तर कांहींच सिद्ध होऊं शकत नाहीं. त्याच्याबरोबर ' **ब्रह्मयोग** ' म्हणजे ज्ञानानें सिद्ध होणारी योजनासुद्धां अवश्य असली पाहिजे, त्याचप्रमाणें ' **क्षात्रयोग** ' क्षात्रयुद्धक्षेत्रांत करण्याचा व्यूह वगैरे रचनामध्यें विशेष प्राविण्य असलें पाहिजे. तसेंच जलादि साधनेंही असलीं पाहिजेत व त्यांचा उपयोग शत्रुनाश करण्यासाठीं केला पाहिजे.

युद्धाचीं शस्त्रास्त्रें

या भागांत शस्त्रास्त्रांचीं वर्णनेंही आहेत. शत्रूंस आपल्या ' **उदारां** ' चें प्रदर्शन दाखविलें पाहिजे. उदार हीं अशीं शस्त्रें आहेत कीं जीं शत्रूंवर दुरून फेंकण्यांत येतात आणि तेथें पडतांच स्फोट होऊन शत्रूंचा भयंकर नाश होतो. शत्रूंशीं युद्ध सुरू करावयाचें त्यांत ' आदान ' आणि ' संदान ' असा दोन प्रकारचा विधि आहे. एकांत शत्रूंस सर्व बाजूनें घेरून पकडावयाचें आहे आणि दुसऱ्यांत सर्व सेना एकत्रित करून शत्रूवर हल्ला करावयाचा आहे. याप्रमाणें युद्ध केल्यामुळें शत्रूसेना महान् असली तरी सुद्धां विजय प्राप्त करणें शक्य असतें.

जीं उदार नांवाचीं स्फोटक अस्त्रें आहेत, तीं सात प्रकारचीं आहेत. एक जमिनींत पुरून ठेवण्याचें, दुसरें पाण्यांत ठेवण्याचें, तिसरें हातानें फेंकावयाचें, चौथें आकाशांत जाऊन तेथून खालीं फेंकावयाचें, पांचवें बाणावर ठेऊन शत्रुसेनेमध्यें सोडावयाचें, सहावें नदी, तलाव, अथवा लहान पाण्याच्या साठ्यांत ठेवून पिण्याच्या पाण्याचे साठे उडवून द्यावयाचें आणि सातवें पर्वत, डोंगर, खडक दऱ्याखोऱ्यांत उपयोगी पडणारें अशीं सात प्रकारचीं घातक विस्फोटक शस्त्रें आहेत. त्यांचा प्रयोग करून शत्रूंचा नाश करावा.

वज्र निर्माण

त्रिषंधि नांवाचें एक प्रकारचें वज्र आहे. तें अत्यन्त तीक्ष्ण असतें. या शस्त्राला तीन ठिकाणीं सांधे असतात. त्यामुळें त्याचें नांव त्रिषंधि असें पडलें आहे. हें पोलादाचें बनविलेलें असावें, तें तापवून पाण्यांत अथवा तेल वगैरे पातळ पदार्थांत बुडवून तयार करण्यांत येत असावें.

बाणांचें स्वरूप

वज्राबरोबर बाणधारी सैनिकसुद्धां राहोत. त्या बाणांचें स्वरूप असें आहे—

१ **अयोमुखाः**- ज्यांच्या अग्रभागीं पोलाद वापरलें आहे, त्यामुळें त्यांचीं अग्रें तीव्र राहतात.

२ **सूचीमुखाः**- सुईप्रमाणें तीक्ष्ण ज्यांचे अग्रभाग आहेत.

३ **विकंकतीमुखाः**- फणीप्रमाणें काटेरी तोंडाचे अथवा कंक पक्ष्याच्या चोंचीसारखे अग्रभाग असलेले.

'**वातरंहसः**' आणि '**क्रव्यादाः**' हे दोन शब्द बाणाचा वेग आणि त्याची मारकता सुचवितात.

४ **शितिपदी**- तीक्ष्ण फाळाचे बाण.

५ **चतुष्पदी**- चार फाळ असलेले बाण.

अशा बाणांनीं युक्त सैन्याला विजय प्राप्त करणें सहजच होईल यांत मुळींच शंका नाहीं.

तमसास्त्राचा आणि संमोहास्त्राचा प्रयोग

(**तमसा परिवारय**) या शब्दांनीं अन्धाराचा प्रयोग करण्याची सूचना दिली आहे. अन्धारात सांपडल्यामुळें शत्रूंस कांहीं दिसेनासें होतें. नंतर या भागांत सम्मोहन करण्याचाही उल्लेख आहे. त्यांत सर्व शत्रुसेना मूर्च्छित होत असे, त्यांना कांहीं सुचत नसे. येथें कांहीं शक्ति शत्रूवर फेंकावयाची आहे कीं ज्यामुळें ती शत्रुसेनेमध्यें पडतांच सर्व मोहित होऊन जातात व त्यांस कर्तव्य करण्याचें सुचत नाहीं.

अशा रीतिनें विजयप्राप्तीचे उपाय या भागांत सांगितलेले आहेत.

म्हणून प्रथम मेधाबुद्धीचें सम्पादन करून समाजांत संघटना करावयाची व त्यानन्तर विजयप्राप्तीसाठीं प्रयत्न करावा.

ॐ

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

(भाग पांचवा)

मेधाजनन, संगठन आणि विजय

बुद्धीचें संवर्धन करणें

कांड १, सूक्त १

(ऋषिः - अथर्वा । देवता - वाचस्पतिः)

ये त्रिषप्ताः परियन्ति विश्वा रूपाणि बिभ्रतः । वाचस्पतिर्बला तेषां तन्वो अद्य दधातु मे ॥ १ ॥
पुनरेहि वाचस्पते देवेन मनसा सह । वसोष्पते नि रमय मय्येवास्तु मयि श्रुतम् ॥ २ ॥
इहैवाभि वि तनूभे आर्त्नी इव ज्यया । वाचस्पतिर्नि यच्छतु मय्येवास्तु मयि श्रुतम् ॥ ३ ॥
उपहूतो वाचस्पतिरुपास्मान्वाचस्पतिर्ह्वयताम् । सं श्रुतेन गमेमहि मा श्रुतेन वि राधिषि ॥ ४ ॥

अर्थ— (विश्वा रूपाणि बिभ्रतः) अनेक निरनिराळीं रूपें धारण करून (ये त्रि-सप्ताः परियन्ति) तीन गुणिले सात पदार्थ सर्वत्र व्यापून आहेत, (तेषां तन्वः बलाः) त्यांच्या शरीराचें बळ (वाचस्पतिः अद्य मे दधातु) वाणीचा स्वामी आज मला देवो. [१]

हे (वाचस्पते) वाणीच्या स्वामि ! (देवेन मनसा सह) दिव्य मनानें (पुनः एहि) परत समोर ये हे (वसोष्पते) वसूच्या स्वामि ! (निरमय) मला आनंद दे. (श्रुतं मयि) मीं शिकलेलें ज्ञान (मयि एव अस्तु) माझ्यांतच स्थिर होवो. [२]

(ज्यया उभे आर्त्नी इव) धनुष्याची दोन टोकें ज्याप्रमाणें दोरीनें बांधलेलीं असतात, (इह एव उभौ अभि वि तनु) येथेंच दोघांचा ताण (वाचस्पतिः नि यच्छतु) वाणीचा पति नियमानें करो. (श्रुतं मयि) माझें ज्ञान (मयि एव अस्तु) माझे ठायीं स्थिर होवो. [३]

(वाचस्पतिः उपहूतः) वाणीच्या स्वामीस बोलावण्यांत आलें. (वाचस्पतिः अस्मान् उपह्वयताम्) तो वाणीचा स्वामी आम्हां सर्वांस बोलावो. (श्रुतेन संगमेमहि) आम्ही सर्व ज्ञानानें युक्त व्हावें. (श्रुतेन) आम्हीं ज्ञानाबरोबर (मा वि राधिषि) कधींहि विरोध करणार नाहीं. [४]

बुद्धीचें संवर्धन

पदार्थ दोन प्रकारचे असतात. एक रूपयुक्त आणि दुसरे रूपरहित. आत्मा-परमात्मा रूपरहित आहेत. आणि बाकी सर्व जग रूपयुक्त पदार्थांनी भरलेलें आहे. पदार्थांची विविध रूपें, मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष, वनस्पति, पाषाण वगैरेंत पहावयास मिळतात. तीं कोण धारण करतो ? तीं रूपें कशीं तयार होतात ? या शंकेच्या उत्तरीं वेद सांगतात की विश्वांत मूळ सात पदार्थ होते. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, तन्मात्र आणि अहंकार यांच्यापासून संपूर्ण जगातील दृश्य रूपें तयार होतात. हे सात पदार्थ तीन अवस्थेंतून प्रसार होणाऱ्या विश्वाचें रूप आणि त्याचा आकार यांस आधाररूप आहे. (१) **सत्त्व** म्हणजे सम अवस्था, (२) **रज** म्हणजे गतिरूप अवस्था आणि (३) **तम** म्हणजे गतिहीन अवस्था. या तीन अवस्थेंत वर सांगितलेल्या सात पदार्थांच्या सहाय्यानें एकवीस पदार्थ तयार होतात आणि ते एकवीस पदार्थ संपूर्ण सृष्टींतील रूपांस आधाररूप आहेत.

पृथ्वीवरील प्रत्येक आकार धारण करणाऱ्या पदार्थांत महान् शक्ति आहे. आपलें शरीरसुद्धां सृष्टींतील पदार्थांपैकीं एक असल्यानें तें रूपयुक्त आहे. म्हणजे त्यांत सुद्धां वर सांगितलेलें तीन ' गुणिले सात ' असे एकवीस पदार्थ आहेत. आणि त्यामुळेंच शरीरांतील एकवीस तत्त्वांचा संबंध बाह्य सृष्टींतील एकवीस तत्त्वांशीं असतो. शरीराचें आरोग्य अथवा रोगसुद्धां या संबंधाच्या चांगले वाईटपणावर अवलंबून असतात.

शरीरांतील या तत्त्वांचा बाहेरील जगांतील तत्त्वांशीं योग्य संबंध ठेवण्यानें आपलें आरोग्य टिकतें आणि त्या आरोग्याच्या सहाय्यानें स्वतःचीच शक्ति वाढविण्याची सूचना या मंत्रांनीं दिली आहे.

ज्याप्रमाणें बाह्य शुद्ध वायूमुळें आपल्या प्राणांचें बळ, बाह्य सूर्याच्या प्रकाशानें आपल्या दृष्टीची शक्ति त्याप्रमाणें इतर शक्ति सुद्धां वाढवून स्वतःचें सामर्थ्य पराकाष्ठेपर्यंत वाढविलें पाहिजे. हा अथर्ववेदाचा मुख्य विषय आहे.

जगाचें तत्त्वज्ञान जाणून, जगाच्या स्वतःशीं असलेल्या संबंधांचा अनुभव घेऊन, स्वतःचें सामर्थ्य वाढविण्याच्या विद्येचें अध्ययन करून, त्याचें अनुष्ठान केलें पाहिजे. उन्नतीचा हा मूल मंत्र या पहिल्या मंत्रांत सांगितला आहे. येथें असा प्रश्न उपस्थित होतो की ही विद्या कोण देऊं शकतो ? उत्तरीं मंत्रात म्हटलें आहे कीं '**वाचस्पति**' तें ज्ञान देण्यास समर्थ आहे.

' **वाचस्पति** ' कोण आहे. ? वाक्, वाचा, वाणी, वक्तृत्व उपदेश, व्याख्यान हे सर्व शब्द समानार्थक आहेत. वक्तृत्व करणारा म्हणजे उत्तम उपदेशक गुरु येथें वाचस्पति शब्दानें अभिप्रेत आहे. असा अर्थ घेतला तर मंत्राचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें होईल.

' मूळ सात तत्त्वें तीन अवस्थेंतून प्रसार होत असतां जगांतील सर्व पदार्थांची रूपें तयार होतात आणि तीं सर्वत्र पसरतात. त्या पदार्थांच्या बळांना स्वतःमध्यें धारण करण्याची विद्या व्याख्याता गुरु आजच शिकवो. '

अथर्ववेदांतील पिप्पलाद संहितेचा पाठ असा आहे—

ये त्रिषप्ताः पर्यन्ति... । ...तेषां तन्वमभ्यादधातु मे ॥

त्याचा अर्थ असा—

जीं मूळ सात तत्त्वें तीन्ही अवस्थेंतून प्रसार होऊन संपूर्ण विश्वांतील पदार्थांची रूपें तयार करतात. सर्वत्र (**पर्यन्ति**) फिरतात. व्याख्याता गुरु आज त्या बळांना माझ्या (**तन्वं**) शरीरांत (**अभ्यादधातु**) धारण करवो. म्हणजे धारण करण्याचा उपाय मला दाखवो.

या मंत्राच्या सुरवातीस ' **पुनः** ' शब्द आला आहे. त्याचा अर्थ वारंवार, पुनः पुनः अथवा सन्मुख, समोर असा होतो. शिष्यवर्ग एका बाजूस आणि गुरु दुसऱ्या बाजूस असतात. म्हणजे गुरु शिष्यासमोर आणि शिष्य गुरुसमोर असतो. त्या दोघांनीं याप्रमाणें असलें पाहिजे. जर ते दोघे (गुरु शिष्य) त्याप्रमाणें न वर्तले तर शिकणें अशक्य होईल.

गुरुनें (**देवेन मनसा**) दैवीभावनांनीं युक्त अशा मनाचा होऊन शिष्यांशीं वागावें. मन दोन प्रकारचें असतें. देव-मन आणि राक्षस-मन. राक्षसमन पृथ्वीवर भांडण-तंटे कलह निर्माण करतें. आणि देव मन शांति ठेवतें. गुरुनें देवमनानें शिष्यांस शिकवावें.

गुरुनें शिष्यास (**नि रमय**) रममाण केलें पाहिजे. म्हणजे असें की ज्यामुळें शिष्य हसतां खेळतां शिकतील. या शब्दानें वेदानें ' **रमण** ' पद्धति प्रसिद्ध केली आहे. ' **रोदन** ' पद्धति यापासून निराळ्या प्रकारची आहे, ज्यांत रडणाऱ्या शिष्यांना शिकविण्यांत येतें.

गुरुचे दोन गुण या मंत्रांत सांगितले आहेत, एकगुण (**वाचस्पतिः**) म्हणजे वाणीचा प्रयोग करण्यांत समर्थ, शिष्यास विद्या समजावून सांगण्यांत कुशल, उत्तम वक्ता तसेंच दुसरा गुण (**वसोष्पतिः**) वसूंचा पति म्हणजे अग्नि वगैरे पदार्थांचें प्रयोग करण्यांत कुशल. शब्दांनीं जें तात्त्विक (Theoretical) ज्ञान सांगण्यांत येतें, तें वस्तूंच्या सहाय्यानें (Practical) प्रयोग रूपानें साक्षात् परिचय करून देणारा केवढा समर्थ गुरु असला पाहिजे.

शिष्य सुद्धां असा असावा की जो (**मयि श्रुतं अस्तु**) माझ्या मध्यें ज्ञान स्थिर व्हावें अशी इच्छा करणारा असेल. म्हणजे मनापासून शिकणारा आणि सत्यार्थानें (**विद्या+अर्थी**) विद्या प्राप्त करण्याची इच्छा करणारा असावा.

हा अर्थ ध्यानीं घेतला असतां प्रथम मंत्राचा अर्थ असा होईल—

' हे उत्तम उपदेश करणाऱ्या गुरो ! देवभाव युक्त मनानें शिष्यासमोर जा. हे अन्नादि वस्तूंचा प्रयोग करणाऱ्या गुरो ! तूं शिष्यास खेळवतां खेळवतां ज्ञान दे. शिष्यानें सुद्धां म्हटलें पाहिजे की ज्ञान माझ्यांत स्थिर असो. '

अथर्ववेद पिप्पलादसंहितेंत मंत्राचा प्रारंभ '**उपनेह**' शब्दानें झालेला आहे. आणि ' **वसोष्पते** ' ऐवजीं ' **असोष्पते** ' असा पाठ आहे. ' **असुपति** ' (**असोः पति**) चा अर्थ प्राणाचा पति ' म्हणजे योगादि साधनद्वारा प्राण स्वतःच्या काबूंत ठेवणारा उत्तम योगी गुरु असला पाहिजे. हा शब्द सुद्धां गुरूचें उत्तम लक्षण दाखवितो.

धनुष्याची दोरी दोन्ही टोकांस खेंचून ठेवण्यांत येते. असा खेंचलेल्या अवस्थेंतच धनुष्य विजयाचें साधन होऊं शकतें. जेव्हां दोरी दोन्ही टोकांवरून काढून टाकलेली असते, अशी धनुष्याची काठी शत्रूचा नाश अथवा विजय प्राप्त करण्यास अशक्तिमान् असते. त्याचप्रमाणें जाति अथवा समाजरूपी धनुष्याचीं दोन टोकें गुरु आणि शिष्य आहेत. या दोघांस विद्यारूप दोरी एकत्र बांधून ठेवते. आणि त्या दोरीनें हें धनुष्य खेंचलें म्हणजे स्वतःचें कार्य सिद्ध होतें. समाजानें हें धनुष्य नेहमीं सिद्ध ठेवलें पाहिजे. त्याच्या सिद्धतेमुळें जातिसमाज अथवा राष्ट्र जीवित जागृत आणि उन्नत रहातें. ज्यावेळीं विद्यारूपी दोरी गुरु शिष्यरूपी धनुष्यावरून दूर केली जाईल त्यावेळीं जाति पतित होईल.

(**वाचस्पतिः**) उत्तम वक्ता गुरु स्वतः (**नि यच्छतु**) नियमानें चालो आणि शिष्यास नियमानुसार चालवो. गुरुकुल, आचार्यकुल अथवा विद्यालय वगैरे संस्था उत्तम नियमानुसार चालविण्यांत याव्यात. तेथें स्वेच्छा विहार नसावा.

शिष्यानें प्रयत्नपूर्वक मिळवलेलें ज्ञान स्वतःमध्यें स्थिर करण्याचा प्रयत्न आणि दक्षता ठेवली पाहिजे. पूर्वी शिकलेलें ज्ञान परिपक्वतेनें स्थिर झालें म्हणजे मगच जास्त ज्ञान प्राप्त करणें शक्य होतें, हा भाव ध्यानीं घेऊन या तिसऱ्या मंत्राचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें होतो.

' ज्याप्रकारें धनुष्याची दोरी त्याच्या दोन्ही टोकांस खेंचून धनुष्य विजयासाठीं तयार करण्यांत येतें त्याप्रकारें गुरु आणि शिष्य या समाजाचीं दोन टोकें विद्येनें तैयार होतात. गुरुनें स्वतः नियमानें वर्तावें व शिष्यास नियमानुसार वर्तवावें. शिष्यानें मिळवलेलें ज्ञान पक्कें करून पुढें सरावें.

' **उपहूत** ' शब्दाचा अर्थ बोलाविलें, हांक मारली, आवाहन केलें किंवा विचारण्यांत आलें वगैरे आहे. उत्तम व्याख्यात्या गुरूनीं आम्हांस बोलाविलें म्हणजे त्याला प्रश्न विचारण्यांत आले, म्हणजे विद्येविषयीं प्रवचन करण्यास त्यास बोलाविण्यांत आलें. गुरूनें सुद्धां शिष्यांचे योग्य प्रश्न ऐकून त्यांचें शंका समाधान करावें. म्हणजे गुरूनें कोणतेंहि ज्ञान शिष्यापासून लपवून ठेऊं नये. अशाप्रकारें उभयतांचें परस्पर प्रेम वृद्धिंगत होत रहावें.

प्रत्येकानें स्वतःच्या मनांत अशी इच्छा ठेवावी की ' आम्हीं सर्वांनीं ज्ञानयुक्त व्हावें. ज्ञानाची वृद्धि करीत रहावें, ज्ञानाच्या प्रगतींत अडथळा कधींहि येऊं देऊं नये. ज्ञानास विरोध न करावा अथवा मिथ्या ज्ञानाचा प्रसार न करावा.

या स्पष्टीकरणावरून विचार केला असतां या चौथ्या मंत्राचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें होतो-' आम्हीं-तत्त्व व्याख्यात्या गुरूची प्रार्थना करतों की त्यांनीं आम्हांस योग्य उत्तर द्यावें. या (प्रश्नोत्तराच्या रीतीनें) आम्हीं सर्व ज्ञानानें युक्त होत राहूं. यांत आमच्याकडून कधींहि अडथळा उत्पन्न न होवो. '

मनन

हे अथर्ववेदाच्या पहिल्या सूक्ताचे चार मंत्र शिष्यमुखानें सांगितले आहेत, त्यांचा संक्षेपानें तात्पर्यार्थ असा आहे- ' जे एकवीस पदार्थ (जगांतील मूल तत्त्वें) आकार धारण करून (सर्वत्र) पसरलेले आहेत, त्यांच्या शक्ति माझ्या (शरीरामध्यें स्थिर करण्याची विद्या) गुरु मला शिकवो. (१) हे गुरो ! तूं मनांत शुभसंकल्प धारण करून आमच्याबरोबर ये. आम्हांस खेळतां (खेळत) शिकव. प्राप्त केलेलें ज्ञान आमच्यांत स्थिर होवो. (२) धनुष्याची दोरी ज्याप्रमाणें दोन्हीं टोंकांस खेंचून ठेवते त्याप्रमाणें तूं (विद्येच्या सहाय्यानें) आपण दोघांस

खेचून ठेव (जोडून ठेव). गुरूनें नियमानें वर्तावें आणि आम्हांस हि नियमबद्धतेनें वागण्यास शिकवावें. ज्ञान आमच्यांत स्थिर होवो. (३) आम्हीं गुरूस प्रश्न विचारूं आणि गुरूनें आम्हांस उत्तर द्यावें आम्हीं सर्वांनीं ज्ञानी व्हावें, कोणीहि ज्ञानाचा विरोध न करावा (४).

या मंत्रांचें जेवढें मनन होईल, त्यांचे अर्थाविषयीं जेवढा विचार होईल, तितका ज्ञान वाढविण्याचा उपाय-(**मेधाजनन**) होऊं शकेल. वाचकांनीं याविषयीं योग्य विचार करावा, आणि स्वतःच्या परिस्थिति अनुरूप स्वतःचें ज्ञान वाढविण्याचे उपाय योजावेत. त्यांत खालीं दिलेल्या पांच गोष्टींचा अवश्य विचार करावा.

१. **विद्या**– ज्यांच्यामुळें विश्व बनतें त्या मूलतत्त्वांचें ज्ञान प्राप्त करावें आणि तें स्वतःमध्यें स्थिर करून त्याचा स्वतःच्या उन्नतीशीं संबंध जोडावा. तसेंच त्या मार्गाचें अनुष्ठान करण्याचा विधि जाणावा. हीच शिकण्यास योग्य विद्या आहे.

२. **गुरु**– वर सांगितलेली विद्या शिकविणारा गुरु (**वाचस्पतिः**) वाणीचा उत्तम प्रयोग करण्यांत समर्थ, उत्तम प्रकारें विद्या शिकविणारा असावा. (**वसोष्पतिः**) अग्न्यादि मूल तत्त्वांचा प्रयोग याथातथ्य करणारा असावा. (**असोष्पतिः**) प्राणविद्येचा ज्ञाता असावा. '**पति**' शब्द येथें 'प्रभुत्व' (Mastership) चा भावदर्शक आहे.

३. **शिकविण्याची रीत**– गुरु स्वतः (**देवेन मनसा**) मनाच्या शुभसंकल्पानें शिकवो. (**निरमय**) हंसताखेळतां शिकविण्याच्या रीतीनें शिकवो. शिष्यांचा आनंद वाढवीत त्यानें शिकवावें. स्वतः (**नि यच्छतु**) उत्तम नियमांनीं चालावें आणि शिष्यांस चालवावें. शिष्यांच्या प्रश्नांची आदरपूर्वक उत्तरें द्यावींत. (**उपह्वयतां**) आणि त्यांचें समाधान करावें.

४. **शिष्य**– शिष्यानें नेहमीं प्रयत्नपूर्वक इच्छा करावी कीं (**श्रुतेन संगमेमहि**) आम्हीं ज्ञानी व्हावें. (**श्रुतं मयि अस्तु**) प्राप्त ज्ञान माझ्या ठिकाणीं स्थिर होवो. तसेंच (**श्रुतेन मा वि राधिषि**) ज्ञानाचा विरोध कधीं करूं नये.

५. **गुरु-शिष्य**– सज्ज धनुष्याचीं दोन्हीं टोकें ज्याप्रमाणें दोरीनीं ताणलेली रहातात तद्वत् विद्यारूपी दोरीनें समाजांतील गुरुशिष्यांचे संबंध एकमेकांशीं पूर्ण संबंधित राहोत. त्यामध्यें कधींहि ढिलेपणा न येवो. ते न दुरावोत.

हें संपूर्णसूक्त शिष्याच्या मुखानें उच्चारल्यासारखें आहे. त्यावरून असेंहि अनुमान करतां येतें कीं गुरूंस मागण्याचा, त्यांच्या चरितार्थाचा खर्च वगैरेची जबाबदारी शिष्यावर अथवा शिष्यांच्या संरक्षकांवरच संपूर्णपणें असे.

अनुसंधान

या पहिल्या सूक्तांत '**मेधाजनन**' म्हणजे बुद्धीचें संवर्धन करण्याचे मूलभूत नियम सांगितले आहेत. गुरुशिष्य तसेंच विद्यालय वगैरेची व्यवस्था कशी करावी. गुरूनें कशाप्रकारें शिकवावें आणि शिष्यानें कसें शिकावें आणि या दोघांनीं मिळून राष्ट्राची उन्नति कशाप्रकारें करावी याचा विचार करण्यांत आला आहे.

मेधा बुद्धि

कांड ६, सूक्त १०८

(ऋषिः - शौनकः । देवता - मेधा, ४ अग्निः ।)

त्वं नो मेधे प्रथमा गोभिरश्वेभिरा गहि । त्वं सूर्यस्य रश्मिभिस्त्वं नो असि यज्ञिया ॥ १ ॥
मेधामहं प्रथमां ब्रह्मण्वतीं ब्रह्मजूतामृषिष्टुताम् । प्रपीतां ब्रह्मचारिभिर्देवानामवसे हुवे ॥ २ ॥

अर्थ— हे (**मेधे**) मेधा बुद्धे ! (**त्वं नः प्रथमा यज्ञिया असि**) तूं आमच्याजवळ प्रथम स्थानीं पूजनीय आहेस तूं (**गोभिः अश्वेभिः आगहि**) गाई आणि घोडे म्हणजे सर्व प्रकारच्या धनानें युक्त अशी आमच्याजवळ ये. तसेंच (**त्वं सूर्यस्य रश्मिभिः नः आगहि**) तूं सूर्यकिरणांसह आमच्याजवळ ये. [१]

(**अहं प्रथमां ब्रह्मण्वतीं**) मीं, श्रेष्ठ ज्ञानानें युक्त, (**ब्रह्मजूतां ऋषिस्तुतां**) ज्ञान्यांकडून सेविली गेलेली आणि ऋषिनीं जिची स्तुति केली आहे (**ब्रह्मचारिभिः प्रपीतां**) ब्रह्मचाऱ्यांनीं स्वीकारलेली, (**मेधां देवानां अवसे हुवे**) अशा मेधा बुद्धिला इंद्रियांच्या रक्षणासाठीं प्रार्थना करतों. [२]

यां मेधामृभवों विदुर्यां मेधामसुंरा विदुः। ऋषयो भद्रां मेधां यां विदुस्तां मय्या वेशयामसि ॥ ३ ॥
यामृषयो भूतकृतो मेधां मेधाविनों विदुः। तया मामद्य मेधयाग्ने मेधाविनं कृणु ॥ ४ ॥
मेधां सायं मेधां प्रातर्मेधां मध्यंदिनं परिं। मेधां सूर्यस्य रश्मिभिर्वचसा वेशयामहे ॥ ५ ॥

अर्थ-(ऋभवः यां मेधां विदुः) कारागीर वर्ग ज्या बुद्धिस जाणतात (असुराः यां मेधां विदुः) असु म्हणजे प्राण विशेषमध्यें रममाण होणारे जे मेधाबुद्धीस जाणतात, अथवा असुरांमध्यें जी बुद्धि आहे, (यां भद्रां मेधां ऋषयः विदुः) ज्या कल्याणकारक बुद्धिला ऋषिमंडळी जाणतात (तां मयि आ वेशयामसि) ती बुद्धि मीं माझ्यांत प्रविष्ट करतों. [३]

(भूतकृतः मेधाविनः ऋषयः) पदार्थ उत्पन्न करणारे बुद्धिमान् ऋषि (यां मेधां विदुः) ज्या बुद्धीस जाणतात, हे अग्ने ! (तया मेधया) त्या मेधा बुद्धिनें (अद्य मां मेधाविनं कृणु) आज मला बुद्धिमान् कर. [४]

(मेधां सायं) बुद्धिला सायंकाळीं (मेधां प्रातः) बुद्धिला प्रातःकाळीं (मेधां मध्यंदिनं परि) बुद्धिस दिवसाच्या मध्यभागीं (मेधां सूर्यस्य रश्मिभिः) बुद्धीला सूर्य किरणांनीं (वचसा आ वेशयामसि) आणि उत्तम वचनांनीं स्वतःमध्यें प्रविष्ट करतों. [५]

भावार्थ— धारणावती बुद्धि सर्वांत जास्त पूज्य आहे. ती सर्व प्रकारच्या धनांसह आम्हांस प्राप्त होवो. ही धारणावती बुद्धि ज्ञान्यांमध्यें असतें. ऋषि तिची प्रशंसा करतात. ब्रह्मचारी तिचें सेवन करितात. म्हणून तिची आम्ही प्रशंसा करतों. कारागीर, ऋषि आणि असुर ज्या बुद्धिसाठीं प्रसिद्ध आहेत ती बुद्धि आम्हांस प्राप्त होवो. बुद्धिमान् ऋषि ज्या बुद्धीसाठीं प्रसिद्ध आहेत. ती आम्हांस प्राप्त होवो. सकाळीं, दुपारी, सायंकाळीं तसेंच इतर कोणत्याहि वेळीं आमचा व्यवहार असा असावा कीं आम्हांस सद् बुद्धि प्राप्त व्हावी आणि आम्हांस उत्तम उपदेश प्राप्त व्हावा. [१-५]

हे सूक्त बुद्धीच्या प्रशंसेविषयीं आहे. मेधाबुद्धि म्हणजे जिला धारणावती म्हणतात ती होय. ही बुद्धि जेवढी जास्त तितकी मनुष्याची योग्यता जास्त. मनुष्य ऋषिचा सन्मान करतात त्याचें कारण हें की त्याच्यांत बुद्धि जास्त होती आणि असते. ब्रह्मचारी विद्यार्थी गुरुजवळ राहून ही बुद्धि प्राप्त करण्याची इच्छा करतात. ही बुद्धि असेल तर मनुष्य या लोकीं आणि परलोकीं उत्तम अवस्था प्राप्त करूं शकतो.

कारागीर लोकांत एक प्रकारची धारणा बुद्धि असते. असुरांमध्यें हे संपूर्ण विश्व जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असते. ऋषिमध्यें फार मोठी सत्त्वगुणी बुद्धि असते. ही बुद्धि विशेष उच्च रूपानें आम्हांस प्राप्त होवो. विशेषेंकरून जी बुद्धि ज्ञानी ऋषिमध्यें असते ती प्राप्त करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपले सर्व प्रयत्न ही बुद्धि आपणांमध्यें स्थिर होऊंन वाढेल कशी एतदर्थ व्हावयास हवेत. प्रत्येक मनुष्य जर असा प्रयत्नशील होईल तर तो अशी बुद्धि अवश्य प्राप्त करूं शकेल.

तपश्चर्येनें मेधेची प्राप्ति

कांड ७, सूक्त ६१

(ऋषिः - अथर्वा। देवता - अग्निः।)

यदंग्ने तपंसा तपं उपतप्यामंहे तपंः। प्रियाः श्रुतस्यं भूयास्मायुंष्मन्तः सुमेधसंः ॥ १ ॥

अर्थ— हे अग्ने ! (तपसा यत् तपः) तपश्चर्येनें जें तप केलें जातें (तपः उप तप्यामहे) असें तप आम्हीं करतों, त्यानें आम्हीं (श्रुतस्य प्रियाः) ज्ञानप्रिय (आयुष्मन्तः सुमेधसः भूयास्म) दीर्घायु आणि उत्तम बुद्धिवाले होऊं. [१]

अग्ने तप॑स्तप्यामह उप॑ तप्यामहे तप॑: । श्रुतानि॑ शृ॒ण्वन्तो॑ व॒यमायु॑ष्मन्तः सु॒मेधसः॑ ॥ २ ॥

हे अग्ने ! (तपः तप्यामहे) आम्ही तप करीत आहोंत आणि (तपः उप तप्यामहे) तप विशेषरीतीनें करतों. (वयं श्रुतानि शृण्वन्तः) आम्हीं ज्ञानोपदेश श्रवण करीत (आयुष्मन्तः सुमेधसः) दीर्घायु आणि उत्तम बुद्धिमान् होऊं. [२]

भावार्थ— आम्ही तप करून ज्ञान प्राप्त करूं आणि दीर्घजीवी, बुद्धिमान् आणि ज्ञानी होऊं. [१-२]

तप करण्यानें ही सिद्धि प्राप्त होते, असा या सूक्ताचा आशय आहे म्हणून ज्यांस दीर्घायुष्य आणि बुद्धिमान् होण्याची इच्छा असेल त्यांनीं तपश्चर्या करावी.

मनाची शक्ति वाढविणें

कांड २, सूक्त १२

(ऋषिः - भरद्वाजः । देवता - द्यावापृथिव्यादिनानादैवतम् ।)

द्यावा॑पृथि॒वी उ॒र्व१॒न्तरि॑क्षं क्षेत्र॑स्य पत्न्यु॑रुगा॒योऽद्भु॑तः ।
उ॒तान्तरि॑क्षमु॒रु वात॑गोपं त इ॒ह त॑प्यन्तां मयि॑ त॒प्यमा॑ने ॥ १ ॥
इ॒दं दे॑वाः शृणु॒त ये य॒ज्ञिया॒ स्थ भ॒रद्वा॑जो॒ मह्य॑मु॒क्थानि॑ शंसति ।
पाशे॒ स ब॒द्धो दु॑रि॒ते नि यु॑ज्यतां॒ यो अ॒स्माकं॒ मन॑ इ॒दं हि॒नस्ति॑ ॥ २ ॥
इ॒दमि॑न्द्र शृणुहि सोमप॒ यत्त्वा॑ हृ॒दा शोच॑ता जोह॑वीमि ।
वृ॒श्चामि॒ तं कु॑लि॒शेने॑व वृ॒क्षं यो अ॒स्माकं॒ मन॑ इ॒दं हि॒नस्ति॑ ॥ ३ ॥

अर्थ— (द्यावापृथिवी) द्युलोक आणि भूलोक (उरु अंतरिक्षं) विस्तीर्ण आकाश (क्षेत्रस्य पत्नी) क्षेत्राचें पालन करणारी सृष्टि (अद्भुतः उरुगायः) अद्भुत आणि अत्यंत प्रशंसनीय सूर्य (उत) आणि (वातगोपं उरु अंतरिक्षं) वायूस स्थान देणारें अंतरिक्ष वगैरे सर्व (मयि तप्यमाने) मीं तापलों असतां (इह ते तप्यन्तां) येथें ते सर्व तप्त होवोत. [१]

हे (देवाः) देव हो ! (ये यज्ञियाः स्थ) जे तुम्हीं सत्कार करण्यालायक आहात ते सर्व (इदं शृणुत) हें ऐका, कीं (भरद्वाजः मह्यं उक्थानि शंसति) बळ वाढविणारा मला उत्तम उपदेश देतो पण (यः अस्माकं इदं मनः हिनस्ति) जो हें आमचें मन बिघडवितो (सः दुरिते पाशे बद्धः नियुज्यताम्) त्यास पापाच्या पाशांनीं बांधून नियमबद्ध ठेवण्यांत यावें. [२]

हे (सोम-प इन्द्र) सोमपान करणाऱ्या इंद्रा ! (शृणुहि) ऐक, कीं (यत् शोचता हृदा जोहवीमि) शोकयुक्त अंतःकरणानें मीं हांका मारतों, (यः अस्माकं इदं मनः हिनस्ति) जो आमचें हें मन बिघडवतो (तं) त्याला (वृक्षं कुलिशेन इव) झाडास कुऱ्हाडीनें कापण्याप्रमाणें (वृश्चामि) मीं कापून टाकतों. [३]

भावार्थ— द्युलोक, पृथ्वीलोक, अंतरिक्षलोक तसेंच या अवकाशांत रहाणारे सर्व लोकलोकान्तर मला अनुकूल होवोत म्हणजे माझा संताप झाल्यानें ते संतप्त होवोत आणि मीं शांत होईन तेव्हां त्यांनीं शांत व्हावें. [१]

हे सत्कार करण्यायोग्य देवा ! ऐका. हा नियम आहे, कीं शक्ति वाढविणारेच दुसऱ्यांस उत्तम उपदेश करूं शकतात. परंतु शक्ति क्षीण करणारे वाईट विचारांच्या प्रेरणेनें मनाला दूषित करतात. अशा पाप्यांना पकडून बंधनांत ठेवणें योग्य आहे. [२]

हे इंद्रा ! ऐक, जो मन बिघडवतो त्याचा नाश करणें योग्य आहे. ही गोष्ट मीं हृदयाच्या आवेगानें सांगतो. [३]

अशीतिभिस्तिसृभिः सामगेभिरादित्येभिर्वसुभिराङ्गिरोभिः ।
इष्टापूर्तमवतु नः पितॄणामामुं ददे हरसा दैव्येन ॥ ४ ॥
द्यावापृथिवी अनु मा दीधीथां विश्वे देवासो अनु मा रभध्वम् ।
अङ्गिरसः पितरः सोम्यासः पापमार्छत्वपकामस्य कर्ता ॥ ५ ॥
अतीव यो मरुतो मन्यते नो ब्रह्म वा यो निन्दिषत्क्रियमाणम् ।
तपूंषि तस्मै वृजिनानि सन्तु ब्रह्मद्विषं द्यौरभिसंतपाति ॥ ६ ॥
सप्त प्राणानष्टौ मन्यस्तांस्ते वृश्चामि ब्रह्मणा । अया यमस्य सादनमग्निदूतो अरंकृतः ॥ ७ ॥
आ दधामि ते पदं समिद्धे जातवेदसि । अग्निः शरीरं वेवेष्ट्वसुं वागपि गच्छतु ॥ ८ ॥

अर्थ—(तिसृभिः आशीतिभिः सामगेभिः) तीन छंदांनीं आणि ऐंशी मंत्रांनीं सामगायन करणाऱ्यांसह तसेंच (आदित्येभिः वसुभिः अङ्गिरोभिः) आदित्य अंगिरा आणि वसूंसह (पितॄणां इष्टापूर्तं नः अवतु) पितरांसाठीं करण्यांत आलेलें यज्ञयागादि शुभकर्म आमचें रक्षण करो. मीं (दैव्येन हरसा अमुं आददे) दिव्य क्रोध अथवा बळानें याला पकडतों. [४]

(द्यावापृथिवी मा अनु आदीधीथां) द्युलोक आणि भूलोक मला अनुकूल होऊन प्रकाशित होवोत. हे (विश्वे देवासः) सर्व देव हो ! (मा अनु आ रभध्वं) मला अनुकूल होऊन कार्यारंभ करा. हे (अङ्गिरसः सोम्यासः पितरः) अंगिरस सोम्य पितर हो ! (अपकामस्य कर्ता पापं आ ऋच्छतु) अनिष्टकार्य करणारा पापास प्राप्त होवो. [५]

हे (मरुतः) मरुत हो ! (यः अतीव मन्यते) जो स्वतः स्वतःला थोर समजतो, (यः वा नः क्रियमाणं ब्रह्म निन्दिषत्) अथवा जो आम्हीं करीत असलेल्या ज्ञानाची निंदा करतो, (वृजिनानि तस्मै तपूंषि सन्तु) सर्व कार्यें त्यास तापदायक होवोत, तसेंच (द्यौः ब्रह्मद्विषं संतपाति) द्युलोक त्या ज्ञान विरोध्याला पुष्कळ ताप देवो. [६]

(ते तान् सप्तप्राणान्) तुझ्या त्या सात प्राणांना आणि (अष्टौ मन्यः) आठ मज्जाग्रंथींना मीं (ब्रह्मणा वृश्चामि) ज्ञानाच्या शस्त्रानें कांपून टाकतो. उघडून टाकतो, तूं (अग्निदूतः अरंकृतः यमस्य सादनं अयाः) अग्नीचा दूत होऊन तयार होऊन यमाच्या घरीं जा. [७]

(समिद्धे जातवेदसि) प्रदीप्त अग्नींत (ते पदं आदधामि) तुझें स्थान ठेवतों. (अग्निः शरीरं वेवेष्टु) हा अग्नि शरीरांत प्रवेश करो. (वाक् अपि असुं गच्छतु) वाणीसुद्धां प्राणांस प्राप्त होवो. [८]

भावार्थ— ज्यामध्यें तीन छंद आणि ऐंशीं मंत्रांनीं सामगायन करतात त्या यज्ञांत वसु-रुद्र-आदित्यांसह पितरांकडून करविलेले यज्ञयाग वगैरे शुभ कर्मे आमचे रक्षक होवोत. त्या सत्कर्मांनीं आमचीं मनें शुद्ध राहोत. जो पापी आमचें मन निर्बल करण्याचा प्रयत्न करतो त्याला मीं दिव्यबळानें पकडतों. [४]

द्युलोक आणि भूलोकांतील सर्व वस्तु मला अनुकूल होवोत. सर्व अग्नि वगैरे देव मला अनुकूल होवोत. हे पितर हो ! अनिष्ट-कार्य करणारा पापी होऊन पतित होवो. [५]

हे मरुत् हो ! जो घमेंडी मनुष्य स्वतः स्वतःला इतर सर्वांपेक्षां महान् समजतो, एवढेंच नव्हे परंतु आम्हीं जो ज्ञान संग्रह करतों त्याची सुद्धां जो निंदा करतों, त्याला सर्व कर्मे कष्टप्रद होवोत. कारण की जो सत्यज्ञानाला विरोध करतो त्याला द्युलोक पुष्कळ ताप देतो. [६]

तुझ्या सात प्राण आणि आठ मज्जास्थानांना मीं ज्ञानानें उघडतो. तूं अग्निदूत होऊन यमाच्या घरीं जा. [७]

या प्रदीप्त ज्ञानाग्निमध्यें मीं तुझें स्थान ठेवतों. हा अग्नि तुझ्यामध्यें प्रविष्ट होवो. आणि तुझी वाणीसुद्धां प्राणास प्राप्त होवो. [८]

मनाचें बल वाढविणें

मानसशक्तीचा विकास

मनाच्या शक्तीनें मनुष्याची योग्यता निश्चित होते. ज्याचें मन शुद्ध आणि पवित्र तो महात्मा होतो; आणि ज्याचें मन अशुद्ध आणि मलीन विचारांनीं युक्त त्याला दुष्ट म्हणतात. अथर्ववेद कांड ११, सूक्त १ मध्यें आत्म्याचें गुणवर्णन करून तद्द्वारा आत्मिक बळ वाढविण्याचा उपाय सांगितला आहे. त्याची पूर्तता करण्यासाठीं या सूक्तांत मानसशक्तीच्या विकासाचा मार्ग दाखविला आहे. कारण कीं आत्मिक शक्तीच्या विकासासाठीं मानसिक शुद्धतेची सुद्धां अत्यंत आवश्यकता आहे. मन मलीन असलें तर आत्मिक बल वाढूंच शकणार नाहीं.

मानसिक शक्ति-विकासाचें साधन
त्यागभावना

मानसिक बल वाढविण्याचें नांव या सूक्तांत ' **भरद्वाजः** ' म्हणजे ' **भरत्+वाजः** ' = **वाजः+भरत्** ' बल भरणारा असें सांगितलें आहे. ' **वाजः** ' चा अर्थ तूप, अन्न जल, प्रार्थना, अर्पण, यज्ञ, शक्ति, बल, वेग, धन, गति, युद्ध आणि शब्द ' इतके आहेत त्यामध्यें, तूप, पाणी आणि अन्न हे शारीरिक पुष्टि करणारे आहेत, परंतु जर ते पदार्थ शुद्ध सात्त्विक स्वरूपांत सेवन करण्यांत आले तर मनाला सुद्धां सात्त्विक बनवितात. जलाचा प्राणाच्या शक्तीशीं संबंध आहे. धनाचा आर्थिक बलाशीं संबंध आहे. अर्पण, आत्मसमर्पण यज्ञ ज्यामध्यें आत्मसर्वस्वाची आहुति देणें मुख्य भाग आहे, हें यज्ञरूप कर्म आत्मिक बल वाढवितें. युद्ध क्षात्रबल वाढवितें. परमेश्वराची प्रार्थना मानसिक बल वाढविते. वाज शब्दाचे जेवढे अर्थ आहेत त्याची संगति याप्रमाणें आहे. येथें बल वाढविण्याच्या साधनांचाहि परिचय झाला. वाचक विचार करतील तर या साधनांनीं स्वतःचें बल वाढविण्याचा उपाय त्यांना ज्ञात होईल. असें बल जो वाढवितो, त्याचें नांव ' **भरद्-वाजः** ' असतें. हा भरद्वाज आत्मिक बल वाढविण्याचें साधन सर्वांना याप्रकारें सांगत आहे—

शुभवचन

भरद्वाजः मह्यं उक्थानि शंसति । (मं. २)

' बळ वाढविण्याचें सूक्त मला सांगतो. ' म्हणजे उत्तम वचन अथवा ईशगुणगानाचें स्तोत्र सांगतो. हें शुभवचन सांगितल्यानें त्याचें मनन केल्यानें, तें स्वतःच्या मनांत स्थिर केल्यानेंच मनाची शक्ति वाढूं शकते. परमेश्वर भक्ति, उपासना, सद्भावनांचें मनन हेंच सूक्तशंसन आहे. त्यामुळें मनाची पवित्रता होऊन तद्द्वारा मानसिक शक्ति विकसित होते.

ज्ञान

या ' ज्ञानाग्नी ' लाच ' **जात-वेद अग्नि** ' म्हटलें आहे. ज्यांतून वेद प्रगट झाले तोच जातवेद अग्नि होय. ज्यापासून ज्ञान प्रकाशित झालें तोच हा अग्नि होय. त्याला ज्ञानाग्नि, ब्रह्माग्नि, आत्माग्नि, जातवेद वगैरे अनेक नांवें आहेत. मानसिक शक्ति विकास अथवा आत्मिक बल वृद्धि करण्याची ज्याची इच्छा आहे त्यानें या अग्नीला शरण जाणें योग्य आहे. त्याविषयीं आठव्या मंत्रांत म्हटलें आहे—

आ दधामि ते पदं समिद्धे जातवेदसि ।
अग्निः शरीरं वेवेष्टु असुं वागपि गच्छतु ॥ (मं. ८)

' या पेटलेल्या जातवेद नांवाच्या ज्ञानाग्नीमध्यें तुझा पाय ठेवतो. हा ज्ञानाग्नि तुझ्या शरीराच्या रोमरोमांत प्रविष्ट होवो. आणि तुझी वाणी सुद्धां प्राणाग्निजवळ जावो. ' जो मनुष्य स्वतःचें आत्मिक तसेंच मानसिक बल वाढविण्याची इच्छा करतो त्यानें स्वतः ज्ञानयुक्त असलें पाहिजे. ज्याप्रमाणें लोखंड अग्नींत पडल्यानें थोड्या वेळांत अग्निरूप होऊन जातें, त्याप्रकारें ज्ञानाग्नींत पडलेला मनुष्य थोड्याच समयांत स्वतःस्वतःला ज्ञानाग्नीनें जातवेद अग्नीनें प्रदीप्त झालेला पाहूं शकतो. हीच ज्ञानावस्था आहे.

जीवित वाणी— यावेळीं त्याच्या वाणींत एकप्रकारची प्राणशक्ति प्रकाशित होते. जणूं काय वाणी जीवित असल्यासारखी होते. (**वाक् असुं गच्छति**) वाणी प्राणास प्राप्त करते. सामान्य मनुष्याची वाणी मेलेली असते. परंतु या ज्ञान्याची वाणी जीवित असते. तो ज्यास सिद्धपुरुष म्हणतात त्याच्यासारखा होतो. हा जीवित वाणीचा साक्षात्कार आहे.

शाखा छेदन

वांकड्या तिकड्या फांद्या कापून वृक्षास सुंदर घाटदार करण्यांत येतो. वृक्षावर जर वेलींचा भार वाढला तर वृक्षाला वाढण्यास जागा करून देण्यासाठीं त्या वेली कापून टाकणें जरूरीचें असतें. म्हणजे उद्यानांतील वृक्षास वाटेल तसें वाढूं देणें हें योग्य नसतें त्याचप्रकारें या अश्वत्थ वृक्षाविषयीं जाणावें. त्याविषयीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे—

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥१॥ अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः । अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥२॥ न रूपमस्येह तथोपलभ्यते नाऽन्तो न चाऽऽदिर्न च संप्रतिष्ठा । अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥ (गी. अ. १५)

' मुळें वर आणि ज्याच्या डहाळयाखालीं पसरलेल्या आहेत. असा हा अश्वत्थ वृक्ष आहे. वर आणि खालीं त्याच्या शाखा पुष्कळच पसरल्या आहेत. या शाखांना असंग शस्त्रानें कापून वृक्ष ठाकठीक केला पाहिजे. ' त्यानंतर उन्नतीचा मार्ग विदित होऊं शकतो. याविषयीं सातव्या मंत्रांत म्हटलें आहे तें आतां पहा—

सप्तप्राणानष्टौ मन्यस्तांस्ते वृश्चामि ब्रह्मणा । अया यमस्य सादनमग्निदूतो अरंकृतः ॥ (मं. ७)

' सात प्राणांना आणि आठ गांठींना मीं ज्ञानानें कापतों, तोडतों अथवा सोडतों तूं अग्नीचा दूत होऊन यमाच्या घरीं जा. ' या सातव्या मंत्रांत सात प्राण आणि आठ मज्जाग्रंथींना (**वृश्चामि**) कापण्याचा उल्लेख आहे. आणि येथें कापण्यासाठीं शस्त्र ' **ब्रह्म** ' म्हणजे ज्ञान, भक्ति, प्रार्थना उपासना, स्तोत्र, वगैरे प्रकारचें आहे. ब्रह्म शब्दाचा अर्थ ज्ञान वगैरे प्रसिद्ध आहे. वाचकांनीं येथें असा विचार करावा कीं ज्ञान अथवा 'ईश उपासना' (**ब्रह्मणा वृश्चामि**) शस्त्र बनून कधीं कोणाला कापूं शकेल काय ? जर ती शस्त्र होऊन कोणास कापत असेल तर कोणास ? त्याविषयीं विचार केला पाहिजे.

असंगशस्त्र आणि ब्रह्मास्त्र

गीतेंत असंगशस्त्रानें झाड कापण्याचा उल्लेख आहे. तेथें निरनिराळया वासनांना असंगशस्त्रानें झाड कापण्याचा भाव आहे. वासना भोगाच्या इच्छेनें प्रसरतात. आणि भोगसुद्धां इंद्रिय विषयक असतात. म्हणजे असंगशस्त्रानें ज्या शाखा कापावयाच्या त्या शाखा इंद्रियभोगरूपी वृत्ति आहेत. भगवद्गीतेचा हा आशय मनांत घेऊन जर आम्हीं या मंत्रांतील सप्तप्राणांना ब्रह्मास्त्रानें कापण्याचें वर्णन पाहिलें, तर स्पष्ट होईल कीं येथें एक विशेष अलंकार आहे. दोन्ही ठिकाणीं क्रियांचा अर्थ एकच आहे—

अश्वत्थं ... असंगशस्त्रेण छित्वा ॥ (भ. गी. १५।३)
सप्तप्राणान् ... ब्रह्मणा वृश्चामि ॥ (अथर्व. २।१२।७)

' **वृश्चामि** ' चा अर्थ सुद्धां कापण्याचा आहे. दोन्ही ठिकाणीं शस्त्रें अभौतिकच आहेत, (**असंग**) वैराग्य आणि (**ब्रह्म**) ज्ञान, उपासना; तसें पाहिलें तर वैराग्य आणि ज्ञान हे शब्द भिन्न आहेत, तरीसुद्धां एकाच गोष्टींत समानार्थक होणारे आहेत. आत्मसाक्षात्कारांत दोन्ही परस्पर उपकारकच असतात. वैराग्यावांचून आत्मज्ञान होणें कठीण अथवा असंभवच आहे. त्याचप्रमाणें विचार केल्यानें ध्यानीं येईल कीं ज्या शाखाविस्तारास भगवद्गीता कापूं इच्छिते, त्याच शाखा विस्तारास हे वेदमंत्रहि कापूं इच्छितात, हें सिद्ध करण्यासाठीं ' सप्तप्राण ' कोणते त्याचा शोध आपणास करावयास हवा—

सप्तप्राण

१ **प्राणा इन्द्रियाणि ॥**
(ताण्ड्य ब्रा. २।१४।२; २२।४।३)

२ **सप्तशिरसि प्राणाः ॥**
(ताण्ड्य ब्रा. २।१४।२, २२।४।३)

३ **सप्त शीर्षन् प्राणाः ॥** (शत. ब्रा. ९।५।२।८)

४ **सप्त वै शीर्षन् प्राणाः ॥**(ऐ.ब्रा. १।१७,तै.ब्रा.१।३३)

(१) प्राण हेच इंद्रियें आहेत. (२-४) मस्तकांत सात प्राण म्हणजे इंद्रियें आहेत. या प्रकारचें स्पष्टीकरण सप्तप्राणाविषयीं वैदिक सारस्वतांत केलेलें आहे. त्यावरून सप्तप्राण म्हणजे आपलीं सात इंद्रियेंच आहेत याविषयीं कोणास शंका रहात नाहीं. कित्येकांच्या मतें हीं इंद्रियें, दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या आणि तोंड मिळून सात होत; तर कित्येकांच्या मतें, कान, त्वचा, नेत्र, जिह्वा, नाक, शिस्न आणि मुख हीं सात होत. या सातांचे अनुक्रमें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, काम आणि भाषण हे सात भोग आहेत. त्यांच्यामुळें मनुष्याची उत्तम, मध्यम अथवा निकृष्ट गति होते. दोन्ही मतांचें तात्पर्य एवढेंच कीं इंद्रियरूपी साधनद्वारा मनुष्य वासनांच्या जाळयांत फसतो, आणि भोग भोगण्याच्या इच्छेनें रोगाच्या भयांत ग्रस्त होतो. त्या सात इंद्रियांच्या शाखा ज्ञानाच्या शस्त्रानें कापल्या पाहिजेत. ज्याप्रकारें माळी स्वतःच्या उद्यानांत वांकडी तिकडी वाढणारी झाडें कापून वांकडी वाढूं देत नाहीं; त्याप्रमाणें शरीररूपी क्षेत्रांत कार्य करणारा हा जीवात्मारूपी माळी आहे. त्यानें या सात वृक्षांना स्वतःच्या बगीचांत वांकडेतिकडे वाढूं देणें योग्य नाहीं. जर ते तसे वाढूं लागले, तर ज्ञानरूपी कुऱ्हाडीनें मर्यादेबाहेर वाढणाऱ्या शाखा कापून त्यांना त्यांच्या मर्यादेंत ठेवणें योग्य होईल.

याचा स्पष्ट आशय असा कीं जर हीं इंद्रियें वाईट व्यवहार करतील तर त्यांना असंगाच्या नियमानें नियमित ठेऊन, बद्ध करून, संयमपूर्ण वृत्तीनें त्यांचें दमन केलें पाहिजे. इंद्रिय दमनानें

आध्यात्मिक वृत्ति-शक्ति विकसित होऊं शकते. शाखा छेदनाचें तात्पर्य असें आहे.

आठग्रंथि– या सातव्या मंत्रात (**अष्टौ मन्यः**) आठ ग्रंथि अथवा धमन्या आहेत त्यांस सुद्धां छेदण्याचें विधान केलें आहे. या आठ मज्जाग्रंथि आहेत. त्यांमधून विलक्षण जीवनरस शरीरांत प्रवाहित होतो. गुदा, नाभी, पोट, हृदय, गळा, टाळू, भ्रूमध्य, मस्तक या स्थानीं या आठ प्रधान ग्रंथी आहेत; आणि त्यांच्यातून जो जीवनरस वहात येतो, तेणेंकरून त्या त्या स्थानास जीवन प्राप्त होतें. त्यांपासून प्राप्त होणारा जीवनरस तर आवश्यक आहेच, परंतु जर कधीं त्यापासून हीन प्रवृत्ति होऊं लागली तर त्या हीन वासनांचा नाश केलाच पाहिजे. पहा, गुदेजवळच्या मज्जाग्रंथींतून वीर्यासह जीवनरस प्राप्त होतो. त्यामुळेंच स्त्रीपुरुष विषयक कामेच्छा होते आणि तिच्या अतिरेकानें मनुष्याचें पतन होतें. तरीसुद्धां कामधर्म मर्यादेंत राखावा आणि शेषजीवन ब्रह्मचर्यानें घालविलें तर येथील दिव्यशक्ति ईशभक्तींत परिणत होते. याप्रकारेंच इतर ग्रंथींविषयीं समजावें. या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानीं आलें असेल कीं, ज्याप्रमाणें बाह्येंद्रियांचा संयम आवश्यक आहे, त्याप्रमाणें या ग्रंथीसुद्धां ताब्यांत ठेवणें आवश्यक आहे. योगांत त्यास ' ग्रंथीभेद, चक्रभेद, ' वगैरे संज्ञा आहेत. त्याचा अर्थ इतकाच की ज्याप्रकारें आपल्या मनाच्या प्रेरणेनें हातापायांचे हलनचलन होतें; त्याचप्रमाणें या अष्टग्रंथींचें कार्य आपल्या इच्छेनुरूप होऊं शकतें. इंद्रियें आणि या ग्रंथी यांस संपूर्णपणें ताब्यांत ठेवणें याचें नांव आहे शाखाछेदन. हा श्रेष्ठ संयम आहे. आणि हेंच शाखाछेदन (**ब्रह्मणा वृश्चामि**) ज्ञानरूपी शस्त्रानें होणें संभवनीय आहे. आतां येथें मंत्रांची संगति पहा—

संयमाचा मार्ग– १ **समिद्धे जातवेदसि पदं** = ज्यानें प्रदीप्त जातवेदामध्यें म्हणजे ज्ञानाग्निमध्यें स्वतःचें स्थान स्थिर केलें आहे (मं. ८) २. **अग्निः शरीरं वेवेष्टु**= ज्याच्या शरीराच्या रोमरोमांत हा ज्ञानाग्नि पेटला आहे. (मं. ८) ३. **वाग् अपि असुं गच्छतु** = ज्याची वाणीसुद्धां प्राणमय म्हणजे जीवितदशेला प्राप्त झाली आहे. (मं. ८) ४ **सप्तप्राणान् वृश्चामि** = सात प्राणांचें म्हणजे सात इंद्रियांच्या शाखांचें ज्यानें छेदन केलें आहे; म्हणजे इंद्रियें वश केलीं आहेत. (मं. ७) ५ **अष्टौ मन्यान वृश्चामि** = आठ मज्जाकेंद्रांचें सुद्धां छेदन केले आहे म्हणजे आठ चक्रभेदांनीं त्यांस स्वतःच्या वश केलें आहेत.

मृत्यूला दूर करण्याची विद्या–तो आत्मिक बलानें बलवान् होतो आणि तोच मृत्यूच्या भयापासून दूर होतो. अथवा निर्भय होऊन यमाच्या घरीं जाईल. सर्व प्राण्यांस मरावयाचें असतेंच, पण निर्भय होऊन मरणें ही एक स्वतंत्रच गोष्ट आहे. आणि भीतीनें मरणें तें वेगळेंच. सर्व मनुष्यें मृत्यूला भीतात. मृत्यूला दूर करण्याची विद्या या सूक्तांत सांगितली आहे. मंत्रांतील शब्द पहा—

अरंकृतः अग्निदूतः यमस्य सदनं अयाः। (मं. ७)

' (**अरंकृतः**) अलंकृत (**अग्नि-**) ज्ञानाग्नीचा (**दूतः**) सेवक बनून यमाच्या घरीं जा. ' कारण कीं आतां तुला यमाची भीति नाहीं. जी अज्ञानावस्था होती ती नाहिशी झाली. ही मृत्यूची भीति दूर करण्याची विद्या आहे. जणूं काय ती मरणाची विद्या आहे असें समजावें. जीवित अवस्थेंत ही विद्या प्राप्त केली पाहिजे. ज्यानें इंद्रिय संयम केला आहे, ज्यानें स्वतःच्या जीवनशक्ति स्वतःच्या आधीन ठेवल्या आहेत, ज्याचें जीवन ज्ञानानें परिशुद्ध प्रशस्ततम कर्ममय झालें आहे आणि जो सत्यज्ञानाच्या प्रसारासाठीं स्वतः स्वतःला अर्पण करतो, तो कधींतरी मृत्यूला भीईल काय ? तो तर निर्भय होऊन मृत्यूजवळ जाईल. त्याप्रमाणें पहा—

निर्भय ऋषिकुमार– कठोपनिषदांत गोष्ट आहे कीं नचिकेता ऋषिकुमार यमाजवळ गेला होता. तो तीन रात्रीपर्यंत यमाजवळ राहिला. त्याला पाहून यमाला सुद्धां भीति वाटली. त्याला प्रसन्न करण्यास यमराजानें त्याला तीन वर दिले. हे तीन वर म्हणजे जणूंकाय तीन प्रचंड शक्ति होत्या. परंतु त्या तीन शक्तींच्या सहाय्यानें त्या ऋषिकुमारानें आपले भोग वाढविले नाहींत, परंतु ज्ञानाग्नीमध्येंच त्या तीन शक्तींचा व्यय केला. यमराजानें अनेक भोग त्याच्या समोर ठेवले, परंतु त्या ऋषिकुमारानें स्वतःच्या ज्ञानशस्त्रानें वासनारूपी शाखा कापून टाकल्या. त्यामुळें भोग स्वीकारण्यास त्याला स्वादच राहिला नाहीं. भोग त्यजून फक्त ज्ञानप्राप्तीची इच्छा त्यानें केली. आणि या त्यागवृत्तीमुळें शेवटीं त्यानें ज्ञान प्राप्त केलें. यमाच्या बरोबरीनें तो ऋषिकुमार राहिला, आणि बरोबरीनें परत आला. असें कां झालें ? वाचकांनीं विचार करावा. नचिकेता ऋषिकुमार अग्नीचा दूत होऊन, ज्ञानाचा सेवक होऊन भोगेच्छांचा त्याग करून यमाजवळ गेला होता. त्यामुळें तो निर्भय होता. जीं मनुष्यें भोगेच्छेनें यमाजवळ जातात तीं भीत भीत जातात आणि पकडलीं जातात. हा सामान्य मृत्यू आणि ज्ञान्याचा मृत्यू यांत भेद आहे. ही वेदाची मृत्यु विद्या आहे.

आत्मवद्भाव– एकाच्या दुःखानें दुसरा दुःखी

येथपावेतों जें आत्मोन्नतीचें वर्णन केलें आहे, त्याविषयीं विचार केला असतां ज्ञानाच्या उच्चावस्थेची कल्पना येईल. त्या ज्ञान्याच्या मनांत ' **आत्मवद्भाव** ' यावेळीं जीवंत-जागृत होतो. तो सर्व प्राणीमात्रांस स्वतः प्रमाणें पाहूं लागतो. जें असें दुःख स्वतःस होतें तें– तसेंच सर्व प्राणीमात्रांस स्वतःप्रमाणेंच होतें असी

त्याची भावना झालेली असते. तो स्वतःमध्यें आणि इतरांत कांहीं भेद पाहूं शकत नाहीं, इतरांच्या दुःखानें स्वतः दुःखी आणि इतरांच्या सुखानें स्वतः सुख मानण्याइतक्या उच्च मनोवस्थेला तो पोहोंचलेला असतो. त्यामुळें ज्यावेळीं तो संतप्त होतो, तेव्हां सर्व प्राणीमात्रसुद्धां संतप्त होतात. जेव्हां ज्ञानी पुरुष दुसऱ्याचें दुःख स्वतःवर घेतो आणि सर्व जगाच्या दुःखाचा भार आनंदानें स्वीकारतो, तेव्हां त्याच्या दुःखांत सर्व जग भागीदार असतें, हा नियम आहे. हा परस्पर संवेदनेचा सार्वत्रिक नियम आहे. ज्याप्रमाणें तंतुवाद्याच्या एक स्वरांत जुळवलेल्या तारांपैकी एक वाजवितांच दुसऱ्यासुद्धां वाजूं लागतात त्याप्रमाणें या ज्ञान्याच्या सर्वात्मभाव जीवनानें सर्व जगांत समान संवेदना उत्पन्न होते. ही आत्मवद्भावाची परम उच्चावस्था आहे तीच या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत सांगितली आहे.

मयि तप्यमाने इह ते तप्यन्ताम् । (मं. १)

' मीं संतप्त होतांच ते सर्व संतप्त होतील, ' पृथ्वी, अंतरिक्ष द्युलोक, मधील अवकाश, मेघमंडळ, सूर्य वगैरे जेवढीं स्थानें आहेत, तीं सर्व स्थानें आणि त्यांत रहाणारे भूतमात्र यांचे क्लेश मीं मजवरती घेतों. जगतास सुखी करण्यासाठीं मीं स्वतः स्वतःला समर्पित करतों. मीं जगाचें दुःख पाहूं शकत नाहीं. जग सुखी होवो आणि त्याचें दुःख मजवर येऊन पडो, या प्रकारची भावना ज्याच्या रोमरोमांत भरली आहे, ज्याच्या दैनिक जीवनांत उतरली आहे, तो स्वतःस जगाशीं एकरूप पाहूं शकतो. जगास स्वतःच्या आत्म्याप्रमाणें समजतो; अथवा असें म्हणा कीं जगाच्या दुःखानें दुःखी होतो. असा महात्मा जेव्हां संतप्त होतो त्यावेळीं सर्व भूतमात्र सुद्धां संतप्त होऊन जातात. ही अवस्था प्रथम मंत्रद्वारा दर्शविली आहे.

ही मनुष्याच्या उन्नतीची परमोच्च अवस्था आहे. या अवस्थेप्रत पोहोंचलेला ज्ञानी, इतरांच्या दुःखानें दुःखी होतो; आणि त्याच्या दुःखानें इतरहि दुःखी होतात. या पूर्णावस्थेंत जगाशी त्याची समसंवेदना असते. मनाचें बळ वाढतां वाढतां आणि आत्म्याची शक्ति वाढल्यानें, मनुष्य अशा उच्चावस्थेस पोहोंचतो. आतां जीं मनुष्यें या ज्ञानमार्गाशीं विरोधी असतात त्यांची काय स्थिति होते, तें सुद्धां पहाण्यासारखें आहे—

ज्ञानाचे विरोधी– जे ज्ञानाचे विरोधी आहेत, जे स्वःतच्या मनाचें पतन होईल अशीं कार्यें करतात, जे दुसऱ्याची मनें निर्बल करण्याच्या उद्योगांत रहातात त्यांची दशा काय होते तें या सूक्ताच्या मंत्रांतील शब्दांत पहा—

१ **यः अतीव मन्यते–** जो स्वतः स्वतःला अहंकारानें, घमेंडीनें फार मोठा समजतो, स्वतःपेक्षां दुसरा कोणी जास्त श्रेष्ठच नाहीं असें मानतो. (मं. ६)

२ **क्रियमाणं नः ब्रह्म यः निन्दिषत्=** करण्यांत येणाऱ्या आमच्या ज्ञानकर्माच्या संग्रहास जो निंदितो, आमचें ज्ञान संपादन, ज्ञानरक्षण आणि ज्ञानवर्धन वगैरेंच्या प्रयत्नांची जे निंदा करतात. (मं. ६)

३ **वृजिनानि तस्मै तपूंषि सन्तु=** सर्व कर्में त्याला तापदायक होवोत. त्याला त्याच्या प्रत्येक कर्मानें पीडा-कष्ट होवोत, कोणत्याहि कर्मानें त्यास शांति प्राप्त न होवो. (मं. ७)

४ **द्यौः ब्रह्मद्विषं अभि संतपाति=** प्रकाशमान् द्युलोक ज्ञानाच्या विद्वेष्ट्याला चारी बाजूंनीं संतप्त करो. ज्ञानाच्या विद्वेष्याला कोणत्याहि प्रकारें शांति मिळणार नाहीं. (मं. ७)

ज्ञानाच्या विरोध्याचें (**ब्रह्मद्विष्**) उत्तम वर्णन या मंत्रांत झालें आहे. तें इतकें स्पष्ट आहे कीं त्याचें अधिक स्पष्टीकरण करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. जास्त घमेंडींत असणें हेंहि खोट्या ज्ञानाचें अथवा अज्ञानाचें द्योतक आहे. आणि तें अत्यंत घातक आहे. जे स्वतः ज्ञान वाढविण्याचे प्रयत्न करूं शकत नाहींत, त्यांचे असो. पण दुसरे प्रयत्न करीत असतील त्यांस अडथळा उत्पन्न करतां नये. परंतु जो स्वतः मिथ्या ज्ञानानें मलीन झालेला मनुष्य दुसऱ्या ज्ञान्यांस त्रास देऊं लागला तर त्याचें अधिक पतन होतें. अशा प्रकारे पतन पावणाऱ्या अज्ञानी मनुष्याचे सर्वच प्रयत्न कष्टकारक ठरतात, त्याच्या कर्मामुळें ज्याप्रमाणें त्यास कष्ट होतात, त्याप्रमाणेंच जनतेचे कष्ट सुद्धां वाढतात. कारण कीं त्याच्या अज्ञानानें अथवा मिथ्याज्ञानामुळें तो जें कांहीं करतो तें भ्रांत चित्तानेंच करतो. त्यामुळें जसा त्याचा नाश होतो, तसा त्याच्याशीं संबंध ठेवणाऱ्यांचा सुद्धां नाश होतो. ही गोष्ट ६ व्या मंत्रांत सांगितली आहे. आतां असें वाईट कर्म करणाऱ्यांची दशा मधल्या चार मंत्रांत वर्णिली आहे. ती पहा—

१ **अपकामस्य कर्ता पापं आ ऋच्छतु ।** (मं. ५)
२ **यः अस्माकं इदं मनः हिनस्ति स दुरिते पाशे बद्धः नियुज्यताम्** (मं. २) ।
३ **अमुं दैव्येन हरसा आददे ।** (मं. ४)
४ **यः अस्माकं इदं मनः हिनस्ति तं कुलिशेन वृश्चामि ।** (मं. ३)

' (१) हें कुकर्म करणाऱ्यांस पाप लागेल. (२) जे आमचें मन बिघडवितात त्यांना पापाच्या पाशांत बांधून नियमांत ठेवावें. (३) त्याला दिव्य क्रोध अथवा बळानें पकडून ठेवतों. (४) जे आमचें मन बिघडवितात त्यांना शस्त्रानें कापतों. '

हीं चार वाक्यें चार मंत्रांची शेवटचीं आहेत. त्यांत एका-

*

पेक्षां दुसऱ्यांत जास्तच शिक्षा क्रमानें सांगितल्या आहेत. पहिल्या वाक्यांत फक्त त्याला पाप लागेल एवढेंच म्हटलें आहे. दुसरें वाक्य सांगतें कीं त्यास बांधून नियमबद्ध ठेवण्यांत यावें. येथें नियमबद्धाचा अर्थ कैदेंत असा आहे. तिसऱ्या वाक्यांत देवतांचा कोप त्याचे वर होवो असें म्हटलें आहे. आणि चौथ्या वाक्यांत शस्त्रानें त्याचें मस्तक कापण्याची गोष्ट सांगितली आहे. या एकापेक्षां एक वाढत्या कडक शिक्षा कोणास सांगण्यांत आल्या आहेत त्यांचा येथें विचार केला पाहिजे. मनास बिघडविण्याचें पाप फार मोठें आहे. पण जे हें पाप एकवार करतात. आणि एका मनुष्यासंबंधीं करतात, त्यांचा अपराध कमी आहे. आणि जो मनुष्य स्वतःच्या विशेष संघामार्फत दुसऱ्या समस्त जातीचें मन बिघडविण्याचा प्रयत्न करतो अथवा समस्त ज्ञान्यांच्या ज्ञान प्राप्तींत अडथळा आणतो, त्याचें पाप जास्त होय. या प्रकारच्या तुलनेनें पापाचें न्यूनाधिक्य समजावें, आणि अपराधास अनुकूल दंड देणें योग्य आहे. हा दंड सुद्धां व्यक्तीनें द्यावयाचा असत नाहीं. परंतु राजसभेकडून देणें हें योग्य होय.

दुसऱ्याच्या ज्ञानवृद्धीमध्यें हरकत करणें हें महान् पाप आहे. त्यामुळें दुसऱ्याची व त्याबरोबर स्वतःची अधोगति होते. म्हणून कोणीहि मनुष्यानें असें पापकर्म करूं नये.

आनुवंशिक संस्कार- सर्वांत पहिली गोष्ट आनुवंशिक संस्कार ही होय. ज्याचा वंश शुद्ध असतो, ज्याच्या वंशांत सत्पुरुष निर्माण झाले आहेत, ज्यांचीं मातापितरें शुद्ध अंतःकरणाचीं आहेत, म्हणजे लहानपणापासून ज्याच्या घरांत शुद्ध वायुमंडल असेल, असा मनुष्य अज्ञानांत फसणें याचा संभव सहसा कमी असतो. त्याविषयीं चौथ्या मंत्रांत म्हटलें आहे.

तिसृभिः अशीतिभिः सामगेभिः वसुभिः अङ्गिरोभिः आदित्येभिः पितॄणां इष्टापूर्तं नः अवतु ॥ (मं. ४)

' वसु, रुद्र आदित्य देवांचें साम गायनपूर्वक आमच्या पितरांकडून केलें गेलेलें यज्ञयागादि शुभकर्म आमचें रक्षण करो ' परिवारांत जें जें प्रशस्त कर्म असतें, तें निःसंशय परिवारांतील लोकांना वाईट संस्कारापासून वांचवितें. मातापित्यांनीं केलेलें शुभकर्म याप्रमाणें मुलांबाळांस शुभ धर्म मार्गानें सुरक्षित ठेवतें, यासच आनुवंशिक शुभसंस्कार म्हणतात. आमचें म्हणणें असें नाहीं कीं ज्यांच्यावर असें शुभसंस्कार झाले नाहींत, ते अधर्माचरण करणारेच आहेत. पण शुभ कर्मं उत्तम मार्गानें जाण्यास अवश्यच मदत करतें एवढाच आमच्या सांगण्याचा हेतु आहे. म्हणून कुटुंबांतील मुख्य पुरुषानें स्वतः अशीं कर्में करावींत कीं जेणेंकरून त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबीयांवर शुभसंस्कार होत रहातील. असें करणें त्याचें आवश्यक कर्तव्य आहे.

ईश-प्रार्थना

आनुवंशिक संस्कार स्वतःच्या आधीन असत नाहींत. कारण कीं तीं कर्में करणारे दुसरे असतात. म्हणून जर ते संस्कार चांगले असले तर उत्तमच, पण जर ते संस्कार वाईट असले तरी सुद्धां घाबरण्यासारखी गोष्ट नाहीं. स्वतःस्वतःच्या शुद्धीचें प्रयत्न केल्यानें निःसंशय सिद्धि प्राप्त होईल. या दिशेनें आत्मशुद्धीचे प्रयत्न करण्यासाठीं ईशप्रार्थना हें मुख्य साधन आहे. परंतु प्रार्थना अंतःकरणापासून व्हावयास हवी. याविषयीं या सूक्तांतील शब्द फार मनन करण्यालायक आहेत.

हे सोमप इंद्र ! शृणुहि । यत्त्वा शोचता हृदा जोहवीमि ॥ (मं. ३)

' हे ज्ञान्यांच्या रक्षक प्रभो ! ऐका, मी जें कांहीं जळत्या अंतःकरणानें मनापासून तुम्हांस सांगत आहें. ' हृदयामधून अवाज यावयास हवा, स्वतःच्या पूर्ण भावनेनें प्रार्थना व्हावयास हवी, हृदयाच्या ऊष्म्यानें शब्द तापलेले असले पाहिजेत. शोक पूर्ण हृदयानें प्रार्थना निघाली पाहिजे. अशी प्रार्थना निश्चित ऐकली जाते. तसेंच—

ये यज्ञियाः स्थ ते देवा इदं शृणुत । (मं. २)

' ज्यांचें यजन केलें जातें ते देव माझी प्रार्थना ऐकोत ' अशाप्रकारें देवाविषयीं श्रद्धभक्तियुक्त अंतःकरणांतून निघालेले शब्द असतील ते ऐकण्यांत येतात. तसेंच—

द्यावापृथिवी मा अनु दीधीथाम् । विश्वेदेवासो मा अन्वारभध्वम् ॥ (मं. ५)

' द्यावापृथिवी मला अनुकूल होऊन प्रकाशित होवोत आणि सर्व देव मला अनुकूल होऊन कार्यारंभ करोत. ' म्हणजे देवांच्या कृपेनें माझा मार्ग प्रकाशित होवो आणि सर्व देव मला अनुकूल होऊन माझें कार्य चालू ठेवण्यास सहाय्यभूत होवोत. देवतांस विरोधी असें कोणतेंहि कार्य मजकडून न होवो. माझ्या अंतःकरणांत देवतांच्या कृपेनें शुद्ध स्फूर्ति होत राहो. त्या स्फूर्तींच्या अनुकूलतेनें मजकडून उत्कृष्ट कार्यें होवोत. देवांशीं स्वतःस्वतःला एकरूप केलें पाहिजे. आणि अशा प्रकारें स्वतः देवतामय बनवून अनुभव घेतला पाहिजे.

स्वतःच्या शरीरास देवांचें मंदिर बनविलें पाहिजे. तरच त्यांत अशुभ विचार येणार नाहींत आणि नेहमीं तेथें शुभ विचार कार्य करीत राहतील. अशा प्रकारें देवांचा जागृत निवास स्वतःच्या विचारांत भावरूपानें होऊं लागला म्हणजे मग स्वतःच्या मानसिक शक्तीची वाढ होण्यास वेळ लागणार नाहीं. आणि जें जें फळ मनुष्य ज्ञान्यांच्या आणि आत्मोन्नतीच्या या सूक्ताच्या प्रारंभीं विवरण करण्यांत आलें आहे तें सर्व उपासकांस अवश्य प्राप्त होतें.

बंधनापासून मुक्त होणें

कांड ६, सूक्त ६३

(ऋषिः - द्रुह्वणः । देवताः – निर्ऋतिः, अग्निः, यमः ।)

यत्ते देवी निर्ऋतिराबबन्ध दाम ग्रीवास्वविमोक्यं यत् ।
तत्ते वि ष्याम्यायुषे वर्चसे बलायादोमदमन्नमद्धि प्रसूतः ॥ १ ॥
नमोऽस्तु ते निर्ऋते तिग्मतेजोऽयस्मयान्वि चृता बन्धपाशान् ।
यमो मह्यं पुनरित्त्वां ददाति तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे ॥ २ ॥
अयस्मये द्रुपदे बेधिष इहाभिहितो मृत्युभिर्ये सहस्रम् ।
यमेन त्वं पितृभिः संविदान उत्तमं नाकमधि रोहयेमम् ॥ ३ ॥
संसमिद्युवसे वृषन्नग्ने विश्वान्यर्य आ । इडस्पदे समिध्यसे स नो वसून्या भर ॥ ४ ॥

अर्थ— (देवी निर्ऋतिः) दुर्गतीनें (यत् यत् अविमोक्यं दाम ते ग्रीवासु आबबन्ध) जें सहज न सूटेल असें बंधन तुझ्या गळ्यांत बांधलें आहे, तें (ते आयुषे बलाय वर्चसे वि स्यामि) तुझें आयुष्य, शक्ति आणि तेजस्वितेसाठीं मीं तोडून टांकतों. आतां तूं (प्रसूतः अदो-मदं अन्नं अद्धि) पुढें होऊन हर्षदायक अन्नाचा भोग कर [१]

हे (निर्ऋते) दुर्गति ! (ते नमः अस्तु) तुला नमस्कार असो. हे (तिग्मतेजः) उग्र तेजानें युक्त (अयस्मयान् बंधपाशान् विचृत) लोखंडाचे पाश तोडून टाक. (यमः त्वां पुनः इत् मह्यं ददाति) यम तुला पुनः मजसाठीं देत आहे. (तस्मै यमाय मृत्यवे नमः अस्तु) त्या नियामक मृत्यूला माझा नमस्कार असो. [२]

जेव्हां तूं (अयस्मये द्रुपदे वेधिषे) लोखंड जडलेल्या लांकडी स्तंभास बांधतोस, तेव्हां (ये सहस्रं) जीं हजारों दुःखें आहेत, तीं (मृत्युभिः इह अभिहितः) मृत्यूंनीं येथें बांधण्यांत येतात, (त्वं पितृभिः यमेन सं विदानः) तूं पितर आणि यमाशीं सहमत होऊन (त्वं इमं उत्तमं नाकं अधिरोहय) तूं याला उत्तम स्वर्गांत चढव, पोंहोचवून दे. [३]

हे (वृषन् अग्ने) बलवान् तेजस्वी देवा ! तुम्हीं (अर्यः) सर्वांहून श्रेष्ठ आहांत, त्यामुळें तुम्हीं (विश्वानि इत् सं सं आयुवसे) सर्वांना निश्चयेंकरून मिळवून द्या. आणि (इडः पदे समिध्यसे) वाणी आणि भूमीच्या स्थानांत प्रकाशित होतां. (सः नः वसूनि आभर) असे तुम्हीं आम्हांस धन प्राप्त करून द्या. [४]

भावार्थ— सामान्य मनुष्याच्या गळ्यांत दुर्गतीचा-अलक्ष्मीचा पाश हमेशा बांधलेला असतो. प्रयत्न केल्यावांचून तो पाश सुटत नाहीं. आणि जेव्हां हा पाश गळ्यांत अटकून रहातो, तोंपावेतों दीर्घायुष्य, बलाची वृद्धि आणि तेजस्विता कधींच प्राप्त होत नाहींत. म्हणून प्रत्येक मनुष्यानें हा पाश तोडून टाकावा आणि आनंद देणारें अन्न ग्रहण करावें. [१]

लोखंडासारखे तुटण्यास कठीण असे हे पाश तोडून टाका. या कार्यासाठीं उग्र तेजाच्या देवाचा आश्रय घ्या. असें सामर्थ्य सर्वांचा नियामक देव तुला देईल, म्हणून त्यास प्रणाम कर. [२]

ज्याच्या गळ्यांत हे (दुर्गतीचे) पाश पडले आहेत. त्यास हजारों दुःखें आणि शेंकडों विनाश हमेशा सतवतात. या रक्षक आणि नियामकाशीं उत्तम सहकार्य ठेवून या माणसास बंधमुक्त करून त्याला सुखपूर्ण स्वर्गधामांत पोंहोचवा. [३]

बलवान् ईश्वर सर्वोपरि शासक आहे. तोच सर्व संघटना करतो. आणि सर्व पदार्थमात्रामध्यें प्रकाशित होतो. आणि तोच वाणीचा सुद्धां प्रेरक आहे. तो ईश्वर आम्हांस धन वगैरे पदार्थ देवो. [४]

बंधनापासून मुक्त होणें

पारतंत्र्याचा घोर परिणाम

पारतंत्र्यांत अथवा बंधनांत रहाण्याचा परिणाम या सूक्तांत अशा प्रकारें सांगितला आहे—

अविमोक्यं दाम । (मं. १)

अयस्मयाः पाशाः । (मं. २)

अयस्मये द्रुपदे बेधिषे, इह सहस्रं मृत्युभिः अभिहितः ॥ (मं. ३)

' पारतंत्र्याचे पाश सहजासहजीं सुटणारे नसतात. ज्याप्रमाणें लोखंडी साखळी तोडण्यास कठीण असते त्याप्रमाणें हे पारतंत्र्याचे पाश तोडण्यास कठीण आहेत. जो मनुष्य लोहमय पाशांनीं खांबास जखडला जातो, त्याच्यावर हजारों दुःखें आणि मृत्यू सुद्धां येऊन पडतो आणि त्यांनीं तो बांधला जातो. '

पारतंत्र्याच्या बंधनांत पडलेला मनुष्य शेंकडों आपत्तींनीं घेरला जातो आणि त्यास मुक्त होण्यास मार्गसुद्धां दिसत नाहीं. तो दिङ्मूढ होतो. हें सर्व तर ठीक तरीसुद्धां मनुष्यानें स्वतः बंधनांतून तर सुटलेच पाहिजे; कारण की पारतंत्र्यांत कोणत्याहि प्रकारची उन्नति होऊं शकत नाहीं. म्हणून म्हटलें आहे कीं—

अयस्मयान् बन्धपाशान् विचृत । (मं. २)

' लोहमय बंधनें तोडून टाक ' कारण की जोंपावेतों पाश तुटत नाहींत, तोपर्यंत तुमची उन्नति होणें कोणत्याहि प्रकारें शक्य नाहीं.

पाश तोडण्यापासून लाभ

पारतंत्र्याचें पाश तोडण्यापासून कोणते लाभ होतात आणि बंधनांत लढत राहिल्यानें काय हानि होते, त्याचें विवरण या मंत्रभागांत केलेलें आहे—

ते तत् अविमोक्यं दाम आयुषे वर्चसे बलाय विष्यामि । प्रसूतः अदोमदं अन्नं अद्धि ॥ (मं. १)

तुझे न तुटणारे पाश तोडतों. पाश तुटल्यामुळें आणि तुला स्वतंत्र्य प्राप्त झाल्यानें तुला दीर्घायुष्य, तेज आणि बळ प्राप्त होईल. तसेंच अन्नभोग पुरत्या प्रमाणांत प्राप्त होतील. '

पारतंत्र्याचीं बंधनें कशींहि अतूट असलीं तरी तीं तोडल्यानें हे चार लाभ प्राप्त होतील. (१) लोक दीर्घायु होतील. (२) जनतेचें तेज वाढेल, (३) लोक बळवान् होतील आणि (४) अन्न वगैरे सुखोपभोगाचे पदार्थ भरपूर प्रमाणांत मिळतील. स्वतंत्रतेचे हे लाभ आहेत.

पारतंत्र्यांत रहाण्यानें जी हानि, जें नुकसान होतें त्याचें ज्ञान सुद्धां यापासून होतें. पहा, पारतंत्र्यांत लोक क्षीणायुषी होतात, जनतेंत शक्ति रहात नाहीं, तिच्यांत तेजस्विता असत नाहीं, आणि कोणास खावयास पोटापुरतेंहि मिळत नाहीं. प्रत्येक परतंत्र मनुष्यास या आपत्ति भोगाव्या लागतात. म्हणून पारतंत्र्याचीं बंधनें तोडण्यासाठीं प्रत्येकानें प्रयत्न करून बंधनांतून मुक्ति प्राप्त केली पाहिजे, अशाप्रकारें स्वतः स्वतःला स्वर्गधामाचा अधिकारी केलें पाहिजे.

वाचकांनीं याप्रकारें या सूक्ताचा विचार केला तर त्यांना पारतंत्र्याचे पाश तोडण्याचा उपदेश वेद किती दृढतेनें करीत आहे, त्याची कल्पना येऊं शकेल. अशा वैदिक उपदेशाचा लाभ वाचकांनीं घ्यावा.

परस्पर मित्रत्व जोडणें

कांड ६, सूक्त ४२

(ऋषिः – भृग्वङ्गिराः (परस्परं चित्तैकीकरणकामः) । देवता – मन्युः ।)

अव ज्यामिव धन्वनो मन्युं तनोमि ते हृदः । यथा संमनसौ भूत्वा सखायाविव सचावहै ॥ १ ॥

अर्थ— (धन्वनः ज्यां इव) धनुष्यावरून दोरी काढून टाकण्याप्रमाणें (ते हृदः मन्युं अवतनोमि) तुझ्या हृदयांतून क्रोधास दूर करतों. (यथा संमनसौ भूत्वा) ज्यामुळें एक मनानें युक्त होऊन (सखायौ इव सचावहै) मित्राप्रमाणें परस्पर मिळून मिसळून राहूं. [१]

सखायाविव सचावहा अव मन्युं तनोमि ते। अधस्ते अश्मनो मन्युमुपास्यामसि यो गुरुः ॥ २ ॥
अभि तिष्ठामि ते मन्युं पार्ष्ण्या प्रपदेन च। यथावशो न वादिषो मम चित्तमुपायसि ॥ ३ ॥

अर्थ— (**सखायौ इव सचावहै**) आम्हीं दोघे मित्र होऊन राहूं म्हणून (**ते मन्युं अवतनोमि**) तुझ्या क्रोधाला दूर करतों. (**यः गुरुः**) जो मोठा क्रोध आहे, तो (**ते मन्युं**) त्या तुझ्या क्रोधाला (**अश्मनः अधः उप अस्यामसि**) दगडाखालीं दाबून टाकतों. [२]

(**ते मन्युं पार्ष्ण्या प्रपदेन च अभितिष्ठामि**) तुझ्या क्रोधाला टांचेनें, पायानें आणि ठोकरीनें दाबून टाकतों. (**यथा मम चित्तं उपायसि**) ज्यामुळें तूं माझ्या चित्तास अनुकूल होऊन रहाशील आणि (**अवशः न अवादिषः**) तूं पारतंत्र्याच्या गोष्टी करणार नाहींस. [३]

क्रोध

क्रोध असा आहे कीं तो मनाला फाडून टाकतो, विरोध उत्पन्न करतो आणि द्वेष वाढवतो. या क्रोधास मनांतून दूर केलें पाहिजे. ज्यावेळीं क्रोध दूर होईल, तेव्हां मन स्वच्छ होईल आणि परस्पर मिलाप होण्याचा संभव खरा. म्हणून युद्ध समाप्त झाल्यावर ज्याप्रमाणें धनुष्याची दोरी दूर करतात, त्याप्रमाणें मनुष्यानें क्रोधाला स्वतःच्या मनांतून दूर केलें पाहिजे. क्रोधास दूर करून त्यास दूरच दाबून ठेवलें पाहिजे. म्हणजे तो पुनः आपल्या मनांत भरून जाणार नाहीं. जर क्रोध पुनः जवळ येऊं लागला तर त्याला अशी ठोकर मारावयाची कीं जेणें करून तो पुनः जवळच येऊं नये. मनुष्यानें कधींहि क्रोधाच्या ताब्यांत जाऊं नये अथवा क्रोध वचन बोलूं नये.

याप्रकारें क्रोधास दूर करून शांति धारण करावी. परस्पर मिळून मिसळून वागावें. त्यामुळें संगठन झाल्यानें शक्ति वाढते.

अग्नीची ऊर्ध्व गति

कांड ५, सूक्त २७

(ऋषिः – ब्रह्मा। देवता – अग्निः।)

ऊर्ध्वा अस्य समिधो भवन्त्यूर्ध्वा शुक्रा शोचींष्यग्नेः।
द्युमत्तमा सुप्रतीकः ससूनुस्तनूनपादसुरो भूरिपाणिः ॥ १ ॥
देवो देवेषु देवः पथो अनक्ति मध्वा घृतेन ॥ २ ॥
मध्वा यज्ञं नक्षति प्रैणानो नराशंसो अग्निः सुकृद्देवः सविता विश्ववारः ॥ ३ ॥

अर्थ— (**अस्य अग्नेः समिधः ऊर्ध्वा भवन्ति**) या अग्नीच्या समिधा उंच असतात तसेंच या अग्नीच्या (**शुक्राः शोचींषि ऊर्ध्वाः भवन्ति**) शुद्ध ज्वाला सुद्धां उंच असतात. हा अग्नि (**द्युमत्तमा**) अत्यंत प्रकाशयुक्त, (**सुप्रतीकः ससूनुः**) सुंदर रूपयुक्त, पुत्रासह रहाणारा, (**तनू-न-पात्, असु-रः**) शरीरास न पडूं देणारा, जीवन देणारा (**भूरि-पाणिः**) अनेक हातांनीं म्हणजे ज्वाळांनीं युक्त आहे. [१]

(**देवेषु देवः देवः**) सर्व देवांत मुख्य देव (**मध्वा घृतेन पथः अनक्ति**) मधुर घृतानें मार्गाला प्रगट करतो. [२]

(**नराशंसः सुकृत् सविता विश्ववारः देवः अग्निः**) मनुष्यांकडून प्रशंसित होण्यास योग्य उत्तम कर्म करणारा, प्रेरक, सर्वांकडून स्वीकार करण्यास योग्य दिव्य अग्नि (**मध्वा यज्ञं प्रैणानः नक्षति**) मधुरतेनें यज्ञास प्रेरित करीत जात आहे. [३]

अच्छायमेति शवसा घृता चिदीडानो वह्निर्नमसा ॥ ४ ॥
अग्निः स्रुचो अध्वरेषु प्रयक्षु स यक्षदस्य महिमानमग्नेः ॥ ५ ॥
तरी मन्द्रासु प्रयक्षु वसवश्चातिष्ठन्वसुधातरश्च ॥ ६ ॥
द्वारो देवीरन्वस्य विश्वे व्रतं रक्षन्ति विश्वहा ॥ ७ ॥
उरुव्यचसाऽग्नेर्धाम्ना पत्यमाने ।
आ सुष्वयन्ती यजते उपाके उषासानक्तेमं यज्ञमवतामध्वरं नः ॥ ८ ॥
दैवा होतार ऊर्ध्वमध्वरं नोऽग्नेर्जिह्वयाभि गृणत गृणता नः स्विष्टये ।
तिस्रो देवीर्बर्हिरेदं सदन्तामिडा सरस्वती मही भारती गृणाना ॥ ९ ॥
तन्नस्तुरीपमद्भुतं पुरुक्षु । देव त्वष्टा रायस्पोषं वि ष्य नाभिमस्य ॥ १० ॥
वनस्पतेऽव सृजा रराणः । त्मना देवेभ्यो अग्निर्हव्यं शमिता स्वदयतु ॥ ११ ॥
अग्ने स्वाहा कृणुहि जातवेदः । इन्द्राय यज्ञं विश्वे देवा हविरिदं जुषन्ताम् ॥ १२ ॥

अर्थ— (अयं ईडानः वह्निः शवसा धृता नमसा चित्) हा स्तुति केला गेलेला अग्नि बळ, तप आणि नमनासह (अच्छ एति) उत्तमरीतीनें जात आहे. [४]

(अध्वरेषु स्रुचः प्रयक्षु अग्निः) यज्ञांत स्रुचांची (चमस-पळी यांची) इच्छा करणारा अग्नि असतो, (सः अस्य अग्नेः महिमानं यक्षत्) तो यजमान या अग्नीच्या महात्म्याची उपासना करो. [५]

(तरी मन्द्रासु प्रयक्षु) तारण करणारा अग्नि आनंदाच्या समयीं यजन करणारा असतो. (वसुधा-तरः वसवः च अतिष्ठन्) धनास अधिक धारण करणारा अग्नि आणि वसु सर्वांचें अतिक्रमण करून स्थिर झाले आहेत. [६]

(अस्य व्रतं देवीः द्वारः) त्याच्या व्रताचें दिव्यद्वार आणि (विश्वे) दुसरे सर्व देव (विश्व-हा अनुरक्षन्ति) नेहमीं अनुकूल होऊन रक्षण करतात. [७]

(अग्नेः उरु-व्यचसा धाम्ना) अग्नीच्या अतिविस्तृत धामानें (पत्यमाने सु-सु-अयन्ती उपाके यजते) पतिरूप बनविणारी, उत्तमरीतीनें चालणारी, जवळच रहाणारी, परस्पर संगत (उषासानक्ता नः इमं अध्वरं यज्ञं आ अवतां) उषासानक्ता म्हणजे प्रातःकाळ आणि सायंकाळ आमच्या या हिंसारहित यज्ञाचें उत्तम रक्षण करोत. [८]

हे (दैवा होतारः) दिव्य होतागण हो ! (नः अध्वरं अग्नेः जिह्वया अभिगृणत) आमच्या उच्च यज्ञाची अग्नीच्या जिह्वेकडून प्रशंसा करवा आणि (नः स्विष्टये गृणत) आमची उत्तम इष्टीसाठीं प्रशंसा करा. (इडा सरस्वती भारती मही) मातृभाषा, मातृसभ्यता-संस्कृति आणि पोषण करणारी मातृभूमि या (तिस्रः देवीः) तीन देवी (इदं बर्हिः सदन्तां) या यज्ञांत येऊन शोभोत. [९]

(देव त्वष्टः) हे त्वष्टा देवा ! (नः तत् तुरी-पं अद्भुतं) आमच्यासाठीं त्वरेनें रक्षण करणारें अद्‌भुत (पुरुक्षु रायः पोषं) निवासास योग्य हितकारक धन आणि पुष्टि द्या आणि (अस्य नाभिं विष्य) आणि त्याच्या मध्यकेंद्रास उघडून टांका. [१०]

हे वनस्पते ! (रराणः अवसृज) दान करणारा तूं आम्हांस दान कर. (शमिता अग्निः त्मना देवेभ्यः हव्यं स्वदयतु) शांति स्थापन करणारा अग्निदेव आत्मशक्तीनें देवांसाठीं हवनीय पदार्थांचा स्वाद देवो. [११]

हे (जातवेदः अग्ने) ज्ञानी प्रकाश स्वरूप देवा ! (स्वाहा कृणुहि) तूं स्वाहारूप यज्ञ कर. तसेंच (इन्द्राय यज्ञं) इंद्रदेवासाठीं यज्ञ कर. (विश्वेदेवाः इदं हविः जुषन्तां) सर्व देव या हवीचें सेवन करोत. [१२]

यज्ञाचें महत्त्व

हें सूक्त यज्ञाच्या प्रशंसेविषयीं आहे. यज्ञ केल्यानें दिव्यलोकांत जाण्याचा मार्ग खुला होतो ही गोष्ट दुसऱ्या मंत्रांत सांगितली आहे. ज्याप्रमाणें (अग्नेः ऊर्ध्वाः शोचींषि) अग्नीच्या ज्वाला वर जातात आणि कधीं खालच्या दिशेस जात नाहींत, बरोबर त्याचप्रमाणें अग्नीची उपासना करणारा याजक सरळ ऊर्ध्वमार्गानें उन्नति प्राप्त करून घेतो. यज्ञयागाचें हें महान् फल आहे.

यज्ञानें मातृभाषा, मातृसंस्कृति आणि मातृभूमीविषयीं आदर वाढतो, कारण कीं यज्ञानें त्यांची सेवा होते, यज्ञांत त्यांस अग्रस्थान असतें ही गोष्ट नवव्या मंत्रांत सांगितली आहे.

या सूक्तांत सांगितलेल्या अग्नींच्या विशेषणांविषयीं विचार करण्यासारखा आहे. त्या गुणांचें मनन करून त्यामुळें बोधित होणारे गुण उपासकांनीं स्वतःमध्यें वाढविले पाहिजेत. उन्नतीचा हा सरळ मार्ग आहे.

ब्राह्मणधर्माचा आदेश

कांड २, सूक्त ६

(ऋषिः - शौनकः (सम्पत्कामः) । देवता - अग्निः ।)

समास्त्वाग्न ऋतवो वर्धयन्तु संवत्सरा ऋषयो यानि सत्या ।
सं दिव्येन दीदिहि रोचनेन विश्वा आ भाहि प्रदिशश्चतस्रः ॥ १ ॥
सं चेध्यस्वाग्ने प्र च वर्धयेममुच्च तिष्ठ महते सौभगाय ।
मा ते रिषन्नुपसत्तारो अग्ने ब्रह्माणस्ते यशसः सन्तु मान्ये ॥ २ ॥

अर्थ— हे अग्ने ! (समाः ऋतवः संवत्सराः) महिने ऋतु आणि वर्षं (ऋषयः) ऋषि तसेंच (यानि सत्या) जो सत्यधर्म आहे ते सर्व (त्वा वर्धयन्तु) तुला वाढवोत. (दिव्येन रोचनेन) दिव्य तेजानें (सं दीदिहि) उत्तम प्रकारें प्रकाशित हो आणि (विश्वाः चतस्रः प्रदिशः) सर्व चारी दिशांमध्यें (आ भाहि) प्रकाशित हो. [१]

हे अग्ने ! (सं इध्यस्व) उत्तमरीतीनें पेट. (च इमं प्र वर्धय) आणि याला पुष्कळ वाढव (याची प्रगति कर) (च महते सौभगाय उत्तिष्ठ) मोठ्या ऐश्वर्यासाठीं उठून उभा रहा. हे अग्ने ! (ते उपसत्तारः) तुझे उपासक (मा रिषन्) नष्ट न होवोत. (ते ब्रह्माणः) तुजजवळ रहाणारे ब्राह्मण (यशसः सन्तु) यशयुक्त होवोत, (मा अन्ये) दुसरे न होवोत. [२]

भावार्थ— हे तेजस्वी ब्रह्मकुमारा ! महिने, ऋतु आणि वर्षं म्हणजे काल, ऋषि म्हणजे तत्त्वदर्शी, विद्वान् आणि जे सर्व सत्यधर्म नियम आहेत ते सर्व तुला वृद्धिंगत करोत. याप्रमाणें दिव्यतेजानें तूं युक्त होऊन सर्व दिशांस तूं स्वतःचा प्रकाश पसरव. [१]

तेजस्वी होऊन तूं या सर्वांस वृद्धिंगत कर आणि महान् सौभाग्य म्हणजे ऐश्वर्य प्राप्त करण्याची तयारी कर. उठून उभा रहा आणि स्वतःमुळें तुझ्या साक्षीदारांच्या दुर्दशेस तूं कधीं प्राप्त होऊं नकोस. एवढेंच नव्हे परंतु तुझ्यापाशीं संबंध ठेवणारे ज्ञानी यशानें युक्त होवोत आणि तुझे सहकारी दुर्दशेंत न जातील आणि तुझ्या चुकीमुळें दुसरे लोक उन्नति प्राप्त करून पुढें जातील असें कधीं न होवो. [२]

त्वाम॑ग्ने वृणते ब्राह्म॒णा इ॒मे शि॒वो अ॑ग्ने सं॒वर॑णे भवा नः ।
स॒प॒त्न॒हाग्ने॑ अभिमाति॒जिद्भ॑व॒ स्वे गये॑ जागृ॒ह्यप्र॑युच्छन् ॥ ३ ॥
क्ष॒त्रेणा॑ग्ने॒ स्वेन॒ सं र॑भस्व मि॒त्रेणा॑ग्ने मि॒त्र॒धा य॑तस्व ।
स॒जा॒ताना॑ं मध्यमे॒ष्ठा राज्ञा॑मग्ने वि॒हव्यो॑ दीदिही॒ह ॥ ४ ॥
अति॒ निहो॒ अति॒ सृधोऽत्यचि॑त्ती॒रति॒ द्विषः॑ ।
विश्वा॒ ह्य॑ग्ने दुरि॒ता तर॒ त्वमथा॒स्मभ्य॒ं स॒हवी॑रं र॒यिं दाः॑ ॥ ५ ॥

अर्थ— हे अग्ने ! (इमे ब्राह्मणाः त्वा वृणते) हे ब्राह्मण तुझा स्वीकार करीत. हे अग्ने ! (नः संवरणे शिवः भव) आम्हांस स्वीकारण्यांत तूं शुभ हो. हे अग्ने ! (सपत्नहा अभिमातिजित् भव) वैऱ्यांचा नाश करणारा तसेंच अभिमान्यांना जिंकणारा तूं हो, तसेंच (अ-प्रयुच्छन्) चूक न करतां (स्वे गये जागृहि) स्वतःच्या घरांत जागृत रहा. [३]

हे अग्ने ! (स्वेन क्षत्रेण) स्वतःच्या क्षात्रतेजानें (सं रभस्व) उत्तमप्रकारें उत्साहित हो. हे अग्ने ! (मित्रेण मित्रधा यतस्व) स्वतःच्या मित्रांशीं मित्राच्या रीतीनें व्यवहार कर. हे अग्ने ! (सजातानां मध्यमे स्थाः) सजातीय मंडळींमध्यें बसणारा होऊन (राज्ञां विहव्यः) क्षत्रियांमध्यें सुद्धां विशेष आदरानें बोलावण्यास योग्य होऊन (इह दीदिहि) येथें प्रकाशित हो. [४]

हे अग्ने ! (निहः अति) पापीवृत्तींचें अतिक्रमण कर. (द्विषः अति) द्वेषभावनांचें अतिक्रमण कर. हे अग्ने ! (विश्वा दुरिता तर) सर्व पापवृत्तींस पार कर. (अथ त्वं) आणि तूं (अस्मभ्यं) आम्हां सर्वांसाठीं (सहवीरं रयिं दाः) वीर पुरुषांसह रहाणारें धन दे. [५]

भावार्थ– हे ज्ञानी लोक सन्मानानें तुझा स्वीकार करीत. म्हणून तूं शुभ विचार संपन्न हो ! तुझे जे शत्रु आहेत आणि जे तुझ्याशीं स्पर्धा करतात त्यांस जिंकून तूं पुढें हो. तसेंच कधींहि चूक न करतां स्वतःचे स्थानीं जागृत रहा. [३]

स्वशक्ति वाढवून नेहमीं उत्साह धारण कर. मित्रांशीं मित्रांप्रमाणें सरळ व्यवहार कर. स्वजातींत प्रमुखस्थानीं बसण्याचा अधिकार प्राप्त कर. एवढेंच नाहीं परंतु रोज लोकसुद्धां तुझा सल्ला घेण्यास तुला आदरानें बोलावतील अशी तूं स्वतःची योग्यता वाढव आणि येथें तेजस्वी हो. [४]

मारामारी अथवा घातपाताच्या कार्यांपासून दूर रहा, नाशक अथवा हिंसकवृत्ति दूर कर. पापवासनांस स्वतःच्या मनांतून दूर कर. द्वेषभावांस जवळ येऊं देऊं नकोस. तात्पर्य सर्व हीनवृत्तिंच्या पार जाऊन स्वतः स्वतःस पवित्र कर आणि आमच्यासाठीं अशी संपत्ति आण कीं जिच्यासह नेहमीं वीरभाव जागृत असेल. [५]

ब्राह्मणधर्माचा आदेश

अग्नीचें स्वरूप

अथर्ववेद कां. १, सू. ७ मध्यें टीका लिहितांना अग्नि कोण आहे ? या प्रकरणांत अग्नि हा शब्द ब्राह्मण म्हणजे ज्ञानी पुरुष वाचक आहे ही गोष्ट विशेष स्पष्ट केली होती. वाचकांनीं कृपा करून तें प्रकरण येथें अवश्य वाचून पहावें. त्या प्रकरणावरून अग्नीचें स्वरूप स्पष्ट होईल. त्यानंतर अग्नीचें वर्णन करण्यासाठीं या सूक्तांत जो शब्दप्रयोग केला आहे त्याचा विचार केला पाहिजे—

१ हे अग्ने ! त्वं सजातानां मध्यमेष्ठाः राज्ञां विहव्यः इह दीदिहि । (मं. ४)

' हे अग्ने ! तूं स्वजातीमध्यें मध्यस्थानीं बसण्याची योग्यता धारण करणारा आणि राजेमहाराजे यांच्या वतीनें विशेष आदरानें

बोलावण्यास योग्य होऊन येथें प्रकाशित हो. '

हें वाक्य, या मंत्रांतच नव्हे तर या सूक्तात प्रतिपादन केलेला अग्नि केवळ देवतावाचकच नव्हे पण मनुष्य वाचकही आहे, ही गोष्ट सिद्ध करते. ' स्वजातींत समेत प्रमुखस्थानीं बसणारा (**स्वजातानां मध्यमेष्ठाः**) ' हे शब्द तर निःसंशय मनुष्य असल्याचेंच सिद्ध करतात. तसेंच याच मंत्रांतील ' (**राज्ञां विहव्यः**) राजे आणि क्षत्रिय यांजकडून विशेष बोलवण्यालायक ' हे शब्द त्याचें क्षत्रिय जातीपासून भिन्न जातीयत्व असणें अंशमात्रानें सूचित करतात. क्षत्रियांपासून भिन्न ब्राह्मण, वैश्य, शूद्र आणि निषाद, या चार जाति आहेत. परंतु कधींतरी क्षत्रिय स्वतःपेक्षा नीच अथवा खालच्या हलक्या गणलेल्या जातींचा असा आदर करतील काय ? या प्रश्नाचें मनन केलें असता ध्यानीं येतें कीं, ठिकठिकाणीं ज्याचें वर्णन केलें गेलें आहे, तो ब्राह्मणवर्णाचा मनुष्यच असला पाहिजे. म्हणजे या सूक्तातील अग्नि शब्द ब्राह्मणवाचक आहे. ही गोष्ट अथर्ववेदाच्या प्रथम कांडातील ७ व्या सूक्ताच्या टीकेंत दाखविली आहे. त्याच गोष्टीची सिद्धता या सूक्तातील या वाक्यानें होत आहे. अशाप्रकारें येथें तर अग्नि शब्द ब्राह्मण वाचक आहे अथवा असें म्हणणें जास्त चांगलें दिसेल की तो ब्राह्मण कुमारवाचक आहे. ब्राह्मण कुमारास या सूक्तानें बोध-उपदेश केला आहे. वेदांमध्यें अग्निदेवतेच्या सूक्तांनीं ब्राह्मणधर्म आणि इंद्रदेवतेच्या सूक्तांनीं क्षत्रियधर्माची विशेषता दाखविली आहे. ही गोष्ट वाचकांच्या आतां पावेतों कित्येकवार ध्यानीं आली असेल. म्हणून त्याविषयीं आतां कांहीं जास्त सांगावयाचें राहिलें नाहीं. आतां अग्नि शब्दाचा हा भाव ध्यानांत धारण करून या सूक्तातील वाक्यें पहा—

दीर्घ आयुष्य

१ **हे अग्ने ! त्वा समाः ऋतवः संवत्सराः च वर्धयन्तु**– हे ब्राह्मणकुमारा ! हे वाचका ! महिने, ऋतु, संवत्सर तुझें संवर्धन करोत म्हणजे तूं उत्तम दीर्घायुष्यानें युक्त हो. योगादि साधनद्वारा असा प्रयत्न कर की तुझें आयुष्य दिवसें दिवस, मासोमास आणि ऋतुमागून ऋतु तसेंच वर्षामागून वर्षे याप्रकारें वाढत राहो. (मं. १)

ज्ञान--प्राप्ति

२ **ऋषयः त्वा वर्धयन्तु**– ऋषिमुनिगण विद्येच्या उपदेशानें तुझी वृद्धि करोत. म्हणजे ऋषिप्रणाली अनुसार अध्ययन करीत तूं ज्ञानी हो. (मं. १)

सत्यनिष्ठा

३ **यानि सत्यानि तानि त्वा वर्धयन्तु**–जे सर्व सत्य धर्म नियम आहेत ते तुला वृद्धिंगत करोत. म्हणजे तूं सत्यधर्म नियमांचें उत्तम पालन कर आणि सत्याच्या बळानें बलवान् हो. सत्य पालनानें आत्मिक बळ वाढतें. (मं. १)

स्वतःचें तेज वाढविणें

४ **दिव्येन रोचनेन सं दीदिहि**– दिव्यतेजानें तूं स्वतः प्रकाशमान् हो. वरील प्रथम तीन उपदेश आज्ञाप्रमाणें तीन प्रकारचीं बळें वाढविण्यास सांगितलें आहे (१) दीर्घायुष्य आणि आरोग्यसंपन्न शरीरद्वारा शारीरिक बल, (२) ऋषिप्रणालीच्या अध्ययनानें ज्ञान बल आणि (३) सत्यपालनानें आत्मिक बल वाढतें. या तीन शक्ति मिळून जें तेज निर्माण होतें त्यास दिव्य तेज म्हणतात. हें दिव्यतेज प्रथम स्वतःमध्यें वाढविलें पाहिजे. म्हणजे हें दिव्यतेज दुसऱ्यांस देण्याचा अधिकार स्वतःस प्राप्त होतो. (मं. १)

तेजाचा प्रकाश

५ **विश्वाः चतस्रः प्रदिशः आभाहि**– सर्वबाजूंनीं चारी दिशा प्रकाशित कर. वर सांगितलेल्या तीन तेजांनीं स्वतः युक्त होऊन चारीहि दिशांस रहाणाऱ्या मनुष्यांस या तीन दिव्यतेजांनीं युक्त कर. स्वतः तेजस्वी झाल्यानंतर दुसऱ्यांस प्रकाशित करणें जरुरी आहे. म्हणजे स्वतः दीर्घजीवन मिळवून आणि बलवान् होऊन त्या सिद्धीचा रस्ता इतरांस दाखवावयाचा. स्वतः ज्ञानी होऊन इतरांस ज्ञानी करावयाचें. आणि स्वतः सत्य निष्ठेनें आत्मिक शक्तीनें युक्त होऊन दुसऱ्यांस आत्मिक बळ वाढविण्यास मार्गदर्शन करावयाचें.

६ **सं इध्यस्व इमं प्रवर्धय च**– स्वतः प्रदीप्त होऊन याला वृद्धिंगत कर. प्रथम स्वतः प्रदीप्त–तेजस्वी होत रहा आणि मग इतरांना प्रदीप्त कर. (मं. २)

ऐश्वर्य-प्राप्ति

७ **महते सौभगाय उत्तिष्ठ**– मोठ्या ऐश्वर्यासाठीं उठून उभा हो. एवढें मोठें ऐश्वर्य प्राप्त करण्यासाठीं जरुर तेवढा पुरुषार्थ प्रयत्न करण्याच्या उद्देशानें स्वतः स्वतःला नेहमीं उत्साहित आणि सिद्ध ठेव. (मं. २)

स्वपक्षीयांची उन्नति

८ **ते उपसत्तारः मा रिषन्**– तुझा आश्रय घेणारे वाईट अवस्थेंत न पडोत. तुझा पक्ष घेणाऱ्यांची तुझ्यामागें येऊन कार्य करणाऱ्यांची अवनति होऊं नये. तूं असे प्रयत्न कर कीं ज्यामुळें तुझे अनुयायी यांस दुर्गति प्राप्त होऊं नये. (मं. २)

९ **ते ब्रह्माणः यशसः सन्तु अन्ये मा**– तुझ्यासह रहाणारे ज्ञानीजन यशस्वी होवोत, अन्य न होवोत. म्हणजे तुझ्या-

सह रहाणारे लोक यशाचे भागीदार होवोत पण असें कधीं न होवो कीं तुझे साथीदार लोक कांहीं क्षतिच्यामुळें संकटांत पडावेत अथवा तुझ्या चुकीच्या कारणानें तुझे प्रतिपक्षी सुख भोगत रहावेत. तुझ्या चुकीचा गैरफायदा शत्रु न घेवोत आणि त्यासाठीं जरूर त्या सावधानीनें स्वतःचें कार्य करीत तूं स्वपक्षाच्या लोकांचें यश वृद्धिंगत कर. (मं. २)

१० इमे ब्राह्मणाः त्वां वृणुते । नः संवरणे शिवः भव– हे ज्ञानी तुझी निवड करीत आहेत या निवडीमुळें तूं सर्वांस कल्याणकारक हो. तूं नेहमीं जनतेचें कल्याण करणारा हो ज्यामुळें सर्व ज्ञानीलोक विश्वासपूर्वक तुझाच स्वीकार करतील. जनतेचा हितकारी होऊन तूं जनतेचा विश्वास संपादन कर. (मं. ३)

११ सपत्नहा अभिमातिजित् भव- प्रतिपक्षीयांचा पराजय कर म्हणजे तूं त्या विरोधीयांस तुझ्या स्वतःवर आक्रमण करूं देऊं नकोस. (मं. ३)

स्वतःच्या घरांत जागृत रहावें

१२ अप्रयुच्छन् स्वे गये जागृहि– कोणतीहि चूक न करतां स्वतःच्या घरांत जागृत रहा. स्वतःचें शरीर हेंच घर ' शरीर, समाज, जाति, राष्ट्र ' एवढ्या मर्यादेपर्यंत विस्तृत, आहे. प्रत्येक घरांत जागृत रहाणें आवश्यक आहे. घराचा स्वामीच जर जागृत नसेल तर शत्रु घरांत शिरून आणि घरांच्या स्वामीलाच घराबाहेर काढून लावील. म्हणून स्वतःच्या घराचें रक्षण करण्याच्या उद्देशानें घराच्या मालकानें नेहमीं जागृत असलें पाहिजे. (मं. ३)

उत्साहानें पुरुषार्थ

१३ स्वेन क्षत्रेण संरभस्व- स्वतःच्या क्षात्रतेजानें उत्साहपूर्वक पुरुषार्थाचा आरंभ कर. शत्रूचा प्रतिकार करण्यासाठीं स्वतःमध्यें बळ वाढवून त्या बळानें स्वतः पुरुषार्थाचा आरंभ कर. (मं. ४)

मित्रभाव

१४ मित्रेण मित्रधा यतस्व- मित्रांशी मित्रांप्रमाणें समान व्यवहार कर. मित्रांशीं कपट करूं नकोस. (मं. ४)

१५ सजातानां मध्यमेष्ठाः भव- स्वजातीमध्यें प्रमुखस्थानीं बसण्याची योग्यता प्राप्त कर. स्वजातींत तुझी योग्यता हीन ठरूं नये. स्वजातीनें तुझें नांव मोठ्या आदरपूर्वक घ्यावें.

१६ राज्ञां विहव्यः दीदिहि- क्षत्रिय आणि राजांच्या सभेंत विशेष आदरानें बोलावण्यालायक हो आणि प्रकाशित हो. म्हणजे केवळ स्वतःच्या जातींतच आदर प्राप्त करावयाचा एवढ्यापुरती योग्यता प्राप्त केली म्हणजे झालें असें समजावयाचें नाहीं, पण राज्याचा बंदोबस्त करणाऱ्या क्षत्रियांनीं सुद्धां प्रसंगीं आदरानें सन्मानानें बोलावून सल्ला घ्यावा एवढी मोठी योग्यता प्राप्त कर. (मं. ४)

मित्रवृत्तीची सुधारणा

१७ निहः सुधः अचित्तीः द्विषः अतितर- भांडण तंटा करण्याची वृत्ति, हिंसेचा भाव, पापवासना आणि द्वेष करण्याचा स्वभाव दूर कर. म्हणजे या दुष्ट मनोभावना दूर कर आणि स्वतः स्वतःला त्यांपासून दूर ठेव. (मं. ५)

१८ विश्वा दुरिता तर- सर्व पापभावनांना दूर कर. पाप विचारांपासुन स्वतः स्वतःला दूर ठेव. (मं. ५)

१९ त्वं सहवीरं रयिं अस्मभ्यं दाः- तूं वीरभावानें युक्त धन आम्हा सर्वांस दे. म्हणजे आम्हीं धन प्राप्त करूं आणि त्याबरोबरच धनरक्षण करण्याची शक्ति सुद्धां उत्पन्न करूं-प्राप्त करूं. प्रत्येक मनुष्यानें धन मिळविलें पाहिजे आणि त्या प्राप्त धनाचें रक्षण करण्यास शक्ति सुद्धां वाढविली पाहिजे. नहून आवश्यक शक्तीच्या अभावीं प्राप्त केलेलें धन स्वतःजवळ रहाणार नाहीं. (मं. ५)

अशीं १९ वाक्यें या सूक्तांत आहेत. प्रत्येक वाक्याचा भावार्थ वर दिला आहे. आतां यापेक्षां जास्त स्पष्टीकरण करण्याची जरुरी नाहीं. वाचक जर थोडें मनन करतील तर या सूक्तांतील दिव्य उपदेश त्यांच्या तत्काल ध्यानीं येईल. या सूक्ताचें प्रत्येक वाक्य ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

अन्योक्ति अलंकार


अग्नीचें वर्णन अथवा अग्नीची प्रार्थना करण्याच्या मिषानें ब्राह्मणकुमारास उन्नतीचा उपदेश किती अपूर्व प्रकारें केला आहे. ही वेदाची आलंकारिक वर्णनशैली वाचकांस येथें पहावयास सांपडेल. येथें अन्योक्ति अलंकार आहे. अग्नीला उद्देशून ब्राह्मणकुमारास उन्नतीचा उपदेश केला आहे.

ज्ञानी मनुष्याच्या हृदय वेदींत जो अग्नि पेट घेतो तो या सूक्तांत वाचकांनीं पहावा. जर या सूक्तांत अग्नि शब्दाचा अन्योक्तीनें सूचित होणारा अर्थ उत्तमरीतीनें समजूं शकला नाहीं; आणि जर कोणी त्याचा अर्थ विस्तव अथवा दावाग्नि असा समजतील तर या सूक्तांतील उपदेशानें प्राप्त होणारा बोध त्यांस मिळूं शकणार नाहीं.

अरणीनें उत्पन्न होणारा अग्नि

दोन अरणि- लाकडें एकमेकांवर घासल्यानें अग्नि उत्पन्न होतो. अलंकारानें (अधर अरणि) खालचें लाकुड ओळख

आणि (उत्तर अरणि) वरचें लाकूड पुरुषरूप मानण्यांत येतें, आणि या अरणींनीं उत्पन्न होणारा अग्नि पुत्र मानला जातो. या अलंकाराप्रमाणें पहातां हा अग्नि पुत्ररूप आहे.



जर या सूक्तांत सामान्यतः बालकास अग्निरूप मानण्यांत आलें आणि त्या सर्वांस या सूक्तांत उन्नतीचा मार्ग दाखविला आहे असें मानण्यांत आलें तरी सुद्धां सामान्यपणें तें चालण्यासारखें आहे. परंतु विशेषतः हा उपदेश ब्राह्मण कुमारासाठीं आहे. त्याचें कारण सुरवातीसच सांगितलें आहे.

[सूचना- यजुर्वेद अध्याय २७ मध्यें या सूक्ताचे ५ मंत्र १-३ आणि ५, ६ या अनुक्रमानें आले आहेत. कित्येक शब्दांचे पाठ भिन्न आहेत तरी सूक्ताच्या अर्थांत फारसा फरक पडत नाहीं. म्हणून त्याचा विचार येथें करण्याची जरूर नाहीं.]

शाप परत फिरवणें

कांड २, सूक्त ७

(ऋषिः - अथर्वा। देवता - भैषज्यं, आयुः, वनस्पतिः ।)

अघद्विष्टा देवजाता वीरुच्छपथयोपनी । आपो मलमिव प्राणैक्षीत्सर्वान्मच्छपथाँ अधि ॥ १ ॥
यश्च सापत्नः शपथो जाम्याः शपथश्च यः । ब्रह्मा यन्मन्युतः शपात्सर्वं तन्नो अधस्पदम् ॥ २ ॥
दिवो मूलमवततं पृथिव्या अध्युत्ततम् । तेन सहस्रकाण्डेन परि णः पाहि विश्वतः ॥ ३ ॥

अर्थ— (अघ-द्विष्टा) पापाचा द्वेष करणारी (देव-जाता) देवांकडून उत्पन्न केली गेलेली (शपथ-योपनी वीरुत्) शापास दूर करणारी औषधि (सर्वान् शपथान्) सर्व शापांना (मत्) माझ्याकडून (अधि-प्र अनैक्षीत्) धुवून टाको. (आपः मलं इव) ज्याप्रमाणें पाणी मळास धुवून टाकतें. [१]

(यः च सापत्नः शपथः) जो शत्रूंचा शाप आहे, (यः च जाम्याः शपथः) आणि जो स्त्रीनें दिलेला शाप आहे तसेंच (यत् ब्रह्मा मन्युतः शापात्) जो ब्रह्मज्ञानी क्रोधानें शाप देतो तो, (तत् सर्वं नः अधस्पदं) ते सर्व आमच्यापासून खालीं निघून जावोत. [२]

(दिवः मूलं अवततं) द्युलोकांतून जड खालीं आलें आणि (पृथिव्याः अधि उत्ततं) पृथ्वीवर पसरलें आहे. (तेन सहस्रकाण्डेन) त्या हजार प्रकारांनीं (नः विश्वतः परिपाहि) आमचें सर्व बाजूंनीं चांगलें संरक्षण कर. [३]

भावार्थ— या वनस्पति पापवृत्तीस हटविणाऱ्या, दिव्यभावास वाढविणाऱ्या, क्रोधानें शाप देण्याच्या प्रवृत्तीस कमी कमी करणाऱ्या, या औषधि शाप देण्याच्या भावनेस आमच्यापासून दूर करोत. ज्याप्रमाणें पाणी मळास दूर करतें. [१]

सर्वत्र भावाकडून, बहिणीकडून, स्त्री पुरुषांकडून अथवा विद्वान् मनुष्याच्या क्रोधानें जो शाप दिला जातो तो यामुळें दूर होवो. [२]

या वनस्पतीचें मूळ द्युलोकांतून येथें आलें आहे. जी पृथ्वीवर उगवली आहे अशीही सहस्र पेरें असलेली वनस्पति आमचें रक्षण सर्व प्रकारें करो. [३]

परि॒ मां परि॑ मे प्र॒जां परि॑ णः पाहि॒ यद्धन॑म्। अरा॑ति॒र्नो॑ मा ता॑री॒न्मा न॑स्तारि॒षुर॒भिमा॑तयः ॥ ४ ॥
श॒प्तार॑मेतु श॒पथो॒ यः सु॒हार्त्तेन॑ नः स॒ह । चक्षु॑र्मन्त्रस्य दु॒र्हार्दः पृ॒ष्टीरपि॑ शृणीमसि ॥ ५ ॥

अर्थ—(**मां परिपाहि**) माझें रक्षण कर. (**मे प्रजां परिपाहि**) माझ्या संततीचें रक्षण कर. (**नः यत् धनं परिपाहि**) आमचें जें धन आहे त्याचें रक्षण कर. (**अरातीः नः मा तारीत्**) अनुदार शत्रु आमच्या पुढें न जावो आणि (**अभिमातयः नः मा तारिषुः**) दुष्ट दुर्जन आम्हांस मागें न ठेवोत. [४]

(**शपथः शप्तारं एतु**) शाप देणाऱ्याजवळ परत जावो. (**यः सुहार्त तेन सह नः**) जे उत्तम हृदयानें युक्त आहेत त्यांच्याशीं आमचें मित्रत्व होवो. (**चक्षुः मंत्रस्य दुर्हार्दः**) डोळ्यांनीं दुष्ट खुणा करणाऱ्या दुष्ट मनुष्याच्या (**पृष्टीः अपि शृणामसि**) बरगड्या सुद्धां आम्हीं तोडून टाकतों. [५]

भावार्थ— माझें, माझ्या संततीचें तसेंच माझ्या धन, ऐश्वर्य वगैरेचें यानें संरक्षण होवो. आमचे शत्रु आमच्यापेक्षां पुढें न जावोत, म्हणजे आमच्यापेक्षां त्याची प्रगति जास्त होऊं नये. आणि आम्हीं त्यांच्यामागें जाऊन राहूं नये. [४]

शाप देणाऱ्याकडेच त्याचा शाप परत जावो. जो उत्तम हृदययुक्त मनुष्य आहे, त्याच्याशीं आमची मैत्री होवो. जे नजरेनें वाईट खुणा करून आपसांत भांडणें निर्माण करणारे आहेत, ते दुष्ट हृदयी मनुष्य आमच्यापासून दूर होवोत. [५]

शाप परत करणें

शापाचें स्वरूप

शाप म्हणजे काय हें सर्वांस माहित आहे. शिव्या देणें, रडतां रडतां, शोक करतांना दुसऱ्याचा नाश होण्याची गोष्ट बोलणें, वाईट शब्द उच्चारणें इत्यादि सर्व घृणित गोष्टी या शापामध्यें गणल्या जातात. ज्याप्रमाणें सामान्य स्त्री अथवा पुरुष शिवीगाळ करतात तद्वत् कित्येक वेळां विद्यायुक्त मनुष्य सुद्धां क्रोधाच्या भरांत वाईट शब्द बोलून जातो. हा सर्व क्रोधाचा खेळ आहे. जर क्रोध नाहींसा होऊन त्याजागीं विचारी शांत स्वभाव येईल तर शाप देण्याची वृत्ति नाहींशी होईल. म्हणून या सूक्तांत '**सहस्र काण्ड**' नांवाची वनस्पतिची प्रशंसा करून सूचविलें आहे या वनस्पतीच्या प्रयोगानें शाप उच्चारण्याची क्रोध वृत्ति दूर करणें शक्य आहे.

दूर्वांचा उपयोग— सहस्र काण्ड वनस्पतीचें प्रसिद्ध नांव दूर्वा असें आहे. जेथें पाणी असतें त्या स्थानीं त्या पुष्कळ उगवतात. हरेक कांडामधून म्हणजे पेरामधून ती फूटत रहाते. पित्तरोग, मूर्च्छारोग मस्तकाची अशांति, मस्तकांतील उष्णता, उन्मादरोग वगैरे वर ती उत्तम आहे. तिच्या सेवनानें क्रोध शांत होतो. तिचा रस जिरें आणि खडीसाखरेसह पीतात. अथवा गाईच्या ताज्या दुधांत सुद्धां पीतात. मस्तकशूळ (डोकें-दुःखी असेल तर त्यावेळीं दूर्वा वाटून त्याचा जाडा लेप मस्तकावर करण्यानें डोकें दुखी, गर्मी वगैरे बऱ्या होतात, म्हणून या सूक्तांत म्हटलें आहे कीं ही वनस्पति शाप देण्याच्या क्रोधवृत्तीला कमी करते. अथवा तिच्या सेवनानें क्रोधवृत्ति कमी होते.

प्रथम मंत्रांत तिचें वर्णन करतांना '**अघ-द्विष्टा**' पापाचा द्वेष करणारी म्हटलें आहे. ही गोष्ट स्पष्ट सांगत आहे कीं ही दूर्वा वनस्पति पापप्रवृत्तीला सुद्धां आळा घालते. म्हणजे दुसऱ्या इंद्रियाकडून होणारी पापें तिच्या सेवनानें कमी होतात. मन शांत होण्यानें दुसरीं इंद्रियें उन्मत्त होत नाहींत. हें तात्पर्य येथें गृहीत धरलें पाहिजे. काम, क्रोध वगैरे दोष तिच्या सेवनानें कमी होतात. म्हणून संयम करण्याची इच्छा करणारानें तिचें सेवन करावें. मन आणि इंद्रियें यांच्या मलिन वृत्तींस ती वनस्पति दूर करते. तिचें सेवन करण्याच्या पुष्कळ तऱ्हा आहेत. त्याचें तेल अथवा घृत तयार करून डोक्यास चोळण्यांत येतें. रस पिण्यांत येतो. लेप वरून करतां येतो. अशा प्रकारें वैद्य मंडळी यावर जास्त विचार करूं शकतात.

ती वनस्पति पाप विचारांना मनातून दूर करते, मनास शांत करते, मनाचा मळ दूर करते. पहिल्या आणि दुसऱ्या मंत्राचा असा आशय आहे. शाप देणें, शिव्या देणें वगैरे दोष वाचेच्या मलीनतेनें जे उत्पन्न होतात ते हिच्या प्रयोगानें माझ्या पायांखालीं दबून जावोत. म्हणजे त्या दोषांचा प्रभाव मजवर न पडो. हा दुसऱ्या मंत्राचा आशय आहे. दुसऱ्यानें शिव्या दिल्या, शाप दिले तरी सुद्धां त्याचा परिणाम माझ्यावर, माझ्या मनावर न

होवो आणि माझ्या मनांत त्याचा विचार कधी न येवो, असा आशय पायातळीं दबून जाण्याचा आहे.

तिसऱ्या मंत्रांत ही वनस्पति स्वर्गांतून येथें आली आहे आणि भूमींतून उगवते. ती प्रथम वर्णन केल्याप्रमाणें मनाला शांति देऊन तद्द्वारा आमचें रक्षण करो अशी प्रार्थना आहे.

चौथ्या मंत्रांत स्वतःचें, स्वतःच्या संततीचें, स्वतःच्या धनाचें—ऐश्वर्याचें रक्षण तिच्यामुळें होवो अशी प्रार्थना आहे. आणि शत्रु स्वतःपेक्षां पुढें न जावो, तसेंच स्वतः शत्रूच्या मागें न राहून जावें अशी इच्छा प्रगट केली आहे त्याचें थोडें स्पष्टीकरण करणें जरुरी आहे.

मनोविकारांची हानि— काम क्रोध वगैरे उच्छृंखल बनविणाऱ्या ज्या प्रवृत्ति आहेत. त्या जर संयमांत न ठेवल्या तर अनेक संकटें येतात, आणि मनुष्याचा त्याच्या परिवारासह नाश करतात. एका कामाच्यामुळें कित्येक कुटुंबें नाश पावलीं, नामशेष झालीं आहेत. आणि योग्य समयीं एक क्रोध जर स्वाधीन न राहिल्यानें सुद्धां कित्येक कुटुंबें मातीस मिळालीं आहेत. तसेंच इतर हीन मनोवृत्तींच्यामुळें कित्येक मनुष्यें नाश पावलीं आहेत. त्यांचें वाचकांनीं मनन करावें आणि मनांत समजावें कीं मनाच्या असंयमित वृत्ति मनुष्याचा कसा नाश करतात. जर ही दूर्वा वनस्पति मनाला शांत करते तर तिच्या सहाय्यानें कुटुंब आणि धन ऐश्वर्यासह मनुष्याचें रक्षण कसें करूं शकते तें यावरून स्पष्ट होतें.

तिच्या प्रयोगानें मन शांत होतें. उसळत नाहीं, आणि मन सुविचारपूर्ण होण्यानें मनुष्य आपत्तिमधून सहीसलामत सुटून जातो. अशा प्रकारें मनुष्य स्वतःचें, स्वतःच्या संततीचें व स्वतःच्या धनदौलतीचें रक्षण करूं शकतो.

मन जर पूर्ण सुविचारी होईल तर योग्यवेळीं योग्य कर्तव्य करणारा मनुष्य उन्नतीस जातो. पुढें प्रगति करतो, परंतु जो मनुष्य अशांत, चंचल आणि प्रक्षुब्ध मनोवृत्तीचा आहे तो पावलोंपावलीं चूका करतो आणि पतन पावतो. याप्रमाणें तो मागें पडत जातो, आणि त्याचे प्रतिपक्षी त्यास मागें सारून स्वतः पुढें सरतात. पण ज्या मनुष्यास मनःसंयम करतां येतो तो मनास उच्छृंखल होऊं देत नाहीं, काम, क्रोध वगैरेस मर्यादेबाहेर वाढूं देत नाहीं, तो कर्तव्य करीत असतां चुकत नाहीं, त्यामुळें तो नेहमीं प्रतिपक्षीयांस मागें टाकून स्वतः प्रगत होत जातो. चौथ्या मंत्राचा हा आशय जाणून वाचकांनीं त्यावर पुष्कळ विचार करावा.

शापास परत लावणें

पांचव्या मंत्रांत तीन उपदेश आहेत आणि या सूक्तांत खोल दृष्टीनें विचार करण्यासारखे तेच आहेत. संपूर्ण सूक्तांत हा मंत्र फार चांगला उपदेश देत आहे—

शपथः शप्तारं एतु। (मं. ५)

'शाप शाप देणाऱ्याजवळ परत जावो.' शिव्या शिव्या देणाऱ्याकडे परत जावोत. त्या कशा प्रकारें परत जातात हा मानसशास्त्राचा महान् शक्तिशाली सिद्धान्त आहे. नियमनाचा चमत्कार आहे. मन एक महान् शक्तिशाली विद्युत् आहे. मनाचे उच्च, नीच विचार, चांगले वाईट विचार ही त्या विद्युतचीं आंदोलनें आहेत. '**हे कंप जेथे पोहोंचण्यासाठीं पाठविण्यांत येतात तेथें पोहोंचून जर ते लीन झाले नाहींत तर ते कृतार्थ होत नाहींत. त्यामुळें ते त्याच पावलीं पाठवणाराकडे परत येतात. आणि त्यांची शक्ति त्या पाठविणाराचा नाश करते.**' हा मानसशास्त्राचा चमत्कार आहे आणि शिव्या अथवा शाप देणाऱ्यानें या नियमाचें अवश्य मनन केलें पाहिजे त्याचा विचार असा कीं—

१ एक 'अ' मनुष्यानें शिव्या किंवा शाप अथवा दुष्ट इच्छा 'क' चा नाश करण्याच्या प्रबळ इच्छेनें 'क' जवळ पाठविल्या.

२ जर 'क' सुद्धां साधारण मनोवृत्तीचा मनुष्य असेल तर त्याच्या मनावर त्याचा परिणाम होऊन त्याचें मन क्षुब्ध होईल, आणि तो सुद्धां परत 'अ' ला शिव्या शाप अथवा त्याचा नाश करणारे दुष्ट शब्द बोलूं लागेल.

याप्रमाणें एक दुसऱ्याचे शाप परस्परांवर जाऊं लागतील तर दोघांचीं मनें सारखींच दोषी आणि समान रीतीनें पतित होतील. परंतु

३ जर 'क' उच्च शांत मनोवृत्तीचा असेल तर 'अ' कडून आलेल्या नीच मनोवृत्तीच्या कंपनांना स्वतःच्या मनांत रहाण्यास तो स्थान देणार नाहीं. त्यामुळें आधार न मिळाल्यामुळें ते विकाराचे भाव परत फिरतील आणि पाठविणाऱ्या मनुष्याकडे 'अ' कडे सरळ परत जातील. आणि त्याच्या मनांत त्यांना तेथें स्थान प्राप्त होईल.

याप्रमाणें कुविचार परत गेल्या कारणानें चमत्कार असा होतो कीं प्रथमच कुविचार पाठविणारा 'अ' चा दुप्पट नाश होतो. प्रथम जेव्हां कुविचार निर्माण झाला तेव्हां त्याचें नुकसान झालें होतेंच आणि याप्रकारें कुविचारांना बाहेर इतरत्र स्थान न मिळाल्यानें ते जेव्हां परत त्याच्या जवळच आले, तेव्हां त्यांचा स्वीकार झाल्यानें त्याचा पुनः विनाश होतो. एकाच प्रकाराचे

कुविचार दोन वेळां त्याच्या मनांत येण्यानें आणि त्याच्यावर आघात करण्यानें त्याचें दुप्पट नुकसान होतें. पण जो सज्जन मनुष्य शांतिपूर्वक स्वतःमध्यें समता धारण करून बाहेरील कुविचारांस स्वतःमध्यें स्थिर होऊं देत नाहीं, स्वीकारत नाहीं, स्थान देत नाहीं, परत पाठवतो तो स्वतःचें मन सुदृढ करतो. त्यामुळें त्या शांत मनुष्याचें कल्याण होतें.

वाचकांच्या यावरून ध्यानीं येईल की वाईट विचारांच्या लहरी अथवा लाटा परत पाठविण्यानें स्वतःची उन्नति कशा प्रकारें होते. आणि प्रतिपक्षी म्हणजे शत्रु याचा दुप्पट नाश अथवा अवनति कोणत्या कारणानें होते. या पांच मंत्रांत तेंच कारण सांगितलें आहे किं जर कोणास स्वतःची उन्नति साध्य करण्याची इच्छा असेल तर त्यानें शाप परत करण्याची विद्या अवश्य जाणून घेतली पाहिजे. स्वतःच्या मनास सुदृढ आणि पवित्र करण्याचा हाच एक इलाज आहे. वाचकांनीं यावर पुष्कळ विचार करावा आणि शाप परत फिरविण्याचा पुष्कळ सखोल अभ्यास करावा. तसेंच स्वतः कधींहि कोणास शिव्या शाप देऊं नयेत अथवा वाईट विचार चिंतू नयेत, शाप दुसऱ्यावर पाठवूं नयेत. कारण की जर ते कुविचार परत फिरले तर आपल्या शत्रुपेक्षां आपलेंच जास्त नुकसान करतील. वाचक हो ! मनःशक्तींचा हा नियम या पांचव्या मंत्राच्या प्रथम चरणांत सूचवलेला आहे. जो तो नियम चांगल्याप्रकारें समजेल त्याचें स्वतःचेंच कल्याण होईल.

योग्य मित्र– मैत्री कोणाशीं करावी त्याविषयीं सुद्धां उपदेश पांचव्या मंत्रांत दुसऱ्या चरणांत केला आहे. पहा '**यः सुहार्त तेन सह**' (मं. ५) जे उत्तम हृदयाचे आहेत त्यांच्याशीं आमचें मित्रत्व होवो. ' उत्तम हृदयांनीं युक्त अशांच्या संगतींत मन शांत, गंभीर, आणि प्रसन्न रहातें; त्यांच्याशीं मित्रत्व जोडल्यानें आपण त्यांच्यासारखें होऊं शकतो; आणि वर सांगितल्याप्रमाणें शाप परत पाठविण्याची शक्ति सुद्धां सज्जन संगतीनें प्राप्त होते. म्हणून आपण आपल्यासाठीं असे सुयोग्य मित्र शोधले पाहिजेत की ज्यांची हृदयें मंगल विचारांनीं परिपूर्ण असतील.

दुष्टहृदय– जीं दुष्टहृदयीं मनुष्यें असतात त्यांच्या संगतींत अगणित हानि होते. दुष्ट मनुष्य कधीं कधीं वाईट शब्द बोलतात. शाप देतात, शिव्या देतात, हीन अर्थाचे कडवट टोमणे मारतात, हात अथवा अंग विक्षेपांनीं वाईट भावनेचे इशारे करतात. असेंच (**चक्षुः+मंत्रः**) डोळ्यांच्या हालचालींनीं असा खुणा, चिन्हे, इशारे करतात, किं कित्येक वेळां ते महा भयंकर वाईट असतात आणि त्याचे परिणामसुद्धां महाभयंकर होतात. त्यांचा परिणामसुद्धां शापासारखाच असतो. म्हणून कोणी मनुष्यानें असे दुष्ट भाव स्वतःच्या हृदयांत उत्पन्न होवूं देऊं नयेत. कोणी दुष्ट मनुष्य असे दुष्ट प्रयोग करीत असेल तर त्यास मदत करूं नये आणि सर्व प्रकारें स्वतःस्वतःचें या दुष्ट वृत्तींपासून रक्षण करावें. डोळयानें चिन्हें सुद्धां कांहीं दुष्ट हेतूनें करूं नयेत. जो मनुष्य दुष्ट असेल त्याचे सहवासांत राहूं नये, आणि नेहमीं चांगल्यांच्या सहवासांत रहावें. त्याविषयीं हा मंत्रभाग पहा–

चक्षुर्मन्त्रस्य दुर्हार्दः पृष्टीरपि शृणीमसि । (मं. ५)

डोळयांच्या वाईट इशाऱ्यांनीं खुणा करणाऱ्या दुष्टहृदयी मनुष्यांच्या पाठी तोडून टाकतों. ' म्हणजेच जो मनुष्य अशा वाईट भावना प्रगट करतो त्याचा पाठलाग करून त्याला दूर पळवून लावलें पाहिजे. त्यांना स्वतःजवळ स्वतःच्या संगतींत कधीं ठेऊं नये. अथवा स्वतः अशांच्या संगतींत राहूं नये. त्यांच्यापासून दूर रहावें हा उपदेश बहुमूल्य आहे. वाचकांनीं त्याचें स्मरण करावें. वाईट संगतीनें मनुष्य वाईट होतो. आणि चांगल्या संगतीनें चांगला होतो. म्हणून कधींहि वाईट सोबतींत फसूं नये. पण नेहमीं चांगल्यांच्या सहवासांत रहावें. आणि वर सांगितल्याप्रमाणें वाईट विचार स्वतःच्या मनांत येऊं देऊं नयेत, त्यांना स्थानच देऊं नये. तसेंच वाईट विचार आलेच तर त्यांस दूर करावें. असा श्रेष्ठ व्यवहार केल्यानें मनुष्य नेहमीं उन्नतीच्या रस्त्यानें प्रगति करील, पुढें जात राहील.

सूक्ताचे दोन भाग– या सूक्ताचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत चार मंत्र आहेत. ज्यांत औषधि प्रयोगानें मनाला क्षोभरहित करण्याची सूचना केली आहे. हें बाह्य साधन आहे. दुसऱ्या भागांत फक्त ५ वा मंत्र आहे. ज्यांत कुसंगतींत न फसतां सुसंगतींत रहाण्याचा उपदेश आणि त्या बरोबर स्वतःचें मन पवित्र ठेवणें तसेंच मनांत आलेल्या विचारांस त्याच क्षणीं परत करणें इत्यादि महत्त्वपूर्ण उपदेश आहेत. सारांश या उपदेशाचें स्वरूप अशाप्रकारें आहे. जर या सूक्ताचा उपदेश वाचक मननपूर्वक अंगीं बाणवतील तर त्यांची मनःशक्ति सुधरेल; यांत कांहीं शंका नाहीं. वाचकांनीं या सूक्ताशीं पहिल्या कांडांतील १०, ३१ आणि ३४ हीं सूक्तें पहावीं.

हृदयरोग आणि काविळीची चिकित्सा

कांड १, सूक्त २२

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - सूर्यः, हरिमा, हृद्रोगः ।)

अनु सूर्यमुदयतां हृद्द्योतो हरिमा च ते । गो रोहितस्य वर्णेन तेन त्वा परि दध्मसि ॥ १ ॥
परि त्वा रोहितैर्वर्णैर्दीर्घायुत्वाय दध्मसि । यथायमरपा असदथो अहरितो भुवत् ॥ २ ॥
या रोहिणीर्देवत्या३ गावो या उत रोहिणीः । रूपंरूपं वयोवयस्ताभिष्ट्वा परि दध्मसि ॥ ३ ॥
शुकेषु ते हरिमाणं रोपणाकासु दध्मसि । अथो हारिद्रवेषु ते हरिमाणं नि दध्मसि ॥ ४ ॥

अर्थ— हे (**हृद्-द्योतः च हरिमा**) तुझें हृदय जळणें आणि त्याचा पिवळा रंग (**सूर्यं अनु उदयताम्**) सूर्यामागून निघून जावो. (**गो-रोहितस्य तेन वर्णेन**) सूर्य अथवा गाईच्या त्या लाल रंगानें (**त्वा परि दध्मसि**) तुला सर्व प्रकारें हृष्टपुष्ट करतों. [१]

(**रोहितैः वर्णैः**) लाल रंगानें (**त्वा**) तुला (**दीर्घायुत्वाय परि दध्मसि**) दीर्घायुष्यासाठीं घेरून टाकतों, (**यथा**) ज्याप्रमाणें (**अयं**) हा (**अ-रपा असत्**) निरोगी होऊन जावो, आणि (**अ-हरितः भुवत्**) कावीळ रोगापासून मुक्त होऊन जावो. [२]

(**याः देवत्याः रोहिणीः गावः**) ज्या दिव्य लालरंगाच्या गाई आहेत, (**उत याः रोहिणीः**) आणि जीं लाल रंगाचीं किरणें आहेत, (**ताभिः**) त्यांनीं (**रूपं रूपं**) सुंदरता (**वयः वयः**) वयाच्या अनुसार (**त्वा परि दध्मसि**) तुला घेरून ठेवतों. [३]

(**ते हरिमाणं**) तुझ्या कावीळ रोगाला (**शुकेषु रोपणाकासु च**) पोपट आणि नवीन लहान रोपट्यांच्या रंगांत (**दध्मसि**) धारण करतों. (**अथो**) आणि तो (**हरिमाणं**) तुझा फिकेपणा आम्ही (**हरिद्रवेषु**) हिरव्या वनस्पतींत (**निदध्मासि**) ठेवतों. [४]

भावार्थ— तुझा हृदयरोग आणि कावीळ रोग सूर्याच्या किरणांशीं संपर्क साधल्यानें निघून जावो. लाल रंगाच्या गाई आणि लाल रंगाची सूर्यकिरणें असतात त्यांच्या द्वारा तुझें आरोग्य होऊं शकतें. [१]

लाल रंगाच्या प्रयोगानें दीर्घायुष्य प्राप्त होतें, कावीळ दूर होते आणि आरोग्य प्राप्त होतें. [२]

लाल रंगाच्या गाई आणि लाल रंगाचीं सूर्यकिरणें दिव्य गुणांनीं युक्त असतात. रूप आणि शक्यनुसार त्यांच्या योगें रोग बरा होतो. दूर होतो, त्या किरणांनीं रोग्यास वेष्टून टाकलें पाहिजे. [३]

या लाल रंगाच्या चिकित्सेत रोग्याचें पिवळें पडणें तसेंच फिकें पडणें दूर होईल. आणि तें फिकेपण हिरवे पक्षी आणि वनस्पति यांच्यांत जाऊन वास्तव्य करील, म्हणजे रोग्याजवळ पुनः कधींहि येणार नाहीं. [४]

हृद्यरोग आणि काविळीची चिकित्सा

वर्ण चिकित्सा

हें सूक्त ' वर्ण चिकित्से' चा महत्त्वपूर्ण उपदेश करीत आहे. मनुष्याला हृद्रोग अथवा कावीळ नांवाचा रोग कष्ट-त्रास-पीडा देतो. अपचन, पोटाचे विकार, तमाखु खाणें, दारू पीणें वगैरे त्याचीं अनेक कारणें आहेत, ज्यामुळें हा हृद्रोग उत्पन्न होतो. युवा अवस्थेंत वीर्य दोषाच्या कारणानें मनुष्य कृश, निस्तेज, फिकट, दुबळा आणि दीन होतो. म्हणून हा रोग दूर करण्यास उपाय या सूक्तांत वेदानें सांगितला आहे. सूर्याच्या लाल किरणांनीं तसेंच

लाल गाई द्वारा ही चिकित्सा केल्यानें वरील दोष दूर होतात, आणि चांगलें आरोग्य प्राप्त होतें.

सूर्यकिरणद्वारा चिकित्सा

सूर्याच्या किरणांत सात रंग असतात, कांचेंतून पाहिलें तरी हे सात रंग आपणास पाहतां येतात. उघड्या शरीरावर ही किरणें पडल्यानें आरोग्य प्राप्त होतें, आणि रोग दूर होतात. यास सूर्य किरणांचें रंगीत स्नान म्हणतात. ते उघड्या शरीरानेंच केलें पाहिजे. छपरांत कौलांचेजागीं लाल कांच ठेवल्यानें लाल किरण खालीं खोलींत मिळूं शकतात. त्या किरणांत उघड्या शरीरानें झोंपल्यानें ही चिकित्सा साध्य होते.

ज्याप्रमाणें वर सांगितलेल्या रोगांत लाल किरणांनीं चिकित्सा होते त्याप्रमाणें दुसऱ्या रोगांत दुसऱ्या एकाद्या रंगानें चिकित्सा होणें संभवनीय आहे. म्हणून चांगल्या वैद्यांनीं याविषयीं जास्त प्रयोग करून निश्चित करावें आणि त्याचा लाभ जनतेचे रोग निवारण्यासाठीं देऊन जनतेस सुखी करावें.

धारण करण्याचा विधि

सूर्याची किरणें ' परिधारण करण्याच्या विधि ' चें महत्त्व आहे. या सूक्तांत ' **परिदध्मसि** ' शब्द चार वेळां आला आहे. ' **निदध्मसि** ' एक वेळ आणि ' **दध्मसि** ' शब्द एक वेळ आला आहे. चारीबाजूंनीं धारण करणें, हा भाव या शब्दानें प्रगट होतो. शरीरास वेष्टून चारीबाजूनें धारण करणें असा भाव ' **परिदध्मसि** ' शब्दाचा आहे. ज्याप्रमाणें तलावांत स्नान केलें असतां तलावाच्या पाण्यानें सर्व शरीर भिजून निघतें, म्हणजे पाणी सर्व शरीरावर धारण केलें जातें त्याप्रमाणें लाल किरणें खोलींत घेऊन त्यांनीं सर्व उघडें शरीर तसेंच शरीराचे अवयव उलटून पालटून फिरवावयाचे, असें लाल किरणांचें स्नान अथवा त्यांचें परिधारण करणें असें याचें तात्पर्य आहे.

१ **रोहितैः वर्णैः परिदध्मसि** । (मं. २)
२ **दीर्घायुत्वाय परि दध्मसि** । (मं. २)
३ **गो रोहितस्य वर्णेन त्वा परि दध्मसि** (मं. १)
४ **ताभिष्ट्वा परिदध्मसि** । (मं. ३)

हे सर्व मंत्रभाग सूर्य किरणांचें स्नान म्हणजे ' परिधारण करण्याचें विधान ' सांगत आहेत. रोग्याच्या उघड्या शरीरास प्रथम सांगितल्याप्रमाणें एका खोलींत लाल किरणें आणून त्यांत बसविल्यानें तें लाल किरणें धारण करणें होऊं शकेल. आणि त्यामुळें आरोग्य दीर्घजीवन तसेंच बलप्राप्ति सुद्धां होऊं शकते. इतर रोग दूर करण्यास दुसऱ्या रंगाची योजना वैद्याच्या बुद्धिवर आधारित आहे.

रूप आणि बल

रूप आणि बलानुसार ही चिकित्सा, हें सूर्यकिरणांचें स्नान अथवा हा किरणें परिधान करण्याचा विधि करण्यास योग्य सूचना तिसऱ्या मंत्राच्या उत्तरार्धांत वाचकांना पहावयास मिळतील. रूपाचा अर्थ शरीर सौंदर्य, शरीराचा वर्ण रंग, आणि शरीराची सुकुमारता, हा आहे. जर शरीर योग्या रंगाचें असलें, नाजूक असलें तर त्यासाठीं किरण स्नान किती घ्यावें, त्यासाठीं सकाळचीं कोमल किरणें कशीं व किती वापरावींत, दुपारीं कठोर सूर्यप्रकाश वापरूं नये; इत्यादि बाबतींचा विचार करण्याचें कार्य विशिष्ट तज्ज्ञाचें आहे. जे मजबूत काळ्या शरीराचे असतात त्यांच्यासाठीं निराळ्या तऱ्हेचें किरणस्नान असलें पाहिजे ही गोष्ट उघड आहे. तसेंच जो नेहमीं सूर्यप्रकाशांत काम करतो त्याच्यासाठीं आणि जो कायम घरांत बसून रहातो त्याच्यासाठीं हें किरण स्नान निरनिराळें असलें पाहिजे. अशा विचाराचें नांव आहे ' रूप आणि वयानुसार परिधारण करणें. ' (**रूपं रूपं वयो-वयः**) असें सांगणारा मंत्रभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. रोग्याचें कठोर अथवा नाजूक शरीर, रोग्याचा रंग, त्याची रहाणीकरणी, त्याचें वय, त्याचें जीवन, पद्धति तसेंच त्याची शारीरिक शक्ति या सर्वांचा विचार करून किरण स्नानाची योजना करावयास हवी. नाहून नाजूक प्रकृतीच्या मनुष्यांस जास्त किरणस्नान मिळाल्यानें आरोग्याऐवजीं रोगी अवस्था निर्माण व्हावयाची. अथवा कठोर प्रकृतीच्या रोग्यास पुरत्या प्रमाणांत तें स्नान न मिळाल्यानें योग्य परिणाम होणार नाहीं. या दृष्टीनें तिसऱ्या मंत्राचा उत्तरार्ध पुष्कळ मनन करण्यासारखा आहे.

रंगीत गाईच्या दुधानें चिकित्सा

या सूक्तांत रंगीत गाईच्या दुधानें रोग्याची चिकित्सा करण्याचा विधिसुद्धां सांगितला आहे. गाई–पांढरी, लाल, काळी, कावरचित्री (कपिला), बदामी, कथ्थाई अशा निरनिराळ्या रंगाच्या असतात. सूर्याचीं किरणें गाईच्या पाठीवर पडतात आणि त्यामुळें रंगभेदानुसार तिच्या दुधावर परिणाम होतो. पांढऱ्या गाईच्या दुधाचा परिणाम काळ्या गाईच्या दुधापेक्षां निराळा असेल. तसेंच लाल, पीवळी, कावरचित्री गाईच्या दुधाचा परिणाम निरनिराळा असेल. रंगचिकित्सेचें तत्त्व मानल्यानें असे परिणाम मानावेच लागतील. म्हणून या सूक्तांत ' **रोहिणीः गावः** ' लाल गाईचें दूध तसेंच दुसऱ्या गोरसाचा उपयोग हृद्रोग आणि कावील या दोन रोगांस दूर करण्यास करावा असें सांगितलें आहे. हें विधान मनन करण्यासारखें आहे. त्यापासून पुष्कळच बोध प्राप्त होतो. आणि त्याच्या

मननामुळे दुसऱ्या रोगासाठीं इतर गाईच्या गोरसाचा उपयोग करण्याचा उपदेश सुद्धां प्राप्त होतो. रंगचिकित्सेचें तत्त्व गोदुग्ध चिकित्सेसाठीं नक्की होऊं शकतें. दोन्हीं मध्यें एकच तत्त्व आहे.

पथ्य

सूर्यकिरण चिकित्सेसह गोरससेवन करण्याचें पथ्य पाळल्यानें जास्त लाभ होणें संभवनीय आहे. म्हणजे लाल रंग धारण करण्याबरोबरच लाल गाईच्या दुधाचें सेवन करणें वगैरे प्रकारचें पथ्य समजावें.

याप्रकारें या सूक्ताचा विचार केल्यानें वाचकांस पुष्कळ लाभ प्राप्त होऊं शकेल.

दोन्ही मूत्राशय

कांड ७, सूक्त ९६

(ऋषिः - कपिञ्जलः । देवताः - वयः ।)

असदन्गावः सदनेऽपप्तद्वसतिं वयः । आस्थाने पर्वता अस्थुः स्थाम्नि वृक्कावतिष्ठिपम् ॥ १ ॥

अर्थ— (गावः सदने असदन्) गाई गोठ्यांत रहातात (वयः वसतिं अपसत्) पक्षी घरट्यांत रहातात, (पर्वताः आस्थाने अस्थुः) पर्वत स्वतःच्या स्थानीं स्थिर असतात त्याप्रमाणें (स्थाम्नि वृक्कौ अतिष्ठिपं) सुदृढ स्थानीं दोन्ही मूत्राशयांस स्थिर करतों. [१]

शरीरांत दोन बाजूस दोन मूत्राशय आहेत ते सुदृढस्थानीं आहेत. त्यांना चांगल्या अवस्थेंत ठेवल्यानें शरीराचें आरोग्य चांगलें रहातें. हे दोन्ही अवयव शरीरांतील विष दूर करतात, म्हणून त्यांना चांगल्या अवस्थेंत ठेवणें हें मनुष्याचें कार्य आहे. इंद्रिय संयमानें ते दोन्हीं चांगल्या अवस्थेंत रहातात आणि स्वतःचें कार्य करण्यास समर्थ होतात.

वनस्पति

कांड ३, सूक्त १८

(ऋषिः - अथर्वा । देवता - वनस्पतिः ।)

इमां खनाम्योषधिं वीरुधां बलवत्तमाम् । यया सपत्नीं बाधते यया संविन्दते पतिम् ॥ १ ॥

उत्तानपर्णे सुभगे देवजूते सहस्वति । सपत्नीं मे परा णुद पतिं मे केवलं कृधि ॥ २ ॥

अर्थ— (इमां बलवत्तमां वीरुधां ओषधिं खनामि) या बलशाली औषधि वनस्पतीस मीं खोदतों. (यया सपत्नीं बाधते) ज्यामुळें सवतीची पीडा दूर करतां येते. आणि (यया पतिं संविन्दते) ज्यामुळें पति प्राप्त करतां येतो. [१]

हे (उत्तानपर्णे सुभगे देवजूते सहस्वति) विस्तृत (मोठ्या) पानांनीं युक्त भाग्यशाली देवांनीं जिचें सेवन केलें आहे, अशा बलशाली औषधि ! (मे सपत्नीं पराणुद) माझ्या सवतीला दूर कर आणि (मे केवलं पतिं कृधि) पति माझा एकटीचा होऊन राहील असें कर. [२]

*

नहि ते नाम॑ ज॒ग्राह॒ नो अ॒स्मिन्र॑मसे॒ पतौ॑ । परा॑मे॒व प॑रा॒वतं॑ स॒पत्नीं॑ गमयामसि ॥ ३ ॥
उत्त॑रा॒हमु॑त्तर॒ उत्त॒रेदुत्त॑रा॒भ्यः । अ॒धः स॒पत्नी॒ या ममाध॑रा॒ साध॑रा॒भ्यः ॥ ४ ॥
अ॒हम॑स्मि॒ सह॑माना॒थो॒ त्वम॑सि सास॒हिः । उ॒भे सह॑स्वती भू॒त्वा स॒पत्नीं॑ मे सहावहै ॥ ५ ॥
अ॒भि ते॑ऽधां॒ सह॑माना॒मुप॑ ते॒ऽधां॒ सही॑यसीम् ।
मामनु॒ प्र ते॒ मनो॑ व॒त्सं गौरि॑व धावतु प॒था वारि॑व धावतु ॥ ६ ॥

हे सपत्नी ! सवती (ते नाम नहि जग्राह) तुझें नांवसुद्धां मी घेतलें नाहीं. आतां तूं (अस्मिन् पतौ नो रमसे) या (माझ्या) पतीत रममाण होऊं नकोस. आतां मी (परां सपत्नीं परावतं गमयामसि) दुसऱ्या सवतीस दूर करतें. [३]

हे (उत्तरे) श्रेष्ठ गुणयुक्त औषधि ! (अहं उत्तरा) मी अधिक श्रेष्ठ आहें. (उत्तराभ्यः इत् उत्तरा) श्रेष्ठां-मध्यें मी सर्वश्रेष्ठ आहें. (मम या अधरा सपत्नी) माझी जी नीच सवत आहे (सा अधराभ्यः अधरा) ती नीचांत नीच आहे. [४]

(अहं सहमाना अस्मि) मी विजयी आहें आणि हे औषधि ! (अथो त्वं सासहिः असि) तूं सुद्धां विजयी आहेस. (उभे सहस्वती भूत्वा) आपण दोघी शक्तिशाली होऊन (मे सपत्नीं सहावहै) माझ्या सवतीस जिंकून टाकूं (५)

(ते अभि सहमानां अधां) तुझ्या चारी बाजूंस मी ही विजयी वनस्पति ठेविली आहे (ते उप सहीयसीं अधां) तुझ्याखालीं ही जयशाली वनस्पति ठेवली आहे. आतां (ते मनः मां अनुप्रधावतु) तुझें मन माझ्या मागें धावो. (गौः वत्सं इव धावतु) ज्याप्रमाणें गाय स्वतःच्या वासराकडे धांवते आणि (वाः इव पथा) जसें पाणी स्वतःचा मार्ग काढून वहातें. [६]

सावत्रपणाचा भयंकर परिणाम

या सूक्ताचा अर्थ सुबोध असल्यानें भावार्थ दिला नाहीं.

अनेक पत्नी केल्या असतां घरांत क्लेश–कलह उत्पन्न होतात. सावत्रपणा उत्पन्न झाल्यानें स्त्रियांमध्यें परस्पर द्वेष वाढीस लागतो. संततिमध्यें सुद्धां ही भांडणें वाढतात. त्यामुळें अशा कुटुंबियांस सुख मिळत नाहीं. ही गोष्ट या सूक्तांत सांगितली आहे. या सूक्ताचें मुख्य तात्पर्य हेंच आहे कीं कोणी मनुष्यानें एका वेळीं एकापेक्षा जास्त पत्नी करूं नयेत, म्हणजे घरांत सावत्रपणाचीं बीजें उगवणार नाहींत.

ज्या घरांत पुरुष एकापेक्षा जास्त लग्नें करतो त्यांत द्वेषाग्नि पेट घेतो, आणि तो कोणी विझवूं शकत नाहीं. तेथें स्त्रियांत कलह, द्वेष, तिरस्कार, भांडणतंटा चालू असतो आणि त्यामुळें शेवटीं पुरुषांत सुद्धां कलह निर्माण होतो. शेवटीं सर्व कुटुंबाचा नाश होतो.

सवतीचा नाश करण्याचा प्रयत्न स्त्रिया करतात आणि त्यामुळें त्या घराची बेअब्रू होते. ही आपत्ति दूर करण्यासाठीं एकपत्नी व्रताचें आचरण करणें हाच एकमेव उपाय आहे.

ओषधि

कांड ८, सूक्त ७

(ऋषिः – अथर्वा । देवता – भैषज्यं, आयुष्यं, ओषधयः ।)

या बभ्रवो याश्च शुक्रा रोहिणीरुत पृश्नयः ।
असिक्नीः कृष्णा ओषधीः सर्वा अच्छावदामसि ॥ १ ॥
त्रायन्तामिमं पुरुषं यक्ष्माद्देवेषितादधि ।
यासां द्यौष्पिता पृथिवी माता समुद्रो मूलं वीरुधां बभूव ॥ २ ॥
आपो अग्रं दिव्या ओषधयः । तास्ते यक्ष्ममेनस्य१मङ्गादङ्गादनीनशन् ॥ ३ ॥
प्रस्तृणती स्तम्बिनीरेकशुङ्गाः प्रतन्वतीरोषधीरा वदामि ।
अंशुमतीः काण्डिनीर्या विशाखा ह्वयामि ते वीरुधो वैश्वदेवीरुग्राः पुरुषजीवनीः ॥ ४ ॥

अर्थ— (याः) ज्या औषधि (बभ्रवः) पोषण करणाऱ्या (याः च शुक्रा) ज्या वीर्य वाढविणाऱ्या (उत-रोहिणी) आणि ज्या वाढविणाऱ्या तसेंच (पृश्नयः) ज्या विविध रंगाच्या (असिक्नीः कृष्णाः ओषधीः) श्याम, काळी औषधि आहेत, (सर्वाः अच्छा आ वदामसि) त्या सर्वांस विशेषें करून आम्ही बोलावितों. [१]

(इमं पुरुषं) या मनुष्याला (देव-इषितात् यक्ष्मात्) देवानें प्रेरलेल्या रोगापासून (अधिञायन्तां) रक्षण करा. (यासां वीरुधां) ज्या औषधींचा (द्यौः पिता पृथिवी माता समुद्रः मूलं) द्युलोक पिता, पृथ्वी माता आणि समुद्र हें मूळ (बभूव) झालें आहे. [२]

(आपः अग्रं) पाणी मुख्य आहे आणि (ओषधयः दिव्याः) औषधि सुद्धां दिव्य आहेत. (ताः ते एनस्य यक्ष्मं) त्या तुझ्या पापामुळे उत्पन्न झालेल्या रोगाला (अंगात् अंगात् अनीनशन्) अंगा प्रत्यंगांतून दूर करो. त्याचा नाश करो. [३]

(प्रस्तृणतीः) विशेष विस्तार असलेली (स्तम्बिनीः) गुच्छांनीं युक्त (एकशुङ्गाः) एक पत्र असलेली, (प्रतन्वतीः) पुष्कळ पसरणारी, (ओषधीः आवदामि) औषधीस मीं बोलावितों. (ये वीरुधः वैश्वदेवीः) ज्या औषधि विशेष दैवीशक्तींनीं युक्त (अंशुमतीः काण्डिनीः विशाखाः ते ह्वयामि) तेजस्वी, कांड्यांनीं उपयोगी, विशेष शाखायुक्त आहेत, त्यांना मी बोलवतों. त्या (उग्राः पुरुषजीवनीः) प्रभावयुक्त आणि मनुष्याचें जीवन वाढ-विणाऱ्या आहेत. [४]

भावार्थ— कित्येक औषधि पोषण करणाऱ्या, कित्येक वीर्य वाढविणाऱ्या आणि कित्येक शरीरांत मांस भरणाऱ्या अशा विविधरंग रूपाच्या श्याम आणि काळ्या आहेत, त्यांचा औषधि प्रयोगांत उपयोग होतो. [१]

औषधि भूमीवर उगवतात आणि त्यांचें रक्षण आकाशातील सूर्य वगैरे कडून होतें. या औषधि पाणी, वायु वगैरे देवांच्या प्रकोपानें होणाऱ्या रोगापासून वाचवितात. [२]

मुख्य औषधि पाणी आहे. औषधि सुद्धां दिव्य वीर्य युक्त आहेत. या वनस्पति पाण्यामुळेंच उत्पन्न होणाऱ्या सर्व रोगापासून वाचवतात. [३]

कित्येक औषधि पुष्कळ प्रसरतात, कित्येक झुबक्यांनीं वाढतात, कित्येक शिंगासारखे फणगे फुटलेल्या असतात, कित्येकांचा विस्तार फार मोठा असतो, त्या सर्वांची प्रशंसा आयुर्वेदाच्या प्रयोगांत होते. या वनस्पति अनेक दिव्य शक्तींनीं युक्त असतात आणि मनुष्याचें जीवन दीर्घ करतात. [४]

यद्वः सहः सहमाना वीर्यं१ यच्च वो बलम् ।
तेनेममस्माद्यक्ष्मात्पुरुषं मुञ्चतौषधीरथो कृणोमि भेषजम् ॥ ५ ॥
जीवलां नघारिषां जीवन्तीमोषधीमहम् ।
अरुन्धतीमुन्नयन्तीं पुष्पां मधुमतीमिह हुवेऽस्मा अरिष्टतातये ॥ ६ ॥
इहा यन्तु प्रचेतसो मेदिनीर्वचसो मम । यथेमं पारयामसि पुरुषं दुरितादधि ॥ ७ ॥
अग्नेर्घासो अपां गर्भो या रोहन्ति पुनर्णवाः । ध्रुवाः सहस्रनाम्नीर्भेषजीः सन्त्वाभृताः ॥ ८ ॥
अवकोल्बा उदकात्मान ओषधयः । व्यृषन्तु दुरितं तीक्ष्णशृङ्ग्यः ॥ ९ ॥

अर्थ— हे (सहमानाः औषधीः) रोगनाशक औषधींनो ! (यत् वः सहः) जें तुमचें सामर्थ्य आहे (यत् च वः वीर्यं बलं) आणि जें वीर्य आणि बळ आहे (तेन इमं पुरुषं) त्यांनीं या पुरुषाला (अस्मात् यक्ष्मात् मुञ्चत) या रोगापासून वांचवा. (अथो भेषजं कृणोमि) आणि मीं औषध तयार करतों. [५]

(जीवलां जीवन्तीं नघारिषां) जीवन देणारी आणि हानी न करणारी (अरुंधतीं) जीवनांत अडथळा न करणारी (उन्नयन्तीं मधुमतीं) उठवणारी मधुर (पुष्पां ओषधीं) फुलांनीं युक्त औषधि (इह अस्मै अरिष्टतातये अहं हुवे) येथें तिला आरोग्य प्राप्तीसाठीं बोलावितों. [६]

(प्रचेतसः मम वचसः) ज्ञानी अशा माझ्या वचनांनीं (मेदिनीः इह आयन्तु) पुष्टिकारक औषधि येथें येवोत. (यथा) ज्यामुळें (इमं पुरुषं) या मनुष्याला (दुरितात् अधि पारयामसि) पापाच्या दुःखरूपी भोगा-पासून पार करतों. [७]

(याः भेषजीः) ज्या औषधि (अग्नेः घासः) अग्नीचें अन्न आणि (अपां गर्भः) पाण्याच्या गर्भरूप आहे (पुनः नवाः रोहन्ति) पुनः नव्यासारखी वाढते, तो (सहस्रनाम्नीः) हजार नांवाची (आभृताः ध्रुवाः सन्तु) आणलेली औषधि स्थिर होवो. [८]

(अवका-उल्बाः उदकात्मानः) शेवाळांत (पाण्यावरील नीळींत) उत्पन्न होणारी, पाणी जीचा आत्मा आहे (तीक्ष्णशृङ्ग्यः ओषधयः) तिखट (तीक्ष्ण) शिंगाची औषधि (दुरितं वि ऋषन्तु) पापरूपी रोगाला दूर करो. [९]

भावार्थ— औषधिमध्यें जें सामर्थ्य, वीर्य आणि बल आहे त्यामुळें या मनुष्याचा हा रोग दूर होवो. त्याच्यासाठीं हें औषध तयार केलें आहे. [५]

जीवन शक्ति वाढविणारी, दीर्घायुष्य देणारी, कमीपणा न आणणारी, शरीर व्यवहारांत अडथळा न करणारी, शरीराची सुस्थिति वाढवणारी, मधुर रसयुक्त फुलांनीं युक्त अशाप्रकारच्या औषधी या मनुष्याच्या आरोग्यासाठीं मीं आणतों. [६]

माझ्या सांगण्याप्रमाणें या सर्व औषधि मिळून या मनुष्यास निरोगी करोत. त्याचा हा रोग पापाचरणानें झाला आहे. [७]

या औषधि अग्नीच्या भोजनरूप आहेत आणि त्या पाण्याला धारण करतात. त्या वारंवार वाढतात, त्यांचीं हजारो नांवें आहेत. त्या गुणधर्मांनीं स्थिर होवोत. [८]

पाण्यावर जगणाऱ्या नीळींत (शेवाळांत) उत्पन्न होणारी औषधि या सर्व पापरूपी दोषापासून मनुष्यास वांचवोत. [९]

उन्मुञ्चन्तीर्विवरुणा उग्रा या विषदूषणीः ।
अथो बलासनाशनीः कृत्यादूषणीश्च यास्ता इहा यन्त्वोषधीः ॥ १० ॥
अपक्रीताः सहीयसीर्वीरुधो या अभिष्टुताः । त्रायन्तामस्मिन्ग्रामे गामश्वं पुरुषं पशुम् ॥ ११ ॥
मधुमन्मूलं मधुमदग्रमासां मधुमन्मध्यं वीरुधां बभूव ।
मधुमत्पर्णं मधुमत्पुष्पमासां मधोः संभक्ता अमृतस्य भक्षो घृतमन्नं दुह्रतां गोपुरोगवम् ॥ १२ ॥
यावतीः कियतीश्चेमाः पृथिव्यामध्योषधीः । ता मा सहस्रपर्ण्यो मृत्योर्मुञ्चन्त्वंहसः ॥ १३ ॥
वैयाघ्रो मणिर्वीरुधां त्रायमाणोऽभिशस्तिपाः ।
अमीवाः सर्वा रक्षांस्यप हन्त्वधि दूरमस्मत् ॥ १४ ॥

अर्थ— (उन्मुञ्चन्तीः विवरुणाः) रोगांतून मुक्त करणारी, विशेष रंग आणि रूप असलेली (उग्राः विषदूषणीः) तीव्र, विषनाशक, (अथो बलासनाशनीः) आणि कफास दूर करणारी (कृत्यादूषणीः या ओषधीः) घातक प्रयोगांचा नाश करणारी जी औषधि आहे, (ताः इह आयन्तु) त्या सर्व येथें येवोत. [१०]

(अभिष्टुताः अप क्रीताः) प्रशंसित आणि किंमत देऊन मिळविलेली, (याः सहीयसीः वीरुधः) ज्या शक्तिशाली औषधि आहेत त्या (अस्मिन् ग्रामे) या गांवांत (गां अश्वं पुरुषं पशुं) गाय, घोडा, मनुष्य आणि जनावर (त्रायन्तां) यांचें रक्षण करोत. [११]

(आसां वीरुधां) या औषधींचें (मूलं मधुमत्) मूळ मधुर आहे (अग्रं मधुमत्) अग्रभाग मधुर आहे (मध्यं मधुमत् बभूव) मध्यभाग सुद्धां मधुर झाला आहे. (आसां पर्णं मधुमत्) यांचीं पानें सुद्धां मधुर आणि (पुष्पं मधुमत्) फुलें मधुर आहेत. या औषधि (मधोः संभक्ता) मधानें भरपूर भरलेल्या आहेत त्या (अमृतस्य भक्षः) अमृताचेंच अन्न आहेत. त्या औषधि (गोपुरोगवं) गाय ज्याच्या अग्रभागीं ठेविली आहे असें (घृतं अन्नं दुह्रतां) तूप आणि अन्न देवोत. [१२]

(पृथिव्यां यावतीः कियतीः इमाः ओषधीः) पृथ्वीवर ज्या कित्येक औषधि आहेत, (ताः सहस्रपर्ण्यः) त्या हजार पानांच्या औषधि आहेत. आणि (मा अंहसः मृत्योः मुञ्चन्तु) मला पापरूपी मृत्युपासून वाचवोत. [१३]

(वीरुधां वैय्याघ्रः मणिः) औषधीपासून तयार केलेला वाघासारखा प्रतापी मणि (अभिशस्ति-पाः त्रायमाणः) विनाशापासून वांचविणारा संरक्षक आहे. तो (सर्वाः अमीवाः) सर्व रोगांना आणि (रक्षांसि) रोगजंतूंना (अस्मत् दूरं अप अधि हन्तु) आमच्यापासून दूर घेऊन जाऊन मारून टाको. [१४]

भावार्थ — रोगांस दूर करणारी, तीव्रगुणांनीं युक्त, शरीरांतून विषास दूर करणारी, कफ पोषणास दूर करणारी, घातपात दूर करणारी ओषधि वगैरे सर्व या स्थानीं उपयोगी आहेत. [१०]

वीर्यवती औषधि या गांवच्या गाई घोडे आणि मनुष्यें यांचें रक्षण करोत. [११]

या औषधींचें मूळ, मध्य, आणि अग्रभाग तसेंच त्यांचीं पानें, फुलें, फळें मधुर आहेत. हें अमृताचें भोजन आहे म्हणून गाय वगैरे प्राण्यांपासून पुष्कळ तूप वगैरेची प्राप्ति होते. [१२]

पृथ्वीवर ज्या औषधि आहेत त्या अनेक पानांच्या औषधि आम्हांस सर्वांस मृत्यूपासून वांचवोत. [१३]

औषधिपासून तयार केलेला मणि विनाशातून वांचवणारा असतो. तो सर्व रोग आणि रोगबीजांस आमच्या जवळून दूर करो. [१४]

सिंहस्येव स्तनथोः सं विजन्तेऽग्नेरिव विजन्त आभृताभ्यः ।
गवां यक्ष्मः पुरुषाणां वीरुद्भिरतिनुत्तो नाव्या एतु स्रोत्याः ॥ १५ ॥
मुमुचाना ओषधयोऽग्नेर्वैश्वानरादधि । भूमिं संतन्वतीरित यासां राजा वनस्पतिः ॥ १६ ॥
या रोहन्त्याङ्गिरसीः पर्वतेषु समेषु च । ता नः पयस्वतीः शिवा ओषधीः सन्तु शं हृदे ॥ १७ ॥
याश्चाहं वेद वीरुधो याश्च पश्यामि चक्षुषा । अज्ञाता जानीमश्च या यासु विद्म च संभृतम् ॥ १८ ॥
सर्वाः समग्रा ओषधीर्बोधन्तु वचसो मम । यथेमं पारयामसि पुरुषं दुरितादधि ॥ १९ ॥
अश्वत्थो दर्भो वीरुधां सोमो राजामृतं हविः । व्रीहिर्यवश्च भेषजौ दिवस्पुत्रावमर्त्यौ ॥ २० ॥

अर्थ— (आभृताभ्यः) आणलेल्या औषधींनी रोग (सं विजन्ते) घाबरून जातो (स्तनथोः सिंहस्य इव) लोक ज्याप्रमाणें गर्जना करणाऱ्या सिंहापासून आणि (अग्नेः इव विजन्ते) ज्याप्रमाणें अग्नीला घाबरतात. (वीरुद्भिः अतिनुत्तः) औषधींनी धकवून लावलेला (गवां पुरुषाणां यक्ष्मः) गाई आणि पुरुषांचा रोग (नाव्याः स्रोत्याः एतु) नावेतून जाण्याप्रमाणें नदींतून दूर निघून जावो. [१५]

(यासां राजा वनस्पतिः) ज्यांचा राजा वनस्पति आहे त्या (ओषधयः) औषधि (मुमुचानाः) रोगापासून सोडविणाऱ्या (वैश्वानरात् अग्नेः अधि) वैश्वानर अग्निवर राहून (भूमिं संतन्वतीः इत) भूमीवर पसरतात. [१६]

(याः आंगीरसीः) ज्या शरीरांतील अवयवांचे रस वाढविणाऱ्या औषधि (पर्वतेषु समेषु च रोहन्ति) पर्वत आणि सपाट भूमीवर वाढतात (ताः शिवाः पयस्वतीः ओषधीः) त्या शुभ रसयुक्त औषधि (नः हृदे शं सन्तु) आमच्या हृदयाला शांति देवो. [१७]

(अहं याः वीरुधः वेद) मी ज्या औषधींना जाणतों (याः च चक्षुषा पश्यामि) आणि ज्या मी डोळ्यांनी पहातों (याः अज्ञाताः जानीमः) ज्या न जाणलेल्या औषधी आम्हीं आतां जाणतों, (यासु च संभृतं विद्म) ज्यांत वीर्य भरपूर आहे असें आम्हीं जाणतों. [१८]

(सर्वाः समग्राः ओषधीः) सर्व संपूर्ण औषधी (मम वचसः बोधयन्तु) माझ्या सांगण्याचा भाव जाणून (यथा) ज्याप्रमाणें (इमं पुरुषं दुरितात् अधि पारयामसि) या पुरुषास पाप रूपी रोगापासून सोडवतात. [१९]

(अश्वत्थः) पिंपळ (दर्भः) दर्भ (वीरुधां राजा सोमः) वनस्पतींचा राजा सोम (हविः अमृतं) अन्न आणि पाणी (व्रीहिः यवः च) तांदूळ आणि जव (अमर्त्यौ भेषजौ) अमर औषधि आहेत त्या (दिवः पुत्रौ) द्युलोकांत पुत्राप्रमाणें रक्षण करतात. [२०]

भावार्थ— ज्याप्रमाणें सिंहाला सर्व प्राणी भितात, त्याप्रमाणें रोग औषधींना भितात; म्हणून या औषधींनी गाई आणि मनुष्यें यांचे रोग दूर होवोत. [१५]

सोम राजाच्या राज्यांत या सर्व औषधि या विशाल भूमीवर पसरतात. [१६]

औषधि अंगरस वाढवतात. त्या पर्वतावर आणि सपाट भूमीवर उगवतात. त्या सर्व रसयुक्त असतात. त्या औषधि आमच्या हृदयाला शांति देवो. [१७]

ज्या औषधि आम्हीं ओळखतों आणि ज्या आम्हीं ओळखीत नाहीं, त्या सर्वांत राहिलेलें वीर्य ओळखलें पाहिजे. [१८]

सर्व औषधि मला अनुकूल होऊन या मनुष्यास पापरूपी रोगापासून वाचवोत. [१९]

पिंपळ, दर्भ, औषधींचा राजा सोम, अन्न, जल, तांदूळ, जव, या सर्व दिव्य औषधि आहेत, त्यामुळें अमरत्व म्हणजे दीर्घायुष्य प्राप्त होऊं शकते. [२०]

उज्जिहीध्वे स्तनयत्यभिक्रन्दत्योषधीः । यदा वः पृश्निमातरः पर्जन्यो रेतसावति ॥ २१ ॥
तस्यामृतस्येमं बलं पुरुषं पाययामसि । अथो कृणोमि भेषजं यथासंच्छतहायनः ॥ २२ ॥
वराहो वेद वीरुधं नकुलो वेद भेषजीम् । सर्पा गन्धर्वा या विदुस्ता अस्मा अवसे हुवे ॥ २३ ॥
याः सुपर्णा आङ्गिरसीर्दिव्या या रघटो विदुः । वयांसि हंसा या विदुर्याश्च सर्वे पतत्रिणः ।
मृगा या विदुरोषधीस्ता अस्मा अवसे हुवे ॥ २४ ॥
यावतीनामोषधीनां गावः प्राश्नन्त्यघ्न्या यावतीनामजावयः ।
तावतीस्तुभ्यमोषधीः शर्म यच्छन्त्वाभृताः ॥ २५ ॥
यावतीषु मनुष्या भेषजं भिषजो विदुः । तावतीर्विश्वभेषजीरा भरामि त्वामभि ॥ २६ ॥

अर्थ— हे (पृश्निमातरः ओषधीः) पृथ्वीपासून उत्पन्न होणाऱ्या औषधींनों ! (उज्जिहीध्वे) वर उठा, (यदा पर्जन्यः स्तनयति अभि क्रन्दति) जेव्हां मेघगर्जना होते आणि वादळें गडगडाट करतात, तेव्हां (पर्जन्यः रेतसा वः अवति) पर्जन्य स्वतःच्या जलानें तुमचें रक्षण करतो. [२१]

(तस्य अमृतस्य इमं बलं) त्या अमृताची ही शक्ति (इमं पुरुषं पाययामसि) या पुरुषाला पाजतों, (अथो कृणोमि भेषजं) आणि औषध तयार करतों. (यथा शतहायनः असत्) ज्यामुळें तो शतायु होईल. [२२]

(वराहः वीरुधं वेद) डुक्कर औषधी ओळखतें. (नकुलः भेषजीं वेद) मुंगुस औषधि ओळखतें (सर्पाः गंधर्वाः याः विदुः) साप आणि गंधर्व ज्यांना जाणतात (ताः अस्मै अवसे हुवे) त्यांना याचें रक्षण करण्यासाठीं बोलावितों [२३]

(सुपर्णाः याः आंगिरसीः) गरुड ज्या अंगरसयुक्त औषधीला (विदुः) जाणतो (याः दिव्याः रघटः विदुः) ज्या दिव्य औषधींची ओळख चिमण्यांना सुद्धां आहे (वयांसि हंसाः याः विदुः) ज्याला हंस आणि पक्षी सुद्धां ओळखूं शकतात, (याः च सर्वे पतत्रिणः) ज्यांना सर्व पक्षी जाणतात (याः ओषधीः मृगाः विदुः) ज्या औषधी हरणांस [जनावरांस] सुद्धां माहित आहेत (ताः अस्मै अवसे हुवे) त्या सर्वांना याच्या रक्षणासाठीं बोलावितों. [२४]

(यावतीनां ओषधीनां) ज्या औषधींना (अघ्न्याः गावः प्राश्नन्ति) अवध्य गाई खातात, (यावतीनां अजावयः) ज्या शेळ्या बकऱ्या खातात (तावतीः आभृताः ओषधीः) तितक्या आणलेल्या औषधि (तुभ्यं शर्म यच्छन्तु) तुला सुख देवोत. [२५]

(भिषजः मनुष्याः) वैद्य लोक (यावतीषु भेषजं विदुः) जितक्या औषधींचे औषधि प्रयोग जाणतात, (तावतीः विश्वभेषजीः) त्या सर्व औषधींपासून तयार केलेलें औषध (त्वां अभि आभरामि) तुझ्या जवळ सर्व बाजूंनीं आणतों. [२६]

भावार्थ— मोठी गर्जना करून मेघ औषधींनां सांगतात कीं आतां वर या–उठा. [२१]
औषधीमध्यें बल संग्रहीत आहे तें मनुष्यास पाजलें तर त्यानें मनुष्य दीर्घायु होईल. [२१]
डुक्कर, मुंगुस, साप, गंधर्व वगैरे या सर्व औषधि ओळखतात. त्या औषधींनीं प्राण्यांचें रक्षण होतें. [२३]
गरुड, चिमण्या, पक्षी, हंस, हरिण वगैरे जे कोणी औषधि जाणतात त्यांनीं प्राण्यांचें रक्षण करण्यात येतें. [२४]
ज्या औषधि, गाय, शेळ्या मेंढ्या वगैरे खातात त्यानें मनुष्याचें कल्याण होतें. [२५]
मनुष्य ज्यांच्यापासून औषधि तयार करणें जाणतो त्या सर्वांना मी येथें आणतों. [२६]

पुष्पवतीः प्रसूमतीः फलिनीरफला उत । संमातरं इव दुह्रामस्मा अरिष्टतातये ॥ २७ ॥
उत्त्वाहार्षं पञ्चशलादथो दशशलादुत । अथो यमस्य पड्वीशाद्विश्वस्माद्देवकिल्बिषात् ॥ २८ ॥

अर्थ— (पुष्पवतीः प्रसूमतीः) फुलें आणि पानें, मोहर यानें युक्त (फलिनीः उत अफलाः) फळानें युक्त आणि फळ रहित औषधि (अस्मै अरिष्टतातये) याच्या सुखशांतिसाठीं आणि विस्तारासाठीं (संमातरः इव दुह्रां) उत्तम मातेप्रमाणें रस प्रदान करोत. [२७]

(पंचशलात् उत दशशलात्) पांचप्रकारच्या आणि दहाप्रकारच्या दुःखांनीं (अथो यमस्य पड्वीशात्) आणि यमाच्या पाशांतून आणि (विश्वस्मात् देवकिल्बिषात्) सर्व देवांविषयीं केलेल्या पापांपासून (त्वा उत् आहार्षं) तुला वर उठवितों. [२८]

भावार्थ— फुलें फळें आणि नवीन कोंवळ्या पानांच्या औषधि याच्या आरोग्यासाठीं आणण्यांत येवोत. आणि त्यांचा उत्तम रस, याच्यासाठीं द्यावा. [२७]

पांच आणि दहा प्रकारचीं दुःखें, यमाचे पाश, देवासंबंधीं होणारीं पापें यांपासून औषधींच्या मदतीनें आम्हीं त्यास वांचवितों [२८]

औषधि

औषधींच्या शक्ति

या सूक्तांत औषधींचें वर्णन करतां करतां जी विशेष महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे, ती ही कीं रोगाचें मूळ पापांत आहे. पहा—

दुरितात् पारयामसि (मं. ७, १९)
तीक्ष्णशृंग्यः दुरितं व्यृषन्तु । (मं. ९)
सहस्रपर्ण्यो मृत्योर्मुञ्चन्त्वंहसः । (मं. १३)

'या औषधि दुरितांपासून म्हणजे पापरूपी रोग अथवा मृत्यूपासून वांचवोत '' येथें दुरित, अंहस्, मृत्यु ' हे तीन शब्द पाप, रोग आणि मरण यांचे वाचक आहेत. पापामुळें रोग होतो, आणि रोगानें मनुष्य मरतो, म्हणजे रोग, दुःख आणि मृत्यु या पापामुळें होतात. जो मनुष्य काया, वाचा, मन आणि बुद्धि यांनीं कधीं पाप करीत नाहीं त्याला रोग कधीं होत नाहीं, कधीं दुःख होत नाहीं, आणि त्याला मृत्युच्या तावडींत कधीं जावें लागत नाहीं. मनुष्याच्या पापवृत्तीच त्याच्या नाशाचें कारण आहे. मनुष्य शारीरिक पाप करून शरीर कष्ट भोगतो. वाचेनें पाप करून वाणीविषयक दुःखें भोगतो. दुःख, कष्ट, रोग आणि मृत्यु थोड्या फार फरकानें एकाच अवस्थेचीं निरनिराळीं नांवें आहेत. म्हणून मृत्युपासून वांचणें याचा तात्पर्यार्थ दुःखापासून मुक्त होणें, रोगापासून सुटणें आणि मृत्यूपासून दूर होणें असा अथवा एवढाच होतो. वेद आणि उपनिषदें यांत हा विषय पुष्कळ वेळ आलेला आहे म्हणून याचा विचार वाचकांनीं त्या रीतीनें करावा.

पापांपासून रोग

या सूक्तांत म्हटलें आहे कीं औषधि पापांपासून वांचवतात आणि पापांपासून वांचल्यानें मनुष्य रोगापासून वांचतो आणि त्याचें सर्व पाप समूळ दूर होण्यानें मनुष्य अंतीं मृत्युपासून सुद्धां वांचतो. वाचकांनीं असें मानूं नये कीं औषधींनीं फक्त रोगाचीच चिकित्सा होते. म्हणून योग्य औषधि सेवनानें शरीरवाणी आणि मनाची पाप प्रवृत्तिही दूर होते. रोग दूर केला म्हणजे चिकित्सेचें कार्य पुरें झालें असें कोणीं जर समजत असेल तर त्याची ती चूक आहे. वास्तविक रोग हें तर एक बाह्यचिह्न आहे ज्यामुळें मनुष्याच्या अंतःप्रवृत्ति कळून येतात.

वाचक येथें कदाचित् असा प्रश्न करतील कीं औषधींच्या सहाय्यानें पापप्रवृत्ती कशा काय दूर होतील ? त्याविषयीं इतकेंच म्हणावयाचें कीं सात्त्विक, राजस् आणि तामस् अन्न सेवन केल्यानें मनुष्याच्या प्रवृत्ति तसतशा होतात. मांस आणि मद्य कांदे, लसूण, तेलांत तळलेले तिखट पदार्थ इत्यादि भक्षण केल्यानें त्या मनुष्याची वृत्ति राजसी अथवा तामसी बनते. तांदूळ, दूध, तूप वगैरे सात्त्विक पदार्थ खाल्ल्यानें मनुष्य सात्त्विक मनोवृत्तींचा होतो. त्याविषयीं भगवद्गीतेंतील खालीं दिलेले श्लोक येथें मनन करण्यायोग्य आहेत.

तीन प्रकारचें भोजन

आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥
कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥
यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥
(भ. गी. अ. १७)

आयु, सत्त्व, बल, आरोग्य, सुख, आणि रुचि म्हणजे स्वाद वाढविणारें रसाल, स्निग्ध, पौष्टिक, आणि मनाला प्रसन्न करणारें भोजन सात्त्विक लोकांस प्रिय असतें. कडू, आंवट, खारट, उष्ण, तिखट, रुक्ष आणि पोटांत आग-जळजळाट निर्माण करणारें अन्न राजस मनुष्यांस प्रिय असतें आणि तें भोजन अंतीं दुःख, रोग आणि शोक उत्पन्न करतें. तयार झाल्यानंतर तीन तास पडून राहिलेलें, रसहीन वास येणारें, उष्टें, अपवित्र अन्न तामसी लोकांस प्रिय असतें, ' म्हणजे एक अन्न बल, आयुष्य, आरोग्य आणि सुख वाढविणारें आहे. आणि दुसरें कमी करणारें आहे. म्हणून जो मनुष्य दीर्घायु होऊं इच्छितो त्यानें योग्य असें सात्त्विक जेवण जेवावें इतका विचार प्रदर्शित करण्यासाठींच पापापासून रोग आणि मृत्यू होतो आणि सात्त्विक अन्नापासून पापवृत्ति दूर होते वगैरे गोष्टी या सूक्तांत सांगितल्या आहेत. तसेंच—

अमर्त्य औषध

व्रीहिर्यवश्च भेषजौ अमर्त्यौ । (मं. २०)

' तांदूळ आणि जव अमर होण्याच्या औषधि आहेत, ' असें म्हटलें आहे. हें अत्यंत सात्त्विक भोजन आहे. तसेंच सोम नांवाचा रस तर अमृतरसच होय तोसुद्धां अमरत्व देतो. असें—

सोमो राजा अमृतं हविः । (मं. २०)

या मंत्रांत तसेंच—

मधोः संभक्ता अमृतस्य भक्षः । घृतं अन्नं गोपुरोगवं दुह्रताम् । (मं. १२)

' मधुरतेनें मिश्रित करून अमृताचा, तुपानें मिश्रित अन्न आणि गोरस हें श्रेष्ठ अन्न आहे. '

याप्रकारें या सूक्तांत जो अनेक वेळां उपदेश आला आहे तो सर्व श्री भगवद्गीतेच्या वचनासह पहाण्यालायक आहे. मनुष्यानें त्याप्रमाणें सात्त्विक अन्न खाऊन दीर्घायुष्य, आरोग्य आणि सुखाचा सोहळा पहावा.

जीवला, जीवन्ती, अरुंधति, रोहिणी, कृष्णा, असिक्नी, इत्यादि नांवें औषधि, वाचक आहेत.

१ जीवन्ती— ही औषधि दीर्घजीवन देणारी आहे कारण की तिला (**सर्व-दोष-घ्ना**) सर्व दोष दूर करणारी असें वैद्यक ग्रंथांत म्हटलें आहे. तिची भाजी सुद्धां उत्तम होते आणि हितकारक असते.

२ कृष्णा— हें नांव पुष्कळ उत्तमोत्तम वनस्पतींचें आहे. ती निरनिराळया औषधांत वापरतात.

३ जीवला— हें नांव सिंहपीपंळीचें आहे. ही औषधिसुद्धां फार आरोग्यकारक आहे. यांतील कित्येक औषधि दीर्घायुष्य-दायक पाकांतून वापरतात. कित्येक वैद्यक ग्रंथांतून त्याचें वर्णन आहे. वाचकांनीं येथील वर्णनाची त्याच्याशीं तुलना करून पहावी.

सूक्तांतील इतर गोष्टी अगदीं सरळ असल्यानें त्याच्या स्पष्टीकरणाची कांहीं आवश्यकता नाहीं. वाचकांनीं या प्रमाणें या सूक्ताचा विचार केला तर त्यांना त्याचा आशय स्पष्ट करून येईल.

पृश्निपर्णी

कांड २, सूक्त २५

(ऋषिः – चातनः । देवता – वनस्पतिः)

शं नो॑ दे॒वी पृ॑श्निप॒र्ण्यशं॒ निर्ऋ॑त्या अकः । उ॒ग्रा हि क॑ण्व॒जम्भ॑नी॒ ताम॑भक्षि॒ सह॑स्वतीम् ॥१॥

अर्थ— (देवी पृश्निपर्णी नः शं) पृश्निपर्णी औषधि दिव्य आहे ती आमच्यासाठीं सुख आणि (निर्ऋत्याः अ-शं) रोगासाठीं दुःख (अकः) करते. (हि उग्रा कण्व-जम्भनी) कारण कीं ती प्रचंड रोग बीज नाशक आहे. (सहस्वतीं तां अभक्षि) बलशाली अशा त्या औषधीचें मीं सेवन करतों. [१]

भावार्थ— पृश्निपर्णी औषधि मनुष्यास सुख देणारी आणि रोगांस त्रासवून पळवून लावणारी आहे. ती रोगबीजांस दूर करते. रोगांस पळवून लावते म्हणून तिचें सेवन केलें पाहिजे. [१]

सहमानेयं प्रथमा पृश्निपर्ण्यजायत । तयाऽहं दुर्णाम्नां शिरो वृश्चामि शकुनेरिव ॥२॥
अरायमसृक्पावानं यश्च स्फातिं जिहीर्षति । गर्भादं कण्वं नाशय पृश्निपर्णि सहस्व च ॥३॥
गिरिमेनाँ आ वेशय कण्वान् जीवितयोपनान् । तांस्त्वं देवि पृश्निपर्ण्यग्निरिवानुदहन्निहि ॥४॥
पराच एनान्प्र णुद कण्वान् जीवितयोपनान् । तमांसि यत्र गच्छन्ति तत्क्रव्यादो अजीगमम् ॥५॥

अर्थ— (इयं प्रथमा सहमाना पृश्निपर्णी अजायत) ही पहिली पृश्निपर्णी प्रगट झाली आहे. (तया दुर्णाम्नां शिरः वृश्चामि) त्या वनस्पतीनें वाईट नांवाच्या रोगाचें डोकीं मी चेंदून टाकतों. (शकुनेः इव) ज्याप्रकारें लहान पक्ष्यांचीं डोकीं कापतात. [२]

हे पृश्निपर्णी (अ-रायं) शोभा दूर करणारे (असृक् पावानं) रक्त पिणारे (यः च स्फातिं जिहीर्षति) जे पुष्टिका अडथळा करतात, त्यांचा तसेंच (गर्भ अदं) गर्भास खाणाऱ्या (कण्वं नाशय) रोगबीजांचा नाश कर आणि (सहस्व) आणि त्यांस जिंकून घे. [३]

हे देवी पृश्निपर्णि औषधि ! तूं (एनान् जीवितयोपनान्) या जीविताचा नाश करणाऱ्या (कण्वान्) रोग बीजानां (गिरिं आवेशय) पर्वतावर नेऊन जा आणि (त्वं तान् अग्निः इव अनुदहन्) तूं त्यांना अग्निप्रमाणें जाळून टाकून (इहि) इकडे ये. [४]

(एनान् जीवितयोपनान्) या जीविताचा नाश करणाऱ्या (कण्वान् पराचः प्रणुद) रोगबीजांना खालच्या रस्त्यानें ढकलून दे. (यत्र तमांसि गच्छन्ति) जेथें अंधार असतो (तत्) तेथें (क्रव्यादः अजीगमं) मांस भक्षक रोगांस प्राप्त केलें आहे. [५]

भावार्थ— या कार्यासाठीं हीच औषधि मुख्य आहे. तिच्यामुळें जणूं काय दुष्ट रोगाचें डोकेंच कापलें जातें. [२]

जे रोग शरीराची शोभा कमी करतात, रक्त कमी करतात, पुष्टीचा नाश करतात, गर्भास सुकवितात, अशा रोगांचा पृश्निपर्णी समूळ नाश करते. [३]

ज्यांना हीं रोगबीजें त्रासवितात. त्यांना डोंगरावर जाऊन राहाण्यास सांगावें आणि त्यांच्याकडून पृश्निपर्णीचें सेवन करवावें. म्हणजे ती पृश्निपर्णी रोगबीजांस जाळून टाकते. [४]

प्राणाचा नाश करणाऱ्या या रोगबीजांस खालच्या वाटेनें दूर करा. जेथें अंधार असतो तेथेंच रक्त आणि मांसाचा नाश करणारीं रोगबीजें रहातात. [५]

पृश्निपर्णी

पृश्निपर्णी

या पृश्निपर्णीला चित्रपर्णी सुद्धां म्हणतात. इतर भाषांत ' पीठवन, पीतवन, पीठौनी, पठौनी ' असे सुद्धां म्हणतात. तिचे गुण असे आहेत—

> त्रिदोषघ्नी वृष्योष्णा मधुरा सरा ।
> हन्ति दाहज्वरश्वासरक्तातिसारतृड्वमीः ॥
>
> (भाव. पू. १ भा. गुड्. वर्ग)

' ही पीठवन औषधि त्रिदोषनाशक, बलवर्धक, उष्ण, मधुर आणि सारक आहे. तिनें दाहज्वर, श्वास, रक्तातिसार, तृष्णा, (तहान) आणि वमन (उलटी) वगैरे दूर होतात. ' या वनस्पतीचें वर्णन प्रस्तुत सूक्तांत केलें आहे. या सूक्तांत ज्या रोगांचा नाश करण्यासाठीं या औषधीचा उपयोग करावा असें म्हटलें आहे त्याचें वर्णन आतां पहा—

रक्तदोष

या सूक्तांत अनेक रोगमूलांचें वर्णन केलें आहे, परंतु विशेषें करून सर्व रोगांचें मूळ कारण रक्तदोष आहे त्याविषयीं पहा—

१ असृक्-पावानं- (असृक्) रक्ताला (पावानं)

ही पीतात म्हणजे रोगबीजें रक्त पीतात. शरीरांतील रक्त कमी करतात, रक्तशुद्धीला दूर करतात, आणि रक्ताचें प्रमाण कमी करतात, (Animea) पांडुरोगासारखे रोग ज्यांत रक्ताचें प्रमाण कमी होतें, (मं. ३) ते रोग होतात.

२ **अ-रायं- (राय, रै)** चा अर्थ श्री, शोभा, कांति, ऐश्वर्य असा आहे. शरीराची शोभा, अथवा सौंदर्य येथें राया शब्दानें सूचविलें आहे. तें या रोगामुळें कमी होतें. आणि शरीरांतील रक्त कमी आणि अशुद्ध झाल्यानें या पांडुरोग वगैरे मध्यें शरीराची शोभा दूर होते आणि शरीर मेल्यासारखें होतें. (मं. ३)

३ **स्फार्ति जिहीर्षति**- पुष्टीला दूर करते. शरीराचें मांस कमी करते, शरीरास सुकवितें, शरीर अशक्त होतें, शरीराचा घाट, सुंदरता, कमी होते, म्हणजे शरीर क्षीण होतें. (मं. ३)

४ **गर्भादं (गर्भ-अदं)** गर्भास खाणारा रोग मातेच्या गर्भांत गर्भास न वाढूं देणारा रोग, गर्भ सुकवून टाकणारा, अशक्त करणारा अथवा गर्भास मारून टाकणारा रोग असतो. (मं. ३)

५ **कणवः**- ज्या रोगांत रोगी अशक्ततेमुळें **(कणति)** कणसतो, कण्हतो, शब्द करतो, वेदनेमुळें ओरडतो, हाय हाय करतो अथवा इतर प्रकारें स्वतःची अशक्तता व्यक्त करणारे शब्द करतो, हें नांव रोगबीजांचें आहे ज्यामुळें पूर्वोक्त रोग ओळखले जातात. (मं. १, ३-५)

६ **निर्ऋतिः- (ऋति)** म्हणजे सरळ व्यवहार, योग्य, सत्य रक्षणाचा मार्ग. **(निः ऋतिः)** म्हणजे वाकडी चाल, अयोग्य, असत्य, क्षय (नाश) चा मार्ग. या प्रकारच्या व्यवहारानें वर सांगितलेले रोग होतात. (मं. १)

७ **दुर्नामा- (दुः नामा)** दुष्ट कीर्तीचे रोग म्हणजे जे रोग दुष्ट व्यवहारामुळें उत्पन्न होतात. (मं. २)

हे सात शब्द रोगाचीं लक्षणें दाखवितात. शेवटीं **(६ निर्ऋतिः ७ दुर्नामा)** हे दोन शब्द रोगोत्पत्तीचीं कारणें दाखवितात. म्हणजे ब्रह्मचर्यादि चांगल्या नियमांचें पालन न केल्यानें तसेंच दुष्ट दुराचाराचे व्यवहार केल्यानें रक्तदोष होत असतो. आणि पांडुरोग, क्षय वगैरे त्यांतुन उद्भवतात. हीं दोन कारणें दर्शवून हें सूक्त वाचकांस सावध करीत आहे. कीं या घातक रोगापासून स्वतःचें रक्षण करा. म्हणजे जी मनुष्यें ब्रह्मचर्य वगैरे चांगल्या नियमांचें पालन करतील आणि धर्माचरणानें रहातील तीं या रोगापासून वाचूं शकतील.

रोगांचा परिणाम

या रोगांचा परिणाम किती भयानक असतो ही गोष्ट येथें सांगितली आहे. पहा-

जीवित-योपनः । (मं. ४-५)

' जीवनाचा नाश करणारा हा रोग आहे. ' रक्त बिघडवून पांडुरोग, क्षयरोग, रक्तपित्त, वगैरे रोग होतात आणि त्यामुळें जीवन नष्ट होण्याचा संभव असतो. हे रोग फार कष्टसाध्य आहेत म्हणून स्वतःस्वतःचें रक्षण करणेंच योग्य आहे.

उत्पत्तिस्थान

या रोगबीजांचें उत्पत्तिस्थान सुद्धां या सूक्तांत स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. पहा—

तमांसि यत्र गच्छन्ति तत् क्रव्यादो अजीगमम् ।
(मं. ५)

' जेथें अंधार रहातो, अशा स्थानांत मांस आणि रक्त खाणारीं हीं बीजें प्राप्त होतात. ' जेथें नेहमीं अंधार असतो जेथें वायु पोहोचूं शकत नाहीं, जेथें सूर्य प्रकाश जाऊं शकत नाहीं. अशा अंधाऱ्या स्थानांत या रोगबीजाची उत्पत्ति होते अथवा अशा स्थानीं हीं रोगबीजें रहातात. म्हणजे जेथें नेहमीं अंधार असतो. जेथें वायु, जाऊं शकत नाहीं, सूर्याचा प्रकाश पोहोंचूं शकत नाहीं, अशा अंधाऱ्यास्थानांत या रोगबीजांची उत्पत्ति होते, अथवा अशा स्थानांत रोगबीजें रहातात. म्हणजे जे लोक कायम अंधारांत रहातात, ज्यांच्या घरांत नेहमीं अंधार असतो, हवा, उजेड आंत जाऊं शकत नाहीं, सूर्य प्रकाश प्रवेश करूं शकत नाहीं, अशा ठिकाणीं हीं रोग बीजें असतात, तीं त्या लोकांस पीडतात. अथवा अशा घरांत रहाणाऱ्यांना हे रोग होतात. पण जे लोक स्वच्छ हवा, उजेडयुक्त घरांत रहातात, जेथें खुली हवा खेळत आहे, सूर्यप्रकाश भरपूर येऊं शकतो, अशा घरांत हा रोग कष्ट देऊं शकत नाहीं. प्रवेश करूं शकत नाहींत. म्हणून पांडुरोग. क्षय तसेंच मांस, रक्त वगैरेस कमी करणारे जे रोग आहेत त्यांपासून संरक्षण म्हणून सूर्य प्रकाश आणि खुली हवा, जेथें भरपूर आहे अशा शुद्ध स्थानीं रहावें.

रक्षणाचा मार्ग

रोग झाल्यावर रक्षणाचा उपाय या सूक्तांत सांगितला आहे तो असा—

जीवितयोपनान् पनान् कण्वान् गिरिं आवेशय। (मं. ४)

'जीवनाचा नाश करणाऱ्या या रोगबीजांचा ज्या रोग्यांत प्रादुर्भाव झाला आहे, प्रवेश झाला आहे अशा रोग्यांना डोंगरावर घेऊन जा.' पहिली गोष्ट अशी कीं अशा रोग्यास शुद्ध हवा मिळाली पाहिजे, त्यासाठीं डोंगरावर घेऊन जाणें हा उत्तमोत्तम उपाय होय. अशा रोग्यास शहरांत ठेवूं नये. पण डोंगरावर घेऊन जावें. कारण कीं रोगबीजें प्रकाशयुक्त शुद्ध हवेमध्यें मरून जातात. रोगबीजें सूर्य प्रकाश रहित ठिकाणीं निर्माण होतात. म्हणून अशा रोगबीजांना त्याचस्थानीं नाश होणें सुद्धां कठीणच. शहरांत घरें फार जवळ जवळ असतात त्यामुळें तेथें शुद्ध हवा खेळूं शकत नाहीं. अर्थात् अशा ठिकाणची हवा रोग्यासाठीं योग्य नव्हे. म्हणून रोग्यास डोंगरावर नेणेंच श्रेयस्कर होय. या मंत्रांत प्राण नाशक रोगांस (**जीवितयोपन कण्व**) असें म्हटलें आहे. अशीं रोगबीजें असणाऱ्या रोग्यास डोंगरावर नेण्यास सांगितलें आहे. त्याचा अर्थ तीं रोगबीजें असलेले रोग झालेल्या रोग्यांना डोंगरावर घेऊन जाणें असा आहे. कारण पुढील मंत्रांत रोग्यासाठीं औषधि प्रयोगहि सुचविला आहे—

देवि पृश्निपर्णि ! त्वं तान् अग्निः इव अनुदहन् इहि। (मं. ४)

'हे दिव्य औषधि पीठवन त्या रोगबीजांना अग्निप्रमाणें जाळून टाकते ! म्हणजे डोंगरावर राहून रोग्यानें या औषधीचें सेवन केल्यानें त्याच्यामध्यें प्रवेशलेलीं रोगबीजें जळून जातील आणि रोगबीजें दूर होण्यानें रोगी आरोग्य पूर्ण होईल. कारण कीं—

इयं प्रथमा पृश्निपर्णी सहमाना अजायत (मं. २)

'ही प्रथम पीठवन विजयी होत आहे' अथवा रोगावर विजय प्राप्त करण्यासाठीं सर्वापेक्षां आधीं (**प्रथमा**) मुख्य औषधि आहे. तिच्या सेवनानें निःसंदेह विजय प्राप्त होईल. आणि रोगबीजें दूर होतील.

कण्वजम्भनी उग्रा हि तां सहस्वतीं अभक्षि (मं. १)

'ही रक्त शोषणारी रोगाचा नाश करणारी अत्यंत प्रचंड औषधि आहे. तिचें सेवन (**सहस्वती**) वीर्ययुक्त अथवा बलयुक्त अवस्थेंत करणेंच योग्य आहे.' त्यासाठीं सुद्धां रोग्यास डोंगरावर रहाणें आवश्यक आहे. कारण योग्य वेळीं तेथें ताजी वनस्पति डोंगरावरून काढून तिचें तत्काल सेवन करवतां येते. तेथून वनस्पति खोदून शहरांत आणीपर्यंत तर ती रसहीन होऊन जाते.

देवी पृश्निपर्णी नः शं निर्ऋत्या अ-शं अकः। (मं.१)

'ही दिव्य औषधि पीठवन मनुष्यास सुख देणारी आणि रोगांस आणि रोगबीजांस कष्ट–पीडा–त्रास देणारी आहे. म्हणजे रोग समूळ दूर होईल. तसेंच—

तया अहं दुर्णाम्नां शिरः वृश्चामि। (मं. २)

'या औषधीनें मीं या दुष्ट रोगाचा नाश करतों.' जणूं त्यांची मस्तकें तोडतो म्हणजे तीं रोगबीजें पुनः डोकें उंच करूं शकणार नाहीं.

जीवितयोपनान् कण्वान् पनान् पराचः प्रणुद। (मं. ५)

आयुष्याचा क्षय करणाऱ्या या रोगबीजांस खालच्या वाटेनें ढकलून या–काढून लावा.' खालीं तोंड करून दूर करण्याचा अर्थ शौचद्वारा दूर करणें असा आहे. पीठवनमध्यें असा सारक गुण आहे. वर सांगितल्याप्रमाणें रोगबीजांस नष्ट करून त्यांस मलद्वारानें दूर करते. असा गुण या वनस्पतीचा आहे.

पृश्निपर्णीचें सेवन करण्यानें रक्तदोष दूर होतो. शरीरांत रक्त वाढतें शरीर पुष्ट होऊं लागतें. शरीरावर तेज दिसूं लागतें, गर्भाची कृशता दूर होऊन गर्भ वाढूं लागतो आणि इतर अनेक लाभ होतात. तिच्या सेवनाचा विधि ज्ञानी वैद्याकडून समजून घ्यावा.

वेदांमध्यें जेथें पहाल तेथें एक औषधि प्रयोग (Single-Drug System) च दिलेला असतो. म्हणजे एकाच औषधीचें सेवन सांगितलेलें असतें. दुसरीं अनेक औषधें एकत्र करून तीं घेणें असा उल्लेख नाहीं. सेवनासाठीं पाण्यांत धुवून क्वचित् खडीसाखरेंत मिसळून घेण्याची पद्धति सांगितली असेल. म्हणजे रोग्यास एक वेळीं एकच औषधीचें सेवन करविणें आणि अग्नि, सूर्य, वरुण, वायु, या निसर्ग देवतांचे सहाय्य शुद्ध पाणी, शुद्ध हवा, सूर्य प्रकाश इत्यादि द्वारा प्राप्त करण्यास सांगितलें आहे. ही वैदिक चिकित्सेची पद्धति विशेष ध्यानांत येण्यासारखी आहे. म्हणून जे वाचक वर सांगितलेल्या पीठवन वनस्पतीचा उपयोग करून लाभ करून घेऊं इच्छितात त्यांनीं तो ज्ञानी वैद्याच्या देखरेखीखालीं प्रयोग करून अवश्य लाभ करून घ्यावा.

अपामार्ग औषधि

कांड ७, सूक्त ६५

(ऋषिः - शुक्रः । देवता - अपामार्गवीरुत् ।)

प्रतीचीनफलो हि त्वमपामार्ग रुरोहिथ । सर्वान्मच्छपथाँ अधि वरीयो यावया इतः ॥ १ ॥
यद्दुष्कृतं यच्छमलं यद्वा चेरिम पापया । त्वया तद्विश्वतोमुखापामार्गाप मृज्महे ॥ २ ॥
श्यावदता कुनखिना बण्डेन यत्सहासिम । अपामार्ग त्वया वयं सर्वं तदप मृज्महे ॥ ३ ॥

अर्थ— हे (अपामार्ग) अपामार्ग (आघाडा) औषधि (त्वं प्रतीचीनफलः हि रुरोहिथ) तूं उलटें तोंड करून फलयुक्त होऊन उगवतेस. त्यामुळें (मत् सर्वान् शपथान्) माझ्यापासून सर्व शापांस (इतः वरीयः अधियावय) येथून दूर कर. [१]

(यत् दुष्कृतं) जें पाप (यत् शमलं) जो दोष अथवा कलंक मीं केला अथवा मला लागला असेल (यत् वा पापया चेरिम) जो पापवाणी व्यवहार केल्यानें माझ्याकडून आचरला गेला असेल, हे (विश्वतो-मुख अपामार्ग) सर्वतो मुख (सर्वत्र उगवणाऱ्या) आघाड्या ! (त्वया तत् अप मृज्महे) तुझ्या सहाय्यानें आम्ही दूर करतों [२]

(यत् श्यावदता) काळे दांत झालेले (कुनखिना) वाईट नखांनीं युक्त (बण्डेन सह आसिम) विरूपां (कुरूपां) सह बरोबर, सहवासांत आम्ही असतों, हे आघाड्या ! (तत् सर्वं वयं त्वया अपमृज्महे) ते सर्व दोष आम्हीं तुझ्या मदतीनें दूर करतों. [३]

भावार्थ— आपामार्ग (आघाडा) वनस्पति औषधीची फळें उलट विशेष वाढतात, म्हणजे त्या वनस्पतीच्या उलटच आचरणानें झालेले रोग-दोष दूर होतात. दुराचार-पाप, दोष, पाप्यांचा सहवास, दातांचे किडणें, नखें बिघडणें तसेंच रक्त दोषांचा सहवास या स्वतःच्या आचरणानें अथवा संगति-सहवासानें आलेले दोष आघाडा वनस्पतिनें दूर होतात. [१-३]

वैद्यांनी या सूक्ताचा विचार करावा. दंत दोष आघाड्यानें दांत घासल्यानें दूर होतात असा अनुभव आहे. वाचकसुद्धां त्याचा अनुभव घेऊं शकतील. अपामार्ग औषधि जरी दोष निवारक असली तरी निरनिराळ्या रोगावर तिचा उपयोग कशारीतीनें करावयाचा हा एक संशोधनाचा विषय आहे. महाराष्ट्रांत भाद्रपद शु॥ ५ मीस (ऋषिपंचमीस) व्रतांत आघाड्याच्या काड्यांनीं स्त्रिया (किंवा व्रत करण्यानें) दांत घासावयाचें असतात, ही पद्धति आजतागायत चालू आहे. हें व्रत विशेषेंकरून स्त्रिया आचरतात. असें असलें तरी या सूक्तांत दंतरोग दूर करण्यास आघाड्याचा उपयोग करण्याचा प्रयोग सांगितला आहे आणि तशी पद्धतिहि आहे. म्हणून याचें जास्त संशोधन होणें जरूर आहे.

अपामार्ग औषधि

कांड ४, सूक्त १७

(ऋषिः - शुक्रः । देवता - अपामार्गो वनस्पतिः ।)

ईशानां त्वा भेषजानामुज्जेष आ रभामहे । चक्रे सहस्रवीर्यं सर्वस्मा ओषधे त्वा ॥ १ ॥

अर्थ— हे औषधे ! (भेषजां ईशानां त्वा उत् जेषे आ रभामहे) औषधिमध्यें तूं विशेष शक्तिसंपन्न असल्याकारणानें म्हणून मीं हा प्रयोग आरंभित आहे. (सर्वस्मै त्वा सहस्रवीर्यं चक्रे) सर्व रोगांना निवारण्यासाठीं तुला हजार पटीनें वीर्ययुक्त करतों. [१]

भावार्थ— औषधिमध्यें विशेष शक्तिशाली औषधि आहेत आणि इतर औषधींना प्रयोगानें विशेष सामर्थ्ययुक्त करतां येतें. [१]

सत्यजितं शपथयावनीं सहमानां पुनःसराम् । सर्वाः समह्वयोषधीरितो नः पारयादिति ॥ २ ॥
या शशाप शपनेन याघं मूरमादधे । या रसस्य हरणाय जातमारेभे तोकमत्तु सा ॥ ३ ॥
यां ते चक्रुरामे पात्रे यां चक्रुर्नीललोहिते । आमे मांसे कृत्यां यां चक्रुस्तया कृत्याकृतो जहि ॥ ४ ॥
दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं रक्षो अभ्वमराय्यः । दुर्णाम्नीः सर्वा दुर्वाचस्ता अस्मन्नाशयामसि ॥ ५ ॥
क्षुधामारं तृष्णामारमगोतामनपत्यताम् । अपामार्ग त्वया वयं सर्वं तदप मृज्महे ॥ ६ ॥
तृष्णामारं क्षुधामारमथो अक्षपराजयम् । अपामार्ग त्वया वयं सर्वं तदप मृज्महे ॥ ७ ॥

अर्थ— (सत्यजितं) खात्रीनें जिंकणारी (शपथ-यावनीं) आक्रोश दूर करणारी (सहमानां) रोगाचा पराजय करणारी (पुनः सरां) विशेषेंकरून सारक आणि विरेचक गुणानें युक्त अशाप्रकारची (सर्वाः ओषधीः समह्वि) सर्व औषधींस मीं प्राप्त करतों. (इतः नः पारयात्) या रोगांतून आम्हांस पार पाड. [२]

(या शपनेन शशाप) जो ओरडून दुष्ट शब्द बोलतो, (या मूरं अघं आदधे) जो मूर्खत्व पदरीं आणणारें पाप धारण करतो, (या रसस्य हरणाय) जो साररूप रसाचें हरण करण्यासाठीं (जातं आरेभे) नूतन जन्मलेल्या बालकांस सुद्धां पकडतो, (सा तोकं अत्तु) तें आजारपण संततीस खाऊन टाकतें. [३]

(यां ते आमे पात्रे चक्रुः) ज्या हिंसक प्रयोगास तुझ्यासाठीं कच्च्या मातीच्या पात्रांत तयार करतो, (यां नीललोहिते) ज्यास निळा-सांवळा आणि लाल होईपर्यंत शिजविण्यांत येतो, (आमे मांसे) कच्च्या मांसांत (यां कृत्यां चक्रुः) जो हिंसक प्रयोग केला जातो, (तया कृत्याकृतः जहि) त्या प्रयोगानें त्या हिंसा करणारांचाच नाश होवो. [४]

(दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं) वाईट स्वप्नें पडणें, दुःखदायक जीवन जगावें लागणें, (रक्षः अ-भ्वं अराय्यः) रोगजंतुमुळें निर्बलता, निस्तेज वाढविणारा जो रोग आहे, तसेंच (दुः-नाम्नीः सर्वाः दुर्वाचः) दुष्ट नांवाची मूळव्याध आणि तिच्यामुळें होणारे इतर वाईट रोग हे सर्व (अस्मत् नाशयामसि) आमच्यापासून नाश पावोत. [५]

(क्षुधामारं तृष्णामारं) भूकेनें मरणें, तहानेनें मरणें (अ-गो-तां अन्-अपत्यतां) इंद्रियें अथवा वाणीचे दोष, संतति न होणें, अथवा नपुंसकता, हे (अपामार्ग) आघाडा औषधि ! (त्वया तत् सर्वं वयं अप मृज्महे) ते सर्व दोष तुझ्या मदतीनें आम्हीं दूर करीत आहोंत. [६]

(तृष्णामारं क्षुधामारं) तहानेनें, भूकेनें मरणें तसेंच (अक्षपराजयं) इंद्रियांचा नाश होणें, (अपामार्ग) हे अपामार्ग (आघाडा) औषधि (सर्वं तत् त्वया वयं अप मृज्महे) हे सर्व दोष तुझ्या मदतीनें आम्हीं दूर करीत आहोंत. [७]

भावार्थ— खात्रीनें रोग दूर करणारी, रोग्याचा आक्रोश दूर करणारी, रोग्याची सहनशक्ति वाढविणारी, रेचकगुणानें युक्त औषधि असेल तिच्या सहाय्यानें आम्हीं रोग मुक्त होतों. [२]

कित्येक रोगांत रोगी किंकाळ्या फोडतो, कित्येकांत तो मूर्छित होतो, कित्येकांत त्याच्या रक्ताचा क्षय होतो, कित्येक रोग नव जात शिशूस होतात, आणि त्याचा सुद्धां नाश करतात. [३]

जे हिंसकप्रयोग कच्च्या मातीच्या भांड्यांत, अथवा कच्च्या मांसांत करण्यांत येतात, त्या हिंसक प्रयोगामुळें त्या लोकांचाच नाश होतो. [४]

वाईट स्वप्न, जीवनांतील औदासिन्य, निस्तेजता, आणि क्षीणता, मूळव्याध, चिडकास्वभाव, हें सर्व या औषधीनें दूर होतें. [५]

पुष्कळ भूक अथवा तहान लागणें, इंद्रियांचे दोष, वांझपण वगैरे सर्व अपामार्ग (आघाडा) औषधीच्या प्रयोगानें दूर होतें. [६]

भस्म रोग आणि तृषेचा रोग, तसेंच इंद्रियांची दुर्बलता, अपामार्ग औषधिप्रयोगानें दूर होते. [७]

अपामार्ग ओषधीनां सर्वासामेक इद्वशी । तेन ते मृज्म आस्थितमथ त्वमगदश्चर ॥ ८ ॥

अर्थ— हे अपामार्ग औषधि ! तूं (सर्वासां ओषधीनां एकः वशी इत्) सर्व औषधींना वश राखणारी एकच औषधि खात्रीलायक आहेस. (तेन ते आस्थितं) त्यामुळें तुझ्या मदतीनें शरीरांत राहिलेल्या रोगास आम्ही (मृज्मः) धूवून टाकतों, दूर करतो. हे रोगी ! (अथ त्वं अगदः चर) आतां तूं निरोगी होऊन निघून जा. [८]

भावार्थ— अपामार्ग औषधि सर्व औषधींमध्यें बाकी सर्व औषधींना स्वतःच्या काबूंत ठेवणारी औषधि आहेत. शरीरांतील सर्व रोग तिनें दूर होतात आणि मनुष्य तिच्या सेवनानें निरोगी होऊन हिंडूं फिरूं लागतो. [८]

अपामार्ग औषधि

कांड ४, सूक्त १८

(ऋषिः - शुक्रः । देवता – अपामार्गो वनस्पतिः)

समं ज्योतिः सूर्येणाह्ना रात्री समावती । कृणोमि सत्यमूतयेऽरसाः सन्तु कृत्वरीः ॥ १ ॥
यो देवाः कृत्यां कृत्वा हरादविदुषो गृहम् । वत्सो धारुरिव मातरं तं प्रत्यगुप पद्यताम् ॥ २ ॥
अमा कृत्वा पाप्मानं यस्तेनान्यं जिघांसति । अश्मानस्तस्यां दग्धायां बहुलाः फट् करिक्रति ॥ ३ ॥
सहस्रधामन्विशिखान्विग्रीवाञ्छायया त्वम् । प्रति स्म चक्रुषे कृत्यां प्रियां प्रियावते हर ॥ ४ ॥

अर्थ— (सूर्येण समं ज्योतिः) सूर्यासमान ज्योति आहे आणि (अह्ना समावती रात्री) दिवसाप्रमाणें रात्र आहे. (कृत्वरीः अरसाः सन्तु) विनाशक गोष्टी रसहीन होवोत. (सत्यं ऊतये कृणोमि) सत्यास मीं रक्षणासाठीं उपयोजितों. [१]

हे (देवाः) देव हो ! (यः कृत्यां कृत्वा अ-विदुषः गृहं हरात्) हिंसक प्रयोग करून अज्ञानी घराचें हरण केलें जातें, (धारुः वत्स मातरं इव) दूध पिणारें बालक स्वतःच्या मातेकडे जातें त्याप्रमाणें तो हिंसक विधि (तं प्रत्यक् अपपद्यतां) त्याच्या जवळच परत फिरो. [२]

(यः पाप्मानं कृत्वा) जो पापें करून (तेन अमा अन्यं जिघांसति) त्याच्यायोगानें दुसऱ्यास मारण्यास इच्छितो, (तस्यां दग्धायां) तो जळून गेल्यावर (बहुलाः अश्मानः फट् करिक्रति) पुष्कळ दगड फट् अवाज करतील म्हणजे नाश पावतील. [३]

हे (सहस्रधामन्) हजार घरें ज्याचीं आहेत अशा ! (त्वं विशिखान् विग्रीवान् शायय) तूं शेंडी विरहित आणि गळ्याविरहित करणाऱ्यांना झोंपवून टाक. (प्रियां कृत्यां चक्रुषे-प्रियावते) तूं प्रिय कृत्य करणाऱ्या प्रियाजवळ (प्रतिहर) परतवला आहेस. [४]

भावार्थ— सर्व विनाशक प्रयत्न असफल होवोत. खात्रीनें सर्वांचें रक्षण होऊं शकेल. पहा, सूर्याची सत्यज्योति आकाशांत चमकते ती दिवसा प्रकाश पसरते त्याचप्रमाणें सत्याची उन्नति होईल. [१]

जो घातकी प्रयोग करतो आणि त्यामुळें दुसऱ्याच्या घरादाराचा नाश करतो त्याचे प्रयत्न परत फिरून, त्या घातकी मनुष्याजवळ आऊन त्याचाच नाश करतात. [२]

जो स्वतः पापकर्म आचरून त्यामुळें दुसऱ्याचा नाश करण्याची इच्छा करतो, त्याचे प्रयत्न त्या प्राण्याचा स्वतःच नाश करतात, ज्याप्रमाणें तापलेले दगड फुटून जातात. [३]

जो दुसऱ्याचा गळा कापणें, शेंडी कापणें वगैरे घातक प्रयोग करणारा आहे त्याचा नाश कर आणि प्रिय कार्य करणाऱ्या त्या प्रेमीजवळ जाऊन पोंहोच. [४]

अनयाहमोषध्या सर्वाः कृत्या अदूदुषम् । यां क्षेत्रे चक्रुर्यां गोषु यां वा ते पुरुषेषु ॥ ५ ॥
यश्चकार न शशाक कर्तुं शश्रे पादमङ्गुरिम् । चकार भद्रमस्मभ्यमात्मने तपनं तु सः ॥ ६ ॥
अपामार्गोऽप मार्ष्टु क्षेत्रियं शपथश्च यः । अपाह यातुधानीरप सर्वा अराय्यः ॥ ७ ॥
अपमृज्य यातुधानानप सर्वा अराय्यः । अपामार्ग त्वया वयं सर्वं तदप मृज्महे ॥ ८ ॥

अर्थ— (यां क्षेत्रे चक्रुः) जें शेतांत केलें असेल, (यां गोषु) जे गाईंत आणि (यां वा ते पुरुषेषु) जें तुझ्या पुरुषांत केलें असेल, (अनया ओषध्या सर्वाः कृत्याः अदूदुषम्) या औषधीनें त्या सर्व दुष्ट कृत्यांचा मीं नाश करतों. [५]

(यः चकार) जो करीत होता परंतु (कर्तुं न शशाक) पण पूर्ण करूं शकला नाहीं, (पादं अंगुरिं शश्रे) पाय, बोटें, वगैरे तोडून टाकलीं, (अस्मभ्यं भद्रं चकार) आमच्यासाठीं त्यानें कल्याण केलें परंतु (सः आत्मने तपनं) त्यानें स्वतःसाठीं आपत्ति ओढवून घेतली. [६]

(अपामार्गः क्षेत्रियं यः शपथः च अपमार्ष्टु) अपामार्ग औषधि क्षेत्रिय (आनुवंशिक) रोगांस आणि दुष्ट वचनें बोलण्याचा जो स्वभाव आहे त्यांस दूर करते. (अहं सर्वाः यातुधानीः अराय्यः अप) आणि सर्व पीडा करणाऱ्यांना आणि निस्तेजता दूर करतें. [७]

(यातुधानान् अपमृज्य) यातना देणाऱ्यांस दूर करून तसेंच (सर्वाः अराय्यः अप) सर्व निस्तेजता दूर करून, हे (अपामार्ग) आघाड्या ! (औषधि) (त्वया वयं तत् सर्वं अपमृज्महे) तुझ्या योगें आम्हीं ते सर्व कष्ट दूर करतों. [८]

भावार्थ— या औषधीनें सर्व नाशक रोग दूर होतात, शेतांत गाय वगैरे जनावरांत, मनुष्यांत होणारे सर्व दोष दूर होतात. [५]

जो दुसऱ्याचा नाश करूं इच्छितो पण तसें घडत नाहीं म्हणून त्याच्या कित्येक अवयवांचा नाश करतो, अथवा थोडें नुकसान करतो, त्यानें स्वतःचेंच नुकसान करून घेतलें आहे. आमचें तर त्यामुळें कल्याणच झालें आहे. [६]

ही अपामार्ग औषधि मातापित्यांकडून आलेले आनुवंशिक रोग, ज्यांत रोगी त्रास भोगतो, आणि ज्यांत रोग्यास दुःख फार होतें, ज्यांत शरीर निस्तेज होतें, अशा सर्व रोगांना दूर करते. [७]

यातना वाढविणारे आणि तेजाचा नाश करणारे दोष अपामार्ग औषधिप्रयोगानें आम्ही दूर करीत आहोंत. [८]

अपामार्ग औषधि

कांड ४, सूक्त १९

(ऋषिः - शुक्रः । देवता - अपामार्गो वनस्पतिः ।)

उतो अस्यबन्धुकृदुतो असि नु जामिकृत् । उतो कृत्याकृतः प्रजां नडमिवा छिन्धि वार्षिकम् ॥ १ ॥

अर्थ— (उतो अबन्धुकृत् असि) जर तूं शत्रु निर्माण करणारा असशील अथवा (उतो नु जामिकृत् असि) बन्धु निर्माण करणारा असशील, तूं (उतो कृत्याकृतः प्रजां) हिंसाकर्म करणाऱ्या संततीला, (वार्षिकं नडं इव आछिन्धि) पावसामुळें उत्पन्न होणाऱ्या गवताप्रमाणें दूर कर. [१]

भावार्थ— तूं स्वतः शत्रु अथवा मित्र होऊन रहा परंतु आपल्या समाजांतील घातकी कर्मे करणाऱ्यांस दूर कर. [१]

ब्राह्मणेन पर्युक्तासि कण्वेन नार्षदेन । सेनेवैषि त्विषीमती न तत्र भयमस्ति यत्र प्राप्नोष्योषधे ॥२॥
अग्रमेष्योषधीनां ज्योतिषेवाभिदीपयन् । उत त्रातासि पाकस्याथो हन्तासि रक्षसः ॥ ३ ॥
यददो देवा असुरांस्त्वयाग्रे निरकुर्वत । ततस्त्वमध्योषधेऽपामार्गो अजायथाः ॥ ४ ॥
विभिन्दती शतशाखा विभिन्दन्नाम ते पिता । प्रत्यग्वि भिन्धि त्वं तं यो अस्माँ अभिदासति ॥ ५ ॥
असद्भूम्याः समभवत्तद्यामेति महद्व्यचः । तद्वै ततो विधूपायत्प्रत्यक्कर्तारमृच्छतु ॥ ६ ॥
प्रत्यङ् हि संबभूविथ प्रतीचीनफलस्त्वम् । सर्वान्मच्छपथाँ अधि वरीयो यावया वधम् ॥ ७ ॥

अर्थ— (नार्-सदेन कण्वेन ब्राह्मणेन) मनुष्यांच्या परिषदेंत बसणाऱ्या विद्वान् ब्राह्मणांनीं (परि उक्ता असि) तुझें वर्णन केलें आहे. हे (ओषधे) औषधि ! तूं (त्विषीमती सेना इव एषि) तेजस्वी लष्कराप्रमाणें रोगरूपी शत्रूवर हल्ला करतेस. (यत्र प्राप्नोषि) जेथें तूं प्राप्त होतेस (तत्र भयं न अस्ति) तेथें भय रहात नाहीं. [२]

(ज्योतिषा इव अभिदीपयन्) तेजानें प्रकाशित करणारी (ओषधीनां अग्रं एषि) इतर सर्व औषधींच्या तूं पुढें जातेस. (उत पाकस्य त्राता असि) आणि परिपक्काचें रक्षक आणि (रक्षसः हन्ता असि) रोगबीजांचा तूं नाशक आहेस. [३]

(अदः यत् अग्रे त्वया देवाः) जे प्रथम तुझ्यासह रहाण्यामुळें देवानीं (असुरान् निरकुर्वन्) असुरांस दूर केलें होतें, हे (ओषधे) औषधि ! (ततः त्वं अपामार्गः अजायथाः) तेव्हांपासून तूं अपामार्ग नांवाच्या औषधिरूपानें प्रगट झाली आहेस. [४]

तूं (शतशाखा विभिन्दती) शेंकडों शाखारूपानें पसरून रोगांचे भेदन करतेस, (विभिन्दन् नाम ते पिता) विभेदन करणारा तुझा पिता आहे, (यः अस्मान् अभिदासति) जो आमचा नाश करतो, (त्वं तं प्रत्यक् विभिन्धि) तूं त्याचा सर्वप्रकारें नष्ट कर. [५]

(असत् भूम्याः समभवत्) असत्यरूप दुष्टता भूमीपासून उत्पन्न झाली तरी सुद्धां तो (तत् महत् वचः द्यां एति) फार विस्तृत होऊन आकाशापर्यंत पसरतो (ततः तत् वै कर्तारं विधूपायत्) तेथून तो खात्रीपूर्वक कर्त्यालाच संतप्त करतो आणि (प्रत्यक् ऋच्छतु) त्याच्या जवळ परत जाऊन पोहोंचतो. [६]

(त्वं हि प्रत्यङ् प्रतीचीनफलः संबभूविथ) तूंच प्रत्यक्ष उलटें फळ देणारा प्रगट झाला आहेस, म्हणून (मत् सर्वान् शपथान्) माझ्यापासून सर्व दुष्ट व वाईट वचनांना आणि (वरीयः वधं अधियावय) वर उठणाऱ्या शस्त्रांना दूर कर. [७]

भावार्थ—मोठ्या परिषदेंत बसणाऱ्या विद्वान पंडितांचें मत आहे की ही औषधि रोगांचा पूर्ण नाश करते, आणि ती जेथें जाते तेथें रोगाचें भयहि शेष सुद्धां उरत नाहीं. [२]

ही तेजस्वी औषधि वनस्पतीमध्यें मुख्य आहे. ही शुभ गुणांची रक्षक आणि रोगबीजांची नाशक आहे.

ज्या शक्तीनें देवांनीं असुरांस दूर हटविलें होतें ती शक्ति बरोबर घेऊन ही आघाडा औषधि उत्पन्न झाली आहे. [४]

ही औषधि अनेकप्रकारें रोगांस दूर करते म्हणून जे रोग आमचा नाश करतात त्यांना या औषधीनें दूर करण्यात यावें. [५]

भूमीवर थोडें सुद्धां असत्य उत्पन्न झालें तरीसुद्धां तें त्वरित सर्वत्र प्रसरतें आणि परत फिरून कर्त्याचा सुद्धां नाश करतें. [६]

या औषधींत दोषांस उलटें करण्याचा गुण आहे. म्हणून दुर्भाषण आणि जे विनाशक दोष आहेत ते या औषधीनें दूर करण्यात यावेत. [७]

*

शतेन मा परि पाहि सहस्रेणाभि रक्ष मा । इन्द्रस्ते वीरुधां पत उग्र ओज्मानमा दधत् ॥ ८ ॥

अर्थ— (शतेन मा परिपाहि) शेकडो उपायांनीं माझें रक्षण कर आणि (सहस्रेण मा अभिरक्ष) हजारों प्रयत्नांनीं माझें रक्षण कर. हे (वीरुधां पते) औषधींच्या स्वामी ! (उग्रः इंद्रः ते ओज्मानं आदधत्) उग्रवीर इंद्र तुझ्या ठिकाणीं पराक्रमाची शक्ति धारण करो. [८]

भावार्थ—शेकडों आणि हजारों प्रकारें ही वनस्पति रक्षण करते कारण की तिच्यांत इंद्राचें तेज आहे. [८]

आघाडा (अपामार्ग) औषधि

अपामार्ग औषधि

हिंदीभाषेंत हिला ' **लटजिरा, चिरचिरा** ' हें नांव आहे. संस्कृतांत तिला ' **अपामार्ग** ' म्हणतात. गुजरातींत ' **अघेडो, संघेडो** ' आणि मराठींत ' **अघाडा** ' असें म्हणतात. या वनस्पतीचे पांढरी, लाल आणि काळी असे तीन भेद आहेत. या तीघींचे गुण एकसारखेच आहेत. त्यांचा उल्लेख वैद्यक ग्रंथांत अशाप्रकारें केला आहे—

तिक्तोष्णः कटुः कफघ्नः अर्शः कण्डूदुरामघ्नो रक्तघ्नः ग्राही वान्तिकृत् । (राजनि. व. ४)
(सन्निपातज्वरचिकित्सायाम्) पृश्निपर्णी त्वपामार्गः । चक्रपाणिदत्ताद्द्रव्यगुणाः ।
दीपनः तिक्तः कटुः पाचको रोचनः छर्दिकफमेदो वातघ्नः हृद्रोगाध्मानार्शः कण्ड्वादिकं हन्ति ।
(भावप्र पू. भा. १)

तत्पत्रं रक्तपित्तघ्नं । (मद. व. १)
श्वेतश्चापामार्गकस्तु तिक्तोष्णो ग्राहकः सरः । किञ्चित्कटुः कान्तिकरः पाचकोऽग्निदीपकः । नस्ये वान्तौ प्रशस्तः श्वासकफकण्डूदरापहः । दुर्नामानं रक्तरुजं मेदोरुदुहरे तथा । वातश्लिष्मापचीदद्रुवात्ल्यामानां विनाशकः । रक्तापामार्गकः किञ्चित्कटुकः शीतलः स्मृतः ॥ मन्यावष्टम्भवमिकृद्वातविष्टम्भकारकः । रूक्षो व्रणं विषं वातं कफं कण्डूं च नाशयेत् । बीजमस्य रसे पाके दुजरं स्वादुशीतलं । मलावष्टंभकं रूक्षं वांतिकृत् कफपित्तजित् । तायापामार्गकः श्लोकः कटुः शोधकफापहः । कासं वातश्च शोषं च नाशयादति च स्मृतः । (वै. निघ.)

अपामार्ग वनस्पतीचें असें वर्णन वैद्यक ग्रंथांत आहे. त्याचें तात्पर्य–अपामार्ग वनस्पति तिक्त (कडू) उष्ण, कटु (तिखट) कफनाशक, मूळव्याध, खाज येणें आंव आणि रक्तविषयक रोगांचा नाश करणारी उलटी करणारी, सन्निपात तापांत चिकित्सेंत पृश्निपर्णी आणि अपामार्ग या दोन्हींचा उपयोग उत्तम होतो. ती पाचक दीपक म्हणजे भूक निर्माण करणारी, वमन म्हणजे उलटी करणारी, कफ, मेद, वात, हृद्रोग, आध्मान, मूळ व्याध वगैरे रोगांचा नाश करते. अपामार्ग कडू, उष्ण, ग्राहक आणि सारक, आहे. शरीराची कांति वाढविणारी, पाचक आणि अग्नि प्रदीप्त करणारी नस्य आणि उलटीसाठीं मोठी वाखाणलेली (प्रसिद्ध) आहे. मूळव्याध, रक्तदोष मेद, उदर वगैरे रोगांचा नाश करणारी आहे. व्रण, विष, वात, कफ, खाज वगैरे दूर करते.

या अपामार्गाचें वर्णन वैद्यक ग्रंथ पाहून आम्हीं या सूक्तांत सांगितलेल्या वर्णनाचा विचार करूं. सूक्त १७–१९ या तीन सूक्तांत या अपामार्ग वनस्पतीचें वर्णन आहे. या तीनहि सूक्तांची रचना करणारा एकच ' **शुक्र** ' ऋषि आहे.

क्षुधा (भूक) आणि तृष्णा (तहान) यांस मारक

सू. १७ मध्यें मं. ६–७ भूकेनें मरण्याचा रोग म्हणजे ज्या रोगांत पुष्कळ भूक लागते, जेवढें खावें तेवढें भस्म होते, त्यामुळें त्यास भस्मरोग म्हणतात. तसेंच ' **तहानेचा रोग** ' ज्यांत फार तहान लागते, या रोगांना अपामार्ग औषधि दूर करते असें म्हटलें आहे. तीच गोष्ट वर केलेल्या वर्णनांत सुद्धा आहे.

बीजमस्य रसे पाके दुर्जरं स्वादु शीतलं ।

' अपामार्गाचें बीज पचनास फार कठीण, गोड आणि थंड असतें ' पाचक आणि कठीण असल्यामुळें भस्म रोगांस उत्तम आणि शीतल असल्यानें तृष्णा रोगाचें शमन करते. याप्रकारें वैद्यक शास्त्रांतील वर्णन वर केलेल्या मंत्रोक्त वर्णनाबरोबर वाचल्यानें त्याचा भावार्थ स्पष्ट होतो.

मूळव्याध

सू. १७ मध्यें ' **दुर्णाम्नीः** ' शब्द आला आहे. वैद्यक ग्रंथांत ' **दुर्नामा** ' शब्द आहे. तोच मूळव्याधीचा वाचक

आहे. वेदांमध्यें जेथें जेथें औषधि प्रकरणांत 'दुर्नामा' शब्द आला आहे तेथें तो मूळव्याध वाचक आहे. वेदांत जेथें औषधि प्रकरणांत '**दुर्नामन्**' शब्द येतो तेथें बहुतकरून मूळव्याधीचाच संबंध असतो. कित्येकजण दुष्ट वाणी वगैरे भिन्न अर्थ करतात परंतु तो बरोबर नाहीं. वेदांत हा '**दुर्नामन्**' शब्द मूळव्याधीचा वाचक आहे. '**दुर्नाम, दुर्णाम, दुर्वाच्**' हे शब्द मूळव्याधीच्या निरनिराळ्या प्रकारांचे वाचक आहेत.

दुष्ट स्वप्न

दुष्ट स्वप्न येणें (पडणें) हें पित्ताचें कारण आहे. पोटांतील दोषांमुळें अथवा आमदोषाच्यामुळें तीं पडतात. वैद्यक ग्रंथांत आघाड्यास पित्तशामक, पाचक अग्नि प्रदीपक, दीपक, रुचिवर्धक म्हटलें आहे. सूक्त १७ च्या ५ व्या मंत्रांत पूर्वार्धांत जे रोग सांगितले आहेत त्यांचा याच्याशीं संबंध आहे. उदाहरणार्थ पहा—

१ **दौष्वप्न्यं**- दुष्ट स्वप्न पडणें, त्यामुळें गाढ झोंप येत नाहीं.

२ **दौर्जीवित्य**- जीवनाविषयी मनांत उदासीनता निर्माण होते.

३ **रक्षः**- विविध प्रकारचे कृमि.

४ **अ-भ्वं**- शरीर न वाढणें, शरीराची कृशता निर्माण करणारा रोग.

५ **अ-राय्यं**- राय म्हणजे, तेज, सौंदर्य, शोभा, कांति. जी आरोग्ययुक्त शरीरावर असते ती नसणें, रंग फिक्कट होणें.

या पांच मंत्रांत रोग वाचक शब्द वैद्यक ग्रंथांतील वर वर्णन केलेल्यासह वाचल्यानें त्यांचा आशय स्पष्ट होतो. हे सर्व रोग अपचनामुळें होतात, आणि पाचक आघाडा अग्नि प्रदीप्त करणारा असल्यानें या रोगांचा खात्रीनें नाश करतो.

सारक

सूक्त १७ च्या दुसऱ्या मंत्रांत, '**सरां**' शब्द आला आहे आणि वर सांगितलेल्या वैद्यक ग्रंथांत '**सर**' पद आहे. दोन्हींचा आशय 'सारक, रेचक' म्हणजे शौचशुद्धि करणारा असा आहे. शौचशुद्धि झाल्यानें भूक लागणें आणि अग्नि दीपन होणें स्वाभाविक आहे. नंतर तिसऱ्या मंत्रांत '**रसस्य हरणं**' अशीं पदें आहेत. रसाचें हरण झाल्यानें शोष वाढतो आणि तहान लागते. '**तृष्णामारं**' रोग त्यामुळेंच होतो. अशा रोगाचें हें औषध आहे. शरीरांतील रसाचें हरण शोषण ज्या रोगांत होते त्या रोगाचें शमन या अपामार्ग औषधीनें होतें. या सूक्ताच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्रांत 'शपथ' शब्द पुनः पुनः आला आहे. शपथ शब्दाचा खरा अर्थ दुष्ट-वाईट भाषण असा आहे. मनुष्याचा स्वभाव जेव्हां चिडखोर होतो त्यावेळीं मनुष्याची प्रवृत्ति दुर्भाषण करण्याकडे होते. पोट साफ न झाल्यानें मनुष्य स्वभाव चिडखोर होतो. हा दोष अपामार्ग वनस्पतीचें सेवन केल्यानें दूर होतो. कारण की ही वनस्पती शौच शुद्धि करते त्यामुळें अपचन दूर होतें. पोट साफ रहातें, आणि पोट साफ झाल्यानें चिडखोर स्वभाव सुधरतो; आणि वाईट, दुष्ट भाषण करणें हि बंद होतें.

१७ व्या सूक्तांतील बाकी सर्व वर्णन अपामार्गाची प्रशंसा करणारें आहे, त्यामुळें त्याविषयीं जास्त लिहिण्याची जरुरी नाहीं.

सूक्त १८ मध्यें २ ऱ्या मंत्रापासून ६ व्या मंत्रापर्यंत अशा घातकी कृत्यांचें वर्णन आहे की स्वतःच्या स्वार्थासाठीं सामान्य मनुष्य तीं दुष्टतेनें दुसऱ्यासाठीं करतो. शेतांतील गाईच्या नाशासाठीं अथवा मनुष्याच्या नाशासाठीं असे प्रयोग करतात. आमच्या पहाण्यांत असें आहे कीं ज्या प्रांतांत अत्यंज जाती मेल्या जनावराचें मांस खातात तेच लोक असले प्रयोग करीत असतात. शेतांत जेथें गाई चरण्यास येतात तेथें गवतात कोण्या एकाद्या प्रकारचें विष लपवून ठेवतात. तें गवत खाण्यानें तें विष गाईच्या जनावराच्या पोटांत जातें व तें जनावर अर्ध्या तासांत तडकाफडकी मरतें. जनावर मेल्यावर अत्यंज त्याचें प्रेत घेऊन जातात आणि त्याचें मांस खातात. शेतांत गाईसाठीं असे घातक प्रयोग करतात. आणि पुष्कळ प्रयत्नांतीं अजूनहि जनावरास अशा घातकी प्रयोगापासून वांचविण्यास कांहीं उपाय प्राप्त झालेला नाहीं.

या उपायाविषयीं सूक्त १८ च्या सातव्या मंत्रांत वेद सांगतो की अपामार्ग औषधीच्या उपयोगानें विष दूर होतें. आणि जनावरें वांचतात. वैद्यक ग्रंथांत आघाड्याचा गुण विष नाशक सांगितला आहे. या गुणामुळें वर सांगितल्या प्रकारच्या घातक प्रयोगांत या औषधीनें लाभ होतो. या सूक्तांतील इतर शपथ वगैरे पदांविषयीं यापूर्वी १७ व्या सूक्ताच्या विवरणांत लिहिलें आहे. तेंच येथें सुद्धां समजावें.

येथें या सूक्तांत एक दोन सामान्य उपदेशाच्या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. त्या वाचकांनीं अवश्य ध्यानीं ठेवाव्या.

सत्यानें रक्षण

ऊतये सत्यं कृणोमि। (सू. १८, मं. १)

'रक्षणासाठीं मीं सत्य करतों' म्हणजे जर सुरक्षित रहा-

ण्याची, रक्षण करण्याची इच्छा असेल तर सत्याचें पालन केलें पाहिजे. सत्यानेंच सर्वांचें रक्षण होणें शक्य आहे. दुसऱ्याचा घात करण्यासाठीं घातकी प्रयोग करणारांनीं ध्यानात ठेवावें की अशा प्रयोगानें त्यांची उन्नति कधीं होऊं शकत नाहीं. सत्य प्रत्यक्ष सूर्यासारखें असतें. प्रकाश पूर्ण असल्यानें दिवस हा सुद्धां सत्य स्वरूप आहे. त्यामुळें प्रकाशानें जसा अंधाराचा नाश होतो तद्वत सत्यानें असत्याला नाश करतां येतो– असत्य दूर करतां येतें.

दुसऱ्याचा घात करण्याच्या प्रयत्नांनीं स्वतःचाच नाश

दुसऱ्या मंत्रांतही गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे कीं ' जे दुष्ट अशा प्रकारची कृत्यें करून दुसऱ्यांस कष्ट-पीडा-त्रास देऊं इच्छितात, अंतीं त्यांचा स्वतःचाच अशा प्रयत्नांत नाश होतो. ज्याप्रमाणें बालक स्वतःच्या मातेकडे जातें तद्वत घातकी कृत्य रूपी बालक तें करणारा जवळच परत जातें. ' (सू. १८ मं. २) हा उपदेश ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. तोच पुनः ६ व्या मंत्रांत सांगितला आहे. ' दुष्ट मनुष्यानें ज्याचें वाईट करण्याची इच्छा बाळगली त्यांचें तर भलें झालेंच पण त्या घात‧ कयानांच कष्ट प्राप्त झालें. ' (सू. १८, मं. ६) असेंच होत असतें. म्हणून घातपाताची भावना चांगली नव्हे. कारण की अंतीं त्यामुळें त्या दुष्टाचाच नाश होतो. या प्रकारें १८ व्या सूक्ताचा विचार झाला आतां १९ व्या सूक्ताचा विचार करूं.

असत्यानें नाश

असद्भूम्याः समभवत्तद्यामेति महद्व्यचः ।
तद्वै ततो विधूपायत्प्रत्यक्कर्तारमृच्छतु ॥ (मं. ६)

या सूक्ताच्या सहाव्या मंत्रांत असत्यामुळें कर्त्याचा नाश कसा होतो ही गोष्ट विस्तारानें सांगितली आहे. ' पृथ्वीवर थोडें असत्य आचरण केलें तरी तें सर्वत्र प्रसरतें आणि त्याच्या कर्त्यास कष्ट देतें आणि त्याचा नाश करतें. ' (मं. ६) म्हणून कधींहि असन्मार्गानें जावूं नये. जगांत सुख आणि शांति प्राप्त करण्यास हा एकच मार्ग आहे. प्रत्येक मनुष्यानें हें शिकलें पाहिजे कीं तो स्वतः कधीं असत्यास प्रवृत्त होणार नाहीं आणि सत्य पालनावरच ध्यान केंद्रित करील.

दुसऱ्या मंत्रांत अपामार्गाचें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं जेथें ही औषधि पोहोंचेल तेथें कोणत्याहि प्रकारचें भय नाहीं. ' एवढें महत्त्व या अपामार्गाचें आहे. तिसऱ्या आणि चौथ्या मंत्रांत सुद्धां या औषधीची प्रशंसा केली आहे. आणि बाकी मंत्रांत काव्यमय वर्णनानें ह्या अपामार्ग वनस्पतीचें गुण वर्णन केलें आहे.

वैद्यानीं या तीनहि सूक्तांचा जास्त विचार केला पाहिजे. कारण हा विषय त्यांच्या कक्षेंतील आहे.

पिप्पली औषधि

कांड ६, सूक्त १०९

(ऋषिः – अथर्वा । देवता – पिप्पली-भैषज्यं, आयुः ।)

पिप्पली क्षिप्तभेषज्यू३तातिविद्धभेषजी । तां देवाः समकल्पयन्नियं जीवितवा अलम् ॥ १ ॥

अर्थ— (पिप्पली क्षिप्तभेषजी) पिंपळी ही औषधी उन्माद रोगासाठीं एक चांगलें औषध आहे. (उत अतिविद्धभेषजी) आणि महाव्याधींवर सुद्धां औषधि आहे. (देवाः तां समकल्पयन्) देवांनीं तिला समर्थ निर्माण केली आहे कारण कीं (इयं जीवितवे अलं) ही औषधि जीवनासाठीं पुरेशी आहे. [१]

भावार्थ— पिप्पली औषधि उन्माद आणि वात अथवा महाव्याधिची औषधि आहे. ही एकच औषधि आरोग्य आणि दीर्घायुष्यास पुरती आहे. [१]

पिप्पल्यः॑ समवदन्तायतीर्जननादधि । यं जीवमश्नवामहै न स रिष्याति पूरुषः ॥ २ ॥
असुरास्त्वा न्यखनन्देवास्त्वोदवपन्पुनः । वातीकृतस्य भेषजीमथो क्षिप्तस्य भेषजीम् ॥ ३ ॥

अर्थ— (जननात् अधि आयतीः) जन्मापासून आलेली (पिप्पल्यः समवदन्त) पिंपळी औषधि (वनस्पति) म्हणते कीं (यं जीवं अश्नवामहै) ज्या जीवाकडून माझें भक्षण करवाल (सः पुरुषः न रिष्याति) तो पुरुष मरत नाहीं. [२]

तूं (वातीकृतस्य भेषजीं) वात रोगाची औषधी (अथो क्षिप्तस्य भेषजीं) आणि उन्माद रोगाची औषधि आहेस, अशा तुला (असुराः त्वा न्यखनन्) असुरांनीं प्रथम खोदली आहे आणि नंतर (पुनः देवाः त्वा उदवपन्) देवांनीं पुनः उगवली आहे. [३]

भावार्थ— जो रोगी पिप्पलीचें सेवन करतो तो रोगामुळें दुःखी होत नाहीं. अशी या औषधीची प्रतिज्ञा आहे. [२]

ही औषधि वात रोग आणि उन्माद रोगावर अप्रतिम गुणकारी आहे याचा प्रथम शोध राक्षसांस लागला म्हणून त्यांनीं ती भूमींतून उपटून काढली आणि नंतर देवांनीं तिला विशेषें करून वाढविली. [३]

पिप्पली (पिंपळी) औषधि

पिंपळी औषधि (वनस्पति) एकटीच मनुष्याचें आरोग्य सुधरविण्यास पुरेशी आहे. एवढें खात्री पूर्वक विधान पहिल्या आणि दुसऱ्या मंत्रांत केलें आहे. जो पिंपळीचें सेवन करतो तो रोगी होत नाहीं, ही गोष्ट दुसऱ्या मंत्रांत खास सांगितली आहे. त्याविषयीं वैद्यक ग्रंथांत खालीं दिलेलें वर्णन आहे—

ज्वरघ्नी वृष्या तिक्तोष्णा कटुतिक्ता दीपनी
मारुतश्वासकासश्लेष्मक्षयघ्नी च ।
(रा. नि. व. ६)

मधुना सा मेदोवृद्धिकफश्वासकासज्वरघ्नी मेदाग्निवृद्धिकरी च । गुडेन सा जीर्णज्वराग्निमान्द्यहरी च । तत्र भागैकं पिप्पल्या भागद्वयं च गुडस्येति । (भा. प्र. १)

पिंपळी ज्वरनाशक, वीर्यवर्धक, आहे. मेद, कफ-श्वास, खोकला ताप वगैरे रोगांचा ती नाश करते. बुद्धि आणि भूकेस वाढवते, मधाबरोबर सेवन केलें असतां मेद, कफ, श्वास, खोकला, ताप, वगैरे दूर करते. बुद्धि आणि पचनशक्ति वाढविते. 'गुळासह खाण्यानें जीर्णज्वर आणि अग्निमांद्य दूर करते. पिंपळी एक भाग आणि गूळ दोन भाग घेतला पाहिजे. '

यावरून पिंपळीचें सेवन करण्यानें केवढा फायदा होतो तें ध्यानी येईल. पहा—

(१) **पिप्पली रसायन**— बुद्धि वर्धक आहे. त्याविषयीं चरकानें म्हटलें आहे. कीं—

तिस्रस्तिस्रस्तु पूर्वाह्णे भुक्त्वाग्रे भोजनस्य च ।
पिप्पल्यः किंशुकक्षारभाविता घृतभर्जिताः ।
प्रयोज्या मधुसर्पिर्भ्यां रसायनगुणैषिणा ॥
(चरक चि. १)

' तुपांत तळून आणि पळसाच्या क्षारांत एकत्र करून पिंपळी मध आणि तुपाशीं मिसळून सकाळीं तीन आणि जेवल्यावर तीन खाल्यानें उत्तम रसायन गुण प्राप्त होतो. ' हें रसायन बुद्धिवर्धक आहे. कमी बुद्धि अथवा अशक्त बुद्धि ज्यांची आहे अशानीं वैद्याच्या सल्ल्यानें त्याचा प्रयोग करून पहावा.

२ **वर्धमान पिप्पली रसायन**— प्रथम दिवशीं १० पिंपळी दूधांत उकळून सेवन करणें. दुसऱ्या दिवशीं २०, तिसऱ्या दिवशीं तीस या प्रकारें १० दिवस करावें नंतर दहा दिवस अनुक्रमानें कमी करीत यावें, अशा रीतीनें २० दिवस तिचें सेवन करावें. साठ दिवसांत तयार झालेले तांदूळाचा भात दुधाशीं खावा आणि पचेल तेवढें दूध प्यावें व तूप खावें. ही उत्तम मात्रा आहे. कोणी अशक्त असल्यास त्यानें दहा ऐवजीं सहा अथवा तीन पिंपळांनें सुरवात करावी, वाढवाव्या तसेंच कमी कराव्या. त्याचे पुष्कळ गुण आहेत. मनुष्य सुदृढ होतो, परंतु हे सर्व प्रयोग वैद्याच्या सल्ल्यानें केला पाहिजे. नाहून तो नुकसानकारक होण्याचा संभव असतो.

रोहिणी वनस्पति

कांड ४, सूक्त १२

(ऋषिः – ऋभुः । देवता – रोहिणी–वनस्पतिः ।)

रोह॑ण्यसि रोह॑ण्यस्थ्नश्छिन्नस्य रोह॑णी । रोहयेदमरुन्धति ॥ १ ॥
यत्ते॒ रि॒ष्टं यत्ते॑ द्यु॒त्तमस्ति पेष्ट्रं त आत्मनि । धाता तद्भद्रया पुनः सं द॑धत्परुषा परुः ॥ २ ॥
सं ते॑ मज्जा मज्ज्ञा भवतु समु ते परुषा परुः । सं ते॑ मांसस्य विस्रस्तं समस्थ्यपि रोहतु ॥ ३ ॥
मज्जा मज्ज्ञा सं धीयतां चर्मणा चर्म रोहतु । असृक्ते अस्थि रोहतु मांसं मांसेन रोहतु ॥ ४ ॥
लोम लोम्ना सं कल्पया त्वचा सं कल्पया त्वचम् । असृक्ते अस्थि रोहतु च्छिन्नं सं धेह्योषधे ॥ ५ ॥

अर्थ— हे औषधि ! तूं (रोहणी असि) वाढणारी आहेस, तूं (छिन्नस्य अस्थनः रोहणी) तुटलेल्या अस्थीस जोडणारी आहेस. हे (अ-रुन्धति) प्रतिबंधन करणारी औषधि (इदं रोहय) हिला वाढव, परिपूर्ण कर. [१]

(यत् ते रिष्टं) जो तुझ्या अंगास मार पडला असेल, (यत् ते द्युत्तं) जें भाजलेलें अंग असेल, आणि जो (ते आत्मनि पेष्टं अस्ति) तुझ्या शरीराचा भाग अथवा अवयव चिरडला गेला असेल, (धाता भद्रया) पोषण करणाऱ्या कल्याण करणाऱ्या त्या औषधीनें (तत् परुः परुषा पुनः सन्दधत्) त्या सांध्याला दुसऱ्या सांध्याशीं पुनः जोडून टाक. [२]

(ते मज्जा मज्ज्ञा सं रोहतु) तुझे मज्जातंतू मांससह वाढोत, (उ ते परुषा परुः सं) आणि तुझ्या सांध्यांनीं सांधे वाढोत. (ते मांसस्य विस्रस्तं सं) तुझ्या मांसाचा छिन्न भिन्न झालेला भाग वाढो. (अस्थि अपि सं रोहतु) हाडाशीं हाडें जोडून ठीक उत्तम होऊन जावोत. [३]

(मज्जा मज्ज्ञा सं धीयतां) मज्जेशीं मज्जा मिळून जावो. (चर्मणा चर्म रोहतु) चामडीनें कातडें वाढो. (ते असृक् अस्थि रोहतु) तुझें रक्त आणि हाडें वाढोत आणि (मांसं मांसेन रोहतु) मांसानें मांस वाढो. [४]

हे औषधि ! (लोम लोम्ना संकल्पय) रोम (शरीरावरील केस) रोमांशीं मिळून जावोत (त्वचा त्वचं संकल्पय) चामडी चामडीशीं मिळून जाऊन वाढो. (ते असृक् अस्थि रोहतु) तुझें रक्त आणि हाडें वृद्धि पावोत. (छिन्नं संधेहि) तुटलेलीं अंगें (अवयव) जोडून टाक. [५]

भावार्थ— ही रोहिणी नांवाची वनस्पति आहे ती तुटलेल्या शरीरावयवांस वाढविते. तिचें नांव रोहिणी आहे. परंतु तिला अरुंधति असेंहि म्हणतात. [१]

शरीरावर मार पडला असला, अंगभाजलें असलें, अवयव चिरडले गेले असले तरी सुद्धां या औषधीनें ते पहिल्यासारखे जोडले जातात. [२]

या औषधीनें शरीरांतील मज्जा, सांधे, मांस, अस्थि वगैरे वाढतात आणि अवयव पूर्ववत् होतात. [३]

मज्जा, कातडें, हाडें आणि मांस तिच्या (रोहिणी) मुळें वाढतात. [४]

रोम (शरीरावरील केस) त्वचा (कातडी), रक्त तसेंच तुटलेले अवयव हिच्यामुळें वाढतात. [५]

स उत्तिष्ठ प्रेहि प्र द्रव रथः सुचक्रः सुपविः सुनाभिः । प्रति तिष्ठोर्ध्वः ॥ ६ ॥
यदि कर्तं पतित्वा संशश्रे यदि वाश्मा प्रहृतो जघान। ऋभू रथस्येवाङ्गानि सं दधत्परुषा परुः ॥७॥

अर्थ — (**सः उत्तिष्ठ प्रेहि**) असा तूं उठ आणि पुढें चल (प्रगति कर) आतां तूं (**सुचक्रः सुपविः सुनाभिः रथः**) उत्तम चाकें, उत्तम लोखंडाच्या धांवा, उत्तम आरीनीं युक्त रथाप्रमाणें (**प्रद्रव**) धांव आणि (**ऊर्ध्वः प्रतितिष्ठ**) उंच उभा रहा. [६]

(**यदि कर्तं पतित्वा संशश्रे**) जर आरी पडून जखम झाली असेल, (**यदि वा प्रहृतः अश्मा जघान**) अथवा फेंकलेल्या दगडानें जखम झाली असेल, तर (**ऋभुः रथस्य अंगानि इव**) सुतार ज्याप्रमाणें रथाचे भाग जोडतो त्याप्रमाणें (**परुषा परुः संदधत्**) पेरें पेरांशीं, सांधे सांध्यांशीं पूर्ववत् जुळून जावोत. [७]

भावार्थ — हे रोग्या ! तूं या औषधीपासून आरोग्य प्राप्त केलें आहेस. आतां तूं उठ आणि प्रगति कर, रथाप्रमाणें धांव. उभा राहून चालूं लाग. [६]

मार पडल्यानें, पडल्यामुळें, वजनदार वस्तु पडून अथवा दगड लागल्यानें शरीरावर घाव झाला असेल तरी सुद्धां या औषधीनें सर्व अवयव पहिल्यासारखे आरोग्ययुक्त होतात. [७]

रोहिणी वनस्पति

रोहिणी औषधि

वैद्यकग्रंथांत या रोहिणी औषधीचें नांव ' मांसरोहिणी ' असें दिलें आहे. तिचीं दुसरीं नांवें आहेत. ' **अग्निरुहा, वृत्ता, चर्मकषा, वसा, मांसरोही, प्रहारवल्ली, विकषा वीरवती.** तिचे गुण असे आहेत —

स्यान्मांसरोहिणी वृष्या सरा दोषत्रयापहा ।

' मांसरोहिणी, वीर्यवर्धक आणि त्रिदोषांचा नाश करणारी आहे, ' आणि —

शीता कषाया कृमिघ्नी कण्ठशोधनी रुच्या वात-
दोषहारी च (रा. नि. व. १२)

ही औषधि वीर्यवर्धक, शीतवीर्य, कषाय (कडू) रुचीची, कृमीदोष दूर करणारी, कंठदोष दूर करणारी, रुचि वाढविणारी आणि वातदोष दूर करणारी आहे. '

या सूक्तांत ' रोहिणी ' चीं नांवें ' भद्रा आणि अरुंधती ' अशी सुद्धां आलीं आहेत. पण वैद्यशास्त्रग्रंथांत त्या नांवाची एकहि वनस्पति नाहीं. वैद्यकग्रंथांत तिचें नांव ' मांसरोही ' अथवा ' मांसरोहिणी ' असें दिलें आहे. हे शब्द या सूक्तांत सांगितलेल्या हकीगतीस टेका देणारे आहेत. मांसादि सप्त धातु वाढविणारी ही औषधि आहे, असें या सूक्तांत म्हटलें आहे आणि वैद्यकग्रंथांत मांसास वाढविते असें म्हटलें आहे, त्यांत विशेष फरक नाहीं. कारण कीं ज्यामुळें रक्त आणि मांस वाढतें त्यानेंच अन्य धातु सुद्धां वाढतात. कारण कीं अन्य धातु रक्तानेंच पुढें तयार होत असतात.

त्याशिवाय वैद्यक ग्रंथांत तिला ' **प्रहारवल्ली** ' असेंही म्हटलें आहे. प्रहारवल्लीचा अर्थ जखमेस रुजवणारी औषधि. हें वर्णनसुद्धां सूक्तांत सांगितलेल्या वर्णनास टेका देणारें आहे. सातव्या मंत्रांत असेंच वर्णन आहे. वैद्यक ग्रंथांत तिचें नांव ' **वीरवती** ' असें सुद्धां आहे. त्याचा अर्थ ' वीरांनीं युक्त ' असा होतो. म्हणजे वीर जिच्याजवळ जातात. या औषधिजवळ वीर अशासाठीं जातात कीं शस्त्रांनीं झालेले घाव ती फार लवकर रुजवते. महाभारतांत आपणांस वाचावयास मिळतें कीं संपूर्ण दिवस युद्ध करणाऱ्या वीरांचीं शरीरें बाणाच्या आघातांनीं व्रणयुक्त होत असत. नंतर ते वीर रात्रीं कोणत्या एका औषधीचा लेप सर्वांगास करून झोंपून जात, त्यामुळें सकाळीं त्यांचें शरीर पुनः युद्ध करण्यालायक तयार होत असे. कदाचित् त्या वीरांजवळ ही रोहिणी औषधीच असेल. त्यामुळें वैद्यक ग्रंथांत तिचें नांव ' वीरवती ' असें म्हटलें आहे.

या सूक्ताचा अर्थ अत्यंत सरळ आहे. वाचकांनीं वैद्यक ग्रंथासह हें सूक्त वाचावें आणि लाभ प्राप्त करावा. ज्ञानी वैद्यांनीं औषधीचा शोध करून लोकहितार्थ ती प्रगट करावी. म्हणजे वारंवार जखमा होऊन दुःख भोगणाऱ्या लोकांस फायदा होणें संभवनीय होईल.

कुष्ठ औषधि

कांड ५, सूक्त ४

(ऋषिः - भृग्वङ्गिराः । देवता - कुष्ठो, तक्मनाशनम् ।)

यो गिरिष्वजायथा वीरुधां बलवत्तमः । कुष्ठेहि तक्मनाशन तक्मानं नाशयन्नितः ॥ १ ॥
सुपर्णसुवने गिरौ जातं हिमवतस्परि । धनैरभि श्रुत्वा यन्ति विदुर्हि तक्मनाशनम् ॥ २ ॥
अश्वत्थो देवसदनस्तृतीयस्यामितो दिवि । तत्रामृतस्य चक्षणं देवाः कुष्ठमवन्वत ॥ ३ ॥
हिरण्ययी नौरचरद्धिरण्यबन्धना दिवि । तत्रामृतस्य पुष्पं देवाः कुष्ठमवन्वत ॥ ४ ॥
हिरण्ययाः पन्थान आसन्नरित्राणि हिरण्यया । नावो हिरण्ययीरासन्याभिः कुष्ठं निरावहन् ॥ ५ ॥
इमं मे कुष्ठ पूरुषं तमा वह तं निष्कुरु । तमु मे अगदं कृधि ॥ ६ ॥

अर्थ— हे (तक्मनाशन कुष्ठ) रोगनाशक कुष्ठ (कुडा) औषधि ! (यः गिरिषु अजायथाः) जी तूं पर्वतांत उत्पन्न होतेस आणि जी (वीरुधां बलवत्तमः) सर्व औषधिमध्यें जास्त बळ देणारी आहेस ती तूं (तक्मानं नाशयन् इतः आ इहि) रोगांचा नाश करीत येथें ये. [१]

(सुपर्ण-सुवने गिरौ हिमवतः परिजातं) जेथें गरुड पक्षी रहातात अशा हिमालयाच्या शिखरावर जी उत्पन्न होते तिचें वर्णन (श्रुत्वा धनैः अभियन्ति) ऐकून धनासह लोक तेथें धांवून जातात आणि (तक्मनाशनं विदुः हि) रोगनाशक औषधीस प्राप्त करतात. [२]

(इतः तृतीयस्यां दिवि देवसदनः अश्वत्थः) येथून तिसऱ्या देवलोकांत देवांना बसण्यास योग्य अश्वत्थ (पिंपळ) आहे. (तत्र अमृतस्य चक्षणं कुष्ठं देवाः अवन्वत) तेथें अमृतदर्शन झाल्याप्रमाणें कुष्ठौषधि देवांस प्राप्त झाली. [३]

(हिरण्ययी हिरण्यबन्धना नौः दिवि अचरत्) सोन्याची तयार केलेली आणि सोन्याच्या बंधनानें बांधलेली होडी द्युलोकांत चालते. (तत्र अमृतस्य पुष्पं कुष्ठं देवाः अवन्वत) तेथें अमृताच्या फुलाप्रमाणें कुष्ठौषधि देवांस प्राप्त झाली. [४]

(हिरण्ययाः पन्थानः आसन्) सोन्याचे मार्ग होते आणि (अरित्राणि हिरण्ययाः) वल्हीं सुद्धां सोन्याचीच होतीं (नावः हिरण्ययीः आसन्) होड्यासुद्धां सोन्याच्या होत्या. (याभिः कुष्ठं निरावहन्) ज्यांच्यांतून कुष्ठौषधि आणण्यांत आली होती. [५]

हे कुष्ठ नांवाच्या औषधि ! (मे इमं तं पूरुषं आवह) माझ्या या पुरुषास उठव. (तं निष्कुरु) त्याला निःशेष रोगरहित आरोग्ययुक्त कर, आणि (मे तं उ अगदं कृधि) माझ्या पुरुषास निरोगी कर. [६]

भावार्थ— कुष्ठ (कुडा) औषधि डोंगरावर होते. बलवर्धक औषधिंमध्यें ती सर्वश्रेष्ठ आहे आणि सर्वांत जास्त शक्ति देणारी आहे, तिच्यामुळें क्षय वगैरे रोग बरे होतात. [१]

हिमालयाच्या उंच शिखरावर ही औषधि उगवते आणि सांपडते, असें समजल्यानें पुष्कळ पैसा खर्च करून मनुष्यें तेथें जातात आणि रोगनाशक अशी ही औषधि प्राप्त करतात. [२]

येथून तिसऱ्या उच्च अशा द्युलोकांत जेथें देवतांचें वास्तव्य असतें तेथें अमृताप्रमाणें ही कुष्ठ औषधि देव प्राप्त करतात. [३]

सोन्याप्रमाणें तेजस्वी आकाशनौका जेथें चालते तेथें अमृताच्या फुलाप्रमाणें ही कुष्ठनामक औषधि देवांनीं प्राप्त केली. [४]

या आकाशनौकांचा मार्गसुद्धां सोनेरी आणि वल्हींसुद्धां सोनेरी, होतीं तिच्या सहाय्यानें कुष्ठ औषधीस येथें आणण्यांत आलें. [५]

ही कुष्ठौषधि मनुष्यास रोग मुक्त करते. [६]

देवेभ्यो अधि जातोऽसि सोमस्यासि सखा हितः। स प्राणाय व्यानाय चक्षुषे मे अस्मै मृड ॥ ७ ॥
उदङ् जातो हिमवतः स प्राच्यां नीयसे जनम् । तत्र कुष्ठस्य नामान्युत्तमानि वि भेजिरे ॥ ८ ॥
उत्तमो नाम कुष्ठास्युत्तमो नाम ते पिता । यक्ष्मं च सर्वं नाशय तक्मानं चारसं कृधि ॥ ९ ॥
शीर्षामयमुपहत्यामक्ष्योस्तन्वोऽ रपः । कुष्ठस्तत्सर्वं निष्करद्दैवं समह वृष्ण्यम् ॥ १० ॥

अर्थ— (देवेभ्यः अधिजातः असि) देवांपासून तूं उत्पन्न झाली आहेस. आणि (सोमस्य सखा हितः) सोम औषधीची तूं मित्र आणि कल्याण करणारी आहेस. (सः प्राणाय व्यानाय चक्षुषे मे अस्मै मृड) अशी तूं प्राण व्यान आणि डोळे वगैरेंच्या बाबतींत या पुरुषाला सुखी कर. [७]

(सः हिमवतः जातः) तूं हिमालयात उत्पन्न झाली आहेस. (जनं प्राच्यां उदङ् नीयसे) तूं मनुष्यास प्रगतीच्या उच्चदिशेस घेऊन जातेस. (तत्र कुष्ठस्य उत्तमानि नामानि) तेथें कुष्ठ औषधींची चांगलीं नांवें (विभेजिरे निरनिराळीं वेगळीं झालीं. [८]

हे कुष्ठ ! (उत्तमः नाम असि) तुझें नांव उत्तम आहे. (ते पिता उत्तमः नाम) तुझा उत्पादक अथवा रक्षक सुद्धां उत्तम आहे. (सर्वं यक्ष्मं नाशय) सर्व क्षयरोग दूर कर. (च तक्मानं अरसं कृधि) आणि ज्वराला निःसत्व कर. [९]

(शीर्षामयं) डोक्याचा रोग (अक्ष्योः उपहत्यां) डोळ्यांची अशक्तता आणि (तन्वः रपः) शरीरांतील दोष (तत् सर्वं) त्या सर्वांना (दैवे वृष्ण्यं सं अह) दिव्य बळ वाढवून (कुष्ठः निष्करत्) कुष्ठ औषधि दूर करते. [१०]

भावार्थ— देवांपासून उत्पन्न झालेली आणि सोमाप्रमाणें कल्याणकारक अशी ही औषधि प्राण, व्यान, डोळे, वगैरेंस सुखदायक आहे. [७]

हिमालयांत उत्पन्न होणारी ही औषधि मनुष्याची उन्नति करते आणि तिची कीर्ति सर्वत्र गायली जाते. [८]

कुष्ठ स्वतः उत्तम आहे. जो ही औषधि जवळ बाळगतो तोसुद्धां उत्तम असतो. त्यामुळें क्षय वगैरे रोग दूर होतात. [९]

तिच्यामुळें डोक्याचे रोग, डोळ्यांची व्याधि, तसेंच शरीरांतील रोग दूर होतात. ही कुष्ठौषधि शरीराचें बळ वाढविते आणि दोष दूर करून आरोग्य प्राप्त करून देते. [१०]

कुष्ठ औषधि

कुष्ठ औषधि

कुष्ठ (कुडा) या औषधीचें वर्णन या सूक्तांत केलें आहे ही औषधि मस्तकाचे रोग, डोळ्याचे रोग, शरीरांत इतर होणारे रोग, ताप, क्षय, आणि कुष्ठरोग सुद्धां दूर करते. म्हणून या औषधीचें महत्त्व सोमवनस्पति एवढें आहे. या औषधीचें सेवन पुष्कळ प्रकारें होतें, रस पोटांत घेता येतो आणि घृत वगैरे करून शरीरास बाहेरून लेप करतां येतो. आतां वैद्यक ग्रंथांत या औषधीचे गुणधर्म काय सांगितले आहेत ते पाहूं. तिच्या इतर नांवाचा सुद्धां विचार करण्यासारखा आहे—

१ नीरुजं- निरोगिता (स्वास्थ्यपूर्ण आरोग्य) उत्पन्न करणारी औषधि.

२ पारिभद्रकं- सर्वप्रकारें कल्याण करणारी.

३ रामं- आनंद देणारी.

४ पावनं- शुद्ध करणारी.

कुष्ठ औषधीचीं हीं नांवें वैद्यक ग्रंथांत प्रचलित आहेत. या नांवावरून ही औषधि काय फायदे करीत असेल ते समजूं शकते. आतां तिचे गुण पहा—

कुष्ठमुष्ण कटु स्वादु शुक्लं तिक्त लघु ।
हन्ति वातास्रवीसर्पकासकुष्ठमरुत्कफान् ॥
(भा. प्र. पू. १)

विषकण्डखर्जुदद्रुहृत् कान्तिकरं च ॥
(रा. नि. व. १०)

'ही कुष्ठ औषधि उष्ण, कटु, स्वादु आहे. वीर्य उत्पन्न करते, तिक्त म्हणजे कडु आणि लघु आहे. वात, रक्त, विसर्प, खोकला,

*

कुष्ठ (कोड) आणि कफ या रोगांना दूर करते. याप्रकारें विष, खाज येणें, गजकर्ण, खरूज, नायटे वगैरे रोगहि दूर करते, आणि शरीराचें तेज वाढविते.

वैद्यक ग्रंथांत लिहिलेलें हें वर्णन अगदीं स्पष्ट आहे. आणि वाचक या गुणांची तुलना वेदमंत्रांशीं करतील तर त्यांना वेदमंत्राचा अर्थ जास्त स्पष्ट होईल.

या औषधीला हिंदुस्थानीत ' कुठ ' म्हणतात. ही अत्यंत प्रख्यात औषधि आहे. तिचा उपयोग पोटांत पिण्यास आणि शरीरास बाहेरून चोपडण्यास असा दुहेरी होतो. तिचा काढा करून थंड करून प्यालें असतां अंतःशुद्धि होते. आणि तिचें तेल अथवा तूप करून त्याला लेप केला असता कुष्ठा (कोड) सारखे रोग सुद्धां बरे होतात. वैद्यांनीं या औषधीचा प्रयोग करून त्याविषयीं जास्त माहिती मिळवून तीं प्रगट करावी.

कुष्ठ औषधि

कांड ६, सूक्त ९५

(ऋषिः – भृग्वंगिराः । देवता – वनस्पतिः ।)

अश्वत्थो देवसदनस्तृतीयस्यामितो दिवि । तत्रामृतस्य चक्षणं देवाः कुष्ठमवन्वत ॥ १ ॥
हिरण्ययी नौरचरद्धिरण्यबन्धना दिवि । तत्रामृतस्य पुष्पं देवाः कुष्ठमवन्वत ॥ २ ॥
गर्भो असि ओषधीनां गर्भो हिमवतामुत । गर्भो विश्वस्य भूतस्येमं मे अगदं कृधि ॥ ३ ॥

अर्थ— (इतः तृतीयस्यां दिवि) येथून तिसऱ्या (द्यु) लोकांत (देवसदनः अश्वत्थः) देवानां बसण्यास योग्य अश्वत्थ (पिंपळ) वृक्ष आहे (तत्र अमृतस्य चक्षणं) तेथें अमृताचें दर्शन व्हावें तद्वत् (कुष्ठं देवाः अवन्वत) कुष्ठ औषधि देवांनीं प्राप्त केली आहे. [१] (अथर्व ५।४।३)

(हिरण्ययी हिरण्यबन्धना नौः) सोन्याची केलेली आणि सोन्याच्या बंधनांनीं बांधलेली होडी (दिवि अचरत्) द्युलोकांत चालते. (तत्र अमृतस्य पुष्पं कुष्ठं) तेथें अमृताच्या फुलाप्रमाणें असलेली कुष्ठ औषधि आहे. ती (देवाः अवन्वत) देवांनीं प्राप्त केली आहे. [२] (अथर्व ५।४।४)

(ओषधीनां गर्भः असि) औषधींचें तूं मूळ आहेस. (उत हिमवतां गर्भः) आणि हिमालयाचा तूं गर्भ आहेस. (तथा विश्वस्य भूतस्य गर्भः) सर्व भूतमात्रांचा गर्भ आहेस, (मे इमं अगदं कृधि) तूं माझ्या या रोग्याला स्वास्थ्यपूर्ण आरोग्ययुक्त कर. [३] (अथर्व ५।२५।७)

हे तीनहि मंत्र त्यांचेसमोर दाखविलेल्या सूक्तांत पूर्वी येऊन गेले आहेत. तेथें त्यांचे स्पष्टीकरण वाचकांनी पहावें. या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रांत थोडा पाठभेद आहे. परंतु त्यामुळें कांहीं त्याचें स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं.

लाक्षा (लाख)

कांड ५, सूक्त ५

(ऋषिः – अथर्वा । देवता – लाक्षा ।)

रात्री माता नभः पितार्यमा ते पितामहः । सिलाची नाम वा असि सा देवानामसि स्वसा ॥ १ ॥

अर्थ— (ते माता रात्री पिता नभः पितामहः अर्यमा) तुझी माता रात्री, पिता आकाश आणि पितामह अर्यमा आहे. (नाम सिलाची वै असि) तुझें नांव सिलाची आहे. (सा देवानां स्वसा असि) ती तूं देवांची भगिनी (बहिण) आहेस. [१]

भावार्थ— सिलाची वनस्पतीची माता रात्र, पिता दिवस आणि पितामह सूर्य आहे. ती इंद्रियांस बहिणीप्रमाणें सुखकारक आहे. [१]

यस्त्वा पिबति जीवति त्रायसे पुरुषं त्वम् । भर्त्री हि शश्वतामसि जनानां च न्यञ्चनी ॥ २ ॥
वृक्षंवृक्षमा रोहसि वृषण्यन्तीव कन्यला । जयन्ती प्रत्यातिष्ठन्ती स्परणी नाम वा असि ॥ ३ ॥
यद्दण्डेन यदिष्वा यद्वारुर्हरसा कृतम् । तस्य त्वमसि निष्कृतिः सेमं निष्कृधि पूरुषम् ॥ ४ ॥
भद्रात्प्लक्षान्निस्तिष्ठस्यश्वत्थात्खदिराद्धवात् । भद्रान्न्यग्रोधात्पर्णात्सा न एह्यरुन्धति ॥ ५ ॥
हिरण्यवर्णे सुभगे सूर्यवर्णे वपुष्टमे । रुतं गच्छासि निष्कृते निष्कृतिर्नाम वा असि ॥ ६ ॥
हिरण्यवर्णे सुभगे शुष्मे लोमशवक्षणे । अपामसि स्वसा लाक्षे वातो ह्यात्मा बभूव ते ॥ ७ ॥

अर्थ— (यः त्वा पिबति जीवति) जो तुझें पान करतो तो जिवंत रहातो. (त्वं पुरुषं त्रायसे) तूं मनुष्याचें रक्षण करतेस (शश्वतां जनानां हि भर्त्री न्यञ्चनी च असि) सर्व लोकांचें भरणपोषण करणारी आणि आरोग्य देणारी तूं आहेस. [२]

(वृषण्यन्ती कन्यला इव) पुरुष इच्छिणाऱ्या कन्येप्रमाणें (वृक्षंवृक्षं आरोहसि) प्रत्येक वृक्षावर तूं चढतेस. तूं (जयन्ती प्रत्यातिष्ठन्ती) विजय प्राप्त करणारी आणि प्रतिष्ठित होणारी आहेस, (स्परणी नाम वै असि) तुझें नांव स्परणी सुद्धां आहे. [३]

(यत् दण्डेन यत् इष्वा) जी काठीनें अथवा बाणानें (यत् वा हरसा अरुः कृतं) अथवा खरचटल्यानें जखम झाली असेल (तस्यः निष्कृतिः त्वं असि) त्यापासून वांचवणारी रक्षण करणारी तूं आहेस. (सा इमं पुरुषं निष्कृधि) अशी तूं या पुरुषास बरा कर. [४]

(भद्रात् प्लक्षात् अश्वत्थात् खदिरात् धवात्) भद्र, पाकर, पिंपळ, खैर, धायटी अथवा धावडा (भद्रात् न्यग्रोधात् पर्णात्) वड आणि पळस या वृक्षांपासून (निः तिष्ठसि) तूं निघतेस. हे (अरुं-धति) जखम संपूर्ण भरून आणणाऱ्या वनस्पति ! (सा नः एहि) अशी तूं आमच्याजवळ ये. [५]

(हिरण्यवर्णे सुभगे) सोन्यासारख्या रंगाची भाग्यशाली (सूर्यवर्णे वपुष्टमे) सूर्यासारख्या रंगाची आणि शरीरास कल्याणकारक हे (निष्कृते) रोग दूर करणारी ! तुझें नांव (निष्कृतिः वै असि) निष्कृति आहे म्हणून तूं (रुतं गच्छासि) जखम अथवा रोगांजवळ जाऊन पोहोंचतेस. [६]

हे (हिरण्यवर्णे सुभगे) सोन्याच्या रंगासारख्या भाग्यशालिनी ! हे (शुष्मे लोमशवक्षणे) बलशालिनी आणि केसांनीं युक्त ! हे (लाक्षे) लाखनामक औषधि ! (अपां स्वसा असि) तूं पाण्याची बहीण आहेस, (ते आत्मा वातः ह बभूव) तुझा आत्मा पावन झाला आहे. [७]

भावार्थ—जो या औषधीचें रसपान करतो तो जिवंत रहातो. या औषधिपासून सर्व मनुष्यांस रक्षण, पुष्टि आणि आरोग्य प्राप्त होतें. [२]

ही औषधि पुष्कळ वृक्षावर होते, तिच्यामुळें विजय प्राप्त होतो आणि जीवित स्थिर होतें म्हणून तिला स्परणीसुद्धां म्हणतात. [३]

काठी, बाण अथवा कोणाशी टक्कर झाल्यामुळें जी जखम होते ती या औषधीनें भरून रुजून येते. [४]

पिंपळ, खैर, पळस, वगैरे अनेक वृक्षावर तिची उत्पत्ति होते.आणि ती जखम बरी करणारी घाव रुजवणारी आहे. [५]

ही औषधि पिंवळ्या रंगाची, तेजस्वी आणि शरीरास कल्याणकारक असते. ती रोग दूर करते म्हणून तिचें नांव निष्कृति असें पडलें आहे. [६]

ती सोन्याच्या रंगाची, बलशाली आणि आंतून तंतू काढणारी आहे. तिचें नांव लाक्षा औषधि आहे, ती रसयुक्त परंतु वात प्रकृतीची आहे. [७]

सिलाची नाम कानीनोऽजंबभ्रु पिता तव । अश्वो यमस्य यः श्यावस्तस्य हास्नास्युक्षिता ॥ ८ ॥
अश्वस्यास्नः संपतिता सा वृक्षाँ अभि सिष्यदे । सरा पतत्रिणी भूत्वा सा न एह्यरुन्धति ॥ ९ ॥

अर्थ—(सिलाची नाम कानीनः) सिलाची नांवाची औषधि कन्येसारखी आहे. (तव पिता अजबभ्रु) तुझा पालक अजबभ्रु २६०.जे बकऱ्यांना पुष्ट करणारा वृक्ष आहे. (यमस्य यः श्यावः अश्वः) यमाचा जो गतिशील घोडा आहे (तस्य ह अस्ना उक्षिता असि) त्याच्या मुखानें तूं शिंपडली गेली आहेस. [८]

(अश्वस्य अस्नः संपतिता) घोड्याच्या तोंडानें संमिलित झालेली (सा वृक्षान् अभिसिष्यदे) ती वृक्षांस शिंपडते. हे (अरुं-धति) जखम भरून आणणारी ! (पतत्रिणी सरा भूत्वा) पाझरणारी आणि प्रवाहित होऊन (सा नः एहि) अशी तूं आमच्याजवळ ये. [९]

भावार्थ- तिचें नांव सिलाची तसेंच कानीना असेंसुद्धा आहे. ज्या वृक्षांचीं पानें बकऱ्या खातात त्या झाडावर ही सांपडते. सूर्याच्या गतियुक्त किरणांनीं ती तयार होते. [८]

सूर्याच्या किरणांनीं उष्ण होऊन ती तयार होऊन वृक्षांतून बाहेर येते. वृक्षांतून ती पसरते आणि बाहेर येते. ती जखमेस रुजवणारी आहे. [९]

लाक्षा (लाख)

लाक्षा (लाख)

लाखेचें वर्णन वैद्यक ग्रंथांत पुष्कळ येतें. तिला हिंदीभाषेंत लाही म्हणतात. लाख असें सुद्धा तिचें नांव आहे. तिचीं संस्कृत नांवें पुष्कळ आहेत. परंतु त्यांतील खालीं देत असलेल्या नांवांचा या सूक्ताबरोबर विचार करण्यासारखा आहे—

१ जन्तुका, जतु, जतुका- कृमीपासून तयार होणारी.
२ क्रिमिजा, कीटजा- कृमीपासून तयार होणारी.
३ क्रिमिहा- जंतूंचा नाश करणारी.
४ रक्षा, राक्षा, लाक्षा- रक्षण करणारी.
५ रङ्गमाता- जिच्यापासून रंग तयार होतात.
६ क्षतघ्ना, क्षतघ्नी- व्रणाचा नाश करणारी.
७ खदिरिका- खैर वृक्षापासून उत्पन्न होणारी.
८ पलाशी- पळस (वृक्ष) पासून उत्पन्न होणारी.
९ द्रुमव्याधिः, द्रुमामयः- हा वृक्षाचा रोग आहे.
१० दीप्तिः- ही तेजरूप आहे.
११ द्रवरसा- द्रव रसरूप आहे.

हीं लाखेचीं नांवें या सूक्तांत सांगितलेल्या आशयांशीं मिळतीं आहेत. पहा—

ही लाख खैर आणि पळस तसेंच इतर वृक्षांपासून प्राप्त होते, ही गोष्ट या सूक्ताच्या पांचव्या मंत्रांत सांगितली आहे. तिचीं सूचक नांवें वैद्यक ग्रंथांत, 'खादिरिका' आणि 'पलाशी' अशीं आहेत. वैद्यक ग्रंथांत तिचें नांव दीप्ति आहे. त्याचें वर्णन सहाव्या आणि सातव्या मंत्रांत हिरण्यवर्णा वगैरे शब्दांनीं केलें आहे. 'द्रवरसा' हें नांव वैद्यक ग्रंथांत आहे तोच भाव नवव्या मंत्रांत 'सरा' पदानें दर्शविला आहे. सरा आणि रसा हे शब्द अक्षरें उलट सुलट करण्यानें होतात.

लाखेचें नांव 'क्षत-घ्नी' असेंहि आहे. त्याचा अर्थ जखमा-घाव रुजवणारी असा आहे. हीच गोष्ट चौथ्या मंत्रांत सांगितली आहे. काठीनें अथवा बाणानें किंवा एखाद्या वस्तूशीं टक्कर होऊन किंवा ठोकर खाऊन खरचटलें, जखम झाली तर ती जखम लाखेचा प्रयोग करून भरून काढतात. याप्रकारें मंत्रांत सांगितलेले गुण आणि वर दिलेल्या वैद्यक ग्रंथांतील नांवांचे गुण परस्पर मिळते-जुळते आहेत. आतां या लाखेचे गुण पहा—

तिक्ता कषाया श्लेष्म पित्तघ्नी विषघ्नी रक्तघ्नी
विषमज्वरघ्नी च । रा. नि. व. ६

'लाख कडू आणि कषाय (अर्क) आहे, तसेंच कफ, पित्त, विषरक्त दोष आणि विषमज्वर यांस दूर करणारी आहे.' असे तिचे गुण आहेत म्हणून ती मनुष्याचें रक्षण करते, असें या सूक्तांत पुनः पुनः सांगितलें आहे.

या सूक्तांत लाक्षा औषधीची माता, पिता, पितामह, बहीण, कन्या वगैरे नातेवाईकांचें वर्णन मं. १,७,८ यांत केलें आहे. त्या वर्णनाच्या आशयाचें जास्त संशोधन व्हावयास हवें. वैद्यांनीं

त्याविषयीं जास्त विचार करून त्या शोधावरून त्याला परिपूर्णत्व आणावें.

पहिल्या मंत्रांत सिलाची लाखेचें वर्णन करतांना ' **देवानां स्वसा** ' असें वर्णन आलें आहे. ही लाख देवांची बहीण म्हणजे इंद्रियांस सहाय्यक आहे. ' **देव** ' शब्द येथें इंद्रियवाचक आहे, कारण की त्यानंतर प्रत्येक अंग आणि अवयवांचें व्रण दूर करणारी ही लाख आहे असें सांगितलें आहे. त्यामुळें ती इंद्रियांची सहाय्यक आहे ही गोष्ट सिद्ध होते.

दुसऱ्या मंत्रांत तिच्या रसाचें पान करणारा दीर्घायुषी होतो असें म्हटलें आहे. या लाखेचा रस तयार करून कसा काय पीत असतील हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्याचें पोटांत सेवन करण्यानें मनुष्याचें रक्षण होतें. रक्षण करण्याच्या तिच्या गुणामुळेंच तिला रक्षा, राक्षा, अथवा लाक्षा म्हणतात. ती व्रणाला दुरुस्त करते, रुज आणते. सडूं देत नाहीं आणि मनुष्याचें भरणपोषण करून त्याला आरोग्यसंपन्न करते. दुसऱ्या मंत्रांत सांगितलेल्या या गोष्टी वैद्यक ग्रंथाच्या कथनाशीं मिळत्या आहेत.

तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे ही निरनिराळ्या पुष्कळ वृक्षांवर निर्माण होते. ती रोगांवर विजय मिळवते, रोगांशीं टक्कर देते, त्यामुळें पुष्कळ मनुष्यांची ती आवडती आहे. सर्व लोक तिची इच्छा करतात म्हणून तिचें नांव ' **स्परणी** ' असें पडलें आहे.

चौथ्या मंत्रांत सांगितलें आहे की विविधप्रकारें उत्पन्न झालेल्या जखमांचे व्रण (घाव) ही लाख दूर करते. रोगाची निष्कृति (दूर करणें) यामुळें तिचें नांव ' **निष्कृति** ' असें झालें आहे.

पांचव्या मंत्रांत सांगितलें आहे की पिंपळ, खैर, पळस वड, आंवळी, बाभूळ वगैरे वृक्षांवर ही लाख होते. ती ' **अरुं-धती** ' आहे म्हणजे व्रणास (जखमा) रुजवणारी आहे. तिच्या प्रयोगानें नानाप्रकारच्या जखमा भरून येतात.

सहाव्या आणि सातव्या मंत्रांच्या पूर्वार्धांत तिचें तेजस्वी वर्णन केलें आहे. सूर्यासमान, तापलेल्या सोन्याप्रमाणें अथवा सूर्याच्या रंगाप्रमाणें तिचें तेज आहे. ती ' **वपुष्टमा** ' म्हणजे शरीराचें कल्याण करणारी आहे. शरीरास पुष्ट आणि तेजस्वी करते. ' **रुत** ' म्हणजे व्रण वगैरेंस दूर करते. आणि सर्व दोषांस दूर घालविते. रोग आणि व्रण-घाव-जखम यांचें निराकरण करण्यामुळें तिला निष्कृति नांव प्राप्त झालें आहे. ती वात प्रकृतियुक्त आहे. जणूं काय वात हा तिचा आत्मा आहे.

आठव्या मंत्रांत ' **अजबभ्रु** ' हा लाखेचा पिता आहे असें सांगितलें आहे. अज नांव बकऱ्यांचें आहे. बकऱ्यांचे पोषण करणाऱ्या वृक्षांचें हें नांव आहे. ज्या वृक्षांचीं पानें शेळ्या खातात ते वृक्ष उदा. पिंपळ, वड, बाभूळ, आंवळी खैर, पळस, बेरी वगैरे वृक्षांच्या शाखा-फांद्यांवर लाख उत्पन्न होते. म्हणून हें त्यांचें नांव आहे.

याप्रकारें या सूक्तांत लाखेचें वर्णन केलें आहे. वैद्यांनीं तिच्या उपयोगाविषयीं अधिक विचार आणि प्रयोग करावे आणि जनतेच्या लाभार्थ ते प्रगट करावेत.

शर्मी औषधि

कांड ६, सूक्त ३०

(ऋषिः - उपरिबभ्रवः। देवता - शमी।)

देवा इमं मधुना संयुतं यवं सरस्वत्यामधि मणावचर्कृषुः ।
इन्द्र आसीत्सीरपतिः शतक्रतुः कीनाशा आसन्मरुतः सुदानवः ॥ १ ॥

अर्थ— (**देवा मधुना संयुतं इमं यवं**) देवांनीं मधुरतेनें युक्त अशा या यव नांवाच्या धान्याला (**सरस्वत्यां अधिमणौ अचर्कृषुः**) सरस्वतीच्या किनारीं कांचेसारख्या भूमींत पेरण्यासाठीं वारंवार नांगर फिरविला. तेव्हां (**शतक्रतुः इन्द्रः सीरपतिः आसीत्**) शंभर यज्ञ करणारा इंद्र नांगराचा स्वामी होता आणि (**सुदानवः मरुत, कीनाशाः आसन्**) उत्तम दान करणारे मरुत शेतकरी होते. [१]

यस्ते मदोऽवकेशो विकेशो येनाभिहस्यं पुरुषं कृणोषि ।
आरात्त्वदन्या वनानि वृक्षि त्वं शमि शतवल्शा वि रोह ॥ २ ॥
बृहत्पलाशे सुभगे वर्षवृद्ध ऋतावरि । मातेव पुत्रेभ्यो मृड केशेभ्यः शमि ॥ ३ ॥

अर्थ- हे (शमि) शमी औषधि ! (यः ते मदः) जो तुझा आनंददायक रस आहे, (अवकेशः विकेशः) विशेष केंस वाढवितो, (येन पुरुषं अभिहस्यं कृणोमि) ज्यामुळें तूं पुरुषांस अत्यंत आनंदित करतोस, म्हणून (त्वत् अन्या वनानि आरात् वक्षि) तुझ्याहून भिन्न वृक्षांच्या जंगलास तुझ्यापासून दूर सारतों. (त्वं शतवल्शा विरोह) तूं शेंकडों शाखा फांद्या डहाळ्यांनीं वाढत रहा. [२]

हे (बृहत्पलाशे सुभगे वर्षवृद्धे शतावरि शमि) मोठ्या पानाच्या उत्तम तेजस्वी वृष्टीच्या (पावसामुळें) मोठ्या शतावरि शमि ! (माता पुत्रेभ्य इव) माता मुलांवर प्रेम करते त्याप्रमाणें (केशेभ्यः मृड) केसांस सुखदायक हो. [३]

शेती

प्रथम मंत्रांत यव नांवाचें धान्य पेरण्यास भूमींत उत्तम प्रकारें नांगर फिरविण्याचें विधान आहे. हा सर्व साधारण शेती-विषयीं उपदेश आहे, असें समजावें. जेव्हां इंद्र नांगर चालवतो आणि मरुत् शेती करतात, म्हणून तें कार्य मनुष्यास करण्यास कोण-त्याहि प्रकारें संकोच वाटतां कामा नये. म्हणजे शेतीचें कार्य दिव्य कार्य आहे, तें मनुष्यानें अवश्य केलें पाहिजे.

शमी

दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं शमीचा रस आनंद देतो, आणि केंस वाढवितो. त्यामुळें लोक आनंदित होतात. म्हणून शमी वृक्षाजवळ उगणारे इतर वृक्ष दूर करावे म्हणजे शमीची वाढ चांगली होईल. येथें बागेविषयीं एक मुख्य नियम सांगितला आहे— ज्या झाडास वाढवावयाचें त्याच्या आसपास इतर वृक्षांस वाढूं देऊं नये म्हणजे तो वृक्ष चांगला वाढतो.

तिसऱ्या मंत्रांत शतावरि आणि शमिची स्तुति आहे. तिच्या रसानें केंस वाढतात. त्यांस रसाचा फार फायदा होतो. वैद्यांनीं या सूक्ताचा अवश्य विचार करावा. या वनस्पतीनें केंसाची निगा आणि वाढ कशी होते त्याचा त्यांनीं खास विचार करावा.

सूर्यकिरण चिकित्सा

कांड ६, सूक्त ५२

(ऋषिः - भागलिः । देवता - मन्त्रोक्ताः ।)

उत्सूर्यो दिव एति पुरो रक्षांसि निजूर्वन् । आदित्यः पर्वतेभ्यो विश्वदृष्टो अदृष्टहा ॥ १ ॥
नि गावो गोष्ठे असदन्नि मृगासो अविक्षत । न्यू१र्मयो नदीनां न्य१दृष्टा अलिप्सत ॥ २ ॥
आयुर्ददं विपश्चितं श्रुतां कण्वस्य वीरुधम् । आभारिषं विश्वभेषजीमस्यादृष्टान्नि शमयत् ॥ ३ ॥

अर्थ— (आदित्यः विश्वदृष्टः) सर्वांस आदान करणारा, सर्व ज्यास सहज पाहूं शकतात आणि जो (अ-दृष्ट-हा सूर्यः) अदृष्ट दोषांचा नाश करणारा सूर्य (रक्षांसि निजूर्वन्) राक्षसांचा नाश करीत (पर्वतेभ्यः पुरः) पर्वतांच्या मागून (दिवः उत एति) द्युलोकांत वर येतो, म्हणजे उगवतो. [१]

(गावः गोष्ठे नि असदन्) गाई गोठ्यांत बसतात, (मृगासः नि अविक्षत) हरणें आपल्या स्वतःच्या स्थानीं जाऊन बसतात. (नदीनां ऊर्मयः नि) नद्यांच्या लाटा (प्रवाह) निघून गेले आणि जातां तर (अदृष्टाः नि अलिप्सत) अदृष्ट झाल्यामुळें त्यांना प्राप्त करण्याची इच्छा होते. [२]

(कण्वस्य आयुः ददं) रोग्यास जीव देणारी (विपश्चितं श्रुतां वीरुधं) बुद्धि वाढवणारी प्रसिद्ध औषधि (विश्वभेषजीं आ आभारिषं) सर्व रोगांच्या औषधि मीं मिळविल्या आहेत आणि (अस्य अदृष्टान् नि शमयत्) याच्या अदृष्ट दोषांस दूर करीत आहेत. [३]

सूर्यकिरण चिकित्सा

सूर्याचें महत्त्व

या सूक्तांतील पहिल्या मंत्रांत सूर्याचें महत्त्व वर्णन केलें आहे. ' सूर्य ' सर्व जलरसाचें आदान करतो, म्हणून त्यास ' आदित्य ' म्हणतात. (विश्व-दृष्टः) सर्व त्यास सहज पाहूं शकतात. डोळ्यांस तो प्रत्यक्ष दिसतो. तो सूर्य (अ-दृष्ट-हा) अदृष्ट दोषांचा नाश करतो. शरीरांत अथवा जगांत जी रोगबीजें, दोष, हानिकारक रोगमूळें असतील त्या सर्वांचा सूर्याचीं किरणें नाश करतात. (रक्षांसि- क्षरांसि निजूर्वन्) राक्षसांस म्हणजे क्षीण करणाऱ्या रोगजंतूंचा नाश करतो. असा सूर्य दररोज उगवतो. सूर्याचे हे गुण वैद्य चिकित्सा करणारांनीं ध्यानांत ठेवावेत.

दुसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं गाई दिवसा इतस्ततः फिरतात, चरतात आणि रात्रीं गव्हाणींत बेऊन रहातात. हरणें (जनावरें) सुद्धां त्याच प्रकारें विश्रांतिसाठीं स्वतःच्या स्थानीं परत येतात. नदीच्या उसळणाऱ्या लाटा कधीं वाऱ्यामुळें वेगानें उसळतात आणि मग प्रवाहाबरोबर अदृश्य होतात. म्हणजे थोडक्यांत असें कीं या जगांत कोणतीहि अवस्था स्थिर नाहीं. रोगसुद्धां त्याच कारणानें नाश पावणारे आहेत. रोग्यानें हें लक्षांत ठेवावें कीं या नश्वर जगांत रोगसुद्धां नष्ट होणारे आहेत, स्थिररूप नाहींत. म्हणून रोग दूर होतील आणि आरोग्य प्राप्त होईल असा मनाचा निश्चय करावा, खात्री ठेवावी तेंच योग्य होय.

रोग्याची अवस्था या सूक्तांत कण्व शब्दानें सांगितली आहे. शरीर पीडा करते तेव्हां रोगी विलक्षण अवाज करतो, त्याला कण्हणें असें म्हणतात. तो शब्द सुद्धां ' कण्व ' शब्दावरून बनला असावा. अशा अवस्थेंत रोगी जर सुप्रसिद्ध (विश्व-भेषजी) सर्व रोगांवरील औषधीचें सेवन करील तर तो निःसंशय रोगमुक्त होईल. या मंत्रांत जी सर्व रोगांचें शमन करणारी औषधि सांगितली आहे, ती पहिल्या मंत्रांत सांगितलेला सूर्य प्रकाश होय. सूर्याची किरणेंरूपी वेली आमच्याजवळ येतात. या सूर्यप्रकाशांत एवढें सामर्थ्य आहे कीं जे दिसतात आणि जे दिसत नाहींत, त्या सर्व रोगबीजांचा नाश तो करतो. जेथें सूर्याचा प्रकाश असतो, तेथें कोणतींहि रोगबीजें राहूंच शकत नाहींत. एवढी शक्ति सूर्यकिरणांत असते. हा वैज्ञानिक विचार करून मनुष्यानें आपली रहाणी योग्यप्रकारची ठेवावी, सूर्यापासून आरोग्य प्राप्त करावें. म्हणजे उघड्या शरीरानें सूर्यप्रकाशांत हिंडल्या फिरल्यानें शरीरावरील रोग कृमी दूर होतील. घरांत सूर्यप्रकाश येण्यानें घरांतील रोग दूर होतील. नगरांत-शहरांत सूर्यप्रकाश खेळता राहील, गल्लीआळींतून तो पोहोंचू शकेल अशी नगरांची बांधणी असावी. म्हणजे सर्व शहर आरोग्य परिपूर्ण होईल. अशाच प्रकारें मनुष्यानेंसुद्धां सूर्यप्रकाशापासून आरोग्य प्राप्त करावें. सूर्याचीं किरणें ज्यांच्यावर पडतात अशा वनस्पति खाण्यानें सुद्धां फायदा होतो. सूर्य प्रकाशांत हिंडण्या फिरणाऱ्या गाईंचें दूध प्याल्यानें लाभ होतो. या प्रकारें योजनापूर्वक सूर्याच्या किरणांनीं (प्रकाश) चिकित्सा कशी साधावी हा विषय सर्वांनीं जाणून घेणें जरूरीचें आहे.

सूर्यकिरण चिकित्सा

कांड ७, सूक्त १०७

(ऋषिः - भृगुः । देवता - सूर्यः आपः च ।)

अव॑ दि॒वस्ता॑रयन्ति स॒प्त सूर्य॑स्य र॒श्मय॑ः । आप॑ः समु॒द्रिया॒ धारा॒स्तास्ते॑ श॒ल्यम॑सिस्रसन् ॥ १ ॥

अर्थ— (सूर्यस्य सप्त रश्मयः) सूर्याचीं सात किरणें (समुद्रियाः आपः धाराः) समुद्राच्या पाण्याच्या धारा, (दिवः अवतारयन्ति) द्युलोकांतून खालीं येतात, (ताः ते शल्यं असिस्रसन्) त्या जलधारा तुझ्या त्रासास (दुःखास) दूर करोत. [१]

सूर्य स्वतःच्या किरणांनीं पृथ्वीवरील पाण्याची वाफ करून वर आकाशांत नेतो आणि त्याचे मेघ होतात. नंतर त्याच्याच किरणांनीं या मेघांतून वृष्टि होते आणि भूमीवर जलप्रवाह वाहूं लागतात. हें जलचक्र अशा प्रकारें चालूं आहे.

मणिबन्धन

कांड १०, सूक्त ६

(ऋषिः - बृहस्पतिः । देवता – फालमणिः, वनस्पतिः आपः ।)

अरातीयोर्भ्रातृव्यस्य दुर्हार्दो द्विषतः शिरः । अपि वृश्चाम्योजसा ॥ १ ॥
वर्म मह्यमयं मणिः फालाज्जातः करिष्यति । पूर्णो मन्थेन मागमद्रसेन सह वर्चसा ॥ २ ॥
यत्त्वा शिक्वः परावधीत्तक्षा हस्तेन वास्या ।
आपस्त्वा तस्माज्जीवलाः पुनन्तु शुचयः शुचिम् ॥ ३ ॥
हिरण्यस्रगयं मणिः श्रद्धां यज्ञं महो दधत् । गृहे वसतु नोऽतिथिः ॥ ४ ॥
तस्मै घृतं सुरां मध्वन्नमन्नं क्षदामहे ।
स नः पितेव पुत्रेभ्यः श्रेयःश्रेयश्चिकित्सतु भूयोभूयः श्वःश्वो देवेभ्यो मणिरेत्य ॥ ५ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्मणिं फालं घृतश्चुतमुग्रं खदिरमोजसे ।
तमग्निः प्रत्यमुञ्चत सो अस्मै दुह आज्यं भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ ६ ॥

अर्थ— (अरातीयोः भ्रातृव्यस्य) शत्रु वैर बाळगणारा (दुर्हार्दः द्विषतः शिरः) दुष्ट हृदयाचा आणि द्वेष करणाऱ्याचें मस्तक (ओजसा अपि वृश्चामि) वेगानें मी तोडतो. [१]

(फालात् जातः अयं मणिः) फळापासून तयार केलेला हा मणि (मह्यं वर्म करिष्यति) माझें कवचा-प्रमाणें रक्षण करो. (मन्थेन रसेन वर्चसा सहपूर्णः) मन्थनसामर्थ्य, रस आणि वर्चस् युक्त असल्यामुळें पूर्ण शक्ति-शाली हा मणि (मा अगमत्) माझ्याजवळ आला आहे. [२]

(यत् त्वा शिक्वः तक्षा) जो तुला कुशल तरवार (वास्या हस्तेन परा अवधीत्) शस्त्रयुक्त हातानें मारतो (तस्मात्) त्यामुळें (जीवलाः शुचयः आपः) जीवन देणारें शुद्ध पाणी (शुचिं त्वा पुनन्तु) तुला पवित्र वीराला पवित्र करो. [३]

(अयं मणिः) हा मणि (हिरण्यस्रक्) सोन्याची माळा (श्रद्धां यज्ञः महः दधत्) श्रद्धा, भक्ति, यश आणि महत्त्व धारण करून तो (नः गृहे अतिथिः वसतु) आमच्या घरांत पूजनीय होऊन राहो. [४]

(तस्मै घृतं सुरां मधु अन्नं क्षदामहे) त्याच्यासाठीं तूप, वृष्टि (पाऊस) पाणी, मध आणि अन्न आम्हीं देतों. (सः नः पुत्रेभ्यः पिता इव) पिता पुत्रास देतो, तद्वत् (श्रेयः श्रेयः चिकित्सतु) तो मणि आम्हास परम कल्याण देवो, हा (मणिः देवेभ्यः एत्य) मणि देवांजवळून येथें येऊन (भूयोभूयः श्वः श्वः) वारंवार आणि दररोज आम्हांस सुख देवो. [५]

(फालं घृतश्चुतं खदिरं उग्रं मणिं) फालापासून उत्पन्न झालेला, तुपानें परिपूर्ण, खदीरापासून तयार केलेला आणि वीरत्व वाढविणारा हा मणि आहे. (यं ओजसे बृहस्पतिः अबध्नात्) ज्याला शक्ति वृद्धिंगत करण्यासाठीं बृहस्पतीनें (मण्याला) बांधलें होतें (तं अग्निः प्रति अमुञ्चत) तो (शक्ति) अग्नि मला देवो. (सः अस्मै भूयोभूयः श्वः-श्वः आज्यं दुहे) तो याच्यासाठीं दररोज तूप देवो. (तेन त्वं द्विषतो जहि) त्याच्या सहाय्यानें तूं शत्रूंना मार म्हणजे त्यांचा विध्वंस-नाश कर. [६]

यमबध्नाद्बृहस्पतिर्मणिं फालं घृतश्चुतमुग्रं खदिरमोजसे ।
तमिन्द्रः प्रत्यमुञ्चतौजसे वीर्याय कम् ।
सो अस्मै बलमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ ७ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्मणिं फालं घृतश्चुतमुग्रं खदिरमोजसे
तं सोमः प्रत्यमुञ्चत महे श्रोत्राय चक्षसे ।
सो अस्मै वर्च इद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ ८ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्मणिं फालं घृतश्चुतमुग्रं खदिरमोजसे ।
तं सूर्यः प्रत्यमुञ्चत तेनेमा अजयद्दिशः ।
सो अस्मै भूतिमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ ९ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्मणिं फालं घृतश्चुतमुग्रं खदिरमोजसे ।
तं बिभ्रच्चन्द्रमा मणिमसुराणां पुरोऽजयद्दानवानां हिरण्ययीः ।
सो अस्मै श्रियमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १० ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे ।
सो अस्मै वाजिनं दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ ११ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तेनेमां मणिना कृषिमश्विनावभि रक्षतः ।
स भिषग्भ्यां महो दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १२ ॥

अर्थ-(यं०) ज्याच्यावर बृहस्पतीनें हा मणि बांधला (तं इन्द्रः प्रति अमुञ्चत) त्याला इन्द्र मला देवो, आणि (ओजसे वीर्याय कं) ओज, वीर्य आणि सुख प्राप्त करवो. (सः अस्मै बलं इत् दुहे०) तो त्याला बल देवो. [७]

(यं०) ज्याच्यावर...... (तं सोमः प्रति अमुञ्चत) तो सोम मला देवो (महे श्रोत्राय चक्षसे) महत्व, श्रोत्र आणि दृष्टि, (वर्चः दुहे०) ऐश्वर्य तो त्याला देवो. [८]

(यं०) ज्याच्यावर.. ... (तं सूर्यः प्रति अमुञ्चत) त्यास सूर्य मला देवो. (तेन इमा दिशः अजयत्) आणि त्याच्या सहाय्यानें हा सर्व दिशा जिंको (सः अस्मै भूतिं दुहे०) तो याच्यासाठीं ऐश्वर्य देवो. [९]

(यं० ... तं मणिं बिभ्रत् चन्द्रमाः) त्या मण्यास धारण करणारा चंद्र (असुराणां दानवानां हिरण्ययीः पुरः अजयत्) असुर आणि राक्षसांच्या सुवर्णयुक्त नगरींना पराजित करतो. (सः अस्मै श्रियं दुहे०) तो याच्यासाठीं श्री देतो. [१०]

(यं०) ज्याला बृहस्पति मणि बांधतो आणि (आशव वाताय) गतिमय वायूच्या शक्तिनें युक्त करतो. (सः अस्मै वाजिनं दुहे०) तो याच्यासाठीं घोडा देतो. [११]

(यं०) ज्याला बृहस्पति मणि बांधतो (तेन मणिना) त्या मण्यानें (अश्विनौ इमां कृषिं अभिरक्षतः) अश्विनौ देव त्याच्या शेतीचें रक्षण करतात. (सः भिषग्भ्यां महः दुहे) तो त्या वैद्यांपासून मोठें अन्न अथवा तेज प्राप्त करतो. [१२]

*

यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तं बिभ्रत्सविता मणिं तेनेदमजयत्स्वः ।
सो अस्मै सूनृतां दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १३ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तमापो बिभ्रतीर्मणिं सदा धावन्त्यक्षिताः ।
स आभ्योऽमृतमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १४ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तं राजा वरुणो मणिं प्रत्यमुञ्चत शंभुवम् ।
सो अस्मै सत्यमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १५ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तं देवा बिभ्रतो मणिं सर्वांल्लोकान्युधाजयन् ।
स एभ्यो जितिमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ १६ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्वाताय मणिमाशवे । तमिमं देवता मणिं प्रत्यमुञ्चन्त शंभुवम् ।
स आभ्यो विश्वमिद् दुहे भूयोभूयः श्वःश्वस्तेन त्वं द्विषतो जहि । ॥ १७ ॥
ऋतवस्तमबध्नतार्तवास्तमबध्नत । संवत्सरस्तं बद्ध्वा सर्वं भूतं वि रक्षति ॥ १८ ॥
अन्तर्देशा अबध्नत प्रदिशस्तमबध्नत । प्रजापतिसृष्टो मणिर्द्विषतो मेऽधराँ अकः ॥ १९ ॥
अथर्वाणो अबध्नताथर्वणा अबध्नत ।
तैर्मेदिनो अङ्गिरसो दस्यूनां बिभिदुः पुरस्तेन त्वं द्विषतो जहि ॥ २० ॥

अर्थ— (यं०)...(तं मणिं सविता बिभ्रत्) त्या मण्याला सवित्याने धारण केला (तेन इदं स्वः अजयत्) त्याने हें स्वर्गीय सुख प्राप्त करण्याचा विजय मिळविला (सः अस्मै सूनृतां दुहे०) तो याच्यासाठीं (याला) सत्य देतो. [१३]

(यं०)...(तं मणिं अपः बिभ्रतीः) त्या मण्याला पाणी धारण करतें (सदाः अक्षिताः धावन्ति) अक्षय होऊन तो नित्य धावतो. (सः आभ्यः अमृतं दुहे) तो यांना अमृत देतो. [१४]

(यं०)...(तं शंभुवं मणिं राजा वरुणः प्रत्यमुञ्चत) त्या सुखदायक मण्याला राजा वरुण सोडतो, (सः अस्मै सत्यं दुहे) तो याला सत्य देतो. [१५]

(यं०)(तं मणिं देवाः बिभ्रतः) त्या मण्याला देवांनी धारण केला, आणि (युधा सर्वान् लोकान् अजयन्) युद्ध करून सर्व लोकांस जिंकलें. (स एभ्यः जितिं इत् दुहे) तो आम्हांस विजय देतो. [१६]

(यं०)...(तं शंभुवं इमं मणिं देवताः प्रत्यमुञ्चन्त) त्या सुखदायक मण्याचा देवतांनीं त्याग केला, (सः आभ्यः विश्वं इद् दुहे) तो याच्यासाठीं सर्व सुख देतो. [१७]

(ऋतवः तं अबध्नत) ऋतु त्यांस बांधत असत, (आर्तवाः तं अबध्नत) ऋतूपासून उत्पन्न पदार्थ त्याला बांधतात. (संवत्सरः तं बध्वा) संवत्सर त्याला बांधून (सर्वं भूतं विरक्षति) सर्व भूतमात्राचें रक्षण करतो. [१८]

(अंतर्देशाः तं अबध्नत) अंतर्दिशांनीं त्याला बांधलें (प्रदिशः तं अबध्नत) दिशांनीं त्यास बांधलें, हा (प्रजापति-सृष्टः मणिः) प्रजापतीनें निर्माण केलेला मणि (मे द्विषतः अधरान् अकः) माझ्या शत्रूंना खालीं पाडतो. [१९]

(अथर्वाणो अबध्नत) अथर्वानें तो मणि बांधला होता. (आथर्वणा आबध्नत) आथर्वणिकांनीं तो बांधला होता, (तैः मेदिनः अंगिरसः) त्यामुळें बलवान् झालेले अंगिरस (दस्यूनां पुरः बिभिदुः) शत्रूंचीं शहरें तोडूं शकले. (तेन त्वं द्विषतः जहि) तूंसुद्धां त्याच्या सहाय्यानें आपल्या शत्रूंना पराजित कर. [२०]

तं धाता प्रत्यमुञ्चत स भूतं व्यकल्पयत् । तेन त्वं द्विषतो जहि ॥ २१ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् । स मायं मणिरागमद्रसेन सह वर्चसा ॥ २२ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् ।
स मायं मणिरागमत्सह गोभिरजाविभिरन्नेन प्रजया सह ॥ २३ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् ।
स मायं मणिरागमत्सह व्रीहियवाभ्यां महसा भूत्या सह ॥ २४ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् ।
स मायं मणिरागमन्मधोर्घृतस्य धारया कीलालेन मणिः सह ॥ २५ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् ।
स मायं मणिरागमदूर्जया पयसा सह द्रविणेन श्रिया सह ॥ २६ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् ।
स मायं मणिरागमत्तेजसा त्विष्या सह यशसा कीर्त्या सह ॥ २७ ॥
यमबध्नाद्बृहस्पतिर्देवेभ्यो असुरक्षितिम् । स मायं मणिरागमत्सर्वाभिर्भूतिभिः सह ॥ २८ ॥
तमिमं देवता मणिं मह्यं ददतु पुष्टये । अभिभुं क्षत्रवर्धनं सपत्नदम्भनं मणिम् ॥ २९ ॥
ब्रह्मणा तेजसा सह प्रति मुञ्चामि मे शिवम् ।
असपत्नः सपत्नहा सपत्नान्मेऽधराँ अकः ॥ ३० ॥

अर्थ — (तं धाता प्रत्यमुञ्चत) धात्यानें त्याला धारण केलें होतें (सः भूतं व्यकल्पयत्) तो सर्व भूतांस निर्माण करण्यास शक्तिमान् ठरला. (तेन त्वं द्विषतः जहि) त्याच्या बळानें तूं शत्रूंना पराजित कर. [२१]

(यं)...(असुरक्षितिं) ज्याला असुर विनाशक (देवेभ्यः बृहस्पतिः अबध्नात्) देवांसाठीं बृहस्पतीनें बांधलें होतें (सः अयं मणिः मा) तो मणि मजजवळ (रसेन वर्चसा सह आगमत्) रस आणि तेजासह आला आहे. [२२]

(यं०)...तो (गोभिः अजाभिः अन्नेन प्रजयासह) गाई, शेळ्या मेंढ्या आणि प्रजेसह- [२३]

(यं०)...(व्रीहियवाभ्यां महसा भूत्या सह) तांदूळ, जव आणि ऐश्वर्यासह- [२४]

(मधोः घृतस्य धारया कीलालेन सह) तूप, मध आणि पय (पाण्याच्या) धारांसह- [२५]

(पयसा द्रविणेन श्रिया सह) दूध, धन आणि श्री (लक्ष्मी) सह- [२६]

(तेजसा त्विष्या यशसा कीर्त्या सह) तेज, चकचकाट, यश आणि कीर्तिसह- [२७]

(सर्वाभिः भूतिभिः सह...) सर्व ऐश्वर्यासह हा मणि (मा आगमत्) मजजवळ आला आहे. [२८]

(तं इमं मणिं) अशा त्या मण्याला (देवता पुष्टये मह्यं ददतु) देवता पुष्टिसाठीं मला देवोत. हा (अभिभुं क्षत्रवर्धनं सपत्नदम्भनं मणिं) शत्रूनाशक क्षात्रतेज वाढविणारा हा मणि आहे. [२९]

(ब्रह्मणा तेजसा सह) ज्ञान आणि तेजासह (मे शिवं प्रतिमुञ्चामि) मीं या कल्याणकारक मण्याला धारण करतों. हा मणि (असपत्नः सपत्नहा) शत्रुरहित आणि शत्रूघातक आहे तसेंच (मे सपत्नान् अधरान् अकः) त्यानें माझ्या शत्रूंस खालीं पाडलें आहे. [३०]

उत्त॑रं द्विष॒तो माम॒यं म॒णिः कृ॑णोतु दे॒व॒जाः । यस्य॑ लो॒का इ॒मे त्रय॒: पयो॑ दु॒ग्धमु॒पास॑ते ।
स मा॒यमधि॑ रोहतु म॒णिः श्रैष्ठ्या॑य मू॒र्धतः ॥ ३१ ॥
यं दे॒वाः पि॒तरो॑ मनु॒ष्या॑ उप॒जीव॑न्ति सर्व॒दा। स मा॒यमधि॑ रोहतु म॒णिः श्रैष्ठ्या॑य मू॒र्धतः ॥ ३२ ॥
यथा॒ बीज॑मु॒र्वरा॑यां कृ॒ष्टे फाले॑न॒ रोह॑ति । ए॒वा मयि॑ प्र॒जा प॒शवोऽन्न॑मन्नं॒ वि रो॑हतु ॥ ३३ ॥
यस्मै॑ त्वा यज्ञवर्धन॒ मणे॑ प्र॒त्यमु॑ञ्च शि॒वम् । तं त्वं श॑तदक्षिण॒ म॒णे श्रैष्ठ्या॑य जिन्वतात् ॥ ३४ ॥
ए॒तमि॒ध्मं स॒माहि॑तं जु॒षा॒णो अग्ने॒ प्रति॑ हर्य॒ होम॑ैः ।
तस्मि॑न्विदेम सु॒म॒तिं स्व॒स्ति प्र॒जां चक्षुः॑ प॒शून्त्समि॑द्धे जा॒तवे॑दसि ब्रह्म॑णा ॥ ३५ ॥

अर्थ— (अयं देवजाः मणिः) हा देवांपासून उत्पन्न झालेला मणि (मां द्विषतः उत्तरं कृणोतु) मला शत्रूपेक्षां चांगल्या अवस्थेंत ठेवो. (यस्य दुग्धं) म्हणजे दोहन केलेलें सार (इमे त्रयः लोकाः उपासते) हे तीनहि लोक प्राप्त करतात. [३१]

(देवाः पितरः मनुष्याः यं सर्वदा उप जीवन्ति) देव, पितर आणि मनुष्यें ज्याच्यामुळें नेहमीं निर्भर रहातात, असा तो मणि (श्रेष्ठयाय०) मला श्रेष्ठ स्थानावर चढवो. [३२]

(फालेन कृष्टे उर्वरायां) नांगराच्या फाळानें नांगरलेल्या जमिनींत (यथा बीजं रोहति) ज्याप्रमाणें बीज उगवतें (एव मयि प्रजाः पशवः अन्नं विरोहतु) तसेंच मजजवळ संतान, पशु पुष्कळ होवोत. [३३]

हे (यज्ञवर्धन मणे) यज्ञ संस्था वृद्धिंगत करणाऱ्या मण्या ! (त्वा शिवं यस्मै प्रति अमुचं) तूं शुभ मणि मी ज्याला धारण करवीन, हे (शतदक्षिण मणे) शंभर प्रकारची दक्षिणा देणाऱ्या मण्या ! (तं त्वं श्रेष्ठयाय जिन्वतात्) त्याला तूं श्रेष्ठत्वासाठीं वाढव. [३४]

हे (अग्ने) अग्ने ! (समाहितं इध्मं जुषाणः) प्रदीप्त इंधन सेवन करीत तूं (होमैः प्रतिहर्य) होम हवनानें समृद्ध हो. (तस्मिन् समिद्धे जातवेदसि) त्या प्रदीप्त अग्नीनें (ब्रह्मणा) ज्ञानानें (सुमतिं स्वस्ति प्रजां) उत्तम बुद्धि, कल्याण, संतान (चक्षुः पशून्) दृष्टि आणि पशूंना (विदेम) आम्हीं प्राप्त करूं. [३५]

या सूक्तांत विशेष प्रकारच्या मण्यास धारण करण्याचें महत्त्व दाखविलें आहे.

जंगिड-मणि

कांड २, सूक्त ४

(ऋषिः - अथर्वा । देवता - चन्द्रमाः, जङ्गिडः ।)

दी॒र्घा॒यु॒त्वाय॑ बृह॒ते रणा॒याऽरि॑ष्यन्तो॒ दक्ष॑माणाः॒ सदै॒व ।
म॒णिं वि॑ष्कन्धदू॒षणं॑ जङ्गि॒डं बि॑भृमो व॒यम् ॥ १ ॥

अर्थ— (दीर्घायुत्वाय) दीर्घायुष्य प्राप्तिसाठीं तसेंच (बृहते रणाय) मोठ्या आनंदासाठीं (विष्कन्ध-दूषणं) शोषक रोगास दूर करणारा जंगिड मणि (अ-रिष्यन्तः दक्षमाणाः वयं) पळवून लावणारे परंतु शक्ति वाढविणारे आम्हीं सर्व (बिभृमः) धारण करतों. [१]

भावार्थ— दीर्घायुष्य प्राप्तिसाठीं आणि आरोग्यासाठीं मोठा आनंद प्राप्त करून देणारा जंगिड मणि आम्हीं शरीरावर धारण करतों. त्यामुळें आमची अशक्तता दूर होईल, आमची शक्ति वाढेल, कारण कीं हा मणि शुष्मता म्हणजे शोषक रोगास दूर करतो. [१]

जङ्गिडो जम्भाद्विशराद्विष्कंन्धादभिशोचनात् । मणिः सहस्रवीर्यः परि णः पातु विश्वतः ॥ २ ॥
अयं विष्कंन्धं सहतेऽयं बाधते अत्त्रिणः । अयं नो विश्वभेषजो जङ्गिडः पात्वंहसः ॥ ३ ॥
देवैर्दत्तेन मणिना जङ्गिडेन मयोभुवा । विष्कंन्धं सर्वा रक्षांसि व्यायामे सहामहे ॥ ४ ॥
शणश्च मा जङ्गिडश्च विष्कंन्धादभि रक्षताम् । अरण्यादन्य आभृतः कृष्या अन्यो रसेभ्यः ॥ ५ ॥
कृत्यादूषिरयं मणिरथो अरातिदूषिः । अथो सहस्वान् जङ्गिडः प्र ण आयूंषि तारिषत् ॥ ६ ॥

भावार्थ— हा (सहस्रवीर्यः) हजारों शक्तींनीं युक्त (जङ्गिडः मणिः) जंगिड मणि (जम्भारात्) जांभया वाढविणाऱ्या रोगापासून, (वि-शरात्) शरीर क्षीण करणाऱ्या रोगापासून (वि-स्कन्धात्) शरीरास शुष्क करणाऱ्या शोषक रोगापासून, (अभिशोचनात्) रडण्यास प्रवृत्त करणाऱ्या रोगापासून (विश्वतः) सर्वप्रकारें (नः परिपातु) आम्हां सर्वांचें रक्षण करो. [२]

(अयं) हा जंगिड मणि (वि-स्कन्धं सहते) शोषक रोगापासून वांचवितो. (अयं) हा मणि (अत्रिणः बाधते) भक्षक-भस्मकरोगापासून वाचवतो. (अयं जंगिडः) हा जंगिड मणि (विश्वः भेषजः) सर्व औषधींचा रस आहे. (नः अंहसः पातु) तो आम्हांस पापांपासून वांचवो. [३]

(देवैः दत्तेन) दिव्य मनुष्यांकडून दिला गेलेला (मयोभुवा) सुखदायक (जंगिडेन मणिना) जंगिड मण्यानें (विष्कन्धं) शोषक रोगाला आणि (सर्वा रक्षांसि) सर्व रोगजंतूंना (व्यायामे) संघर्षांत (सहामहे) आम्ही दाबून टाकतों. [४]

(शणः च) सण (ताग) आणि (जङ्गिडः च) जंगिड हे दोघे (विष्कंधात्) शोषक रोगापासून (मा अभि-रक्षताम्) माझें रक्षण करोत. त्यांच्यापैकीं (अन्यः) एक (अरण्यात् आभृतः) अरण्यांतून आणलेला आहे आणि (अन्यः) दुसरा (कृष्याः रसेभ्यः) शेतीनें उत्पन्न झालेल्या रसापासून तयार केलेला आहे. [५]

(अयं मणिः) हा मणि (कृत्या-दूषिः) हिंसेपासून वाचविणारा (अथो) आणि (अ-राति-दूषिः) शत्रूंस दूर करणारा आहे. (अथो) असा (सहस्वान् जंगिडः) बलवान् जंगिड मणि (नः आयूंषि तारिषत्) आमचें आयुष्य वाढवो. [६]

भावार्थ— हा मणि साधारणपणें हजारों प्रकारच्या सामर्थ्यानें युक्त आहे, परंतु विशेषतः जांभया आणणाऱ्या, अशक्तता निर्माण करणाऱ्या, शरीरास सुकविणाऱ्या, कारणावांचून डोळ्यांतून अश्रु आणणाऱ्या रोगांपासून हा मणि वांचवतो. [२]

हा मणि शोषक रोगास दूर करतो आणि ज्यांत पुष्कळ अन्न खाल्लें जातें परंतु शरीर कृश रहातें अशा प्रकारच्या भस्मरोगापासून वाचवतो. या मण्यांत अनेक औषधि गुण आहेत, म्हणून तो आम्हांस पाप प्रवृत्तिपासूनसुद्धां सुरक्षित ठेवतो. [३]

महान् पुरुषांपासून प्राप्त झालेला आणि सुख देणारा हा जंगिड मणि शोषक रोग आणि रोग बीजरूपी जंतूंपासून आमचें रक्षण करो. [४]

ताग आणि हा जंगिड मणि दोन्हीं शोषक रोगापासून आमचें रक्षण करोत. त्यांतील एक अरण्यांतून प्राप्त होतो, आणि दुसरा शेतीमुळें उत्पन्न झालेल्या औषधि रसांतून तयार करण्यांत येतो. [५]

हा मणि नाशापासून वाचवितो, आणि आरोग्याच्या शत्रुरूपी रोगास दूर ठेवतो. हा प्रभावशाली मणि आमचें आयुष्य वाढवो. [६]

जंगिड मणि

ताग आणि जंगिड मणि

या सूक्तांत ' सण ' (ताग) आणि जंगिड मणि या दोन वस्तूंचा उल्लेख आहे. (मं. ५) शण अथवा सण किंवा ताग हा प्रसिद्ध पदार्थ आहे. सणाविषयीं राजवल्लभ नांवाच्या वैद्यक ग्रंथांत असें वचन आहे—

१ तत्पुष्पं रक्तपित्ते हितं मलरोधकं च ।
बीजं शोणितशुद्धिकरम् ॥ (राज. व. ३।५)

२ अम्लः कषायो मलगर्भास्रपातनः वान्तिकृत्
वातकफघ्नश्च ॥ राजनिघंटु व. ४)

(१) तागाचें फूल रक्तपित्त रोगांत हितकारक आहे. मलरोधक आहे. तसेंच बीज रक्तशुद्धि करणारें आहे. (२) सणा (तागा) चे हे गुण आहेत– आंबट कषाय रुचीनें युक्त, मल-गर्भ-रक्त यांचा स्राव करावणारा, उलटी करवणारा तसेंच वात-रोग आणि कफरोगास दूर करणारा आहे.'

वैद्यांनीं याविषयीं जास्त विचार करावा. हा ताग (कृष्याः रसेभ्यः आभृतः) शेतीनें उत्पन्न होणाऱ्या रसांनीं तयार केलेला असतो. (मं. ५) हें वर्णन सण किंवा ताग काय पदार्थ असावा हें ठरविण्यास उपयुक्त आहे. सणाचें जें कापड मिळतें त्याचा धागा अथवा तंतू येथें सांगितला आहे. दोरीधागा किंवा कापड असेल. आम्हांस तर येथें तागाच्या धाग्याचा उल्लेख आहे असें वाटतें. तो निरनिराळ्या औषधींच्या रसांत (रसेभ्यः ॥मं. ५) भिजवून तयार करण्यांत येतो. या सणाचें नांव ' त्वक्सार ' आहे, त्याचा अर्थ होतो (त्वक्+सार) त्वचेंत ज्याचें सत्व रहातें. म्हणून त्याच्या त्वचेचा धागा तयार करून तो विविध औषधि रसांत भिजवून हातावर, कमरेवर अथवा गळ्यांत ती दोरी बांधण्यांत येत असेल. व्यायाम करतांना जेव्हां घाम येतो तेव्हां त्या घामानें तागाच्या धाग्यास लावलेला औषधिरस शरीरास लागतो आणि शरीरावर त्याचा इष्ट परिणाम होतो.

हे सणाचे धागे तयार करतांना त्यांवर कोणत्या औषधि-रसांचा कशाप्रकारें लेप करतात, ते कसे तयार करण्यांत येतात एतद्विषयीं चांगल्या जाणत्या वैद्यांनीं विचार करावा, हें योग्य ठरेल. कारण कीं त्याविषयीं सूक्तांत कांहीं सांगितलेलें नाहीं.

शणः च मा जंगिडश्च अभिरक्षताम् । (मं. ५)

' सण आणि जंगिड मणि माझें रक्षण करो. ' असें पांचव्या मंत्रांत म्हटलें आहे. या सांगण्यावरून स्पष्ट होतें कीं सणाच्या धाग्यांत जंगिड मणि ओंवून गळ्यांत अथवा शरीरावर बांधत असतील, असा अभिप्राय या सूक्तांत स्पष्ट आहे. वर सांगितल्या-प्रमाणें औषधिरसांनीं तयार केलेला सणाचा धागासुद्धां स्वतः गुणकारी आहे तसेंच तागाचा धागा आणि जंगिड मणि दोघे एकत्र झाले तर दोघांचा विशेष लाभ होण्याचा संभव आहे. जोपर्यंत या दिशेनें विशेष संशोधन झालें नाहीं तोपर्यंत आपण असें समजूं कीं सणाच्या दोऱ्यांत जंगिड मणि शरीरावर बांधल्यानें मंत्रांत सांगितलेले फायदे होतात.

जंगिड मण्यानें होणारे लाभ

१ दीर्घायुत्वं– दीर्घायुष्य प्राप्त होतें. (मं. १)
आयूंषि तारिषत्– आयुष्य वाढतें. (मं. ६)

२ महत् रणं (रमणीयं)– मोठा आनंद, मोठा उत्साह रहातो, जो आनंद आरोग्यामुळें प्राप्त होतो तो हा मणि धारण करण्यानें प्राप्त होतो.

३ अरिष्यन्त– अपमृत्यूपासून वांचवितो. अथवा रोगामुळें नाश होऊं देत नाहीं. (मं. १)

४ दक्षमाणः– (दक्षं) शक्ति वाढवितो, बलवान् सामर्थ्यशाली होणें. (मं. १)

५ विष्कंधदूषणः– शोषक रोग दूर करतो. ज्या रोगांत मनुष्य रोज कृश होत जातो त्या रोगाची निवृत्ति याच्या-मुळें होते. (मं. १)

६ सहस्रवीर्यः– या मण्यांत हजारों प्रकारचें सामर्थ्य आहे. (मं. २)

७ विश्व-भेषजः– त्यांत सर्व औषधि (म्हणजे त्याचे गुण) आहेत. (मं. ३)

८ मयोभूः– सुख देतो. (मं. ४)

९ कृत्यादूषिः– स्वतःचा नाश अथवा हिंसा होण्यापासून वांचविणारा हा मणि आहे. (मं. ६)

१० अराति-दूषिः– आरोग्याचे शत्रु असे जे रोग आहेत त्यांना दूर करणारा आहे. (मं. ६)

११ सहस्वान्– बलवान् म्हणजे शरीराचें बल वाढविणारा आहे. (मं. ६)

या जंगिड मण्यानें खालीं दिलेले रोग दूर करण्याचा उल्लेख या सूक्तांत आहे. त्या विषयीं येथें पाहूं–

१२ जम्भारान् पातु– जांभया ज्यामुळें वाढतात असा शरीराचा दोष या मण्यानें दूर होतो. (मं. २)

१३ **वि-शरात् पातु**- ज्या रोगांत शरीर विशेष क्षीण होतें त्या रोगापासून हा मणि वांचवितो.

१४ **वि-स्कंधात् पातु**- ज्या रोगांत शरीर वाळून जातें त्या रोगापासून हा मणि वांचवितो. (मं. २)

१५ **अभिशोचनात्**- ज्यामुळें रडण्याची प्रवृत्ति होते अशा आजारापासून रक्षण करतो. (मं. २)

१६ **अत्त्रिणः बाधते- (अद्-त्रिन्)** पुष्कळ अन्न खाण्याची आवश्यकता ज्या रोगांत होते (भस्मरोग) पण पुष्कळ खाण्यानें शरीर मात्र क्षीण होत जातें असा भस्मरोग या मण्यानें दूर होतो. (मं. ३)

१७ **अंहसः पातु**- पापवृत्तीपासून वांचवितो अथवा हीन भावना इच्छा मनांतून दूर करतो. (मं. १)

१८ **रक्षांसि सहामहे**- रोगबीजें तसेंच रोग निर्माण करणारे जंतू यांना (**रक्षस्**) अथवा (**क्षरः**) म्हणतात. कारण की त्यांच्यामुळें शरीरास पोषक असणाऱ्या सात धातूंचें (**क्षरण**) नाश होत रहातो. अशा रोगबीजें आणि रोगजंतूंचा या मण्यानें नाश होतो. (मं. ४)

हे सर्व गुण जंगिड मण्यांत आहेत. येथें ' **रक्षस्** ' शब्दाविषयीं थोडें सांगण्यासारखें आहे. [वाचकांनीं कृपाकरून स्वाध्यायमंडळानें प्रकाशित केलेलें 'वेदामध्यें रोगजंतुशास्त्र' नांवाचें पुस्तक पहावें. या पुस्तकांत, राक्षस म्हणजे अत्यंत सूक्ष्म कृमी असतात हें स्पष्ट दाखविलें आहे. ते कातडीवर चिकटतात तरी सुद्धां नुसत्या डोळ्यांनीं दिसत नाहींत. ते रात्रीचे वेळीं प्रबळ होतात. हें वर्णन वाचल्यानें वाचकाची खात्री होईल की रोगबीजें अथवा रोगजंतूंचें नांव राक्षस आहे, त्यांना रक्षस् म्हणतात] **क्षर्** (क्षीण-अशक्त होणें) या धातूवरून अक्षरें उलट होऊन रक्षस् शब्द तयार होतो. पसरणाऱ्या रोगांचा आणि रोगजंतूंचा हा जंगिड मणि नाश करतो, असा भाव येथें आहे. म्हणजे तो मणि (Highly disinfectant) उत्तमप्रकारें स्पर्शजन्य रोगांच्या जंतूंचे दोष दूर करणारा आहे ही गोष्ट या विवरणावरून वाचकांच्या ध्यानीं येईल.

हा जंगिड मणि कोणत्या वनस्पतीपासून बनविण्यांत येतो तें समजून घेण्याविषयीं आम्हीं पुष्कळ प्रयत्न केला पण जाणण्यास मिळालें नाहीं. तरीसुद्धां जे गुण वरील मंत्रांत सांगितले आहेत त्यांतील पुष्कळसे ' **वचा** ' वनस्पतीच्या गुणधर्मांशीं मिळणारे आहेत. त्यामुळें आम्हांस वाटतें की हा मणि वचा वनस्पतीचा असणें संभवनीय आहे. वचा वनस्पतीचे गुण पहा—

१ **वचागुणाः- तीक्ष्णा कटुः उष्णा कफामग्रंथि शोथघ्नी वातज्वरातिसारघ्नी वान्तिकृत् उन्मादभूतघ्नी च ॥** (राजनिघंटु व. ५)

२ **वचायुष्या वातकफतृष्णाघ्नी स्मृतिवर्धिनी ।**

३ **वचापर्यायाः-' मङ्गल्या । विजया । रक्षोघ्नी । भद्रा । '**

१ **वचेचे गुण**-तीक्ष्ण, कटु, उष्णतेनें युक्त, कफ, आम, ग्रंथि आणि सूज यांचा नाश करणारी, वातज्वर, अतिसार यांचा नाश करणारी, उलटी करवणारी, उन्माद आणि भूतरोगाचा नाश करणारी ही वचा आहे. '

२ वचेनें आयुष्य वाढतें. ती वात-कफ-तहानेचा नाश करते, स्मरणशक्ति वाढवते.

३ **वचेच्या पर्याय शब्दांचा अर्थ**- (**मंगल्या**) मंगल म्हणजे कल्याण करणारी, (**विजया**) विजय प्राप्त करून देणारी (**रक्षोघ्नी**) राक्षसांचा (रोगबीजांचा आणि रोगजंतूंचा) नाश करणारी, पूर्वी सांगितलेल्या रोगकृमींचा नाश करणारी, (**भद्रा**) कल्याण करणारी. '

या वचेच्या वैद्यक ग्रंथांत सांगितलेल्या गुणांवरून हें स्पष्ट होतें की तिचे गुण जंगिड मण्याच्या गुणांशीं समान आहेत. वाचकांनीं पहिल्या मंत्रांत असलेल्या शब्दांशीं यांची तुलना करावी. म्हणजे त्यांच्या ध्यानीं येईल की दोन्हींचे गुणधर्म समान आहेत. त्यामुळें आम्हांस वाटतें की जंगिड मणि कदाचित् वचा वनस्पतीचा केलेला असावा. दोघांचें साहश्य पहा—

वैद्यकग्रंथांतील शब्द- (वचेचे गुण)	**या सूक्तांतील शब्द**- (जंगिड मण्याचे गुण)
१ **आयुष्या**	१ **दीर्घायुत्वाय** (मं. १) **आयूंषि तारिषत्** (मं. ६)
२ **रक्षोघ्नी । भूतघ्नी**	२ **रक्षांसि सहामहे** (मं. ४)
३ **वातघ्नी । उन्मादघ्नी**	३ **जम्भात् पातु** (मं. २) **अभिशोचनात् पातु** । (मं. २)
४ **मंगल्या, भद्रा, स्मृतिवर्धनी**	४ **अरिष्यन्तः** (मं. २) **दक्षमाणाः । सहस्रवीर्यः** (मं. ३)

५ विजया
६ अतिसारघ्नी
७ शोथघ्नी ज्वरघ्नी, कफघ्नी, ग्रंथिघ्नी

५ अरातिदूषिः (मं. ६)
६ विशरात् (वि-सारात्) पातु (मं. २)
७ विश्वभेषजः (मं. ३)

अशा प्रकारें वाचक पहातील तर त्यांचे ध्यानीं येईल की वचा वनस्पतीचे वैद्यक ग्रंथांत सांगितलेले गुणधर्म आणि सूक्तांत सांगितलेले जंगिड मण्याचे गुणधर्म बहुंशीं एकमेकांशीं मिळते-जुळते आहेत. त्यावरून अनुमान करतां येतें कीं कदाचित् हा जंगिड मणि वचा वनस्पतीचाच केलेला असावा. औषधींच्या गुणधर्मांतील साहश्यावरून औषधि प्रकरणांत औषधि दाखल करीत नाहींत आणि नव करण्यात, हें आम्हीं चांगल्याप्रकारें जाणतों. तरीसुद्धां एखादी औषधि मिळत नसली तर तिच्या बदल्यांत घेण्याची औषधि समान गुण पाहूनच घेतली जाते, घेतली सुद्धां पाहिजे.

चरक वगैरे ग्रंथांत जेथें मोठें आयुष्य वाढविणारे रसायन प्रयोग सांगितले आहेत, तेथें सोमादि दिव्य वनस्पतींच्या अभावीं याच प्रकारें समान गुणाच्या अन्य औषधि घेण्याचें विधान आहे. म्हणून जर जंगिड मण्याविषयीं योग्य माहिती मिळूं शकत नाहीं तर या मण्याच्या समान गुणधर्माच्या वनस्पतीपासून तो बनवावा आणि धारण करावा. यांत अयोग्य कांहींच नाहीं. इतकें सांगून सुद्धां ही गोष्ट आम्हीं चांगल्या वैद्यावर सोपवितों. याविषयीं जास्त संशोधन होणें अगत्याचें आहे, हें सुद्धां आम्हीं येथें स्पष्ट करीत आहोंत. चांगल्या वैद्यांनीं या महत्त्वाच्या बाबतींत अधिक संशोधन जरूर करावें.

मणिधारण

येथें कित्येक वाचक अशी शंका घेतील कीं, निवळ मणि धारण करण्यामुळें रोगमुक्त होण्याची तुमची गोष्ट निव्वळ अंधश्रद्धेची वाटते. त्यामुळें, ताईत, कवच धागेदोरे वगैरे अंधश्रद्धेच्या गोष्टींस पाठींबा नाहीं का मिळणार ? अशी शंका उपस्थित होणें शक्य आहे. म्हणून त्या गोष्टीचा येथें विचार करणें जरूरीचें आहे--

या सूक्तांत जंगिड मण्याचें वर्णन आहे तें कांहीं ताईत अगर धागादोऱ्यासारखी जादुची वस्तु नव्हे. खरें पहातां ती औषधि वस्तु आहे. या पूर्वी लिहिल्या सूक्तांत पर्वतावर आणि समुद्रांत उत्पन्न होणाऱ्या औषधि वनस्पतींचें स्पष्ट वर्णन आहे. त्याच औषधि वनस्पतींचा पुनरुच्चार या सूक्तांत पुनः झालेला आहे. हीं दोन्ही सूक्तें एकत्र वाचलीं असतां दोन्हीमध्यें रोगनिवारण आणि आरोग्य-साधन हा विषय आहे हें ध्यानीं येईल. म्हणून हा औषधि मणि आहे ही गोष्ट स्पष्ट सिद्ध होते.

मण्यावर संस्कार

हा मणि स्वतः एका वनस्पतीचा आहे. म्हणजे वनस्पतीच्या लाकडापासून तो तयार केलेला आहे. तसेंच तो ज्या दोऱ्यानें बांधण्यांत येणार आहे तो दोरासुद्धां विशेष गुणकारी वनस्पतींचा आहे. ही गोष्ट पूर्वी सांगितली आहेच. विशेष गुणाचा दोरा आणि विशेष गुणाचा मणि शरीरावर राहिल्यानें विशेष परिणाम होणें संभवनीय आहे. त्यानंतर--

अरण्यादन्य आभृतः ।
कृष्या अन्यो रसेभ्यः ॥ (मं. ५)

' एक अरण्यांतील वनस्पतीपासून तयार होतो आणि दुसरा शेतींमुळें उत्पन्न होणाऱ्या वनस्पतींच्या रसानें भरतात. ' हें पांचव्या मंत्राचें कथन खास मनन करण्यासारखें आहे. त्यांत ' आ-भृत ' शब्द आहे त्याचा धात्वर्थ (आ) सर्व बाजूंनीं (भृतः) पूर्ण केलेला, भरलेला, चारी बाजूंनीं भरलेला असा होतो. म्हणजे मणि आणि दोरा अनेक वनस्पतींच्या रसांत भिजवून वाळवल्यानें ते सर्व रस त्या दोऱ्यांत आणि मण्यांत भरून जातात अथवा ओतप्रोत भिनतात, आणि त्या सर्व रसांचा परिणाम शरीरावर होतो. म्हणून जंगिड मणि धारण करणें हा वैद्यशास्त्राचा महत्त्वपूर्ण आणि सशास्त्र पद्धतशीर संशोध्य विषय आहे आणि त्यांत अंधविश्वासाची गोष्ट जराहि नाहीं.

हल्लीं बाजारांत जे ताईत, कवच, धागेदोरे वगैरे आढळणाऱ्या वस्तु मिळतात त्या केवळ भावनाजन्य विश्वासाच्या वस्तु काल्पनिक अशा असतात. जंगिडमणि तसा नाहीं. त्यांत औषधींचा संबंध विशेषतः शरीराशीं येतो. तसें पाहिलें तर औषधि पोटांत घेतली जात नाहीं, पण शरीरास औषधींचा स्पर्श झाल्यानें लाभ होतोच.

आमच्या पहाण्यांत असें आहे कीं तंबाखूचीं पानें पोटावर बांधल्यानें उलटी होते. (त्याचप्रमाणें हरितकी [हरडे] ची एक तीव्र जात आहे, ती फक्त हातांत धरल्यानें जोवाब होते. पण हें आम्हीं स्वतः पाहिलें अथवा अनुभविलें नाहीं.) त्या शिवाय आम्हीं पाहिलेल्या आणखी एका गोष्टीचा येथें उल्लेख करण्यासारखा आहे. माजी कोल्हापूर संस्थानांत ? गगन बावडा नांवाची एक लहान जहागिरी सह्याद्रिच्या डोंगरांत होती. तेथील राजाजवळ वनस्पतीचा एक मणि होता. तो मणि धारण केल्यानें दांताची पीडा नष्ट होत असे. याविषयीं

अनुभव आम्हीं अनेक वार घेतला आहे, आणि आमच्या परिस्थितीवर त्याचा प्रयोग करविला आहे. हा मणि कोण्या वनस्पतीच्या खोडांतून बनविला आहे. पण त्या वनस्पतीचें नांव आम्हांस माहित नाहीं. त्याशिवाय, प्रवाळ, सोनें, तांबें, विविध रत्नें वगैरे धारण करण्यानें बालकाच्या शरीरावर विशेष प्रभाव होतो, हें सुद्धां आम्हीं पाहिलें आहे. म्हणून जो दोरा किंवा मणि वनस्पतींच्या रसानें सुसंस्कृत करून मग धारण करण्यांत येतो तो रोग दूर करूं शकतो हें म्हणणें सुसंगत शास्त्रीयदृष्ट्या सत्यच प्रतीत होतें.

वचेविषयीं आम्हीं कित्येक वैद्यांशीं चर्चा सुद्धा केली आहे. त्याचें म्हणणें असें कीं वचेचा मणि वर सांगितल्याप्रमाणें शरीरावर धारण केला तर स्पर्शजन्य रोगां (स्पर्शामुळें पसरणारे) ची बाधा दूर होऊं शकते. म्हणजे जे त्यास धारण करतात त्यांना असे स्पर्शजन्य रोग होणार नाहींत. या गोष्टीचा आम्हीं पुष्कळ वेळां प्रयोगसुद्धां केला आहे, आणि तो लाभदायक ठरला आहे.

त्याचप्रकारें प्राथिक सन्निपात रोगाच्या दिवसांत, ' इम्लिया ' नामक वनस्पतीचीं बीजें धारण केल्यानें कांहीं फायदा होतो असे कित्येक डॉक्टर म्हणतात, पण आम्हांस त्याचा खास अनुभव नाहीं. मुंबईत या रोगाची साथ आली असतां पुष्कळ-जणांस हा मणि धारण करतांना आम्हीं पाहिलें आहे.

अशा थोड्या अनुभवाच्या आधारावर आम्हीं म्हणूं शकतों कीं जंगिड मणि धारण करणें हा एक शास्त्रीय महत्त्वाचा विषय आहे, आणि त्यांत अंधश्रद्धेला जराहि वाव नाहीं. आतां तो विशेष संशोधन करण्याचा विषय आहे. वैद्यांनीं जंगिड मणि तयार करण्याची रीत शोधून काढावी आणि त्याचा उपयोग करून आरोग्य प्राप्त करण्याचा निश्चित उपाय सर्वांस उपलब्ध करून द्यावा. वैद्यशास्त्राचे ग्रंथ पाहिले असतां जास्त माहिती मिळण्याचा संभव खरा.

शोधाची दिशा

येथें शोधाच्या दिशेचें थोडेसें मार्गदर्शन अस्थानीं होणार नाहीं अशी आशा आहे. श्रीसायणाचार्यांनीं त्यांच्या भाष्यांत लिहिलें आहे कीं काशी प्रांतात जंगिड वृक्ष आहेत. त्या वृक्षांविषयीं काशीचे आजुबाजूस शोध करावा आणि जो कांहीं अनुभव प्राप्त होईल तो प्रगट, प्रसिद्ध करावा.

वचा वनस्पतीचा वास उग्र आहे. तिच्या उग्र वासानें युक्त जे हवेचे परमाणु पसरतात ते रोगजंतूंचा नाश करतात. एवढेंच रोगाच्या विषासुद्धां दूर करतात. त्यामुळें वचा शरीरावर धारण केली असतां स्पर्शजन्य रोग दूर होतात. त्यांची बाधा होत नाहीं. स्पर्शजन्य रोग बहुंशीं सूक्ष्म जंतुद्वारें प्रसरतात. ते रोगजंतू वचेच्या उग्रवासानें तत्काळ मरतात. असे उग्र वासाचे पदार्थ, अजवायन (ओंवा), पुदीना, लसूण, कापूर, पेपरमींट, शोपा वगैरे अनेक आहेत. आर्यवैद्यक शास्त्रांत या पदार्थांची गणना केली आहे आणि त्यांस कृमीनाशकहि म्हटलें आहे. जर संशोधक पूर्वी सांगितलेल्या रोगनाशक वनस्पतींच्या खोडांतून अथवा लांकडांतून मणि तयार करून त्यावर उग्र वासाच्या अनेक रसांचा योग्य संस्कार करतील तर त्यांच्या अशा प्रयत्नांनीं जंगिड मणि अथवा त्याच्यासारखा मणि अजूनहि प्राप्त होण्याचा संभव आहे. म्हणून आम्हीं सुयोग्य वैद्यांस याविषयीं जास्त संशोधन करण्यास प्रार्थना–विनंति करीत आहोंत.

जंगिड मण्यानें दीर्घजीवन

पहिल्या मंत्राच्या सुरवातीस ' जंगिड मण्यानें दीर्घायुष्य प्राप्त करण्याची गोष्ट सांगितली आहे. ' हो दीर्घायुष्य प्राप्ति कशाप्रकारें होते याविषयीं येथें विचार केला पाहिजे. तो विचार करण्यापूर्वी आयुष्य उणें कां होतें याचा विचार करूं.

ज्यामुळें आयुष्य क्षीण होतें त्याचीं रोग–आधि आणि व्याधि हीं मुख्य कारणें आहेत. जंगिड मणि रोगनिवारण करणारा, रोगांचें विष आणि रोग वाढविणाऱ्या जंतूंना दूर करतो, अथवा नाश करतो. त्यामुळें आरोग्य प्राप्त होतें आणि आरोग्ययुक्त स्वास्थ्यमय जीवन प्राप्त झालें असतां आयुष्य वाढतें

कित्येक लोक असें मानतात कीं आयुष्याची वृद्धि होत नाहीं. परंतु वेदांत शेंकडो ठिकाणीं दीर्घायुष्य प्राप्तीचे उपाय सांगितले आहेत (पहा– प्रस्तुत लेखकाचा स्वाध्यायमंडळ प्रकाशित अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद खंड ४ था, **' दीर्घायुष्य आणि आरोग्य '**) त्यामुळें वैदिक दृष्टिकोणानें आयुष्य वृद्धि होते यांत कांहीं शंका नाहीं. जीवन (आयुष्य) वाढतें कीं नाहीं याविषयीं आपण आर्य वैद्यकाचा पुरावा घेतला तर तो आपणांस अनुकूलच मिळेल. कारण कीं आयुष्य वाढविणारीं कित्येक रसायनें व त्यांचे प्रयोग वैद्यशास्त्रांत सांगितले आहेत. म्हणजे ऋषि प्रणीत ग्रंथांची संमति आयुष्यवृद्धि होते याविषयीं आहेच. म्हणून सर्व सामान्य लोक जे असें मानतात कीं आयुष्य वाढत नाहीं तें खोटें. चुकीचें आहे. असा विचार वैदिक धर्मीयांनीं मनांत बाळगूं नये.

जंगिड मणि (Disinfectant) स्पर्शजन्य दोषांस दूर

करतो कारण की जर तो शरीरावर धारण करण्यात आला तर त्यामुळें रोग नाहींसे होतील यांत कांहीं शंका नाही. अशा प्रकारें जर आरोग्य टिकवलें आणि आयुष्यवर्धक दुसरे ब्रह्मचर्य प्राणायामादि वैदिक उपाय अमलांत आणले तर आयुष्य नक्कीच वाढेल. म्हणून वाचकांनीं या गोष्टीचें विशेष मनन करावें.

महान् रण

पहिल्या मंत्रांत '**महते रणाय**' शब्द आहेत. यांत जो '**रण**' शब्द आहे त्याचा वास्तविक अर्थ रमणीयता, शोभा, वगैरे होतो. हा अर्थ पूर्वस्थानीं दिला आहे. पण कित्येकांच्या मतें येथें रण शब्दाचा अर्थ युद्ध असा आहे. त्यामुळें '**महत् रणं**' शब्दाचा अर्थ 'महायुद्ध' आहे. असा अर्थ करण्यामुळें प्रथम मंत्राच्या या भागाचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें होईल—

महते रणाय जंगिडं वयं बिभृमः। (मं. १)

'महान् युद्धासाठीं जंगिड मणि धारण करतों.' म्हणजे महायुद्धांत आम्हांस विजय प्राप्त व्हावा म्हणून आम्हीं जंगिड मणि धारण करीत आहोंत. जंगिड मणि धारण केल्यानें आमच्या शरीरांत असें बळ संचरेल कीं ज्यामुळें आम्हीं त्या महायुद्धांत विजयी होऊं. तें युद्ध कोणतें ? तें युद्ध म्हणजे स्वतःचें जीवनच होय. मनुष्याचें जीवन हेंच एक महायुद्ध आहे.

शंभर वर्षे चालणारें हें युद्ध आहे. या युद्धांत शंभर वर्षे व्यतीत होतात. म्हणून त्या युद्धास सामान्य अथवा साधारण म्हणतां येणार नाहीं. शरीररूपी क्षेत्रांत जें कार्य आत्म्यातर्फे चालतें त्यांत विविधरोग विघ्नें करतात. आणि त्यांच्याशीं आमचें युद्ध चालू आहे. स्वतःचें आरोग्य टिकविण्यानेंच या महायुद्धांत विजय प्राप्त होणार आहे. जंगिड मण्यानें रोगनिवृत्तिद्वारा आरोग्य प्राप्त होतें. त्यामुळें हा मणि महान् युद्धांत आम्हांस सहाय्यरूप आहे, असें जें या मंत्रांत म्हटलें आहे तें सत्य आहे.

बलवर्धन

या सूक्तांतील दुसरे दोन शब्दसुद्धां फार महत्त्वाचे आहेत. '**अरिष्यन्तः । दक्षमाणाः**' हे दोन शब्द क्रमशः 'अहिंसित होणें, बलिष्ठ होणें' असे आहेत. रोग वगैरेंच्या हल्ल्यामुळें अथवा दुसऱ्या दुष्ट शत्रूंच्या आक्रमणामुळें आम्हीं (**अरिष्यन्तः**) हिंसित न व्हावें. म्हणजे आम्हीं दुःखी होऊं नये, त्रस्त अथवा नष्ट होऊं नये. हा पहिल्या पदाचा अर्थ आहे. पण थोडा विचार केल्यानें वाचकांच्या मनांत ही गोष्ट स्पष्ट होईल कीं केवळ क्षीण, दुर्बळ न होण्यानें अथवा नष्ट न होण्यानेंच म्हणजे फक्त जीवंत रहाण्यानेंच या जगांत कार्य करणें अथवा विजय प्राप्त करणें अशक्य आहे. विजय प्राप्त करण्यासाठीं हे निषेधात्मक गुण निव्वळ सहाय्यभूत होतील, त्या कार्यासाठीं विधेयात्मक गुण असणें आवश्यक आहे. तो गुण (**दक्षमाणाः**) बलवान् या शब्दानें दाखविला आहे. त्याचा अर्थ शक्तिसंपन्न होणें असा आहे. वाचकांनीं थोडा विचार केला तर ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं येईल कीं—

बल आणि विजय

या गुणांची फार आवश्यकता आहे. रोग होऊं नये. अशक्त होऊं नये, नाश होऊं नये, पण एवढ्यानें हें कार्य होणार नाहीं. विजयाची इच्छा आहे तर स्वतःची शक्ति सर्वप्रकारें वाढविली पाहिजे त्यासाठीं प्रयत्न होणें आवश्यक आहे. जेवढें बल वाढेल तेवढी विजयाची खात्री, प्राप्त होण्याचा संभव जास्त आहे. वाचकांनीं या दोन शब्दांचा परस्पर महत्त्वपूर्ण संबंध जाणून घ्यावा आणि वेदांच्या शब्दयोजनेची गंभीरता आणि कौशल्य याचा अनुभव घ्यावा.

दूषण

या सूक्तांत '**दूषण, दूषि**' असे शब्द प्रयोग विलक्षण अर्थानें केले आहेत. पहा—

विष्कन्धदूषण— विष्कंधास बिघडविणारा.

कृत्या दूषि— कृत्यास दोष देणारा.

अराति दूषि— अरातीला दोष देणारा.

वाचक जर सूक्ष्म दृष्टीनीं पहातील तर त्यांना या शब्दप्रयोगांत ही गोष्ट स्पष्ट दिसेल कीं, 'शत्रूमध्यें दोष उत्पन्न करणें' येथें सुचविलें आहे. कित्येक म्हणतात कीं शत्रूस मारा, कापून काढा आणि शत्रूचा नाश करा. वेदांमध्यें शत्रूचा नाश करण्याचा उपदेश कित्येक वेळां आला आहे. परंतु येथें शत्रूचा नाश दुसऱ्याच पद्धतीनें करण्याचा मार्ग सांगितला आहे. शत्रूंत दोष उत्पन्न करणें, शत्रूंत हीनता उत्पन्न करणें, शत्रूच्या कार्यांत दोष उत्पन्न करणें. ज्यावेळीं शत्रूचा लवकर नाश होत नाहीं त्यावेळीं अनेक युक्त्या योजून शत्रूमध्यें दोष वाढविल्यानें शत्रूचें बळ कमी होतें आणि स्वतःचें बल वाढतें. हें जितकें व्यक्तिगत रोगांविषयीं सत्य आहे तितकेंच सामाजिक आणि राष्ट्रीय शत्रूविषयीं सुद्धां सत्य आहे. शत्रूमध्यें दोष उत्पन्न केल्यानें थोड्याशा प्रयत्नांनीं शत्रूचा पराजय होतो आणि स्वतःला विजय प्राप्त होतो.

हा मणि शरीरावर धारण केल्यानें शरीरांत जे रोगरूपी शत्रु आहेत त्यांच्या शक्तींत दोष उत्पन्न होतो आणि त्यामुळें त्या शत्रूंची शक्ति क्षीण होत जाते आणि स्वतःचें बळ मणि धारण करण्यामुळें वाढतें,

हा शरीराच्या क्षेत्रातील उपदेश वाचकांनीं राष्ट्राच्या क्षेत्रांत सुद्धां लागू पडतो हें पहावें, त्यामुळें त्यास राजनीतींतील शत्रू-दमन विषयक एक महान् प्रकरणांतील सिद्धांताचें ज्ञान होऊं शकेल.

अत्रि

वेदमंत्रात 'अत्रि' शब्द निरनिराळ्या अर्थी वापरलेला पहावयास सांपडतो. कित्येकस्थानीं त्याचा अर्थ ऋषि आहे, कित्येकस्थानीं राक्षस असा आहे आणि या सूक्तांतील मंत्रात तें एका विशिष्ट रोगाचें नांव आहे. इतक्या निरनिराळ्या अर्थी त्याचा प्रयोग होत असल्यानें त्याविषयीं वाचकांच्या मनांत शंका निर्माण होणें संभवनीय आहे. म्हणून त्याविषयीं थोडें लिहिणें आवश्यक आहे.

'अद्' (खाणें) या धातूपासून हा शब्द तयार झाला आहे. त्यामुळें त्याचा अर्थ 'भक्षक' असासुद्धां होतो. दुसरा अर्थ 'अत्' भ्रमण करणें या अर्थ सुद्धां आहे. त्यावरून भटकणारा, भ्रमण करणारा, असाहि अर्थ होतो. पहिला अर्थ आम्ही या सूक्तांत विवेचनाच्या सुरवातीस दिला आहे. येथें हा अत्रि शब्द केवळ रोगवाचक असल्यानें भक्षक रोग अथवा भस्मरोग असा अर्थ केला आहे. ज्या रोगांत रोगी अन्न पुष्कळ खातो आणि तरिसुद्धां क्षीण होत जातो. दुसरा 'अत्रि' शब्दाचा अर्थ 'भ्रमण करणारा' असा होतो. हा अर्थ रोगवाचक समजण्यात आला तर वेडेपणा ज्याला म्हणतात त्या अवस्थेस बोधक होईल. मूर्ख मनुष्य डोकें ठिकाणीं नसल्यानें वेडा होतो, कारणाशिवाय भटकतो म्हणून हा शब्द त्या रोगाचा वाचक होऊं शकेल. त्यामुळें अर्सेसुद्धां सिद्ध होतें कीं हा जंगिड मणि डोकें दुखणें, वेडे होणें, मेंदु अस्थिर होणें, अशा रोगांत सुद्धां उपयोगी होतो. परंतु वाचकांनीं येथें ध्यानीं बाळगावें कीं ही सर्व शब्द व्युत्पत्तिची गोष्ट आहे. त्यासाठीं जरुर तो पुरावा वैद्यकग्रंथांत मिळत नाहीं. म्हणजे जोपर्यंत जंगिड मण्याचा तसा उपयोग सिद्ध झालेला नाहीं तोपावेतों त्याबद्दल खात्री देतां येत नाहीं. असें असूनहि वरील अर्थच जंगिड मण्याविषयीं विशेष शोध करण्यांत सहाय्यभूत होईल अशा हेतूनें हा अर्थ येथें दिला आहे. वचेच्या गुण धर्मांत स्मृतिवर्धन आणि उन्मादनाशन हे दोन गुण हा अर्थ सूचित करणारे आहेत, हें संशोधन करणाऱ्यांनीं ध्यानीं बाळगावें.

याप्रकारें हें सूक्त अनेक महत्वपूर्ण गोष्टींचें वर्णन करतें. वाचकांनीं विचार करून त्यांतून अनेकप्रकारचा बोध प्राप्त करावा.

शंखमणि

कांड ४, सूक्त १०

(ऋषिः - अथर्वा । देवता - शंखमणिः, कृशनः ।)

वातो॑ज्जा॒तो अ॒न्तरि॑क्षाद्वि॒द्युतो॒ ज्योति॑ष॒स्परि॑ । स नो॑ हिरण्य॒जाः श॒ङ्खः कृश॑नः पा॒त्वंह॑सः ॥ १ ॥
यो अ॑ग्र॒तो रो॑च॒नानां॑ समु॒द्रादधि॑ ज॒ज्ञि॒षे । श॒ङ्खेन॑ ह॒त्वा रक्षां॑स्य॒त्त्रिणो॒ वि ष॑हामहे ॥ २ ॥

अर्थ— (वातात् अन्तरिक्षात्) वायूपासून, विष्णुपासून, (विद्युतः ज्योतिषः परिजातः) वीजेपासून आणि सूर्य वगैरे ज्योतिपासून सर्वप्रकारें उत्पन्न झालेला (सः हिरण्यजाः कृशनः शंखः) तो सोन्यापासून तयार केलेला मोतीरूपी तेजस्वी शंख (नः अंहसः पातु) आम्हांस पापापासून वांचवो. [१]

(यः रोचनानां अग्रतः) जो प्रकाशमान् वस्तूंच्या अग्रभागीं आहे, (समुद्रात् अधिजज्ञिषे) समुद्रांतून उत्पन्न झाला आहे त्या (शंखेन रक्षांसि हत्वा) शंखानें राक्षसांचा नाश करून (अत्रिणः वि सहामहे) भक्षकांना आम्हीं पराजित करतों. [२]

भावार्थ— वायु, अंतरिक्ष, वीज, आणि सूर्य वगैरेंचें तेज तसेंच सोन्याचा गुण धारण करून शंख उत्पन्न झाला आहे. तो रोगापासून आम्हांस वांचवतो. [१]

शङ्खेनामीवाममतिं शङ्खेनोत सदान्वाः । शङ्खो नो विश्वभेषजः कृशनः पात्वंहसः ॥ ३ ॥
दिवि जातः समुद्रजः सिन्धुतस्पर्याभृतः । स नो हिरण्यजाः शङ्ख आयुष्प्रतरणो मणिः ॥ ४ ॥
समुद्राज्जातो मणिर्वृत्राज्जातो दिवाकरः । सो अस्मान्त्सर्वतः पातु हेत्या देवासुरेभ्यः ॥ ५ ॥
हिरण्यानामेकोऽसि सोमात्त्वमधि जज्ञिषे ।
रथे त्वमसि दर्शत इषुधौ रोचनस्त्वं प्र ण आयूंषि तारिषत् ॥ ६ ॥
देवानामस्थि कृशनं बभूव तदात्मन्वच्चरत्यप्स्व१न्तः ।
तत्ते बध्नाम्यायुषे वर्चसे बलाय दीर्घायुत्वाय शतशारदाय कार्शनस्त्वाभि रक्षतु ॥ ७ ॥

अर्थ— (शंखेन अमीवां अमतिं) शंखानें रोग आणि बुद्धि हीनतेस (उत शंखेन सदान्वाः) आणि शंखानें नेहमीं पीडा करणाऱ्या रोगांस आम्हीं दूर करतों, हा (शंखः विश्वभेषजः) शंख सर्वरोगांस औषधि आहे म्हणून (कृशनः अंहसः नः पातु) मोत्याप्रमाणें तेजस्वी असा तो शंख पापांपासून आम्हांस वांचवो. [३]

(दिविजातः) द्युलोकापासून उत्पन्न झालेला (समुद्रजः) समुद्रांत जन्मलेला अथवा (सिन्धुतः परि आभृतः) नदींतून एकत्र केलेला हा (हिरण्यजाः शंखः) सोन्याप्रमाणें चमकणारा शंख आहे. (सः मणिः) तो मणि (नः आयुष्प्रतरणः) आम्हांस आयुष्यांतील दुःखांतून पार करणारा होवो. [४]

(समुद्रात् मणिः जातः) समुद्रांत हें शंखरूपी रत्न जन्मलें आहे. ज्याप्रमाणें (वृत्रात् दिवाकरः जातः) मेघांपासून सूर्य प्रगट होतो (सः हेत्या) तो स्वतःच्या शस्त्रानें (देवासुरेभ्यः) देव अथवा असुरांपासून (अस्मान् सर्वतः पातु) आमचें सर्वप्रकारें रक्षण करो. [५]

(हिरण्यानां एकः असि) तूं सोन्यासारखा चमकणारा आहेस. (त्वं सोमात् अधिजज्ञिषे) तूं सोमापासून उत्पन्न झालेला आहेस. (त्वं रथे दर्शनः) तूं रथांत पहावयास मिळतोस (त्वं इषुधौ रोचनः) तूं बाणाच्या थैलींत चमकतोस, (नः आयूंषि प्रतारिषत्) आमचें जीवन दीर्घ कर. [६]

(देवानां अस्थि कृशनं बभूव) देवांचें हाडरूपीं स्वच्छ पांढरें तेजच सोनें अथवा मोत्यासारखें झालें आहे. (तत् आत्मन्वत् अप्सु अन्तः चरति) तो आत्म्याच्या अधिकारानें युक्त होऊन पाण्यांत रहातो. (तत् ते) आणि तुझ्यावर (वर्चसे बलाय आयुषे दीर्घायुत्वाय शतशारदाय) तेज, बल, आयुष्य, जीवन, शंभरवर्षांचें पूर्ण आयुष्य प्राप्त होण्यासाठीं (बध्नामि) मीं बांधतों. हा (कार्शनः त्वा अभिरक्षतु) शंखमणि तुझें संपूर्णपणें रक्षण करो. [७]

भावार्थ— तो स्वतः तेजस्वी आहे आणि समुद्रांतून प्राप्त होतो. त्याच्यामुळें रोगबीजें दूर होतात. रक्तशोषण करणाऱ्या रोगाचे कृमी त्याच्यामुळें नष्ट होतात. [२]

शंखामुळें आमापासून निर्माण होणारे रोग दूर होतात. बुद्धिमांद्य दूर होतें, शंखानें शरीराच्या अन्य पीडा दूर होतात. शंख सर्व रोगांवर औषधि आहे. तो तेजस्वी शंख आम्हांस रोगांपासून वांचवो. [३]

हा शंख समुद्रांत उत्पन्न होतो आणि महानद्यांच्या मुखाजवळ सुद्धां प्राप्त होऊं शकतो. तो संपूर्ण जीवनांत आम्हांस दुःख मुक्त करतो. [४]

समुद्रांतून प्राप्त होणारा शंख स्वतःच्या विनाशक गुणांनीं सर्वप्रकारच्या दोषांपासून आमचें रक्षण करो. [५]

शंख सोन्याप्रमाणें तेजस्वी आणि चंद्रम्याप्रमाणें पांढरा आहे. तो शूरपुरुषांच्या रथावर आणि बाणांच्या पिशवींत ठेवला जातो. त्यामुळें आयुष्यवृद्धि होते. [६]

तो जणूं काय देवांचें तेज आहे आणि तेंच शंखरूपानें समुद्रांतून प्राप्त झालें आहे. त्याच्यापासून तेज, शक्ति, दीर्घायुष्य इत्यादि प्राप्ति होते. तो सर्व दोषांपासून मनुष्याचें रक्षण करतो. [७]

शंखमणि

शंखानें रोग दूर करणें

शंखापासून औषधें तयार करून त्यांचा उपयोग निरनिराळ्या रोगांत करून ते रोग दूर करण्याविषयीं वैद्यशास्त्रांत अनेक ठिकाणीं लिहिलें आहे. हें सूक्त सुद्धां त्याविषयींच आहे. या विषयीं सर्वप्रथम आपण वैद्यशास्त्राचें प्रमाण पाहूं—

वैद्यशास्त्र ग्रंथांत जीं त्याचीं नांवें दिलीं आहेत त्यांत '**पूतः**' शब्द आहे, त्याचा अर्थ 'पवित्र' असा आहे. स्वतः पवित्र असल्यानें जेथें तो जातो तेथें निर्दोषता निर्माण करतो. शंखाचा हा गुण आहे त्यामुळें त्याचा उपयोग औषधि क्रियांत केला जातो.

शंखाचे गुण

वैद्यशास्त्रांत त्याचे गुण खालीं दिल्याप्रमाणें सांगितले आहेत—

शंखकूर्मादयः स्वादुरसपाका मरुन्नुदः ।
शीता स्निग्धा हिताः पित्ते वर्चस्याः श्लेष्मवर्धनाः ।
(सुश्रुत सू. ४६)

'शंख स्वादुरस, वायू दूर करणारा, शीत, स्निग्ध, पित्त विकारांत हितकारक तेज वाढविणारा आणि श्लेष्मा वाढविणारा आहे.' तसेंच—

कटुः शीतः पुष्टिवीर्यबलदः गुल्मशूलकफश्वासविषघ्नश्च । (रा. नि. व. १९)

'कडु, शीत, पुष्टिकारक, वीर्यवान्, शक्ति वाढविणारा, गुल्मरोग दूर करणारा, शूल हटविणारा, कफरोग आणि श्वास तसेंच विषाची असर दूर करणारा आहे.' वैद्यशास्त्रांत सांगितलेले हे शंखाचे गुण ध्यानीं घेतां या सूक्ताचा मतितार्थ स्पष्ट समजेल. आणि शंखाचे रोगनिवारक गुण ध्यानांत येतात. या शंखापासून शंखद्रव, शंखभस्म, शंखचूर्ण, शंखवटी, वगैरे अनेक औषधें निरनिराळ्या रोगांस दूर करण्यास तयार करण्यांत येतात. त्यामुळें लोकांस या औषधींचा अनुभव आहे. म्हणून त्यांस शंखाच्या औषधि गुणांविषयीं कांहीं जास्त सांगण्याची आवश्यकता नाहीं. लहान मुलांस होणारे कित्येक रोग शंख पाण्यांत धुवून तें पाणी पाजल्यानें दूर होतात. त्याबरोबर दुसरें सुद्धां कांहीं औषध असतें. त्यामुळें शंख हा एकटासुद्धां औषधीच आहे. ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे.

शंख प्राणी आहे

शंख केवळ निर्जीव स्थितींत बाजारांत विकावयास येतात. परंतु खरें पाहिलें तर तें एका प्राण्याचें घर अथवा शरीर आहे. म्हणजे शरीराचें आवरण आहे. तें प्राण्याबरोबर वाढतें. तें हाडांसारखें असतें. थोडासा रासायनिक भेद नक्की असेलच त्यामुळें तें प्रत्यक्ष हाडांत जमा नाहीं. तो जीव आहे असें या सूक्ताच्या सातव्या मंत्रांत सांगितलें आहे—

देवानां अस्थि कृशनं बभूव ।
तत् आत्मन्वत् अप्सु अन्तः चरति ॥ (मं. ७)

'देवांचीं हाडें या शंखाच्या रूपानें परिणत होऊन (**आत्मन्वत्**) आत्म्यानें जीवसत्तेनें युक्त होऊन तो पाण्यांत विचरतो.' यामुळें शंकारहितपणें स्पष्ट होतें कीं शंख एक आत्म्यानें युक्त प्राणी म्हणजे जीव धारण करणारा प्राणी आहे. दिव्यगुणांनीं युक्त हा अस्थिप्रमाणें तो हाडांच्या घरांत रहाणारा प्राणी आहे. त्यामुळें या घरासारख्या शंखाचे जे औषधि गुण आहेत ते या सूक्तांत सांगितले आहेत. या सूक्तांत शंखाचे सांगितलेले गुण असे आहेत—

१ **विश्वभेषजः**— पुष्कळ रोगांवर औषधि. शंखापासून तयार केलेल्या औषधांनीं पुष्कळ रोग दूर होतात. (मं. ३)

२ **अंहसः पातु**—(**पाति**) शरीरांत रोग रहात असल्यामुळें मनुष्याची पापाकडे प्रवृत्ति होते. शंखाचें औषधसेवन करण्यानें तो स्वतः पवित्र असल्यानें रोगदोष दूर करतो. रोग दूर झाल्यानें पापप्रवृत्ति नाहींशी होते. आणि आरोग्ययुक्त होण्यानें मनुष्य पुण्य कर्मांकडे वळतो. रोग आणि पाप हे परस्परावलंबी आहेत. एक असला कीं दुसरा होतोच. (मं. १, ३)

३ **आयुष्प्रतरणः**— जीवनाच्या पार घेऊन जाणारा, म्हणजे पूर्ण आयुष्य देऊन मध्यें येणाऱ्या रोगरूपीं आपत्तींस दूर करणारा शंख आहे. (मं. ४)

४ **देवासुरेभ्यः हेत्या पातु (पाति)**— देव आणि असुरांकडून जे जे रोग अथवा पीडा होण्याचा संभव आहे त्यापासून शंख रक्षण करतो. जल, अन्न वगैरे देवता आहेत, त्यांचे सेवन मनुष्य करतो तेव्हां त्यांत कांहीं दोष असल्यास त्यामुळें तो रोगी होतो. असुर आणि राक्षस जीव इन्द्रियें आणि मन

यांमध्यें प्रबळ होतात आणि त्यामुळें मनुष्य आजारी होतो. या सर्व रोगांस दूर करण्यासाठीं, शंख ही औषधि उत्तम आहे. (मं. ५) देव आणि राक्षस यांच्यापासून रोग कसे होतात तें वाचकांनीं ध्यानात ठेवावें.

५ **अमीवां शंखेन (विषहामहे)**- ' आम ' म्हणजे अन्न न पचल्यामुळें होणारा रोग ' **अमीव** ' असें त्याला म्हणतात. हा रोग शंखानें दूर होतो. म्हणजे शंख औषधीनें पचनशक्ति वाढते आणि आमदोष दूर होतो. (मं. ३)

६ **अमतिं शंखेन (विषहामहे)**- मति, बुद्धि अथवा मनांतील कुविचार सुद्धां प्रथम सांगितलेल्या आमदोषानें होतात. शंखानें आमदोष दूर होतो आणि त्यामुळें मनांतील वाईट विचार दूर जातात आणि त्यामुळें पापप्रवृत्ति सुद्धां दूर होते. (मं. ३)

७ **शंखेन सदान्वाः (विषहामहे)**- ज्या रोगांत शरीरांत अथवा प्रत्येक अवयवांत फार पीडा-त्रास-वेदना-कष्ट होतात त्या रोगांस ' **सदान्वाः** ' म्हणतात. (**सदा नोनूयमानाः**) नेहमीं रोगी ओरडत रहातो, अशा प्रकारच्या रोगांस शंख दूर करतो. (मं. ३)

८ तेज, बल, आणि दीर्घायुष्य प्राप्त शंखामुळें होते. (मं. ७)

याप्रकारें शंखामुळें रोग दूर होण्याविषयीं या सूक्तांत सांगितलें आहे.

रोगजन्तु

या सूक्तांत रोगकृमी आणि त्यांपासून उत्पन्न होणारे निरनिराळे रोग दूर करण्यासाठीं ही शंख औषधि सांगितली आहे. त्याविषयीं वर्णन या सूक्तांत खालीं दिल्याप्रमाणें आहे.

१ **रक्षांसि- (रक्षः = क्षरः)** ज्या रोगजंतूमुळें शरीर क्षीण होतें. (मं. २)

२ **अत्रिन्- (अत्ति इति)**-ज्या रोगांत रोगी पुष्कळ अन्न खातो पण शरीर मात्र पुष्ट होत नाहीं, उलट, रक्त, मांस वगैरे सप्त धातु क्षीण आणि अशक्त होत जातात. भस्मरोग आणि त्याच प्रकारच्या दुसऱ्या रोगजंतूचें हें नांव आहे. (मं.३)

हीं कृमींचीं म्हणजे रोग निर्माण करणाऱ्यांचीं नावें आहेत. त्यामुळें उत्पन्न होणारे सर्व रोग शंखाच्या सेवनानें दूर होतात.

शंखाचे गुण

या सूक्तांत शंखाचे जे गुण सांगितले आहेत ते आतां पहा-

१ **समुद्रात् जज्ञिषे**- तो समुद्रांतून उत्पन्न होतो. पाण्यानें त्याची उत्पत्ति होण्यामुळें तो शीतवीर्य म्हणजे गुणांनीं शीत आहे. (मं. १,२,४-५)

२ **सोमात् जज्ञिषे**- सोम म्हणजे औषधि अथवा चंद्रापासून उत्पन्न होण्यामुळें गुणकारी रोग दूर करणारा आणि शीत गुण प्रधान आहे. (मं. ६)

३ **हिरण्यजः**- सोन्यापासून उत्पन्न होण्यामुळें बलवर्धन वगैरे गुण त्याच्यांत आहेत. (मं. १,४,६)

४ **विद्युतः**- तेजापासून उत्पन्न होण्यामुळें हा शंख शरीराचें तेज वाढविणारा आहे. (मं. १)

याप्रकारें या सूक्तांत शंखाचे गुण सांगितले आहेत. या गुणांची तुलना वाचकांनीं वैद्यक ग्रंथांत सांगितलेल्या गुणांशीं करावी. आणि अशा रीतीनें वैदिक गुणशैली जाणण्याचा प्रयत्न करावा.

हा वैद्यक विषय आहे. वैद्यशास्त्रांत शंखाचा पुष्कळ प्रकारें उपयोग होतो. त्यामुळें वैद्यांनीं शंखाविषयीं जास्त संशोधन करून ती माहिती सुबोध रीतीनें सामान्य लोकांचे लाभार्थ प्रगट करावी.

महाराष्ट्रांत शंख पाण्यांत धुवून तें पाणी लहान मुलांस पाजतात म्हणजे लहान बालकांचे कित्येक रोग दूर होतात. मुलांच्या गळयांत सुद्धां शंख बांधतात अथवा लहान शंख सोन्यांत मढवून गळयांत दागिन्याप्रमाणें बांधतात. त्यापासून फायदा होतो असा अनुभव आहे. वैद्यांनीं त्याविषयीं जास्त शोध करणें जरुरीचें आहे.

प्रतिसर मणि

कांड ८, सूक्त ५

(ऋषिः - शुक्रः देवता - कृत्यादूषणं, मंत्रोक्तदेवताः ।)

अयं प्रतिसरो मणिर्वीरो वीराय बध्यते । वीर्यवान्त्सपत्नहा शूरवीरः परिपाणः सुमङ्गलः ॥ १ ॥
अयं मणिः सपत्नहा सुवीरः सहस्वान्वाजी सहमान उग्रः । प्रत्यक्कृत्या दूषयन्नेति वीरः ॥ २ ॥
अनेनेन्द्रो मणिना वृत्रमहन्ननेनासुरान्पराभावयन्मनीषी ।
अनेनाजयद् द्यावापृथिवी उभे इमे अनेनाजयत्प्रदिशश्चतस्रः ॥ ३ ॥
अयं स्राक्त्यो मणिः प्रतीवर्तः प्रतिसरः । ओजस्वान्विमृधो वशी सो अस्मान्पातु सर्वतः ॥ ४ ॥
तदग्निराह तदु सोम आह बृहस्पतिः सविता तदिन्द्रः ।
ते मे देवाः पुरोहिताः प्रतीचीः कृत्याः प्रतिसरैरजन्तु ॥ ५ ॥

अर्थ— (अयं प्रतिसरः) हा शत्रूवर आक्रमण करणारा मणि (वीर्यवान् वीरः) वीर्य युक्त वीर (सपत्नहा परिपाणः) शत्रूंचा नाश करणारा आणि सर्व प्रकारें रक्षण करणारा (सुमंगलः शूरवीरः) मंगल कारक शूरवीराच्या विश्वासाचा (मणिः वीराय बध्यते) मणि वीर पुरुषाला बांधण्यांत येतो. [१]

(अयं मणिः) हा मणि (सपत्नहा सुवीरः) शत्रूंचा नाश करणारा उत्तम वीर (सहस्वान् वाजी) शत्रूंचा वेग सहन करणारा बलवान् (सहमानः उग्रः वीरः) शत्रूंचा पराजय करणारा उग्र वीर (कृत्याः प्रत्यक् दूषयन् एति) घातक प्रयोगांस विफल करीत येतो. [२]

(अनेन मणिना इन्द्रः वृत्रं अहन्) हा मण्याच्या सहाय्यानें इंद्रानें वृत्राला मारलें (अनेन मनीषी असुरान् पराभावयत्) त्याच्या सहाय्यानें संयमी वीरांनीं राक्षसांचा पराभव केला. (अनेन उभे इमे द्यावापृथिवी अजयत्) त्याच्यामुळें हे दोन्ह द्युलोक आणि पृथ्वी विजयी झाले. (अनेन चतस्रः प्रदिशः अजयत्) त्याच्यानें चारी दिशांनीं विजय प्राप्त केला आहे. [३]

(अयं स्राक्त्यः मणिः) हा प्रगति साधणारा मणि (प्रतीवर्तः प्रतिसरः) शत्रूवर हल्ला करणारा आणि त्याच्यावर धांवून जाणारा, (ओजस्वान विमृधः वशी) बलशाली युद्धांत जाणारा आणि वशी आहे. (सः) तो (अस्मान् सर्वतः पातु) आम्हां सर्वांचे सर्व प्रकारें रक्षण करो. [४]

(अग्निः तत् आह) अग्निनें तसें म्हटलें आहे. (सोमः उ तत् आह) चंद्रसुद्धां तेंच म्हणाला (बृहस्पतिः सविता इन्द्रः तत्) बृहस्पति, इंद्र आणि सविता यांनीं सुद्धां तसेंच म्हटलें. (ते पुरोहिताः देवाः) ते अग्रेसर देव (प्रतिसरैः मे कृत्याः प्रतीचीः अजन्तु) हल्ल्यामुळें मजवर होणाऱ्या घातक प्रयोगांना विरुद्ध दिशेस फिरवून टाकोत. [५]

भावार्थ— हा मणि (किंवा पदक) शूर वीर पराक्रमी शत्रुनाशक मंगल करणारा आहे म्हणून तो वीराच्या शरीरावर बांधण्यांत येतो. [१]

हा मणि बलवान् शत्रुनाशक उग्रवीर आहे. तो सर्व शत्रूंच्या घातक प्रयोगांस दूर करतो. [२]

या मण्याच्या सहाय्यानें इंद्रानें वृत्राला मारलें, राक्षसांचा पराजय केला. द्युलोक आणि पृथ्वी यांस जिंकलें, आणि सर्व दिशांस विजय प्राप्त केला. [३]

हा शत्रूंवर हल्ला करणारा, बलवान्, शत्रूला वश करणारा मणि आमचें रक्षण करो. [४]

सर्व देव या मण्याच्या सहाय्यानें मजवर केलेल्या घातक प्रयोगापासून मला वाचवोत आणि घातक प्रयोगांस दूर करोत. [५]

अन्तर्दधे द्यावापृथिवी उताहरुत सूर्यम् ।
ते मे देवाः पुरोहिताः प्रतीचीः कृत्याः प्रतिसरैरजन्तु ॥ ६ ॥
ये स्राक्त्यं मणिं जना वर्माणि कृण्वते । सूर्य इव दिवमारुह्य वि कृत्या बाधते वशी ॥ ७ ॥
स्राक्त्येन मणिन ऋषिणेव मनीषिणा । अजैषं सर्वाः पृतना वि मृधो हन्मि रक्षसः ॥ ८ ॥
याः कृत्या आङ्गिरसीर्याः कृत्या आसुरीर्याः कृत्याः स्वयंकृता या उ चान्येभिराभृताः ।
उभयीस्ताः परा यन्तु परावतो नवतिं नाव्या अति ॥ ९ ॥
अस्मै मणिं वर्म बध्नन्तु देवा इन्द्रो विष्णुः सविता रुद्रो अग्निः ।
प्रजापतिः परमेष्ठी विराड्वैश्वानर ऋषयश्च सर्वे ॥ १० ॥
उत्तमो अस्योषधीनामनड्वान्जगतामिव व्याघ्रः श्वपदामिव ।
यमैच्छामाविदाम तं प्रतिस्पाशनमन्तितम् ॥ ११ ॥

अर्थ- (द्यावापृथिवी अंतः दधे) द्युलोक आणि पृथ्वीलोकास मीं माझ्यामध्यें धारण करतों. (उत अहः उत सूर्यम्) तसेंच दिवस आणि सूर्याला सुद्धां अंतरांत ठेवतों. ते अग्रेसर देव हल्ल्यामुळें मजवर होणाऱ्या घातक प्रयोगांस विरुद्ध दिशेस उलटवून टाकोत. [६]

(ये जनाः स्राक्त्यं मणिं) जे लोक प्रगति साधणाऱ्या या मण्याचा (वर्माणि कृण्वते) चिलखताच्या स्थानीं उपयोग करतात, ते (सूर्यः इव दिवं आरुह्य) सूर्याप्रमाणें द्युलोकांत जाऊन (वशी) सर्वांस वश करून (कृत्याः वि बाधते) घातक प्रयोगांचा नाश करतात. [७]

(मनीषिणा ऋषिणा इव) ज्ञानी ऋषिप्रमाणें (स्राक्त्येन मणिना) प्रगति साधणाऱ्या मण्यानें (सर्वाः पृतनाः अजैषं) सर्व शत्रुसेनेला पराभूत करतों आणि (रक्षस मृधः वि हन्मि) राक्षसांना युद्धांत ठार मारतों. [८]

(याः आङ्गिरसीः कृत्याः) जे आंगिरस घातक प्रयोग आहेत (याः आसुरीः कृत्याः) जे राक्षसांचे घातक प्रयोग आहेत (याः स्वयंकृताः कृत्याः) जे स्वतः केलेले घातक प्रयोग आहेत (या उ अन्येभिः आभृताः) जे दुसऱ्याकडून आणण्यांत येतात (उभयीः ताः नवतिं नाव्याः अति) ते दोन्ही नव्वद नद्यांच्या पलीकडे (परावतः परा यन्तु) दूर स्थानीं जावोत. [९]

इंद्र, विष्णु, सविता, रुद्र, अग्नि, प्रजापति, परमेष्ठी, विराट् आणि वैश्वानर हे सर्व (देवाः) देव तसेंच (सर्वे च ऋषयः) सर्व ऋषि (अस्मै मणिं वर्म बध्नन्तु) या वीराच्या शरीरावर मणिरूपी कवच बांधोत. [१०]

(ओषधीनां उत्तमः असि) औषधि मध्यें तूं श्रेष्ठ आहेस (जगतां अनड्वान् इव) ज्याप्रमाणें गतिशील प्राण्यांत बैल असतो. आणि (श्वपदां व्याघ्रः इव) श्वापदांमध्यें वाघ असतो (यं ऐच्छाम) ज्याची आम्हीं इच्छा करतों, (तं प्रतिस्पाशनं) त्या प्रतिस्पर्ध्याला (अन्तितं अविदाम) मेलेला प्राप्त करतों. [११]

भावार्थ— द्युलोक, पृथ्वी, सूर्य आणि दिवस यांच्या शक्ति मीं स्वतःमध्यें धारण करतों. ते सर्व माझ्यावर केलेल्या घातक प्रयोगांस दूर करो. [६]

जे लोक हा मणि कवचरूपानें धारण करतात ते सूर्याप्रमाणें तेजस्वी होऊन स्वतःवर केलेल्या घातक प्रयोगांस दूर करतात. [७]

या मण्यानें सर्व शत्रुसेना जिंकून घेतली, आणि दुष्टांस मारून टाकलें. [८]

या मण्यानें सर्व प्रकारचे घातक प्रयोग दूर करतां येतात. [९]

सर्व देव आणि ऋषि स्वतःच्या शक्तीनें हा मणि माझ्या शरीरावर बांधोत. [१०]

हा मणि सर्वांत उत्तम आहे. त्याला धारण केल्यानें वाटेल त्याला (इच्छा करील त्याला) जिंकू शकतो. [११]

स इद्व्याघ्रो भवत्यथो सिंहो अथो वृषा । अथो सपत्नकर्शनो यो बिभर्तीमं मणिम् ॥ १२ ॥
नैनं घ्नन्त्यप्सरसो न गन्धर्वा न मर्त्याः । सर्वा दिशो वि राजति यो बिभर्तीमं मणिम् ॥ १३ ॥
कश्यपस्त्वामसृजत कश्यपस्त्वा समैरयत् । अबिभस्त्वेन्द्रो मानुषे बिभ्रत्संश्रेषिणेऽजयत् ।
मणिं सहस्रवीर्यं वर्म देवा अकृण्वत ॥ १४ ॥
यस्त्वा कृत्याभिर्यस्त्वा दीक्षाभिर्यज्ञैर्यस्त्वा जिघांसति ।
प्रत्यक्त्वमिन्द्र तं जहि वज्रेण शतपर्वणा ॥ १५ ॥
अयमिद्वै प्रतीवर्त ओजस्वान्संजयो मणिः । प्रजां धनं च रक्षतु परिपाणः सुमङ्गलः ॥ १६ ॥
असपत्नं नो अधरादसपत्नं न उत्तरात् । इन्द्रासपत्नं नः पश्चाज्ज्योतिः शूर पुरस्कृधि ॥ १७ ॥

अर्थ-(यः इमं मणिं बिभर्ति) जो हा मणि धारण करतो (सः इत् व्याघ्रः भवति) तो खरोखर वाघासारखा होतो (अथो सिंहः अथो वृषः) अथवा सिंहासारखा, बैलासारखा (अथो सपत्नकर्शनः) शत्रूंचें दमन करणारा होतो. [१२]

(यः इमं मणिं बिभर्ति) जो या मण्यास धारण करतो तो (सर्वाः दिशः विराजति) सर्व दिशांस शोभवतो, (एनं अप्सरसः न घ्नन्ति) त्याला अप्सरा मारीत नाहींत, आणि (न गंधर्वाः न मर्त्याः) गंधर्व मारीत नाहींत अथवा मनुष्य मारूं शकत नाहीं. [१३]

(कश्यपः त्वां असृजत) कश्यपानें तुला तयार केलें आहे. (कश्यपः त्वा समैरयत्) कश्यपानें तुला प्रेरीत केला आहे. (इन्द्रः त्वा मानुषे संश्रेषिणे बिभ्रत्) इन्द्रानें तुला मानवी संग्रामांत धारण केलें होतें आणि (अजयत्) विजय मिळविला. अशा (सहस्रवीर्यं मणिं) सहस्रसामर्थ्यांनीं युक्त मण्याला (देवाः वर्म अकृण्वत) देवांनीं कवचरूप केलें. [१४]

हे इन्द्रा ! (यः त्वा कृत्याभिः) जो तुला मारक प्रयोगांनीं (यः त्वा दीक्षाभिः) जो तुला दीक्षांनीं अथवा (यः त्वा यज्ञैः जिघांसति) जो तुला यज्ञांनीं मारूं इच्छितो (तं) त्याला (त्वं) तूं (शतपर्वणा वज्रेण प्रत्यक् जहि) शेकडों पेरें असलेल्या वज्रानें प्रत्येक स्थानांत मार. [१५]

(अयं इत् वै) या निश्चयानें (प्रतीवर्तः) शत्रूवर हल्ला करणारा (परिपाणः संजयः) रक्षक आणि विजयी (सुमंगलः मणिः) उत्तम मंगल करणारा मणि (प्रजां धनं च रक्षतु) आमच्या संतति आणि संपत्तीचें रक्षण करो. [१६]

हे शूर इंद्रा ! (नः अधरात् असपत्नं) आमच्या खालून विरोध रहित (न उत्तरात् असपत्नं) आमच्या-वरून अविरोध (नः पश्चात् असपत्नं) आमच्या मागून अविरोधदर्शक (ज्योतिः पुरः कृधि) प्रकाश आमच्या समोर दाखव. [१७]

भावार्थ— जो हा मणि धारण करतो तो बळवान् होऊन स्वतःच्या सर्व शत्रूंना जिंकतो. [१२]

या मण्यास धारण करणारा सर्व दिशामध्यें शोभतो आणि कोणीहि त्याचा वध करूं शकत नाहीं. [१३]

कश्यपानें हा मणि निर्माण करण्याच्या कलेला आरंभ केला. सर्वांत प्रथम इंद्रानें याला धारण केलें होतें, आणि विश्वांत विजय मिळविला होता. [१४]

हा मणि धारण करण्यामुळें सर्व मारक प्रयोग दूर होतात. सर्व प्रकारचे मारक प्रयोग त्याच्यामुळें दूर होतात. [१५]

शत्रूंस दूर करून रक्षण करणारा हा मणि आहे. त्याला धारण करणाऱ्याचें कल्याण होतें. प्रजा आणि धनाचें रक्षण त्यामुळें होतें. [१६]

आमचें रक्षण सर्व बाजूंनीं होत राहो आणि आमच्या समोर प्रकाशाचा मार्ग स्थिर होवो. [१७]

*

वर्म मे द्यावापृथिवी वर्माहर्वर्म सूर्यः । वर्म म इन्द्रश्चाग्निश्च वर्म धाता दधातु मे ॥ १८ ॥
ऐन्द्राग्नं वर्म बहुलं यदुग्रं विश्वे देवा नाति विध्यन्ति सर्वे ।
तन्मे तन्वं त्रायतां सर्वतो बृहदायुष्मां जरदष्टिर्यथासानि ॥ १९ ॥
आ मारुक्षद्देवमणिर्मह्या अरिष्टतातये । इमं मेथिमभिसंविशध्वं तनूपानं त्रिवरूथमोजसे ॥ २० ॥
अस्मिन्निन्द्रो नि दधातु नृम्णमिमं देवासो अभिसंविशध्वम् ।
दीर्घायुत्वाय शतशारदायायुष्माञ्जरदष्टिर्यथासत् ॥ २१ ॥
स्वस्तिदा विशां पतिर्वृत्रहा विमृधो वशी ।
इन्द्रो बध्नातु ते मणिं जिगीवाँ अपराजितः सोमपा अभयंकरो वृषा ।
स त्वा रक्षतु सर्वतो दिवा नक्तं च विश्वतः ॥ २२ ॥

अर्थ— (द्यावापृथिवी मे वर्म) द्यावापृथ्वी माझ्यासाठीं कवच धारण करवो. (अह्नः वर्म सूर्यः वर्म) दिवस आणि सूर्य माझ्यासाठीं कवच धारण करवोत. (इन्द्रः च अग्निः च धाता च) इंद्र, अग्नि आणि धाता हे तीन देवही (मे वर्म दधातु) माझ्यासाठीं कवच धारण करवोत. [१८]

(सर्वे विश्वे देवाः) सर्व देव (यत् न अति विध्यन्ति) ज्याचें अतिक्रमण करूं शकत नाहींत. (तत् उग्रः बहुलं ऐंद्राग्नं बृहत् वर्म) तें मोठें इंद्र आणि अग्नीचें मोठें कवच (मे तन्वं सर्वतः त्रायतां) माझ्या शरीराचें सर्व बाजूनीं रक्षण करो (यथा) म्हणजे मीं (जरदष्टिः) वृद्धावस्थेंमध्यें सुद्धां कार्य करणारा (आयुष्मान् असानि) दीर्घायु होईन. [१९]

हा (देवमणिः) दिव्य मणि (मा मह्यै अ-रिष्ट-तातये) माझ्यावर मोठ्या सुख समृद्धिसाठीं (आरुक्षत्) आरुढ होवो. (इमं मेथिं) हा शत्रु नाशक (तनूपानं त्रिवरूथं) शरीर रक्षक आणि तीन शक्तींचा रक्षकाला (ओजसे अभि संविशध्वं) बळासाठीं आश्रित होवो. [२०]

(अस्मिन् इन्द्रः नृम्णं निदधातु) याच्यांत इंद्र बळ धारण करो (देवासः इमं अभि संविशध्वम्) देव याच्यांत प्रवेश करोत (यथा) ज्यामुळें (शतशारदाय दीर्घायुत्वाय) शंभर वर्षांच्या दीर्घायुष्यासाठीं (आयुष्मान् जरदष्टिः असत्) दीर्घायु आणि वृद्धावस्थेपर्यंत सुदृढ राहो. [२१]

(स्वस्तिदा विशां पतिः वृत्रहा) कल्याण करणारा प्रजापालक, शत्रुनाशक (विमृधः वशी) शत्रूंस वश करणारा (जिगीवां अपराजितः सोमपाः अभयंकरः) विजयी अपराजित, सोमरस पीणारा, सौम्य (वृषा इन्द्रः) बलवान् इंद्र (ते मणिं बध्नातु) तुझ्या शरीरावर मणि बांधो. (सः सर्वतः दिवा नक्तं) तो सर्व बाजूनीं रात्रंदिवस (त्वा विश्वतः पातु) तुझें सर्व बाजूनीं रक्षण करो. [२२]

भावार्थ— सर्व देव हें कवच धारण करण्यास मला सहाय्यक ठरोत. तो दैवीशक्तिनें युक्त असतो. [१८]
सर्व दैवीशक्तींनी युक्त असा ह्या मणिरूपी कवचानें माझें उत्तम रक्षण व्हावें आणि माझें जीवन दीर्घ व्हावें. [१९]
हा दिव्य मणि शरीरावर धारण करण्यानें माझें रक्षण होवो आणि माझ्या बळाची वृद्धि होवो. [२०]
याच्यांत सर्व देव स्वतःच्या बळाची स्थापना करोत. म्हणजे मला शतायुत्व आणि दीर्घ जीवन प्राप्त होईल. [२१]
शूरवीर, शत्रूंनाशक, बलवान्, विजयी असे पुरुष हा मणि शरीरावर बांधतात त्यामुळें त्यांचें रात्रंदिवस रक्षण होतें. [२२ [

प्रतिसर मणि

मणि धारण करणें

या सूक्तात मणि धारण करण्याचा विषय आहे. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं येथें ' मणि ' म्हणजे वीर पुरुष असा अर्थ घ्यावा. पण तसें करणें योग्य नाहीं आणि तो अर्थ खराही नाहीं. अशाप्रकारें अर्थाचा अनर्थ करणें कोणासहि शोभणार नाहीं. या सूक्तात सांगितलेला मणि एखाद्या वनस्पतीचा असावा. तशाप्रकारें तो तयार करून शरीरावर धारण करण्यांत येत असेल. बहुतकरून गळ्यांत बांधण्यात येत असेल. ज्याप्रमाणें हल्लीं शौर्य, वीर्य, पराक्रमाचें कार्य करणाऱ्या सैनिकास 'चंद्रक' देण्यात येतो आणि तो चंद्रक छातीवर लटकाविण्यात येतो, त्याचप्रकारें हा मणि गळ्यात अथवा मनगटावर किंवा दंडावर बांधण्यात येत असेल. तें एक शौर्याचें अथवा लोककल्याणाचें कार्य केल्याचें मानचिह्न आहे. तो धारण केल्यानें वीराची प्रतिष्ठा वाढते, त्याचा उत्साह वाढतो आणि उत्साह वाढल्यानें तो मनुष्य जास्त पराक्रम करण्यास सामर्थ्यसंपन्न होतो.

पूर्वी केलेल्या शौर्याच्या कामासाठीं अधिकाऱ्यांकडून इनाम मिळाल्यानें जास्त पराक्रम करण्याचें साहस मनुष्य करतो, म्हणजे तें पारितोषक अथवा तो चंद्रक किंवा इतर कोणत्याहि प्रकारचा मानसन्मान, वीरत्व वाढविणारा, रक्षणाचें कार्य करणारा, उत्तम वीरत्व दाखविणारा उग्रता वाढविणारा इत्यादि गुणांनीं युक्त असतो अथवा आहे असें मानणें अयोग्य ठरणार नाहीं. अशा उद्देशानें या सूक्तात या मण्याचे गुण ' **सुवीरः वाजी, उग्र** ' इत्यादि सांगितले आहेत. बाकी वर्णन सुद्धां त्या दृष्टीनें विचार करण्यासारखें आहे.

एक शंका

कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं झाडाच्या लाकडापासून तयार केलेला हा मणि वीरत्व वाढविणारा, मंगल करणारा आणि बळ वाढविणारा कसा काय होऊं शकेल ? कारण कीं लांकडापासून तयार केलेल्या मण्यांत असें सामर्थ्य असूं शकत नाहीं. म्हणून येथील ' **मणि** ' शब्दाचा अर्थ ' **वीर सेनापति** ' असाच घ्यावा. ही युक्ति अथवा विचारपद्धति विवेकयुक्त नाहीं. सरकारी नोकर हातात एक विशेष प्रकारची काठी अथवा लाकूड घेऊन आणि विशेष प्रकारचा पोषाख धारण करून हजारों मनुष्यांत जातो. आणि निर्भयपणें त्यांस धमकावतो आणि विशेष कार्य करतो. हें सामर्थ्य त्याच्यामध्यें कोठून येतें ? तर तें त्यानें घातलेल्या सरकारी पोषाख आणि सरकारी चिन्हाचें काष्ठ धारण करण्यामुळें त्यास प्राप्त होतें. खरें पहातां त्याची शारीरिक शक्ति इतर दुसऱ्या लोकांप्रमाणेंच असते. पण सरकारी चिन्ह धारण केल्यानें त्याची शक्ति कित्येक पटींनीं वाढते. त्याचप्रमाणें हा विशेष सन्मानाचा मणि जेव्हां कोणा राजा महाराजाकडून कोणाची वीरपुरुषास देण्यात येतो अथवा त्याच्या शरीरावर बांधण्यात येतो तेव्हा तें राजचिन्ह असल्यानें तें धारण केल्यानें त्या पुरुषाचें बल, वीर्य धैर्य वगैरे कित्येक पटींनीं वाढतें आणि तें स्वाभाविक आहे.

या दृष्टीनें या सूक्ताचा विचार वाचकांनीं करावा आणि त्यांचा आशय जाणून घ्यावा. हें सूक्त अशा दृष्टीनें पाहिलें तर अत्यंत सरळ आहे त्यामुळें प्रत्येक मंत्राचें जास्त स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं.

शरीराची रचना

कांड ११, सूक्त ८

(ऋषिः – कौरुपथिः । देवता – अध्यात्मं, मन्युः ।)

यन्मन्युर्जायामावहत्संकल्पस्य गृहादधि । क आसं जन्याः के वराः क उ ज्येष्ठवरोऽभवत् ॥ १ ॥

अर्थ— (यत् मन्युः संकल्पस्य गृहात्) जेव्हां उत्साह संकल्पाच्या घरून (जायां अधि आवहत्) स्वतःची स्त्री प्राप्त करून, लग्न करून स्वतःच्या घरीं घेऊन आला, त्यावेळीं (के जन्याः) कन्यापक्षाचे कोण लोक होते आणि (के: वराः) वरपक्षाचे कोण लोक होते आणि त्यांच्यापैकीं (कः उ ज्येष्ठवरः अभवत्) कोण श्रेष्ठवर समजण्यांत आला ? [१]

तपश्चैवास्तां कर्म चान्तर्महत्यर्णवे । त आसं जन्यास्ते वरा ब्रह्म ज्येष्ठवरोऽभवत् ॥ २ ॥
दश साकमजायन्त देवा देवेभ्यः पुरा । यो वै तान्विद्यात्प्रत्यक्षं स वा अद्य महद्वदेत् ॥ ३ ॥
प्राणापानौ चक्षुः श्रोत्रमक्षितिश्च क्षितिश्च या । व्यानोदानौ वाङ्मनस्ते वा आकूतिमावहन् ॥ ४ ॥
अजाता आसन्नृतवोऽथो धाता बृहस्पतिः । इन्द्राग्नी अश्विना तर्हि कं ते ज्येष्ठमुपासत ॥ ५ ॥
तपश्चैवास्तां कर्म चान्तर्महत्यर्णवे । तपो ह जज्ञे कर्मणस्तत्ते ज्येष्ठमुपासत ॥ ६ ॥
ये त आसीद्भूमिः पूर्वा यामद्धातय इद्विदुः । यो वै तां विद्यान्नामथा स मन्येत पुराणवित् ॥ ७ ॥
कुतः इन्द्रः कुतः सोमः कुतो अग्निरजायत । कुतस्त्वष्टा समभवत्कुतो धाताजायत ॥ ८ ॥
इन्द्रादिन्द्रः सोमात्सोमो अग्नेरग्निरजायत । त्वष्टा ह जज्ञे त्वष्टुर्धातुर्धाताजायत । ॥ ९ ॥
ये त आसन्दश जाता देवा देवेभ्यः पुरा । पुत्रेभ्यो लोकं दत्त्वा कस्मिंस्ते लोक आसते ॥ १० ॥

अर्थ— (महति अर्णवे अन्तः) महान् समुद्रामध्यें (तपः कर्म च आस्तां) तप आणि कर्म असे दोन पक्ष आहेत. (ते जन्याः ते वराः आसन्) तेच कन्यापक्षाचे आणि तेच वर पक्षाचे लोक होते. आणि त्यावेळीं (ब्रह्म ज्येष्ठवरः अभवत्) ब्रह्म सर्वांत श्रेष्ठ होतें. [२]

(देवेभ्यः दश देवाः साकं अजायन्त) देवांपैकीं दहा देव एकाच वेळीं जन्मले. (यः वै तान् प्रत्यक्षं विद्यात्) जो निश्चयें करून त्यांना प्रत्यक्ष जाणतो (सः वै अद्य महत् वदेत्) तोच निश्चयेंकरून महान् ब्रह्माचें ज्ञान सांगूं शकतो. [३]

(प्राणापानौ चक्षुः श्रोत्रं या अक्षितिः च क्षितिः च) प्राण, अपान, चक्षु, श्रोत्र, अभौतिक आणि भौतिक, शक्ति, (व्यान उदानौ वाङ्मनः) व्यान, उदान, आणि वाणी तसेंच मन (ते वै आकूतिं आवहन्) तेच सर्व निश्चयेंकरून संकल्पशक्तीला धारण करतात. [४]

(ऋतवः अथो धाता बृहस्पतिः इंद्राग्नी अश्विनौ) ऋतु, धाता, बृहस्पति, इंद्र अग्नि आणि दोघे अश्विनी-कुमार हे देव (अजाताः आसन्) जन्मले नव्हते, (तर्हि ते कं ज्येष्ठं उपासत) तर मग ते सर्व कोणत्या श्रेष्ठ ब्रह्माची उपासना करीत होते ? [५]

(तपः कर्म च एव) तप आणि कर्म (महति अर्णवे आस्तां) मोठ्या संसाररूपी समुद्रांत होते. (कर्मणः तपः ह जज्ञे) कर्मापासून तप उत्पन्न झालें (ते तत् ज्येष्ठं उपासते) ते सर्व त्या श्रेष्ठाची उपासना करीत होते. [६]

(या इतः पूर्वाः भूमिः आसीत्) जी या पूर्वीची भूमि होती (यां अद्धातयः इत् विदुः) जिला बुद्धिमान् लोकांनीं जाणलें होतें (यः वै तां नामथा विद्यात्) जे तिला निरनिराळ्या नांवानीं जाणतात (सः पुराणवित् मन्येत) त्यांना पुराणवित् म्हणतात. [७]

(कुतः इन्द्रः कुतः सोमः कुतः अग्निः अजायत) इंद्र, सोम, आणि अग्नि कोणापासून उत्पन्न झाले. (कुतः त्वष्टा समभवत्) त्वष्टा कोणापासून उत्पन्न झाला ? (कुतः धाता अजायत) धाता कोणापासून उत्पन्न झाला ? [८]

(इन्द्रात् इन्द्रः सोमात् सोमः) इंद्रापासून इंद्र आणि सोमापासून सोम (अग्नेः अग्निः अजायत) अग्नि-पासून अग्नि (त्वष्टा ह त्वष्टुः जज्ञे) त्वष्टयापासून त्वष्टा उत्पन्न झाला आणि (धातुः धाता अजायत) धात्यापासून धाता झाला. [९]

(ये ते दश देवाः) हे जे दहा देव (पुरा देवेभ्यः जाताः आसन्) पूर्वीं देवांपासून उत्पन्न झाले होते ते (पुत्रेभ्यः लोकं दत्त्वा) स्वतःच्या पुत्रांस स्थान देऊन (ते कस्मिन् लोके आसते) ते स्वतः कोणत्या लोकांत राहूं लागले ? [१०]

यदा केशानस्थि स्नावं मांसं मज्जानमाभरत्। शरीरं कृत्वा पादवत्कं लोकमनु प्राविशत् ॥ ११ ॥
कुतः केशान्कुतः स्नाव कुतो अस्थीन्याभरत्। अङ्गा पर्वाणि मज्जानं को मांसं कुत आभरत् ॥ १२ ॥
संसिचो नाम ते देवा ये संभारान्त्समभरन्। सर्वं संसिच्य मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १३ ॥
ऊरू पादावष्ठीवन्तौ शिरो हस्तावथो मुखम्। पृष्टीर्बर्जह्ये पार्श्वे कस्तत्समदधादृषिः ॥ १४ ॥
शिरो हस्तावथो मुखं जिह्वां ग्रीवाश्च कीकसाः। त्वचा प्रावृत्य सर्वं तत्संधा समदधान्मही ॥ १५ ॥
यत्तच्छरीरमशयत्संधया संहितं महत्। येनेदमद्य रोचते को अस्मिन्वर्णमाभरत् ॥ १६ ॥
सर्वे देवा उपाशिक्षन्तदजानाद्वधूः सती। ईशा वशस्य या जाया सास्मिन्वर्णमाभरत् ॥ १७ ॥
यदा त्वष्टा व्यतृणत्पिता त्वष्टुर्य उत्तरः। गृहं कृत्वा मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १८ ॥

अर्थ—(यदा केशान् अस्थि स्नाव) जेव्हां केंस, हाडें, आणि स्नायू (मांसं मज्जानं आभरत्) मांस आणि मज्जा या शरीरांत भरलीं आणि (शरीरं पादवत् कृत्वा) शरीरास पायांनीं युक्त केलें तेव्हां त्या भरणाऱ्यानें (कं लोकं अनुप्राविशत्) कोणत्या लोकांत अनुकूलतेनें प्रवेश केला ? [११]

(कुतः केशान् कुतः स्नावः) केस कशानें आणि स्नायू कशानें (कुतः अस्थीनि आभरत्) आणि हाडें याच्यांत कोठून भरलीं ? (कः अंगा पर्वाणि मज्जानं) कोणीं अवयव संधि आणि मज्जा तसेंच (मांसं कुतः आभरत्) मांस कोठून भरलें ? [१२]

(ते देवाः संसिचः नाम) ते देव ' संसिच् ' म्हणजे सिंचन करणारे या नांवाचे आहेत. (ये संभारान् समभरन्) जे संभार भरतात (सर्वं मर्त्यं संसिच्य) सर्व मरणधर्मानें युक्त अशा शरीरास सिंचन करून (देवाः पुरुषं आविशन्) हे देव पुनः पुरुषांत प्रविष्ट झाले. [१३]

(कः ऋषिः) तो कोणता ऋषि आहे ज्यानें (ऊरू अष्ठीवन्तौ पादौ) जांघा, गुडघे आणि पाय (शिरः हस्तौ मुखं) मस्तक आणि दोन हात तसेंच तोंड (पृष्ठीः बर्जह्ये पार्श्वे) पाठ आणि दोनी बाजू तसेंच फांसळया (तत् समदधात्) तें सर्व जोडलें आहे ? [१४]

(शिरः हस्तौ अथो मुखं) मस्तक, हात, आणि तोंड (जिह्वां ग्रीवाः च कीकसाः) जीभ–गळा–मान आणि हाडें (तत् सर्वं त्वचा प्रावृत्य) या सर्वांवर चामड्याचें वेष्टन करून (मही संधा अमदधात्) महान् जोडण्याच्या शक्तीनें जोडलें आहे. [१५]

(यत् तत् महत् शरीरं) जें हें मोठें शरीर (संधया संहितं) संधा नांवाच्या जोडण्याच्या शक्तीनें जोडलें आहे (येन इदं अद्य रोचते) ज्यामुळें आज तें प्रकाशत आहे (अस्मिन् कः वर्णं आभरत्) त्यांत रंग कोणी भरला ॥ १६ ॥

(सर्वे देवा उपाशिक्षन्) सर्व देवांनीं उपदेश दिला (तत् सती वधूः अजानात्) तो सती वधूनें म्हणजे बुद्धीनें ग्रहण केला. (या वशस्य ईशा जाया) जी सर्वांस ताब्यांत ठेवणारी ईश–शक्ति नांवाची पत्नी आहे. (सा अस्मिन् वर्णं आभरत्) तिनें याच्यांत रंग भरला. [१७]

(यः त्वष्टुः पिता उत्तरः त्वष्टा) जो त्वष्ट्याचा पिता उच्चतर श्रेष्ठ त्वष्टा आहे त्यानें (यदा व्यतृणत्) जेव्हां या शरीरांत छिद्रें केलीं (मर्त्यं गृहं गृत्वा) तेव्हां मरणधर्म युक्त घर करून (देवाः पुरुषं आविशन्) देवांनीं पुरुष शरीरांत प्रवेश केला. [१८]

स्वप्नो वै तन्द्रीर्निर्ऋतिः पाप्मानो नाम देवताः। जरा खालत्यं पालित्यं शरीरमनु प्राविशन्॥ १९ ॥
स्तेयं दुष्कृतं वृजिनं सत्यं यज्ञो यशो बृहत्। बलं च क्षत्रमोजश्च शरीरमनु प्राविशन् ॥ २० ॥
भूतिश्च वा अभूतिश्च रातयोऽरातयश्च याः। क्षुधश्च सर्वास्तृष्णाश्च शरीरमनु प्राविशन् ॥ २१ ॥
निन्दाश्च वा अनिन्दाश्च यच्च हन्तेति नेति च। शरीरं श्रद्धा दक्षिणाश्रद्धा चानु प्राविशन्॥ २२ ॥
विद्याश्च वा अविद्याश्च यच्चान्यदुपदेश्यम्। शरीरं ब्रह्म प्राविशदृचः सामाथो यजुः ॥ २३ ॥
आनन्दा मोदाः प्रमुदोऽभीमोदमुदश्च ये। हसो नरिष्टा नृत्तानि शरीरमनु प्राविशन् ॥ २४ ॥
आलापाश्च प्रलापाश्चाभीलापलपश्च ये। शरीरं सर्वे प्राविशन्नायुजः प्रयुजो युजः ॥ २५ ॥
प्राणापानौ चक्षुः श्रोत्रमक्षितिश्च क्षितिश्च या। व्यानोदानौ वाङ्मनः शरीरेण त ईयन्ते ॥ २६ ॥
आशिषश्च प्रशिषश्च संशिषो विशिषश्च याः। चित्तानि सर्वे संकल्पाः शरीरमनु प्राविशन्॥ २७ ॥
आस्तेयीश्च वास्तेयीश्च त्वरणाः कृपणाश्च याः। गुह्याः शुक्राः स्थूला अपस्ता बीभत्सावसादयन्॥२८॥

अर्थ— (स्वप्नः तन्द्रीः निर्ऋतिः) निद्रा आलस्य आणि पापभावना या (पाप्मानः देवताः वै नाम) पापी नावाच्या देवता आहेत तसेंच (जरा खालत्यं पालित्यं) वृद्धावस्था टक्कल पडणें, अथवा लंगडत चालणें आणि केंस शुभ्र होणें हें सर्व (शरीरं अनुप्राविशन्) शरीरामध्यें प्रवेशले. [१९]

(स्तेयं दुष्कृतं वृजिनं) चोरी, दुराचार आणि कपट, (सत्यं यज्ञः बृहत् यशः) सत्य यज्ञ आणि मोठी कीर्ति (बलं च क्षत्रं ओजः च) बल, क्षात्रतेज आणि सामर्थ्य हें सर्व (शरीरं अनुप्राविशन्) शरीरामध्यें प्रविष्ट झाले. [२०]

(भूतिः च अभूतिः च) ऐश्वर्य आणि दारिद्र्य (रातयः याः अरातयः च) दान आणि कंजूषपणा (क्षुधः च सर्वाः तृष्णाः च) भूक आणि सर्व प्रकारची तहान (शरीरं अनुप्राविशन्) शरीरांत प्रविष्ट झाल्या. [२१]

(निन्दाः च वै अनिन्दाः च) निंदा आणि स्तुति (यत् च हन्त इति न इति च) जें हो आणि नाहीं म्हटलें जातें (श्रद्धा दक्षिणा अश्रद्धा च) श्रद्धा दक्षता आणि अश्रद्धा या सर्व शरीरांत प्रवेशून गेल्या. [२२]

(विद्याः च वै अविद्याः च) विद्या अविद्या (यत् च अन्यत् उपदेश्यं) जें दुसरें इतर उपदेश करण्याजोगें आहे तें (ऋचः साम अथो यजुः ब्रह्म शरीरं प्राविशत्) ऋग्वेद सामवेद यजुर्वेद आणि ब्रह्मवेद यांनीं शरीरांत प्रवेश केला. [२३]

(आनन्दाः मोदाः प्रमुदः ये अभीमोदमुदः च) आनंद, मोद, प्रमोद, आणि हास्यविनोद हे सर्व (हसः नरिष्टा नृत्तानि) हास्य मस्करी आणि नृत्य (शरीरं अनुप्राविशन्) या सर्वांनीं शरीरांत प्रवेश केला. [२४]

(आलापाः च प्रलापाः च ये अभीलापलपः) आलाप, प्रलाप, आणि वार्तालाप तसेंच (आयुजः प्रयुजः युजः) आयोजन प्रयोजन आणि योग हें (सर्वे शरीरं प्राविशन्) सर्व शरीरांत प्रवेशले. [२५]

(प्राणापानौ चक्षुः श्रोत्रं) प्राण अपान डोळे (दृष्टि) आणि कान (श्रवणशक्ति) तसेंच (अक्षितिः या च क्षितिः) अभौतिक आणि भौतिकशक्ति (व्यानोदानौ वाङ्मनः) व्यान, उदान, वाणी आणि मन (ते शरीरेण ईयन्ते) या शरीराबरोबर चालतात. [२६]

(आशिषः प्रशिषः च) आशीर्वाद आणि घोषणा (संशिषः च विशिषः च याः) संमति आणि विशेष अनुशासन (चित्तानि सर्वे संकल्पाः) चित्त आणि सर्व संकल्प (शरीरं अनुप्राविशन्) शरीरांत प्रविष्ट झाले. [२७]

(आस्तेयीः वास्तेयीः च) बसणें आणि राहणें (त्वरणाः याः कृपणाः च) त्वरा आणि कृपणता (गुह्याः शुक्राः स्थूलाः ताः अपः बीभत्सौ) गुह्य, वीर्य, स्थूल, जलरूप तसेंच बीभत्स भाव हे सर्व या शरीरासह (असादयन्) राहूं लागले. [२८]

अस्थि कृत्वा समिधं तदृष्टापो असादयन् । रेतः कृत्वाज्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ २९ ॥
या आपो याश्च देवता या विराड् ब्रह्मणा सह । शरीरं ब्रह्म प्राविशच्छरीरेऽधि प्रजापतिः ॥३०॥
सूर्यश्चक्षुर्वातः प्राणं पुरुषस्य वि भेजिरे । अथास्येतरमात्मानं देवाः प्रायच्छन्नग्नये ॥ ३१ ॥
तस्माद्वै विद्वान्पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते । सर्वा ह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ॥ ३२ ॥
प्रथमेन प्रमारेण त्रेधा विष्वङ् वि गच्छति । अद एकेन गच्छत्यद एकेन गच्छतीहैकेन नि षेवते॥३३॥
अप्सु स्तीमासु वृद्धासु शरीरमन्तरा हितम् । तस्मिञ्छवोऽध्यन्तरा तस्माच्छवोऽध्युच्यते ॥ ३४ ॥

अर्थ— (तत् अस्थि समिधं कृत्वा) त्या हाडांच्या समिधा करून (अष्ट आपः असादयन्) आठ प्रकारच्या पाण्यानें सर्व शरीराची रचना केली आहे. (रेतः आज्यं कृत्वा) वीर्याचें तूप करून (देवाः पुरुषं आविशन्) सर्व देवांनीं पुरुषांत प्रवेश केला. [२९]

(याः आपः याः च देवताः) जें पाणी आणि ज्या देवता आणि (या विराट् ब्रह्मणा सह) जें ब्रह्मासह विराट् आहे त्यांच्या बरोबर (ब्रह्म शरीरं प्राविशत्) ब्रह्मानें शरीरांत प्रवेश केला. (शरीरे अधि प्रजापतिः) शरीरांत तोच प्रजापति नांवाचा अधिष्ठाता आहे. [३०]

(पुरुषस्य चक्षुः सूर्यः) पुरुषाची दृष्टि सूर्य (प्राणं वातः विभेजिरे) आणि प्राण वायु असा विशिष्टरीतीनें विभाजन करून तयार केला आहे. (अथ अस्य इतरं आत्मानं) आणि त्याचा अन्य आत्मा (देवाः अग्नये प्रायच्छन्) देवांनीं अग्निजवळ दिला. [३१]

(तस्मात् वै विद्वान्) त्यामुळें खात्रीनें ज्ञानी विद्वान् (पुरुषं इदं ब्रह्म इति मन्यते) पुरुषाला हें ब्रह्म आहे असें समजतात. (हि सर्वाः देवताः अस्मिन् आसते) कारण कीं सर्व देव-देवतांचें त्याच्यांत वास्तव्य आहे. (गावः गोष्ठे इव) ज्याप्रमाणें सर्व गायी गोशाळेंत रहातात. [३२]

(प्रथमेन प्रमारेण) प्रथम मृत्यूनें (त्रेधा विष्वङ् विगच्छति) तीनप्रकारें सर्वत्रच जातो. (अदः एकेन गच्छति) तेथून एकासह जातो (इह एकेन निषेवते) येथें एकानें सेवन करतो. [३३]

(स्तीमासु अप्सु वृद्धासु) ओलें करणाऱ्या पाण्याची वाढ झाल्यानें (अन्तरा शरीरं हितं) त्याच्यांत शरीर ठेवण्यांत आलें. (तस्मिन् अंतरा अधिशवः) त्यामध्यें हें शवरूपी शरीर रहातें. (तस्मात् शवः अधि उच्यते) म्हणून त्यास शव असें म्हणतात. [३४]

शरीराची रचना

शरीराची रचना आणि योग्यता

सर्व प्राण्यांच्या शरीराची रचना विशेषतः अद्भुत आहे. त्यांत विशेषेकरून मनुष्यशरीराची रचना तर विचित्र, विलक्षण आहे म्हणजे चमत्कारिक आहे. मानवी शरीराची रचना ही जर परमात्म्याच्या कौशल्याची परमावधि म्हटली तर जराहि अतिशयोक्ति होणार नाहीं. या मानवी शरीराची रचना, त्यामध्यें आत्म्याचें वास्तव्य तसेंच संपूर्ण देवतांचें स्थान इत्यादि रहस्यमय वर्णन या सूक्तांत केलें आहे. त्या दृष्टीनें हें सूक्त अत्यंत महत्त्वाचें आहे.

एक संकल्प होता त्याची कन्या 'संकल्प शक्ति' होती या शक्तीचें लग्न व्हावयाचें होतें. दुसरा आत्मा होता आणि त्याचें मन्यु म्हणजे उत्साहरूपी सामर्थ्य होतें. त्याचा विवाह संकल्पशक्तीशीं करणें नक्की केलें. त्यांत वर पक्षांत आणि वधूपक्षांत पुष्कळ मंडळी होती. आणि त्यांत जो वर पक्षांत सर्व श्रेष्ठ होता, त्याचें नांव 'ज्येष्ठ वर' होतें, त्यालाच 'मन्यु' असें सुद्धां म्हणतात. (मं. १)

या महान् अमर्याद संसाररूपी समुद्रांत तप आणि कर्म हे दोन पक्ष आहेत. एकपक्ष तपश्चर्या करणाऱ्या संयमींचा आणि दुसरा पक्ष कर्म करणाऱ्यांचा होता. कर्म करणाऱ्यामध्यें सुद्धां एक सकाम

कर्म करणारे आणि इतर निष्काम कर्म करणारे होते याप्रमाणें उभयपक्षाचे लोक होते. यांतील कित्येक वधूपक्षाचे आणि बाकी वरपक्षाचे होते. त्यांत ब्रह्म हें (हा) प्रमुखवर होतें. (ता.) (मं. २)

दहा मोठे देव होते व त्यांचे दहा लहान पुत्र होते. हे सर्व देव आणि त्यांचे पुत्र कोण होते हें सर्व तत्त्व जो जाणतो त्यालाच महान् ब्रह्माचें ज्ञान प्राप्त होतें आणि तो दुसऱ्यास उपदेश करूं शकतो. म्हणून हें तत्त्वज्ञान प्राप्त करणें मनुष्याला अत्यंत आवश्यक आहे. (मं. ३)

प्राण, अपान, व्यान, उदान, डोळे, कान (क्षितिः = भूमितत्त्वापासून उत्पन्न) नाक, वाणी आणि मन, तसेंच (अ-क्षितिः = अभौतिक) बुद्धितत्त्व हे दहा देव आहेत, जे मानवी मनांत--शरीरांत वास्तव्य करतात. तेच निरनिराळ्या प्रकारचे संकल्प करतात. आणि मनुष्य चांगले आणि वाईट विचार करीत रहातो (मं. ४) त्यांत प्राण, अपान, व्यान आणि उदान हे प्राण आहेत आणि ते तप करणारे देव आहेत. म्हणजे ते निराहारी राहून भोग न घेता जन्मापासून मृत्युपर्यंत काम करीत रहातात. त्यामुळें त्यांना तप करणारे ऋषि म्हटलें आहे. दुसरे देव दृष्टि, कान, नाक, वाणी, आणि मन आहेत. ते काम करण्यांत लक्ष घालतात. कर्म करतांना ते थकून जातात, तेव्हां त्यांस विश्रांति द्यावी लागते. ते भोगसुद्धां उपभोगतात, ज्ञान मिळवितात आणि कांहीं कर्मसुद्धां करतात. त्यांस अन्न दिल्यानें ते समर्थ म्हणजे शक्तिसंपन्न रहातात आणि कार्यक्षम होतात. अन्न न मिळाल्यास ते कृश होतात आणि अति क्षीण होतात, काम करूं शकत नाहींत. प्राणाप्रमाणें ते भुकेले राहून तपश्चर्या करूं शकत नाहीत. डोळे, कान इत्यादींस विश्रांतीची जरुरी आहे, निद्रासुद्धां हवी, आणि भोगसुद्धां हवेत. येथें ' संकल्पशक्ति ' नांवाची एक दैवीशक्ति आहे. जिचें लग्न व्हावयाचें आहे. या वधुपक्षाबरोबर दृष्टि, कान, नाक वगैरे भोगविलासी लोक आहेत आणि वर पक्षाकडे प्राण, अपान, वगैरे तपस्वी लोक आहेत. याप्रकारें विवाह करण्यासाठीं या शरीररूपी मांडवांत हे सर्व एकत्र झाले आहेत आणि येथें ते मोठ्या थाटामाटानें विवाह संस्कार करणार आहेत.

सूर्य, चंद्र, वायु, वगैरे दहा मोठे देव या विश्वांत आहेत. त्यांची शक्ति फार मोठी आहे. या मोठ्या देवांचे अंशरूपानें लहान देव डोळे, मन, आणि प्राण वगैरे रूपानें या शरीरांत येवून रहातात. त्यांत कित्येक वधुपक्षाचे आणि कित्येक वरपक्षाचे आहेत. दोन्ही प्रकारच्या लोकांची येथें भेट होते. त्याचेंच नांव विवाह मंगलकार्य होय.

ऋतु, धाता, बृहस्पति, इंद्र, अग्नि, अश्विनौ देव हे सर्व देव जेव्हां स्वतःच्या स्थानीं रहात होते, आणि जेव्हां त्यांचे निरनिराळे अंश येथें निरनिराळ्या रूपांत अवतरले नव्हते तेव्हां जिथें रहात होते म्हणजे ज्या श्रेष्ठ देवाजवळ ते रहात होते त्या श्रेष्ठ देवाचें नांवच ' ज्येष्ठ ब्रह्म ' आहे. हें ज्येष्ठ ब्रह्म सर्व देवांसह रहात होतें आणि या महान् विश्वांत कार्य करीत होतें. परंतु तेथून या लहान्या विश्वांत म्हणजे शरीरांत येवून त्यांचें वास्तव्य झालें नव्हते. (मं. ५) म्हणजेही वेळा शरीररचनेच्या आधीची आहे. शरीररचनेचे वेळीं सर्व देवतांचे अंश येथें या पिंडदेहांत उतरून वास्तव्य करूं लागले. कित्येक स्वतः तप करीत राहिले, कित्येक स्वतःचीं कर्में करूं लागले. याप्रमाणें येथील संसार चालू झाला. त्याचें नांव शरीर निर्मिति होय.

तप आणि कर्म करणारे देव असें म्हणण्यांत आलें, येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं कर्मानेंच तप होतें. कर्म न केल्यास तप होत नाहीं. म्हणून कर्मच मुख्य आहे. श्रेष्ठ ब्रह्माची उपासना करणें हें सुद्धां एक पवित्र कर्मच आहे. (मं. ६) सर्व विश्वचक्र या कर्मामुळेंच चालू आहे. कर्माशिवाय कांहीं होत नाहीं. हें पाहून मनुष्यानें शुभ कर्म केलें पाहिजे.

या शरीराची रचना होण्यापूर्वी एक विस्तृत भूमि होती, तिचें नांव नैसर्गिक भूमि असें होतें. या भूमिवर या शरीराची रचना होते आणि अशी रचना करण्यासाठीं हे दहा देव अंशरूपानें येथें येतात, आणि शरीर निर्माण करतात. हें स्थान वगैरेचें नांव आणि त्यांचे धर्म जो कोणी जाणतो त्याला ' पुराण विद् ' असें म्हणतात. (मं. ७) जो प्रथम होतो आणि पुनः नवा झाला त्याला पुराण (पुरा अपि नवं) म्हणतात. हें सर्व यथातथ्य समजलें पाहिजे.

हे देव या पिंडशरीरांत येवून बसतात, ते कोठून येतात ? मूळ देव कोठें होते आणि ते येथें कोठून आले आणि कोणत्या स्थानीं राहिले ? त्याचा शोध करावयास हवा. (मं. ८) इंद्र, सोम, अग्नि, त्वष्टा आणि धाता हे मोठे देव. यांचेपासून लहान देवांची उत्पत्ति झाली. त्यांचीं नांवें सुद्धां तींच. जें पित्याचें नांव तेंच पुत्राचें, कारण नांव हें कांहीं गुणबोधक असतें, आणि पित्याचे गुण पुत्रांत उतरतात. म्हणून पित्याचें नांव पुत्रास देण्यांत येतें. म्हणून येथें इंद्रापासून इंद्र झाला असें म्हटलें आहे. (मं. ९) त्यांतील एक इंद्र विश्वात्म्याच्या विश्वरूपी शरीरांत रहाणारा आहे आहे आणि दुसरा त्याचा पुत्ररूपी इंद्र पिंड देहामध्यें रहाणारा आहे. याचप्रकारें इतर सर्व देवांविषयीं समजावें.

हे देव दहा आहेत आणि प्रत्येक मोठ्या देवाचा एक एक

अंशरूप पुत्र आहे. याप्रमाणें दहा मोठ्या देवांचे दहा पुत्र या पिंड देहांत येऊन रहातात. पिंडदेहांत हे दहा देव दहा स्थानीं रहातात. या दहा देवांनीं स्वतःच्या दहा पुत्रांस निर्माण केलें आणि त्यांस या पिंड देहांत यथायोग्य स्थानीं बसविलें. आणि स्वतः स्वतःच्या मूळस्थानीं जाऊन राहिले. (मं. १०) विश्वांत मोठा सूर्य आहे. त्याचा अंशरूपी पुत्र नेत्रेंद्रिय ' (दृष्टि) त्याला त्याच्या स्थानीं बसवून सूर्यदेव स्वतःच्या द्युलोकांतील स्थानीं विराजमान झाला. याचप्रमाणें इतर सर्व देवांविषयीं समजावें. प्रत्येक देवतेचें नांव घेऊन त्याविषयीं पुनः पुनः लिहिण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. देवांच्या अंशावताराची जी कल्पना पुराण वाङ्मयांत आहे ती हीच. प्रत्येक देवाचा अंशरूपी अवतार मनुष्यांत–मानवदेहांत (अथवा प्राण्याच्या देहांत) झाला आहे. या अंशरूप देवांनाच अवतार असें म्हणतात. मोठ्या देवाचा एक लहान अंश उतरला आहे आणि या पतनशील देहाचें तारण करण्यासाठीं येथें राहिला आहे. जेव्हां हा अंशावतार येथून निघून जाईल, तेव्हां या देहाचें पतन होईल. नंतर हा देह फिरून उठणार नाहीं. तो जाळून टाकण्यांत येतो अथवा त्या[illegible] त्याग करण्यांत येतो. देवांनीं पावन करण्याच्या अवस्थे[illegible] देह पवित्र मानला जातो. देवांच्या अभावीं त्यास शिवण्यास सुद्धां कोणी तयार होणार नाहीं. जेव्हां या शरीरांत निरनिराळ्या देवांनीं येऊन येथें केंस, हाडें, स्नायु, मांस, मज्जा इत्यादि भरलें आणि शरीर हात, पाय वगैरे अवयवांनी युक्त केलें त्यानंतर ते देव कोठें गेले ? (मं. ११) म्हणजे देवांनीं स्वतःचें कार्य केल्यानंतर ते येथेंच राहिले अथवा येथून निघून गेले. त्याचें उत्तर असें आहे कीं ते येथें वास्तव्य करून राहिले आहेत. कारण कीं मृत्युनंतरच अथवा मृत्युसमयींच हा पिंड देह सोडून ते जातात. या शरीरांत कोणते देव कोठें रहातात त्याचें ज्ञान उपनिषदांच्या व इतर ग्रंथाच्या आधारें खालीं दिल्याप्रमाणें आहे—

विश्वांतील देव	मानवशरीरांतील देवतांश
परब्रह्म	जीव, आत्मा
सूर्य	नेत्र (दृष्टि)
भूमि	नासिका (नाक)
आपः	रसना (जिह्वा)
अग्नि	वाणी (वाक्) मुख
दिशा (आकाश)	कान
वायु, रुद्र,	प्राण, त्वचा
औषधि, वनस्पतयः	केंस
लोहिनीः आपः	रक्त, रुधिर,
द्यौः	मस्तिष्क, मस्तक, डोकें
अंतरिक्ष	(बेंबी) नाभि, उदर, पोट, छाती.
पृथ्वी	पाय
पर्वत (पर्ववान्)	पर्व (पेर) जोड, सांधा,
मृत्यु–आपः	वीर्य (रज)
अश्विनौ	श्वास–उच्छ्वास

यात्रकारें अनेक देवांचे अंश येथें शरीरांत येऊन राहिले आहेत. तेच देवतांचे अंशावतार आहेत. त्याचें वर्णन उपनिषदांत विस्तारानें केलें आहे. विशेषतः ऐतरेय उपनिषदांत हें वर्णन जास्त स्पष्ट आहे. केंस स्नायु, मज्जा, हाडें, पर्व–सांधा मांस वगैरे कोठून कशाचें आणि कशारीतीनें भरण्यांत आलें असा प्रश्न (मं. १२ मध्यें) विचारला आहे, वरील कोष्टक पाहिल्यानें त्याचें उत्तर मिळूं शकतें.

या देवतांचें नांव ' संसिच ' आहे. संपूर्णपणें सिंचन करणारे, सिंचणारे म्हणजे स्वतःचें स्थान सजीवन करणारे, जीवित करणारे हे देव आहेत. या सर्व देवांनीं (सर्वं मर्त्यं संसिच्य) सर्व मरणधर्मानें युक्त अशा अंग–अवयवांस अथवा शरीरास जीवनधर्मे युक्त केलें आहे. त्या कार्यासाठीं हे सर्व देव (पुरुषं आविशन्) मानवदेहांत येवून बसले आहेत. या शरीरांत शिरून स्वतः स्वतःच्या स्थानीं राहिले आहेत. (मं. १३)

कोणत्या शक्तीनें ऊरू म्हणजे मांड्या, पाय, जानु म्हणजे गुडघे, शिर म्हणजे डोकें, पाठ, फांसळ्या, पोटऱ्या, जिह्वा, मान, गळा, गळ्याचीं हाडें, त्वचा हे सर्व भाग बनविले अथवा जोडले ? (मं. १४–१५) निरनिराळ्या देवांनीं स्वतःचीं कामें करीत स्वतःचे अवयव स्वतः तयार केले, आणि ' संधा ' नांवाची देवता आहे. तिनें ते सर्व जोडले आणि तसे जोडल्यामुळें हें शरीर अखंड एकसें झालें आहे. त्यांत रंग, रूप, शोभा तेज वगैरे भरणारी सुद्धां एक देवता आहे. (मं. १६)

हे सर्व देव एकत्रित झाले, या देवांचें येथें संमेलन झालें ही गोष्ट एक सतीदेवीनें जाणली, तीच सतिदेवी सर्व अवयवांना आपल्या ताब्यांत ठेवणारी आत्मदेवाची पत्नी आहे. ही पत्नी येथील म्हणजे या शरीराची कांति, शोभा, आणि रमणीयता, टिकवणारी आहे. (मं. १७) ही वधू आणि वराचें लग्न झाल्याचें वर्णन या सूक्तांतील पहिल्या दोन मंत्रांत आहे.

हे सर्व देव महान् कारागीर आहेत. त्यामुळें त्वष्टा हें नांव कारागीर देवतेचें असतें. जे लहान देव या शरीराची कारागिरी करण्यास येथें येतात त्यामध्यें जो सर्व देवांचा अधिष्ठाता देव आहे तो सर्व कारागीरांचा कारागीर असल्यानें त्याला ' त्वष्टा ' म्हणतात. त्याचा पिता परमात्मा, सर्व देवांचा देव, सर्व कारा

*

गीरीचा कारागीर सर्वांचा उपरि होऊन रहातो. तोसुद्धां महान् ' त्वष्टा ' आहे. त्याच्यापासून शक्ति मिळवून जेव्हां लहान कारागीर या शरीरांत छिद्रें पाडतात, तेव्हां एक एक छिद्रांतून एक एक देव प्रवेश करतो. आणि स्वतःच्या स्थानीं रहातो. या (**मर्त्यं गृहं कृत्वा**) मर्त्यघराची चांगली व्यवस्था करून (**देवाः पुरुषं आविशन्**) सर्व देवांनीं मनुष्य शरीरांत प्रवेश करून ते स्वतःच्या स्थानीं राहिले. (मं. १८) खरें पाहिलें तर हें घर मरणारार्चे आहे. परंतु याच्यांत देवांच्या अमर शक्ति रहात असल्या कारणानें हा मरणारा देह अमर असल्यासारखा होऊन जातो. जेव्हां देव येथील यज्ञ पूर्ण करून येथून निघून जातात तेव्हां हा देह मरतो. देवांच्या अमर शक्तींचा अनुभव असा आहे.

या शरीरांत निद्रा-जागृति, तन्द्री (सुस्ती)-उद्योगिता, निर्ऋति (पाप वासना)-पुण्यभावना, पाप-पुण्य, जरा (वृद्धत्व) तारुण्य, खालित्य (टकल पडणें)-पुष्कळ केंस असणें, पालित्य (श्वेतत्व-कृष्णत्व) केंस पांढरे अथवा काळे असणें, स्तेय (चोरी) अस्तेय, दुष्कृत्य-सुकृत, वृजिनं (कपट)-सरलता, सत्य-असत्य, यज्ञ-अयज्ञ, यश-अपयश, बळ-अशक्तता, क्षात्र-निर्बलता, ओज (शरीराची कांति अथवा शक्ति)-अशक्ति, भूति (ऐश्वर्य)-अभूति (निर्धनता-दारिद्र्य) (**राति**) दान (**अराति**) कंजुषपणा, क्षुधः (भूक)-भूक न लागणें तृष्णा- (तहान)-तहान न लागणें, निंदा-स्तुति (अनिंदा), हो आणि नाहीं म्हणणें (**हन्त इति न इति**) श्रद्धा-अश्रद्धा, दक्षता-अदाक्षिण्य, विद्या-अविद्या, ज्ञान-अज्ञान, आनंद-दुःख, मोद-कष्ट, हास्य-रडणें, नरिष्ट (**अनाश**)- नाश, नृत्य-अनृत्य, आलाप-प्रलाप-मौन, प्रयोग-वियोग हे सर्व भाव शरीरांत होऊं लागले. हे भाव शरीरांत स्पष्ट दिसूं लागले. (मं. १९-२५)

प्राण, अपान, व्यान उदान चक्षु, श्रोत्र. क्षिति-अक्षिति, वाणी, मन, या दहा शक्ति शरीरांत रहातात, आणि बाहेरील कार्यें करितात. (मं. २६)

आशीर्वाद-शाप, अनुकूल-प्रतिकूल शब्द, संकल्प-विकल्प, स्थिरता-चांचल्य, त्वरा-शांति, कृपणता-उदारता, गुह्य-प्रगट, शुक्र-निर्वीर्य, स्थूल-कृश, बीभत्स-सभ्यता हे सर्व भाव शरीरांत प्रवेशले. (मं. २८-२९) या यज्ञाच्या हवनासाठीं रेत (वीर्याचें) तूप करून, त्या रेताची आहुति स्त्री गर्भाशयांत टाकावयाची असते. त्या रेताबरोबर सर्व देव शरीरांत प्रवेश करतात. वीर्याच्या प्रत्येक अणूमध्यें पित्याच्या संपूर्ण शरीराचा म्हणजे त्या शरीरांतील प्रत्येक इंद्रियाचा सत्त्वांश रहातो. आणि त्या सत्त्वांशासह पित्याच्या शरीरांतील देवतांश पण रहातात. अथवा देवतांशानांच सत्त्वांश समजा पित्याप्रमाणेंच पुत्राच्या शरीराचीं अंग-प्रत्यंगें असतात. त्याचें हेंच कारण आहे. या रेतांत शरीराचें सर्व सत्त्व असतें. म्हणून पुत्र मोठा होऊन पित्या समान होतो. त्यामुळें रेताचें तूप करून देव शरीरांत कसा प्रवेश करतात आणि सर्वत्र प्रसरतात ही गोष्ट वाचकांच्या स्पष्ट ध्यानीं येईल.

त्या सर्व देवता आहेत, जें पाणी आहे, जें ब्रह्म आहे. त्यासह विराट् पुरुष आहे. हे सर्व देव रेताबरोबर शरीरांत प्रवेश करतात. (मं. ३०) पाणी तर प्रवाही पदार्थ आहे. तो गर्भाशयांत रहातो. त्यांत वीर्यासह देवतांश पोहोंचतात. विराट् पुरुषाचें सर्व सत्त्व तेथें पोहोंचतें, स्वतः ब्रह्माचा अंश जीव भावानें तेथें पोहोंचतो या ब्रह्माच्या अंशावर सर्व देव स्वतः त्या स्थानीं रहातात. आणि तेथील अवयवास स्वतःस राहण्यायोग्य तयार करतात. प्रत्येक स्थानीं योग्य छिद्र पाडतात आणि तेथें उत्तम रीतीनें रहातात. त्या शरीरांत प्रजापति संज्ञक जीवात्मा होऊन सर्वांचें पालन करतो जोपावेतों तो या शरीरांत रहातो, तोपर्यंतच देवांचा निवास येथें असतो. जेव्हां हा ब्रह्मांश शरीर सोडून निघून जातो तेव्हां इतर देवहि तें स्थान सोडून त्याच्या बरोबरच निघून जातात. अशाप्रकारें जीवात्मा त्यांचा पालक असल्यानें त्याला शरीरांत प्रजापति म्हटलें आहे.

मनुष्याच्या शरीरांत सूर्य, दृष्टि होतो, वायु प्राण होतो, आणि इतर देव इंद्रियांच्या स्थानांत रहातात, येथें सर्वांस उष्णता पुरविण्याचें कार्य अग्नि करतो. (मं. ३१) जेव्हां अग्निदेव स्वतःचें काम स्थगित करतो तेव्हां हें शरीर थंड होऊन जातें. आणि इतर देव येथें राहाण्यास असमर्थ होतात.

ज्याप्रमाणें गोठी वाड्यांत गाई रहातात, त्याप्रमाणें सर्व देवता या शरीरांत रहातात. ज्या देवतेस जेथें रहाणें योग्य असेल तेथेंच त्या देवता रहातात. या सर्व देवता जणूं गाई आहेत आणि सर्व गाई या शरीररूपीं गोठीवाड्यांत रहातात. या सर्व देवतारूपीं गाईंचा एक गवळी गुराखी आहे. त्याचें नांव आत्मा. ज्या ब्रह्माचा अंश येथें रहातो त्याचें चित्र या प्रकारचें असूं शकेल—

ब्रह्म	जीवात्मा
इंद्र, सूर्य, वायु, अग्नि वगैरे सर्व देव	देवतांश मन, दृष्टि, प्राण, वाणी वगैरे देवांचें अंश

मोठी गौ-शाळा आणि विश्व-विराट्

असें या गोशाळेचें वर्णन आहे. ही गोशाळा म्हणजे स्वतःचें शरीर होय. त्यांत सर्व इंद्रिय स्थानीं देव गोरूपी आहेत. आणि त्यांचा अधिष्ठाता आत्मा त्यांचा गुराखी आहे, गोपाल भगवान् आहे. तोच अंशरूपानें येथें आला आहे आणि सर्वांचें तारण करतो. त्यामुळेंच त्या पुरुषाला (इदं ब्रह्म) ' हा ब्रह्म आहे ' असें म्हणतात. कारण की सर्व देव-देवता त्याच्या आधीन आहेत. (मं. ३२)

येथें गाई आणि गुराख्याचा दृष्टांत वाचकांनीं मननपूर्वक पहावा—

या पुरुषांत तीन भाग आहेत. एक भाग येथील पार्थिवभोग भोगूं शकतो, दुसरा भाग दिव्य सुखाची प्राप्ति करूं शकतो आणि तिसरा भाग स्थूल-सूक्ष्म-कारण नांवानें प्रख्यात आहे--

लहान गोशाळा—देह (शरीर)

गर्भाशयांत जेव्हां वीर्य बिंदु शिरतो तेव्हां तो तेथें रजामध्यें स्थिर होतो आणि गर्भ वाढीस लागतो. तेथें बुडबुड्याची अवस्था असल्यामुळें पाण्यांत प्रेत जसें तरंगते तद्वत् गर्भ तरत असतो व वाढतो, त्याच्या चारी बाजूंस एक प्रकारचें पाणी असतें. पाण्यामुळें त्याचें रक्षण होतें. या पाण्यांत तो रहातो त्यामुळें त्यास शव अथवा (के-शव) पाण्यांत शवरूप असें म्हणतात (मं. ३४)

अशा प्रकारें या शरीराची रचना हें देवाचें एक विलक्षण कार्य आहे. ही एक अद्भुत रचना आहे. ही एक आश्चर्यकारक घटना आहे. हेंच देवाचें मंदिर आणि हाच सप्तऋषींचा आश्रम आहे. प्रत्येक मनुष्यास तो प्राप्त झाला आहे. त्याला स्वतःच्या तपश्चर्येनें उन्नतिकडे वळवून साधकानें स्वतःचें जीवन सफल करावें.

अंजन

कांड ४, सूक्त ९

(ऋषिः - भृगुः । देवता - त्रैककुदाञ्जनम् ।)

एहिं जीवं त्रायमाणं पर्वतस्यास्यक्ष्यम् । विश्वेभिर्देवैर्दत्तं परिधिर्जीवनाय कम् ॥ १ ॥
परिपाणं पुरुषाणां परिपाणं गवामसि । अश्वानामर्वतां परिपाणाय तस्थिषे ॥ २ ॥
उतासि परिपाणं यातुजम्भनमाञ्जन । उतामृतस्य त्वं वेत्थाथो असि जीवभोजनमथो हरितभेषजम् ॥ ३ ॥

अर्थ— (जीवं त्रायमाणं) जीवाचें रक्षण करणारा, (पर्वतस्य अक्षं) पर्वतापासून प्राप्त होणारा आणि डोळ्यांस (दृष्टीला) लाभकारक (विश्वेभिः देवैः दत्तं) सर्व देवांनीं दिलेलें (कं) सुख स्वरूप (जीवनाय परिधिः असि) जीवनास रक्षणासाठीं सभोंवार कोटासारखें आहे, असा तूं (एहि) येथें ये. [१]

तूं (पुरुषाणां परिपाणं) पुरुषांचा रक्षक (गवां परिपाणं असि) गाईचा रक्षक आहेस (अर्वत अश्वानां) वेगानें धांवणाऱ्या घोड्यांच्या (परिपाणाय तस्थिषे) रक्षणासाठीं तूं रहातोस. [२]

हे (अञ्जन) अंजना ! तूं (उत परिपाणं असि) खरोखर संरक्षक आहेस, आणि (यातुजम्भनं) वाईटाचा नाश करणारा आहेस. (उत त्वं अमृतस्य वेत्थ) आणि तूं अमृतास जाणतोस. (अथो जीव-भोजनं असि) आणि जीवांची पुष्टि करणारा आहेस, (अथो हरित-भेषजं) तसेंच पंडुरोगाची औषधि आहेस. [३]

भावार्थ— प्राणीमात्रास अपमृत्युपासून वांचविणारा, जीवनांत साहाय्यक, दृष्टीस हितकारक, सर्व देवापासून प्राप्त, आणि पर्वतावर उगवणाऱ्या वनस्पतींपासून तयार केलेल्या अंजन आम्हांस प्राप्त होवो. [१]

मनुष्य, गाय, घोडा यांसाठीं सुद्धां ते अत्यंत कल्याणकार आहे. [२]

हें अंजन उत्तम संरक्षक, वाईटपणास दूर करणारें, मृत्युस दूर सारणारें, पुष्टि देणारें, आणि पांडु रोगाचा नाश करणारें आहे. [३]

यस्याञ्जन प्रसर्पस्यङ्गमङ्गं परुष्परुः । ततो यक्ष्मं वि बाधस उग्रो मध्यमशीरिव ॥ ४ ॥
नैनं प्राप्नोति शपथो न कृत्या नाभिशोचनम् । नैनं विष्कन्धमश्नुते यस्त्वा बिभर्त्याञ्जन ॥ ५ ॥
असन्मन्त्राद्दुष्वप्न्याद्दुष्कृताच्छमलादुत । दुर्हार्दश्चक्षुषो घोरात्तस्मान्नः पाह्याञ्जन ॥ ६ ॥
इदं विद्वानाञ्जन सत्यं वक्ष्यामि नानृतम् । सनेयमश्वं गामहमात्मानं तव पूरुष ॥ ७ ॥
त्रयो दासा आञ्जनस्य तक्मा बलास आदहिः । वर्षिष्ठः पर्वतानां त्रिककुन्नाम ते पिता ॥ ८ ॥
यदाञ्जनं त्रैककुदं जातं हिमवतस्परि । यातूंश्च सर्वाञ्जम्भयत्सर्वाश्च यातुधान्यः ॥ ९ ॥

अर्थ- हे (अञ्जन) अंजना ! (यस्य अंगं अंगं परुः परुः प्रसर्पसि) ज्याच्या अंगप्रत्यंगात आणि सांध्यासांध्यातें तूं व्यापून रहातोस, (ततः यक्ष्मं वि बाधसे) तेथून रोगास दूर करतोस, (मध्यमशीः उग्रः इव) मध्यस्थानी रहाणाऱ्या प्राणाप्रमाणें तूं उग्र आहेस. [४]

हे अंजना ! (यः त्वा बिभर्ति) जो तुला धारण करतो, (एनं शपथः न प्राप्नोति) त्याला दुष्ट भाषण प्राप्त होत नाहीं, (न कृत्या) हिंसक कर्मसुद्धां प्राप्त होत नाहीं. (न अभिशोचनं) अथवा शोक त्याच्या जवळहि येत नाहीं. (विष्कन्धं एनं न अश्नुते) पीडा त्यास वेढून टाकीत नाहीं. [५]

हे अंजना ! तूं (असन्मंत्रात्) वाईट सल्ल्यापासून (दुष्वप्न्यात्) वाईट स्वप्नापासून (दुष्कृतात्) दुष्ट कर्मापासून (शमलात्) अशुद्धीपासून (उत दुर्हार्दः) दुष्ट हृदयापासून (तस्मात् घोरात् चक्षुषः) या भयंकर नेत्रविकारापासून (नः पाहि) आमचें रक्षण कर. [६]

हे अंजना ! (इदं विद्वान्) ही गोष्ट जाणणारा मी (सत्यं वक्ष्यामि) सत्य बोलतों (न अनृतं) असत्य बोलत नाहीं, हे (पुरुष) मनुष्या ! (तव अश्वं गां आत्मानं) तुझ्या घोड्याला, गाईला आणि आत्म्याला (अहं सनेयं) मीं आरोग्य देतों. [७]

(तक्मा बलासः आत् अहिः) ताप, कफरोग आणि उदावर्त रोग अथवा सर्प हे (त्रयः आञ्जनस्य दासाः) तीन आंजनाचे दास आहेत. (पर्वतानां वर्षिष्ठः) पर्वतामध्यें श्रेष्ठ (त्रिककुत् नाम ते पिता) त्रिककुद् नांवाचा तारा तुझा पालक आहे. [८]

(यत् त्रैककुदं आञ्जनं) जे त्रिककुदापासून तयार केलेलें आंजन आहे (हिमवतः परि जातं) बर्फयुक्त पर्वतावर उत्पन्न झालेलें, तें (सर्वान् यातून् जम्भयत्) सर्व पीडकांना दूर करून (सर्वाः यातुधान्यः च) सर्व दुष्टांना दूर करतो. [९]

भावार्थ— हें अंजन ज्याच्या अवयवांत आणि सांध्यांत पोहोंचतें त्यांचा रोग हटवितें. [४]

जे लोक हें अंजण डोळ्यांत घालतात, त्यांना दुष्ट भाषण शिव्या, शाप, हिंसक कर्म, इतर शोकाची कारणें आणि दुसऱ्या पीडा कष्ट देत नाहींत. [५]

या अंजनामुळें वाईट विचार, वाईट संमति, दुष्टस्वप्न, दुष्टकर्म, अशुद्धता, हृदयाचे दुष्ट भाव, आणि डोळ्याचे भयंकर रोग दूर होतात. [६]

मीं या अंजनाचें गुण जाणतो म्हणून सत्यच सांगतों की याच्यामुळें मनुष्य, घोडा, गाय वगैरेंना आरोग्य प्राप्त होतें. [७]

ज्वर, क्षय, कफविकार, उदावर्त नांवाचें पोटाचें दुःख अथवा सापाचें विष इत्यादि या अंजनाच्या प्रयोगानें दूर होतात. उंच पर्वतावरील पदार्थांपासून तें तयार होतें. [८]

या अंजनानें सर्व प्रकारचे दुःख पीडा दूर होतात. [९]

यदि॑ वासि॒ त्रैक॑कुदं य॒दि या॑मु॒नमु॒च्यसे॑ । उ॒भे ते॑ भ॒द्रे नाम्नी॒ ताभ्यां॑ नः पाह्याञ्जन ॥ १० ॥

अर्थ—(**यदि वा त्रैककुदं असि**) जर तूं तीन ककुदांपासून उत्पन्न झाला असशील (**यदि यामुनं उच्यसे**) जर तुला यामुन म्हणत असतील, (**ते उभे नाम्नी भद्रे**) तुझी दोन्हीं नांवें कल्याण सूचक आहेत. हे अंजना ! (**ताभ्यां नः पाहि**) त्यापासून आमचें रक्षण कर. [१०]

भावार्थ—त्रैककुद आणि यामुन हीं त्याचीं नांवें आहेत. त्यामुळें कल्याण होतें. त्यापासून आमचें सुद्धां रक्षण होवो.[१०]

अंजन

अंजन

वैद्यशास्त्रांत अंजनाचीं मुख्य दोन नांवें आहेत. ' **यामुनं** ' अथवा, **यामुनेयं** आणि **सौवीरांजनं**, ' त्याचे पर्याय शब्द, **पार्वतेयं, अंजनं, यामुनं कृष्णं नादेयं, मेचकं, स्रोतोजं, दुःस्वप्नदं, नीलं, सुवीरजं, नीलांजनं, चाक्षुष्यं, वारिसंभवं, कपोतकं,** असे आहेत. (रा. नि. व. १३)

या नांवांत, ' **पार्वतेयं, यामुनं** ' हे दोन शब्द आहेत. हेच दोन शब्द या सूक्ताच्या पहिल्या आणि दहाव्या मंत्रांत अनुक्रमे येतात. दुसऱ्या मंत्रांत सुद्धां आहेत, पहा—

पर्वतस्य असि । (मं. १)
पर्वतानां त्रिककुदं० ते पिता (मं. ८)
त्रैककुदं आंजनं हिमवतस्परिजातं । (मं. ९)
त्रैककुदं (आंजनं) यामुनं उच्यते । (मं. १०)

' हें आंजन पर्वतापासून निर्माण झालें आहे. अंजनाचा पिता पर्वत आहे. हिमवत् पर्वतावर हें आंजन होतें. त्याला यामुन म्हणतात. ' म्हणजे वैदिक शब्दांचा अर्थ वैद्यक ग्रंथाच्या वर्णनानें या प्रकारें स्पष्ट होतो. आंजनाचें गुण वैद्यक ग्रंथांत याप्रकारचें सांगितलें आहेत—

शीतलं तीक्ष्णं स्वादु लेखनं कटु चक्षुष्यं तिक्तं ग्राहकं मधुरं स्निग्धं, हिक्काक्षयपित्तविषकफघ्नं नेत्रदोषहरं वातघ्नं श्वासहरं रक्तपित्तघ्नं च । (वै. निघं.)

शीतलं कटु तिक्तं कषायं चक्षुष्यं रसायनं कफवातविषघ्नं च ॥ (रा. नि. व. १३)

हे वैद्यक ग्रंथांत सांगितलेले अंजनाचे गुण आहेत. त्यांतील कित्येक गुण या सूक्तांत सुद्धां सांगितले आहेत. पहा—

१ **अक्ष्यं** (मं. १) दृष्टीस हितकारक ' **घोरात् चक्षुषः पाहि** ' (मं. ६) डोळयाच्या भयंकर रोगापासून वाचवो. हाच भाव वैद्यक ग्रंथांत ' **चक्षुष्यं, नेत्रदोषहरं** ' या शब्दांनीं वर्णिला आहे.

२ (मं. ८ मध्यें) **तक्मा** (क्षयज्वर) **बलास** (कफश्वास) आणि **अहिः** (सर्प विष) चें शमन अंजनानें होतें असें वर्णन आहे. तीच गोष्ट वरील वैद्यक ग्रंथाच्या वर्णनांत ' हिक्का (श्वास), क्षय (क्षयरोग), विष (विषबाधा) वगैरेंचा नाश करणारें ' या शब्दांनीं सांगितली आहे.

या सूक्तांत हृदय वगैरे आंतील अवयवावर सुद्धां या अंजनाचा प्रभाव पडतो असें सांगितलें आहे. विचार वगैरेंची शुद्धता होतें आणि मनुष्य तसेंच पशूंच्या शरीरांतील अनेक रोग दूर होतात, असें म्हटलें आहे. तेंसुद्धां वैद्यकग्रंथांत ' **कफपित्तवातघ्नं** ' म्हणजे कफ, पित्त, वात या तीनहि दोषांचें शमन करणार वगैरे वर्णन स्पष्ट आहे, कफपित्त वाताच्या प्रकोपानें सर्व रोग उत्पन्न होतात, आणि त्यांच्या प्रकोपाचें शमन या अंजनानें होतें. म्हणून सर्व रोग दूर करणारें हें अंजन आहे. या दृष्टीनें या सूक्ताच्या २ ते ८ पर्यंतच्या मंत्रांत सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून बोध प्राप्त घ्यावा. हें सूक्त सुबोध आहे आणि विषय उपयोगी आहे. म्हणून वैद्यांनीं हें अंजन निर्माण करण्याचा विधि नक्की करून तो प्रसिद्ध केला पाहिजे.

पाशांतून मुक्ति

कांड ६, सूक्त ११२

(ऋषिः - अथर्वा । देवता - अग्निः ।)

मा ज्येष्ठं वधीदयमग्न एषां मूलबर्हणात्परि पाह्येनम् ।
स ग्राह्याः पाशान्वि चृत प्रजानन्तुभ्यं देवा अनु जानन्तु विश्वे ॥ १ ॥
उन्मुञ्च पाशांस्त्वमग्न एषां त्रयस्त्रिभिरुत्सिता येभिरासन् ।
स ग्राह्याः पाशान्वि चृत प्रजानन्पितापुत्रौ मातरं मुञ्च सर्वान् ॥ २ ॥
येभिः पाशैः परिवित्तो विबद्धोऽङ्गेअङ्ग आर्पित उत्सितश्च ।
वि ते मुच्यन्तां विमुचो हि सन्ति भ्रूणघ्नि पूषन्दुरितानि मृक्ष्व ॥ ३ ॥

अर्थ— हे अग्ने ! (अयं ज्येष्ठं मा वधीत्) या मोठ्या भावाचा वध करूं नकोस. (एषां मूलबर्हणात् एनं परिपाहि) त्यांच्या मूळ विच्छेदापासून त्यांचें रक्षण कर. (सः प्रजानन्) ते तूं जाणतोस. (ग्राह्याः पाशान् विचृत) जखडून टाकणाऱ्या रोगांच्या पाशांपासून मुक्त कर. (विश्वेदेवाः तुभ्यं अनुजानन्तु) सर्व देव तुला अनुमति देवोत. [१]

(त्वं पाशान् उन्मुञ्च) तूं पाश सोडून टाक. (येभिः त्रिभिः एषां त्रयः उत्सिताः आसन्) ज्या तिघामुळें त्यांचे तिघेजण बंधनांत पडले आहेत. (सः प्रजानन्) तें तूं जाणतोस. (ग्राह्याः पाशान् विचृत) जखडून टाकणाऱ्या रोगांच्या पाशांपासून मुक्त कर (पितापुत्रौ मातरं सर्वान् मुञ्च) पितापुत्र आणि माता या सर्वांस सोडून दे. [२]

(येभिः पाशैः परिवित्तः विबद्धः) ज्या पाशांनीं मोठ्या भावाचा प्रथम विवाह करणारे बांधले गेले आहेत (अंगे अंगे आर्पितः उत्सिताः च) प्रत्येक अंग जखडलें बांधले गेलें आहे, (ते विमुच्यन्तां) ते तुझे पाश मोकळे होवोत. (हि विमुचः सन्ति) कारण ते मोकळे झाले आहेतच. हे (पूषन्) पोषक देवा ! (भ्रूणघ्नि दुरितानि मृक्ष्व) गर्भाचा घात करणाऱ्यामध्यें जीं पापें असतील तीं दूर कर. [३]

भावार्थ— लहान भाऊ मोठ्या भावाच्या नाशास उद्युक्त न होवो. कोणाचें मूळ उखडले न जावो. रोग मूळांतून दूर होवो आणि सर्व देवता अनुकूल होवोत. [१]

सर्व बंधनाचे पाश तोडून टाक. तीन गुणांनीं तीन लोक बांधले गेले आहेत. रोग मूळांतुन दूर होवो. आणि मातापिता तसेंच पुत्र कष्टापासून बचोत. [२]

मनाच्या दुर्बलतेमुळें मोठ्या भावाआधीं लहान भाऊ लग्न करतो, ते लोभाचे पाश सर्व अवयवास बंधनकारक होतात. ते पाश मोकळे होवोत आणि गर्भपात वगैरे प्रकारचे सर्व दोष दूर होवोत. [३]

सूक्त ११० प्रमाणेंच हें सूक्त आहे म्हणून त्याच्यासह हें वाचकानें वाचावें आणि विचार करावा. गृह सुख वाढविण्यासाठीं चांगला उपदेश या सूक्तांत दिलेला आहे.

दोन देवांचा सहवास

कांड ७, सूक्त २९

(ऋषिः - मेधातिथिः। देवता - अग्राविष्णू।)

अग्नाविष्णू महि तद्वां महित्वं पाथो घृतस्य गुह्यस्य नाम ।
दमेदमे सप्त रत्ना दधानौ प्रति वां जिह्वा घृतमा चरण्यात् ॥ १ ॥
अग्नाविष्णू महि धाम प्रियं वां वीथो घृतस्य गुह्या जुषाणौ ।
दमेदमे सुष्टुत्या वावृधानौ प्रति वां जिह्वा घृतमुच्चरण्यात् ॥ २ ॥

अर्थ— हे (अग्नाविष्णू) अग्नि आणि विष्णो ! (वां तत् महि महित्वं नाम) तुमच्या दोघांचें तें महान् पूर्ण यश आहे, कीं तुम्हीं दोघे (गुह्यस्य घृतस्य पाथः) गुप्त तुपाचें पान करतां तसेंच (दमेदमे सप्त रत्ना दधानौ) प्रत्येक घरांत सात रत्न धारण करतां आणि (वां जिह्वा घृतं प्रति आ चरण्यात्) तुमची दोघांची जीभ प्रत्येक यज्ञांत रसास प्राप्त करते. [१]

हे अग्नि आणि विष्णु ! (वां धाम महि प्रियं) तुमचें स्थान मोठें प्रिय आहे त्यामुळें (घृतस्य गुह्या जुषाणौ वीथः) तुपाच्या गुप्तरसाचें सेवन करून प्राप्त करतां (दमे दमे सुष्टुत्या वावृधानौ) प्रत्येक घरांत उत्तम स्तुतीनें वृद्धि प्राप्त करून (वां जिह्वा घृतं प्रति उत् चरण्यात्) तुमची दोघांची जीभ त्या तुपास प्राप्त करते. [२]

भावार्थ— अग्नि आणि विष्णु हे दोघे देव एका स्थानीं रहातात. त्या दोन्ही देवांचें महात्म्य फार मोठें आहे. ते दोघे गुहेंत बसून गुप्तरीतीनें तूप भक्षण करतात. प्रत्येक घरांत सात रत्नें ठेवतात आणि स्वतःच्या जिभेनें तुपाचा स्वाद घेतात. [१]

या दोन्ही देवांचें एकच मोठें स्थान आहे ते दोघे तुपाचा गुप्त स्वाद घेतात. प्रत्येक घरांत स्तुतीनें वृद्धि पावतात आणि गुप्त असलेल्या तुपापाशीं त्यांची जीभ पोहोंचते. [२]

दोन देवांचा सहवास

दोन देवांचा सहवास

या सूक्तांत एकस्थानांत रहाणारे दोन देव असें म्हटलें आहे. एक अग्नि आणि दुसरा विष्णु आहे. ' विष्णु ' शब्दानें सर्व व्यापक परमेश्वराचें वर्णन यापूर्वी २६ व्या सूक्तांत केलें आहे. ' विष्णु ' शब्दाचा दुसरा अर्थ ' सूर्य ' आहे. सूर्य सुद्धां मोठा आहे आणि संपूर्ण ग्रहमालेच्या केंद्रस्थानीं असून तिचा कर्ता हर्ता आहे, आधारभूत आहे. त्याच्याशीं तुलना केली तर अग्नि फारच थोडा, अगदीं लहान आहे. सूर्याशीं अग्नीची तुलना करणें म्हणजे दावानलाशीं ठिणगीची तुलना करण्यासारखें आहे. अग्नि उत्पन्न होतो, म्हणजे त्याचा जन्म होतो ही गोष्ट आम्ही पाहूं शकतों. जन्मल्यानंतर थोडा वेळ तो जळत रहातो आणि नंतर विझून जातो. नेमकी याच गोष्टीची तुलना जीवात्म्याचा जन्म आणि त्याचें जीवित समाप्तिपर्यंत जीवंत रहाणें आणि नंतर मरणें या गोष्टीशीं करून पहा, म्हणजे समजेल की ' विष्णु ' शब्दानें व्यापक परमात्मा गृहीत केला तर ' अग्नि ' शब्दानें लहान जीव असें ग्रहण करण्यास कांहीं हरकत नाहीं. उत्पन्न होणें, जीवंत रहाणें, आणि विझून जाणें या तीन गोष्टी ज्याप्रमाणें अग्निविषयीं संभवतात, तद्वत जीवात्म्याविषयीं संभवतात, आणि या जीवात्म्यासह नेहमीं रहाणारा विश्वव्यापक परमात्मा आहे. ही गोष्ट वेदांमध्यें इतरत्र सुद्धां सांगितली आहे—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परि-षस्वजाते । (ऋ. १।१६४।२०)

' दोन सुंदर पंखाचे पक्षी बरोबर रहातात, परस्पर मित्र आहेत आणि ते दोघे एकाच वृक्षावर रहातात. '

हे जे दोन पक्षी सांगितले आहेत त्यांतील एक जीवात्मा आणि दुसरा परमात्मा. त्याचप्रमाणें बरोबर रहाणारे दोन देव, त्यांतील एक अग्नि आणि दुसरा सूर्य, अथवा एक जीवात्मा आणि दुसरा परमात्मा आहे. येथें अग्नीचें जीवात्म्याशीं कोणत्या गुणामुळें साधर्म्य कल्पिलें आहे तें वर सांगितलें आहे. देहाशीं वारंवार संबंध असल्यामुळें प्रथम सांगितलेला जन्म, स्थिति, आणि मृत्यु हे तीन धर्म जीवात्म्यावर आरोपित होतात. कारण की जीवात्मा जन्मत नाहीं की मरत नाहीं. शरीराचा तो धर्म आहे. आणि जीवात्म्यावर तो जबरदस्तीनें आरोपित केला आहे. ते दोघे- **' दमे दमे सप्त रत्ना दधानौ '** (मं. १) ' घरोघर सात रत्नें धारण करतात. ' हीं सात रत्नें येथें प्रत्येक जीवात्म्याच्या प्रत्येक घरांत म्हणजे शरीरांत असतात. पंचज्ञानें-द्रियें आणि मन तसेंच बुद्धि हीं सात रत्नें आहेत. त्यांनीं सर्व प्राणी विशेषतः मनुष्य सुशोभित होतो. त्यांत रमणीयता आहे. ती मनुष्यास शोभादायक आहे, म्हणून त्यांस रत्नें म्हटलें आहे. जीं दागिनें-आभूषणें यांत जडविलेलीं असतात तीं रत्नें नव्हेत. या आत्म्याचीं सात रत्नें जर उत्तम असतील तर तीं शरीरास शोभा देतात. नद्दून वरील दागिन्यांनीं कांहीं शोभा प्राप्त होत नाहीं. वाचकांनीं प्रत्येक शरीरांत ठेवलेल्या गेलेल्या या सात रत्नांचा परिचय करून घ्यावा. यजुर्वेदांत म्हटलें आहे—

सप्त ऋषयः प्रतिहिताः शरीरे सप्त रक्षन्ति सदमप्रमादम् । सप्तापः स्वपतो लोकमीयुः०।
(य. ३४।५५)

' प्रत्येक शरीरांत सात ऋषि आहेत. हे सात ऋषि सभा स्थानास न चूकतां रक्षण करतात. या सात नद्या झोंपणाऱ्या जीवात्म्याच्या लोकांत जातात. ' इत्यादि वर्णन पण याच इंद्रियांचें आहे. सात रत्नें, सात ऋषि, सात रक्षक, सात जलप्रवाह, वगैरे वर्णन या जीवात्म्याच्या सात शक्तींचें आहे. हीं सात रत्नें जों पावेतों जीवात्मारूपीं अग्नि या शरीररूपीं अग्निकुंडांत जळत रहातो तोपर्यंत असतात. जेव्हां तो अग्नि विझून जातो तेव्हां तीं रत्नें शोभा देण्याचें कार्य समाप्त करतात. दोन्ही अग्नि—

गुह्यस्य घृतस्य पाथः । (मं. १)
घृतस्य गुह्या जुषाणौ वीथः । (मं. २)
वां जिह्वा घृतं प्रति आ (उत्) चरण्यात् ।
(मं. १-२)

' गुप्त तूप पितात, त्यांची जीभ या तुपाकडे वळते. ' हें गुह्य-गुप्त तूप तें काय ? ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. गुहेंत जें असतें तें ' गुह्य ' होय. येथें ' गुहा ' शब्द बुद्धि अथवा अंतःकरण दर्शवितो. त्यांत जे इंद्रियरूपीं गाईंच्या काढलेल्या दुधापासून तयार होतें तें गुप्त अथवा गुह्य तूप होय. हें तूप या बुद्धींत अथवा हृदयरूपीं गुहेंत ठेवलेलें आहे, आणि त्याचें हे दोघे गुप्तरीतीनें सेवन करतात. ही गोष्ट आतां वाचकांच्या ध्यानीं आली असेल की या रूपकाचें काय तात्पर्य आहे.

वां महि प्रियं धाम । (मं. २)

'त्याचें स्थान फार मोठें प्रिय आहे.' कारण कीं तेथें प्रेम भरलें आहे. सर्वांस तें प्रिय आहे. सर्व त्याच्याच प्राप्तिसाठीं प्रयत्न कर-तात. असें त्याचें स्थान आहे. तसेंच—

दमे दमे सुष्टुत्या वावृधानौ । (मं. २)

' घरोघर उत्तम स्तुतीनें वृद्धि पावून प्राप्त करून घेतात. ' म्हणजे प्रत्येक शरीरांत जेथें जेथें उत्तम ईश्वरस्तुति होते, जेथें त्याच्या शुभ गुणाचें गायन होते, तेथें एक तर परमेश्वर भावनेची वृद्धि होते आणि गुणाच्या धारणेनें जीवात्म्याची शक्ति वाढते हा जीवात्म्याच्या वृद्धीचा उपाय आहे.

येथें शरीराबद्दल ' दम ' शब्द योजिला आहे. ज्या शरीरांत इंद्रियांचें दमन होतें त्याचें नांव आहे ' **दम** ' शरीर दोन प्रकारचें आहे. एकांत भोगवृत्ति वाढते आणि दुसऱ्यांत दमवृत्ति वाढते ज्यांत दमवृत्ति वाढते त्याचें नांव आहे ' **दम** ' आणि दमाच्या सहाय्यानें ' सप्तरत्नें ' सुद्धां उत्तम तेजस्वी स्थितींत रहातात आणि तेथेंच आत्म्याच्या शक्तीचा विकास होतो.

ब्रह्मचर्य

कांड ११, सूक्त ५

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - ब्रह्मचारी ।)

ब्रह्मचारीष्णंश्चरति रोदसी उभे तस्मिन्देवाः संमनसो भवन्ति ।
स दाधार पृथिवीं दिवं च स आचार्यं१ तपसा पिपर्ति ॥ १ ॥
ब्रह्मचारिणं पितरो देवजनाः पृथग्देवा अनुसंयन्ति सर्वे ।
गन्धर्वा एनमन्वायन्त्रयस्त्रिंशत्त्रिशताः षट्सहस्राः सर्वान्त्स देवांस्तपसा पिपर्ति ॥ २ ॥
आचार्य उपनयमानो ब्रह्मचारिणं कृणुते गर्भमन्तः ।
तं रात्रीस्तिस्र उदरे बिभर्ति तं जातं द्रष्टुमभिसंयन्ति देवाः ॥ ३ ॥
इयं समित्पृथिवी द्यौर्द्वितीयोतान्तरिक्षं समिधा पृणाति ।
ब्रह्मचारी समिधा मेखलया श्रमेण लोकांस्तपसा पिपर्ति ॥ ४ ॥

अर्थ— ब्रह्मचारी (उभे रोदसी) पृथ्वी आणि द्युलोक या दोन्ही मध्यें (इष्णन्) पुनः पुनः अनुकूल करून (चरति) जातो म्हणून (तस्मिन्) त्या ब्रह्मचाऱ्यांत सर्व देव (संमनसः) अनुकूल मनासह (भवन्ति) रहातात. (सः) तो ब्रह्मचारी पृथ्वी आणि (दिवं) द्युलोकास धारण करतो. आणि तो स्वतःच्या तपानें स्वतःच्या आचार्यास (पिपर्ति) परिपूर्ण करतो. [१]

देव, पितर, गंधर्व आणि देवजन (सर्वे) सर्व ब्रह्मचाऱ्यास अनुसरतात (त्रयः त्रिंशत्) तीन तीस (त्रिशताः) तीनशें आणि (षट् सहस्राः) सहा हजार देव आहेत. (सर्वान् देवान्) या सर्व देवांचें (सः) तो ब्रह्मचारी स्वतःच्या तपःसामर्थ्यानें (पिपर्ति) पालन करतो. [२]

(उपनयमानः आचार्यः) ब्रह्मचाऱ्यास स्वतःजवळ ठेऊन घेणारा आचार्य त्याला (अन्तः गर्भं) स्वतः मध्यें ठेवतो. त्या ब्रह्मचाऱ्यास स्वतःच्या उदरांत (तिस्रः रात्रीः) तीन रात्रींपर्यंत ठेवतो. जेव्हां तो ब्रह्मचारी (जातं) दुसरा जन्म घेऊन बाहेर येतो तेव्हां त्यास पहाण्यासाठीं सर्व (देवाः) देव विद्वान् (अभि संयन्ति) सर्व प्रकारें एकत्र होतात. [३]

(इयं पृथिवी) ही पृथ्वी पहिली (समित्) समिधा आहे आणि (द्वितीया) दुसरी समिधा (द्यौः) द्युलोक आहे. या (समिधा) समिधांनीं ब्रह्मचारी अंतरिक्षाची (पृणाति) पूर्णता करतो, समिधा मेखला, श्रम करण्याचा अभ्यास आणि तप इत्यादि द्वारा हा ब्रह्मचारी सर्व (लोकान् पिपर्ति) लोकांस पूर्ण करतो. [४]

भावार्थ— (१) पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत जे जे विविध पदार्थ आहेत त्यांना ब्रह्मचारी स्वतःसाठीं अनुकूल करतो. (२) त्यामुळें सर्व देव त्या ब्रह्मचाऱ्यास अनुकूल होऊन त्याच्यामध्यें वास्तव्य करतात. (३) याप्रमाणें तो आपल्या तपश्चर्येनें पृथ्वी आणि द्युलोकास धारण करतो. (४) तो तपःसाधनेनें स्वतःच्या आचार्यास सुद्धां परिपूर्ण करतो. [१]

देव, पितर आदि सर्व ब्रह्मचाऱ्यास सहाय्यक होतात. आणि ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें त्यांस सहाय्यक होतो. [२]

(१) जो आचार्य ब्रह्मचाऱ्यास स्वतःजवळ ठेऊन घेतो तो स्वतः त्यास स्वतःमध्येंच प्रविष्ट करतो. (२) जणूं काय तो शिष्य गुरुच्या पोटांत तीन रात्रीं रहातो आणि गर्भाप्रमाणें त्याचा जन्म होतो. (३) अशाप्रकारें जेव्हां तो द्विज होतो तेव्हां त्याचा सन्मान सर्व विद्वान् करतात. [३]

पृथ्वी आणि द्युलोक या समिधांनीं ब्रह्मचारी अंतरिक्षास पूर्ण करतो. तसेंच ब्रह्मचारी श्रम आणि तप वगैरे करून सर्व जनतेस आधार देतो. [४]

पूर्वो जातो ब्रह्मणो ब्रह्मचारी घर्मं वसानस्तपसोदतिष्ठत् ।
तस्माज्जातं ब्राह्मणं ब्रह्म ज्येष्ठं देवाश्च सर्वे अमृतेन साकम् ॥ ५ ॥
ब्रह्मचार्येति समिधा समिद्धः कार्ष्णं वसानो दीक्षितो दीर्घश्मश्रुः ।
स सद्य एति पूर्वस्मादुत्तरं समुद्रं लोकान्त्संगृभ्य मुहुराचरिक्रत् ॥ ६ ॥
ब्रह्मचारी जनयन्ब्रह्मापो लोकं प्रजापतिं परमेष्ठिनं विराजम् ।
गर्भो भूत्वामृतस्य योनाविन्द्रो ह भूत्वासुरांस्ततर्ह ॥ ७ ॥
आचार्यस्ततक्ष नभसी उभे इमे उर्वी गम्भीरे पृथिवीं दिवं च ।
ते रक्षति तपसा ब्रह्मचारी तस्मिन्देवाः संमनसो भवन्ति ॥ ८ ॥

अर्थ— (ब्रह्मणः पूर्वः) ज्ञानापूर्वी (ब्रह्मचारी जातः) ब्रह्मचारी असतो. (घर्मं वसानः) उष्णता धारण करीत तपानें (उत्+अतिष्ठत्) वर उठतो, उन्नत होतो. त्या ब्रह्मचाऱ्याकडून (ब्राह्मणं ज्येष्ठं ब्रह्म) ब्रह्माविषयी श्रेष्ठ ज्ञान (जातं) प्रसिद्ध होतें. तसेंच सर्व देव अमृतासह असतात. [५]

(१) समिधा समिद्धः) तेजानें प्रकाशित (कार्ष्णं वसानः) कृष्ण म्हणजे काळ्या रंगाचें चामडें धारण करून (दीक्षितः) व्रतानुकूल आचरण करणारा आणि (दीर्घश्मश्रुः) लांब दाढी मिशा धारण करणारा ब्रह्मचारी (एति) प्रगति करतो. (२) (सः) तो (लोकान् संगृभ्य) लोकांस एकत्र करून म्हणजे लोकसंग्रह करून आणि (मुहुः) पुनः पुनः त्यांना (आचारक्रत्) उत्साह देतो आणि (३) (पूर्वस्मात् उत्तरं समुद्रं) पूर्वेपासून उत्तर समुद्रापर्यंत (सद्यः एति) त्वरित पोहोंचतो. [६]

जो (अमृतस्य योनौ) ज्ञानामृताच्या केन्द्रस्थानीं (गर्भः भूत्वा) गर्भरूप राहून ब्रह्मचारी झाला, तोच (ब्रह्म) ज्ञान, (अपः) कर्म (लोकं) जनता, (प्रजा-पतिं) प्रजापालक राजा आणि (विराजं परमेष्ठिनं) विशेष तेजस्वी परमेष्ठी परमात्म्याला (जनयन्) प्रगट करतो, आतां (इंद्रः भूत्वा) इंद्र होवून (ह) खातरीनें (असुरान् ततर्ह) असुरांचा नाश करतो. [७]

(इमे) हे (उर्वी गंभीरे) मोठे गंभीर (उभे नभसी) दोन्ही लोक (पृथिवीं दिवं च) पृथ्वी आणि द्युलोक आचार्यांनीं (ततक्ष) बनविलें आहेत. ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें त्यांचे (ते रक्षति) दोघांचें रक्षण करतो. म्हणून (तस्मिन्) त्या ब्रह्मचाऱ्यामध्यें सर्व (देवाः संमनसो भवन्ति) देव अनुकूल मनानें रहातात. [८]

भावार्थ— ज्ञानप्राप्तिपूर्वी ब्रह्मचारी रहाणें आवश्यक आहे. ब्रह्मचर्यांत श्रम आणि तप केल्यानें उच्चता प्राप्त होते. या प्रकारच्या ब्रह्मचाऱ्याकडूनच परमात्म्याचें श्रेष्ठ ज्ञान प्रसिद्ध होतें. तसेंच देव अमरत्वाशीं संयुक्त होतात. [५]

(१) समिधा कृष्णाजिन वगैरेंनी सुशोभित, मोठ्या दाढी मिशा धारण करणारा, तेजस्वी ब्रह्मचारी नियमानुकूल आचरण करण्यामुळें स्वतःची प्रगति साधतो. (२) अध्ययन समाप्तिनंतर धर्म जागृति करीत स्वतःच्या उपदेशानें जनतेंत उत्साह उत्पन्न करतो, आणि वारंवार तिची चेतना वाढवितो. (३) या प्रकारें धर्मोपदेश करीत तो पूर्वेहून उत्तर समुद्रापर्यंत पोहोंचतो. [६]

जो एकवेळ आचार्यांजवळ विद्यामातेच्या गर्भांत रहातो तोच ब्रह्मचारी विद्याध्ययनानंतर ज्ञान, सत्कर्म, प्रजा आणि राजाचा धर्म तसेंच परमात्म्याचें स्वरूप या सर्वांचा प्रचार करीत रहातो. नंतर तोच शत्रुनिवारक वीर होऊन शत्रूचा नाश करतो. [७]

आचार्यच पृथ्वीपासून द्युलोकापर्यंतच्या सर्व पदार्थांचें ज्ञान ब्रह्मचाऱ्यास देतो. जणूं काय तो स्वतःच्या शिष्यांसाठींच हा लोक सुद्धां तयार करतो. ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें त्यांचें संरक्षण करतो. त्यामुळें त्या ब्रह्मचाऱ्याचें ठायीं सर्व देवता वास्तव्य करतात. [८]

इमां भूमिं पृथिवीं ब्रह्मचारी भिक्षामा जभार प्रथमो दिवं च ।
ते कृत्वा समिधावुपास्ते तयोरार्पिता भुवनानि विश्वा ॥ ९ ॥
अर्वागन्यः परो अन्यो दिवस्पृष्ठाद्गुहा निधी निहितौ ब्राह्मणस्य ।
तौ रक्षति तपसा ब्रह्मचारी तत्केवलं कृणुते ब्रह्म विद्वान् ॥ १० ॥
अर्वागन्य इतो अन्यः पृथिव्या अग्नी समेतो नभसी अन्तरेमे ।
तयोः श्रयन्ते रश्मयोऽधि दृढास्ताना तिष्ठति तपसा ब्रह्मचारी ॥ ११ ॥
अभिक्रन्दन्स्तनयन्नरुणः शितिङ्गो बृहच्छेपोऽनु भूमौ जभार ।
ब्रह्मचारी सिञ्चति सानौ रेतः पृथिव्यां तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः ॥ १२ ॥
अग्नौ सूर्ये चन्द्रमसि मातरिश्वन्ब्रह्मचार्य१प्सु समिधमा दधाति ।
तासामर्चींषि पृथगभ्रे चरन्ति तासामाज्यं पुरुषो वर्षमापः ॥ १३ ॥

अर्थ- (प्रथमः ब्रह्मचारी) पहिल्या ब्रह्मचाऱ्यानें (पृथिवीं भूमिं) या विस्तृत भूमीची तसेंच (दिवं) द्युलोकाची (भिक्षां आजभार) भिक्षा प्राप्त केली आहे. आतां हा ब्रह्मचारी (ते समिधौ, कृत्वा) त्याच्या दोन समिधा करून (उपास्त) उपासना करतो. कारण कीं (तयोः) त्या दोघांमध्यें सर्व भुवनें (अर्पिताः) स्थापिलेलीं आहेत. [९]

(अन्येः अर्वाक्) एक जवळ आहे आणि (अन्यः दिवः पृष्ठात् परः) दुसरा द्युलोकाच्या पृष्ठभागाहून वेगळा आहे. ते दोन्ही (निधी) खजिनें (ब्राह्मणस्य गुहा) ज्ञानाच्या बुद्धींत (निहितौ), ठेवले आहेत. (तौ) त्या दोन्ही खाजिन्यांचें रक्षण ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें करतो. तसेंच तोच विद्वान् ब्रह्मचारी, (तत् केवलं ब्रह्म) केवळ ब्रह्मज्ञान (कृणुते) विस्तृत करतो, ज्ञान प्रसरवितो. [१०]

(अर्वाक् अन्यः) येथें एक आहे आणि (इतः पृथिव्यः अन्यः) या पृथ्वीपासून दूर दुसरा आहे. ते (अग्नी) दोन्ही अग्नि (इमे अंतरा नभसी) या पृथ्वी आणि द्युलोकामध्यें (समेतः) मिळतात-भेटतात-एकत्र होतात. (तयोः दृढा रश्मयः) त्यांची बलवान् किरणें, (अधि श्रयन्ते) प्रसरतात. ब्रह्मचारी तपानें (तान् आतिष्ठति) त्या किरणांचा अधिष्ठाता होतो. [११]

(अभिक्रंदन् स्तनयन्) गर्जना करणारा (अरुणः शितिंगः) फिक्कट गुलाबी आणि काळ्या रंगानें युक्त (बृहत् शेपः) मोठा प्रभावशाली (ब्रह्मचारी) ब्रह्म म्हणजे उदकासह घेऊन जाणारा मेघ, (भूमौ अनुजभार) भूमीचें योग्य पोषण करतो. तसेंच (सानौ पृथिव्यां) डोंगरावर आणि पृथ्वीवर (रेतः सिञ्चति) पाण्याची वृष्टि करतो. (तेन) तिच्यामुळें (चतस्रः प्रदिशः जीवन्ति) चारी दिशा जीवित रहातात. [१२]

अग्नि, सूर्य, चंद्र, वायु (अप्सु) पाणी ज्यांत ब्रह्मचारी समिधा टाकतो, त्यांचें तेज निरनिराळे (अभ्रे) मेघांत संचार करतें. (तासां) त्यापासून (वर्ष) पाऊस आणि (आपः) पाणी तसेंच (आज्यं) तूप आणि पुरुषाची उत्पत्ति होते. [१३]

भावार्थ — ब्रह्मचारी प्रथम भिक्षेंत, पृथ्वीलोक आणि द्युलोक प्राप्त करतो. या दोन लोकांतच इतर सर्व भुवनें स्थापित झालीं. दोन्ही लोकांची प्राप्ति झाल्यामुळें तोच ब्रह्मचारी आतां दोन्ही लोकांच्या दोन समिधा करून ज्ञानयज्ञानें उपासना करतो. [९]

स्थूल शरीर आणि मन हे दोन कोश मनुष्यशरीरांत असतात. [१०]

दोन अग्नि आहेत, जे त्रैलोक्यांत कार्य करीत आहेत. त्यांच्या अधिष्ठाता ब्रह्मचारी आहे. [११]

मेघ ब्रह्मचारी आहे, तो स्वतःच्या तपानें भूमीला शांत करतो. ब्रह्मचाऱ्यानें त्याचे जवळून हा बोध घ्यावा. [१२]

ब्रह्मचाऱ्यानें अग्निहोत्राच्या समयीं अग्नींत आहुति टाकून जगास तृप्त केलें पाहिजे. [१३]

आचार्यो॑ मृत्युर्वरु॑णः सोम॒ ओष॑धयः पय॑ः । जीमूता॑ आसन्त्सत्वा॑नस्तैरि॒दं स्व॑राभृ॑तम् ॥ १४ ॥
अमा घृतं कृ॑णुते केव॑लमाचार्यो॑ भूत्वा वरु॑णो यद्य॑दैच्छत्प्रजाप॑तौ ।
तद् ब्रह्मचारी प्राय॑च्छत्स्वान्मित्रो अध्यात्मनः ॥ १५ ॥
आचार्यो॑ ब्रह्मचारी ब्रह्मचारी प्रजाप॑तिः । प्रजाप॑तिर्वि रा॑जति विराडिन्द्रो॑ऽभवद्वशी ॥ १६ ॥
ब्रह्मचर्ये॑ण तप॑सा राजा॑ राष्ट्रं वि र॑क्षति । आचार्यो॑ ब्रह्मचर्ये॑ण ब्रह्मचारिण॑मिच्छते ॥ १७ ॥
ब्रह्मचर्ये॑ण कन्या॒३ युवा॑नं विन्दते॒ पति॑म् । अनड्वान्ब्रह्मचर्ये॑णाश्वो॑ घासं जिंगीर्षति ॥ १८ ॥
ब्रह्मचर्ये॑ण तप॑सा देवा मृत्युमपा॑घ्नत । इन्द्रो॑ ह ब्रह्मचर्ये॑ण देवेभ्यः स्व॑राभ॑रत् ॥ १९ ॥

अर्थ— आचार्य मृत्यु, वरुण, सोम औषधि तसेंच पयरूप आहे. त्याचे जे (सत्वानः) सात्विक भाव आहेत. (जीमूताः) मघरूप आहे, कारण कीं (तैः) त्यांच्यामुळेंच हें (इदं स्वः आभृतं) सत्व राहिलें आहे. [१४]

(अमा) एकत्व, सहवास (केवलं घृतं) केवळ शुद्ध तेजच करतो. आचार्य वरुण होऊन (प्रजा-पतौ) प्रजा-पालकाविषयीं (यत् यत् ऐच्छत्) जें जें इच्छितो (तत्) त्याचा मित्र ब्रह्मचारी (स्वात् आत्मनः) स्वतःच्या आत्मशक्तिनें (आंध प्रायच्छत्) देतो. [१५]

आचार्य ब्रह्मचारी असला पाहिजे (प्रजापतिः) प्रजापालकसुद्धां ब्रह्मचारी असला पाहिजे. अशा प्रकारचा प्रजा-पति (विराजतिः) शोभतो. जो (वशी) संयमी (विराड्) राजा असतो तोच इंद्र म्हटला जातो. [१६]

ब्रह्मचर्यरूपी तपश्चर्येच्या साधनेनें राजा राष्ट्राचें विशेष रक्षण करतो. आचार्य सुद्धां ब्रह्मचर्यानें रहाणाऱ्या ब्रह्मचाऱ्याच्या (सहाय्याची) इच्छा करतो. [१७]

ब्रह्मचर्य पालन केल्यानें कन्या युवान पति (विंदते) प्राप्त करते. (अनड्वान्) बैल आणि (अश्वः) घोडा सुद्धां ब्रह्मचर्य पालन करण्याच्या कारणेंच गवत खातात. [१८]

ब्रह्मचर्य रूपीं तपानें सर्व देवांनीं (अप अघ्नत) मृत्यु दूर केला. इंद्र ब्रह्मचर्यानेंच सर्व देवांना (स्वः) तेज (आभरत्) देतो. [१९]

भावार्थ— आचार्य देवतामय आहे. तो ब्रह्मचाऱ्याच्या सत्वाची उन्नति करतो. [१४]

गुरुशिष्य सहवासानेंच दिव्य तेज अथवा तेजस्वी ज्ञानाचा प्रवाह प्रचलित होतो. आचार्य वरुण होऊन जी इच्छा करतो त्याची पूर्तता शिष्य स्वशक्त्यनुरूप करतो. [१५]

सर्व शिक्षक ब्रह्मचारी असले पाहिजेत. सर्व राज्याधिकारी, प्रजापालनाच्या कार्यात नियुक्त केलेले राजपुरुषसुद्धां ब्रह्म-चारी असले पाहिजेत. जे योग्यरीतीनें प्रजापालन करतात तेच सुशोभित होतील; तसेंच जे जितेंद्रिय राजपुरुष असतील तेच इंद्र म्हणविण्यास लायक ठरतील. [१६]

राजानें राज्यव्यवस्थेनें सर्व लोकांकडून ब्रह्मचर्य पालन करवून राष्ट्राचें विशेष रक्षण केलें पाहिजे. अध्यापकसुद्धां अशा ब्रह्म-चाऱ्याची इच्छा करतात कीं जे ब्रह्मचर्य पालन करतात. [१७]

ब्रह्मचर्य पालन केल्यानंतर कन्या स्वतःस योग्य पति प्राप्त करते. बैल आणि घोडा हे सुद्धां ब्रह्मचर्यानें रहातात, म्हणून गवत खाऊन तें पचवूं शकतात. [१८]

ब्रह्मचर्य पालन करण्यामुळें सर्व देव अमर होतात. तसेंच ब्रह्मचर्याच्या सामर्थ्यानें देव राजा इंद्र इतर सर्व देवांस तेज देऊ शकतो. [१९]

ओष॑धयो भूतभ॒व्यम॑होरा॒त्रे वन॒स्पति॑ः । सं॒व॒त्स॒रः स॒हर्तुभि॒स्ते जा॒ता ब्र॑ह्मचा॒रिण॑ः ॥ २० ॥
पार्थि॑वा दि॒व्याः प॒शव॑ आर॒ण्या ग्रा॒म्याश्च॒ ये । अ॒प॒क्षाः प॒क्षिण॑श्च॒ ये ते जा॒ता ब्र॑ह्मचा॒रिण॑ः ॥ २१ ॥
पृथ॒क्सर्वे॑ प्राजाप॒त्याः प्रा॒णाना॒त्मसु॑ बिभ्रति । तान्त्सर्वा॒न्ब्रह्म॑ रक्षति ब्रह्मचा॒रिण्याभृ॑तम् ॥ २२ ॥
दे॒वाना॑मे॒तत्प॑रिषू॒तमन॑भ्यारूढं चरति॒ रोच॑मानम् ।
तस्मा॒ज्जा॒तं ब्राह्म॑णं॒ ब्रह्म॑ ज्ये॒ष्ठं दे॒वाश्च॒ सर्वे॑ अ॒मृते॑न सा॒कम् ॥ २३ ॥
ब्र॒ह्म॒चा॒री ब्रह्म॒ भ्राज॑द्बिभर्ति॒ तस्मि॑न्दे॒वा अधि॒ विश्वे॑ स॒मोता॑ः ।
प्रा॒णा॒पा॒नौ ज॒नय॒न्नाद् व्या॒नं वाचं॒ मनो॒ हृद॑यं॒ ब्रह्म॑ मे॒धाम् ॥ २४ ॥
चक्षु॒ः श्रोत्रं॒ यशो॑ अ॒स्मासु॑ धे॒ह्यन्नं॒ रेतो॒ लोहि॑तमु॒दर॑म् ॥ २५ ॥
तानि॒ कल्प॑द्ब्रह्मचा॒री स॑लि॒लस्य॑ पृ॒ष्ठे तपो॑ऽतिष्ठत्त॒प्यमा॑नः समु॒द्रे ।
स स्ना॒तो ब॒भ्रुः पि॑ङ्ग॒लः पृ॑थि॒व्यां ब॒हु रो॑चते ॥ २६ ॥

अर्थ— औषधि वनस्पति (ऋतुभिः सह संवत्सरः) ऋतूंसह जाणारें वर्ष, अहोरात्र. भूत आणि (भव्यं) भविष्यकाळ हे सर्व ब्रह्मचारी (जाताः) होऊन गेले. [२०]

(पार्थिवाः) पृथ्वीवर उत्पन्न होणारे (आरण्याः ग्राम्याश्च) अरण्य आणि खेडेगांवातून उत्पन्न होणारे जे (अपक्षाः पशवः) पंखाशिवायचे पशु आहेत तसेंच (दिव्याः पक्षिणः) आकाशांत संचार करणारे पक्षी हे सर्व (ब्रह्मचारिणः जाताः) ब्रह्मचारी होऊन गेले आहेत. [२१]

(सर्वे प्राजापत्याः) सर्व प्रजापति परमात्म्यापासून उत्पन्न झालेले पदार्थ निरनिराळे (आत्मसु प्राणान्) स्वतःमधील प्राणांना (बिभ्रति) धारण करतो. (ब्रह्मचारिणि आभृतं) ब्रह्मचाऱ्यामध्यें राहिलेलें (ब्रह्म) ज्ञान (तान् सर्वान् रक्षति) त्या सर्वांचें रक्षण करतें. [२२]

देवांचें (एतत्) हें (परि-पूतं) उत्साह देणारें (अन् अभ्यारूढं) सर्वांहून श्रेष्ठ (रोचमानं) तेज (चरति) चालत आहे. त्यामुळें (ब्राह्मणं) ब्रह्माविषयीं (ज्येष्ठं ब्रह्म) श्रेष्ठ ज्ञान झालें आहे आणि (अमृतेन साकं) अमर मनासह (सर्वे देवाः) सर्व देव प्रगट झाले आहेत. [२३]

(भ्राजत् ब्रह्म) चमकणारे ज्ञान ब्रह्मचारी धारण करतो. त्यामुळें त्यांत सर्व देव (अधि समोताः) राहिले आहेत. ते प्राण, अपान, व्यान, वाचा, मन, हृदय, ज्ञान,(आत्) आणि मेधा (जनयन्) प्रगट करतात. म्हणून ब्रह्मचाऱ्या ! (अस्मासु) आम्हां सर्वांत चक्षु, श्रोत्र, यश, अन्न, (रेतः) वीर्य, (लोहितं) रक्त आणि (उदरं) पोट (धेहि) पुष्ट कर. [२४–२५]

ब्रह्मचारी (तानि) त्यांच्याविषयीं (कल्पत्) योजना करतो. (सलिलस्य पृष्ठे) पाण्याजवळ तपश्चर्या करतो. या ज्ञानसमुद्रांत (तप्यमानः) तप्त होणारा हा ब्रह्मचारी (स स्नातः) जेव्हां स्नातक होतो तेव्हां (बभ्रुः पिंगलः) अत्यंत तेजस्वी असल्यामुळें तो या पृथ्वीवर फार चमकतो. [२६]

भावार्थ— सर्व विश्व ब्रह्मचर्यानें युक्त आहे. [२०] सर्व पशुपक्षी जन्मापासून ब्रह्मचारीच आहेत. [२१] ब्रह्मचाऱ्याचें तेज सर्वांचें रक्षण करतें. [२२] सर्व देव ब्रह्मचर्याच्या तेजानें अमर झाले आहेत. [२३] ब्रह्मचाऱ्याच्या तेजानें सर्व पुष्ट होतात. [२४–२५] ब्रह्मचारी स्वतःच्या तेजानें शोभतो. [२६]

ब्रह्मचर्य

ब्रह्मचर्य-सूक्त

या सूक्ताचा प्रथम मंत्र ब्रह्मचाऱ्याचें कर्तव्य स्पष्ट करतो, ब्रह्मचारी तर त्याला म्हणावयाचें कीं जो (ब्रह्म) मोठा होण्यासाठीं (चारी) पुरुषार्थ करतो. ' ब्रह्म ' शब्दाचा अर्थ वृद्धि, महत्त्व, मोठेंपणा, ज्ञान, अमृत वगैरे आहेत. ' चारी ' शब्दाचा भाव| आचरण करणें नियमपूर्वक योग्य व्यवहार करणें असा आहे. या दोन्हीं पदांचा भाव खालीं दिल्याप्रमाणें व्यक्त करतां येतो— ' अभिवृद्धिसाठीं प्रयत्न करणें, सर्व प्रकारें श्रेष्ठ होण्याचा पुरुषार्थ करणें, सत्य आणि शुद्ध ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करणें, अमरत्व प्राप्तिसाठीं परम पुरुषार्थ करणें ' हा मुख्य भाव ब्रह्मचारी शब्दांत आहे. वर सांगितलेले पुरुषार्थ करण्याची शक्ति शरीरांत वीर्याची स्थिरता झाल्यानें प्राप्त होतें म्हणून ब्रह्मचाऱ्यानें वीर्य रक्षण करण्याची फार मोठी आवश्यकता आहे.

वरील मंत्रांपैकीं पहिल्या मंत्राचें कथन असें आहे कीं ' **ब्रह्मचारी उभे रोदसी इष्णन् चरति** ' म्हणजे ' स्वतःच्या अभिवृद्धिची इच्छा करणारा पुरुष पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत जे जे पदार्थ आहेत. त्यांना अनुकूल करून घेऊन स्वतःचें व्यवहार करतो. ' म्हणजे पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत जे पदार्थ आहेत, त्यांस प्राप्त करून घेतल्यानें अभ्युदयाचा रास्ता सोपा होऊन जातो, ही गोष्ट अत्यंत स्पष्ट आहे. जर आपण सृष्टींतील पदार्थांशीं विरोध करूं तर त्यांची शक्ति जास्त असल्यामुळें आपला नाश होईल. परंतु जर आम्ही पृथ्वी, आप, तेज, वायु, अग्नि वगैरे सर्व पदार्थांस अनुकूल करून घेऊं आणि स्वतःचे व्यवहार अनेक नियमानुसार करूं, तसेंच या प्रकारच्या अनुकूलत्यानें परस्परांशीं व्यवहार करूं तर आम्हा सर्वांचाच अभ्युदय होऊं शकेल, हा भाव या मंत्रभागांत सांगितला आहे.

जेव्हां ब्रह्मचारी सृष्टीचें निरीक्षण करतो तेव्हां त्यास समजतें कीं पृथ्वी सर्वांस आधार देते. तें पाहून तो निराश्रितास आश्रय देण्याचें शिकतो. तसें करण्यास स्वतःचा स्वभाव वाढवितो. जलदेवता सर्वांस पाणी पुरविण्यासाठीं उच्च स्थानापासून नीच स्थानापर्यंत जाते, तें पाहून ब्रह्मचारी मनाशीं निश्चय करतो कीं मी स्वतःच्या उच्चावस्थेच्या घमेंडींत न रहावें. म्हणून मीं हलक्यांत हलकीं नीच अवस्थेंत रहाणारे पतित मनुष्यें त्यांच्या उद्धारासाठीं तसेंच त्यांच्या आत्म्यांस शांत करण्यासाठीं अवश्य प्रयत्न करीन. अग्निदेवतेची ऊर्ध्व ज्योति पाहून ब्रह्मचारी त्यापासून बोध घेतो कीं दुसऱ्यांस प्रकाश देण्यासाठीं मीं असें जळलें पाहिजे आणि सरळ झालें पाहिजे. वायुदेवतेची हालचाल पाहून ब्रह्मचारी निश्चय करतो कीं मी सुद्धां चळवळीनें जनतेची शुद्धता संपादन करीन. सूर्याचें तेज पाहून ब्रह्मचारी संकल्प करतो कीं मीं ज्ञानानें असा प्रकाशित होईन. चंद्राच्या शांत आणि अमृतमय तेजाचें निरीक्षण करून तो बोध प्राप्त करतो कीं मीं सुद्धां याप्रकारें अमृतरूप शांतीचा प्रवाह होऊं शकेन. याप्रकारें अन्य देवतांचें निरीक्षण करून तो स्वतःमध्यें त्या गुणधर्मांचें अनुकरण करण्याचा, ते वाढविण्याचा, स्वतःमध्यें धारण करण्याचा प्रयत्न करतो, जणूं काय अग्न्यादि देव त्यास आदर्श होतात, आणि वर सांगितल्याप्रमाणें त्यास उपदेश देतात.

वेदमंत्रांत जे अग्नि, वायु, वगैरे देवतांचे गुण वर्णन केले आहेत त्याचेंच तें तात्पर्य आहे. ब्रह्मचारी एक एक सूक्त म्हणून प्रारंभीं सांगितलेले गुण देवतांमध्यें पाहून स्वतःमध्यें ते गुण धारण करण्याचा प्रयत्न करतो. या देवतांमध्यें परमात्म्याच्या विविध गुणांचा आविर्भाव झाला असल्यामुळें या परंपरेनें परमात्म्याचे गुणच स्वतःमध्यें वाढवितो.

याप्रमाणें प्रत्येक देवतेचे प्रशंसनीय चांगले गुण पहाण्याचा अभ्यास तो ब्रह्मचारी करतो. त्याची दोष पहाण्याची दृष्टि दूर होते. आणि सद्गुण स्वीकारण्याचा भाव वाढतो. प्रत्येक मनुष्याच्या उन्नतीचा हाच मार्ग आहे. हल्लीं दोष पहाण्याची प्रवृत्ति वाढली आहे. त्यामुळें मनुष्याचा नित्य अधःपात होत आहे. म्हणून मनुष्यानें या वैदिकमार्गानें जाऊन सर्व विश्वांत शांति स्थापनेचा प्रयत्न करावा आणि स्वतःच्या आत्म्याची शांति वाढवावी. शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे कीं—

यद्देवा अकुर्वंस्तत्करवाणि । (श. ब्रा. ६।३।२६)

म्हणजे ' देव जें करीत आले तें मीं करीन. ' तीच गोष्ट या स्थानीं सांगितली आहे.

अशाप्रकारें ब्रह्मचारी देवांचें अनुकरण करूं लागतो. देवांविषयीं आदरभाव ठेवतो. आणि इतरप्रकारें देवांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो. अशा तपश्चर्येनें देवसुद्धां संतुष्ट होतात. आणि प्रसन्न होऊन खरें म्हटलें तर त्याचे शरीरांत वास्तव्य करूं लागतात. त्याचें वर्णन नंतरच्या मंत्रभागांत आलें आहे.

देवतांचें आनुकूल्य

जो ब्रह्मचारी वर सांगितल्याप्रमाणें देवतांचें निरीक्षण करून गुणग्रहण करतो त्याच्यांत अंशरूपानें निवास करणाऱ्या देवता त्याला अनुकूल होऊन रहातात. मंत्रांत म्हटलें आहे की—

तस्मिन् देवाः सं-मनसो भवन्ति ।

म्हणजे त्या ब्रह्मचाऱ्यांत सर्व देव अनुकूल मनानें रहातात. त्याच्या शरीरांत जे जे देवतांचे अंश आहेत ते सर्व त्या ब्रह्मचाऱ्याच्या मनाला अनुकूल असें स्वतःचें मन करून त्याच्या शरीरांत वास्तव्य करतात. स्वतःच्या शरीरांत देवतांचा निवास याप्रमाणें असतो. पहा—

१ अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशत् ।
२ वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशत् ।
३ आदित्यश्चक्षुर्भूत्वाऽक्षिणी प्राविशत् ।
४ दिशः श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशन् ।
५ ओषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशन् ।
६ चंद्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशत् ।
७ मृत्युरपानो भूत्वा नाभिं प्राविशत् ।
८ आपो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशत् ।

(ऐतरेय उप. १।४)

' (१) अग्नि बोलण्याचें इंद्रिय होऊन (वाचा) मुखांत शिरला. (२) वायुनें प्राणरूपानें नाकांत संचार केला. (३) सूर्यानें दृष्टीचें रूप धारण करून डोळयांत वास्तव्य केलें. (४) दिशांनीं ऐकण्याची शक्ति होऊन कानांत प्रवेश केला. (५) औषधि वनस्पति केस आणि त्वचा (कातडी, चामडी) मध्यें राहूं लागल्या. (७) मृत्यूनें अपानानें रूप धारण केलें आणि तो नाभीप्रदेशीं राहिला. (८) जलदेवता वीर्य बनून शिस्नांचें ठायीं राहूं लागली. '

या ऐतरेय उपनिषदाच्या कथनाप्रमाणें अग्नि, वायु, सूर्य, दिशा, औषधि, चंद्र, मृत्यु, आप (पाणी) या आठ देवतांचा निवास वर सांगितलेल्या आठ स्थानीं झाला आहे. यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं ज्या इतर देवता बाहेर आहेत आणि ज्यांचें वर्णन वेदांत ठिकठिकाणीं आलें आहे त्यांचे अंश मनुष्य शरीरांत निरनिराळया ठिकाणीं रहातात. याप्रकारें आमचे शरीरांत सर्व देवतांचें दिव्य साम्राज्य आहे आणि त्याचा अधिष्ठाता आत्मा आहे. तसेंच त्याच आत्म्याची शक्ति सर्व देवतांमध्यें प्रविष्ट होऊन कार्य करते. त्याचा अधिक विचार करण्यापूर्वी अथर्ववेदाचे खालील मंत्र पहाण्यासारखे आहेत—

१ दश साकमजायन्त देवा देवेभ्यः पुरा ।
यो वै तान्विद्यात् प्रत्यक्षं स वा अद्य महद्वदेत् ॥३॥
२ ये त आसन् दश जाता देवा देवेभ्यः पुरा ।
पुत्रेभ्यो लोकं दत्वा कस्मिंस्ते लोक आसते ॥१०॥
३ संसिचो नाम ते देवा ये संभारान्त्समभरन् ।
सर्वं संसिच्य मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १३ ॥
४ यदा त्वष्टा व्यतृणत् पिता त्वष्टुर्य उत्तरः ।
गृहं कृत्वा मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १८ ॥
५ अस्थि कृत्वा समिधं तदष्टापो असादयन् ।
रेतः कृत्वाऽऽज्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ २९ ॥
६ या आपो याश्च देवता या विराड् ब्रह्मणा सह ।
शरीरं ब्रह्म प्राविशच्छरीरेऽधि प्रजापतिः॥ ३० ॥
७ सूर्यश्चक्षुर्वातः प्राणः पुरुषस्य विभेजिरे ।
अथास्येतरमात्मानं देवाः प्रायच्छन्नग्नये ॥ ३१ ॥
८ तस्माद्वै विद्वान् पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते ।
सर्वा ह्यस्मिन् देवता गावो गोष्ठ इवासते ॥३२॥

(अथर्व ११।८)

' सर्व प्रथम (**देवेभ्यः दश देवाः**) देवांपासून दहा देव उत्पन्न झाले. जे कोणी त्यांस प्रत्यक्ष जाणतील ते (**अद्य**) आज (**महत् वदेत**) महान् ब्रह्माविषयीं सांगूं शकतील. (२) जे प्रथम दहा देवांपासून दहा देव झाले होते, पुत्रांना स्थान देऊन ते स्वतः कोठें रहावयास गेले ? (३) सिंचन करणारे देव ते आहेत जे सर्व सामग्री एकत्रित करतात. (**देवाः**) ते सर्व देव (**मर्त्यं**) मरणधर्म असणाऱ्या शरीरास सिंचन करून पुरुषांत प्रविष्ट झाले. (४) जो (**त्वष्टुः पिता**) कारागीर जीवाचा पिता (**उत्तरः त्वष्टा**) अधिक चांगला कारागीर आहे तो या शरीरांत छिद्रें पाडतो. तेव्हां मरणधर्मानें युक्त शरीररूपीं घर तयार करून सर्व देव या पुरुषांत (शरीरांत) राहूं लागले. (५) हाडांच्या समिधा केल्या, रेतांचें तूप केलें (**अष्ट आपः**) आठ प्रकारचा वारसा घेऊन सर्व देवांनीं पुरुषांत प्रवेश केला. (६) जें आप (पाणी) तसेंच इतर देवता आहेत आणि ब्रह्मासह वर्तमान विराट् आहे त्या सर्वांसह (**शरीरं प्राविशन्**) शरीरांत प्रविष्ट झाला आणि प्रजापति शरीरांत अधिष्ठाता झाला. (७) सूर्य दृष्टि झाला, वायु प्राण झाला, आणि हे देव या पुरुषांत राहूं लागले. नंतर त्याच्या आत्म्याला देवांनीं अग्निस अर्पण केलें. (८) म्हणून या पुरुषास (**विद्वान्**) म्हणजे जाणणारा ज्ञानी (**इदं ब्रह्म इति**) तोच ब्रह्म आहे असें (**मन्यते**) मानतात कारण की

त्याच्यांत सर्व देवता एकत्रित रहातात, ज्याप्रमाणें सर्व गाई गोठ्यांत रहातात. '

या मंत्राचें स्पष्ट कथन आहे कीं अग्नि, वायु, वगैरे देवता, या शरीरांत निवास करतात. म्हणजे प्रत्येक देवतेचा थोडा अंश या शरीरांत वास्तव्य करतो. हेंच देवांचें **' अंशावतरण '** आहे. जो याप्रकारें स्वदेहांतील देवतांचे अंश जाणतो तोच स्वतःच्या आत्म्याची शक्ति जाणतो, तोच परमेष्ठी परमात्म्यास जाणतो. याविषयीं खालीं दिलेला मंत्र पहा—

ये पुरुषे ब्रह्म विदुः ते विदुः परमेष्ठिनम्।
यो वेद परमेष्ठिनं यश्च वेद प्रजापतिम्।
ज्येष्ठं ये ब्राह्मणं विदुस्ते स्कंभमनुसंविदुः ॥
(अथर्ववेद १०।७।१७)

' जे पुरुषांत ब्रह्म जाणतात ते परमेष्ठीला जाणतात आणि जे प्रजापतीला जाणतात, तसेंच जे **(ज्येष्ठं ब्राह्मणं)** श्रेष्ठ ब्रह्माला जाणतात ते स्कंभाला उत्तम प्रकारें जाणतात. '

स्वतःच्या शरीरांत ब्रह्माचा अनुभव करण्याचें हें फळ आहे. परमात्म्याच्या साक्षात्काराचा हाच मार्ग आहे. म्हणून स्वतःच्या शरीरांत देवतांच्या अंशाचें ज्ञान प्राप्त करून त्या देवतांचा अधिष्ठाता जो एक आत्मा आहे त्याचा प्रथम अनुभव केला पाहिजे. वर दिलेल्या ऐतरेयोपनिषदाच्या वचनांत प्रत्येक देवतेचें भिन्न भिन्न स्थान सांगितलें आहे. त्या त्या स्थानांत सांगितलेल्या देवतांचे अंशस्थान आहे असें समजलें पाहिजे.

बाहेरच्या सृष्टींत अग्नि, वायु वगैरे देवता विशाल रूपांत रहातात, त्यांचे अंश प्रत्येक शरीरांत येवून रहातात. आणि अशाप्रकारें तें जीवात्म्याचें शरीर एक साम्राज्य होऊन रहातें. येथें असा एक प्रश्न उपस्थित होतो कीं देवता मनासह कीं मनविरहित आहेत ? या प्रश्नाचें उत्तर ब्रह्मचर्य सूक्ताच्या मंत्रानें दिलें आहे कीं, **' तस्मिन् देवाः संमनसो भवन्ति । '** म्हणजे ' त्या ब्रह्मचाऱ्यामध्यें सांगितलेले सर्व देव अनुकूल मन धारण करून रहातात. ' या मंत्रांत **' संमनसः देवाः '** हे दोन शब्द विशेष लक्षपूर्वक पहाण्यासारखे आहेत. त्यांचा अर्थ पहा—

सं = एकत्र, अनुकूल; **मनसः** = मनानें युक्त.

देवाः = अग्नि वगैरे देव तसेंच शरीरांत निवास करणाऱ्या देवतांचे अंश.

' जो ब्रह्मचारी सृष्टिमध्यें असलेले अग्नि, वायु वगैरे विशाल देवतांचें निरीक्षण करून त्यांचें अनुकरण करून उपदेश स्वीकारतो, त्यांस अनुकूल करून स्वतः त्यांस अनुकूल असे व्यवहार करतो. त्या ब्रह्मचाऱ्यामध्यें तेच देव म्हणजे त्यांचे अंश त्याला अनुकूल होऊन रहातात. तात्पर्य त्या ब्रह्मचाऱ्याच्या मनासह स्वतःचें मन मिळवून ते देव निवास करतात. '

प्रत्येक इंद्रियांत एक एक देव आहे आणि ते देव या ब्रह्मचाऱ्यास अनुकूल होऊन रहातात. या सर्वाचें तात्पर्य ब्रह्मचाऱ्याच्या सर्व इंद्रियांच्या शक्ति त्याच्या ताब्यांत रहातात, एवढेंच नाहीं पण प्रत्येक देवतेला भिन्न भिन्न मनसुद्धां असतें. म्हणजे प्रत्येक इंद्रियस्थानांत त्या त्या देवतांच्या अंशाचें मनसुद्धां भिन्न भिन्न असतें; डोळे, नाक, कान, मुख, हृदय, नाभि, शिश्न, हात, पाय वगैरे प्रत्येक इंद्रिय आणि अवयवाचें मन विभिन्न आहे. पण हीं सर्व मनें स्वतःच्या ताब्यांत ठेवणारें आणखी एक मन आहे आणि तें **' जीवात्म्याचें मुख्य मन '** होय. ब्रह्मचर्याच्या नियमाप्रमाणें स्वतःचें आचरण करून ब्रह्मचारी होतो आणि त्याच्या शरीरांत निवास करणाऱ्या देवतांचे संपूर्ण अंश ब्रह्मचाऱ्याच्या मनाला अनुकूल असें स्वतःचें मन ठेवतात. त्याला अनुकूल अशींच स्वतःचीं कार्यें करण्यांत तत्पर रहातात. पण जो नियम सोडून व्यवहार करतो अशा स्वच्छंदी मनुष्याच्या इंद्रियस्थानीय देवतासुद्धां स्वेच्छाचारी होतात आणि प्रत्येक इंद्रिय स्वच्छंदी झाल्यानें अंतीं त्या मनुष्याचा नाश होतो. म्हणून ब्रह्मचाऱ्यानें नियमानुसार आचरण ठेवुन इंद्रियस्थानीय सर्व देवतांस स्वतःस वश करून घेऊन त्यांचेकडून स्वतः अनुकूल कार्य करवावें हेंच त्यास उचित होय.

देवतांचें साम्राज्य

स्वतःचें शरीर याप्रमाणें ' देवतांचें साम्राज्य ' समजावें. आणि सर्व देवतांचा अधिष्ठाता मीं आहें हा विचार स्वतःच्या मनांत दृढ केला पाहिजे. स्वतःच्या मनाची शक्ति शरीरांत प्रत्येक इंद्रियांत जाऊन तेथें कसें विलक्षण कार्य करते, तें विचारपूर्वक पाहिल्यानें स्वतःच्या आत्मशक्तीचा अनुभव प्रत्येकास प्राप्त होऊं शकतो. या अनुभवानें इंद्रियदमन आणि इंद्रियवासना शमन हीं दोन्हीं साध्य होतात.

प्रत्येक इंद्रिय भिन्न देवतांच्या अंशांनीं बनलें आहे. या देवतांत भूस्थानीय अंतरिक्षस्थानीय तसेंच द्युस्थानीय याप्रमाणें देवतांचे तीन वर्ग आहेत. सर्व देवतांचा निवास शरीरांत आहे. असें म्हटल्यानें वर सांगितलेल्या तीनहि लोकांचा निवास या शरीरांत आहे ही गोष्ट स्पष्ट झाली. कारण कीं भूलोक, अन्तरिक्षलोक आणि स्वर्गलोक या तीन स्थानांतच सर्व देवता रहातात. जेव्हां या तीन लोकांतील एकूण एक पदार्थांचे अंश शरीरांत येतात तेव्हां जणूं काय त्रैलोक्याचाच थोडा अंश घेऊन हा मानवदेह तयार

केला जातो. या विषयाचें स्पष्टीकरण खालीं दिलेल्या कोष्टकावरून होऊं शकेल.

याप्रमाणें बाहेरील तीनहि लोकांचे अंश शरीरांत आले आहेत. त्यामुळेंच म्हणण्यांत येते कीं हा ब्रह्मचारी त्रैलोक्यास आधाररूप आहे. पहा– **' स दााधार पृथिवीं दिवं च '** म्हणजे तो संयमी ब्रह्मचारी पृथ्वी आणि द्युलोक तसेंच तदंतर्गत मधल्या अंतरिक्षलोकास सुद्धां आधाररूप आहे. ही गोष्ट खालीं दिलेल्या कोष्टकावरून आतां स्पष्ट झाली आहे. याप्रकारें मंत्राचा प्रत्येक भाग अनुभवाची गोष्टच सांगत आहे. येथें कांहीं अलंकाराची कल्पना करण्याची जरुरी नाहीं. प्रत्येक मनुष्यानें वैचारिक दृष्टीनें मंत्रांत सांगितलेल्या गोष्टी स्वतःमध्यें पहाव्या. काल्पनिक गोष्टी वेदांत नाहींत. प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टीच वेदांत वर्णन केलेल्या आहेत. परंतु त्या प्रत्यक्ष पहाण्याच्या पद्धतीनेंच पाहिल्या पाहिजेत. जी रीत येथें सांगितली आहे त्या रीतीनें प्रत्येक मनुष्य स्वतःमध्यें मंत्रांत सांगितलेल्या गोष्टी स्वतः पाहूं शकतो.

आतां मंत्राचा अंतिम भाग राहिला. तो असा आहे, **' स आचार्यं तपसा पिपर्ति '** म्हणजे वर वर्णन केलेला ब्रह्मचारी स्वतःच्या तपश्चर्येनें स्वतःच्या आचार्याचें पालन आणि पूर्णत्व करतो. ब्रह्मचाऱ्यानें जें तप करावयाचें आहे त्याचें स्वरूप मंत्राच्या तीन चरणांत सांगितलें आहे. सृष्टींतील अग्नि वगैरे देवतांचें निरीक्षण करणें, त्यास स्वतः अनुकूल करून घेणें, त्यास अनुकूल असे स्वतःचे व्यवहार करणें, तसेंच स्वतःच्या शरीरांत जे त्यांचे अंश रहातात त्यांना स्वतःच्या मनास अनुकूल असें चालविणें, हें सर्व तपच आहे. या प्रकारचें तप जो ब्रह्मचारी करतो तोच आचार्यास परिपूर्ण करूं शकतो. म्हणजे नियमविरुद्ध आचरण करणारा विद्यार्थी गुरूची पूर्णता कसली करणार, उलट तो त्यांच्यांत न्यूनत्व उत्पन्न करतो ही गोष्ट स्पष्ट आहे.

वरील मंत्रांत **' पिपर्ति '** पद आहे. त्याचा अर्थ (१) ' पालन करणें आणि (२) परिपूर्ण करणें ' असा आहे. तात्पर्य असें कीं, आचार्यांचे पालनपोषण करण्याचा भार विद्यार्थ्यांवर (अथवा विद्यार्थ्यांच्या पालकावर) असतो. तसेंच आचार्यांची इच्छा पूर्ण करण्याचा भारसुद्धां विद्यार्थ्यांवर रहातो.

दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं देव, पितर, गंधर्व, मनुष्य या चार वर्णांचे लोक ब्रह्मचाऱ्याचें अनुकरण करतात. हें मंत्रांतील पहिलें कथन आहे. ब्रह्मचारी जसें आचरण करतो तसेंच व्यवहार इतर लोक करूं लागतात. यामुळें खरोखर ब्रह्मचाऱ्यावर एक-

त्रैलोक्याचें कोष्टक

(डावीकडे: बाह्य स्थानांत त्रैलोक्य (समष्टि); उजवीकडे: शरीरांत त्रैलोक्य (व्यष्टि))

लोक	देवता		मनुष्याचीं इंद्रियें
स्वर्गलोक [द्युलोक स्वः]	द्यौः सूर्य दिशा अग्नि	शिर	मस्तक दृष्टि कान मुख, वागिंद्रिय
[भुवर्लोक अंतरिक्षलोक] भुवः	इंद्र चंद्र वायु आणि मरुत्	कंठ-फुप्फुस-पोट-हृदय	आत्मा मन मुख्य आणि गौण प्राण
भूलोक [पृथ्वीलोक] भूः	मृत्यु आप, जल भूमि	नाभि-शिश्न, पाय	अपान रेत, वीर्य पाय

*

प्रकारें जबाबदारी आहे. ब्रह्मचाऱ्याच्या आचरणांत जर कांहीं दोष झाला तर त्याचें अनुकरण इतर लोक करतात. विशेषतः गुणापेक्षां दोषांचें अनुकरण जास्त होतें. श्रेष्ठ मनुष्य जसें आचरण करतात तसेंच इतर लोक वागतात, असें म्हणतात. पण हा नियम सदाचाराच्या अनुकरणापेक्षां दुराचाराच्या अनुकरणाविषयीं, जास्त सत्य प्रत्यक्षांत पहावयास मिळतो. जर कोणी महापुरुष उत्तम आचार करीत असेल तर सामान्य मनुष्यें तसें चांगलें आचरण करतीलच हें कांहीं नक्की नव्हे. परंतु जर कोणी मोठा मनुष्य दुराचरण करीत असेल तर त्याचें नांव पुढें करून त्याच्यासारखें दुराचरण इतर लोक करूं लागतील. म्हणून नेत्यानें, पुढाऱ्यानें, सत्पुरुषानें, महापुरुषानें स्वतःचें आचरण विचारपूर्वक शुद्ध ठेवावें. ही जबाबदारी ब्रह्मचाऱ्यावरही आहे. कारण स्वतःच्या स्थानीं ब्रह्मचाऱ्याची प्रशंसा होईल तर तेथील मोठमोठीं माणसें त्याला पाहून त्याचासारखें होण्याचा प्रयत्न करतील. जो बाहेरून विद्या मिळवून येतो त्याच्यावर ही जबाबदारी जास्त असते. म्हणून नवीन शिकलेल्यांनी स्वतःची जबाबदारी समजून व्यवहार करावा हें चांगलें.

प्रत्येक प्राणीमात्रांत चार वर्ण आहेत, ते ब्रह्मचाऱ्याच्या देहांतहि आहेत. म्हणजे त्याच्या देहांत चार वर्ण एकदुसऱ्याशीं मिळून रहातात. एकदुसऱ्यास अनुकूल होऊन रहातात. शरीरांतील ज्ञान ग्रहण करून ज्ञानसंचय करणारा जो भाग आहे त्यास देव अथवा ब्राह्मण समजा. देहांतील विरोधी दोषांस दूर करणारा जो संरक्षक विभाग आहे त्यास क्षत्रिय समजावें. जो पोषक अंश आहे तो वैश्य आणि जो स्थूल भारवाहक अंश असेल तो शूद्र म्हणावें. शरीरांत मेंदु-बुद्धि ब्राह्मण आहे, वीर्य क्षत्रिय आहे, रस (रक्त) वैश्य आहे आणि हाडें शूद्र होय. तुम्हांस योग्य वाटतील ते शब्द तुम्ही त्याच्यासाठीं वापरूं शकतां. येथें जें सांगितलें तें फक्त त्याचे भाव ध्यानीं घेऊन सांगितलें आहे. चातुर्वर्ण्याचे चार शब्द जे या मंत्रांत आले आहेत ते गुण, कर्म तसेंच भावबोधकसुद्धां आहेत.

मंत्रांत सांगितलें आहे की देव, पितर, गंधर्व आणि देवजन हे सर्व ब्रह्मचाऱ्यास अनुकूल होऊन चालतात. म्हणजे अनुकूल होऊन स्वतःचे व्यवहार करतात. हें जितकें बाह्य समाजांत सत्य आहे त्यापेक्षां कित्येक पटीनें जास्त शरीरांतील शक्ति केंद्रांविषयीं सत्य आहे. शरीरांत हाडकें-रस-वीर्य-मज्जा, वगैरे मूलभूत आधारतत्व ब्रह्मचाऱ्यास अनुकूल होऊन रहातें. कारण की तो संयमी पुरुष असतो. शरीरांत अंग, अवयव, इंद्रियें आणि तत्वें हे चतुर्वर्ण आहे. ते सर्व त्यास अनुकूल होतात. ही गोष्ट आतां वाचकांच्या ध्यानीं आली असेल. वरप्रमाणें विचार केल्यानें वैदिक भावाचा प्रकाश वाचकांच्या मनांत पडूं शकतो, आणि वैदिक विचाराची सूक्ष्मता सुद्धां जाणूं शकते.

तीन आणि तीस देव

अग्नि, वायु, इंद्र, वगैरे बाह्य देवतांमध्यें चातुर्वर्ण्य आहे, इतकें फक्त म्हटल्यानें शरीरांतील देवतांमध्यें चातुर्वर्ण्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली. कारण कीं संपूर्ण देवतांचे अंश स्वतःच्या शरीरांत विद्यमान आहेत. म्हणजेच त्यांचे गुणधर्म बाहेर आहेत तेच आंत आहेत. यांत विवाद असण्याचें कारणच नाहीं. आतां या देवतांची संख्या किती आहे त्याचें उत्तर या मंत्रांत खालीं दिल्याप्रमाणें दिलें आहे—

त्रयः	— तीन	३
त्रिंशत्	— तीस	३०
त्रिशताः	— तीनशें	३००
षट् सहस्राः	— सहा हजार	६०००

प्रथम मंत्राच्या स्पष्टीकरणाच्या कोष्टकांत दाखविलें आहे कीं बेंबीच्या खालचा भाग पृथ्वीस्थानीय, बेंबीपासून गळ्यापर्यंत भाग अंतरिक्ष स्थानीय आणि डोकें द्युस्थानीय आहे. म्हणजे शरीराच्या आंतील या तीन स्थानांत बाहेरील तीन स्थानांत रहाणारे सर्व देव आहेत. वेदामध्यें इतरत्रसुद्धां म्हटलें आहे कीं प्रत्येक स्थानांत अकरा देवता रहातात, त्यांत दहा गौण आणि एक मुख्य आहे.

मस्तकांत मेंदु आहे त्याची देवता सूर्य आहे. हृदयांत मन आहे त्यांची देवता चंद्र अथवा इंद्र आहे, तसेंच जठरांत अग्नि आहे. याप्रकारें तीन स्थानांत या तीन देवता मुख्य आहेत. प्रत्येक देवता एकेका अंगांत रहाते. म्हणजे ३३ देवतांच्या स्वाधीन ३३ अंगें आहेत. हा भाव दर्शविणारे खालीं दिलेले मंत्र पहा—

(१) यस्य त्रयस्त्रिंशद्देवा अंगे सर्वे समाहिताः ॥ १३ ॥

(२) यस्य त्रयस्त्रिंशद्देवा अंगे गात्रा विभेजिरे । तान्वै त्रयस्त्रिंशद्देवानेके ब्रह्मविदो विदुः ॥ २७ ॥

(३) यस्य त्रयस्त्रिंशद्देवा निधिं रक्षन्ति सर्वदा ॥ निधिं तमद्य को वेद यं देवा अभिरक्षथ॥२३॥

(अथर्व. १०।७)

' (१) ज्याच्या अंगांत तेहतीस देव रहातात. (२)

ज्याच्या अंगांत आणि अवयवांत तेहतीस देव विशेष सेवा करतात, ते तेहतीस देव ब्रह्मज्ञानी पुरुषच केवळ जाणतो. (३) तेहतीस देव ज्याच्या खजिन्याचें रक्षण करीत आहेत, त्या खजिन्यास आज कोण जाणतो ! '

हें वर्णन परमात्म्यास पूर्णरूपें आणि जीवात्म्यास अंशरूपें लागू पडतें. कारण की ही गोष्ट पूर्वींहि सांगण्यांत आली आहे. अग्नि, इंद्र आणि सूर्य वगैरे देवता पूर्णरूपें परमात्म्यासह जगांत आहेत आणि अंशरूपें जीवात्म्यासह मानवशरीरांत आहेत. परमात्म्याचें व्यापकत्व आणि महत्त्व तसेंच जीवात्म्याचें अव्यापकत्व आणि अणुत्व सोडलें तर तत्त्वरूपानें दोघांचें वर्णन एकसारखेंच आहे. वेदांत या प्रकारचें वर्णन हजारों ठिकाणीं आलें आहे.

तीन आणि तीस देवतांचें स्वरूप हें असें आहे. हे तेहतीस देव मेरु पर्वतांत रहातात. मेरु पर्वत म्हणजे पृष्ठवंशच होय. त्यास मेरुदंड असेंहि म्हणतात. या मेरुदंडांत निरनिराळीं हाडें एक दुसऱ्यावर अशीं चिकटलेलीं आहेत आणि मध्यें सांध्यांत एक गांठ आहे. ही गांठ हें या देवतांचें स्थान आहे. योगांत जें ग्रंथीभेदनाचें महात्म्य वर्णिलें आहे त्या ग्रंथि याच होत. प्राणायामादि साधनांनीं प्राणास त्यांच्या मधून फिरवावें लागतें. योगसाधनांत या प्रत्येक साधनाचें अत्यंत महत्त्व असतें. या सर्व देवतांच्या ग्रंथीमधून प्रवास करून मेरुपर्वत अथवा मेरुदंडाच्या सर्वांत वरील भागांत, मेंदूच्या मधोमध जेव्हां आत्म्यासह प्राण पोहोंचतो तेव्हां त्या स्थितीस ' ब्रह्मलोक प्राप्ति ' म्हणतात.

या तेहतीस देवता अथवा तीन आणि तेहतीस देवता, ब्रह्मचाऱ्याच्या ताब्यांत असतात. कारण की ब्रह्मचर्याश्रमांत वीर्यरक्षणामुळें योगाभ्यास करून या सर्वांस स्वाधीन ठेवावयाचेंच असतें. म्हणूनच या ब्रह्मचर्य सूक्तांत पुनः पुनः सांगितलें आहे कीं हे सर्व देव ब्रह्मचाऱ्यास अनुकूल रहातात. ब्रह्मचारी या सर्व देवांस पूर्ण तृप्त आणि स्वाधीन करतो. पूर्ण करण्याचें तात्पर्य प्राण भरणें आणि पूर्ण विकसित करणें असें दोन प्रकारचें आहे.

वर सांगितलेल्या तेहतीस देवांव्यतिरिक्त निराळे (**त्रिशताः**) तीनशें देव आहेत. तीन स्थानांत शंभर शंभर मिळून तिनशें होतात. मेंदूंत शंभर, हृदयस्थानांत शंभर आणि नाभीस्थानांत शंभर याप्रकारें शंकरांचे तिनशें गण आहेत. या बरोबरच (**षट् सहस्राः**) सहा हजार सुद्धां आहेत. पृष्ठवंशाबरोबर सहा चक्रें आहेत. (१) गुह्यस्थानीं मूलाधार चक्र. (२) नाभीस्थानीं जवळच स्वाधिष्ठान चक्र, (३) मणिपूरक चक्र, (४) हृदय स्थानाजवळ अनाहत चक्र, (५) कंठस्थानांत विशुद्धि चक्र, (६) दोन्ही भुंवयामध्यें आज्ञाचक्र आहे. प्रत्येक चक्रांत सहस्र शक्तींचें अंश केंद्रित झाले आहेत. या प्रकारें सहा स्थानांत सहा हजार शक्ति विभक्त झालेल्या आहेत. येथें ' तीनशें ' आणि ' सहा हजार ' या संख्या विपुलत्व दाखविणाऱ्या आहेत असेंहि कित्येक मानतात. याविषयीं मला स्वतःला कांहीं विशेष ज्ञान नाहीं. अनुभवी योगी त्याविषयीं कांहीं सांगूं शकतील. म्हणून त्याबद्दल कांहीं जास्त लिहिणें योग्य होणार नाहीं.

या देवतांची संख्या वेदांत आणि ब्राह्मण ग्रंथांत तीन, तेहतीस, तीनशेंतीस याप्रकारें वाढवलेली हजारों, लाखो, कोट्यवधिपर्यंत ही गणना गेलेली आहे. मेंदू हें मज्जातंतूचें मुख्य केंद्र आहे. त्याच्या आधीन मस्तक, हृदय आणि नाभी, हीं तीन स्थानें आहेत. प्रत्येक स्थानांत दहा दहा गौण विभाग मिळून तीस आणि सूक्ष्म शंभर शंभर सूक्ष्म विभाग मिळून अगणित सूक्ष्म विभाग झाले आहेत. त्यांस कोट्यावधि अथवा लक्षावधि सूक्तांत विभक्त करणें हें केवळ कल्पनेनेंच होऊं शकेल असें आहे. प्रत्यक्ष मोजदाद कदाचित् होऊं सुद्धां शकणार नाहीं. परंतु याविषयीं सत्यासत्य निर्णय विशेष अधिकारी पुरुषच करूं शकेल.

याप्रकारें (१) तीन, (२) तीस, (३) तीनशें आणि (४) सहा हजार देवतांचें स्वरूप, स्थान आणि महात्म्य आहे. ब्रह्मचाऱ्याच्या आधीन हे सर्व देव रहातात. जो ब्रह्मचर्य पालन करूं शकत नाहीं, तसेंच योगादि साधन करीत नाहीं त्याचे आधिन हे देव राहूं शकत नाहींत. स्वेच्छेनें जो स्वतःचे व्यवहार करूं लागतो, तेथें मोठी भयानक अवस्था निर्माण होते. प्रत्येक इंद्रिय स्वतंत्र झाल्यानें मनुष्याची किती अवनति होऊं शकते त्याची कल्पना वाचक स्वतः करूं शकतील.

ब्रह्मचर्य, वीर्यरक्षण, उत्तम ग्रंथवाचन, सत्समागम, उत्तम विचार धारण करणें, यमनियम, ईश्वरोपासना, वगैरे सर्व साधनांनीं हेंच करावयाचें आहे की स्वतःच्या शरीरांत राहिलेल्या देवतांचे अंश स्वतःच्या आधीन व्हावयास पाहिजेत म्हणजे स्वतःमधील संपूर्ण शक्ति स्वाधीन होऊन आत्म्याच्या शक्ति पूर्ण विकसित होतील. या प्रकारचें ब्रह्मचर्याच्या परमसिद्धिचें वर्णन या मंत्रांत केलें आहे. वाचकांनीं या मंत्राच्या अर्थाचें जास्त संशोधन करावें आणि शक्य तेवढे प्रयत्न करून या दृष्टीनें स्वतःची उन्नति करण्याचा प्रयत्न करावा.

नंतर तिसऱ्या मंत्रांत ब्रह्मचर्याश्रमांत करण्यायोग्य ' तीन प्रकारच्या अज्ञानाचें निवारण ' सांगितलें आहे. सामान्य मनुष्य तीन अज्ञानरूपी अंधारांत रहातो. त्या तीन अज्ञानाचें निराकरण

करणें आणि तीनहि ज्ञानांची प्राप्ति करून घेणें हें कार्य या आश्रमांत होतें.

गुरुशिष्य--संबंध

या तिसऱ्या मंत्राच्या पहिल्या अर्ध्या भागांत म्हटलें आहे कीं, जेव्हां आचार्य ब्रह्मचाऱ्यास शिष्य समजून स्वतःजवळ ठेऊन घेतो, तेव्हां तो त्याला स्वतःमध्यें सामावून घेतो. येथें सामावून घेण्याचा अर्थ केवळ स्वतःच्या परिवारांत अथवा स्वतःच्या कुळांत त्याचा समावेश करतो एवढाच होत नाहीं, परंतु त्या विद्यार्थ्यास स्वतःचें हृदयांत ठेवतो, असा भाव आहे. हृदयांत अथवा स्वतःच्या गर्भांत ठेवण्याचा अर्थ असा आहे कीं त्यापासून कांहीं लपवून ठेवीत नाहीं. ज्याचा प्रवेश स्वतःच्या घरांत अथवा स्वतःच्या परिवारांत असतो त्याच्यापासून कोणतीहि गोष्ट लपून रहात नाहीं. परंतु या ब्रह्मचाऱ्याचा प्रवेश तर हृदयांत—गर्भांत होतो. म्हणून हृदयांतील कोणतीहि गोष्ट त्याच्यापासून गुप्त रहाणार नाहीं. हाच गुरुशिष्याचा संबंध होय. गुरुनें स्वतःच्या शिष्यापासून कोणतीहि गोष्ट कपटानें लपवून दूर ठेऊं नये. जी विद्या स्वतः प्राप्त केली, ती पूर्णपणें शिष्यास द्यावी. शिकवावी. तसेंच शिष्यानें सुद्धां आचार्याच्या पोटांत राहून त्या गुरुस कोणत्याहि प्रकारचे कष्ट देऊं नयेत.

तीन रात्रींचें वास्तव्य

या मंत्राचें दुसरें सांगणें असें आहे कीं, ' आचार्य स्वतःच्या पोटांत त्या ब्रह्मचाऱ्याला तीन रात्रींपर्यंत धारण करतो. ' उदरांत ब्रह्मचाऱ्याला धारण करण्याचा अर्थ वर सांगितला-स्पष्ट केला आहे. येथें तीन रात्रीचा अर्थ काय होतो तें पहावयाचें आहे. ' तीन दिवस ' असें म्हटलेलें नाहीं परंतु ' **तिस्रः रात्रीः** ' (तीन रात्री) असें म्हटलें आहे. रात्री शब्द अंधाराचा भाव दर्शवितो. आणि अंधार अज्ञानाचा बोधक आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणजे तीन रात्रींचें तात्पर्य तीन प्रकारचें अज्ञान आहे. त्यासाठीं तीन रात्रीं गुरुपाशीं रहाण्याचा आशय आतां स्पष्ट होईल, कीं, तीनहि प्रकारचें अज्ञान दूर होईपर्यंत गुरुपाशी वास्तव्य करणें. एक अज्ञान स्थूल-सूक्ष्म सृष्टिविषयक आहे, दुसरें अज्ञान आत्म्याविषयीं असतें आणि तिसरें आत्मा-अनात्म्याच्या संबंध विषयक अज्ञान असतें. ही तीन प्रकारचीं अज्ञानें दूर करणें हाच विद्याध्ययनाचा उद्देश आहे. वर सांगितलेलें तीन प्रकारचें गाढ अज्ञान-अंधारांत रात्रीं जीव झोपलेला असतो. आचार्य कृपेनें ज्ञान सूर्याचा उदय होण्यामुळें तो प्रबुद्ध शिष्य रात्रीचा समय व्यतीत करून स्वच्छ आणि पवित्र प्रकाशांत येतो.

हा तीन रात्रींचा विषय कठोपनिषदांत सुद्धां आला आहे. वाचकांनीं तो तेथें विस्तारपूर्वक पहावा. येथें थोडें दिग्दर्शन करण्यांत येत आहे-

तिस्रो रात्रीर्यदवात्सीर्गृहे मेऽनश्नन् ब्रह्मन् अतिथिर्नमस्यः । (कठ. उ. ११९)

यम नचिकेताला म्हणतो कीं, तूं नमस्कार करण्यायोग्य अतिथि माझ्या घरांत तीन रात्री राहिला आहेस. ' म्हणून—

त्रीन् वरान् वृणीष्व । (क. उ. ११९)

' तीन वर प्राप्त कर. ' त्यानंतर नचिकेतानें तीन वर मागून घेतले. उत्तरीं महाराज यमानें (१) आत्मविद्या, (२) जगत् विद्या आणि दोन्हींचा एकमेकांशीं संबंध दाखविणारी (३) कर्मविद्या सुद्धां सांगितली-दाखविली. या उपनिषदांत विद्या देणाऱ्या गुरुचें नांव ' यम ' आहे. या ब्रह्मचर्य सूक्ताच्या १४ व्या मंत्रांत सुद्धां ' **आचार्यो मृत्युः** ' म्हणजे आचार्य मृत्यु आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यावरून प्रतीत होतें कीं या ब्रह्मचर्य सूक्ताशीं कठोपनिषदाचा संबंध आहे, आणि कठोपनिषदांतील कथेचें स्पष्टीकरण ब्रह्मचर्य सूक्ताच्या स्पष्टीकरणानें होण्याचा संभव आहे. त्याचा विचार वाचकांनीं करावा.

तिसऱ्या मंत्रांत असें कथन आहे कीं, ' जेव्हां तो ब्रह्मचारी जन्म घेऊन गुरुच्या उदरांतून बाहेर येतो तेव्हां त्यास पाहाण्यासाठीं सर्व विद्वान एकत्र होतात. ' वर सांगितल्याप्रमाणें तीन रात्रीं पूर्ण होईपर्यंत म्हणजे तीन प्रकारचें अज्ञान दूर होईपर्यंत ब्रह्मचारी गुरुजवळ रहातो, अथवा गुरुच्या आधीन रहातो. जेव्हां तीन प्रकारचें अज्ञान दूर होतें तेव्हां तो स्वतंत्रतेच्या विश्वांत संचार करण्यास योग्य होतो. मंत्रांतील शेवटच्या चरणांत ' **जातं** ' शब्द आहे. त्याचा अर्थ ' ज्यानें जन्म घेतला आहे ' असा होतो. गुरु पिता आणि विद्या माता आहे. या विद्यारूपी मातेपासून यावेळीं जन्म होतो. हा दुसरा जन्म आहे. त्याविषयीं म्हटलें आहे—

स हि विद्यातस्तं जनयति । तच्छ्रेष्ठं जन्म ।
शरीरमेव मातापितरौ जनयतः ॥
(आप. ध. सू. ११११५ ते १७)

' तो आचार्य विद्यार्थी ब्रह्मचाऱ्यास उत्पन्न करतो. हा श्रेष्ठ जन्म होय. माता पितरें तर केवळ शरीर निर्माण करतात. ' या प्रमाणें आचार्यापासून जो दुसरा जन्म होतो, तो श्रेष्ठ जन्म आहे. हा जन्म प्राप्त केल्यानेंच द्विज होतो. द्विज होण्यानें सर्वत्र सन्मान होणें योग्यच आहे. गुरुकुळांतून या प्रकारें द्विज होऊन स्नातक

जेव्हां घरीं परत जातो, तेव्हां त्याचे नातेवाईक, सगेसोयरे त्याचा तेथें मोठा सन्मान करतात.

या चौथ्या मंत्रांत पृथ्वीरूपी प्रथम समिधेंतून ' भोग ' आणि द्युलोकरूपी द्वितीय समिधेपासून ' ज्ञाना ' चें तात्पर्य येथें अभीष्ट आहे. ज्ञान आणि भोग या दोन समिधाद्वारां अंतरिक्ष-स्थानीय हृदयाची संतुष्टता आणि परिपूर्णता करणें हा ब्रह्मचर्याचा उद्देश आहे. या मंत्रांत ' पृथ्वी, अंतरिक्ष, आणि द्यौ ' हे तीन शब्द बाह्यलोकवाचक नाहींत. कारण कीं द्युलोक तर त्यास अप्राप्यच आहे. त्यामुळें येथें स्वतःमधील स्थानांचा भाव येथें घेणें उचित आहे. सर्व शिक्षणाची परंपरा हृदयाच्या शुद्धतेसाठीं असली पाहिजे. निव्वळ भोगाची अथवा निव्वळ ज्ञानाची समृद्धि झाल्यानें सुद्धां कार्य होऊं शकत नाहीं. निव्वळ उदर पोषण अथवा ग्रंथावलोकनानें सुद्धां कार्यभाग होऊं शकत नाहीं. परंतु जेव्हां हृदयाची शुद्धता, पवित्रता आणि निर्मलता होते, तेव्हां जीवनोद्देशाची पूर्ति होते. या उद्देशाची स्पष्टता करण्यासाठीं हा मंत्र आहे. भूलोक आणि द्युलोकांतील ज्ञान या दोन्हींचा उपयोग अंतःकरणाच्या शुद्धिसाठींच व्हावयास हवा. जगांत शांतता प्रस्थापित करण्याचें तेंच एक साधन आहे. साधारण मनुष्यें केवळ ज्ञानविज्ञानाचा प्रचार करतात अथवा भोग वाढविण्यास प्रवृत्त होतात; परंतु वेद येथें सर्वांना सावधान करून स्पष्टतेनें सांगत आहे कीं भोग आणि ज्ञानाचें समर्पण जेव्हां हृदयाच्या पूर्णतेसाठीं होईल, तेव्हांच मानवजातीची खरी उन्नति होईल. या मंत्रभागापासून वाचक पुष्कळ बोध घेऊं शकतात.

श्रमाचें तत्त्वज्ञान

यानंतरच्या मंत्रभागांत म्हटलें आहे कीं, ' ब्रह्मचारी स्वतः-च्या समिधा मेखला, परिश्रम आणि तपानें सर्व लोकांस आश्रय देतो. ' समिधा शब्दाचा अर्थ पूर्वी सांगितला आहे. ' मेखला ' शब्द कटिबद्ध होण्याची सूचना देतो. जनतेच्या हिताचें कार्य तसेंच सर्वांच्या उन्नतीचें कार्य करण्यासाठीं आणि स्वतःच्या अभ्युदय निःश्रेयाचें साधन करण्यासाठीं ब्रह्मचाऱ्यानें नेहमीं ' कटिबद्ध ' म्हणजे तयार असलें पाहिजे. ' श्रमा ' चे तात्पर्य परिश्रम-कष्ट आहे. सर्वप्रकारचे पुरुषार्थ साध्य करणें हें परि-श्रमानेंच होऊं शकते. वेदांत म्हटलें आहे—

न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः । (ऋ. ४।३३।११)

' श्रम केल्यावांचून देवसुद्धां मदत करीत नाहींत. ' तसेंच ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे कीं—

नाऽनाश्रांताय श्रीरस्ति। पापो नृषद्वरो जन इन्द्र इच्चरतः सखा । चरैवेति चरैवेति ॥ १ ॥

पुष्पिण्यो चरतो जंघे भूष्णुरात्मा फलग्रहिः ।
शेरे अस्य सर्वे पाप्मानः श्रमेण प्रपथे हताः ।
चरैवेति चरैवेति ॥ २ ॥
आस्ते भग आसीनस्योर्ध्वस्तिष्ठति तिष्ठतः ॥
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ।
चरैवेति चरैवेति ॥ ३ ॥
कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ।
चरैवेति चरैवेति ॥ ४ ॥
चरन्वै मधु विंदति चरन् स्वादुमुदुंबरम् ।
सूर्यस्य पश्य श्रेमाणं यो न तंद्रयते चरन् ।
चरैवेति चरैवेति ॥ ५ ॥ (ऐत. ब्रा. ७।१५)

' (१) श्रमावांचून श्रीची प्राप्ति होत नाहीं. सुस्त मनुष्य पापी आहे. पुरुषार्थ करणारा मित्र ईश्वर होय म्हणून पुरुषार्थ करा, प्रयत्न करा. (२) जो चालतो त्याच्या मांड्या त्यामुळें पुष्ट होतात. फलप्राप्तिपर्यंत प्रयत्न करणारा आत्मा प्रभावशाली असतो आणि प्रयत्न करणाऱ्याचा पापभाव मार्गांत लय पावतो, म्हणून प्रयत्न करा, श्रम करा. (३) जो बसून रहातो त्याचे दैवसुद्धां बैठक मारतें, जो उभा रहातो त्याचें दैव उठून उभे रहाते; जो झोंपतो त्याचे दैव झोंपी जाते आणि जो चालतो त्याचें दैवसुद्धां प्रगति करतें. म्हणून प्रयत्न करा, परिश्रम करा. (४) झोंपून रहाणें तें कलियुग, आळस सोडून देणें तें द्वापरयुग, उठून उभे रहाणें तें त्रेतायुग आणि पुरुषार्थ करणें तें सत्ययुग होय म्हणून पुरुषार्थ करा, परिश्रम करा. (५) मधमाशी फिरते त्यामुळें ती मध गोळा करूं शकते. पक्षी फिरतात म्हणून त्यास मधुर फळें प्राप्त होतात. सूर्याची शोभा आहे त्याच्या निरालस फिरण्यामुळेंच. म्हणून, पुरुषार्थ, परिश्रम, प्रगति यांसाठीं प्रयत्न करीत रहा. ' याप्रकारें परिश्रम करण्याचा उपदेश ब्राह्मण ग्रंथ-कारांनीं केला आहे. प्रत्येक मनुष्यानें हा उपदेश स्मरणांत ठेवणें योग्य आहे. तसेंच—

श्रमयुवः पदव्यो धियंधास्तस्थुः पदे परमे चार्वग्नेः ॥ (ऋ. १।७२।२)

' (**श्रम-युवः**) परिश्रम करणारा (**पद-व्यः**) मार्गानें जाणारा (**धियं-धाः**) धारणावती बुद्धि धारण करणारा, पुरुषार्थी मनुष्यच (**अग्नेः परमे पदे**) आत्माग्नीचें सुंदर परमस्थान प्राप्त करतो. ' तसेंच—

श्रान्ताय सुन्वते वरूथमस्ति । (ऋ. ८।६७।६)

' परिश्रम करून यज्ञ करणाऱ्यासच ईश्वराचें संरक्षण प्राप्त होतें.

अशा प्रकारें परिश्रमाचें महत्त्व वेद ठिकठिकाणीं वर्णन करीत आहे. परिश्रम करणारा, पुरुषार्थ, प्रयत्न करणारा मनुष्य स्वतःचा तसेंच जनतेचा अभ्युदय करूं शकतो. आतां तपाविषयीं थोडें सांगणें बाकी आहे. तपाचें स्वरूप केवढें व्यापक आहे तें पहा—

ऋतं तपः, सत्यं तपः, श्रुतं तपः, शान्तं तपो, दमस्तपः, शमस्तपो, दानं तपो, यज्ञस्तपो, भूर्भुवः स्वर्ब्रह्मैतदुपास्वैतत्तपः । (तै. आ. १०।८)

' ऋत, सत्य, अध्ययन, शांति, इंद्रियदमन, मनोविकारांचें शमन, दान, यज्ञ (भूः) अस्तित्व (भुवः) ज्ञान (स्वः) आनंद वगैरे सर्व तपच आहे. ' विचार केल्यानें ध्यानीं येईल कीं, जन्मापासून मरेपर्यंत प्रत्येक चांगला प्रयत्न हें एक प्रकारचें तपच आहे. तपामुळें आपण सर्व जिवंत राहूं शकतों, तपानें उन्नति करूं शकतो, तपानें उच्च अवस्था प्राप्त करूं शकतो, तपानेंच स्वतःच आणि जनतेचा अभ्युदय साध्य करूं शकतो. ' म्हणून वेदानें या मंत्रांत सांगितलें आहे कीं ' ब्रह्मचारी श्रम आणि तपानें सर्व लोकांस पूर्ण उन्नत करतो. ' जर ब्रह्मचारी श्रम करणार नाहीं, आणि तपाचरण करणार नाहीं तर त्याची उन्नति होणार नाहीं आणि तो दुसऱ्याचें सुद्धां कांहीं कल्याण करूं शकणार नाहीं. (१) आत्मशक्तिरूपी समिधा अर्पण करावयाची आहे. (२) नेहमीं कटिबद्ध राहून जनकल्याणासाठीं पुरुषार्थ करावयाचा आहे. (३) आनंदानें परिश्रम करून प्रारंभिलेलें शुभ कार्य समाप्त करावयाचें आहे. तसेंच (४) सत्यनिष्ठापूर्वक सर्व योग्य श्रेष्ठ कार्य करीत असतांना जे कष्ट पडतील ते शांतीनें सहन करावयाचे आणि फलप्राप्तीपर्यंत प्रारंभिलेलें शुभ कार्य मध्येंच न सोडण्याचा बोध या मंत्रानें प्राप्त होतो.

मृत्यु स्वीकारण्याची सिद्धता

या मंत्राचा विचार करतांना खालील मंत्र पहा—

मृत्योरहं ब्रह्मचारी यदस्मि निर्याचन् भूतात् पुरुषं यमाय । तमहं ब्रह्मणा तपसा श्रमेणानयैनं मेखलया सिनामि ॥ (अथर्व. ६।१३३।३)

' (मृत्योः ब्रह्मचारी) मीं मृत्यूस समर्पित झालेला ब्रह्मचारी आहे. म्हणून (भूतात्) मनुष्यापासून यमासाठीं एक पुरुषाची (याचन्) इच्छा करतो. [जो पुरुष येईल] त्याला सुद्धां मीं (ब्रह्मणा) ज्ञानानें, तपानें, परिश्रमानें आणि या मेखलेनें (सिनामि) बांधतो. '

ब्रह्मचाऱ्याचा संबंध मृत्यु अथवा यमाशीं आहे. ही गोष्ट या मंत्रांत सांगितली आहे. ब्रह्मचारी सुद्धां जाणतो कीं, आतां मीं मातापित्यांचा नाहीं पण मृत्यूला समर्पण झालेलों आहें. म्हणजे घरचीं प्रलोभनें दूर झालीं आहेत. पहिल्या जन्मानें प्राप्त झालेल्या शरीराचा मृत्यु होण्यापूर्वीं दुसरा जन्म प्राप्त होऊं शकत नाहीं. म्हणून जो ' द्वि-जन्मा ' असतो त्याला ' द्विज ' होण्यापूर्वी एकवार मृत्यूच्या ताब्यांत जावें लागतें. अशा प्रसंगीं आचार्यच मृत्यूचें कार्य करतो. मातापित्यापासून प्राप्त शारीरिक आणि मानसिक स्थितींत योग्य तें परिवर्तन करणें तसेंच त्यास सुयोग्य करणें हें आचार्याचें कार्य आहे. कठोपनिषदांत सुद्धां या दृष्टीनें गुरूच्या स्थानीं मृत्यूला मानलें आहे. ब्रह्मचर्य सूक्तांत सुद्धां ' आचार्योंच ' मृत्यु म्हटलें आहे. तसेंच या मंत्रांत स्वतः ब्रह्मचारी म्हणतो कीं, ' मीं आतां मृत्यूस समर्पित झालों आहे. ' याप्रकारें मृत्यूला समर्पित झालेला ब्रह्मचारी गुरुकुलांतील विद्यामृताचें पान करीत आनंदानें म्हणत आहे कीं ' मीं जनतेंतून अनेक पुरुष याप्रकारें मृत्यूला (आचार्याला) समर्पण करण्याची इच्छा करतों. ' म्हणजे ब्रह्मचाऱ्याची अशी भावना असावयास हवी कीं त्यानें स्वतःच्या गुरुकुलांत जास्त ब्रह्मचारी आकर्षित करावें. स्वतः इतकें योग्य व्हावें कीं, त्याला पाहून इतर विद्यार्थ्यांनीं तेथें जावें. ब्रह्मचाऱ्याचे परस्पर संबंध सुद्धां ' ज्ञान, तप, परिश्रम ' वगैरे उच्च भावनांचे असावयास हवेत. एका ब्रह्मचाऱ्याचा इतर सहपाठी यांशीं असाच संबंध आहे. असला पाहिजे. म्हणजे एका ब्रह्मचाऱ्यानें दुसऱ्या ब्रह्मचाऱ्यास ज्ञान द्यावें, जें स्वतः जाणतो तें दुसऱ्यास समजवावें, दुसऱ्याच्या कल्याणासाठीं परिश्रम करावेत. आणि दुसऱ्याचें हित करण्यासाठीं स्वतः क्लेश सुद्धां सहन करावेत.

सर्व ब्रह्मचाऱ्यांनीं स्वतः स्वतःला मृत्यूला समर्पित असें समजलें पाहिजे. तसेंच ब्रह्मचाऱ्याच्या मातापित्यांनीं सुद्धां जाणावें कीं आमचा पुत्र मृत्यूस समर्पित केलेला आहे. कारण कीं गुरुकुलांत प्रविष्ट झालेला ब्रह्मचारी संपूर्णपणें जनतेचा होतो. तो आतां एकट्या मातापित्यांचा नव्हे तर समस्त जनतेचा संपूर्णपणें पुत्र झालेला असतो. एवढेंच नव्हे तर स्वतः ब्रह्मचारी स्वतःला ब्रह्मचारी स्वतःला मृत्यूस समर्पित समजूं लागतो. जो आनंदानें मृत्यूला भेटावयास तयार होतो, जो स्वतःच्या हाडांच्या समिधा बनवण्यास तयार होतो, जो स्वतःचें वीर्य, बल, पराक्रमरूपी तुपानें राष्ट्राच्या नरमेधांत आहुति देण्यास उत्सुक होतो, तसेंच जो आत्म सर्वस्वाची पूर्णाहुति हातांत घेऊन तयार आहे, त्यास इतर क्लेश-पीडा त्रासवूं शकत नाहींत, परिश्रमांच्या भयानें तो स्वकार्यापासून परावृत्त होऊं शकत नाहीं. असा आहे, ब्रह्मचाऱ्याचा पराक्रम.

तपानें उन्नति

पांचव्या मंत्रांत तपाचें महत्त्व सांगितलें आहे. ब्रह्मचर्यात 'धर्म आणि तप ' चें जीवन व्यतीत करावयाचें असतें. गर्मी, उष्णता याचें नांव आहे धर्म आणि योग्य व्यवहार करण्याचे वेळीं जे क्लेश होतात ते आनंदानें सहन करणें त्याचें नांव आहे तप. दोन्हींच्या मदतीनें प्रत्येकाची उन्नति होते. शीत उष्ण सहन करण्यानें शरीराचें आयुष्य वाढतें. हानिलाभ यांकडे लक्ष न देता कर्तव्य तत्पर होण्यानें फलसिद्धिपर्यंत कार्य करण्याचा उत्साह कायम रहातो. त्याप्रमाणें इतर द्वंद्वें सहन करण्यामुळें स्वतःची शक्ति वाढते. शारीरिक, मानसिक बौद्धिक आणि आत्मिक बळ वाढणें हेंच उच्चता प्राप्त झाल्याचें फळ होय. हीच गोष्ट '**घर्मं वसानः तपसा उदतिष्ठन्** ' म्हणजे उष्णता धारण करून कष्ट सहन करण्यामुळें उच्च होतो, या मंत्रांत हें स्पष्टतेनें सांगितलें आहे.

ब्रह्मचारीच श्रेष्ठ ज्ञानाचा प्रसार करतो. वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचर्याच्या सुनियमांचें पालन केल्यानंतर जेव्हां तो ज्ञानी होतो आणि स्वतःची योग्यता उच्च करतो, तेव्हांच त्याचेकडून श्रेष्ठ ज्ञानाचा प्रसार होतो. हा भाव '**तस्मात् ज्येष्ठं ब्रह्म जातं** ' या मंत्रभागांत सांगितलें आहे. ज्ञानाचा प्रचार होण्यापूर्वी ज्या प्रकारची योग्यता असावयास पाहिजे त्या प्रकारची योग्यता या मंत्रांत सांगितली आहे. सत्य, धर्म, ज्ञानाचे प्रचारक भले पैसे घेऊन अगर फुकट काम करणारे असोत, परंतु ते वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचर्य समाप्त करून श्रमानें आणि तपानें स्वतःची उच्चता ज्यांनीं प्राप्त केली आहे त्या प्रकारच्या धर्मोपदेशकांकडूनच ब्रह्मासंबंधीं श्रेष्ठ ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार होऊं शकेल. इतर धर्मोपदेशक सत्यधर्माच्या प्रचारास लायक नाहींत.

तसेंच तोच ज्ञानी आणि अनुष्ठानी ब्रह्मचारी, '**देवाः अमृतेन साकं** ' सर्व देवांस अमृत वचनांशीं मिळवूं शकतो. येथें 'देव ' शब्दानें व्यवहार करणारे सज्जन असा अर्थ घेतला पाहिजे. 'भूदेव' ब्राह्मण आहेत. वीरांचें नांव 'क्षात्रदेव ' वैश्यांचे नांव 'धनदेव ' तसेंच शूद्रांचे 'कर्मदेव ' असें नांव आहे. हे चार प्रकारचे तसेच निषाद नांवाचे पांचवे 'वनदेव ' सुद्धां वर सांगितलेल्या ब्रह्मचाऱ्याच्या उपदेशानें अमरत्व प्राप्त करतात. अशाप्रकारें सर्वांना अमृत प्रदान करणें, अशाप्रकारचे सुयोग्य, सूज्ञ धर्मज्ञानी उपदेशकांसच साध्य होतें, म्हणून वेदांत इतरत्रहि म्हटलें आहे कीं—

ब्रह्म ब्रह्मचारिभिरुदक्रामत्। तां पुरं प्रणयामि वः। तामाविशत, तां प्रविशत। सा वः शर्म च वर्म च यच्छतु ॥ (अथर्व. १९।१९।८)

'ब्रह्मचाऱ्यांकडूनच ज्ञानाची उत्क्रांती होते. त्या ज्ञानाच्या नगरींत मीं तुम्हांस घेऊन जातों. त्यांत प्रवेश करा, त्यांत शिरा, ती ज्ञाननगरीच आपणास सुख आणि संरक्षण देईल. '

असें आहे ज्ञानाचें महत्त्व. वरीलप्रमाणें खरा ब्रह्मचारी या ज्ञानाची उन्नति करतो. दुसऱ्या पगाराची इच्छा करणाऱ्या उपदेशकांकडून हें पवित्र कार्य होऊं शकत नाहीं. ही ज्ञाननगरी ज्ञान्यांच्या विचारक्षेत्रांत असते. जे सज्जन अशा विचारक्षेत्रांत पोहोंचतात, त्यांत प्रवेश करून तेथेंच वास्तव्य करतात, त्यांनाच खरें सुख आणि खरें संरक्षण प्राप्त होऊं शकतें. या ज्ञानाच्या नगरीचा मार्ग ब्रह्मचर्य आश्रम आहे. दुसरा कोणताहि रस्ता या नगरीपर्यंत जात नाहीं.

खरें पाहिलें तर प्रत्येकानें ज्ञानाच्या या पवित्र भूमींत गेलें पाहिजे. जो त्यांत प्रवेश करतो तो देवतांचा अंश होऊन जातो. पहा—

ब्रह्मचारी चरति वेविषद्विषः स देवानां भवत्येकमंगम्। (ऋ. १०।१०९।५; अथर्व. ५।१७।५)

'ब्रह्मचारी (विषः) सत्कर्में (**वेविषत् चरति**) करीत जात असतो. त्यामुळें तो देवांचें एक अंग बनून जातो. '

ब्रह्मचारी नियमानुकूल व्यवहार करतो. तसेंच सत्कर्म दक्षतापूर्वक करतो. म्हणून तो देवांचा एक अवयव, भाग अथवा अंग मानला जातो. त्यास कोणीं सामान्य मनुष्य समजूं नये, परंतु तो देवांचेंच अंग आहे. परंतु जो नियमपूर्वक चालणारा ब्रह्मचारी असेल तोच अशाप्रकारें श्रेष्ठ असतो. नकली ब्रह्मचारी श्रेष्ठ होऊं शकत नाहीं.

सहाव्या मंत्राच्या पूर्वार्धांत ब्रह्मचाऱ्याची रहाणीकरणी अत्यंत साधी आणि सरळ असली पाहिजे अशी सूचना दिली आहे. काळी कांबळी अथवा कृष्णाजिन त्याचें पांघरायचें वस्त्र आहे. थंडी दूर करण्यास अग्नि चेतवण्याचें साधन समिधा तयार आहेत. हजामत वगैरे करण्याची भानगड नाहीं. अशा प्रकारचा साधा सरळ ब्रह्मचारी असला पाहिजे. जेवढें साफ स्वच्छ आणि चलाख रहाणें शक्य आहे तेवढें राहिलें पाहिजे. खादीचा लंगोट, खादीचें धोतर, उपरणें आणि कुडतें, काळी कांबळ हाच ब्रह्मचाऱ्याचा पोषाख आहे. अशा प्रकारें साधेपणानें ब्रह्मचर्य नियमांचें उत्तमप्रकारें पालन करून स्वतः स्वतःला पवित्र करण्याच्या कामीं लक्ष लावून महामेहनतीनें विद्याध्ययन केलें पाहिजे, आणि सुफलतेबरोबर सफलता प्राप्त केली पाहिजे. अशारीतीनें विद्याध्ययन समाप्त करून नंतर तो गांवोगांव फिरून लोकसंग्रह करतो. एकाच विचारानें लोकांस एकत्रित करतो. त्यांस महान् कार्यांत प्रवृत्त

करतो. हें लोकसंग्रहाचें तात्पर्य आहे. जनतेची उन्नति करण्यासाठीं या प्रकारचें कार्य तो करतो. वारंवार ठिकठिकाणीं फिरून तो सर्वत्र जागृति करतो. पूर्वेपासून उत्तर समुद्रापर्यंत तो प्रचार करीत जातो. म्हणजे पूर्वावस्थेपासून उच्चतर अवस्थेस तो स्वतः पोहोंचतो आणि जनतेस पोहोंचवितो. याप्रकारें ब्रह्मचर्याश्रमरूपी पूर्व अवस्थेपासून गृहस्थाश्रमरूपी उत्तर अवस्थेस तो प्राप्त करतो.

' समुद्र ' (सं+उत्+द्रु) शब्द हालचालीचा द्योतक आहे. (सं) एकत्र होऊन (उत्) उत्कर्षासाठीं (द्रु) गति अथवा हालचाल, चळवळ करणें याचें नांव समुद्र आहे. या समुद्रांत आतां तो स्वतःची होडी चालविण्यास तयार होतो. जनतेची उन्नति करण्यासाठीं जी जी हालचाल अथवा चळवळ करणें आवश्यक आहे ती चळवळ आतां तो करूं लागतो.

ब्रह्मचाऱ्याची चळवळ

सातव्या मंत्रात सांगितलें आहे कीं पहिल्या अवस्थेंत ब्रह्मचारी मातापिता आणि घरदार या सर्वांचा मोह सोडून स्वतः स्वतःला मृत्यूला समर्पित समजतो. आणि सर्व प्रकारचे कष्ट आणि क्लेश सहन करण्याच्या दृढ निश्चयासह गुरुकुलांत वास्तव्य करून विद्या प्राप्त करण्याच्या कार्यक्रमांत तो गुंतून गेलेला असतो. या अवस्थेंत तो विद्या समाप्त होईपर्यंत रहातो. साधेपणानें रहाणें आणि उच्च विचार ठेवणें असा त्याचा सहज स्वभाव बनतो. जेव्हां तो विद्येच्या गर्भांतून बाहेर आला म्हणजे जेव्हां तो द्विज झाला तेव्हां तो (ब्रह्म) सत्यज्ञानाचा प्रचार करूं लागला. सत्यज्ञानाच्या प्रचारानें लोकांस (अपः) सत्कर्मांचा उपदेश त्यानें केला. सत्यज्ञान आणि सत्कर्मांच्या ज्ञानामुळें जनतेंत स्वकर्तव्याविषयीं जागृति उत्पन्न झाली. स्वतःच्या परिस्थितींस जागृत झालेल्या (लोकं) लोकांस स्वतःच्या वास्तविक अवस्थेचा बोध झाला. हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, अशी आमची योग्यता आहे, आमची उन्नति या रीतीनें होऊं शकते वगैरे गोष्टींचें ज्ञान जनतेंत प्रसरलें. एवढेंच करून तो ब्रह्मचारी स्वस्थ बसला नाहीं, परंतु त्यानें (प्रजापतिं) प्रजेचें पालन करणारा धर्मसुद्धां दाखवला. राजानें याप्रकारें वागलें पाहिजे, अधिकाऱ्यांचें हें कर्तव्य आहे, वगैरे सर्व उत्तमप्रकारें शिकविलें. त्याबरोबरच परमेष्ठी परमेश्वराचें रूपसुद्धां लोकांस दाखविलें. जगाचें खरें नियमन करणारा एकच परमेश्वर आहे, त्याच्यासमोर राजा काय रंक काय प्रत्येक प्रजाजनाला उभें रहावें लागतें. तोच सर्वांचा सहाय्यकर, न्याय करणारा आहे म्हणून त्यालाच प्रवांनीं सर्वश्रेष्ठ मानावें, वगैरे सत्य आणि धर्मानुकूल तत्त्वांचा उपदेश त्यांना ब्रह्मचाऱ्यानें केला.

याप्रमाणें ब्रह्मचाऱ्याकडून जी जागृति झाली त्यामुळें राष्ट्रांतील लोकांस समजूं लागले कीं हा सुर आहे आणि हा असुर आहे. असुरांस दूर करावें. देवांच्या अधिष्ठानाखालीं राष्ट्र येणार नाहीं तो पावेतों धर्माची स्थिरता होऊं शकत नाहीं. अशी खात्री होतांच सर्व जनता त्याला स्वतःचा इंद्र म्हणजे प्रमुख नेमते, आणि आतां तो असुरांस दूर करण्याच्या तयारीस लागतो. पूर्वी जें केवळ ज्ञानप्रचाराचें कार्य करीत होता तो आतां क्षात्रधर्माचा पुरस्कार करूं लागला. ' इंद्र ' शब्द (इन्) शत्रूंना (द्र) विदारणें अशा अर्थानें येथें आहे. या मंत्रावरून ध्यानीं येतें आणि अनुमान पण करतां येतें कीं, ब्रह्मचर्य अवस्थेंत जें अध्ययन केलें पाहिजे त्यांत ब्रह्मवर्चसाबरोबर क्षात्रतेजाचें सुद्धां संवर्धन होणें आवश्यक आहे. जनतेचें हित करतांना जर कोणती गोष्ट आवश्यक असेल, तर ती उत्साहानें करण्याची शक्ति आणि ओज त्याच्यांत असलें पाहिजे, हा आशय या मंत्रांत येथें प्रतीत होत आहे.

पहा, आतां तोच ब्रह्मचारी इंद्र होऊन म्हणजे क्षात्रदलाचा मुख्य होऊन (असुरान् ततर्ह) राक्षसांस पळवून लावतो. ' ततर्ह ' शब्द विनाश करण्याच्या अर्थीच वापरला जातो. संपूर्ण जनतेस उपद्रव देणाऱ्यांस असुर म्हणतात. श्रीमद् भगवद् गीता अध्याय १६, श्लोक ६ ते १८ पर्यंत असुरांचीं लक्षणें दिलीं आहेत. ' नास्तिक, निरीश्वरवादी, गर्विष्ठ, घमंडी, स्वार्थी, दुष्ट, भोगी, कामी, क्रोधी, अत्याचारी, क्रूर ' वगैरे असुरांचीं लक्षणें आहेत. सर्व प्रकारच्या घातकप्रवृत्ति करणारे लोक असुर होत. सर्व जनता त्यांच्याकडून त्रस्त होते. म्हणून ब्रह्मचारी प्रजेचा नेता होऊन अशाप्रकारच्या असुरांना दूर करून जनतेंत शांति प्रस्थापित करतो, त्यांना आश्वासन देतो. हाच ब्रह्मचाऱ्याचा आत्मयज्ञ होय.

आठव्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, ' आचार्य ततक्ष ' म्हणजे आचार्य येऊन शिष्याला आकार देतो; ' तक्ष् ' धातूचा अर्थ कोतरण्याच्या शस्त्रांनीं हत्यारांनीं काम करणें, आकार देणें, लांकडाचे निरनिराळे पदार्थ तयार करणें, कल्पनेनें नवीन यंत्रादिकांची योग्य रचना योग्यरीतीनें करणें, असा आहे. या धातूपासून ' तक्षक, तक्षन् ' असे शब्द तयार झाले. त्यांचा अर्थ, ' सुतार, लांकडाचें काम करणारा, खरादी, लांकडांस निरनिराळे आकार देणारा ', असे होतात. ' तक्षण ' शब्दाचा भाव कापणें असें आहे. यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल कीं, ' ततक्ष ' शब्दाचा भाव ' आकार देणें ' असा आहे. गुरु-आचार्यांचा भाव

'परमेश्वर' असा सुद्धा होऊं शकेल. योगदर्शनांत पतंजलि महामुनींनीं म्हटलें आहे कीं—

स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥ (यो. ६)

'तो ईश्वर प्राचीनांचा सुद्धा आचार्य आहे, कारण कीं तेथें समयाची कांहीं मर्यादा नाहीं.' या कथनावरून आचार्यांचा आचार्य आणि गुरूंचा गुरु परमेश्वर आहे. आणि तो पृथ्वीपासून स्वर्गापर्यंत द्युलोकापर्यंत संपूर्ण पदार्थांचा आकार तयार करतो. हा भाव स्पष्ट आहे. जें कार्य परात्पर गुरु परमेश्वर करतो तेंच कार्य येथें शिष्याच्या मानसिक सृष्टींत गुरु करतो. संपूर्ण विश्वांतील यच्चयावत् पदार्थांसह त्या विश्वाची यथातथ्य कल्पना शिष्याच्या मनांत उत्पन्न करण्याचें कार्य येथें अध्यापकाचें आहे. आणि त्या दृष्टीने म्हटलें आहे कीं गुरु शिष्यासाठीं पृथ्वी आणि द्युलोक तयार करतो. सृष्टीची कल्पना आपल्या ज्ञानांत आहे. सृष्टि-विषयक जेवढें ज्ञान आपणांस असेल तेवढीच आपणांपुरती सृष्टीची मर्यादा असते. ज्या पदार्थांचें ज्ञान आपणांस असत नाहीं त्या पदार्थांचे आपल्यापुरतें अस्तित्वच नसते. म्हणजे सृष्टीचें अस्तित्व आपणास ज्ञानपूर्वकच असतें. यामुळें सुद्धा म्हणण्यांत येतें कीं आचार्य ज्या ज्या पदार्थांचें ज्ञान देतो, त्या ज्ञानासह ते ते पदार्थसुद्धां देतो. आचार्य पृथ्वीपासून द्युलोका-पर्यंत सर्व पदार्थांचें ज्ञान देतो; म्हणजे वर म्हटल्याप्रमाणें ते पृथ्वी आणि द्युलोकच जणूं काय शिष्याला अर्पण करतो.

जो यावेळीं आचार्य आहे तो कोणे एकेकाळीं शिष्य आणि ब्रह्मचारी होता. त्यावेळीं त्याच्या गुरूनें त्रिभुवनाविषयीं जें जें ज्ञान त्यास दिलें, त्याचें संरक्षण करून स्वतः आचार्य झाल्यावर तेंच ज्ञान स्वतःच्या शिष्यास देतो. ज्ञान देण्यानें ऋषीचें ऋण फेडलें जातें. त्याचप्रमाणें हा शिष्यसुद्धां गुरुपासून प्राप्त झालेलें त्रिभुवन आणि तद्विषयक ज्ञान स्वतःजवळ संभाळून ठेवील, असें करणेंच त्यास योग्य होय. या मंत्रांतच म्हटलें आहे कीं '**ते रक्षति तपसा ब्रह्मचारी**' म्हणजे 'ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें त्याचें रक्षण करतो.' आचार्य जी जी गोष्ट शिष्यासाठीं तयार करतो, बनवितो, घडवितो, अथवा ज्ञानरूपानें त्यास देतो, त्याचें संरक्षण शिष्य करतो, अथवा प्राप्त ज्ञानाचें रक्षण शिष्यानें केलें पाहिजे. ज्ञानरूपानें त्रिभुवनाची स्थिति गुरुशिष्याच्या मनांतच आहे ही गोष्ट जो समजूं शकेल त्याच्याच या मंत्राचा आशय योग्य प्रकारें ध्यानीं येईल.

मंत्राच्या शेवटच्या भागांत सांगितलें आहे कीं, वर वर्णि-लेल्या 'ब्रह्मचाऱ्यांत त्याच्या मनाशीं अनुकूल मनें धारण करून सर्व देव रहातात.' पहिल्या मंत्राच्या स्पष्टीकरणांत त्याचा विचार झालेला आहे. अशा प्रकारच्या सुयोग ब्रह्मचाऱ्याचीं सर्व इंद्रियें आणि अवयव त्याच्या मनाच्या इच्छेस अनुकूल रहातात. तो संयमी होतो. मन वगैरे आंतरिक इंद्रियांचें दमन आणि सर्व बाह्य इंद्रियांचें शमन झाल्यामुळें तो दान्त आणि शांत होतो, हाच संयम आहे. ज्याचा पूर्णपणें '**सं-यम**' सिद्ध होतो. त्याचें नांव '**यम**' आहे आणि उत्तम यमाचें नांवच '**सं-यम**' आहे, यावरून वाचक समजूं शकतील कीं जो प्रथम सामान्य ब्रह्मचारी होता तो नंतर आचार्य होण्यापूर्वीं '**यम**' अथवा '**सं-यमी**' होतो. आचार्यांचेंच नांव '**यम**' आहे.

ब्रह्मचाऱ्याची भिक्षा

नवव्या मंत्राचें कथन आतां पहा. ब्रह्मचारी गुरुजवळ जातो आणि त्याच्याजवळ दोन्ही लोकांची भिक्षा घेतो. भूलोकाच्या भिक्षेपासून त्यास सर्व भोगांची प्राप्ति होते आणि द्युलोकापासून त्याला आत्मिकज्ञान प्राप्त होतें. याप्रकारें शारीरिक आणि आत्मिक पुष्टि तो ब्रह्मचारी प्राप्त करतो. पृथ्वी आणि द्युलोकाचा संबंध शारीरिक आत्मिक अभिवृद्धीशीं आहे. ही गोष्ट यापूर्वीं सिद्ध केली आहे. तसेंच लोकांचा अंश स्वतःच्या शरीरांत कोठें आहे, हें सुद्धां पूर्वीं दाखविलें आहे. गुरुपासून तो ज्ञानमय भिक्षा प्राप्त करतो आणि गुरु स्वतःच्या शिष्याला पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत संपूर्ण विश्वाची भिक्षा अर्पण करतो. पृथ्वी आणि द्युलोकामध्यें संपूर्ण विश्व आलें. म्हणजे शारीरिक, मानसिक आणि आत्मिक उन्नतिची संपूर्ण साधनें या भिक्षेनें त्या ब्रह्मचाऱ्यास प्राप्त होतात.

ब्रह्मचाऱ्याचा आत्मयज्ञ

जेव्हां ब्रह्मचारी या प्रकारच्या परिपूर्ण साधनांनीं संपन्न होतो तेव्हां तो दोन्ही लोकांच्या दोन समिधा करून हवन करतो. या ज्ञानयज्ञांत त्या ब्रह्मचाऱ्याला स्वतःची सर्व भिक्षा अर्पण कराव-याची असते. हा त्याचा सर्वस्व त्याग होय. जें प्राप्त केलें होतें अथवा झालें होतें तें सर्व इतरांच्या कल्याणासाठीं अर्पण करणें याचें नांवच आत्मयज्ञ आहे. शरीरिक, मानसिक आणि आत्मिक शक्तींचें समर्पण करून अंतीं स्वतःची पूर्ण आहुति देऊन या आत्मयज्ञाची समाप्ति होते.

जें कांहीं प्राप्त झालें त्याचें समर्पण समष्टि म्हणजे समुदा-याच्या भल्यासाठीं करणें याचें नांव यज्ञ आहे. समष्टीचें एक अंग व्यष्टी आहे. समाजाचें एक अंग व्यक्ति आहे. या कारणानें व्यक्तीची अंतिम सफलता संपूर्ण समाजाच्या पूर्णतेसाठीं स्वतः स्वतःचें समर्पण करणें हीच होय, हाच यज्ञ आहे, तीच पूजा, तीच उपासना आहे. ज्याच्याजवळ शक्ति आहे तिचा व्यय संपूर्ण

समाजाच्या उदयासाठीं करणें हाच त्या शक्तिचा उत्तमांत उत्तम उपयोग आहे. अशाप्रकारें ब्रह्मचारी आत्मयज्ञ करतो.

दोन कोश

दहाव्या मंत्रांत दोन कोशांचें वर्णन आहे. एक भूलोकीचा कोश आणि दुसरा द्युलोकाचा कोश आहे. दोन्ही कोश ब्राह्मणाच्या बुद्धींत रहातात. ब्राह्मण म्हणजे गुरु स्वतःच्या शिष्यास जें वर सांगितलेल्या दोन्ही लोकांचें ज्ञान देतो तें स्वतःच्या बुद्धींनेंच देतो. विद्वानाच्या बुद्धींत पृथ्वी, अंतरीक्ष, द्युलोक, तसेंच इतर सर्व विश्व रहातें आणि तो ज्ञानी स्वतःच्या शिष्याला उपदेशाद्वारां त्याचें प्रदान करतो. या मंत्रांत ही गोष्ट स्पष्ट झाली आहे कीं पृथ्वी आणि द्युलोक वास्तविक रीतीनें ज्ञान्याच्या बुद्धींत आहेत. बुद्धींत संपूर्ण दुनियेचें वास्तव्य आहे. ज्ञानी स्वतःच्या इच्छेनुसार इतरांस या विश्वाचें दान करतो.

कोशरक्षक ब्रह्मचारी

आचार्याजवळून वर सांगितल्याप्रमाणें दोन्ही कोश शिष्याच्या बुद्धींत उतरतात. म्हणजे पृथ्वीपासून स्वर्गापर्यंत संपूर्ण ज्ञान त्याला प्राप्त होतें. आतां विचार करा कीं या दोन्ही खजिन्यांचें कसें रक्षण होतें ? मंत्रांतच सांगितलें आहे कीं तपानें संरक्षण होतें. जो ब्रह्मचारी तप करतो, शीत, उष्ण वगैरे द्वंद्वें सहन करण्याची शक्ति वाढवतो, तोच वर सांगितलेल्या कोशांचें रक्षण करूं शकतो. तपाशिवाय, कष्ट सहन केल्याशिवाय, त्यांचें रक्षण होऊं शकत नाहीं. ही गोष्ट या मंत्रांत स्पष्ट सांगितली आहे.

दोन अग्नि

अकराव्या मंत्रांत अग्नींचें वर्णन आहे. पृथ्वीवर एक अग्नि आहे आणि द्युलोकांत दुसरा अग्नि आहे, तो सूर्यरूपानें आहे. या दोन्हींची प्रकाश किरणें मध्यें म्हणजे अंतरिक्षांत मिळतात. त्यांची किरणें सर्वत्र पसरतात, आणि ब्रह्मचारी त्यांचा अधिकारी असतो. पूर्वीच्या दोन्ही मंत्रांशीं या मंत्रांतील कथनाची तुलना केल्यानें ज्ञान होईल कीं (१) दोन्ही लोकांची भिक्षा, (२) बुद्धींत रहाणारे दोन्ही कोश तसेंच (३) दोन लोकांतील दोन अग्नि हें सर्व एकच मुख्य गोष्ट दाखवीत आहेत.

शरीरांत भूस्थानीय जठराग्नि आणि द्युस्थानीय मस्तकांत निवास करणारा सूर्यच अग्नि आहे. जठराग्नि आणि मेंदूंतील चैतन्याग्नि यांचें मिलन मध्यें हृदयांत होतें. तेथून सर्व स्थानांत किरणें पसरतात. अशा प्रकारचे हे दोन अग्नि आहेत.

ऊर्ध्वरेता मेघ आणि ब्रह्मचारी

बाराव्या मंत्रांस मेघाचें ब्रह्मचर्य सांगितलें आहे. वृष्टि करणारा मेघ मोठी गर्जना करून वृष्टि करतो, आणि सर्वांस जीवन देतो. दुसरे कित्येक मेघ जलहीन असतात परंतु मोठी गर्जना करतात. त्यांच्या गर्जनेनें जनतेस फक्त कष्टच होतात. म्हणून पहिल्या प्रकारचे मेघ (ऊर्ध्व रेताः) पाण्यानें भरपूर असतात आणि दुसऱ्या प्रकारचे मेघ (निर्वीर्य) जलहीन असतात.

त्याचप्रमाणें ऊर्ध्वरेता ब्रह्मचारी मेघनादाप्रमाणें स्वतःच्या मोठ्या अवाजानें व्याख्यान देऊन तद्वारां स्वतःच्या ज्ञानामृताची वृष्टि करतो आणि जनतेंस 'नवजीवन' प्रसरवितो. परंतु दुसरे कित्येक निःसत्त्व उपदेशक असे असतात कीं जे व्याख्यानाचा खटाटोप करतात परंतु त्यांच्या वक्तृत्वानें कोणास कांहींच लाभ होत नाहीं. त्याचें कारण पहिल्यांत वीर्यासह तप असतें, आणि दुसऱ्यांत तें नसतें.

मोठ्या ब्रह्मचाऱ्याचें कार्य

तेराव्या मंत्रांत सर्वांत मोठा ब्रह्मचारी परमात्मा सांगितला आहे. तो अग्नि, सूर्य, चंद्र, वायु, जल वगैरे देवतांमध्यें विशेष प्रकारच्या समिधा टाकतो. त्या समिधांनीं ते देव स्वतःचें कार्य करण्यास शक्तिशाली होतात. अग्नि, सूर्य वगैरे देव परमात्म्याच्या तेजानें प्रकाशतात. वायु परमात्मशक्तीनें वहातो, पाणी त्याच्याच शांतीनें दुसऱ्यांस शांति देते. म्हणजे परमात्मा स्वतःची शक्तिरूपी समिधा प्रत्येकांत ठेवतो. त्यामुळेंच अग्नि वगैरे देवता स्वतःचें कार्य करतात. प्रत्येक देवतेपासून निरनिराळें तेज उत्पन्न होतें आणि तें तेज अंतराळांत एकत्र होतें. त्यामुळें वृष्टि आणि जळ निर्माण होतें. पाण्यानें वृक्ष, वनस्पति, त्यांपासून अन्न, अन्नापासून वीर्य आणि वीर्यापासून पुरुष, अथवा मनुष्य इत्यादि प्राणि यांची उत्पत्ति होते. हें मोठ्या ब्रह्मचाऱ्याचें विश्वांतील कार्य आहे.

लहान ब्रह्मचाऱ्याचें कार्य

आतां लहान ब्रह्मचाऱ्याचें कार्य पहा. लहान ब्रह्मचारी म्हणजे जो गुरुगृहीं जाऊन रहातो, यम-नियमांचें पालन करून विद्याभ्यास करतो. परमात्म्यांत ज्या (१) अग्नि, (२) सूर्य, (३) चंद्रमा, (४) वायु, (५) जल इत्यादि देवता आहेत त्यांचे अंश ब्रह्मचाऱ्यांत क्रमशः (१) वाणी (२) नेत्र, (३) मन, (४) प्राण, (५) वीर्य वगैरे रूपानें आहेत. हा लहान ब्रह्मचारी स्वतःच्या समिधा त्यांच्यांत टाकतो आणि त्यांना प्रज्वलीत करतो. वक्तृत्व, शक्ति, दृष्टि, विचारशक्ति, जीवनाची कला, आणि वीर्य तसेंच इतर शक्तींचा

विकास करणें हें लहान्या (धाकट्या) ब्रह्मचाऱ्याचें कार्य आहे. स्वतःच्या आत्मशक्तीची समिधा तो स्वतःच्या वर सांगितलेल्या अग्नींत टाकतो, आणि त्यांस प्रज्वलित म्हणजे जास्त तेजस्वी करतो. जेव्हां त्या शक्ति वृद्धिंगत होतात तेव्हां त्यांच्या ज्वाला, अंतरिक्षांत म्हणजे अंतःकरणांत अथवा हृदयांत जळूं लागतात. वाणी, नेत्र, कर्ण, मन, प्राण वगैरेंचा संबंध अंतःकरणाशीं असूं शकतो. त्यामुळें एक प्रकारचें बिलक्षण तेज उत्पन्न होतें. त्यामुळें पुरुषाची प्रसिद्धि होते. त्यामुळें ज्ञानाची वृष्टि झाल्यानें सर्वत्र शांति प्रसरते.

धाकट्या आणि मोठ्या ब्रह्मचाऱ्यांचीं हीं कार्यें पहाण्यासारखीं आहेत. हीं कार्यें पाहिलीं असतां दोघांच्या कार्यांची समानता व्यक्त होते. ही समानता पहाण्यासारखी आहे. आत्मा-परमात्म्याचें कार्यक्षेत्र आणि गुणसाधर्म्य याप्रमाणें पहाण्यासारखें आहे.

आचार्याचें स्वरूप

चौदाव्या मंत्रांत आचार्यासच मृत्यु म्हटलें आहे. कारण कीं त्याच्या कृपेनें दुसरा जन्म प्राप्त होतो, आणि शिष्य '**द्विज**' होतो. पहिला जन्म मातापित्यापासून प्राप्त होतो. प्रथम प्राप्त झालेल्या शरीराचा मृत्यु उपनयन संस्काराच्यावेळीं होतो. त्यानंतर त्या ब्रह्मचाऱ्याचा आत्मा विद्यादेवीच्या गर्भांत रहातो. विद्या आणि आचार्याच्या गर्भांत नियत समय म्हणजे १२, २४, ३६ अथवा ४८ वर्षें पर्यंत राहून तो गर्भांतून बाहेर येतो. हा त्याचा दुसरा जन्म होय. परमात्म्याचें नांव मृत्यु आहे. म्हणून पहिलें जीर्ण शरीर सोडून दुसरें कार्यक्षम असें नवें शरीर तो देतो. गुरु-आचार्य सुद्धां हेंच कार्य संस्काररूपानें करतो, म्हणून आचार्यास मृत्यु म्हटलें आहे.

आचार्य वरुण आहे. वरुणास निवारक म्हणतात. तो पापापासून निवारण करतो आणि पुण्यमार्गांत प्रवृत्त करतो. म्हणून आचार्यच वरुण आहे. वरुण शब्द वरत्व म्हणजे श्रेष्ठत्वदर्शक सुद्धां आहे. आचार्याची श्रेष्ठता सुप्रसिद्ध आहे. आचार्याचा अर्थच असा आहे कीं (**आचारं ग्राहयति**) जो सदाचाराचें शिक्षण देतो-वळण लावतो.

आचार्य सोम म्हणजे चंद्र होय. चंद्राप्रमाणें शांति आणि आनंद देण्याचें काम आचार्य करतात. आचार्यापासून जी विद्या प्राप्त होते, ती शिष्याच्या अंतरांत शांति आणि आनंद स्थिर करण्यास कारणरूप होते. '**सोम**' शब्दाचा दुसरा अर्थ (**स+उमा**) ज्ञानी असा सुद्धां आहे. '**उमा**' शब्द संरक्षक विद्या अथवा ज्ञान अथवा मूलशक्तीचा वाचक केन उपनिषदांत (३।१२) आला आहे. उमा शब्दाचा अर्थ '**ब्रह्मविद्या**' अथवा 'मूलशक्ति' असा होतो. (**अवति इति उमा**) जी रक्षक विद्या अथवा शक्ति असते तिचें नांव आहे 'उमा.' या प्रकारची संरक्षक शक्ति अथवा विद्या ज्याच्याजवळ असते (**उमया सहितः सोमः**) त्याला ज्ञानी अथवा समर्थ म्हणतात.

आचार्य औषधि आहे. औषधि शब्द '**दोषधि**' शब्दापासून झाल्याचें निरुक्तकार सांगतात. (निरु. दै. ३।३।२८) दोषांस दूर करणें आणि स्वास्थ्य प्राप्त करणें हीं कामें औषधि करते. तेंच कार्य आचार्य करतो. शिष्याचे दोष दूर करून त्याच्या मध्यें (**स्व-स्थ-ता**) स्वावलंबन म्हणजे स्वतःच्या शक्तीनें उभे राहणें यासाठीं बळ आचार्य देतो. त्यामुळें आचार्य औषधि आहे.

आचार्य दूध आहे. '**पयः**' शब्दाचा अर्थ 'दूध, जल, वीर्य, अन्न, बळ, उत्साह' इतके आहेत. या सर्व अर्थांचा भाव 'पुष्टीचें साधन' इतकाच आहे.

पंधराव्या मंत्रांत गुरुशिष्यांच्या सहवासाचें महत्त्व सांगितलें आहे. त्यापासून विशेष लाभ तर शिष्यासच होतो आणि तो गुरुच्या सहवासानें होतो.

'**अमा**' शब्द सहवास म्हणजे बरोबर रहाण्याचा भाव दाखवितो. सूर्य आणि चंद्राच्या सहवासामुळें अहोरात्रीचें नांव '**अमा**' अथवा '**अमावास्या**' पडलें आहे. येथें सूर्य स्वयंप्रकाशी असल्यानें गुरु स्वतः आणि चंद्र परप्रकाशी असल्यामुळें त्याचा शिष्य आहे. हा जो चंद्र सूर्यांचा सहवास '**अमावास्या**' या दिवशीं होतो तोच सहवास गुरुशिष्यांविषयीं येथें '**अमा**' शब्द दाखवतो. आचार्यरूपी सूर्याच्या विद्यातेजानें शिष्यरूपी चंद्रमा प्रकाशित होतो. आणि हा सूर्य आणि चंद्र विद्याध्ययनाच्या समाप्तिपर्यंत एकत्रित रहातात. इतकेंच नाहीं पण येथील '**अमा**' शब्द सूचित करतो कीं गुरुशिष्यांचा सहवास विद्याध्ययनाच्या समाप्तिपर्यंत अवश्य राहिला पाहिजे. नक्की ठरवलेल्या वेळीं गुरूनें शिकविण्यास यावें आणि शिकविण्याचें कार्य झाल्यावर निघून जावें, हा आधुनिक अध्यायनाचा प्रकार बरा नव्हे. शिष्य गुरूच्या कायम सहवासांत राहिला तर त्याला जरूर अत्यंत लाभ प्राप्त होतो. त्याच उद्देशानें गुरुकुलांची प्रणालि वेदानें दाखविली आहे. गुरूच्या घरीं त्याच्या पुत्राप्रमाणें शिष्य रहात असत. यावेळीं ते गुरुचे सर्व गुण पाहूं शकत असत, आणि त्यांचें अनुकरण करूं शकत असत. गुरुशिष्यांचा

नित्य सहवास शिष्याला अत्यंत लाभकारक आहे असें आतां सर्व लोक मानूं लागले आहेत.

या मंत्रांत ' घृत ' शब्द आहे. ' घृ-क्षरण-दीप्त्योः ' या धातूपासून तो शब्द तयार झाला आहे. (१) प्रवाह चालू रहाणें आणि (२) तेज प्रसरणें या दोन अर्थी ' घृ ' धातूचा उपयोग होतो. घृत शब्दांत सुद्धां हे दोन्ही भाव आहेत. गुरु-शिष्यांचा सहवास घृत करतें असें मंत्राचें सांगणें आहे. म्हणजे गुरुशिष्याच्या सहवासानें विद्येचा प्रवाह चालत रहातो, आणि ज्ञानाचें तेज प्रसरतें. आज पावेतों ज्ञानाचा प्रवाह गुरुशिष्यांच्या संबंध-सहवासानेंच आमच्यापर्यंत पोहोंचला आहे आणि तेंच ज्ञान मनुष्याचें तेज वाढवतें यांत कांहीं शंका असणें शक्यच नाहीं.

आतां प्रश्न असा निर्माण होतो कीं गुरु शिष्याजवळ दक्षणा कशी, कसली, किती मागत असेल ? गुरुदक्षणेचें स्वरूप दाख-विणारा शब्द या मंत्रांत ' प्रजा-पतौ ' असा आहे. ही गुरु-दक्षणा प्रजेचें पालन करण्यासंबंधीं असते. प्रजेच्या पालन-संरक्षणाविषयीं अथवा जनतेच्या हितसंबंधाबाबतच दक्षणा असते. म्हणजे गुरु स्वतःच्या स्वार्थासाठीं दक्षणा मागत नाहीं. म्हणजे आचार्य अशी दक्षणा मागतात, कीं ज्यामुळें सर्व जनते-च्या पालनाविषयीं कांहीं भाग या दक्षणेनें साध्य व्हावा. हा आचार्यांचा सार्वजनिक कल्याण साधण्याचा भाव पहाण्यासारखा आहे. या रीतीनें आचार्य स्वतः शिष्यास दाखवून देत आहे कीं संपूर्ण प्रजेच्या पालन रक्षणाविषयीं उचित कर्तव्य करण्यांत स्वतः स्वतःला समर्पित केलें पाहिजे, हेंच मनुष्याचें मनुष्यत्व आहे. आणि राष्ट्रीय शिक्षणाचा हाच आदर्श आहे. गुरुप्रमाणें शिष्य-सुद्धां प्रजापालन कर्तव्याचा स्वतःच्या वाटचा भार उचलतो आणि स्वतः उत्तम नागरिक आहे हें सिद्ध करतो.

स्वराज्यांत सर्व नागरिक प्रजापालनात्मक कार्य करणाऱ्या ' प्रजापति संस्थे ' च्या अंगभूत असतात. म्हणून प्रत्येक अंशभूत नागरिकानें संपूर्णपणें राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं स्वतःच्या कर्तव्य पालनाची पराकाष्ठा करणें अत्यंत आवश्यक आहे.

सोळाव्या मंत्रांत म्हटलें आहे कीं ' आचार्यः ब्रह्मचारी ' म्हणजे राष्ट्रांत जे अध्यापक आहेत ते सर्व ब्रह्मचारी असले पाहि-जेत. ब्रह्मचारी या शब्दाचा अर्थ येथें विवाह न केलेले असा नाहीं. विवाहानंतर सुद्धां ऋतुगामी होण्यानें आणि दुसऱ्या कित्येक नियमांचें पालन करण्यानें ब्रह्मचारी रहातां येते. लहान मोठे सर्वच अध्यापक आणि जे दुसरे कोणी लोकहिताच्या कामीं लागले आहेत ते सर्व ब्रह्मचारी असले पाहिजेत. कामी, भोगी, लोभी तसेंच स्वार्थी असतां कामा नये. ब्रह्मचर्याचें महत्त्व जेव्हां सर्व अध्यापकांस कळून येईल तेव्हां ते स्वतःच शिष्यांना त्याची दीक्षा देऊं शकतील. आणि याप्रमाणें जी गोष्ट अध्यापकांकडून राष्ट्रां-तील युवकांच्या मनांत स्थिर केली जाईल ती संपूर्ण राष्ट्रांत दृढ-मूल होईल.

आदर्श राज्यशासन

क्षत्रियसुद्धां ब्रह्मचारी असले पाहिजेत. राजा, महाराजा, सम्राट्, प्रधानमंत्री, सेनानायक, सैनिक, ग्रामाधिकारी तसेंच इतर हुद्देदार स्वतः ब्रह्मचर्याचें पालन करणारे असले पाहिजेत येथें ब्रह्मचारी असण्याचें तात्पर्य फक्त बाल्यअवस्थेंत ब्रह्मचर्य पालन करणें एवढेंच नाहीं. परंतु त्यानंतर गृहस्थाश्रमांतसुद्धां ब्रह्मचर्य नियमाचे पालन केलें पाहिजे असें आहे. सर्व राज्याधिकारी असे असले पाहिजेत. जेथें असे ब्रह्मचारी शासनाधिकारी नसतील तेथील राज्यव्यवस्था धर्मानुसार होणार नाहीं. जे जे अधिकारी प्रजापालनाचें कार्य करतात त्यांनीं ब्रह्मचर्याबरोबर संयमी होऊन स्वतःचें कर्तव्य पूर्ण करणें योग्य. राज्याचें मुख्य अधिकारी यांना सुद्धां येथें सूचना मिळते कीं हुद्यावर मनुष्य नेमतांना त्याच्या इतर लायकीबरोबर तो ब्रह्मचारी आणि धार्मिक आहे कीं नाहीं तें सुद्धां पहावें.

ज्या राज्यांत ज्ञान प्रचार करणारे विद्याधिकारी आणि संरक्षण करणारे क्षत्रिय अधिकारी उत्तम ब्रह्मचारी असतील तेथील राज्य-व्यवस्थेंत एक शब्दाचीहि उणीव असणार नाहीं. तीच ' आदर्श राज्यव्यवस्था ' वेदाच्या दृष्टीनें आहे. हल्लीं या पृथ्वीवर सर्वत्र ज्या निरनिराळ्या राज्यव्यवस्था आहेत त्या सर्व भोगी लोकां-च्या आहेत. भोगी लोक आसुरी संपत्तीनें युक्त असे असतात. त्यामुळें ७ व्या मंत्रांत म्हटलें आहे कीं ' ब्रह्मचाऱ्यानें इंद्र होऊन असुरांचा नाश केला. ' भोगी असुरांस दूर करून त्यागी संयमी जितेंद्रिय ब्रह्मचाऱ्यांना अधिकारावर स्थापणें हें ब्रह्म-चाऱ्याच्या राजकीय चळवळीचें कार्य आहे.

ब्रह्मचर्यानें राष्ट्राचें संरक्षण

राजा, राजपुरुष वगैरे क्षत्रिय तसेंच आचार्य आणि अध्यापक वगैरे ब्राह्मण स्वतः ब्रह्मचर्य पालन करणारे असले पाहिजेत. या विषयीं उपदेश १६ व्या मंत्रांत दिला आहे. नंतर १७ व्या मंत्रांत म्हटलें आहे कीं राज्यव्यवस्था तसेंच, पाठशाळा, गुरु-कुल वगैरेंची कडून ब्रह्मचर्य पालन व्हावयास हवें.

राजानें स्वतःच्या राज्यांत शासनाची अशी व्यवस्था ठेवावी कीं सर्व अधिकारी ब्रह्मचर्याचें पालन करणारे व्हावेत आणि त्यांनीं स्वतःच्या अधिकार क्षेत्रांत राहून आपल्या प्रजेला ब्रह्मचर्य

पालनाचा उपदेश करावा. आणि त्यांच्याकडून तसें आचरण करवावें. या प्रकारची व्यवस्था प्रत्येक अधिकारी करील तर त्या संपूर्ण राज्यांत ब्रह्मचर्य पालन सुरू होईल. येथें ब्रह्मचर्याचें तात्पर्य संयम आहे. राज्यांत बालविवाह होऊं नयेत. विवाह योग्य समयीं व्हावेत. विवाहानंतर इंद्रिय विषयक अत्याचार अथवा व्यभिचार न व्हावेत. संयम आणि त्याग वृत्तीनें व्यवहार करण्यांत यावेत. या प्रकारें मरणापर्यंत, ब्रह्मचर्याचें पालन होऊं शकते. अशा प्रकारचें ब्रह्मचर्य पालन लोकांकडून राज्यशासन द्वारां राजा करवूं शकतो, आणि त्यामुळें तो लोकांचें आणि राष्ट्राचें चांगलें संरक्षण करूं शकतो.

सामान्य जनता अज्ञानी असल्यानें सुनियमांचें पालन स्वतः करूं शकत नाहीं, पण जेव्हां राज्यव्यवस्थेकडून नियमांचें पालन करविण्यांत येतें तेव्हां लोक सुद्धां नियम पालनाचे लाभ प्राप्त करूं शकतात. समाजाची उन्नति-अवनति अवस्थेच्या अनुसार नियमांत परिवर्तन होऊं शकते. पण येथें ब्रह्मचर्य, वीर्यरक्षण, बलसंवर्धन, योगाभ्यास, ज्ञान संपादन, उपासना वगैरेंचा संबंध आहे. राज्यशासनामुळेंच सर्व लोक त्याचें पालन करूं शकतील, आणि राजानें त्याचें पालन करवून जनतेचें संरक्षण करावें. हेंच या मंत्राचें तात्पर्य आहे.

कन्यांचें ब्रह्मचर्य

वरील मंत्रांत सुचविलें आहे कीं राजानें शासन व्यवस्थेद्वाराच सर्व प्रजेकडून ब्रह्मचर्याचें पालन करवावें. आणि प्रजेनें विशेष पालन करावें. सर्व जनतेंत पुत्रांप्रमाणें कन्यांचें सुद्धां ब्रह्मचर्य पालन व्हावयास हवें. पुत्रांच्या ब्रह्मचर्य पालनाविषयीं कोणास शंका असणार नाहीं कारण कीं ब्रह्मचारी शब्द नर जातीचा आहे. म्हणून पुरुषाकरितां ब्रह्मचर्य पालनाची आज्ञा वेद मंत्रद्वारां सिद्ध झाली. या १८ व्या मंत्रांत **'कन्या'** शब्दानें स्त्री जातीच्या ब्रह्मचर्य पालनाची सूचना दिली आहे. म्हणजे बाल-बालिकांसाठीं समान ब्रह्मचर्य आहे आणि पूर्व मंत्रानुसार दोघांचें ब्रह्मचर्य, पालन राज्यव्यवस्थेद्वारां झालें पाहिजे.

पशूंचें ब्रह्मचर्य

घोडा, बैल, वगैरे पशु खरोखर ब्रह्मचारीच असतात. त्यांच्यांत अति काम वासना असत नाहीं. कामुक मनुष्याप्रमाणें पशूंमध्यें स्त्रैणत्व नसतें. मनुष्याशीं तुलना केली असतां पशूंमध्यें स्त्रीसंबंध फार थोडा असतो. म्हणजे पशु तर पूर्ण जीवनांत ब्रह्मचारीच असतात. त्यांच्यापासून मनुष्यानें पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

अपमृत्यूस दूर करण्याचा उपाय

एकोणिसाव्या मंत्रांत म्हटलें आहे कीं अपमृत्यु दूर करण्याचा उपाय ब्रह्मचर्यच आहे. ब्रह्मचर्य आयुष्य वाढविणारें आणि रोग दूर करणारें आहे. जे ब्रह्मचर्याचें पालन करतात ते मृत्यूला दूर करूं शकतात. अशा प्रकारचे देव अमर झाले आहेत. जे देवांस साध्य झालें तें मनुष्यास तपश्चर्येच्या साधनानें मिळवतां येतें. देवांचा राजा इंद्र सर्व देवांमध्यें अति तेजस्वी आहे कारण कीं त्यानें सर्वांपेक्षां जास्त ब्रह्मचर्य पालन केलें आहे. जो याप्रकारें जास्त ब्रह्मचर्याचें पालन करतो, तो जास्त तेजस्वी होतो. ब्रह्मचर्याचें तेज त्याच्या चेहऱ्यावर दिसतें. जितेंद्रिय ब्रह्मचारी मनुष्याचा चेहरा नेहमीं कमलाप्रमाणें तेजस्वी, उत्साही आणि स्फूर्तियुक्त असतो. म्हणून प्रत्येकानें ब्रह्मचर्याचें पालन अवश्य केलें पाहिजे.

औषधि वगैरेचें ब्रह्मचर्य

सूर्य ब्रह्मचारी आहे कारण तो ब्रह्मासह संचार करतो अथवा तेजासह रहातो. या ब्रह्मचारी सूर्यापासून वर्ष, मास, ऋतु, दिवस, रात्र तसेंच भूत, भविष्य आणि वर्तमान तीनहि काल प्रगट होत आहेत. हें सूर्याच्या ब्रह्मचर्याचें महात्म्य आहे.

औषधि वनस्पति सुद्धां ऊर्ध्वरेता असल्यानें ब्रह्मचारी आहेत. औषधि-वनस्पतींचा जनक मेघ अथवा पर्जन्य आहे. ते मेघ सुद्धां ब्रह्मचारी आहेत. कारण कीं, ते **'ऊर्ध्व-रेतः'** आहेत. **'ऊर्ध्व'** म्हणजे वर धारण केलें आहे. **'रेतः'** म्हणजे उदक ज्यानें अथवा ज्यांत असा मेघ आहे. म्हणून तो **'ऊर्ध्व रेता'** आहे. आणि त्या कारणानेंच तो ब्रह्मचारी सुद्धां आहे. या ब्रह्मचर्य सूक्ताच्या १२ व्या मंत्रांत मेघ ब्रह्मचर्याचें वर्णन येऊन गेलें आहे. तेथें म्हटलें आहे कीं, हा मेघ गर्जना करीत डोंगरावर आणि भूमीवर (रेतः) उदक सिंचन करतो. त्यामुळें सर्व दिशा जीवित होतात. ' ऊर्ध्वरेता असल्यामुळें मेघांत सृष्टीचें पालन करण्याची शक्ति आली आहे. याप्रमाणें जो ऊर्ध्वरेता असेल त्याच्यांत सुद्धां पालन करण्याची शक्ति येऊं शकते. सूर्य सुद्धां स्वतःच्या किरणांनीं उदकरूपी रेतास वर खेंचून घेतो. मनुष्य सुद्धां प्राणाच्या आकर्षणानें वीर्यास वर खेंचून घेऊं शकतो. या प्रकारें मेघ आणि सूर्याच्या उदाहरणावरून ब्रह्मचर्याचें महात्म्य वर्णन केलें आहे.

पशुपक्ष्यांचें ब्रह्मचर्य

बैल आणि घोड्याविषयीं मंत्र १८ मध्यें सांगितलें आहे कीं

ते ब्रह्मचारी आहेत. वानरांत वीर्यनाश करण्याचा प्रयास समजतो पण सामान्यतः पशु ऋतुगामी असतात. ऋतुकालावांचून ते स्त्री (मादी) जवळ जात नाहींत. अथवा मादी त्यांचे जवळ येत नाहीं. सिंह, वाघ वगैरे क्रूर पशूंमध्यें ब्रह्मचर्य आणि एक पत्नित्व विशेष तीव्र असतें. परमात्म्यानें त्यांचेसाठीं अशी व्यवस्था केली आहे कीं, ऋतुकालाशिवाय इतर वेळीं त्यांना स्त्री-पुरुषत्वाचें भानच नसतें. कित्येक पशुपक्षी या नियमास अपवादरूपहि आहेत. पण असे अपवाद पूर्वी सांगितलेला नियमच सिद्ध करतात. पशु-पक्ष्यांचें ब्रह्मचर्य पाहून तेवढ्या बाबतींत मनुष्यानें बोध घ्यावा. या पूर्वीच्या मंत्रांत वनस्पति-औषधि ऋतुकालांत पुष्पवती होतात असें सांगितलें आहे. म्हणजे त्या ऋतुगामी असल्यानें ब्रह्मचारीच आहेत, संवत्सर ऋतुमध्येंच गमन करतात. म्हणजे ते सुद्धां ऋतुगामी असल्यानें ब्रह्मचारीच आहेत.

देवांचें तेज

तेवीसाव्या मंत्रांत देवांच्या तेजाचें वर्णन आहे. जें उत्साह आणि स्फुरण देतें, जें सर्वापेक्षां श्रेष्ठ असा भाव उत्पन्न करतें, आणि जें स्वतः तेजयुक्त असून दुसऱ्यास सुद्धां तेजस्वी करतें तें देवांचें तेज आहे. राष्ट्रांत विद्वान् देव आहेत आणि ते वर सांगितल्याप्रमाणें चैतन्ययुक्त तेज स्वतःच्या राष्ट्रांत उत्पन्न करतात. शरीरांत ज्ञान-इंद्रिय तसेंच अंतःकरण वगैरे देव आहेत. ते जड शरीरांत रहातात आणि त्यांत विलक्षण स्फूर्तीचें कार्य करतात. तसेंच संपूर्ण जगांत सूर्यचंद्र वगैरे देव स्वतःचें विलक्षण तेज प्रसरून सर्व जगाला चैतन्य देतात. तात्पर्य असा नियम आहे कीं जे देव आहेत ते श्रेष्ठ तेजाचा प्रसार करून विलक्षण उत्साह उत्पन्न करतात.

तें तेज, ज्ञान आणि स्फूर्ति ब्रह्मचाऱ्यापासून प्रसरतात, आणि देवामध्यें कार्य करतात, त्यामुळें अमरपण सुद्धां देतात.

उपदेशाचा अधिकारी

चोवीस आणि पंचवीसाव्या मंत्रांत ब्रह्मचाऱ्याच्या विशेष ज्ञानाचा उल्लेख आहे. ब्रह्मचारी विलक्षण ज्ञान प्राप्त करतो, त्यामुळें त्याचें तेज अद्‌भुत असतें. त्यामुळेंच सर्व देवता त्याच्यामध्यें संपूर्णपणें भरून रहातात. त्याच्यापासून कोणीहि देवता अथवा शक्ति वेगळी राहूं शकत नाहीं. इतक्या सर्व देवतांच्या पूर्ण शक्तिसह तो कार्य करतो. प्राणायामादि योगसाधनद्वारा तो स्वतःचें प्राण, अपान, व्यान सर्व प्राणांना स्वतःच्या ताब्यांत आणतो. प्राण ताब्यांत आल्यानें त्याचें मन त्याला वश होतें. कारण कीं प्राण आणि मन शरीरांत एकत्र खेळीमेळीनें रहातात. प्राण जर निर्बळ असले अथवा झाले तर मन सुद्धां निर्बळ होईल. आणि मन स्थिर होण्यानें प्राणाची चंचलता दूर होते. अशा रीतीनें मन आणि प्राण स्थिर झाल्यानें हृदयाची दिव्य शक्ति प्रगट होते. तसेंच हृदय आणि मन नियमबद्ध होण्यानें मेधा बुद्धींत ज्ञानाचा संचय होतो, आणि वाढूं लागतो. त्यानंतर त्याची एवढी योग्यता होते कीं वाणीद्वारा तो स्वतः जवळच्या ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करूं शकतो. याप्रमाणें सुयोग्य उपदेशकाच्या व्याख्यानानें जनता प्रभावित होते. कारण कीं त्याचें सांगणें अनुभवसिद्ध असतें.

त्यामुळें लोक, आपला उद्धार होण्यासारखा कांहीं उपदेश त्याच्या जवळून मिळावा असें इच्छितात. जेथें असा ब्रह्मचारी जातो तेथील सज्जन त्याला सांगतात कीं, हे ब्रह्मचारी ! आम्हांस उपदेश द्या ! चक्षु, श्रोत्र वगैरे इंद्रियांची शक्ति वाढावी आणि तीं स्वास्थ्यपूर्ण आणि प्रभावशाली व्हावीत असा मार्ग दाखवा. ' कोणी म्हणतात कीं अन्नाच्या अभावीं फार कष्ट पडत आहेत म्हणून पुष्कळ धान्य कशा रीतीनें प्राप्त होईल तें सांगा. कोणी महाजन (लठ्ठ शरीराचा) विचारतो कीं पोट साफ करण्याचा उपाय सांगा. पचन चांगल्या प्रकारें होत नाहीं, यावर कांहीं इलाज आहे काय ? कोणी म्हणतात, वीर्य स्थिर नाहीं आणि रक्त सुद्धां बिघडलें आहे, त्यासाठीं काय उपाय केला पाहिजे ?

वर सांगितलेले जे जे प्रश्न लोक विचारतात त्यांना यथायोग्य उत्तरें ब्रह्मचारी देतो. योजना आणि युक्ति यांनीं सर्वांच्या सर्व शंका दूर करतो. आणि त्यांस योग्य मार्गास लावतो. एवढी योजना असूनहि तो स्वतःचें आत्मिक बळ वाढविण्यासाठीं पवित्र स्थानीं राहून तपश्चर्या करतो आणि त्या साधनानें आत्मशक्तीचा विकास करीत राहतो. याप्रकारें तपस्वी जेव्हां स्वतः-च्या तपश्चर्येची समाप्ति करतो आणि तपश्चर्येच्या प्रभावानें, आत्मशक्तीनें युक्त होतो, तेव्हां तो अत्यंत तेजस्वी असल्यानें या पृथ्वीवर त्याची शोभा पुष्कळच वाढते. असें आहे ब्रह्मचर्याचें तेज. म्हणून प्रत्येकानें ब्रह्मचर्याच्या चांगल्या नियमांचें पालन करून स्वतःच्या आत्मशक्तीचा विकास साधला पाहिजे.

P 113 to 120 missing in the book

ब्रह्मौदन

ज्ञान वाढविणारें अन्न

ब्रह्माचा अर्थ ज्ञान असा आहे आणि ओदन म्हणजे अन्न. विशेषतः शिजवलेल्या तांदुळास ओदन म्हणतात. हें अन्न मनुष्याचें ज्ञानशक्ति वाढविणारें आहे, म्हणून त्यास ब्रह्मौदन म्हटलें आहे. तांदुळांत उत्तम दुध, तूप, पाणी, सोमरस वगैरे वनस्पतींचे रस मिसळून हें अन्न तयार केलें जातें. बुद्धिवर्धक ओषधींचे रस त्यांत मिश्रित केलेले असतात. त्यानें ज्ञान, बुद्धि आणि आयुष्य प्राप्ति होऊन पुष्टि मिळते. गृहस्थाश्रमीयांस हें अन्न उत्तमांत उत्तम आहे; कारण की त्यानें वीर्यवृद्धि होऊन गृहस्थसुखाची उत्तम वृद्धि करणारें हें अन्न आहे.

गृहस्थाचें मुख्य कार्य उत्तम प्रजा निर्माण करण्याचें असतें. त्यासाठीं स्त्रियांनीं '**पुत्रकामा अदिति**' च्या आदर्शाचें पालन केलें पाहिजे. सत्पुत्र निर्माण करण्याची इच्छा धारण करून तदनुसार दैन्याच्या सर्व भावना दूर केल्या पाहिजेत. घरांत आणि स्वतःच्या राज्यांत, देशांत अदीन होऊन रहावें. अदितीचा आदर्श सर्व स्त्रियांसमोर आहे. त्यांत फक्त सत्पुत्राचीच कामना केली आहे. ती संततिसाठीं, संततीच्या कल्याणासाठीं जें अन्न खालें पाहिजे, तेंच खात असे, तेंच शिजवित असे. स्वतःच्या संततीच्या कल्याणासाठीं ती चांगलेंच अन्न शिजविते, सत्पुत्रांचें ज्ञान वाढावें, त्यांची बुद्धि विकसित व्हावी यासाठीं ती जरूर ते आणि तितके परिश्रम करते. असाच आदर्श आर्यस्त्रियांनीं स्वतःसमोर ठेवला पाहिजे.

सप्तऋषि या संपूर्ण विश्वाची रचना करतात. सप्तऋषि आकाशांत आहेत. त्यांत सात मुख्य तत्त्वें आहेत. त्यांच्या एकीकरणानें हें संपूर्ण विश्व निर्माण होतें. सप्तऋषि प्राणादितत्त्वांचे वाचक आहेत. हीं तत्त्वें विश्वनिर्मितिविषयीं सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रसन्नतेनें संततीची उत्पत्ति आणि वृद्धि होते. हें एक महत्त्वाचें विज्ञान आहे. या सात ऋषींचें वर्णन या सूक्तांत अनेक वेळां आलें आहे, म्हणून त्यांचा शोध करण्याचा निश्चय केला पाहिजे, की ज्यामुळें या विश्वाची रचना ते कशी करतात, तें ज्ञान होईल.

दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे की यज्ञासाठीं अग्नि प्रदीप्त करावा, द्रोहरहित भाषण करावें. हा वाग्यज्ञ आहे आणि दुसरा हवनयज्ञ आहे. या दोन्ही यज्ञांनीं मानवाची उन्नति होते. द्रोह न करणें हा एक मोठा यज्ञच आहे. या व अशा प्रकारच्या यज्ञांनीं सुपुत्र असे तयार होतात की जे (**पृतनाषाट् सुवीरः**) युद्धांत विजय मिळविणारे आणि उत्तम वीर असतात. ते स्वतःच्या शत्रूचा पराजय करूं शकतात.

शत्रूंस पराजित करणें

स्वतःच्या शत्रूंस पराजित करणें हें एक महत्त्वपूर्ण कार्य या संसारांत आहे. त्यावांचून मनुष्य क्षणभर सुद्धां जिवंत राहूं शकत नाहीं. मनुष्याचे शत्रु आध्यात्मिक, बौद्धिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि राष्ट्रीय क्षेत्रांत असतात. त्या सर्वांस पराजित केल्यानेंच मनुष्य उन्नत होऊं शकतो. म्हणून येथें वेदानें शत्रूंचा नाश करण्यावर एवढा जोर दिला आहे. वाचकांनीं याचा विचार करावा आणि शत्रूंस पराजित करण्याचें महत्त्व जाणावें.

तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे की (**महते वीर्याय अजनिष्ठाः**) मनुष्य महान् पुरुषार्थ करण्यासाठीं येथें निर्माण झाला आहे. पुरुषार्थ करून त्यानें स्वतःच्या सर्व शत्रूंस पळवून लावावें आणि (**सर्ववीरं रयिं**) सर्व प्रकारच्या वीरश्री भावनेनें युक्त धन प्राप्त करावें. येथें वेदाचें महत्त्व दर्शविणारी गोष्ट अशी की वेद केवळ पैसा मिळविण्यास सांगत नाहीं तर त्यासह वीरत्व सुद्धां मिळवावयास सांगत आहे. कारण की वीरत्वविरहितचें धन रक्षण करणें कठीण असतें. त्यामुळे ज्या धनाबरोबर वीरश्री नसेल तें धन स्थिर राहूं शकत नाहीं.

चौथ्या मंत्रांत सांगितलें आहे की 'यज्ञामध्यें यज्ञायोग्य देवास बोलावा.' येथें सहाय्यकांस आणि सम्मान्य लोकांस बोलावून त्यांस आपलेसें करण्याची सूचना प्राप्त होते. जे मदत करीत नाहींत, त्यांस बोलावूं नये. उदा० (**सातघ्नो देवान् निषेध** अथर्व ३।१५।५) लाभाचा नाश करणाऱ्या देवांना निषेध करणारे म्हटलें आहे. त्यापासूनहि विरोध करणारास दूर करणें आणि सहाय्य करणारांस जवळ करण्याची सूचना मिळते.

पांचव्या मंत्रांत म्हटलें आहे की अन्नांत देव, पितर आणि मनुष्यें यांचा भाग असतो. तो भाग ज्याचा त्यास देणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. एकाचा भाग दुसऱ्यानें घेणें योग्य नाहीं. तो अन्याय आणि अधर्म होय. मनुष्यानें स्वतःच्या अन्नांतून त्यांस भाग द्यावा आणि शेष राहील तो स्वतः ग्रहण करावा.

सहाव्या मंत्रांत म्हटलें आहे की मनुष्यानें (**सहस्वान्**) बलवान् व्हावें, सशक्त असावें, (**अभिभूः**) शत्रूचा पराजय करावा. आणि (**सपत्नान् नीचः न्युब्ज**) शत्रूंस खालीं

दाबून ठेवावें. त्यांस उठूं देऊं नये. एवढेंच नव्हे परंतु त्यांस (बलिहृतः) कर देणारे करावें. म्हणजेच जे पूर्वी शत्रुत्व करीत होते ते आता कर देणारे होतील एवढी शक्ति स्वतःमध्यें वाढविली पाहिजे.

सातव्या मंत्रांत (महते वीर्याय) मोठा पराक्रम करण्याची पुनः सूचना दिली आहे. तिसऱ्या मंत्रांत तीच गोष्ट सांगितली तीच पुनः येथें सांगितली आहे. कारण की मानवी जीवनांत पराक्रमाचें स्थान खूपच उच्च आहे. (पयसा) दूध पीवून बलवान् व्हावें आणि मोठा पराक्रम करावा हें सर्वांसच उचित आहे. अशा रीतीनें स्वर्गाचा मार्ग मोकळा होतो.

त्यानंतरच्या तीन मंत्रांत दगडानें सोमरस काढण्याचें वर्णन आहे. हा सोमरस मनुष्याचें सर्व प्रकारचें स्वास्थ्य आणि उत्साह वाढविणारा असतो. यज्ञांत अग्नीमध्यें त्याचें हवन करण्यांत येतें आणि नंतर सर्व लोक त्याचें सेवन करितात. हा रस पिण्यांत येतो. दुधांत मिसळून अथवा भाजलेल्या पिठांत मिसळून तो खातात. या रसाचें सेवन पुष्कळ प्रकारें करतां येतें.

शूर पुत्रवती स्त्री

अकराव्या मंत्रांत आदर्श स्त्री ' शूर पुत्रा ' होय असें म्हटलें आहे. स्त्रियांनीं ही गोष्ट ध्यानीं बाळगावी. स्वतःची संतति शूर असली पाहिजे, ती भित्री, घाबरट नसावी. गृहस्थांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी कारण (सर्ववीरा रयि) सर्व वीरत्वाच्या गुणांनीं युक्त धन प्राप्त करणें हा गृहस्थाचा धर्म आहे. वीर पुत्र असेल तरच सर्ववीरयुक्त धन प्राप्त होण्याचा संभव आहे.

बाराव्या मंत्रांत दोन मंत्रभाग मुख्य आहेत. (श्रिया समानान् अति स्याम) संपत्तीनें सर्वांपेक्षा श्रेष्ठ होऊन रहाणें आणि (द्विषतः पदं अधः आपादयामि) शत्रूचें स्थान खालीं करतों. यानंतर २१ व्या मंत्रांत हेंच सांगितलें आहे. संसारी मनुष्यानें हाच उपदेश नेहमीं ध्यानीं बाळगला पाहिजे. सर्वांनीं सतत हाच मार्ग नजरेसमोर ठेवला पाहिजे.

स्त्रियांचें कर्तव्य

घरांत पाणी भरणें हें पहिलें कर्तव्य आहे. उत्तमांत उत्तम पाणी घरांत भरून ठेवावें. घडा-हंडा घेऊन जाऊन चांगलें स्वच्छ पाणी भरण्याचा प्रयास स्त्रियांनीं करावा. स्त्रियांनीं एकत्र मिळून पाणी भरण्यास जावें. चांगलें पाणी घरांत आणावें, हें (बः ऊर्जः भागः) बल वाढविण्याचें कार्य आहे. संतति, पाळलेले पशु वगैरेसाठीं याची फार जरुरी असते असा उपदेश सोळाव्या मंत्रापर्यंत आहे.

सोळाव्या मंत्रांत (चरुः) तांदूळ वगैरे अन्न शिजविण्याचें आयोजन करण्याचा उत्तम उपदेश आहे. (ऋतुभिः) ऋतूंस अनुकूल अन्न तयार करण्यांत यावें. तें सेवन केल्यानें सर्व वयाचे लोक सुदृढ आणि दीर्घजीवी होतील.

सतराव्या मंत्रांत म्हटलें आहे कीं स्त्रियांनीं शुद्ध, पवित्र आणि सुंदर वस्त्रांच्या भूषणांनीं सजून घरांत पाणी आणावें, अन्न शिजवावें, यज्ञांत हजर रहावें, अतिथींचा सत्कार करावा, पशु आणि स्वतःचीं मुलेंबाळें यांस संतोषित करावें, तृप्त ठेवावें आणि घरची सर्व व्यवस्था करावी. कोणत्याहि प्रकारें न्यूनता राहूं देऊं नये.

अठराव्या मंत्रांत तांदूळ, तूप, सोमरस वगैरे उत्तम पक्व अन्न तयार करण्याचा उपदेश आहे. उत्तम अन्न शिजविणें हें स्त्रियांचें मुख्य गृहकृत्य आहे.

एकोणीसाव्या मंत्रांत म्हटलें आहे की पितामह, पिता, पुत्र वगैरे पंधरा पिढ्यापर्यंत अविच्छिन्न वंश असावा. घरांत खाण्यापिण्याचा अशी व्यवस्था असावी की वंश मध्येंच खुंटूं नये. पुरुष दीर्घजीवी होऊन वंश अखंडित चालू रहावा. नंतर पुढें जेवढा चालेल तेवढें उत्तम. परंतु कमींत कमी तेवढा म्हणजे पंधरा पिढ्यांतर चालावाच. हें सर्व ब्रह्मौदनानें म्हणजे. ज्ञान वाढविणाऱ्या अन्नानें होऊं शकतें. ब्रह्मौदनाचा अर्थ बुद्धिवर्धक अन्न असा आहे. त्यानें बुद्धि वाढते आणि बुद्धीनें सरळ मार्ग दिसतो. तसेंच मनुष्य (रक्षः नुदस्व) राक्षसांस दूर करूं शकतात आणि स्वतः स्वतःची प्रगति करूं शकतात.

बावीसाव्या मंत्रांत (शपथः अभिचारः मा प्रापत्) शाप आणि हल्ल्यापासून दूर रहाणें, शरीरांत रोग न होणें वगैरे सर्व प्रकारची, कुशलता सांगितली आहे. वाचकांस माहित आहे की शरीर शुद्ध रहाण्यानेंच शरीराचें आरोग्य टिकतें. वाणीची शुद्धता, शाप, शिव्या वाईट द्रोहयुक्त शब्द न उच्चारल्यानें साधते. वधादि अपराध न घडले तर समाजाची शुद्धता राहूं शकते. शरीर, वाणी आणि समाज शुद्ध राहिले पाहिजेत. इच्छाच अशी असावी कीं सर्वत्र निर्दोषिता संभाळली जाईल. पथ्य न पाळल्यानें शरीरांत रोग होतात. अपशब्द उच्चारल्यानें वाणी रोगनिष्ठ होते आणि गुन्ह्याचें प्रमाण वाढल्यानें समाज रोगी होतो. वाचकांनीं या सर्वक्षेत्रांत आरोग्य संभाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

तेवीसाव्या मंत्रांत तांदूळ वगैरे अन्न शिजवून तयार केल्यानंतर ते वाढण्याचा विधि दर्शविला आहे. चोवीसाव्या मंत्रांत पळीचा उपयोग करून भाग नीट करण्यास सांगितलें आहे. पंचविसाव्या मंत्रांत म्हटलें आहे की —

प्राशितारः मा रिषन् ।

अन्न भक्षण करणारे कृश अथवा रोगी न होवोत. अन्न खातांच

खाणाऱ्यास तृप्ति आणि पुष्टि प्राप्त व्हावी असें अन्न असावें. हेंच शिजविणाराचें कौशल्य. खाणारांनी तें अन्न आनंदानें खावें आणि पचवून हृष्टपुष्ट व्हावें. असें अन्न शिजवून चांगल्या विद्वानांस वाढलें पाहिजे अशी सूचना २६ व्या मंत्रांत केली आहे.

विवाह

सत्ताविसाव्या मंत्रांत विवाहविषय संक्षेपानें सांगितला आहे. स्त्रिया (**शुद्धाः पूताः योषितः यज्ञियाः**) शुद्ध पवित्र आणि पूज्य आहेत. हें वाक्य येथें अत्यंत महत्त्वाचें लिहिलें आहे. स्त्रियांची निंदा न करावी, त्यांची घरोघरीं पूजा व्हावयास हवी, त्यांचा सर्वत्र मानसन्मान संभाळला जावा. तशी त्यांची पूजा झाली तर पवित्रता राहील आणि पवित्रतेच्या कारणें उच्चता साध्य होईल. या वर्णनावरून स्त्रियांचा दर्जा समाजांत किती उच्च होता त्याचा स्पष्ट निर्देश केलेला ध्यानीं येईल.

अशा स्त्रियांचे विवाह ज्ञानी पुरुषांशीं व्हावयास हवेत. (**ब्रह्मणां हस्तेषु प्र पृथक् सादयामि**) ज्ञान्यांच्या हातीं वेगवेगळ्या एक एकेकाच्या हातीं एक एक स्त्री सोंपणें योग्य आहे. एका पुरुषानें एकाच स्त्रीशीं लग्न करावें, तसेंच एका स्त्रीनें अनेक पुरुषांशीं संबंध ठेवूं नये. एका स्त्रीनें एकाच पुरुषाशीं प्रामाणिक-पणें रममाण व्हावें आणि पुरुषानें सुद्धां एकाच स्त्रीशीं आनंदानें एकनिष्ठ रहावें. हें आदर्श गृहस्थाश्रमाचें वर्णन येथें संक्षेपतः केलें आहे. या मंत्रांतील ' **पृथक्** ' शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे कारण तो विवाहाचे नियम स्पष्ट करीत आहे.

नंतर अठ्ठाविसाव्या मंत्रांत गृहस्थाश्रमांत ' **कामधेनु** ' (**कामदुघा**) ठेवली पाहिजे असा आदेश आहे. घरोघरीं गाईंचें पालन व्हावयास हवें. आपल्या इच्छेस येईल तेव्हां दूध देते त्या गाईस कामधेनु म्हणतात. घरांत लहान बालकें, वृद्ध आणि रोगी असतील तर त्यांचें पालन पोषण या गाईच्या दुधानें होऊं शकते. गोमातेचें एवढें आणि असें महत्त्व आहे. गृहस्थानें तीन गोष्टी ध्यानांत ठेवाव्यात. (**ज्योतिः अमृतं हिरण्यं**) तेजस्वी जीवन, अमरत्व आणि सुवर्ण. सुवर्ण म्हणजे सोन्याचें महत्त्व तर सर्वांस माहित आहेच. गृहस्थाश्रमीयास तर प्रत्येक व्यवहारांत त्याची जरुरी पडते. सर्व दैनिक आणि सार्वकालिक व्यवहार धनानें साध्य होतात. अमृत नांव मोक्षाचें आहे. तेंच अमरत्व आहे. सर्व विश्व मृत्यूनें घेरलेलें आहे. ते मृत्यूचे पाश तोडून अमरत्व प्राप्त करणें हें मनुष्य जीवनाचें उद्देश्य अथवा ध्येय आहे. सर्व धर्म कर्में या उद्देशानेंच केलीं जातात. अशा प्रकारचें तेजस्वी जीवन येथें व्यतीत करावें. याप्रकारें (**स्वर्गः पन्थाः कृणवे**) स्वर्गीय मार्ग तयार होतो. स्वर्गमार्गांच्या या तीन पायऱ्या आहेत. धन येथील सुखासाठीं पाहिजे. तेजस्वी जीवन सन्मानासाठीं पाहिजे आणि अमरत्व पारमार्थिक उन्नतिसाठीं पाहिजे, हें स्वर्गाचें सत्यस्वरूप वाचकांनीं येथें पहावें.

*

गृहराज

एकोणतीसाव्या मंत्रांत (**गृहराजस्य भागं**) गृहराजाच्या कार्यभागाचें वर्णन आहे. गृहराज म्हणजे घराचा स्वामी अथवा घरामध्यें जें श्रेष्ठ घर आहे त्यांत कोणतें कार्य व्हावयास हवें ! भूसा (कोंडा) आणि साल्पटें दूर करून स्वच्छ तांदूळ स्वतः-जवळ ठेवावेत. हाच नियम सर्व व्यवहार करतांना ध्यानांत ठेवावा. कचरा दूर करून सार द्रव्य स्वतःजवळ ठेऊन घ्यावें. कोणत्याहि व्यवहाराकडे वाचक जर पहातील तर त्यांना हाच नियम सर्वत्र असल्याचें दिसून येईल. उत्तम सिद्धिसाठीं हाच एक नियम आहे. अभ्यासासाठीं सुद्धां तत्त्वज्ञान स्वीकारलें पाहिजे. अपरिपक्क ग्रंथ दूर करावेत.

एक भाग निर्ऋति म्हणजे नाशाचा आहे, आणि दुसरा उन्नतीचा. विनाश करणारा भाग दूर करावा आणि उन्नतिकारक भाग स्वतःजवळ ठेवावा. हा सरळ साधा नियम आहे. जो या नियमाचें पालन करील तो उन्नत होईल. उन्नति प्राप्त करील यांत कांहीं शंकेस स्थान नाहीं.

(**श्राम्यतः पचतः सुन्वतः विद्धि**) परिश्रम कर-णारा, शिजविणारा आणि रस काढणारा कोण आहे त्यास जाणा, ओळखा. परिश्रम केल्यानें मनुष्याची उन्नति होते, म्हणून परि-श्रम करण्याचा स्वभाव मनुष्यानें स्वतःचा बनविला पाहिजे. परिश्रम करण्याची संवय अंगीं बाणवली पाहिजे. असा स्वभाव परिपक्क केला पाहिजे. प्रत्येकाची परिपक्क अवस्था उत्तम असते. तेंच प्राप्त केलें पाहिजे. तसेंच रसग्रहण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वनस्पतींत सारभूतरस असतो. त्या सारभूतरसाचें ग्रहण केलें पाहिजे, आणि अवशिष्ट साररहित भाग फेंकून द्यावा. हा उपदेश व्यापक दृष्टीनें विशेष उपयोगी आहे. स्वर्गप्राप्तिसाठीं हे तीन उपदेश अत्यंत महत्त्वाचे आहेत.

(**घृतेन सर्वा गात्रा विमृड्ढि**) तुपानें सर्व इंद्रियांस अंगांस अवयवास मालिश-मर्दन कर. शरीराचय सुस्थितींत ठेवण्यासाठीं तुपाच्या मर्दनाची अत्यंत जरुरी आहे. तुपानें पायाचे तळवे घासल्यानें दृष्टि चांगली रहाते. सांध्यावर मर्दन केल्यानें संधिवात रोग होत नाहीं. डोक्यावर मालिश केल्यानें मेंदू आणि मस्तक शांत रहातें आणि उष्णता असल्यास दूर होते. याप्रमाणें इतर अवयवांस मर्दन केल्यानें अनेक लाभ होतात. याशिवाय दुसरें निरनिराळ्या औषधि रसांनीं घृतावर संस्कार

केल्यानें तूपाचा गुण वाढतो. ज्याप्रमाणें ब्राह्मी वनस्पतीचा तुपावर संस्कार करून तें घृत मस्तकावर धारण केल्यानें अथवा त्यानें मर्दन केल्यानें, तें मर्दन बुद्धि वाढवितें आणि उष्णतेस दूर करतें. त्याचप्रमाणें आयुर्वेदांत आमलक्यादि घृत तसेंच इतर घृतें वैद्यशास्त्रांत प्रसिद्ध आहेत. त्यांनीं शरीरास मर्दन केल्यानें लाभ होतो. ही गोष्ट एकतीसाव्या मंत्रांत सांगितली आहे.

पोषक अन्न

घरोघर अन्न शिजविलें पाहिजे आणि तें अन्न पोषक असलें पाहिजे. (**प्राशितारः मा रिषन्**) ते अन्न खाणारे कधीं दुःखी न होवोत. कधीं हिंसित होऊं नयेत. कधीं क्षीण होऊं नयेत. असें अन्न गृहस्थाच्या घरांत शिजविण्यांत यावें ही सूचना ३२ व्या मंत्रांत केली आहे.

जें अन्न परिपक्व केलें नसेल तें (**आर्षेयेषु निदध्मे**) ऋषि-प्रणालीप्रमाणें वागणाऱ्यांस अर्पण केलें पाहिजे. (**न अनार्षेयाणां**) ऋषिप्रणालीविरुद्ध वर्तणाऱ्यांस देवूं नये. ऋषिप्रणालीस जिवंत राखण्यासाठींच प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे.

घर कसें असावें ?

घर असें असावें कीं तेथें नेहमीं (**यज्ञं दुहानं**) यज्ञ होत रहातील. (**सद्मनं रयीणां**) ऐश्वर्याचें स्थान असेल, (**प्रपीनं सदं**) पुष्टि आणि समृद्धीचें केंद्र असेल. (**पोषैः प्रजा अमृतत्वं**) अनेक पुष्टींच्या साधनांनीं प्रजेस अमृतत्व देणारें असावें. जेथें (**धेनु**) गाई आदि धनसंपत्तीसह (**दीर्घ आयुः**) दीर्घायुषी लोक असतील असें घर असावें. घरांत अशी स्थिति असावी. घरांतील धन कधीं कमी होऊं नये. प्रत्येक हृष्टपुष्ट असावा. सत्कार संगति ज्ञानात्मक यज्ञ होत रहावेत, सर्व लोक आनंदी-सुप्रसन्न असावेत. कोणीं कधींहि दुःखी कष्टी असूं नये. हा उपदेश ३४ व्या मंत्रांत केला आहे.

३५ व्या मंत्रांत (**वृषभः असि**) तूं बलवान् आहेस, तूं निर्बल नाहींस, तूं (**स्वर्गः असि**) स्वर्गाचा अधिकारी आहेस, तूं सुखात्मक स्थानाचा अधिकारी आहेस. म्हणून ज्या मार्गानें ऋषि मुनि गेले आणि ज्या मार्गानें ऋषि मुनींनीं सुख स्थान प्राप्त केलें त्या रस्त्यानें तूं जा. तोच पुण्यवान लोक आहे. तेथें जास्त रहा. आमच्या संस्कृतीचें तेंच ध्येय आहे.

नंतरच्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, (**देवयानान् पथः कल्पय**) देवांस येण्याजाण्याचा भाग सुदृढ कर. तोच तुला येण्याजाण्यासाठीं मार्ग आहे. (**एतैः सुकृतैः यज्ञं अनुगच्छेम**) या सुकृतांसहच आम्हांस यज्ञाकडे जावयाचें आहे. सत्कृत्यें करून पुढें गेलें पाहिजे. सत्कृत्य करतांत. माघार घेऊं नये. नेहमीं सत्कर्मच मनुष्यास मार्गदर्शक होतें. मनुष्यानें सत्कर्मापासून दूर होऊं नये.

आज स्वर्गांत जे देव आहेत ते याच मार्गानें स्वर्गांत जाऊन तेजस्वी झाले आहेत. म्हणून मनुष्यानें या यज्ञमार्गाचें अवलंबन करावें.

अशा प्रकारें अनेक प्रकारचा उपदेश या सूक्तांत केला आहे. त्याचें मनन केल्यानें वाचकांस सन्मार्ग सुस्पष्टपणें दिसेल.

स्वर्ग आणि ओदन

कांड १२, सूक्त ३

(ऋषिः - यमः । देवता - स्वर्गः, ओदनः, अग्निः ।)

पुमान्पुंसोऽधि तिष्ठ चर्मेहि तत्र ह्वयस्व यतमा प्रिया ते ।
यावन्तावग्रे प्रथमं संमेयथुस्तद्वां वयो यमराज्ये समानम् ॥ १ ॥

अर्थ— (**पुंसः पुमान्**) मनुष्यांत वीर्यवान् पुरुष असा तूं (**अधितिष्ठ**) इतरांचा अधिष्ठाता होऊन रहा. (**चर्म इहि**) आसनावर बस. (**तत्र ते यतमा प्रिया ह्वयस्व**) तेथें तुझे जे विशेष प्रिय त्यांना बोलाव. (**अग्रे यावन्तौ प्रथमं सं ईयथुः**) पूर्वी जे सर्व प्रथम प्राप्त झालें होतें. (**तत् वां वयः**) ते आपलें सामर्थ्य (**यमराज्ये समानं**) यमराज्यांत समान आहे. [१]

भावार्थ— मनुष्यांत जो सर्वांत बलवान् असेल तो सर्वांचा पुढारी अधिष्ठाता होण्यास योग्य आहे. अशा मनुष्यानें अधिष्ठाता व्हावें. मुख्य आसनावर बसावें, तेथें स्वतःस हितकारक अशा मनुष्यांस बोलवावें, सर्वांस एकत्र करावें. असें संमेलनच शक्ति निर्माण करते. आणि या शक्तीनें राज्याचें नियंत्रण होतें. राष्ट्रांत ही शक्ति सारख्या प्रमाणांत वांटली जावी म्हणजे कोण्या एकाच ठिकाणीं ती प्रमाणाबाहेर एकत्र होऊं नये. [१]

तावद्वां चक्षुस्तति वीर्याणि तावत्तेजस्ततिधा वाजिनानि।
अग्निः शरीरं सचते यदैधोऽधा पक्वान्मिथुना सं भवाथः ॥ २ ॥
समस्मिंल्लोके समु देवयाने सं स्मा समेतं यमराज्येषु।
पूतौ पवित्रैरुप तद्ध्वयेथां यद्यद्रेतो अधि वां संबभूव ॥ ३ ॥
आपस्पुत्रासो अभि सं विशध्वमिमं जीवं जीवधन्याः समेत्य।
तासां भजध्वममृतं यमाहुर्यमोदनं पचति वां जनित्री ॥ ४ ॥
यं वां पिता पचति यं च माता रिप्रान्निर्मुक्त्यै शमलाच्च वाचः।
स ओदनः शतधारः स्वर्ग उभे व्याप नभसी महित्वा ॥ ५ ॥

अर्थ—(तावतः वां चक्षुः) तशी बलवान् आपली दृष्टि आहे. (तति वीर्याणि) तसे आपले पराक्रम आहेत. (तावत् तेजः) तसें आपलें तेज आहे. (ततिधा वाजिनानि) आणि तसें आपलें बळ आहे. (यदा अग्निः एधः शरीरं सचते) जेव्हां अग्नि समिधेप्रमाणें या शरीरास प्रदीप्त करतो, (अधा) तेव्हां हे (मिथुना) पतीपत्नीनों ! (पक्वात् संभवाथः) परिपक्व झाल्यानंतर तुम्हीं उत्पन्न होता. [२]

(अस्मिन् लोके सं एतं) या लोकांत मिळून मिसळून एकीनें रहा. (देवयाने उ सं एतं) देवमार्गांत मिळून वर्ता. (यमराज्येषु सं समेतं) नियन्त्याच्या राज्यांत सुद्धां एकीनें रहा. (यत् यत् वां रेतः) जो जो तुम्हां दोघांचा पराक्रम वगैरे (सं बभूव) मिळून व्हावयाचा करावयाचा आहे (तत्) तो (पूतौ) स्वतः पवित्र होऊन तुम्ही दोघे (उप ह्वयेथां) प्राप्त करा. स्वतः जवळ बोलावा. [३]

हे (पुत्रासः) पुत्र हो ! (आपः अभिसंविशध्वं) पाण्यांत शिरा. हे (जीवधन्याः) जीवास धन्य करणार हो ! (इमं जीवं समेत्य) या जीवदशेस प्राप्त होऊन (तासां अमृतं भजध्वं) त्या जीवदशेनें अमृत प्राप्त करा. (यं ओदनं वां जनित्री पचति) जें अमृतान्न तुमची माता प्रकृति (निसर्ग) शिजवीत आहे ते सर्व (आहुः) वर्णन करतात. [४]

(वां पिता माता च) आपले माता पिता (रिप्रात् शमलात् च वाचः निर्मुक्त्यै) पाप आणि मलीनतेनें युक्त वाणींतून मुक्त होण्यासाठीं (यं पचति) जें परिपक्व करीत आहेत (सः शतधारः स्वर्गः ओदनः) तें शेंकडो प्रवाहांनीं सुख देणारें स्वर्गदायक अन्न (महित्वा उभे नभसी व्याप) स्वतःच्या महात्म्यानें दोन्हीं लोकांस व्यापलें. [५]

भावार्थ- असें झाल्यानेंच त्याची दूर दृष्टि होऊं शकेल. त्याच्याकडून पराक्रम होईल, त्याचें तेज प्रसरेल आणि बळ वाढेल. ज्याप्रमाणें अग्नि लाकडाचें तेज वाढवितो, त्याप्रमाणें हें आंधिक बळ मनुष्याचें तेज वाढवितें. त्यामुळें सर्व प्रकारच्या शक्ति परिपक्व होतात, आणि त्यामुळेंच बुद्धिशुद्धी होऊं शकते. [२]

दोघांनीं खेळीमेळीनें एकत्र रहावें. आपसांत कधीं विरोध करूं नये. या लोकांत कार्य केल्यानें देवमार्गाच्या प्रवासांत आणि यमाच्या राज्यांत एकीनें रहाण्यानें लाभ होतो. आपसांत फाटाफूट असल्यानें दुःख होते. जो कांहीं श्रेष्ठ पराक्रम करावयाचा तो स्वतः संगठित होऊन, पवित्र होऊन करावा. [३]

हे स्वतःच्या आत्म्यास धन्य करणाऱ्या साधका ! तुम्हीं स्वतःच्या जीवनांत शुद्ध रहा, कधीं अशुद्ध होऊं नका. हें जीवन प्राप्त करून अमर व्हा. तुम्हांस अमृत प्राप्त व्हावें म्हणून ही तुमची माता प्रकृति (निसर्ग) हें अपूर्व अमृतान्न तयार करीत आहे. [४]

पापप्रवृत्ति आणि मलीन वाणीच्या दोषांतून मुक्त व्हावयास हवें. हेंच मातापितरांनी आणि पुत्रानें करावयाचें आहे. सर्व लोकांनीं वाणी शुद्ध करावी. त्यानें शेंकडोंपट स्वर्गीय सुख प्राप्त होईल. तें येथें आणि परलोकांत सुद्धां प्राप्त होईल. [५]

उभे नभसी उभयांश्च लोकान्ये यज्वनामभिजिताः स्वर्गाः ।
तेषां ज्योतिष्मान्मधुमान्यो अग्रे तस्मिन्पुत्रैर्जरसि सं श्रयेथाम् ॥ ६ ॥
प्राचींप्राचीं प्रदिशमा रभेथामेतं लोकं श्रद्दधानाः सचन्ते ।
यद्वां पक्वं परिविष्टमग्नौ तस्य गुप्तये दंपती सं श्रयेथाम् ॥ ७ ॥
दक्षिणां दिशमभि नक्षमाणौ पर्यावर्तेथामभि पात्रमेतत् ।
तस्मिन्वां यमः पितृभिः संविदानः पक्वाय शर्म बहुलं नि यच्छात् ॥ ८ ॥
प्रतीचीं दिशामियमिद्वरं यस्यां सोमो अधिपा मृडिता च ।
तस्यां श्रयेथां सुकृतः सचेथामधा पक्वान्मिथुना सं भवाथः ॥ ९ ॥

अर्थ-(ये यज्वनां अभिजिताः स्वर्गाः) जे याजकास प्राप्त होणारे स्वर्गलोक आहेत, ते (उभे नभसी, उभयान् च लोकान्) ते दोन्ही लोकांस प्राप्त होवोत. (तेषां यः मधुमान् ज्योतिष्मान्) त्यांत जो मधुर आणि तेजस्वी स्वर्ग आहे तो प्राप्त करा, (तस्मिन् अग्रे) त्यांत मुख्य स्थानीं (पुत्रैः जरसि संश्रयेथाम्) पुत्रांसह वृद्ध अवस्थेचा आश्रय करा. [६]

(प्राचीं प्राचीं प्रदिशं आरभेथां) पूर्व दिशेस पुढें व्हा. चला. (एतं लोकं श्रद्दधानाः सचन्ते) श्रद्धावान् मनुष्यें या लोकांस प्राप्त करतात. (यत् वां पक्वं अग्नौ परिविष्टं) जें तुमचें परिपक्व होऊन अग्नींत हवन करण्यांत आलें आहे, हे (दंपती) स्त्री पुरुष हो ! (तस्य गुप्तये संश्रयेथाम्) त्याच्या रक्षणासाठीं गृहस्थ धर्माचा आश्रय करा. [७]

(दक्षिणां दिशं अभिनक्षमाणौ) दक्षिण दिशेस स्वतःचीं पावलें वाढवीत, (एतत् पात्रं अभिपर्यावर्तेथां) या पात्राच्या चारी बाजूस परिभ्रमण करा. (तस्मिन् वां) त्यांत तुम्हीं (पितृभिः संविदानः यमः) पितरांशीं हरणारा यम (पक्वाय बहुलं शर्म नियच्छात्) परिपक्व होण्यासाठीं पुष्कळ सुख देवो. [८]

(इयं प्रतीची) ही पश्चिम दिशा आहे. (इत् दिशां वरं) ही सर्व दिशांत श्रेष्ठ दिशा आहे. (यस्यां सोमः अधिपा मृडिता च) ज्या दिशेस सोम अधिपति आणि सुख देणारा आहे. (तस्यां श्रयेथां) तेथें आश्रय करा आणि (सुकृतं सचेतां) सुकृतास प्राप्त व्हा. हे (मिथुनौ अधा पक्वात् सं भवाथः) स्त्री पुरुष हो ! नंतर परिपक्व झाल्यावर दोघे मिळून उन्नति प्राप्त करा. [९]

भावार्थ—यज्ञकर्त्यांस जे शुभ लोक प्राप्त होतात, त्यांत जें श्रेष्ठांत श्रेष्ठ स्थान आहे, जें जें जास्तींत जास्त सुखदायक आहे आणि जास्त तेजस्वी आहे तें प्राप्त करून वृद्धावस्थेंत पुत्रांसह तेथें आनंदानें रहा. [६]

श्रद्धेनें प्रकाशाच्या दिशेनें पुढें व्हा. श्रद्धेनें उन्नति प्राप्त होते. जें कांहीं परिपक्व फळ झालें आहे त्याचें रक्षण करण्याचे प्रयत्न खेळीमेळीनें मिळून मिसळून, करा. [७]

गृहस्थाश्रमांत दक्षिणेच्या दिशेनें पुढें प्रगति साधतांना पात्रतेच्या केंद्रासह रहा. तेथें तुम्हीं परिपक्व होण्यासाठीं, नियामक देव तुम्हांस मदत करील. तो तुम्हांस सुख देईल आणि तुमची प्रगति करील. [८]

पश्चिम दिशा विश्रामाची दिशा आहे, येथें सोम देव सुख देतो. येथें गृहस्थाश्रमांत विश्रांति घेऊन चांगली कामें करा आणि स्वतः स्वतःला परिपक्व करून स्वतः उन्नत व्हा. [९]

उत्त॑रं राष्ट्रं प्र॒जयो॑त्त॒राव॑द्दि॒शामुदी॑ची कृणव॒न्नो अग्र॑म् ।
पाङ्क्तं छन्दः॒ पुरु॑षो बभूव॒ विश्वै॑र्वि॒श्वाङ्गैः॑ स॒ह सं भ॑वेम ॥ १० ॥
ध्रु॒वेयं वि॒राण्नमो॑ अस्त्व॒स्यै शि॒वा पु॒त्रेभ्य॑ उ॒त मह्य॑मस्तु ।
सा नो॑ देव्यदिते विश्ववार॒ इर्य॑ इव गो॒पा अ॒भि र॑क्ष प॒क्वम् ॥ ११ ॥
पि॒तेव॑ पु॒त्राना॒भि सं स्व॑जस्व नः शि॒वा नो॒ वाता॑ इ॒ह वा॑न्तु भूमौ॑ ।
यमो॑द॒नं पच॑तो दे॒वते॑ इ॒ह तं न॒स्तप॑ उ॒त स॒त्यं च॑ वेत्तु ॥ १२ ॥
यद्य॑त्कृ॒ष्णः श॑कु॒न एह ग॒त्वा त्सर॒न्विष॑क्तं॒ बिल॑ आस॒साद॑ ।
यद्वा॑ दा॒स्या॒र्द्रह॑स्ता सम॒ङ्क्त उ॒लूख॑लं॒ मुस॑लं शुम्भताप॑ः ॥ १३ ॥
अ॒यं ग्रावा॑ पृ॒थुबु॑ध्नो वयो॒धाः पू॒तः प॒वित्रै॒रप॑ हन्तु र॒क्षः॑ ।
आ रो॑ह॒ चर्म॒ महि॒ शर्म॑ यच्छ॒ मा दंप॑ती॒ पौत्र॑म॒घं नि गा॑ताम् ॥ १४ ॥

अर्थ-(उत्तरं राष्ट्रं प्रजया उत्तरावत्) श्रेष्ठ राष्ट्र सुप्रजेनें अधिक श्रेष्ठ होतें. (उदीची दिशां नः अग्रं कृणवत्) ही उत्तर दिशा आम्हांस पुढें सारो, आमची प्रगति करो. (पुरुषः पाङ्क्तं छन्दः बभूव) मनुष्य पंचवीस छंदवाला असावा. आम्हीं सर्व (विश्वैः विश्वांगैः सह सं भवेम) सर्व अंगासह परिपूर्ण उन्नत होऊं. [१०]

(इयं ध्रुवा विराट्) ही ध्रुवदिशा फार शोभादायक आहे. (अस्यै नमः अस्तु) तिला नमस्कार असो. (पुत्रेभ्यः उत मह्यं शिवा अस्तु) ती पुत्रपौत्रांसाठीं वंशजासाठीं तसेंच माझ्यासाठीं सुद्धां शुभ होवो. हे (विश्ववारे अदिते देवि) विश्वाचें कल्याण करणाऱ्या अन्न देणाऱ्या देवी ! (सा नः इर्यः इव) अशी तूं आम्हांस अन्ना-प्रमाणें (गोपा पक्वं अभिरक्ष) सुरक्षित करीत परिपक्व कर. सुरक्षित कर. [११]

(पिता इव पुत्रान् नः अभि सं स्वजस्व) ज्याप्रमाणें पिता पुत्रास भेटतो. त्याप्रमाणें तुम्हीं आम्हांसर्वांस भेटा. (इह भूमौ न वाताः शिवाः वान्तु) या भूमींत आमच्यासाठीं शुभ वारे वहात राहोत. हे देवते ! (इह यं ओदनं पचतः) येथें जें अन्न हे दोघे शिजवतात (तं नः तपः सत्यं च वेत्तु) ते आमचें तप आणि सत्य जाणो. [१२]

(यत् यत् कृष्णः शकुनः इह आगत्वा) जो काळा पक्षी कावळा येथें येऊन (त्सरत् विषक्तं बिले आससाद) हालचाल करीत लपून छपून स्वतःच्या बिळांत-घरट्यांत घुसून बसतो. (यत् वा आर्द्रहस्ता दासी) अथवा ओल्या हातांची दासी (उलूखल मुसलं समंक्त) उखळा-मुसळास ओलें करो (आपः शुम्भत) तें पाणी आम्हांस पवित्र करो. [१३]

(अयं ग्रावा पृथुबुध्न वयोधाः) हा दगड विशाल आधार असलेलें अन्न देतो. अन्न कुटून तयार करून देतो. (पवित्रैः पूत रक्षः अप हन्तु) पवित्र करणाऱ्यास धनांनीं पुनीत होणारा तो दुष्टांचा नाश करो. (आरोह चर्म) चामड्यावर बस, (महि शर्म यच्छ) मोठें सुख दे. (दम्पती पौत्रं अघं मा निगातां) स्त्रीपुरुषांवर पुत्राचें पाप न येवो. [१४]

भावार्थ— प्रजेच्या उन्नतिमुळें राष्ट्र उन्नत होतें. जास्त उन्नत होणें हा उत्तर (उच्चतर) दिशेचा संदेश आहे. मनुष्यांचे पांच भेद आहेत. आणि त्यांची सर्वांगीण उन्नति संघटनेनें होते. [१०]

ही ध्रुव दिशा आहे. ती अन्न देणारी पृथ्वी आहे. त्या मातृभूमीला माझा नमस्कार हो. ती मला आणि माझ्या संततीला शुभ होवो. ती आमचें रक्षण करो. [११]

पिता स्वतःच्या पुत्रावर प्रेम करतो. त्याप्रमाणें सर्वांनीं परस्पर प्रेम करावें आम्हांस जल, वायु कल्याणकारक होवो. यज्ञासाठीं अन्न शिजविणारे तप आणि सत्याचें महत्त्व जाणोत. [१२]

जर कावळा येऊन स्वतःच्या घरट्यांत शिरला अथवा ओल्या हातांनीं दासी उखळ मुसळ ओलें करील तर त्या दोन्ही गोष्टी चांगल्या नाहींत. म्हणजे ओल्या हातांनीं कोणीही स्पर्श करणें चांगलें नाहीं. [१३]

वनस्पतिः सह देवैर्न आगन्रक्षः पिशाचाँ अपबाधमानः ।
स उच्छ्रयातै प्र वदाति वाचं तेन लोकाँ अभि सर्वान् जयेम ॥ १५ ॥
सप्त मेधान्पशवः पर्यगृह्णन्य एषां ज्योतिष्माँ उत यश्चकर्श ।
त्रयस्त्रिंशद्देवतास्तान्त्सचन्ते स नः स्वर्गमभि नेष लोकम् ॥ १६ ॥
स्वर्गं लोकमभि नो नयासि सं जायया सह पुत्रैः स्याम ।
गृह्णामि हस्तमनु मैत्वत्र मा नस्तारीन्निर्ऋतिर्मो अरातिः ॥ १७ ॥
ग्राहिं पाप्मानमति ताँ अयाम तमो व्यस्य प्र वदासि वल्गु ।
वानस्पत्य उद्यतो मा जिहिंसीर्मा तण्डुलं वि शरीर्देवयन्तम् ॥ १८ ॥

अर्थ— (वनस्पतिः देवैः सह नः आगन्) वृक्ष सर्व देवांच्या शक्तिसह येथें आमच्या जवळ येवो. (रक्षसः पिशाचान् अपः बाधमानः) ते राक्षस आणि पिशाचांस दूर करतात. (स उच्छ्रयातै वाचं प्रवदाति) तो उंच बसून घोषणा करतो कीं (तेन सर्वान् लोकान् अभिजयेम) त्यामुळें सर्व लोकांस जिंकूं. [१५]

(पशवः सप्त मेधान् परि अगृह्णन्) पशु साती यज्ञांस घेरतात. (त्रयः त्रिंशत् देवताः तान् सचन्ते) तेहतीस देवता त्यांचे सेवन करतात. (यः एषां ज्योतिष्मान् उत यः चकर्श) जो त्यांच्यांत तेजस्वी आणि त्यांच्यांत सूक्ष्म आहे (सः वः स्वर्गं लोकं अभिनेष) तो सोम आम्हांस स्वर्ग लोक प्राप्त करतो. [१६]

(नः स्वर्गं लोकं अभिनयासि) आम्हांस तूं स्वर्ग लोकांत पोहोंचवतोस (जायया पुत्रैः सह स्याम) स्त्री पुत्रांसह आम्हीं येथें सुखानें रहावें. (हस्तं गृह्णामि) जिचें मीं पाणीग्रहण करतों ती स्त्री (मा अत्र अनु एतु) येथें मला अनुसरो. (निर्ऋतिः अरातिः नः मा तारीत्) दुर्गति आणि शत्रु आम्हांस कष्ट न देवोत. [१७]

(तां पाप्मानं ग्राहिम्) त्या पापापासून उत्पन्न होणाऱ्या रोगाला (अति अयाम) पार करूं. (तमः व्यस्य वल्गु प्रवदासि) अंधार दूर करून मनोहर वचन बोलूं. हे (वानस्पत्य) वनस्पतीपासून तयार झालेल्या ! तूं (उद्यतः मा जिहिंसीः) उठून हिंसा करू नकोस. (मा तुंडुलं) तांदळांचा नाश करूं नकोस. (देवयन्तं मा वि शरीः) देव होण्याची इच्छा करणाऱ्याचा नाश करूं नकोस. [१८]

भावार्थ– दगडाचें उखळ आणि मुसळ धान्य स्वच्छ करण्यास चांगलें. प्रथम तीं पाण्यानें स्वच्छ करावीं आणि मग त्यांचा उपयोग करावा. एखाद्या चामड्यावर ठेऊन कांडावें. कांडल्यानें सर्व दोष दूर होतात, आणि तें धान्य कल्याणकारक होतें. त्यामुळें स्त्री पुरुषांस पुत्रनाशाचें दुःख सहन करावें लागणार नाहीं. म्हणजे त्यांचा पुत्र लवकर मरणार नाहीं. [१४]

वनस्पति सर्व रोगबीजें आणि पिशाच्च यांस दूर करते. त्यानें घोषणा केली आहे कीं त्याच्या बलानें सर्व प्रकारचें सुख प्राप्त होतें. [१५]

सात प्रकारच्या यज्ञांत गाईच्या आणि इतर पशूंच्या तुपाचा तसेंच इतर पदार्थांचा उपयोग होतो. तेहतीस देवतांचा या यज्ञांत संबंध येतो. शुक्ल पक्षांत तेजस्वी होणारा आणि कृष्णपक्षांत क्षीण होणारा सोम म्हणजे यज्ञ आम्हांस स्वर्गांत पोंहोचवो. [१६]

मृत्युनंतर आम्हीं स्वर्गांत जाऊं, तोंपावेतों येथें स्त्री पुत्रांसह आनंदांत राहूं. मीं ज्या स्त्रीशीं लग्न करीन ती मला अनुसरणारी होऊन राहो. आम्हांस कोण्या दुर्गति अथवा शत्रूकडून कष्ट न होवोत. [१७]

हीन आचरणानें रोग उत्पन्न होतात, ते दूर केले पाहिजेत. अज्ञानरूपी अंधार दूर केला पाहिजे. मनोहर भाषण बोलावें, झाडाच्या लाकडापासून तयार केलेलें उखळ मुसळ कोणाचा नाश न करो, आणि त्यांत तांदुळाचा सुद्धां नाश न होवो. दैवी शक्ति प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्याचा नाश न होवो. [१८]

विश्वव्यचा घृतपृष्ठो भविष्यन्त्सयोनिर्लोकमुप याह्येतम् ।
वर्षवृद्धमुप यच्छ शूर्पं तुषं पलावानप तद्विनक्तु ॥ १९ ॥
त्रयो लोकाः संमिता ब्राह्मणेन द्यौरेवासौ पृथिव्य१न्तरिक्षम् ।
अंशून्गृभीत्वान्वारभेथामा प्यायन्तां पुनरा यन्तु शूर्पम् ॥ २० ॥
पृथग्रूपाणि बहुधा पशूनामेकरूपो भवसि सं समृद्ध्या ।
एतां त्वचं लोहिनीं तां नुदस्व ग्रावा शुम्भाति मलग इव वस्त्रा ॥ २१ ॥
पृथिवीं त्वा पृथिव्यामा वेशयामि तनूः समानी विकृता त एषा ।
यद्यद् द्युत्तं लिखितमर्पणेन तेन मा सुस्रोर्ब्रह्मणापि तद्वपामि ॥ २२ ॥

अर्थ— (विश्वव्यचाः घृतपृष्ठः भविष्यन्) चारी बाजूस पसरलेलें तूप ज्याच्यावर टाकलें आहे असा होत (सयोनिः एतं लोकं उपयाहि) एकाच स्थानीं उत्पन्न झालेला तूं या लोकास प्राप्त हो. (वर्षवृद्धं शूर्पं उपयच्छ) एक वर्षाचें सूप जवळ घे आणि (तत् तुषं पलावान् अप विनक्तु) तें तूस (कोंडा) आणि कण्या दूर कर. [१९]

(ब्राह्मणेन त्रयः लोकाः संमिताः) ब्राह्मणाच्या ज्ञानानें तीन लोक प्राप्त झाले आहेत. (असौ द्यौः एव पृथिवी अन्तरिक्षं) हा द्यु, हें अंतरिक्ष आणि ही पृथ्वी आहे. (अंशून् गृभीत्वा अनु आरभेथां) धान्याचे अंश घेऊन अनुकूलतेनें झटकण्यास प्रारंभ करा आणि (आप्यायतां) वृद्धि प्राप्त होवो तसेंच (पुनः शूर्पं आयन्तु) पुनः सुपांत साफ करण्यास धान्य घेण्यांत यावें. [२०]

(पशूनां पृथक् बहुधा रूपाणि) पशूंची अनेक पृथक् पृथक् रूपें आहेत. तरी सुद्धां (समृद्ध्या एकरूपः भवसि) स्वतःच्या महात्म्यानें सोम एकरूप होतो. (एतां तां लोहिनीं त्वचं नुदस्व) या लाल त्वचेला दूर कर. (मलगः वस्त्रा इव) ज्याप्रमाणें धोबी वस्त्रांस शुद्ध करतो. तसेंच धुण्याचें (ग्रावा शुंभाति) दगड शुद्ध करतो. [२१]

(त्वा पृथिवीं पृथिव्यां आवेशयामि) पृथ्वीतत्त्वाला पृथ्वीमध्येंच स्थापित करतों. (एष ते विकृता तनूः) ही तुझी (सृष्टिरूपी) विकृत झालेली काया आहे. दुसरी तुझी (समानी) म्हणजे न बिघडलेली (प्रकृतिरूपी) काया आहे. (यत् यत् द्युत्तं अर्पणेन लिखितं) जें कांहीं पांघरल्यानें घासून जीर्ण अथवा खडबडीत झालें आहे. (तेन मा सुस्रोः) त्यामुळें तें टोंचणार नाहीं. (तत् ब्रह्मणा अपि वपामि) तें ज्ञानानें दुरुस्त करतों. [२२]

भावार्थ— चांगलें पसरट म्हणजे रुंद सूप हातांत घेऊन धान्यांतून, कुसकी-कोंडा दूर करून चांगल्या धान्याचा संग्रह करावा. [१९]

ब्राह्मणाच्या ज्ञानानें भूमि, अंतरिक्ष आणि द्युलोकाची प्राप्ति होते. त्याचप्रमाणें सुपानें अन्न स्वच्छ होतें, कोंडा दूर होतो आणि स्वच्छ धान्य प्राप्त होतें. अशाप्रकारें धान्य वारंवार स्वच्छ केलें पाहिजे. [२०]

पशुमध्यें अनेक रंगरूपें असतात परंतु औषधि एकच असते. तीच औषधि लाल कातडीस ठीक करते. धोबी कपडे धुवून स्वच्छ करतो त्याप्रमाणेंच धुण्याचा दगड सुद्धां कपडे स्वच्छ करतो. [२१]

पृथ्वीमध्यें पृथ्वीतत्त्व आहे. त्याप्रमाणें दुसरी तत्त्वें इतरांत आहेत. मूळ प्रकृति गुण साम्य आहे, तें विकृत होऊन ही सृष्टि तयार झाली त्यामुळें तीसुद्धां विकृत आहे. उपयोगानें तींत बिघाड निर्माण होतो, ज्ञानानें ही विकृति कमी करतां येते. [२२]

जनित्रीव प्रति हर्यासि सूनुं सं त्वा दधामि पृथिवीं पृथिव्या ।
उखा कुम्भी वेद्यां मा व्यथिष्ठा यज्ञायुधैराज्येनातिषक्ता ॥ २३ ॥
अग्निः पचन्रक्षतु त्वा पुरस्तादिन्द्रो रक्षतु दक्षिणतो मरुत्वान् ।
वरुणस्त्वा दृंहाद्धरुणे प्रतीच्या उत्तरात्त्वा सोमः सं ददातै ॥ २४ ॥
पूताः पवित्रैः पवन्ते अभ्राद्दिवं च यन्ति पृथिवीं च लोकान् ।
ता जीवला जीवधन्याः प्रतिष्ठाः पात्र आसिक्ताः पर्यग्निरिन्धाम् ॥ २५ ॥
आ यन्ति दिवः पृथिवीं सचन्ते भूम्याः सचन्ते अध्यन्तरिक्षम् ।
शुद्धाः सतीस्ता उ शुम्भन्त एव ता नः स्वर्गमभि लोकं नयन्तु ॥ २६ ॥

अर्थ— (जनित्री सूनुं इव) माता ज्याप्रमाणें स्वतःच्या पुत्रास घेते, तसेंच (त्वा प्रति हर्यासि) तुजवर प्रेम करते. (पृथिवीं पृथिव्यां संदधामि) पृथ्वीतत्त्वास पृथ्वीमध्यें मिळवतों (उखा कुम्भी वेद्यां मा व्यथिष्ठाः) घडा आणि भांडें अग्निवर फुटणार नाहीं (यज्ञायुधैः आज्येन अतिषक्ता) तीं यज्ञसाधनें तुपानें माखलेलीं आहेत. [२३]

(पचन् अग्निः पुरस्तात् त्वा रक्षतु) शिजविणारा अग्नि तुझें पुढून रक्षण करो. (मरुत्वान् इन्द्रो दक्षिणतः रक्षतु) मरुतांसह इंद्र दक्षिण बाजूनें रक्षण करो. (प्रतीच्याः वरुणः धरुणे त्वा दृंहात्) पश्चिमेकडून वरुण तुला आधारस्थानांत सुदृढ करो. (सोमः त्वा उत्तरात् संददातै) सोम तुला उत्तर दिशेनें जोडून सुरक्षित ठेवो. [२४]

पाण्याच्या धारा (पवित्रैः पूताः अभ्रात् पवन्ते) पवित्रतेनें पुनीत होऊन मेघांतून येऊन सर्वांस पवित्र करतात. (दिवं पृथिवीं च लोकान् यन्ति) द्यु आणि पृथ्वीला प्राप्त होतात. (ताः जीवलाः जीवधन्याः प्रतिष्ठाः) त्या जीवन देणाऱ्या आणि जीवास धन्यता देणाऱ्या तसेंच सर्वांस आधार देणाऱ्या (पात्रे आसिक्ताः) पात्रांत टाकलेल्या पाण्याच्या धारांना (अग्निः परि इन्धां) अग्नि चारी बाजूंनीं तापवो. [२५]

(दिवः आयन्ति) जलधारा द्युलोकांतून येतात. (पृथिवीं सचन्ते) पृथ्वीवर एकत्रित होतात. (भूम्याः अन्तरिक्षं अधिसचन्ते) पृथ्वीवरून वाफेच्या रूपानें अंतराळांत एकत्रित होतात. त्या (शुद्धाः सतीः ताः उ शुंभन्ते एव) शुद्ध झालेले पाणी सर्वांस पवित्र करतें. (ताः नः स्वर्गं लोकं अभिनयन्तु) त्या आम्हांस स्वर्ग लोकास प्राप्त करवोत. [२६]

भावार्थ— माता ज्याप्रमाणें पुत्रास प्रेमानें उचलून घेते त्याप्रमाणें भांड्यांशीं वागलें पाहिजे. भांडीं अनघडपणें वापरून फोडूं नयेत. घड्या-भांड्यांत (बरणींत) तूप भरलेलें असावें. आणि त्याचा संबंध यज्ञसाधनांशीं असावा. [२३]

अग्नि, इंद्र, वरुण आणि सोम हे देव पूर्व, दक्षिण, पश्चिम आणि उत्तर दिशेस सर्वांचें रक्षण करोत. [२४]

मेघांनीं पृथ्वीवर पाऊस पडतो, आणि तें पाणी भांड्यांत भरून ठेवतां येतें. हें जल जीवांस जीवन देतें, तृप्त करतें आणि धन्य बनवितें. त्याला अग्नीनें तापविलें पाहिजे. [२५]

पाण्याची वाफ होऊन ती वर आकाशांत जाते आणि तेथून पावसाच्या रूपानें पृथ्वीवर येते. या शुद्ध अवस्थेंत सर्वांस शुद्ध करून सुख देते. [२६]

उतेवं प्रभ्वीरुत संमितास उत शुक्राः शुचयश्चामृतासः ।
ता ओदनं दंपतिभ्यां प्रशिष्टा आपः शिक्षन्तीः पचता सुनाथाः ॥ २७ ॥
संख्याता स्तोकाः पृथिवीं सचन्ते प्राणापानैः संमिता ओषधीभिः ।
असंख्याता ओप्यमानाः सुवर्णाः सर्वं व्यापुः शुचयः शुचित्वम् ॥ २८ ॥
उद्योधन्त्यभि वल्गन्ति तप्ताः फेनमस्यन्ति बहुलांश्च बिन्दून् ।
योषेव दृष्ट्वा पतिमृत्वियायैतैस्तण्डुलैर्भवता समापः ॥ २९ ॥
उत्थापय सीदतो बुध्न एनानद्भिरात्मानमभि सं स्पृशन्ताम् ।
अमासि पात्रैरुदकं यदेतन्मितास्तण्डुलाः प्रदिशो यदीमाः ॥ ३० ॥
प्र यच्छ पर्शुं त्वरया हरौषमहिंसन्त ओषधीर्दान्तु पर्वन् ।
यासां सोमः परि राज्यं बभूवामन्युता नो वीरुधो भवन्तु ॥ ३१ ॥

अर्थ— (उत एव प्रभ्वीः, उत संमितासः) पाणी खात्रीनें प्रभावशाली आहे, आणि संमत (उत शुक्राः शुचयः अमृतासः च) आणि तें बलवर्धक, पवित्र आणि अमृत आहे. (ताः प्रशिष्टाः सुनीथाः आपः) तें उत्तम शिष्टसंमत आणलेलें पाणी (दंपतीभ्यां ओदनं पचत) स्त्रीपुरुषासाठीं तांदूळ शिजवो. [२७]

(संख्याताः स्तोकाः पृथिवीं सचन्ते) थोडेच लहान पाण्याचे बिंदु पृथ्वीवर पडतात. ते (प्राणापानैः ओषधीभिः संमिताः) औषधिशीं मिळाल्यानें प्राणापानांच्या गुणांनीं युक्त असतात. (असंख्याताः ओप्यमानाः सुवर्णाः शुचयः) असंख्य विखुरलेलें उत्तम रंगानें युक्त शुद्ध जलबिंदु (सर्वं शुचित्वं व्यापुः) सर्व पवित्रांस व्यापतात. [२८]

(तप्ताः उद्योधन्ति अभिवल्गन्ति) तापलेलें पाणी शुद्ध करतें, पुकारतें. (फेनं बहुलान् बिन्दून् च अस्यन्ति) फेस आणि बुडबुडे येतात (फेकले जातात) हे (आपः) पाण्या ! (योषा पतिं दृष्ट्वा ऋत्वियाय संभवति) ज्याप्रमाणें उत्सुक स्त्री पतीला पाहून ऋतुकर्मासाठीं एकत्र येते त्याप्रमाणें (एतैः तण्डुलैः संभवत) या तांदुळाशीं हें पाणी मिळून जावो. [२९]

(बुध्ने सीदतः एनान् उत्थापय) खालीं बसलेल्या तांदूळास वर करा. (अद्भिः आत्मानं अभिसंस्पृशन्ताम्) पाण्याशीं ती उत्तम रीतीनें एकजीव होऊन जावो. (यत् एतत् उदकं पात्रैः अमासि) हें जल भांड्यानें मीं मापून मोजून घेतलें आहे. (इमाः प्रदिशः तण्डुलाः मिताः) त्याचप्रमाणें हे चारी दिशास जाणारे तांदुळ सुद्धां मीं मोजके मापले आहेत. [३०]

(पर्शुं प्रयच्छ) कुऱ्हाड दे. (त्वरय) उशीर करूं नकोस आणि (ओषं हर) येथें लवकर घेऊन ये (अहिंसन्तः ओषधीः पर्वन् दान्तु) हिंसा न करतां भाजी चिरण्यांत यावी. (यासां राज्यं सोमः परि बभूव) या औषधींच्या राज्याचा राजा सोम आहे. (वीरुधः नः अमन्युता भवन्तु) औषधि आमच्याशीं क्रोधरहित होवोत. [३१]

भावार्थ— पाणी प्रभावशाली, प्रशंसनीय, बलवर्धक, पवित्र, रोग दूर करणारे असतें. असें उत्तम पाणी परिशुद्धरीतीनें आणल्या धान्यास शिजविण्यास मदद्रूप होवो. [२७]

कित्येक थोडे पाण्याचे बिंदु औषधींत मिळून प्राण्याचे प्राण धारण करतात. पण अगणित सुंदर जलबिंदु इकडे तिकडे विखरून तेज प्रसरतात. [२८]

पाणी ऊन केल्यानें उकळतें, अवाज करतें. फेस आणि बुडबुडे वर उसळतात, युद्ध करण्यासारखी हालचाल करतात. ज्याप्रमाणें उत्सुक स्त्री पतीशीं मिळून जाते त्याप्रमाणें हें पाणी (शिजणाऱ्या) तांदुळांत सामावून जातें. [२९]

तांदूळ शिजत असतात, अर्धे शिजल्यावर खालचे वर असे अर्धे हलवले पाहिजेत. म्हणजे त्या सर्वांत पाणी मुरून जाईल. शिजणाऱ्या भांड्यांत पाणी आणि तांदूळ एकत्र मिसळून गेले पाहिजेत. [३०]

भाजी चिरण्यास सुरी वेळींच हातांत घ्यावी. लवकर लवकर सांध्यांतून चिरा पण वनस्पतीचा नाश करूं नका. ही सर्व भाजी सोमराजाच्या राज्यांतील आहे. तिनें आमचें पोषण होतें. [३१]

*

नवं बर्हिरोदनाय स्तृणीत प्रियं हृदश्चक्षुषो वल्ग्वस्तु ।
तस्मिन्देवाः सह दैवीर्विशन्त्विमं प्राश्नन्त्वृतुभिर्निषद्य ॥ ३२ ॥
वनस्पते स्तीर्णमा सीद बर्हिरग्निष्टोमैः संमितो देवताभिः ।
त्वष्ट्रेव रूपं सुकृतं स्वधित्यैना एहाः परि पात्रे ददृश्राम् ॥ ३३ ॥
षष्ट्यां शरत्सु निधिपा अभीच्छात्स्वः पक्वेनाभ्यश्नवातै ।
उपैनं जीवान्पितरश्च पुत्रा एतं स्वर्गं गमयान्तमग्नेः ॥ ३४ ॥
धर्ता ध्रियस्व धरुणे पृथिव्या अच्युतं त्वा देवताश्च्यावयन्तु ।
तं त्वा दंपती जीवन्तौ जीवपुत्रावुद्वासयातः पर्यग्निधानात् ॥ ३५ ॥
सर्वान्त्समागा अभिजित्य लोकान्यावन्तः कामाः समतीतृपस्तान् ।
वि गाहेथामायवनं च दर्विरेकस्मिन्पात्रे अध्युद्धरैनम् ॥ ३६ ॥

अर्थ— (नवं बर्हिः ओदनाय स्तृणीत) या तांदुळासाठीं नवी चटई पसरा. (हृदः प्रियं चक्षुषः वल्गु अस्तु) हें सर्व हृदयास संतोष देणारें प्रिय आणि पहाण्यास सुंदर होवो.. (तस्मिन् देवः दैवीः सह विशन्तु) तेथें देवींसह सर्व देव येवोत. (निषद्य इमं ऋतुभिः प्राश्नन्तु) बसून हें अन्न ऋतु अनुसार खावोत. [३२]

(वनस्पते स्तीर्णं बर्हिः आसीद) हे वनस्पतीपासून तयार केलेल्या खांबा ! या पसरलेल्या आसनावर तूं बैस. (अग्निष्टोमैः देवताभिः संमितः) अग्निष्टोम यज्ञाच्या देवांकडून सन्मानित हो. (त्वष्ट्रा स्वधित्या रूपं सुकृतं) त्वष्टा स्वतःच्या शस्त्रानें तुझें रूप सुंदर करो. (एना एहाः पात्रे परि ददृश्रां) याबरोबर असणाऱ्या या पात्रांत रहा. [३३]

(निधिपाः षष्ट्यां शरत्सु) अन्नाचा पालक दाता साठ वर्षांत (पक्वेन अश्नवातै स्वः अभीच्छात्) शिजवलेल्या अन्नाच्या दानानें स्वर्गप्राप्तीची इच्छा करावी. (पितरः पुत्राः च एनं उपजीवान्) पिता आणि पुत्र त्याच्यामुळें जीवंत राहोत. (एतं अग्नेः अन्तं स्वर्गं गमय) याला अग्नीजवळून स्वर्गांत पोहोंचवा. [३४]

(धर्ता पृथिव्याः धरुणे ध्रियस्व) धारण करणारा तूं अग्नि पृथ्वीच्या आधारानें स्थिर रहा. (अच्युतं त्वा देवताः च्यावयन्तु) न हलणाऱ्या तुला देवता हलवोत. (जीवपुत्रौ जीवन्तौ दम्पती) ज्यांचे पुत्र जीवित आहेत असे जीवित स्त्रीपुरुष (तं त्वा अग्निधानात् परि उत् वासयातः) तुला अग्निधानाच्या स्थानावरून उठवोत. [३५]

(तान् सर्वान् लोकान् अभिजित्य) ते सर्व लोक जिंकून (समागाः यावन्तः कामाः समतीतृपः) संगत झालेल्या ज्या कामना तूं तृप्त केल्या आहेस. (आयवनं च दर्विः विगाहेथां) पळी आणि चमस आंत टाका आणि (एकस्मिन् पात्रे एनं अधि उद्धर) एकच पात्रांत त्याला ठेव. [३६]

भावार्थ— तांदुळ शिजल्यानंतर ते पसरण्यासाठीं नवी चटई पसरा. ती दिसण्यांत सुंदर आणि हृदयास प्रिय होईल अशी असावी. सर्व देवांनीं येऊन बसून त्याचें यथेच्छ सेवन करावें. [३२]

यज्ञस्तंभ त्याच्या स्थानीं ठेवण्यांत यावा. तो स्तंभ तासण्याच्या हत्यारांनीं तयार केलेला असावा. कोरीवकामानें त्याचें स्वरूप सुंदर केलें आहे. त्यासह भांड्यांत हें धान्य ठेवावें. [३३]

जो अन्नाचा संग्रह करतो आणि शिजवून त्याचें दान करतो, तो साठ वर्षेंपर्यंत दान करीत राहील, आणि त्यामुळें तो स्वर्गाचा अधिकारी होईल. या अन्नानें सर्व कुटुंबीजन जिवंत रहातील आणि या अन्नानें अग्नींत हवन होईल. तो अग्नि आम्हांस स्वर्गांत पोहोंचवो. [३४]

अग्नि सर्वांस धारण करतो. तो भूमीवर स्थिर होवो. देवतागण त्यास स्वतःच्या स्थानापासून दूर करोत. ज्यांचे पुत्रपौत्र हयात असतील अशा स्त्रीपुरुषांनीं अग्निस्थानांतून अग्नि उचलून हवनस्थानांत ठेवावा. [३५]

स्वर्गादि सर्व लोकांस यज्ञानें जिंकून स्वतःच्या सर्व मनोकामना तृप्त करण्यासाठीं या अन्नांत चमस ठेवून त्याचा थोडा भाग या पात्रांत घ्यावा. [३६]

उप स्तृणीहि प्रथय पुरस्ताद् घृतेन पात्रमभि घारयैतत् ।
वाश्रेवोस्रा तरुणं स्तनस्युमिमं देवासो अभिहिङ्कृणोत ॥ ३७ ॥
उपास्तरीरकरो लोकमेतमुरुः प्रथतामसमः स्वर्गः ।
तस्मिञ्छ्रयातै महिषः सुपर्णो देवा एनं देवताभ्यः प्र यच्छान् ॥ ३८ ॥
यद्यज्जाया पचति त्वत्परःपरः पतिर्वा जाये त्वत्तिरः ।
सं तत्सृजेथां सह वां तदस्तु संपादयन्तौ सह लोकमेकम् ॥ ३९ ॥
यावन्तो अस्याः पृथिवीं सचन्ते अस्मत्पुत्राः परि ये संबभूवुः ।
सर्वांस्ताँ उप पात्रे ह्वयेथां नाभिं जानानाः शिशवः समायान् ॥ ४० ॥
वसोर्या धारा मधुना प्रपीना घृतेन मिश्रा अमृतस्य नाभयः ।
सर्वास्ता अव रुन्धे स्वर्गः षष्ट्यां शरत्सु निधिपा अभीच्छात् ॥ ४१ ॥

अर्थ— (उपस्तृणीहि पुरस्तात् प्रथय) तूप टाका, पुढें पसरा (घृतेन एतत् पात्रं अभिघारय) तुपानें हें पात्र भरून टाका. हे (देवासः) देव हो ! (स्तनस्युं तरुणं वाश्रा उस्रा इव) स्तन पिणाऱ्या वासरावर गाय जशी प्रेम करते-इच्छिते तसेंच देव याला (अभि हिंकृणोत) प्रसन्नतेच्या शब्दानें स्वीकार करोत. [३७]

तूं (एतं लोकं अकरः) हा लोक तयार केला आहेस. आणि (उपः अस्तरीः) त्याला व्यवस्थित केला आहेस. (असमः स्वर्गः उरुः प्रथतां) ज्याच्यासारखा दुसरा कोणी नाहीं असा हा स्वर्ग फार पुष्कळ पसरो. (तस्मिन महिषः सुपर्णः श्रयातै) त्यांत बलवान् सुपर्ण-सूर्य आश्रय घेवो. (एनं देवाः देवताभ्यः प्रयच्छान्) त्याला देव-देवतांसाठीं देतात. [३८]

(यत् यत् त्वत् परः परः जाया पचति) जे तुझ्यापासून वेगळें तुझी पत्नी शिजविते हे (जाये) स्त्रिये ! (त्वत् तिरः पतिः वा) तुझ्यापासून लपवून जें कांहीं तुझा पति करतो, (तत् संसृजेथाः) तें तुम्हीं दोघे एकत्र करा. (तत् वां सह अस्तु) ते तुम्हीं दोघानीं बरोबर केलेलें असेल. (एकं लोकं सह संपादयन्तौ) तुम्हीं दोघे एकाच लोकांबरोबरच प्राप्त करतां. [३९]

(यावन्तः अस्मत् अस्याः पुत्राः) जेवढे या स्त्रीच्या ठिकाणीं माझ्यापासून उत्पन्न झालेले पुत्र (ये परि संबभूवुः) जे येथें चारी बाजूस आहेत आणि जे (पृथिवीं सचन्ते) मातृभूमीची सेवा करतात, (तान् सर्वान् पात्रे उपह्वयेथां) त्या सर्वांना पात्रांत भोजन करण्यास बोलावतों. (शिशवः जानानाः नाभिं समायान्) पुत्रसुद्धां समजून सर्व एका ठिकाणीं येवोत. [४०]

(याः मधुना प्रपीनाः घृतेन मिश्राः) ज्या मधानें भरपूर आणि तुपानें मिश्रित (अमृतस्य नाभयः वसोः धाराः) अमृताच्या केंद्राप्रमाणें धनाच्या धारा आहेत (ताः सर्वाः स्वर्गः अवरुन्धे) त्या सर्वांस स्वर्ग स्वतःजवळ ठेवो. (निधिपाः षष्ट्यां शरत्सु अभीच्छात्) निधीचा रक्षक साठ वर्षांच्या आयुष्यांत त्यांची इच्छा करो. [४१]

भावार्थ— पात्रांत तूप टाका, तें पसरा, तुपानें भांडें भरून ठेवा आणि चारी बाजूस माखा. त्यांत अन्न ठेवून देवतांस अर्पण करा. त्यांनीं त्याचा स्वीकार करावा. ज्याप्रमाणें आंचळें चोखणाऱ्या वासराचा गाय स्वीकार करते. [३७]

ईश्वरानें हा लोक आणि स्वर्ग निर्माण केले आणि विशाल करून प्रसरले, त्यांत प्रकाशयुक्त सूर्य शोभत आहे. सर्व देव या प्रकाशानें प्रकाशित होतात. [३८]

पत्नी आणि पति जें करतात तें सर्व एकत्रित करण्यांत यावें, दोघांचा मिळून एकच संसार असावा. दोघांत भेद असूं नये. दोघांनीं मिळून खेळीमेळीनें रहावें आणि एकाच गृहस्थाश्रमाची शोभा वाढवावी.

पति-पत्नीचीं जितकीं मुलें असतील त्या सर्वांस जेवणासाठीं एकत्र बोलवावें, कारण कीं एक केंद्रांत येणें सर्वांस योग्य होय. सर्वांनीं मातृभूमीची सेवा करावी. [४०]

निधिं निधिपा अभ्येनमिच्छादनीश्वरा अभितः सन्तु येऽन्ये ।
अस्माभिर्दत्तो निहितः स्वर्गस्त्रिभिः काण्डैस्त्रीन्त्स्वर्गानरुक्षत् ॥ ४२ ॥
अग्नी रक्षस्तपतु यद्विदेवं क्रव्यात्पिशाच इह मा प्र पास्त ।
नुदाम एनमप रुध्मो अस्मदादित्या एनमङ्गिरसः सचन्ताम् ॥ ४३ ॥
आदित्येभ्यो अङ्गिरोभ्यो मध्विदं घृतेन मिश्रं प्रति वेदयामि ।
शुद्धहस्तौ ब्राह्मणस्यानिहत्यैतं स्वर्गं सुकृतावपीतम् ॥ ४४ ॥
इदं प्रापमुत्तमं काण्डमस्य यस्माल्लोकात्परमेष्ठी समाप ।
आ सिञ्च सर्पिर्घृतवत्समङ्ग्ध्येष भागो अङ्गिरसो नो अत्र ॥ ४५ ॥

अर्थ— (**निधिपाः एनं निधिं अभीच्छात्**) खजिन्याचें रक्षण करणारा यजमान त्या खजिन्याचें रक्षण करो. (**ये अन्ये अनीश्वराः अभितः सन्तु**) जे दुसरे ऐश्वर्यहीन आहेत ते चारी बाजूंस रखडत-भटकत राहाते. (**अस्माभिः दत्तः स्वर्गः निहितः**) आमच्याकडून दानानें प्राप्त झालेला स्वर्ग सुरक्षित ठेवला आहे. तो (**त्रिभिः काण्डैः त्रीन् स्वर्गान् अरुक्षत्**) तीन विभागांनीं तीन स्वर्गांवर आरूढ होवो. [४२]

(**यत् विदेवं रक्षः अग्निः तपतु**) जे ईश्वरविरोधी राक्षस आहेत त्यांस अग्नि तापवो. (**क्रव्यात् पिशाचः इह मा प्रपास्त**) रक्तमांसभक्षक लोक येथें न्याहरी अथवा पाणीसुद्धां न घेवोत. (**एनं नुदामः**) या दुष्टास आम्हीं दूर करतों. (**अस्मत् अपरुध्मः**) त्याला स्वतःजवळ येऊं देत नाहीं. (**आदित्याः अंगिरसः एनं सचन्तां**) आदित्य आणि अंगिरस या दुष्टांस पकडून ठेवोत. [४३]

(**इदं घृतेन मिश्रं मधु**) हा तुपांत मिसळलेला मध (**आदित्येभ्यः अंगिरोभ्यः प्रतिवेदयामि**) आदित्य आणि अंगिरसांसाठीं आहे, असें मीं म्हणतों. (**शुद्ध-हस्तौ ब्राह्मणस्य अनिहत्य सुकृतौ**) जे शुद्ध हात ज्ञानी मनुष्याचें अकल्याण करीत नाहींत, ते पुण्यवान् असतात ते (**एतं स्वर्गं अपि इतं**) या स्वर्गास प्राप्त होवोत. [४४]

(**यस्मात लोकात् परमेष्ठी समाप**) ज्या लोकापासून परमेष्ठी परमेश्वर प्राप्त होतो, (**अस्य इदं उत्तमं काण्डं प्रापं**) त्याचा हा उत्तम भाग मीं प्राप्त केला आहे. (**घृतवत् सर्पिः आसिञ्च समङ्ग्धि**) तूप मिसळलेला मध येथें ठेव आणि मिसळ, (**नः एषः भागः अत्र अंगिरसः**) आमचा हा भाग अंगिरसाचा आहे. [४५]

भावार्थ— ज्या ऐश्वर्याचा प्रवाह मध आणि तूप यांनीं मिळालेलें अमरत्व देणाऱ्या स्वर्गांत आहे, त्याची इच्छा यजमानानें साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर करावी. [४१]

निधीचा रक्षक यजमान, दानानें श्रेष्ठ ऐश्वर्य प्राप्त करण्याची इच्छा करो. जे दुसरे शक्तिहीन आहेत ते चहूंबाजूस भटकत राहोत. आमच्या दानानें प्राप्त झालेला स्वर्ग तो हाच आहे. तो तीनहि विभागापेक्षां, तीनहि स्वर्गांपेक्षां श्रेष्ठ आहे. [४२]

जे ईश्वरास विरोध करतात, जे रक्त आणि मांस खातात, त्यांस जवळ येऊं देऊं नका, दूर ठेवा. ते समाजाचे शत्रु होत. [४३]

मध आणि तूप सर्व देवतांस देण्यांत यावें. जे कोणाची हिंसा करीत नाहींत त्यांस पवित्र हात म्हणतात. तेच स्वर्ग प्राप्त करूं शकतात. [४४]

ज्या ठिकाणाहून परमेश्वर साधकास प्राप्त होतो, असें स्थान मनुष्यानें प्राप्त करावें. तूप आणि मध भरपूर सेवन करण्यांत यावेत, आणि देवतांस उद्देशून अर्पण करण्यांत यावेत. [४५]

सत्याय॑ च तप॑से दे॒वता॑भ्यो नि॒धिं शे॑व॒धिं परि॑ दद्म ए॒तम् ।
मा नो॑ द्यूतेऽव॑ गा॒न्मा समि॑त्यां॒ मा स्मा॒न्यस्मा॒ उत्सृ॑जता पु॒रा मत् ॥ ४६ ॥
अ॒हं प॑चाम्य॒हं द॑दामि॒ ममे॑दु॒ कर्म॑न्क॒रुणेऽधि॑ जा॒या ।
कौमा॑रो लो॒को अ॑जनिष्ट पु॒त्रो॒३॒॑ऽन्वार॑भेथां॒ वय॑ उत्त॒राव॑त् ॥ ४७ ॥
न कि॑ल्बि॒षमत्र॒ नाधा॒रो अस्ति॒ न यन्मि॒त्रैः स॒मम॑मान॒ एति॑ ।
अनू॑नं॒ पात्रं॒ निहि॑तं न ए॒तत्प॒क्तारं॑ प॒क्वः पुन॒रा वि॑शाति ॥ ४८ ॥
प्रि॒यं प्रि॒याणां॑ कृणवाम॒ तम॒स्ते य॑न्तु यत॒मे द्वि॒षन्ति॑ ।
धे॒नुर॑न॒ड्वान्वयो॑वय॒ आय॑दे॒व पौरु॑षेय॒मप॑ मृ॒त्युं नु॑दन्तु ॥ ४९ ॥
सम॒ग्नयो॑ विदुर॒न्यो अ॒न्यं य ओष॑धी॒: सच॑ते॒ यश्च॒ सिन्धू॑न् ।
याव॑न्तो दे॒वा दि॒व्या॒३॒॑तप॑न्ति॒ हिर॑ण्यं॒ ज्योति॒: पच॑तो ब॒भूव ॥ ५० ॥

अर्थ— (सत्याय तपसे देवताभ्यः च) सत्य तप आणि देवतांसाठीं (एतं शेवधिं निधिं परि दद्मः) हा खजिनारूपी निधि दे. (द्यूते समित्यां नः मा अव गात्) खेळ आणि सभेमध्यें त्या आमच्यापासून दूर न जावोत, आणि (मत् पुरा अन्यस्मै मा उत्सृजत) मला सोडून इतरास न मिळो. [४६]

(अहं पचामि, अहं ददामि) मीं शिजवितों, मीं दान देतो, (मम जाया करुणे कर्मन् अधि) माझी धर्मपत्नी दयायुक्त कामें करण्याचा प्रयत्न करीत आहे. (कौमारः पुत्रः लोकः अजनिष्ट) कुमारपुत्र या लोकासाठीं जन्मला आहे. (उत्तरावत् वयः अन्वारभेथां) उच्च अवस्था प्राप्त करणारें स्वतःचें जीवन उत्तमप्रकारें व्यतीत करोत. [४७]

(अत्र न किल्बिषं) येथें अर्पण करण्यांत कांहीं पाप नाहीं, (न आधारः अस्ति) आधारासाठीं मागें कांहीं ठेवूं नये. (यत् मित्रैः सं-अममानः न एति) जो मित्रांशीं मिळून मिसळून वागत नाहीं, (एतत् पात्रं अ-नूनं निहितं) हें पात्र परिपूर्ण ठेवलें आहे. (पक्कः पक्तारं पुनः आविशाति) शिजविलेलें पुनः शिजविणाऱ्या जवळ परत येतें. [४८]

(प्रियाणां प्रियं कृणवाम) मित्रांचें प्रिय आम्हीं करतों. (यतमे द्विषन्ते ते तमः यन्तु) जे द्वेष करतात ते अंधारांत जावोत. (धेनुः अनड्वान् वयोवयः आयत् एव) गाय आणि बैल हे शक्तिच जाणतात. ते (पौरुषेयं मृत्युं अप नुदन्तु) मनुष्याचा मृत्यु दूर करो. [४९]

(अग्नयः अन्यो अन्यं सं विदुः) अग्नि एकमेकांस जाणतात (यः ओषधीः सचते, यः च सिन्धून्) जो औषधींत रहातो आणि जो दुसरा पाण्यांत रहातो. (यावन्तः देवाः दिवि आतपन्ति) जितके देव द्युलोकांत प्रकाशतात त्यांना (हिरण्यं ज्योतिः पचतः बभूव) अन्न शिजविणाऱ्या दात्यास तेजस्वी ज्योति प्राप्त होवो. [५०]

भावार्थ—सत्य, तप, आणि देवतांसाठीं आम्हीं हें समर्पण करीत आहोंत. हें फळ आम्हांपासून कोणत्याहि कारणानें दूर न होवो. खेळांत अथवा सभेंत दूर न होवो, म्हणजे नेहमीं आमच्याजवळ राहो. [४६]

मनुष्यानें अन्न शिजवावें आणि त्याचें दान करावें. स्त्रियांनीं सुद्धां धर्मकर्माविषयीं दक्षतेनें प्रयत्न करावा. याप्रमाणें दोघांनी पुत्रास जन्म देऊन उच्च अवस्था प्राप्त करावी. [४७]

दान करण्यांत कांहीं पाप नाहीं. दान देतांना मागें कांहीं शिल्लक ठेवूं नये. ते इष्टमित्रासह सुद्धां जात नाहीं. तें दान पात्र पूर्ण भरून ठेवावें. ते परिपक्व झाल्यावर पुनः फळरूपानें दात्याजवळ पोहोंचते. [४८]

मनुष्यानें स्वतः मित्राचें हित करावें, द्वेष करणाऱ्या शत्रूस दूर करावें, गाय स्वतःच्या दुधानें मनुष्यास आरोग्य, जीवन आणि शक्ति देते आणि मृत्यूस दूर करते. [४९]

एषा त्वचां पुरुषे सं बभूवानग्नाः सर्वे पशवो ये अन्ये ।
क्षत्रेणात्मानं परि धापयाथोऽमोतं वासो मुखमोदनस्य ॥ ५१ ॥
यदक्षेषु वदा यत्समित्यां यद्वा वदा अनृतं वित्तकाम्या ।
समानं तन्तुमभि संवसानौ तस्मिन्त्सर्वं शमलं सादयाथः ॥ ५२ ॥
वर्षं वनुष्वापि गच्छ देवांस्त्वचो धूमं पर्युत्पातयासि ।
विश्वव्यचा घृतपृष्ठो भविष्यन्त्सयोनिर्लोकमुप याह्येतम् ॥ ५३ ॥
तन्वं स्वर्गो बहुधा वि चक्रे यथा विद आत्मन्नन्यवर्णाम् ।
अपाजैत्कृष्णां रुशतीं पुनानो या लोहिनी तां ते अग्नौ जुहोमि ॥ ५४ ॥

अर्थ— (**पुरुषे एषा त्वचां संबभूव**) मनुष्यांमध्यें ही त्वचा दुसऱ्या त्वचेपासून उत्पन्न होते. (**ये अन्ये सर्वे पशवः अ-नग्नाः**) जे इतर सर्व पशु आहेत ते नग्न नाहींत. (**क्षत्रेण आत्मानं परि धापयाथः**) शौर्यानें स्वतः स्वतःसाठीं पांघरण्यास द्या. (**अमा-उतं वासः ओदनस्य मुखं**) सहकारानें विणलेलें वस्त्र तांदुळावर झांकण्यालायक मुख्य वस्त्र आहे. [५१]

(**यत् अक्षेषु वदाः**) खेळांत जे तुम्हीं बोलतां, (**यत् समित्यां**) जे तुम्हीं सभेंत बोलतां (**यत् वा वित्त-काम्या अनृतं वदाः**) जे धनाच्या इच्छेनें असत्य भाषण केलें असेल, त्याचे (**सर्वं शमलं तस्मिन् सादयाथः**) सर्व दोष त्यांतच ठेवा आणि (**समानं तंतुं अभिसंवसानौ**) सारखीं वस्त्रें वापरण्यास लागा. [५२]

(**वर्षं वनुष्व**) पाऊस प्राप्त करा, (**देवान् अपि गच्छ**) देवांचे जवळ जा, (**त्वचः परि धूमं उत्पातयासि**) त्वचेवर धूळ उडवा. (**विश्वव्यचाः घृतपृष्ठः भविष्यन्**) विश्वांत विस्तृत, घृतानें युक्त होण्याची इच्छा करणारा (**सयोनिः एतं लोकं उपयाहि**) सजातीय होऊन या लोकास प्राप्त हो. [५३]

(**स्वर्गः बहुधा तन्वं विचक्रे**) द्युलोक पुष्कळप्रकारें आपल्या शरीरास तयार करतो. (**यथा आत्मन् अन्य-वर्णां विद**) स्वतःप्रमाणें इतर रंगांसहि पहातो. (**रुशतीं पुनानः**) तेजस्वी आकारास पवित्र करतो, (**कृष्णां अपाजैत्**) काळ्या रंगास दूर करतो (**या लोहिनी तां ते अग्नौ जुहोमि**) जें लालरूप आहे त्याचें अग्नींत हवन करतो. [५४]

भावार्थ— अग्नीचा परस्पर संबंध आहे. एक औषधींत आणि दुसरा पाण्यांत रहातो. आकाशांत प्रकाशणारा देव स्वतःचा प्रकाश उदार दात्यांस देवो. [५०]

सर्व इतर पशु नग्न नाहींत, त्यांस ईश्वर निर्मित वस्त्र आहे. परंतु मनुष्यास पांघरण्यास वस्त्र हवें. असें कातडें मनुष्यास निसर्ग निर्मित प्राप्त झालें आहे. म्हणून सहकारानें वस्त्रें विणावींत आणि वापरावींत. हींच वस्त्रें तांदुळ वगैरे धान्यावर झांकण्यासाठीं ठेवा. [५१]

जो खेळांत असत्य बोलतो, जो सभेंत अथवा धनाच्या इच्छेनें खोटें बोलतो, त्याचे सर्व दोष दूर करा. समानता धारण करा. आणि असमानतेसाठीं समान वस्त्रेंच वापरा. [५२]

पावसाचा योग्य उपयोग करा, पाणी फुकट जाऊं नये. देवतांची उपासना करा. स्वतःस निर्मल करा. जगांत प्रसिद्ध व्हा, पुष्टिकारक पदार्थ जवळ बाळगा, या भूलोकांत मानवजातीची सेवा करा. [५३]

द्युलोकानें जीं अनेकरूपें धारण केलीं आहेत आणि त्यांपासून हें विश्व तयार केलें आहे, ज्ञानी इतर सर्वांस स्वतःप्रमाणें पहातो. मनुष्यानें तमोगुण दूर केला पाहिजे, सत्वगुण वाढवावा आणि रजोगुणाचा त्याग करावा. [५४]

प्राच्यै त्वा दिशेऽग्नयेऽधिपतयेऽसिताय रक्षित्र आदित्यायेषुमते ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ५५ ॥
दक्षिणायै त्वा दिश इन्द्रायाधिपतये तिरश्चिराजये रक्षित्रे यमायेषुमते ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ५६ ॥
प्रतीच्यै त्वा दिशे वरुणायाधिपतये पृदाकवे रक्षित्रेऽन्नायेषुमते ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ५७ ॥
उदीच्यै त्वा दिशे सोमायाधिपतये स्वजाय रक्षित्रेऽशन्या इषुमत्यै ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ५८ ॥
ध्रुवायै त्वा दिशे विष्णवेऽधिपतये कल्माषग्रीवाय रक्षित्र ओषधीभ्य इषुमतीभ्यः ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ५९ ॥
ऊर्ध्वायै त्वा दिशे बृहस्पतयेऽधिपतये श्वित्राय रक्षित्रे वर्षायेषुमते ।
एतं परि दद्मस्तं नो गोपायतास्माकमैतोः ।
दिष्टं नो अत्र जरसे नि नेषज्जरा मृत्यवे परि णो ददात्वथ पक्वेन सह सं भवेम ॥ ६० ॥

अर्थ-(प्राच्यै दिशे) पूर्व दिशेला (अग्नये अधिपतये) अग्नि अधिपति, (रक्षित्रे असिताय) रक्षणकर्ता असित (इषुमते आदित्याय) बाणयुक्त आदित्य, (दक्षिणायै दिशे०) दक्षिणदिशेला इन्द्र अधिपति, रक्षणकर्ता तिरश्चिराजी, यम बाणयुक्त (प्रतीच्यै दिशे०) पश्चिमदिशेस वरुण अधिपति, पृदाकू रक्षणकर्ता, अन्न बाणांनीं युक्त (उदीच्यै दिशे०) उत्तरदिशेस सोम अधिपति, स्वज रक्षणकर्ता, अशनि बाणयुक्त (ध्रुवायै दिशे०) ध्रुव दिशेला विष्णू अधिपति, कल्माषग्रीव रक्षणकर्ता, आणि औषधि बाणावली आहे. (ऊर्ध्वायै दिशे०) ऊर्ध्व दिशेस बृहस्पति अधिपति, श्वित्र रक्षक आणि पाऊस बाणयुक्त आहे त्यांच्यासाठीं (एतं परिदद्मः) आम्ही याचें दान करतों. (तं नः गोपायत) त्याचा स्वीकार करून आमचें रक्षण करा. (अस्माकं आ एतोः) आमच्या उन्नतीस सहाय्यक व्हा. (अत्र नः जरसे दिष्टं निनेषत्) येथें आमचें आयुष्य वृद्धापकाळपर्यंत लांबण्यास आम्हांस योग्यमार्गानें न्या. (जरा नः मृत्यवे परि ददातु) वृद्धावस्था आम्हांस मृत्युपर्यंत पोहोंचवो. (अथ पक्वेन सह सं भवेम) आणि परिपक्व फळासह आम्हीं पुनः उत्पन्न होऊं. [५५-६०]

भावार्थ— प्रत्येक दिशेस अधिपति, रक्षक आणि इषुमान् म्हणजे बाणांनीं युक्त योद्धा आहे. ते सर्वांचें रक्षण करोत. त्यांना आम्ही योग्य दान देऊं. ते आमचें पालन करून आमच्या उन्नति पावेतों आम्हांस पोहोंचवोत. ते आम्हांस वृद्धावस्थेपर्यंत सुरक्षित पोहोंचवोत, आणि तेथून मृत्युपर्यंत घेऊन जावोत. मृत्युनंतर परिपक्व कर्म फळासह आम्हीं पुनः जन्म घेऊं आणि तेथें उन्नति प्राप्त करूं. [५५-६०]

स्वर्ग आणि ओदन

स्वर्गाचें साम्राज्य

स्वर्गाचें साम्राज्य सर्व मानवजातीसाठीं खुलें आहे. तें प्राप्त करून तेथें पुष्कळ काळपर्यंत रहाणें प्रत्येकास योग्य होय. परंतु तो सत्कृत्याचा लोक असल्यानें तो सत्कर्में केल्यावांचून प्राप्त होत नाहीं, ही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवावी. हा स्वर्ग या भूमीवर आहे आणि परलोकांत सुद्धां आहे. परलोकांतील स्वर्ग प्राप्त करण्यासाठीं सुद्धां प्रयत्न करावे लागतात. यावरून स्पष्ट होईल कीं येथें अथवा परलोकांत स्वर्गसुख प्राप्त करणें मनुष्याच्या पुरुषार्थावर अवलंबून असतें. या सूक्ताचें तात्पर्य संक्षेपतः असें आहे. आतां क्रमशः या मंत्रांत जे मुख्य मुख्य उपदेश आहेत त्यांचें निरीक्षण करूं—

बळाचें महत्त्व

स्वर्ग प्राप्त करण्यांत बळाचें महत्त्व आहे. बळावांचून कोणतीहि उन्नति होऊं शकत नाहीं. तें बळ प्रत्येकानें प्राप्त केलें पाहिजे. मनुष्यांत जो जास्त सामर्थ्यसंपन्न आणि प्रभावशाली असतो त्यानें राष्ट्राचा अधिष्ठाता व्हावें; कोणी निर्बळ राज्यगादीवर न यावा; कारण कीं राष्ट्राची उन्नति प्रबळ राज्यशक्तिवर आधारलेली असते. राजा निर्बल असला तर संपूर्ण राज्य (राष्ट्र) निर्बल होतें. म्हणून सुखप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांनीं, कोणा शक्तिशाली पुरुषास राष्ट्राचा अधिष्ठाता म्हणून नियुक्त करावें. तोच अधिष्ठाता स्वतःच्या सुयोग्य सामर्थ्यशाली अनुयायांना एकत्रित करून त्यांच्या सहाय्यानें राष्ट्राचें शासन चालवील, सर्वांचें उत्तम नियंत्रण करील आणि सर्वांची उन्नति होण्यासाठीं योग्य आणि चांगली अशी व्यवस्था ठेवील. त्याचें नांव यमराज्य म्हणजे नियमानुसार चालणारें राज्य असें आहे. (मं. १)

याप्रकारचें राज्यशासन झाल्यानंतर स्वतः स्वतःची दृष्टि सूक्ष्म आणि परिशुद्ध केली पाहिजे. म्हणजे चांगलें ज्ञान प्राप्त करावें, वीर्य म्हणजे अनेक शक्ति मिळवाव्यात. स्वतःच्या राष्ट्रांत दूरदृष्टि आणि सामर्थ्य जितकें जास्त असेल तितका स्वतःचा उत्कर्ष व्हावयाचा आहे. म्हणून तेज, बल, सामर्थ्य, ज्ञान आणि दूरदृष्टि वाढविली पाहिजे. तें आपलें मुख्य कर्तव्य आहे. फळ परिपक्व झाल्यानंतरच त्यांत गोडी येते. म्हणून स्वतः स्वतःला परिपक्व करावें म्हणजे स्वतःचें कल्याण होईल. (मं. २)

एकतेचा संदेश

या लोकांत तुम्ही सर्व सहकारानें खेळीमेळीनें रहा. परमेश्वर उपासनासुद्धां मिळून करा. राज्यव्यवस्थासुद्धां एकमेकांच्या मदतीनें करा. जो कांहीं पराक्रम करावयाचा असेल तो सुद्धां सहकारानेंच होऊं शकेल. एकत्र अथवा संघानें कार्य करण्यामुळें बळ वाढतें. संगठन होण्यासाठीं निर्दोषिता आणि पवित्रता संपादन केली पाहिजे. जसजसें संगठन वाढतें तसें बळ वाढतें आणि जशी शक्ति वाढते तसा प्रभाव विशेष पडतो. अशा प्रकारचा हा ऐक्याचा संदेश मानवी उन्नतिसाठीं येथें सांगितला आहे. (मं. ३)

सर्व लोकांस असें सांगणें आहे कीं त्यांनीं स्वतःचें जीवन धन्य करण्याचा प्रयास करावा. हा प्रयत्न जितका सहकारानें होईल तितकें यश तुम्हांला प्राप्त होईल. आपसांत जर फाटाफूट मतभेद असतील तर तें नाशाचें बीज आहे. तुम्हांपैकीं प्रत्येकास अमृत प्राप्त करण्याचा अधिकार आहे. घरांत स्त्री, पुत्र आणि गृहपति यांचा सुमेळ असावा. येथें ऐक्याचा उपदेश प्राप्त होतो आणि येथेंच सुखाची प्राप्ति होऊं शकते. या गृहस्थाश्रमांत बापानें अन्न आणावयाचें, मातेनें तें शिजवावयाचें, पुत्रानें इतर घरांतील संसारोपयोगी कामें करावयाचीं. याप्रमाणें परस्पर सहकार्य असल्यानें सर्वांस जास्तींत जास्त सुख प्राप्त होऊं शकतें. याप्रमाणें विचार करून वाचकांनीं एकतेचा बोध प्राप्त करून त्याचें आचरण करून उन्नति साधावी. (मं. ४–५)

घरांत पुत्रपौत्र मोठे झाले आहेत, त्यांनीं संसाराचा कार्यभार संभाळला आहे, वृद्धांची योग्यप्रकारें सेवा करीत आहेत, तरुणांस वृद्धांप्रमाणेंच आश्रय मिळत आहे, ही परिस्थिति हाच या लोकींचा तेजस्वी स्वर्ग आहे. प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें तो प्राप्त केला पाहिजे. (मं. ६)

चारी दिशांस हालचाल

उन्नतिसाठीं चारी दिशांस हालचाल सुरू केली पाहिजे. पूर्व दिशा ज्ञानाची दिशा आहे. सर्व प्रकाश या दिशेकडून प्राप्त होतो. श्रद्धावान् लोक ज्ञान प्राप्त करून ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करतात. ज्याप्रमाणें सूर्य सर्वांसच प्रकाश देतो, त्याचा प्रकाश सर्वांसच मिळतो. ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या रक्षणासाठीं करण्यांत यावा. स्त्रीपुरुषांनीं संघानें कार्य करावें आणि सर्व लोक ज्ञानानें सुप्रकाशित होवोत. (मं. ७)

ज्ञान प्राप्त झाल्यानंतर दक्षतेनें उद्योग करावा. दक्षता नसली तर सर्व प्रयत्न निष्फळ होतील. हा संदेश दक्षिण दिशा देते. येथें यम म्हणजे नियामक देवता आहे. ती सांगते कीं, नियमांत रहा, नियम सोडून चालाल तर माझा दंड तयार आहे. त्यांतून कोणाची सुटका होणार नाहीं. या नियामकासह पितरसुद्धां आहेत.

ते सर्वांचे रक्षक आहेत. रक्षण करणें आणि नियमाविरुद्ध आचरण न करणें हा येथें उपदेश आहे. जो हा उपदेश ग्रहण करून त्या अनुसार वर्तेल तोच उन्नति प्राप्त करूं शकेल. (मं. ८)

पश्चिम दिशा विश्रामाची सूचक दिशा आहे. योग्य पुरुषार्थ केल्यानंतर विश्रांतीची जरूरी आहेच. त्यामुळें पुनः प्रयत्न करण्यास बल प्राप्त होतें. म्हणजे विश्रांति जास्त पुरुषार्थ करण्यासाठीं पाहिजे. येथें सोम वगैरे औषधि आहेत, त्यांचें सेवन केल्यानें बल, पुष्टि आणि आयुष्य वाढतें. (मं. ९)

उत्तरदिशा उच्चतर अवस्था प्राप्त करण्याची सूचना देत आहे. स्वतःच्या राष्ट्राची उच्चतर अवस्था करावी, राष्ट्रास श्रेष्ठ करावें, सर्वप्रकारें पुढें करावें, पांच प्रकारच्या लोकांचा समुदाय उन्नति प्राप्त करो, सर्वांगीण उन्नति व्हावयास हवी; ज्यामुळें कोणत्याहि एक बाबतींत मागसलेपणा राहून न जावा. हा उपदेश येथें प्राप्त होतो. (मं. १०)

ध्रुवदिशा स्थिरतेचा संदेश देते. स्वतःच्या शब्दावर स्थिर रहा. स्वतःची प्रतिज्ञा स्थिर ठेवा. युद्धांत स्वतःच्या स्थानीं स्थिर व्हा, व्यर्थ चंचल होऊं नका. स्वतःचें रक्षण करण्यासाठीं पुत्रांचें योग्यप्रकारें पालन पोषण करण्यासाठीं, अनेक शुभ कर्मे करण्यासाठीं स्थिर होण्याची सूचना या दिशेकडून मिळते.

अशाप्रकारें या सर्व दिशा मनुष्यांस जो उपदेश देतात तो ऐकून मनुष्यास उन्नतीचें साधन करण्याचा मार्ग विदित होतो. मनुष्यानें या मार्गानें जावें आणि स्वतःची उन्नति साधावी. (मं. ११)

उखळ आणि मुसळ

पुत्रांचें पालन योग्यरीतीनें करण्यांत यावें. पाणी आणि वायु सर्वत्र शुद्ध ठेवण्यांत यावा. सत्याविषयीं प्रीति आणि तपश्चर्येची आवड मनुष्यांत वाढावी आणि सर्वांस अन्नसुद्धां पुरत्या प्रमाणांत प्राप्त व्हावें. घरांत उखळ आणि मुसळ कोणीं पाण्यानें ओलें करूं नये, कारण कीं तें कोरडें राहिलें तरच चांगलें काम देऊं शकतें. तें पवित्रस्थानीं ठेवावें, आणि धान्य वगैरे साफ करून पुनः साफसूफ करून जागेवर ठेवावें. म्हणजे येथें वेदाची आज्ञा आहे कीं यंत्राच्या (Machine) वगैरे द्वारां साफ केलेलें अथवा दळलेलें धान्य उदा. तांदूळ पीठ वगैरे कोणीं खाऊं नयेत. परंतु घरोघर उखळ आणि मुसळ असावें आणि त्यांनीं साफ केलेले तांदूळ सर्वांनीं खावेत. याविषयीं सर्व वाचकांनीं विचार करावा. कारण कीं या कार्यासाठीं हल्लीं सर्वत्रच यंत्राचा वापर सुरू झाला आहे. यंत्रानें स्वच्छ करण्यामुळें धान्यांतील जीवनसत्वें नष्ट होतात, आणि हातानें स्वच्छ करण्यानें तीं सत्वें सुरक्षित रहातात. वेद उपदेशितो कीं यंत्रानें तयार केलेलें पीठ कोणीं खाऊं नये, आणि यंत्रानें स्वच्छ केलेले तांदुळसुद्धां वापरूं नयेत. त्यामुळें परिपूर्ण जीवनसत्वें प्राप्त होतील आणि उत्तम आरोग्य राहील. असा कोणी वैदिकधर्मी आहे काय जो वेदाच्या उपदेशाचें परिपालन करून कमींत कमी खाण्यापिण्यांत तरी वेदाच्या उपदेशाचें पालन करील ? (मं. १२-१४)

*

हें लाकडाचें उखळ मुसळ दैवीशक्तिशाली आहेत. तीं राक्षस आणि पिशाचांस आम्हांपासून दूर करतात, अशी त्या मुसळाची घोषणा आहे. जनतेनें तो घोष ऐकावा. जर घरोघर मनुष्यें उखळ मुसळानें स्वच्छ केलेलें धान्य वापरतील तर त्यांचेवर राक्षस आणि पिशाच यांचा म्हणजे रोगजंतूंचा हल्ला होणार नाहीं. (म्हणजे जे यंत्रानें साफ केलेलें धान्य अगर दळलेलें पीठ वापरतात त्यांचा नाश याच राक्षस आणि पिशाचांकडून होईल.) म्हणून लोकांनीं सावध रहावें. (मं. १५)

पशुपालन

घरोघरीं गाय वगैरे पशूंचें पालन व्हावें. घरोघरीं यज्ञयाग होत रहावेत. प्रत्येक घरांत देवतांचा संतोष होत रहावा. पाणी, वायु, वगैरे देवता कोणत्याहि घरावर अप्रसन्न न व्हाव्यात. कोठेंहि अप्रसन्नता उत्पन्न न व्हावी. (मं. १६)

गृहव्यवस्था

स्त्री, पुत्र आणि पुरुष (गृहपति) मिळून घर होतें. त्या सर्वांनीं घरांत एकविचारें रहावें. या एकतेविषयीं अथर्ववेद कां. ३ सू. ३० मध्यें जो उपदेश केला आहे, तो वाचकांनीं येथें पाहून पहावा. तो उपदेश उत्तम आहे आणि प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें नेहमीं ध्यानांत धारण करण्यालायक आहे. पुरुष ज्या स्त्रीचें पाणीग्रहण करतो त्या दोघांनीं परस्परांचे अनुकूल होऊन रहावें. आपापसांत क्लेश अथवा कंकास (कलह) होऊं देऊं नये. जर आपसांतील मतभेद वाढत असतील तर दुर्गति नाश दूर नाहींत. ही गोष्ट प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें ध्यानांत बाळगावी. घरांतील सर्व मनुष्यें आनंद प्रसन्न आणि खेळीमेळीनें वागणारी असावीत. आणि त्यांनीं प्रयत्नपूर्वक उन्नतीचें साधन करीत असावें. (मं. १७)

सर्वांनीं मिळून दक्षतेनें सर्व रोगांस दूर ठेवावें, अज्ञान आणि अंधःकार यांस दूर सारावें. घरांत अंधार नसावा. कारण कीं अंधारामुळें रोगजंतू वाढतात, आणि रोग निर्माण होतात. त्यामुळें घर बांधतांनाच त्यांत अंधार रहाणार नाहीं असें प्रकाशयुक्त बांधावें. घरोघरीं लाकडाचें केलेलें उखळ मुसळ असावें. त्यानें तांदूळ साफ करून घरच्या लोकांनीं सेवन करावेत. (मं. १८)

उखळ-मुसळानें स्वच्छ केलेल्या धान्यांतून, तूस, कोंडा दूर

करण्यासाठीं घरांत सूप असलें पाहिजे. सुपानें तांदूळ साफ-स्वच्छ करून, तूस–कोंडा दूर करून मगच गृहस्थानें त्या तांदुळांचें सेवन करावें. (मं. १९)

ज्यामुळें तीनहि लोकांत आनंद आणि स्वास्थ्य प्राप्त होतें असें स्वच्छ तांदूळ याप्रकारें शुद्ध करण्यांत येतात. (यंत्र-मशीन-च्या सहाय्यानें स्वच्छ केलेले तांदूळ तर राक्षस आणि पिशाच म्हणजे रोगजंतूंना बोलाविणारे असतात.) जे तांदूळ उखळ–मुसळ–सूप यांनीं स्वच्छ करण्यांत येतात तें आप्यायन म्हणजे सर्वप्रकारची पुष्टि देणारे असतात. (मं. २०)

सुपांत पुनः पुनः घेऊन धान्य स्वच्छ करावयास हवें: तांदुळा-वर जें लाल रंगाचें आवरण असतें तें मुसळानें कांडून दूर केलें पाहिजे. ज्याप्रमाणें धोबी दगडावर कपडे आपटून धुतो आणि स्वच्छ करतो, त्याप्रमाणें मुसळानें तांदूळ स्वच्छ करावेत. त्या तांदुळांचें सेवन गृहस्थानें करावें. पशूंचे विविध रंग असतात पण एकच प्रकारचें गवत खाऊन ते पुष्ट होतात त्याप्रमाणें विविध रंगारूपाच्या मनुष्यांनीं अशा तांदुळांचे सेवन करून हृष्टपुष्ट आणि दीर्घायु व्हावें. (मं. २१)

शिजविण्याचें कार्य

आतां शिजविण्याविषयीं विचार आहे. त्यासाठीं निरनिराळया प्रकारचीं भांडीं असतात. ही भांडीं मातीची निरनिराळ्या आका-राचीं तयार करण्यांत येतात. तीं फुटकीं मोडकीं अथवा गळकी नसावींत. कुठें जर फुटकें असलें तर ते छिद्र समजून घेऊन बंद केलें पाहिजे. ज्याप्रमाणें माता पुत्राचा संभाळ मोठ्या काळजी-पूर्वक करते त्याप्रमाणें भांडीं मोठ्या काळजीपूर्वक संभाळलीं पाहिजेत. तीं अशाप्रकारें वापरावींत कीं जेणेंकरून तुटणार नाहींत. तपेलीं, पातेलीं, हंडे, पळ्या, कढई वगैरे भांडीं चुलीवर संभाळपूर्वक ठेवण्यांत यावींत. त्यांत पळी, चमचा ठेवण्यांत यावा. आणि तीं पात्रें तुपानें सारवलेली असावीत. (मं. २२-२३)

या पात्रांचें रक्षण चारी बाजूंनीं करावें. अग्निमुळें रक्षण होतें म्हणजे भांडें चांगलें भाजलेलें असावें. वरुणदेवतेच्या पाण्यापासून त्याचें रक्षण व्हावें म्हणजे पाणी त्यांतून पाझरूं नये. गळूं नये. वनस्पतींमुळें फुटण्याचें भय नसावें. (मं. २४)

पाण्याचें महत्त्व

पृथ्वीवरील पाण्याची वाफ होऊन मेघमंडलांत आकाशांत एकत्र होते. त्यास मेघ म्हणतात. त्यांतून पाऊस पुनः पृथ्वीवर पडतो. हें पाणी प्राणीमात्रांस जीवन देणारें आणि जीवन धन्य करणारें आहे. तें पात्रांत भरून ठेवावें आणि शिजवावयाचें वेळीं चुलीवर चढवावें. हें परिशुद्ध जल मनुष्यास सुखकारक असतें–होतें. (मं. २५-२६)

हें जल मनुष्यास शक्ति देतें, प्रसन्नता निर्माण करतें, वीर्य निर्माण करतें, पवित्रता आणि आरोग्य अर्पण करते, मृत्युदूतास दूर सारतें. हेंच पाणी गृहस्थास अन्न शिजविण्यास उत्तम होय. म्हणून त्यांनीं तें वापरावें. (मं. २७)

पाणी पावसाच्या रूपानें भूमिवर औषधि वनस्पतींमध्यें जाऊन त्याचा गुणवर्धक औषधिरस तयार होतो. तो मनुष्यांस हितकारक असतो. त्याशिवाय दुसरें इतर पुष्कळ पाणी मेघांतून वर्षतें तें सर्व जगभर व्यापून आहे. (मं. २८)

जेव्हां पाणी भांड्यांत ठेवून तापविण्यांत येते, तेव्हां पाण्याचा एक अणु दुसऱ्यावर उसळतो, आणि जणूंकाय ते दोघे लढत आहेत असें दिसतें, अथवा गप्पा मारीत आहेत अथवा वादविवाद करतांना भांडत आहेत असें वाटतें. ज्याप्रमाणें स्त्री पतीस पाहून मोठ्या प्रेमानें त्याला भेटूं इच्छिते, त्याप्रमाणें पाणी, तांदूळ शिजतांना त्यांशीं मिळून जातें. त्यामुळें तांदूळ शिजतात. (मं. २९)

शिजवतांना मध्यें पळी टाकून वरचे तांदूळ खालीं, खालचे वर करावयास हवेत. म्हणजे तांदूळ उत्तमप्रकारें शिजतात. अशाप्रकारें तांदूळ हलवल्यानें, तांदुळाच्या प्रत्येक दाण्यास पाणी लागून तें त्यांत मुरतें आणि तांदूळ चांगले शिजतात. (मं. ३०)

भाजीपाला

ज्याप्रमाणें तांदूळ शिजवावयाचे असतात त्याचप्रमाणें भाजी-पाला शिजविण्याची सुद्धा एक विशिष्ट पद्धत आहे. उत्तम फरशी (कुऱ्हाडी)नें, सुरी, विळी वगैरेनीं भाजी बारीक चिरून घ्यावी. त्यास धार चांगली तीक्ष्ण असावी. नसल्यास धार चांगली तीक्ष्ण करावी. भाजी अशा प्रकारें चिरावी कीं तिचें (भाजीपाल्याचें) सत्त्व बिघडूं नये. औषधीची हिंसा होऊं नये. आणि त्यामुळें त्यांचा आमच्यावर क्रोध न व्हावा. (मं. ३१)

शिजल्यानंतर

भात शिजल्यानंतर तो भांड्यांतून काढून घ्यावा. तो ठेवण्यास नवी चटई (वेळूची कळकाची तयार केलेली) शुद्ध, स्वच्छ केलेली पवित्र जमिनीवर पसरावी आणि त्यावर भांड्यांतून काढून शिजलेले तांदूळ पसरावेत. त्यांची रास अशी करावी कीं ती रचना पहातांच तें दृश्य डोळ्यांस रमणीय आनंददायक, मनोहर वाटावें. देवता तेथें स्वतःच्या धर्मपत्नीसह येऊन त्या अन्नाचें सेवन करोत. (मं. ३२)

अशा प्रकारचा यज्ञ केल्यानें यजमानास स्वर्ग प्राप्त होतो. साठ वर्षेपर्यंत जर कोणी गृहस्थ असा यज्ञ करील तर त्यास स्वर्ग प्राप्त होईल. घरांत माता, पिता, पुत्र वगैरे सर्व संतुष्ट रहातील तरच तो भूलोकाचा स्वर्ग होऊन राहील. आणि अन्नदानानें परलोकांतील स्वर्ग प्राप्त होईल. (मं. ३३-३५)

सर्व सुखें विजय प्राप्त झाला असतां प्राप्त होतात. विजयाशिवाय भोग मिळणार नाहीं, ही एक मोठी महत्त्वाची सूचना उन्नतिसाठीं येथें दिली आहे. शुद्ध अन्न, उत्तम तूप, मध वगैरे पदार्थ हितकारक, पुष्टिकारक आणि बलवर्धक आहेत. त्यांचे सेवन स्वतः करावें आणि दुसऱ्यांस द्यावें तसेंच देवतांस उद्देशून त्याचें समर्पण करण्यांत यावें. या लोकांत म्हणजे पृथ्वीवर स्वतःच्या पुरुषार्थानें जें कांहीं व्हावयाचें तें होईल. म्हणून हा लोक पुरुषार्थप्रधान आहे. जो पुरुषार्थ करतो, त्यास सर्व देवतांचे सहाय्य मिळतें. (मं. ३६-३८)

कुटुंबांत ऐक्य

स्त्री घरांत कांहीं काम करते, पुरुषसुद्धां आपल्या कामधंद्यास लागलेला असतो, युवक स्वतःचीं कार्यें करतो. हे सर्व जें कांहीं करतात, तें कुटुंबाच्या रक्षणासाठीं आणि उन्नतिसाठीं असतें. संघटनेनें घरांत स्वर्गसुख प्राप्त होऊं शकते. त्यामुळें जेवणाचे वेळीं घरांतील सर्व मुलेंमुली आणि कौटुंबिक जन यांस बोलवावें आणि सर्वांनीं एकत्र मिळून बसून भोजन करावें. त्यामुळें सर्व मुलाबेकरांस ऐक्याचा बोधपाठ मिळतो, आणि या ऐक्यांतच सर्वांच्या सुखाचीं बीजें आहेत. (मं. ३९-४०)

तूप, मधानें मिश्रित अन्न असावें. धनाचा प्रभाव चालता राहो. आयुष्याच्या साठ वर्षापर्यंत त्याचें दान होत राहो. सर्व वस्तु सर्वत्र भरपूर असाव्यात. केव्हांहि कोणत्याहि प्रकारची न्यूनता नसावी. हेंच स्वर्गदायक आहे. इतर लोक ज्या प्रमाणांत कंजूस असतील, तितक्या प्रमाणांत त्यांना आनंद प्राप्त होईल. हा आनंद वर वर्णन केलेल्या दात्यास उत्तम रीतीनें भरपूर प्राप्त होईल. (मं. ४१-४२)

देवाची निंदा करणाऱ्यांस दूर ठेवा

कित्येक मनुष्यें देवतांची निंदा करणारीं असतात त्यांस समाजांतून बहिष्कृत केलें पाहिजे. त्यांना कोणत्याहि अधिकाराचें जागेवर नेमूं नये. जे देवांना अनुकूल होऊन वर्ततात अशांच्या हस्तें सर्व राज्यकारभार चालावा. देवद्रोहीयांस सर्वांनीं एकत्र मिळून समाजबहिष्कृत करावें. जे ज्ञानी, शूर या कार्यांत मदतरूप होतील त्यांस, मध, तूप तसेंच अन्न भरपूर मिळालें पाहिजे, म्हणजे देण्यांत यावें. (मं. ४३-४४)

परमेष्ठि प्रजापति

परमेष्ठि प्रजापति परम उच्च स्थानांत विराजलेला आहे. म्हणून त्यास (**परमे-स्थि**) परमेष्ठि म्हणतात. त्याला प्राप्त करण्यासाठीं सर्व धर्म कार्यें करण्यांत येतात. आपण जें दान करतों ते भलें तुपाचे असो, अन्नाचे असो, किंवा मधाचे असो, तें सर्व या एकच कार्याकरितां असतें. सत्य आणि तप मुख्यतः त्याच्या प्राप्तीसाठीं आहेत. सत्याचें अवलंबन केल्यानें मोठें फळ प्राप्त होतें. तप उत्तम आणि सर्वप्रकारें पवित्रता करणारें असतें. हेंच सत्य आणि तप महान् आध्यात्मिक ऐश्वर्य आणि ऐहिक धन देणारें असतें. चुकून सुद्धां असत्याचरण न व्हावें, सत्यापलाप न व्हावा, याविषयीं मनुष्यानें सभेंत, समाजांत जागरूक राहिलें पाहिजे. नेहमीं सत्याचाच अवलंब केला पाहिजे. जो सत्य आणि तपाचा त्याग करतो त्याची उन्नति कदापि होत नाहीं. प्रत्येक जण कार्य करतो त्यांत उन्नति इच्छितो. त्यामुळें सत्य आणि तपाचें अवलंबन करणें अनिवार्य होतें. (मं. ४५-४६)

आदर्श गृहस्थाश्रम

' मी अन्न शिजवतों. मी दान करतों, माझी धर्मपत्नी धर्मकार्यांत सहाय्य करते, माझे पुत्र जनहिताचें कार्य करीत आहेत, मी दीर्घायुष्य प्राप्त करून त्याचा उपयोग धर्मकार्य करण्यांत करीन, असें बोलण्याचें-सांगण्याचें भाग्य प्रत्येक गृहस्थास प्राप्त व्हावें, हेंच एक मोठें ऐश्वर्य आहे. ज्याचें कुटुंब असें असेल तो धन्य होय. त्याचप्रमाणें आमच्या घरांत पाप करणारा कोणी न राहो. दान देते वेळीं, त्यांतून कांहीं शिल्लक रहाण्याची इच्छा करणारा कृपण कोणी नसावा, सर्वत्र मित्र वाढत रहावेत. दानासाठीं पात्रें सर्वदा भरपूर आणि तयार असावींत, आणि सर्व शुभ कर्मांचें परिपक्व फळ, अशा गृहस्थास प्राप्त होत रहावें. हा आदर्श गृहस्थाश्रम आहे. गृहस्थानें मित्रांचें प्रिय करावें, नेहमीं प्रयत्न करीत रहावें, गाईचें दूध प्यावें, बैलाचा उपयोग शेतीसाठीं करीत असावें, रोग आणि मृत्यु दूर व्हावेत. (मं. ४७-४९)

परस्परांचे हृदय ओळखलें पाहिजे. मित्रत्वासाठीं त्याची खास जरूरी आहे. हृदयाच्या ज्ञानावांचून संगठन सुद्धां होऊं शकणार नाहीं. पृथिव्यादि ज्या देवता आहेत, त्या सर्व योग्य मनुष्यास सुवर्ण आणि तेज देण्यास तयार आहेत. परंतु तें त्यांचे जवळून मिळविण्याचा प्रयत्न तर व्हावयास-करावयास हवा. स्वतःमध्यें क्षात्रतेज वाढवावें आणि त्यापासून स्वतःचें रक्षण करावें. हें आत्मरक्षणाचें कार्य तर प्रत्येकाचें आहे. म्हणून कोणीहि या क्षात्रतेजावांचून असूं नये. सर्व लोकांनीं तेजस्वी व्हावें. (मं. ५०-५१)

जर कोण्या कार्यासाठीं असत्य बोलावें लागणार असलें, तर ते सर्व पाप हेतूनें असतें, मग तें असत्य भाषण खेळात असो कीं धन लोभानें असो. सर्वांचें उन्नतीचा एकच तंतू आहे आणि तो केवळ एक मात्र सत्यच आहे. सत्यावांचून कोणाची उन्नति होणारच नाहीं. (मं. ५२)

जो पाऊस पडतो त्याचा चांगला उपयोग करा, म्हणजे निसर्गानें दिलेलें पाणी फुकट घालवूं नका. सर्व पदार्थ स्वच्छ ठेवावेत, कोणत्याहि स्थानीं मलिनता नसावी, स्वतःचा प्रभाव सर्व बाजूस प्रसरावा, तूप वगैरे पदार्थ भरपूर असावेत, अन्न वगैरे कमी असूं नये. (मं. ५३)

सर्व विश्व या स्वर्गधामाच्या निरनिराळया तत्त्वांपासून बनलें आहे. या विश्वांत सत्त्व, रज आणि तम हे गुण आहेत. त्यांची तेजस्विता, लाली आणि मलीनता, हीं अनुक्रमें प्रख्यात चिन्हें आहेत. मलीनता दूर केली पाहिजे आणि तेजस्विता प्राप्त केली पाहिजे. रजोगुणाचें दान केलें पाहिजे, हा उन्नतीचा सामान्य नियम आहे. (मं. ५४)

प्रत्येक दिशेस अधिपति रक्षणकर्ता, शस्त्रास्त्रधारी सैनिक ठेऊन स्वतःच्या राष्ट्राचें रक्षण केलें पाहिजे. हें रक्षण करणाऱ्या आणि राष्ट्र सुरक्षित ठेवणाऱ्यांची उपजीविका उत्तमरीतीनें चालावी यासाठीं त्यांस उत्तम दान द्यावें. त्यांच्या रक्षणाखालीं सुरक्षित झालेले लोक वृद्धावस्थेपर्यंत स्वतःच्या उन्नतीचें कार्य करीत राहोत. याप्रकारें वागल्यानें पृथ्वीवरच स्वर्गधाम प्राप्त होतें आणि मृत्युनंतर स्वर्गलोक सुद्धां प्राप्त होतो. (मं. ५५-६०)

येथ पावेतों या सूक्ताचा सरळ आशय स्पष्ट भाषेंत दिला आहे. त्यामुळें मंत्रांचा हृद्गतमात्र वाचकांस समजूं शकेल. या सूक्तांत वेदानें या भूलोकासच स्वर्गधाम बनविण्याचा विधि सांगितला आहे. जे लोक त्याप्रमाणें वर्ततील, तेच फक्त या संसारांत-आयुष्यांत स्वर्गसुख प्राप्त करतील, एवढेंच नव्हे तर मरणोत्तर मिळणारा स्वर्गलोक सुद्धां नक्की मिळवतील. आणि तेथें पुष्कळ कालपर्यंत तें अपूर्व सुख भोगवतील. त्यानंतर उत्तम कुळांत पुनः जन्म घेऊनसुद्धां आस्त उन्नति करीत रहातील.

हा उपदेश वैदिकधर्मीयांच्या आचारांत यावा आणि सर्व संसाराचें स्वर्गधाम व्हावें अशी आशा आहे.

विराट् अन्न

कांड ११, सूक्त ३

(ऋषिः - अथर्वा । देवता - ओदनः ।)

तस्यौ॒दनस्य॒ बृह॒स्पति॒ः शिरो॒ ब्रह्म॒ मुखम् ॥ १ ॥
द्यावा॑पृथि॒वी श्रोत्रे॒ सूर्याचन्द्रम॒सावक्षिणी सप्तऋ॒षयः प्राणापा॒नाः ॥ २ ॥
चक्षुर्मुसलं॒ काम॑ उ॒लूखलम् ॥ ३ ॥
दिति॒ः शूर्प॒मदितिः शूर्पग्रा॒ही वातोऽपाविनक् ॥ ४ ॥

अर्थ— (तस्य ओदनस्य बृहस्पतिः शिरः) त्या अन्नाचें बृहस्पति शिर आहे. (ब्रह्म मुखं) ब्राह्मण मुख आहे. [१]

(द्यावापृथिवी श्रोत्रे) द्यु आणि पृथ्वी कान आहेत. (सूर्याचन्द्रमसौ अक्षिणी) सूर्य आणि चंद्र हे डोळे (दृष्टि) आहेत. (सप्तऋषयः प्राणापानाः) सप्तऋषि प्राण आणि अपान आहेत. [२]

(मुसलं चक्षुः, उलूखलं कामः) मुसळ डोळे आणि काम उखळ आहे. [३]

(दितिः शूर्पं) विभाग सूप आहे, (अदितिः शूर्पग्राही) अविभक्तता सूप धरणारी आहे. (वातः अपाविनक्) वारा, कणी-कोंडा-तूस वगैरे दूर करणारा आहे. [४]

अश्वाः कणा गावस्तण्डुला मशकास्तुषाः ॥ ५ ॥
कब्रु फलीकरणाः शरोऽभ्रम् ॥ ६ ॥
श्याममयोऽस्य मांसानि लोहितमस्य लोहितम् ॥ ७ ॥
त्रपु भस्म हरितं वर्णः पुष्करमस्य गन्धः ॥ ८ ॥
खलः पात्रं स्फ्यावंसावीषे अनूक्ये ॥ ९ ॥
आन्त्राणि जत्रवो गुदा वरत्राः ॥ १० ॥
इयमेव पृथिवी कुम्भी भवति राध्यमानस्यौदनस्य द्यौरपिधानम् ॥ ११ ॥
सीताः पर्शवः सिकता ऊबध्यम् ॥ १२ ॥
ऋतं हस्तावनेजनं कुल्योपसेचनम् ॥ १३ ॥
ऋचा कुम्भ्यधिहितार्त्विज्येन प्रेषिता ॥ १४ ॥
ब्रह्मणा परिगृहीता साम्ना पर्यूढा ॥ १५ ॥
बृहदायवनं रथन्तरं दर्विः ॥ १६ ॥
ऋतवः पक्तार आर्तवाः समिन्धते ॥ १७ ॥

अर्थ- (कणाः अश्वाः) अन्नाचें कण घोडे आहेत, (तण्डुलाः गावः) तांदूळ गाई आहेत (तुषाः मशकाः) भूसा-तूस मशक-मच्छरें आहेत. [५]

(फलीकरणाः कब्रु) तुकडे हें दृश्य आहे. (अभ्रं शरः) वाढळें वरची साल आहे. [६]

(श्यामं अयः अस्य मांसानि) काळें लोखंड मांस आहे, (लोहितं अस्य लोहितं) लाल लोखंड त्याचें रक्त आहे. [७]

(त्रपुः भस्म) टीन-कथील त्याचें भस्म आहे. (हरितं वर्णः) हिरवा त्याचा रंग आहे. (पुष्करं अस्य गन्धः) पुष्कर त्याचा वास आहे. [८]

(खलः पात्रं) खळ त्याचें पात्र आहे, (स्फ्या अंसौ) बंने स्फ्य नांवाचीं यज्ञसाधनें त्याचे खांदे आहेत. (ईषे अनूक्ये) ईषा नांवाचें साधन त्याच्या गुडघ्या खालच्या पायाचें हाड आहे. [९]

(जत्रवः आन्त्राणिः) दोऱ्या आंतडी आहेत, आणि (वरत्राः गुदा) बैल जोडण्याचें चामडें गुदा आहे. [१०]

(राध्यमानस्य ओदनस्य) शिजविण्यांत येणाऱ्या तांदुळासाठीं (इयं एव पृथिवी कुंभी भवति) हीच पृथ्वी डेगची (हांडा-मोठें तपेला अथवा डेरा) होते आणि (द्यौः अपिधानं) द्युलोक झांकण आहे. [११]

(सिताः पर्शवः) नांगर फासळ्या आहे. आणि (सिकताः ऊबध्यं) रेत मलस्थान आहे. [१२]

(ऋतं हस्तावनेजनं) सत्य हेंच हात धुण्याचें पाणी आहे. (कुल्या उपसेचनम्) कालवे सिंचन करण्यासाठीं पाणी आहे. [१३]

(ऋचा कुम्भी अधिहिता) ऋग्वेद मंत्रद्वारां डेगची ठेवली आहे. (आर्त्विज्येन प्रेषिता) यजुर्वेदानें हलविण्यांत आली आहे. [१४]

(ब्रह्मणा परिगृहिता) अथर्ववेदानें पकडली आहे आणि (साम्ना पर्यूढा) सामवेदानें झांकलेली आहे. [१५]

(बृहत् आयवनं रथंतरं दर्विः) बृहत्साम मिळवणारा आणि रथंतर साम पळी आहे. [१६]

(ऋतवः पक्तारः, आर्तवाः समिंधते) ऋतु रांधणारे आणि ऋतूचे दिवस अग्नि चेतवणारे आहेत. [१७]

चरुं पञ्चबिलमुखं घर्मो३भीन्धे ॥ १८ ॥
ओदनेन यज्ञवचः सर्वे लोकाः समाप्याः ॥ १९ ॥
यस्मिन्त्समुद्रो द्यौर्भूमिस्त्रयोऽवरपरं श्रिताः ॥ २० ॥
यस्य देवा अकल्पन्तोच्छिष्टे षडशीतयः ॥ २१ ॥
तं त्वौदनस्य पृच्छामि यो अस्य महिमा महान् ॥ २२ ॥
स य ओदनस्य महिमानं विद्यात् ॥ २३ ॥
नाल्प इति ब्रूयान्नानुपसेचन इति नेदं च किं चेति ॥ २४ ॥
यावद्दाताभिमनस्येत तन्नाति वदेत् ॥ २५ ॥
ब्रह्मवादिनो वदन्ति पराञ्चमोदनं प्राशी३ः प्रत्यञ्चा३मिति ॥ २६ ॥
त्वमोदनं प्राशी३स्त्वामोदना३ इति ॥ २७ ॥
पराञ्चं चैनं प्राशीः प्राणास्त्वा हास्यन्तीत्येनमाह ॥ २८ ॥
प्रत्यञ्चं चैनं प्राशीरपानास्त्वा हास्यन्तीत्येनमाह ॥ २९ ॥
नैवाहमोदनं न मामोदनः ॥ ३० ॥
ओदन एवौदनं प्राशीत् ॥ ३१ ॥

अर्थ— (पंचबिलं उखं चरुं घर्मः अभीन्धे) पांच तोंडाच्या हंड्यांत रहाणारे तांदूळ उष्णता उकळते. [१८]

या (ओदनेन यज्ञवचः सर्वे लोकाः समाप्याः) अन्नानें यज्ञद्वारा मिळणारे सर्व लोक प्राप्त होतात. [१९]

(यस्मिन् समुद्रः द्यौः भूमिः त्रयः) ज्यांत समुद्र, द्यु आणि भूमि हे तिघे (अवरपरं श्रिताः) वरखालीं आश्रित झाले आहेत. [२०]

(यस्य उच्छिष्टे षट् अशीतयः देवाः) ज्याच्या शेष भागांत सहा गुणिले ऐंशी देव (अकल्पयन्त) समर्थ शक्तिशाली झाले आहेत. [२१]

(त्वा ओदनस्य तं पृच्छामि) तुला मीं त्या अन्नाचा तो महिमा विचारतों. (यः अस्य महान् महिमा) जें त्याचें मोठें महात्म्य आहे. [२२]

(सः यः ओदनस्य महिमानं विद्यात्) तो जो या अन्नाचें महात्म्य जाणतो. [२३]

त्यानें (अल्प इति न ब्रूयात्) थोडें आहे असें म्हणूं नये. (अनुपसेचन इति न) पाण्याचा अभाव आहे असेंहि म्हणूं नये. (इदं च किं इति न) हें काय आहे असें सुद्धां म्हणूं नये. [२४]

(यावत् दाता अभिमनस्येत तत् न अतिवदेत्) दात्याची जेवढी (दान करण्याची) इच्छा असेल तिला कमी म्हणूं नये. [२५]

(ब्रह्मवादिनः वदन्ति) ब्रह्मज्ञानी लोक म्हणतात कीं, (पराञ्चं ओदनं प्राशी· प्रत्यंचां इति) दूरचे तांदूळ तुम्हीं खाल्ले कीं जवळचे खाल्ले ? [२६]

(त्वं ओदनं प्राशीः, त्वां ओदनः इति) तूं अन्न खाल्लेंस कीं अन्नानें तुला खाल्लें ? [२७]

(पराञ्चं ओदनं प्राशीः) जर तूं वरचें अन्न खाल्लें असलें तर (त्वा प्राणाः हास्यन्ति इति एनं आह) तुला प्राण सोडून जातील असें त्याला म्हणतात. [२८]

(प्रत्यञ्चं च एनं प्राशीः) जर समोरचें (अन्न) खाल्लें असलें तर (अपानाः त्वा हास्यन्ति इति एनं आह) अपान तुला सोडून जाईल असें याला म्हणतात. [२९]

(न एव अहं ओदनं) मीं अन्न खाल्लें नाहीं आणि (नः मां ओदनः) अन्नानें मला खाल्लें नाहीं. [३०]

परंतु (ओदनः एव ओदनं प्राशीत्) अन्नानेंच अन्नाला खाल्लें. [३१]

[२]

ततश्चैनमन्येन शीर्ष्णा प्राशीर्येन चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
ज्येष्ठतस्ते प्रजा मरिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
बृहस्पतिना शीर्ष्णा । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३२ ॥
ततश्चैनमन्याभ्यां श्रोत्राभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
बधिरो भविष्यसीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
द्यावापृथिवीभ्यां श्रोत्राभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३३ ॥
ततश्चैनमन्याभ्यामक्षीभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
अन्धो भविष्यसीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
सूर्याचन्द्रमसाभ्यामक्षीभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३४ ॥

अर्थ— (ततः च एनं अन्येन शीर्ष्णा प्राशीः) नंतर त्याचें तूं अन्य शिरानें प्राशन करशील, (येन च पूर्वे ऋषयः प्राश्नन्) ज्यानें पूर्वी ऋषींनीं प्राशन केलें होतें, त्यानें जर तूं प्राशन करणार नाहीस, तर (ज्येष्ठतः ते प्रजा मरिष्यति इति एनं आह) मोठ्यापासून सुरवात करून तुझी संतति मरून जाईल असें याला म्हणतात. (तं वा अहं न अर्वाञ्चं न पराञ्चं) मीं त्याचें खालून, वरून अथवा पलीकडून प्राशन केलें नाहीं. मीं (बृहस्पतिना शीर्ष्णा) बृहस्पतीस मुख्य करून (तेन एनं प्राशिषं) त्यानें या अन्नाचें प्राशन केलें. (तेन एनं अजीगमं) त्याच्या सहाय्यानें याला प्राप्त केलें. त्यामुळें (एषः ओदनः सर्वांगः वै) हें अन्न परिपूर्ण आहे. (सर्वपरुः सर्वतनूः) सर्व अंग आणि अवयवांनीं युक्त आहे. याप्रकारें (यः एवं वेद सर्वांगः सर्वपरुः सर्वतनूः भवति) हें जो जाणतो तो सर्वांग, सर्व इंद्रियें आणि सर्व अवयवांनीं युक्त होतो. [३२]

(याभ्यां च एतं पूर्वे ऋषयः प्राश्नन्). ज्या कानानें याचें पूर्वी ऋषींनीं प्राशन केलें होतें त्यानें (अन्याभ्यां श्रोत्राभ्यां ततः एनं प्राशीः) निराळ्या दुसऱ्या कानानें प्राशन करशील तर (बधिरो भविष्यसि इति एनं आह) तूं बहिरा होशील असें यास म्हणतात. (तं वा०... द्यावापृथिवीभ्यां श्रोत्राभ्यां) त्याला मीं... द्युलोक आणि पृथ्वी लोकाच्या कानांनीं (ताभ्यां एतं प्राशिषं) प्राशन केलें (ताभ्यां एवं अजीगमं) त्यामुळें त्याला मिळविलें. [३३]

(याभ्यां च एतं पूर्वे ऋषयः प्राश्नन्) ज्या डोळ्यानें याचें पूर्वी ऋषींनीं प्राशन केलें होतें त्यानें (ततः च एनं अन्याभ्यां अक्षिभ्यां प्राशीः) जर तूं दुसऱ्या डोळ्यानें याचें सेवन करशील तर तूं (अंधः भविष्यासि इति एनं आह) आंधळा होशील असें याला सांगितलें. (तं वा०... सूर्याचंद्रमसाभ्यां अक्षिभ्यां ताभ्यां एनं०...) त्याचें मीं चंद्र सूर्य रूपी डोळ्यांनीं प्राशन केलें. [३४]

ततश्चैनमन्येन मुखेन प्राशीर्येन चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
मुखतस्ते प्रजा मरिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
ब्रह्मणा मुखेन । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३५ ॥
ततश्चैनमन्यया जिह्वया प्राशीर्यया चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
जिह्वा ते मरिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
अग्नेर्जिह्वया । तयैनं प्राशिषं तयैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३६ ॥
ततश्चैनमन्यैर्दन्तैः प्राशीर्यैश्चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
दन्तास्ते शत्स्यन्तीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
ऋतुभिर्दन्तैः । तैरेनं प्राशिषं तैरेनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३७ ॥
ततश्चैनमन्यैः प्राणापानैः प्राशीर्यैश्चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
प्राणापानास्त्वा हास्यन्तीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
सप्तर्षिभिः प्राणापानैः । तैरेनं प्राशिषं तैरेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३८ ॥

अर्थ— (येन च एतं पूर्वे ऋषयः प्राश्नन्) ज्या (मुखा) नें याचें पूर्वी ऋषीनीं प्राशन केलें होतें त्या शिवाय दुसऱ्या (ततः च एनं अन्येन मुखेन प्राशीः) मुखानें याचें प्राशन करशील तर (मुखतः ते प्रजा मरिष्यति इति एनं आह) मुखानें तुझी संतति मरेल असें याला सांग. (तं वा० ब्रह्मणा मुखेन तेन एनं प्राशिषं तेन अजीगमं) त्याचें... मीं ज्ञानाच्या मुखानें सेवन केलें आणि त्याच्या सहाय्यानें यास प्राप्त केलें. [३५]

(यया एतं पूर्वे ऋषयः प्राश्नन्) ज्या (जिह्वेनें) पूर्वी ज्ञान्यांनीं तें प्राशन केलें होतें त्या शिवाय इतर (ततः एनं अन्यया जिह्वया प्राशीः) दुसऱ्या जीभेनें तूं जर याचें सेवन करशील तर (जिह्वा ते मरिष्यति इति एनं आह) तुझी जीभ मरेल असें त्याला सांग. (तं वा०... अग्ने जिह्वया प्राशिषं०) त्याचें मीं अग्निच्या जिह्वेनें प्राशन केलें. [३६]

ज्या (दाता) नीं पूर्वी ऋषीनीं यास प्राशन केलें त्या व्यतिरिक्त निराळ्या (ततः च एनं अन्यैः दन्तैः प्राशीः) दुसऱ्या दातांनीं याचें तूं प्राशन करशील तर (दन्ताः ते शत्स्यन्ति इति०) तुझे दांत तुटतील असें याला सांग. (तं... ऋतुभिः दन्तैः०) त्याचें मीं ऋतुरूपीं दातांनीं प्राशन केलें. [३७]

ज्यानीं पूर्वी ऋषीनीं याचें सेवन केलें होतें त्याशिवाय निराळ्या (अन्यैः प्राणापानैः प्राशीः) दुसऱ्या प्राण आणि अपानानें जर तूं याचें सेवन करशील तर तुझे प्राण आणि अपान तुला सोडून जातील, असें त्याला सांगा. यास मीं (सप्तर्षिभिः प्राणापानैः०) सप्त ऋषिरूपीं प्राण आणि अपानानें प्राशन केलें. [३८]

ततश्चैनमन्येन व्यचसा प्राशीर्येनं चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
राजयक्ष्मस्त्वा हनिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
अन्तरिक्षेण व्यचसा । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ३९ ॥
ततश्चैनमन्येन पृष्ठेन प्राशीर्येनं चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
विद्युत्त्वा हनिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
दिवा पृष्ठेन । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४० ॥
ततश्चैनमन्येनोरसा प्राशीर्येनं चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
कृष्या न रात्स्यसीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
पृथिव्योरसा । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४१ ॥
ततश्चैनमन्येनोदरेण प्राशीर्येनं चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
उदरदारस्त्वा हनिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
सत्येनोदरेण । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४२ ॥

अर्थ— ज्यानें पूर्वी ऋषींनी यास प्राशन केलें त्या व्यतिरिक्त जर निराळ्या (अन्येन व्यचसा प्राशीः) दुसऱ्या प्राणानें प्राशन करशील (राजयक्ष्मः त्वा हनिष्यति) राजयक्ष्मा तुझा नाश करील असें त्याला सांगा. (तं वै०... अन्तरिक्षेण व्यचसा तेन एनं प्राशिषं०) त्याला मीं अंतरिक्षरूपी अंतःप्राणानीं प्राशन केलें आणि त्यापासून प्राप्त केलें. [३९]

ज्यानें पूर्वी ऋषींनीं याला प्राशन केलें तद्व्यतिरिक्त अन्य (पृष्ठेन०) पृष्ठ भागानें जर तूं याचें प्राशन करशील तर (विद्युत् त्वा हनिष्यति) वीज तुझा नाश करील असें त्याला सांगा. (तं वा०...दिवा पृष्ठेन० ...) त्यास मीं द्युलोकरूपी पाठीनें प्राशन केलें. [४०]

ज्यानें पूर्वी ऋषींनीं याला प्राशन केलें होतें त्याशिवाय अन्य (अन्येन उरसा) छातीनें तूं यास सेवन करशील तर (कृष्या न रात्स्यसि इति०...) तुझें शेतीचें ऐश्वर्य वाढणार नाहीं. (तं वै०... पृथिव्या उरसा०...) त्यास मीं पृथ्वीरूपी उरानें सेवन केलें. [४१]

ज्यानें पूर्वी ऋषींनीं याला प्राशन केलें होतें त्याशिवाय निराळ्या (अन्येन उदरेण०) दुसऱ्या पोटानें जर तूं सेवन करशील तर (उदरदारः त्वा हनिष्यति इति) पोट फाडणारा अतिसार रोग तुझा नाश करील असें याला सांगा. (तं वा०... सत्येन उदरेण०....) त्याला मीं सत्यरूपी उदरानें प्राशन केलें. [४२]

*

ततश्चैनमन्येन वस्तिना प्राशीर्येन चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
अप्सु मरिष्यसीत्यैनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
समुद्रेण वस्तिना । तेनैनं प्राशिषं तेनैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४३ ॥

ततश्चैनमन्याभ्यामूरुभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
ऊरू ते मरिष्यत इत्यैनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
मित्रावरुणयोरूरुभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४४ ॥

ततश्चैनमन्याभ्यामष्ठीवद्भ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
स्रामो भविष्यसीत्यैनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
त्वष्टुरष्ठीवद्भ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं तेनैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४५ ॥

ततश्चैनमन्याभ्यां पादाभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
बहुचारी भविष्यसीत्यैनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
अश्विनोः पादाभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४६ ॥

अर्थ–पूर्वी ऋषीनीं ज्यानें याचें सेवन केलें होतें त्याशिवाय (अन्येन वास्तिना प्राशीः...) दुसऱ्या बस्तिनें तूं प्राशन करशील तर तूं (अप्सु मरिष्यासि) पाण्यांत बुडून मरशील असें त्याला सांगा. (तं वै०...समुद्रेण वास्तिना०...) त्याचें मी समुद्ररूपी बस्तीनें सेवन केलें. [४३]

ज्यानें पूर्वी ऋषीनीं याचें सेवन केलें होतें त्याशिवाय (अन्याभ्यां ऊरुभ्यां प्राशीः) दुसऱ्या जांघेनें तूं याचें सेवन करशील तर (ते ऊरु मरिष्यतः) तुझ्या जंघा नष्ट होतील असें त्याला सांगा. (तं वा०... मित्रावरुणयोः ऊरुभ्यां प्राशिषं०...) त्याचें मीं मित्रावरुणरूपी ऊरूंनीं सेवन केलें. [४४]

ज्यानें पूर्वी ऋषीनीं याचें सेवन केलें होतें त्याशिवाय अन्य (अन्याभ्यां अष्ठीवद्भ्यां प्राशीः) दुसऱ्या गुडघ्यांनीं जर तूं याचें सेवन करशील तर (स्रामः भविष्यासि) तूं लंगडा होशील असें त्याला सांगा. (तं वै०... त्वष्टुः अष्ठीवद्भ्यां) त्याचें मीं त्वष्टारूपी गुडघ्यानें सेवन केलें.... [४५]

ज्यानें पूर्वी ऋषींनीं याचें प्राशन केलें होतें त्या व्यतिरिक्त (अन्याभ्यां पादाभ्यां) दुसऱ्या पायांनीं जर तूं याचें सेवन करशील तर (बहुचारी भविष्यासि) तुला पुष्कळ चालावें लागेल, म्हणजे तूं भटक्या होशील, असें त्याला सांगा. (तं वै०... अश्विनोः पादाभ्यां०...) त्याचें मीं अश्विदेवरूपी पायांनीं सेवन केलें.... [४६]

ततश्चैनमन्याभ्यां प्रपदाभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
सर्पस्त्वा हनिष्यतीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
सवितुः प्रपदाभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४७ ॥
ततश्चैनमन्याभ्यां हस्ताभ्यां प्राशीर्याभ्यां चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
ब्राह्मणं हनिष्यसीत्येनमाह । तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् ।
ऋतस्य हस्ताभ्याम् । ताभ्यामेनं प्राशिषं ताभ्यामेनमजीगमम् ।
एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति य एवं वेद ॥ ४८ ॥
ततश्चैनमन्यया प्रतिष्ठया प्राशीर्यया चैतं पूर्व ऋषयः प्राश्नन् ।
अप्रतिष्ठानोऽनायतनो मरिष्यसीत्येनमाह ।
तं वा अहं नार्वाञ्चं न पराञ्चं न प्रत्यञ्चम् । सत्ये प्रतिष्ठाय ।
तयैनं प्राशिषं तयैनमजीगमम् । एष वा ओदनः सर्वाङ्गः सर्वपरुः सर्वतनूः ।
सर्वाङ्ग एव सर्वपरुः सर्वतनूः सं भवति यः एवं वेद ॥ ४९ ॥

[३]

एतद्वै ब्रध्नस्य विष्टपं यदोदनः ॥ ५० ॥
ब्रध्नलोको भवति ब्रध्नस्य विष्टपि श्रयते य एवं वेद ॥ ५१ ॥

अर्थ— ज्याचें पूर्वी ऋषींनी ज्यानें सेवन केलें होतें त्याचें सेवन जर तूं अन्य (अन्याभ्यां प्रपदाभ्यां०) दुसऱ्या पावलांनीं सेवन करशील तर (सर्पः त्वा हनिष्यति) साप तुला मारील असें त्याला सांग. (तं वै०... सवितुः प्रपदाभ्यां०...) त्याचें मीं सवितारूपी पावलानें प्राशन केलें. [४७]

ज्यानें पूर्वी ऋषींनीं याचें सेवन केलें त्या व्यतिरिक्त (अन्याभ्यां हस्ताभ्यां०...) दुसऱ्या हातानीं सेवन करशील तर (ब्राह्मणं हनिष्यसि) तूं ब्राह्मणाचा घात करशील असें त्याला सांग. (तं वै... ऋतस्य हस्ताभ्यां०...) त्याचें मीं ऋतरूपी हातानें सेवन केलें. [४८]

ज्याच्यानें पूर्वी ऋषींनीं याचें प्राशन केलें त्याच्याशिवाय (अन्यया प्रतिष्ठया प्राशीः) जर तूं दुसऱ्या प्रतिष्ठेनें त्याचें प्राशन करशील तर (अप्रतिष्ठानः अनायतनः मरिष्यसि) तूं प्रतिष्ठारहित–आधाररहित होऊन मरशील. असें याला सांग. (तं वै०... सत्ये प्रतिष्ठाय तया एतं प्राशिषं०) मीं सत्यांत प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठीं याचें सेवन केलें ज्यामुळें मीं सर्व अंगानीं अवयवांनीं युक्त झालों. जो हें जाणतो तोसुद्धां सर्व अंगें, इंद्रिय आणि अवयवांनीं युक्त होतो. [४९]

(यत् ओदनः एतत् वै ब्रध्नस्य विष्टपं) जें अन्न आहे तें खरोखर स्वर्गधाम आहे. [५०]

(यः एवं वेद) जो हें जाणतो, (ब्रध्नलोकः भवति) स्वर्गलोकास योग्य होतो. (ब्रध्नस्य विष्टपि श्रयते) स्वर्गलोकांत रहातो. [५१]

एतस्माद्वा ओदनात्त्रयस्त्रिंशतं लोकान्निरमिमीत प्रजापतिः ॥ ५२ ॥
तेषां प्रज्ञानाय यज्ञमसृजत ॥ ५३ ॥
स य एवं विदुष उपद्रष्टा भवति प्राणं रुणाद्धि ॥ ५४ ॥
न च प्राणं रुणाद्धि सर्वज्यानिं जीयते ॥ ५५ ॥
न च सर्वज्यानिं जीयते पुरैनं जरसः प्राणो जहाति ॥ ५६ ॥

(**तस्मात् ओदनात् प्रजापतिः त्रयस्त्रिंशतं लोकान् निरमिमीत**) त्या अन्नानें प्रजापतीनें तेहतीस लोक निर्माण केले. [५२]

(**तेषां प्रज्ञानाय यज्ञं असृजत**) त्यांच्या ज्ञानासाठीं यज्ञ निर्माण केला. [५३]

(**सः यः एवं विदुषः उपद्रष्टा भवति प्राणं रुणद्धि**) तो जो हें जाणणाऱ्यांचा निंदक असतो तो प्राणांचा नाश करतो. [५४]

(**न च प्राणं रुणद्धि सर्वज्यानिं जीयते**) केवळ प्राणाचा नाश होतो एवढेंच नाहीं तर सर्व जीवनाचा नाश होतो. [५५]

(**न च सर्वज्यानिं जीयते**) सर्वस्वनाश होतो असें सुद्धां नाहीं, परंतु (**जरसः पुरा एनं प्राणः जहाति**) वृद्धावस्था प्राप्त होण्यापूर्वींच त्याचे प्राण त्याला सोडून जातात. [५६]

विराट् अन्न

अन्नाचें महत्त्व

अन्नाचें महत्त्व या सूक्तांत काव्याच्या आलंकारिक भाषेंत केलें आहे. तें पाहिलें असतां खात्री होईल की अन्नसुद्धां मनुष्यास स्वर्गसुख प्राप्त करून देणारें आहे. संपूर्ण विश्व अन्नमय आहे. हें जें कांहीं आहे तें सर्व अन्नच आहे. हेंच अन्नाचें विश्वरूप आहे.

अन्न सेवन करावयाचें असलें तर ज्याप्रमाणें पूर्वी ऋषिमुनि त्याचें सेवन करीत तसेंच केलें पाहिजे, नाहींतर त्या मनुष्याचा नाश होईल, अशी सूचना या सूक्तांत दिली आहे. ती अत्यंत महत्त्वाची आहे. वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचें मनन करावें. या सूक्ताच्या आरंभीची तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें सांगितलेलीं कित्येक वाक्यें विचार करण्यायोग्य आहेत. २७ व्या मंत्रांत एक प्रश्न विचारला आहे—

त्वं ओदनं प्राशीः त्वां ओदनः इति । (मं. २७)

' तूं हें अन्न सेवन केलेंस की या अन्नानें तुला खाऊन टाकलें ? ' हा प्रश्न पुष्कळ विचार करण्यासारखा आहे. आपण जें अन्न खातों तें आपणांस खात आहे की आपण त्याचा भोग करतों ? आम्हीं जें भोग भोगतों, ते भोग आमचा उपभोग करीत आहेत कीं आम्हीं त्या भोगांचा उपभोग करतों ? किती गंभीर प्रश्न आहे ! प्रत्येक मनुष्यानें याचा विचार करावा. हें काय होत आहे ? मनुष्य उपभोग वाढवित आहे. ते भोग वाढविण्यांत शक्तीचा केवढा व्यय होत आहे ! एवढी शक्ति खर्च करून मनुष्य भोगांचा उपभोग करीत आहे की ते भोगच मनुष्याचें जीवन खात आहेत. याचा कोणींच विचार करीत नाहींत हें केवढें आश्चर्य ?

मनुष्याचे अन्न, वस्त्र, घर, स्त्री, राज्य, धन, ऐश्वर्य हे भोग मनुष्यास सतत खात आहेत. मनुष्यानें वर सांगितलेले भोग भोगून आनंदी व्हावयास हवें, परंतु होतें असें की मनुष्याचीं दुःखें वाढतच रहातात. असें कां होतें ? याचा विचार मनुष्यानें करावयास पाहिजे. या मंत्राच्या प्रश्नांत एवढा महत्त्वपूर्ण आशय आहे. वाचकांनींच विचार करावा की वेदानें एकाच प्रश्नानें केवढ्या महत्त्वपूर्ण विचार परंपरेस चालना दिली आहे. जे योग्य विचार करतील त्यांचेसाठीं हा प्रश्न जीवन परिवर्तन करणारा आहे.

या प्रश्नाचें उत्तर कसें असलें पाहिजे, ही गोष्ट या सूक्तानेंच दाखविली आहे. मंत्रच उत्तर देतो की—

न एव अहं ओदनं न मां ओदनः। (मं. ३०)

' अन्न मला खात नाहीं किंवा मीं अन्नाला खाल्लें नाहीं. ' म्हणजे आम्हीं दोघे अशा निर्विकार भावनेनें एक दुसऱ्याजवळ आलों आहोंत कीं ज्यामुळें दोघांतून कोणाचाच वाईट प्रभाव एक दुसऱ्यावर पडला नाहीं. मीं अन्न खाऊन खाऊन कमी केलें. म्हणजे मीं आवश्यकतेपेक्षां जास्त खाल्लें नाहीं, आणि स्वतःजवळ जास्त भोग्य वस्तूंचा संग्रह करून इतरांस वंचित केलें नाहीं. आणि अन्नानें सुद्धां मला खाल्लें नाहीं, म्हणजे अन्न मजवर कुरघोडी करून माझा नाश करूं शकलें नाहीं. मीं अन्न एक दुसऱ्याबरोबर राहूं लागलों, एक दुसऱ्यास सहाय्यक झालों, एक दुसऱ्याची प्रतिष्ठा वाढवूं लागलों, एक दुसऱ्याचें महात्म्य वाढवीत जगांत इतरांवर उपकार करण्यास सहाय्यरूप झालों.

वाचकांनीं या उत्तराचा विचार करावा. हें उत्तर वाचकांचे बाबतींत सार्थ होत आहे काय? वाचकांच्या जीवनांत हें उत्तर उतरत आहे कीं नाहीं याचा विचार वाचकांनीच करावा. भोग आणि भोक्ता हे दोघे, जर एक दुसऱ्याजवळ आले तर त्यांचा संबंध परस्पर उपकारक व्हावयास हवा, असा नियम येथें दर्शविला आहे. एकदुसऱ्याची शक्ति कमी करणारा तो संबंध न व्हावा. किती सुंदर उपदेश हा आहे! वाचकांनीं त्याचें मनन करावें. जीवनांत एवढ्या तत्त्व ज्ञानानें समाप्ति होत नाहीं. त्यानंतरच्या मंत्रांत सर्वांची एकरूपता सांगितली आहे—

ओदनं एव ओदनं प्राशीत्। (मं. ३१)

' अन्नानेंच अन्नास खाऊन टाकलें. ' म्हणजे भोक्ता आणि भोग्य एकच तत्त्व आहे. जसें भगवद्गीतेंत म्हटलें आहे—

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
(गी. ४-२५)

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम्।
मंत्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्॥ (गी. ९-१६)

' ब्रह्मच अर्पण द्रव्य आहे आणि ब्रह्मच अर्पणकर्ता आहे, ' हें जें गीतेंत सांगितलें आहे तेंच या मंत्रांच्या आधारानें सांगितलें आहे अथवा आपण असें म्हणूं शकतों कीं, वेद आणि गीतेंचे विचार समान आहेत.

आम्हीं खाणारे सुद्धां अन्नच आहोंत आणि आम्हीं जें खातों तें सुद्धां अन्नच आहे. वाचक विचार करतील तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं मनुष्य सुद्धां अन्नच आहे. मनुष्याचें शरीर हिंस्र प्राण्याचें अन्नच आहे. पण मनुष्य वगैरे प्राणी उच्छ्वास वाटे जो वायु बाहेर टाकतात तो खाऊन वनस्पति पुष्ट होतात. याप्रकारें हा विचार अनेकप्रकारें अनुभवतां येतो.

एक तत्त्वाचा अभ्यास येथें वेदमंत्रांनीं वाचकांस करविला आहे. याप्रकारें विचार करून वाचक या सूक्ताचा योग्य बोध घेतील अशी आशा आहे.

हृदयांतील दोन गृध्र

कांड ७, सूक्त ९५

(ऋषिः - कपिञ्जलः। देवता - गृध्रौ।)

उदस्य श्यावौ विथुरौ गृध्रौ द्यामिव पेततुः। उच्छोचनप्रशोचनावस्योच्छोचनौ हृदः ॥ १ ॥

अर्थ- (अस्य विथुरौ गृध्रौ) याचीं व्यथा वाढविणारे दोन गृध्र (श्यावौ गृध्रौ इव) काळया रंगाच्या गिधाडासारखें (द्यां उत पेततुः) आकाशांत उडतात. हे (उच्छोचनप्रशोचनौ) शोक वाढविणारे आणि शरीर सुकविणारे आहेत. हे (अस्य हृदः उच्छोचनौ) याच्या हृदयास सुकविणारे आहेत. [१]

भावार्थ— काम आणि लोभ या दोन गिधाड्यासारख्या भावना मनुष्यमात्रांत असतात, त्या दोन्हीं पीडा वाढविणाऱ्या आहेत. त्या दोनीं शोक वाढविणाऱ्या आणि शरीर सुकविणाऱ्या आहेत. त्या हृदयास सुद्धां सुकवतात. [१]

अहमेनावुदतिष्ठिपं गावौ श्रान्तसदाविव । कुकुराविव कूजन्तावुदवन्तौ वृकाविव ॥ २ ॥
आतोदिनौ नितोदिनावथो संतोदिनावुत । अपि नह्याम्यस्य मेढ्रं य इतः स्त्री पुमाञ्जभार ॥ ३ ॥

अर्थ— (श्रान्तसदौ गावौ इव) थकलेल्या गाई अथवा बैलाप्रमाणें, (कूजन्तौ कुकुरौ इव) भुंकणाऱ्या कुत्र्याप्रमाणें (उत अवन्तौ वृकौ इव) हल्ला करणाऱ्या लांडग्याप्रमाणें (अहं एनौ उत् अतिष्ठिपं) मीं त्यां दोघांस ओलांडून जातों. [२]

(आतोदिनौ नितोदिनौ) पीडा देणारे आणि व्यथा करणारे (अथो उत संतोदिनौ) आणि दुःख देणाऱ्या त्या दोघांना (अपि नह्यामि) मीं बांधतों. (यः पुमान्) जो पुरुष अथवा (स्त्री) स्त्री (इतः मेढ्रं जभार) येथून प्रजनन सामर्थ्य धारण करतो, त्यांचा सुद्धां मीं संयम करतो. [३]

भावार्थ—बैल, कुतरा, अथवा लांडग्याप्रमाणें त्या दोन्ही भावांना मीं ओलंगून पार जातो. म्हणजे मीं त्या दोन्हींस ताब्यांत ठेवतों. [२]

स्त्री अथवा पुरुष यांच्या इंद्रियांचा त्यांत संबंध आहे म्हणून या पीडा देणाऱ्या भावनांस मीं बंधनांत ठेवतों. [३]

स्त्री-पुरुष विषयक काम आणि लोभ हे मनुष्याच्या अंतःकरणास सुकविणारे पीडा आणि कष्ट देणारे भाव आहेत. ते गिधाडा-प्रमाणें मनुष्याच्या अंतःकरणावर हल्ला करतात. म्हणून त्यांस बंधनांत-प्रतिबंधांत ठेवलें पाहिजे, म्हणजे या वृत्तींचा संयम केला पाहिजे. संयम करण्यानेंच मनुष्य सुखी होतो.

तृष्णेचें विष

कांड ७, सूक्त ११३

(ऋषिः – भार्गवः । देवता – तृष्टिका ।)

तृष्टिके तृष्टवन्दन उदमूं छिन्धि तृष्टिके । यथा कृतद्विष्टासोऽमुष्मै शेप्यावते ॥ १ ॥
तृष्टासि तृष्टिका विषा विषातक्यसि । परिवृक्ता यथासस्यृषभस्य वशेव ॥ २ ॥

अर्थ— हे (तृष्टिके तृष्टिके) हीन तृष्णे ! हे (तृष्टवन्दने) लोभी (अमूं उत् छिन्धि) याला काप. (यथा अमुष्मै शेप्यावते) ज्यामुळें या बलशाली पुरुषाचा (कृत-द्विष्टा असः) द्वेष करणारी तूं होतेस. [१]

(तृष्टा तृष्टिका असि) तूं तृष्णा लोभमयी आहेस. (विषा विषातकी असि) तूं विषारी आणि विषानें युक्त आहेस (यथा परिवृक्ता असासि) त्यामुळें तूं वरण्यालायक आहेस, (इव ऋषभस्य वशा) बैलासाठीं जशी गाय असते. [२]

तृष्णा लोभवृत्ति फार विषमयी मनोवृत्ति आहे. ती सर्वांस चावते. ती सर्व शक्तिशाली मनुष्यांचा द्वेष करते. ही एक प्रकारची विषारी मनोवृत्ति आहे, म्हणून तीस ठेचून नागाच्याप्रकारें दाबून टाकली पाहिजे. ती वृत्ति मनुष्यावर कधीं ताबा न मिळवो पण मनुष्यानें तिच्यावर ताबा मिळविला पाहिजे.

अमावास्या

कांड ७, सूक्त ७९

(ऋषिः - अथर्वा । देवता - अमावास्या ।)

यत्ते देवा अकृण्वन्भागधेयममावास्ये संवसन्तो महित्वा ।
तेना नो यज्ञं पिपृहि विश्ववारे रयिं नो धेहि सुभगे सुवीरम् ॥ १ ॥
अहमेवास्म्यमावास्याउ मामा वसन्ति सुकृतो मयीमे ।
मयि देवा उभये साध्याश्चेन्द्रज्येष्ठाः समगच्छन्त सर्वे ॥ २ ॥
आगन्रात्री संगमनी वसूनामूर्जं पुष्टं वस्वावेशयन्ती ।
अमावास्यायै हविषा विधेमोर्जं दुहाना पयसा न आगन् ॥ ३ ॥
अमावास्ये न त्वदेतान्यन्यो विश्वा रूपाणि परिभूर्जजान ।
यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तु वयं स्याम पतयो रयीणाम् ॥ ४ ॥

अर्थ— हे (अमावास्ये) अमावास्ये ! (ते महित्वा) तुझ्या महत्वानें (संवसन्तः देवाः) एकत्र वास्तव्य करणारे देव (यत् भागधेयं अकृण्वन्) जें भाग्य बनवितात, (तेन नः यज्ञं पिपृहि) त्यानें आमच्या यज्ञाची पूर्तता कर. हे (विश्ववारे सुभगे) सर्वांनीं वरण्यायोग्य भाग्यवति देवि ! (सुवीरं रयिं नः धेहि) उत्तम वीरांनीं युक्त धन आम्हांस दे. [१]

(अहं एव अमावास्या अस्मि) मींच अमावास्या आहें. (मां इमे सुकृतः मयि आवसन्ति) माझी इच्छा करणारी हीं पुण्य आचरणारीं मनुष्यें माझ्या आश्रयानें रहातात. (साध्याः इन्द्रज्येष्ठाः सर्वे उभये देवाः) साध्य आणि इंद्र वगैरे सर्व दोन्ही प्रकारचे देव (मयि समगच्छन्त) माझ्यांत एकत्रित येवोत. [२]

(वसूनां संगमनी) सर्व वसूंस एकत्रित करणारी (पुष्टं ऊर्जं वसु आवेशयन्ती) पुष्टिकारक आणि बलवर्धक धन देणारी (रात्री आगन्) रात्र आली आहे. (अमावास्या वै हविषा विधेम) अमावास्येसाठीं आम्हीं हवनानें यज्ञ करतों कारण कीं ती (ऊर्जं दुहाना पयसा नः आगन्) अन्न देणारी दुधासह आली आहे. [३]

हे अमावास्ये ! (त्वत् अन्यः एतानि विश्वा रूपाणि) तुझ्यापासून निराळीं हीं रूपें (परिभूः न जजान) घेरून कोणी तयार करूं शकत नाहीं. (यत् कामाः ते जुहुमः) ज्याची इच्छा करून आम्हीं तुझ्या प्रीत्यर्थ यजन करतों, (तत् नः अस्तु) तें आम्हांस प्राप्त होवो. (वयं रयीणां पतयः स्याम) आम्हीं धनाचें स्वामी व्हावें. [४]

भावार्थ— सर्व देव जें भाग्य देतात तें आम्हांस प्राप्त होवो, आणि त्यानें आमचा यज्ञ पूर्ण होवो. तसेंच आम्हांस असें धन द्या कीं ज्याबरोबर वीर असतील. [१]

मी अमावास्या आहें, म्हणून साध्य वगैरे सर्व देव तसेंच पुण्य कर्म करणारीं मनुष्यें माझ्या आश्रयानें रहातात. [२]

अमावास्या सर्व प्रकारचें धन देते. पुष्टि, बळ आणि धनसुद्धां देते, म्हणून तिच्यासाठीं यज्ञ करण्यांत यावा. [३]

हे अमावास्ये ! जें या जगास व्यापून करूं शकेल असें तुझ्याहून भिन्न दुसरें कोणी नाहीं. ज्या इच्छेनें आम्हीं तुझें यजन करतों, ती आमची इच्छा पूर्ण होवो, आणि आम्हीं धनाचें स्वामी व्हावें. [४]

अमावास्या

' अमावास्या ' शब्दाचा अर्थ ' एकत्र वास्तव्य करणारी ' असा आहे. सूर्य आणि चंद्र एकस्थानी रहातात म्हणून त्या तिथीस अमावास्या म्हणतात. सूर्य उग्रस्वरूपी आणि चंद्रमा शीतल शांत रूपाचा आहे. उग्र आणि शांत यांस एकाच घरांत ठेवणारी ही

अमावास्या आहे. त्याप्रमाणें सर्व देवांचें एकत्र वास्तव्य करणारी सुद्धां ती आहे. हे गुण मनुष्यानें स्वतःमध्यें धारण करावे-केले पाहिजेत. परस्पर विरोधी स्वभावाच्या लोकांना आणून मनुष्यांस एकत्र आणण्याची शक्ति मनुष्यांत असेल तेवढी त्याची योग्यता मोठी. ' अमावास्ये ' पासून हा बोध मनुष्यानें घ्यावा.

हें सूक्त अमावास्येविषयीं एक सुंदर काव्य आहे. त्या काव्यरसासह मनुष्यास उत्तम बोधसुद्धां प्राप्त होतो. निरनिराळ्या स्वभावाच्या मनुष्यांस एका घरांत, एका जातींत, एका धर्मांत, एक राष्ट्रांत, एका कार्यांत प्रवृत्त करून त्यांच्याजवळून एकच कार्य करविणें आणि त्या सर्वांची उन्नति साध्य करणें, असा या सूक्ताचा विषय आहे. तो प्रत्येक व्यवहारांत निःसंदेह बोधप्रद आहे.

पूर्णिमा

कांड ७, सूक्त ८०

(ऋषिः – अथर्वा । देवता – पौर्णमासी, प्रजापतिः ।)

पूर्णा पश्चादुत पूर्णा पुरस्तादुन्मध्यतः पौर्णमासी जिगाय ।
तस्यां देवैः संवसन्तो महित्वा नाकस्य पृष्ठे समिषा मदेम ॥ १ ॥
वृषभं वाजिनं वयं पौर्णमासं यजामहे । स नो ददात्वक्षितां रयिमनुपदस्वतीम् ॥ २ ॥
प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा रूपाणि परिभूर्जजान ।
यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तु वयं स्याम पतयो रयीणाम् ॥ ३ ॥
पौर्णमासी प्रथमा यज्ञियासीदह्नां रात्रीणामतिशर्वरेषु ।
ये त्वां यज्ञैर्यज्ञिये अर्धयन्त्यमी ते नाके सुकृतः प्रविष्टाः ॥ ४ ॥

अर्थ- (पश्चात् पूर्णा) मागून परिपूर्ण, (उत पुरस्तात् पूर्णा) आणि पुढूनहि परिपूर्ण तसेंच (मध्यतः) मधूनहि परिपूर्ण (पौर्णमासी उत् जिगाय) पूर्णिमा झाली आहे. (तस्यां देवैः संवसन्तः) तिच्यांत देवांसह रहाणारे आम्हीं सर्व (महित्वा नाकस्य पृष्ठे इषा संमदेम) महत्त्वानें स्वर्गाच्या पृष्ठावर इच्छेनुसार आनंदाचा उपभोग घेऊं. [१]

(वृषभं वाजिनं पौर्णमासं) बलवान् अन्नानें युक्त पौर्णमासाचें (वयं यजामहे) आम्हीं हवन करतों. (सः नः) तें आम्हां सर्वांस (अक्षितां अनु उपदस्वतीं रयिं ददातु) अक्षय आणि अविनाशी धन देवो. [२]

हे प्रजापते ! (त्वत् अन्यः) तुझ्याशिवाय दुसरा (एतानि विश्वा रूपाणि) या सर्व रूपांस (परिभूः न जजान) सर्वत्र व्यापून कोणी निर्माण करूं शकत नाहीं. (यत् कामाः ते जुहुमः) ज्यांची इच्छा करीत आम्हीं तुझें यजन करतों (तत् नः अस्तु) ते आम्हांस प्राप्त होवो. (वयं रयीणां पतयः स्याम) आम्हीं सर्व धनाचे स्वामी व्हावें. [३]

(पौर्णमासी) पूर्णिमा (अह्नां रात्रीणां अतिशर्वरेषु) दिवस आणि रात्रीच्या अंधारांत (प्रथमा यज्ञिया आसीत्) प्रथम पूजनीय आहे. हे (यज्ञिये) पूजनीय ! जे (ये त्वां यज्ञैः अर्धयन्ति) जे यज्ञद्वारा तुझा सत्कार करतात (ते अमी सुकृतः नाके प्रविष्टाः) ते हे सत्कर्म करणाऱ्या स्वर्गपीठावर प्रविष्ट होतात. [४]

भावार्थ— सर्वप्रकारें परिपूर्ण असल्यानें पौर्णमासीस पूर्णिमा म्हणतात. यावेळीं जे लोक देवांच्या सभेंत, यज्ञांत गुंतलेले असतात ते स्वतःच्या महत्त्वानें स्वर्गास प्राप्त करतात. [१]

पूर्णमास बल आणि अन्नानें युक्त असतो म्हणून आम्हीं सर्व त्याचें यजन करतों, त्यामुळें आम्हीं अक्षय धन प्राप्त करूं. [२]

या विश्वाच्या अनंत रूपांना निर्माण करणारा प्रजापतिशिवाय दुसरा कोणी नाहीं. ज्या इच्छांनीं आम्हीं यज्ञ करतों, त्या पूर्ण होवोत आणि आम्हीं धनसंपन्न व्हावें. [३]

पूर्णिमेचें पूजन दिवसा आणि रात्रीं करण्यायोग्य आहे. हे पूर्णिमे ! तुझें यजन आम्हीं करतों. आम्हांस स्वर्गधामांत प्रवेश प्राप्त होवो. [४]

ही दोन्ही सूक्तें अमावास्य आणि पूर्णिमेच्या ' दर्श आणि पूर्णमास ' यज्ञांचीं सूचक आहेत. अमावास्येचे वेळीं ज्याप्रमाणें यज्ञ करावयास हवा तसा पूर्णिमेस सुद्धां करावयास हवा. त्यामुळें इहलोकांत आणि परलोकांतहि लाभ होतो.

त्याचें वर्णन या दोन्हीं सूक्तांत वाचकांस पहावयास मिळतें. दर्श-पूर्णमास यज्ञांची आवश्यकता या दोन्हीं सूक्तांत स्पष्ट शब्दांत केली आहे.

अनुमति

कांड ७, सूक्त २०

(ऋषिः - अथर्वा । देवता - अनुमतिः ।)

अन्वद्य नोऽनुमतिर्यज्ञं देवेषु मन्यताम् । अग्निश्च हव्यवाहनो भवतां दाशुषे मम ॥ १ ॥
अन्विदनुमते त्वं मंससे शं च नस्कृधि । जुषस्व हव्यमाहुतं प्रजां देवि ररास्व नः ॥ २ ॥
अनु मन्यतामनुमन्यमानः प्रजावन्तं रयिमक्षीयमाणम् ।
तस्य वयं हेडसि मापि भूम सुमृडीके अस्य सुमतौ स्याम ॥ ३ ॥
यत्ते नाम सुहवं सुप्रणीतेऽनुमते अनुमतं सुदानु ।
तेना नो यज्ञं पिपृहि विश्ववारे रयिं नो धेहि सुभगे सुवीरम् ॥ ४ ॥

अर्थ— (अद्य नः अनुमतिः) आज आमची अनुमति (देवेषु यज्ञं अनुमन्यतां) देवलोकांत सत्कर्म करण्यासाठीं अनुकूल होवो. (हव्यवाहनः अग्निः) हवनीय पदार्थांस घेऊन जाणारा अग्नि (मम दाशुषे भवतां) आमच्या दात्यांस अनुकूल होवो. [१]

हे (अनुमते) अनुकूल बुद्धि ! (त्वं इत् अनुमंससे) तूं या कार्यासाठीं अनुमोदन देतेस. (नः च शं कृधि) आमचें कल्याण कर. (आहुतं हव्यं जुषस्व) हवन केलेल्या पदार्थांचा स्वीकार कर. हे देवि ! (नः प्रजां ररास्व) आम्हांस उत्तम संतान दे. । २]

(अनुमन्यमानः) अनुमोदन देणारा (अक्षीयमाणं प्रजावन्तं धनं अनुमन्यतां) क्षीण न होणारें प्रजायुक्त धन प्राप्त करण्यास अनुमति देवो. (तस्य हेडसि वयं मा अपि भूम) त्याच्या क्रोधांत आम्हीं क्षीण न व्हावें. (अस्य सुमृडीके सुमतौ स्याम) त्याच्या सुखकारक कर्मं आणि सुमतींत आम्हीं असावें-रहावें. [३]

हे (सु-प्र-नीते अनुमते) उत्तम प्रकारची नीति ठेवणाऱ्या अनुमते ! हे (विश्ववारे) सर्वांचा स्वीकार करण्यायोग्य ! (यत् ते सुदानु सुहवं अनुमतं नाम) जें तुझें उत्तम दानशील, उत्तम त्यागमय, अनुमतियुक्त यश आहे, (तेन नः यज्ञं पिपृहि) त्यानें आमच्या सत्कर्मांस परिपूर्ण कर. हे (सुभगे) सौभाग्यशाली ! (नः सुवीरं रयिं धेहि) उत्तम वीरांनीं युक्त धन आम्हांस दे. [४]

भावार्थ— आजच आमची बुद्धि सत्कर्म करण्यास अनुकूल होवो आणि अग्नि वगैरेंची अनुकूलता आम्हांस प्राप्त होवो. [१]

अनुकूल बुद्धि असल्यानेंच हीं सर्व कार्यें होऊं शकतात. म्हणून आमच्या अनुमतीनें अशीं कार्यें व्हावयास हवींत कीं जीं आमचें कल्याण करणारीं असतील. आम्हीं जें दान करतों तें सत्कर्माच्या उपयोगीं यावें आणि आम्हांस उत्तम संतति प्राप्त व्हावी. [२]

क्षीण न होणारें धन आणि उत्तम प्रजा प्राप्त होण्यासाठीं जसें सत्कर्म करावें लागतें तसें करण्यास आमची बुद्धि अनुकूल होवो. म्हणजे खरें उत्तम सुख देणारी सद्बुद्धि आमच्याजवळ असावी. आणि आम्हीं कधीं क्रोधी होऊं नये आणि त्यामुळें सद्बुद्धि विरुद्ध कार्य न करावें. [३]

उत्तम नीति आणि सद्बुद्धीचें महान् यश आहे. त्यांत दान, त्याग वगैरे श्रेष्ठ गुण आहेत. या गुणांनीं युक्त आमचीं सत्कर्में होवोत, आणि आम्हांस वीरतायुक्त धन प्राप्त व्हावें. [४]

*

एमं युज्ञमनुमतिर्जगाम सुक्षेत्रतायै सुवीरतायै सुजातम् ।
भुद्रा ह्य॑स्याः प्रम॑तिर्बभूव सेमं युज्ञम॑वतु देवगोपा ॥ ५ ॥
अनुमतिः सर्वमिदं बभूव यत्तिष्ठति चरति यदु च विश्वमेजति ।
तस्यास्ते देवि सुमतौ स्यामानुमते अनु हि मंससे नः ॥ ६ ॥

अर्थ–(**इमं सुजातं यज्ञं**) या सुप्रसिद्ध सत्कर्माकडे (**अनुमतिः सुक्षेत्रतायै सुवीरतायै आजगाम**) अनुमति उत्तम स्थान तयार करण्यासाठीं आणि उत्तम वीरता उत्पन्न करण्यासाठीं आली आहे. (**अस्याः प्रमतिः भद्रा बभूव**) तिची श्रेष्ठ बुद्धि कल्याणकारक झाली आहे. (**सा देवगोपा इमं यज्ञं आ अवतु**) ती देवांकडून रक्षण केलेली सुमति सर्वप्रकारें या आमच्या सत्कर्माचें रक्षण करो. [५]

(**यत् तिष्ठति**) जो स्थिर आहे, (**यत् चरति**) जो चालतो, (**यत् च विश्वं एजति**) जें सर्वांस चालवत आहे (**इदं सर्वं अनुमतिः बभूव**) तें सर्वही अनुमतिच होते. हे देवी ! (**तस्याः ते सुमतौ स्याम**) तुझ्या त्या सद्बुद्धींत आम्हीं रहावें. हे अनुमति ! (**नः हि अनुमंससे**) आम्हांस तूं अनुमति देत रहा. [६]

भावार्थ– सुप्रसिद्ध सत्कर्मासाठीं आमची बुद्धि अनुकूळ होवो आणि त्यापासून आम्हांस उत्तम वीरत्व आणि उत्तम कार्यक्षेत्र प्राप्त होवो. अशी जी सद्बुद्धि असते तीच कल्याणकारक होते. ही देवांकडून रक्षिलेली बुद्धि आम्हीं चालविलेल्या सत्कर्माचें रक्षण करो. [५]

जे स्थिर आणि चर पदार्थ आहेत आणि जी त्यांची चालक शक्ति आहे, ते सर्व अनुमतिपासून झालेले आहेत. ही अनुमति आम्हांस अनुकूळ राहो. म्हणजे आमच्याकडून प्रतिकूळ वर्तन न करवो. आणि आम्हांस नेहमीं सत्कर्म करण्याची प्रेरणा मिळत राहो. [६]

अनुमति

अनुमतीची शक्ति

' अनुकूळ बुद्धीला ' च ' अनुमति ' म्हणतात. जगांत जें कांहीं घडत आहे ते सर्व अनुकूळ बुद्धीनें होत आहे. चोर चोरी करतो तीं स्वतःच्या अनुमतीनें करतो. योगी योगाभ्यास करतात तो सुद्धां स्वतःच्या बुद्धीच्या आनुकूल्यानें म्हणजेच अनुमतीनें, आणि देशभक्त स्वराज्य–स्वातंत्र्य प्राप्तीच्या युद्धांत सामील होतात आणि स्वतःच्या मस्तकाचें (प्राणाचें) बलिदान करतात ते सुद्धां स्वतःच्या अनुकूल बुद्धिमुळेंच. तात्पर्य असें कीं मनुष्य जें कांहीं कार्य करतो, चांगलें अथवा वाईट, हितकारक अथवा अहितकारक देशाच्या उद्धाराचें अथवा उद्धरासाठीं किंवा देशविघातक, हीं सर्व कार्यें स्वतःच्या अनुमतिनेंच निश्चितपणें करतात. म्हणून या सुक्तांत म्हटलें आहे कीं—

यत् तिष्ठति, चरति, यत् उ च विश्वमेजति,
इदं सर्वं अनुमतिः बभूव ॥ (मं. ६)

' जें स्थिर आहे, जें चंचल आहे, आणि जें सर्वांस चालवितें, तें सर्वं अनुमतीनें होतें. ' हा मंत्र लहानशा क्षुद्र कार्यापासून विश्वातील महान् कार्यापर्यंत विश्वव्यापक तत्त्व सहजपणें सांगत आहे. जी स्थिर जगाची व्यवस्था आहे, जो चर जगताचा संसार आहे आणि हें जें स्थिर चर संपूर्ण विश्व चालत आहे तें परमेश्वराच्या अनुमतीनें चालतें. वाचकांस असा अनुभव येईल कीं एवढी अनुमतीची शक्ति आहे. त्याचप्रमाणें मनुष्य जीं कांहीं अनुकूल अथवा प्रतिकूल कार्यें करतो, तीं सर्व स्वतःच्या अनुमतीनें करतो. एवढें अनुमतीचें साम्राज्य समस्त विश्वांत चालत आहे. म्हणून स्वतःची अनुकूल बुद्धि चांगल्या कार्यासाठींच असावी, आणि वाईट कार्यांत ती न वापरावी. एवढी दक्षता धारण करणें अत्यंत आवश्यक आहे. अशी सूचना खालीं दिलेले मंत्रभाग आपणांस देत आहेत—

देवेषु यज्ञं अनुमन्यताम् । (मं. १)
अनुमते ! त्वं अनुमंससे नः शं कृधि । (मं. २)
वयं तस्य हेडसि मा अपि भूम । (मं. ३)
समृडीके सुमतौ स्याम । (मं. ३)
सुदानुं सुहवं अनुमतं नाम । (मं. ४)

सुवीरं रयिं धेहि । (मं. ४)
सुमतौ स्याम । (मं. ६)

' देवामध्यें चालणाऱ्या सत्कर्मासाठीं अनुमति प्राप्त होवो म्हणजे राक्षसांकडून होणाऱ्या घातक कार्यास बुद्धि कधींहि अनुकूळ न होवो. अनुमतीनेंच सर्व कार्यें होतात, म्हणून अशा कार्यासच अनुमति असावी की ज्यामुळें कल्याण होईल. आम्हीं कधीं क्रोधासाठीं स्वतःची अनुकूळ बुद्धि न वापरावी. इतर कोणाच्या क्रोणास स्वतः अनुकूल न व्हावें. सर्वांचें सुख वाढविण्याच्या कार्यांत आणि उत्तम बुद्धीच्या कार्यांत आमची बुद्धि अनुकूल होवो; म्हणजे दुःख वाढविणाऱ्या कोणत्याहि कार्यास आमची सद्बुद्धि अनुकूळ न होवो. दान, त्याग, परोपकार, ज्या कार्यांत असेल अशा कार्यास अनुमति द्यावयाची असते. तीच कीर्ति वाढविणारी होते. म्हणजे ज्या कार्यांत परोपकार नाहीं, वाईटच परिणाम येत रहातो अशा कार्यास अनुमति देण्यानें अपकीर्ति होते. म्हणून नेहमीं अनुमति अशा कार्यासच असावी कीं जी वीरत्व युक्त धन वाढवेल. भित्रेपणा आणि नीचतेनें धन प्राप्त करण्याच्या कार्यांत कधीं कोणीं स्वतःची अनुमति देऊं नये. सारांश की सुमतीसाठीं आमची अनुकूळ बुद्धि असली पाहिजे आणि दुर्मतिसाठीं अनुकूळता कधीं नसावी.'

या सूक्तांत जो विशेष महत्त्वाचा उपदेश आहे तो हा– अनुमतीची शक्ति मोठी आहे, म्हणून त्या अनुमतीस चांगल्या कार्यास जुंपावें हेंच योग्य होय. नाहींतर नुकसान होईल. याविषयीं सर्वांत पहिली आज्ञा अशी आहे—

नः अनुमतिः देवेषु यज्ञं अद्य अनुमन्यताम् । (मं. १)

' आमची अनुमति देवांमध्यें चालणाऱ्या सत्कर्मास आजच अनुमोदन देवो. ' येथें उद्याची सबब सांगितलेली नाहीं. शुभ कर्म आजच करावें, उद्यासाठीं शिल्लक ठेवूं नये. जें सत्कर्म करावयाचें असेल त्याची सुरवात आजच करा. सत्कर्माचें लक्षण–चिन्ह असें कीं (**देवेषु यज्ञं**) देवांमध्यें जसा यज्ञ होतो, तसा तो करण्यासाठीं आमची बुद्धि अनुकूळ होवो. देव कोणता यज्ञ करतात तो पहा. जे दान देतात, प्रकाश देतात, परोपकार करतात, ते देव आहेत. पहा पृथ्वी देवता आहे कारण ती सर्वांस आधार देते. जलदेवता सर्वांस शांति शैत्य–स्वच्छता–पवित्रता देण्यासाठीं आत्मसमर्पण करते, अग्निदेवता आहे ती थंडीनें ओखडलेल्यांना पीडलेल्यांना उष्णता देते, सुखकारक होते, सूर्यदेवता सर्वांस जीवन आणि प्रकाश देते, वायु सर्वांस प्राण देतो, जीवन देतो, चंद्रमा स्वतः कष्ट घेऊन इतरांस शांति देण्यास तत्पर रहातो. याप्रमाणें इतर सर्व देवता, रात्रंदिवस परोपकारांत कार्यरत असतात, हाच देवांमध्यें होणारा परोपकारमय यज्ञ आहे. अशा शुभ कर्मासाठीं माझी मति अनुकूळ होवो. या देवांत—

दाशुषे हव्यवाहनः अग्निः भवताम् । (मं. १)

' दात्या पुरुषासाठीं हव्यवाहक अग्नि आदर्श होवो. ' अग्नीच परोपकाराचा आदर्श आहे. कारण की तो स्वतः जळत राहून दुसऱ्यांना सुख देण्यास प्रकाश देतो, थंडीनें पीडलेल्यास उष्णता देऊन सुखवितो आणि स्वतःची ऊर्ध्वगति कायम ठेवतो. प्रत्येक अवस्थेंत स्वतःची उच्चगति स्थिर ठेवण्याच्या कार्यांत अग्नि हाच श्रेष्ठ आदर्श आहे. अग्नीचा गुणच (**अग्नेः ऊर्ध्वजलनं**) उच्च दिशेस प्रकाशित होऊन प्रगति साधण्याचा आदर्श, अग्नीच सर्वांस देतो. असा आदर्श प्रत्येकानें स्वतःच्या बुद्धींत ठेवावा आणि स्वतःची बुद्धि हीनदशेस जाऊं देऊं नये अथवा हीन कार्याकडे न लावावी, सूर्यसुद्धां अग्निरूप असल्यामुळें सर्वांच्या उच्चस्थानीं राहून सर्वांस प्रकाश देण्याचें कार्य करीत आहे. त्याचप्रमाणें मनुष्यानें सुद्धां उच्चांत उच्च अवस्था प्राप्त करावी, आणि प्रगति साधावी. कधींहि नीच अवस्थेंत पडून अथवा अंधारांत, चिखलांत पडूं नये. कोणत्या कार्यास अनुमति देणें योग्य आहे त्याविषयीं खालील मंत्रभाग पहा—

अक्षीयमाणं प्रजावन्तं रयिं अनुमन्यताम् । (मं. ३)
सुवीरं रयिं (अनुमन्यताम्) । (मं. ४)

' क्षीण न होणारें, प्रजायुक्त आणि वीरांनीं युक्त धन वाढविणारें जें जें श्रेष्ठ कर्म असेल ' त्या सर्व कामांत अनुमति दिली पाहिजे. म्हणजे कोणत्या दुष्ट व्यसनांत द्रव्यनाश होत असेल अशा कामास अनुमति कधीं देऊं नये. मनुष्यानें काय केलें पाहिजे त्याविषयीं खालीं दिलेला मंत्रभाग मनन करण्यासारखा आहे—

सुक्षेत्रतायै सुवीरतायै अनुमतिः । (मं. ५)

' स्वतःचा देश उत्तम होईल आणि त्यांत वीरत्व वाढत राहील, या दोन कार्यास नेहमीं स्वतःची अनुमति दिली पाहिजे.' प्रत्येक प्रकारचें क्षेत्र (**सु-क्षेत्र**) उत्तमांत उत्तम होईल, प्रत्येक गांव, नगर आणि प्रांत सुधरून जावा. प्रत्येक राष्ट्र सुधरून सर्वांपेक्षां श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करीत असावा, अशा कार्यासाठीं प्रयत्न असले पाहिजेत आणि ज्यामुळें सुधारणा होईल अशा कार्यास अनुमोदन दिलें पाहिजे. म्हणजे, स्थान, देश अथवा व्यक्ति हीन होईल अशा कोणत्याहि कार्यांत अनुमति देऊं नये. याप्रमाणें देशांत, नगरांत, गांवांत, घरोघर आणि व्यक्ति व्यक्तिमध्यें वीरत्व उत्पन्न होण्यायोग्य श्रेष्ठ कर्मासाठीं स्वतःची अनुमति दिली पाहिजे. स्वतःच्या देशांतील एकाद्या मनुष्यानें सुद्धां भीरुपणा निर्माण होईल असें कृत्य कदापि न करावें.

' **अवीरते** ' चा नाश करण्याची वेदांत स्पष्ट आज्ञा आहे.

सुमति– चांगली बुद्धि नेहमीं (देवगोपा) देवांकडून सुरक्षित असते म्हणजे जी दुर्मति–दुष्ट बुद्धि असते तिला देवांचा पाठीं नसतो, ती राक्षसांकडून रक्षित बुद्धि असते. म्हणून स्वतःची बुद्धि कोणीहि राक्षसाच्या हवाली करूं नये. देवांकडून सुरक्षित अशी जी प्रमति आणि विशेष श्रेष्ठ बुद्धि असते तीच भद्रा म्हणजे खरें कल्याण करणारी असते.

याप्रमाणें या सूक्ताचा उपदेश अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वाचक जर त्याचें मनन विशेष प्रकारें करतील तर त्यांची बुद्धि कशा प्रकारची ' प्रमति, सुमति, भद्रा अनुमति ' होऊं शकेल त्याचा मार्ग त्यांस सांपडेल. आत्म शुद्धि करूं इच्छिणाऱ्यांना हें सूक्त चांगलें मार्गदर्शक होऊं शकेल. या दृष्टीनें या सूक्ताचें एक एक वाक्य फारच बोधप्रद आहे.

हृदयांत अग्नीची ज्योत

कांड ६, सूक्त ७६

(ऋषिः – कबन्धः । देवता – सान्तपनाग्निः ।)

य एनं परिषीदन्ति समादधति चक्षसे । संप्रेद्धो अग्निर्जिह्वाभिरुदेतु हृदयादधि ॥ १ ॥
अग्नेः सांतपनस्याहमायुषे पदमा रभे । अद्धातिर्यस्य पश्यति धूममुद्यन्तमास्यतः ॥ २ ॥
यो अस्य समिधं वेद क्षत्रियेण समाहिताम् । नाभिह्वारे पदं नि दधाति स मृत्यवे ॥ ३ ॥
नैनं घ्नन्ति पर्यायिणो न सन्नाँ अव गच्छति । अग्नेर्यः क्षत्रियो विद्वान्नाम गृह्णात्यायुषे ॥ ४ ॥

अर्थ— (ये एनं परिषीदन्ति) जे याच्या चारी बाजूस बसतात, याची उपासना करतात आणि (चक्षसे सं आदधति) दिव्य दृष्टिसाठीं याचें आधान करतात त्यांच्या (हृदयात् अधि) हृदयावर (संप्रेद्धः अग्निः जिह्वाभिः उदेतु) प्रदीप्त झालेला अग्नि स्वतःच्या ज्वाळांनीं उदित होवो. [१]

(सांतपनस्य अग्नेः पदं) तापणाऱ्या अग्निच्या पदाला मीं (आयुषे आरभे) जीवन वृद्धिसाठीं प्राप्त करतो. (यस्य आस्यतः) ज्याच्या तोंडानें (उद्यन्तं धूमं अद्धातिः पश्यति) निघणाऱ्या धुरास सत्यज्ञानी पहातो. [२]

(यः क्षत्रियेण समाहितां) जी क्षत्रियांकडून समर्पित झालेली (अस्य समिधं वेद) याच्या समिधेला जाणतो. (सः अभिह्वारे मृत्यवे) त्या कुटिल स्थानांत सुद्धां मृत्युसाठीं (पदं न निदधाति) पाऊल सुद्धां टाकत नाहीं. [३]

(पर्यायिणः एनं न घ्नन्ति) घेरून टाकणारे याचा घात करीत नाहींत आणि (सन्नान् न अवगच्छति) जवळ बसणारे त्याला जाणत सुद्धां नाहींत. (यः विद्वान् क्षत्रियः) जो ज्ञानी क्षत्रिय (अग्नेः नाम आयुषे गृह्णाति) जीवनासाठीं अग्नीचें नांव घेतो. [४]

भावार्थ— जे या अग्निच्या चारी बाजूस बसून हवन वगैरे करतात, जे दृष्टीच्या शुद्धतेसाठीं अग्नीची साधना करतात, त्यांच्या हृदयांत प्रज्वलित होऊन दुसराच आत्माग्नि प्रकाशित होतो. [१]

या हृदयस्थानांत प्रदीप्त आत्माग्नीच्या स्थानाला दीर्घ जीवनासाठीं प्राप्त करतों. या आत्माग्नीच्या मुखांतून वाणीवाटे निघणारा धूर म्हणजे याचें चिह्न ज्ञानी मनुष्येंच जाणूं शकतात. [२]

जो क्षत्रिय आत्मसमर्पणद्वारा याच्या मूळ स्थानास जाणतो, तो कठीण प्रसंगांत सुद्धां मृत्युसाठीं स्वतःचें पाऊल सुद्धां देत नाहीं. म्हणजे तो अजरामर होतो. [३]

जे घेरणारे शत्रु आहेत ते या आत्माग्नीचा घात करीत नाहींत आणि समीप रहाणारे सुद्धां त्याला जाणण्यास समर्थ होत नाहींत. जो ज्ञानी क्षत्रिय या आत्माग्नीचें नांव घेतो तो दीर्घायुष्य प्राप्त करतो. [४]

हृदयांतील अग्नीची ज्योत

अग्निपासून दिव्यदृष्टि

अग्नीच्या तापानें दृष्टीची शुद्धता होण्याचें कथन या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत आहे, तें पहा—

चक्षसे सं आ दधाति । (मं. १)

' दृष्टिसाठीं अग्नीचें आधान कर. ' म्हणजे यज्ञकुंडांत अग्नीची स्थापना करतो आणि अग्नींत हवन करतो. अग्नीच्या समीप बसून हवन केल्यानें दृष्टि सुधरते असें या मंत्राचें तात्पर्य आहे.

औंध संस्थानांत कऱ्हाड स्टेशनाजवळ ओगलेवाडी नांवाचे एका गांवीं कांचेचा मोठा कारखाना आहे. त्यांत सर्व प्रकारच्या कांचेच्या वस्तू तयार होतात. कांचेचा रस तयार करण्याची जी भट्टी आहे त्यांत एवढी मोठी उष्णता असते कीं सामान्य मनुष्य तिच्या जवळ एक क्षण सुद्धां उभा राहूं शकत नाहीं. पण जीं मनुष्यें तेथें काम करतात ते तर त्या भट्टी जवळच नेहमीं असतात. गेल्या पंधरा वर्षांचा अनुभव तेथल्या अधिकाऱ्यानें सांगितला कीं जेवढें दृष्टींत कांहीं दोष असणारे अथवा अशक्त दृष्टीचीं मनुष्यें तेथें कामास आलीं आणि त्या भट्टी जवळ काम करूं लागलीं त्या सर्वांची दृष्टि सुधरली. आणि असा एक सुद्धां बनाव घडला नाहीं कीं इतक्या उष्णते नजिक काम करण्यामुळें कोणाची दृष्टि बिघडली, हा अनुभव विचार करण्यासारखा आहे.

यावरून अनुमान करतां येतें कीं दररोज सकाळीं आणि सायंकाळीं तसेंच वैदिक रीतीनें पाहिलें तर सकाळीं दुपारीं आणि सायंकाळीं नियमपूर्वक अग्नीचें आधान करून नियमानें हवन करणाऱ्यांस नेत्र दोषाची बाधा होत नाहीं. तसेंच त्या हवनांत नेत्र दोष दूर करणारे पदार्थ ते टाकण्यांत आले तर अधिक लाभ होईल यांत कांहींच शंका नाहीं.

यामुळें यज्ञानें नेत्र दोष दूर होऊं शकतात. वाचकांनीं याचा विचार करावा आणि त्याविषयीं जास्त संशोधन करावें.

हृदयांतील अग्नि

यज्ञांतील बाह्य अग्नि प्रदीप्त झाल्यानंतर आणि यज्ञाग्नीच्या हवनानें उपासना केल्यानंतर दुसराच एक अग्नि हृदयांत प्रगट होतो. त्याचें वर्णन पहा—

हृदयाद् अधि अग्निः उदेतु । (मं. १)

' हृदयाच्या वेदीवर एक अग्नि प्रदीप्त होतो.' म्हणजे हा अग्नि केवळ भौतिक अग्नि नाहीं. हा अभौतिक अग्नि आत्मारूपी आहे. हृदयांत बुद्धीच्या पलीकडे आत्म्याची उपस्थिति आहे, ही गोष्ट सर्व जाणतात. त्याचें नांव **' सांतपनाग्नि '** आहे. ज्यामुळें अंतःकरणांत प्रसन्नता आणि उत्साह रहातो, त्यास हृदयाची उष्मा अथवा मनाचा उत्साह म्हणतात. या अग्नीस प्रज्वलित करण्याचें ज्ञान ज्ञान्यांसच असतें. दुसऱ्या कोणास तें असत नाहीं—

अस्य धूमं अद्यातिः पश्याति । (मं. २)

' त्याचा धूर ज्ञानीच पाहूं शकतो. ' धुरानेंच अग्नीचें ज्ञान होतें. जेथें धूर असतो तेथें अग्नि असलाच पाहिजे, हा सर्वमान्य न्याय आहे, म्हणजे धूर पहाणें याचा अर्थ त्या धुरामुळीं असलेल्या अग्नीचा अनुभव करणें असा आहे. अग्निहोत्र ठेवल्यानें या हृदयस्थानाच्या आत्माग्नीची जागृति होते.

क्षत्रिय आत्मसमर्पणानें या अग्नीस जाणूं शकतात, आणि जे स्वार्थ सोडून देतात त्यांना सुद्धां याचें यथार्थ ज्ञान होतें. फक्त जीं स्वार्थी मनुष्यें असतात त्यांना या शक्तीची ओळख होत नाहीं.

ही आत्मशक्ति प्रगट होण्यानें शत्रु त्याचें कांहीं वांकडें करूं शकत नाहीं. म्हणजे कोणाच्या दबावण्यानें तो दबून जात नाहीं. विद्वान्, क्षत्रिय, याच्याच बलानें दीर्घजीवन प्राप्त करतात आणि अमर होतात.

भौतिक अग्नीच्या सहाय्यानें अभौतिक आत्माग्नीचें ज्ञान या सूक्तानें दिलें आहे. त्या दृष्टीनें या सूक्ताचें महत्त्व विशेष आहे.

सर्वांची स्थिरता

कांड ६, सूक्त ७७

(ऋषिः — कबन्धः । देवता — जातवेदाः ।)

अस्थाद् द्यौरस्थात्पृथिव्यस्थाद्विश्वमिदं जगत् । आस्थाने पर्वता अस्थु स्थाम्न्यश्वाँ अतिष्ठिपम् ॥ १ ॥

अर्थ— (द्यौः अस्थात्) द्युलोक स्थिर झाला, (पृथिवी अस्थात्) पृथ्वी स्थिर आहे. (इदं विश्वं जगत् अस्थात्) हें सर्व जग स्थिर आहे. (आस्थाने पर्वताः अस्थुः) पर्वतसुद्धां स्वतःच्या स्थानीं स्थिर झाले आहेत म्हणून मीं सुद्धां (अश्वान् स्थाम्नि अतिष्ठिपं) घोड्यांस योग्य स्थानीं स्थिर केलें आहे. [१]

भावार्थ— पृथ्वी, द्युलोक तसेंच संपूर्ण विश्व स्वतः आपआपल्या स्थानीं स्थिर आहेत. पर्वत सुद्धां स्वतःच्या स्थानीं स्थिर आहेत, त्याचप्रमाणें मनुष्य, घोडे वगैरे आपआपल्या स्थानांत स्थिर होवोत. [१]

य उद्वानट् परायणं य उद्वानण्न्यायनम्। आवर्तनं निवर्तनं यो गोपा अपि तं हुवे ॥ २ ॥
जातवेदो नि वर्तय शतं ते सन्त्वावृतः। सहस्रं त उपावृतस्ताभिर्नः पुनरा कृधि ॥ ३ ॥

अर्थ— (यः गोपाः परायणं उद्वानट्) पृथ्वीपालक राजानें जें श्रेष्ठ स्थान प्राप्त केलें आहे, (यः न्यायनं उद्वानट्) ज्यानें खालचें स्थान प्राप्त केलें आहे, (आवर्तनं निवर्तनं) ज्याच्यांत येण्या-जाण्याचें सामर्थ्य आहे. (तं अपि हुवे) त्याची प्रार्थना करतों. [२]

हे (जातवेदः) ज्ञानी ! (निवर्तय) परत फिर (ते आवृतः शतं) तुझीं शेंकडो आवरणें आहेत आणि (ते उपावृतः सहस्रं) तुझ्याजवळ अनेक रस्ते आहेत. (ताभिः न पुनः आकृधि) त्यांनीं आम्हांस पुनः सामर्थ्यशाली कर. [३]

भावार्थ— पृथ्वीपालक राजांनीं जीं उच्च अथवा नीच स्थानें प्राप्त केलीं आहेत, जो योग्य स्थानीं येत जात रहातो तो प्रशंसा करण्यायोग्य आहे. [२]

ज्ञानी पुरुषा ! स्वतःच्या स्थानीं परत जा. तुझ्या आवरणाच्या आणि उपावरणाच्या शक्ति अनेक आहेत, त्यांनीं त्यानें आम्हांस समर्थ करावें. [३]

स्थिरता

सर्व जग आपल्या स्थानीं स्थिर आहे. सूर्य वगैरे गोल ग्रह भ्रमण करीत आहेत, ते सुद्धां त्यांच्यांतील कोणी स्वतःची मर्यादा सोडत नाहींत. आणि ते सर्व स्वतःच्या मर्यादेंत राहिल्यामुळेंच जगाचे सर्व घटक आपआपल्या स्थानीं स्थिर आहेत. याप्रमाणें सर्व मनुष्यांनीं स्वतःच्या धर्माच्या मर्यादेंत राहून स्थिर व्हावें. तसें रहाण्यानें सर्वांचें सामर्थ्य वाढतें.

आमचें संरक्षण

कांड ६, सूक्त ९३

(ऋषिः – शन्तातिः। देवता – रुद्रः।)

यमो मृत्युरघमारो निर्ऋथो बभ्रुः शर्वोऽस्ता नीलशिखण्डः।
देवजनाः सेनयोत्तस्थिवांसस्ते अस्माकं परि वृञ्जन्तु वीरान् ॥ १ ॥
मनसा होमैर्हरसा घृतेन शर्वायास्त्र उत राज्ञे भवाय।
नमस्येभ्यो नम एभ्यः कृणोम्यन्यत्रास्मदघविषा नयन्तु ॥ २ ॥

अर्थ— (यमः) नियामक, (मृत्युः) मारक, (अघ-मारः) पापांस मारणारा, (निर्ऋथः) पीडा देणारा (बभ्रुः) पोषण करणारा, (शर्वः) शस्त्र फेंकणारा, (नीलशिखण्डः) निळ्या ध्वजेनें युक्त तसेंच (देवजनाः) सर्व दिव्यजन, (सेनया उत्तस्थिवांसः) सेनेसह हल्ला करणारा (अस्माकं वीरान् परिवृञ्जन्तु) आमच्या वीरांस वांचवोत. [१]

(अस्त्रः शर्वाय) अस्त्रें फेंकणाऱ्या हिंसकासाठीं (उत भवाय राज्ञे) आणि उन्नति करणाऱ्या राजासाठीं (मनसा घृतेन होमैः हरसा) मनानें, तुपानें, होमानें आणि शक्तीनें (एभ्यः नमस्येभ्यः नमः कृणोमि) या नमस्कार करण्यास योग्य असणांना नमस्कार करतों. (अघविषः अस्मत् अन्यत्र नयन्तु) पापरूपी विषानें परिपूर्ण लोकांस आमच्यापासून दूर करा. [२]

भावार्थ— सर्व शूरवीर आमचें आणि आमच्या बालबच्चांचें तसेंच वीरांचें रक्षण करोत. [१]

जे नमस्कार करण्यायोग्य आहेत त्यांचा मनानें आणि दानानें सत्कार करण्यांत यावा. पापी आमच्या सर्वांपासून दूर राहोत. [२]

त्रायध्वं नो अघविषाभ्यो वधाद्विश्वे देवा मरुतो विश्ववेदसः ।
अग्नीषोमा वरुणः पूतदक्षा वातापर्जन्ययोः सुमतौ स्याम ॥ ३ ॥

अर्थ— (विश्वदेवाः विश्ववेदसः मरुतः) सर्व दिव्य आणि सर्व जाणणारे, मरणापर्यंत कार्य करणारे वीर तसेंच (अग्निषोमौ पूतदक्षाः वरुणः) अग्नि, सोम आणि पवित्र बलानें युक्त वरुण (अघविषाभ्यः वधात् त्रायध्वम्) पापांच्या वधापासून आम्हांस वाचवो. (वातपर्जन्ययोः सुमतौ स्याम) वायु आणि पावसाच्या सुमतींत आम्हीं नेहमीं रहावें. [३]

भावार्थ— सब देव आम्हांस पापांपासून वाचवोत आणि आम्हीं त्यांच्या सदिच्छेंत राहून चांगलीं कामें करीत रहावें. [३]

समृद्धीची प्राप्ति

कांड ३, सूक्त २४

(ऋषिः - भृगुः । देवता – वनस्पतिः, प्रजापतिः ।)

पयस्वतीरोषधयः पयस्वन्मामकं वचः । अथो पयस्वतीनामा भरेऽहं सहस्रशः ॥ १ ॥
वेदाहं पयस्वन्तं चकार धान्यं बहु ।
संभृत्वा नाम यो देवस्तं वयं हवामहे यो यो अयज्वनो गृहे ॥ २ ॥
इमा याः पञ्च प्रदिशो मानवीः पञ्च कृष्टयः । वृष्टे शापं नदीरिवेह स्फातिं समावहान् ॥ ३ ॥

अर्थ— (ओषधयः पयस्वतीः) औषधि रसयुक्त आहेत आणि (मामकं वचः पयस्वत्) माझें वाक्य सुद्धां सारयुक्त आहे. (अथो) म्हणून (पयस्वतीनां सहस्रशः) रसयुक्त औषधींच्या हजारों प्रकारांनीं (अहं आभरे) मीं भरणपोषण करतों. [१]

(पयस्वन्तं बहुधान्यं चकार) रसयुक्त पुष्कळ धान्य उत्पन्न केलें आहे त्याची रीत (अहं वेद) मीं जाणतों. (यः यः अयज्वनः गृहे) जें कांहीं अयाजकाच्या घरांत आहे त्याचा (संभृत्वा नाम यः देवः) संग्रह करून आणणारा या नांवाचा जो देव आहे, (तं वयं हवामहे) त्याचें आम्हीं हवन करतों. [२]

(इमाः याः पञ्च प्रदिशः) या पांच दिशांत रहाणाऱ्या (मानवीः पञ्च कृष्टयः) माणसांच्या पांच जाती आहेत, त्या (इह स्फातिं समावहान्) येथें वृद्धीस प्राप्त करोत. (इव) ज्याप्रमाणें (वृष्टे नदीः शापं) पाऊस पडण्यामुळें नद्या कांठावरचें सर्व कांहीं ओढून आणतात. [३]

भावार्थ— माझें भाषण मधुर असतें तसेंच औषधि उत्तम रसयुक्त असतात. म्हणून मीं विशेषप्रकारें औषधींचें पोषण करतों. [१]

रसयुक्त उत्तम अन्न धान्य निर्माण करण्याचा विधि मीं जाणतों, म्हणून त्या दयाळु ईश्वराचें यजन करतों. ज्या अयाजक मनुष्यांच्या घरांत सुद्धां समृद्धि आहे. [२]

या पांच दिशांत रहाणाऱ्या मनुष्यांच्या पांच जाती उत्तम समृद्धि प्राप्त करोत. ज्याप्रमाणें नद्या पावसामुळें भरून जातात. [३]

उदुत्सं शतधारं सहस्रधारमक्षितम् । एवास्माकेदं धान्यं सहस्रधारमक्षितम् ॥ ४ ॥
शतहस्त समाहर सहस्रहस्त सं किर । कृतस्य कार्यस्य चेह स्फातिं समावह ॥ ५ ॥
तिस्रो मात्रा गन्धर्वाणां चतस्रो गृहपत्न्याः । तासां या स्फातिमत्तमा तया त्वाभि मृशामसि ॥ ६ ॥
उपोहश्च समूहश्च क्षत्तारौ ते प्रजापते । ताविहा वहतां स्फातिं बहुं भूमानमक्षितम् ॥ ७ ॥

अर्थ-(शतधारं सहस्रधारं अक्षितं उत्सं उत्) शेंकडो आणि हजारों धारांनीं युक्त कायम वहाणारें झरे अथवा तलाव वगैरे ज्याप्रमाणें पावसानें भरून जातात, (एव अस्माकं इदं धान्यं) त्याप्रमाणें आमचें हें धान्य (सहस्रधारं अक्षितं) हजारों धारांनीं देणारें अक्षय होवो. [४]

हे (शत-हस्त) शंभर हातांच्या मनुष्या ! (समाहर) एकत्र करून घेऊन या. हे (सहस्र हस्त) हजारो हातांच्या मनुष्या ! (सं किर) तें पसरव, त्याचें दान कर आणि (कृतस्य कार्यस्य च) केलेल्या कार्याची (इह स्फातिं समावह) येथें वृद्धि कर. [५]

(गन्धर्वाणां तिस्रः मात्राः) भूमिचें धारण करणाऱ्यांच्या तीन मात्रा आणि (गृहपत्न्याः चतस्रः) गृहपत्नीच्या चार असतात, (तासां या स्फाति-मत्-तमा) त्यांच्यांत ज्या अत्यंत समृद्धशाली आहेत. (तया त्वा अभि मृशामसि) त्यानें आम्हीं तुला संयुक्त करतों. [६]

हे (प्रजापते) प्रजेच्या पालक ! (उपोहः च) उचलून आणणारा आणि (समूहः च) एकत्रित करणारा हा असे दोघे (ते क्षत्तारौ) तुझे सहकार्य करणारे आहेत. (तौ इह स्फातिं) ते दोघे येथें वृद्धीस घेऊन येवोत, आणि (बहु अक्षितं भूमानं आवहतां) पुष्कळ अक्षय्य भरपूरतेस म्हणजे समृद्धीस आणोत. [७]

भावार्थ— पाऊस पडण्यामुळें तलाव वगैरे जलाशय भरपूर भरून जातात, त्याप्रमाणें आमच्या घरांत अनेक प्रकारचें धान्य भरपूर आणि अक्षय्य होवो. [४]

हे मनुष्या ! तूं शंभर हातांचा होऊन धन प्राप्त कर आणि हजार हातांचा होऊन त्याचें दान कर. याप्रमाणें स्वतःचें कर्तव्य करून स्वतःची उन्नति करून घे. [५]

असें करण्यानें जास्तींत जास्त समृद्धि आम्हीं तुम्हांला देतों. [६]

आणणारा आणि संग्रह करणारा हे दोघे प्रजापालन करणारे सहकारी आहेत. त्यामुळें ते दोघे या स्थानीं समृद्ध होऊन अक्षय्य समृद्धि प्राप्त करोत. [७]

समृद्धीची प्राप्ति

समृद्धि-प्राप्तीचा उपाय

समृद्धि प्राप्त करण्याची इच्छा प्रत्येकास असते, परंतु ती मिळविण्याचा मार्ग फार थोडे जाणतात. समृद्धि मिळविण्याचे कित्येक उपाय आहेत ते या सूक्तांत सांगितले आहेत. जे लोक समृद्धि प्राप्त करूं इच्छितात त्यांनीं या सूक्ताचें चांगल्या प्रकारें मनन करावें. समृद्धि प्राप्तिसाठीं मोठा नियम-पहिला उपाय ' मधुर बोलणें ' असा आहे-

' पयस्वान् मामकं वचः ।' (मं. १)

' दूध जसें मधुर असतें तसें माझें बोलणें असावें. ' भाषणांत मधुरता, रसयुक्त, मधुर बोलणें ऐकणाऱ्याची तृप्ति करण्याचा गुण त्यांत असावा. समृद्धि प्राप्त करण्यासाठीं मधुर भाषण करण्याच्या गुणाची अत्यंत आवश्यकता आहे. आत्मशुद्धीचा तो पहिला आणि आवश्यक नियम आहे. त्यानंतर समृद्धि वाढविण्याचा दुसरा नियम, काळजीपूर्वक हुषारीनें शेती वाढविणें !

पयस्वतीनां आभरेऽहं सहस्रशः । (मं. १)
वेदाहं पयस्वन्तं चकार धान्यं बहु ॥ (मं. २)

' रसयुक्त औषधींना मीं हजारों प्रकारें पोषण देतों, पुष्कळ धान्य कशा रीतीनें उत्पन्न करण्यांत येते ती विद्या मीं जाणतों. ' म्हणजे उत्तम शेती करण्याची विद्या जाणली पाहिजे आणि त्याप्रमाणें शेती करून स्वतःचा धान्याचा सांठा वाढवावा. ही समृद्धि

होणें अत्यंत आवश्यक आहे. रसदार धान्य स्वतःजवळ नसलें तर दुसरी कांहीं समृद्धि होण्यानें लाभ होणार नाहीं. मधुर भाषण करणारा मनुष्य स्वतः जाहला तर त्याचे जवळ पुष्कळ मनुष्यें एकत्रित होतील आणि त्याचेजवळ रसयुक्त धान्य असलें तर तीं आनंदानें तृप्त होतील. नंतर ' सामुदायिक उपासना करावी ' समृद्धिसाठीं तीहि आवश्यक आहे.

सम्भूत्वा नाम यो देवस्तं वयं हवामहे
यो-यो अयज्वनो गृहे ॥ (मं. २)

' ज्या यज्ञ न करणाऱ्यांच्या घरीं सुद्धां (त्यांच्या पोषणासाठीं पुरतें ठेवतो तो दयामय) भरण पोषण करणारा देव आहे त्याची उपासना आम्हीं करतों. ' परमेश्वर सर्वांचें पालन पोषण करणारा आहे. त्याची कृपादृष्टि सर्व श्रेष्ठ आहे. असा जो दयामय ईश्वर आहे त्याची उपासना करण्यानें समृद्धि वाढते. जो देव त्याचें भजन-पूजन न करणाऱ्यांस सुद्धां पुष्टीचें साधन देतो तो याजकांचें पोषण करीलच. म्हणून ईश्वर भक्ति करून समृद्धि प्राप्त करण्याचें मुख्य साधन आहे. या मंत्रांत ' **हवामहे** ' असें बहुवचनीं पद आलें आहे, म्हणजे पुष्कळ मनुष्यांनीं एकत्र होऊन उपासना-यज्ञ करण्याचा भाव येथें स्पष्ट होत आहे.

सर्वांनीं एकत्र मिळून उपासना करण्यानें आणि पहिल्या दोन नियमांचें पालन करण्यानें ' पांच प्रकारच्या मनुष्यांची म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद या सर्वांची उन्नति होऊं शकते. ' (मं. ३) उन्नतीचा हाच नियम आहे. ज्याप्रमाणें पाऊस झाल्यानें नदींत पाणी वाढतें, नाहींतर नाहीं, तसेंच वरील तीन नियमांचें पालन झालें तरच मनुष्याची उन्नति निःसंशय होईल. वाचकांनीं हे नियम नीट लक्षांत ठेवावें.

समृद्धि होण्यासाठीं रसदार धान्याची मुबलकता स्वतःजवळ अवश्य असली पाहिजे, हा भाव विशेष दृढ करण्यासाठीं चौथ्या मंत्रांत ' हजारों प्रकारच्या मधुर रसधारांनीं युक्त अक्षय धान्यांचा संग्रह ' स्वतःजवळ ठेवण्याचा उपदेश केला आहे. तो विशेष महत्त्वाचा उपदेश आहे.

याप्रकारें धनधान्याची विपुलता झाल्यावर स्वार्थ उत्पन्न होईल, आणि त्या स्वार्थामुळें आत्मोन्नति होणें सर्वथा असंभवनीय आहे. म्हणून पांचव्या मंत्रांत दान देण्याच्या समयाविषयीं उदारता ठेवण्याचा उपदेश केला आहे—

शतहस्त समाहर, सहस्रहस्त सं किर ।(मं. ५)

' शंभर हातानीं मिळवा आणि हजार हाताचे होऊन दान करा. ' हा उपदेश प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या हृदयांत स्थिर करणें अत्यंत जरुरी आहे. अशा उदार भावनेशिवाय मनुष्याची उन्नति होणें अशक्य आहे. त्यानंतर वेद म्हणतो की–

कृतस्य कार्यस्य चेह स्फातिं समावह । (मं. ५)

' अशा प्रकारें स्वतःच्या कर्तव्यकर्माची येथें उन्नति करा. ' यापूर्वी जे उन्नतीचे नियम सांगितले, त्या नियमांचें पालन केल्यानें आपल्या कर्तव्यक्षेत्राचा विस्तार होतो. हा उपदेश अत्यंत मनन करण्यासारखा आहे. '**कार्यस्य स्फातिं समावह** ' हे शब्द मनुष्याच्या कार्यक्षेत्राविषयीं सांगितले आहेत. ब्राह्मणानें स्वतःचें ज्ञानविषयक कार्यक्षेत्र वाढवावें. क्षत्रियानें स्वतःचे प्रजा-रक्षणरूपी कार्यक्षेत्र वाढवावें. वैश्यानें शेतीचें आणि गोरक्षणाचें, व्यापाराचें वगैरे स्वतःच्या कार्यक्षेत्राची अभिवृद्धि करावी. शूद्रानें स्वतःचें कारागिरी कौशल्य वाढवावें आणि निषादानें स्वतःचीं जंगल-अरण्य-विषयक कर्तव्यें आहेत, त्यांची वृद्धि करावी. याप्रकारें सर्वांची उन्नति झाली तर संपूर्ण पंचजनांचें म्हणजेच पर्यायानें सर्व राष्ट्राचें सुख वाढूं शकेल आणि सर्वांची सामुदायिक उन्नति होऊं शकेल. प्रत्येकानें स्वतःची (**स्फातिं**) बढति, उन्नति, प्रगति, वृद्धि, समृद्धि करण्यासाठीं कटिबद्ध व्हावयास हवें. स्वतःच्या संपूर्ण शक्तींचा विकास अवश्य केला पाहिजे.

मुख्य दोन साधनें

समृद्धि प्राप्त करण्याचीं मुख्य दोन साधनें आहेत.' **उपोहः**' आणि ' **समूहः** ' त्यांचे विशेष अर्थ असे—

१ **उपोहः**- (**उप+ऊहः**) एकत्रित करणें, संग्रह करणें, एका स्थानीं आणणें.

२ **समूहः**- समुदायांत वांटून त्याचें वर्गीकरण करणें.

पहिली गोष्ट आहे संग्रह करण्याची आणि दुसरी आहे संग्रह केलेल्या द्रव्याचें योग्य वर्गीकरणद्वारें व्यवस्थित ठेवणें. यामुळेंच शास्त्रें तयार होतात आणि वाढतात. वृक्षवनस्पतींचा संग्रह करण्यानें आणि त्याचें वर्गीकरण करण्यामुळें वनस्पतिशास्त्राची उत्पत्ति झाली. वस्तुसंग्रहालयांत पहा, तेथें पदार्थांचा वस्तूंचा संग्रह करण्यांत येतो, आणि त्या वर्गवार सुव्यवस्थित ठेवण्यांत येतात. जर असें करण्यांत न येईल तर संग्रहालयापासून कांहीं लाभच होणार नाहीं. त्याचप्रमाणें स्वतःच्या घरांत वस्तूंचा संग्रह केला पाहिजे आणि त्या वर्गवार योग्य क्रमपूर्वक सुव्यवस्थित ठेवल्या पाहिजेत. तरच उन्नति आणि समृद्धि होऊं शकते.

सातव्या मंत्रांत ' **उपोहः** (संग्रह) आणि **समूहः** समुदायाचें वर्गीकरण ' करणें या दोन गोष्टी समृद्धीच्या साधक अशा सांगितल्या आहेत. हा फार महत्त्वाचा विषय आहे. म्हणून

*

वाचकांनीं त्याचें मनन करावें आणि स्वतःच्या जीवनांत लाभ देणारा हा उत्तम उपदेश आहे हें जाणून त्यापासून पुष्कळ लाभ करून घ्यावा. संग्रह आणि वर्गीकरण उन्नतीचे साधक आहे त्याविषयीं सातव्या मंत्रांत स्पष्ट सांगितलें आहे—

तौ इह स्फातिं आ वहताम् ।
अक्षितं बहु भूमानम् । (मं. ७)

' त्या (म्हणजे संग्रह आणि वर्गीकरण या दोन्ही) गोष्टी या संसारांत (स्फातिं) समृद्धि देतात आणि (भूमानं) पुष्कळ धन अथवा विशेष महत्त्व देतात. '

ज्यास समृद्धि आणि धन पाहिजे त्यानें हे गुण आत्मसात् करावे, आणि त्यामुळें स्वतःचा लाभ सिद्ध करावा. जे लोक अभ्युदय प्राप्त करण्याची इच्छा करतात, त्यांनीं या सूक्ताचें पुष्कळच मनन करावें. निदान या सूक्तांत सांगितलेला महत्त्वपूर्ण उपदेश आहे तो तर कधीं विसरूं नये. जे वाचक या सूक्ताचें मनन करतील त्यांस स्वतःच्या अभ्युदयाचा मार्ग या सूक्तांतील विचारांच्या सहाय्यानें निश्चित जाणता येईल.

गाढ झोप

कांड ४, सूक्त ५

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - स्वापनं, वृषभः ।)

सहस्रशृङ्गो वृषभो यः समुद्रादुदाचरत् । तेना सहस्येना वयं नि जनान्त्स्वापयामसि ॥ १ ॥
न भूमिं वातो अति वाति नाति पश्यति कश्चन । स्त्रियश्च सर्वाः स्वापय शुनश्चेन्द्रसखा चरन् ॥२॥
प्रोष्ठेशयास्तल्पेशया नारीर्या वह्यशीवरीः । स्त्रियो याः पुण्यगन्धयस्ताः सर्वाः स्वापयामसि ॥३॥
एजदेजदजग्रभं चक्षुः प्राणमजग्रभम् । अङ्गान्यजग्रभं सर्वा रात्रीणामतिशर्वरे ॥ ४ ॥
य आस्ते यश्चरति यश्च तिष्ठन्विपश्यति । तेषां सं दध्मो अक्षीणि यथेदं हर्म्यं तथा ॥ ५ ॥

अर्थ— (सहस्रशृंगः वृषभः) हजार शिंगाचा म्हणजे हजार किरणांनीं युक्त बलवान् चंद्र (यः समुद्रात् उदाचरत्) जो समुद्रांतून उदय पावला आहे, (तेन सहस्येन) त्या बळवानाच्या सहाय्यानें (वयं जनान् नि स्वापयामसि) आम्हीं लोकांस झोंपवितों. [१]

(न वातः भूमिं अति वाति) यावेळीं वारा भूमीवर पुष्कळ चालूं शकत नाहीं, (न कश्चन अतिपश्यति) अथवा कोणी वरून पहात नाहीं, (इन्द्रसखा चरन्) इंद्राचा मित्र होऊन तूं वहाणारा वारा (सर्वाः स्त्रियः शुनः च स्वापय) सर्व स्त्रियांस आणि कुत्र्यांस झोंपव. [२]

(प्रोष्ठ-शयाः तल्पे-शयाः) पलंगावर झोंपणाऱ्या, खाटल्यावर झोंपणाऱ्या (वह्य-शीवरीं) झोंपाळ्यावर झोंपणाऱ्या (याः नारीः) ज्या स्त्रिया आहेत (याः पुण्यगन्धाः स्त्रियः) ज्या पुण्यगंधयुक्त स्त्रिया आहेत, (ताः सर्वाः स्वापयामसि) त्या सर्वांस झोंपवून टाक. [३]

(एजत्-एजत् चक्षुः अजग्रभम्) इकडे तिकडे भटकणाऱ्या दृष्टीस निग्रहांत ठेवली आहे. त्याचप्रमाणें (प्राणं अजग्रभम्) प्राणास सुद्धां ताब्यांत ठेवलें आहे. (रात्रीणां अतिशर्वरे) रात्रीच्या अंधारांत (सर्वा अंगानि अजग्रभम्) सर्व अंगोपांगें, इंद्रियें, शरीरावयव निग्रहांत ठेवले आहे. [४]

(यः आस्ते, यः चरति) जो बसतो, जो चालतो (यः तिष्ठन् वि पश्यति) जो उभा राहून पहातो (तेषां अक्षीणि संदध्मः) त्यांचे डोळे (दृष्टि) आम्हीं बंद करतों, ज्याप्रमाणें (यथा इदं हर्म्यं तथा) या मंदिराचीं दारें बंद करतात [५]

स्वप्तु माता स्वप्तु पिता स्वप्तु श्वा स्वप्तु विश्पतिः। स्वपन्त्वस्यै ज्ञातयः स्वप्त्वयमभितो जनः॥६॥
स्वप्न स्वप्नाभिकरणेन सर्वं नि ष्वापया जनम्।
ओत्सूर्यमन्यान्त्स्वापयाव्युषं जागृतादुहमिन्द्र इवारिष्टो अक्षितः ॥ ७ ॥

अर्थ—(माता स्वप्तु, पिता स्वप्तु) माता झोंपी जावो, पिता झोंपी जावो, (श्वा स्वप्तु, विश्पतिः स्वप्तु) कुत्रा झोंपो आणि प्रजारक्षक झोंपो, (अस्यै ज्ञातयः स्वपन्तु) याच्या जातीचे लोक झोंपी जावोत, (अयं जनः अभितः स्वप्तु) हे सर्व चोंहोबाजूचे लोक झोंपी जावोत. [६]

हे (स्वप्न) झोंप ! (स्वप्न-अभिकरणेन) झोंपेच्या उपायानें (सर्वं जनं नि ष्वापय) सर्व लोकांस झोंपवा. (अन्यान् जनान् उषं वि आ-उत-सूर्यं स्वापय) दुसऱ्या लोकांस सूर्योदय होईपर्यंत झोंपवा. पण (अहं इन्द्र इव) मीं शूर पुरुषाप्रमाणें, (अ-रिष्टः अ-क्षितः) नाशरहित आणि क्षयरहित होऊन (जागृतात्) जागत रहावें. [७]

[हे सूक्त अत्यंत सरळ असल्यानें त्याचा भावार्थ देण्याची जरुरी नाहीं.]

गाढ झोंप आणण्याचा उपाय

या सूक्तांत मनाच्या दृढ भावनेनें गाढ झोंप प्राप्त करण्याचा उपाय सांगितला आहे. चंद्र उगवला असल्यास त्याच्या शीतलत्वाचें, शांतीचें ध्यान केल्यानें मन शांत होऊन गाढ झोंप येऊं शकते. (मं. १) थंड वारा वहात आहे अशा भावनेनें सुद्धां गाढ झोंप येऊं शकते. (मं. २) डोळे, इतर अवयव प्राण इत्यादीं शांति प्राप्त करून दिल्यानें सुद्धां झोंप येते. (मं. ४) तरुण स्त्रिया आणि पुरुष यांनीं प्रयत्नपूर्वक स्वतःच्या वृत्ति शांत ठेवल्यानें निद्रा येऊं शकते. मनाची शांति वाढविली पाहिजे, म्हणजे सुखानें झोंपतां येतें. जंगल रक्षणासाठीं कुत्र्यांस झोंपवावें. (मं. ६) जे संरक्षक पुरुष असतील त्यांनीं इतरांस शांततेनें झोंपूं द्यावें. परंतु स्वतः उत्तमप्रकारें जागृत राहून सर्वांचे रक्षण करावें. (मं. ७)

ऐश्वर्यमय संकट

कांड ५, सूक्त ७

(ऋषिः – अथर्वा । देवता – बहुदैवत्यम् ।)

आ नो भर मा परि ष्ठा अराते मा नो रक्षीर्दक्षिणां नीयमानाम्।
नमो वीर्त्साया असमृद्धये नमो अस्त्वरातये ॥ १ ॥
यमराते पुरोधत्से पुरुषं परिरापिणम्। नमस्ते तस्मै कृण्मो मा वनिं व्यथयीर्मम ॥ २ ॥

अर्थ— हे (अराते) दान न देणाऱ्या ! (नः आभर) आम्हांस भरपूर धन दे. आमच्यापासून (मा परि स्थाः) मोकळा होणार नाहीं. (नः नीयमानां दक्षिणां मा रक्षीः) आम्हीं आणलेली दक्षिणा तुझ्याजवळ ठेऊं नकोस. अशी (वीर्त्सायै असमृद्धये नमः) ईर्ष्यायुक्त असमृद्धीस माझा नमस्कार असो. आणि (अरातये नमः अस्तु) दान न देणाऱ्यास दुरूनच नमस्कार असो. [१]

हे (अराते) दान न देणाऱ्या ! (यं परिरापिणं पुरुषं पुरोधत्से) ज्या बडबडणाऱ्या पुरुषास तूं पुढें करतोस (ते तस्मै नमः कृण्मः) तुझ्या त्या पुरुषास नमस्कार करतों. पण (मम वनिं मा व्यथयीः) माझ्या मनांतील इच्छेस पीडा करूं नकोस. [२]

भावार्थ— दान देण्याच्या गुणानें संपत्तीचा संग्रह होतो, म्हणून तो गुण अमुक मर्यादेपर्यंत दूर सारूं नये. परंतु देण्यायोग्य दक्षिणेचें दानसुद्धां कमी होऊं नये. अशा मर्यादित कंजूस (कृपण) पणाचा आणि असमृद्धीचा आम्हीं आदर करतों. [१]

ज्या पुरुषावर सांगितल्याप्रमाणें अदानशीलतेचा प्रभाव पडला आहे त्याला सुद्धां आम्हीं नमस्कार करतों. असें असूनहि माझ्या मनांतील इच्छांनीं त्याचेकडून व्यथा न पोहोंचो. [२]

प्र णो वनिर्देवकृता दिवा नक्तं च कल्पताम् । अरातिमनुप्रेमो वयं नमो अस्त्वरातये ॥ ३ ॥
सरस्वतीमनुमतिं भगं यन्तो हवामहे । वाचं जुष्टां मधुमतीमवादिषं देवानां देवहूतिषु ॥ ४ ॥
यं याचाम्यहं वाचा सरस्वत्या मनोयुजा । श्रद्धा तमद्य विन्दतु दत्ता सोमेन बभ्रुणा ॥ ५ ॥
मा वनिं मा वाचं नो वीर्त्सीरुभाविन्द्राग्नी आ भरतां नो वसूनि ।
सर्वे नो अद्य दित्सन्तोऽरातिं प्रति हर्यत ॥ ६ ॥
परोऽपेह्यसमृद्धे वि ते हेतिं नयामसि । वेद त्वाहं निमीवन्तीं नितुदन्तीमराते ॥ ७ ॥
उत नग्ना बोभुवती स्वप्नया सचसे जनम् । अराते चित्तं वीर्त्सन्त्याकूतिं पुरुषस्य च ॥ ८ ॥
या महती महोन्माना विश्वा आशा व्यानशे । तस्यै हिरण्यकेश्यै निर्ऋत्या अकरं नमः ॥ ९ ॥

अर्थ- (नः देवकृता वनिः) आमची देवांमार्फत निर्मित इच्छा (दिवा नक्तं च कल्पतां) दिवस आणि रात्रीं समर्थ होवो. (वयं अरातिं अनुप्रेमः) आम्ही अदानशीलतेस प्राप्त होऊं (अरातये नमः अस्तु) अदान शक्तीला नमस्कार असो. [३]

(यन्तः सरस्वतीं अनुमतिं भगं हवामहे) हालचाल करणारे आम्हीं विद्या, सुमति आणि ऐश्वर्य यांस जवळ बोलावितों. (देवहूतिषु देवानां जुष्टां वाचं अवादिषं) देवांस बोलावण्याचे प्रसंगीं मीं देवांस प्रिय वचनेंच म्हणतों. [४]

(यं अहं मनोयुजा सरस्वत्या वाचा याचामि) म्हणून मीं उत्तम मनानें युक्त ज्ञानमय वाणी मागतों. (तं अद्य बभ्रुणा सोमेन दत्ता) भरणपोषण करणाऱ्या सोमानें ती आज दिलेली (श्रद्धा विदन्तु) श्रद्धा प्राप्त होवो. [५]

(नः वनिं मा) आमची भक्ति कमी करूं (लेखूं) नका, आणि (वाचं मा वि ईर्त्सीः) वाणीस सुद्धां अडवूं नका (उभौ इन्द्राग्नी नः वसूनि आभरतां) दोघे इंद्र आणि अग्नि आम्हांस धन प्राप्त करवोत (नः दित्सन्तः सर्वे) आम्हांस दान करणारे तुम्हीं सर्व (अरातिं प्रतिहर्यत) अदानशीलतेस विरोधासह प्राप्त व्हा. [६]

हे (असमृद्धे) असमृद्धे ! (परः अपः इहि) दूर निघून जा. (ते हेतिं विनयामसि) तुझ्या शस्त्रास आम्हीं निराळे करतों. हे (अराते) अदानशीलते ! (अहं त्वा निमीवन्तीं नितुदन्तीं वेद) मीं निर्बळ करणारी आणि आतून शोषणारी तूं आहेस असें जाणतों. [७]

हे (अराते) अदानशीलते ! (उत नग्ना बोभुवती) जास्त नग्न होऊन (जनं स्वप्नया सचसे) मनुष्यास आळसानें युक्त करतेस. याप्रमाणें (पुरुषस्य चित्तं आकूतिं च वि ईर्त्सन्ति) मनुष्याचें चित्त आणि संकल्प मलीन करतेस. [८]

(या महती महोन्माना) जो मोठी आणि विशाल असल्यामुळें (विश्वा आशा व्यानशे) सर्व दिशांस प्रसरलेली आहे (तस्यै हिरण्यकेश्यै निर्ऋत्यै) त्या सोनेरी केसाच्या विपत्तीला (नमः अकरं) मीं नमस्कार करतों. [९]

भावार्थ— देवांकडून प्रेरित झालेल्या आमच्या सदिच्छा रात्रंदिवस वाढत राहोत. आम्हास वर सांगितलेली अदानशीलता प्राप्त होवो. [३]

आम्हीं हालचाल करणारे लोक विद्या, सुमति आणि ऐश्वर्यांची इच्छा करतों. आम्हीं नेहमीं प्रिय भाषण करूं. [४]

मीं उत्तम सुसंस्कृत मन आणि ज्ञानमय वाणीला चाहतों. आम्हांस उत्तम श्रद्धा सुद्धां प्राप्त होवो. [५]

आमची सदिच्छा कधीं कमी न होवो आणि वाणी न अडखळो. देव आम्हांस धन देवो. दान देणारे सर्व दाते वर सांगितल्या-प्रमाणें अदानशीलतेस दुरून नमस्कार करोत. [६]

असमृद्धि दूर जावो. तुझ्या आघातास आम्ही दूर करतों. मीं जाणतों कीं असमृद्धीमुळें निर्बळता प्राप्त होते, आणि ती आतून कष्ट देते. [७]

कृपणता मनुष्यास नग्न आणि आळसु बनविते आणि मनुष्याच्या अंत:करणास आणि संकल्पास मलीन करते. [८]

ती खूप विशाल आहे आणि सर्वत्र प्रसरते. त्या सोनेरी रंगाच्या विपत्तीस दूरूनच नमस्कार असो. [९]

हिरण्यवर्णा सुभगा हिरण्यकशिपुर्मही । तस्यै हिरण्यद्रापयेऽरात्या अकरं नमः ॥ १० ॥

अर्थ-(हिरण्यवर्णा सुभगा) सोनेरी वर्णाची, ऐश्वर्ययुक्त (मही हिरण्यकशिपुः) मोठी सोन्याच्या वस्त्रानें युक्त (तस्यै हिरण्यद्रापये अरात्यै) त्या सोन्याच्या वस्त्रानें आच्छादित अदानशीलतेसाठीं (नमः अकरं) नमस्कार करतों. [१०]

भावार्थ—सोन्याप्रमाणें सुंदर, ऐश्वर्ययुक्त, सोन्याच्या आभूषणांनीं युक्त अशा अदानशीलतेला आम्हीं दूरूनच नमस्कार करतों. [१०]

ऐश्वर्यमय संकट

विपत्तिपूर्ण संपत्ति

आपत्तिपूर्ण विपत्ति आणि संपत्तिमय विपत्ति अशा दोन प्रकारच्या विपत्ति आहेत. दोन्ही निंदास्पदच आहेत; परंतु वेदांत पहिलीचा पूर्ण निषेध आणि दुसरीचा कांहीं नियमांनीं निषेध केलेला आहे. जी परिपूर्ण निर्धनतेसह अनंत–अगणित आपत्ति आणते तिला आपत्तिपूर्ण विपत्ति म्हणतात. अशी अवस्था पुरुषार्थानेंच दूर केली पाहिजे. परंतु दुसरी जी संपत्तियुक्त विपत्ति आहे, जिला भाषेंत ' कृपणता ' असें नांव आहे, त्या अवस्थेंत मनुष्याजवळ संपत्ति पुष्कळ असते. परंतु दान न करण्यामुळें घरांत भरपूर समृद्धि असूनहि त्याची स्थिति कंगाल असते. ही अवस्था सुद्धां दुरून नमस्कार करण्यालायक आहे आणि तिचेंच वर्णन या सूक्तांत केलें आहे.

पुष्कळ धनवान्–श्रीमंत आहे परंतु अत्यंत कृपण, हातून पैसा सुटत नाहीं, आवश्यक धर्मकृत्यासाठीं सुद्धां दान देत नाहीं, असा मनुष्य संपत्तियुक्त विपत्तीनीं घेरलेला असतो. त्याचें वर्णन या सूक्ताच्या नवव्या आणि दहाव्या मंत्रांत केलेलें आहे. ज्या वाचकांस या दोनहि मंत्रांचा आशय उत्तमप्रकारें समजेल त्यांना या सूक्ताचा सारांश समजणें कठीण जाणार नाहीं.

नवव्या मंत्रांत (हिरण्यकेशी निर्ऋती) सोनेरी केंसाच्या विपत्तीचें वर्णन आहे. येथें केसांत सोनें भरलेलें आहे अशी ही धनयुक्त निर्धनता आहे. अशांच्या जवळ पैसा असून ते दरिद्री असतात. त्यांचें जास्त वर्णन १० मंत्रांत आहे.

हिरण्यवर्णा, सुभगा हिरण्यकशिपुः मही;
हिरण्यद्रापी अरातिः । (मं. १०)

' सोन्याच्या वर्णानें युक्त, उत्तम भाग्यवती, सोन्याच्या शरीरानें युक्त, मोठी आणि सोन्याचे कपडे वापरणारी ही अदानशीलता आहे. ' ज्या श्रीमंताजवळ सोनेंचांदी पुष्कळ असतें इतर समृद्धि पाहिजे त्यापेक्षां जास्त असतें, घरांत सर्वत्र सोन्याचे ढीग पडले आहेत, कपडे, भांडीं आणि इतर साधनें सुद्धां सोन्याचीं केलेलीं आहेत, अशा महाधनवान पुरुषांत दान न करण्याची जी भावना असते तिला ' धनयुक्त निर्धनता ' म्हणतात. निर्धन मनुष्य जर दान करणार नाहीं तर तें एक वेळ समर्थनीय ठरेल. कारण कीं त्याचेजवळ दान करण्यास कांहीं असत नाहीं. परंतु ज्या मनुष्याजवळ संपत्ति भरपूर आहे आणि तरी तो सत्कर्मासाठीं दान देत नाहीं त्याला दूरूनच (नमः अकरं । मं. १०) नमस्कार केला पाहिजे. त्याचेजवळ जाणें सुद्धां योग्य नाहीं. अशा प्रकारची धनयुक्त विपत्ति पुष्कळ ठिकाणीं पहावयास सांपडते. त्याविषयीं नवव्या मंत्रांत म्हटलें आहे—

या महती महोन्माना विश्वा आशा व्यानशे । (मं. ९)

' ही संपत्तिमय विपत्ति फार मोठी आणि सर्व दिशांस प्रसरलेली आहे. ' म्हणजे तिच्या शिवाय अशी एकहि दिशा रिकामी नाहीं. प्रत्येक दिशेस या या संपत्तिमय विपत्तीनें घेरलेले लोक आहेत. एकहि गांव त्यांच्या वांचूनचें नाहीं. स्वतःच्या शक्तिपेक्षां जास्त दान देणारा अथवा जनतेच्या कल्याणासाठीं आत्म सर्वस्व संपूर्णपणें समर्पण करणारा उदार दाता महात्मा पुरुष असे फार थोडे असतात. परंतु पुष्कळ लोक अल्पदान करणारे अथवा दान न करणारे असे असतात. म्हणून नवव्या मंत्रांत म्हटलें आहे, कीं, ' ही दानहीनता फार मोठी आणि सर्वत्र प्रसरलेली आहे. एकहि शहर अथवा गांव तिच्याशिवायचें नाहीं. प्रशस्त कर्म करण्यासाठीं धनाची भीक मागणारा धर्मसेवक कुठल्याहि नगरांत गेला त्याला वर सांगितल्याप्रकारचे धनवान् असून निर्धनाप्रमाणें व्यवहार करणारे लोकच पुष्कळ चारीबाजूस पहावयास मिळतात. या अशा कृपणतेमुळें काय होतें तें पहा—

कृपणतेनें अधःपात

नग्ना बोभुवती स्वप्नया जनं सचते ।
अरातिः पुरुषस्य चित्तं आकूतिं च वीत्सयन्ती ॥
(मं. ८)

ही कृपणता जणूं स्वतः नग्न आहे तद्वत् इतर लोकांस सुद्धां स्वतःप्रमाणें नग्न आणि आळसू बनविते. ही कृपणता मनुष्याचें चित्त आणि संकल्प मलीन करते. उदार मनुष्य ज्याप्रमाणें नेहमीं

प्रसन्न चित्त रहातो आणि त्याला जसे सर्वत्र मित्र प्राप्त होतात त्याप्रकारें दान न देणाऱ्या कृपणास मिळत नाहींत. तो आळशी असतो. त्याचें चित्त आणि संकल्प मलीन असतात. तो कधीं प्रसन्नचित्त असत नाहीं. हें केवढें नुकसान आहे, त्याचा वाचकांनीं विचार करावा, आणि कृपणतेपासून संभाळून रहाण्याचा प्रयत्न करावा. कारण कीं ती कृपणता मनुष्यास मनुष्यत्वांतून वंचित करते. म्हणून सातव्या मंत्रांत म्हटलें आहे—

असमृद्धे ! परः अपेहि ते हेतिं विनयामसि ।
अराते ! अहं त्वा निर्मीवन्तीं नितुदन्तीं वेद ॥ (मं ७)

' हे असमृद्धे ! तूं दूर पळून जा. तुझीं शस्त्रें आम्हीं दूर करतों. मीं चांगल्या प्रकारें जाणतों कीं तूं मनुष्यास निर्बळ करणारी आणि आंतरिक दुःख देणारी आहेस. ' खरोखर पाहिलें तर ही दानहीनता कष्ट देणारी आहे म्हणून तिला दूर केलें पाहिजे. कोणी तिच्या आधीन होऊं नये. कारण कीं ती निर्बलता वाढविते. आंतरिक कष्ट देते. तिच्यामुळें मनुष्याचें अधःपतन होतें. म्हणून म्हटलें आहे कीं—

अरातिं प्रतिहर्यत । (मं. ६)

' कृपणतेचा विरोध करा. ' विरोध करून स्वतःमध्यें कृपणता न राहील अशी व्यवस्था करा आणि स्वतःमध्यें—

अद्य सर्वे दित्सन्तः । (मं. ६)

' आजच सर्वजण दान देण्यास उत्सुक व्हा. ' आपणांत कोणी कृपण न राहो. समाज असा उदारचित्त, दाता, महात्म्यानें युक्त होवो कीं त्यांत कधीं कृपणबुद्धांचा कोणी न दिसो.

हार्दिक इच्छा

आपली हार्दिक इच्छा काय असली पाहिजे ? त्याविषयीं विचार करतांना खालीं दिलेले मंत्रभाग आपणांसमोर असावेत.

१ **यन्तः सरस्वतीं अनुमतीं भगं हवामहे** । (मं. ४)
२ **जुष्टां मधुमतीं वाचं अवादिषम्** । (मं. ४)
३ **सरस्वत्या मनोयुजा वाचा यं याचामि तं अद्य श्रद्धा विन्दतु** । (मं. ५)

' (१) आम्हीं प्रगतीचा प्रयत्न करणारे लोक विद्या, सन्मति आणि ऐश्वर्य इच्छितों. (२) आम्हीं सेवन करण्यासारख्या गोड गोष्टीच करतों. (३) विद्या आणि सुविचारानें युक्त धन सुसंस्कृत वाणीनें ज्याचेजवळ आम्हीं मागतो, त्याचे जवळ श्रद्धा असो. ' वास्तविक आम्हीं असें इच्छितों कीं आम्हां सर्वांस चांगली बुद्धि, विद्या, संपत्ति प्राप्त होवो. आम्हीं त्यामुळेंच मधुर वाणीनें बोलतो. आम्हीं श्रेष्ठ सत्कर्म करूं इच्छितों, त्या कर्मासाठीं ज्याचे जवळ धन वगैरेची याचना करूं त्यांच्यात दान देण्याची बुद्धि असो. या प्रकारच्या दानानें जनतेच्या कल्याणाचीं प्रशस्ततम कार्ये केलीं जातात. त्यामुळें सर्वांचा उद्धार होईल आणि सर्वांचें यश वाढेल. तसेंच—

१ **नः देवकृता वनिः दिवा नक्तं वर्धताम्** । (मं. ३)
२ **न वनिं वाचं मा वीर्त्सीः** । (मं. ६)

' देवांकडून कमावलेली आमची ही श्रद्धामय बुद्धि रात्रंदिवस वाढत राहो. (२) या **श्रद्धा**-भक्तियुक्त वाणींत उणप न येवो. ' म्हणजे दानबुद्धि, परोपकाराची **भावना**, आणि आत्मसर्वस्व समर्पणाची श्रद्धा आमच्यांत स्थिर राहो, आणि वाढो. या धर्मबुद्धीनें परस्पर सहाय्यता करीत आम्हांस उन्नति प्राप्त होईल.

येथ पावेतों या सूक्ताच्या आठ मंत्रांचा विचार झाला. त्यावरून वाचकांस असा विचार पडेल कीं या सूक्ताचा मुख्य उपदेश कोणता ? दान न देणें अथवा कृपणतेची स्तुति करण्याचा विचार त्यांत नाहीं; परंतु मनुष्याच्या प्रगतीस हानी करणारी कृपणता जी आहे तिचा नाश करून उच्चता स्थापन करणाऱ्या श्रद्धायुक्त दानशूरतेकडे घेऊन जाणें हें या सूक्ताचें अभीष्ट आहे.

पहिल्या मंत्रांत सुद्धां दान न देणें अशा प्रवृत्तीस दुरूनच नमस्कार केला आहे. जी कृपणता **(दक्षिणां मा रक्षीः)** दान देण्यांत क्षति (हरकत) निर्माण करीत नाहीं म्हणजे दान देण्यास काढलेलें धनसुद्धां पुनः स्वतःच्या पेटींत बंद न करतां म्हणजे स्वतः योग्य दान देते ती वाईट नव्हे. त्या संग्रहवृत्तीनें **(आभर)** स्वतःजवळ भरपूर धन एकत्र करावें आणि ज्या प्रमाणांत खजिना भरेल त्या प्रमाणांत दानसुद्धां दिलें जावें परंतु जी **(अराति)** कृपणता असमृद्धीचें कंगाल परिस्थितीचें प्रदर्शन करविते आणि **(वीर्त्सा)** मलीनतायुक्त व्यवहार करविते ती हानिकारक आहे. या प्रथम मंत्राचा भाव विचार करण्यासारखा आहे. त्याचा भावार्थ असा कीं योग्य प्रमाणांत संग्रह करावा आणि योग्य दानसुद्धां द्यावें. जी कृपणता दरिद्रावस्थेचें प्रदर्शन करते ती हानिकारक आहे. धन जवळ असून सुद्धां दरिद्र्याप्रमाणें व्यवहार करण्याची बुद्धि ती हानिकारक होते. मनुष्यांत भले मोठें औदार्य गुण नसले तरी धन असून दारिद्र्यावस्था असल्याप्रमाणें वृत्ति तर दर्शविली नच पाहिजे.

अशा प्रकारचा या सूक्ताचा आशय आहे. जरी या सूक्तांत अदानशीलतेला नमस्कार केला असला तरीसुद्धां तो तशी वृत्ति दूर करण्यासाठीं लाक्षणिक आहे. या दृष्टीनें विचार केल्यानें या सूक्ताचा मोठा गंभीर आशय वाचकांच्या ध्यानीं येईल. हें सूक्त फार कठीण आहे, सहज समजेल असें सुगम नाहीं. तरीसुद्धां जर वाचक या स्पष्टीकरणांत सांगितल्याप्रमाणें मनन करतील तर त्यांना या सूक्ताचा आशय सहज समजूं शकेल.

घातक प्रयोगांस परत फिरविणें

कांड ५, सूक्त १४

(ऋषिः -- शुक्रः । देवता -- वनस्पतिः, कृत्याप्रतिहरणम् ।)

सुपर्णस्त्वान्वविन्दत्सूकरस्त्वाखनन्नसा । दिप्सौषधे त्वं दिप्सन्तमव कृत्याकृतं जहि ॥ १ ॥
अव जहि यातुधानानव कृत्याकृतं जहि । अथो यो अस्मान्दिप्सति तमु त्वं जह्योषधे ॥ २ ॥
रिश्यस्येव परीशासं परिकृत्य परि त्वचः । कृत्यां कृत्याकृते देवा निष्कमिव प्रति मुञ्चत ॥ ३ ॥
पुनः कृत्यां कृत्याकृते हस्तगृह्य परा णय । समक्षमस्मा आ धेहि यथा कृत्याकृतं हनत् ॥ ४ ॥
कृत्याः सन्तु कृत्याकृते शपथः शपथीयते । सुखो रथ इव वर्ततां कृत्या कृत्याकृतं पुनः ॥ ५ ॥
यदि स्त्री यदि वा पुमान्कृत्यां चकार पाप्मने । तामु तस्मै नयामस्यश्वमिवाश्वाभिधान्या ॥ ६ ॥
यदि वासि देवकृता यदि वा पुरुषैः कृता । तां त्वा पुनर्णयामसीन्द्रेण सयुजा वयम् ॥ ७ ॥

अर्थ- (सुपर्णः त्वा अन्वविन्दत्) गरुडानें तुला मिळविलें आणि (सूकरः त्वा नसा अखनत्) डुकरानें तुला स्वतःच्या नाकानें खोदून काढली आहे. हे औषधि ! (त्वं दिप्सन्तं दिप्स) तूं नाशकाचा नाश कर आणि (कृत्याकृतं अवजहि) हिंसा करणाऱ्यास मारून टाक. [१]

(यातुधानान् अवजहि) यातना देणाऱ्यांस मारून टाक. (कृत्याकृतं अवजहि) घातकाऱ्यास मारून टाक, (अथो यः अस्मान् दिप्सति) आणि जो आम्हांस मारूं इच्छितो, हे औषधि !(तं उ त्वं जहि) त्याला तूं मारून टाक. [२]

हे (देवाः) देव हो ! (रिश्यस्य परिशासं इव) हिंसकास चारी बाजूनीं खेचणाऱ्याप्रमाणें आणि (निष्कं इव) सुवर्णाच्या दागिन्याप्रमाणें, (त्वचः परि परिकृत्य) कातडीवर घाव (जखम) करून (कृत्याकृते कृत्य प्रतिमुञ्चतं) हत्या करणाऱ्यांच्याकडे त्यांचेंच प्रयोग परत करा. [३]

(पुनः कृत्यां हस्तगृह्य) पुनः कापण्याची साधनें हातांत धरून (कृत्याकृते परा णय) प्राणघातक उपाय करणाऱ्याकडे परत पाठवा. (अस्मै समक्षं आधेहि) त्याच्यासमोर ठेवा, (यथा कृत्याकृतं हनत् ; ज्यामुळें हिंसा करणारे मारले जावोत. [४]

(कृत्याः कृत्याकृते सन्तु) मारक साधन हिंसकाकडे परत फिरो. (शपथः शपथीकृते) शिव्या शिव्या देणाऱ्याकडे परत फिरोत. (सुखः रथः इव) सुख देणारा रथ ज्याप्रमाणें जातो त्याप्रमाणें (कृत्याः कृत्याकृतं पुनः वर्ततां) घातपाताचे उपाय घातक्याकडेच परत फिरोत. [५]

(यदि स्त्री यदि वा पुमान्) स्त्रीनें अथवा पुरुषानें (कृत्यां पाप्मने चकार) पापाच्या इच्छेनें घातक प्रयोग केला असेल, (तां उ तस्मै नयामसि) त्यांना त्यांच्याकडेच आम्हीं परत फिरवतों. (अश्वा-अभि-धान्या अश्व इव) घोड्यास बांधण्याची दोरी ज्याप्रमाणें घोड्याजवळ नेण्यांत येते. [६]

(यदि वा देवकृता असि) जर तूं देवांकडून केलेली असशील अथवा (यदि वा पुरुषैः कृता) मनुष्यांकडून केलेली असशील (तां त्वा वयं) अशा तुला आम्हीं (इन्द्रेण सयुजा) सहयोगी इंद्राकडून (पुनः नयामसि) परत फिरवतों. [७]

अग्ने पृतनाषाट् पृतनाः सहस्व । पुनः कृत्यां कृत्याकृते प्रतिहरणेन हरामसि ॥ ८ ॥
कृतव्यधनि विध्य तं यश्चकार तमिज्जहि । न त्वामचक्रुषे वयं वधाय सं शिशीमहि ॥ ९ ॥
पुत्र इव पितरं गच्छ स्वज इवाभिष्ठितो दश । बन्धमिवावक्रामी गच्छ कृत्ये कृत्याकृतं पुनः ॥ १० ॥
उदेणीव वारण्यभिस्कन्दं मृगीव । कृत्या कर्तारमृच्छतु ॥ ११ ॥
इष्वा ऋजीयः पततु द्यावापृथिवी तं प्रति । सा तं मृगमिव गृह्णातु कृत्या कृत्याकृतं पुनः ॥ १२ ॥
अग्निरिवैतु प्रतिकूलमनुकूलमिवोदकम् । सुखो रथ इव वर्ततां कृत्या कृत्याकृतं पुनः ॥ १३ ॥

अर्थ- हे (पृतनाषाट् अग्ने) संग्राम जिंकणाऱ्या तेजस्वी पुरुषा ! (पृतनाः सहस्व) शत्रुसेनेचा पराजय कर. (पुनः कृत्याकृते) पुनः घातपात करणाऱ्याकडे (प्रति हरणेन कृत्यां प्रति हरामसि) प्रतिहार करण्याच्या उपायानें घातक प्रयोग परत फिरवतों. [८]

हे (कृत-व्यधनि) घातकांचा वेध करणाऱ्या ! तूं (तं विध्य) तिचा वेध कर. (यः चकार तं इत् जहि) ज्यानें घात केला त्याचा नाश कर. (अचक्रुषे त्वां वधाय वयं न संशिशीमहि) हिंसा न करणाऱ्याच्या वधाला आम्हीं उत्तेजन देत नाहीं. [९]

(पुत्र इव पितरं गच्छ) पुत्राप्रमाणें पित्याजवळ जा. (स्वज इव अभिष्ठितः दश) वेटाळून टाकणाऱ्या सापाप्रमाणें घात करणाऱ्यास चाव. (बन्ध इव अवक्रामी) बंधनाजवळ जाण्याप्रमाणें जा. हे (कृत्ये) हिंसक कृत्या ! (कृत्याकृतं पुनः गच्छ) हिंसकाकडे परत जा. [१०]

(वारणी एणी इव मृगी इव) हत्तीण हरणीवर हल्ला करते तद्वत् (अभिस्कन्दं कर्तारं कृत्या उद् ऋच्छतु) हल्ला करणाऱ्या, घातकप्रयोग करणाऱ्याकडे घातकप्रयोग परत जावोत. [११]

हे द्यावापृथ्वी ! (सा कृत्या तं प्रति इष्वाः ऋजीयः पततु) तो घातकप्रयोग करणाऱ्याकडेच बाणाप्रमाणें सरळ परत जावो. आणि (मृग इव) हरणाप्रमाणें तो (तं कृत्याकृतं पुनः गृह्णातु) घातकप्रयोग करणाऱ्यास पकडो. [१२]

(अग्निः इव प्रतिकूलं) अग्निप्रमाणें प्रतिकूलतेनें आणि (उदकं इव अनुकूलं एतु) पाण्याप्रमाणें अनुकूलतेनें तो चालो. (सुखः रथः इव) सुखकारक रथाप्रमाणें (कृत्या कृत्याकृतं पुनः वर्ततां) घातकप्रयोग करणाराकडेच परत फिरोत. [१३]

दुष्कृत्यांचा परिणाम

दुष्कृत्य जर दुसऱ्याचा घातपात करण्यासाठीं करण्यांत आलें तर तें अंतीं करणाऱ्याचाच घात करतें, असा या सूक्ताचा तात्पर्यार्थ आहे. त्यांत कृत्या नांवाचे घातकप्रयोग कित्येक दुष्ट लोक करतात. असा जो विषय सांगितला आहे तो फार दुर्बोध आहे. आणि आज पावेतों त्याविषयीं आम्हांस कांहीं माहिती मिळालेली नाहीं. म्हणून त्याविषयीं आम्हीं कांहीं लिहूं शकत नाहीं. जर कोणा वाचकास अशा मारणप्रयोगाविषयीं निश्चित आणि सप्रयोग ज्ञान असेल तर त्यानें तें प्रसिद्ध करावें.

प्रथम वस्त्र-परिधान

कांड २, सूक्त १३

(ऋषिः – अथर्वा । देवता – अग्निः, नाना देवताः ।)

आयुर्दा अग्ने जरसं वृणानो घृतप्रतीको घृतपृष्ठो अग्ने ।
घृतं पीत्वा मधु चारु गव्यं पितेव पुत्रानभि रक्षतादिमम् ॥ १ ॥
परि धत्त धत्त नो वर्चसेमं जरामृत्युं कृणुत दीर्घमायुः ।
बृहस्पतिः प्रायच्छद्वास एतत्सोमाय राज्ञे परिधातवा उ ॥ २ ॥
परीदं वासो अधिथाः स्वस्तयेऽभूर्गृष्टीनामभिशस्तिपा उ ।
शतं च जीव शरदः पुरूची रायश्च पोषमुपसंव्ययस्व ॥ ३ ॥
एह्यश्मानमा तिष्ठाश्मा भवतु ते तनूः । कृण्वन्तु विश्वे देवा आयुष्टे शरदः शतम् ॥ ४ ॥

अर्थ— हे (अग्ने अग्ने) तेजस्वी अग्ने ! तू (आयुः-दा) जीवन देणारा (जरसं वृणानः) स्तुतीचा स्वीकार करणारा, (घृत-प्रतीक;) तुपाप्रमाणें तेजस्वी आणि (घृत-पृष्ठः) तुपाच सेवन करणारा आहेस. म्हणून (मधु चारु गव्यं घृतं पीत्वा) मधुर सुंदर गाईचें तूप पीऊन (पिता पुत्रान् इव) पिता ज्याप्रमाणें पुत्रांचें रक्षण करतो तसा तू (इमं अभिरक्षतात्) याचें चारी बाजूंनीं रक्षण कर. [१]

(नः इमं) आमच्या या पुरुषाला (परिधत्त) सर्वबाजूंनीं आधार देऊन धारण कर. (वर्चसा धत्त) तेजानें युक्त कर, याचें (दीर्घं आयुः जरामृत्युं कृणुत) दीर्घायुष्य तसेंच वृद्धावस्थेनंतर मृत्यु होवो. (बृहस्पतिः एतत् वासः) बृहस्पतीनें हें वस्त्र (सोमाय राज्ञे परिधातवै) सोमराजास धारण करण्यास (उ प्रायच्छत्) निश्चयें करून दिलें आहे. [२]

(इदं वासः स्वस्तये परि अधिथाः) हें वस्त्र स्वतःच्या कल्याणासाठीं धारण कर. (गृष्टीनां अभिशस्तिपा उ अभूः) तूं मनुष्यास विनाशांतून वांचविणारा निश्चयेंकरून असा झाला आहेस. याप्रकारें (पुरूचीः शरदः शतं च जीव) परिपूर्ण शंभर वर्षेंपर्यंत जीवंत रहा (रायः पोषं च उप सं व्ययस्व) धन आणि पोषणासाठीं कपडे वीण. [३]

(एहि, अश्मानं आतिष्ठ) ये, या दगडावर उभा रहा. (ते तनूः अश्मा भवतु) तुझें शरीर दगडाप्रमाणें दृढ होवो. (विश्वे देवाः) सर्व देव (ते आयुः शरदः शतं कृण्वन्तु) तुझें आयुष्य शंभरवर्षांचें करोत. [४]

भावार्थ— हे तेजस्वी देवा ! तूं जीवन देणारा, स्तुति ऐकणारा, तेजस्वी आणि हवनाचे वेळीं हवनमार्गानें तुपाचें सेवन करणारा आहेस, म्हणून मधूर सुंदर गाईचें तूप पीऊन या बालकाचें बाप ज्याप्रमाणें मुलाचें रक्षण करतो तद्वत् रक्षण कर. [१]

या बालकास चारी बाजूंनीं वस्त्र पांघरवा. त्याचें तेज वाढवा आणि त्याचें जीवन अतिदीर्घ करा म्हणजे अत्यंत वृद्धावस्थेनंतरच त्याला मृत्यु येवो. हें वस्त्र सर्वांत प्रथम कुलगुरु बृहस्पतीनें सोमराजास धारण करण्यासाठीं तयार केलें होतें, जें या बालकास धारण करविण्यांत येत आहे. [२]

हें स्वतःच्या कल्याणाची वृद्धि करण्यासाठीं धारण करा. मनुष्यास विनाशातून वाचविण्याचा हाच एक उपाय आहे, हेंच एक उत्तम साधन आहे. याप्रकारें शंभरवर्षांचें दीर्घजीवन प्राप्त करा. आणि धनाच्या आडव्या आणि (शरीर) पोषणाच्या उभ्या दोरांनीं तयार केलेलें हें वस्त्र उत्तम प्रकारें वीणा. [३]

येथें ये, या दगडावर उभा रहा, तुझें शरीर दगडाप्रमाणें सुदृढ होवो आणि त्यामुळें सर्व देव तुझें जीवन शंभर वर्षांचें करोत. [४]

*

यस्यं ते वासः प्रथमवास्यं१ हरामस्तं त्वा विश्वेऽवन्तु देवाः ।
तं त्वा भ्रातरः सुवृधा वर्धमानमनु जायन्तां बहवः सुजातम् ॥ ५ ॥

(**यस्य ते प्रथमवास्यं वासः हरामः**) जे तुला प्रथम धारण करण्यालायक वस्त्र असें हें वस्त्र आम्हीं आणलें आहे. (**तं त्वा विश्वेदेवाः अवन्तु**) अशा तुझें सर्व देव रक्षण करोत. (**तं त्वा सुजातं**) अशा उत्तम जन्म पावलेल्या तुला, आणि (**वर्धमानं**) वाढणाऱ्या बालकास (**बहवः सुवृधाः भ्रातरः अनु जायन्तां**) नंतर उत्तम वृद्धि पावणारे पुष्कळ बंधु उत्पन्न होवोत. [५]

हे बालका ! तुझ्यासाठीं हें प्रथम धारण करण्यासाठीं वस्त्र आम्हीं आणलें आहे सर्व देव तुझें पूर्ण रक्षण करोत. तूं या उत्तम कुळांत जन्मला आहेस आणि येथें तूं उत्तमप्रकारें वाढत आहेस. अशाप्रकारें तुझ्यामागून तुझे अनेक धष्टपुष्ट, सुदृढ बंधु उत्पन्न होवोत आणि तुझ्या कुळाची वृद्धि होवो. [५]

प्रथम वस्त्र-परिधान

प्रथम वस्त्र- परिधान

बालकाच्या शरीरावर प्रथम वस्त्र परिधान करविण्याचा समारंभ या सूक्तांत वर्णिला आहे. या सूक्ताचा प्रथम मंत्र अग्नींत तुपाचें हवन करण्याचें विधान करीत आहे. म्हणजे हवनापूर्वीचें सर्व विधान यापूर्वीं होऊन गेलें आहे, असें समजणें योग्य होईल. अग्निमध्यें परमात्म्याची शक्ति आहे. अग्नींत तूप वगैरे पदार्थांनीं प्रदीप्त करण्यांत येतें. आणि त्याचे समोर वस्त्र धारण करण्याचा विधि करण्यांत येतो. सर्व संस्कार अग्नींत हवन करण्यानंतर होतात. परमेश्वर स्तुति, प्रार्थना, उपासना, शांति, अभय मागणें वगैरे क्रिया पूर्ण झाल्यावर हवन करून प्रथम मंत्रांतील प्रभूची प्रार्थना करण्यांत यावी, किं तो परमपिता आमचें आणि आमच्या सर्व पुत्रांचें रक्षण करो. याप्रकारें वस्त्र परिधान करण्याची पूर्व तयारी केल्यानंतर वस्त्र आणण्यांत यावें–

पुत्रासाठीं वस्त्र

येथें हें ध्यानांत ठेवावें कीं हें वस्त्र बाजारांतून विकत आणावयाचें नाहीं. पण स्वतःच्या पुत्रासाठीं मातेनें विणलेलें असावें. त्याविषयीं वेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटलें आहे. तें येथें तुलना करून पहाण्यासारखें आहे–

वितन्वते धियो अस्मा अपांसि वस्त्रा ।
पुत्राय मातरो वयन्ति । (ऋ. ५।४७।६)

या मंत्रांत दोन वाक्यें आहेत आणि तीं विचार करण्यासारखीं आहेत. त्यांचा अर्थ पहा––

(१) **मातरः पुत्राय वस्त्राणि वयन्ति**– माता स्वतःच्या पुत्रासाठीं वस्त्र विणते आणि (२) **अस्मै धियः अपांसि वितन्वते**– या मुलासाठीं सुविचार आणि सत्कर्माची शिकवणूक देते.

हा मंत्र मातेचें पुत्राविषयीं कर्तव्य सांगत आहे. मातेनें स्वतःच्या पुत्रासाठीं वस्त्रें विणून तयार करावींत, त्यांत प्रत्येक ताण्यासह किती प्रेम त्या सुताच्या तंतूत विणलें जातें त्याचा विचार वाचकांनीं अवश्य करावा. हें वस्त्र नुसतें वस्त्र नाहीं तर या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रात म्हटलें आहे कीं—

रायः च पोषं उपसंव्ययस्व । (मं. ३)

' येथें कपडे विणण्याचें ऐश्वर्य हे उभे दोरे (ताणा) आणि पुष्टि हे आडवे दोरे (वीणा) आहेत याप्रकारें हें कापड (वस्त्र) विणलें जावें. ' खरोखर असेंच असावें कीं जेथें माता स्वतःच्या पुत्र प्रेमानें लहान बालकासाठीं कापड (वस्त्र) विणीत असावी. धन्य असो त्या बालकाची आणि त्या मातेची, जेथें असें प्रेम असेल तेंच त्या कुटुंबांत भूषण रूप आहे. अशा प्रकारचें वस्त्र या लहान बालकास घालण्यांत यावें त्यावेळीं मंत्र म्हणतो कीं—

परिधत्त, धत्त, नो वर्चसा इमम् ।
जरामृत्युं कृणुत, दीर्घमायुः ॥ (मं. २)

' धारण करवा, धारण करवा या आमच्या बालकास हें वस्त्र तेजासह हें बालक दीर्घायु होवो. वृद्धावस्थेनंतरच त्याचा मृत्यु होवो. त्याला अकालीं मरण न प्राप्त होवो. ' जेव्हां माता स्वतःच्या पुत्रासाठीं प्रेमानें कपडे (वस्त्र) विणते तेव्हां तें प्रेमच

बालकाचें रक्षण करण्यास समर्थशाली असते. म्हणून अशा प्रेमळ मातेचा पुत्र दीर्घायुष्यानें युक्त होतो.

नंतर दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे की, 'देवांचा कुलगुरु बृहस्पती यानें सोमराजास याप्रमाणें वस्त्र परिधान करविलें होतें.' म्हणजे ही प्रथा फार सनातन आहे. कुलाच्या पुरोहितानें मातेनें विणलेलें वस्त्र स्वतःच्या आशीर्वादानें बालकास धारण करावयाचें आणि सर्व उपस्थित सज्जनांनीं बालकाचें शुभचिंतन करावयाचें असें या वैदिक रीतीचें सामान्य स्वरूप आहे. वाचकांनीं त्याचा विचार करावा आणि असा शुभ संस्कार स्वतःचें घरांत घडवून आणावा,

वस्त्र घरांत विणण्याचें कारण

वस्त्र घरांत कां विणावयाचें आणि बाजारांतून विकत कां आणावयाचें नाहीं त्या विषयीं तिसऱ्या मंत्रांत जें सांगितलें आहे तें मनन करण्यालायक आहे. त्यांत या गृहउद्योगाचे चार लाभ वर्णिले आहेत—

१ स्वस्ति = कल्याण

इदं वासः स्वस्तये अधिथाः। (मं. ३)

'हें वस्त्र स्वतःच्या कल्याणासाठीं धारण करा.' '**स्वस्ति**' या अर्थ '**सु+अस्ति**' म्हणजे उत्तम अस्तित्व, स्वतःची स्थिति उत्तम होण्यासाठीं स्वतःच विणलेलें वस्त्र वापरलें पाहिजे. दुसऱ्यानें विणलेलें वस्त्र स्वतः परिधान केल्यानें स्वतःला '**स्वस्ति**' म्हणजे स्वतःचें कल्याण होत नाहीं. म्हणून स्वतः विणलेलें वस्त्र वापरावें.

२ विनाशापासून रक्षण

गृष्टीनां अभिशस्ति-पा उ अभूः। (मं. ३)

'मनुष्य मात्रांचें नाशापासून रक्षण करणारें आहे.' स्वतःचें वस्त्र स्वतः विणून वापरल्यामुळें स्वतःसच फक्त लाभ होतो असें नाहीं. परंतु संपूर्ण मनुष्यांस विनाशापासून वांचवितें, रक्षण करतें. त्यामुळें प्रत्येक मनुष्य उद्योगी होऊन त्यामुळें त्याचें रक्षण होतें, दुःस्थिति हीन अवस्था, नाश इत्यादींतून वांचविणारा वस्त्र विणण्याचा एक धंदा आहे.

३ धन आणि पुष्टि

हें घरीं विणलेलें वस्त्र फक्त वस्त्र नाहीं तसेंच त्याचे आडवे उभे दोरे निव्वळ सुताचे नाहींत. परंतु—

रायः च पोषं उपसंव्ययस्व। (मं. ३)

'त्यांत उभा दोरा ऐश्वर्य सूचक आणि आडवा दोरा पुष्टि सूचक आहे.' असें समजूनच तुम्ही वस्त्र विणा. स्वतःचें वस्त्र स्वतः विणण्यानें ऐश्वर्य आणि पोषण आपोआप प्राप्त होतें. आणि ज्या कुटुंबांत आणि ज्या परिवारांत माता स्वतःच्या बालकासाठीं वस्त्रें तयार करते तेथें तर त्या कुटुंबाचें ऐश्वर्य वाढण्याविषयीं आणि पोषण होण्याविषयीं कांहीं शंकाच रहात नाहीं. जेथें या प्रकारें सुख आणि शांति रहाते, तेथेंच—

४ दीर्घायुष्य

शतं च जीव शरदः पुरूचीः। (मं. ३)

'शंभर वर्षांचें दीर्घायुष्य प्राप्त होईल.' ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे. हा तिसरा मंत्र वास्तविक बालकास आशीर्वाद रूप आहे, तरीहि त्यांत स्वतः वस्त्र विणण्यांत काय महत्त्व आहे तें येथें सूक्ष्म रीतीनें दर्शविलें आहे. वाचकांनीं त्याचा विचार करावा आणि त्यापासून बोध प्राप्त करावा. तसेंच स्वतःच्या घरांत या महत्त्वपूर्ण गोष्टीचा प्रचार करावा. विशेषतः जे वैदिक धर्मी आहेत त्यांनीं तर असें आचरण अवश्य केलें पाहिजे.

सुदृढ शरीर

हातानें वीणलेलें वस्त्र धारण केल्यानें शरीर नाजुक होत नाहीं. इतर वस्त्र कापड वापरल्यानें तें नाजूक बनतें. हा कोमलपणा वाईटच, त्यामुळें शंभर वर्षांचें दीर्घजीवन प्राप्त होत नाहीं. म्हणून स्वतःचें शरीर सुदृढ करण्याची फार आवश्यकता आहे. बालपणींच हा उपदेश या सूक्तद्वारा केला आहे. या '**प्रथम वस्त्र परिधान करण्याच्या वेळीं**' एक विधि करण्यांत येतो. त्यांत वस्त्र धारण करतांच त्या बालकास एका दगडावर उभा करविण्यांत येतें आणि हा मंत्र म्हटला जातो—

एहि अश्मानं आतिष्ठ, ते तनूः अश्मा भवतु।
ते शरदः शतं आयुः विश्वे देवाः कृण्वन्तु॥ (मं. ४)

'येथें या दगडावर उभा रहा, तुझें शरीर दगडासारखें सुदृढ होवो. सर्व देव तुझें शंभर वर्षांचें आयुष्य सिद्ध करोत, म्हणजे तुला शंभर वर्षांचें दीर्घायुष्य देवोत.'

बालक सुदृढ अवयव आणि अंगाचें असलें पाहिजे याविषयीं उत्तम उपदेश या मंत्रांत आहे. बालपणांत माता पिता स्वतःचें बालक आणि बालिकांचें शरीर सुदृढ करण्याचा प्रयत्न करोत. त्यांनीं ज्यामुळें बालकें नाजूक, अशक्त, मृदु, नरम, कोमल शरीराची रहातील असें कांहीं करूं नये. वय वाढल्यावर सुद्धां बाल बालिकांनीं स्वतःचें शरीर सुदृढ आणि घाटदार करण्याचा

प्रयत्न करावा. याप्रमाणें ते करतील तर ते वज्रदेही होतील. वज्र शरीर तर योग्य साधनांनीं सुद्धां तयार करतां येतें. त्याविषयींचे प्रयोग वाचकांनीं योग्य साधनांत पहावे. शीत, उष्ण, इत्यादि द्वंद्व सहन करण्याच्या संवईनें सुद्धां मनुष्याचें शरीर सुदृढ होऊं शकतें.

नंतर पांचव्या मंत्राच्या पूर्वार्धांत सांगितलें आहे की हे बालका ! तुझ्यासाठीं आम्ही हें प्रथमच धारण करण्यालायक वस्त्र (**प्रथम वास्यं वासः**) आणलें आहे. या गोष्टीस सर्व देव सहाय्य करणारे होवोत. ' या मंत्रांत ' प्रथम परिधान करण्यायोग्य वस्त्रा ' चा उल्लेख आहे. त्यावरून बालकाविषयीं कल्पना येते. जन्मतः कित्येक महिनेपर्यंत तर बालकात विशेष वस्त्र परिधान करविण्यांत येत नाहीं. चौथ्या मंत्रांत ' दगडावर उभें करण्याचा ' उल्लेख आहे. त्यावरून स्वतः उभें राहूं शकत नाहीं, दुसऱ्याच्या मदतीनें उभें राहूं शकेल असें बालक असलें पाहिजे. या मंत्रावरून एवढें नक्की होतें की हें मूल ज्यावेळीं त्यास प्रथम वस्त्र परिधान करविण्यांत येते त्यावेळीं कमींत कमी दोन-तीन वर्षांच्या वयाचें असावें. या वयांत भले दुसऱ्याच्या कां होईना पण मदतीनें थोडा वेळ बालक दगडावर उभें राहूं शकतें. एवढें तर आपण म्हणूं शकतों की याहून कमी वय तर या कामास योग्य नाहींच. '**अश्मानं आतिष्ठ**' हा शब्दप्रयोग स्वतः होऊन दगडावर उभें रहाण्याचा भाव दर्शवितो. म्हणून मुलाचें वय तीन वर्षांपेक्षां कमी मानणें योग्य नाहीं. चार अथवा पांच वर्षे समजणें सुद्धां योग्य होईल. या वयाला हा वस्त्र धारण विधि करण्यांत येतो. यावेळीं अखेरीस जे आशिर्वाद देण्यांत येतात. तेसुद्धां बोधप्रद आहेत—

तं त्वा सुजातं वर्धमानम्
बहवः सुवृधाः भ्रातरः अनुजायन्ताम् । (मं. ५)

उत्तम जन्मानें आणि उत्तम प्रकारें वाढणाऱ्या तुला बाळकाला नंतर पुष्कळ वाढणाऱ्या भावांस तुझी माता जन्म देवो.'

कित्येक मातापितरें दरवर्षी संतान उत्पन्न करतात तें योग्य कीं अयोग्य त्याचा विचार या आशीर्वचनांवरून होऊं शकतो, तीन चार वर्षे वयाच्या बाळकाचा हा ' प्रथम वस्त्र परिधान करण्याचा विधि, ' करण्यांत येतो. त्याविषयीं पूर्वी सांगण्यांत आलें आहेच. याचवेळीं आशीर्वाद देण्यांत येतो की, ' ज्याप्रमाणें हें बालक हृष्टपुष्ट आणि तेजस्वी होऊन वाढत आहे अशींच आणखीं बाळकें याच्यामागून जन्मोत. ' समजा हा आशीर्वाद पहिल्या बालकाच्या चौथ्या वर्षी देण्यांत आला, त्याच्या पांचव्या वर्षी दुसऱ्या बालकाच्या जन्माची वेळ येईल. याप्रकारें प्रत्येक बालकांत पांचवर्षांचें अंतर असेल.

(१) एका बालकाचा जन्म, (२) त्याच्या चौथ्या वर्षी ' प्रथम वस्त्र परिधान करविण्याचा विधि ', (३) यांतच बाळकास दगडावर उभें करण्याचा विधि करावयाचा आणि दगडाप्रमाणें मजबूत शरीराचा होण्यास त्यास उपदेश करावयाचा. (४) याचवेळीं आशीर्वाद द्यावयाचा कीं तुझ्यासारखेच हृष्टपुष्ट भाऊ तुला होवोत.

जर याप्रमाणें दुसरें बाळक झालें तर पहिल्याच्या पांचव्या वर्षी दुसऱ्या बालकाच्या जन्माचा संभव आहे म्हणजे पहिल्या बाळकास मातेचें दूध चार वर्षे मिळेल, त्यामुळें त्याचे पोषण चांगल्याप्रकारें होईल. मातेचे अवयव सुद्धां द्वितीय गर्भधारणेसाठीं सुदृढ होतील आणि सर्व ठीक होईल. जेथें दरवर्षी गर्भधारण होतें तेथें बाळकास मातेचें दूध पुरेसें न मिळाल्यानें बाळक अशक्त रहातें. मध्यें पूर्ण विश्रांति न मिळाल्यामुळें मातासुद्धां निःशक्त बनते अशाप्रकारचें भय असते. म्हणून, वाचकांनीं याचा योग्य विचार करावा आणि जर ही पद्धति स्वतःच्या कुटुंबासाठीं योग्य वाटली तर त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करावा.

आम्हीं दरवर्षी, दर तीन वर्षांनीं, दर पांच वर्षांनीं दर सात वर्षांनीं संतानोत्पत्तिचें कार्य करणारीं कुटुंबें पाहिलीं आहेत. पहिल्यापेक्षां दुसऱ्याची, दुसऱ्यापेक्षां तिसऱ्याची शारीरिक आरोग्यता, सुदृढता आम्हीं पाहिली आहे. म्हणून हा विचार विशेष महत्त्वाचा वाटल्यानें आम्हीं येथें विस्तारपूर्वक त्याचें विवेचन केलें आहे. वाचकांनीं तें अश्लील समजूं नये कारण त्यावर सर्व कुटुंबाचें आरोग्य अवलंबून आहे.

वाचकांनीं या सूक्ताचा योग्य विचार करून बोध घ्यावा.

घातक प्रयोगांस असफल करणें

कांड १०, सूक्त १

(ऋषिः - प्रत्यङ्गिरसः । देवता - कृत्यादूषणम् ।)

यां कल्पयन्ति वहतौ वधूमिव विश्वरूपां हस्तकृतां चिकित्सवः। सारादेत्वप नुदाम एनाम् ॥ १ ॥
शीर्षण्वती नस्वती कर्णिनी कृत्याकृता संभृता विश्वरूपा । सारादेत्वप नुदाम एनाम् ॥ २ ॥
शूद्रकृता राजकृता स्त्रीकृता ब्रह्मभिः कृता । जाया पत्या नुत्तेव कर्तारं बन्ध्वृच्छतु ॥ ३ ॥
अनयाहमोषध्या सर्वाः कृत्या अदूदुषम् । यां क्षेत्रे चक्रुर्यां गोषु यां वा ते पुरुषेषु ॥ ४ ॥
अघमस्त्वघकृते शपथः शपथीयते । प्रत्यक्प्रतिप्रहिण्मो यथा कृत्याकृतं हनत् ॥ ५ ॥
प्रतीचीन आङ्गिरसोऽध्यक्षो नः पुरोहितः । प्रतीचीः कृत्या आकृत्यामून्कृत्याकृतो जहि ॥ ६ ॥
यस्त्वोवाच परेहीति प्रतिकूलमुदाय्यम् । तं कृत्येऽभिनिवर्तस्व मास्मानिच्छो अनागसः ॥ ७ ॥

अर्थ— (चिकित्सवः) निर्माण करणारे लोक (यां हस्तकृतां विश्वरूपां कल्पयन्ति) जी कृत्या घातक प्रयोगांना स्वतःच्या हातानीं अनेक रूपयुक्त करते, ज्याप्रमाणें (वहतौ वधूं इव) वरातीचे वेळीं वधूस शृंगारतात, (सा) ती कृत्या ते घातकप्रयोग (आरात् एतु) दूर निघून जावोत. (एनां अप नुदामः) त्या घातकप्रयोगांस आम्हीं दूर करतों. [१]

(विश्वरूपा शीर्षण्वती नस्वती कर्णिनी) अनेक रूपांची, मस्तकांची नाकांची तसेंच कानांची (कृत्याकृता संभृता) तयार केलेली कृत्या जी तयार झाली आहे (सा आरात् एतु) ती दूर जावो (एनां अप नुदामः) तिला आम्हीं दूर करतों. [२]

(पत्या नुत्ता जाया इव) पतीनें सोडलेल्या स्त्रीप्रमाणें (कर्तारं बन्धुं) पित्याजवळ अथवा भावाजवळ जाते तद्वत् (शूद्रकृता, स्त्रीकृता, राजकृता, ब्रह्मभिः कृता) शूद्र स्त्री, राजा, अथवा ब्राह्मणाकडून केली गेलेली कृत्या (कर्तारं ऋच्छतु) करणाऱ्याकडे परत जावो. [३]

(यां क्षेत्रे) जी कृत्या–घातकप्रयोग–शेतांत (यां गोषु) जी गाईवर केली जाते (यां वा ते पुरुषेषु चक्रुः) अथवा जी तुझ्या पुरुषांत पुरुषांवर केली जाते, (सर्वाः ताः कृत्याः) ते घातकप्रयोग (अहं अनया ओषध्या अदूदुषं) या औषधीनें मीं असफल बनवितों. [४] (अथर्व. ४।१८।५ अपामार्ग औषधि)

(अघकृते अघं अस्तु) पापकृत्य करणारास त्याचें पाप प्राप्त होवो. (शपथीयते शपथः) शाप देणाऱ्यास शाप लागो. (प्रत्यक् प्रति प्रहिण्मः) आम्हीं सर्व वाईटपणा परत पाठवितों. (यथा कृत्याकृतं हनत्) ज्यामुळें घातकप्रयोग करणाराचा नाश होवो. [५]

(प्रतिचीनः आंगिरसः) घातकप्रयोगांस परत फिरविण्यांत शक्तिशाली, आंगिरसी विद्येंत कुशल (अध्यक्षः नः पुरोहितः) अध्यक्षच आमचा मुख्य नेता आहे. तो (कृत्याः प्रतीचीः आकृत्य) घातकप्रयोगांस परत काढतो आणि तो या साधनांनीं (अमून् कृत्याकृतः जहि) त्या घातपात करणाऱ्यांचा नाश करो. [६]

हे (कृत्ये) घातकप्रयोगा ! (यः त्वा ' परा इहि ' इति उवाच) ज्या प्रयोग करणाऱ्यानें तुला ' पुढें हो ', असें म्हटलें, (तं प्रतिकूलं उदाय्यं अभिनिवर्तस्व) त्या विरोध करणाऱ्या शत्रूजवळ जा आणि (अनागसः अस्मान् मा इच्छः) निरपराधी आमच्यासारख्यांची इच्छा करूं नकोस म्हणजे आमच्यावर आक्रमण करूं नकोस. [७]

यस्ते परूंषि संदुधौ रथस्येवर्भुर्धिया । तं गच्छ तत्र तेऽयनमज्ञातस्तेऽयं जनः ॥ ८ ॥
ये त्वा कृत्वालेभिरे विद्वला अभिचारिणः ।
शम्भ्वी३दं कृत्यादूषणं प्रतिवर्त्म पुनःसरं तेन त्वा स्नपयामसि ॥ ९ ॥
यद्दुर्भगां प्रस्नपितां मृतवत्सामुपेयिम । अपैतु सर्वं मत्पापं द्रविणं मोप तिष्ठतु ॥ १० ॥
यत्ते पितृभ्यो ददतो यज्ञे वा नाम जगृहुः । संदेश्या३त्सर्वस्मात्पापादिमा मुञ्चन्तु त्वौषधीः ॥ ११ ॥
देवैनसात्पित्र्यान्नामग्राहात्संदेश्यादभिनिष्कृतात् ।
मुञ्चन्तु त्वा वीरुधो वीर्येण ब्रह्मण ऋग्भिः पयस ऋषीणाम् ॥ १२ ॥
यथा वातश्च्यावयति भूम्या रेणुमन्तरिक्षाच्चाभ्रम् । एवा मत्सर्वं दुर्भूतं ब्रह्मनुत्तमपायति ॥ १३ ॥
अप क्राम नानदती विनद्धा गर्दभीव । कर्तॄन्नक्षस्वेतो नुत्ता ब्रह्मणा वीर्यावता ॥ १४ ॥

हे कृत्ये ! (ऋभुः धिया रथस्य परूंषि) ज्याप्रमाणें सुतार स्वतःच्या बुद्धीनें रथाचे निरनिराळे भाग तयार करतो त्याप्रमाणेंच (या ते परूंषि संदधौ) जे तुझ्या घातकप्रयोगाचे अवयव होतात, ते निर्माण करणाऱ्याजवळ (तं गच्छ) परत जा. (तत्र ते अयनं) तेथेंच तुला परत पोहोंचवो. (अयं जनः ते अज्ञातः) हा मनुष्य तुला अज्ञात असो म्हणजे त्याच्यावर तुझा हल्ला न होवो, घातकप्रयोग त्यांना निर्माण करणाऱ्याजवळ परत पोहोंचोत. [८]

(ये विह्वलाः=विह्वराः अभिचारिणः) जे लुच्चे घातकप्रयोग करणारे (त्वा कृत्वा) हे कृत्ये तुला तयार करून (आलेभिरे) धारण करतात. घातकप्रयोगांना (कृत्यादूषणं इदं) प्रतिकार करणारें हें (शं-भु) शुभसाधन आहे. (पुनःसरं प्रतिवर्त्म) तें पुनः घातकप्रयोगास परत करणारें आहे, म्हणून (तेन त्वा स्नपयामसि) त्यानें तुला स्नान घडवितों. म्हणजे त्यामुळें तुझे सर्वदोष दूर होवोत. [९]

(यत् दुर्भगां प्रस्नपितां मृतवत्सां) ज्या दुर्भाग्ययुक्त, स्नान केलेल्या मेलेल्या पुत्रांच्या आईस (उप ईयिम) प्राप्त करण्यास जें कार्य करावें लागतें तें (मत् सर्वं पापं अप एतु) सर्वच पाप माझ्यापासून दूर जावो आणि (द्रविणं मा उप तिष्ठतु) द्रव्य मजजवळ येवो. [१०]

हे मनुष्या ! (यत् पितृभ्यः ददतः) जे पितरांस देतांना अथवा (यज्ञे वा) यज्ञांत (ते नाम जगृहुः) तुझें नांव घेतात, (इमाः ओषधीः) या औषधि त्या (संदेश्यात् सर्वस्मात् पापात्) सर्व होणाऱ्या पापापासून (त्वा मुञ्चन्तु) तुला मुक्त करो. [११]

हे मनुष्या ! (वीरुधः) औषधि (त्वा) तुला (देव-एनसात् पित्र्यात्) देवतासंबंधींच्या पापांपासून, पितरासंबंधीं पापापासून (नामग्राहात् संदेश्यात) निंद्य नांव घेण्याच्या तसेंच वाईट अपशब्द बोलण्याच्या पापांतून (अभिनिः कृतात्) अपमान करण्याच्या पापांतून (ब्रह्मणः वीर्येण) ज्ञानाच्या बळानें (ऋग्भिः) मंत्रांच्या शक्तीनें आणि (ऋषीणां पयसा) ऋषींच्या अमृतानें तुला (मुञ्चन्तु) मुक्त करो. [१२]

(यथा वातः) ज्याप्रमाणें वारा (भूम्याः रेणुं अंतरिक्षात् अभ्रं) भूमीवरील धूळ आणि आकाशांतील ढगांस (च्यावयति) उडवून लावतो, उधळून टाकतो (एवा सर्वं दुर्भूत) त्याप्रमाणें सर्व दुष्ट भाव (ब्रह्मनुत्तं अपायति) ज्ञानानें निवारण होऊन दूर होतात. [१३]

हे कृत्ये ! (विनद्धा गर्दभी इव) बंधनांतून सुटलेल्या गाढवीप्रमाणें (नानदती अप क्राम) शब्द करीत दूर निघून जा. (वीर्यावता ब्रह्मणा) वीर्ययुक्त ज्ञानानें (नुत्ता) परत फेंकलेली (इतः कर्तॄन् नक्षस्व) येथून कर्त्या-जवळ पळून जावो. [१४]

अयं पन्थाः कृत्येति त्वा नयामोऽभिप्रहितां प्रति त्वा प्र हिण्मः ।
तेनाभि याहि भञ्जत्यनस्वतीव वाहिनी विश्वरूपा कुरूटिनी ॥ १५ ॥
पराक्ते ज्योतिरपथं ते अर्वागन्यत्रास्मदयना कृणुष्व ।
परेणेहि नवतिं नाव्याः अति दुर्गाः स्रोत्या मा क्षणिष्ठाः परेहि ॥ १६ ॥
वात इव वृक्षान्नि मृणीहि पादय मा गामश्वं पुरुषमुच्छिष एषाम् ।
कर्तॄन्निवृत्येतः कृत्येऽप्रजास्त्वाय बोधय ॥ १७ ॥
यां ते बर्हिषि यां श्मशाने क्षेत्रे कृत्यां वलगं वा निचख्नुः ।
अग्नौ वा त्वा गार्हपत्येऽभिचेरुः पाकं सन्तं धीरतरा अनागसम् ॥ १८ ॥
उपाहृतमनुबुद्धं निखातं वैरं त्सार्यन्वविदाम कर्त्रम् ।
तदेतु यत आभृतं तत्राश्व इव वि वर्ततां हन्तु कृत्याकृतः प्रजाम् ॥ १९ ॥

अर्थ—हे कृत्ये! (अयं पन्थाः त्वा अति नयामः) हा मार्ग आहे, त्यापासून तुला दूर घेऊन जातों. (अभि प्रहितां त्वा प्रति प्रहिण्मः) आमच्यावर फेंकलेल्या तुला आम्हीं परत फेंकतों. (तेन भञ्जति अभि याहि) म्हणून तोडून पुढें जा. (अनस्वती विश्वरूपा कुरूटिनी वाहिनी इव) रथयुक्त अनेक रूपांचे भयंकर शब्द करीत ज्याप्रमाणें सेना जाते तद्वत्. [१५]

हे कृत्ये ! (ते ज्योतिः पराक्) तुला परत जाण्यास पुढें प्रकाश दिसो, (ते अर्वाक् अपथं) तुला इकडे परत येण्यास रस्ता न दिसो. (अस्मत् अन्यत्र अयना कृणुष्व) आम्हांस सोडून इतरत्र जा. (नाव्याः दुर्गाः नवतिं स्रोत्याः अति परेण इहि) नौकेनें दुर्गम अशा नव्वद नद्यांना पार करून दूर निघून जा. (मा क्षणिष्ठाः) मारूं नकोस, (परा इहि) दूर निघून जा. [१६]

हे कृत्ये ! (वातः वृक्षान् इव) वारा झाडें तोडतो त्याप्रमाणें तूं (कर्तॄन् नि मृणीहि) हिंसा करणाऱ्यांचा नाश कर आणि (नि पादय) त्यांस उलथून टाक. (एषां गां अश्वं पुरुषं मा उच्छिषः) त्यांच्या गाई घोडे आणि पुरुष यांना शिल्लक ठेवूं नकोस. (इतः निवृत्य) येथून परत जाऊन (अप्रजास्त्वाय बोधय) संततिनाशाची धमकी घातकप्रयोग करणाऱ्यांस दे. [१७]

(यां कृत्यां ते बर्हिषि) जो घातक प्रयोग तुझ्या धान्यांत (यां श्मशाने) जो स्मशानांत आणि (क्षेत्रे निचख्नुः) शेतांत पुरला आहे, जो (गार्हपत्ये अग्नौ अभिचेरुः) प्रयोग गार्हपत्य अग्नींत अभिचार कर्म करून केलेला असतो, (पाकं अनागसं सन्तं त्वा) तूं पवित्र आणि निष्पाप झाल्यानंतर सुद्धां (धीरतराः) धूर्त लोकांनीं जें अभिचार कर्म केलें असेल तें निर्बल करतों. [१८]

(उपाहृतं अनुबुद्धं) आणलेलें आणि जाणलेलें (नि-खातं वैरं त्सारि कर्त्रं अनुविदाम) पुरून ठेवलेल्या वैररूपी विनाशक अभिचार प्रयोगाचें ज्ञान मला झालें आहे. (यतः आभृतं तत् एतु) जेथून तो आला असेल तेथें तो परत जावो. (तत्र अश्व इव वर्ततां) तेथें घोड्याप्रमाणें भ्रमण कर आणि (कृत्याकृतः प्रजां हन्तु) अभिचार प्रयोग करणाऱ्यांच्या संततीचा नाश करो. [१९]

स्वायसा असयः सन्ति नो गृहे विद्मा ते कृत्ये यतिधा परूंषि ।
उत्तिष्ठैव परेहीतोऽज्ञाते किमिहेच्छसि ॥ २० ॥
ग्रीवास्ते कृत्ये पादौ चापि कर्त्स्यामि निर्द्रव । इन्द्राग्नी अस्मान्रक्षतां यौ प्रजानां प्रजावती ॥ २१ ॥
सोमो राजाधिपा मृडिता च भूतस्य नः पतयो मृडयन्तु ॥ २२ ॥
भवाशर्वावस्यतां पापकृते कृत्याकृते । दुष्कृते विद्युतं देवहेतिम् ॥ २३ ॥
यद्येयथ द्विपदी चतुष्पदी कृत्याकृता संभृता विश्वरूपा ।
सेतोऽष्टापदी भूत्वा पुनः परेहि दुच्छुने ॥ २४ ॥
अभ्यक्ताक्ता स्वरंकृता सर्वं भरन्ती दुरितं परेहि । जानीहि कृत्ये कर्तारं दुहितेव पितरं स्वम् ॥ २५ ॥
परेहि कृत्ये मा तिष्ठो विद्धस्येव पदं नय । मृगः स मृगयुस्त्वं न त्वा निकर्तुमर्हति ॥ २६ ॥
उत हन्ति पूर्वासिनं प्रत्यादायापर इष्वा । उत पूर्वस्य निघ्नतो नि हन्त्यपरः प्रति ॥ २७ ॥

अर्थ— (स्वायसा असयः न गृहे सन्ति) उत्तम लोखंडाच्या तरवारी आमच्या घरांत आहेत. हे कृत्ये ! (ते परूंषि विद्म) तुझे सांधे आम्हीं जाणतों कीं ते (यतिधा) किती आणि कोणत्या प्रकारचे आहेत. (उत्तिष्ठ एव, इतः परा इहि) ऊठ आणि येथून दूर पळून जा. हे (अज्ञाते) अज्ञात मारण-प्रयोग ! (इह किं इच्छसि) येथें तूं कसली इच्छा करतोस. [२०]

हे कृत्ये ! (ते ग्रीवाः पादौ च अपि कर्त्स्यामि) तुझें डोकें आणि पाय मीं कापून टाकतों. तूं येथून (निर्द्रव) पळून जा. (इन्द्राग्नी अस्मान् रक्षतां) इंद्र आणि अग्नि आमचें रक्षण करो. ज्याप्रमाणें (यौ प्रजानां प्रजावती) संततीचें रक्षण माता करते. [२१]

(सोमः राजा मृडिता) राजा सोम आम्हांस सुख देवो तसेंच (भूतस्य पतयः नः मृडयन्तु) भूतांचा स्वामी आम्हांस सुख देवो. [२२]

(भवाशर्वौ देवहेतिं विद्युतं) भव आणि शर्व हे देव देवांच्या वीजरूपी शस्त्राला (कृत्याकृते दुष्कृते पापकृते) घातक दुराचारी पाप्यांवर (अस्यतां) फेंको. [२३]

(यदि कृत्याकृता संभृता विश्वरूपा) जो मारणप्रयोग तयार होऊन अनेक रूपें धारण करतो. (द्विपदी चतुष्पदी एयथ) दोन अथवा चार पायांचा होऊन आमच्या जवळ आला तर, हे (दुच्छुने ! सा इतः अष्टापदी भूत्वा पुनः परा इहि) दुःख देणाऱ्या कृत्ये ! अशी तूं आठ पायांची होऊन म्हणजे त्वरित चालणारी होऊन जेथून आलीस तेथें परत जा. [२४]

(अभ्यक्ता अक्ता स्वरंकृता) पुष्कळ तेल माखलेली आणि सुशोभित केलेली (सर्वं दुरितं भरन्ती) सर्व प्रकारची दुर्दशा करणारी तूं (परा इहि) दूर निघून जा. (दुहिता स्वं पितरं इव) ज्याप्रमाणें कन्या स्वतःच्या पित्यास जाणते, त्याप्रमाणें तूं (कर्तारं जानीहि) स्वतःच्या कर्त्यास जाण. [२५]

हे कृत्ये ! (परा इहि) दूर निघून जा. (मा तिष्ठ) येथें राहूं नको. (विद्धस्य इव पदं नय) घायाळ झालेल्या जनावराजवळ ज्याप्रमाणें शिकारी जातो, तद्वत् तूं स्वतःच्या स्थानीं पोहोंच. (मृगः सः मृगयुः त्वं) तो हरीण आहे आणि तूं शिकारी आहेस (त्वा निकर्तुं न अर्हसि) त्याला चावणें तुला योग्य नाहीं म्हणून तूं परत जा. [२६]

(पूर्वासिनं अपरः प्रति आदाय इष्वा हन्ति) प्रथम बसलेल्या शत्रूस दुसरा शत्रु पकडून बाणानें मारतो आणि (पूर्वस्य निघ्नतः अपरः प्रति नि हन्ति) पहिला हटकून मारूं लागला म्हणजे दुसरा सुद्धां समोर मारूं लागतो, याप्रमाणें परस्पर लढतात. [२७]

एतद्धि शृणु मे वचोऽथेहि यत एयथ । यस्त्वा चकार तं प्रति ॥ २८ ॥
अनागोहत्या वै भीमा कृत्ये मा नो गामश्वं पुरुषं वधीः ।
यत्रयत्रासि निहिता ततस्त्वोत्थापयामसि पर्णाल्लघीयसी भव ॥ २९ ॥
यदि स्थ तमसावृता जालेनाभिहिता इव । सर्वाः संलुप्येतः कृत्याः पुनः कर्त्रे प्र हिण्मसि ॥ ३० ॥
कृत्याकृतो वलगिनोऽभिनिष्कारिणः प्रजाम् । मृणीहि कृत्ये मोच्छिषोऽमून्कृत्याकृतो जहि ॥ ३१ ॥
यथा सूर्यो मुच्यते तमसस्परि रात्रिं जहात्युषसश्च केतून् ।
एवाहं सर्वं दुर्भूतं कर्त्रं कृत्याकृता कृतं हस्तीव रजो दुरितं जहामि ॥ ३२ ॥

अर्थ— (एतत् हि मे वचः शृणु) हें माझें बोलणें ऐक (अथ एहि यतः एयथ) आणि जेथून आलीस तेथें परत जा. (यः त्वा चकार तं प्रति) ज्यानें तुला निर्माण केलें त्याच्याजवळ घातक प्रयोग परत जावो. [२८]

हे कृत्ये ! तूं (अनागः हत्या भीमा) निरपराध्याचा वध करणारी अशी भयंकर आहेस (न गां अश्वं पुरुषं मा वधीः) आमच्या गाई, घोडे आणि मनुष्यें यांचा वध करूं नकोस. (यत्र यत्र निहिता असि) जेथें जेथें तुला ठेवण्यांत आलें आहे (ततः त्वा उत्थापयामसि) तेथून तुला उपटून-उखडून टाकतों. (पर्णात् लघीयसी भव) तूं पानापेक्षांही लहान हो. [२९]

(यदि तमसा आवृताः स्थ) जर तूं अंधारानें झांकलेली असशील तर ज्याप्रमाणें (जालेन अभिहिता इव) जाळ्यांत गुरफटल्याप्रमाणें तुझ्यासह (सर्वाः कृत्याः इतः संलुप्य) सर्व घातक प्रयोग येथून लुप्त करून त्यांना मीं (पुनः कर्त्रे इतः प्र हिण्मसि) परत कर्त्याजवळ येथून परत पाठवतों. [३०]

हे कृत्ये ! (कृत्याकृतः वलगिनः) घातक प्रयोग करणारी बलशाली दुष्ट (प्रजा अभि निः कारिणः मृणीहि) जी प्रजेचा नाश करते तिचा तूं नाश कर. (अमून् कृत्याकृतः उच्छिषः) त्या घातकर्मांपैकीं एक सुद्धां जिवंत न राहो. त्या सर्वांना (जहि) मारून टाक. [३१]

(यथा सूर्यः तमसः परि मुच्यते) ज्याप्रमाणें सूर्य अंधारांतून सुटतो, (रात्रिं उषसः केतून् जहाति) रात्र उषेच्या किरणांस टाकते, (एवं अहं कृत्याकृता कृतं) याप्रमाणें मीं घातक प्रयोगांनीं केलेल्या (दुर्भूतं कर्त्रं जहामि) दुष्ट कृत्याचा त्याग करतों. ज्याप्रमाणें (हस्ती रजः इव) हत्ती धूळ उडवतो, त्याप्रमाणें सहजपणें मीं शत्रूच्या दुष्ट घातक प्रयोगांस दूर करतों. [३२]

कृत्या प्रयोग

' कृत्या ' प्रयोग, ज्यामुळें कोणास मारून टाकण्यांत येतें त्याला म्हणतात. कोणाच्या घरांत, शेतांत, खाण्यापिण्याच्या वस्तूंत, कपड्यांत अथवा कोण्या अन्य ठिकाणीं कांहीं मारक वस्तु ठेवण्यांत येते-तिच्या परिणामानें तो मरतो. त्या प्रयोगास कृत्या प्रयोग अथवा मारकप्रयोग म्हणतात.

एका कानाची, डोळ्याची अथवा एका नाकपुडीची मूर्ति करून, ती खूप सुशोभित करतात, जो कोणी त्या मूर्तीस स्पर्श करतो तो मरतो. मूर्तिशिवाय दुसरी सुद्धां कांहीं वस्तु करण्यांत येते. तिच्यामुळें मारण करतां येतें

या प्रयोगांत काय करावयाचें असतें, त्याचा विधि काय आहे, त्याची आज कोणास माहिती नाहीं. त्याविषयीं आज कांहीं ग्रंथहि उपलब्ध नाहीं, त्यामुळें या प्रयोगाविषयीं आम्हीं जास्त कांहीं सांगूं शकत नाहीं.

अशा प्रकारच्या प्रयोगाचा परिणाम आपल्या लोकांवर न व्हावा आणि असा घातक प्रयोग त्याच्या निर्माण कर्त्याजवळ परत जावा, अशा कार्यासाठीं हें सूक्त इच्छाशक्तिसह वाचल्यानें मानसिक शक्ति प्राप्त होते. त्या शक्तीनें वर सांगितलेले घातक प्रयोग फिरतात आणि ज्यानें ते निर्माण केले त्याच्याजवळ परत जाऊन त्याचाच बळी घेतात.

सर्व मंत्रांचा आशय असाच आहे आणि तो स्पष्ट आहे. आतां हा प्रयोग कसा रीतीनें करावयाचा अथवा परत कसा फिरवावयाचा हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. कोणी मंत्रशास्त्रज्ञ, कोणी खरा जाणकार त्या विषयाचा असला तर तोच जास्त हकीकत सांगूं शकेल. म्हणून त्याविषयीं आम्हीं कांहीं लिहित नाहीं. असें म्हणून या सूक्ताचें हें विवरण पुरें करतों.

*

ईर्ष्या-निवारण

कांड ६, सूक्त १८

(ऋषिः – अथर्वा । देवता – ईर्ष्याविनाशनम् ।)

ई॒र्ष्याया॒ ध्राजिं॑ प्रथ॒मां प्र॑थ॒मस्या॑ उ॒ताप॑राम् । अ॒ग्निं हृ॑द॒य्यं१ शोकं॒ तं ते॒ निर्वा॑पयामसि ॥ १ ॥
यथा॑ भूमि॑र्मृ॒तम॑ना मृ॒तान्मृ॒तम॑नस्तरा । य॒थोत म॒म्रुषो॒ मनं॑ ए॒वेर्ष्यो॑र्मृ॒तं मनः॑ ॥ २ ॥
अ॒दो यत्ते॑ हृ॒दि श्रि॒तं म॑न॒स्कं प॑तयि॒ष्णुक॑म् । तत॑स्त ई॒र्ष्यां मु॑ञ्चामि॒ निरू॒ष्माणं॒ दृते॑रिव ॥ ३ ॥

अर्थ — (ते ईर्ष्यायाः प्रथमां ध्राजिं) तुझ्या ईर्ष्येच्या पहिल्या लहरीस-वेगास (उत प्रथमस्याः अपरां) आणि पहिल्या गतिनंतरच्या गतीस तसेंच (हृदय्यं तं शोकं अग्निं) हृदयांत रहाणाऱ्या त्या शोकरूपी अग्नीला (निर्वापयामसि) आम्हीं दूर करतों. [१]

(यथा भूमिः मृतमनाः) ज्याप्रमाणें जमीन मेल्या मनाची आहे. किंवा (मृतात् मृतमनस्तरा) मेल्यापेक्षा सुद्धां जास्त मेलेल्या मनाची आहे (उत यथा मम्रुषः मनः) आणि ज्याप्रमाणें मरणाऱ्याचें मन असतें (एव ईर्ष्योः मनः मृतं) तद्वत् मत्सर-ईर्ष्या करणाऱ्याचें मन मेलेलें असतें. [२]

(अदः यत् ते हृदि श्रितं) जें तुझ्या हृदयांत राहिलेलें आहे, (पतयिष्णुकं मनस्कं) अधःपतन पावणारें संकुचित मन आहे, (ततः ते ईर्ष्यां निः मुञ्चामि) तेथून तुझ्या ईर्ष्या-मत्सरास दूर करतों. (दृतेः ऊष्माणं इव) ज्याप्रमाणें भात्यांतील हवा काढून टाकावी. [३]

मत्सरा (ईर्ष्या) स दूर करणें

दुसऱ्याची उन्नति पाहून ती सहन न होणें यास ' ईर्ष्या ' असें म्हणतात. जेव्हां दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाहीं तेव्हां मनांत मत्सर निर्माण होतो. अशी ईर्ष्या किती नुकसानकारक आहे तें पहा—

(१) **हृदय्यं शोकं अग्निं**- हृदयांत शोक निर्माण करते, शोकामुळें हृदय जळतें आणि ही आग जीवनास क्षीण करते. (मं. १)

(२) **ईर्ष्योः मृतं मनः**- मत्सर करणाऱ्याचें मन मेलेलें असतें, मेल्यासारखें असतें, मनांत कांहीं शुभ विचार येत नाहींत. मन जीवनहीन, निर्जीव होतें. म्हणून त्यास ' **मृतमनाः** ' मेलेल्या मनाचा म्हणतात. तो (**मृतात् मृतमनस्तरः**) प्रेतापेक्षां सुद्धां जास्त मेलेला असतो. (मं. २)

(३) **पतयिष्णुकं मनस्कं**- त्याचें मन अधःपतन पावणारें असतें आणि अत्यंत संकुचित असतें. (मं. ३)

पहा मत्सर किती घातक आहे, हृदयास जाळतो, मनास मारतो आणि सर्वांस अधोगतीस नेतो. म्हणून अशा मत्सरास मनांतून दूर केलें पाहिजे. मत्सर दूर होण्यानें हृदय शांत होतें, मन सजीव होतें, मनुष्य चैतन्ययुक्त कार्य करण्यास प्रवृत्त होतो, आणि उन्नति पावतो, सद्विचारांनीं परिपूर्ण होतो. म्हणजे मत्सरास दूर केलें असतां मनुष्य स्वतःची उन्नति करून घेऊं शकतो. परंतु जर मत्सर मनांत राहिला तर नुकसान होतें म्हणून शक्य त्या प्रयत्नांनीं मनुष्यानें मत्सरास स्वतःच्या मनांतून दूर करावें.

उद्धारक क्षत्रिय

कांड ७, सूक्त १०३

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - आत्मा ।)

को अस्या नो द्रुहोऽवद्यवत्या उन्नेष्यति क्षत्रियो वस्य इच्छन् ।
को यज्ञकामः क उ पूर्तिकामः को देवेषु वनुते दीर्घमायुः ॥ १ ॥

अर्थ— (कः = प्रजापतिः क्षत्रियः वस्यः इच्छन्) प्रजेचें पालन करणारा क्षत्रिय प्रजेचें धन वाढविण्याची इच्छा करीत, **(अस्याः अवद्यवत्याः द्रुहः नः उन्नेष्यति)** तो परस्पर द्रोहरूपी अशा निंद्य दुर्गतींतून आम्हांस वांचवो. **(कः = प्रजापतिः यज्ञकामः)** प्रजेचें पालन करणें हाच एक प्रकारचा यज्ञ करणारा **(उ कः पूर्तिकामः)** आणि तोच प्रजेचें पालन करणारा आमची पूर्णता करणारा आहे. **(देवेषु कः दीर्घं आयुः वनुते)** देवांमध्यें प्रजापालकच दीर्घायुष्य देतो. [१]

या सूक्तांत उद्धारक क्षत्रियाचे गुण वर्णन केले आहेत. म्हणून त्याचा विशेष विचार करण्यासारखा आहे.

१ **कः क्षत्रियः= (कः= प्रजापतिः= प्रजापालकः । क्षत्रियः क्षतात् त्रायते)** दुःखांतून जो प्रजाजनांचें रक्षण करतो त्याला प्रजापालक क्षत्रिय म्हणतात. प्रजारक्षण हा एक क्षत्रियांचा मुख्य गुण आहे. ' **कः** ' या शब्दाचा अर्थ एक प्रजापालक, एक राजा असा आहे.

२ **वस्यः इच्छन् = (वसुः इच्छन्)** धनाची इच्छा करणाऱ्या प्रजेचें ऐश्वर्य वाढविण्याची इच्छा करणारा क्षत्रिय असला पाहिजे.

३ **अस्याः अवद्यवत्याः द्रुहः नः उन्नेष्यति-** अशा निंद्य, आपसांत कलह, भांडण, परस्पर द्रोह, कपट, विश्वासघात करण्याच्या आमच्या अवस्थेंतून आमचा प्रजाजनांचा उद्धार करणारा क्षत्रिय असतो. क्षत्रियाचें हें कर्तव्यच आहे. तो प्रजेला असें शिक्षण देतो कीं ज्यामुळें आपआपसांत भांडणें, ईर्ष्या, मत्सर, द्रोह लोक सोडून देतात.

४ **यज्ञकामः क्षत्रियः =** सत्कार, संगति-दानात्मक कर्माचें नांव यज्ञ आहे. संगतिकरण, संगठनरूपी यज्ञ करणारा म्हणजे प्रजाजनांचें संगठन करणारा क्षत्रिय असावा. क्षत्रियानें प्रजेंत आपआपसांत कधीं फाटाफूट पाडूं नये आणि आपसांतील मत्सरास वाढण्यास वाव देऊं नये.

५ **पूर्तिकामः क्षत्रियः-** प्रजाजनांच्या सर्व इच्छांची पूर्तता करणारा राजा असावा. प्रजाजनांत जो कांहीं कमीपणा असेल, न्यून असेल, तें त्यानें पूर्ण करावें. स्वतःच्या प्रजेंत कांहीं अपूर्णत्व राहूं देऊं नये.

६ **दीर्घं आयुः वनुते-** प्रजेस दीर्घायुष्य प्राप्त होईल अशी व्यवस्था करणारा राजा असला पाहिजे. राजानें राज्यशासनाची अशी व्यवस्था करावी कीं जेणेंकरून प्रजा दीर्घायुषी होईल, कधीं अल्पायुषी न व्हावी.

या सूक्ताचा वाचकांनीं अशाप्रकारें विचार करावा आणि प्रजेच्या उद्धारकाविषयीं उत्तम बोध प्राप्त करून घ्यावा.

युद्धाची रीत

कांड ११, सूक्त १०

(ऋषिः - भृग्वंगिराः । देवता - त्रिषन्धिः)

उत्तिष्ठत सं नह्यध्वमुदाराः केतुभिः सह । सर्पा इतरजना रक्षांस्यमित्राननु धावत ॥ १ ॥
ईशां वो वेद राज्यं त्रिषंधे अरुणैः केतुभिः सह । ये अन्तरिक्षे ये दिवि पृथिव्यां ये च मानवाः ।
त्रिषंधेस्ते चेतसि दुर्णामान उपासताम् ॥ २ ॥
अयोमुखाः सूचीमुखा अथो विकङ्कतीमुखाः ।
क्रव्यादो वातरंहस आ संजन्त्वमित्रान्वज्रेण त्रिषंधिना ॥ ३ ॥
अन्तर्धेहि जातवेद आदित्य कुणपं बहु । त्रिषंधेरियं सेना सुहितास्तु मे वशे ॥ ४ ॥
उत्तिष्ठ त्वं देवजनार्बुदे सेनया सह । अयं बलिर्व आहुतस्त्रिषंधेराहुतिः प्रिया ॥ ५ ॥
शितिपदी सं द्यतु शरव्येऽयं चतुष्पदी । कृत्येऽमित्रेभ्यो भव त्रिषंधेः सह सेनया ॥ ६ ॥
धूमाक्षी सं पततु कृधुकर्णी च क्रोशतु । त्रिषंधेः सेनया जिते अरुणाः सन्तु केतवः ॥ ७ ॥

अर्थ— हे (उदाराः) स्वतःच्या जीवनावर उदार झालेल्या सैनिकांनों ! (केतुभिः सह उत्तिष्ठत, सं नह्यध्वं) स्वतःचे ध्वज हातांत घेऊन उठा आणि तयार व्हा. हे (सर्पाः इतरजनाः) साप आणि इतर लोक हो ! हे (रक्षांसि) राक्षस हो ! आमच्या (अमित्रान् अनुधावत) शत्रूंवर हल्ला करा. [१]

हे (त्रिषंधे) त्रिषंधि वज्रयुक्त वीरा ! (अरुणैः केतुभिः सह) लाल ध्वजासह (ईशां वः राज्यं वेद) तुम्हां सर्व अधिकाऱ्यांचेंच हें राज्य आहे असें मी समजतों. (ये अन्तरिक्षे, ये दिवि, पृथिव्यां च ये मानवाः) जे अंतरिक्षांत, द्युलोकांत आणि या पृथ्वीवर मनुष्य आहेत त्यांत (दुः-नामानः) दुष्ट नांवाचे जे आहेत, ते सर्व लोक (ते त्रि-संधे चेतसि उपासतां) त्रिसंधी वीरांच्या चित्तांत राहोत म्हणजे ते वीर त्यांचा योग्य विचार करोत. [२]

(त्रिषंधिना वज्रेण) तीन सांध्याच्या वज्रासह (अयोमुखाः सूचीमुखाः) लोखंडी तोंडाचे, सुईसारख्या टोकाचे (अथो विकंकति मुखाः) तीक्ष्ण फणीसारख्या तोंडाचे (क्रव्यादः वातरंहसः) मांस खाणारे आणि वायु-वेगानें जाणारे बाण (अमित्रान् आ सजन्तु) शत्रुवर जाऊन पडोत. [३]

हे जातवेद आदित्या ! (बहु कुणपं अंतः धेहि) तूं शत्रूसेनेचीं पुष्कळ प्रेतें जमिनीवर पाड. (त्रिषंधेः इयं सेना) तीन सांध्याचें वज्र धारण करणारी ही सेना (मे वशे सुहिता अस्तु) चांगल्याप्रकारें माझ्या ताब्यांत राहो. [४]

हे (देवजन अर्बुदे) दिव्यजन शत्रुनाशक वीर हो ! (त्वं सेनया सह उत्तिष्ठ) तूं सेनेसह ऊठ. (वः अयं बलिः आहुतः) तुमच्यासाठीं हा शत्रुरूपी बळी आणला आहे, (त्रिषंधेः आहुतिः प्रिया) तीन सांध्याच्या नांवानें प्रख्यात असणाऱ्या वज्राला या बळीची आहुति अत्यंत प्रिय आहे. [५]

(शितिपदी चतुष्पदी इयं शरव्या) पांढऱ्या पायाची तसेंच ही चार पायाची बाणाची ओळ शत्रूंचा (सं द्यतु) नाश करो. हे (कृत्ये) विनाश करणारे हो ! (त्रि-सन्धेः सेनया सह) त्रिसंधी नांवाचें वज्र धारण करणाऱ्या सेनेसह (अमित्रेभ्यः भव) शत्रूंचा नाश करण्यास तयार हो. [६]

(धूमाक्षी सं पततु) धुरानें डोळे पीडित होऊन शत्रुसेना खालीं पडो. (कृधुकर्णी च क्रोशतु) कानांत पीडा निर्माण होऊन शत्रुसेना रडत राहो. (त्रिषंधेः सेनया जिते) त्रिषंधी सेनेचा जय झाल्यानें (अरुणाः केतवः सन्तु) लाल रंगाचे ध्वज वर समारणांत यावेत. [७]

अवायन्तां पक्षिणो ये वयांस्यन्तरिक्षे दिवि ये चरन्ति ।
श्वापदो मक्षिकाः सं रभन्तामामादो गृध्राः कुणपे रदन्ताम् ॥ ८ ॥
यामिन्द्रेण संधां समधत्था ब्रह्मणा च बृहस्पते ।
तयाहमिन्द्रसंधया सर्वान्देवानिह हुव इतो जयत मामुतः ॥ ९ ॥
बृहस्पतिराङ्गिरस ऋषयो ब्रह्मसंशिताः । असुरक्षयणं वधं त्रिषंधिं दिव्याश्रयन् ॥ १० ॥
येनासौ गुप्त आदित्य उभाविन्द्रश्च तिष्ठतः । त्रिषंधिं देवा अभजन्तौजसे च बलाय च ॥ ११ ॥
सर्वाँल्लोकान्त्समजयन्देवा आहुत्यानया । बृहस्पतिराङ्गिरसो वज्रं यमसिञ्चतासुरक्षयणं वधम् ॥ १२ ॥
बृहस्पतिराङ्गिरसो वज्रं यमसिञ्चतासुरक्षयणं वधम् ।
तेनाहममूं सेनां नि लिम्पामि बृहस्पतेऽमित्रान्हन्म्योजसा ॥ १३ ॥
सर्वे देवा अत्यायन्ति ते अश्नन्ति वषट् कृतम् । इमां जुषध्वमाहुतिमितो जयत मामुतः ॥ १४ ॥

अर्थ— (ये दिवि अन्तरिक्षे च चरन्ति) जे द्युलोकांत व अंतरिक्षांत संचार करतात ते (वयांसि अव-अयन्तां) पक्षी इकडे येवोत. (श्वापदः मक्षिकाः सं रभन्तां) हिंस्र पशु, माशा वगैरे शत्रुंची प्रेतें खाऊं लागोत. (आमादः गृध्राः कुणपे रदन्तां) कच्चें मांस खाणारीं गिधाडें प्रेतें खावोत. [८]

हे बृहस्पते ! (इंद्रेण ब्रह्मणा च यां संधां) इंद्र आणि ब्रह्मदेव या दोघांकडून जो संधि (समधत्थाः) केला गेला होता, (तया इंद्र संधया अहं सर्वान् देवान्) त्या इंद्राच्या संधीनें मीं सर्व देवांना (इह हुवे) येथें बोलावतों आणि सांगतों कीं (इतः जयत मा अमुतः) येथें विजयी व्हा, अन्यत्र नाहीं. [९]

(आंगिरसः बृहस्पतिः) अंगिरसाचा बृहस्पति आणि (ब्रह्मसंशिताः ऋषयः) ज्ञानानें तीक्ष्ण झालेले सर्व ऋषि, (असुरक्षयणं त्रिषंधि वधं) असुरनाशक त्रिषंधी नामक वज्राचा (दिवि आश्रयन्) द्युलोकांत आश्रय घेतात. [१०]

(येन असौ आदित्यः गुप्तः) ज्याच्यामुळें हा आदित्य सुरक्षित झाला आहे (उभौ इंद्र च तिष्ठतः) आणि दुसरा इंद्र हे दोघे सुरक्षित झाले आहेत, (त्रिषंधि ओजसे बलाय च) त्रिषंधी नांवाच्या वज्राला ओज आणि बलासाठीं (देवाः अभजन्त) देवांनीं स्वीकृत केलें आहे. [११]

(आंगिरसः बृहस्पतिः यं असुरक्षयणं वधं) आंगिरस बृहस्पतीनें ज्या असुरविनाशक वज्राला (असिंचत) शिंपून तयार केलें, (अनया आहुत्या) त्या वज्रास स्वीकारल्यानें (देवाः सर्वान् लोकान् अजयन्) सर्व देवांनीं सर्व लोकांस जिंकून घेतलें. [१२]

(आंगिरसः बृहस्पतिः यं असुरक्षयणं वधं वज्रं असिंचत) आंगिरस बृहस्पतीनें जें असुरनाशक वज्र शिंपडून तयार केलें, (तेन अमूं सेनां नि लिंपामि) त्या वज्रानें या शत्रूसेनेला नष्ट करतों. हे बृहस्पति ! (ओजसा अमित्रान् हन्मि) सामर्थ्यानें शत्रूंचा नाश करतों. [१३]

(ये वषट् कृतं अश्नन्ति) जे वषट्काराच्या उच्चारासह अन्न भक्षण करतात, ते (सर्वे देवाः अति-आयन्ति) सर्व देव शत्रूचें अतिक्रमण करतात, (इमां आहुतिं जुषध्वं) या आहुतीचा स्वीकार करा आणि (इतः जयत, मा अमुतः) येथें शत्रूंस जिंकून घ्या, इतरत्र नको. [१४]

सर्वे देवा अत्यायन्तु त्रिषंधेराहुतिः प्रिया । संधां महतीं रक्षत ययाग्रे असुरा जिताः ॥ १५ ॥
वायुरमित्राणामिष्वग्राण्याञ्चतु । इन्द्र एषां बाहून्प्रति भनक्तु मा शकन्प्रतिधामिषुम् ।
आदित्य एषामस्त्रं वि नाशयतु चन्द्रमा युतामगतस्य पन्थाम् ॥ १६ ॥
यदि प्रेयुर्देवपुरा ब्रह्म वर्माणि चक्रिरे ।
तनूपानं परिपाणं कृण्वाना यदुपोचिरे सर्वं तदरसं कृधि ॥ १७ ॥
क्रव्यादानुवर्तयन्मृत्युना च पुरोहितम् । त्रिषंधे प्रेहि सेनया जयामित्रान्प्र पद्यस्व ॥ १८ ॥
त्रिषंधे तमसा त्वममित्रान्परि वारय । पृषदाज्यप्रणुत्तानां मामीषां मोचि कश्चन ॥ १९ ॥
शितिपदी सं पतत्वमित्राणाममूः सिचः । मुह्यन्त्वद्यामूः सेना अमित्राणां न्यर्बुदे ॥ २० ॥
मूढा अमित्रा न्यर्बुदे जह्येषां वरंवरम् । अनया जहि सेनया ॥ २१ ॥
यश्च कवची यश्चाकवचोऽमित्रो यश्चाज्मनि । ज्यापाशैः कवचपाशैरज्मनाभिहतः शयाम् ॥ २२ ॥

अर्थ—(सर्वे देवाः अति आयन्तु) सर्व देव शत्रूंवर हल्ला करोत. (त्रिषंधेः आहुतिः प्रिया) त्रिषंधी वज्राला बलिदान प्रिय असते. (यथा अग्रे असुराः जिताः) ज्यांनीं सुरवातीस राक्षसांचा पराजय केला होता, ते (महतीं संधां रक्षत) तुम्ही सर्व मिळून महान संधीचें रक्षण करा. [१५]

(वायुः अमित्राणां इष्वग्राणि अञ्चतु) वायु शत्रूंच्या बाणांच्या अग्रभागांस नष्ट करो. (इंद्रः एषां बाहून् प्रतिभनक्तु) इंद्र त्यांचे बाहू कापून टाको. ते शत्रु (इषुं प्रतिधां मा शकन्) बाण धनुष्यावर ठेवण्यास समर्थ न होवोत. (आदित्यः एष अस्त्रं विनाशयतु) सूर्य त्यांच्या अस्त्रांचा नाश करो आणि (चंद्रमा आगतस्य पन्थां युतां) चंद्रमा अप्राप्त शत्रूंचा रस्ता अडवून ठेववो. [१६]

(यदि देवपुराः प्रेयुः) देवांसमोरचे म्हणजे शत्रु रूप राक्षस येथून दूर पळून गेले आहेत आणि त्यांनीं (ब्रह्म वर्माणि चक्रिरे) ज्ञानानीं चिलखत तयार केलें आहे आणि (तनूपानं परिपाणं कृण्वानाः) शरीराचें आणि गांव वगैरे सर्वांचे रक्षण करीत बसले आहेत आणि जे (उपोचिरे) संघटन करीत आहेत (तत् सर्वं अरसं कृधि) तें त्यांचें सर्व कार्य निष्फळ करा. [१७]

हे त्रिषंधे ! (क्रव्यादा अनुवर्तयन्) मांस भक्षकास घेऊन (मृत्युना च पुरोहितं) मृत्यू पुढें ठेवून (सेनया प्रेहि) सेनेसह पुढें जा. (अमित्रान् जय प्रपद्यस्व) शत्रूंस जिंक आणि त्यांना प्राप्त कर म्हणजे स्वतः-च्या आधीन कर. [१८]

हे त्रिषंधे ! (त्वं अमित्रान् तमसा परि वारय) तूं शत्रूंना अंधारानें घेरून टाक. (पृषद्-आज्य-प्रणुत्तानां अमीषां) पृषदाज्यानें प्रेरित झालेले या शत्रूंपैकीं (कश्चन मा मोचि) कोणासहि मोकळें सोडूं नकोस. [१९]

(शितिपदी अमित्राणां अमूः सिचः संपततु) पांढऱ्या पायाची शक्ति शत्रूंच्या या सेनेवर हल्ला करो. हे न्यर्बुदे ! (अद्य अमूः अमित्राणां सेनाः मुह्यन्तु) आज ही शत्रुसेना मोहित होवो. [२०]

हे न्यर्बुदे ! (अमित्राः मूढाः) शत्रु मूर्ख होवोत. (एषां वरं वरं जहि) त्यांच्या नेत्यांचा-मुख्यांचा पराजय कर आणि त्यांना (अनया सेनया जहि) या सेनेच्या सहाय्यानें जिंकून घे अथवा मारून टाक. [२१]

(यः च कवचः) जे कवच धारण करणारे आहेत (यः च अकवचः अमित्रः) आणि जे कवच धारण न करणारे परंतु शत्रु आहेत (यः च अज्मनि) आणि जे रथांत आहेत ते सर्व शत्रु (ज्यापाशैः कवचपाशैः अज्मना अभिहतः शयां) धनुष्याच्या दोरीच्या पाशानें आणि कवचाच्या पाशानें तसेंच रथाच्या आघातानें घायाळ होऊन खालीं पडोत. [२२]

ये वर्मिणो येऽवर्माणो अमित्रा ये च वर्मिणः । सर्वांस्ताँ अर्बुदे हतांछ्वानोऽदन्तु भूम्याम् ॥ २३ ॥
ये रथिनो ये अरथा असादा ये च सादिनः। सर्वानदन्तु तान्हतान्गृध्राः श्येनाः पतत्रिणः॥ २४ ॥
सहस्रकुणपा शेतामामित्री सेना समरे वधानाम् । विविद्धा ककजाकृता ॥ २५ ॥
मर्माविधं रोरुवतं सुपर्णैरदन्तु दुश्चितं मृदितं शयानम् ।
य इमां प्रतीचीमाहुतिममित्रो नो युयुत्सति ॥ २६ ॥
यां देवा अनुतिष्ठन्ति यस्या नास्ति विराधनम् । तयेन्द्रो हन्तु वृत्रहा वज्रेण त्रिषंधिना ॥ २७ ॥

अर्थ— (ये वर्मिणः ये अवर्माणः) जे कवच धारण करणारे आहेत आणि जे कवच न धारण करणारे आहेत आणि (ये च वर्मिणः अमित्राः) जे कवचधारी शत्रु आहेत, हे अर्बुदे! (तान् सर्वान् हतान्) त्या सर्व मारलेल्यांना (भूम्यां श्वानः अदन्तु) जमिनीवर कुत्रे खाऊन जावोत. [२३]

(ये रथिनः ये अरथाः) जे रथांत बसलेले आहेत आणि जे रथरहित आहेत, (ये असादाः ये च सादिनः) ज्यांच्याजवळ घोडे नाहींत आणि जे घोड्यांवर स्वार झाले आहेत, (सर्वान् तान् हतान्) त्या सर्व मारण्यांत आलेल्या शत्रूंना (गृध्राः श्येनाः पतत्रिणः अदन्तु) गिधाडें, ससाणे इत्यादि पक्षी खावोत. [२४]

(समरे वधानां आमित्री सेना) युद्धांत मेलेली शत्रूची सेना (विविद्धा ककजाकृता शेतां) शस्त्रानें विद्ध होऊन आणि विकृत आकाराची होऊन खालीं पडो. [२५]

(यः अमित्रः) जे शत्रु (नः इमां प्रतीचीं आहुतिं युयुत्सति) आमच्या या पूर्वाभिमुख आलेल्या सैन्याची आहुतिसह युद्ध करूं इच्छितात, (सुपर्णैः मर्माविधं रोरुवतं) बाणांनीं मर्मछेदन झाल्यामुळें रडणारे (दुश्चितं मृदितं शयानं अदन्तु) दुःखी चित्तानें मर्दित झाल्यामुळें जमिनीवर पडलेल्या त्या शत्रूंना हिंस्र पशु खाऊन जावोत. [२६]

(यां देवाः अनुतिष्ठन्ति) ज्यांचें देव अनुष्ठान करतात, (यस्या विराधनं नास्ति) ज्याचा विरोध होत नाहीं (तया त्रिषंधिना वज्रेण) त्याच्या सहाय्यानें तीन संध्यांच्या वज्रानें (वृत्रहा इंद्रः हन्तु) वृत्राचा नाश करणारा इंद्र शत्रूला मारून टाको. [२७]

युद्धाची रीत

भयंकर युद्ध

युद्ध हें नेहमीं भयंकरच असतें; परंतु काय करणार ? मानवजातीची हृदयें जोपर्यंत शुद्ध होणार नाहींत तो पावेतों युद्धें अनिवार्य आहेत. मग जर युद्धें टाळतां येत नाहींत तर कमींत कमीं लवकरांत लवकर टाळणें शक्यच नाहीं तर निदान परिणामकारक केलें पाहिजे. म्हणून युद्ध परिणामकारक करण्यासाठीं आणि क्षात्रभाव वाढविण्यासाठीं वेदांत कित्येक सूक्तें दिलेलीं आहेत. त्यांत हें सूक्त विशेष महत्त्वाचें आहे. वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचा अभ्यास करावा.

युद्ध करणारे वीर स्वतःचें संपूर्ण जीवन समर्पित करून युद्धास तयार होतात. (उदाराः) जीवावर उदार होतात. स्वतःच्या प्राणाची शरीराची चिंता करीत नाहींत. सर्व सेनेचे वीर स्वतःची निशाणें घेऊन हल्ला करण्यास तयार होतात. स्वतःच्या ध्वजाचें रक्षण करणें हें प्रत्येक सैनिकाचें कर्तव्य आहे. सर्व सैनिकांसह आपल्या मदतीसाठीं आलेल्या सर्व वीरांनीं मिळून शत्रूवर हल्ला करावा. (मं. १) येथें सर्प राक्षस आणि इतर लोक लढण्यास आले आहेत असें वाटतें. जे कोणी आपल्या पक्षाचे आहेत त्यांनीं सर्वांनीं एकत्र येऊन एक विचारें शत्रूवर हल्ला करावा.

आपापसांत फूट असूं नये. सर्वांचे विचार निरनिराळे असूं नयेत, एक विचारें योजना करून एकत्रित होऊन शत्रूंशीं लढावें आणि शत्रूचा पूर्ण पराजय करावा.

वज्र निर्माण

त्रिषंधि नावाचें एकप्रकारचें वज्र आहे. तें अत्यंत तीक्ष्ण असतें. या शस्त्राला तीन ठिकाणीं सांधे असतात. त्यामुळें त्याचें नांव त्रिषंधी असें पडलें आहे. त्रिषंधी हें वज्र आहे हें खालीं दिलेल्या मंत्रभागावरून ध्यानीं येतें.

वज्रेण त्रिषंधिना । (मं. ३,२७)

यं वज्रं असिंचत । (मं. १२,१३)

हें तीन सांध्याचें वज्र आहे. तीन सांधे असतात आणि तें पाण्यांत सिंचन करून तयार करण्यांत येतें. म्हणजे हें पोलादाचें बनविलेलें असावें. तें तापवून पाण्यांत अथवा तेल वगैरे पातळ पदार्थांत विरघळवून भिजवून तयार करण्यांत येत असावें, तें तयार करण्याविषयीं सूक्तांत कित्येक उल्लेख आहेत. जे वाचक शस्त्र निर्माणाची विद्या जाणूं इच्छित असतील त्यांनीं हे निर्देश विशेष ध्यानांत ध्यावे.

लाल निशाणें

अरुण (लाल) रंगाचीं निशाणें घेऊन तसेंच स्वतःच्या वज्र शस्त्रासह सर्व सैनिकांनीं तयार झालें पाहिजे. याप्रकारें सर्व सैन्य तयार झाल्यावर राजानें सैनिकांस उद्बोधन करावयाचें कीं– ' हे सैनिक हो ! तुम्हीं सर्व या सैन्याचे खरे धनी आहांत. तुम्हींच या राज्याचे रक्षक आहांत आणि तुम्हींच त्याची वृद्धि करणारे आहांत. या भूमीवर जे मनुष्यमात्र आहेत त्यांत जे दुष्ट अथवा दुश्चरित्र (**दुः-नाम**) आहेत, दुष्टपणाबद्दल ज्यांचें नांव प्रख्यात आहे त्यांस शिक्षा करणें हें सर्व वीरांचें कर्तव्य आहे. या भूमंडलावरील राज्य निष्कंटक करण्यासाठीं तुम्हीं सर्व तयार झालां आहांत, तुमच्या हातांत त्रिषंधी नावाचें शस्त्र आहे, तें अत्यंत शक्तिशाली आहे, त्याच्या मदतीनें तुम्हीं कोणत्याहि शत्रूंशीं सामना करूं शकतां, जिंकूं शकतां आणि दुष्टांस शिक्षा करणें हें एकमात्र तुमचें कर्तव्य आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवा (**चेतसि उपासत**) आणि तें कधीं विसरूं नका. (मं. २) ज्या कारणासाठीं तुम्हांस दुष्टांस शिक्षा करावयाची आहे, त्यामुळें तुमच्या हातानें अशीं कर्में न होवोत कीं जीं दोषयुक्त असावीं. अशीं कर्में तुम्हीं न करावींत म्हणून तुमचें आचरण वारंवार तपासून पहा. ' असें भाषण करून स्वतःच्या सैनिकांना उत्साहित आणि सावध करावें.

बाणांचें स्वरूप

त्रिषंधी वज्राबरोबर बाणधारी सैनिकसुद्धां रहोत, दोघांचा शत्रुवर हल्ला एकदमच व्हावा. बाण अनेक प्रकारचे असतात पण तिसऱ्या मंत्रांत खालीं दिल्याप्रमाणें बाणांचा उल्लेख आहे—

१ **अयोमुखाः**– ज्यांच्या अग्रभागीं पोलाद वापरलें आहे, त्यामुळें त्यांचीं अग्रें तीव्र रहातात.

२ **सूचीमुखाः**– सुईप्रमाणें ज्यांचे अग्रभाग आहेत असे बाण शत्रूंच्या शरीरांत सहज शिरतात.

३ **विकंकतीमुखाः**– फणीप्रमाणें कांटेरी तोंडाचे अथवा कंक पक्षाच्या चोंचीसारखे अग्रभाग असलेले. त्यामुळें विशेष मारकता सुचविली आहे.

' **वातरंहसः** ' आणि ' **क्रव्यादाः** ' हे दोन शब्द बाणाचा वेग आणि त्याची मारकता सुचवितात. असे बाण शत्रूवर फेंकण्यांत यावे. आणि त्याबरोबरच त्रिषंधी वज्राचा उपयोग होत असावा. (मं. ३)

त्रिषंधी वज्राचा प्रयोग करणारे सैनिक ज्याचेजवळ असतील तो शत्रूस जिंकण्यास खात्रीनें समर्थ होईल. कारण की त्याचेजवळ सैनिक वीर स्वतःच्या प्राणाचें बलिदान करण्यास तयार असतात आणि युद्धसाधनें सुद्धां त्याचेजवळ चांगलीं असतात. म्हणजे अशा सैन्याच्या सहाय्यानें रणभूमीवर शत्रूचीं पुष्कळ प्रेतें पड ण्याचा संभव असतो. (मं. ४)

सेनापतीनें अशी स्वतःची सेना तयार करून शत्रूवर हल्ला करावा. युद्धांत स्वतःच्या जीवनाची आहुति देणारे सैनिक असले पाहिजेत. नहून त्रिषंधी वज्राचें समाधान होत नाहीं. (**त्रि-षंधेः आहुतिः प्रिया**) त्रिषंधी वज्राला अशा प्रकारचा आहुति प्रिय असते. (मं. ५)

यावरून आपणांस असें ज्ञान प्राप्त होतें कीं त्रिषंधी नांवाचें वज्र चालवणें सोपें काम नाहीं. शत्रूसेनेंत शिरून त्याचा उपयोग करावयाचा असतो आणि म्हणूनच स्वतःच्या प्राणाची आहुति देण्यास तयार असलेले वीरच त्रिषंधी वज्रासाठीं प्रिय समजण्यांत येतात.

तिसऱ्या मंत्रांत बाणाचे तीन प्रकार सांगितले. येथें आतां दुसरे दोन प्रकार सांगितले आहेत.

४ **शितिपदी**– तीक्ष्ण फाळाचे बाण. ज्या बाणांचा अग्रभाग पोलादाचा बनवला असल्यामुळें अत्यंत तीक्ष्ण असतो अर्थात् हें विशेषण सर्व प्रकारच्या बाणांसच लागूं पडतें.

५ चतुष्पदी- चार फाळ असलेले बाण. यांत धार असलेले कापणारे फाळ चार असतात. पूर्वी वर्णिलेल्या बाणाबरोबर या प्रकारच्या बाणांचाही विचार वाचकांनीं करावा.

हे सर्व बाण शत्रुसैन्यास पुरत्या प्रमाणांत कापीत. मंत्रांत 'कृत्या' नांवाच्या कांहीं विनाशक प्रयोगाचा उल्लेख आहे. 'कृत्या' या शब्दाचा अर्थ चावणारी असा आहे, या कृत्येचें वर्णन अथर्ववेदांत अनेक ठिकाणीं आलें आहे. हा काय प्रयोग असावा ? त्याची चांगलीशी माहिती मिळत नाहीं. या त्रिषंधी वज्र धारण करणाऱ्या सेनेच्या हल्ल्याबरोबर या कृत्या प्रयोगाचा उपयोग करून शत्रूसेनेचा नाश करीत असतील. म्हणजे तें एखादें विशिष्ट प्रकारचें शस्त्र असावें. परंतु कृत्याप्रयोगाविषयीं जास्त संशोधन होणें जरूरी आहे. (मं. ६)

धूराचा प्रयोग

'धूमाक्षी' शब्दानें सातव्या मंत्रांत धुरानें शत्रूसेनेला पीडित करणें असें वर्णन आहे. हा धूर कसा निर्माण करण्यांत येत असे त्याची कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. पण शत्रूसेना मैदानांत असल्यास या धुरानें गुदमरून जात असेल यांत कांहीं शंकेला स्थान नाहीं. हा धूम्रास्त्राचा प्रयोगच आहे. धुरानें कांहीं अस्त्र शत्रूवर फेंकण्यांत येत असावें असें वाटतें. तें शत्रु सैन्यांत जाऊन पडत असावें व लागलेंच फुटत असेल आणि त्यांतून निघणारा धूर शत्रू सैन्यांत पसरत असावा त्यामुळें ते सैनिक गुदमरून घाबरून जात असावे. या धूरानें (संतपतु) शत्रूसैन्यास उष्णता बाधून ताप येत असावा. फक्त मानसिक संतापाचा येथें उल्लेख नाहीं परंतु शारीरिक तापाचाच उल्लेख आहे.

या धूरानें तापाप्रमाणें कानाची पीडा सुद्धां निर्माण होत असावी (कृधुकर्णी) आणि ती पीडा इतकी भयानक असावी कीं तिच्यामुळें सैनिक (क्रोशतु) किंकाळ्या फोडूं लागत; इतकी भयंकर ती पीडा असावी, एवढा भीषण हा धूराचा प्रयोग आहे. या धूराच्या प्रयोगानें डोळे, कान, नाक, फुफ्फुसें वगैरेंस वेदना, शरीरांत ताप, कानांत वेदना-पीडा आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे शत्रूसेनेचा आक्रोश, रडणें, किंकाळ्या फोडणें. इतकीं प्रबळ शस्त्रास्त्रें ज्याचेजवळ असतील तो विजयी व्हावयाचाच यांत काय आश्चर्य ! अशाप्रकारें विजय प्राप्त झाल्यावर सैनिक आपले लाल ध्वज उंच करून विजयाचा आनंद प्रगट करीत. (मं. ७)

वर सांगितल्याप्रमाणें शत्रूसेना कापली गेल्यावर हिंस्रपशु आणि पक्षी तीं प्रेतें खावयास एकत्र जमतात. त्या प्रेतांच्या व्यवस्थेसाठीं सुद्धां शत्रूसेनेंतील कोणी शिल्लक रहात नसे, असा आशय येथें वर्णिला आहे. म्हणजे थोडक्यांत सांगणें असें कीं असा शत्रूसेनेचा पराजय होत असे. (मं. ८)

*

संधि केलेले राजाचे सैनिक एकत्रित होत आणि निश्चित केलेल्या मार्गानें शत्रूवर हल्ला करीत आणि शत्रूचा पराजय करीत. शत्रूचा नाश करण्यासाठीं त्रिषंधीनामक वज्राचा प्रयोग करीत. (मं. ९-१०)

त्रिषंधी वज्राच्या मदतीनें सैनिकांत विलक्षण सामर्थ्य निर्माण होई. देवसुद्धां या वज्राचा आश्रय घेतात. मग मनुष्यें त्याचें साहाय्य घेतील यांत काय आश्चर्य ? (मं. ११) शत्रूंचा नाश करणाऱ्या या वज्रानें देवांनीं सर्व लोक (भुवनें) जिंकले. म्हणून मनुष्यानें या वज्राचा उपयोग करावा आणि विजय मिळवावा. (मं. १२।१५) या मंत्रांत एवढेंच सांगितलें आहे कीं देवसुद्धां त्रिषंधीनामक वज्राचा उपयोग करतात. त्यावरून मनुष्यानेंहि त्याचा उपयोग करावा हें सूचित होतें.

शत्रूसेनेच्या बाणांची धार बोथट करावी, त्यांचीं शस्त्रास्त्रें निकामीं करावी, त्यांचे हात तोडावेत अथवा असे अशक्त करावेत कीं ज्यामुळें त्यांना बाण सोडतां येऊं नयेत, त्यांचीं अस्त्रें निष्क्रिय करावीं, त्यांचे मार्ग अडचणीचे, अशुद्ध करावेत, अशाप्रकारें शत्रूचें कार्य असफल करावें. (मं. १६)

शत्रूंचीं (तनूपानं) चिलखतें तोडावीत, त्यांचे (परिपाणं) गड-किल्ले मोडावेत, पाडावेत अथवा त्यांच्या संरक्षण सामग्रीस हानि पोहोंचवावी आणि त्यांच्या सर्व योजना असफल कराव्यात. आणि त्यांस जिंकावें. (मं. १७)

शत्रूसेनेस मरण्याशिवाय दुसरा मार्ग राहूं नये, प्रत्यक्ष मृत्युच समोर उभा आहे असें वाटावें, हिंसक शस्त्रांचा प्रयोग त्यांच्यावर होत रहावा असा आपल्या सेनेनें शत्रूसेनेवर हल्ला करावा आणि शत्रूचा पराजय करावा. (मं. १८)

तमसास्त्राचा प्रयोग

१९ व्या मंत्रांत शत्रूंवर (तमसा परिवारय) अंधाराचा प्रयोग करण्याची सूचना आहे. तो सुद्धां धुरासारखा प्रयोग असेल. ज्यांत सांपडल्यामुळें शत्रूस कांहीं दिसेनासें होत असेल. हा हल्ला इतका भयानक आहे कीं शत्रूपक्षांतील कोणी वीर त्यांतून वांचूं शकत नसेल. (मं. १९)

संमोहनास्त्राचा प्रयोग

नंतर वीसाव्या मंत्रांत (मुह्यतु) संमोहन करण्याचा उल्लेख आहे. त्यांत सर्व शत्रूसेना मूर्च्छित होत असे. त्यांना कांहीं सूचत

नये. येथें कांहीं शक्ति शत्रूवर फेकावयाची आहे कीं ज्यामुळें ती शत्रूसेनेमध्यें पडतांच सर्व मोहित होऊन जात. जेव्हां सर्व सैनिक भ्रांतचित्त होत त्यावेळीं कोणीहि त्यांचेजवळ जाऊन त्यांस कापून काढूं शके. (मं. २०) शत्रु (**मूढाः**) मोहित होऊन मूढ होतात. त्यांस कर्तव्य करण्याचें सूचत नाहीं. अशाप्रकारें शत्रूचे वीर मोहित झाले म्हणजे त्या वीरांना (**वरं वरं जहि**) कापून काढावेत. कारण अशा मोहित अवस्थेंत त्यांचेजवळ जाण्यास कांहींच भीती नाहीं. परंतु हें सर्व त्वरित करावयास हवें कारण मोहनास्त्राचा प्रभाव अमुक वेळपर्यंतच टिकतो. म्हणजे तेवढ्याच वेळांत स्वतःचें काम समजून पूर्ण करावयास हवें. (मं. २१)

शत्रु जरी चिलखत घालून आलेला असला अथवा कवच धारण केल्याशिवाय आला असला तरी, त्यास पाशांनीं बांधून त्याचा नाश करावयास हवा. याप्रमाणें नाश पावलेली सेना जमिनी-वर मरून पडली म्हणजे ती प्रेतें कुत्रा खावोत. (मं. २२।२३) रथी, पदातीं तसेंच इतर सर्व प्रकारची शत्रूसेना याप्रमाणें नाश पावो. (२४।२५) युद्ध असें घनघोर करावयास हवें कीं शत्रु एकसुद्धां वाचू नये. शत्रूस संपूर्णपणें पराजित केलें पाहिजे अथवा त्याचा निःशेष नाश करावयास हवा. कारण शत्रूपैकीं थोडे जरी शिल्लक राहिले तरी ते पुनः वर डोकें काढतील आणि पीडा करीत रहातील. म्हणून युद्धांत त्याचा पूर्ण नाश केला पाहिजे.

शत्रूचा पूर्ण पराजय व्हावा, बाणांनीं त्यांचीं मर्मस्थानें वेधलीं जावोत आणि ते भ्रांतचित्त होऊन रडण्याशिवाय त्यांस दुसरा मार्ग न रहावा. (मं. २६) त्रिषंधी वज्र फारच प्रभावशाली शस्त्र आहे. त्याच्या प्रयोगानें शत्रूचा पुरा निःपात करण्यांत यावा. (मं. २७)

याप्रकारें या सूक्तांत युद्धविधेचा उपदेश केला आहे. वाचकांनीं तो वाचून वेदांतील युद्धरीति-नीति जाणावी आणि त्यांत जो ग्राह्यभाग आहे तो ग्रहण करावा.

युद्धाची तयारी

कांड ११, सूक्त ९

(ऋषिः – काङ्कायनः । देवता – अर्बुदिः ।)

ये बाहवो या इषवो धन्वनां वीर्याणि च । असीन्परशूनायुधं चित्ताकूतं च यद्धृदि ।
सर्वं तदर्बुदे त्वममित्रेभ्यो दृशे कुरूदारांश्च प्र दर्शय ॥ १ ॥
उत्तिष्ठत सं नह्यध्वं मित्रा देवजना यूयम् । संदृष्टा गुप्ता वः सन्तु या नो मित्राण्यर्बुदे ॥ २ ॥
उत्तिष्ठतमा रभेथामादानसंदानाभ्याम् । अमित्राणां सेना अभि धत्तमर्बुदे ॥ ३ ॥

अर्थ— हे (**अर्बुद**) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (**ये बाहवः**) जे हात आहेत, (**याः इषवः**) जे बाण आहेत, जो (**धन्वनां वीर्याणि**) धनु धारण करणाऱ्यांचा पराक्रम आहे तसेंच (**असीन् परशून् आयुधं**) तलवारी, कुऱ्हाडी आणि आयुधें, तसेंच (**यत् हृदि चित्ताकूतं च**) जो हृदयांत संकल्प आहे (**तत् सर्वं**) तें सर्व (**त्वं अमित्रेभ्यः दृशे कुरु**) तूं शत्रूंस भीति दाखविण्यास तयार कर आणि (**उदारान् च प्रदर्शय**) मोठीं मोठीं स्फोटक अस्त्रें शत्रूस दाखव. [१]

हे (**मित्राः देवजनाः**) मित्र आणि देवजन हो ! (**यूयं उत्तिष्ठत**) तुम्हीं उठा आणि (**सं नह्यध्वं**) तयार व्हा. हे (**अर्बुदे**) शत्रूचा नाश करणार हो ! (**या नः मित्राणि**) जे आमचे मित्र आहेत त्यांना तुम्हीं ध्यानांत ठेवा आणि (**वः संदृष्टा गुप्ताः सन्तु**) तुमचे सर्व सैनिक सुरक्षित आहेत असें दिसावें. [२]

हे (**अर्बुद**) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (**उत्तिष्ठतं आरभेथां**) उठा आणि युद्धास आरंभ करा. (**आदान-संदानाभ्यां**) धरपकड करून (**अमित्राणां सेनाः अभिधत्तं**) शत्रुसेनेस घेरून टाका. [३]

अर्बुदिर्नाम यो देव ईशानश्च न्यर्बुदिः । याभ्यामन्तरिक्षमावृतमियं च पृथिवी मही ।
ताभ्यामिन्द्रमेदिभ्यामहं जितमन्वेमि सेनया ॥ ४ ॥
उत्तिष्ठ त्वं देवजनार्बुदे सेनया सह । भञ्जन्नमित्राणां सेनां भोगेभिः परि वारय ॥ ५ ॥
सप्त जातान्न्यर्बुद उदाराणां समीक्षयन् । तेभिष्ट्वमाज्ये हुते सर्वैरुत्तिष्ठ सेनया ॥ ६ ॥
प्रतिघ्नानाश्रुमुखी कृधुकर्णी च क्रोशतु । विकेशी पुरुषे हते रदिते अर्बुदे तव ॥ ७ ॥
संकर्षन्ती करूकरं मनसा पुत्रमिच्छन्ती । पतिं भ्रातरमात्स्वान्रदिते अर्बुदे तव ॥ ८ ॥
अलिक्लवा जाष्कमदा गृध्राः श्येनाः पतत्रिणः ।
ध्वाङ्क्षाः शकुनयस्तृप्यन्त्वमित्रेषु समीक्षयन्रदिते अर्बुदे तव ॥ ९ ॥
अथो सर्वं श्वापदं मक्षिका तृप्यतु क्रिमिः । पौरुषेयेऽधि कुणपे रदिते अर्बुदे तव ॥ १० ॥

अर्थ— (यः अर्बुदिः नाम देवः) जो अर्बुदि नांवाचा सेनाध्यक्ष आहे आणि (यः न्यर्बुदिः ईशानः) जो न्यर्बुदिः नांवाचा सेनाप्रमुख आहे (याभ्यां अन्तरिक्षं आवृतं) ज्यांनीं हें अंतरिक्ष घेरून टाकलें आहे, (इयं च मही पृथिवी) ही मोठी पृथ्वी सुद्धां व्याप्त झाली आहे. (ताभ्यां इंद्रमेदिभ्यां सेनया जितं इति अहं अन्वेमि) त्या इंद्र आणि मेदिकडून सेनाद्वारा शत्रूंस जिंकलें, म्हणजे त्यांचे मागें मीं जातों. [४]

हे (देवजन–अर्बुदे) देवजन–शत्रूचा नाश करणाऱ्या ! (त्वं सेनया सह उत्तिष्ठ) तूं सेनेसह ऊठ. (अमित्राणां सेनां) शत्रूंच्या सैन्यास (भोगेभिः भञ्जन् परिवारय) स्वतःच्या पकडीनें घेरून टाकून तिचा नाश कर. [५]

हे (न्यर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (उदाराणां सप्त जातान् समीक्षयन्) स्फोटक अस्त्राचे सात प्रकार पाहून (आज्ये हुते) तुपाची आहुति देतों. (तेभिः सर्वैः सेनया त्वं उत्तिष्ठ) त्या सर्वांस बरोबर घेऊन स्वतःच्या सेनेसह तूं ऊठ. [६]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (तव रदिते) तुझा हल्ला झाला असतां (पुरुषे हते) शत्रूचे वीर मेल्यामुळें त्यांच्या स्त्रिया (विकेशी कृधुकर्णी) केंस मोकळे सोडून भूषणरहित कानांनीं (अश्रुमुखी प्रतिघ्नाना) अश्रूंनीं मुख भरून जाऊन रडत, छाती बडवीत (क्रोशतु) मोठा आक्रोश करोत. [७]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (तव रदिते) तुझें आक्रमण झालें असतां (करूकरं संकर्षन्ती) हात-पाय घाशीत, (मनसा पुत्रं इच्छन्ती) मनानें पुत्राची इच्छा करणारी, (पतिं भ्रातरं आत् स्वान्) पति, भाऊ आणि स्वतःच्या नातेवाईकांचें कल्याण इच्छणारी शत्रूची पत्नी पुष्कळ दुःख पावो (पावले). [८]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (तव रदिते) तुझें आक्रमण झालें असतां (अलिक्लवाः जाष्कमदाः) भयानक, मांस खाणारे मोठमोठे पक्षी, (गृध्राः श्येनः पतत्रिणः) गिधाडें, ससाणे आणि (इतर) पक्षी (ध्वांक्षाः शकुनयः) कावळे आणि शकुनि पक्षी (अमित्रेषु तृप्यन्तु) शत्रूंच्या मृतसेनेचें मांस खाऊन तृप्त होवोत. असें तूं (समीक्षयन्) पहात रहा. [९]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या (तव रदिते) तुझें आक्रमण झालें असतां (पौरुषेये कुणपे अधि) शत्रु-सेनेच्या पुरुषांच्या प्रेतांवर (अथो सर्वं श्वापदं) सर्व जनावरें (मक्षिकाः कृमिः तृप्यतु) माशा आणि मुंग्या सर्व तृप्त होवोत. [१०]

आ गृह्णीतं सं बृहतं प्राणापानान्न्यर्बुदे ।
निवाशा घोषाः सं यन्त्वमित्रेषु समीक्षयन्रदिते अर्बुदे तव ॥ ११ ॥
उद्वेपय सं विजन्तां भियामित्रान्त्सं सृज । उरुग्राहैर्बाह्वङ्कैर्विध्यामित्रान्न्यर्बुदे ॥ १२ ॥
मुह्यन्त्वेषां बाहवश्चित्ताकूतं च यद्धृदि । मैषामुच्छेषि किं चन रदिते अर्बुदे तव ॥ १३ ॥
प्रतिघ्नानाः सं धावन्तूरः पटूरावाघ्नानाः ।
अघारिणीर्विकेश्यो रुदत्यः पुरुषे हते रदिते अर्बुदे तव ॥ १४ ॥
श्वन्वतीरप्सरसो रूपका उतार्बुदे । अन्तःपात्रे रेरिहतीं रिशां दुर्णिहितैषिणीम् ।
सर्वास्ता अर्बुदे त्वममित्रेभ्यो दृशे कुरूदारांश्च प्र दर्शय ॥ १५ ॥
खडूरेऽधिचङ्क्रमां खर्विकां खर्ववासिनीम् । य उदारा अन्तर्हिता गन्धर्वाप्सरसश्च ये ।
सर्पा इतरजना रक्षांसि ॥ १६ ॥
चतुर्दंष्ट्राञ्छ्यावदतः कुम्भमुष्काँ असृङ्मुखान् । स्वभ्यसा ये चोद्भ्यसाः ॥ १७ ॥

अर्थ- हे (अर्बुदे, न्यर्बुदे) शत्रूंचा नाश करणारे वीर हो ! (तव रदिते) तुमचें आक्रमण झालें असतां (समीक्षयन्) आणि योग्य समय पाहून हल्ला होत असल्यानें (प्राणापानान् बृहन्तं सं आगृह्णीतं) शत्रूंच्या प्राणांस पकडा आणि मोठा हल्ला करा, त्यामुळें (अमित्रेषु निवाशाः घोषाः सं यन्तु) शत्रूसेनेंत मोठा कोलाहल सुरू होवो. [११]

हे (अर्बुदे) शत्रुनाशक वीरा ! (अमित्रान् उद्वेपय) शत्रूंस भयभीत कर. (सं विजन्तां) शत्रु भिऊन पळूं लागो. (भिया संसृज) शत्रु भयभीत होवो. (उरुग्राहैः बाह्वङ्कैः अमित्रान् विध्य) मोठ्या पकडीच्या हातानें फेंकण्याच्या शस्त्रांनीं शत्रूंना मारा. [१२]

हे (अर्बुदे) शत्रुनाशक वीरा ! (तव रदिते) तुझें आक्रमण झालें असतां (एषां बाहवः मुह्यन्तु) शत्रूंचे हात शिथील होवोत, (यत् हृदि चित्ताकूतं च) ज्या त्यांच्या अंतरांतील इच्छा असतील त्या निःसत्व होवोत, (एषां किंचन मा उच्छेषि) त्या शत्रूंपैकीं कोणीहि वांचूं नये. [१३]

हे (अर्बुदे) शत्रू नाश करणाऱ्या वीरा ! (तव रदिते) तुझा हल्ला झाला असतां (पुरुषे हते) शत्रूचे वीर पुरुष मारले गेल्यावर त्यांच्या स्त्रिया (उरः प्रतिघ्नानाः) छाती बडवीत (पटूरौ आघ्नानाः) मांड्यावर दोन्ही बाजूंस हात आपटीत, (अघारिणी विकेश्यः रुदत्यः) तेल न लावलेले केंस मोकळे सोडून रडत राहोत. [१४]

हे (अर्बुदे) शत्रुनाशक वीरा ! (श्वन्वतीः रूपकाः अप्सरसः) कुत्र्यास बरोबर घेऊन जाणाऱ्या स्त्रिया (उत) आणि (अन्तः पात्रे रेरिहतीं रिशां) भांडीं चाटणाऱ्या हिंसक प्रवृत्तीच्या स्त्रिया (दुर्णिहितैषिणां) दुष्ट दृष्टीच्या कुत्र्या (सर्वाः ताः त्वं अमित्रेभ्यः दृशे कुरु) हें सर्व तूं शत्रूंस दाखविण्यास तयार कर आणि (उदारान् च प्रदर्शय) स्फोटक अस्त्रसुद्धां दाखव. [१५]

(खडूरे अधि चंकमां) आकाशांत फिरणारी (खर्विकां खर्ववासिनी) लहान आणि लहान स्थानावर रहाणाऱ्या हिंस्त्र पक्षिकेला दाखव. (ये अन्तर्हिताः उदाराः) जीं लपवून ठेवलेलीं स्फोटक अस्त्रें आहेत त्यांचा उपयोग कर. (ये गन्धर्वाः अप्सरसः च सर्पाः इतरजनाः रक्षांसि) गंधर्व, अप्सरा, सर्प, राक्षस आणि इतर लोक आहेत तसेंच जे (चतुर्दंष्ट्रान् श्यावदतः) चार दाढा आणि काळे दांत असलेले आहेत (कुम्भमुष्कान् असृङ्मुखान्) घड्यासारखी अंडीं असणारे आणि तोंडांतून रक्त काढणारे, (ये स्वभ्यसाः ये च उद्भ्यसाः) जे स्वतः घाबरणारे आणि जे इतरांस घाबरवणारे आहेत ते सर्व शत्रु दाखव. अथवा तें सर्व शत्रूंस दाखव. (१६–१७)

उद्वेपय त्वमर्बुदेऽमित्राणाममूः सिचः । जयांश्च जिष्णुश्चामित्राँ जयतामिन्द्रमेदिनौ ॥ १८ ॥
प्रब्लीनो मृदितः शयां हतोऽमित्रो न्यर्बुदे । अग्निजिह्वा धूमशिखा जयन्तीर्यन्तु सेनया ॥ १९ ॥
तयार्बुदे प्रणुत्तानामिन्द्रो हन्तु वरंवरम् । अमित्राणां शचीपतिर्मामीषां मोचि कश्चन ॥ २० ॥
उत्कसन्तु हृदयान्यूर्ध्वः प्राण उदीषतु । शौष्कास्यमनु वर्ततामभित्रान्मोत मित्रिणः ॥ २१ ॥
ये च धीरा ये चाधीराः पराञ्चो बधिराश्च ये । तमसा ये च तूपरा अथो बस्ताभिवासिनः
सर्वांस्ताँ अर्बुदे त्वममित्रेभ्यो दृशे कुरूदारांश्च प्रदर्शय ॥ २२ ॥
अर्बुदिश्च त्रिषंधिश्चामित्रान्नो वि विध्यताम् ।
यथैषामिन्द्र वृत्रहन्हनाम शचीपतेऽमित्राणां सहस्रशः ॥ २३ ॥
वनस्पतीन्वानस्पत्यानोषधीरुत वीरुधः । गन्धर्वाप्सरसः सर्पान्देवान्पुण्यजनान्पितॄन् ।
सर्वांस्ताँ अर्बुदे त्वममित्रेभ्यो दृशे कुरूदारांश्च प्र दर्शय ॥ २४ ॥

अर्थ — हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या ! (त्वं अमित्राणां चमूः सिचः उद्वेपय) तूं या शत्रुसेनेस कंपायमान कर. (जिष्णुः अमित्रान् जयान्) जयशाली वीर शत्रूस जिंकोत आणि (इन्द्र-मेदिनौ जयतां) राजा आणि मित्र या दोघांचा विजय होवो. [१८]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या वीरा ! (अमित्रः प्रब्लीनः मृदितः हतः शयां) शत्रु घेरला जाऊन, कापला जाऊन मरून जावो. स्वतःच्या (सेनया अग्निजिह्वाः धूमशिखाः जयन्तीः यन्तु) सेनेसह अग्नीच्या ज्वाळा आणि धूराचीं वर्तुळें विजय करीत निघून जावो. [१९]

हे (अर्बुदे) शत्रूनाशक वीरा ! (तया प्रणुत्तानां अमित्राणां) त्या सेनेंतून पळवून लावलेले शत्रूच्या (वरं वरं शचीपतिः इन्द्रः हन्तु) मुख्य वीरांना शक्तिशाली वीर मारून टाको. (अमीषां कः चन मा मोचि) त्यांच्या पैकीं कोणीहि निसटून न जावो. [२०]

(हृदयानि उत्कसन्तु) शत्रूंचीं हृदयें खळबळून जावोत. (प्राणः ऊर्ध्वः उदीषतु) शत्रूंचे प्राण उंच उंच निघून जावोत, (अमित्रान् शौष्कास्यं अनुवर्ततां) शत्रूंचीं तोंडें सुकून जावोत परंतु (मित्रिणः मा उत) आमच्या मित्रांस हे कष्ट न व्हावेत. [२१]

हे (अर्बुदे) शत्रूचा नाश करणाऱ्या वीरा ! (ये च धीराः ये च अधीराः) जे धैर्यशाली आहेत आणि जे भित्रे आहेत, (ये पराञ्चः ये च बधिराः) जे दूर पळून जाणारे आणि जे बहिरे आहेत, (तमसा ये च तूपराः) अंधारानें जे घेरलेले आहेत (अथो बस्ताभिवासिनः) आणि जो बकऱ्याप्रमाणें स्वतःची उपजीविका करणारा आहे (सर्वान् तान् त्वं अमित्रेभ्यः दृशे कुरु) त्या सर्वांस शत्रूंस दाखविण्यास तूं पुढें कर आणि (उदारान् च प्रदर्शय) स्फोटक अस्त्रें शत्रूंना दाखव. [२२]

(अर्बुदिः च त्रिषंधिः च) अर्बुदि आणि त्रिषंधिसारखे आमचे वीर (नः अमित्रान् विविध्यतां) आमच्या शत्रूस मारून टाकोत. (वृत्रहन् शचीपते इन्द्र) हे वृत्राचा नाश करणाऱ्या शचीपति इंद्रा ! प्रभो ! (यथा एषां अमित्राणां सहस्रशः हनाम) या शत्रूंस हजारोंच्या संख्येनें आम्हीं मारून टाकावें. [२३]

हे (अर्बुदे) शत्रुनाशक वीरा ! वनस्पति आणि वनस्पतीपासून तयार झालेले पदार्थ औषधि, वेली, गंधर्व, अप्सरा, सर्प, देव, पुण्यजन आणि पितरांना तूं (अमित्रेभ्यः दृशे कुरु) शत्रूस दाखव आणि (उदारान् च प्रदर्शय) स्फोटक अस्त्रें प्रदर्शित कर म्हणजे तीं पाहून शत्रु घाबरून जाईल. [२४]

ईशां वो मरुतो देव आदित्यो ब्रह्मणस्पतिः । ईशां व इन्द्रश्चाग्निश्च धाता मित्रः प्रजापतिः ।
ईशां व ऋषयश्चक्रुरमित्रेषु समीक्षयन्नदिते अर्बुदे तव ॥ २५ ॥
तेषां सर्वेषामीशाना उत्तिष्ठत सं नह्यध्वं मित्रा देवजना यूयम् ।
इमं संग्रामं संजित्य यथालोकं वि तिष्ठध्वम् ॥ २६ ॥

अर्थ— हे (अर्बुदे) शत्रुनाशक वीरा ! (तव रदिते) तुझें आक्रमण झालें असतां (अमित्रेषु समीक्षयन) शत्रूंचें निरीक्षण केल्यानंतर आमच्या शत्रूवर (मरुतः देवः आदित्यः ब्रह्मणस्पतिः) आदित्य, देव, बृहस्पति आणि मरुत् (ईशां चक्रुः) अधिकार गाजवोत. इंद्र, अग्नि, धाता, मित्र, प्रजापति हे देव आणि (वः ईशां चक्रुः) तुम्हीं शत्रूंवर शासन चालवा. (ऋषयः) ऋषि (ईशां चक्रुः) शासन चालवोत. [२५]

हे (मित्राः) मित्र देव हो ! (देवजनाः) देवजन हो ! (यूयं तेषां सर्वेषां ईशानाः) तुम्हीं सर्व त्या शत्रूंचे अधिपति आहांत. (उत्तिष्ठत स नह्यध्वं) ऊठा, तयार व्हा. (इमं संग्रामं संजित्य) या युद्धांत उत्तमप्रकारें जय प्राप्त करून (यथालोकं वितिष्ठध्वं) स्वतःच्या देशांत जाऊन सुखी व्हा. [२६]

युद्धाची तयारी

युद्धाची नीति

वेदांत युद्धविषयक अनेक सूक्तें आहेत. आणि अनेक सूक्तांत युद्धाचा निर्देश आहे. त्याप्रकारचें हें सूक्त आहे. या सूक्ताची देवता ' अर्बुद ' आहे. ' अर्बुद ' शब्द संख्यावाचक आहे. तसाच न्यर्बुद शब्दसुद्धां आहे. पहा—

अर्बुद 1,००,००,००० एक कोटी.
न्यर्बुद १०,००,००,००० दहा कोटी.

याप्रकारें या संख्या मानल्या आहेत. अर्बुदाच्या दहा पटीनें न्यर्बुद. एक कोटी अर्बुदांत आणि दहा कोटी न्यर्बुदांत असतात. कित्येकांचें असें मत आहे की दोन्ही शब्द एका अर्थाचे आणि तेहि दहा कोटी वाचक आहेत. ते कांहीं असलें तरी दहा कोटी वाचक हा शब्द आहे यांत कांहीं शंकेला स्थान नाहीं.

एवढें सैन्य एक सेनापतीच्या ताब्यांत रहाणें शक्य नाहीं. दहावीस लक्ष सेना एका सेनापतीच्या ताब्यांत राहील. तिचें संचालन तो एकटा करूं शकेल. अशीं उदाहरणें इतिहासांत आहेत. म्हणून तितकीच मर्यादा या संख्यांची समजली पाहिजे असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. त्यांचे मतें ' अर्बुद ' म्हणजे एक लक्ष आणि ' न्यर्बुद ' म्हणजे दश लक्ष सेना समजण्यास हरकत नाहीं. पण असें एकमत आहे एवढेंच, हा कांहीं विशेष पुरावा नाहीं.

ज्या सेनापतीच्या ताब्यांत जेवढी सेना असेल तें नांव त्यास प्राप्त होतें. म्हणजे ज्याचेजवळ अर्बुद सेना तो ' अर्बुदि ' आणि ज्याचे ताब्यांत न्यर्बुद सेना तो ' न्यर्बुदि ' सेनापति, हें स्वाभाविक आहे. त्यामुळें हीं नांवें सेनापतिवाचक आहेत. श्री सायणाचार्य म्हणतात कीं हीं नांवें सर्पवाचक आहेत—

अर्बुदः काद्रवेयः सर्पऋषिमन्त्रकृत्। (ऐ. ब्रा. ६।१)

या वचनानुसार अर्बुद कद्रुचा मुलगा सर्पजातीचा ऋषि होय. त्याचे दोन मुलगे अर्बुदी आणि न्यर्बुदी. असें जरी मानलें तरी ते दोघे सेनानायक होते असें तर मानलेंच पाहिजे.

यावरून अर्बुदी आणि न्यर्बुदी हीं नांवें आपल्या पक्षाच्या सेनापतींची आहेत यांत तर कांहीं शंकाच नाहीं. आम्हांस असें वाटतें कीं या शब्दांच्या अर्थासाठीं जास्त संशोधन व्हावयास हवें. तसें होईपावेतों आम्ही या शब्दांचा अर्थ विशेष अधिकार असलेले सेनापति असा केला आहे. या सूक्ताचा अर्थ ध्यानीं येण्यासाठीं असें समजावें कीं एक राजा आहे, त्याचे जवळ निरनिराळ्या प्रकारचे सैनिक आणि सेनापति आहेत आणि शत्रूबरोबर

युद्ध सुरू झालें आहे. अशा प्रसंगीं काय केलें पाहिजे त्याविषयीं हा उपदेश आहे—

'आपल्या सैनिकांचें जें बाहुबल आहे, त्यांचेजवळ धनुष्य, बाण, परशु, तरवार वगैरे शस्त्रसमूह आहे, त्या सर्वांची रचनाच अशी करा कीं ती पाहूनच शत्रु भयभीत व्हावा.' (मं. १) स्वतःचें सैन्य आणि शस्त्रें अशा रीतीनें तयार ठेवावींत कीं त्यांचा प्रभाव शत्रूवर पडावा. तोहि असा कीं शत्रु युद्ध करण्यास उभाच राहूं नये आपल्या मनांतील इच्छा आणि संकल्प, आहेत, ज्या कारणें आपणांस युद्ध करावें लागत आहे, हें सर्व अशा योजनेनें जगाच्या माहितीसाठीं जाहीर करावें कीं, त्यामुळें जनतेस जाणीव व्हावी कीं दोष तर बहुंशीं शत्रूचाच आहे आणि स्वकीय पक्ष निर्दोष आहे. परंतु स्वसंरक्षणासाठीं आम्हीं युद्ध करण्यास प्रवृत्त झालों आहोंत, अशाप्रकारें जनतेच्या मनांत शत्रुपक्ष दुर्बल, हीन ठरतो आणि जनतेची सहानुभूति, अनुकूलता आपल्या पक्षास प्राप्त होते. युद्धांत विजय प्राप्त होण्यास याबाबतीची खास जरूरी आहे.

पांडवांचें सैन्यबल कमी होतें आणि कौरवांचें जास्त होतें. शस्त्रास्त्रांचें बलहि पांडवांपेक्षा कौरवांचें जास्त होतें. तरीसुद्धा जनतेमध्यें कौरवांची एवढी निंदा झाली होती कीं, जनतेच्या दृष्टीनें कौरव मेले होते. त्याचा फायदा पांडवांस मिळाला. येथें युद्धनीतीची गोष्ट या मंत्रांत सूचित केली आहे. ज्यास पराजित करावयाचा त्याचेवर स्वतःच्या शस्त्रास्त्रांचा पुष्कळ प्रभाव पाडला पाहिजे आणि मानसिक शक्तीनेंहि त्यांस जिंकलें पाहिजे. असा जय प्राप्त झाल्यावर प्रत्यक्ष रणमैदानांत जय प्राप्ति होण्याचा संभव वाढतो.

शत्रूंस आपल्या '**उदारां**' चें प्रदर्शन दाखविलें पाहिजे. उदार हीं अशीं शस्त्रें आहेत कीं जीं शत्रूंवर दुरून फेंकण्यांत येतात आणि तेथें पडतांच स्फोट होऊन शत्रूचा भयंकर नाश होतो. ज्याप्रमाणें स्फोटक दारू भरलेल्या भांड्यास आग लागल्यानें त्या दारूचा स्फोटक होतो आणि अंधारांत ती जळणारी दारू मोठा वृक्ष होऊन बाहेर येते त्याचें नांव आहे उदार. (**उत्+आर**) आंतुन बाहेरवर फेंकणें, आंतून एकदम बाहेर येऊन चारी बाजूस पसरणें आणि वर उडणें याचें नांव '**उदार**' (**उत्+आर**) आहे. हें शस्त्र शत्रूवर फेंकलें असतां त्याचा स्फोट होतो आणि आंतील विनाशक पदार्थ वेगानें बाहेर येऊन चारी बाजूस प्रसरतात आणि शत्रुसेनेचा नाश करतात. अशा प्रकारचे उदार आपणांजवळ पुष्कळ प्रमाणांत असावेत आणि युद्ध सुरू होतांच त्याचे मदतीनें शत्रुसैन्याचा त्वरित नाश करणें आपणांस अत्यंत सुलभ गोष्ट ठरावी. ही गोष्ट शत्रूच्या अंतःकरणावर चांगली बिंबवावी-ठसवावी, म्हणजे शत्रु भीऊन

जाईल आणि युद्धास उभा रहाणार नाहीं. अशा देखाव्यानें सुद्धां पुष्कळ वेळां कार्यभाग सिद्धीस जातो.

देखावा जेवढा करावयाचा असेल तेवढा खुशाल करावा परंतु स्वतःचीं गुप्त शस्त्रें शत्रूच्या नजरेस पडूं देऊं नयेत. कारण कीं आपल्या सर्व शस्त्रास्त्रांची माहिती शत्रूस असतां कामा नये. आपणांजवळ अद्भुत शस्त्रास्त्रें आहेत आणि त्यांच्या सहाय्यानें आपण भयंकर नाश करूं शकूं, एवढेंच शत्रूच्या मनावर ठसवावें. प्रत्यक्ष युद्ध केल्याशिवाय शत्रूचा नाश करण्याची ही योजना आहे. या आपल्या '**उदार**' नांवाच्या शस्त्रांचें प्रदर्शन करण्याचा उपदेश मं. १,१५,२२,२४ या मंत्रांत केला आहे. त्याचा योग्य अर्थ समजला पाहिजे, नहून अर्थाचा अनर्थ होण्यास वेळ लागणार नाहीं. येथें फक्त प्रदर्शन म्हणजे देखावाच करावयाचा आहे. हा देखावा केवळ शत्रूवर आपल्या सामर्थ्याचा योग्य परिणाम होण्यापुरताच आहे. जें आपलें अव्वल-खरें सामर्थ्य तें या देखाव्यांत दाखवावयाचें नाहीं. म्हणजे देखावा असा करावयाचा कीं त्यानेंच शत्रु भीऊन दबून जावा.

नंतर सर्व सेना तयार करून सेनापतीनें तयार व्हावें, केव्हां युद्ध करावें लागेल हें नक्की नसतें, नेहमीं तयारच असलें पाहिजे. स्वतःच्या पक्षाचे, स्वतःचे जे मित्र राजे आहेत त्यांच्या शक्तीविषयीं अंदाज असावा. सुरक्षितपणें ते आपणांस योग्यसमयीं येऊन मिळतील याविषयीं काळजी घ्यावी, तयारी कायमचीच असावी. (मं. २) स्वतःचा निश्चित विजय व्हावा यासाठीं या सर्व योजना याप्रकारें करणें जरूरीचें आहे.

बाह्यात्कारीं सर्वत्र आपली शक्ति फार मोठी आहे अशी समजूत प्रसरून ठेवावी आणि त्याप्रमाणें आपली तयारी सुद्धां करावी. नेहमीं आपलें सैन्य तयार ठेवावें आणि मित्रांचें सैन्य सुरक्षित स्थिर करावें, हें कार्य युद्ध होण्यापूर्वीं करावें.

जेव्हां युद्ध अटळ, अपरिहार्यच आहे असें वाटेल तेव्हां तयारी करून उठावें आणि युद्ध सुरू करावें. यांत विचार करण्यास शत्रूस सवड देऊं नये. ही विशेष सूचना मनन करण्यासारखी आहे. शत्रूंशीं युद्ध सुरू करावयाचें त्यांत '**आदान**' आणि '**संदान**' असा दोन प्रकारचा विधि आहे. एकांत शत्रूंस सर्व बाजूनें घेऊन पकडावयाचें आहे आणि दुसऱ्यांत सर्व सेना एकत्रित करून शत्रुवर हल्ला करावयाचा आहे. याप्रमाणें युद्ध केल्यामुळें शत्रुसेना महान् असली तरीसुद्धां विजय प्राप्त करणें शक्य असतें. जेव्हां असा विजय प्राप्त होण्याचा संभव दिसेल तेव्हां एकदम शत्रुसमोर जाऊन (**अभिधत्त**) त्यांच्यावर हल्ला करावा. (मं. ३) या मंत्रांतील शब्दांचें मनन केलें असतां युद्धनीतीचा बोध होतो.

एक मोठा सेनापति आहे व दुसरे इतर अनेक त्याच्या हाता-खालीं काम करणारे आहेत. या सर्वांनीं मिळून असा पराक्रम करावा कीं त्यामुळें पृथ्वीवरील आणि आकाशांतील सर्व शत्रूंचा संपूर्ण नाश व्हावा. पृथ्वीवर पायदळ आणि घोडेस्वार यांचें युद्ध होईल, आकाशांत विमानांतून युद्ध होईल, डोंगर-पर्वतांच्या शिखरांवर-दऱ्याखोऱ्यांतून तोफांनीं युद्ध होईल, जेथें ज्याप्रकारचें युद्ध करावयाचें तें अत्यंत कुशलतेनें करून स्वतःचा विजय आणि शत्रूचा पराजय, शत्रूचा संपूर्ण नाश साध्य करावा. याप्रकारें विजय प्राप्त केल्यानंतर राजानें स्वतःच्या सेनेसह शत्रूच्या व्याप्त केलेल्या प्रदेशांत प्रवेश करावा. (**सेनया अहं अन्वेमि**) सेनेसह मीं— राजा— त्यास्थानीं प्रवेश करीत आहे. राजानें तसें करावें. पूर्ण विजय प्राप्त झाल्याशिवाय राजानें कधींहि शत्रूच्या व्याप्त प्रदेशांत प्रवेश करूं नये. (मं. ४) कारण सर्व राष्ट्राचें भविष्य राजावर अवलंबून असतें. जर राजा निष्काळजीपणें शत्रु-प्रदेशांत गेला आणि तेथें शत्रूच्या कारस्थानांस बळी पडून पकडला गेला, कैद केला गेला आणि शत्रूच्या मिथ्या मनोवृत्तींस बळी पडला तर सर्व सेनेचा पराजय आणि राष्ट्राची भयंकर हानी होण्याची शक्यता असते. म्हणून आपला पूर्ण जय झाल्यावरच म्हणजे शत्रूचा पूर्ण प्रदेश आपल्या ताब्यांत आल्यावरच आणि कोणत्याहि प्रकारें भीतीचा संभव नाहीं असें पाहून मगच राजानें स्वतःच्या संरक्षणापुरती सेना (जिच्यावर विश्वास ठेवतां येईल अशी) बरोबर घेऊन मग शत्रूच्या जिंकलेल्या प्रदेशांत प्रवेश करावा. राजाच्या सुरक्षिततेवरच सर्व अवलंबून आहे. येथें राजा याचा अर्थ मुख्य राज्यशासक असा समजावा.

योग्यवेळीं सैन्याचा (**उत्थान**) उठाव करावा. चढाई अथवा हल्ला करण्याची तयारी करून घेरा घालावा आणि शत्रु सेना अशीं घेरून टाकावी कीं, ज्याप्रमाणें साप अथवा अजगर कोणास वेटाळून टाकतो, याप्रमाणें शत्रूस घेरून टाकून मारावा. शत्रुसेनेस चारी बाजूनें घेरावी, एवढ्यासाठीं आपलें सैन्य एवढें अधिक असावें की त्यामुळें शत्रु घेरला जावा. स्वतःच्या सेनारूपी सापानें शत्रुसेनेस विळखा घालावा आणि तिची हालचाल बंद पाडावी. तिचा बाह्य जगाशीं संबंध-व्यवहार बंद पाडावा-तोडावा आणि तिला हैराण करावें. (मं. ५)

जीं उदार नांवाची स्फोटक अस्त्रें आहेत, तीं सात प्रकारचीं आहेत. एक जमीनींत (**अन्तर्हिताः उदाराः**) पुरून ठेवण्याचें, दुसरें पाण्यांत ठेवण्याचे, तिसरें हातानें फेंका-वयाचें, चौथें आकाशांत जाऊन तेथून खालीं फेंकावयाचें, पांचवें बाणावर ठेऊन शत्रूसेनेमध्यें सोडावयाचें, सहावें नदी, तलाव अथवा लहान पाण्याच्या साठ्यांत ठेऊन ते पीण्याच्या पाण्याचे साठे उडवून द्यावयाचें आणि सातवें पर्वत, डोंगर, खडक, दऱ्याखोऱ्यांत उपयोगी पडणारें. अशीं हीं सात प्रकारचीं महा-घातक विस्फोटक शस्त्रें आहेत. जेथें हीं ठेवण्यांत येतात, तेथें शत्रूला घेरून आणण्यांत येतें आणि शत्रुसेना तेथें येतांच त्या अस्त्रांतील विस्फोटक द्रव्याचा स्फोट होतो. आणि त्यांतून जी आग बाहेर पडते तिच्यामुळें शत्रुसेना छिन्नभिन्न होऊन जाते. हीं सात प्रकारचीं विस्फोटक अस्त्रें बरोबर घेऊन शत्रूवर हल्ला केला पाहिजे. हवनामींत तुपाच्या आहुति देऊन सर्व सैनि-कांस सिद्ध केलें पाहिजे. आणि एकदम शत्रूंवर हल्ला करण्यास प्रारंभ केला पाहिजे. (मं. ६) हें जें हल्ल्याचें सूचक हवन आहे तें सकाळचें हवन आहे.

याप्रकारें तयार होऊन शत्रूवर हल्ला करण्यानें शत्रु मारला जाईल, पराजित होईल, पळून जाईल अथवा नाश पावेल. त्यामुळें त्याच्या देशांत स्त्रियांना रडण्याची आणि आक्रोश कर-ण्याची वेळ येईल, याशिवाय दुसरा मार्ग रहाणार नाहीं. (मं. ७-९) शत्रूसेनेंतील पुरुष मरून जातील म्हणजे त्यांची प्रेतें क्रूर जनावरें खाऊन टाकतील. (मं. १०) त्यांच्या स्त्रिया छाती बडवून रडूं लागतील. (मं. १४) शत्रु मारला गेल्यानें त्याच्या सैन्यांत रडारड, गोंधळ आणि कोलाहल सुरू होईल. (मं. ११) हल्ला असा करण्यांत यावा कीं शत्रु भीऊन पळूनच जावा अथवा पकडला जावा किंवा मारला जावा. (मं १२) शत्रु मोहित व्हावा आणि त्यांच्यापैकीं कोणींहि जिवंत राहूं नये. (मं. १३) शत्रूंस प्रेतें खाणारे पक्षी आणि जनावरेंच फक्त दिसावींत, क्रूतरे त्यांचीं प्रेतें खात राहोत. हिंसक क्रूर श्वापदें त्यांच्या स्थानांत प्रवेश करोत राहोत. (मं. १५)

(**ख-दूरे**) आकाशांत दूर-वर आपली सेना जावो आणि तेथून शत्रूवर हल्ला करो. (**खर्व-वासिनी**) खालीं असलेल्या शत्रूसेनेवर मारा करण्यांत यावा. (**अंतर्हिताः उदाराः**) जमीनींत अथवा पाण्यांत लपवून ठेवलेलीं उदार- विस्फोटक अस्त्रें आहेत त्यांचा स्फोट होऊन शत्रूचा नाश व्हावा. गंधर्व, अप्सरा, सर्प, राक्षस आणि इतर लोकांची मदत घऊन शत्रूचा पूर्ण निःपात करावा, अशाप्रकारें शत्रूचा पूर्ण पराजय करावा. (मं. १६-१७)

वर सांगितल्याप्रमाणें शत्रूचा पूर्ण नाश करावा. स्वतःच्या सेनेचा सर्वत्र विजय होवो. (मं. १८)

शत्रूस घेरून मारावें. आपल्या सेनेबरोबर अग्नि ज्वाळा आणि धुराचीं मंडलें असावींत. म्हणजे अशी शस्त्रें असावींत कीं त्यांतून अग्नीच्या ज्वाळा अथवा धूराचे लोटचे लोट निघावे आणि त्यांत

शोधून शत्रु शोधून घेरला जावा. याप्रकारें शत्रूचा नाश करावा. (मं. १९)

शत्रूसेनेचे (**वरं वरं हन्तु**) मोठे मोठे वीर शोधून काढून मारावेत, त्यांचा कोणी नेता (पुढारी) शिल्लक राहूं नये. (मं. २०) याप्रमाणें पराजित झाल्यानें शत्रूंचीं हृदयें भंग होतील. प्राण पळून जातील, तोंडें सुकून जातील, असा शत्रु वांचणार नाहींत अशी स्थिति येईपर्यंत आपल्या सेनेनें हल्ला करीत रहावें. पण एवढें ध्यानांत ठेवावें कीं आपल्या पक्षाचे लोकांवर (**मित्रिणः मा**) कांहीं आपत्ति नसावी. त्यांस कांहीं कष्ट पडूं नयेत. (मं. २१)

धैर्यशाली आणि भीतिग्रस्त म्हणजे भित्रे जे कोणी असतील जेथें रहात असतील, त्या सर्वांस पराजित केलें पाहिजे. शत्रूसेनेचे हजारों वीर कापले जावोत, वनस्पति, औषधि, स्फोटक पदार्थ वगैरे सर्व बाबतींचा उपयोग शत्रूस पराजित करण्यास व्हावा. (मं. २२-२४)

आमचे अग्नि, सूर्य, धाता, प्रजापति वगैरे तसेंच आमचे ऋषि आणि आमचे वीर शत्रूवर अधिकार गाजवोत. म्हणजे आमच्या राज्यांत येऊन शत्रूच्या सर्व प्रजेनें आसरा घ्यावा. म्हणजे शत्रुंवर आमचे केवळ भौगोलिक साम्राज्यच नव्हे तर आमच्या आर्य संस्कृतीचें पूर्ण अधिराज्य व्हावें. व ते सर्व आमच्या संस्कृतींत येवो. (२५)

आमच्या सर्व सैनिकांनीं एवढा विजय संपादन करावा, आणि नंतर स्वतःच्या स्थानीं जाऊन विश्रांति घ्यावी. त्यांचा अधिकार शत्रूवर चालू रहावा. (मं. २६)

असा आशय या सूक्ताचा आहे. यापुढें विजयप्राप्तीचें सूक्त येत आहे. तें आतां पहा—

विजयप्राप्ति

कांड १०, सूक्त ५

(ऋषिः – अनेकाः । देवता – मंत्रोक्ताः ।)

(१) इन्द्रस्यौज स्थेन्द्रस्य सह स्थेन्द्रस्य बलं स्थेन्द्रस्य वीर्यं स्थेन्द्रस्य नृम्णं स्थ ।
जिष्णवे योगाय ब्रह्मयोगैर्वो युनज्मि ॥ १ ॥
इन्द्रस्यौज० । जिष्णवे योगाय क्षत्रयोगैर्वो युनज्मि ॥ २ ॥
इन्द्रस्यौज० । जिष्णवे योगायेन्द्रयोगैर्वो युनज्मि ॥ ३ ॥
इन्द्रस्यौज० । जिष्णवे योगाय सोमयोगैर्वो युनज्मि ॥ ४ ॥
इन्द्रस्यौज० । जिष्णवे योगायाप्सुयोगैर्वो युनज्मि ॥ ५ ॥
इन्द्रस्यौज स्थेन्द्रस्य सह स्थेन्द्रस्य बलं स्थेन्द्रस्य वीर्यं स्थेन्द्रस्य नृम्णं स्थ ।
जिष्णवे योगाय विश्वानि मा भूतान्युप तिष्ठन्तु युक्ता म आप स्थ ॥ ६ ॥

अर्थ— (**इंद्रस्य ओजः स्थ**) तुम्हीं इंद्राचें बळ आहांत, (**इंद्रस्य सहः स्थ**) तुम्ही इंद्राचे शत्रूचा पराजय करण्याचें सामर्थ्य आहांत, (**इन्द्रस्य बलं स्थ**) तुम्हीं इंद्राचें बळ आहांत, (**इन्द्रस्य वीर्यं स्थ**) तुम्हीं (तुमच्यामध्यें) इंद्रासारखा पराक्रम आहांत. (**इन्द्रस्य नृम्णं स्थ**) तुम्हीं इंद्राचें ऐश्वर्य असो. तुम्हांस (**जिष्णवे योगाय**) विजयप्राप्तीच्या कार्यांत (**ब्रह्मयोगैः वः युनज्मि**) ज्ञानसाधनांशीं संयुक्त करतों. (१) ० (**क्षत्रयोगैः**) क्षात्रबळासह, ...० (**इन्द्रयोगैः**) इंद्रियशक्तिसह,...० (**सोमयोगैः**) सोमादि औषधि वनस्पतींच्या शक्तिसह,...० (**अप्सुयोगैः**) पाणी वगैरे योजनांच्या शक्तिसह संयुक्त करतों. [२-५]

(**जिष्णवे योगाय**) विजयप्राप्तिसाठीं (**विश्वानि भूतानि उपतिष्ठन्तु**) सर्व भूतें तुमच्याजवळ येवोत व (**आपः मे युक्ता स्थ**) पाणी मला योग्यसमयीं प्राप्त होवो. [६]

*

(२) अग्नेर्भाग स्थ । अपां शुक्रमापो देवीर्वर्चो अस्मासु धत्त ।
प्रजापतेर्वो धाम्नास्मै लोकाय सादये ॥ ७ ॥
इन्द्रस्य भाग स्थ ।०।०।८। सोमस्य भाग स्थ ।०।०।९। वरुणस्य भाग स्थ ।०।० ॥ १० ॥
मित्रावरुणयोर्भाग स्थ ।०।०।११। यमस्य भाग स्थ ।०।१२। पितृणां भाग स्थ ।०।० ॥ १३ ॥
देवस्य सवितुर्भाग स्थ । अपां शुक्रमापो देवीर्वर्चो अस्मासु धत्त ।
प्रजापतेर्वो धाम्नास्मै लोकाय सादये ॥ १४ ॥
(३) यो व आपोऽपां भागोऽप्स्वन्तर्यजुष्यो देवयजनः । इदं तमति सृजामि तं माभ्यवनिक्षि ।
तेन तमभ्यतिसृजामो योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः ।
तं वधेयं तं स्तृषीयानेन ब्रह्मणानेन कर्मणानया मेन्या ॥ १५ ॥
यो व आपोऽपामूर्मिरप्स्वन्त०।०।०।०।१६। यो व आपोऽपां वत्सोऽप्स्वन्त०।०।०।० ॥ १७ ॥
यो व आपोऽपां वृषभोऽप्स्वन्त०।०।०।० ॥ १८ ॥
यो व आपोऽपां हिरण्यगर्भोऽप्स्वन्त०।०।०।० ॥ १९ ॥
यो व आपोऽपामश्मा पृश्निर्दिव्योऽप्स्वन्त०।०।०।० ॥ २० ॥
ये व आपोऽपामग्नयोऽप्स्वन्तर्यजुष्या देवयजनाः ।
इदं तानति सृजामि तान्माभ्यवनिक्षि ।
तैस्तमभ्यतिसृजामो योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः ।
तं वधेयं तं स्तृषीयानेन ब्रह्मणानेन कर्मणानया मेन्या ॥ २१ ॥

अर्थ-(२) (अग्नेः भागः स्थ) तुम्हीं अग्नीचा भाग आहांत हे (देवीः आपः) दिव्य जलदेवते ! (अस्मासु वर्चः धत्त) आमच्या ठिकाणीं तेज धारण कर, कारण कीं तूं (अपां शुक्र) पाण्याचें वीर्यच आहेस. (प्रजापतेः धाम्ना) प्रजापतीच्या स्थानापासून आलेलें आहेस (वः) तुला (अस्मै लोकाय सादये) या लोकांत स्थिर स्थान देतों. [७]

तुम्हीं (इन्द्रस्य भागः स्थ) इंद्राचा भाग आहांत,० (सोमस्य भागः ०) सोमादि औषधिवनस्पतींचा भाग आहांत,० (वरुणस्य०) वरुणाचा०, (मित्रावरुणयोः०) सूर्य आणि वरुणाचा०, (यमस्य०) यमाचा०, (पितृणां०) पितरांचा०, (देवस्य सवितुः०) सविता देवाचा भाग तुम्हीं आहांत. [८-१४]

(३) हे (आपः) पाणी ! (यः वः अपां भागः) तुमच्यांत जो जलाचा भाग आहे, जो (अप्सु अन्तर्, यजुष्यः देवयजनः) पाण्यांत असलेला यज्ञकर्मांत उपयोगी देवांसाठीं यजनरूप आहे, (इदं तं अतिसृजामि) हें मीं त्याला सोंपून देतों, (तं मा अभि अवनिक्षि) त्याचा तिरस्कार न करो. (तेन तं अभि अति सृजामः) त्यानें त्याला दूर करून टाकतों. (य अस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मः) जो आमचा द्वेष करतो आणि आम्हीं ज्याचा द्वेष करतों. (अनेन ब्रह्मणा अनेन कर्मणा अनया मेन्या) या ज्ञानानें, या कर्मानें आणि या इच्छेनें (तं वधेयं तं स्तृषीय) त्याचा वध करूं अथवा नाश करूं. (१५) ...(यः आपः अपां ऊर्मिः०) ज्या पाण्याच्या लाटा आहेत०, (अपां वृषभः०) जो पाण्याचा वर्षाव करणारा मेघ आहे०, (अपां हिरण्यगर्भः०) जो पाण्याचा सुवर्णासारखा तेजस्वी भाग आहे०, (अपां अश्मा पृश्निः दिव्यः) जो पाण्याचा दगडासारखा बर्फ वगैरे दिव्य भाग आहे तसेंच जो (अपां अग्नयः०) पाण्यांत अग्निप्रमाणें उष्णतेचा भाग आहे०, त्यांच्या सहाय्यानें आम्हीं आमचा द्वेष करणाऱ्यांचा नाश करतों. [१६-२१]

(४) यदर्वाचीनं त्रैहायणादनृतं किं चोदिम । आपो मा तस्मात्सर्वस्माद्दुरितात्पान्त्वंहसः ॥ २२ ॥
समुद्रं वः प्र हिणोमि स्वां योनिमपीतन । अरिष्टाः सर्वहायसो मा च नः किं चनाममत् ॥ २३ ॥
अरिप्रा आपो अप रिप्रमस्मत् ।
प्रास्मदेनो दुरितं सुप्रतीकाः प्र दुष्वप्न्यं प्र मलं वहन्तु ॥ २४ ॥
(५) विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा पृथिवीसंशितोऽग्नितेजाः ।
पृथिवीमनु वि क्रमेऽहं पृथिव्यास्तं निर्भजामो योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः ॥
स मा जीवीत्तं प्राणो जहातु ॥ २५ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहान्तरिक्षसंशितो वायुतेजाः ।
अन्तरिक्षमनु वि क्रमेऽहमन्तरिक्षात् तं निर्भजामो०।० ॥ २६ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा द्यौसंशितः सूर्यतेजाः । दिवमनु वि क्रमेऽहं दिवस्तं ०।० ॥ २७ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा दिक्संशितो मनस्तेजाः । दिशोऽनु वि क्रमेऽहं दिग्भ्यस्तं०।०॥ २८ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहाशासंशितो वाततेजाः। आशा अनु वि क्रमेऽहमाशाभ्यस्तं०।०॥ २९ ॥

अर्थ— (४) (त्रैहायणात् अर्वाचीनं यत् किं च) तीन वर्षाचे आंत जें कांहीं (अनृतं ऊदिम) असत्य भाषण केलें आहे, (तस्मात् सर्वस्मात् दुरितात् अंहसः) त्या सर्व पापांतून (आपः मा पान्तु) पाणी माझें रक्षण करो. [२२]

हे (आपः) पाण्या ! (वः समुद्रं प्रहिणोमि) तुम्हांस मीं समुद्राकडे पाठवितों, तुम्हीं (स्वां योनिं अपीतन) स्वतःच्या उगमस्थानास प्राप्त व्हा. (सर्वहायसः अरिष्टाः) संपूर्ण आयुष्यभर अहिंसित राहून (नः किंचन मा अममत्) अम्हां सर्वांस कोणत्याहि प्रकारचा रोग न व्हावा. [२३]

(आपः अरिप्राः) पाणी निर्दोष आहे, यास्तव तें (अस्मत् रिप्रं अप) आम्हां सर्वांपासून दोषांस दूर करो. (सुप्रतीकाः अस्मत् दुरितं एनः प्र) उत्तम रूप असणारे जळ आम्हां सर्वांपासून पाप आणि मळ दूर करो. (दुष्वप्न्यं मलं प्र वहन्तु) दुष्ट स्वप्न आणि मळ वाहवून दूर घेऊन जावो. [२४]

(५) तूं (विष्णोः क्रमः असि) विष्णूच्या आक्रमणासारखा आक्रमक आहेस, तसेंच (सपत्नहा पृथिवीसंशितः अग्नितेजाः) शत्रूचा नाश करणारा, पृथ्वीवर तेजस्वी आणि अग्निप्रमाणें प्रतापी आहेस. मीं (अहं पृथिवीं अनु वि क्रमे) पृथ्वीवर पराक्रम करतों, आम्हीं (तं पृथिव्याः निर्भजामः) त्याला पृथ्वीवरून दूर करतों, (यःअस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मः) जो आमचा द्वेष करतो आणि आम्हीं ज्याचा द्वेष करतों, (सः मा जीवीत्) तो जिवंत न राहो, (तं प्राणो जहातु) त्याला प्राण सोडून जावोत. [२५] ...(अंतरिक्षसंशितः वायुतेजाः) तूं अंतरिक्षांत तेजस्वी आणि वायूच्या तेजानें युक्त, (अहं अन्तरिक्षं अनु वि क्रमे) मीं अंतरिक्षांत पराक्रम करतों आणि (अन्तरिक्षात् तं निर्भजामः) त्याला अंतरिक्षांतून दूर करतों० [२६], ...(द्यौः संशितः सूर्यतेजाः) तूं द्युलोकांत तेजस्वी आणि सूर्य तेजानें युक्त आहेस, मीं (दिवं अनु वि क्रमे) द्युलोकांत पराक्रम करतों आणि त्याला द्युलोकांतून दूर करतों० [२७] ...(दिक्संशितः मनस्तेजाः०) तूं दिशांमध्यें तेजस्वी आणि मनाच्या तेजानें युक्त आहेस, मीं (दिशः०) दिशांमध्यें पराक्रम करतों आणि त्याला दिशांतून दूर करतों० [२८] ...(आशासंशितः वाततेजाः) तूं उपदिशांमध्यें तेजस्वी आणि वायूच्या तेजानें युक्त आहेस, मीं सर्व उपदिशांत पराक्रम करतों आणि त्याला तेथून दूर करतो० [२९]

विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा ऋक्संशितः सामतेजाः । ऋचोऽनु वि क्रमेऽहमृग्भ्यस्तं ०।० ॥ ३० ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा यज्ञसंशितो ब्रह्मतेजाः । यज्ञमनु वि क्रमेऽहं यज्ञात् ०।० ॥ ३१ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहौषधीसंशितः सोमतेजाः ।
ओषधीरनु वि क्रमेऽहमोषधीभ्यस्तं ०।० ॥ ३२ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहाप्सुसंशितो वरुणतेजाः । अपोऽनु वि क्रमेऽहमद्भ्यस्तं०।० ॥ ३३ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा कृषिसंशितोऽन्नतेजाः । कृषिमनु वि क्रमेऽहं कृष्यास्तं ०।० ॥ ३४ ॥
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा प्राणसंशितः पुरुषतेजाः ।
प्राणमनु वि क्रमेऽहं प्राणात् तं निर्भजामो योऽस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मः ॥
स मा जीवीत् तं प्राणो जहातु ॥ ३५ ॥
(६) जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमभ्यष्ठां विश्वाः पृतना अरातीः ।
इदमहमामुष्यायणस्यामुष्याः पुत्रस्य वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥३६॥
सूर्यस्यावृतमन्वावर्ते दक्षिणामन्वावृतम् । सा मे द्रविणं यच्छतु सा मे ब्राह्मणवर्चसम् ॥ ३७ ॥

अर्थ— (ऋक्संशितः सामतेजाः) तूं ऋग्वेदाच्या ज्ञानानें तेजस्वी आणि सामाच्या तेजानें युक्त आहेस, मीं (ऋचः अनु वि क्रमे) ऋग्विज्ञानांत पराक्रम करतों आणि त्याला ऋचांपासून दूर करतों० [३०] ...(यज्ञसंशितः ब्रह्मतेजाः) तूं यज्ञानें तेजस्वी आणि ज्ञानानें युक्त आहेस, मीं यज्ञक्षेत्रांत पराक्रम करतों आणि त्याला यज्ञक्षेत्रांतून दूर करतों० [३१] ...(औषधिसंशितः सोमतेजाः) तूं औषधिद्वारां तेजस्वी आणि सोमाच्या तेजानें युक्त आहेस. मीं (औषधीः अनु वि क्रमे) औषधि विद्येंत पराक्रम करून आणि औषधिपासून त्याला दूर करतों० [३२] ... (अप्सु संशितः वरुणतेजाः) तूं पाण्यानें तेजस्वी आणि वरुणाच्या तेजानें युक्त आहेस (अपः अनु वि क्रमे) जलामध्यें मीं पराक्रम करतों आणि जलापासून त्याला दूर करतो० [३३] ...पराक्रम (कृषिसंशितः अन्नतेजाः) तूं कृषिनें तेजस्वी व अन्नतेजानें युक्त आहेस, मीं (कृषि अनु वि क्रमे) कृषिमध्यें करतों आणि त्याला कृषिमधून दूर करतो, [३४] ...(प्राणसंशितः पुरुषतेजाः) तूं प्राणानें तेजस्वी व पुरुषतेजानें युक्त आहेस, मीं (प्राणं अनु वि क्रमे) प्राण-क्षेत्रांत विक्रम करतों आणि त्याला (प्राणात् तं निर्भजामः) प्राणापासून दूर करतों कीं जो आमचा द्वेष करतो आणि आम्हीं ज्याचा द्वेष करतों, तो जिवंत न राहो, त्याला प्राण सोडून जावो. [३५]

(६) (अस्माकं जितं) आमचा विजय झाला आहे, (अस्माकं उद्भिन्नं) आमचा प्रभाव पडला आहे. (विश्वाः पृतना अरातीः अभ्यस्थां) सर्व शत्रुसेना आणि वैरी पराजित झाले आहेत. (अहं इदं) मीं हें (आमुष्यायणस्य अमुष्याः पुत्रस्य) अमुक गोत्राच्या अमुक मातेच्या पुत्राच्या शत्रूचें (वर्चः तेजः प्राणं आयुः निवेष्टयामि) वर्चस, तेज, प्राण आणि आयुष्य पूर्णपणें बांधून टाकतों आणि मीं (इदं एनं अधराञ्चं पादयामि) याप्रमाणें त्याला खालीं पाडतों. [३६]

(सूर्यस्य आवृतं) सूर्याचें आवर्तन म्हणजे (दक्षिणां अन्वावृतं) दक्षिणदिशेस गमन आहे, त्याच्याबरोबर (अनु आवर्ते) मीं अनुकूल होऊन जातों. (सा मे द्रविणं यच्छतु) तो मला धन देवो. (सा मे ब्राह्मणवर्चसं) तो मला ज्ञानतेज देवो. [३७]

दिशो ज्योतिष्मतीरभ्यावर्ते । ता मे द्रविणं यच्छन्तु ता मे ब्राह्मणवर्चसम् ॥ ३८ ॥
सप्तऋषीनभ्यावर्ते । ते मे द्रविणं यच्छन्तु ते मे ब्राह्मणवर्चसम् ॥ ३९ ॥
ब्रह्माभ्यावर्ते । तन्मे द्रविणं यच्छतु तन्मे ब्राह्मणवर्चसम् ॥ ४० ॥
ब्राह्मणाँ अभ्यावर्ते । ते मे द्रविणं यच्छन्तु ते मे ब्राह्मणवर्चसम् ॥ ४१ ॥
(७) यं वयं मृगयामहे तं वधै स्तृणवामहै । व्यात्ते परमेष्ठिनो ब्रह्मणापीपदाम तम् ॥ ४२ ॥
वैश्वानरस्य दंष्ट्राभ्यां हेतिस्तं समधादभि । इयं तं प्सात्वाहुतिः समिद्देवी सहीयसी ॥ ४३ ॥
राज्ञो वरुणस्य बन्धोऽसि । सोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमन्ने प्राणे बधान ॥ ४४ ॥
यत्ते अन्नं भुवस्पत आक्षियति पृथिवीमनु । तस्य नस्त्वं भुवस्पते संप्रयच्छ प्रजापते ॥ ४५ ॥
अपो दिव्या अचायिषं रसेन समपृक्ष्महि । पयस्वानग्न आगमं तं मा सं सृज वर्चसा ॥ ४६ ॥
सं माग्ने वर्चसा सृज सं प्रजया समायुषा । विद्युर्मे अस्य देवा इन्द्रो विद्यात् सह ऋषिभिः॥४७॥

अर्थ—(ज्योतिष्मतीः दिशः अभ्यावर्ते) तेजोयुक्त दिशांस मीं गमन करतों. (ताः मे०) त्या मला धन आणि ज्ञान तेज देवोत. [३८]

(सप्तऋषीन् अभ्यावर्ते) सप्तऋषींस अनुकूल होऊन मीं गमन करतों. (ते मे०) ते मला धन आणि ज्ञान तेज देवोत. [३९]

(ब्रह्म अभ्यावर्ते) मीं ज्ञानास अनुकूल होऊन गमन करतों. (तत्०) तें मला धन आणि ज्ञानाचें तेज देवो. [४०]

(ब्रह्मणां अभ्यावर्ते) ब्राह्मणांस अनुकूल होऊन मीं गमन करतों. (ते मे०) ते मला धन आणि ज्ञान तेज देवोत. [४१]

(७) (यं वयं मृगयामहे) ज्याला आम्हीं शोधतों, (तं वधैः स्तृणवामहै) वधानीं, शस्त्रांनीं त्याचा नाश करतों, आणि (परमेष्ठिनः व्यात्ते) परमेश्वराच्या विकाळ दाढेंत, (तं ब्रह्मणा अपीपदाम) ज्ञानाच्या योगें त्याला टाकून देतों. [४२]

(वैश्वानरस्य दंष्ट्राभ्यां) ईश्वराच्या दाढांनीं तयार झालेलें (हेतिः) जें शस्त्र आहे, त्यानें (तं अभि समधात्) त्याचा नाश करतों. (तं प्सात्वा) त्याचा नाश करून (इयं समित्) ही जी समिधा या यज्ञांत टाकली जात आहे. ती (देवी सहीयसी) शत्रूस दूर करण्यास समर्थ आहे. [४३]

(वरुणस्य राज्ञः बन्धः असि) तूं वरुण राजाच्या बंधनांत पडला आहेस. (सः अमुं) तो या (अमुष्यायणं अमुष्याः पुत्रं) अमुक गोत्राच्या अमुक मातेच्या पुत्राला (अन्ने प्राणे बधान) अन्न आणि प्राणांत बांधतो. [४४]

हे (भुवः पते) पृथ्वीच्या स्वामी ! (यत् ते अन्नं) जें तुझें अन्न (पृथिवीं अनु आक्षियाति) पृथ्वीवर आहे, हे (प्रजापते) प्रजेच्या पालका ! (तस्य त्वं नः संप्रयच्छ) तूं तें आम्हांस प्रदान कर. [४५]

हे दिव्य (आपः) पाण्या ! (अचायिषं) मीं याचना करीत आहें कीं (रसेन समपृक्ष्महि) आम्हांस रसानीं संयुक्त करा. हे (अग्ने) अग्ने ! (पयस्वान् आगमं) रसासह मी येत आहे. (तं मा वर्चसा सं सृज) मला तेजानें युक्त कर. [४६]

हे अग्ने ! (मा वर्चसा सं सृज) मला तेजानें युक्त कर, (प्रजया आयुषा सं) प्रजा आणि आयुष्यानें युक्त कर. (देवाः अस्य मे विद्युः) देवता माझी ही भावना जाणोत. (इंद्रः ऋषिभिः सह विद्यात्) इंद्र ऋषींसह याविषयीं जाणो. [४७]

यदग्ने अद्य मिथुना शपातो यद्वाचस्तृष्टं जनयन्त रेभाः ।
मन्योर्मनसः शरव्या३ जायते या तया विध्य हृदये यातुधानान् ॥ ४८ ॥
परा शृणीहि तपसा यातुधानान् पराग्ने रक्षो हरसा शृणीहि ।
परार्चिषा मूरदेवाञ्छृणीहि परासुतृपः शोशुचतः शृणीहि ॥ ४९ ॥
अपामस्मै वज्रं प्र हरामि चतुर्भृष्टिं शीर्षभिद्याय विद्वान् ।
सो अस्याङ्गानि प्र शृणातु सर्वा तन्मे देवा अनु जानन्तु विश्वे ॥ ५० ॥

अर्थ- हे अग्ने ! (यत् अद्य मिथुना शपातः) आज जे एकत्रित येऊन शिव्या देत आहेत, (यत् रेभाः वाचः तृष्टं जनयन्तं) जे वक्ते वाणीचे दोष करतात, (या मन्योः मनसः शरव्या जायते) क्रोधानें जी मनाची हिंसा होते, (तया यातुधानान् हृदये विध्य) त्यानें दुष्टांच्या हृदयाचा वेध कर. [४८]

(यातुधानान् तपसा परा शृणीहि) दुष्टांस आपल्या त्रासापासून दूर पळवून लाव, हे अग्ने ! (रक्षः हरसा परा शृणीहि) राक्षसांस आपल्या बळानें दूर कर. (अर्चिषा मूरदेवान् परा शृणीहि) स्वतःच्या ज्वालांनीं मूर्खांस दूर फेंकून दे आणि (असुतृपः शोशुचतः परा शृणीहि) दुसऱ्यांच्या प्राणांनीं तृप्त होणाऱ्यांस शोक करवीत दूर पळवून लाव. [४९]

(विद्वान्) मीं हें सर्व जाणतों आणि जाणून, (अस्मै शीर्षभिद्याय) याचें मस्तक तोडण्यासाठीं (अपां चतुर्भृष्टिं वज्रं प्र हरामि) पाण्याच्या चारी बाजूस नाश करणारें वज्र फेंकतों. (सः अस्य सर्वा अंगानि प्र शृणातु) तें याच्या सर्व अंगास कापो, (तत् मे विश्वेदेवाः अनु जानन्तु) तें माझें कर्म सर्व देव अनुकूलतेनें जाणोत. [५०]

विजयप्राप्ति

शत्रूच्या पराजयासाठीं प्रयत्न

शत्रूच्या पराजयासाठीं (**ओज**) शारीरिक बल, (**सहः**) शत्रूचे हल्ले सहन करण्याचें सामर्थ्य, (**बल**) सैन्य तसेंच अन्य प्रकारचें बल, (**वीर्य**) पराक्रम, वीर्याची शक्ति, (**नृम्णं**) मानवी अनुकूल्याचें सामर्थ्य, एवढीं साधनें आवश्यक आहेत. नंतर (**जिष्णुयोग**) विजय प्राप्त करण्याची चातुर्ययुक्त योजना कशी करावी, याचें उत्तम ज्ञान असावें. सर्व अन्य बलाचें अनुकूल्य असून जर ' **जिष्णु योगां** ' त न्यूनता झाली, तर कांहींच सिद्धि होऊं शकत नाहीं. त्याच्याबरोबरच ' **ब्रह्मयोग** ' म्हणजे ज्ञानानें सिद्ध होणारी योजनासुद्धां अवश्य असली पाहिजे, त्याचप्रमाणें ' **क्षात्रयोग** ', क्षात्रयुद्ध क्षेत्रांत करण्याच्या व्यूह वगैरे रचनांमध्यें विशेष प्राविण्य असलें पाहिजे, ' **इन्द्रयोग** ' म्हणजे राज्यपद अथवा राजैश्वर्याचा योग असावा लागतो; याच्या अभावीं इतर कार्यें कांहीं फलद्रूप होत नाहींत. ' **सोमयोगा** ' चें दुसरें नांव आहे औषधियोग. शत्रूंशीं युद्ध होतांच आपल्या पक्षाचे जे कोणी जखमी होतील त्यांना लवकर उपचार करून आरोग्यसंपन्न करण्यासाठीं वैद्यांचें औषधि ज्ञान अत्यंत उपयोगी असतें. याचप्रमाणें स्वपक्षीय लोकांची शारीरिक शक्ति वाढविण्यासाठीं सुद्धां या औषधी-प्रयोगाची अत्यंत आवश्यकता आहे.

' **अप्सुयोगा** ' चें नांव जलयोग आहे. पाण्याचा मानवी-जीवनाशीं अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे, म्हणून तर त्यास जीवन म्हटलें आहे. म्हणून विजयासाठीं जीवनाशीं संयोग अत्यंत उत्तम प्रकारें असला पाहिजे. पाणी वेळेवर न मिळालें तर पराजय होण्यास विलंब लागणार नाहीं.

संक्षेपतः प्रथम ६ मंत्रांत विजयप्राप्तीसाठीं अत्यंत आवश्यक विषयांसंबंधीं सूचना वरप्रमाणें दिल्या आहेत.

मंत्र ७ ते २१ पर्यंत म्हटलें आहे कीं बलादि साधनें

आपणापाशीं आहेत त्यांचा उपयोग शत्रुनाश करण्यासाठीं केला पाहिजे, ज्यामुळें शत्रूचा नाश होऊन आपणास विजय प्राप्त होईल.

मं. २२ ते २४ पर्यंत म्हटलें आहे कीं, पाण्यानें सर्व शरीर आणि मन यांची निर्दोषता सिद्ध होते. त्यानेंच शरीर आणि मनाचे दोष आणि मल दूर होतात. मनांतील मलानें स्वप्नदोष होतो आणि शारीरिक दोषांनीं रोग उत्पन्न होतात. जलप्रयोगानें हे सर्व दोष दूर होतात आणि मनुष्य निर्दोष झाला म्हणजे विजय प्राप्त करण्यास समर्थ होतो. जोपावेतों शरीर आणि मनांत दोष आहेत, तोपर्यंत विजय प्राप्त होऊं शकत नाहीं आणि प्राप्त झाल्यावरही स्थिर राहूं शकत नाहीं.

पृथ्वी, अंतरिक्ष, द्यौ, दिशा, उपदिशा, ऋचा, ऋतु, यज्ञ, औषधि, सोम, आप, कृषि, अन्न, प्राण वगैरे सर्व स्थानांतून शत्रूस दूर केलें पाहिजे आणि या स्थानांस शत्रुरहित केलें पाहिजे. हा आशय मंत्र २५ ते ३५ पर्यंत मंत्रांत सांगितला आहे.

एवढें केल्यावर विजय प्राप्त होईल आणि असा पवित्र वीरच शत्रूला बांधून त्याला पायांखालीं दाबून टाकूं शकतो, ही गोष्ट ३६ व्या मंत्रांत सांगितली आहे.

सूर्यापासून तेजस्विता, दिशांपासून विस्तृत कार्यक्षेत्र, ऋषींपासून ज्ञान, ब्रह्म म्हणजे मंत्रांपासून सुविचार आणि ब्राह्मणांपासून उत्तम उपदेश प्राप्त करून विजयी होण्याची सूचना मंत्र ३७ ते ४१ यांत दिली आहे.

४२-४३ या मंत्रांत आपल्या शत्रूस परमेश्वराधीन म्हणजे ईश्वरी न्यायाधीन करण्यास सांगितलें आहे. स्वतः त्याचा नाश न करतां असें करावें कीं, जेणें करून तो आपलें कांहीं करूं शकणार नाहीं आणि नंतर त्यास ईश्वराधीन करावें. पण असें करण्यास आपली शक्ति वाढविली पाहिजे, शत्रूचें सामर्थ्य कमी केलें पाहिजे. अशी व्यवस्था केली पाहिजे कीं, शत्रु आपलें कांहींच नुकसान करूं शकणार नाहीं.

शत्रूस आपला कैदी केल्यानंतरसुद्धां त्यास परमेश्वराचा कैदी मानलें पाहिजे, त्याचा नाश करावयाचा तर परमेश्वर करो.

आपणांजवळ बल, अन्न, जल, शौर्य, तेजस्विता इत्यादींचें वैपुल्य असावें आणि शत्रुजवळ या वस्तु कमी असाव्यात, अशी योजना केली पाहिजे. अशा प्रकारचा बोध ४७ व्या मंत्रापर्यंत मिळतो.

अश्लील, अभद्र शब्द आपल्या राज्यांत कोणी कोणास उद्देशून वापरूं नयेत. हा वाणीचा दुरुपयोग वाटल्यास शत्रुराज्यांत चालू रहावा. दुष्टांचा विध्वंस याप्रकारें करून सज्जनांचें रक्षण केलें पाहिजे. हा या सूक्ताचा संक्षेपतः आदेश-आज्ञा आहे.

दुष्टांचा नाश

कांड ७, सूक्त ११४

(ऋषिः - भार्गवः । देवता - अग्नीषोमौ ।)

आ तें ददे वक्षणाभ्य आ तेऽहं हृदयाद्ददे । आ ते मुखस्य संकाशात्सर्वं ते वर्च आ ददे ॥ १ ॥
प्रेतो यन्तु व्याध्यः प्रानुध्याः प्रो अशस्तयः । अग्नी रक्षस्विनीर्हन्तु सोमो हन्तु दुरस्यतीः ॥ २ ॥

अर्थ— (ते वक्षणाभ्यः वर्चः आददे) तुझ्या छातीपासून मी शक्ति प्राप्त करतों. (अहं ते हृदयात् आददे) मी तुझ्या हृदयापासून बळ प्राप्त करतों. (ते मुखस्य संकाशात्) तुझ्या मुखापासून (ते सर्वं वर्चः आददे) तुझें सर्व तेज मी प्राप्त करतों. [१]

(इतः व्याध्यः प्रयन्तु) येथून व्याधी दूर जावोत. (अनुध्याः प्र) दुःखें दूर होवोत. (अशस्तयः प्र उ) अकीर्ति दूर जावोत. (अग्निः रक्षस्विनीः हन्तु) अग्नि राक्षसीणींचा वध करो (सोमः दुरस्यतीः हन्तु) आणि सोम दुराचारीणींचा नाश करो. [२]

स्वतःच्या छाती, हृदय, मुख इत्यादि सर्व अवयवांचें बळ वाढविलें पाहिजे आणि आधि, व्याधि, पीडा, दुःखें आणि अकीर्ति दूर केल्या पाहिजेत. तसेंच दुराचारिणी स्त्रियांसुद्धां दूर केलें पाहिजे.

शत्रूचा नाश

कांड ६, सूक्त ६

(ऋषिः - अथर्वा । देवता - ब्रह्मणस्पतिः, सोमः ।)

योऽस्मान्ब्रह्मणस्पतेऽदेवो अभिमन्यते । सर्वं तं रन्धयासि मे यजमानाय सुन्वते ॥ १ ॥
यो नः सोम सुशंसिनो दुःशंस आदिदेशति । वज्रेणास्य मुखे जहि स संपिष्टो अपायति ॥ २ ॥
यो नः सोमाभिदासति सनाभिर्यश्च निष्ट्यः । अप तस्य बलं तिर महीव द्यौर्वधत्मना ॥ ३ ॥

अर्थ— हे (ब्रह्मणस्पते) ज्ञानाच्या स्वामी ! (यः अदेवः अस्मान् अभिमन्यते) जो ईश्वराची भक्ति न करणारा आम्हांस नीच करूं इच्छितो, (तं सर्वं) त्या सर्व शत्रूला (सुन्वते यजमानाय मे रन्धयासि) सोमरसानें यज्ञ करणाऱ्या माझ्यासाठीं नाश कर. [१]

हे सोमा ! (यः दुःशंसः) जो दुराचारी (सुशंसिनः नः आदिदेशति) सदाचार करणाऱ्या आम्हां सर्वांस आज्ञा करतो म्हणजे आम्हांस स्वतःच्या आधीन करूं इच्छितो, (अस्य मुखे वज्रेण जहि) त्याच्या तोंडावर वज्रानें आघात कर, म्हणजे (सः संपिष्टः अप अयाति) तो चूर्ण होऊन दूर होवो. [२]

हे सोमा ! (यः सनाभिः) जो स्वजातीय (यः च निष्ट्यः) आणि जो सर्वांत खालीं बसण्यायोग्य नीच मनुष्य (नः अभिदासति) आम्हांस दास करूं इच्छितो, अथवा आमचा घात करतो, (तस्य बलं वधत्मना अप तिर) त्याच्या बलाला आपल्या वधसाधनांनीं निरर्थक कर, (मही द्यौः इव) ज्याप्रकारें महान् द्युलोक स्वतःच्या प्रकाशानें अंधकारास दूर करतो. [३]

शत्रूचीं लक्षणें

या सूक्तांत शत्रूचीं लक्षणें खालीं दिल्याप्रमाणें सांगितलीं आहेत—

१ अदेवः— जो एक अद्वितीय ईश्वरास मानीत नाहीं, देवाची भक्ति करीत नाहीं, जो नास्तिक आहे आणि सत्यधर्मावर अविश्वास करतो.

२ अभिमन्यते— जो अभिमानानें भरपूर आहे, घमेंडी आहे.

३ दुःशंसः— ज्याच्याविषयीं सर्व मनुष्यें वाईट बोलतात, सर्व लोक ज्याची निंदा करतात म्हणजे जो एकटाच सर्वांचें अहित करतो.

४ आदिदेशति— जो दुसऱ्यावर हुकुम गाजविण्याची इच्छा करतो, जो दुसऱ्यांस आज्ञा करतो, फक्त आज्ञा करणेंच जाणतो, जो कोणत्याहि रीतीनें दुसऱ्यावर अधिकार गाजवूं इच्छितो.

५ अभिदासति— जो दुसऱ्यांस दास करूं इच्छितो, दुसऱ्यांचा नाश करतो, दुसऱ्यांस लुटतो.

शत्रूचीं हीं पांच लक्षणें आहेत. या लक्षणांनीं बोधित होणाऱ्या शत्रूस दूर केलें पाहिजे. मग तो (सनाभिः) स्वजातीय, आपल्या कुळांत उत्पन्न झालेला, अथवा (नि-ष्ट्यः) निकृष्ट जातीचा अथवा एखाद्या हीन कुळांत उत्पन्न झालेला असो, अथवा आचार हीन असो, अथवा कसाहि असो, त्यास दूर केलें पाहिजे.

शरीरांतून बाण काढून टाकणें

कांड ६, सूक्त ९०

(ऋषिः – अथर्वा । देवता – रुद्रः ।)

यां ते रुद्र इषुमास्यदङ्गेभ्यो हृदयाय च । इदं तामद्य त्वद्वयं विषूचीं वि वृहामसि ॥ १ ॥
यास्ते शतं धमनयोऽङ्गान्यनु विष्ठिताः । तासां ते सर्वासां वयं निर्विषाणि ह्वयामसि ॥ २ ॥
नमस्ते रुद्रास्यते नमः प्रतिहितायै । नमो विसृज्यमानायै नमो निपतितायै ॥ ३ ॥

अर्थ— (रुद्रः यां इषुं) रुद्र ज्या बाणाला (ते अङ्गेभ्यः हृदयाय च आस्यत्) तुझ्या अंगावर आणि हृदयावर फेंकतो, (अद्य तां) आज त्या बाणाला (वयं त्वद् विषूचीं) आम्हीं तुझ्याहून विरुद्ध दिशेहून (इदं विवृहामसि) अशाप्रकारें दूर करतों. [१]

(याः ते शतं धमनयः) तुझ्या शरीरांत ज्या शेंकडों धमन्या (अङ्गानि अनु विष्ठिताः) अवयवांत रहातात, (ते तासां सर्वासां) तुझ्या त्या सर्व धमन्यांतून (विषाणि निः ह्वयामसि) सर्व विषांस निःशेष करतों. [२]

हे रुद्रा ! (ते अस्यते नमः) फेंकणाऱ्या तुला नमस्कार असो. (प्रतिहितायै नमः) फेंकलेल्या बाणांस नमस्कार असो. (विसृज्यमानायै नमः) सोडला जाणाऱ्या बाणास नमस्कार असो आणि (निपतितायै नमः) लक्ष्यावर लागलेल्या बाणास नमस्कार असो. [३]

भावार्थ— शरीरांत लागलेल्या बाणांस युक्तीनें दूर केलें पाहिजे आणि शरीरास विषरहित केलें पाहिजे. (१–३)

पापापासून मुक्तता

कांड ७, सूक्त ११२

(ऋषिः - वरुणः । देवता – आपः, वरुणश्च ।)


शुम्भनी द्यावापृथिवी अन्तिसुम्ने महिव्रते । आपः सप्त सुस्रुवुर्देवीस्ता नो मुञ्चन्त्वंहसः ॥ १ ॥
मुञ्चन्तु मा शपथ्या३दथो वरुण्यादुत । अथो यमस्य पड्वीशाद्विश्वस्माद्देवकिल्बिषात् ॥ २ ॥

अर्थ— (द्यावापृथिवी शुम्भनी) द्युलोक आणि पृथ्वीलोक हे (महिव्रते अन्ति-सुम्ने) महान् कार्य करणारे आणि जवळून सुख देणारे आहेत. (सप्त देवीः आपः) सात दिव्य नद्या येथें (सुस्रुवुः) वहात आहेत. (ताः नः अंहसः मुञ्चन्तु) त्या आम्हांस पापापासून वांचवोत. [१]

(मा शपथ्यात्) मला शापानें (अथो उत वरुण्यात्) आणि वरुणदेवाच्या क्रोधापासून (मुञ्चन्तु) वांचवो (अथो यमस्य पड्वीशात्) आणि यमाच्या बंधनापासून तसेंच (विश्वस्मात् देव किल्बिषात्) सर्व देव विषयक केलेल्या दोषांपासून मुक्त करो. [२]

*

हा द्युलोक आणि पृथ्वीलोक फार सुखदायक आहेत. येथें वहाणाऱ्या सात नद्या आम्हांस पापांपासून आणि सर्व प्रकारच्या वाचिक आणि शारीरिक दोषांपासून वाचवोत. अध्यात्मिक दृष्ट्या सात प्रवाह, पंचज्ञानेंद्रियें आणि मन तसेंच बुद्धि असे आहेत. आत्म्यापासून या सात नद्या अशाप्रकारें वहातात—



हे सात प्रवाह आम्हांस सर्व प्रकारच्या पापांपासून वांचवोत आणि पाप मुक्त करोत. निःसंशय या नद्या पापांपासून वांचविणाऱ्या आहेत.

पापनाशन

कांड ४, सूक्त २४

(ऋषिः – मृगारः । देवता – इन्द्रः ।)

इन्द्र॑स्य मन्महे शश्व॒दिद॑स्य मन्महे वृत्र॒घ्न स्तोमा॒ उप॑ मे॒म आगुः॑
यो दा॒शुषः॑ सु॒कृतो॒ हव॒मेति॒ स नो॑ मुञ्च॒त्वंह॑सः ॥ १ ॥

अर्थ— (इन्द्रस्य मन्महे) आम्हीं इंद्राचें ध्यान करतों, (अस्य वृत्रघ्नः इत् शश्वत् मन्महे) त्या शत्रुनाशक प्रभूचें आम्हीं निश्चयेंकरून नेहमीं ध्यान करतों, (इमे स्तोमाः मा उप मा अगुः) हे त्याचे स्तोम मजजवळ आले आहेत. (यः दाशुषः सुकृतः हवं एति) जो दाता सत्कार्य करणाऱ्याची हांक ऐकून येतो (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस पापांपासून मुक्त करो. [१]

भावार्थ— सर्व जगाच्या प्रभूचें मीं ध्यान करतों, त्याच्या गुणांचें आम्हीं मनन करतों, तो शत्रूंचा नाश करणारा प्रभू आहे. त्याचे प्रशंसेची स्तोत्रेंच नेहमीं आमच्या नजरे समोर (मनांत) येतात. निःसंशय तो सत्कर्म करणाऱ्या दाता अशा महोदयाची प्रार्थना ऐकतो. तो आम्हांस पापापासून वांचवो. [१]

य उग्राणामुग्रबाहुर्ययुर्यो दानवानां बलमारुरोज ।
येन जिताः सिन्धवो येन गावः स नो मुञ्चत्वंहसः ॥ २ ॥
यश्चर्षणिप्रो वृषभः स्वर्विद्यस्मै ग्रावाणः प्रवदन्ति नृम्णम् ।
यस्याध्वरः सप्तहोता मदिष्ठः स नो मुञ्चत्वंहसः ॥ ३ ॥
यस्य वशास ऋषभास उक्षणो यस्मै मीयन्ते स्वरवः स्वर्विदे ।
यस्मै शुक्रः पवते ब्रह्मशुम्भितः स नो मुञ्चत्वंहसः ॥ ४ ॥
यस्य जुष्टिं सोमिनः कामयन्ते यं हवन्त इषुमन्तं गविष्टौ ।
यस्मिन्नर्कः शिश्रिये यस्मिन्नोजः स नो मुञ्चत्वंहसः ॥ ५ ॥
यः प्रथमः कर्मकृत्याय जज्ञे यस्य वीर्यं प्रथमस्यानुबुद्धम् ।
येनोद्यतो वज्रोऽभ्यायताहिं स नो मुञ्चत्वंहसः ॥ ६ ॥

अर्थ—(यः उग्रबाहुः) जो बलवान् वीर (उग्राणां ययुः) प्रचंड वीरांचा चालक आहे आणि जो (दानवानां बलं आरुरोज) असुरांची शक्ति-सामर्थ्य कापून टाकतो, (येन सिन्धवः गावः जिताः) ज्यानें नद्या आणि गाई जिंकून स्वतःच्या ताब्यांत आणल्या आहेत, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आमचें पापांपासून रक्षण करो. [२]

(यः चर्षणिप्रः वृषभः स्वर्विद्) जो मनुष्यास पूर्णत्वास नेणारा, बलवान् आणि आत्मिकप्रकाशाला जवळ ठेवणारा आहे, (ग्रावाणः यस्मै नृम्णं प्रवदन्ति) हे दगडसुद्धां ज्याच्याजवळ बळ आहे असें म्हणतात, (यस्य सप्त होता अध्वरः मदिष्ठः) ज्याचे सात होतागण ज्यांत कार्य करीत आहेत, असा अहिंसामय यज्ञ अत्यंत आनंद देणारा आहे, तो (सः नः अंहसः मुञ्चतु) आम्हांस पापांपासून वांचवो. [३]

(यस्य वशासः ऋषभासः उक्षणः) ज्याच्या कार्यासाठीं गाय, बैल आणि सांड (पोळ) असतात, (यस्मै स्वर्विदः स्वरवः मीयन्ते) ज्या आत्मिक शक्तियुक्तासाठींच सर्व यज्ञ होत असतात, (यस्मै ब्रह्मशुम्भितः शुक्रः पवते) ज्याच्यासाठीं वेदोच्चारानें पवित्र केलेला सोम शुद्ध केला जात आहे, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करो. [४]

(सोमिनः यस्य जुष्टिं कामयन्ते) सोमयज्ञ करणारे ज्याच्या प्रीतीची इच्छा करतात, (यं इषुमन्तं गविष्टौ हवन्ते) ज्या बाण धारण करणाऱ्याला इच्छापूर्तीसाठीं बोलावितात (यस्मिन् अर्कः शिश्रिये) ज्यांत सूर्य आश्रय घेतो, (यस्मिन् ओजः) ज्यामध्यें बळ रहातें (सः नः मुञ्चतु) तो आम्हांस पापांपासून मुक्त करो. [५]

(यः प्रथमः कर्मकृत्याय जज्ञे) जो प्रथम कर्म करण्यासाठींच प्रकट झाला (यस्य प्रथमस्य वीर्यं अनुबुद्धं) ज्या अद्वितीय देवाचा पराक्रम सर्वत्र जाणला जातो, (येन उद्यतः वज्रः अहिं अभ्यायत) ज्यानें वज्र उचललें असतां सर्व प्रकारच्या शत्रूंचा नाश होतो, (सः नः अंहसः मुञ्चतु) तो आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करो. [६]

भावार्थ— जो बलवान् प्रभू वीरांस वीर्य देणारा आहे, जो दुष्टाच्या बलाचा नाश करतो, ज्याचा अमृतरस धारण करून नद्या आणि गाई या पृथ्वीवर फिरतात, तो प्रभू आमचें पापांपासून रक्षण करो. [२]

जो मनुष्यास पूर्ण करणारा बलवान् आणि आत्मशक्तीचा दाता आहे, सामान्य दगडसुद्धां ज्याच्या शक्तीची प्रशंसा करतात, आणि ज्याच्यासाठीं सर्व यज्ञ केले जातात, तो प्रभु आमचें पापांपासून रक्षण करो. [३]

ज्याच्या यज्ञकर्मांत गाय, बैल, वगैरे पशुसुद्धां आपलें बळ खर्च करतात, ज्याच्या आत्मिकबलासाठीं अनेक यज्ञ केले जातात, ज्याच्या यज्ञांत मंत्रोच्चारांनीं पवित्र केलेला सोम शुद्ध केला जातो, तो प्रभू आम्हांस पापांपासून वांचवो. [४]

ज्याच्या संतोषासाठीं सोमयाजी यज्ञ करतात, आपल्या इच्छापूर्तीसाठीं प्रार्थना करण्यांत येते, ज्याच्या आधारानें सूर्यासारखे गोल अंतरिक्षांत राहिले आहेत, एवढी ज्याची प्रचंड शक्ति आहे, तो प्रभू आमचें सर्व पापांपासून रक्षण करो. [५]

जो जगद्रूपी कार्य करण्यासाठींच प्रथम प्रकट झाला आहे, ज्याच्या या कार्यावरून त्याचें बळ जाणलें जातें, ज्याच्या वज्रासमोर कोणी शत्रु टिकूं शकत नाहीं, तो प्रभू आम्हांस पापांपासून वांचवो. [६]

यः सं॒ग्रामा॒न्नय॑ति॒ सं यु॒धे व॒शी यः पु॒ष्टानि॑ संसृ॒जति॑ द्व॒यानि॑ ।
स्तौमीन्द्रं॑ ना॒थि॒तो जो॑हवीमि॒ स नो॑ मुञ्च॒त्वंह॑सः ॥ ७ ॥

अर्थ— (यः वशी संग्रामान् युधे सं नयति) जो आपल्या तंत्रानें चालणाऱ्या योद्ध्यांच्या समुदायास युद्ध करण्यास प्रवृत्त करतो, **(यः द्वयानि पुष्टानि संसृजति)** जो दोन्ही पुष्टांस (बलवानांस) मित्रत्वासाठीं युक्त करतो, त्या प्रकारें **(इन्द्रं नाथितः स्तौमि)** प्रभूची त्या दीनानाथाला वश राहून मीं स्तुति करतों आणि **(जोहवीमि)** वारंवार त्यास हांका मारतो, **(सः नः अंहसः मुञ्चतु)** तो आम्हांस पापांपासून मुक्त करो. [७]

भावार्थ— जो सर्वांस आपल्या ताब्यांत ठेवतों, जो धर्म युद्धासाठीं प्रेरित करतो, जो दोन बलवानांची मैत्री व्हावी म्हणून त्यांस प्रेरणा देतो, त्याच्या आज्ञेत राहून मीं त्याची प्रार्थना करतों कीं तो प्रभू आम्हांस सर्व पापांपासून मुक्त करो. [७]

पापनाशन

पापापासून रक्षण

या सूक्तांत परमेश्वराची प्रार्थना इंद्र नांवानें केली आहे. इन्द्र बलाची देवता आहे, सर्वांत जें बल संचरतें तो इंद्राचाच प्रभाव होय. इंद्राच्या बलानें सर्व बलवान् झाले आहेत. बलावांचून कृमीकीटकसुद्धां राहूं शकणार नाहींत, हें दर्शविण्यासाठीं तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे की—

ग्रावाणः यस्मै नूरुणं प्र वदन्ति । (मं. ३)

' हे दगड ज्याच्या बलाची स्तुति करतात. ' म्हणजे बलासाठीं ज्याची प्रशंसा करतात, शक्ति याच्यापासूनच प्राप्त होते असें निश्चयपूर्वक सांगतात, दगड म्हणतात कीं, आपणांमध्यें जी शक्ति आहे, जी दृढता आहे आणि जें बल आहे तें त्याचेंच आहे. ज्या प्रभूसाठीं हे सर्व यज्ञ होतात. ही साक्ष ज्याप्रमाणें दगड देतात, तद्वत् सर्व पदार्थ देऊं शकतात कारण कीं, प्रत्येक पदार्थास बल त्याचे जवळूनच प्राप्त होतें.

हा ईश्वर **(प्रथमः)** आदि देव आहे. त्याचें प्रकट होणें, **(कर्मकृत्याय)** हें जगद्रूपी कर्म करण्यासाठींच आहे. म्हणजे तो प्रकट होऊन जगद्रूपी कार्य करतो किंवा या जगद्रूपी महान् कार्यास पाहिल्यानें त्याच्या अस्तित्वाचें ज्ञान होतें आणि **(अस्य प्रथमस्य वीर्यं अनुबुद्धं)** त्या आदि देवाचें बल आणि पराक्रम या दोहोंचें ज्ञान होतें. जर हें महान् कार्य ध्यानीं न आलें तर कोणास त्याचा थांग कसा लागेल ? हें प्रचंड सामर्थ्य प्रभूचें आहे म्हणून कोणी शत्रु त्याचे समोर उभा राहूं शकत नाहीं. तो तर—

उग्राणां उग्रबाहुः । (मं. २)

' तो भयंकर शूरवीरांससुद्धां वीर्य-पराक्रम देणारा बाहु-बलशाली वीर आहे. ' म्हणजे आमचे अत्यंत भयंकर शूरवीर आहेत ते त्याच्याच पराक्रमानें वीर्यशाली झाले आहेत, त्याच्या बलानें बलिष्ठ आणि त्याच्या सामर्थ्यानें सामर्थ्यशाली झालें आहेत. जर पराक्रमी वीर हें नीट समजून घेतील, तसाच दृढ विश्वास बाळगतील तर ते जास्त प्रभावशाली होतील. म्हणून विनंति कीं, कोणींहि स्वशक्तीचा खोटा अभिमान बाळगून त्यापासून दुसऱ्यास त्रास अथवा पीडा देऊं नये. ज्या बलामुळें मनामध्यें अहंकार निर्माण होतो तें बल तर त्या प्रभूचें आहे. जर तो आपलें बल परत घेईल तर मग कोणत्या सामर्थ्याचा गर्व ते करूं शकतील ? असा विचार करून आपल्या बलापासून दुसऱ्यास लाभ करून देण्याचा प्रयत्न करावयाचा कीं पीडा देण्याचा. हाच उपाय पापापासून वांचण्याचा आहे.

वीर पुरुष त्याच्या बलानें प्रेरित होऊन युद्ध करतात, धर्मयुद्ध करणारे सुद्धां याच्याच बलानें युक्त असतात, हाच सर्वांचा खरोखर स्वामी आहे. जे लोक हा प्रभूच आपला स्वामी आहे असें समजून स्वतःस सनाथ समजतात, तेच पापापासून मुक्त होतात, दूर रहातात.

सर्व यज्ञ करणारे स्वतःचे यज्ञ याच्या प्रेमास्तवच करतात. सर्व यज्ञांत याच्यासाठींच हवन केलें जातें. यज्ञांत दिलेलें दान यालाच पोहोंचतें आणि तो दात्याच्या कामना पूर्ण करतो. अशा परमेश्वराच्या भक्तीनें मनुष्य पवित्र होऊन पापांपासून मुक्त होतो.

मधु-विद्या

कांड १, सूक्त ३४

(ऋषिः - अथर्वा । देवता - मधुवनस्पतिः ।)

इयं वीरुन्मधुजाता मधुना त्वा खनामसि । मधोरधि प्रजातासि सा नो मधुमतस्कृधि ॥ १ ॥
जिह्वाया अग्रे मधु मे जिह्वामूले मधूलकम् । ममेदह क्रतावसो मम चित्तमुपायसि ॥ २ ॥
मधुमन्मे निक्रमणं मधुमन्मे परायणम् । वाचा वदामि मधुमद् भूयासं मधुसंदृशः ॥ ३ ॥
मधोरस्मि मधुतरो मदुघान्मधुमत्तरः । मामित्किल त्वं वनाः शाखां मधुमतीमिव ॥ ४ ॥
परि त्वा परितत्नुनेक्षुणागामविद्विषे । यथा मां कामिन्यसो यथा मन्नापगा असः ॥ ५ ॥

अर्थ— (**इयं वीरुत् मधुजाता**) ही वनस्पति मधुरतेसह निर्माण झाली आहे, मीं (**त्वा मधुना खनामसि**) तुला मधुरतेनें खोदतों. (**मधोः अधि प्रजाता असि**) मधाबरोबर तूं निर्माण झाली आहेस म्हणून (**सा**) अशी तूं (**नः मधुमतः कृधि**) आम्हांस मधुरतेनें युक्त कर. [१]

(**मे जिह्वायाः अग्रे मधु**) माझ्या जीभेच्या टोंकावर मधुरता राहो. (**जिह्वामूले मधूलकं**) माझ्या जीभेच्या मुळाशीं सुद्धां मधुरता असो. हे मधुरते ! तूं (**मम क्रतौ इत् अह असः**) माझ्या कर्मांत खात्रीनें रहाच. (**मम चित्तं उपायसि**) माझ्या चित्तांत मधुरता राहो. [२]

(**मे निक्रमणं मधुमत्**) माझें वर्तन मधुर असो (**मे परायणं मधुमत्**) माझें दूर जाणें सुद्धां मधुर असो, मीं (**वाचा मधुमत् वदामि**) वाणीनें मधुर बोलावें, (**मधुसन्दृशः भूयासं**) मीं मधुरतेची मूर्तिच होऊन रहावें. [३]

मीं (**मधोः मधुतरः अस्मि**) मधापेक्षांहि जास्त मधुर आहे. (**मधुघान् मधुमत्तरः**) मधुर पदार्थाहून अधिक मधुर आहें. (**मां इत् किल त्वं वनाः**) माझ्यावरच तूं प्रेम कर. (**मधुमतीं शाखां इव**) ज्याप्रमाणें मधुररसानें युक्त शाखेवर वृक्ष प्रेम करतात. [४]

(**अ-विद्विषे**) वैर दूर करण्यासाठीं (**परितत्नुना इक्षुणा त्वा परि अगाम्**) पसरलेल्या ऊसांनीं तुला घेरून टाकतो. (**यथा मां कामिनी असः**) म्हणजे तूं माझी इच्छा करणारी होऊन रहाशील आणि (**यथा मत् न अपगाः असः**) ज्यामुळें तूं माझ्यापासून दूर जाणार नाहींस. [५]

भावार्थ— ही ऊस नांवाची वनस्पति स्वभावतः मधुर आहे आणि ती लावणारा तसेंच उखडणारा सुद्धां मधुरतेच्या भावनेनेंच ती लावतो आणि उखडतो. याप्रकारें ही वनस्पति परमात्म्याजवळून मधुरता आपणांसह घेऊन येते आणि म्हणूनच ती आम्हां सर्वांस स्वतःप्रमाणें मधुर करो असें आम्हीं इच्छितों. [१]

माझ्या जीभेच्या टोंकावर मधुरता राहो, तसेंच जिह्वामुळींसुद्धां मधुरता असो, माझ्या कामकाजात मधुरता असो, माझें चित्त मधुर विचारांचें मनन करो. [२]

माझी वर्तणूक मधुर असो, माझें येणें जाणें गोड असावें, माझे हावभावना, भावना आणि शब्द सुद्धां मधुर असावेत, असें होण्यानें मीं अंतर्बाह्य मधुरतेची मूर्ति होईन. [३]

मीं मध अथवा मिठाईपेक्षां सुद्धां मधुर व्हावें. ज्याप्रमाणें पक्षी मधुर शाखा असलेल्याना वृक्षावर प्रेम करतात, त्याप्रमाणें तूं मजवर प्रेम कर. [४]

कोणी कोणाचा द्वेष करूं नये, या उद्देशानें व्यापक मधुरवल्लींची म्हणजे व्यापक मधुर विचारांची वाढ सर्वत्र करतों. म्हणजे या वृद्धींत सुद्धां सर्वत्र मधुरता प्रसरो आणि सर्वांनीं एक दुसऱ्यावर प्रेम करावें आणि द्वेषामुळें कोणी कोणाशीं विमुख होऊं नये. [५]

मधु--विद्या

मधु--विद्या

वेदांमध्यें कित्येक विद्या आहेत, आध्यात्मिकविद्या, देवविद्या, जनविद्या, युद्धविद्या, त्याचप्रकारें मधुविद्यासुद्धां वेदांत आहे. मधुविद्या मनुष्यानें जगाकडे कोणत्या दृष्टीनें पहावें ही जाणीव मनुष्यांत उत्पन्न करते. उपनिषदांतही मधुविद्या वेदांतून घेतली आहे. हें सर्व जग मधुरच म्हणजे गोड-मधुर आहे असें समजून जगाकडे पहाणें या गोष्टीचा उपदेश मधुविद्या करते. दुसऱ्या विद्या जगास कष्टाचें आगार समजतात; त्या विद्येस वाचकांनीं कटुविद्या समजावें, परंतु अशी कटुविद्या वेदांत नाहीं. वेद जगाकडे दुःख-दृष्टीनें पहात नाहीं; अथवा दुःखदृष्टीनें जगाकडे पहाण्यास सांगत नाहीं. वेदांमध्यें मधुविद्या एवढ्यासाठीं आहे कीं तिचें ज्ञान प्राप्त करून लोकांनीं जगाकडे मधुदृष्टीनें पहाण्यास शिकावें. या विद्ये-विषयीं मंत्र अथर्ववेदांत पुष्कळ आहेत आणि अन्य वेदांत सुद्धां आहेत. त्यांचा येथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं. या सूक्तांतील मंत्रच स्वतः या विद्येचा उत्तम उपदेश करीत आहेत. वाचकांनीं या मंत्रांचा विचार करावा आणि योग्य तो बोध प्राप्त करावा.

जन्म-स्वभाव

वृक्षांत काय किंवा प्राणिमात्रांत काय प्रत्येकाचा व्यक्तिनिष्ठ जन्मस्वभाव असतो तो बदलत नाहीं. उदाहरणार्थ सूर्याचें प्रकाशणें, अग्नीनें उष्ण होणें, ऊस गोड असणें, कारलीं कडू असणें इत्यादि जन्मस्वभाव आहेत. हे जन्मस्वभाव कोठून प्राप्त होतात हा एक विचारणीय प्रश्न आहे. ऊस गोडी देतो आणि कारलीं कडुपणा आणतात. एकाच भूमींत उगवणाऱ्या या दोन वनस्पति परस्पर विरुद्ध रस कशा एकत्रित करतात ? कारलें कधीं गोड होत नाहीं व ऊस कधीं कडू होत नाहीं. हें कसें होतें ? हे रस येतात कुठून !

कोणी म्हणेल भूमींतून. कारण भूमीचें नांव ' रस ' असें आहे. या भूमींत विविध रस असतात. जी जी वनस्पति पृथ्वींतून बाहेर येऊं इच्छिते, ती ती आपल्या स्वभावधर्मानुसार रस पृथ्वींतून शोषून घेते आणि मनुष्यास देते. कारल्याचा स्वभाव कडु आहे आणि उसाचा गोड आहे. त्यामुळें या वनस्पति पृथ्वी-च्या विविध रसांतून आपल्या स्वभावास अनुकूल रस घेतात आणि ते घेऊन जगांत प्रगट होतात.

मनुष्याची अशीच रीति आहे. निरनिराळ्या स्वभावाचीं माणसें निरनिराळे गुणधर्म प्रकट करतात. त्यांना एकाच सांच्यांतून, एकाच जीवनाच्या महासागरांतून जीवनरस मिळतो, परंतु तोच रस एकांत शांति वाढवणारा आणि दुसऱ्यांत अशांति प्रसरविणारा होतो, हा स्वभावधर्म आहे. एकच पाणी मेघांत जाऊन गोड होऊन वृष्टिरूपानें परिशुद्ध स्थितींत मनुष्यास प्राप्त होतें. तें पीऊन मनुष्य तृप्त होतो. तेंच पाणी वाहून समुद्रांत जातें आणि खारें होतें, इतकें कीं तें कोणी पीऊं शकत नाहीं. हा स्वभाव-धर्म आहे.

दुसरे पदार्थ अथवा इतर योनि आपले स्वभाव बदलूं शकत नाहींत. मरणापर्यंत त्यांच्यांत बदल होऊं शकत नाहीं. परंतु मनुष्ययोनि एक अशी आहे कीं ज्या योनींत मनुष्य चांगल्या नियमांच्या आचरणानें स्वतःचा स्वभाव बदलूं शकतात. दुष्टाचे सुष्ट होऊं शकतात, मूर्खांतून प्रबुद्ध शहाणे होतात, दुराचारी असतात ते सदाचारी होतात. म्हणून वेद मनुष्यांच्या हिता-साठीं या मधुविद्येचा उपदेश करीत आहे. मनुष्यानें आपला कडूपणा कमी करावा आणि अंगीं माधुर्य बाणवावें हेंच या विद्येंत सांगितलें आहे.

आतां मधुविद्येचा प्रथम मंत्र पहा—' ही ऊस नामक वनस्पति गोडीनें युक्त जन्मली आहे. मनुष्य मधुर भावनेनें ती खोदतो. ही मधुरतेस घेऊन येत आहे. म्हणून आम्हां सर्वां ती स्वतःप्रमाणें मधुरतेनें परिपूर्ण करो. ' (मं. १)

हा प्रथम मंत्र मोठा अर्थपूर्ण आहे. यांत चार गोष्टी सांगितल्या आहेत. (१) स्वतः मधुर स्वभावाचें असावें, (२) मधुर स्वभावाच्याशीं संबंध ठेवावा, (३) स्वतः मधुर जीवन व्यतीत करावें (४) आणि दुसऱ्यास आपणांप्रमाणें मधुर करावें. वाचकांनीं पहावें कीं- (१) ऊस स्वभावतःच मधुर असतो, (२) मधुरतेनें युक्त होण्याची इच्छा करणाऱ्याशींच त्याची मैत्री होते, (३) ऊस आपणाबरोबर मधुर रस घेऊन येतो, (४) ज्या वस्तूंत मिळतो तिला मधुर करतो. वाचकांस या मधुर जीवनापासून कांहींच बोध घेतां येणार नाहीं काय ?

या चार उपदेशांविषयीं मनुष्यानें विचार केला पाहिजे. हा ऊस स्वतःच्या आचरणानें मनुष्यास बोध देत आहे कीं अशा-प्रकारच्या व्यवहारानें मनुष्य मधुर होऊं शकतो. या उपदेशाच्या मननानें खालीं दिल्याप्रमाणें नियम प्राप्त होतात—

(१) आपला स्वभाव गोड असावा-करावा. आपणांमध्यें जर कांहीं कटुता कठोरपणा, उग्रपणा असेल तर तो दूर करावा,

तसेंच प्रत्येक प्रसंगीं आत्मपरीक्षा करावी व दोष दूर करावे. आपला स्वभाव मधुर करण्याचा प्रयत्न करीत रहावें.

(२) मधुर स्वभावाच्या मनुष्यांशीं मित्रता करीत रहावें हें मनुष्यास उचित होय; अथवा स्वतः मधुरता पसरविण्याची इच्छा बाळगणाऱ्याशीं मित्रता राखावी.

(३) आपलें जीवन मधुर करावें. वर्तणूक, बोलणें, चालणें मधुर असावें, राखावें, आपल्या हावभाव किंवा चेहऱ्यामोहऱ्यावरून सुद्धां कडूपणा दिसूं नये.

(४) अशा गोष्टी करीत रहाव्यात कीं जेणेंकरून दुसऱ्यांचे स्वभाव आपणांप्रमाणें मधुर व्हावेत आणि कठोर प्रकृतीचीं मनुष्येंसुद्धां सुधरून उत्तम प्रकृतीचीं व्हावींत.

वाचक जर प्रथम मंत्राचें मनन करतील तर त्यांस उपरोक्त बोध प्राप्त होईल. ' ऊस स्वतः मधुर आहे, मधुरता इच्छिणाऱ्या शेतकऱ्याशीं मित्रत्व जोडतो, आपणांमध्यें मधुर जीवनरस धारण करतो आणि ज्याच्याशीं मिळतो त्याला आपणांप्रमाणें मधुर करून सोडतो. ' पहिल्या मंत्राचे चार चरण असे चार उपदेश देत आहेत. वाचकांनीं हा उपदेश आपल्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न करावा. (मं. १)

येथें अन्योक्ति अलंकार आहे. वाचकांनीं या काव्यमय मंत्रांतील हा अलंकार पहावा, आणि नीट समजून घ्यावा. वेदांमध्यें असे अलंकारद्वारा उपदेश अनेक मिळतात.

मधुर जीवन

वरील पहिल्या मंत्राच्या तृतीय चरणांत सुचवलें आहे कीं, ' मनुष्यानें मधुरतेसह जीवन व्यतीत करावें. ' म्हणजे आपलें जीवन मधुर बनवावें. या उपदेशावर भाष्य वेद स्वतः पुढील तीन मंत्रांत करीत आहे. म्हणून या तीन मंत्रांचा भावार्थ जरा विस्तारपूर्वक येथें देत आहोंत—

(मंत्र २) ' माझ्या जिव्हेच्या अग्र, मूळ आणि मध्यभागीं मधुरता राहो. म्हणजे मीं वाणीनें मधुर शब्द बोलेन, लेखनांत अगर बोलण्यांत कधीं कटु शब्द वापरणार नाहीं, कीं ज्यामुळें जगांत कटुता प्रसरेल. माझें चित्त, मनसुद्धां मधुर विचारांनीं भरलेलें असावें म्हणजे मीं चिंतनसुद्धां मधुर विचारांचें करीन. याप्रकारें चित्तांतील विचार आणि वाणीचे उच्चार एकरूप होऊन जर मधुर झाले तर माझे (क्रतु) आचार, विचार व व्यवहार मधुर होऊन जातील, अर्थात् कर्मेंही मधुर होतील. अशा प्रकारें उच्चार, विचार, आचार मधुर झाले म्हणजे जगांत मधुरता प्रसरेल. माझ्या विचारांनीं, माझ्या भाषणांनीं आणि माझ्या आचार व्यवहारांनीं सर्वत्र मधुरता प्रसरेल. '

(तिसरा मंत्र) ' माझे आचार व्यवहार मधुर असावेत, माझ्या जवळचे आणि दूरचे व्यवहार मधुर असावेत, माझे हावभाव मधुर असावेत. मीं वाणीनें मधुर शब्दच उच्चारीन आणि त्या भाषणाचा आशयसुद्धां मधुरता वाढविणारा असेल. ज्यावेळीं माझ्या विचार, उच्चार आणि आचारांत स्वाभाविक आणि अकृत्रिम मधुरता पाझरूं लागेल त्यावेळीं मीं माधुर्याची मूर्ति बनून जाईन. '

(चौथा मंत्र) ' जेव्हां मधापेक्षां सुद्धां मीं जास्त मधुर होईन आणि मिठाईपेक्षां जास्त मधुर होईन, त्यावेळीं तुम्ही सर्व मजवर असें प्रेम कराल कीं तसें प्रेम पक्षीगण मधुर फळें आणि शाखांनीं युक्त अशा वृक्षावर करतात. '

हे तीन मंत्र केवढा अद्भुत उपदेश करीत आहेत, त्याचा विचार वाचकांनीं अवश्य करावा. वर भावार्थ देतांना कित्येक जास्त शब्द अर्थ प्रगट करण्यासाठीं वापरले आहेत. त्यामुळें आतां त्या मंत्रांचें अधिक स्पष्टीकरण करण्याची जरुरी नाहीं.

प्रतिज्ञा

हे मंत्र प्रतिज्ञारूप आहेत. मी अशा प्रकारें प्रतिज्ञा करतों असा भाव त्यामध्यें आहे. जर वाचकांस या मंत्रापासून जास्तींत जास्त लाभ करून घ्यावयाचा असेल तर त्यांनीं अशीच प्रतिज्ञा करावी. जर ते अशी प्रतिज्ञा करतील आणि त्याप्रमाणें त्यांचें आचरण राहील तर त्यांचें यश सर्वत्र प्रसरेल. ही पूर्ण अहिंसेची प्रतिज्ञा आहे. आपल्या उच्चार, विचार, आचारानें कोणत्याहि प्रकारची हिंसा होऊं नये, कोणाचा द्वेष होऊं नये, कोणाशीं वैरभाव नसावा, कोणाशीं शत्रुत्व नसावें. अशा प्रकारें आपलें जीवन आदर्श होण्यानें जगांत आनंदाचें साम्राज्य होऊन जाईल. असें आनंद साम्राज्य स्थापन करणें हा वैदिक धर्मीयांचा परम धर्म आहे आणि म्हणून या मधुविद्येचा उपदेश या सूक्तांत केला आहे.

मधुर कुंपण

शेतास कुंपण असतें. त्यामुळें शेतीचा नाश करणारीं जनावरें शेतांत उगवलेल्या धान्यापर्यंत जाऊं शकत नाहींत. अशा प्रकारें स्वतः आचार, व्यवहार, विचारांनीं मधुर होणारा मनुष्य स्वतः भोवतीं मधुरतेचें कुंपण निर्माण करतो. त्यामुळें त्याचे विरोधी शत्रु, क्रौर्य, द्वेष वगैरे त्याच्यापर्यंत पोहोंचू शकत नाहींत. हें कुंपण आपल्या मनांतील सुविचारांचें असावें, आपल्या इंद्रियाभोंवतीं संयमाचें असावें, आपल्या घरांत परस्पर प्रेमाचें असावें, समाजांत परस्पर मित्रत्वाचें असावें, आपले सर्व मित्र सुद्धां उत्तम मधुर विचार करणारे असावेत, स्वतःच्या जीवनांत मधुरता

आणणारे असावेत. असें कुंपण जर झालें तर आंतील मधुरतेचें शेत बिघडणार नाहीं. याविषयीं पांचवा मंत्र पहाण्यासारखा आहे.

(पांचवा मंत्र) 'मी विद्वेषास दूर करण्यासाठीं चारी बाजूस पसरणारें ऊसाचें कुंपण तुमच्या चारी बाजूस करतों. त्यामुळें तूं माझी इच्छा करशील आणि माझ्यापासून कधींहि दूर होणार नाहींस.'

हें जितकें स्त्रीपुरुषांच्या आपापसांतील अविद्वेषाविषयीं सत्य आहे, तितकेंच अन्य परिवार, कुटुंबी, मित्र मंडळीच्या अविद्वेषाविषयींहि प्रेम वाढविण्याविषयीं सत्य आहे. परंतु आपल्या चहूं बाजूस मधुर कुंपण करण्याची युक्ति वाचकांनीं अवश्य जाणून घ्यावी. आपणांजवळ ऊंसाचे तुकडे बाळगल्यानें हें कार्य होणार नाहीं. हें कार्य करण्यासाठीं जो ऊंस पाहिजे तो विचार, उच्चार आणि आचाराचा तसेंच मनोभावनेचा ऊस असावयास हवा. जे वाचक स्वतःच्या अंतःकरणांत अशा ऊंसाची शेती करतील आणि स्वतःच्या जीवनांत त्याची परिपुष्टि आपल्या मधुर जीवनानें करतील, तेच हा वैदिक उपदेश आचरणांत आणूं शकतील.

हे मंत्र स्पष्ट आहेत. अधिक स्पष्टीकरणाची जरूरी नाहीं. परंतु वाचकांनीं ते काव्य दृष्टीनें समजण्याचा प्रयत्न करावा आणि त्यापासून लाभ करून घ्यावा.

संगठन-महायज्ञ-सूक्त

कांड १, सूक्त १५

(ऋषिः - अथर्वा । देवता - सिन्धवः, (वाताः, पतत्रिणः ।)

सं सं स्रवन्तु सिन्धवः सं वाताः सं पतत्रिणः ।
इमं यज्ञं प्रदिवो मे जुषन्तां संस्राव्येण हविषा जुहोमि ॥ १ ॥
इहैव हवमा यात म इह संस्रावणा उतेमं वर्धयता गिरः ।
इहैतु सर्वो यः पशुरस्मिन् तिष्ठतु या रयिः ॥ २ ॥

अर्थ— (सिंधवः) नद्या, (सं सं स्रवन्तु) उत्तम प्रकारें मिळून वहात राहोत. (वाताः सं) वायु उत्तम रीतीनें मिळून वाहात राहो, (पतत्रिणः सं) पक्षीसुद्धां उत्तम गतीनें एकत्र मिळून उडत राहोत. त्याच प्रकारें (प्रदिवः) उत्तम दिव्यजन (मे इमं यज्ञं) या माझ्या यज्ञाला (जुषन्तां) सेवन करोत, कारण कीं मीं (संस्राव्येण हविषा) संगठनाच्या अर्पणानें (जुहोमि) दान करीत आहें. [१]

(इह एव) येथेंच (मे हवं) माझ्या यज्ञाकडे (आयात) या. (उत) आणि हे (संस्रावणाः) संगठन करणाऱ्या (गिरः) वक्त्यानों ! (इमं वर्धयत) हें संगठन वाढवा. (यः पशुः) जो सर्व पशुभाव आहे, तो (इह एतु) येथें येवो आणि (अस्मिन्) या (या रयिः) मध्यें जी संपत्ति आहे, ती (तिष्ठतु) येथेंच स्थिर राहो. [२]

भावार्थ— नद्या मिळून वाहोत, वायु मिळून वाहो, पक्षीसुद्धां एकत्रित उडोत. याप्रकारें दिव्यजनसुद्धां माझ्या यज्ञांत एकत्रित संमिलित होवोत. कारण कीं, मीं संगठनानें वाढणारें अर्पण समर्पित करून हा संगठनाचा महायज्ञ करीत आहें. [१]

सरळ या माझ्या संगठन यज्ञांत येऊन सामील व्हा आणि हें संगठन साधणाऱ्या वक्त्यानों ! तुम्ही आपल्या उत्कृष्ट संगठन वाढविणाऱ्या वक्तृत्वानें या संगठन महायज्ञास वाढवा- प्रसरवा. आम्हां सर्वांत जो पशुभाव आहे तो सर्व येथें या यज्ञांत येवो आणि आम्हां सर्वांमध्यें धन्यतेची भावना चिरकाळ वास्तव्य करो. [२]

ये नदीनां संस्रवन्त्युत्सासः सदमक्षिताः । तेभिर्मे सर्वैः संस्रावैर्धनं सं स्रावयामसि ॥ ३ ॥
ये सर्पिषः संस्रवन्ति क्षीरस्य चोदकस्य च । तेभिर्मे सर्वैः संस्रावैर्धनं सं स्रावयामसि ॥ ४ ॥

अर्थ-(नदीनां) नद्यांचा जो (यः अक्षिताः उत्सासः) अक्षय अखंड प्रवाह आहे तो या (सदं) संगठनस्थानीं (संस्रवन्ति) वहात राहो, (तेभिः मे सर्वैः संस्रावैः) त्या माझ्या सर्व प्रवाहांनीं आम्हीं सर्व (धनं) धन (संस्रावयामसि) एकत्र करीत रहावों. [३]

(ये) ज्या (सर्पिषः) तुपाच्या (क्षीरस्य) दुधाच्या (च उदकस्य) आणि जलाच्या धारा (संस्रवन्ति) वहात आहेत, (तेभिः ते सर्वैः संस्रावैः) त्या सर्व धारांनीं आम्हीं (धनं संस्रावयामसि) धन एकत्रित करतों.[४]

भावार्थ- नद्यांचे जे अखंड अक्षय्य स्रोत या यज्ञांत वहात आहेत, त्या सर्व प्रवाहांपासून आम्ही आपलें धन संगठन मार्गानें वाढवावें. [३]

तूप, दूध अथवा पाण्याच्या ज्या अखंड धारा वहात आहेत, त्या सर्व आम्हांजवळ राहोत आणि त्यापासून आम्ही स्वतःचें धन संगठनद्वारा वाढवावें. [४]

संगठन--महायज्ञ--सूक्त

संगठनानें शक्तींची वाढ

हें संगठन महायज्ञाचें सूक्त आहे. याच्या प्रथम मंत्रांत संगठनेच्या शक्तीचें वर्णन आहे. या संगठन करणाऱ्याविषयीं पुष्कळ विचार करावयास हवा. पहा—

१ सिंधवः- नद्या ! जें पाणी वहात असतें त्यास प्रवाह म्हणतात. अशा प्रकारचे शेंकडों वा हजारों प्रवाह एकत्रित होतात आणि स्वतःचा भेदभाव खोडून एकरूप होऊन वाहतात, तेव्हां त्या मोठ्या प्रवाहास 'नदी' असें नांव प्राप्त होतें. नदीसुद्धां जेव्हां महापूर येऊन वहाते त्यावेळीं हे विविध लहान लहान प्रवाह एकरूप होऊन जी महाशक्ति प्रकट होते, ती शक्ति अपूर्व आहे. अशा वेळीं ही नदी महान् वृक्षांस सुद्धां मूळांतून उखडून टाकते, जो तिच्यासमोर सामन्यास उभा राहील, त्यालासुद्धां आपणाबरोबर वाहून नेते. महान वृक्ष, मोठीं घरें, मोठे डोंगरसुद्धां महानदीच्या वेगासमोर तुच्छ ठरतात. हा वेग कोठून येतो ?

वाचकांनीं विचार करावा म्हणजे ध्यानीं येईल कीं हा वेग त्या लहान प्रवाहांत नसतो परंतु जेव्हां ते सर्व छोटे प्रवाह एकत्रित होतात, एकरूप होतात तेव्हां त्याच्य. त्या संगठनानें ही अभूतपूर्व, अद्भुत शक्ति निर्माण होते. याप्रकारें मनुष्याला नद्या 'संगठनद्वारा स्वतःची शक्ति वाढविण्याचा उपदेश' देत आहेत.

२ वातः- वायुसुद्धां याप्रकारें मनुष्यास संघटनेचा उपदेश देत आहे. छोट्या छोट्या वायुलहरी ज्यावेळीं वाहूं लागतात, त्यावेळीं झाडाचीं पानें सुद्धां हलत नाहींत. परंतु त्या सर्व एकत्रित होऊन प्रचंड वेगानें जेव्हां वाहूं लागतात, तेव्हां महावृक्ष सुद्धां तुटून पडतात आणि मनुष्य भिऊन जातो. वाचक या झंझावातापासून संगठनाचा बोध ग्रहण करूं शकतात. या प्रकारें वायुसुद्धां मनुष्यास संगठनाचा बोध देत आहे.

३ पक्षी- पक्षी सुद्धां संगठन करूं शकतात. जेव्हां एकटा दुकटा पक्षी रानांत फिरत असतो तेव्हां त्याला दुसरा कोणीहि मारूं शकतो; परंतु तेच शेंकडो हजारोंच्या टोळ्यांनीं लहान चिमण्या कळप करून रहात असल्या तर त्यांची संगठित एकत्रित शक्ति भारी असते. असे पक्षांचे कळप मोठ्या शेतांतील धान्य अल्प समयांत उध्वस्त करून टाकतात. वाचकांनीं ही संगठनाची शक्ति पहावी आणि आपला संघ करून आपलें ऐश्वर्य वाढवावें. पक्षी हा उपदेश आपल्या आचरणानें मनुष्यांस देत आहेत.

याप्रमाणें पहिल्या मंत्रांत ही तीन उदाहरणें मनुष्यासमोर ठेऊन त्यास संगटनेचें महत्व दाखविलें आहे. जर वाचक या उदाहरणांचें उत्तम मनन करतील तर त्यांचे ध्यानीं येईल कीं आपण कशा प्रकारें संगठन केलें पाहिजे.

यज्ञांत संगतिकरण

'यज्ञांत संगतिकरण होतेंच. कोणताच यज्ञ असा नाहीं कीं ज्यांत संगतिकरण नाहीं. यज्ञाचा मुख्य अर्थच संगतिकरण आहे.'

*

प्रथम मंत्राच्या द्वितीयार्धांत म्हणून म्हटलें आहे कीं, नद्या, वायु, पक्षी इत्यादींत संगठनशक्तीचा अनुभव घेऊन त्या प्रकारचें संगठन आपलें सुद्धां करण्याच्या उद्देशानें आपल्या समाज, देश, जाति अथवा राष्ट्राच्या लोकांनीं या संगठन महायज्ञांत सामील व्हावें. एकस्थानीं जमा होणें ही पहिली पायरी आहे. नंतर परस्पर समर्पण करण्यानें संगठनशक्ति वाढीस लागते. हवनांत सात प्रकारच्या समिधा एकत्रित होतात आणि अग्निद्वारा प्रकाश प्रसरवतात. जर एक एक समिधा अग्नींत पडली तर विझून जाईल व जळून जाईल. अशा प्रकारें जातीचे सर्व लोक एकत्रित होण्यानें त्या जातीचें यश सर्व दिशांस प्रसरतें परंतु ज्या जातींत ऐक्य नाहीं तिची दिवसें दिवस अवनति होत जाते. यावरून संगठन करणाऱ्या मनुष्यांत आत्मसमर्पणाचा भाव अवश्य असला पाहिजे हें स्पष्ट होतें.

याप्रमाणें प्रथम मंत्रांत संगठन करण्याचा मूलभूत सिद्धांत विशद करून सांगितला आहे.

संगठनाचा प्रचार

'सर्व मनुष्यें एकत्रित यावींत, त्यांचें संगठन व्हावें, परिषद् भरावी व त्यांत संगठन वाढविण्याविषयीं उत्तम वक्त्यांनीं ऐक्य भाव वाढविण्याविषयीं वक्तृत्व करून या संगठन-महायज्ञाचा प्रसार करावा.' हा दुसऱ्या मंत्राच्या प्रथमार्धाचा भाव आहे.

सभा, परिषद्, महासभा वगैरे द्वारा जातीचें संगठन करण्याची रीत या मंत्रार्धांत सांगितली आहे. सर्व मनुष्यांनीं याचें महत्त्व समजावें. पुढें या दुसऱ्या मंत्रांत दुसरी महत्त्वपूर्ण गोष्ट सांगितली आहे, ही विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

पशुभावनेचा यज्ञ

'आम्हां सर्वांमध्यें जो पशुभाव आहे तो सर्व या यज्ञांत येवो आणि येथेंच राहो म्हणजे फिरून आमच्याकडे परत न येवो. आमच्यांत पशुभाव न राहो.' पशुभावनेचें महत्त्व ज्या मनुष्यांत असतें, त्यांच्यांत आपसांत भांडणें असतात. जर पशुभाव संगठन साधण्यासाठीं दूर केला आणि मनुष्यत्व वाढविलें तर आपसांतील भांडणतंटे कमी होतील किंवा होणार नाहींत. यासाठीं हा पशुभाव कायमचा टाकून देण्याची सूचना या दुसऱ्या मंत्राच्या तिसऱ्या चरणांत दिली आहे. संगठनासाठीं ती अत्यंत आवश्यक आहे. तिच्याशिवाय कांहीं संगठन होऊं शकणार नाहीं.

पशुभाव सोडण्याचें फळ

पशुभाव सोडण्यानें आणि मनुष्यत्वाचा विकास साधण्यानें तसेंच संघटनद्वारा आपली शक्ति वाढविण्यानें जें फळ प्राप्त होतें, त्याचें वर्णन दुसऱ्या मंत्राच्या चतुर्थ चरणांत केलें आहे—

'जें धन आहे तें आमच्या या समाजांत स्थिर राहो.' संगठनाचा तोच परिणाम व्हावयास हवा. मनुष्य जेणेंकरून धन्य होतो त्याचें नांव धन. मनुष्यास धन्य करणारें सर्व धन मनुष्य आपलें संगठन करूनच प्राप्त करूं शकतो. या दुसऱ्या मंत्रांत संगठनाचे नियम सांगितले आहेत ते असे—

१ एकस्थानीं एकत्रित होणें, सभा भरवणें.

२ उत्तम वक्त्यानें जनतेस संगठनाचें महत्त्व समजावणें.

३ आपल्यामध्यें असणारा पशुभाव सोडून, पशुभावापासून मुक्त होऊन मनुष्यांमीं स्वस्थानीं परत जावें, सर्वांनीं मनुष्यत्वानें वागून परस्पर मित्रत्वाची वागणूक ठेवावी.

या गोष्टी करण्यानें संगठन होण्याचा संभव आहे. याप्रकारें जीं मनुष्यें संगठन करतील तीं जगांत धन्य होतील.

तिसऱ्या आणि चौथ्या मंत्रांत पुनः नदी आणि पाण्याच्या प्रवाहाचें वर्णन आलें आहे. तो पूर्वीप्रमाणेंच ऐक्याचा उपदेश आहे. संगठन करणाऱ्या मनुष्यास, तूप, दूध, दही वगैरे पदार्थ भरपूर प्राप्त होतात. जणूं काय त्यांच्यासाठीं या पदार्थांच्या नद्याच वहात असतात. यावरून संगठन करणें हें मनुष्याच्या उन्नतीचें प्रमुख साधन आहे.

यासाठींच तिसऱ्या आणि चौथ्या मंत्रांच्या उत्तरार्धांत म्हटलें आहे कीं, 'या संगठित प्रयत्नांनीं आम्हीं आमचें धन वाढवितों.' संगठित प्रयत्नांनींच यश, धन आणि कीर्ति वाढते.

वाचक या सूक्ताचा अधिक विचार करतील आणि संगठनद्वारा स्वतःची पुरुषार्थशक्ति वाढवून आपलें यश चारी दिशांस पसरवतील अशी आशा आहे.

संघटनेचा उपदेश

कांड ६, सूक्त ९४

(ऋषिः - अथर्वांगिराः । देवता - सरस्वती ।)

सं वो मनांसि सं व्रता समाकूतीर्नमामसि । अमी ये विव्रता स्थन तान्वः सं नमयामसि ॥ १ ॥
अहं गृभ्णामि मनसा मनांसि मम चित्तमनु चित्तेभिरेत ।
मम वशेषु हृदयानि वः कृणोमि मम यातमनुवर्त्मान एत ॥ २ ॥
ओते मे द्यावापृथिवी ओता देवी सरस्वती । ओतौ म इन्द्रश्चाग्निश्चर्ध्यास्मेदं सरस्वति ॥ ३ ॥

अर्थ— (वः मनांसि सं) तुमचीं मनें एकभावानें संयुक्त करा, (व्रता सं) तुमचीं कार्यें एका विचारानें होवोत, (आकूतीः सं नमामसि) तुमच्या संकल्पांस एकच दिशेनें वळवा. (अमी ये विव्रताः स्थन) हे जे तुम्हीं परस्पर विरुद्ध कर्में करणारे आहांत, (तान् वः सं नमयामसि) त्या तुम्हां सर्वांना आम्हीं एका विचाराकडे नमवतों.- वळवतों. [१] (अथर्व. ३-८-५)

(अहं मनसा मनांसि गृभ्णामि) मीं आपल्या मनानें तुमच्या मनाला वश करतों. (मम चित्तं चित्तेभिः अनु आ-इत) माझ्या चित्तास अनुकूल अशी तुमचीं चित्तें बनवून या. (वः हृदयानि मम वशेषु कृणोमि) मीं तुमच्या हृदयास माझ्या वश करतों. (मम यातं अनुवर्त्मानः आ-इत) माझ्या वर्तणुकीस अनुसरून तुम्हीं येथें या. [२](अथर्व ३-८-६)

(द्यावापृथिवी मे ओते) द्युलोक आणि भूलोक हे मला अनुकूल झाले आहेत. (देवी सरस्वती ओता) देवी सरस्वती मला अनुकूल आहे. (इंद्रः च अग्निः च मे ओतौ) इन्द्र आणि अग्नि माझे साथीदार झाले आहेत, मला अनुकूल आहेत. हे सरस्वति ! (इदं ऋध्यास्म) यामुळें आम्हीं समृद्ध व्हावें. [३] (अथर्व. ५-२३-१)

हे तीनहि मंत्र पूर्वी आले आहेत. कोठें आले आहेत तें वर दर्शविलें आहे. वाचकांनीं त्याचें स्पष्टीकरण पूर्वस्थानींच पहावें. तिसऱ्या मंत्राचा चौथा चरण थोडा भिन्न आहे. परंतु तो इतका स्पष्ट आहे कीं त्याच्या जास्त स्पष्टीकरणाची सुद्धां आवश्यकता नाहीं.

संघटनेचा उपदेश

कांड ६, सूक्त ६४

(ऋषिः - अथर्वा । देवता - सांमनस्यम् ।)

सं जानीध्वं सं पृच्यध्वं सं वो मनांसि जानताम् । देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ॥ १ ॥
समानो मन्त्रः समितिः समानी समानं व्रतं सह चित्तमेषाम् ।
समानेन वो हविषा जुहोमि समानं चेतो अभिसंविशध्वम् ॥ २ ॥

अर्थ— (संजानीध्वं) समान ज्ञान प्राप्त करा, (सं पृच्यध्वं) समानतेचा संबंध एक दुसऱ्याशीं जोडा, (वः मनांसि सं जानतां) तुमचीं मनें समान संस्कारानें युक्त करा. (यथा पूर्वे संजानाना देवाः भागं उपासते) ज्याप्रकारें पूर्वकालीन ज्ञानी मनुष्यें आपलीं कर्तव्य कर्में करीत असत तद्वत् तुम्हीसुद्धां करीत रहा. [१]

(मन्त्रः समानः) तुमचे विचार समान असोत, (समितिः समानी) तुमची सभा सर्वांसाठीं समान होवो, (व्रतं समानं) तुम्हां सर्वांची व्रतें-कर्में समान असोत, (एषां चित्तं सह) या सर्व लोकांचें अतएव तुमचीं मनें समान एकाच विचाराची असोत. (समानं चेतः अभि सं विशध्वं) समान चित्ताचे होऊन सर्व प्रकारच्या कार्यांत प्रविष्ट व्हा, म्हणून (वः समानेन हविषा जुहोमि) तुम्हां सर्वांस समान हविर्द्रव्यांनीं युक्त करतों. [२]

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः । समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥ ३ ॥

अर्थ—(वः आकूतिः समानी) तुम्हां सर्वांचा संकल्प एकच असो, (वः हृदयानि समाना) तुमचीं हृदयें समान असोत, (वः मनः समानं अस्तु) तुमचीं मनें समान म्हणजे एकसारख्या विचारांचीं असोत, (यथा वः सह सु असति) ज्यामुळें तुम्हीं सर्व एकत्र खेळीमेळीनें एक विचारें उत्तम रीतीनें रहाल. [३]

तुम्ही तुमची संघटना करणें इष्ट आहे तर तुम्हां सर्वांचें ज्ञान एकसारखें असो, तुम्हीं समभावनेनें एकमेकांस भेटा, एक-दुसऱ्याशीं कधीं हीनभाव ठेवूं नका, सर्वांचीं मनें शुभ संस्कारांनीं युक्त करा. आपले श्रेष्ठ पूर्वज ज्याप्रकारें वेळोवेळीं आपलीं कर्तव्य कर्में करीत गेले, त्याप्रकारें तुम्हींसुद्धां आज तुमचीं कर्तव्यकर्में करा. तुम्हीं सर्व एकविचारें रहा, तुमच्या सभेंत सर्वांचे अधिकार सारखे असोत, तुमचे नियम सर्वांसाठीं एकसारखे असोत, तुम्हां सर्वांचीं अंतःकरणें-चित्तें एक भावनेनें भरलेलीं असोत, एकविचारें कोणत्याहि कार्यांत तुम्हीं सर्व लागून जा, यासाठीं तुम्हांस समानशक्ति प्राप्त होवो. तुम्हां सर्वांचे संकल्प समान असोत, परस्पर-विरोधी नसावे, तुमच्या अंतःकरणांतील भाव सर्वांचे एकसारखे असावे, एक दुसऱ्याच्या विरुद्ध नसावेत, तुमचे विचार समतायुक्त असावेत. अशाप्रकारें ऐक्यानें जर तुमची संघटना केली, तर तुम्हीं येथें उत्तम रीतीनें आनंदांत नांदाल, म्हणजे तुमच्यावर कोणी शत्रु आक्रमण करूं शकणार नाहीं. तुमच्या या संघटनेनें तुमचें बल असें वाढेल कीं, तुम्हीं कधीं कोणत्याहि शत्रुपुढें दबून जाणार नाहीं आणि स्वतःच्या शक्तीनें स्वतःचा उद्धार करूं शकाल.

संघटना करूं इच्छिणाऱ्या वाचकांनीं या सूक्ताचा पुष्कळ विचार करावा आणि आपलें बळ वाढवावें.

मातृभूमीचें यश

कांड ७, सूक्त ६

(ऋषिः – अथर्वा । देवता – अदितिः ।)

अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षमदितिर्माता स पिता स पुत्रः ।
विश्वे देवा अदितिः पञ्च जना अदितिर्जातमदितिर्जनित्वम् ॥ १ ॥
महीमू षु मातरं सुव्रतानामृतस्य पत्नीमवसे हवामहे ।
तुविक्षत्रामजरन्तीमुरूचीं सुशर्माणमदितिं सुप्रणीतिम् । ॥ २ ॥

अर्थ— (अदितिः द्यौः) मातृभूमि स्वर्ग आहे, (अदितिः अन्तरिक्षं) मातृभूमि अंतरिक्ष आहे, (अदितिः माता) मातृभूमीच माता आहे, (सः पिता सः पुत्रः) तीच पिता आहे व पुत्रसुद्धां आहे. (अदितिः विश्वदेवाः) मातृभूमीच सर्व देव आहे, (अदितिः पंच जनाः) मातृभूमिच पांच प्रकारचे लोक आहे, (अदितिः जातं) मातृभूमिच उत्पन्न झालेले पदार्थ आहे (अदितिः जनित्वं) आणि उत्पन्न होणारे पदार्थ सुद्धां मातृभूमीच आहे. [१]

(सुव्रतानां मातरं) उत्तम कर्म करणाऱ्यांचें हित करणारी, (ऋतस्य पत्नीं) सत्य पालन करणारी, (तुवि-क्षत्रां) पुष्कळ प्रकारें क्षात्रतेज दाखविणारी-प्रकट करणारी, (अ-जरन्तीं) क्षीण न करणारी, (उरूचीं) विशाल (सु-शर्माणं) उत्तम सुख देणारी, (सु-प्र-नीतिं) सुखानें योगक्षेम चालवणारी आणि (अदितिं महीं) अन्न देणारी, या महान् मातृभूमीच्या (अवसे सुहवामहे) रक्षणासाठीं प्रशंसा करीत आहोंत. [२]

भावार्थ— मातृभूमि आमचा स्वर्ग आहे, तीच अंतरिक्ष, तीच माता, पिता आणि पुत्रपौत्र आहे. तीच आमची सर्व देवता आहे आणि तीच आमची जनता आहे. झालेलें आणि व्हावयाचें सर्व कांहीं आमच्यासाठीं मातृभूमीच आहे. [१]

मातृभूमि उत्तम पुरुषार्थी मनुष्याचें रक्षण करणारी आहे, सत्याची रक्षक तीच आहे, त्या मातृभूमीसाठीं अनेक प्रकारचें क्षात्रतेज प्रकाशित होतें, मातृभूमि क्षीण न करणारी आहे, विशाल सुख देणारी आहे, आम्हांस उत्तम मार्गावर चालवणारी आणि आम्हांस अन्न देणारी आहे. तिच्यामुळें आमचें रक्षण होतें, त्यासाठीं आम्हीं तिचें यश गातों. [२]

सुत्रामाणं पृथिवीं द्यामनेहसं सुशर्माणमदितिं सुप्रणीतिम् ।
दैवीं नावं स्वरित्रामनागसो अस्रवन्तीमा रुहेमा स्वस्तये ॥ ३ ॥
वाजस्य नु प्रसवे मातरं महीमदितिं नाम वचसा करामहे ।
यस्या उपस्थ उर्वन्तरिक्षं सा नः शर्म त्रिवरूथं नि यच्छात् ॥ ४ ॥

अर्थ— (**सुत्रामाणं**) उत्तम रक्षण करणारी, (**द्यां अनेहसं**) प्रकाशयुक्त आणि अहिंसक (**सुशर्माणं सुप्रणीतिं**) उत्तम सुख देणारी आणि उत्तम योगक्षेम चालविणारी (**सु-अरित्रां अस्रवन्तीं दैवीं नावं**) उत्तम वल्हीं असणारी, ज्यांत थोडेंसुद्धां पाणी पाझरत नाहीं, आंत येत नाहीं अशा नावेंत बसण्यासमान (**पृथिवीं**) मातृभूमीवर (**स्वस्तये आरुहेम**) कल्याणासाठीं आम्हीं बसतों. [३]

(**वाजस्य प्रसवे**) अन्न उत्पन्न करण्यासाठीं (**अदितिं मातरं महीं**) अन्न देणाऱ्या मोठ्या मातृभूमीचें (**नाम वचसा करामहे**) वक्तृत्वानें यश गातों. (**यस्याः उपस्थे उरु अन्तरिक्षं**) जिच्या मांडीवर विशाल अंतरिक्ष आहे, (**सा नः त्रिवरूथं शर्म नियच्छात्**) ती मातृभूमि आम्हां सर्वांस तिप्पट (त्रैगुण्य) सुख देवो. [४]

भावार्थ— उत्तम वल्हीं असणारी आणि न पाझरणारी अशा नावेंत बसण्यासारखे आम्हीं उत्तम रक्षक, तेजस्वी, अविनाशक, सुखदायक, उत्तम चालक अशा मातृभूमीवर आम्ही आपल्या कल्याणासाठीं उन्नत होतों. [३]

अन्नाची उत्पत्ति करण्यासाठीं अन्न देणारी, अशा मातृभूमीचें यश आम्हीं गातों. जिच्यावर हें महान अंतरिक्ष आहे, ती मातृभूमि आम्हांस उत्तम सुख देवो. [४]

मातृभूमीचें यश

मातृभूमीचें यश

या सूक्तांत मातृभूमीच्या यशाचें वर्णन केलें आहे. मातृभूमि खरोखर उत्तम कल्याण करणारी आहे. यासाठीं पुढील वर्णन पहा—

१ **अदितिः (अदनात् आदितिः)**— अदन म्हणजे खाण्यासाठीं अन्न देते. आपली मातृभूमि आम्हांस अन्न देते. म्हणून आमचा (**द्यौः**) स्वर्ग आहे. आमची माता पिता पण तीच आहे, कारण की मातापित्यासमान मातृभूमि आमचें पालन पोषण करते. पुत्रसुद्धां तीच आहे कारण (**पुनाति त्रायते**) आम्हांस पवित्र करणारी आणि आमचें रक्षण करणारी, याशिवाय ती आम्हांस पुष्टि देणारी आणि यामुळें आमची संतति उत्पन्न करणारी, म्हणजेच तिच्या कृपेनें होते असें समजणें युक्तियुक्त आहे. आमचीं तीन प्रकारचीं सुखें अथवा त्रैगुण्य (तिप्पट) सुखें मातृभूमीमुळें आम्हांला प्राप्त होतात. (मं. १)

२ **विश्वेदेवाः अदितिः**— सर्व देवता आमचेसाठीं मातृभूमि आहेत. म्हणजे मातृभूमीची उपासना केल्यानें सर्व देवतांच्या उपासनेचें श्रेय प्राप्त होतें. (मं. १)

३ **पंचजनाः अदितिः**— आमची मातृभूमीच पांच प्रकारची प्रजा आहे. ज्ञानी, शूर, व्यापारी, कारागीर आणि अशिक्षित असे पांच प्रकारचे लोक राष्ट्रांत रहातात. मातृभूमि यांच्यामुळें पूर्ण होते. म्हणून म्हटलें जातें कीं मातृभूमीच हे पांच प्रकारचे लोक आहे. म्हणजे मातृभूमीचा अर्थ या पांच प्रकारच्या लोकांसह ही पृथ्वी-भूमि असा आहे. (मं. १)

४ **जातं जनित्वं अदितिः**— पूर्वकालीं झालेलीं व भविष्यकालीं होणारीं सर्व कर्में, सर्व वस्तु, सर्व पदार्थ या मातृभूमींत असतात, रहातात. पूर्वकालीं आमचे पूर्वज व आम्हीं कसें वागलों हें आजच्या मातृभूमीच्या परिस्थितिवरून जाणतां येतें आणि भविष्यांत मातृभूमि कशी राहील, होईल याचें ज्ञानसुद्धां तिच्या आजच्या आमच्या वर्तणुकीवरून कळून येतें. (मं. १)

५ **सुव्रतानां माता**— उत्तम सत्कर्म करणाऱ्या मनुष्यांची मातृभूमि मातेसमान हित करणारी आहे. (मं. २)

६ **ऋतस्य पत्नी**— सत्यव्रताचें पालन करणारी अर्थात् सत्यनिष्ठ रहाणाऱ्यांचें पालन करणारी मातृभूमि आहे. (मं. २)

७ **तुविक्षत्रा**— जिच्यासाठीं विविध शौर्य करण्याचा उत्साह उत्पन्न होतो अशी ही मातृभूमि आहे. (मं. २)

८ **अजरन्ती**— जो या मातृभूमीची भक्ति करतो त्याला ती क्षीण, दुबळा, अशक्त, हीन होऊं देत नाहीं. (मं. २)

९ **सुशर्मा**— उत्तम सुख देणारी मातृभूमि आहे. (मं.२-३)

१० **सुप्रणीतिः (सु-प्र- नीतिः)** उत्तम मार्गानें चालणारी, उत्तम अवस्थेस प्राप्त होणारी मातृभूमि आहे. (मं. २-३) नीति शब्द येथें चालविणें या अर्थी आहे.

११ **अनेहस्- (अहननीया)** जी घातपात करण्यास अयोग्य अथवा जी घातपात करीत नाहीं. अशी ही मातृभूमि आहे. (मं. ३)

१२ **स्वस्तये आरुहेम-** आमचें कल्याण होण्यासाठीं आम्हीं आमच्या मातृभूमींत रहातों, मातृभूमींत राहिलों नाहीं तर आमचें कल्याण होणार नाहीं. जे आपल्या मातृभूमींत रहातात त्यांचें कल्याण होतें. (मं. ३)

१३ **स्वरित्रा अस्रवन्ती दैवी नौः-** ज्याप्रमाणें उत्तम वल्ही असलेली आणि न पाझरणारी दिव्यनौका समुद्र पार करण्यास सहाय्यभूत होते, त्याचप्रकारें ही मातृभूमि आम्हांस दुःखसागरास पार करण्यास दिव्यनौकेप्रमाणें आहे. (मं. ३)

१४ **वाजस्य प्रसवे मातरं महीं वचसा नाम करामहे-** अन्न विशेष उत्पन्न करण्याच्या कार्यात आम्ही सर्व मातृभूमीचें यश वाणीनें गायन करतों. मातृभूमि आम्हांस पुष्कळ अन्न देते, म्हणून आम्हीं तिची प्रशंसा करतों. अशा प्रकारें मातृभूमीचें यशोगान करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यच आहे. (मं. ४)

१५ **सा नः त्रिवरूथं शर्म नियच्छात्-** ती मातृभूमि आम्हांस तीन प्रकारचें अथवा तिप्पट सुख देते. म्हणजे स्थूल शरीराचें, इंद्रियांचें आणि मनाचें सुख याप्रकारें त्रिविध सुख ती देते. (मं. ४)

या सूक्तांत मातृभूमीचे गुण वर्णन केले आहेत. ते प्रत्येक मनुष्यानें ध्यानीं आणण्यासारखे आहेत. मनुष्यास मातृभूमि मातापित्याप्रमाणें आहे. म्हणून जन्मभूमीस मातृभूमि अथवा पितृभूमुद्धा म्हणतात. त्याचप्रकारें ती पुत्रभूमि सुद्धा आहे. उत्तम पुरुषार्थी मनुष्यास तीच स्वर्गधामाप्रमाणें असते, अर्थात् पुरुषार्थ न करणाऱ्यासाठीं नरकभूमीच होते. याचें कारण मनुष्याचे गुण वा दोषच होय. मातृभूमिही मनुष्याचें सर्वस्व आहे. म्हणून सर्व मनुष्यें मातृभूमीची योग्यप्रकारें भक्ति करोत आणि स्वतःची उन्नति करोत.

अदिति शब्द

' अदिति ' शब्द वेदांत कित्येक स्थानीं आला आहे. एक अदिति शब्द ' **अद्- भक्षण करणें** ' या धातुपासून झालेला आहे. त्याचा अर्थ ' अन्न देणारी असा आहे. हा शब्द या सूक्तांत आहे. ' गौ ' अदिति आहे कारण ती दूध देते. भूमि अदिति आहे कारण ती अन्न, फळें, धान्य, वनस्पति वगैरे देते. द्यौ अदिति आहे कारण द्युलोकांतून पाणी वर्षतें आणि त्यामुळें मनुष्यास अन्न धान्य मिळतें. याप्रमाणें अन्न देणारी या अर्थानें हा अदिति शब्द आहे. परंतु या शब्दाचा दुसराहि अर्थ आहे. अथवा असें समजा कीं तो अदिति शब्द निराळाच आहे. तो (अ+दिति) जो दिति म्हणजे खंडित नव्हे अथवा प्रतिबंध युक्त नाहीं तो अदिति म्हणजे ' **स्वतंत्रता** ', हे दोन शब्द परस्पर भिन्न आहेत. यांतील पहिल्या अर्थानें अदिति शब्द या सूक्तांत वापरला आहे, एवढेंच वाचकांनीं स्मरण ठेवावें.

मातृभूमीच्या भक्तांचा सहाय्यक ईश्वर

कांड ७, सूक्त ७

(ऋषिः - अथर्वा । देवता - अदितिः ।)

दितेः पुत्राणामदितेरकारिषमव देवानां बृहतामनर्मणाम् ।
तेषां हि धाम गभिषक्समुद्रियं नैनान्नमसा परो अस्ति कश्चन ॥ १ ॥

अर्थ— (दितेः) प्रतिबंधतेच्या **(तेषां पुत्राणां)** निर्माणकर्त्या पुत्रांचें **(धाम समुद्रियं गभिषक् हि)** वास्तव्य खोल समुद्रांत आहे. तेथून त्यांना **(अदितेः बृहतां अनर्मणां देवानां)** स्वातंत्र्यानें युक्त मातृभूमीच्या महान् अहिंसाशील देवीगुणांनीं युक्त सत्पुत्रांसाठीं **(अव अकारिषं)** दूर करतों, कारण कीं **(एनान् नमसा परः)** यांना नमाहून अधिक योग्य **(कश्चन न अस्ति)** कोणीहि नाहीं. [१]

भावार्थ— पारतंत्र्य प्रसरविणारे राक्षस अथवा असुर समुद्रामध्यें अत्यंत खोल स्थानांत रहातात. मी त्यांना तेथून दूर करतों आणि मातृभूमीचें स्वातंत्र्य संपादन करणाऱ्या श्रेष्ठ देवीगुणांनीं युक्त अहिंसाशील सज्जनांना योग्य स्थान तयार करतों. कारण कीं या सज्जनापेक्षां दुसरा कोणी योग्य नाहीं.

मातृभूमीच्या भक्तांचा सहाय्यक ईश्वर

दिति आणि अदिति

दिति आणि अदिति शब्दाचे अर्थ येथें विशेष प्रकारें पाहिले पाहिजेत. कोषांत या शब्दांचे अर्थ असे सांपडतात—

(१) **अदिति–** स्वतंत्रता, स्वातंत्र्य, मर्यादा न राहणें; अमर्याद, अखंडित, सुखी, पवित्र, पूर्णत्व, वाणी, पृथ्वी, गौ, देवमाता वगैरे अर्थ अदिति शब्दाचे आहेत.

(२) **दिति–** खंडित, पराधीनता, मर्यादित, दुःखी, अपवित्र, अपूर्णत्व, राक्षसमाता हे अर्थ दिति शब्दाचे आहेत.

अदितीची प्रजा 'देवता' आहे आणि दितीची प्रजा 'राक्षस' आहेत. हें सर्व महाभारतादि ग्रंथांत वर्णिलेले विषय आहेत. या सूक्तांत (**दितेः पुत्राणां**) दितीच्या पुत्रांचें स्थान अर्थात् राक्षसांचें स्थान नाश करून देवांना सुख देतों, असें परमेश्वरद्वारा सांगितलें आहे. दितीच्या पुत्रांचें स्थान समुद्रांत खोल जागीं आहे. ही एक त्या स्थानीं प्रवेश होण्यास हरकत सांगितली आहे. वस्तुतः राक्षस जसे समुद्रांत रहातात तद्वत् भूमीवरहि रहातात. गीतेंत राक्षसांचे गुण असे वर्णिले आहेत—

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥
(भ. गी. १६।४)

' दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरपणा आणि अज्ञान हे राक्षसीगुण आहेत.' म्हणजे जे दंभी, घमेंडी, अभिमानी, क्रोधी, कठोर आणि अज्ञानी म्हणजे बंधमुक्त होण्याचें ज्ञान ज्यांना नाहीं अशीं मनुष्यें राक्षस होत. ते असे असल्यामुळें त्यांच्या व्यवहारानें पारतंत्र्य, दुःख वगैरे पसरतें आणि जे त्यांच्या सहवासांत येतात ते पराधीन होतात. म्हणून मंत्रांत म्हटलें आहे कीं अशा दुष्टांस मूळापासून उपटून टाकतों आणि देवांचें स्थान सुदृढ करतों.

अदितीचे पुत्र देव आहेत. परमेश्वर त्यांस सहाय्य करतो, राक्षसांस सुद्धां एवढ्यासाठींच दूर करावयाचें कीं जेणें करून देवांचें स्थान सुदृढ व्हावें. दैवीगुण असे आहेत—

' निर्भयता, पवित्रता, बंधमुक्त होण्याचें ज्ञान, दान, इंद्रियदमन, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरलता, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, चहाडी न करणें, भूतमात्रावर दया करणें, अलोभ, मार्दव, वाईट कर्म करण्याविषयीं लाज, तेजस्विता, क्षमा, धैर्य, शुद्धता, अद्रोह, घमेंड न करणें इत्यादि गुण देवांचे आहेत. (भ. गी. १६।१–३) हे गुण ज्यांच्यांत वाढतील ते देव होत. हे देवच स्वतंत्रता स्थापन करण्याचें कार्य करतात.

परमेश्वर राक्षसवृत्ति असणाऱ्या मनुष्यांचा अंतीं नाश करतो. याचें कारण हेंच कीं ते जगांत पराधीनता आणि दुःख वाढवतात आणि तो दैवीवृत्तीच्या मनुष्यांस सहाय्य एवढ्यासाठींच करतो कीं ते देव जगांत स्वातंत्र्यवृत्ति प्रसरवितात आणि सर्वांस सुखी करण्यांत दत्तचित्त रहातात. म्हणून मंत्रांत म्हटलें आहे कीं (**एतान् परः कश्चन नास्ति**) या देवांपेक्षां श्रेष्ठ दुसरा कोणी नाहीं. म्हणून परमेश्वराचें सहाय्य यांना मिळतें. असा विचार करून वाचकांनीं स्वतःमध्यें दैवीगुण वाढवून निर्भय व्हावें आणि ईश सहाय्य प्राप्त करावें.

राष्ट्रीय ऐक्य

कांड ३, सूक्त ८

(ऋषिः – अथर्वा । देवता – मित्रः, विश्वेदेवताः ।)

आ यातु मित्र ऋतुभिः कल्पमानः संवेशयन्पृथिवीमुस्रियाभिः ।
अथास्मभ्यं वरुणो वायुरग्निर्बृहद्राष्ट्रं संवेश्यं दधातु ॥ १ ॥

अर्थ— (उस्रियाभिः पृथिवीं संवेशयन्) किरणांनीं पृथ्वीला संयुक्त करीत, (ऋतुभिः कल्पमानः मित्रः) ऋतूंसह समर्थ होत (मित्रः) मित्र (आयातु) येवो (अथ) आणि (वरुणः वायुः अग्निः) वरुण, वायु आणि अग्नि (अस्मभ्यं संवेश्यं बृहत् राष्ट्रं) आम्हां सर्वांस उत्तम प्रकारें रहाण्यास योग्य असें मोठें राष्ट्र (दधातु) धारण करो. [१]

भावार्थ— आपल्या किरणांनीं पृथ्वीस प्रकाशित करणारा आणि ऋतूंसह सामर्थ्य वाढविणारा सूर्य, वरुण, वायु आणि अग्नि हे सर्व देव आम्हांस असें मोठें राष्ट्र देवोत कीं तें आम्हांस रहाण्यास योग्य स्थान होईल. [१]

धाता रातिः सवितेदं जुषन्तामिन्द्रस्त्वष्टा प्रति हर्यन्तु मे वचः ।
हुवे देवीमदितिं शूरपुत्रां सजातानां मध्यमेष्ठा यथासानि ॥ २ ॥
हुवे सोमं सवितारं नमोभिर्विश्वानादित्याँ अहमुत्तरत्वे ।
अयमग्निर्दीदायद्दीर्घमेव सजातैरिद्धोऽप्रतिब्रुवद्भिः ॥ ३ ॥
इहेदसाथ न परो गमाथेर्यो गोपाः पुष्टपतिर्व आजत् ।
अस्मै कामायोप कामिनीर्विश्वे वो देवा उपसंयन्तु ॥ ४ ॥
सं वो मनांसि सं व्रता समाकूतीर्नमामसि ।
अमी ये विव्रता स्थन तान्वः सं नमयामसि ॥ ५ ॥

अर्थ— (धाता रातिः सविता) धारण करणारा दाता सविता (मे इदं वचः) हें माझें वचन (जुषन्तां) प्रीतीनें ऐको आणि (इंद्रः त्वष्टा) इंद्र आणि त्वष्टा कारागीर (मे इदं वचः प्रति हर्यन्तु) माझें हें वचन स्वीकारोत. (शूरपुत्रां देवीं अदितिं हुवे) शूरपुत्र असणारी अदिति देवी मातेला मीं बोलावितों. (यथा सजातानां मध्यमे-स्थाः असानि) ज्यामध्यें मीं स्वजातींमध्यें मध्य-स्थानावर राहणारा व्हावें. [२]

(अहं सोमं सवितारं विश्वान् आदित्यान्) मीं सोम, सविता आणि सर्व आदित्यांस (उत्तरत्वे) अधिक श्रेष्ठतेच्या प्राप्तीसाठीं (नमोभिः हुवे) अनेक सत्कारांसह बोलावीत आहें. (अ-प्रति-ब्रुवद्भिः सजातैः इद्धः) विरुद्ध भाषण न करणाऱ्या स्वजातीयांकडून प्रदीप्त केला गेलेला (अयं अग्निः) हा अग्नि (दीर्घं एव दीदायत्) पुष्कळ काळपर्यंत प्रकाशित राहो. [३]

(इह इत् असाथ) येथेंच रहा. (परः न गमाथ) दूर जाऊं नका. (इर्यः गोपाः) अन्नयुक्त गाईचें पालन करणारा, (पुष्टपतिः वः आजत्) पोषण करीत तुम्हांस येथें आणो. (विश्वे देवाः) सर्व देव (अस्मै कामाय) या इच्छेच्या पूर्तीची (कामिनीः वः) इच्छा करणाऱ्या तुम्हां प्रजेची (उप उप संयन्तु) एकत्र एक विचारें संयुक्त करो. [४]

(वः मनांसि सं) तुमच्या मनांस एका भावनेनें युक्त करा, (व्रता सं) तुमच्या कर्मांस एका भावनेनें युक्त करा. (आकूतीः सं नमामसि) संकल्पांस एका भावनेनें एकीकडे वळवा. (अमी ये विव्रताः स्थन) हे जे तुम्हीं परस्पर विरुद्ध कर्म करणारे आहात, (तान् वः सं नमयामसि) त्या सर्व तुम्हांस एकाच विचाराकडे आम्हीं वळवतों. [५]

भावार्थ— सर्वांस धारण करणारा दाता सविता आणि इंद्र व त्वष्टा हे माझें वचन ऐकोत आणि मान्य करोत. तसेंच मीं शूर पुत्रांची माता देवी अदितीस सांगतों कीं या सर्वांचें असें सहाय्य मला प्राप्त होवो कीं ज्यामुळें मीं सजातीयांमध्यें विशेष प्रमुख स्थानांवर विराजमान होण्यास योग्यता प्राप्त करीन. [२]

मीं नमनपूर्वक सोम, सविता तसेंच सर्व आदित्यांस बोलावतों की ते मला असें सहाय्य देवोत कीं ज्यामुळें मीं अधिक श्रेष्ठ योग्यता प्राप्त करून योग्य व्हावें. परस्पर विरोध न करणाऱ्या सजातीय लोकांद्वारा जो हा राष्ट्रीयतेचा अग्नि प्रदीप्त केला गेला आहे, तो पुष्कळ काळपर्यंत आमच्या लोकांत पेटता राहो. [३]

तुम्हीं सर्व येथें एक विचारें रहा, परस्पर विरोध करून एकमेकांपासून दूर होऊं नका. आपणांजवळ अन्न ठेवणारा शेतकरी आणि गाईचें पालन करणारा, तुम्हांस पुष्ट करणारा वैश्य तुम्हांस एकत्रित करून येथें आणो. एकाच इच्छेच्या पूर्ततेसाठीं प्रयत्न करणाऱ्या सर्व प्रजांस सर्व देव एकतेच्या विचारानें संयुक्त करो. [४]

तुमचीं मनें एकत्र करा, म्हणजे एक विचारांचीं करा, तुमचीं कर्में एकतेसाठीं असोत, तुमचे संकल्प एक असोत ज्यामुळें तुमची संघशक्ति संयुक्त होईल. जे हे आपसांत विरोध करणारे आहेत त्या सर्वांत आम्हीं एका विचारानें एकत्रित वळवून आणतों. [५]

अहं गृभ्णामि मनसा मनांसि मम चित्तमनु चित्तेभिरेत ।
मम वशेषु हृदयानि वः कृणोमि मम यातमनुवर्त्मान एत ॥ ६ ॥

अर्थ – (अहं मनसा मनांसि गृभ्णामि) मीं आपल्या मनानें तुमच्या मनांचें ग्रहण करतों. (मम चित्तं चित्तेभिः अनु आ-इत) माझ्या चित्तास अनुकूल तुमचीं चित्तें करून या. (मम वशेषु वः हृदयानि कृणोमि) तुमच्या हृदयांस मीं माझ्या वश करतों. (मम यातं अनुवर्त्मानः आ-इत) माझ्या वर्तणूकीस अनुकूल होऊन वर्तणारे तुम्हीं होऊन येथें या. [६]

भावार्थ– सर्वांत आधीं मीं माझ्या मनानें तुमच्या मनास आकर्षित करतों. माझ्या चित्तास अनुकूल तुम्हीं तुमच्या चित्तास तयार करून मग येथें या. मीं तुमचीं हृदयें माझ्या वश करून घेतों. मीं ज्यामार्गानें जातों त्या मार्गानेंच तुम्हींहि माझ्या पाठोपाठ या. [६]

राष्ट्रीय ऐक्य

अधिक उच्चता

मनुष्यामध्यें अधिक उच्चत्व प्राप्त करण्याची इच्छा स्वभावतःच असते. आपली उन्नति न व्हावी असें कोणीहि मनुष्य मनानें चिंतणार नाहीं, प्रत्येक मनुष्य जन्मतः उन्नतिच इच्छित असतो. याविषयीं तिसऱ्या मंत्राचें कथन पहा—

हुवे सोमं सवितारं नमोभिः
विश्वानादित्यॉं अहमुत्तरत्वे । (मं. ३)

' सोम, सविता आणि सर्व आदित्यांना उच्च होण्याच्या स्पर्धेत मदतीसाठीं बोलावतों. ' म्हणजे मीं देवतांपासून असें सहाय्य इच्छितों कीं ज्यामुळें मी दिव्यमार्गानें उन्नति प्राप्त करूं शकेन.

' **उत, उत्तर** ' हे शब्द एकापेक्षां एक श्रेष्ठ अवस्थांचे द्योतक आहेत. साधारण अवस्थेपेक्षां ' **उत्** ' अवस्था आणि त्यापेक्षां ' **उत्तर** ' अवस्था अधिक श्रेष्ठ आहे. मनुष्यानें नेहमीं ' **उत्तरत्वा** ' च्या प्राप्तीचा प्रयत्न करावा, अशी या तिसऱ्या मंत्राची सूचना आहे. अर्थात् मनुष्यानें आहे अथवा असेल त्या अवस्थेपेक्षां उच्च अवस्थेंत जाण्याचा प्रयत्न तर अवश्य करावाच परंतु त्यापेक्षांहि उच्चतर पायरीस पोहोंचण्याचें ध्येय ठेवावें. ' **उत्-तर-त्व** ' शब्दांत हे सर्व अर्थ आहेत याकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

ही अधिक उच्च अवस्था देवमार्गानेंच प्राप्त केली पाहिजे. ' **श्रेय** आणि **प्रेय** ' अथवा ' **देव** आणि **असुर** ' असे मार्ग मनुष्यांसमोर येतात. त्यांतील श्रेय म्हणजे देव मार्गाचें अवलंबन करण्यानें मनुष्याचें कल्याण होतें आणि दुसऱ्या मार्गानें जाण्यानें मनुष्यांची हानि होते. असुर मार्गास दूर करण्यासाठीं आणि श्रेय मार्गानें जाण्याची प्रेरणा मिळण्यासाठींच या मंत्रांत, ' देवतांची नम्रतापूर्वक प्रार्थना ' करण्याची सूचना दिली आहे. देवतांची नम्रतापूर्वक प्रार्थना करणारा मनुष्य सहसा निकृष्ट मार्गानें जात नाहीं–जाणार नाहीं, त्यामार्गावर पाऊल सुद्धां ठेवणार नाहीं. देवतांची प्रार्थना करणें हा याप्रमाणें मनुष्यत्वाच्या विकासाचा हेतु आहे. एकवेळ या दैवीमार्गावर पाऊल ठेवल्यानंतर सुद्धां कित्येक मनुष्यें आसुरी लालसेंत फंसतात. अशा प्रकारच्या अधःपातापासून सुरक्षित होण्यासाठीं चौथ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

इह इत् असाथ, न परो गमाथ । (मं. ४)

' या दैवी मार्गावर रहा, हा सोडून अन्य मार्गानें जाऊं नका. ' ही सावधतेची सूचना विशेष लक्ष देण्यासारखी आहे. कित्येकदां असें दिसून आलें आहे कीं मनुष्य आत्मोन्नतींच्या मार्गानें उन्नत होत जातो आणि मग त्याचें एकदम पतन होतें. असें न व्हावें म्हणून चौथ्या मंत्रांत सूचना दिली आहे. जर वाचक या सूचनेचा विशेष ध्यानपूर्वक विचार करतील तर निःसंदेह ते सुरक्षित रहातील.

उन्नतीचा मार्ग

मनुष्याच्या उन्नतिसाठीं, मनुष्य सामाजिक प्राणी असल्यामुळें त्याला सांघिक जीवन घालवावें लागतें. हा (मनुष्य) वेगळा एकटा राहून उन्नति करूं शकतच नाहीं वैयक्तिक जीवनासाठीं एवढ्या स्वार्थत्यागाची आवश्यकता नाहीं, जेवढी सामुदायिक जीवनासाठीं असते. यासाठीं सामुदायिक जीवन व्यतीत करणाऱ्या मनुष्यांनीं स्वतःचा व्यवहार असा करावा कीं ज्यामुळें

*

समाजांत परस्पर विरोध उत्पन्न होऊं नये. याविषयीं पांचव्या मंत्राचा उपदेश पहा—

वः मनांसि सं, वः व्रतानि सं,
वः आकूतीः सम् । (मं. ५)

' तुमचीं मनें, तुमचीं कर्में आणि तुमचे संकल्प संपूर्णपणें एकता वाढविणारे असोत. ' या मंत्रांत जो ' **सं** ' उपसर्ग आहे तो ' **उत्तमता** आणि **एकता** ' यांचा द्योतक आहे. मनुष्यांचे संकल्प, त्यांचे मानसिक विचार आणि सर्व प्रकारचीं कर्में अशीं असावींत कीं जीं एकतेची आणि उत्तमतेची वृद्धि करणारीं असोत. कित्येक मनुष्यें प्रत्यक्षतः कांहीं वाईट कार्य करीत नाहींत परंतु मनानें इतके वाईट विचार आणि वाईट संकल्प करतात कीं, त्यांचा परिणाम आपसांत तंटे बखेडे निर्माण होण्यांत होतो. असें होतां कामा नये. संकल्प, विचार आणि कर्म सर्व नेहमीं शुभच असले पाहिजेत, त्यांत कधीं वैरभाव येऊं नये. जर आपल्या समाजांत या विरुद्ध वर्तन करणारा कोणी असला, तर त्याला नीट समजावून सन्मार्गावर आणणें या विषयीं पांचव्या मंत्राचा उत्तरार्ध पहाण्यासारखा आहे—

अमी ये विव्रता स्थन तान्वः सं नमयामसि । (मं. ५)

' हे जे विरुद्ध आचरण करणारे आहेत त्यांस सुद्धां एकतेच्या मार्गावर वळवितों. ' याप्रमाणें विरोधी लोकांना समजूत देऊन एकतेच्या मार्गावर आणलें पाहिजे. समाजाच्या शासनाची अशी व्यवस्था असली पाहिजे कीं ज्यांत राहणारे लोक कुमार्गानें जाऊंच शकणार नाहींत. सज्जन तर शुभ मार्गानें चालतीलच, परंतु विरोध मार्गानें जाण्याचें दुर्जनांनीं सुद्धां सोडून दिलें पाहिजे आणि शुभ मार्गानें चालण्यांत आपलें हित आहे ही गोष्ट त्यांनीं नीट समजून घेतली पाहिजे. याप्रकारें सर्व जनतेस एकतेच्या मार्गावर आणल्यानें आणि समाजांतून दुर्वर्तन करणाऱ्या मनुष्यांस दूर केल्यानें अथवा त्यांस सुधरल्यानें जनतेच्या उन्नतीचा मार्ग सरळ होतो.

सुधारणेचा प्रारंभ

नेहमीं ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं सुधारणेस प्रारंभ आपल्या स्वतःच्या सुधारणेनें होतो. जीं मनुष्यें स्वतःचें अंतःकरण सुधारल्या वांचूनच दुसऱ्यांस सुधारण्यास निघतात ते तें कार्य पार पाडूं शकत नाहींत अथवा स्वतःची उन्नति सुद्धां करून घेऊं शकत नाहींत, म्हणून वेदानें या सूक्ताच्या सहाव्या मंत्रांत आपल्या स्वतःच्या सुधारणेनें जगास सुधारण्याचा उपदेश केला आहे. तो अवश्य पहा—

अहं मनसा मनांसि गृभ्णामि ।
मम वशेषु वः हृदयानि कृणोमि । (मं. ६)

मीं स्वतःच्या ' मनानें दुसऱ्यांची मनें आकर्षित करतों. अशा प्रकारें मीं इतरांची हृदयें माझ्या वश करून घेतों. '

या मंत्रांत ' स्वतःच्या शुभाचरणानें दुसऱ्यांच्या अंतःकरणास आकर्षित करण्याचा उपदेश आहे.' तो प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वाचकांनीं विचार करावा आणि आजूबाजूस पहावें म्हणजे कोण इतरांस आकर्षित करूं शकतो, हें त्यांस कळून येईल. कधींहि दुराचारी अशुभ इच्छा, अशुभ कर्में करणारा मनुष्य जनतेस आकर्षित करूं शकेल काय ? असें कधीं होणार नाहीं. सत्पुरुष आणि शुभ संकल्प करणारेच पुण्यात्मे जनतेस—तिच्या मनास आकर्षित करूं शकतात. जिवंत असतांनाच नव्हे तर मेल्यावर सुद्धां त्यांचे सद्भावप्रेरित शब्द जनतेच्या मनास आकर्षक करीत रहातात. हें त्यांचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें त्यांच्या शुभ संकल्प आणि सत्य संकल्पामुळेंच उत्पन्न होतें. असे पुरुष जें सांगतात त्याप्रमाणें जनता वर्तते. हें त्यांच्या तपश्चर्येचें फल आहे. प्रत्येक मनुष्यानें हें सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या संकल्पांची पवित्रता करण्यानें ही गोष्ट साध्य होते. जो जितकी स्वतःची पवित्रता करील तितकी सिद्धि त्याला प्राप्त होईल. एवढें झाल्यावर तो पुण्यात्मा म्हणूं शकेल कीं—

मम चित्तं चित्तेभिः अनु एत ।
मम यातं अनु वर्त्मान एत ॥ (मं. ६)

' माझ्या चित्तास अनुकूल आपलीं चित्तें करा, मला अनुकूल होऊन वागा आणि माझ्या मार्गानें या (चाला). '

वस्तुतः जो पुण्यात्मा सत्यमार्गानें चालतो आणि आपल्या शुभ संकल्पाच्या जोरावर जनतेचीं मनें आकर्षित करतो त्याला ही सिद्धि अनायासेंच प्राप्त झालेली असते. म्हणजे त्यांनीं सांगितल्यावांचूनच अन्य लोक त्यांच्या अनुकूल आपलीं चित्तें करतात आणि त्यांच्या मार्गाचें अनुसरण करण्याचा प्रयत्न करतात, हें आपोआप होत रहातें. परंतु जनतेस माझ्या मार्गानें या अथवा चाला, असें सांगण्याचा जर कोणास अधिकार असला तर तो अशा पुण्यात्म्यांनाच असतो ही गोष्ट सत्य आहे आणि तीच येथें सांगितली आहे. याप्रमाणें स्वतःची सुधारणा करणारे पुण्यात्मे जनतेचे मार्गदर्शक होतात. जगांत सुधारणा करण्याचा खरा मार्ग याप्रकारें आत्मसुधारणेंत आहे. म्हणून जो प्रयत्न अयोग्य मनुष्य जनतेच्या सुधारणेसाठीं करतात तेवढाच प्रयत्न जर ते आत्मसुधारणेसाठीं करतील तर जास्त चांगलें होईल. जें सामर्थ्य आपणांस प्राप्त होतें तें आत्मसुधारणेमुळेंच प्राप्त होतें. आत्म

सुधारणेशिवाय खऱ्या सुधारणेचा मार्गच नाही. जेव्हां या मार्गानें आपलें सामर्थ्य वाढतें आणि त्यामुळें आपणास आपल्या मनानें दुसऱ्यांचीं मनें आकर्षित करतां येतात, तेव्हां जनतेस ' माझ्या मागें या ' असें सांगण्याचा अधिकार प्राप्त होतो. तो म्हणतो कीं—

' माझ्या रस्त्यानें या, माझे बरोबर चला, माझ्या चित्तास अनुकूल तुमचीं चित्तें करा आणि चला. ' (मं. ६) म्हणजे ज्या मार्गानें मीं जात आहे, त्याच मार्गानें तुम्ही या. या मार्गानें जाण्यानेंच तुमचें भलें होईल. अशा प्रकारें अशा अवस्थेंत मनुष्य जनतेचा मार्गदर्शक होतो. त्याचें आचरण आणि त्याचें जीवन दुसऱ्या लोकांस मार्गदर्शक म्हणजे आदर्श होतें.

संवेश्य राष्ट्र

वर सांगितल्या प्रकारचे पुण्यात्मा आणि धर्मात्मा ज्या राष्ट्रांत अधिक असतात आणि जेथील लोक त्यांस अनुकूल असें आपलें आचरण ठेवतात, त्या राष्ट्रास ' **संवेश्य राष्ट्र** ' म्हणतात. कारण कीं त्यामध्यें (**संवेशन**) प्रवेश करून तेथें रहाण्यालायक तें राज्य असतें. मनुष्यानें तेथें जावें रहावें आणि आनंद प्राप्त करावा. अशा प्रकारचें राष्ट्र आम्हांस देवांच्या कृपेनें प्राप्त व्हावें अशी प्रार्थना प्रथम मंत्रांत केली आहे. पहा—

अस्मभ्यं० बृहद्राष्ट्रं संवेश्यं दधातु । (मं. १)

'आम्हां सर्वांस देव प्रवेश करण्यायोग्य राष्ट्र देवोत.' म्हणजे देवांची कृपा झाली तर असें उत्तम राष्ट्र आम्हांस प्राप्त व्हावें, अथवा आमचें राष्ट्र तसें तयार व्हावें. अशा प्रकारच्या राष्ट्रांत ' मीं प्रमुख होईन ' अशी महत्त्वाकांक्षा जनतेच्या अंतःकरणांत राहील की अशा राष्ट्रांत कोणत्याही कारणानें पक्षपात होणार नाही. असें सूचक वाक्य दुसऱ्या मंत्रांत आहे—

यथा सजातानां मध्यमेष्ठा असानि । (मं. २)

' स्वजातीयांमध्यें मुख्यस्थानीं बसण्यालायक मी होईन. ' ही इच्छा अशा राष्ट्राच्या लोकांच्या अंतःकरणांत राहील, याविषयीं जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. जे वर सांगितलेल्या मार्गांनीं आपल्या शक्तीचा विकास करतील ते सांगितलेल्या स्थानीं जाऊन विराजतील. इतर मनुष्यें आपआपल्या योग्यतेनुसार आपल्या योग्यस्थानीं राहून आपलें कर्तव्य करतील, परंतु कोणासहि उन्नति करून घेण्याच्या मार्गांत प्रतिबंध होणार नाहीं. सर्व मनुष्यें आपल्या पुरुषार्थानें आपल्या उन्नतीचें साधन करतील, सर्व मिळून आपल्या राष्ट्रास उन्नतीच्या शिखरावर घेऊन जातील. याविषयीं एकप्रकारें सात्त्विक स्पर्धाच होते. हिला तिसऱ्या मंत्रांत ' उत्तरत्वाची स्पर्धा ' म्हटलें आहे. या स्पर्धेंत परस्परांचा घात होत नाहीं, उलट परस्परांची उन्नति होते. जनतेंतील सर्व मनुष्यें एका भावानें हा राष्ट्रोन्नतीचा अग्नि प्रदीप्त करतात आणि त्यांत आपआपल्या कर्मरूपी आहुति टाकतात. याविषयीं तिसऱ्या मंत्राचा उत्तरार्ध पहा—

राष्ट्रीय अग्नि

अयमग्निर्दीदायद्दीर्घमेव सजातैरिद्धोऽप्रतिब्रुवद्भिः । (मं. ३)

'(**अ-प्रति ब्रुवाद्भिः**) आपसांत विरोधाचीं भाषणें न करणाऱ्या (**स-जातैः**) स्वजातीयांकडून प्रदीप्त केलेला हा राष्ट्रीय एकतेचा अग्नि दीर्घकालपर्यंत प्रदीप्त स्थितींत राहो. ' म्हणजे हा अग्नि मध्येंच विझून न जावो. कारण या अग्नीच्या उष्णतेनें सर्व राष्ट्रीय मनोरथ सफल आणि सुफल होत आहेत. म्हणून हा राष्ट्रीय अग्नि सर्वदा प्रदीप्त राहिला पाहिजे. हा अग्नि जी मनुष्यें (**अ-प्रति-ब्रुवत्**) म्हणजे आपसांत विरोधाचे शब्द बोलत नाहींत, आपसांत कलह करीत नाहींत, आपसांत द्वेष वाढवीत नाहींत तींच प्रदीप्त ठेऊं शकतात, परंतु उलटपक्षीं आपसांत मेळ घालतात, अथवा सख्य करण्याची भाषा बोलतात अशींच मनुष्यें राष्ट्रोन्नतीच्या महान् अग्नीचें चयन करतात.

या सूक्तांत ' **सजात** ' शब्द आला आहे आणि हा शब्द वेदमंत्रांत अनेकवेळां आला आहे. ' सजातीय, समानजातीय, स्वजातीय ' इत्यादि अर्थांनीं हा शब्द प्रयुक्त होतो. ज्यांच्यांत जातिभेदाची भिन्नता नाहीं, असे एकाजातीचे एक राष्ट्रीयतावादी लोक असा या शब्दाचा अर्थ आहे. जातिभेदामुळें एकमेकांशीं भांडत रहाणारे लोक ' **सजात** ' नाहींत. एकाच राष्ट्राचीं मनुष्यें परस्पर ' **सजात** ' च असतात. परंतु त्यांच्यांत राष्ट्रीयतेची भावना प्रबल असली पाहिजे आणि लघु जातपातीविषयीं भावना गौण असली पाहिजे. अशी मनुष्यें जेव्हां एकतेनें, आपआपसांतील प्रेमानें कोणतें एकादें कार्य करतात तेव्हां त्यांच्यांत एक विलक्षण शक्ति उत्पन्न होते. तीच शक्ति अग्नि या शब्दानें तिसऱ्या मंत्रांत वर्णिली आहे. संपूर्ण राष्ट्राच्या उन्नतीस सहाय्यक होतो तो हाच राष्ट्रभक्तीचा अग्नि.

राष्ट्राचा पोषक

अशाप्रकारचे खरे राष्ट्रास पोषक दोनच प्रकारचे लोक असतात, त्यांचे वर्णन चौथ्या मंत्रद्वारां केलें आहे—

इर्यो गोपा पुष्टपतिर्व आजत् । (मं. ४)

' (**इर्यः**) अन्नाचें उत्पन्न करणारा आणि (**गो-पा**) गाईचें रक्षण करणारा, हे दोघे पुष्टि करणारे आहेत. ' हा मंत्रभाग पुष्कळ मनन करण्यासारखा आहे. अन्नास उत्पन्न करणारा शेतकरी आणि गाईचे रक्षण करणारा गवळी हे दोन वर्ग राष्ट्राच्या

पुष्टिसाठीं आवश्यक आहेत, राष्ट्राचा पाया पक्का करण्याचें कार्य हे करतात. म्हणून राज्यव्यवस्थेंत यांची स्थिति सुदृढ करण्याची विशेष आवश्यकता आहे. जर अन्न उत्पन्न करणारा शेतकरी आणि गाईंचें रक्षण करणारा गवळी हे दोन वर्ग राष्ट्रांत कमकुवत झाले तर राष्ट्राची पुष्टि कधींहि होणार नाहीं. वाचकांनीं या दृष्टीनें यांचें महत्त्व जाणावें आणि हा उपदेश या प्रसंगीं देण्यांत वेदानें केवढी महत्त्वाची गोष्ट सांगतली आहे तें ध्यानांत ठेवावें.

शूरपुत्रांची माता

राष्ट्राचा पाय त्याची ' संतति ' आहे. पुत्र आणि कन्या हेच राष्ट्राचा भावी उत्कर्ष अथवा अपकर्ष करणारे असतात. याचे खरें शिक्षण मातेकडून होते. मातेनें आपल्या मुलांस कशा-प्रकारचें शिक्षण द्यावें याची सूचना दुसऱ्या मंत्रांत दिली आहे, याविषयीं सूचक शब्द असे आहेत—

शूरपुत्रां अदितिं देवीं हुवे । (मं. २)

' शूरपुत्रांच्या अदीन मातेला मीं बोलावितों. ' अथवा तिची मीं प्रशंसा करतों. येथील ' अ-दिति ' शब्द अदीन, प्रतिबंधांत न रहाणारी, राष्ट्राच्या स्वतंत्रतेचे, स्वाधीनतेचे विचार असणारी इत्यादि भाव दर्शविणारा आहे. ' शूरपुत्रा ' शब्दाचा भाव स्पष्ट आहे. राष्ट्रांत स्त्रिया अशा असाव्या कीं ज्या अदीन आणि वीरपुत्रा म्हटल्या जातील. ' वीरसूर्भव ' म्हणजे वीर पुत्रास जन्म देणारी हो, असा वैदिक आशीर्वाद सुप्रसिद्ध आहे. तीच गोष्ट येथें अन्यप्रकारें सांगितली आहे.

राष्ट्रीय शिक्षण

अशा प्रकारच्या वीरमाता जेथें असतील तेथें राष्ट्रीयतेचा भाव परम उत्कर्ष पावलेला असेल. स्त्रियांस, मुलींस, बहीणस कशाप्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे हा विचार येथें निश्चित करतां येतो. ज्या शिक्षणामुळें स्त्रिया वीरपुत्रांस जन्म देणाऱ्या होतील असें शिक्षण त्यांस द्यावयास हवें.

दैवी सहायता

वर सांगितलेल्या राष्ट्रीयत्वाच्या विचारांची पूर्णता होऊन संपूर्ण जनता याप्रकारें समर्थ राष्ट्रभक्तांनीं युक्त होवो. याविषयीं चौथा मंत्र पहा—

अस्मै कामायोप कामिनीर्विश्वे वो देवा उपसंयन्तु । (मं. ४)

' सर्व देव अशा कामनेच्या पूर्ति करणाऱ्या तुम्हा सर्व प्रजेस एकतेच्या विचारानें युक्त करो. ' म्हणजे तुम्हीं सर्व लोक एकतेचा विचार वाढवा. हा एका दृष्टीनें पूर्ण आणि उच्च असा आशीर्वाद आहे. जे वाचक परमेश्वरभक्तिपूर्वक राष्ट्रोन्नतिसाठीं प्रयत्नशील होतील तेच आशीर्वाद प्राप्त करण्याचे अधिकारी होतील.

अध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक

या सूक्ताच्या इतर मंत्रभागांत, ' मित्र, वरुणादि देवतांचें सहाय्य आम्हांस राष्ट्रशक्ति वाढविण्याच्या कार्यांत प्राप्त होवो, ' असा आशय आहे. हा आशय, अध्यात्मिक, आधिभौतिक कार्य-क्षेत्रांत पाहून अर्थबोध ग्रहण करण्याची रीत यापूर्वी कित्येक प्रसंगीं वर्णन केली आहे. (विशेषतः कां. १ सू. ३०-३१ चें विवरण पहा.) म्हणून त्याविषयीं येथें पुनः विचार करण्याची जरूरी नाहीं. या दृष्टीनें वाचकांनीं या सूक्ताचा अधिक विचार करावा आणि बोध प्राप्त करून घ्यावा.

ऐक्य

कांड ३, सूक्त ३०

(ऋषिः - अथर्वा । देवता - चंद्रमाः, सांमनस्यम् ।)

सहृदयं सांमनस्यमविद्वेषं कृणोमि वः । अन्यो अन्यमभि हर्यत वत्सं जातमिवाघ्न्या ॥ १ ॥

अर्थ— (**स-हृदयं**) सहृदयता म्हणजे प्रेमपूर्ण हृदय, (**सां-मनस्यं**) सांमनस्य म्हणजे मन शुभ विचारांनीं परिपूर्ण होणें आणि (**अ-विद्वेषं**) परस्पर निर्वैरता (**वः कृणोमि**) तुमच्यासाठीं मीं करतों. तुमच्यापैकीं (**अन्यः अन्यं अभि हर्यत**) प्रत्येक एकमेकांवर प्रेम करा, (**अघ्न्या जातं वत्सं इव**) ज्याप्रमाणें गाय जन्मलेल्या वासरावर प्रेम करते. [१]

भावार्थ— प्रेमपूर्ण हृदयाचा भाव, मनाचे शुभ विचार आणि आपसांतील निर्वैर तुम्हीं तुमच्या घरांत स्थिर करा. तुमच्या पैकीं प्रत्येकजण एकदुसऱ्याशीं असा प्रेमपूर्ण व्यवहार करो कीं ज्याप्रमाणें गायमाता नव्या जन्मलेल्या वासरावर प्रेम करते. [१]

अनुव्रतः पितुः पुत्रो मात्रा भवतु संमनाः । जाया पत्ये मधुमतीं वाचं वदतु शन्तिवाम् ॥ २ ॥
मा भ्राता भ्रातरं द्विक्षन्मा स्वसारमुत स्वसा । सम्यञ्चः सव्रता भूत्वा वाचं वदत भद्रया ॥ ३ ॥
येन देवा न वियन्ति नो च विद्विषते मिथः । तत्कृण्मो ब्रह्म वो गृहे संज्ञानं पुरुषेभ्यः ॥ ४ ॥
ज्यायस्वन्तश्चित्तिनो मा वि यौष्ट संराधयन्तः सधुराश्चरन्तः ।
अन्यो अन्यस्मै वल्गु वदन्त एत सध्रीचीनान्वः संमनसस्कृणोमि ॥ ५ ॥
समानी प्रपा सह वोऽन्नभागः समाने योक्त्रे सह वो युनज्मि ।
सम्यञ्चोऽग्निं सपर्यतारा नाभिमिवाभितः ॥ ६ ॥

अर्थ— (पुत्रः पितुः अनुव्रतः) पुत्र पित्यास अनुकूल कर्म करणारा आणि (मात्रा संमनाः भवतु) मातेशीं उत्तम मनानें रहाणारा होवो. (जाया पत्ये) पत्नी पतीशीं (मधुमतीं शन्तिवां वाचं वदतु) मधुर आणि शांति युक्त भाषण करो. [२]

(भ्राता भ्रातरं मा द्विक्षत्) भाऊ भाऊ एकमेकांचा द्वेष न करोत (उत स्वसा स्वसारं मा) आणि बहिणी बहिणी परस्पर द्वेष न करोत. (सम्यञ्चः सव्रताः भूत्वा) एकमताचे आणि एक कर्म करणारे होऊन (भद्रया वाचं वदत) उत्तम रीतीनें भाषण करा. [३]

(येन देवाः न वियन्ति) ज्यामुळें व्यवहार करणाऱ्यांत विरोध निर्माण होत नाहीं (च नो मिथः विद्विषते) आणि कधींहि परस्पर द्वेष वाढत नाहीं, (तत् संज्ञानं ब्रह्म) तें ऐक्य वाढवणारें परम उत्तम ज्ञान (वः गृहे पुरुषेभ्यः कृण्मः) तुमच्या घरच्या मनुष्यासाठीं आम्हीं करतों. [४]

(ज्यायस्वन्तः) वृद्धांचा सन्मान करणारे, (चित्तिनः) उत्तम चित्त असणारे (संराधयन्तः) उत्तम सिद्धि प्राप्त होईपर्यंत प्रयत्न करणारे, (स-धुराः चरन्तः) एकाच धुरेखालीं कार्य करणारे आणि पुढें सरणारे होऊन (मा वि यौष्ट) तुम्हीं एकमेकांपासून विलग-वेगळे होऊं नका, एकमेकांचा विरोध करूं नका. (अन्यः अन्यस्मै वल्गु वदन्तः एत) एकमेकांशीं प्रेमपूर्वक भाषणें करीत पुढें सरा. (वः सध्रीचीनान्) तुम्हांस बरोबरीनें पुरुषार्थ करणारे आणि (संमनसः कृणोमि) उत्तम एकाविचारानें युक्त मनाचे करतों. [५]

(प्रपा समानी) तुमची पाणी पिण्याची जागा एकच असो आणि (वः अन्नभागः सह) तुमच्या अन्नाचा भागसुद्धां बरोबरीनें असो. (समाने योक्त्रे वः सह युनज्मि) एकाच जूंवास तुम्हांस बरोबरीनें जोडतों. (सम्यञ्चः अग्निं सपर्यत) मिळून मिसळून देवाची पूजा करा, (अभितः नाभिं अराः इव) सर्व बाजूंनीं केंद्राशीं ज्याप्रमाणें चाकाच्या आऱ्या जोडलेल्या असतात. [६]

भावार्थ— पुत्र पित्यास अनुकूल असें कर्म करो आणि मातेशीं मनाच्या शुभभावनेनें व्यवहार करो. पत्नी पतिशीं सदा मधुर भाषण करो. (२)

भाऊ भावाचा द्वेष न करो, बहीण बहीणीचा द्वेष न करो. एकमतानें एक कर्म करणारे होऊन परस्पर निष्कपटतेनें भाषण करा. [३]

ज्यामुळें कार्य करणाऱ्यांत परस्पर विरोध होऊं शकणार नाहीं आणि कधींहि आपसांत भांडण होणार नाहीं, असें उत्तम ज्ञान तुम्हीं आपल्या घरांत वाढवा. [४]

वृद्धांचा सन्मान करा, चित्तांत शुभसंकल्प धारण करा, उत्तम सिद्धि प्राप्त होईपर्यंत प्रयत्न करा, पुढें सरा, आपल्या डोक्यावर कार्याचा भार घ्या आणि आपसांत विद्वेष वाढवूं नका. परस्पर प्रेमपूर्वक भाषण करा, मिळून मिसळून रहा आणि पुरुषार्थ करणारे व्हा. यासाठीं तुम्हांस उत्तम मनानें युक्त करतों. [५]

तुमचीं पाणी पिण्याचीं स्थानें सर्वांचीं एकच अथवा समान असोत. अन्नाचा भोग (भाग) तुम्हांस समान प्राप्त होवो. समान कार्यासाठीं एक धुरेखालीं राहून कार्य करणारे तुम्ही व्हा. उपासना सुद्धां तुम्हीं सर्व एकत्र मिळून एकेठायीं करा. ज्याप्रमाणें चाकाच्या आरी एकत्र केंद्राशीं जोडलेल्या असतात तद्वत् तुम्हीं आपल्या समाजांत एकजुटीनें रहा. [६]

सध्रीचीनान्वः संमनसस्कृणोम्येकश्नुष्टीन्त्संवननेन सर्वान् ।
देवा इवामृतं रक्षमाणाः सायंप्रातः सौमनसो वो अस्तु ॥ ७ ॥

अर्थ— (संवननेन वः सर्वान्) परस्पर सेवा करण्याच्या भावनेनें तुम्हीं सर्व (सध्रीचीनान् संमनसः एकश्नुष्टीन् कृणोमि) एकमेकांशीं मिळून मिसळून पुरुषार्थ करणारे, उत्तम मनाचे आणि समान नेत्याच्या आज्ञेनें कार्य करणारे असे तयार करतों. (अमृतं रक्षमाणाः देवाः इव) अमृताचें रक्षण करणाऱ्या देवासारखे, (सायं प्रातः वः सौमनसः अस्तु) सांज-सकाळ तुमचें प्रसन्न चित्त राहो. [७]

भावार्थ— परस्परांची सहाय्यता करण्यासाठीं परस्परांची सेवा करा, उत्तम ज्ञान प्राप्त करा, मनांतील भावना शुद्ध करून एका विचारानें एका कार्यांतच दत्तचित्त रहा. सर्वांस अन्न भोग (भाग) समान प्राप्त होवो. ज्याप्रकारें देव अमृताचें रक्षण करतात, त्याप्रमाणें सांज-सकाळ तुम्हीं आपल्या मनांतील शुद्ध संकल्पांचें रक्षण करा. [७]

ऐक्य

संज्ञानानें ऐक्य

या सूक्तांत ' संज्ञान ' प्राप्त करून आपसांत ऐक्य साधण्याचा उपदेश आहे. मनुष्यप्राणी संघ करून रहाणारा असल्यानें त्यानें आपसांत ऐक्य राखणें आवश्यक असतें. जातींत ऐक्य न राहिलें तर मनुष्याचा नाश होईल. म्हणून आपसांत संघशक्ति वाढवून रहातात तेच या जगांत विजयी होतात आणि ज्या जातींत आपसांत फाटाफूट अधिक असतें ती पराजित होत रहाते. यास्तव आपसांत संघशक्ति वाढवून स्वतःची उन्नति करणें प्रत्येक जातीस अत्यंत आवश्यक आहे. संघशक्ति वाढविण्याचा जो उपाय या सूक्तांत वर्णन केला आहे तो आतां पाहूं—

अंतर्गत सुधारणा

सर्वप्रथम व्यक्तीचे अंतरंगांत सुधारणा व्हावयास हवी. वैदिकधर्मांत जर कांहीं विशेष महत्त्वाची गोष्ट सांगितली असेल तर ही की संपूर्ण सुधारणा मनुष्यानें प्रथम स्वतःच्या हृदयापासुन करावी. हृदय सुधरल्यानें इतर सर्व सुधारणा मनुष्यास लाभदायक होतात. परंतु अंतःकरणांत दोष राहिले तर बाह्यसुधारणांपासून कांहीं लाभ होणार नाहीं. म्हणून या सूक्तांत हृदय सुधारण्याची सूचना सर्वांत प्रथम सांगितली आहे—

१ सहृदयं- (स-हृदयं)- हृदयांतील भावनांची समानता म्हणजे दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी आणि सुखानें सुखी होणें. (मं. १)

ज्यांचीं हृदयें अशी असतात तेच जनतेंत ऐक्य साधण्याच्या आणि ऐक्य वाढवण्याचें कार्य करण्यास अधिकारी होतात. जो दुसऱ्यास दुःखी पाहून दुःख अनुभवत नाहीं तो जनतेची वा स्वतःची कांहींच उन्नति करूं शकत नाहीं. हृदय सुधारणें हेंच मुख्य कार्य आहे. त्यानंतर वेद म्हणतो—

२ सां-मनस्यं- (सं-मनः)- मन उत्तम शुभ संस्कारांनीं पूर्ण होणें. मन शुद्ध आणि पवित्र भावांनीं आणि श्रेष्ठ विचारांनीं युक्त होणें. (मं. १)

मनाधीन संपूर्ण इंद्रियें असतात. म्हणून मनांत असे विचार येतील तशीच प्रवृत्ति सर्व इंद्रियांची होईल. म्हणून अन्य इंद्रियांकडून प्रशस्ततम कार्य होण्यासाठीं मनाचे संकल्प शुभ असणें अत्यंत आवश्यक आहे. वर सांगितल्याप्रमाणें सहृदयता आणि सांमनस्यता सिद्ध झाल्यावर मनुष्याचे बाह्य व्यवहार कसे असावेत हें सुद्धां मंत्रांतील तिसऱ्या शब्दाद्वारा सांगितलें आहे—

बाह्य सुधारणा

३ अ-विद्वेषं- द्वेष न करणें. एकानें दुसऱ्याचा (परस्पर) द्वेष न करणें. आपापसांत कलह करूं नये. (मं. १)

हा शब्द बाह्य व्यवहारांत सुधारणा करण्याची सूचना देत आहे. मनुष्याचा व्यवहार कसा असावा ? या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं,' मनुष्याचा व्यवहार असा असावा कीं ज्यांत कोणी कोणाचा द्वेष करूं नये. ' हा मनुष्य व्यवहाराचा आदर्श आहे. द्वेष नसावा, कलह-तंटा-भांडण नसावें. दोन मनुष्यें एकत्र आलीं कीं कोणाची तरी निंदा सुरूं होते. नीच मनुष्याचा हा स्वभाव असतो, परंतु सज्जनांनीं असें करणें योग्य नाहीं. त्यांनीं आपलें आचरण निर्वैरतेनें परिपूर्ण ठेवावें.

निर्वैरतेनें व्यवहार करण्याचें तात्पर्य काय आहे ? दोन दगड अथवा दोन वृक्ष शेजारीं शेजारी रहातात, निर्वैरतेनें रहातात.

अशी जड निर्वैरता कां येथें सांगितली आहे ? नव्हे. येथील, ' **अ-विद्वेषं** ' शब्द परस्पर प्रेमपूर्ण व्यवहाराचा सूचक आहे. सर्वांत प्रथम सहृदयता आणि सांमनस्यता सांगितली आहे. नंतर क्रमानें हृदय आणि मन शुद्ध करण्यास सांगितलें. असें परिशुद्ध हृदय आणि मन जसा अविद्वेषाचा व्यवहार करतील तो दोन दगडाच्या आपसांतील व्यवहारासारखा जड असूं शकणार नाहीं. अशा अविद्वेषाच्या व्यवहाराचें उदाहरणसुद्धां मंत्राच्या उत्तरार्धांत दिलें आहे—

अन्यो अन्यमभिहर्यत, वत्सं जातमिवाघ्न्या । (मं. १)

' एक दुसऱ्याशीं असें प्रेम करा, जसें गाय नुकत्याच जन्मलेल्या वासरावर करते. ' निर्वैरतेचें हें उदाहरण आहे. अहिंसेच्या व्यवहाराचें दृश्यरूप गोमातेच्या नवजात वत्साशीं होणाऱ्या व्यवहारानें मिळतें. गाईचें जसें तिच्या वासरावर प्रेम असतें तसें प्रेम तुम्हीं एकमेकांवर करा. ' **अ-विद्वेष** ' या शब्दाचा केवळ अर्थ ' **वैराचा अभाव** ' एवढाच नाहीं. निव्वळ निषेध करण्यानें विरुद्ध स्थितीचा-अर्थाचा बोध होत नाहीं. वैर न करणें, हिंसा न करणें, हें तर उत्तम आहेच परंतु याचें विधायक स्वरूप आहे, ' प्रेम करणें. ' म्हणजे अविद्वेष याचा अर्थ दुसऱ्यावर प्रेम करणें. पहिल्या मंत्रांत जो तीन शब्दांनीं मानवीधर्माचा उपदेश दिला आहे, त्यासाठीं उदाहरण मंत्राच्या उत्तरार्धांत गाईचें दिलें आहे आणि परस्परांशीं प्रेम कसें असावें हें दर्शविलें आहे. असें करण्यानें जातीय ऐक्य साध्य होईल. या उपदेशाचें आचरण करण्यासाठीं क्रम पुढील मंत्रांत सांगितला आहे. सर्वप्रथम आपल्या घरांत या उपदेशानुसार व्यवहार करण्याची रीत पुढील तीन मंत्रांत सांगितली आहे. ती गृहस्थांनीं अवश्य मनन करण्यासारखी आहे.

'(१) पुत्र पित्यास अनुकूल कर्म करो आणि मातेशीं उत्तम भावनांनीं व्यवहार करो. धर्मपत्नीनें पतीशीं मधुर आणि शांतियुक्त भाषण करावें. (२) भावानें भावाशीं द्वेष ठेऊं नये आणि बहिणीनें बहीणीशीं कलह करूं नये, सर्वांनीं मिळून मिसळून आपसांत मधुर भाषण करावें आणि स्वतःच्या कल्याणाकडे सर्व लक्ष द्यावें. (३) ज्यामुळें वैर अथवा विद्वेष उत्पन्न होणार नाहीं असें संज्ञान तुम्हांस आणि तुमच्या घरच्या सर्वांस मीं देत आहें. (४)'

आदर्श कुटुंबाचें हें वर्णन आहे. जें कुटुंब असें असेल तें निःसंशय आदर्शरूपच असेल. वाचकांनीं या मंत्राच्या उपदेशाचें बीज आपल्या परिवारांत पेरावें-रोपण्याचा यत्न करावा.

या मंत्रांचा अर्थ करतेवेळीं हा सामान्य निर्देश आहे ही गोष्ट विसरूं नये. म्हणजे, ' पुत्रानें पित्यास अनुकूल कार्य करावें ' या वाक्याचा अर्थ ' कन्येनें सुद्धां मातापित्यांस अनुकूल कार्य करावें ' असा आहे. तसेंच ' भावाभावांनीं द्वेष करूं नये ' याचा अर्थ ' भावानें बहिणीशीं अथवा बहीणीनें भावाशीं द्वेष करूं नये ' असाहि होतो. ' पत्नीनें पतीशीं मधुर भाषण करावें ' याचा ' पतीनें पत्नीशीं मधुर भाषण करावें ' हा अर्थ आलाच. आणि—

वः गृहे पुरुषेभ्यः संज्ञानं ब्रह्म कृण्मः । (मं. ४)

' तुमच्या घरच्या पुरुषांना हें संज्ञान ब्रह्म देत आहे.' याचा, अर्थ ' तुमच्या घरच्या स्त्रियांनाहि हें संज्ञान देत आहे ' असा आहे. यास सामान्य निर्देश म्हणतात. जर वाचक या निर्देशांतील अर्थ सामान्यतः न पारखतील तर अर्थाचा अनर्थ होईल. म्हणून वाचकांनीं या अनुसंधानानें अवश्य बोध प्राप्त करून घ्यावा.

समुदायांत कर्म

पांचव्या मंत्रांत जातीच्या मनुष्यांशीं कसा व्यवहार केला पाहिजे, याविषयीं उत्तम उपदेश आहे. त्याचा सारांश असा—

१ **ज्यायस्वन्तः**- मोठ्यांचा सन्मान करणारे व्हा. वृद्धांचा सन्मान करा. (मं. ५)

२. **मा वि यौष्ट**- विभक्त होऊं नका. आपसांत भेद वाढवूं नका. (मं. ५)

३ **सधुराः चरन्तः**- एका धुरेखालीं राहून पुढें सरा. येथें धुरेचा अर्थ, धुरीण, नेता वगैरे समजणें योग्य आहे. आपल्या नेत्याच्या आज्ञेंत राहून आपल्या उन्नतीच्या मार्गानें कटिबद्ध होऊन चला. (मं. ५)

आपल्या नेत्याच्या आज्ञेंत राहून उन्नतीचें साधन करणारेच अभ्युदय आणि निःश्रेयस प्राप्त करूं शकतात.

४ **सध्रीचीनाः**- एकाच कर्मासाठीं एकत्र येऊन पुरुषार्थ करणारे व्हा. म्हणजे जें कांहीं करावयाचें तें सर्व एकत्र येऊन मिळून करा. (मं. ५)

५ **संराधयन्तः**- मिळून सिद्धिसाठीं प्रयत्न करणारे व्हा. (मं. ५)

६ **अन्यो अन्यस्मै वल्गु वदन्त एत**- परस्पर प्रेमपूर्वक शुभ भाषण करीत पुढें चला. (मं. ६)

जर कधीं दुसऱ्याशीं भाषण करावयाचें असलें तर तें प्रेमपूर्वक मधुर आणि तोलून मोजून करावें. म्हणजे त्यामुळें आपसांत कलह वाढणार नाहीं आणि आपसांत फूट वाढून आपली शक्ति क्षीण होणार नाहीं.

या मंत्रांतील ' **चित्तिनः** आणि **संमनसः** ' हे शब्द पूर्वी येऊन गेलेल्या ' **सांमनस्य** ' शब्दाचा जो भाव आहे तोच येथें दर्शवितात. उत्तम चित्ताचे आणि शुभ मनाचे व्हा हाच त्यांचा आशय आहे.

वृद्धांचा सन्मान करणें आणि पुरुषार्थ साधक कर्माकडे लक्ष लावणें हे दोन उपदेश येथें मुख्य आहेत. वाचकांनीं विचार केला तर त्यांचे ध्यानीं येईल कीं, मनुष्यांची परीक्षा कर्मानें होते. म्हणून या मंत्रांत अनेक शब्दद्वारा सांगितलें आहे कीं कोणत्याहि एका कर्मास स्वतःला वाहून घ्या आणि त्यांत जर इतरांचा संबंध येत असला तर त्यांच्याशीं अविरोधानें कर्म करा. अशा कर्मावरून मनुष्य श्रेष्ठ कीं कनिष्ठ आहे याचा निश्चय होत असतो.

खाण्या-पिण्याचा प्रश्न

जेव्हां समुदायांत राहून कार्य करण्याचा प्रश्न येतो तेव्हां खाण्या-पिण्याचा प्रश्न उपस्थित होतो. घरांत तर सर्वांचें खाणें-पिणें एकत्र असतें. कारण कीं माता, पिता, मुलेंबाळें, बंधु वगैरे सर्वच बहुशः एकत्र भोजन करतात आणि एकच पाणी पितात. जो कांहीं खाण्या-पिण्याचा प्रश्न उपस्थित होतो तो जातीय संघटनेचे वेळीं उत्पन्न होतो. याविषयीं सहाव्या मंत्रांत उत्तम नियम सांगितला आहे—

' तुमचें जलपानाचें स्थान आणि अन्नभाग सुद्धां एकच असो. तुम्हां सर्वांस मीं एका धुरेखालीं ठेवतों. तुम्हीं मिळून एकजुटीनें ईश्वराची उपासना करा. ' (मं. ६)

या मंत्रांत सर्वांचें खाणें-पिणें आणि उपासना एकच असावी याविषयीं उपदेश स्पष्ट शब्दांत दिला आहे. जातीय आणि राष्ट्रीय कार्य करणाऱ्यांनीं या मंत्राचें अधिक मनन करावें. मंत्र म्हणतो कीं, ' जात ही चाकासारखी आहे. ' ज्याप्रमाणें चाकाच्या आरी केंद्राशीं उत्तम प्रकारें जोडलेल्या असतात, त्याप्रकारें चारी वर्ण राष्ट्राच्या केंद्राशीं जडलेले असतात. जर ते स्वस्थानापासून थोडेसे जरी विचलित झाले तर चक्राचा नाश होईल. जनतेंतील सर्व मनुष्यांची एकता अशी असली पाहिजे कीं ज्याप्रमाणें चाकाच्या आरी एकत्र असतात.

सेवाभावनेनें उन्नति

सातव्या मंत्रांत ' **सं-वनन** ' शब्द आहे. त्याचा अर्थ ' उत्तम प्रकारें प्रेमपूर्वक सहाय्य करणें ' असा आहे. ' **वन्** ' धातूचा अर्थ ' प्रेमपूर्वक दुसऱ्यास सहाय करणें ' असा आहे. ' **सं+वन्** ' चा अर्थ सुद्धां तसाच आहे. यावरून संवननचा अर्थ स्पष्ट होईल. प्रेमपूर्वक दुसऱ्यास सहाय्य करणें हें सेवा-समितीचें कार्य होतें, तोच भाव या शब्दांत आहे, आपणास कांहीं बक्षिस-इनाम-बदला मिळावा अशी अपेक्षा न करतां जनतेची सेवा निष्कळ प्रेमानें करणें आणि हीच परमेश्वराची श्रेष्ठ भक्ति आहे. असा भाव मनांत धारण करणें श्रेष्ठ मनुष्याचें लक्षण आहे. या गुणानें इतर मनुष्यांवर मोठा प्रभाव पडतो आणि पुष्कळ मनुष्यें अनुकूल होतात. याविषयीं मंत्र म्हणतो—

संवननेन सर्वान् एक श्नुष्टीन् कृणोमि । (मं. ७)

' प्रेमपूर्वक सेवेनें सर्वांस मदत करीत मीं सर्वांस एकाच ध्येयासाठीं कार्य करणारे बनवितों. ' जनतेचा सर्व श्रेष्ठ नेता तोच जो जनतेचा निःस्वार्थ सेवक आहे. खरें राष्ट्र कार्य, खरी जनसेवा करणें हें मनुष्याचें महान् यज्ञ कर्म आहे. जो तें जेवढें आणि जसें करील तो तेवढा तितका श्रेष्ठ नेता होऊं शकतो. निःस्वार्थ सेवेनेंच जनतेचा नेता होतां येते. परमेश्वर सर्वांपेक्षां श्रेष्ठ एवढ्यासाठींच कीं तो सर्वांपासून अज्ञात गुप्त राहून अज्ञात रीतीनें जनतेस अधिकांत अधिक मदत करतो. हा त्याचा महान् यज्ञ आहे. म्हणून सर्व आस्तिक मनुष्यें त्याचा जास्तींत जास्त सन्मान करतात. सत्पुरुष स्वतः समोर मोठा आदर्श ठेवतात आणि जनतेची सेवा करीत रहातात आणि त्या कारणानें ते सुद्धां सन्मानाचे भागीदार होतात.

कर्मानें मनुष्यत्वाचा विकास

वेदाचा सिद्धांत आहे कीं ' **क्रतुमयोऽयं पुरुषः** ' म्हणजे ' हा मनुष्य कर्ममय आहे. ' याचें तात्पर्य असें कीं जो मनुष्य जसें कर्म करतो तशी त्याची स्थिति होते. मनुष्याची उन्नति कर्माधीन आहे म्हणून प्रशस्ततम कर्म करणें मनुष्यास आवश्यक आहे. तें कर्म असें असावें कीं त्यामुळें ऐक्य वाढावें आणि परस्पर विद्रोह-कलह होऊं नये. हा उपदेश या सूक्तांत ' **सव्रताः, संराधयन्तः, सधुराश्चरन्तः, सध्रीचीनान्, एकश्नुष्टीन्** ' वगैरे शब्दांद्वारां मिळतो. वाचकांनीं या महत्त्वाच्या उपदेशाकडे अवश्य लक्ष द्यावें.

अशा प्रकारें या सूक्तांत अत्यंत महत्त्वाचा उपदेश केला आहे. वाचक या उपदेशाचें जितकें जास्त मनन करतील तितका त्यांस अधिक बोध प्राप्त होईल.

राष्ट्राचें पोषण करणारे

कांड ७, सूक्त १०९

(ऋषिः - बादरायणिः । देवता - अग्निः ।)

इदमुग्राय बभ्रवे नमो यो अक्षेषु तनूवशी । घृतेन कलिं शिक्षामि स नो मृडातीदृशे ॥ १ ॥
घृतमप्सराभ्यो वह त्वमग्ने पांसूनक्षेभ्यः सिकता अपश्च ।
यथाभागं हव्यदातिं जुषाणा मदन्ति देवा उभयानि हव्या ॥ २ ॥
अप्सरसः सधमादं मदन्ति हविर्धानमन्तरा सूर्यं च ।
ता मे हस्तौ सं सृजन्तु घृतेन सपत्नं मे कितवं रन्धयन्तु ॥ ३ ॥
आदिनवं प्रतिदीव्ने घृतेनास्माँ अभि क्षर । वृक्षमिवाशन्या जहि यो अस्मान्प्रतिदीव्यति ॥ ४ ॥

अर्थ— (बभ्रवे उग्राय इदं नमः) भरण पोषण करणाऱ्या उग्र वीरास हा नमस्कार असो. (यः अक्षेषु तनू-वशी) जो इंद्रियांच्या विषयांत स्वतःचें शरीर ताब्यांत ठेवणारा आहे, (सः नः ईदृशे मृडाति) तो आम्हांस अशा अवस्थेंत सुख देतो, म्हणून मी (घृतेन कलिं शिक्षामि) स्नेहानें कलहाला वा कलह करणाऱ्यास शिकवितों. [१]

हे अग्ने ! (त्वं अप्-सराभ्यः घृतं वह) तूं पाण्यांत संचार करणाऱ्यांसाठीं तूप घेऊन जा. (अक्षेभ्यः पांसून सिकताः अपः च) डोळ्यांसाठीं धूळ, वाळू यांतून गाळलेलें पाणी मिळव. (यथाभागं हव्यदातिं जुषाणाः देवाः) यथायोग्य प्रमाणांत हव्य भागाचें सेवन करणारे देव (उभयानि हव्या मदन्ति) दोन्हीं प्रकारचे हव्य पदार्थ प्राप्त करून आनंदित होतात. [२]

(सूर्यं च हविर्धानं अन्तरा) सूर्य आणि हविर्द्रव्याच्या पात्रामध्यें जें (सध-मादं) जें बरोबर रहाण्याचें ठिकाण आहे, त्यामध्यें (अप्सरासः मदन्ति) अप्सरा आनंदित होतात. (ताः मे हस्तौ) त्या माझ्या दोन्हीं हातांस (घृतेन संसृजन्तु) तुपानें युक्त करोत आणि (मे कितवं सपत्नं रन्धयन्तु) माझ्या जुगारी (लबाड, कपटी) शत्रूचा नाश करोत. [३]

(प्रतिदीव्ने आ-दिनवं) प्रतिपक्षीयांशीं मी विजयेच्छेनें कडतों. (घृतेन अस्मान् अभिक्षर) तुपानें आम्हांस युक्त कर. (यः अस्मान् प्रतिदीव्यति) जो आम्हांशीं प्रतिपक्षी होऊन व्यवहार करतो, त्याला (अशन्या वृक्षं इव जहि) वीजेनें वृक्षाचा नाश होतो, त्याप्रमाणें नष्ट कर. [४]

भावार्थ— जे राष्ट्राचें भरणपोषण करणारे आहेत त्यांना मी प्रणाम करतों. ते इंद्रियें आणि शरीर यांस आपल्या ताब्यांत ठेवणारे आहेत. तेच सर्वदा सर्व प्रजेला सुख देतात. आमच्यांत आपसांत कलह झाला तर त्यांस मी स्नेहानें शान्त करतों. [१]

पाण्यांत संचार करणाऱ्यांस तूप द्या. डोळ्यासाठीं, धूळ, रेती यांतून गाळून घेतलेलें पाणी वापरा. देवतांस यथायोग्य हवन समर्पण करा, ज्यामुळें सर्व आनंदित होतील. [२]

सूर्य आणि हविर्द्रव्याचीं पात्रें या मध्यें जी जागा आहे, त्यांत सर्वांचें रहाण्याचें स्थान आहे. या स्थानांत मला तूप प्राप्त होवो, आणि जुगाऱ्यांचा (कपटांचा) नाश होवो. [३]

प्रतिपक्षावर मला विजय प्राप्त होवो. आम्हांस पुष्कळ तूप प्राप्त होवो. जो आमचा प्रतिपक्षी असेल त्याचा नाश होवो. [४]

*

यो नो॑ द्यु॒वे धन॑मि॒दं च॒कार॒ यो अ॒क्षाणां॒ ग्लह॑नं॒ शेष॑णं च ।
स नो॑ दे॒वो ह॒विरि॒दं जु॑षा॒णो ग॑न्ध॒र्वेभि॑: सध॒मादं॑ मदेम ॥ ५ ॥
संव॑सव॒ इति॑ वो नाम॒धेय॑मु॒ग्रंप॒श्या रा॑ष्ट्र॒भृतो॒ ह्य१॒क्षाः ।
तेभ्यो॑ व॒ इन्द॑वो ह॒विषा॑ विधेम व॒यं स्या॑म॒ पत॑यो रयी॒णाम् ॥ ६ ॥
दे॒वान्यन्ना॑थि॒तो हु॒वे ब्र॑ह्म॒चर्यं॒ यदू॑षि॒म । अ॒क्षान्यद्ब॒भ्रूना॒लभे॒ ते नो॑ मृडन्त्वी॒दृशे॑ ॥ ७ ॥

अर्थ—(यः नः द्युवे इदं धनं चकार) जो आम्हांस क्रीडादि व्यवहारासाठीं हें धन देतो (यः अक्षाणां ग्रहणं शेषणं च) जो फाशांचे (जुगाराचे) ग्रहण आणि विशेषीकरण करतो (सः देवः इदं नः हविः जुषाणः) तो देव या आमच्या हवीचें सेवन करो आणि आम्हीं (गन्धर्वेभिः सधमादं मदेम) गंधर्वांसह एकाच स्थानीं आनंद करूं. [५]

(सं-वसवः इति वः नामधेयं) 'सम्यक् रीतीनें वास्तव्य करविणारे' असें या अर्थाचें तुमचें नांव आहे. तुम्हीं (उग्रं-पश्याः) उग्र दृष्टीचे आहांत (राष्ट्र-भृतः) राष्ट्राचें भरण पोषण करणारे आहांत आणि (अक्षाः) राष्ट्राचे जणूं काय डोळे आहांत. हे (इन्दवः) ऐश्वर्यवंतानों ! (तेभ्यः वः हविषा विधेम) अशा तुम्हांस आम्हीं हवि समर्पण करीत आहोंत आणि (वयं रयीणां पतयः स्याम) आम्हीं धनाचे स्वामी व्हावें. [६]

(यत् नाथितः देवान् हुवे) जो मीं आशीर्वाद प्राप्त करणारा देवांसाठीं हवन करतों तसेंच (यत् ब्रह्मचर्यं ऊषिम) जें आम्हीं ब्रह्मचर्यव्रताचें पालन केलें आहे. (यत् बभ्रून् अक्षान् आलभे) जो मीं भरण करणाऱ्या अक्षांचा स्वीकार करतों, (ते नः ईदृशे मृडन्तु) ते आम्हांस अशा अवस्थेंत सुखी करो. [७]

भावार्थ— जो आम्हांस व्यवहार करण्यास धन देतो, त्याच्यासह आम्हीं आनंदपूर्वक रहावें. [५]

राष्ट्राचे भरणपोषण करणारे वीर भयंकर उग्र स्वरूपाचे आहेत. त्यामुळें सर्व राष्ट्राचे लोक आपल्या राष्ट्रांत सुखानें राहतात. त्यांस आम्हीं प्रजाजन करभार देतों आणि त्यांच्या व्यवस्थेनें आम्हीं धनाचें स्वामी होऊं. [६]

मी हवन करून देवांचा आशीर्वाद प्राप्त करतों. म्हणूनच मीं ब्रह्मचर्यव्रताचें पालन करतों. जे राष्ट्राचें भरणपोषण करणारे आहेत, त्यांच्या प्रयत्नांनीं आम्हीं सर्व सुखें प्राप्त करतों. [७]

राष्ट्राचा पोषक

हें सूक्त दुर्बोध आहे आणि कित्येक मंत्रभागांचा अर्थ कांहीं स्थानीं येत नाहीं. म्हणून याचा जास्त शोध होणें जरूरीचें आहे. पुष्कळ प्रयत्न करूनहि कांहीं संगतवार अर्थ लागत नाहीं. असें असूनहि या सूक्ताविषयीं जे विचार सुचले ते याखालीं दिले आहेत. ते शोधकांस कांहीं अंशीं उपयुक्त होतील—

राष्ट्रभृत्

यामध्यें 'राष्ट्र-भृत्' किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक, राष्ट्रभृत्य, राष्ट्राचें भरणपोषण करणाऱ्यांचें वर्णन आहे. राष्ट्राचें भरणपोषण करणाऱ्यांस 'राष्ट्र-भृत्' म्हणतात. त्यांचें नांव 'सं-वसवः' (सं-वसु) असें आहे. दुसऱ्यांचें वास्तव्य चांग. ल्या प्रकारें सुखाचें व्हावें म्हणून प्रयत्न करतात त्यांचें हें नांव आहे. ते (उग्रं-पश्याः) उग्र स्वरूपाचे असतात. ज्यांचे स्वरूप उग्र म्हणजे वीरतायुक्त असतें. यांस (अक्षाः) अक्ष सुद्धां म्हणतात. म्हणजे हे राष्ट्राचे डोळे असतात. जणूं काय त्यांच्या डोळ्यांनीं राष्ट्र पहातें. 'अक्ष' याचा दुसरा अर्थ गाडी-च्या दोन्ही चाकांमधील दांडा—आडवें लाकूड असा सुद्धां होतो. हे राष्ट्रभृत्य जणूं काय राष्ट्ररूपी चक्राचे मध्य दण्ड आहेत. यांच्यावरच राष्ट्राचें चक्र फिरतें. 'अक्ष' शब्दाचे दुसरे अर्थ 'आत्मा, ज्ञान, नियम, आधार सूत्र' असे आहेत. वाचक विचार करतील तर त्यांचे ध्यानीं येईल कीं हे अर्थ सुद्धां या विषयांत अन्वर्थक होतात. (मं. ६)

यांस लोकांनीं (तेभ्यः हविषा विधेम) अन्न वगैरे द्यावें. त्यांस राज्यव्यवस्थेसाठीं कारभार द्यावा आणि त्यांच्या

सेवेंत रहावें. (**वयं रयीणां पतयः स्याम**) आम्ही सर्व प्रजाजन त्यामुळें धनधान्याचे स्वामी होऊं. प्रजेनें राज्यव्यवस्थेसाठीं कर द्यावा आणि राष्ट्र सेवकांनीं राष्ट्राची अशी उत्तम सेवा करावी कीं ज्या व्यवस्थेमुळें राष्ट्रांतील सर्व लोक धनधान्यसंपन्न होतील. (मं. ६)

जे (**उग्राय**) उग्रवीर आणि राष्ट्राचे (**बभ्रु**) भरण पोषण करणारे आहेत किंवा जे भुऱ्या अथवा गहुंवर्णाचे आहेत, त्यांना (**इदं नमः**) हा नमस्कार आम्हीं करतों कारण की यांच्यामुळें (**सः नः ईदृशे मृडाति**) आम्हांस या बिकट अवस्थेंत सुद्धां सुख प्राप्त होतें. (**यः अक्षेषु तनूवशी**) जो या राष्ट्राच्या आधारभूत वीरांत आपल्या शरीरास स्वाधीन ठेवणारा आहे तो विशेष प्रभावशाली आहे आणि तोच सर्वांत अधिक योग्य आहे. (मं. १)

आपसांतील भांडणें दूर करण्याचा उपाय

आपसांतील कलहाचें नांव ' **कलि** ' आहे. हा कलि सर्वस्वी नाश करणारा आहे. आपसांतील भांडणामुळें एकाचा दुसऱ्याशीं संघर्ष होतो. या घर्षणानें जो अग्नि उत्पन्न होतो तो दोघांस जाळतो. या दोघांमध्यें कांहीं तेल अथवा तूप (स्नेह) टाकल्यानें घर्षण कमी होतें. यंत्रांत जेथें दोन चाकें एकमेकांवर घासतात तेथें तीं गरम होतात, तेथें तेल घातल्यानें घर्षण कमी होतें आणि तीं तापत नाहींत. कलीस दूर करण्याचा उपाय आहे. (**घृतेन कलिं शिक्षामि**) तुपापासून आपसांतील कलह कमी करण्याचें शिक्षण मिळतें. यंत्रांतील चाकांचें घर्षण असें तुपानें (अथवा तेलानें) कमी होतें तद्वत् दोन मनुष्यांतील अथवा दोन समाजांतील कलह सुद्धां परस्पर स्नेहाच्या वागणुकीनें कमी होऊं शकतात. म्हणून स्नेह (तेल अथवा तूप) संघर्षण कमी करणारें आहे. हा स्नेह वाढविल्यानें आपसांतील कलह दूर होतो. (मं. १)

आपसांतील कलह दूर करण्याचा हा अद्वितीय उपाय आहे. त्यामुळें जसा वैयक्तिक लाभ होतो, त्याचप्रमाणें सामाजिक आणि राष्ट्रीय शांतीचा लाभ होऊं शकतो.

दुसरा मंत्र समजणें कठीण आहे. (मं. २) ' **अप्सरस्** ' शब्दाचा एक अर्थ प्रसिद्ध आहे. त्याशिवाय दुसरा भिन्न अर्थ (**अप्-सरः**) पाण्यांत संचार करणारे किंवा ' **अपस्** ' नांव ' **कर्मा** ' चें आहे. कर्मासह जे संचार करतात ते ' **अप्सरस्** ' म्हटले जातात. हे कर्मचारी (**सधे-मादं मदन्ति**) एकाच स्थानीं राहणें पसंत करतात. कर्मचाऱ्यासाठीं एक चांगलें स्थान असावें. असें स्थान असल्यास सर्वांस आनंद होतो. या सर्वांस तूप भरपूर मिळालें पाहिजे आणि त्याच प्रमाणांत इतरहि खाण्या-पीण्याचे जिन्नस मिळावयास हवेत. म्हणजे कर्मचाऱ्यांची अवस्था उत्तम असली पाहिजे. सर्वांस काम भरपूर असावें आणि खाण्यापीण्यास सुद्धां भरपूर असावें.

(**मे सपत्नं कितवं रन्धयन्तु**) माझा प्रतिपक्षी कपटी जुगारी) नाश पावो. माझा शत्रु नाश पावो आणि जुगारी सुद्धां शिल्लक न राहो. आपसांतील शत्रुत्व जितकें वाईट आहे तितकेंच जुगार खेळणें सुद्धां वाईट आहे. (मं. ३)

(**प्रतिदीव्ने आदिनवं**) प्रतिपक्षी होऊन जर युद्ध करण्यास उभा राहिला तर त्याच्याशीं युद्ध करण्याची माझी तयारी असते; असें प्रत्येक मनुष्यानें म्हणावें. अशी तयारी प्रत्येक मनुष्यानें ठेवावी म्हणजे प्रत्येक मनुष्यानें बलवान् व्हावें, म्हणजे त्यास शत्रूची भीति बाळगण्याचें कांहीं कारण रहाणार नाहीं. (**यः प्रतिदीव्यति जहि**) जो प्रतिपक्षी होऊन युद्ध करण्यास येईल त्याचा नाश कर. ही सर्व सामान्य आज्ञा आहे. शत्रूस दूर करण्याची तयारी प्रत्येकानें केलीच पाहिजे. (मं. ४)

(**यः नः द्युवे धनं चकार**) जो आम्हांस क्रीडादि व्यवहारासाठीं धन देतो, त्याला आम्हीं सुद्धां प्रत्युपकाररूपानें कांहीं द्यावयास हवें. या मंत्रभागांत जे ' **द्युवे, दीव्ने** ' वगैरे शब्द आहेत त्यांत ' **दिव** ' धातु आहे त्याचे अर्थ, ' क्रीडा, विजिगीषा, व्यवहार, द्युति, स्तुति, मोद, मद, स्वप्न, कान्ति, गति, प्रकाश, दान वगैरे आहेत. बहुधा लोके ' **क्रीडा** ' अर्थ घेतात आणि अशा शब्दांचा अर्थ जुगार असा करतात. हे लोक 'विजिगीषा, व्यवहार ' वगैरे अर्थ पहात नाहीं. जर हे अर्थ या मंत्रांत स्वीकारले तर संगत अर्थ करण्यास सहाय्य होईल. याचा जसा क्रीडा अर्थ आहे, त्याचप्रकारें विजयेच्छा व्यवहार असेहि अर्थ आहेतच. हे अर्थ घेतल्यानें ' **यः नः द्युवे धनं चकार** ' या मंत्रभागाचा अर्थ ' जो आमच्या विजयासाठीं आम्हांस धन देतो, जो आमच्या विविध व्यवहारांसाठीं धन देतो ' वगैरे अर्थ होऊं शकतील आणि हे अर्थ पुष्कळ बोधप्रद आहेत. जो व्यवहारासाठीं धन देईल त्यास प्रत्युपकारासाठीं आम्हीं सुद्धां लाभाचा कांहीं भाग देऊं. (मं. ५)

आम्ही (**ब्रह्मचर्यं ऊषिम**) ब्रह्मचर्याचें पालन करावें, वीर्याचा नाश करूं नये आणि लोकांचे (**नाथितः**) आशीर्वाद प्राप्त करावे, त्यामुळें आमचें कल्याण होईल. (मं. ६)

हें सूक्त फार कठीण आहे. तथापि हे कांहीं सूचक विचार आहेत. ते या सूक्ताविषयीं जास्त शोध होण्यास उपयुक्त होतील.

बाह्यशक्तींशीं अन्तःशक्तींचा संबंध

कांड ६, सूक्त १०

(ऋषिः – शन्तातिः । देवता – नानादेवताः, अग्निः, वायुः, सूर्यः ।)

पृथिव्यै श्रोत्राय वनस्पतिभ्योऽग्नयेऽधिपतये स्वाहा ॥ १ ॥
प्राणायान्तरिक्षाय वयोभ्यो वायवेऽधिपतये स्वाहा ॥ २ ॥
दिवे चक्षुषे नक्षत्रेभ्यः सूर्यायाधिपतये स्वाहा ॥ ३ ॥

अर्थ— पृथ्वी, (**श्रोत्राय**) कान, वनस्पति तसेंच पृथ्वीचे अधिपति, अग्नीसाठीं (स्व–आह) प्रशंसा करतात, [१] अन्तरिक्ष, प्राण, (**वयोभ्यः**) पक्षी तसेंच अन्तरिक्षाचे अधिपति वायु वगैरेंसाठीं आमची स्तुति असो. [२] द्युलोक, डोळे, नक्षत्र आणि द्युलोकाचे अधिपति सूर्य वगैरेंचो मीं प्रशंसा करतों. [३]

या सूक्तांत बाह्यसृष्टीशीं व्यक्तीच्या आंतरिक शक्तींच्या संबंध दाखविला आहे—

बाह्यलोक	त्यांत प्राप्त पदार्थ	लोकाधिपति	व्यक्तीच्या शरीरांतील इंद्रियें
पृथ्वी	वनस्पति	अग्नि	कान (शब्दग्रहण)
अन्तरिक्ष	पक्षी	वायु	प्राण
द्युलोक	नक्षत्र	सूर्य	डोळे (दृष्टि)

याप्रमाणें व्यक्तींच्या इंद्रियांचा बाह्य जगांतील लोकांशीं आणि देवांशीं संबंध आहे. हा संबंध जाणून सूर्यप्रकाशानें डोळ्यांची, शुद्ध, वायूनें प्राणाची आणि अग्नीनें कानाची (म्हणजे ऐकण्याची) शक्ति वाढवावी. येथें अग्नीशीं श्रवणशक्तीचा संबंध दर्शविला आहे, ह्याविषयीं शोध व्हावयास हवा.

रुद्रदेव

कांड ११, सूक्त २

(ऋषिः – अथर्वा । देवता – भव–शर्व–रुद्राः ।)

भवाशर्वौ मृडतं माभि यातं भूतपती पशुपती नमो वाम् ।
प्रतिहितामायतां मा वि स्राष्टं मा नो हिंसिष्टं द्विपदो मा चतुष्पदः ॥ १ ॥

अर्थ— हे (**भवाशर्वौ**) भव आणि शर्व हो ! हे उत्पादक आणि संहारकहो ! तुम्ही दोघे (**मृडतं**) आम्हां सर्वांस सुखी करा. (**मा अभियातं**) आम्हांवर हल्ला करूं नका. तुम्हीं दोघेहि (**भूतपती, पशुपती**) भूतांचे पालक व पशूंचे पालक आहांत. (**वां नमः**) तुम्हां दोघांस नमस्कार असो. (**प्रतिहितां आयतां मा वि स्राष्टं**) धनुष्यावर ठेऊन खेचलेला बाण आमच्यावर सोडूं नका; (**नः द्विपदः चतुष्पदः मा हिंसिष्टं**) आमच्या दोन पायांची (कुटुंबांतील मनुष्यांची) आणि चतुष्पादांची (जनावरांची) हिंसा करूं नका. [१]

शुने क्रोष्ट्रे मा शरीराणि कर्तमलिक्लवेभ्यो गृध्रेभ्यो ये च कृष्णा अविष्यवः ।
मक्षिकास्ते पशुपते वयांसि ते विघसे मा विदन्त ॥ २ ॥
क्रन्दाय ते प्राणाय याश्च ते भव रोपयः नमस्ते रुद्र कृण्मः सहस्राक्षायामर्त्य ॥ ३ ॥
पुरस्तात्ते नमः कृण्म उत्तरादधरादुत । अभीवर्गाद्दिवस्पर्यन्तरिक्षाय ते नमः ॥ ४ ॥
मुखाय ते पशुपते यानि चक्षूंषि ते भव । त्वचे रूपाय संदृशे प्रतीचीनाय ते नमः ॥ ५ ॥
अङ्गेभ्यस्त उदराय जिह्वाया आस्याय ते । दद्भ्यो गन्धाय ते नमः ॥ ६ ॥
अस्त्रा नीलशिखण्डेन सहस्राक्षेण वाजिना । रुद्रेणार्धकघातिना तेन मा समरामहि ॥ ७ ॥
स नो भवः परि वृणक्तु विश्वत आप इवाग्निः परि वृणक्तु नो भवः ।
मा नोऽभि मांस्त नमो अस्त्वस्मै ॥ ८ ॥
चतुर्नमो अष्टकृत्वो भवाय दश कृत्वः पशुपते नमस्ते ।
तवेमे पञ्च पशवो विभक्ता गावो अश्वाः पुरुषा अजावयः ॥ ९ ॥

अर्थ– जे (कृष्णाः अविष्यवः) काळे आणि हिंसक कृमि आहेत, त्यांच्यासाठीं (शुने क्रोष्ट्रे) कुत्रे आणि कोल्ह्यां-साठीं (अलिक्लवेभ्यः गृध्रेभ्यः) क्रूर शब्द करणाऱ्या गिधाडांसाठीं (शरीराणि मा कर्त) शरीरांस कापूं नका. हे (पशुपते) पशूंच्या पालका! (ते मक्षिकाः ते वयांसि) तुझ्या माशा आणि कावळे (विघसे मा विदन्त) त्या कापलेल्या शरीरास खाण्यास प्राप्त न होवोत, म्हणजे तुम्हीं आमच्या शरीराचा अशा प्रकारें नाश करूं नका. [२]

हे (भव) सर्वांस उत्पन्न करणाऱ्या देवा! (ते क्रन्दाय प्राणाय) तुझ्या शब्दरूपी प्राणास नमस्कार असो. (ते याः रोपयः) तुझा जो शक्तिप्रभाव आहे, हे (अमर्त्य रुद्र) अमर रुद्रदेवा ! (सहस्राक्षाय ते नमः कृण्मः) सहस्र डोळयांच्या तुला देवास माझे नमस्कार असोत. [३]

(ते पुरस्तात् उत्तरात् उत अधरात् नमः कृण्मः) तुला पुढून, वरून, खालून नमस्कार करतों. (अभी-वर्गात् दिवः परि अन्तरिक्षाय ते नमः) सर्व बाजूंनीं द्युलोक आणि अंतरिक्षलोकरूपी तुझ्या स्वरूपास नमस्कार असो. [४]

हे पशुपते ! हे भव ! (ते मुखाय नमः) तुझ्या मुखास नमस्कार असो. (यानि ते चक्षूंषि) जे तुझे डोळे आहेत त्यांस नमस्कार असो. तुझ्या (त्वचे रूपाय संदृशे प्रतीचीनाय नमः) त्वचारूप, दर्शन आणि पृष्ठभागास नमस्कार असो. [५]

(ते अंगेभ्यः उदाराय जिह्वायै आस्याय) तुझ्या अंगांस, अवयवांस, उदर, जिह्वा आणि मुखास नमस्कार असो. (ते दद्भ्यः गंधाय नमः) तुझ्या दांतास आणि वासास नमस्कार असो. [६]

(नीलशिखण्डेन वाजिना अस्त्रा) नीळया रंगाची शेंडी असणाऱ्या बलवान् अस्त्रानें (सहस्राक्षेण अर्ध-कघातिना रुद्रेण) हजारों डोळयांच्या सर्व विनाशक रुद्राच्या (मा समरामहि) आम्हीं कधीं विरुद्ध होणार नाहीं. [७]

(सः भवः विश्वतः नः परिवृणक्तु) उत्पत्तिकर्ता आम्हांस घेरून ठेवो. (आपः इव अग्निः) पाणी ज्या-प्रमाणें अग्नीला घेरून टाकतें, त्याप्रमाणें (भवः नः परिवृणक्त) उत्पत्तिकर्ता आम्हांस घेरून टाको. (नः मा अभि मांस्त) आम्हांस नष्ट न करो. (असै नमः अस्तु) त्याला नमस्कार असो. [८]

हे पशुपते ! (भवाय चतुः अष्टकृत्वः नमः) उत्पत्ति करणाऱ्या देवाला चार वेळां तसेंच आठ वेळां नमस्कार असो. (ते दशकृत्वः नमः) तुला दहा वेळां नमस्कार असो. (इमे पंच पशवः तव विभक्ताः) हे पांच पशु तुझ्या-साठीं ठेवले आहेत. (गावः) गाई, (अश्वाः) घोडे, (पुरुषाः) पुरुष, (अजावयः) बकऱ्या आणि मेंढ्या ठेवल्या आहेत. [९]

तव चतस्रः प्रदिशस्तव द्यौस्तव पृथिवी तवेदमुग्रोर्वऽन्तरिक्षम् ।
तवेदं सर्वमात्मन्वद्यत्प्राणत्पृथिवीमनु ॥ १० ॥
स कोशो वसुधानस्तवायं यस्मिन्निमा विश्वा भुवनान्यन्तः ।
नो मृड पशुपते नमस्ते परः क्रोष्टारो अभिभाः श्वानः परो यन्त्वघरुदो विकेश्यः ॥ ११ ॥
धनुर्बिभर्षि हरितं हिरण्ययं सहस्रघ्नि शतवधं शिखण्डिनम् ।
रुद्रस्येषुश्चरति देवहेतिस्तस्यै नमो यतमस्यां दिशीऽतः ॥ १२ ॥
योऽभियातो निलयते त्वां रुद्र निचिकीर्षति । पश्चादनुप्रयुङ्क्षे तं विद्धस्य पदनीरिव ॥ १३ ॥
भवारुद्रौ सयुजा संविदानावुभावुग्रौ चरतो वीर्याय । ताभ्यां नमो यतमस्यां दिशीऽतः ॥ १४ ॥
नमस्तेऽस्त्वायते नमो अस्तु परायते । नमस्ते रुद्र तिष्ठत आसीनायोत ते नमः ॥ १५ ॥
नमः सायं नमः प्रातर्नमो रात्र्या नमो दिवा । भवाय च शर्वाय चोभाभ्यामकरं नमः ॥ १६ ॥

अर्थ— (तव चतस्रः प्रदिशः) तुझ्या या चारी दिशा आहेत (तव द्यौः, तव पृथिवी) तुझे द्युलोक आणि पृथ्वीलोक आहेत. (तव इदं उग्र उरु अंतरिक्षं) तुझें हें अत्यंत तेजस्वी महान् अंतरिक्ष आहे. (इदं सर्वं आत्मन्वत् तव) हें सर्व तुझेंच चेतनायुक्त आहे. (यत् पृथिवीं अनु प्राणत्) जो पृथ्वीवर जीव धारण करतो, तें सर्व तुझेंच आहे. [१०]

(यस्मिन् इमा विश्वा भुवनानि अन्तः) ज्यामध्यें हीं सर्व भुवनें आहेत, हें (वसुधानः अयं उरुः कोशः) वसूंचें निवासस्थानरूप हा विश्वरूपी मोठा कोश (तव) तुझाच आहे. हे (पशुपते) पशुपालका ! (सः मृड, ते नमः) असा तूं आम्हांस सुख दे, तुला नमस्कार असो. (क्रोष्टारः अभिभाः श्वानः परः) कोल्हे, कुत्रे वगैरे सर्व दूर होवोत. (अघरुदः विकेश्यः) वाईट स्वरांनीं रडणाऱ्या, केस विसकटून ओरडणाऱ्या स्त्रिया दूर होवोत. म्हणजे असे शोकाचे प्रसंग आम्हांजवळ न येवोत. [११]

हे (शिखंडिन्) कलगी (शेंडी) धारण करणाऱ्या तूं (सहस्रघ्नि शतवधं हिरण्ययं हरितं धनुः बिभर्षि) हजारोंचा नाश करणारें, शेंकडोंचा वध करणारें सुवर्णाचें धनुष्य धारण करतोस (रुद्रस्य इषुः देवहेतिः चरति) रुद्राचा बाण देवांचें शस्त्र संचार करीत आहे. तें (इत यतमस्यां दिशि) ज्या दिशेस असेल (तस्यै नमः) त्याला नमस्कार असो. [१२]

हे रुद्रा ! (यः अभियातः निलयते) जो हल्ला झाला असतां लपून जातो आणि (त्वां नि चिकीर्षति) तुला खालीं पहावयास लावूं इच्छितो, (विद्धस्य पदनीः इव) घायाळ झालेल्याच्या पावलें टाकण्याप्रमाणें (तं पश्चात् अनु प्रयुंक्षे) त्याचा तूं पाठीमागून सूड घेतोस. [१३]

(भवारुद्रौ सयुजौ संविदानौ) उत्पत्ति करणारा आणि संहार करणारा हे दोघे देव मिळून रहाणारे ज्ञानी आहेत. (उभौ उग्रौ वीर्याय चरतः) हे दोघे तेजस्वी पराक्रमासाठीं हिंडतात, (इतः यतमस्यां दिशि) ते येथून ज्या दिशेस असतील तेथें (ताभ्यां नमः) त्या दोघांस नमस्कार असो. [१४]

हे रुद्रा ! (आयते परायते तिष्ठते आसीनाय) येणारे, जाणारे, थांबणारे आणि बसणारे (ते नमः) तुम्हांस नमस्कार असो. [१५]

(सायं प्रातः रात्र्याः दिवा नमः) संध्याकाळीं, रात्रीं दिवसा त्यांना नमस्कार असो. (भवाय शर्वाय च उभाभ्यां नमः अकरं) भव आणि शर्व या दोघांस नमस्कार करतों. [१६]

सहस्राक्षमतिपश्यं पुरस्ताद्रुद्रमस्यन्तं बहुधा विपश्चितम् । मोपाराम जिह्वयेयमानम् ॥ १७ ॥
श्यावाश्वं कृष्णमसितं मृणन्तं भीमं रथं केशिनः पादयन्तम् । पूर्वे प्रतीमो नमो अस्त्वस्मै ॥ १८ ॥
मा नोऽभि स्रा मत्यं देवहेतिं मा नः क्रुधः पशुपते नमस्ते ।
अन्यत्रास्मद्दिव्यां शाखां वि धूनु ॥ १९ ॥
मा नो हिंसीरधि नो ब्रूहि परि णो वृङ्ग्धि मा क्रुधः । मा त्वया समरामहि ॥ २० ॥
मा नो गोषु पुरुषेषु मा गृधो नो अजाविषु । अन्यत्रोग्र वि वर्तय पियारूणां प्रजां जहि ॥ २१ ॥
यस्य तक्मा कासिका हेतिरेकमश्वस्येव वृषणः क्रन्द एति ।
अभिपूर्वं निर्णयते नमो अस्त्वस्मै ॥ २२ ॥
योऽन्तरिक्षे तिष्ठति विष्टभितोऽयज्वनः प्रमृणन्देवपीयून् । तस्मै नमो दशभिः शक्वरीभिः ॥ २३ ॥
तुभ्यमारण्याः पशवो मृगा वने हिता हंसाः सुपर्णाः शकुना वयांसि ।
तव यक्षं पशुपते अप्स्व१न्तस्तुभ्यं क्षरन्ति दिव्या आपो वृधे ॥ २४ ॥

अर्थ— (सहस्राक्षं विपश्चितं बहुधा अस्यन्तं रुद्रं) सहस्रनेत्र ज्ञानी पुष्कळ प्रकारचीं शस्त्रें फेंकणाऱ्या रुद्रास (पुरस्तात् अति पश्यं) पुढें मीं पाहतों. (ईयमानं जिह्वया मा उपाराम) त्या गतियुक्ताला आम्हीं आमच्या जिह्वेनें भर्षित करतों. [१७]

(श्यावाश्वं कृष्णं असितं मृणन्तं) अश्वयुक्त, आकर्षक, बंधनरहित, सुखदायक (भीमं केशिनः रथं पादयन्तं) किरणांनीं युक्त अशांच्या महान् रथास सुद्धां हारविणारे (पूर्वे प्रतीमः) प्रथम प्राप्त करतात आणि (अस्मै नमः अस्तु) याला नमस्कार असो. [१८]

हे पशुपते ! (मत्यं देवहेतिं नः मा अभिस्राः) जाणूनबुजून फेंकलेलें देवांचें शस्त्र आमच्यापाशीं न येवो. (नः मा क्रुधः ते नमः) आमच्यावर रागावूं नकोस, तुला नमस्कार असो. (अस्मत् अन्यत्र दिव्यां शाखां विधूनु) आम्हांपासून दूर दिव्यशाखेला टाक. [१९]

(नः मा हिंसीः) आमची हिंसा करूं नकोस, (नः अधि ब्रूहि) आम्हांस उपदेश कर, (नः परिवृङ्ग्धि) आमचें रक्षण कर, (मा क्रुधः) क्रोध करूं नकोस (त्वया मा समरामहि) तुझ्यापाशीं आम्हीं विरोध करणार नाहीं.[२०]

हे (उग्र) उग्रवीरा ! (न गोषु पुरुषेषु अजाविषु मा गृधः) आमच्या गाई, मनुष्य, बकऱ्या, मेंढ्या वगैरे विषयीं लोभ करूं नकोस. (अन्यत्र विवर्तय) भयास दुसऱ्या स्थानीं घेऊन जा. (पियारूणां प्रजां जहि) हिंसकांच्या प्रजेचा नाश कर. [२१]

(यस्य तक्मा कासिका हेतिः) ज्याचीं हत्यारें क्षय आणि खोकला आहे, (वृषणः अश्वस्य क्रन्दः इव एकं एति) बलवान् घोड्याच्या खिंकाळण्याप्रमाणें निःसंशय एकाच पुरुषावर ज्याचें हत्यार जातें (पडतें), (अभि पूर्वं निर्णयते) जो प्रथमच निश्चय करतो (अस्मै नमः अस्तु) त्याला नमस्कार असो. [२२]

(यः अंतरिक्षे विष्टभितः तिष्ठति) जो अंतरिक्षांत स्थिर रहातो आणि (अयज्वनः देवपीयून् प्रमृणन्) यज्ञ न करणाऱ्या देवांच्या द्वेषीयांचा नाश करतो, (तस्मै दशभिः शक्वरीभिः नमः) त्याला दहा शक्तींनीं आमचा नमस्कार असो. [२३]

(आरण्याः पशवः वने हिताः मृगाः) अरण्यांत उत्पन्न झालेले जंगलांत रहाणारे मृग इत्यादि पशु तसेंच (हंसाः सुपर्णाः शकुना वयांसि तुभ्यं) हंस, गरुड, शकुनि आणि इतर पक्षि समुदाय सर्व तुझेच आहेत. हे पशुपते ! (तव यक्षं अप्सु अन्तः) तुझा पूज्य आत्मा पाण्यांत आहे, (तुभ्यं दिव्यः आपः वृधे क्षरन्ति) तुझ्यासाठीं दिव्य जलें अभिनंदन देण्यास उंचावरून खालीं पडतात. [२४]

शिंशुमारा अजगराः पुरीकया जषा मत्स्या रजसा येभ्यो अस्यसि ।
न ते दूरं न परिष्ठास्ति ते भव सद्यः सर्वान्परि पश्यसि भूमिं पूर्वस्माद्धंस्युत्तरस्मिन्समुद्रे ॥ २५ ॥
मा नो रुद्र तक्मना मा विषेण मा नः सं स्रा दिव्येनाग्निना । अन्यत्रास्मद्विद्युतं पातयैताम् ॥२६॥
भवो दिवो भव ईशे पृथिव्या भव आ पप्र उर्व१न्तरिक्षम् । तस्मै नमो यतमस्यां दिशी३तः ॥२७॥
भव राजन्यजमानाय मृड पशूनां हि पशुपतिर्बभूथ ।
यः श्रद्दधाति सन्ति देवा इति चतुष्पदे द्विपदेऽस्य मृड ॥ २८ ॥
मा नो महान्तमुत मा नो अर्भकं मा नो वहन्तमुत मा नो वक्ष्यतः ।
मा नो हिंसीः पितरं मातरं च स्वां तन्वं रुद्र मा रीरिषो नः ॥ २९ ॥
रुद्रस्यैलबकारेभ्योऽसंसूक्तगिलेभ्यः । इदं महास्येभ्यः श्वभ्यो अकरं नमः ॥ ३० ॥
नमस्ते घोषिणीभ्यो नमस्ते केशिनीभ्यः । नमो नमस्कृताभ्यो नमः संभुञ्जतीभ्यः ॥
नमस्ते देव सेनाभ्यः स्वस्ति नो अभयं च नः ॥ ३१ ॥

अर्थ- (शिंशुमाराः अजगराः पुरीकयाः) मगर, अजगर, कांसव, (जषाः मत्स्याः रजसा येभ्यः अस्यसि) मासे आणि जलचर, मलीन प्राणि ज्यांच्यावर तूं बाण फेंकतोस, त्यांपैकीं (न ते दूरं, न ते परिष्ठाः) कोणी दूर नाहीं, कोणी तुझ्याशिवाय इतर स्थानीं नाहींत, तूं तर (सर्वान् सद्यः परिपश्यसि) सर्वांसच एकाचवेळीं पाहूं शकतोस आणि (पूर्वस्मात् उत्तरस्मिन् समुद्रे भूमिं हंसि) पूर्वेपासून उत्तरेपर्यंतच्या समुद्रापर्यंत व्यापलेल्या भूमीवर आघात करतोस. [२५]

हे रुद्रा ! (तक्मना नः मा संस्राः) तापानें आम्हांस पीडा देऊं नकोस, (विषेण मा) विषबाधा आम्हांस न होवो, (दिव्येन अग्निना मा) दिव्य अग्नीपासून कष्ट न होवोत. (अस्मात् अन्यत्र एतां विद्युतं पातय) आम्हां-पासून दूर इतर कुठल्याहि ठिकाणीं ही वीज पाड. [२६]

(भवः दिवः ईशे) भव द्युलोकाचा ईश्वर आहे. (भवः पृथिव्याः) भव पृथ्वीचा स्वामी आहे. (भवः उरु अन्तरिक्षं आपप्रे) भव महान् अंतरिक्षांत व्यापक आहे. तो (इतः यतमस्यां दिशि तस्मै नमः) येथून ज्या दिशेस असेल तेथें त्यास आमचा नमस्कार असो. [२७]

हे (राजन् भव) उत्पत्ति करणाऱ्या देवराजा ! (यजमानाय मृड) यजमानास सुखी कर, (पशूनां पशु-पतिः हि बभूव) तूं पशूंचा स्वामी हो. (यः श्रद् दधाति) जो श्रद्धा ठेवतो, (देवाः सन्ति इति) देवता आहेत असें जो मानतो, (अस्य द्विपदे चतुष्पदे मृड) त्याच्या दोन पायांच्या (कुटुंबांतील मनुष्यांस) चार पायांच्या (जनावरांस) सुखी कर. [२८]

(नः महान्तं मा हिंसीः) आमच्या वडिल पुरुषांची हिंसा करूं नकोस, (नः अर्भकं मा) आमच्या मुलां-लेकरांची हिंसा करूं नकोस, (नः वहन्तं मा) आमच्या समर्थ पुरुषांची हिंसा तूं करूं नकोस, (नः वक्ष्यतः मा) आम्हांपैकीं बलवान् होणाऱ्यांची हिंसा तूं करूं नकोस. (नः पितरं मातरं च मा हिंसीः) आमच्या मातापित्यांची हिंसा करूं नकोस. हे रुद्रा ! (नः स्वां तन्वं मा रीरिषः) आमच्या शरीरास दुःखी करूं नको. [२९]

(रुद्रस्य ऐलबकारेभ्यः असंसूक्तगिलेभ्यः) रुद्राचे भयजनक आणि अस्पष्ट शब्द करणारे (महास्येभ्यः श्वभ्यः) मोठ्या तोंडाच्या कुत्र्यांना (इदं नमः अकरं) हा नमस्कार करतों. [३०]

हे देवा ! (ते घोषिणीभ्यः केशिनीभ्यः) तुझ्या मोठ्या अवाजानें जयजयकार करणाऱ्या केंस वाढविणाऱ्या, (नमस्कृताभ्यः संभुञ्जतीभ्यः) नमस्कारांनीं संस्कृत आणि उत्तम अन्नभक्षण करणाऱ्या, (ते सेनाभ्यः नमः) तुझ्या सेनेस नमस्कार असो, (नः स्वस्ति अभयं च) आमचें कल्याण होवो व आम्हांस निर्भयता प्राप्त होवो. [३१]

रुद्रदेव

भव आणि शर्व यांच्या सूक्ताचा आशय

हें सूक्त भव आणि शर्व या देवतांच्या वर्णनपर आहे. कोणी असें समजूं नये की भव आणि शर्व या देवता वेगवेगळ्या आहेत. '**भवाशर्वौ**' असा द्विवचनी प्रयोग आहे. असें असून सुद्धा एकाच देवतेचे हे दोन्ही गुण आहेत. सर्व विश्व व्यापणारी ही एकच देवता आहे. ही देवता सृष्टीची उत्पत्ति करते म्हणून तिचें नाव '**भव**' आहे आणि तीच सर्वांचा संहार करते म्हणून त्या देवतेचें नांव '**शर्व**' आहे.

पुराणांत सुद्धां भव आणि शर्व हीं नांवें एकाच रुद्रदेवतेची आहेत. तीच गोष्ट वेदांत येथें आणि अन्यत्रहि जेथें जेथें भव आणि शर्व इत्यादि नांवें येतात तेथेंहि असाच अर्थ समजणें योग्य होईल. या सूक्तांत रुद्र, भव, शर्व, पशुपति इत्यादि शब्द आले आहेत. ते सर्व एकाच परमेश्वराचे वाचक आहेत.

पहिल्या मंत्रांत या देवतांच्या दोन गुणांचें स्मरण केलें आहे. यावरून आपणांस सूचना मिळते कीं दोन गुणामुळें जर एकच देवतेचे दोन देव मानले जातात तर अनेक गुणांमुळें एकाच ईश्वराच्या अनेक देवता मानणें संभवनीय आहे. वैदिक-धर्मांत अनेक देवतांची कल्पना याप्रकारें एकाच परमात्म्यावर अधिष्ठित आहे. एकाच ईश्वराच्या अनेक गुणांमुळें अनेक देवता मानल्या गेल्या.

ईश्वराच्या मारक गुणास येथें शर्व म्हटलें आहे. ही देवता आपल्या मारक हिंसक अथवा विनाशक कार्यांची सिद्धि ज्या साधनांनीं करते त्या शस्त्रांचीं नांवें या सूक्तांतील अनेक मंत्रांत आलीं आहेत— कुत्रे, कोल्हे, गिधाडें, माशा, कावळे, अस्त्र, शस्त्र, धनुष्यबाण, विद्युत्, अग्नि, ज्वर, क्षय हीं मारण-साधनें आहेत. माशांस रुद्राच्या विनाशक साधनांत गणलें आहे ही गोष्ट वाचकांनीं विशेष लक्षांत घ्यावी. माशांमुळें अनेक रोग प्रसरतात आणि प्राण्यांचा संहार होतो, म्हणून रोगांपासून सुरक्षित होण्या-साठीं सर्वत्र स्वच्छता केली पाहिजे, म्हणजे माशा होणार नाहींत आणि मनुष्य रोगांपासून सुरक्षित राहील. असेंच इतर मारण-साधनांविषयीं समजलें पाहिजे. (मं. २ पहा)

यापुढें ७ व्या मंत्रापर्यंत रुद्राच्या प्रत्यंगाला नमस्कार केला आहे. हा एक मृत्युदेवतेच्या उपासनेचा प्रकार आहे. सातव्या मंत्रांत रुद्राशीं विरोध न व्हावा अशी इच्छा प्रगट केली आहे. असाच भाव पुढील कित्येक मंत्रांत सुद्धां आहे. (**मा सम-रामहि**) हेंच शब्द पुढेंहि कित्येक मंत्रांत पुनः पुनः आले आहेत.

नवव्या मंत्रांत अनेकवार रुद्रास नमन केलें आहे. दहाव्या मंत्रांत या रुद्रदेवतेच्या आधीन हें सर्व विश्व आहे हें सांगितलें आहे. या कथनावरून विश्वनियामक देवच तारणभावानें येथें रुद्र नांवानें उल्लेखिला आहे ही गोष्ट स्पष्ट होते. कारण कीं सर्व विश्वाचा नियंता देव एकच आहे.

चौदाव्या मंत्रांत भव आणि शर्व हीं दोन नांवें पुनः आलीं आहेत. येथें द्विवचनी उल्लेख असल्यानें हे दोन देव परस्पर भिन्न वाटतात. अशी कित्येकांस शंका होऊं शकते, परंतु हे दोन देव गुणानें भिन्न परंतु स्वरूपतः एकच आहेत. हें विवरण या पूर्वी केलें आहेच. नंतर १९ व्या मंत्रापर्यंत रुद्र देवासच नमन आहे. नंतर तीन मंत्रांत मृत्यूस दूर करण्याची प्रार्थना आहे.

तेविसाव्या मंत्रांत रुद्रदेवता हें अंतरिक्ष व्यापतें, हें सांगून ती देव विरोधीयांचा नाश करते हेंहि सांगितलें आहे. हें वर्णन निःसंदेह सर्वव्यापक देवाचेंच आहे. पुढील दोन मंत्रांत सर्व प्राणी त्याच एका देवाच्या आधारानें रहातात, हा देव सर्वांस समदृष्टीनें पहातो आणि विघातक शत्रूंचा नाश करतो इत्यादि वर्णन पहाण्यासारखें आहे.

सत्तावीसाव्या मंत्रांत हा देव संपूर्ण स्थिरचर जगाचा ईश आहे हें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. हा मंत्र वाचला असतां संपूर्ण विश्वाचा प्रभू एकच आहे या गोष्टीविषयीं कांहीं संदेह रहात नाहीं. पुढील मंत्रांत हा देव (**भव**) विश्वाचा राजा आहे असें सांगितलें आहे. त्याच्याशिवाय इतर (**देवाः सन्ति**) दैवीशक्ति या जगांत कार्य करीत आहेत असें जो (**यः श्रद्धधति**) श्रद्धापूर्वक मानतो, तो सुखी होतो हें कथन विशेष महत्त्वाचें आहे. या जगाचा प्रभू एकच परंतु त्याच्या अनेक शक्त्या या विश्वांत कार्य करीत आहेत. वाचकांस ही कल्पना जर चांगल्या-प्रकारें ठसावली तर मनुष्य दिव्य होऊन जाण्याविषयीं कांहीं संदेह रहाणार नाहीं.

नंतरच्या मंत्रांत सर्व साधारण निर्भयतेविषयीं प्रार्थना आहे. अशाप्रकारचा या सूक्ताचा आशय आहे.

*

यज्ञ

कांड ७, सूक्त ९७

(ऋषिः - अथर्वा । देवता - इन्द्राग्नी ।)

यद॒द्य त्वा॑ प्रय॒ति य॒ज्ञे अ॒स्मिन्होत॑श्चिकित्व॒न्नवृ॑णीमही॒ह ।
ध्रु॒वम॑यो ध्रु॒वमु॒ता श॑विष्ठ प्रवि॒द्वान्य॒ज्ञमुप॑ याहि॒ सोम॑म् ॥ १ ॥
समि॑न्द्र नो॒ मन॑सा नेष॒ गोभि॒ः सं सू॒रिभि॑र्हरिव॒न्त्सं स्व॒स्त्या ।
सं ब्रह्म॑णा दे॒वहि॑तं॒ यदस्ति॒ सं दे॒वानां॑ सुम॒तौ य॒ज्ञिया॑नाम् ॥ २ ॥
याना॑वह उश॒तो दे॑व दे॒वांस्तान्प्रेर॑य॒ स्वे अ॑ग्ने स॒धस्थे॑ ।
ज॒क्षि॒वांस॑ः पपि॒वांसो॒ मधू॒न्यस्मै॑ धत्त वसवो॒ वसू॑नि ॥ ३ ॥
सु॒गा वो॑ देवा॒ः सद॑ना अकर्म॒ य आ॑ज॒ग्म सव॑ने मा जुषा॒णाः ।
वह॑माना॒ भर॑माणा॒ः स्वा वसू॑नि॒ वसुं॑ घ॒र्मं दिव॒मा रो॑हता॒नु ॥ ४ ॥

अर्थ— हे (चिकित्वन् होतः) ज्ञानी हवनकर्त्या ! (यत् अद्य इह) जें आज येथें (अस्मिन् प्रयति यज्ञे) या प्रयत्नपूर्वक करण्यायोग्य यज्ञांत आम्ही (त्वा अवृणीमहि) तुला स्वीकारीत आहोंत, हे (शविष्ठ) बलिष्ठा ! तूं (ध्रुवं अयः) स्थिरतेनें ये. (उत ध्रुवं यज्ञं प्रविद्वान्) आणि स्थिर यज्ञास जाणणारा तूं (सोमं उप याहि) सोमा-जवळ जा. [१]

हे (हरिवन् इन्द्र) किरणयुक्त तेजस्वी प्रभो ! (नः मनसा गोभिः सं) आम्हांस मनानें गाईंनीं युक्त कर, (सूरिभिः सं) विद्वानांनीं युक्त कर, (स्वस्त्या सं) कल्याणयुक्त कर आणि (नेष) घेऊन जा. (यत् देवहित अस्ति) जो देवांचा हितकारी आहे त्याला (ब्रह्मणा सं) ज्ञानानें युक्त कर. तसेंच (यज्ञियानां देवानां सुमतौ सं) पूजनीय देवांच्या उत्तम मतींत आम्हांस घेऊन चल. [२]

हे अग्निदेवा ! (यान् उशतः देवान्) ज्या अभिलाषा करणाऱ्या देवांना (आ अवहः) येथें घेऊन आला होतास (तान् स्वे सधस्थे प्रेरय) त्यांस आपल्या स्व स्थानीं प्रेरित कर. हे (वसवः) वसुदेवांनो ! (जक्षिवांसः) अन्न खात आणि (मधूनि पपिवांसः) मधुर रस पीत आमच्यासाठीं (वसूनि धत्त) धनाचें प्रदान करा. [३]

हे (देवाः) देव हो ! (वः सु-गा सदना अकर्म) तुम्हांसाठीं उत्तम रहाण्यास योग्य घर तयार केलीं. (सवने मा जुषाणाः आजग्म) यज्ञांत तुम्हीं माझ्या दानाचा स्वीकार करीत आलांत, आतां (स्वा वसूनि वह-मानाः वसुं भरमाणाः) आपल्या धनास धारण करीत आणि आमच्यासाठीं धन धारण करणारे तुम्हीं सर्व (घर्मं दिवं अनु आरोहत) प्रकाशमान द्युलोकांत जा. [४]

भावार्थ— हे ज्ञानी होतागण हो ! मीं तुम्हांस या यज्ञांत आचार्यपद दिलें आहे, हा यज्ञ उत्तम विधिपूर्वक करा. स्थिर चित्तानें रहा आणि शांतीनें यज्ञ समाप्त करा. [१]

हे देवा ! आम्हांस गाई द्या, ज्ञान्यांची संगति द्या, आमचें सर्व प्रकारें हित करा. जें कल्याणकारक ज्ञान आहे तें मला द्या, सर्व सज्जनांचें मन मजविषयीं उत्तम व्हावें. [२]

अग्नि या यज्ञांत सर्व देवांस आणतो आणि पुनः स्वस्थानीं परत पोहोंचवितो. सर्व देव येथें येवोत, अन्न खावोत, सोमरस पीवोत आणि आम्हांस धन देवोत. [३]

हे देव हो ! हा यज्ञ जणूं काय तुमचें घरच झाला आहे, या सोमाभिषवांत या, बरोबर धन घेऊन या, तें धन आम्हांस अर्पण करा आणि यज्ञ समाप्तीनंतर स्वर्गांत स्वस्थानीं परत जा. [४]

यज्ञं य॒ज्ञं गच्छ य॒ज्ञप॑तिं गच्छ । स्वां योनिं॑ गच्छ॒ स्वाहा॑ ॥ ५ ॥
ए॒ष ते॑ य॒ज्ञो य॑ज्ञपते स॒हसू॑क्तवाकः । सु॒वीर्यः॒ स्वाहा॑ ॥ ६ ॥
वष॑ड्डुतेभ्यो॒ वष॒डहु॑तेभ्यः । देवा॑ गातुविदो गा॒तुं वि॒त्वा गा॒तुमि॑त ॥ ७ ॥
मन॑सस्पत इ॒मं नो॑ दि॒वि दे॒वेषु॑ य॒ज्ञम् ।
स्वाहा॑ दि॒वि स्वाहा॑ पृथि॒व्यां स्वाहा॒न्तरि॑क्षे स्वाहा॒ वाते॒ धां स्वाहा॑ ॥ ८ ॥

अर्थ— हे यज्ञा ! तूं (यज्ञं गच्छ) यज्ञस्थानाप्रत जा. (यज्ञपतिं गच्छ) यजमानास प्राप्त हो, (स्वां योनिं गच्छ) आपल्या आश्रयस्थानास प्राप्त हो, (स्वा-हा) स्वकीय वस्तूंचा त्याग हाच यज्ञ आहे. [५]

हे (यज्ञपते) यज्ञ करणाऱ्या यजमाना ! (एषः ते यज्ञः) हा तुझा यज्ञ (सह-सूक्त-वाकः) उत्तम सूक्त वचनांसह झाला, म्हणून (सुवीर्यः) हा वीर्यवान् झाला आहे, (स्वा-हा) स्वकीय अर्थाचा त्याग हाच यज्ञ आहे. [६]

(हुतेभ्यः वषट्) हवन करणाऱ्यांस अर्पण आणि (अहुतेभ्यः वषट्) हवन न करणाऱ्यांस सुद्धां अर्पण असो. हे (देवाः) देव हो ! तुम्हीं मनुष्यें (गातुविदः) मार्गास जाणणारे आहांत, (गातुं वित्वा गातुं इत) मार्ग जाणून त्या मार्गानेंच जा. [७]

हे (मनसः-पते) मनाच्या स्वामी ! (नः इमं यज्ञं दिवि देवेषु) आमच्या या यज्ञास द्युलोकांत देवांमध्यें (धां) धारण करतों. (दिवि स्वा-हा) द्युलोकांत आमचें समर्पण, (पृथिव्यां स्वाहा) पृथ्वीवर आमचें समर्पण पोहोंचो आणि (अन्तरिक्षे स्वाहा) अंतरिक्षांत तसेंच (वाते स्वाहा) वायुमध्यें अथवा प्राणांमध्यें आमचें समर्पण पोहोंचो. [८]

भावार्थ— यज्ञ यज्ञस्थानीं आणि यजमानाजवळच असतो. ज्या साधनांनी होता त्यांतच राहता, स्वार्थाचा त्याग करणें हाच यज्ञ होय. [५]

सूक्त आणि मंत्रकथनपूर्वक जो यज्ञ होतो तोच वीर्यवान् होतो. स्वार्थत्यागच यज्ञ आहे. [६]

समर्पण तर सर्वांकरितां झालें पाहिजे. मग तो यज्ञ करणारा असो अथवा नसो. मार्ग जाणल्यानंतर त्याच मार्गानें जाणें उत्तम होय. [७]

हे मनावर अधिकार गाजविणाऱ्या यजमाना ! जो यज्ञ तुम्हीं कराल तो देवांस समर्पण करा, त्याचें समर्पण पृथ्वी, अन्तरिक्ष आणि द्युलोक यांमध्यें रहाणाऱ्या सर्वांसाठीं होवो. [८]

हें सूक्त यज्ञाचें महत्त्व वर्णन करीत आहे. वाचकांनीं वरील भावार्थाचें मनन करावें. या सूक्ताचा आशय सहज ध्यानीं येण्यासारखा आहे.

यज्ञ

कांड ५, सूक्त २६

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – वास्तोष्पतिः, मन्त्रोक्ताः ।)

यजूं॑षि य॒ज्ञे स॒मिधः॒ स्वाहा॒ग्निः प्र॑वि॒द्वानि॒ह वो॑ युनक्तु ॥ १ ॥

अर्थ— (प्र विद्वान् अग्निः इह यज्ञे) विशेष ज्ञानी अग्नि या यज्ञांत (वः यजूंषि समिधः) आपणांसाठीं यजुर्वेद मंत्र आणि समिधा (युनक्तु स्वाहा) उपयोगांत आणो. मी आपल्या आहुत्या समर्पित करतों. [१]

युनक्तु देवः सविता प्रजानन्नस्मिन्यज्ञे महिषः स्वाहा ॥ २ ॥
इन्द्र उक्थामदान्यस्मिन्यज्ञे प्रविद्वान्युनक्तु सुयुजः स्वाहा ॥ ३ ॥
प्रैषा यज्ञे निविदः स्वाहा शिष्टाः पत्नीभिर्वहतेह युक्ताः ॥ ४ ॥
छन्दांसि यज्ञे मरुतः स्वाहा मातेव पुत्रं पिपृतेह युक्ताः ॥ ५ ॥
एयमगन्बर्हिषा प्रोक्षणीभिर्यज्ञं तन्वानादितिः स्वाहा ॥ ६ ॥
विष्णुर्युनक्तु बहुधा तपांस्यस्मिन्यज्ञे सुयुजः स्वाहा ॥ ७ ॥
त्वष्टा युनक्तु बहुधा नु रूपा अस्मिन्यज्ञे सुयुजः स्वाहा ॥ ८ ॥
भगो युनक्त्वाशिषो न्व१स्मा अस्मिन्यज्ञे प्रविद्वान्युनक्तु सुयुजः स्वाहा ॥ ९ ॥
सोमो युनक्तु बहुधा पयांस्यस्मिन्यज्ञे सुयुजः स्वाहा ॥ १० ॥
इन्द्रो युनक्तु बहुधा वीर्याण्यस्मिन्यज्ञे सुयुजः स्वाहा ॥ ११ ॥

अर्थ— (महिषः प्रजानन् सविता देवः) महान् ज्ञानी सर्व प्रेरक सविता देव (अस्मिन् यज्ञे युनक्तु, स्वाहा) या यज्ञांत हवन सामग्री उपयोगांत आणो. मी आपल्या आहुत्या समर्पित करतो. [१]

(प्रविद्वान् सुयुजः इन्द्रः) ज्ञानी, सुयोग्य इंद्र (अस्मिन् यज्ञे उक्थामदानि युनक्तु, स्वाहा) या यज्ञांत आनंदकारक स्तुति स्तोत्रें प्रयुक्त करो. यांत माझें समर्पण असो. [३]

(प्रैषाः निविदः इह यज्ञे युक्ताः शिष्टाः) आज्ञा आणि आत्मनिवेदन करण्याची रीत जाणणारे या यज्ञांत नियुक्त केलेले शिष्ट लोक (पत्नीभिः वहत, स्वाहा) आपल्या धर्मपत्नींसह यज्ञाचा भार उचलोत, या यज्ञांत माझें समर्पण असो. [४]

(माता इव पुत्रं) माता ज्याप्रमाणें पुत्रास पूर्ण करते, त्याप्रकारें (इह यज्ञे युक्ताः मरुतः) या यज्ञांत गुंतलेले मरुत् देव (छंदांसि पिपृत, स्वाहा) छंदांस पूर्ण करो, या यज्ञांत माझें समर्पण असो. [५]

(इयं अदितिः बर्हिषा प्रोक्षणीभिः) ही अदिति देवी हवन सामग्री आणि शोधक साधनांसह (यज्ञं तन्वाना आ अगन् स्वाहा) यज्ञाचा विस्तार करीत आली आहे, या यज्ञांत माझें समर्पण असो. [६]

(सुयुजः विष्णुः अस्मिन् यज्ञे) सुयोग्य विष्णु देव या यज्ञांत (तपांसि बहुधा युनक्तु, स्वाहा) आपल्या तप व शक्तिचा पुष्कळ उपयोग करो, यज्ञांत माझें समर्पण होवो. [७]

(सुयुजः त्वष्टा अस्मिन् यज्ञे) सुयोग्य त्वष्टा देव या यज्ञांत (रूपाः नु बहुधा युनक्तु, स्वाहा) विविध रूपें बहुत प्रकारें उपयोजो. या यज्ञांत माझें समर्पण असो. [८]

(सुयुजः प्रविद्वान् भगः अस्मिन् यज्ञे) सुयोग्य ज्ञानी भग देव या यज्ञांत (अस्मै नु आशिषः युनक्तु, स्वाहा) याला आशीर्वाद देवो, अशा यज्ञांत माझें समर्पण असो. [९]

(सुयुजः सोमः अस्मिन यज्ञे) सुयोग्य सोमदेव या यज्ञांत (पयांसि बहुधा युनक्तु, स्वाहा) पाण्यांस पुष्कळ प्रकार प्रयुक्त करो, माझें समर्पण या यज्ञांत होवो. [१०]

(सुयुजः इन्द्रः अस्मिन् यज्ञे) सुयोग्य इन्द्र देव या यज्ञांत (वीर्याणि बहुधा युनक्तु, स्वाहा) आपल्या सामर्थ्यांचा पुष्कळ प्रकारें उपयोग करो, या यज्ञांत माझें समर्पण असो. [११]

अश्विना ब्रह्मणा यातमर्वाञ्चौ वषट्कारेण यज्ञं वर्धयन्तौ ।
बृहस्पते ब्रह्मणा याह्यर्वाङ् यज्ञो अयं स्वरिदं यजमानाय स्वाहा ॥ १२ ॥

अर्थ— हे (अश्विनौ) दोघे अश्विदेव हो ! (ब्रह्मणा वषट्कारेण यज्ञं वर्धयन्तौ) ज्ञान आणि दानानें यज्ञास वृद्धिंगत करीत (अर्वाञ्चौ आयातं) आमचे जवळ या. हे बृहस्पते ! (ब्रह्मणा अर्वाङ् आयाहि) ज्ञानासह जवळ ये. (अयं यज्ञः यजमानाय स्वः) हा यज्ञ यजमानासाठीं तेज वाढविणारा होवो. (स्वाहा) यज्ञांत आत्म समर्पण होवो. [१२]

यज्ञांत आत्मसमर्पण

' स्वाहा ' शब्दाचा अर्थ (स्व+आ+हा) ' आपलें म्हणून जें जें कांहीं असेल तें सर्वस्व जगाच्या कल्याणासाठीं करणें असा आहे. ' वास्तविक पहातां आत्मशक्तीचें समर्पण हा अत्यंत मुख्य भाग आहे. असें समजतात कीं या आत्मसमर्पणावांचून यज्ञ होऊंच शकत नाहीं. यज्ञांत आहुति देतांना ' स्वाहा, न मम ' (हा पदार्थ मीं यज्ञांत समर्पित केला, आतां तो माझा नव्हे) हा मंत्र जो म्हटला जातो त्याचा तात्पर्यार्थ आत्मसमर्पणाचा बोध देणें हा आहे. या सूक्ताच्या प्रत्येक मंत्रांत ' स्वाहा ' शब्दाचा पाठ म्हणून केला आहे.

अग्नि, सविता, मरुत्, इंद्र, अदिति, विष्णु, त्वष्टा, भग, सोम, अश्विनौ, बृहस्पति इत्यादि सर्व देवता जगाच्या यज्ञांत आप-आपलें कार्य करीत आहेत, म्हणजे स्वशक्तीचें समर्पण करीत आहेत. हें देवतांचें आत्मसमर्पण पाहून प्रत्येक मनुष्य आपली संपूर्ण शक्ति यज्ञांत समर्पण करो आणि आपल्या जीवनाची सार्थकता यज्ञानें करावी हेंच त्यास उचित आहे. अग्नि उष्णता देतो, सविता प्रकाश देतो, इन्द्र चमकतो, मरुत् जीवन देतो, अदिति आधार देते, विष्णु सर्वत्र व्यापून सर्वांचें रक्षण करतो, त्वष्टा सर्व पदार्थांस रूपें देतो, भग सर्वांस भाग्यवान् करतो, सोम शांति देतो, अश्विनौ देव सर्वांचे दोष दूर करतात, बृहस्पति सर्वांस ज्ञान देतो किंवा एकच परमात्मा देव एवढ्या शक्तिद्वारा जगाचा यज्ञ संपूर्णपणें सांगतेस नेतो. हे सर्व देव आपआपलीं कार्यें स्वतःच्या सुखासाठीं करीत नाहींत, परंतु सर्व जगाच्या कल्याणासाठीं आत्मशक्तीचें समर्पण करीत असतात. त्याप्रमाणें मनुष्यानें आपलें तन-मन-धनाच्या सर्व शक्तींचें समर्पण जनतेच्या कल्याणासाठीं करावें आणि या आत्मसर्वस्व समर्पणाच्या यज्ञद्वारा स्वतःच्या जीवनाचें सार्थक्य करावें. याप्रमाणें यज्ञमय जीवन व्यतीत करण्याचा उपदेश या सूक्तांत केला आहे.

यज्ञ

कांड ५, सूक्त १२

(ऋषिः - अङ्गिराः । देवता - जातवेदाः ।)

समिद्धो अद्य मनुषो दुरोणे देवो देवान्यजसि जातवेदः ।
आ च वह मित्रमहश्चिकित्वान्त्वं दूतः कविरसि प्रचेताः ॥ १ ॥

अर्थ— हे (जातवेदः) ज्ञान प्रकाशक देवा ! (अद्य मनुषः दुरोणे समिद्धः देवः) आज मनुष्याच्या घरांत प्रदीप्त झालेला तूं देव (देवान् यजसि) देवासाठीं यजन करतोस. हे (मित्रमहः) मित्रासारख्या पूज्य देवा ! तूं (चिकित्वान् आवह च) ज्ञानवान् त्यांना येथें आण. (त्वं कविः प्रचेता दूतः असि) तूं कवि आणि विशेष ज्ञानी दूत आहेस. [१]

भावार्थ— आज मनुष्याच्या घरांत प्रदीप्त झालेला अग्निदेव देवांसाठीं यज्ञ करीत आहे आणि त्यांना येथें आणीत आहे. हा मित्रासमान पूज्य, ज्ञानी, कवि उत्तम चित्तानें युक्त देवांचा दूत आहे. [१]

तनूनपात्पथ ऋतस्य यानान्मध्वा समञ्जन्त्स्वदया सुजिह्व ।
मन्मानि धीभिरुत यज्ञमृन्धन्देवत्रा च कृणुह्यध्वरं नः ॥ २ ॥
आजुह्वान ईड्यो वन्द्यश्चा याह्यग्ने वसुभिः सजोषाः ।
त्वं देवानामसि यह्व होता स एनान्यक्षीषितो यजीयान् ॥ ३ ॥
प्राचीनं बर्हिः प्रदिशा पृथिव्या वस्तोरस्या वृज्यते अग्रे अह्नाम् ।
व्यु प्रथते वितरं वरीयो देवेभ्यो अदितये स्योनम् ॥ ४ ॥
व्यचस्वतीरुर्विया वि श्रयन्तां पतिभ्यो न जनयः शुम्भमानाः ।
देवीर्द्वारो बृहतीर्विश्वमिन्वा देवेभ्यो भवत सुप्रायणाः ॥ ५ ॥

अर्थ— हे (तनू न-पात् सुजिह्व) शरीरास न पडूं देणाऱ्या आणि उत्तम जिह्वेच्या देवा ! (ऋतस्य यानान् पथः मध्वा समञ्जन् स्वदय) सत्याच्या चालण्यास योग्य मार्गांना मधुरतेनें युक्त करीत स्वादयुक्त कर. (धीभिः मन्मानि) बुद्धींनीं मननीय विचारांना (उत यज्ञं ऋन्धन्) आणि यज्ञाला सिद्ध करीत (देवत्रा नः अध्वरं च कृणुहि) देवांच्या मध्यें आमचें अहिंसामय कर्म पूर्ण कर. [२]

हे अग्ने ! (आजुह्वानः ईड्यः वन्द्यः च) हवन करणारा स्तुति आणि वंदन करण्यायोग्य तूं (सजोषाः वसुभिः आयाहि) प्रेमानें वसुसह ये. हे (यह्व) पूज्य ! (त्वं देवानां होता असि) तूं देवांस आह्वान करणारा आहेस. (सः इषितः यजीयान् एनान् यक्षि) असा तूं इष्ट आणि याजक यांचें यजन कर. [३]

(अह्नां अग्रे) दिवसाच्या प्रथम भागांत (अस्याः पृथिव्याः प्रदिशा) या पृथ्वीच्या दिशांपासून (वस्तोः बर्हिः प्राचीनं आवृज्यते) आच्छादनासाठीं तृणादि पूर्व दिशाभिमुख पसरलें जातें. हें आसन (वितरं वरीयः) विस्तृत आणि श्रेष्ठ (देवेभ्यः अदितये स्योनं) देवांसाठीं तसेंच स्वतंत्रतेसाठीं सुखकारक (उ विप्रथते) पसरलें जातें. [४]

(शुम्भमाना जनयः पतिभ्यः न) शोभायमान स्त्रिया ज्या प्रकारें पतींचा आदर करतात, त्याप्रकारें (व्यचस्वती उर्विया) विस्तृत आणि महान् (बृहतीः विश्वं इन्वाः) मोठे आणि सर्वांस प्राप्त करणारे (देवीः द्वारः) हे दिव्य द्वारांनों ! (देवेभ्यः सुप्रायणाः भवत) देवांसाठीं सुखानें येण्याजाण्यायोग्य हो. [५]

भावार्थ— शरीरास न पडूं देणारा आणि मधुरभाषणी देव सत्यास पोहोंचविणारे मार्ग मधुरतायुक्त करतो. उत्तम मननीय विचारांनीं यज्ञास सिद्ध करून देवांमध्यें आमचा यज्ञ पोहोंचतो. [२]

उत्तम हवन करणारा, स्तुति योग्य आणि नमस्कारासाठीं योग्य तूं देव वसूंसह येथें या यज्ञांत ये. तूं देवास बोलविणारा आहेस म्हणून तूं याजकांत श्रेष्ठ याजक त्या देवांना येथें घेऊन ये. [३]

प्रातःकाळींच या पृथ्वीस आच्छादित करण्यासाठीं पूर्व दिशेकडून आसन प्रसरवतों. हें विस्तृत आणि उत्तम आसन सर्व देवांस बसण्यासाठीं सुखदायक आहे आणि स्वतंत्रतेसाठीं सुद्धां उत्तम आहे. [४]

स्त्रिया ज्याप्रमाणें पतीला सुख देतात, त्याप्रकारें हे आमचे दिव्य दरवाजे जे विस्तृत आणि सर्वांस येण्याजाण्यायोग्य आहेत, ते देवांस सुखानें आंत आणणारे होवोत. [५]

आ सुष्वयन्ती यजते उपाके उषासानक्ता सदतां नि योनौ ।
दिव्ये योषणे बृहती सुरुक्मे अधि श्रियं शुक्रपिशं दधाने ॥ ६ ॥
दैव्या होतारा प्रथमा सुवाचा मिमाना यज्ञं मनुषो यजध्यै ।
प्रचोदयन्ता विदथेषु कारू प्राचीनं ज्योतिः प्रदिशा दिशन्ता ॥ ७ ॥
आ नो यज्ञं भारती तूयमेत्विडा मनुष्वदिह चेतयन्ती ।
तिस्रो देवीर्बर्हिरेदं स्योनं सरस्वतीः स्वपसः सदन्ताम् ॥ ८ ॥
य इमे द्यावापृथिवी जनित्री रूपैरपिंशद्भुवनानि विश्वा ।
तमद्य होतरिषितो यजीयान्देवं त्वष्टारमिह यक्षि विद्वान् ॥ ९ ॥
उपावसृज त्मन्या समञ्जन्देवानां पाथ ऋतुथा हवींषि ।
वनस्पतिः शमिता देवो अग्निः स्वदन्तु हव्यं मधुना घृतेन ॥ १० ॥

अर्थ-(सुष्वयन्ती यजते उपाके) उत्तम चालणारे जवळच असलेले (दिव्य योषणे) दिव्य आणि सेवनीय (बृहती सुरुक्मे) अत्यंत सुंदर (शुक्रपिशं श्रियं अधिदधाने) शुद्ध शोभा धारण करणारे (उषासानक्ता योनौ नि आसदताम्) दिवस आणि रात्र आमच्या घरांत येवो. [६]

(प्रथमा सुवाचा दैव्या होतारा) प्रथम सुंदर बोलणारे दोन दिव्य होता (मनुषः यज्ञं यजध्यै मिमाना) मनुष्याच्या यज्ञांत यजन करण्यासाठीं निर्माण करणारे (विदथेषु प्रचोदयन्ता कारू) यज्ञांत प्रेरणा करणारे कार्यकर्ता (प्राचीनं ज्योतिः प्रदिशा दिशन्तौ) प्राचीन ज्योतीला तिची दिशा दाखवतात. [७]

(भारती नः यज्ञं तूयं आ एतु) सर्वांचें भरणपोषण करणारी मातृभूमि आमच्या यज्ञांत वेगासह येवो. (इडा मनुष्यवत् यज्ञं चेतन्ती इह) मातृभाषा मनुष्यांनीं युक्त यज्ञाची चेतना देत येथें येवो. (सरस्वतीः सु अपसः आसदन्तां) मातृसभ्यता उत्तम कर्म करणाऱ्यांच्या जवळ बसो आणि या (तिस्रः देवीः इदं स्योनं बर्हिः) तीन देवी या उत्तम आसनांवर येऊन बसोत. [८]

(इमे जनित्री द्यावापृथिवी) या उत्पन्न करणाऱ्या द्यु आणि पृथ्वीमध्यें (विश्वा भुवनानि रूपैः यः अपिंशत्) सर्व भुवनांस विविध रूपांनीं सुंदर ज्यानें बनविलें. हे (होतः) याजका ! (यजीयान् इषितः विद्वान्) यज्ञ करणारा इष्ट विद्वान् तूं (अद्य इह तं देवं त्वष्टारं यक्षि) आज येथें त्या त्वष्टा देवासाठीं यजन कर. [९]

(त्मन्या समञ्जन) स्वतः प्रकट होत तूं (देवानां पाथः हवींषि ऋतुथा उप अवसृज) देवांसाठीं अन्न आणि हवन ऋतूं अनुसार दे. (वनस्पतिः शमिता देवो अग्निः) वनस्पति, शामितकर्ता अग्नि देव (मधुना घृतेन हव्यं स्वदन्तु) मधुर घृतासह हव्याचा स्वाद घेवो. [१०]

भावार्थ— उत्तम गमन करण्यायोग्य, एक दुसऱ्यांशीं संबंधित, दिव्य आणि सुंदर प्रातःकाल आणि रात्रीचा समय सुखपूर्वक आमचे घरांत व्यतीत होवो. [६]

हे सुंदर मंत्रगान करणारे दिव्य होतागण मनुष्याचा हा यज्ञ पूर्ण करण्यासाठीं पूर्व दिशेकडील ज्योतीचा संदेश देत, सर्वांस प्रेरणा देण्यास येथें येवोत. [७]

आमच्या यज्ञांत सर्वांचें भरणपोषण करणारी मातृभूमि, यज्ञाची प्रेरणा करणारी मातृभाषा आणि उत्तम कर्मांची प्रेरणा देणारी प्रवाहप्राप्त मातृसभ्यता येथें येऊन या यज्ञांत विराजमान होवो. [८]

ज्या सर्व भूतांस विविधरूपें देतात त्या या द्यावापृथिवी आहेत. आमचा याजक त्वष्टा देवाचें येथें यजन करो. [९]

स्वतः येथें प्रकट होऊन ऋतु अनुसार सर्व देवांस हवि आणि अन्न देवो. वनस्पति, शमिता आणि देव अग्नि हे सर्व आमचा हवि आणि घृत मधुरतेनें युक्त करोत. [१०]

सद्यो जातो व्यमिमीत यज्ञमग्निर्देवानामभवत्पुरोगाः ।
अस्य होतुः प्रशिष्यृतस्य वाचि स्वाहाकृतं हविरदन्तु देवाः ॥ ११ ॥

अर्थ—(सद्यः जातः अग्निः यज्ञं वि अमिमीत) शीघ्र प्रकट झालेला अग्नि यज्ञास निर्माण करतो. तो (देवानां पुरोगाः अभवत्) तो देवांचा अग्रगामी होता आहे. (अस्य ऋतस्य होतुः प्रशिषि वाचि) या सत्य प्रवर्तक होत्याच्या प्रकृष्ट शासनयुक्त वाणीमध्यें (स्वाहाकृतं हविः देवा अदन्तु) स्वाहाकारद्वारा दिलेला हविर्भाग देव खावोत. [११]

भावार्थ—प्रज्वलित अग्नि येथें आमचा यज्ञ निर्माण करीत आहे. हा देवांचा अग्रणी आहे. या होता अग्निच्या वाणीमध्यें म्हणजे मुखांत स्वाहाकारपूर्वक टाकलेला हवि सर्व देव खावोत. [११]

यज्ञ

यजमानाची इच्छा

यजमान आपल्या घरांत यज्ञयाग अथवा होमहवन करतो, त्यावेळीं त्याचे मनांत जे विचार असले पाहिजेत, ते या सूक्तांत फार सुंदर रीतीनें वर्णिले आहेत. घरांत कांहीं धर्मकृत्य, कांहीं धार्मिकसंस्कार करण्याच्या वेळीं सुद्धां हेच विचार यजमानानें मनांत धारण करणें योग्य होय—

(१) हा माझ्या घरांत प्रदीप्त केलेला यज्ञीय अग्नि निःसंदेह सर्व देवतांचें यजन करीत आहे. तो खरोखर सर्व देवांस यज्ञस्थानीं घेऊन येतो, कारण कीं तो देवांस बोलाविणारा आणि त्यांस हवि पोहोंचविणारा प्रत्यक्ष देवदूत आहे.

(२) हा उत्तम जिह्वा असणारा अग्निदेव सत्याशीं पोहोंचणाऱ्या धर्ममार्गावर मधुर पाथेय देणारा आहे. हा येथें येतो आणि उत्तम स्तोत्रांनीं यज्ञ करतो आणि अहिंसामय कर्मांस देवापर्यंत पोहोंचवितो.

(३) हे अग्ने ! पृथिव्यादि आठ वसु देवांना तूं येथें या यज्ञांत घेऊन ये. तूं वंदनीय आणि प्रशंसनीय देव आहेस. तूं देवांस येथें बोलाविणारा आहेस म्हणून देवांस येथें बोलावून त्यांचेसाठीं यज्ञ कर.

(४) आम्हीं सकाळपासून देवतांस सुखपूर्वक बसण्यासाठीं पूर्वे दिशेसन्मुख आसन पसरून ठेवलेलें आहे. देवांनीं येथें येऊन त्यावर विराजमान व्हावें.

(५) आमच्या घराचीं द्वारें पूर्णपणें उघडून ठेवलीं आहेत, त्यांत देवांनीं सुखेनैव यावें आणि या यज्ञांत मंगल करावें.

(६) सकाळपासून संध्याकाळपर्यंतची वेळ शोभन आणि तेजस्वी आहे. ही वेळ उत्तम आनंदकारकपणें आमच्या घरांत व्यतीत होवो म्हणजे आमच्यासाठीं ही वेळ सुखकारक होवो.

(७) दिव्य होतागण आमच्या यज्ञांत येवोत, मनुष्यांस बोलावोत, उत्तम प्रकारें यज्ञकर्म करोत आणि या यज्ञद्वारा सर्वांस प्रकाशाचा मार्ग दाखवोत.

(८) या यज्ञानें सर्वांचें भरणपोषण करणाऱ्या मातृभूमीचा सत्कार होवो, येथें मातृभाषा सर्वांस उत्तम प्रेरणा देवो, प्रवाहानें प्राप्त झालेली सभ्यता उत्तम कर्मांस प्रेरणा देवो. अशा प्रकारें या तीनहि देवी या यज्ञांत येऊन कार्य करोत.

(९) ही द्यावापृथिवी आहे, तिच्यामुळेंच सर्व स्थिरचर पदार्थ रूपानें संपन्न झाले आहेत. त्यांच्यामध्यें हा यज्ञ चालू आहे, म्हणून या यज्ञांत सर्वांस आकार देणाऱ्या त्वष्टा देवासाठीं हवन अवश्य होवो.

(१०) यज्ञांतील समिधा, अग्नि आणि हवनसामग्री तुपानें युक्त होवो. हवन सामग्रींत मधुर पदार्थ मिसळून गोडी आणली जावो आणि ऋतूंस अनुकूल देवांनिमित्त हवन होत रहावें.

(११) अग्नि प्रदीप्त होतांच यज्ञाचा प्रारंभ होतो आणि देवसुद्धां त्या यज्ञस्थानीं येतात. या अग्नींत स्वाहाकारपूर्वक केलेलें हवन सर्व देव भक्षण करतात आणि तृप्त होत आमचें कल्याण करतात.

या प्रकारें यजमानानें स्वतःची हार्दिक इच्छा प्रगट करावी. ज्या यजमानाच्या मनांत या गोष्टी विश्वासपूर्वक स्थिरावतात आणि जो खरोखर जाणतो कीं, यज्ञ कर्मांत सर्व देव भाग घेतात आणि मनुष्यांचें कल्याण करतात, तोच यजमान वैदिक कर्मांपासून आध्यात्मिक लाभ करून घेऊं शकतो. अविश्वासीयांच्या उद्धारास कोणताच मार्ग नाहीं.

या सूक्तांत सांगितल्याप्रमाणें वाचक स्वतः समजूं शकतात कीं, यज्ञासाठीं सामग्री कशी सिद्ध असावयास हवी. या सूक्ताच्या

मननानें यज्ञविधि जाणण्यास पुष्कळच मदत होण्यासारखी आहे.

अग्नीचें नांव या सूक्तांत ' **तनू-न-पात्** ' असें आहे. त्याचा अर्थ ' शरीराचें पतन न करणारा ' म्हणजे शरीर चालविणारा असा आहे. या शरीरांत अग्नि शरीरास चालविणारा आहे ही गोष्ट या मंत्रांनीं स्पष्ट सांगितली आहे. अगदीं स्थूल दृष्टीनीं वाचकांनीं जरी विचार केला तरी त्यांचें ध्यानीं यावें कीं मृत शरीर थंडगार असतें आणि जीवित शरीरांत उष्णता राहते. या अनुभवानें वाचक जाणूं शकतील कीं शरीरास चालविणारा अग्नि आहे. पुढें हाच **तनू-न-पात्** शब्द आत्म्याचा वाचक बनतो आणि आत्मा शरीराचा चालक आहे ही गोष्ट तर सर्वांस माहीत आहेच.

जो यज्ञ अग्नींत केला जातो त्याचें नांव **अध्वर** आहे. ही गोष्ट दुसऱ्या मंत्रांत सांगितली आहे. **अ-ध्वर**चा अर्थ ' **अ-हिंसा** ' अथवा ' **अ-कुटिलता** ' असा सुद्धां आहे. म्हणजे यज्ञाचा अर्थ अहिंसायुक्त आणि कुटिलतारहित कर्म असा आहे. मनुष्यानें या प्रकारचीं कर्मेंच केलीं पाहिजेत. परंतु कित्येक मनुष्यें यज्ञाच्या नांवें हिंसामय कर्में करतात आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं त्या हिंसेसच ते अहिंसा समजतात. यापेक्षां अर्थाचा अनर्थ आणखी कोणता ? असो.

याप्रमाणें या सूक्ताचा विचार करून वाचकांनीं योग्य बोध प्राप्त करून घ्यावा.

यज्ञ

कांड ७, सूक्त ९८

(ऋषिः - अथर्वा । देवता - मंत्रोक्ताः ।)

सं बर्हिरक्तं हविषा घृतेन समिन्द्रेण वसुना सं मरुद्भिः ।
सं देवैर्विश्वदेवेभिरक्तमिन्द्रं गच्छतु हविः स्वाहा ॥ १ ॥

अर्थ— (घृतेन हविषा बर्हिः सं अक्तं) तूप आणि हवन सामग्रीनें आहुति भरपूर होवोत, (इन्द्रेण, वसुना, मरुद्भिः सं अक्तं) इन्द्र, वसु, मरुत् या देवांसह (विश्वदेवेभिः देवैः सं) सर्व अन्य देवांसह भरपूर होवो. (हविः इन्द्रं गच्छतु) हें हवन सर्व देवांच्या मुख्य प्रभूस पोहोंचो. (स्वा-हा) हें आत्मसमर्पणच आहे. [१]

या सूक्ताचा संबंध पूर्वीच्या सूक्ताशीं आहे. हवनसामग्री, तूप वगैरे पदार्थ पूर्णपणें यथाविधि यज्ञांत समर्पण केले जावेत. हा सर्व यज्ञ परमेश्वरास समर्पण होवो, या बुद्धीनें अर्थात् ईश्वरार्पण बुद्धीनें केला जावो. स्वार्थत्याग-स्वतःच्या वस्तूचें समर्पण-केल्यानेंच यज्ञ सिद्ध होतो.

यज्ञ

कांड ७, सूक्त ९९

(ऋषिः - अथर्वा । देवता - वेदी ।)

परि स्तृणीहि परि धेहि वेदिं मा जामिं मोषीरमुया शयानाम् ।
होतृषदनं हरितं हिरण्ययं निष्का एते यजमानस्य लोके ॥ १ ॥

अर्थ— (वेदिं परिस्तृणीहि) वेदीच्या चारी बाजू चांगल्याप्रकारें झांकून टाक आणि (परि धेहि) त्यांस धारण कर. (अमुया शयानां जामिं मा मोषीः) या यज्ञभूमींत झोंपणाऱ्या या आमच्या बहिणीशीं म्हणजे यजमान पत्नीशीं कपट करूं नकोस. (होतृ-सदनं हरितं हिरण्मयं) या हवन करणाऱ्याचें घर हिरवळीनें युक्त आहे आणि उत्तम वर्णयुक्त आहे. (यजमानस्य लोके एते निष्काः) यजमानाच्या स्थानीं हीं नाणीं, सोन्याच्या मोहरा या अलंकाररूप आहेत. [१]

वेदीच्या चारी बाजूंस स्वच्छता ठेवली पाहिजे आणि नेहमीं ती स्थिर राहिली पाहिजे. कोण्या स्त्रीशीं कपट अथवा वाईट वर्तन नसावें. घराजवळ हिरवेगार उद्यान-तृण असावें व तें उत्तम अवस्थेंत ठेवलें पाहिजे. घर उत्तम स्वच्छ अवस्थेंत असणें हेंच गृहस्थाचें भूषण आहे. *

अन्नाचा यज्ञ

कांड ४, सूक्त ३४

(ऋषिः – अथर्वा । देवता – ब्रह्मौदनं ।)

ब्रह्मा॑स्य शी॒र्षं बृ॒हद॑स्य पृ॒ष्ठं वा॑मदे॒व्यमु॒दर॑मोद॒नस्य॑ ।
छन्दां॑सि प॒क्षौ मुख॑मस्य स॒त्यं वि॑ष्टा॒री जा॒तस्तप॑सोऽधि य॒ज्ञः ॥ १ ॥
अ॒न॒स्थाः पू॒ताः पव॑नेन शु॒द्धाः शुच॑यः शुचि॒मपि॑ यन्ति लो॒कम् ।
नैषां॑ शि॒श्नं प्र द॑हति जा॒तवे॑दाः स्व॒र्गे लो॒के ब॒हु स्त्रैण॑मेषाम् ॥ २ ॥
वि॒ष्टा॒रिण॑मोद॒नं ये पच॑न्ति॒ नैना॒नव॑र्तिः सचते॒ क॒दा च॒न ।
आस्ते॑ य॒म उप॑ याति दे॒वान्त्सं ग॑न्ध॒र्वैर्म॑दते सो॒म्येभिः॑ ॥ ३ ॥
वि॒ष्टा॒रिण॑मोद॒नं ये पच॑न्ति॒ नैना॒न्य॒मः परि॑ मुष्णा॒ति॒ रेतः॑ ।
र॒थी ह॑ भू॒त्वा र॑थ॒यान॑ ईयते प॒क्षी ह॑ भू॒त्वाति॒ दि॒वः समे॑ति ॥ ४ ॥

अर्थ— (**अस्य ओदनस्य शीर्षं ब्रह्म**) या अन्नाचें मस्तक ब्रह्म आहे, (**अस्य पृष्ठं बृहत्**) या अन्नाची पाठ मोठे क्षत्रिय आहेत आणि (**ओदनस्य उदरं वामदेव्यं**) या अन्नाचें उदर–मध्यभाग–उत्तम देवसंबंधी आहे. (**अस्य पक्षौ छंदांसि**) याच्या दोन्ही पार्श्वबाजू छंद आहेत आणि (**अस्य मुखं सत्यं**) याचें मुख सत्य आहे. याच्या (**तपसा**) उष्णतेपासून (**विष्टारी यज्ञः अधिजातः**) पसरणारा यज्ञ होतो. [१]

(**अन्-अस्थाः**) अस्थिरहित (**पवनेन शुद्धाः पूताः शुचयः**) प्राणायामानें शुद्ध पवित्र आणि निर्मळ झालेले (**शुचिं लोकं अपि यन्ति**) शुद्धलोकास प्राप्त होतात. (**जातवेदाः एषां शिश्नं न प्रदहाति**) अग्नि यांच्या सुख-साधनरूप इंद्रियास जाळीत नाहीं आणि (**स्वर्गे लोके एषां बहु स्त्रैणं**) स्वर्गलोकांत याला पुष्कळ सुख प्राप्त होतें. [२]

(**ये विष्टारिणं ओदनं पचन्ति**) जे या व्यापक अन्नाला शिजवितात, (**एनान् कदाचन अवर्तिः न सचते**) यांस कधींच दारिद्र्य प्राप्त होत नाहीं. जो (**यमे आस्ते**) नियमांत रहातो, तो (**देवान् उप याति**) देवांस प्राप्त होतो आणि तो (**सोम्येभिः गंधर्वैः सं मदते**) शांत गंधर्वांसह आनंद प्राप्त करतो. [३]

(**ये विष्टारिणं ओदनं पचन्ति**) जे या व्यापक अन्नास शिजवितात, (**यमः एनान् रेतः न परि मुष्णाति**) यम त्यांच्या वीर्यास कमी करीत नाहीं. ते (**रथी ह भूत्वा रथयाने ईयते**) रथी होऊन रथमार्गानें विचरतात आणि (**पक्षी ह भूत्वा अति दिवः सं पति**) पक्ष्यासारखे होऊन द्युलोकास पार करून वर जातात. [४]

भावार्थ— या अन्नाचें मस्तक ब्राह्मण, पाठ क्षत्रिय, मध्यभाग वैश्य (आणि शेषभाग शूद्र,) आहेत. छंद याचें डावेउजवे भाग आहेत. याचें मुख सत्य आहे. या अन्नानें विस्तृत यज्ञ सिद्ध होतो. (१)

विदेही, शुद्ध, पवित्र आणि निर्मल होणारे यज्ञकर्ते लोक उच्च लोकास प्राप्त होतात. सुख प्राप्त करणारें याचें इंद्रिय अग्नीनें जळत नाहीं. उच्च लोकांत याला सुख प्राप्त होतें. [२]

जीं मनुष्यें हा अन्नदानरूपी यज्ञ करतात, त्यांस कष्टाची अवस्था कधीं प्राप्त होत नाहीं. ते अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या यमांचें पालन करीत देवत्व प्राप्त करतात आणि तेथें (देवलोकांत) आनंद प्राप्त करतात. [३]

जीं मनुष्यें हा अन्नदानरूपी यज्ञ करतात, ते कधीं निर्वीर्य होत नाहींत. ते या लोकीं रथांत बसतात आणि रथीं म्हणवतात आणि अंतीं द्युलोकाच्यावर पोहोंचतात. [४]

एष य॒ज्ञानां॒ वित॑तो॒ वहि॑ष्ठो विष्टा॒रिणं॑ प॒क्त्वा दिव॒मा वि॑वेश ।
आ॒ण्डीकं॑ कुमु॒दं सं त॑नोति॒ बिसं॑ शा॒लूकं॒ शफ॑को मुला॒ली ।
ए॒तास्त्वा॒ धारा॒ उप॑ यन्तु॒ सर्वाः॑ स्व॒र्गे लो॒के मधु॑मत्पिन्व॑माना॒
उप॑ त्वा तिष्ठन्तु पुष्क॒रिणीः॒ सम॑न्ताः ॥ ५ ॥
घृ॒तह्र॑दा॒ मधु॑कूला॒ः सुरो॑दकाः क्षी॒रेण॑ पू॒र्णा उ॑द॒केन॑ द॒ध्ना ।
ए॒तास्त्वा॒ धारा॒ उप॑ यन्तु॒ सर्वाः॑ स्व॒र्गे लो॒के मधु॑मत्पिन्व॑माना॒
उप॑ त्वा तिष्ठन्तु पुष्क॒रिणीः॒ सम॑न्ताः ॥ ६ ॥
च॒तुरः॑ कु॒म्भांश्च॑तु॒र्धा द॑दामि क्षी॒रेण॑ पू॒र्णाँ उ॑द॒केन॑ द॒ध्ना ।
ए॒तास्त्वा॒ धारा॒ उप॑ यन्तु॒ सर्वाः॑ स्व॒र्गे लो॒के मधु॑मत्पिन्व॑माना॒
उप॑ त्वा तिष्ठन्तु पुष्क॒रिणीः॒ सम॑न्ताः ॥ ७ ॥
इ॒ममो॑द॒नं नि द॑धे ब्राह्म॒णेषु॑ विष्टा॒रिणं॑ लोक॒जितं॑ स्व॒र्गम् ।
स मे॒ मा क्षे॑ष्ट स्व॒धया॒ पिन्व॑मानो वि॒श्वरू॑पा धे॒नुः का॑म॒दुघा॑ मे अस्तु ॥ ८ ॥

अर्थ-(एष यज्ञानां वहिष्ठः विततः) हा सर्व यज्ञांत श्रेष्ठ आणि विस्तृत आहे. या (विष्टारिणं पक्त्वा दिवं आ विवेश) विस्तृत यज्ञाचें अन्न शिजवून यजमान द्युलोकांत प्रविष्ट होतो. (श-कफः मुलाली) शांतचित्त होऊन मूल शक्तीची वृद्धि करणारा, (आण्डीकं कुमुदं बिसं शालूकं) अंड्याप्रमाणें वाढणाऱ्या आनंददायक कमळाच्या कांद्याप्रमाणें वाढणाऱ्याला (सं तनोति) उत्तमप्रकारें प्रसरवतो. (एताः सर्वाः धाराः त्वा उपयन्तु) या सर्व धारा तुला प्राप्त होवोत, (स्वर्गे लोके मधुमत् पिन्वमानाः समन्ताः पुष्करिणीः) स्वर्गलोकांत मधुररस देणाऱ्या सर्व नद्या (त्वा उप तिष्ठन्तु) तुझ्याजवळ उपस्थित होवोत. [५]

(घृतह्रदाः मधुकूलाः) तुपाच्या प्रवाहाच्या मधुर रसाचे कांठ असणाऱ्या, (सुरोदकाः) निर्मळ पाण्यानें युक्त (उदकेन दध्ना क्षीरेण पूर्णाः) पाणी, दही आणि दुधानें परिपूर्ण (एताः सर्वा धाराः त्वा उपयन्तु०) या सर्व धारा तुला प्राप्त होवोत. स्वर्ग लोकांत मधुररस देणाऱ्या सर्व नद्या तुझ्यासमीप उपस्थित होवोत. [६]

(क्षीरेण दध्ना उदकेन पूर्णान्) दुध, दही आणि पाण्यानें भरलेल्या (चतुरः कुम्भान् चतुर्धा ददामि) चार घड्यांचें चारप्रकारें मीं दान करतों. या सर्व धारा तुला प्राप्त होवात, स्वर्ग लोकांत मधुररस देणाऱ्या सर्व नद्या तुझ्या जवळ उपस्थित होवोत. [७]

(इमं विष्टारिणं लोकजितं स्वर्गं ओदनं) या विस्तृत लोकांस जिंकणाऱ्या आणि स्वर्ग देणाऱ्या अन्नाला (ब्राह्मणेषु नि दधे) ज्ञान्यांसाठीं प्रदान करतों. (स्वधया पिन्वमानः) आपल्या धारकशक्तीनें तृप्त करणारा (सः मे मा क्षेष्ट) तें अन्नदान माझी हानि न करो. (विश्वरूपाः कामदुघा धेनुः मे अस्तु) विश्वरूपी कामना पूर्ण करणारी कामधेनु माझ्यासाठीं असो. [८]

भावार्थ—हा अन्नयज्ञ सर्व यज्ञांत श्रेष्ठ आहे. जो हा यज्ञ करतो तो स्वर्गलोकास प्राप्त होतो. तेथें शांतीनें युक्त होऊन अंतःशक्तीनें संपन्न होऊन आनंद प्राप्त करतो. तेथें सर्व मधुररस अनायासें त्यास प्राप्त होतात. [५]

तूप, मध, शुद्ध पाणी, दूध, दही इत्यादीचे प्रवाह प्राप्त होण्यासमान पूर्ण तृप्ति त्यांस प्राप्त होते. [६]

दूध, दही, पाणी, मध वगैरेंनीं भरपूर भरलेले चार घडे विद्वानांस दान केल्यानें उच्च लोक प्राप्त होऊन पूर्ण तृप्ति प्राप्त होते.[७]

हा अन्नदानाचा यज्ञ करण्यानें आणि हें अन्न ज्ञान्यांस दिल्यानें कोणत्याहि प्रकारची हानि होत नाहीं. आपल्या शक्तीनें तृप्ति होण्याची अवस्था प्राप्त होण्यामुळें जणूं काय सर्व मनःकामना पूर्ण करणारी कामधेनूच प्राप्त होते. [८]

अन्नाचा यज्ञ

अन्नाचा विष्टारी यज्ञ

विष्टारी यज्ञाचें वर्णन या सूक्तात केलें आहे. ' **विष्टारी** ' शब्दाचा अर्थ ' विस्तार करणारा ' असा आहे. म्हणजे ज्याचा परिणाम विस्तृत होतो. हा यज्ञ (**ओदनस्य**) अन्नाचा केला जातो. अन्न शिजलेलें असो, कच्चें असो म्हणजे शिजवून तयार केलेलें असो अथवा धान्याच्या रूपांत असो, अथवा ज्यायोगें धान्य खरीद केलें जातें अशा धनरूपानें असो, त्या सर्वांचा अर्थ एकच आहे.

या सूक्तांत ' **पचन्ति** ' ही क्रिया आली आहे, ती शिजविलेलें अन्न सुचवते. परंतु तो भाव गौण मानणेंहि अयोग्य होणार नाहीं. सातव्या मंत्रांत (**क्षीर, दधि, उदक, मधु**) दूध, दही, पाणी आणि मध या चार पदार्थांचें विष्टारी यज्ञांत दान देण्यास सांगितलें आहे. हे पदार्थ कांहीं शिजविलेल्या अन्नाचे रूपानें नाहींत. दूध तापविण्यांत येतें, परंतु मध अथवा दहि शिजविण्याची वस्तु नव्हे, म्हणजे विष्टारी यज्ञास शिजविलेलें अन्न पाहिजे असें नाहीं. उत्तम पक्ष शिजविल्या अन्नाचें दान करणें म्हणजे विद्वानांस जेऊं घालणें. मध्यम पक्ष विद्वानांस धान्य समर्पण करणें आणि गौण पक्ष धान्य खरीद करण्याचें साधन धन वगैरे अर्पण करणें. पाणी, मध, दूध, तूप, लोणी तसेंच खाण्याचे व पिण्याचे इतर पदार्थ देणें हें सर्व यज्ञाचें अंग आहे. जलदानाचा अर्थ विहीर खणून अर्पण करणें. दूध देण्याचें तात्पर्य दूध देणारी गाय दान देणें. मध, तूप इत्यादि तयार अवस्थेंत देणें वगैरे गोष्टी स्पष्ट आहेत.

ब्राह्मणांना दान

या विष्टारी यज्ञाचें दान ब्राह्मणांस दिलें पाहिजे, याविषयीं ८ व्या मंत्रांत म्हटलें आहे—

इमं ओदनं निदधे ब्राह्मणेषु । (मं. ८)

' हें अन्न ब्राह्मणांस देत आहे. ' म्हणजे हें अन्न ब्राह्मणांस मीं वाटून देतों. दुसऱ्या कोणास देऊं नये. असें कां याचा थोडा विचार केला पाहिजे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद हे पंचजन आहेत. यांत क्षत्रिय राज्यव्यवस्थेचें कार्य करतात आणि ऐश्वर्यसंपन्न तसेंच अधिकारसंपन्न असतात, म्हणून त्यांस दान घेण्याची आवश्यकता नाहीं. वैश्य शेती आणि क्रयविक्रय इत्यादि व्यापार करतात तसेंच व्याजपण सावकारी करून मिळवतात, म्हणजे ते धनसंपन्न असल्यानें त्यांस दान घेण्याची आवश्यकता नाहीं. शूद्र सर्व कारागीरी करणारे आणि उत्पादक धंदा करणारे असतात, म्हणजे त्यांचेजवळ सुद्धां धन असतेंच. म्हणजे कामधंदा करून धन मिळविण्याची शक्यता असल्याकारणानें त्यांस दान घेण्याची जरूरी नाहीं. निषाद बहुत करून जंगलांत रहातात, कायम घरें वगैरे करीत नाहींत. जंगलांत जेथें वन्य खाद्य-पेय पदार्थ प्राप्त होतील तेथें जाऊन वास्तव्य करतात म्हणजे ते कोणाजवळ दान मागत नाहींत. म्हणजे शेवटीं राहिले ब्राह्मण ज्यांस कांहीं उत्पादक धंदा नाहीं की, ज्यामुळें ते धन मिळवूं शकतील. राज्यव्यस्थेंत सुद्धां त्यांस विशेष अधिकार नाहीं, त्यामुळें क्षत्रियांप्रमाणें त्यांची समृद्धि वाढूं शकत नाहीं. याप्रमाणें ब्राह्मणांची निर्धनता जन्मसिद्ध आहे. दुसऱ्यानें यांस धनधान्यादि दिलें तर त्यांची वृत्ति चालावयाची, अन्यथा उपाशी रहाणेंच भाग पडावयाचें, म्हणून ब्राह्मणास दान दिलें पाहिजे. ब्राह्मणच दान घेण्यास अधिकारी आहे, याचें सामाजिक दृष्टीनें हें असें कारण आहे.

ब्राह्मणांस दान कां दिलें जावें ?

अन्य वर्णीयांनीं ब्राह्मणांस कां दान द्यावें, याचें कारण शोधलें पाहिजे. या सूक्तांत दानाचें जें फल सांगितलें आहे, तें या संदर्भांत पाहिलें पाहिजे—

(१) शुद्ध, पवित्र, निर्मल आणि विदेही होऊन पवित्र लोकांस प्राप्त करतात. (मं. २)

(२) स्वर्गलोक प्राप्त करतात. (मं. ४)

(३) स्वर्गलोकांत त्यांस मधुररसाच्या धारा प्राप्त होतात. (मं. ५-७)

हीं फलें अलौकिक म्हणजे भूलोकांत प्राप्त होणारीं नाहींत. स्वर्गांत काय होते नि काय नाहीं, या विषयाचें ज्ञान येथें सामान्य मनुष्यास प्राप्त होत नाहीं. तथापि याविषयीं थोडीशी कल्पना येण्यासाठीं स्वर्गाचें थोडेसें स्वरूप येथें सांगतों—

मृत्युलोक

(१) **इहलोक**— या लोकांत मनुष्य जीवित अवस्थेंत रहातो. स्थूल शरीरानें हिंडतो फिरतो, आपल्या स्थूल इंद्रियांनीं सुखदुःखाचा अनुभव प्राप्त करतो. मनुष्यानें जीवित या लोकांत जात असल्यामुळें येथील अनुभव प्रत्यक्षानुभव म्हणून म्हटले जातात.

स्वर्गलोक

(१) **परलोक**- दुसरा लोक. या लोकांत देह सोडल्यानंतर प्राप्त होणाऱ्या लोकांचा समावेश होतो. या स्थूल देहानें या जगांत ज्याप्रकारें व्यवहार होतात, त्याप्रकारें सूक्ष्म देहानें अन्य लोकांत व्यवहार होतात, परंतु थोडा भेद आहे. स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण असे चार प्रकारचे देह मनुष्यास प्राप्त होतात आणि हे एक दुसऱ्याच्या आंत असतात. ज्याप्रमाणें स्थूल देहाचें कार्यक्षेत्र या दृश्य जगांत असतें; त्याप्रकारें सूक्ष्म देहाचें कार्यक्षेत्र सूक्ष्म जगांत असतें. स्थूल देहानें सूक्ष्म जगांत कार्य होऊं शकत नाहीं, परंतु सूक्ष्म देहानें स्थूल जगांत अंशरूपानें प्रेरणेचें कार्य होऊं शकतें, ही गोष्ट सत्य आहे. तरी देखिल मृत्यूनंतर निव्वळ अवशिष्ट सूक्ष्मदेहानें या स्थूल जगांत कार्य होऊं शकत नाहीं. या लोकांचा विचार करण्यासाठीं या व्यवस्थेची चांगली कल्पना असणें आवश्यक आहे.

वासना देह

स्थूल देहाचें कार्य सर्व जाणतात. त्यांत पहिला सूक्ष्म देह '**वासना देह**' आहे. भद्र अथवा अभद्र वासना मनुष्य करतो, त्या या देहानें. जो मनुष्य घातपात, लूटफाट, खून इत्यादि अभद्र वासनांनीं स्वतः स्वतःस अपवित्र करतो आणि अशा प्रकारच्या दुष्ट कमातच आपलें आयुष्य खर्चतो, त्याचा हा वासना देह अत्यंत मलिन होतो आणि जीं मनुष्यें आपल्या वासना पवित्र ठेवतात, शुद्ध, पवित्र, निष्पाप इच्छा धारण करतात त्यांचा वासना देह शुद्ध आणि पवित्र बनतो.

मृत्यु येण्यानें मनुष्याचा स्थूल देह नाश पावला तरी, या स्थूल देहाच्या नाशानें '**वासना देह**' नष्ट होत नाहीं. म्हणजे मृत्युनंतर स्थूल देहाचा नाश झाला तरी जीव या वासना देहानें आपल्या वासना करीत रहातो. आमरणांत हिंसक वृत्तीनें राहिलेल्या मनुष्याच्या वासना हिंसामय क्रूर असतात आणि शांत तसेंच समवृत्तीनें रहाणाऱ्या मनुष्याच्या वासना शांतीनें पूर्ण निर्भय वृत्तीच्या असतात. हिंसापूर्ण वासनांनीं अशांति आणि निर्भयतेच्या वासनांनीं शांति होते. वासना देहाच्या कार्यक्षेत्रांत मनुष्याला याप्रमाणें सुखदुःख निव्वळ स्वतःच्या वासनानुरूप प्राप्त होतें. वाईट वासनांच्या प्राबल्यानें जी अशांति निर्माण होते तिचेंच नांव नरक आहे, आणि शुभ वासनांच्या प्रबलतेनें मनुष्य स्वर्ग सोपानाच्या मार्गानें वर चढतो. म्हणजेच मरणोत्तर कालांत शांति सुखाचा अनुभव करतो. मनुष्य स्वतःचा स्वर्ग अथवा नर्क स्वतः तयार करतो, असें म्हणतात त्याचा हेतु हा असा आहे. जो मनुष्य स्वतःमध्यें सुंदर शुभ वासना स्थिर करतो आणि आत्मशुद्धीचें साधन करतो, तो स्वतःसाठीं स्वर्ग रचतो आणि जो मनुष्य स्वतःमध्यें हीनवासना वाढवितो, तो आपणासाठीं नरकाचा अग्नि प्रज्ज्वलित करतो.

नरकाचें दुःख

कामी आणि क्रोधी मनुष्य आपल्या कुवासना अतृप्त राहिल्यामुळें कसा तडफडत रहातो, याचा अनुभव ज्यांना आहे ते समजूं शकतात कीं, मरणोत्तर कालांत अशुभ वासना भडकून उठल्यानें मृतात्म्याला कसें तडफडावें लागतें, हाच त्याचा नरकवास होय. या वासना देहाच्या वाईट वासनांचें जाळें जोपर्यंत चालतें तोपर्यंत ही तडफड त्याला अत्यंत अपरिहार्य होते आणि दुसरा कोणीहि त्याला या तडफडींतून मोकळा करूं शकत नाहीं. कारण कीं, हे त्याचे कष्ट त्याच्यामधील वासनामुळें होत असतात. जेव्हां वासना पुनः पुनः निर्माण होऊन त्यांचा परिणाम न होण्यामुळें कांहीं थोड्या वेळानंतर स्वतःच नाश पावतात, तेव्हां त्याचा हा नरकवास समाप्त होतो.

याप्रमाणें शुभाशुभ वासनांच्या लहरी उठणें बंद होतें तेव्हां त्याचें भोक्तृत्व समाप्त होतें. जणूं काय यावेळीं त्याचा वासना देह फाटून जातो म्हणजे या वासना देहाचा मृत्यु होतो. या वासना देहानें मनुष्य स्वप्न पहातो. शुभ अथवा अशुभ स्वप्नांचा अनुभव शुभाशुभ वासनामुळें होतो. मनुष्य जर स्वतःस पडणाऱ्या स्वप्नांचा विचार करील तर त्याला आपल्या मरणोत्तर स्थितीची कल्पना येईल. आपल्या वासनांच्या शुभाशुभ अवस्थेचीहि माहिती त्यास मिळेल, तसेंच मरणोत्तर नर्क प्राप्त होईल कीं स्वर्ग प्राप्त होईल याचेंहि ज्ञान प्रत्येकास होऊं शकेल. स्वतःच्या वासनांच्या परीक्षणानें हें समजणें कठीण नाहीं.

कल्पवृक्ष आणि कामधेनु

जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें वासना देहाचा मृत्यु होतो तेव्हां मृतात्म्याचा कारणदेह कार्य करूं लागतो. या देहांत जर त्याचे विचार शुभ आणि सत्यप्रिय झाले तर त्यास नुसत्या कल्पनेनेंच सुख आणि आनंद प्राप्त होतें. जी कल्पना करावी, ती मूर्तरूपानें उपस्थित होते. हेंच कल्पवृक्षाचें स्थान आहे, हीच स्वर्गीय कामधेनु आहे. जी कल्पना निर्माण होईल ती प्रत्यक्ष स्वरूप धारण करून त्याचे सन्मुख येईल. शुभ मंगल कल्पनांनीं सुख आणि इतर कल्पनांनीं दुःख होईल. कल्पवृक्षाखालीं बसलेला मनुष्य जर, वाघाचा हल्ला स्वतःवर होण्याची कल्पना करील तर त्याला कल्पना येतांच वाघाचा हल्ला त्याच्यावर होऊन तो मरून जाईल. यांत कल्पवृक्षाचा काय दोष ? कल्पना करणाऱ्याचा दोष होय. कारण दुसरा कोणी तेथेंच सुमधुर फळांची इच्छा करून सुमधुर फळांचा

आस्वाद करूं शकेल. हें सर्व कल्पनेचे खेळ आहेत. या कारण देहाची अवस्थासुद्धां अशा संकल्पांचाच खेळ आहे, जर त्यानें शुभसंकल्प केले तर यावेळीं (म्हणजे कारणदेहांत) हे शुभ संकल्प अत्यंत सुख देऊं शकतात. स्वर्गलोकांत तूप, दूध, मध, दही इत्यादींच्या मधुर नद्या प्राप्त होतील आणि इतरहि सुखें मिळतील, असें जें या सूक्तांत सांगितलें आहे, तें सुख याप्रकारें शुभ विचारांमुळें त्याला प्राप्त होतें. मधाची कल्पना करतांच तें त्यास प्राप्त होतें आणि याचप्रमाणें इतर सुखेंहि यास मिळतील. मंत्र ५ ते ८ पर्यंत जें स्वर्गसुख वर्णन केलें आहे त्याचें तात्पर्य असें आहे. आठव्या मंत्रांत—

विश्वरूपा धेनुः कामदुघा मे अस्तु । (मं. ८)

' विश्वरूपी कामना पूर्ण करणारी कामधेनु मला स्वर्गांत मिळो ' असें जें म्हटलें आहे, ती कामधेनु यावेळीं याप्रकारें प्राप्त होते. या स्वर्गलोकाच्या संकल्पाच्या प्रभावाचें वर्णन कसें केलें आहे तें पहा—

संकल्पसिद्धि

अथ यद्यन्नपानलोककामो भवति... ॥ ७ ॥
अथ यदि गीतवादितलोककामो भवति ...॥ ८ ॥
अथ यदि स्त्रीलोककामो भवति... ॥ ९ ॥
यं यं कामयते सोऽस्य संकल्पादेव समुत्तिष्ठति तेन संपन्नो महीयते... ॥ १० ॥

(छां. ८।२।७-१०)

' अन्नपान, गाणें बजावणें, स्त्रीसुख इत्यादि जी कांहीं इच्छा तो यावेळीं करतो, त्याच्या नुसत्या कल्पनेनेंच तीं तीं सुखें त्यास प्राप्त होतात. ' हें छांदोग्य उपनिषदांतील वर्णन जर वाचक या सूक्तांतील वर्णनाशीं ताडून पहातील तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं, दोन्ही वर्णनें एकसारखा भावच व्यक्त करीत आहेत.

स्वर्गांत मध, दही, दूध, तूप, शुद्धोदक इत्यादींचे कालवे आहेत ही कांहीं खरी गोष्ट नाहीं. परंतु मधाची कल्पना आल्यानें त्यास पाहिजे तेवढा मधाचा तलाव अथवा प्रवाह प्राप्त होऊं शकतो. आणि त्याच्या सेवनानें प्राप्त होणारा आनंद नुसत्या संकल्पाच्या प्रभावानें मिळूं शकतो.

या सूक्तांत, ' स्वर्गांत पुष्कळ (**बहु स्त्रैणं**) स्त्रीसुख (मं. २); मधुर रसाच्या धारा (**मधुमत् पिन्वमानाः धाराः** मं. ५-७) (**घृतह्रदाः**) तुपाचे तलाव; (**मधुकूलाः**) मधाच्या नद्या; (**क्षीरेण दध्ना पूर्णाः**) दूध आणि दह्यानें भरलेले हौद (मं. ८) ' इत्यादि जें वर्णन आहे तें पूर्वी सांगितल्याप्रमाणें अनुभवास येणारें आहे, हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें. ' कारण ' शरीराची ही अवस्था आहे. येथें नुसत्या संकल्पानें सिद्धि मिळते.

कुराणांत बहिश्त

कुराणशरीफांत जी ' **बहिश्ता** ' ची कल्पना आहे आणि या बहिश्तांत, पाण्याचें स्रोत वाहतात आणि मधाच्या नद्या असण्याचें जें वर्णन आहे तें या सूक्तांतून घेतलेलें आहे असें वाटतें. या सूक्ताच्या पांचव्या मंत्रांत ' **बहिष्ठः** ' शब्द आहे तो स्वर्गदायक यज्ञाचा वाचक आहे आणि त्याबरोबरच स्वर्गाचा सुद्धां दुरान्वयानें वाचक आहे. त्याचेंच रूपांतर कुराणशरीफांत ' **बहिश्त** ' शब्दानें केलें आहे. नदि आणि स्रोत दोन्ही सारखेंच आहेत. परंतु वेदादि ग्रंथांत जी स्वर्गाची विशद कल्पना आहे आणि वर वर्णिलेलें छांदोग्य उपनिषदांतील वर्णनानें जी कल्पना स्पष्ट केली आहे, त्याप्रकारें ती कुराणांत नाहीं. त्यामुळें ग्रंथ मानणाऱ्यास खरोखरच असें वाटतें कीं, स्वर्गांत मधाच्या नद्या आहेत. परंतु वैदिक ग्रंथांत स्वर्गाची स्पष्ट कल्पना दिली आहे, त्यामुळें आम्हांस कळते कीं, संकल्पशक्तिमुळें सांगितल्याप्रमाणें अनुभव येतात, आणि ' **कारण** ' शरीराच्या अवस्थेंत तेथील अनुभव नक्कीच सत्य आहेत. अन्य धर्मांच्या ग्रंथांतील वचनांची जर वेदवचनांशीं तुलना केली, तर त्यांतील संदिग्ध वचनांचा सत्य अर्थ नीट ध्यानीं येईल आणि धर्मवचनांचा सत्य अर्थ सर्वांस समजेल. असें होण्यानें कित्येक भांडणें बंद होतील. परंतु असें होण्यास धर्मग्रंथांच्या वचनांचा अभ्यास तुलनात्मक दृष्टीनें होणें जरूरीचें आहे. जेव्हां तो शुभ अवसर प्राप्त होईल तेव्हां सत्यधर्माचा प्रचार आणि विचार संभवनीय आहे.

मनो--रथ

अशाप्रकारें स्वर्गांतील पुष्करिणी आणि कामधेनु म्हणजे काय, त्याचें तात्पर्य काय आणि त्याचा अनुभव कधीं कसा असतो; या गोष्टींचा एथवर विचार झाला. स्वर्गाचा अनुभव ' **कारण** ' शरीरांत वरसांगितल्याप्रमाणें होतो. यालाच ' **मनोदेह** ' अथवा ' **मनो-रथ** ' म्हणजे मनरूपी रथ असेंसुद्धां म्हणतात. याचें वर्णन चौथ्या मंत्रांत अशाप्रकारें आहे—

रथी ह भूत्वा रथयान ईयते । (मं. ४)

' हा रथांत बसतो आणि महारथी होऊन चालतो.' हा त्याचा ' मनोरथ ' च आहे. मनाच्या संकल्परूपी रथांत बसतो आणि ज्या सुखाची इच्छा करतो तें संकल्प करतांच प्राप्त करतो. यावरून वाचकांनींच विचार करावा कीं मनानें संकल्प जीविताच्या अंतापर्यंत स्थिर करणें किती आवश्यक आहे. संकल्प अशुभ झाले

तर ते राक्षस होऊन यावेळीं याच्यासाठीं लागतात आणि अनेक भयंकर दृश्यांचा अनुभव याला त्यावेळीं येतो. भयंकर भीतीनें घाबरून जातो. याची कल्पना पूर्वींच्या वर्णनावरून वाचकांस येईल.

शुभसंकल्प मनांत स्थिर करणाऱ्यांसाठीं जे लाभ आहेत त्यांचें वर्णन या सूक्तांत खालीं दिल्याप्रमाणें केलें आहे—

नैषां शिश्नं प्र दहति जातवेदाः । (मं. २)
नैनान् यमः परि मुष्णाति रेतः । (मं. ४)

' अग्नि शुभसंकल्पधारी मनुष्याचें शिश्न जाळीत नाहीं आणि यम त्याचें वीर्य कमी करीत नाहीं. ' म्हणजे जो अशुभ विचारांचें सतत चिंतन करीत रहातो त्याचें शिश्न अग्नि जाळतो आणि यम त्याला निर्वीय करतो. या अशुभ विचारांमुळें तो मनुष्य इंद्रियशक्तीनें हीन होतो आणि क्षीण वीर्य बनतो. या जगांत हा अनुभव वाचकांस मिळूं शकतो. जो दुराचारी असतो आणि आपल्या दुष्ट विचारांनीं आपलें मन कलंकित करतो, तो येथेंच या लोकीं क्षयी आणि निर्वीय तसेंच निस्तेज होतो. मृत्यूच्या पश्चात् वासना देहामध्यें ज्यावेळीं त्याच्या वासना भडकून उठतात, त्यावेळीं त्या आगींत जळण्यामुळें काय वेदना होत असतील त्या वाचक कल्पनेनेंच जाणूं शकतील. विषय वासनेच्या ज्वाला भडकून त्याला क्षणाक्षणाला जाळीत असतात आणि त्यावेळीं ती आग असह्य होते. ही अनियमित वागणारांची अवस्था आहे. धर्मनियमानें वर्तणाऱ्यांची अवस्था कशी असते ती पहा—

यमांचें पालन

(यः) यम आस्ते (स) उप याति देवान् । (मं. ३)

' जो यमांत रहातो तो देवांस प्राप्त होतो.' म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पांच यम जो आपल्या आचरणांत आणतो, तो स्वर्गनिवासी देवच होऊन जातो. शुभ विचार त्याचे मनांत स्थिर रहाण्यामुळें मृत्युनंतर दुष्ट वासनांचे कष्ट—पीडा—त्रास त्याला होतच नाहींत, परंतु सरळ तो स्वर्गधामांत कल्पवृक्षाच्या वनांत कामधेनूचें दूध पीत आणि अमृतरसधारांचा मधुर स्वाद घेत पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें आनंदानें रममाण होत विचरतो. तो संकल्पामुळें शुद्ध, पवित्र आणि मलहीन होऊन परिशुद्ध पवित्र अवस्थेंत हिंडत असतो. (मं. २) मनुष्यानें प्रयत्नांनीं स्वतःची अशी मनोभूमिका केली पाहिजे. अशी ही सर्व उन्नति यज्ञानें प्राप्त होते आणि यासाठींच या ' विष्टारी ' यज्ञाची रचना आहे.

ब्राह्मणाचें घर

या यज्ञांत ब्राह्मणांस अन्नदान केलें जातें. येथें असा एक प्रश्न उपस्थित होतो की अन्नदान ब्राह्मणांसच कां केलें जातें आणि त्याचें एवढें फल कां ? ब्राह्मण म्हणजे कांहीं केवळ एक गृहस्थ एवढीच कल्पना नव्हे. प्रत्येक ब्राह्मण अध्ययन अध्यापन करणारा असल्यामुळें प्रत्येक खऱ्या ब्राह्मणाचें घर विद्यालय अथवा विश्व-विद्यालय असतें, त्यामुळें जें दान अशा ब्राह्मणास दिलें जातें तें या विश्वविद्यालयाला दिल्यासारखेंच आहे. थोड्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या ब्राह्मणास अध्यापक म्हणत असत, शेंकडों विद्यार्थ्यांस विद्यादान करणाऱ्या ब्राह्मणांस आचार्य पदवी असते, आणि हजारों विद्यार्थ्यांस विद्यादान करणाऱ्या ब्राह्मणास कुलपति म्हणतात. म्हणजे अशा कुलपतिच्या हाताखालीं अनेक आचार्य आणि शेंकडों अध्यापक असतात. अर्थात् ब्राह्मणाचा अर्थ गुरुकुल, विद्यालय आणि विश्वविद्यालयाचे आचार्य आणि भट्टाचार्य—कुलपति—यांना दान दिल्यानें तें दान सर्व विद्यार्थ्यांचें कल्याण करतें म्हणजे परंपरेनें तें दान राष्ट्रांतील प्रत्येक घरापर्यंत पोहोंचतें.

गुरु-कुल

राष्ट्रांतील विद्यार्थी प्रायः त्रैवर्णीय विद्यार्थी अथवा वेळोवेळीं पंचवर्णीय विद्यार्थी ब्राह्मणांच्या घरांत राहून विद्याभ्यास करीत होते. अध्यापन न करणारा असा सहसा कोणी ब्राह्मण नसे. एक एका कुलपतीच्या आश्रमांत दहा हजार ते साठ हजारापर्यंत विद्यार्थी शिकत असत आणि बहुतेक ब्राह्मणांचीं घरें ' गुरु-कुल ' असत. ही परिस्थिति जर वाचक नजरेसमोर आणूं शकेल तर त्याला सहज समजेल की ब्राह्मणांस दिलेलें दान सर्व राष्ट्रांत आणि सर्व जनतेपर्यंत कसें पसरत असे आणि पसरून प्रत्येकाजवळ कशाप्रकारें पोहोंचत असे.

दानाची रीत

अशा ब्राह्मणाच्या आश्रमभूमींत विहीरी खणणें, जलदान करणें, पुष्कळ दूध देणाऱ्या गाई त्यांना देऊन दूध देणें, मध, मीठ, खडीसाखर, तूप, लोणी इत्यादींचें दान करणें, गहूं, तांदूळ वगैरे धान्यें देणें अथवा ज्यांत उत्तम धान्य पिकतें अशी भूमि दान देणें अथवा आश्रमांत धान्य घेऊन जाऊन शिजवून तेथील आश्रमवासीयांस भोजन देणें, अथवा लाडू, मिठाई इत्यादि पदार्थ तयार करून तेथें, पाठविणें किंवा अन्यरीतीनें अन्नदान करणें ही विष्टारी यज्ञाची रीत आहे. हा मोठा उपकारक यज्ञ आहे आणि हा दानयज्ञ करण्यानें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें स्वर्ग वगैरे सर्व सुखें प्राप्त होऊं शकतात.

शुभ भावनेची स्थिरता

जेव्हां मनुष्य याप्रकारचें दान करतो, तेव्हां त्याच्या मनांत शुभ भावना असतात. वारंवार याप्रकारचें दान करण्यानें त्या शुभ भावना मनांत स्थिर होऊन जातात. दान करण्यानें मनाची प्रसन्नता सुद्धां वाढते. स्वतः विषयभोगानें जेवढें सुख समाधान होतें त्यापेक्षां दान देण्यानें जास्त सुख-प्रसन्नता प्राप्त होते आणि वारंवार दान देण्यानें त्या मनामध्यें स्थिर होतात. अशा‐प्रकारें हा विष्टारी यज्ञ मनुष्याच्या मनावर शुभ संस्कार स्थिर करतो. हेच शुभ संस्कार जीवित अवस्थेंत त्याचें मन प्रसन्न राहण्यास सहाय्यभूत होतात आणि मरणोत्तरसुद्धां वर सांगित‐ल्याप्रकारें प्रसन्नता देतात. अशाप्रकारें हा यज्ञ मनुष्याची उन्नति करतो.

यज्ञाचें सत्य फल

कांड ६, सूक्त ११४

(ऋषिः - ब्रह्मा । देवता – विश्वेदेवाः ।)

यद्देवा देवहेडनं देवासश्चकृमा वयम् । आदित्यास्तस्मान्नो यूयमृतस्यर्तेन मुञ्चत ॥ १ ॥
ऋतस्यर्तेनादित्या यजत्रा मुञ्चतेह नः । यज्ञं यद्यज्ञवाहसः शिक्षन्तो नोपशेकिम ॥ २ ॥
मेदस्वता यजमानाः स्रुचाज्यानि जुह्वतः । अकामा विश्वे वो देवाः शिक्षन्तो नोपशेकिम ॥ ३ ॥

अर्थ— हे (देवासः) देव हो ! (वयं देवासः यत् देवहेडनं चकृम) आम्हीं स्वतः दैवीशक्तीनें युक्त होऊन सुद्धां जो देवांचा अनादर करतों, हे (आदित्याः) आदित्य हो ! (यूयं तस्मात् नः ऋतस्य ऋतेन मुञ्चत) तुम्ही सर्व त्यांपासून आम्हांस यज्ञाच्या सत्यानें सोडवा. [१]

हे (आदित्याः) आदित्य हो ! हे (यजत्राः) यज्ञ करणाऱ्यांनों ! हे (यज्ञवाहसः) यज्ञ चालविणाऱ्यांनों ! (यत् यज्ञं शिक्षन्तः न उपशेकिम) जर आम्हीं यज्ञाचें शिक्षण प्राप्त करूनहि त्यास यथावत् करूं शकलों नाहीं, (नः ऋतस्य ऋतेन इह मुञ्चत) आम्हांस यज्ञाच्या सत्यद्वारा येथें मुक्त करा. [२]

हे (विश्वेदेवाः) सर्व देव हो ! (वः शिक्षन्तः अकामाः न उपशेकिम) आपणांजवळून शिक्षण प्राप्त करून आम्हीं विफल होऊन जर त्यास पूर्ण करूं शकलों नाहीं, तरीसुद्धां (मेदस्वता स्रुचा आज्यानि जुह्वतः) घृतयुक्त चमसानें तूप हवन करीत आम्हीं (यजमानाः) यजमान तर होऊंच. [३]

भावार्थ— देवांविषयीं जो तिरस्कार आमच्याकडून कधीं कधीं होतो, तर त्या पापांपासून आम्हीं यज्ञाच्या सत्यफलाच्या सहाय्यानें मुक्त व्हावें. [१]

आम्हीं आमच्याकडून सांग यज्ञाची तयारी करतों, तरीसुद्धां त्यांत जे कांहीं दोष अथवा उणीवा रहातात, त्या पापांपासून आम्हीं यज्ञाच्या सत्यफलाच्या सहाय्यानें मुक्त होऊं. [२]

आम्हीं उत्तम ज्ञान प्राप्त केलें तरीसुद्धां जो दोष आमच्याकडून घडतो, त्याचें निवारण यज्ञांत ज्या तुपाच्या आहुति आम्हीं देतों त्यानें व्हावें आणि आम्हीं उत्तम यज्ञकर्ता व्हावें. [३]

मनुष्यानें दोष टाळण्याचा, काढून टाकण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्याचेकडून अनेक दोष होतात. सत्ययज्ञानेंच ते दोष दूर होऊं शकतात. यज्ञ करण्याचा भाव असा आहे की, जनतेच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण करणें. हा यज्ञ सर्व दोषांस दूर करूं शकतो.

यज्ञानें उन्नति

कांड ६, सूक्त ५

(ऋषिः - अथर्वा देवता - इन्द्राग्नी ।)

उदेनमुत्तरं नयाग्ने घृतेनाहुत । समेनं वर्चसा सृज प्रजया च बहुं कृधि ॥ १ ॥
इन्द्रेमं प्रतरं कृधि सजातानामसद्वशी । रायस्पोषेण सं सृज जीवातवे जरसे नय ॥ २ ॥
यस्य कृण्मो हविर्गृहे तमग्ने वर्धया त्वम् । तस्मै सोमो अधि ब्रवदयं च ब्रह्मणस्पतिः ॥ ३ ॥

अर्थ— हे (घृतेन आहुत अग्ने) तुपाच्या आहुति मिळालेल्या अग्नि ! (एनं उत्तरं उन्नय) या मनुष्याला अधिक उच्च कर. (एनं वर्चसा संसृज) याला तेजानें संयुक्त कर. (च प्रजया बहुं कृधि) आणि प्रजेनें समृद्ध कर. [१]

हे इन्द्रा ! (इमं प्रतरं कृधि) या मनुष्यास उच्च कर. हा (सजातानां वशी असत्) मनुष्य स्वजातीयां-मध्यें सर्वांना वश करणारा होवो. (रायस्पोषेण संसृज) याला धन आणि पुष्टि उत्तमप्रकारें प्राप्त होवो आणि (जीवातवे जरसे नय) दीर्घायुष्यासाठीं वृद्धत्वापर्यंत सुखानें घेऊन जा. [२]

हे अग्ने ! (यस्य गृहे हविः कृण्मः) ज्याच्या घरांत आम्हीं हवन करतों (त्वं तं वर्धय) तूं त्याला वाढव. (सोमः अयं च ब्रह्मणस्पतिः) सोम आणि हा ब्रह्मणस्पति (तस्मै अधि ब्रवत्) याला आशीर्वाद देवोत. [३]

हवनानें आरोग्य

ज्याच्या घरांत हवन होतें त्याची वृद्धि होतें आणि सर्वप्रकारची उन्नति होते. याविषयीं पहा—

१ **एनं उत्तरं**- ज्याच्या घरांत हवन होतें, तो (उत्+तरः) अधिक उच्च होतो. पूर्वीपेक्षां अधिक उन्नत होतो.

२ **वर्चसा सं**- ज्याच्या घरांत हवन होतें, तो तेजस्वी होतो.

३ **प्रजया बहुः**- ज्याच्या घरांत हवन होतें, त्यास उत्तम संतति भरपूर प्राप्त होते.

४ **इमं प्रतरं**- ज्याच्या घरांत हवन होतें, तो अधिक उच्च होतो. सर्वप्रकारें श्रेष्ठ होतो.

५ **सजातानां वशी**- सजातीयांस आपल्या स्वाधीन करणारा होतो, जो दररोज हवन करतो.

६ **रायस्पोषेणं सं**- त्याचें धन आणि पुष्टि वाढते, तो हृष्टपुष्ट होतो.

७ **जीवातवे जरसे नय**- त्यास दीर्घायुष्य प्राप्त होतें.

म्हणजे ज्याचें घरांत हवन होतें त्याची सर्व प्रकारें उन्नति होतें. दररोज त्यास सुख आणि सौभाग्य प्राप्त होतें, म्हणून दररोज हवन करणें लाभकारक आहे. हवनानें आरोग्य, बल, दीर्घायुष्य प्राप्त होऊन धन, यश आणि अन्य सर्व प्रकारचा अभ्युदय आणि निःश्रेयससुद्धां प्राप्त होतात.

यज्ञांत आत्मसमर्पण

कांड २, सूक्त ३५

(ऋषिः - अङ्गिराः । देवता - विश्वकर्मा ।)

ये भ॒क्षय॑न्तो॒ न वसू॑न्यानृ॒धुर्यान॒ग्नयो॑ अ॒न्वत॑प्यन्त॒ धिष्ण्याः॑ ।
या तेषा॑मव॒या दुरि॑ष्टिः॒ स्वि॑ष्टिं॒ नस्तां कृ॑णवद्वि॒श्वक॑र्मा ॥ १ ॥
य॒ज्ञप॑ति॒मृष॑य॒ एन॑साहुर्निर्भ॑क्तं प्र॒जा अ॑नुत॒प्यमा॑नम् ।
म॒थ॒व्या॑न्त्स्तो॒कानप॒ यान्र॒राध॒ सं न॒ष्टेभिः॑ सृजतु॒ वि॒श्वक॑र्मा ॥ २ ॥
अ॒दा॒न्या॑न्त्सो॒म॒पान्मन्य॑मानो य॒ज्ञस्य॑ वि॒द्वान्त्स॑म॒ये न धीरः॑ ।
यदेन॑श्चकृ॒वान्ब॒द्ध ए॒ष तं वि॑श्वकर्म॒न्प्र मु॑ञ्चा स्व॒स्तये॑ ॥ ३ ॥

अर्थ— (ये भक्षयन्त) जीं मनुष्यें अन्न सेवन करीत असून सुद्धां (वसूनि न आनृधुः) चांगल्या गोष्टीची वृद्धि करीत नाहीं, तसेंच (यान् धिष्ण्या अग्नयः) ज्यांच्यासंबंधीं बुद्धिचे अग्नि (अन्वतप्यन्त) पश्चात्ताप करतात, (तेषां या अवया दुरिष्टिः) त्यांची जी अवनतिकारक सदोष इष्टीची पद्धति आहे, (विश्वकर्मा तां नः सु-इष्टिं कृणवत्) विश्वाची रचना करणारा देव तिला आमच्यासाठीं उत्तम इष्टि करो. [१]

(प्रजाः अनुतप्यमानं) प्रजेविषयीं अनुताप करणारे, (यज्ञपतिं ऋषयः एनसा निर्भक्तं आहुः) यज्ञाच्या पतीला ऋषि पापापासून निराळा समजतात. (यान् मथव्यान् अप रराध) ज्या घुसळण्यासारख्या योग्य रसभागांस समर्पण करीत राहिला (विश्वकर्मा तेभिः नः सं सृजतु) विश्वाची रचना करणारा त्यांच्याशीं आम्हांस संयुक्त करो. [२]

(सोमपान् अदान्यान् मन्यमानः) सोमपान-यज्ञ करणाऱ्यांना दान देण्यास अयोग्य समजणारा (न यज्ञस्य विद्वान्) यज्ञाचा ज्ञाताहि नसतो आणि (न समये धीरः) योग्य समयीं धैर्य धारण करणाराहि नसतो. (एषः बद्धः यत् एनः चकृवान्) हा बद्ध झालेला मनुष्य जीं पापें करतो, हे (विश्वकर्मन्) विश्वाची रचना करणाऱ्या ! (तं स्वस्तये प्रमुञ्च) त्याच्या कल्याणासाठीं त्याला सुटा कर, मोकळा कर. [३]

भावार्थ— जे अन्न खात असूनहि श्रेष्ठ कर्तव्य करीत नाहींत. ज्यामुळें त्यांच्या बुद्धीमध्यें राहणारा अग्नि सुद्धां अत्यंत पश्चात्ताप करतो, त्यांच्याकडून जे दोष होतात ते सुधरोत आणि विश्वकर्त्याच्या कृपेनें ते आमच्या सत्कर्मांत संमिलित होवोत. [१]

दुःखी प्रजाजनांसंबंधीं हृदयानें तापणाऱ्या यज्ञकर्त्या पुरुषास निष्पाप समजतात, जो सोमाचें मंथन करून यज्ञ करतो, विश्वकर्माच्या कृपेनें आमचा संबंध त्याच्याशीं जडो. [२]

जो यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणास दान देण्यास अयोग्य समजतो, यज्ञाचें तत्त्व ज्यास समजलेलें नसतें आणि जो वेळेवर धैर्यहि दाखवीत नाहीं किंवा समर्थहि होत नाहीं. असा अज्ञानी मनुष्य या बद्धावस्थेंत जें पाप करतो, त्यापासून विश्वकर्ताच त्यास सोडवो आणि त्याचें कल्याण करो. [३]

घोरा ऋषयो नमो अस्त्वेभ्यश्चक्षुर्यदेषां मनसश्च सत्यम् ।
बृहस्पतये महिष द्युमन्नमो विश्वकर्मन्नमस्ते पाह्य१स्मान् ॥ ४ ॥
यज्ञस्य चक्षुः प्रभृतिर्मुखं च वाचा श्रोत्रेण मनसा जुहोमि ।
इमं यज्ञं विततं विश्वकर्मणा देवा यन्तु सुमनस्यमानाः ॥ ५ ॥

अर्थ— (**ऋषयः घोराः**) ऋषि अत्यंत तेजस्वी असतात, (**एभ्यः नमः अस्तु**) त्यांना नमस्कार असो. (**यत् एषां चक्षुः मनः च सत्यं**) कारण कीं यांचे डोळे आणि मन सत्य भावनेनें पूर्ण असतात. हे (**महिष विश्वकर्मन्**) विश्वाच्या बलवान् रचना करणाऱ्या ! (**बृहस्पतये द्युमत् नमः**) ज्ञानपतीला व्यक्त नमस्कार असो. (**अस्मान् पाहि**) आमचें रक्षण कर, (**ते नमः**) तुला नमस्कार असो. [४]

(**यज्ञस्य चक्षुः प्रभृतिः मुखं च**) जो यज्ञाचा डोळा, भरणकर्ता आणि मुखासमान आहे त्याला (**वाचा श्रोत्रेण मनसा जुहोमि**) वाणी, कान आणि मनानें अर्पण करतों, (**सुमनस्यमानाः देवाः**) उत्तम मनाचे देव (**विश्वकर्मणा विततं इमं यज्ञं आयन्तु**) विश्वाच्या कर्त्या मार्फत प्रसारलेल्या या यज्ञाकडे येवोत. [५]

भावार्थ— ऋषि अत्यंत तेजस्वी आणि प्रभावशाली असतात, कारण कीं त्यांच्या मनांत तसेंच दृष्टींत सत्य चमकत असतें, अशा ज्ञान्यांस आम्हीं प्रणाम करतों. हे सर्व शक्तिमान् विश्वाच्या कर्त्या ! आमचें सर्व प्रकारें रक्षण कर. तुला आम्हीं वारंवार नमस्कार करतों. [४]

मीं आपल्या वाणी, कान आणि मनानें यज्ञचे चक्षु, पोट आणि मुखांत आत्मार्पण करतों कारण कीं विश्वकर्त्यानें हा यज्ञ प्रसरविला आहे. त्यामध्यें सर्व देव येऊन कार्य करतात. [५]

यज्ञांत आत्मसमर्पण

अयाजकांची निंदा

पहिल्या आणि तिसऱ्या मंत्रांत अयाजकांची निंदा आहे. असें म्हटलें आहे कीं– ' जो अन्न खातो परंतु यज्ञासारखीं सत्कर्में करण्याची आवड त्यास होत नाहीं, दुसरेंहि कांहीं सत्कर्म करीत नाहीं, सद्भावना प्रसरवीत नाहीं. ' (मं. १) त्याला सद्गति कशी प्राप्त होईल ? मनुष्याच्या बुद्धींत कित्येक प्रकारचे अग्नि आहेत, ते सत्कर्म, सद्भावना आणि सद्विचाराच्या अभावामुळें याच्या बुद्धींत वास्तव्य करण्याबद्दल पश्चात्ताप पावतात. कारण दुष्ट मार्गांत सर्वदा रत होण्यामुळें हा मनुष्य स्वतःच्या शक्तींचा विकास करूं शकत नाहीं. ' धिषणा ' शब्द बुद्धीचा वाचक आहे. त्यामध्यें रहाणारा ' **धिष्ण्यः अग्निः** ' आहे. प्रत्येक मनुष्याच्या बुद्धींत तो राहतो. असा मनुष्य जेव्हां पाप करतो, तेव्हां त्यांतून त्याला परमात्माच वाचवो आणि तो सुधारून प्रशस्ततम यज्ञ कर्मांत रत होऊन जावो. (मं. १) यज्ञ करणारे ब्राह्मण श्रेष्ठ असतात. याविषयीं कोणास शंका असण्याचें कारण नाहीं. परंतु, ' जो मनुष्य असा श्रेष्ठ, ब्राह्मणांनाहि दान देण्यास योग्य समजत नाहीं त्यास यज्ञाचें तत्त्वहि समजलें नाहीं अथवा वेळेचें महत्त्वसुद्धां कळत नाहीं. ही त्याची स्थिति बंधन युक्त आहे. या स्थितींत जो जें कांहीं कर्म करतो, तें पापमयच असणार यांत कांहीं संशय नाहीं. परमात्मा त्याला या पापांपासून वाचवो आणि सन्मार्गानें चालवो. (मं. ३) '

अशा प्रकारें या दोन मंत्रांत अयाजकांची निंदा केली आहे.

याचकांची प्रशंसा

' दुसऱ्या मंत्रांत याजकांची प्रशंसा केली आहे. ' जो दीन आणि दुःखी प्रजेकडे अनुतापाच्या भावनेनें पहातो आणि तिच्या कल्याणाचें चिंतन करतो, तो याजक निष्पाप आहे, अशा याजकांशीं परमात्म्याच्या कृपेनें आमचा स्थिर संबंध होवो. ' (मं. २) यज्ञानेंच पाप दूर होतें आणि दुसऱ्याच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण करणें यज्ञ आहे. तो पाप दूर करण्यास समर्थ आहे.

ऋषींची प्रशंसा

चौथ्या मंत्रांत ऋषींची प्रशंसा या प्रकारें केली आहे– ' ऋषि अत्यंत तेजस्वी असतात आणि त्यांच्या मनांत तसेंच दृष्टींत सत्य रहातें. अशा ऋषींना नमस्कार असो. (मं. ४)

या वर्णनात (घोरा ऋषयः) ऋषींना ' घोर ' हें विशेषण लावलें आहे. त्याचा अर्थ ' उच्च ' (Sublime) श्रेष्ठ उन्नत असा होतो. ऋषि उन्नत होण्याचा हेतु या मंत्रात असा सांगितला आहे कीं, ' त्यांच्या दृष्टींत आणि मनांत नेहमीं सत्य रहातें ' ते असत्य विचार कधीं मनांत आणीत नाहींत आणि त्यांची दृष्टि सत्यानें उज्ज्वल झालेली असते. ही गोष्ट तर ऋषि विषयीं झाली. परंतु आम्हांस येथें असा बोध प्राप्त होतो कीं, ' ज्याच्या मनांत आणि दृष्टींत ओतप्रोत सत्य असतें तो मनुष्य सुद्धा ऋषींप्रमाणें उच्च होईल. ' हा उच्च होण्याचा उपाय आहे. सत्यपालन केल्यानें मनुष्य उच्च होतो.

विश्वकर्त्याची पूजा

या सूक्ताची देवता ' विश्वकर्मा ' आहे. विश्वाचा कर्ता एक प्रभु आहे, त्याची उपासना करणें मनुष्य मात्राचें कर्तव्य आहे. ' याच प्रभूनें यज्ञरूपी प्रशस्त कर्म प्रारंभिलें आहे. ' (मं. ५) या प्रभूनें आत्मसमर्पण करून संपूर्ण जीवनाच्या कल्याणासाठीं विश्वरूपी महान् यज्ञाची रचना सर्व प्रथम केली आहे, ती पाहून इतर महात्म्यांनीं सुद्धां विविध यत्न करण्यास प्रारंभ केला. यासाठीं अशा ' विश्वकर्त्याला आम्हीं नमन करतों. तो आमचें सर्वांचें रक्षण करो. ' (मं. ४) अशा प्रकारें त्या प्रभूची उपासना आणि पूजा करणें मनुष्य मात्रास इष्ट आहे.

याप्रमाणें हें सूक्त आत्मसमर्पण करण्याचा उपदेश देत आहे. हें सूक्त प्रत्येक मनुष्यास सांगते कीं—

वाचा श्रोत्रेण मनसा च जुहोमि । (मं. ५)

' वाणी, कान आणि मनानें अर्पण करतों. ' यज्ञांत आत्मसमर्पण करण्याची तयारी प्रत्येक मनुष्यानें करावी, समर्पणाचे समयीं माघार घेऊं नये. कारण कीं या प्रकारच्या समर्पणानेंच उच्च अवस्था प्राप्त होते.

कालाचा यज्ञ

कांड ३, सूक्त १०

(ऋषिः – अथर्वा । देवता – एकाष्टका: ।)

प्रथमा ह व्युवास सा धेनुरभवद्यमे । सा नः पयस्वती दुहामुत्तरामुत्तरां समाम् ॥ १ ॥
यां देवाः प्रतिनन्दन्ति रात्रिं धेनुमुपायतीम् । संवत्सरस्य या पत्नी सा नो अस्तु सुमङ्गली ॥ २ ॥
संवत्सरस्य प्रतिमां यां त्वा रात्र्युपास्महे । सा न आयुष्मतीं प्रजां रायस्पोषेण सं सृज ॥ ३ ॥

अर्थ— (प्रथमा ह वि+उवास) पाहिल्या उषेच्या उदयाची वेळ प्राप्त झाली. (सा यमे धेनुः अभवत्) ती नियमांत धेनुसारखी झाली. (सा पयस्वती) ती दूध देणारी गाय (नः उत्तरां उत्तरां समां दुहां) आमच्यासाठीं उत्तरोत्तर म्हणजे येणाऱ्या वर्षांत दूध देत राहो. [१]

(देवाः) देव (यां उपायतीं रात्रिं धेनुं) ज्या येणाऱ्या रात्ररूपी गाईंस पाहून (प्रतिनन्दन्ति) आनंदित होतात. (या संवत्सरस्य पत्नी) जी संवत्सराची पत्नीरूप आहे (सा नः सुमंगली अस्तु) ती आमचें मंगल करणारी होवो. [२]

हे (रात्रि) रात्री ! (यां त्वा) ज्या तुला (संवत्सरस्य प्रतिमां) संवत्सराची प्रतिमा मानून (उपास्महे) आम्हीं सर्व भजतों, (सा नः आयुष्मतीं प्रजां) त्या आमच्या दीर्घायुषी प्रजेला (रायस्पोषेण संसृज) धनाच्या समृद्धीनें संयुक्त कर. [३]

भावार्थ— पहिली उषा उदयास प्राप्त झाली आहे. जो सुनियमाचें पालन करतो, त्याच्यासाठीं ही वेळ कामधेनूप्रमाणें अमृतरस देणारी आहे. म्हणून ही वेळ आमच्यासाठीं भविष्यकालीं आमच्या आयुष्यांत अमृतरस देणारी होवो. [१]

प्राप्त होणारी ही रात्ररूपी कामधेनू पाहून देव आनंदित होतात. ही संवत्सराची पत्नीरूपी वेळा आमचें उत्तम मंगल करणारी होवो. [२]

संवत्सराची प्रतिमारूप ही रात्र आहे, हिची उपासना आम्हीं करतों, त्यामुळें ती आमच्या संतानांस दीर्घायु, धन आणि पुष्टि देवो. [३]

इयमेव सा या प्रथमा व्यौच्छदास्वितरासु चरति प्रविष्टा ।
महान्तो अस्यां महिमानो अन्तर्वधूर्जिगाय नवगज्जनित्री ॥ ४ ॥
वानस्पत्या ग्रावाणो घोषमक्रत हविष्कृण्वन्तः परिवत्सरीणम् ।
एकाष्टके सुप्रजसः सुवीरा वयं स्याम पतयो रयीणाम् ॥ ५ ॥
इडायास्पदं घृतवत्सरीसृपं जातवेदः प्रति हव्या गृभाय ।
ये ग्राम्याः पशवो विश्वरूपास्तेषां सप्तानां मयि रन्तिरस्तु ॥ ६ ॥
आ मा पुष्टे च पोषे च देवानां सुमतौ स्याम ।
पूर्णा दर्वे परा पत सुपूर्णा पुनरा पत । सर्वान्यज्ञान्त्संभुञ्जतीषमूर्जं न आ भर ॥ ७ ॥
आयमगन्त्संवत्सरः पतिरेकाष्टके तव । सा न आयुष्मतीं प्रजां रायस्पोषेण सं सृज ॥ ८ ॥

अर्थ- (इयं एव सा) तीच ही आहे कीं (या प्रथमा व्यौच्छत्) जी प्रथम प्रगट झाली आणि जो (आसु इतरासु प्रविष्टा चरति) या इतरांत प्रवेशून जाते. (अस्यां अन्तः महान्तः महिमानः) हिच्या मध्यें फार मोठे महिमा आहेत. (नवगत् वधूः जनित्री जिगाय) ही नूतन वधू माता होऊन विजय प्राप्त करते. [४]

(परिवत्सरीणं हविः कृण्वन्तः) सांवत्सरिक यज्ञाचें अन्न तयार करणारे (वानस्पत्याः ग्रावाणः घोषं अक्रत) वनस्पतीशीं संबंधित दगड शब्द करीत आहेत. हे (एकाष्टके) एक अष्टके ! (वयं सुप्रजसः सुवीराः) आम्हीं सर्व उत्तम संततिनें युक्त आणि उत्तम वीरांनीं युक्त तसेंच (रयीणां पतयः स्याम) धनाचे स्वामी व्हावें. [५]

हे (जातवेदः) उत्पन्न पदार्थांस जाणणाऱ्या अग्ने ! (इडायाः घृतवत् सरीसृपं पदं प्रति) गाईच्या तुपानें युक्त स्रवणाऱ्या स्थानाप्रत (हव्या गृभाय) हव्यास ग्रहण कर. (ये ग्राम्याः विश्वरूपाः पशवः) जे ग्राम्य अनेक रूपांचे पशू आहेत (तेषां सप्तानां रन्तिः मयि अस्तु) त्या सातांची प्रीति मजमध्यें असो. [६]

हे (रात्रि) रात्रे ! (पुष्टे च पोषे च मा आभर) पुष्टि आणि पोषक यासंबंधीं मला भरपूर कर. आम्हीं (देवानां सुमतौ स्याम) देवांच्या सुमतींत असावें. हे (दर्वे) चमसा ! तूं (पूर्णा परा पत) पूर्ण भरून दूर जा आणि (सुपूर्णा पुनः आपत) उत्तम होऊन पुनः जवळ ये. (सर्वान् संभुञ्जती) सर्व यज्ञाचें उत्तम प्रकारें सेवन करीत (नः इषं ऊर्जं आभर) आम्हांसाठीं अन्न आणि बल आणून (आम्हांस) भरपूर कर. [७]

हे (एकाष्टके) एकाष्टके ! (अयं संवत्सरः) हा संवत्सर (ते पतिः) तुझा पति होऊन (आ अगन्) आला आहे. (सा) अशी तूं (न आयुष्मतीं प्रजां) आमच्या दीर्घायु प्रजेला (रायः पोषेण सं सृज) धनाच्या पुष्टीनें युक्त कर. [८]

भावार्थ-ही तीच वेळ जी प्रथम प्रगट झाली होती आणि जी अन्य वेळांशीं संयुक्त होऊन चालते. या वेळेंत अनेक महत्त्वपूर्ण शक्ति आहेत. ज्याप्रमाणें नवी कुलवधु प्रथम संतानास जन्म देऊन कुळाचें यश वाढवते, त्याप्रमाणें ही वेळा विजय प्राप्त करते. [४]

आज सांवत्सरिक हवनाची सामग्री तयार करणारे-सोमरस काढणारे दगड आणि काष्टयंत्र अवाज करीत आहेत. हे एकाष्टके ! आम्हीं सर्व उत्तम वीरांनीं युक्त होऊन पुष्कळ धनाचे स्वामी व्हावें. [५]

हे जातवेद ! तू गाईच्या तुपानें युक्त तसेंच ज्यांतून गाईचें तूप पाझरत आहे अशा तुपानें पूर्ण भिजलेलें हव्य ग्रहण कर. जे अनेक रंगारूपाचे सात ग्राम्य पशु आहेत, ते मजवर प्रेम करीत माझे बरोबर राहोत. [६]

हे रात्री ! आम्हांस पुष्कळ पुष्टि आणि शक्ति दे. देवांची मंगलमय मति आम्हांस मदत करीत राहो. हे चमसा ! तूं तुपानें पूर्ण होऊन अग्नींत आहुति देण्यास पुढें हो आणि तेथील दैवीशक्तिनें पूर्ण होऊन आमच्यापाशीं परत ये. आणि आम्हांस अन्न आणि बल भरपूर प्रमाणांत दे. [७]

हे एकाष्टके ! हा संवत्सर तुझा पतिरूप आहे. त्याची पत्नीरूप तूं आमच्या मुलांबाळांस दीर्घायुष्य, धन आणि पुष्टि दे. [८]

ऋतून्यज ऋतुपतीनार्तवानुत हायनान् । समाः संवत्सरान्मासान्भूतस्य पतये यजे ॥ ९ ॥
ऋतुभ्यष्ट्वार्तवेभ्यो माद्भ्यः संवत्सरेभ्यः । धात्रे विधात्रे समृधे भूतस्य पतये यजे । ॥ १० ॥
इडया जुह्वतो वयं देवान्घृतवता यजे । गृहानलुभ्यतो वयं सं विशेमोप गोमतः ॥ ११ ॥
एकाष्टका तपसा तप्यमाना जजान गर्भं महिमानमिन्द्रम् ।
तेन देवा व्यसहन्त शत्रून्हन्ता दस्यूनामभवच्छचीपतिः ॥ १२ ॥
इन्द्रपुत्रे सोमपुत्रे दुहितासि प्रजापतेः । कामानस्माकं पूरय प्रति गृह्णाहि नो हविः ॥ १३ ॥

अर्थ- (मासान् ऋतून् आर्तवान् ऋतुपतीन्) महिने, ऋतु, ऋतुसंबंधीं ऋतुपतींस तसेंच (उत हायनान् समाः संवत्सरान् यजे) अयनवर्ष, समवर्ष आणि संवत्सरांस अर्पण करतों आणि (भूतस्य पतये यजे) भूतांच्या स्वामीसाठीं यज्ञ करतों. [९]

(माद्भ्यः ऋतुभ्यः आर्तवेभ्यः संवत्सरेभ्यः) महिने, ऋतु, ऋतूंशीं संबंध ठेवणारे तसेंच वर्ष या सर्वांसाठीं आणि (धात्रे, विधात्रे समृधे) धाता, विधाता आणि समृद्धिसाठीं (भूतस्य पतये यजे) भूतांच्या स्वामीस मीं अर्पण करतों. [१०]

(इडया घृतवता जुह्वतः) गाईपासून प्राप्त तुपानें युक्त अर्पण द्वारा हवन करणारे (वयं देवान् यजे) आम्हीं सर्व देवांचें यजन करतों. (अलुभ्यतः गोमतः गृहान्) ज्यामध्यें न्यूनता नाहीं, जीं गाईंनीं भरपूर आहेत अशा घरांत (वयं उप सं विशेम) आम्हीं प्रवेश करूं. [११]

(एकाष्टका तपसा तप्यमाना) ही एक अष्टका तपानें तापत (महिमानं इन्द्रं गर्भं जजान) मोठा महिमा असणाऱ्या इंद्ररूपी गर्भास प्रकट करीत आहे. (तेन देवाः शत्रून् वि-असहन्त) त्यानें देवांनीं जिंकून घेतलें. (दस्यूनां हन्ता शचीपतिः अभवत्) कारण कीं शत्रूंचा नाश करणारा शक्तिशाली प्रकट झाला आहे. [१२]

हे (इंद्रपुत्रे) इन्द्रसारखा पुत्र असणारी ! हे (सोमपुत्रे) चंद्रसारखा पुत्र असणारी ! तूं (प्रजापतेः दुहिता असि) प्रजापतीची दुहिता आहेस, (नः हविः प्रति गृह्णीष्व) आमच्या हवीचा तूं स्वीकार कर (अस्माकं कामान् पूरय) आणि आमच्या कामना पूर्ण कर. [१३]

भावार्थ— मीं आपल्या दिवस, पक्ष, मास, ऋतु, काल, अयन आणि संवत्सर इत्यादि कालापासून अवयवांस भूतपति परमेश्वराच्या यजनासाठीं समर्पित करीत आहें, म्हणजे आपल्या आयुष्यास यज्ञासाठीं अर्पण करीत आहें. [९]

मास, ऋतु, (शीत, उष्ण वृष्टिसंबंधीं तीन) काल, अयन, संवत्सर वगैरे माझ्या आयुष्याच्या काल विभागाचे धाता, विधाता, समृद्धिकर्ता, भूतपति परमात्म्यासाठीं म्हणजे यज्ञासाठीं समर्पित करतों. [१०]

गाईच्या तूपानें मी देवांचें यजन करतों आणि असे यज्ञ करीत मीं आपल्या घरांत प्रवेश करतों. आमच्या घरांत पुष्कळ दूध देणाऱ्या गाई नेहमीं राहोत आणि आमच्या घरांत कधीं कोणत्याहि पदार्थांची न्यूनता न येवो. [११]

ही एकाष्टका तप करीत, मोठ्या प्रभावशाली इंद्र नांवाच्या गर्भास धारण करते आणि नंतर प्रकट करते. या इंद्राच्या प्रभावानें शत्रु दूर पळून जातात अथवा पूर्ण पराजित होतात. हा शक्तिशाली इंद्र शत्रुनाशक आहे. [१२]

हे इंद्रास जन्म देणारी ! आणि हे सोमास जन्म देणारी अष्टके ! तूं प्रजापतीची कन्या आहेस. या यज्ञांत जो हवि आम्हीं अर्पण करीत आहोंत त्याचा स्वीकार कर आणि आमची संपूर्ण इच्छा परिपूर्ण कर. [१३]

कालाचा यज्ञ

कामधेनु

काल म्हणजे समय अथवा वेळा ही एक मोठी शक्तिशाली कामधेनु आहे. ही कोणत्या मनुष्यास कामधेनुरूप होते आणि कोणास होत नाहीं, याविषयीं प्रथम मंत्राचें सांगणें मनन करण्यासारखें आहे—

प्रथमा व्युवास, सा धेनुरभवद्यमे । (मं. १)

' पहिली उषा प्रकाशित झाली आहे, तीच नियमांचें पालन करणाऱ्यासाठीं दूध देणाऱ्या गाईसारखी होते. ' उषाही वेळेची प्रथमावस्था आहे. या उषेपासून काल मापनास आरंभ होतो. ही वेळा ' **यमा** ' साठींच दूध देणारी गो माता होते. हा यम कोण आहे ? यम हे आहेत—

यम

अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ।

(योगदर्शन)

' अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पांच यम आहेत. ' हे मनुष्यांस वागण्याचे पांच नियम आहेत. यांच्याबरोबरच ' शौर्य, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरभक्ति हे पांच नियम लागलेले आहेत. ' यांचें पालन करणारा अर्थात् यमनियमानुसार स्वतःचे आचरण करणारा जो त्यास ' **यम** ' म्हणतात. नियमानें वागणारा मनुष्य मोठा प्रभावशाली महात्मा असतो. अशा मनुष्यासाठीं हा ' **समय** ' कामधेनु होतो. परंतु अनियमित व्यवहार करणाऱ्यासाठीं काल भयानक काळरूप होतो. म्हणून उन्नति प्राप्त करूं इच्छिणाऱ्या मनुष्यानें उत्तम नियमांस अनुकूल होऊन वर्तावें. समयाचा उपयोग उत्तम रीतीनें करावा आणि अभ्युदय तसेंच निःश्रेयस प्राप्त करून यशाचे भागीदार व्हावें. प्रत्येक मनुष्य इच्छितो कीं—

सा नः पयस्वती दुहामुत्तरामुत्तरां समाम् ।

(मं. १)

' तो काल आम्हांस उत्तरोत्तर आमच्या जीवनांत अमृतरस देणारा होवो. ' अशी प्रत्येकाची इच्छा असणें स्वाभाविक आहे. कारण कीं सुख तर प्रत्येकास पाहिजेच असते. परंतु फार थोडी मनुष्यें कालाचा उत्तम उपयोग करूं जाणतात आणि यमनियमांचें उत्तम रीतीनें पालन करणारे तर त्यापेक्षांहि थोडे असतात. त्यामुळें प्रत्येकाची इच्छा असूनहि पुष्कळशा मनुष्यांस काल प्रतिकूल असतो आणि जे वर सांगितल्याप्रमाणें यमनियमानुसार आपलें आचरण सुयोग्य बनवितात त्यांच्यासाठींच तो अनुकूल होतो. वाचकानीं हा नियम सर्व प्रथम ध्यानांत ठेवावा, कारण कीं उन्नतिसाठीं सर्वांत प्रथम याचीच जरूरी आहे.

उषेपासून या कालाचा प्रारंभ होतो. उषेपासून दिवसाचा आरंभ होतो हें तर सर्व जाणतातच. त्यामुळें कित्येक ठिकाणीं उषेस दिवसाची माता म्हणतात. रात्री प्रायः निद्रेंत जाते म्हणून ' नियमांचे आचरण करणें, कालाचा सदुपयोग करणें ' इत्यादि गोष्टी बहुंशीं दिवसांशीं संबंधित असतात. रात्रींचे सात आठ तास निद्रेंत जातात., ते सोडून जो कार्यासाठीं अवशिष्ट समय रहातो, त्याचा सदुपयोग अथवा दुरुपयोग मनुष्य करतो आणि उन्नत अथवा अवनत होतो.

एका पूर्ण दिवसांत ' दिन आणि रात्र ' हे दोन विभाग असतात. एवढ्या समयाचे आठ प्रहर होतात. आठ प्रहरांचें नांव ' **अष्टक** अथवा **अष्टका** ' आहे. एक पुऱ्या दिवसाची ही ' **एकाष्टका** ' आहे म्हणजे आठ प्रहरांचा समय आहे. दिवसाचे चार प्रहर आणि रात्रीचे चार प्रहर असतात. या सर्वांचें मिळून एकच नांव ' **एकाष्टका** ' आहे हीच या सूक्ताची देवता आहे. दिवसाच्या आठ प्रहरांचा उत्तम उपयोग कसा करावा हें सांगणें असा या सूक्ताचा स्पष्ट उपदेश आहे. प्रत्येक दिवसाचा योग्य उपयोग होत राहील तर तो सर्व आयुष्याचा उत्तम उपयोग होईल. हेंच सर्व आयुष्याचा यज्ञ करण्याचें तात्पर्य आहे.

अंधकारमय रात्र

दिवसा प्रकाश असतो त्यामुळें मनुष्य सहसा निर्भय असतो. रात्री अंधार असल्यामुळें भयभीत होतो म्हणून प्रकाशमय दिवसाविषयीं कांहीं सांगण्यापेक्षां अंधाऱ्या रात्री विषयींच कांहीं सांगणें आवश्यक आहे. हें कार्य दुसऱ्या मंत्रापासून चौथ्या मंत्रापर्यंत तीन मंत्रांत केलें आहे. त्या मंत्रांचा आशय असा आहे—

' देव भयदायक अंधाऱ्या रात्रीचें आनंदानें स्वागत करतात, कारण कीं ही रात्र संवत्सराची पत्नी आहे, ती आम्हां सर्वांचें मंगल करणारी होवो. (मं. २) या रात्रीस संवत्सराची छोटी मूर्ति मानून तिचें स्वागत केलें पाहिजे. ती आम्हांस दीर्घायुष्य, प्रजा, धन, आणि पुष्टि देवो. (मं. ३) ही तीच की जिच्या पूर्वी उषा उगवली होती. हीच इतर समयांच्या विभागांत प्रवेशून चालते. या रात्रीचें महात्म्य मोठें आहे. ही वीर पुत्रास जन्म देणाऱ्या कुलवधुप्रमाणें यशस्विनी रात्र आहे. (मं. ४) '

असा या तीन मंत्रांचा भावार्थ आहे. या मंत्रांत रात्रीची

भयानकता दूर करून तिची मंगलमयता दाखविली आहे. ज्या रात्रीस सामान्य लोक भयप्रद मानतात, तिलाच वेद मंगलमयी, अनंत महिम्यानें युक्त आणि कुलवधुप्रमाणें भावी यशाची सूचक अशी वर्णितात. वेदांचा हा असा सृष्टींतील घटनांकडे पहाण्याचा पवित्र दृष्टिकोण आहे. वाचकांनीं या दृष्टिकोणानें जगाकडे पहावें आणि त्यांत परमात्म्याच्या महात्म्याचा अनुभव करावा. दिवसांत जसें परमात्म्याचें प्रकाशमय स्वरूप प्रकट होतें, तद्वत् रात्रींत त्या परमात्म्याचें शांत स्वरूप दिसून येतें. दिवसा विविधतेचा अनुभव येतो आणि रात्रीं ही विविधता संपून जाते. याप्रमाणें दिवस आणि रात्रींत परमात्म्याचें मंगल स्वरूप पाहिलें पाहिजे. हेंच वेदांत अभीष्ट आहे.

संवत्सराची प्रतिमा

तिसऱ्या मंत्रांत रात्रीस संवत्सराची प्रतिमा म्हटलें आहे. संवत्सर हें वर्षाचें नांव आहे. वर्ष हें मोठ्या आकाराचें असतें. त्याची सूक्ष्म प्रतिमा रात्र आहे. प्रतिमा याचा अर्थ ' **प्रति+मान** ' असा आहे. म्हणजे मापण्याचें साधन. दिवस आणि रात्र हे दोन्ही मिळून संवत्सराचें माप करण्याचें साधन आहे. दिवसांनीं वर्ष मापलें जातें. हीच रात्र संवत्सराची पत्नी आहे. संवत्सर पति आणि रात्र त्याची पत्नी आहे. वार्षिक कालाचें विशाल स्वरूप संवत्सर आहे आणि छोटें स्वरूप दिन अथवा रात्री आहे. ही रात्र--

सा नो अस्तु सुमंगली । (मं. २)
सा न आयुष्मतीं प्रजां रायस्पोषेण संसृज । (मं. ३)
महान्तो अस्यां महिमानो अन्तः । (मं. ४)

' ही रात्र आम्हांस मंगलमय होवो. ही रात्र आम्हांस धन आणि पुष्टि सह दीर्घायु प्रजा देवो. या रात्रींत मोठें महात्म्य आहे. ' हें रात्रीचें वर्णन निःसंशय सत्य आहे. रात्र खरोखरच मंगलमय आहे. या रात्रींत झोंप घेऊन मनुष्य एवढा आराम प्राप्त करतो कीं त्याचें वर्णन होऊं शकत नाहीं, याचा अनुभव प्रत्येकास आहेच. ' जे रात्रीं रतिक्रीडा करतात ते ब्रह्मचर्य पालन करतात.' (प्रश्न उप० १।१३) हें उपनिषद्वचन सांगतें कीं गृहस्थानें गृहस्थधर्माचें पालन नियमपूर्वक रात्रीचें वेळीं रति करून आणि त्या आश्रमायोग्य आचरण करून सुद्धां ब्रह्मचर्य पालन होतें. त्यामुळें उत्तम सुसंतान उत्पन्न होतें जें दीर्घायु आणि तेजस्वी सुद्धां असतें. याप्रकारें या रात्रींत अनेक महिमा आहेत आणि त्यामुळें रात्र ही अत्यंत उपकारक आहे. वाचकांनी या प्रकारें रात्रीचा उपकार पहावा आणि या रात्रीचें स्वागत करावें. कोणी असें म्हणतील कीं रात्रींत चोरादिकांचा तसेंच हिंस्र प्राण्यांचा उपद्रव होतो. म्हणून रात्र भयानक आहे. परंतु हें म्हणणें योग्य नाहीं कारण त्यामुळें तर मनुष्यांत आत्मरक्षणाची शक्ति वाढते आणि धैर्य, शौर्य, वीर्य, पराक्रम वगैरे गुण वाढतात. या दृष्टीनें पाहतां रात्रीचे महान् उपकार आहेत.

हवन

पुढें पांचव्या मंत्रांत दगडांनीं सोम औषधीचा रस काढणें आणि यज्ञांत हवनासाठीं हवि तयार करण्याचें वर्णन आहे. सहाव्या मंत्रांत प्रत्येक प्रकारचा हवि तुपानें परिपूर्ण भिजवून, त्यांतून तूप पाझरत आहे अशा अवस्थेंत हवन सामग्रीच्या आहुति अग्नींत टाकाव्यात वगैरे वर्णन आहे. तें सर्व याजकांनीं लक्षपूर्वक पहाण्यासारखें आहे. तुपांत हवेंतील दोष दूर करण्याचें सामर्थ्य आहे. यामुळें हवेच्या शुद्धिसाठीं हवन इष्ट आहे. मनुष्य आपल्या नित्याच्या व्यवहारांत अनेक प्रकारचीं विषें हवेंत फेंकतो म्हणून रोगोत्पादक विषांचा उपशम करण्यासाठीं अशा प्रकारचें हवन करणें अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारें हवनानें हवेची शुद्धता केल्यानें गृहस्थ लोक सुखी, बलवान्, निरोगी आणि सुप्रजेनें युक्त होतील अशी सूचना पांचव्या मंत्राच्या उत्तरार्धांत मिळते. ती सूचना प्रत्येक गृहस्थधर्मीयानें मनांत ठेवण्यासारखी आहे. सहाव्या मंत्राच्या उत्तरार्धांत, ' ग्रामीण सप्त पशु मनुष्यावर प्रेम करीत घरांत राहोत ' असें सांगितलें आहे. हें गृहस्थाश्रमाचें स्वरूप आहे. गृहस्थाच्या घरांत, गाय, बैल, घोडा, शेळ्या, मेंढ्या वगैरे पशु आणि त्यांचीं वासरें असावींत, ही घराची शोभा आहे आणि त्याचा उपयोग सुद्धां आहे.

सातव्या मंत्राच्या दुसऱ्या भागांत आहुति देण्याच्या चमसाचें वर्णन करतांना एक महत्त्वपूर्ण गोष्टीचा उपदेश केला आहे. ' आहुति देणारा चमस पूर्ण भरून अग्नि पाशीं जावो आणि तेथून अग्नीची तेजस्विता घेऊन परत येवो आणि ती हवन करणाऱ्याची तेजस्विता वाढवो. '

पूर्णा दर्वे परापत सुपूर्णा पुनरापत । (मं. ७)

' चमस पूर्ण भरून दान देण्यासाठीं पुढें होवो आणि परत येतेवेळीं तेज भरून परत येवो. ' यांत चमसाचें भरून जाणें व येणें सांगितलें आहे. दान देतांना चमस भरून यज्ञाजवळ जाऊन आपली आहुति देवो, दान देतांना कृपणता नसावी, असा बोध येथें मिळतो. ज्या देवतेस दान दिलें जातें त्या देवतेचे प्रशंसित गुण या चमसांत येतात. चमस रिकामा होतांच जणुं तो देव आपल्या गुणांनीं तो परिपूर्ण करतो. त गुणग्रहण करून चमस

परत येवो आणि दान देणाऱ्यास गुणी करो. असा आशय येथें आहे. या मंत्राच्या मननानें वाचकांस पुष्कळ बोध प्राप्त होऊं शकतो. 'यज्ञा'चें 'दान आणि आदान' या मंत्राच्या मननानें उत्तमप्रकारें समजूं शकतें. 'जें आपणांजवळ आहे तें इतरांच्या कल्याणार्थ दान देणें आणि दुसऱ्यामध्यें जे श्रेष्ठ गुण आहेत ते प्राप्त प्राप्त करणें' हें यज्ञाचें तत्त्व या मंत्रानें स्पष्ट होतें. वाचकांनीं याचें मनन करावें.

पुढें आठव्या मंत्राचा आशय दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्राप्रमाणें आहे. म्हणून त्याविषयीं जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

कालाचा यज्ञ

नवव्या आणि दहाव्या मंत्रांत कालाच्या अवयवांचा नामनिर्देश करून त्या कालावयवांचा यज्ञ करण्यासंबंधीं मोठा महत्त्वपूर्ण उपदेश आहे. (१) **मास**– महिना. (२) **ऋतु**– दोन महिन्यांचा काल. (३) **आर्तव काल**– दोन ऋतूंनीं मर्यादित होणारा काल, हिंवाळा, उन्हाळा, पावसाळा. (४) **अयन**– तीन ऋतूंचा काल, वर्षाची दोन अयनें असतात. दोन अयनांच्या मापानें मोजल्या जाणाऱ्या कालास '**हायन**' म्हणजे वर्ष म्हणतात. (५) **समाः**– तीस दिवसांचा एक महिना अशा बारा महिन्यांचे म्हणजे ३६० दिवसांचें एकवर्ष '**समाः**' नांवानें प्रसिद्ध आहे कारण कीं अशा प्रकारच्या वर्षाचें दिवस समसंख्यक असतात. (६) **संवत्सर**– सौर वर्ष; या वर्षाचे दिवस ३६५ असतात आणि महिन्यांत दिवसांची संख्या कमी अधिक असते. (या व्यतिरिक्त चांद्रवर्ष असतें त्याचा उल्लेख येथें केला नाहीं, त्याचे दिवस ३५४ असतात. याच्या महिन्यांचे दिवससुद्धां कमीजास्त असतात.

याप्रकारें 'जो माझ्या जीवनाचा काल आहे तो सर्व मीं सर्व भूतांचे पालन करणारा जो परमात्मा आहे त्याच्यासाठीं समर्पित करतों.' म्हणजे माझे आयुष्याचा यज्ञ मीं करतों. स्वतःच्या आयुष्याचा विनियोग जनतेच्या भलाईसाठीं करण्याच्या कार्यासच आयुष्याचा यज्ञ असें नांव आहे. परमात्म्याचें कार्य 'सज्जनांचें पालन आणि दुर्जनांस दंड न करणें' आहे. हेंच जनतेच्या हिताचें कार्य आहे. या कार्यासाठीं आपलें सर्वस्व तन, मन, धन अर्पण करणें म्हणजेच '**आत्मयज्ञ**' करणें होय. अशाप्रकारें आपल्या आयुष्याचा यज्ञ करण्याचा उपदेश नवव्या व दहाव्या मंत्रांत आहे, म्हणून या मंत्रांचें अत्यंत मनन करणें योग्य होय.

*

यज्ञाचें कार्य

या मंत्रांत जो यज्ञ करणें आहे तो, '(**धात्रे, विधात्रे, समृधे, भूतस्य पतये** (मं. ९-१०) धारक, निर्माता, समृद्धि कर्ता आणि भूतांचें पालन करणारा यांसाठीं करावयाचा आहे. आपलें आयुष्य या कार्यकर्त्यांस समर्पित करावयाचें आहे. (१) जो प्रजेस धारण करतो, (२) जो जनतेच्या सुखासाठीं साधनें निर्माण करतो, (३) जो जनतेच्या समृद्धीची वृद्धि करतो आणि (४) जो या सर्वांचें पालन करतो त्याच्या कार्यासाठीं आपलें आयुष्य समर्पण करणें हें आत्मयज्ञाचें तात्पर्य आहे. अर्थात् प्रजाहिताच्या इतक्या कार्यासाठीं आपल्या आयुष्याचा विनियोग करणें याचें नांव यज्ञ आहे. या प्रकारचा आत्मयज्ञ जे करतात, ते लोकोत्तर दिव्यपुरुष सर्वत्र पूजनीय होतात.

अकराव्या मंत्रांत यज्ञाचें वर्णन करतांना म्हटलें आहे—

अलुभ्यतः वयं गृहान् उप संविशेम । (मं. ११)

'लोभ केल्यावांचून आम्हीं घरांत प्रवेश करूं' म्हणजे आम्हीं घरांतील व्यवहार लोभ करून करणार नाहीं, आमच्या घराचें वायुमंडल असें असेल कीं तेथें कोणास लोभ अथवा स्वार्थ साधण्याची इच्छा होणार नाहीं. अथवा आवश्यकता रहाणार नाहीं. जीं मनुष्यें वर सांगितल्याप्रमाणें आपल्या आयुष्याचा यज्ञ करतात त्यांच्या घराचें वायुमंडळच असें असेल यांत कांहीं शंका नाहीं.

शत्रुनाशक इंद्र

बाराव्या आणि तेराव्या मंत्रांत एकाष्टकेच्या गर्भधारणेविषयीं व इंद्रनामक पुत्रास जन्म देण्याविषयीं वर्णन आहे. एकाष्टका, अहोरात्री आहे आणि तिच्या गर्भांत सूर्य रहातो आणि रात्रीच्या प्रसूतिसमयीं सूर्य प्रकाशमान होतो आणि तो प्रकाशाच्या शत्रूंचा पूर्ण नाश करतो. जीं मनुष्यें पूर्वोक्त पद्धतीनें कालाचा यज्ञ करतात, त्यांच्या प्रयत्नानें इंद्र नांवाचें असें विशाल तेज उत्पन्न होतें कीं त्यामुळें शत्रु पराजित होतात. ही वेळ स्वतःमध्यें पुष्कळ महिमा संग्रहून असते तिचा पुत्र (इंद्र) प्रकाशाचा उग्रदेव आहे आणि तिचाच पुत्र (सोम) शांतीचा देवसुद्धां आहे. (मं. १३)

रात्रीचा म्हणजे उषेचा पुत्र सूर्य आहे, याला दिवस्पुत्र असें सुद्धां वेदांत म्हटलें आहे. रात्रीचा दुसरा पुत्र चंद्र आहे याला सोमसुद्धां म्हणतात. हे दोघेहि प्रकाश प्रसविणारे आणि अंधःकाराचा नाश करणारे आहेत आणि जनतेला प्रकाश देऊन मार्ग-

दर्शन करतात. वेदांत यांचें निरनिराळया प्रकारें वर्णन आहे आणि तें मोठें बोधप्रद आहे.

यावरून असा बोध प्राप्त होतो की मनुष्यानें स्वतः ज्ञान प्राप्त करावें आणि दुसऱ्यास आपल्या ज्ञानाचा प्रकाश द्यावा. कलानिधि चंद्राप्रमाणें मनुष्यानें स्वतः विविधकलांत पूर्ण प्रवीणता संपादन करून स्वतः कलानिधि व्हावें व इतरांस कलेचें आणि दुसरांचें ज्ञान देऊन जनतेची उन्नति करावी. मातांनीं आपल्या संतानांस असें शिक्षण देऊन बालकाची पूर्ण उन्नति करावी.

हा याचा महिमा समजून प्रत्येक मनुष्यानें या सूक्ताच्या उपदेशानुसार आपल्या आयुष्याचा उत्तम यज्ञ करून यज्ञाचें भागीदार व्हावें.

सविता आणि वायु

कांड ४, सूक्त २५

(ऋषिः – मृगारः । देवता – सविता, वायुः ।)

वायोः सवितुर्विदथानि मन्महे यावात्मन्वद्विशथो यौ च रक्षथः ।
यौ विश्वस्य परिभू बभूवथुस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ १ ॥
ययोः संख्याता वरिमा पार्थिवानि याभ्यां रजो युपितमन्तरिक्षे ।
ययोः प्रायं नान्वानशे कश्चन तौ नो मुञ्चतमंहसः ॥ २ ॥
तव व्रते नि विशन्ते जनासस्त्वय्युदिते प्रेरते चित्रभानो ।
युवं वायो सविता च भुवनानि रक्षथस्तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ३ ॥

अर्थ— (वायोः सवितुः) वायु आणि सविता या दोन देवांचे (विदथानि मन्महे) जाणण्यायोग्य गुणांचें आम्हीं मनन करतों. (यौ आत्मन्वत् विशथः) जे दोघे आत्म्यानें युक्त जंगम जगांत प्रविष्ट होतात (यौ च रक्षथः) आणि जे दोघे रक्षण करतात, (यौ विश्वस्य परिभू बभूवथुः) जे दोघे संपूर्ण जगाचे तारक होतात (तौ नः अंहसः मुञ्चतं) ते दोघे आम्हांस पापापासून वांचवोत. [१]

(ययोः पार्थिवानि वरिमा संख्याता) ज्या दोघांची पृथ्वीवरील विविध कर्में मोजलीं गेलीं आहेत, (याभ्यां अंतरिक्षे रजः युपितं) ज्या दोघांनीं मिळून अंतरिक्षांत मेघमंडळास धारण केलें आहे. (कश्चन ययोः प्रायं न अन्वानशे) कोणीहि ज्यांच्या गतीस प्राप्त होत नाहीं (तौ नः अंहसः मुञ्चन्तं) ते दोघे आमचें पापांपासून रक्षण करोत. [२]

हे (चित्रभानो) विचित्र प्रभायुक्त ! (तव व्रते जनासः नि विशन्ते) तुझ्या व्रतांत सर्व मनुष्यें रहातात. (त्वयि उदिते प्रेरते) तुझा उदय झाला असतां कार्यास प्रेरित होतात, हे (वायो सविता च) वायु आणि सविता ! (युवं भुवनानि रक्षथ) तुम्हीं दोघे सर्व प्राण्यांचें रक्षण करतां (तौ नः अंहसः मुञ्चतं) असे तुम्ही दोघे आम्हांस पापांपासून वांचवा. [३]

भावार्थ— विश्वांत वायु आणि सविता (तसेंच शरीरांत प्राण आणि नेत्र) हे दोघे अनेकप्रकारें प्राणिमात्रांची धारणा करीत आहेत. हे दोघे सर्व प्राणिमात्रांत व्यापक होऊन त्यांचे रक्षण करतात. हे दोघे सर्व जगताचे तारक आहेत, म्हणून असे हे दोघे पापांपासून आम्हांस वांचवोत. [१].

या दोघांची अनंत कर्में आहेत. हेच अंतरिक्षांत मेघमंडळास धारण करतात. यांच्याशीं दुसऱ्या कोणाची तुलना होऊं शकत नाहीं. हे दोघे आम्हांस पापांपासून वांचवोत. [२]

सूर्य विचित्र तेजानें युक्त आहे. (शरीरांत डोळे म्हणजे दृष्टिसुद्धां तशीच आहे.) त्याचा उदय झाल्यानंतर म्हणजे प्रकाश उघडल्यानंतर (प्रसरल्यानंतर) प्राणीमात्र कार्यास प्रवृत्त होतात. विश्वांत वायु आणि सूर्य (तसेंच शरीरांत प्राण आणि दृष्टि) प्राण्यांचें रक्षण करतात. ते दोघे आम्हांस पापांपासून वांचवोत. [३]

अपेतो वायो सविता च दुष्कृतमप रक्षांसि शिमिदां च सेधतम् ।
सं ह्यू३र्जया सृजथः सं बलेन तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ४ ॥
रयिं मे पोषं सवितोत वायुस्तनू दक्षमा सुवतां सुशेवम् ।
अयक्ष्मतातिं मह इह धत्तं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ५ ॥
प्र सुमतिं सवितर्वाय ऊतये महस्वन्तं मत्सरं मादयाथः ।
अर्वाग्वामस्य प्रवतो नि यच्छतं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ६ ॥
उप श्रेष्ठा न आशिषो देवयोर्धामन्नस्थिरन् ।
स्तौमि देवं सवितारं च वायुं तौ नो मुञ्चतमंहसः ॥ ७ ॥

अर्थ-हे (वायो सविता च) वायु आणि सविता ! (इतः दुष्कृतं अप सेधतं) येथून दुष्कर्म करणाऱ्यास दूर करा. तसेंच (रक्षांसि शिमिदां च) घातकीयांस आणि पीडकांसहुदां दूर करा. (ऊर्जया बलेन हि सं सृजथः) शारीरिक आणि आत्मिकबळानें आम्हांस युक्त करा. (तौ नः अंहसः मुञ्चतं) असे तुम्हीं दोघे पापांपासून आम्हांस मुक्त करा. [४]

हे सविता आणि हे वायो ! (मे तनू) माझ्या शरीरांत (सुसेवं रयिं) सेवन करण्यायोग्य कांति आणि (पोषं दक्षं) पुष्टियुक्त बल (आ सुवतां) उत्पन्न करा. (इह महः अयक्ष्मतातिं धत्तं) हा मोठें आरोग्य धारण करा आणि (तौ नः अंहसः मुञ्चतं) असे तुम्ही दोघे आम्हांस पापांपासून मुक्त करा. [५]

हे सविता आणि हे वायो ! (ऊतये सुमतिं प्र यच्छतं) रक्षणासाठीं उत्तम बुद्धि दान करा. (प्रवतः वामस्य अर्वाक् नि यच्छतं) प्रकर्षयुक्त धनाचा भाग आम्हांस प्रदान करा. तसेंच (महस्वन्तं मत्सरं मादयाथः) तृप्ति करणारें सोम वगैरे अन्न तृप्तिसाठीं द्या आणि (तौ नः अंहसः मुञ्चतं) असे तुम्हीं दोघे आम्हांस पापांपासून वांचवा-मुक्त करा. [६]

(नः श्रेष्ठाः आशिषः) आमच्या श्रेष्ठ आकांक्षा (देवयोः धामन् उप अस्थिरन्) वर सांगितलेल्या दोघांच्या धामांत स्थिर होवोत. (सवितारं वायुं च देवं स्तौमि) सविता आणि वायु देवाची मीं स्तुति करतों, म्हणून (तौ नः अंहसः मुञ्चतं) ते दोघे आम्हांस पापांपासून मुक्त करोत. [७]

भावार्थ-हे दोघे सर्वांस दुराचारापासून वांचवोत, घातकी आणि पीडक यांस दूर करोत, शारीरिकशक्ति आणि आत्मिक-बलप्रदान करोत आणि आम्हांस पापांपासून मुक्त करोत. [४]

या दोघांपासून माझ्या शरीरांत तेजस्विता, पुष्टि, बल आणि आरोग्य प्राप्त होवो आणि ते दोघे आम्हांस पापांपासून मुक्त करोत. [५]

हे दोघे आमचें रक्षण करण्यास आम्हांस शुद्ध बुद्धि, उत्कर्षप्रत घेऊन जाणारें धन आणि पोषक अन्न देवोत आणि आम्हांस पापांपासून वांचवोत. [६]

अशा आमच्या श्रेष्ठ आकांक्षा हे दोघे देव ऐकोत आणि पूर्ण करोत. तसेंच आम्हांस पापांपासून मुक्त करोत. [७]

सविता आणि वायु

सविता आणि वायु

सविता आणि वायु या दोन देवांचें वर्णन या सूक्तांत आहे. सूर्य आणि हवा असा यांचा प्रसिद्ध अर्थ आहे. मनुष्याच्या आरोग्यास सूर्य आणि वायु किती उपयोगी आहेत हें सर्व जाणतात. सूर्य अथवा वायु नसेल तर मनुष्यांचें जीवन तत्क्षणींच नष्ट होईल. सूर्यप्रकाश आणि शुद्ध वायु विपुल प्रमाणांत प्राप्त होण्यानें

मनुष्य निरोगी होतो आणि अंधाऱ्या घरांत राहिल्यानें आणि दूषित वायूच्या सेवनानें विविध प्रकारचे रोग मनुष्याच्या पाठीस लागतात, हा विषय वेदांत अनेकस्थानीं आलेला आहे. तसेंच हा विषय आज सर्वसाधारण सामान्य मनुष्यासमुद्धां माहित झाला आहे. त्यामुळें या दोन देवांचा आमच्या आरोग्याशीं किती निकटचा घनिष्ठ संबंध आहे, तें येथें विशेष विस्तारानें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

सूर्यदेवता

सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च । (ऋग्वेद)

असें ऋग्वेदांत सांगितलें आहे. सूर्य स्थावर आणि जंगमाचा आत्मा आहे. एवढें सूर्याचें महत्त्व आहे. सूर्यामुळेंच स्थावर जंगम पदार्थांचें अस्तित्व आहे. सर्वांचें अस्तित्व सूर्यामुळें आहे. एवढें सूर्याचें महत्त्व असल्यामुळें सूर्यदेवाचा संबंध आमच्या आरोग्याशीं किती आहे हें आपोआपच समजून येतें.

हा सूर्य आमच्या शरीरांत आपल्या एका अंशानें दृष्टि (नेत्रेंद्रियांत) मध्यें राहिला आहे.

सूर्यश्चक्षुर्भूत्वाऽक्षिणी प्राविशत् । (ऐ. उ.)

सूर्य दृष्टि होऊन नेत्रांत राहिला आहे. नेत्रेंद्रिय जर कार्यक्षम असेल तर स्वयं प्रकाशमयच आहे. या नेत्रांतून प्रकाशकिरणें निघतात व त्यांचा परिणाम बाह्य पदार्थांवर होतो. ब्रह्मचर्यादि चांगल्या नियमांनीं हें आपलें सामर्थ्य वाढतें आणि अनियमितपणामुळें घटतेंसुद्धां. हा नेत्रस्थानीं रहाणारा सूर्याचा अंश आम्हांस योग्य आणि अयोग्य पदार्थांचें दर्शन करवितो. या नेत्रेंद्रियाचा पिता सूर्य आहे. ही दृष्टि आपल्या पित्यापासून प्रकाशाचें सहाय्य घेऊन येथील कार्य करते आणि विविधरूपें दाखविते. आपली उन्नति करणाऱ्या साधनांचें दर्शन करणें आणि अवनति करणाऱ्या साधनांचें दर्शन न करण्यानें साधक पापापासून दूर रहातो. हें सूर्यदेवाचें पापांपासून मुक्त करण्याचें कार्य आहे. पवित्र दृष्टीनें अनेक प्रकारच्या पापांपासून वाचण्याचा संभव आहे. सर्व सृष्टीस परमात्मास्वरूप मानून पहाण्याचें मनुष्याची दृष्टि पवित्र होते. दृष्टिची पवित्रता होण्यानें मनुष्य पापांपासून मुक्त होतो. मनुष्य जें पाप करतो तें दृष्टीच्या दोषामुळेंच करतो. विचार केला असतां वाचकांच्या आपोआप ध्यानीं येईल कीं दृष्टीच्या पवित्रतेवर मनुष्याची पुष्कळशी शुद्धता आधारित आहे. दृष्टि बंद राहील तर काम, लोभ, मोह इत्यादि विकार तितक्या प्रमाणांत कांहीं अंशीं कमी होतील.

वाणी, बल आणि नेत्र

या पूर्वींच्या या सूक्तांत अग्निच्या मिषानें वाणीची शुद्धता, इन्द्राच्या मिषानें बलाची पवित्रता आणि या सूक्तांत सूर्याच्या मिषानें नेत्रेंद्रियाची पवित्रता प्राप्त करण्याची सूचना दिली आहे. पापापासून सुरक्षित रहाण्याचें, मुक्त होण्याचें अनुष्ठान हें आहे. या प्रकारें आपल्या मधील शक्ति पवित्र आणि पुनीत केल्यानें मनुष्य पापांपासून वाचतो, मुक्त होतो. हें अनुष्ठान केल्यानें बाह्य देवतांचें सहाय्य सर्वदा मिळत रहातेंच परंतु त्या सहाय्याचा लाभ-फळ पूर्वीं सांगितल्याप्रमाणें जे स्वतःची अंतःशुद्धि करण्याचें अनुष्ठान करीत रहातात त्यांसच होतो. इतरांस तसा लाभ होऊं शकत नाहीं.

सूर्यचक्र

सूर्याचा दुसरा अंश पोटाजवळ सूर्यचक्रांत असतो. त्याचा अधिकार पचन इंद्रियावर असतो. पोटाच्या बरोबर मागें हें चक्र आहे. यामध्यें सूर्यशक्ति असतें आणि ती अन्न पचनाचें कार्य करते. या कार्यासाठींच सोम आदि अन्नरस दिले आहेत. (मं.६) असें शुद्ध अन्न भक्षण करणें आणि अशुद्ध अन्न सेवन न करणें हें पथ्य जे पापांपासून दूर राहूं इच्छितात त्यांनीं संभाळलें पाहिजे. अशुद्ध अन्नानें मनाची वृत्तिच दुष्ट होते आणि शुद्ध अन्नाच्या सेवनानें पवित्र होते. जे पवित्र होऊं इच्छितात त्यांनीं याचें अवश्य मनन करावें.

प्राण

आतां वायूचा विचार केला पाहिजे—

वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशत् । (ऐ. उ.)

वायु प्राण होऊन नाकावाटे फुफ्फुसांत जातो आणि तेथें रक्तास शुद्ध करतो. यांच्या शुद्धिकरणामुळेंच प्राणी जिवंत राहूं शकतात, हा जर अशुद्ध असला तर प्राणी मरून जातील. अशा प्रकारें वायु हा जीवनाचा हेतू (कारण) आहे. योगशास्त्रांत या प्राणाच्या आयामास ' प्राणायाम ' म्हणतात. ज्याप्रमाणें फुंकणीनें वायु देऊन प्रदीप्त केलेल्या अग्नींत सुवर्ण इत्यादि धातु परिशुद्ध होतात, तद्वत् प्राणायाम द्वारा उत्पन्न होणाऱ्या अग्निप्रदीपनानें शरीराचे व इंद्रियांचे सर्व दोष नष्ट होतात. मन शांत होतें, तर्क, वितर्क आणि कुतर्क निर्माण होत नाहींत. यामुळें आत्मिकशक्तीची उन्नति होण्यास मदत होते. पापांपासून मुक्त होण्यास वायु देवतेचें सहाय्य याप्रकारें होतें. अनुष्ठान करणारा पुरुष जेव्हां आपल्यामध्यें वास्तव्य करणाऱ्या या देवास योग्य मार्गानें चालवितो तेव्हां बाहेरच्या देवांचें सहाय्य त्यास आपोआप प्राप्त होतें. असें हें पापापासून वाचण्याचें, दूर रहाण्याचें, मुक्त होण्याचें अनुष्ठान आहे. वाचकांनीं हें नीट स्वतामध्यें घटवावें व त्यापासून लाभ करून घ्यावा.

कपोत-विद्या

कांड ६, सूक्त २७

(ऋषिः - भृगुः । देवता - यमः, निर्ऋतिः ।)

देवाः कपोतं इषितो यदिच्छन्दूतो निर्ऋत्या इदमाजगाम ।
तस्मा अर्चाम कृणवाम निष्कृतिं शं नो अस्तु द्विपदे शं चतुष्पदे ॥ १ ॥
शिवः कपोतं इषितो नो अस्त्वनागा देवाः शकुनो गृहं नः ।
अग्निर्हि विप्रो जुषतां हविर्नः परि हेतिः पक्षिणी नो वृणक्तु ॥ २ ॥
हेतिः पक्षिणी न दभात्यस्मानाष्ट्री पदं कृणुते अग्निधाने ।
शिवो गोभ्यं उत पुरुषेभ्यो नो अस्तु मा नो देवा इह हिंसीत्कपोतः ॥ ३ ॥

अर्थ— हे (देवाः) देव हो ! (इषितः निर्ऋत्याः दूत कपोतः) पाठविलेला दुर्गतीचा दूत कपोत (यत् इच्छन् इदं आजगाम) ज्याची इच्छा करीत या स्थानास प्राप्त झाला आहे, (तस्मै अर्चाम) त्याची आम्हीं पूजा करतों. आणि त्याचेकडून (निष्कृतिं कृणवाम) दुःख निवारण आम्हीं करतों. (नः द्विपदे चतुष्पदे शं अस्तु) आमच्या दोन पायांच्या आणि चारपायांच्यासाठीं शांति– कल्याण होवो. [१]

(इषितः कपोतः नः शिवः अनागाः अस्तु) पाठविलेला कपोत आमच्यासाठीं कल्याणकारी आणि निष्पाप होवो. हे (देवाः) देव हो ! (नः गृहं शकुनः) आमच्या घरास तो शुभसूचक होवो. (विप्रः अग्निः हि नः हविः जुषतां) ज्ञानी अग्नि आमचा हवि स्वीकारो आणि (पक्षिणी हेतिः नः परि वृणक्तु) पंखयुक्त हें शस्त्र आम्हां-पासून दूर होवो. [२]

(पक्षिणी हेतिः अस्मान् न दभाति) पंखयुक्त हें शस्त्र आम्हांस न दबवो. (आष्ट्री अग्निधाने पदं कृणुते) आगटीच्या अग्निजवळ हा आपला पाय ठेवतो. (नः गोभ्यः उतः पुरुषेभ्यः शिवः अस्तु) आमच्या गाई आणि मनुष्यांस हा कल्याणकारी होवो. हे (देवाः) देव हो ! (कपोतः इह नः मा हिंसीत्) हा कपोत आमची हिंसा न करो. [३]

कबूतर दूरदूर देशांहून बातम्या आणण्याचें कार्य करतें. तें हानिकारक वार्ता न आणो, शुभ वार्ता आणो, याविषयीं ही प्रार्थना आहे. कबूतरास शिकवून कुठूनही सोडलें तरी तें सरळ घरीं येतें असा त्याच्यांत गुण आहे. प्रवासी मनुष्यें अशीं शिकविलेलीं कबूतरें स्वतःजवळ ठेवतात व जेथें जावयाचें तेथें मुक्काम होताच, कबूतराचे गळ्यांत चिठी बांधून त्यास सोडतात म्हणजे तें सरळ घरीं जाऊन प्रवाशाची बातमी पोहोंचवितें.

या सूक्तांतील उल्लेखावरून आपणांस आणखी असेंहि कळतें कीं या कपोत विद्येंत कांहीं अधिक गोष्टी आहेत, त्यामुळें कबूतर चांगलें अथवा वाईट होऊं शकतें. परंतु याविषयीं माहिती अजून पावेतों मिळालेली नाहीं. हें सूक्त थोड्या पाठभेदानें ऋग्वेदांत मंडळ १० मध्यें १६५।१-३ आलें आहे. परंतु तेथें पाहूनहि याविषयावर कांहीं जास्त प्रकाश पडत नाहीं. म्हणून संशोधकांस विनंति कीं त्यांनीं याविषयीं जास्त संशोधन करावें आणि या विद्येचा आविष्कार करावा.

याच विषयावर पुढील सूक्त पहा—

कपोत-विद्या

कांड ६, सूक्त २८

(ऋषिः - भृगुः । देवता - यमः, निर्ऋतिः ।)

ऋचा कपोतं नुदत प्रणोदमिषं मदन्तः परि गां नयामः ।
संलोभयन्तो दुरिता पदानि हित्वा न ऊर्जं प्र पदात्पथिष्ठः ॥ १ ॥
परीमेऽग्निमर्षत परीमे गामनेषत । देवेष्वक्रत श्रवः क इमाँ आ दधर्षति ॥ २ ॥
यः प्रथमः प्रवतमाससाद बहुभ्यः पन्थामनुपस्पशानः ।
योऽस्येशे द्विपदो यश्चतुष्पदस्तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे ॥ ३ ॥

अर्थ— (ऋचा प्र-नोदं कपोतं नुदत) मंत्रद्वारा पाठविण्यासयोग्य कबूतरास पाठवा. आम्ही तर (इषं मदन्तः) अन्न प्राप्त करून आनंदित होऊन (दुरिता पदानि संलोभयन्तः) आणि पापाचीं चिन्हेंरूप याचीं अशुभ पदचिन्हांस पुसून टाकीत (गां परिनयामः) गाईस चहूं बाजूस घेऊन जातों. (ऊर्जं हित्वा) जलस्थानास सोडून (पथि-ष्ठः प्रपदात्) मार्गांत उभा असलेला प्रवासी पुढें निघून जावो. [१]

(इमे अग्निं परि अर्षत) यांनीं अग्नीस प्राप्त केलें आहे. (इमे गां परि अनेषत) यांनीं गाईस प्राप्त केलें आहे आणि (देवेषु श्रवः अकृत) देवांमध्यें यश संपादन केला आहे. आतां (कः इमान् दधर्षति) यांना कोण भय दाखवूं शकतो ? [२]

(यः प्रथमः) जो पहिला (बहुभ्यः पंथां अनुपस्पशानः) अनेकांसाठीं मार्गाचा निश्चय करीत (प्रवतं आससाद) योग्यमार्ग प्राप्त करतो. (यः अस्यः द्विपदः) जो याचे दोन पायांचे आणि (यः चतुष्पदः) चार पायांचे आहेत त्यांचें वर स्वामित्व करतो (तस्मै यमाय मृत्यवे नमः अस्तु) त्या मृत्यु देणाऱ्या यमाला नमस्कार असो. [३]

वार्ताहर कबूतराला मंत्राचा पवित्र उच्चार करून आणि ईश्वराची प्रार्थना करून पवित्र इच्छेनें पाठवा. कधींहि घातक इच्छेनें पाठवूं नका. आम्हीं गाईस पाळतों, उत्तम अन्नाच्या सेवनानें आनंदित होतों आणि पापवासनास दूर करतों; म्हणून आमचा प्रवासी सुखानें पुढें जाईल, यांत शंका नाहीं.

जे दररोज अग्नींत हवन करतात, गाईचा सत्कार करतात आणि यश वाढविणारे पुण्यकर्म करतात, त्यांस भिवविण्याचें सामर्थ्य कोणास नाहीं. म्हणून मनुष्य या उपायांनीं स्वतः स्वतःला कष्टांपासून वाचवूं शकतो.

यमाचा अधिकार द्विपाद आणि चतुष्पाद सर्वांवर समान असतो. तो सर्व लोकांच्या मार्गास म्हणजे जीवनाच्या मार्गास यथा-तथ्य जाणतो. म्हणून त्या यमास सर्वांनीं नमस्कार करावा.

हा आशय या तीन मंत्रांचा आहे. यांत मधल्या म्हणजे दुसऱ्या मंत्रांत जें सांगितलें आहे कीं सत्कर्म करणाऱ्यास कोणी भीववूं शकत नाहीं, ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या पुढील सूक्त ही या कपोत विद्येविषयींच आहे. तें आतां पाहूं—

कपोत-विद्या

कांड ६, सूक्त २९

(ऋषिः - भृगुः । देवता - यमः, निर्ऋतिः ।)

अमून्हेतिः पतत्रिणी न्ये॑तु यदुलूको वदति मोघमेतत् । यद्वा कपोतः पदमग्नौ कृणोति ॥ १ ॥
यौ ते दूतौ निर्ऋत इदमेतोऽप्रहितौ प्रहितौ वा गृहं नः । कपोतोलूकाभ्यामपदं तदस्तु ॥ २ ॥
अवैरहत्यायेदमा पपत्यात्सुवीरताया इदमा ससद्यात् । पराङेव परा वद पराचीमनु संवतम्
यथा यमस्य त्वा गृहेऽरसं प्रतिचाकशानाभूकं प्रतिचाकशान् ॥ ३ ॥

अर्थ— (पतत्रिणी हेतिः अमून् नि एतु) पंखयुक्त शस्त्र या शत्रूंस खालीं आणो. (उलूकः यत् वदति मोघं एतत्) घुबड जें बोलतें तें व्यर्थ आहे. (यत् वा कपोतः अग्नौ पदं कृणोति) अथवा जें कबूतर अग्नीजवळ पाय ठेवतें तेंहि व्यर्थ आहे, म्हणजे त्याचेकडून कांहीं अशुभ होणार नाहीं. [१]

हे (निर्ऋते) दुर्गति ! (यौ प्रहितौ अप्रहितौ ते दूतौ) जे पाठविलेले अथवा न पाठविलेले तुझे दोन दूत (नः इदं गृहं आ इतः) आमच्या घरीं येतात; (कपोतोलूकाभ्यां तत् अपदं अस्तु) कबूतर आणि घुबडांकडून तो पाय ठेवण्यायोग्य न होवोत, म्हणजे कांहीं अशुभ सूचविणारे प्राणी आमच्या घरीं पाऊल न ठेवोत. [२]

(अ-वैरहत्याय इदं आपपत्यात्) आमच्या वीरांची हत्या न होण्याची सूचना देणारें हें होवो. (सुवीरतायै इदं आ ससद्यात्) आमच्या वीरांच्या उत्साहासाठीं हें सुचिन्ह होवो. (पराङ् पराची अनुसंवतं) खालीं तोंड करून अनुकूल रीतीनें (परा एव वद) दूरून बोल (यथा यमस्य गृहे) ज्याप्रकारें यमाच्या घरांत (अरसं त्वा प्रतिचाकशान) निर्बल झालेल्या तुला लोक पाहोत. (आभूकं प्रति चाकशान्) केवळ झालेला तुला पाहोत. म्हणजे तूं शत्रु दूर असमर्थ होऊन येथें रहा. [३]

हीं तीन्हीं सूक्तें मोठीं दुर्बोध आहेत. कबूतर, घुबड यांचेकडून कशाप्रकारें अनिष्टाची सूचना मिळते हें सांगणें कठिण आहे. परंतु या सूक्तांवरून असें दिसतें कीं आपले वीर शत्रूवर हल्ला करावयास जातांना कबूतर घेऊन जात असत आणि तेथील निरोप आपलें घरीं अथवा राष्ट्रांत पाठवीत असत. हा शुभ संदेश प्राप्त व्हावा आणि आपल्या वीरांच्या मृत्युचा अथवा आपल्या पराजयाचा संदेश प्राप्त न व्हावा याविषयींच्या प्रार्थना या मंत्रांत आहेत. परंतु या सूक्तांचा विषय संशोधनाचा आहे. त्यामुळें या सूक्तांविषयीं अधिक लिहिणें अशक्य आहे.

कृषीनें सुखप्राप्ति

कांड ३, सूक्त १७

(ऋषिः - विश्वामित्रः । देवता - सीता ।)

सीरा युञ्जन्ति कवयो युगा वि तन्वते पृथक् । धीरा देवेषु सुम्नयौ ॥ १ ॥

अर्थ— (देवेषु धीराः कवयः) देवांवर विश्वास ठेवणारे कवि (सुम्नयौ सीरा युञ्जन्ति) सुख प्राप्त करण्यासाठीं नांगर जोडतात आणि (युगा पृथक् वितन्वते) बैलांस (जोकड वेगळी) वेगळे करतात. [१]

भावार्थ— पृथिव्यादि देवतांच्या शक्तीवर विश्वास ठेवणारे कवि लोक विशेष सुख प्राप्त करण्यासाठीं नांगर जोडतात म्हणजे शेती करतात आणि जोकड योग्य जागीं बांधतात. [१]

युनक्त सीरा वि युगा तनोत कृते योनौ वपतेह बीजम् ।
विराजः श्नुष्टिः सभरा असन्नो नेदीय इत्सृण्यः पक्वमा यवन् ॥ २ ॥
लाङ्गलं पवीरवत्सुशीमं सोमसत्सरु ।
उदिद्वपतु गामविं प्रस्थावद्रथवाहनं पीवरीं च प्रफर्व्यम् ॥ ३ ॥
इन्द्रः सीतां नि गृह्णातु तां पूषाभि रक्षतु । सा नः पयस्वती दुहामुत्तरामुत्तरां समाम् ॥ ४ ॥
शुनं सुफाला वि तुदन्तु भूमिं शुनं कीनाशा अनु यन्तु वाहान् ।
शुनासीरा हविषा तोशमाना सुपिप्पला ओषधीः कर्तमस्मै ॥ ५ ॥
शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषतु लाङ्गलम् । शुनं वरत्रा बध्यन्तां शुनमष्ट्रामुदिङ्गय ॥ ६ ॥

अर्थ–(सीराः युनक्त) नांगर जोडा, (युगा वितनोत) जोकड प्रसरा, (कृते योनौ इह बीजं वपत) तयार केलेल्या शेतांत येथें बीज पेरा. (विराजः श्नुष्टिः न सभराः असत्) अन्नाची उपज आमच्यासाठीं भरपूर होवो. (सृण्यः इत् पक्वं नेदीयः आयवन्) परिपक्व धान्य आमच्याजवळ आणो. [२]

(पवीरवत् सुशीमं सोमसत्सरु लांगलं) वज्राप्रमाणें कठीण, चालविण्यास सुखकारक, लाकडी मुठीचा नांगर (गां अविं) गाय आणि बकरी, (प्रस्थावत् रथवाहनं) शीघ्रगामी रथाचे घोडे आणि बैल, (पीवरीं च प्रफर्व्यं) पुष्ट स्त्री (इत् उद्वपतु) निश्चयानें देवो. [३]

(इंद्रः सीतां नि गृह्णातु) इंद्र नांगराची रेषा पकडो. (पूषा तां अभिरक्षतु) पूषा तिचें रक्षण करो. (सा पयस्वती नः उत्तरां उत्तरां समां दुहां) ती नांगराची रेषा रसयुक्त होऊन आम्हांस पुढें येणाऱ्या वर्षांत रसाचें प्रदान करो. [४]

(सु–फालाः भूमिं शुनं वितुदन्तु) सुन्दर नांगराचे फाळ भूमीला सुखानें खोदोत. (कीनाशाः शुनं वाहान् अनुयन्तु) शेतकरी सुखानें बैलांमागून चालोत. (शुनासीरौ) हे वायु आणि सूर्य हो ! तुम्हीं दोघे (हविषा तोशमानौ) आमच्या हवनानें संतुष्ट होऊन (अस्मै सुपिप्पलाः ओषधीः कर्त) या शेतकऱ्यासाठीं उत्तम फलयुक्त धान्य उत्पन्न करो. [५]

(वाहाः शुनं) बैल सुखी होवोत, (नरः शुनं) मनुष्य सुखी होवोत, (लांगलं शुनं कृषतु) नांगर सुखानें शेती करो. (वरत्रा शुनं बध्यन्तां) दोऱ्या सुखानें बांधल्या जावो, (अष्ट्रां शुनं उदिंगय) चाबूक सुखानें वर उचलला जावो. [६]

भावार्थ— हे लोक हो ! तुम्हीं नांगर जोडा, जोकड प्रसरा, उत्तम प्रकारें जमीन तयार करा आणि नंतर त्यामध्यें बी पेरा. त्यामुळें अन्न (धान्य) उत्तम उत्पन्न होईल, पुष्कळ धान्य निर्माण होईल आणि परिपक्व झाल्यानंतर पुष्कळ धान्य प्राप्त होईल. [२]

नांगरास लोखंडाचा कठीण फाळ बसविला जावो आणि पकडण्यासाठीं लाकडाची मूठ केली जावी, त्यामुळें नांगर चालविणें सोपें जातें. हा नांगरच गाय, बैल, शेळ्या, मेंढ्या, घोडे, स्त्रीपुरुष या सर्वांस उत्तम गवत आणि धान्यादि देऊन पुष्ट करतो. [३]

इंद्र आपल्या वृष्टीनें नांगरानें खोदलेल्या रेषा पकडो आणि धान्य पोषक सूर्य त्यांचें उत्तम रक्षण करो. ही भूमि आम्हांस प्रतिवर्षी उत्तम रसयुक्त धान्य देत राहो. [४]

नांगराचे सुंदर फाळ भूमि खोदोत, शेतकरी बैलांचें मागें चालोत. आमच्या हवनानें प्रसन्न झालेले वायु आणि सूर्य या शेतीपासून उत्तम फळाच्या रसयुक्त औषधी देवोत. [५]

बैल सुखी राहोत, सर्व मनुष्यें आनंदित होवोत, उत्तम नांगर चालवून आनंदानें शेती केली जावो. दोऱ्या जेथें जशा बांधल्या जाव्यात तशा बांधल्या जावोत आणि आवश्यकता निर्माण होतांच चाबूक उचलला जावो. [६]

शुनासीराविह स्म मे जुषेथाम् । यद्दिवि चक्रथुः पयस्तेनेमामुप सिञ्चतम् ॥ ७ ॥
सीते वन्दामहे त्वार्वाची सुभगे भव । यथा नः सुमना असो यथा नः सुफला भुवः ॥ ८ ॥
घृतेन सीता मधुना समक्ता विश्वैर्देवैरनुमता मरुद्भिः ।
सा नः सीते पयसाभ्याववृत्स्वोर्जस्वती घृतवत्पिन्वमाना ॥ ९ ॥

अर्थ-हे (शुनासीरौ) वायु आणि सूर्य हो ! (इह स्म मे जुषेथां) येथें माझ्या हवनाचा स्वीकार करो. (यत् पयः दिवि चक्रथुः) जें जल आकाशांत तुम्हीं तयार केलें आहे, (तेन इमां भूमिं उप सिञ्चतं) त्यानें या भूमीला शिंपडत रहा. [७]

हे (सीते) नांगरलेल्या भूमे ! (त्वा वन्दामहे) तुला आम्हीं नमस्कार करतों. हे (सुभगे) ऐश्वर्ययुक्त भूमे ! (अर्वाची भव) आमच्या सन्मुख हो. (यथा नः सुमनाः असः) ज्यामुळें तूं आमच्यासाठीं उत्तम मनाची होशील आणि (यथा नः सुफलाः भुवः) ज्यामुळें आम्हांस उत्तम फळ देणारी व्हावेंस. [८]

(घृतेन मधुना समक्ता सीता) तूप आणि मधानें उत्तम प्रकारें माखलेली खडलेली जमीन (विश्वैः देवैः मरुद्भिः अनुमता) सर्व देव आणि मरुतांद्वारां अनुमोदित झाली आहे. हे (सीते) नांगरलेल्या भूमे ! (सा घृतवत् पिन्वमाना) अशी तूं तुपानें शिंपीलेली (नः पयसा अभ्याववृत्स्व) आम्हांस दूधानें चहुं बाजूंनीं भरपूर कर. [९]

भावार्थ— वायु आणि सूर्य माझ्या हवनाचा स्वीकार करो आणि जें जल आकाशमंडलांत आहे, त्याच्या वृष्टीनें या पृथ्वीला सिंचन करो. [७]

भूमि भाग्य देणारी आहे, म्हणून आम्हीं तिचा आदर करतों. ही भूमि आम्हांस उत्तम धान्य देत राहो. [८]

जेव्हां भूमि तूप आणि मधानें योग्य प्रकारें सिंचित होते आणि जल वायु आदि देवांची अनुकूलता तिला मिळते, तेव्हां ती आम्हांस उत्तम मधुर रसयुक्त धान्य आणि फल देत राहो. [९]

कृषीनें सुखप्राप्ति

शेतीनें भाग्याची वृद्धि

शेतीनें भाग्याची वृद्धि होते. भूमिची अवस्था, वायु आणि वृष्टीची परिस्थिति, ऋतुमानाची अनुकूलता जो जाणतो, तो शेती करून लाभ करून घेऊं शकतो आणि सुखी होऊं शकतो.

प्रथम शेतकऱ्यानें नांगर जोडावा, नांगरानें प्रथम भूमि चांगल्या प्रकारें नांगरावी, लहान रेषा बारीक ढेकूळ तोडून सरळ केल्या जावेत आणि त्यांत बीज रोपण्यांत यावें, असें करण्यानें धान्याची उत्तम पैदास होते.

जेव्हां नांगरानें उत्तम शेती केली जाते, तेव्हां धान्य सुद्धां उत्तम उत्पन्न होतें, गवत विपुल मिळतें आणि सर्व पशु तसेंच मनुष्यें पुष्कळ पुष्ट होऊन जातात.

नांगरानें नांगरलेली भूमि (इन्द्रः सीतां निगृह्णातु) वृष्टि करणारा देव आपल्या जलानें पकडो, नंतर त्याचें उत्तम रक्षण (पूषा) सूर्य स्वतःच्या किरणांनीं करो. या प्रकारें दृष्टि आणि सूर्यप्रकाश योग्य प्रमाणांत मिळत राहीला तर उत्तम शेती होईल आणि धान्यादि पुष्कळ प्रमाणांत प्राप्त होईल.

धान्य पेरण्यापूर्वी हवन

पांचव्या मंत्रांत उत्तम शेतीसाठीं प्रारंभीं शेतांत हवन करण्याचा उल्लेख आहे. जें धान्य पेरावयाचें आहे त्याचें हवन करावयास हवें आणि हवनासाठीं घृतादि अन्य पदार्थ तर अवश्य पाहिजेत. अशा प्रकारच्या हवनानें जलवायु शुद्ध होतो आणि शुद्ध शेतीपासून शुद्ध धान्य उत्पन्न होतें. या हवनानें दुसरी एक गोष्ट आपोआप होते, ती अशी की ज्याचें हवन करावयाचें तेंच पदार्थ पेरावयाचे. या नियमामुळें तंबाखु सारखे घातक पदार्थ पेरले जाण्याची संभावना कमी होते. यावरून हेंहि स्पष्ट होतें की जर पेरण्यापूर्वी हवन करण्याची वैदिक प्रथा सुरू केली, तर तंबाकू सारखे हानिकारक पदार्थ या जगांत जनतेचा घात करण्यास उत्पन्नच होणार नाहींत आणि उत्तम धान्य वगैरे विपुल

उत्पन्न होऊन लोकांचें अधिक कल्याण होईल.

खतासाठीं तूप आणि मध

नवव्या मंत्रांत (घृतेन मधुना पयसा समक्ता सीता) तूप, मध आणि दुधाचें खत वनस्पतींना घालण्याचा उपदेश आहे. हल्लीं तर हे पदार्थ मनुष्यांस खाण्यास सुद्धां मिळणें कठीण आहे, तर मग खतासाठीं कोठून मिळणार? थोड्या प्रमाणांत तरी कोठून मिळतील? परंतु शुद्ध पौष्टिक फल उत्पन्न करण्यासाठीं दूध, तूप, मध इत्यादींचें खत आवश्यक आहे ही गोष्ट सत्य आहे.

ऐतिहासिक उदाहरण

पुण्याच्या पेशव्यांच्या वेळीं कित्येक आंब्यांचीं झाडें याप्रमाणें पंचामृताचें खत घालून तयार केलीं होतीं. त्यांपैकीं एक आम्रवृक्ष आजहि जिवंत आहे आणि अशीं मधुर आणि गोड फळें देतो कीं त्याचें वर्णन शब्दानें होऊं शकणार नाहीं! पंचामृता (दूध, दहीं, तूप, मध आणि साखर) च्या खतानें जो आंबा पुष्ट होतो त्याचीं फळेंहि तशींच अद्भुत अमृतरूप अवश्य असतील यांत शंका नाहीं. हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. तसेंच वाईच्या एका पंडितानें दुधाचें खत घालून कृषिशास्त्रानुसार एक वर्ष जोंधळा पिकविला होता. तो इतका मधुर आणि परिपुष्ट झाला होता कीं त्याची समान्य धान्याशीं तुलनाच होऊं शकत नाहीं.

हा वैदिक कृषिशास्त्राचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. जे पैसेदार वाचक याचा प्रयोग करूं शकतील त्यांनीं अवश्य प्रयोग करून पहावा. सामान्य मनुष्यास असे प्रयोग करणें अशक्य आहे, कारण ज्या लोकांस बिचाऱ्यांस पीण्यास दूध मिळू शकत नाहींत ते खतासाठीं तूप, दहीं, मध आणि साखर कोठून आणणार?

वाचकांनीं हें वर्णन वाचावें आणि वैदिककाळाच्या शेतीची कल्पना करावी आणि मनांतल्या मनांत तिचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न करावा.

गोरक्षणाची वेळ

वैदिककाळ गोरक्षणाचा होता. त्यामुळें गाई भरपूर होत्या आणि त्यामुळेंच खतासाठीं दूध मिळूं शकत होतें. परंतु आज अनार्यांच्या भक्षणासाठीं लाखोंनीं गाई कापल्या जात आहेत, त्यामुळें पीण्यासच दूध पुरेसें मिळत नाहीं. हें कालाचें परिवर्तन आहे. येथें आतां हें पहाणें आहे कीं वैदिकधर्मीयांच्या प्रयत्नांनीं भविष्यकाल कसा प्राप्त होतो?

अश्व

कांड ६, सूक्त ९२

(ऋषिः - अथर्वा । देवता - इन्द्रः, वाजी ।)

वातंरंहा भव वाजिन्युज्यमान इन्द्रस्य याहि प्रसवे मनोजवाः ।
युञ्जन्तु त्वा मरुतो विश्ववेदस आ ते त्वष्टा पत्सु जवं दधातु ॥ १ ॥
जवस्ते अर्वन्निहितो गुहा यः श्येने वात उत योऽचरत्परीत्तः ।
तेन त्वं वाजिन्बलवान्बलेनाजिं जय समने पारयिष्णुः ॥ २ ॥

अर्थ— हे (वाजिन्) घोड्या! (युज्यमानः वातरंहाः भव) जोडल्यावर वायूच्या वेगानें युक्त हो (इन्द्रस्य प्रसवे मनोजवाः याहि) इंद्राच्या या सृष्टींत मनोवेगानें चाल. (विश्ववेदसः मरुतः त्वा युजन्तु) सर्व ज्ञानानें युक्त मरेपर्यंत उठून लढणारे वीर तुला नियुक्त करोत. (त्वष्टा ते पत्सु जवं आदधातु) त्वष्टा तुझ्या पायांत वेग ठेवो. [१]

हे (अर्वन्) गतिशील! (यः गुहा निहितः ते जवः) जो हृदयांत राहिलेला तुझा वेग आहे, (यः श्येने वाते उत परीत्तः) जो वेग श्येनपक्ष्यामध्यें आणि वायुमध्यें आहे आणि जो इतरत्रसुद्धां आहे; हे (वाजिन्) घोड्या! (तेन त्वं बलवान्) त्या वेगानें तूं बलवान् होऊन (समने पारयिष्णुः) संग्रामांत पार करणारा होऊन (आजिं जय) युद्धांत विजय मिळव. [२]

भावार्थ— घोडा वेगवान् असावा. चालण्याचे वेळीं मनाचे वेगाप्रमाणें शीघ्र धावो. असे घोडे वीर आपल्या रथास जोडोत आणि ईश्वर अशा घोड्याच्या पायांत पुष्कळ वेग ठेवो. [१]

जो वेग वायु, ससाणा आणि दुसऱ्या वेगवान् पदार्थांत आहे, तो वेग या घोड्यांत असो. असा वेगवान् आणि बलवान् घोडा युद्धांत विजय प्राप्त करणारा होवो. [२]

तनूष्टे वाजिन्तन्वं१ नयन्ती वाममस्मभ्यं धावतु शर्म तुभ्यम् ।
अह्रुतो महो धरुणाय देवो दिवीव ज्योतिः स्वमा मिमीयात् ॥ ३ ॥

अर्थ— हे (वाजिन्) अश्वा ! (ते तनूः तन्वं नयन्ती) तुझें शरीर आमच्या शरीरास घेऊन जात असतां (अस्मभ्यं वामं धावतु) आम्हां सर्वांस सत्वर काळांत पोहोंचवो आणि (तुभ्यं शर्म) तुम्हांस सुख देवो. (अ-ह्रुतः देवः) अकुटिल देव (धरुणाय) सर्वांस धारण करण्यासाठीं (दिवि ज्योतिः इव) द्युलोकांत जसा तेजस्वी सूर्य आहे त्याच्या समान (महः स्वं आ मिमीयात्) सर्वांस महान् तेज निर्माण करून देवो. [३]

भावार्थ- हा घोडा मनुष्यला अतिशीघ्र दूर पर्यंत पोहोंचवो. तो धान्याला सुख देवो आणि स्वतः सुखी होवो. द्युलोकांतील सूर्यासमान असा घोडा येथें चमकत राहो. [३]

या सूक्तांत उत्तम घोड्याचें वर्णन आहे. घोडा बलवान् आणि चपल तसेंच वेगवान् असावा. युद्धांत जाणाऱ्या सैनिकांनीं अशा घोड्यांचा उपयोग करावा आणि विजय प्राप्त करावा वगैरे बोध या सूक्तांतून मिळतो.

वृष्टि कशी होते ?

कांड ६, सूक्त २२

(ऋषिः – शन्तातिः । देवता – आदित्यरश्मिः, मरुतः ।)

कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति ।
त आववृत्रन्त्सदनादृतस्यादिद्घृतेन पृथिवीं व्यूदुः ॥ १ ॥
पयस्वतीः कृणुथाप ओषधीः शिवा यदेजथा मरुतो रुक्मवक्षसः ।
ऊर्जं च तत्र सुमतिं च पिन्वत यत्रा नरो मरुतः सिञ्चथा मधु ॥ २ ॥
उदप्रुतो मरुतस्ताँ इयर्त वृष्टिर्या विश्वा निवतस्पृणाति ।
एजाति ग्लहा कन्येव तुन्नैरुं तुन्दाना पत्येव जाया ॥ ३ ॥

अर्थ— (अपः वसानाः) पाण्यास आपल्या बरोबर घेऊन (सु-पर्णाः हरयः) उत्तम गतिशील सूर्यकिरण (कृष्णं नियानं दिवं) सर्वांचें आकर्षण करणारे सर्वांस वाहनरूप द्युलोकस्थ सूर्याप्रत (उत् पतन्ति) वर चढतात. (ते ऋतस्य सदनात्) ते पाण्याच्या स्थानरूप अंतरिक्षांतून (आववृत्रन्) खालीं येतात (आत् इत घृतेन पृथिवीं वि ऊदुः) आणि पाण्यानें पृथ्वीला भिजवितात. [१]

हे (रुक्मवक्षसः मरुतः) चमकणाऱ्या हृदययुक्त वायु देव हो ! (यत् एजथ) जेव्हां तुम्हीं वेगानें चालतां तेव्हां (अपः ओषधीः) पाणी आणि औषधींना (पयस्वतीः शिवाः कृणुथ) रसयुक्त आणि हितकारक करतां. हे (नरः मरुतः) नेता मरुत हो ! (यत्र च मधु सिंचत) आणि जेथें मधुर रस सिंचन करतां (तत्र ऊर्जं सुमतिं च पिन्वत) तेथें बल देणारें अन्न आणि उत्तम बुद्धि स्थापित करतां. [२]

हे (मरुतः) मरुत हो ! (तान् उदप्रुतः इयर्त) त्या उदकानें पूर्ण करणाऱ्या मेघांना पाठवा. (या वृष्टिः) ज्यांच्यामुळें होणारी वृष्टि (विश्वाः निवतः पृणाति) सर्व खालोंक स्थानांस भरते. (तुन्ना कन्या इव) ज्याप्रमाणें दुःखी कन्या पित्यास कंपित करते त्याप्रमाणेंच (ग्लहा) मेघांचा शब्द (एजाति) सर्वांस कंपित करीत आहे, (पत्या जाया इव) ज्याप्रमाणें पतिसह रहाणारी धर्मपत्नी गृहस्थाच्या संसारांत प्रेरणा करते. त्याप्रमाणेंच तो शब्द (एरुं तुंदाना) मेघास प्रेरित करो. [३]

वृष्टी कशी होते ?

मेघ कसे तयार होतात ?

सूर्यकिरण पृथ्वीवरील जल हरण करतात, त्यामुळें त्यांस (**हरि:, हरय:**) अशीं नावें दिलीं आहेत. ते सर्व स्थानांस पूर्ण करतात, म्हणून त्या सूर्यकिरणांस (**सु-पर्णा-सुपूर्णा:**) म्हणतात अथवा त्यांच्या विशेष गतीनें हीं नावें त्यास प्राप्त झालीं आहेत. हीं किरणें (**अप: वसाना:**) पाण्यास आपल्याबरोबर घेतात, जणूं पाण्याचें वस्त्र तीं पांघरतात आणि (**दिवं उत्पतन्ति**) द्युलोकांत– वर आकाशांत– वर चढतात. म्हणजे पृथ्वीवरील जलांश घेऊन हीं सूर्यकिरणें वर जातात आणि (**ऋतस्य सदनं**) पाण्याचें स्थान अंतरिक्षांत राहून तेथें मेघरूपांत परिणत होतें आणि त्या मेघांतून पृथ्वीवर पुनः तेंच पाणी वृष्टि रूपानें पडतें. म्हणजें जें जल सूर्यकिरणांमुळें वर आकर्षिलें जातें तेंच जल पावसाच्या रूपानें पृथ्वीवर येतें. हें कार्य सूर्यकिरणांचें आहे.

हें सूर्यकिरणांचें कार्य सदैव चालू असतें. तीं समुद्राचें पाणी वर खेंचून नेतात, मेघ बनतात आणि वृष्टि होते, या प्रकारें जलशुद्धि होते. पृथ्वीवरील जें जल वाफेच्यारूपानें वर खेंचलें जातें, तें तेथें शुद्ध होऊन वृष्टिरूपानें पृथ्वीवर पडतें; जणूं काय ती (**मधु सिंचथ**) मधूर मधाची वृष्टि होते. या वृष्टीनें (**औषधी: शिवा:**) हितकारक औषधि निर्माण होतात आणि (**पयस्वती:**) उत्तम रसानेंयुक्त होतात. या औषधि रोग्यांच्या शरीरांत राहणाऱ्या दोषाला (**दोष-धी:**) धुवून त्यांस निरोगी करतात. या औषधि आणि विविध रसपूर्ण अन्न खाल्यानें मनुष्य (**ऊर्जं सुमतिं च**) बल आणि उत्तम बुद्धि प्राप्त करतात. जर वृष्टि न झाली तर या पदार्थांची उत्पत्ति होत नाहीं आणि दुष्काळ पडतो. त्यामुळें मनुष्य निर्बल आणि बुद्धिहीन होतात. याप्रमाणें वृष्टीचें महत्त्व केवढें आहे तें पहा.

पाण्यानें भरलेले मेघ वायु आणतो आणि त्यांतून जी वृष्टि होते ती पृथ्वीवरील तलाव, नद्या, विहिरी वगैरे सर्वांस भरून टाकतो आणि त्यामुळें सर्वत्र आनंद प्रसरतो.

थोडक्यांत हें या सूक्ताचें सार आहे. वाचकांनीं याचा विचार करावा आणि वृष्टिविषयक विज्ञान जाणून घ्यावें.

वृष्टि

कांड ४, सूक्त १५

(ऋषि: – अथर्वा । देवता – मरुत:, पर्जन्यश्च ।)

समुत्पतन्तु प्रदिशो नभस्वतीः सम॒भ्राणि वात॑जूतानि यन्तु ।
महऋषभस्य नदतो नभस्वतो वाश्रा आप: पृथिवीं तर्पयन्तु ॥ १ ॥
समीक्षयन्तु तविषाः सुदानवोऽपां रसा ओषधीभिः सचन्ताम् ।
वर्षस्य सर्गा महयन्तु भूमिं पृथग्जायन्तामोषधयो विश्वरूपाः ॥ २ ॥

अर्थ— (**नभस्वती: प्रदिश: सं उत्पतन्तु**) मेघयुक्त दिशा भरून जावोत. (**वातजूतानि अभ्राणि सं यन्तु**) वायुपासून गति प्राप्त झालेले उदकयुक्त मेघ मिळून एकत्र येवोत. (**महऋषभस्य नदत:**) महाबळवान् गर्जना करीत (**नभस्वत: वाश्रा: आप: पृथिवीं तर्पयन्तु**) वादळांच्या गतियुक्त जलधारा भूमीला तृप्त करोत. [१]

(**तविषा: सुदानवा: समीक्षयन्तु**) बळवान् पाण्याचें उत्तम दान करणारे मेघ दिसून येवोत. (**अपां रसा: ओषधीभि: सचन्तां**) पाण्यांचे रस औषधींशीं संयुक्त होऊन जावोत. (**वर्षस्य सर्गा: भूमिं महयन्तु**) वृष्टीच्या धारा भूमीला समृद्ध करोत. (**विश्वरूपा: ओषधय: पृथक् जायन्तां**) विविधरूपाच्या औषधि अनेकप्रकारें उत्पन्न होवोत. [२]

भावार्थ— चारी दिशांतून ढग येवोत, वायु जोरानें वाहो, त्या वायूनें मेघ आकाशांत येवोत आणि मोठी गर्जना होऊन मोठा पाऊस पडो. [१]

मेघांतून वर्षणारें जल वनस्पतींस प्राप्त होवो आणि सर्व वनस्पति उत्तम परिपुष्ट होवोत. [२]

समीक्षयस्व गायतो नभांस्यपां वेगासः पृथगुद्विजन्ताम् ।
वर्षस्य सर्गा महयन्तु भूमिं पृथग्जायन्तामोषधयो विश्वरूपाः ॥ ३ ॥
गणास्त्वोप गायन्तु मारुताः पर्जन्य घोषिणः पृथक् ।
सर्गा वर्षस्य वर्षतो वर्षन्तु पृथिवीमनु ॥ ४ ॥
उदीरयत मरुतः समुद्रतस्त्वेषो अर्को नभ उत्पातयाथ ।
महऋषभस्य नदतो नभस्वतो वाश्रा आपः पृथिवीं तर्पयन्तु ॥ ५ ॥
अभि क्रन्द स्तनयार्दयोदधिं भूमिं पर्जन्य पयसा समङ्ग्धि ।
त्वया सृष्टं बहुलमैतु वर्षमाशारैषी कृशगुरेत्वस्तम् ॥ ६ ॥
सं वोऽवन्तु सुदानव उत्सा अजगरा उत । मरुद्भिः प्रच्युता मेघा वर्षन्तु पृथिवीमनु ॥ ७ ॥
आशामाशां वि द्योततां वाता वान्तु दिशोदिशः । मरुद्भिः प्रच्युता मेघाः सं यन्तु पृथिवीमनु ॥८॥

अर्थ- (गायतः नभांसि समीक्षयस्व) गर्जणाऱ्या मेघांनीं युक्त आकाश दाखवा. (अपां वेगासः पृथक् उद्विजन्तां) पाण्याचे वेग विविधप्रकारें उमटोत. (वर्षस्य सर्गाः भूमिं महयन्तु) वृष्टीच्या धारा भूमीका समृद्ध करोत. (विश्वरूपाः ओषधयः वीरुधः पृथक् जायन्तां) विविधरूपाच्या औषधि अनेकप्रकारें उत्पन्न होवोत. [३]

हे पर्जन्या ! (घोषिणः मारुताः गणाः त्वा पृथक् उपगायन्तु) गर्जना करणारे वायूचे गण तुझें पृथक् पृथक् गायन करोत. (वर्षतः वर्षस्य सर्गाः पृथ्वीं अनु वर्षन्तु) वर्षाव करणाऱ्या मेघाच्या धारा पृथ्वीवर अनुकूल वर्षोत. [४]

हे (मरुतः) वायूंनो ! (अर्कः त्वेषः नभः) सूर्याच्या उष्णतेनें ढगांना (समुद्रतः उत्पातयत) समुद्रांतून वर घेऊन जा (अथ उदीरयत) आणि वर उडवा. (महऋषभस्य नदतः नभस्वतः) मोठे बळवान् आणि शब्द करणारे ढगयुक्त आकाशांतून (वाश्राः आपः पृथिवीं तर्पयन्तु) वेगवान् जलधारा पृथ्वीस तृप्त करोत. [५]

हे (पर्जन्य) मेघा ! तूं (अभिक्रन्द) गर्जना कर, (स्तनयः) वीजा चमकव. (उदधिं अर्दय) समुद्रास खळबळवून सोड. (पयसा भूमिं समङ्ग्धि) पाण्यानें भूमि भिजवून सोड. (त्वया सृष्टं बहुलं वर्षं एतु) तुझ्याकडून होणारी महावृष्टि आमचेजवळ येवो. (कृश-गुः) जमिनीका नांगरणारा (आशार-एषी) आश्रयाची इच्छा करणारा होऊन (अस्तं एतु) आपल्या घरीं निघून जावो. [६]

(सु-दानवः उत अज-गराः उत्साः) उत्तम पाणी देणारे मोठे प्रवाह (वः सं अवन्तु) तुमचें रक्षण करोत. (मरुद्भिः प्रच्युताः मेघाः) वायूंनीं प्रेरित केलेले मेघ (पृथिवीं अनु वर्षन्तु) पृथ्वीवर अनुकूल वर्षाव करोत. [७]

(आशां आशां विद्योततां) दिशादिशांस वीजा चमकोत. (दिशो दिशः वाताः वान्तु) प्रत्येक दिशेस वायु वाहो. (मरुद्भिः प्रच्युताः मेघाः पृथिवीं अनु संयन्तु) वाऱ्यानें चालविलेले मेघ पृथ्वीवर अनुकूलतेनें येवोत. [८]

भावार्थ—गर्जना करणाऱ्या मेघांतून जोराची वृष्टि होवो आणि त्या वृष्टीनें वनस्पति उत्तम रसयुक्त होवोत. [३]

वायु जोरानें मेघांस घेऊन येवो आणि प्रचंड धारांनीं उत्तम वृष्टि होवो. [४]

सूर्याच्या उष्णतेनें समुद्राची वाफ होऊन वाऱ्याबरोबर वर जावो, तेथें ती सर्व एकत्रित होऊन तिचे मेघ होवोत. तेथें वीजेची गर्जना होऊन पृथ्वीला तृप्त करणारी वृष्टि होवो. [५]

मेघगर्जना करोत, वीज चमको, समुद्र उसळो, भूमीवर अशी वृष्टि होवो कीं शेतकरी आपल्या घरीं जाऊन आश्रय घेवो. [६]

पाणी देणारे मेघ सर्वांचें रक्षण करोत. त्यांच्यापासून भूमीवर उत्तम वृष्टि होवो. [७]

सर्व दिशांत वीज चमको, वायुवेगानें वाहो, त्यामुळें चालणारे मेघ पुष्कळ वृष्टि करोत. [८]

आपो विद्युद्भ्रं वर्षं सं वोऽवन्तु सुदानव उत्सा अजगरा उत ।
मरुद्भिः प्रच्युता मेघाः प्रावन्तु पृथिवीमनु ॥ ९ ॥
अपामग्निस्तनूभिः संविदानो य ओषधीनामधिपा बभूव ।
स नो वर्षं वनुतां जातवेदाः प्राणं प्रजाभ्यो अमृतं दिवस्परि ॥ १० ॥
प्रजापतिः सलिलादा समुद्रादाप ईरयन्नुदधिमर्दयाति ।
प्र प्यायतां वृष्णो अश्वस्य रेतोऽर्वाङेतेन स्तनयित्नुनेहि ॥ ११ ॥
अपो निषिञ्चन्नसुरः पिता नः श्वसन्तु गर्गरा अपां वरुणाव नीचीरपः सृज ।
वदन्तु पृश्निबाहवो मण्डूका इरिणानु ॥ १२ ॥
संवत्सरं शशयाना ब्राह्मणा व्रतचारिणः । वाचं पर्जन्यजिन्वितां प्र मण्डूका अवादिषुः ॥ १३ ॥

अर्थ-(आपः विद्युत् अभ्रं वर्षं) जल, विद्युत, मेघ, वृष्टि (उत अजगराः सुदानवः उत्साः) आणि पाणी देणारे मोठे प्रवाह (वः सं अवन्तु) तुमचें रक्षण करोत. (मरुद्भिः प्रच्युताः मेघाः पृथिवीं अनु प्र अवन्तु) वायूनें प्रेरित केलेले मेघ भूमीचें रक्षण करोत. [९]

(अपां अग्निः) मेघांच्या पाण्यांत रहाणारा वीजरूपी अग्नि (तनूभिः संविदानः) सर्व शरीरांशीं एकरूप होऊन (यः ओषधीनां अधिपा बभूव) जो औषधींचा पालक होतो (सः जातवेदाः) तो अग्नि (दिवः परि अमृतं वर्षं) आकाशांतून अमृतरूपी वृष्टिजल जें (प्रजाभ्यः प्राणं) प्रजेसाठीं प्राणरूप आहे तें (नः) आमच्यासाठीं (वनुतां) देवो. [१०]

(प्रजापतिः सलिलात् समुद्रात् आपः ईरयन्) प्रजापति जलमय समुद्रांतून जलास प्रेरित करीत (उदधिं अर्दयाति) समुद्रास गति देतो. त्यामुळें (अश्वस्य वृष्णः रेतः प्र प्यायतां) वेगवान् वृष्टि करणाऱ्या मेघांतून पाणी वाढो. वृष्टि (एतेन स्तनयित्नुना अर्वाङ् आ इहि) या गर्जना करणाऱ्यासह येथें येवो. [११]

(अपः निषिञ्चन् असुरः) पाण्याची वृष्टि करणारा मेघ (नः पिता) आमचा पालक आहे. हे (वरुण) श्रेष्ठ उदक धारण करणाऱ्या मेघा ! (अपां गर्गराः श्वसन्तु) पाण्याचा गडगड अवाज करणारे मेघ चालोत. (अपः नीचीः अवसृज) पाण्यास सखल भूमीकडे प्रवाहित कर. (पृश्निबाहवः मण्डूकाः) विचित्ररंगी बेरंगी हात असणारे बेडूक (इरिणा अनु वदन्तु) भूमीवर येऊन शब्द करोत. [१२]

(मण्डूकाः पर्जन्यजिन्वितां वाचं) बेडूक पर्जन्यानें प्रेरित वाणी (अवादिषुः) बोलतात. जणूं काय (संवत्सरं शशयानाः व्रतचारिणः ब्राह्मणाः) वर्षभर एकस्थानीं राहून व्रत करणारे ब्राह्मण बोलतात. [१३]

भावार्थ— मेघ, विद्युत्, वृष्टि, जल, जलस्थान हे सर्व मनुष्यांचें रक्षण करोत. वायूनें चालवलेले मेघ पृथ्वीवर उत्तम वृष्टि करोत. [९]

मेघांत वीजरूपी अग्नि आहे तोच वृष्टि करतो, म्हणून तो औषधींचा अधिपति आहे. तो वरून वृष्टि करो, आणि आम्हांस अमृतजल देवो, त्यामुळें प्राणिमात्रास जीवन प्राप्त होवो; अशाप्रकारें आम्हां सर्वांचें रक्षण होवो. [१०]

हा प्रजापालक समुद्राचे पाण्यास प्रेरित करतो, ज्यामुळें मेघ होतात. त्यामुळें पृथ्वीवर पुरतें पाणी प्राप्त होवो. हे मेघ वीजेसह आमच्या भूमिजवळ येवोत. [११]

मेघाच्या वृष्टीनें पृथ्वीवर मोठे प्रवाह वाहोत. पाण्यांत बेडूक उत्तम शब्द करोत. [१२]

व्रत आचरण करणाऱ्या ब्राह्मणांप्रमाणें हे बेडूक जणूं काय वर्षभर व्रत करीत होते, आतां आपलें व्रत समाप्त करून बाहेर आले आहेत आणि प्रवचन करीत आहेत. [१३]

उपप्रवद मण्डूकि वर्षमा वद तादुरि । मध्ये ह्रदस्य प्लवस्व विगृह्य चतुरः पदः ॥ १४ ॥
खण्वखा३इ खैमखा३इ मध्ये तदुरि । वर्षं वनुध्वं पितरो मरुतां मन इच्छत ॥ १५ ॥
महान्तं कोशमुदचाभि षिञ्च सविद्युतं भवतु वातु वातः ।
तन्वतां यज्ञं बहुधा विसृष्टा आनन्दिनीरोषधयो भवन्तु ॥ १६ ॥

अर्थ— हे (मंडूकि) बेडके ! हे (तादुरि) लहान बेडके (उप प्रवद) बोल, (वर्षं आ वद) पावसास बोल आणि (ह्रदस्य मध्ये) तलावांत (चतुरः पदः विगृह्य) चारी पायांसह (प्लवस्व) पोह. [१४]

हे (खण्-वखे) बिळांत रहाणारी, हे (खैमखे) घांत रहाणारी, हे (तदुरि) लहान बेडकी ! (वर्षे मध्ये वनुध्वं) वृष्टिमध्यें आनंदित हो. हे (पितरः) पालक हो ! (मरुतां मनः इच्छत) वायूंचें मननीय ज्ञान इच्छा. [१५]

(महान्तं कोशं उदञ्च) पाण्याच्या मोठ्या सांठ्यास म्हणजे मेघांना प्रेरित कर आणि (अभि षिञ्च) जलवर्षा कर. (सविद्युतं भवतु) आकाश वीजांनीं युक्त होवो, (वातः वातु) वायु वहात राहो. (यज्ञं तन्वतां) यज्ञ करा. (ओषधयः) औषधि (बहुधा विसृष्टाः) पुष्कळ प्रकारांनीं उत्पन्न झालेल्या (आनंदिनीः भवन्तु) आनंद देणाऱ्या होवोत. [१६]

भावार्थ— बेडूक ढगांना बोलावोत. आणि पाण्यानें तलाव भरल्यानंतर ते त्यांत पुष्कळ पोहोत. [१४]

बेडूक आनंदित व्हावेत अशी वृष्टि होवो. [१५]

मेघ येवोत, पुष्कळ वृष्टि होवो, वीजा चमकोत, वायु वाहो, औषधि पुष्ट होवोत, पुष्कळ अन्न उत्पन्न होवो आणि यज्ञ वाढत राहोत. [१६]

हें सूक्त म्हणजे पर्जन्यविषयक एक सुंदर काव्य आहे, तें अत्यंत स्पष्ट असल्यानें त्याच्या जास्त स्पष्टीकरणाची जरूरी नाहीं.

मेघांचा संचार

कांड ६, सूक्त ४९

(ऋषिः - गार्ग्यः । देवता – अग्निः ।)

नहि ते अग्ने तन्वः क्रूरमानंश मर्त्यः । कपिर्बभस्ति तेजनं स्वं जरायु गौरिव ॥ १ ॥

अर्थ— हे (अग्ने) प्रकाशरूप देवा ! (मर्त्यः ते तन्वः क्रूरं नहि आनंश) कोणी मनुष्य तुझ्या शरीराच्या उग्रतेचा स्वीकार करूं शकत नाहीं, ज्याप्रकारें (कपिः तेजनं बभस्ति) क म्हणजे जल त्याचें पान करणारे मेघ प्रकाश धारण करतात आणि (गौः स्वं जरायु इव) ज्याप्रमाणें गाय आपल्या जरायुस घेते. [१]

हें सूक्त अत्यंत दुर्बोध आहे, परंतु खालीं दिलेल्या भावार्थावरून वाचक अनुसंधानानें थोडा भाव समजूं शकतील.

भावार्थ—' हे ईश्वरा ! ज्यावेळीं तूं क्रूर होतोस, तेव्हां तुझ्या समक्ष कोणी मनुष्य उभा राहूं शकत नाहीं, तुझा राग इतका असह्य आहे. काळा ढग सुद्धां प्रकाश धारण करूं शकेल, अथवा गाय सुद्धां आपली वार खाऊन जाईल, परंतु कोणी मनुष्य ईश्वराचा कोप झाला असतां क्षणमात्र टिकूं शकणार नाहीं. [१]

मेष इव वै सं च वि चोर्वच्यसे यदुत्तरद्रावुपरश्च खादतः ।
शीर्ष्णा शिरोऽप्ससाप्सो अर्दयन्नंशून्बभस्ति हरितेभिरासभिः ॥ २ ॥
सुपर्णा वाचमक्रतोप द्यव्याखरे कृष्णा इषिरा अनर्तिषुः ।
नि यन्नियन्त्युपरस्य निष्कृतिं पुरू रेतो दधिरे सूर्यश्रितः ॥ ३ ॥

अर्थ— (मेष इव वै) खात्रीनें मेंढ्याप्रमाणें तूं (सं अच्यसे) एकत्रित होतोस आणि (च उरू वि अच्यसे) पसरतोस (यत् उत्तरद्रौ खादतः उपरः च) आणि उत्तम वनांत गवत खात थांबतोस. (शीर्ष्णा शिरः अप्ससा अप्सः अर्दयन्) डोक्यानें डोकें आणि रूपानें रूपास दाबून टाकीत (हरितेभिः आसभिः अंशून् बभस्ति) पिंवळया रंगाच्या तोंडानें किरणांस धारण करतो. [२]

(सुपर्णाः आखरे द्यवि वाचं उप अक्रत) अनेक किरणें या पोंकळ आकाशांत शब्द करतात आणि (कृष्णाः इषिराः अनर्तिषुः) पाण्यास आकर्षित करणारे गतिमान किरण येथें नाचत आहेत. (यत् उपरस्य निष्कृतिं नि नियन्ति) जेव्हां थांबणाऱ्या मेघांची निष्कृति म्हणजे वृष्टिरूप परिणामास निश्चित करते, तेव्हां ते (पुरू रेतः दधिरे) पुष्कळ जल धारण करतात. [३]

भावार्थ-ज्याप्रमाणें मेंढे अथवा बकरे कधीं एकत्र होतात आणि कधीं कधीं वेगळे होऊन सुपीक जमीनीवरील गवत खातात आणि कोण्यावेळीं आपल्या डोक्यानें दुसऱ्याच्या डोक्यास टक्कर देतात आणि आपल्या शरीरानें दुसऱ्याचें शरीर घासतात आणि अशा प्रकारची क्रीडा करीत गवत खातात, त्याप्रमाणें मनुष्यसुद्धां आपसांत एकत्रित होतात, कधीं भांडतात आणि अशा प्रकारें जीवन व्यतीत करतात तथापि ईश्वराच्या क्रोधासमोर कोणी टिकूं शकत नाहीं. [२]

ईश्वराच्या कृपेनें सूर्यकिरण सर्व जगांत नाचत आहेत आणि जलाचें आकर्षण करीत वेगानें जात आहेत. हेच मेघ तयार करतात आणि त्यांपासून वृष्टि होते. तेव्हां सर्व जगतास शांत करणारें पाणी पुरत्या प्रमाणांत सर्वांस प्राप्त होतें. [३]

याप्रकारें परमेश्वराच्या सामर्थ्याचें ध्यान करणें योग्य आहे.

मेघांत सरस्वती

कांड ७, सूक्त ११

(ऋषिः - शौनकः । देवता - सरस्वती ।)

यस्ते पृथु स्तनयित्नुर्य ऋष्वो दैवः केतुर्विश्वमाभूषतीदम् ।
मा नो वधीर्विद्युता देव सस्यं मोत वधी रश्मिभिः सूर्यस्य ॥ १ ॥

अर्थ— (यः ते पृथुः स्तनयित्नुः) जो तुझा विस्तृत, गर्जना करणारा, (ऋष्वः दैवः केतुः) प्रवाहित होणारा आणि दिव्य ध्वजासमान मार्गदर्शक चिन्ह (इदं विश्वं आभूषति) या जगास भूषित करतो, त्या (विद्युता) वीजेनें (नः मा वधीः) आम्हांस मारूं नकोस. तसेंच हे देवा ! (उत) आणि आमचें (सस्यं सूर्यस्य रश्मिभिः मा वधीः) शेत सूर्याच्या किरणांनीं नष्ट करूं नकोस. [१]

भावार्थ— हे सरस्वति ! जो तुझा विस्तृत आणि गर्जना करणारा, स्वतः वृष्टिरूपानें प्रभावित होणारा, ज्यामध्यें वीज चमकत आहे आणि जो या विश्वाचें भूषण आहे, तो मेघ आपल्या वीजेनें आमचा नाश न करो, परंतु असेंहि न व्हावें की, आकाशांत ढग न यावेत आणि सूर्याच्या तापानें आमची सर्व शेती नष्ट व्हावी, म्हणजे आकाशांत ढग यावेत, मेघ वर्षोत आणि शेती उत्तम होवो; परंतु मेघांतील वीजेनें कोणाचा नाश न होवो. [१]

' सरस्वती ' चा दुसरा अर्थ (सरः) रसानें युक्त असा आहे. म्हणजे पाणी देणारी. तेंच जल अथवा रस मेघांत रहातो आणि तो आमचें धान्य इत्यादीस पुष्ट करतो. या मंतरच्या सूक्तांत सरस्वतीचा अर्थ ' विद्या ' आहे, येथें ' जल ' असा आहे.

सरस्वती

कांड ७, सूक्त १०

(ऋषिः – शौनकः । देवता – सरस्वती ।)

यस्ते स्तनः शशयुर्यो मयोभूर्यः सुम्नयुः सुहवो यः सुदत्रः ।
येन विश्वा पुष्यसि वार्याणि सरस्वति तमिह धातवे कः ॥ १ ॥

अर्थ— हे सरस्वति ! (यः ते शशयुः स्तनः) जो तुझा शांति देणारा स्तन आहे आणि (यः मयोभूः यः सुम्नयुः) जो सुख देणारा, जो शुभ मन देणारा (यः सुहवः सुदत्रः) जो प्रार्थनीय आणि उत्तम पुष्टि देणारा आहे, (येन विश्वा वार्याणि पुष्यसि) ज्यामुळें तूं सर्व वरणीय पदार्थांस पुष्ट करतेस, (तं इह धातवे कः) त्याला येथें आमच्या पुष्टिसाठीं आमच्याकडे आण. [१]

भावार्थ— सरस्वती देवी जगाला सारयुक्त रस देते. तिच्या स्तनांत पोषक दूध आहे. ती सुख शांति, सुमनस्कता, पुष्टि वगैरे देते. त्यानें सर्वांचें पोषण होतें. हे देवी ! ते तुझे पोषक गुण आमच्या जवळ कर. म्हणजे उत्तम रस पीऊन आम्हीं सर्व पुष्ट होऊं. [१]

सरस्वती विद्याच आहे. विद्या सर्वांचें पोषण करते. सर्वांस शांति, सुख, सुमनस्कता आणि पुष्टि देते. विद्येनें या लोकांत आणि परलोकांत उत्तम गति प्राप्त होते. म्हणून ही विद्या प्रत्येकानें अवश्य प्राप्त केली पाहिजे.

सरस्वती

कांड ७, सूक्त ६८

(ऋषिः – शन्तातिः । देवता – सरस्वती ।)

सरस्वति व्रतेषु ते दिव्येषु देवि धामसु । जुषस्व हव्यमाहुतं प्रजां देवि ररास्व नः ॥ १ ॥
इदं ते हव्यं घृतवत्सरस्वतीदं पितॄणां हविरास्यं१ यत् ।
इमानि त उदिता शंतमानि तेभिर्वयं मधुमन्तः स्याम ॥ २ ॥
शिवा नः शंतमा भव सुमृडीका सरस्वति । मा ते युयोम संदृशः ॥ ३ ॥

अर्थ— हे सरस्वति देवि ! (ते दिव्येषु धामसु व्रतेषु) तुझ्या दिव्य धामांच्या व्रतांत (आहुतं हव्यं जुषस्व) हवन केलेले हव्य पदार्थ सेवन कर आणि हे देवि ! (नः प्रजां ररास्व) आम्हांस प्रजा (संतति) दे. [१]

हे सरस्वति ! (ते इदं घृतवत् हव्यं) तुझें हें तूपयुक्त हव्य आहे. (इदं पितॄणां हविः यत् आस्यं=आश्यं) हा पितरांचा हवि आहे जो खाण्यास योग्य आहे. (ते इमानि उदिता शंतमानि) तुझें प्रकट झालेलें कल्याणकारी सामर्थ्य आहे, (तेभिः वयं मधुमन्तः स्याम) त्यानें आम्ही मधुर होऊं. [२]

हे सरस्वति ! (नः सुमृडीका शिवा शंतमा भव) आमच्यासाठीं स्तुति करण्यायोग्य शुभ आणि सुखकारक हो, (ते संदृशः मा युयोम) तुझ्या दृष्टिपासून आम्हीं कधीं वियुक्त न व्हावें. [३]

(सरस्वती ज्या) उपासकांचें सर्वदा कल्याण होतें.

*

उत्तम वृष्टि

कांड ७, सूक्त ३९

(ऋषिः - प्रस्कण्वः । देवता - मंत्रोक्ता ।)

दिव्यं सुपर्णं पयसं बृहन्तमपां गर्भं वृषभमोषधीनाम् ।
अभीपतो वृष्ट्या तर्पयन्तमा नो गोष्ठे रयिष्ठां स्थापयाति ॥ १ ॥

अर्थ— (दिव्यं पयसं सुवर्णं) आकाशांत राहणारे, पाण्यास धारण करण्यामुळें पाण्यानें परिपूर्ण, (अपां बृहन्तं वृषभं) पाण्याची मोठी वृष्टि करणारे (ओषधीनां गर्भं) औषधि वनस्पतींचा गर्भ वाढविणारे, (अभीपतः वृष्ट्या तर्पयन्तं) सर्व प्रकारें वृष्टीनें तृप्त करणारे (रयि-स्थां) शोभायुक्त स्थानांत रहाणारे मेघांस देव (नः गोष्ठे आ स्थापयाति) आमच्या गोशाळेच्या भूमींत स्थापन करोत म्हणजे आमच्या भूमींत उत्तम वृष्टि होवो. [१]

मेघ आकाशांत संचार करतात. ते पाण्यानें परिपूर्ण असतात, जलाची वृष्टि करतात. त्या जलानें सर्व औषधि वनस्पति गर्भयुक्त होतात. हा अन्य प्रकारें स्वतःच्या वृष्टीनें सर्वांची तृप्ति करतो, सर्वांची शोभा वाढवतो, हा सर्वांचे कल्याण करणारा मेघ आमच्या भूमींत जेथें आमच्या गाई रहातात, तेथें उत्तम वृष्टि करो आणि आम्हां सर्वांस तृप्त करो.

वृष्टीनें विपर्यास दूर करणें

कांड ६, सूक्त १२४

(ऋषिः - अथर्वा । देवता - मंत्रोक्ता उत दिव्या आपः ।)

दिवो नु मां बृहतो अन्तरिक्षादपां स्तोको अभ्यपप्तद्रसेन ।
समिन्द्रियेण पयसाहमग्ने छन्दोभिर्यज्ञैः सुकृतां कृतेन ॥ १ ॥
यदि वृक्षादभ्यपप्तत्फलं तद्यद्यन्तरिक्षात्स उ वायुरेव ।
यत्रास्पृक्षत्तन्वो यच्च वाससु आपो नुदन्तु निर्ऋतिं पराचैः ॥ २ ॥

अर्थ— (बृहतः दिवः अंतरिक्षात्) मोठ्या द्युलोकाच्या अवकाशांतून (अपां स्तोकः रसेन मां अभि अपप्तत्) पाण्याच्या थेंबांच्या रसानें मजवर वृष्टि झाली आहे. हे अग्ने ! (अहं इन्द्रियेण पयसा) मीं इंद्रियांसह, दूध वगैरे पुष्टिकारक रसासह, (छंदोभिः यज्ञैः सुकृतां कृतेन सं) छंदांनीं यज्ञांनीं आणि पुण्यकर्म करणाऱ्या सुकृतानें युक्त होईन. [१]

(यदि वृक्षात् अभि फलं अपप्तत्) जर वृक्षावरून फळ पडकें अथवा (यदि अन्तरिक्षात् तत्) जर अंतरिक्षांतून हें जल पडलें, तर (स उ वायुः एव) तर तो वायुच आहे म्हणजे वायुमधून तें पडतें. (यत्र तन्वः अस्पृक्षत्) जेथें शरीराच्या भागास तें जल स्पर्श करील. अथवा (यत् वाससः) जेथें कपड्यांस स्पर्श करील तर तें (आपः पराचैः निर्ऋतिं नुदन्तु) जल दुरून अवनतीस दूर करो. [२]

भावार्थ— आकाशांतून उत्तम पवित्र जलाची वृष्टि होते, या वृष्टीनें अन्नरस, दूध वगैरे उत्पन्न होतात, त्यामुळें यज्ञ होतो, यज्ञानें सुकृत होतें. हें सुकृत प्राप्त करण्याची इच्छा प्रत्येकानें मनांत धारण केली पाहिजे. [१]

वृक्षापासून फळ पडावें त्याप्रमाणें आकाशांतून वायूंतून वृष्टिचे थेंब आमच्या जवळ येतात. त्या जलानें आमची वस्त्रें आणि शरीरें मलहीन होतात, या वृष्टीनें पुष्कळ धान्य उत्पन्न होऊन त्यामुळें आमच्या आपत्ति दूर होवोत. [२]

अभ्यञ्जनं सुरभि सा समृद्धिर्हिरण्यं वर्चस्तदु पूत्रिममेव ।
सर्वा पवित्रा वितताध्यस्मत्तन्मा तारीन्निर्ऋतिर्मो अरातिः ॥ ३ ॥

अर्थ— (अभ्यंजनं) तेलाचें मर्दन, (सुरभि) सुगंध, (हिरण्यं) सोनें, (वर्चः) शरीराचें तेज (सा समृद्धिः) ही सर्व समृद्धि आहे. (तत् उ पूत्रिमं एव) तें पाणी पवित्र करणारें आहे (सर्वा पवित्रा वितता) सर्व पवित्र करणारे जगांत पसरले आहेत. (अस्मत् अधि निर्ऋतिः मा तारीत्) आम्हांवर दुर्गति न येवो आणि (अरातिः मा उ) शत्रु सुद्धां हल्ला न करो. [३]

भावार्थ— शरीरास तेलाचें मर्दन करणें, सुगंधी द्रव्यांचा उपयोग करणें, सुवर्ण धारण करणें, शरीर सुडौल आणि तेजस्वी होणें, हीं सर्व समृद्धीचीं लक्षणें आहेत. जल समृद्धीचें लक्षण असून पवित्र करणारें आहे. त्यामुळें सर्व जगांत पवित्रता प्रसरली आहे. या जलानें विपुल धान्याची उत्पत्ति होण्यामुळें आमच्या विपत्ति दूर होवोत. आणि सर्व संपत्ति आमचे जवळ येवोत. शत्रु सुद्धां आम्हांस कष्ट न देवो. [३]

आकाशांतून पवित्र अमृतजलाची उत्पत्ति होते. त्यामुळें धान्य, फळें, फुलें वगैरे तसेंच वृक्ष-वनस्पति सुद्धां उत्पन्न होतात, गवत वगैरे उत्पन्न होऊन त्यावर पशु पुष्ट आणि प्रसन्न होतात. म्हणजे याप्रमाणें आकाशांतील वृष्टि सर्व प्राणिमात्रांच्या विपत्ति दूर करणारी आहे. वृष्टि न होण्यामुळें सर्वांवर विपत्ति येते आणि वृष्टीनें ती दूर होते. हें पाणी शरीराला आंतून आणि बाहेरून निर्मल करतें, पवित्र करणें हा याचा स्वभाव धर्म आहे. वस्त्रादिकांसहि तें पवित्र करतें. जेव्हां अशा प्रकारें उत्तम वृष्टीनें पशु, पक्षी आणि मनुष्यें आनंदयुक्त होतात, तेव्हां मनुष्य अभ्यंग स्नान करतात, सुगंधी द्रव्यें शरीरावर लावतात, सुवर्ण भूषणें धारण करतात. आणि त्यानें शरीरसुद्धां यथायोग्य पुष्ट आणि सुंदर डौलदार होतें. सर्वत्र पवित्रता होते आणि सर्व विपत्ति दूर होतात.

हा वृष्टीचा महिमा आहे. म्हणून जणुं काय वृष्टि ही परमात्म्याच्या कृपेनेंच होते.

वृष्टि जल

कांड ७, सूक्त ८९

(ऋषिः - सिन्धुद्वीपः । देवता - अग्निः)

अपो दिव्या अचायिषं रसेन समपृक्ष्महि । पयस्वानग्न आगमं तं मा सं सृज वर्चसा ॥ १ ॥
सं माग्ने वर्चसा सृज सं प्रजया समायुषा । विद्युर्मे अस्य देवा इन्द्रो विद्यात्सह ऋषिभिः ॥ २ ॥

अर्थ — (दिव्याः आपः सं अचायिषं) दिव्य जलाचा मीं संचय करतों, (रसेन सं अपृक्ष्महि) रसांत मिसळतों. हे (अग्ने !) अग्ने ! (पयस्वान् आगमं) मीं दूध घेऊन तुझ्याजवळ आलों आहें. (तं मा वर्चसा सं सृज) अशा मला तेजानें युक्त कर. [१]

हे अग्ने ! (मा वर्चसा प्रजया आयुषा सं सृज) मला तेज, आयुष्य आणि संततीनें युक्त कर, (देवाः अस्य मे विदुः) देव माझा हा हेतु जाणोत. तसेंच (ऋषिभिः सहः इन्द्रः विद्यात्) ऋषींसह इन्द्र मला जाणो. [२]

भावार्थ— आकाशांतून येणारें वृष्टि जल मीं संग्रहित करतों, त्यांत औषधिरस मिसळतों. या प्रयोगानें मीं तेजस्वी होईन. या प्रयोगांत मीं तापवलेलें दूध पीतों. [१]

त्यामुळें मला तेजस्विता, दीर्घायु आणि उत्तम संतान प्राप्त होईल, हा देवांनीं आणि ऋषींनीं दाखविलेला मार्ग आहे. [२]

इदमापः प्र वहतावद्यं च मलं च यत् । यच्चाभिदुद्रोहानृतं यच्च शेपे अभीरुणम् ॥ ३ ॥
एधोऽस्येधिषीय समिदसि समेधिषीय । तेजोऽसि तेजो मयि धेहि ॥ ४ ॥

अर्थ— हे (आपः) पाण्यानो ! (इदं अवद्यं मलं च यत्) हा जो कांहीं मळ अथवा पाप मजमध्यें आहे तें (प्रवहत) वाहून टाका. (यत् च अभिदुद्रोह) जो कांहीं मीं द्रोह केला असेल, (यत् च अनृतं) जें असत्य बोललों असेन. (यत् च अभीरुणं शेपे) आणि जो न भीतां शाप दिला असेल, त्या सर्वांचा दोष दूर करा. [३]

(एधः असि एधिषीय) तूं महान् आहेस मीं महान् व्हावें, (समित् असि समेधिषीय) तूं प्रकाशमान आहेस मीं प्रकाशित व्हावें, (तेजः असि तेजः मयि धेहि) तूं तेजस्वी आहेस माझ्यांत तेज स्थापना कर. [४]

भावार्थ— वर सांगितलेल्या प्रयोगानें शरीराचा मल दूर होईल आणि मनाची पापवासनासुद्धां दूर होईल. शाप देणें वगैरे भाव दूर होतील आणि मनुष्य निर्दोष आणि शुद्ध होईल. [३]

जे लोक महान् आहेत, तेजस्वी आहेत आणि जे वीर आहेत त्यांना पाहून इतर लोकसुद्धां महान् शूर आणि तेजस्वी होवोत. [४]

वृष्टि जल

दीर्घायु होण्याचा उपाय

या सूक्तांत दीर्घायु, तेजस्वी आणि सुप्रजावान् होण्याचा उपाय सांगितला आहे. वाचकांनीं त्याचा विचार करावा. तो लाभ मिळवण्यासाठीं निर्दोष झालें पाहिजे. मनुष्याच्या शरीरांत कांहीं दोष आहेत आणि मन-बुद्धीचेहि कांहीं दोष असतात. ते दोष या सूक्तांत असें वर्णिले आहेत—

(१) अभिदुद्रोह, (२) अनृतं, (३) अभीरुणं शेपे, (४) अवद्यं मलं प्रवहत । (मं. ३)

' (१) दुसऱ्याचा घातपात करणें, कपट प्रयोग करणें, (२) असत्य भाषण करणें, (३) न भीतां शिव्या देणें, (४) इत्यादि जे मनाचे हीन भाव अथवा जे शारीरिक दोष आहेत. '

यांस दूर केलें पाहिजे. यांत कांहीं दोष मनाचे आहेत, कांहीं वाणीचे, कांहीं शरीराचे आणि कांहीं इतर प्रकारचें आहेत. हे सर्व दूर झाले पाहिजेत, तेव्हां मनुष्यास दीर्घायुष्य, तेजस्विता आणि उत्तम संतति प्राप्त होईल.

दुसऱ्याचा द्रोह करणें आणि शिव्या देणें इत्यादि जे क्रोधाचे दोष आहेत ते फार वाईट आहेत. क्रोधामुळें मनुष्याच्या रक्तांतील जीवनतत्त्वांचा नाश होतो आणि जीवन तत्त्वें नष्ट होण्यानें मनुष्याचें आयुष्य कमी होतें, वीर्य दूषित होण्यानें संतति अशक्त होते आणि अनेक प्रकारची हानि होते. म्हणून दोष दूर व्हावयास हवेत.

मनुष्याचें यकृत बिघडल्यानें मनुष्य क्रोधी, द्रोही, अविचारी, असत्यभाषी वगैरे होतो. यामुळें अन्य दोषसुद्धां होतात. शरीरांत, नसनाड्यांतून मल संचय वाढल्यानें शारीरिक रोग होतात आणि या प्रकारें मनुष्याचें दुःख वाढत जातें. शरीर आणि मन निर्दोष झाल्यानेंच याची निवृत्ति होऊं शकते. यासाठीं दिव्यजलाचें सेवन करणें हा एक महत्त्वपूर्ण उपाय आहे.

दिव्यजल सेवन

जें मेघवृष्टिपासून प्राप्त होतें तें दिव्यजल होय. येथें हत्तीच्या सोंडेसारख्या नळीनें वाफेचे केलेलें पाणी तसेंच उपयोगांत येतें. वृष्टीचें जल घरांत शुद्ध पात्रांत संग्रहित केलें पाहिजे. याप्रकारें संग्रह केलेलें आणि बंद भांड्यांत ठेवलेलें जल एक वर्षपर्यंत उत्तम प्रकारें रहातें आणि बिघडत नाहीं, हें जल पीण्यानें शरीर शुद्ध होतें. उपवास करून हें जल जर भरपूर प्रमाणांत पीण्यांत येईल तसेंच बस्ति (एनिमा) वगैरेसाठीं हेंच पाणी वापरण्यांत येईल तर शरीराची आणि आंतरिक शुद्धता उत्तम प्रकारें होईल. यकृतसुद्धां शुद्ध होतें, आंतड्यांचे दोष दूर होतात आणि इतर मलसुद्धां निघून जातो. बहुधा या प्रयोगानें सर्व रोग दूर होऊन जातात आणि मनुष्य तेजस्वी सुदृढ आणि वीर्यवान् होतो.

वाचकांनीं येथें ' दिव्यजल ' शब्दाचा नुसता चांगलें पाणी एवढा अर्थ घेऊं नये, द्युलोकांतून आलेलें पाणी असा अर्थ समजावा. वरून द्युलोकांतून आलेलें पाणी हें वृष्टिजल दिव्य

जलच असतें आणि तेंच येथें अपेक्षित आहे. या पाण्यात (**रसेन अपृणक्षि**) विविध औषधींचे रस मिसळले गेले तर विशेष लाभ होईल, यांत कांहीं शंका नाहीं. जी दोषांस धूते तिला औषधि म्हणतात. म्हणून औषधींचे रस योग्य प्रमाणांत या दिव्यजलांत मिसळल्यानें पुष्कळ लाभ होण्याचा संभव असतो. कोणत्या औषधींचे रस मिसळावयाचे याचा विचार दोष आणि रोगांच्या संदर्भानें नक्की करावयाचा. रोगी मनुष्य ज्या ज्या दोषानें पीडित असेल, त्या त्या निवारणास उपयोगी औषधींचा रस त्या पाण्यांत मिसळावा. हा विचार सामान्य मनुष्य करूं शकत नाहीं. उत्तम वैद्यच याविषयीं विचारकरून नक्की करूं शकतो. म्हणून या विषयीं एवढें विवरण पुरेसें आहे.

हें वृष्टिजल मल दूर करतें, मनाचे भाव शरीरशुद्धीनेंच पवित्र होतात. अशाप्रकारें मनुष्य पवित्र, शुद्ध आणि तेजस्वी, वर्चस्वी, ओजस्वी आणि सुपुत्रानें युक्त होतो.

जलचिकित्सा

कांड ६, सूक्त ९१

(ऋषिः - भृग्वंगिराः । देवता - यक्ष्मनाशनं, मन्त्रोक्ताः ।)

इमं यवमष्टायोगैः षड्योगेभिरचर्कृषुः । तेना ते तन्वोऽ रपोऽपाचीनमप व्यये ॥ १ ॥
न्य१ग्वातो वाति न्यक्तपति सूर्यः । नीचीनमघ्न्या दुहे न्यग्भवतु ते रपः ॥ २ ॥
आप इद्वा उ भेषजीरापो अमीवचातनीः । आपो विश्वस्य भेषजीस्तास्ते कृण्वन्तु भेषजम् ॥३॥

अर्थ— (इमं यवं) या जवांना (अष्टायोगै षड्योगैः) आठ बैलजोड्या अथवा सहा बैलजोड्यांनीं केलेल्या (अचर्कृषुः) शेतींतून उत्पन्न करतात. (तेन ते तन्वः) त्यानें तुझ्या शरीराच्या (रपः अपाचीनं अपव्यये) रोगबीजांना खालच्या वाटेनें दूर करतात. [१]

(वातः न्यक् वाति) अपानवायु खालच्या गतीनें जात आहे. (सूर्यः न्यक् तपति) सूर्य खालच्या भागांत तापतो-प्रकाशतो . (अघ्न्या नीचीनं दुहे) गाय खालच्या भागानें दूध देते, याप्रमाणें (ते रपः न्यक् भवतु) तुझे दोष दूर होवोत. [२]

(आपः इत् वै भेषजीः) पाणी निःसंशय औषधि आहे (आपः अमीवचातनीः) पाणी रोग दूर करणारें आहे, (आपः विश्वस्य भेषजीः) पाणी सर्व रोगांवर औषधि आहे, (ताः ते भेषजं कृण्वन्तु) तें पाणी तुझ्यासाठीं औषध तयार करो. [३]

पाणी सर्व रोगांस दूर करणारें औषध आहे, पाणी सर्व दोष शरीरातुन दूर करतें आणि सर्व विष दूर करून आरोग्य देतें. जलप्रयोगानें अपानाची गति निम्न होते आणि त्यामुळें बद्धकोष्ठता दूर होते. बद्धकोष दूर होण्यामुळें पूर्ण आरोग्य प्राप्त होतें. या आरोग्यासाठीं उत्तम अन्न जवाचें खावें व त्यासह अष्टांग अथवा षडंगयोग करावा. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधिही आठ अंगें योगाचीं आहेत. पहिली दोन अथवा शेवटचीं दोन सोडून देण्यामुळें षडंग योग होतो. यानेंसुद्धा रोग दूर होतात आणि आरोग्य प्राप्त होतें.

जलचिकित्सा

कांड ६, सूक्त ५७

(ऋषिः - शंतातिः । देवता - रुद्रः ।)

इदमिद्वा उ भेषजमिदं रुद्रस्य भेषजम् । येनेषुमेकतेजनां शतशल्यामपब्रवत् ॥ १ ॥
जालाषेणाभि षिञ्चत जालाषेणोप सिञ्चत । जालाषमुग्रं भेषजं तेन नो मृड जीवसे ॥ २ ॥
शं च नो मयश्च नो मा च नः किं चनाममत् ।
क्षमा रपो विश्वं नो अस्तु भेषजं सर्वं नो अस्तु भेषजम् ॥ ३ ॥

अर्थ— (इदं इत् वा उ भेषजं) हें पाणी निःसंशय औषध आहे, (इदं रुद्रस्य भेषजं) हें रुद्राचें औषध आहे. (येन) ज्यानें (शतशल्यां एकतेजनां इषुं अपब्रवत्) अनेक शल्यांनीं युक्त, एक दंडाच्या बाणाविरुद्ध शब्द बोलला जातो म्हणजे बाणाची जखमसुद्धां बरी होऊं शकते. [१]

(जलाषेण अभि सिंचत) पाण्यानें उपसिंचन करावा, (जलाषं उग्रं भेषजं) पाणी हें महान् तीव्र औषध आहे. (तेन जीवसे नः मृड) त्यानें दीर्घजीवनासाठीं आम्हांस सुखी कर. [२]

(नः शं च) आम्हांस शांति प्राप्त होवो. (नः मयः च) आम्हांस सुख प्राप्त होवो. (नः च किंचन आममत् मा) आम्हांस कोणताहि आमयुक्त रोग न होवो. (रपः क्षमा) सडण्यापासून रक्षण होवो. (नः विश्वं भेषजं अस्तु) आम्हांस सर्व औषधें असोत. (नः सर्वं भेषजं अस्तु) सर्वच आम्हांस औषधरूप होवोत. [३]

भावार्थ— पाणी हें उत्तम औषध आहे. वैद्य याचा प्रयोग करतात. शस्त्राचें घावसुद्धां जलचिकित्सेनें बरे केलें जातात. [१]

पाण्यानें पूर्ण स्नान करा, अर्धें स्नान, कटिस्नानसुद्धां पाण्यानें करा, त्यामुळें रोग दूर होतील. कारण पाणी ही मोठी तीव्र औषधि आहे. या पाण्यानें दीर्घजीवन प्राप्त होऊन स्वास्थ्याचें सुखसुद्धां प्राप्त होतें. [२]

पाण्यानें शरीरास शांति, समता, सुख आणि स्वास्थ्य प्राप्त होऊन आमरोग दूर होतो, शरीराची सूज नाहींशी होते. जल हें पूर्ण औषधि आहे, जल हें निःसंदेह सर्वांनर औषधि आहे. [३]

या सूक्ताचा अभिप्राय स्पष्ट आहे. जलचिकित्सेचा उपदेश करणारें हें सूक्त आहे. पाण्यानें संपूर्ण शरीर भिजविल्यानें पूर्ण स्नान होतें आणि रोगयुक्त भाग भिजवण्यानें अर्धस्नान होतें. योजनापूर्वक याचा उपयोग करण्यानें पुष्कळ लाभ होतो. उदाहरणार्थ—

१ ब्रह्मचर्य पालनासाठीं शिस्नस्नान थंड पाण्यानें करणें तसेंच आजूबाजूचा भाग उत्तमप्रकारें भिजवून शांत करणें.

२ बद्धकोश दूर करण्यासाठीं बेंबीपासून जांघेपर्यंतचा भाग पाण्यांत भिजेल अशा भांड्यांत पाणी भरून त्यांत बसणें आणि कपड्यानें पोट आणि बेंबीच्या खालचा भागावर मालीश केल्यानें बद्धकोष दूर होतो आणि आमाचे सर्व रोग दूर होतात. शरीरांत सडणारे सर्व दोष यानें दूर होतात आणि आरोग्य प्राप्त होतें.

याप्रमाणें मीठाच्या पाण्यानें नेत्रस्नान करण्यानें नेत्रदोष दूर होतात. विंचवाच्या दंशावर वरून संतत थंड पाण्याची धार धरल्यानें विष उतरतें. परंतु याविषयीं आरत प्रयोग व्हावयास हवेत.

तापांत डोकें तापून वात झाला तर डोक्यावर थंड पाण्याची पट्टी ठेवल्यानें उन्माद (वात) आणि ज्वरसुद्धां त्वरित उतरतो.

स्त्री अथवा पुरुषाच्या मोह रोगांत कटिस्नान उत्तम उपाय आहे. इंद्रियस्नान आणि स्त्रियांसाठीं अंतःस्नानसुद्धां अत्यंत उपयोगी आहे.

अशाप्रकारें योजनापूर्वक प्रयोग करण्यानें बहुशः सर्वच रोग जलोपचारानें बरे होतात.

जल

कांड ६, सूक्त २३

(ऋषिः - शन्तातिः । देवता - आपः ।)

ससुषीस्तदपसो दिवा नक्तं च ससुषीः । वरेण्यक्रतुरहमपो देवीरुप ह्वये ॥ १ ॥
ओता आपः कर्मण्या मुञ्चन्त्वितः प्रणीतये । सद्यः कृण्वन्त्वेतवे ॥ २ ॥
देवस्य सवितुः सवे कर्म कृण्वन्तु मानुषाः । शं नो भवन्त्वप ओषधीः शिवाः ॥ ३ ॥

अर्थ- (वरेण्यक्रतुः अहं) प्रशंसित श्रेष्ठ कर्म करणारा मीं (तत् ससुषीः) त्या प्रवाहयुक्त जलधारा आणि (दिवा नक्तं च अपसः ससुषीः) दिवसरात्र पाण्याच्या धाराप्रवाहांत वहाणाऱ्या (देवीः आपः) दिव्य पाण्याला (उपह्वये) जवळ बोलावतों. [१]

(ओताः कर्मण्याः आपः) सर्वत्र व्यापक आणि कर्म करविणारें पाणी (प्रणीतये इतः मुञ्चतु) उत्तम गति प्राप्त करण्यासाठीं या निकृष्ट अवस्थेंतून मला सोडवो, मुक्त करो आणि (सद्यः एतवे कृण्वन्तु) सत्वर प्रगति करो. [२]

(सवितुः देवस्य सवे) सर्वांची उत्पत्ति करणाऱ्या ईश्वराच्या या सृष्टींत (मानुषाः कर्म कृण्वन्तु) मनुष्य पुरुषार्थ करो आणि (अपः ओषधीः) पाणी आणि पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या औषधि (नः शं शिवाः च भवन्तु) आम्हासाठीं कल्याण करणाऱ्या होवोत. [३]

पावसानें प्राप्त होणारें आणि प्रवाहांत वहाणारें जल सर्व मनुष्यांस सुख आणि शांति देवो आणि त्या पाण्यानें हृष्टपुष्ट होऊन मनुष्य उत्तम पुरुषार्थ करून उन्नति प्राप्त करो.

जल

कांड ६, सूक्त २४

(ऋषिः - शंतातिः । देवता - आपः ।)

हिमवतः प्र स्रवन्ति सिन्धौ समह संगमः । आपो ह मह्यं तद्देवीर्ददन्हृद्द्योतभेषजम् ॥ १ ॥
यन्मे अक्ष्योरादिद्योत पार्ष्ण्योः प्रपदोश्च यत् । आपस्तत्सर्वं निष्करन्भिषजां सुभिषक्तमाः ॥ २ ॥
सिन्धुपत्नीः सिन्धुराज्ञीः सर्वा या नद्य१ स्थन । दत्त नस्तस्य भेषजं तेना वो भुनजामहै ॥ ३ ॥

अर्थ— (आपः हिमवतः प्रस्रवन्तिः) पाण्याचे प्रवाह हिमालयांतून वाहतात. हे (स-मह) महिम्यासह वहाणाऱ्या ! (सिन्धौ संगमः) त्यांचा संगम समुद्रांत होतो. त्या (देवीः) दिव्य जलधारा (मह्यं तत् हृद्द्योत-भेषजं ददन्) मला त्या जळत्या हृदयावरचें औषधि देतात. [१]

(यत् यत् मे अक्ष्योः पार्ष्ण्योः प्रपदोः च)जें जें माझ्या दोन डोळ्यांत, टांचांत आणि पायांत दुःख (आदि-द्योत) प्रकट होत आहे, (तत् सर्वं) त्या सर्व दुःखांना ! भिषजां सुभिषक्तमाः आपः) वैद्यांत उत्तम वैद्यरूपी जल (निष्करत्) दूर करतें. [२]

(सिन्धुपत्नीः सिन्धुराज्ञीः) समुद्राच्या पत्न्या आणि समुद्राच्या राण्या (याः सर्वाः नद्यः स्थन) ज्या सर्व नद्या आहेत, त्या तुम्हीं (नः तस्य भेषजं दत्त) आम्हांस त्यासाठीं औषधि द्या, (तेन वः भुनजामहै) त्या द्वारां आम्हीं तुमचा उपभोग करूं. [३]

जलचिकित्सा

या सूक्तांत जलचिकित्सेचा धर्म लिहिला आहे. येथें ज्या पाण्याचें वर्णन आहे तें पाणी हिमालयासारख्या बर्फयुक्त पर्वतांतून वहाणारें आहे; दुसरें नाहीं. हें हिमपर्वतावरून वहाणारें पाणी नद, नदी आणि दुसऱ्या प्रवाहांतून वहात समुद्रास जाऊन मिळतें. हें जल हृदयाची आग दूर करणारें असतें.

डोळे, पाठ, टांचा, पाय इत्यादि स्थानांतील दुखावा या पाण्यानें दूर होतो. हें पाणी (भिषजां सुभिषक्तमाः) वैद्यांमध्यें उत्तम वैद्य आणि औषधींमध्यें उत्तम औषधि आहे.

या सर्व नद्या महासागराच्या स्त्रिया आहेत, त्यांच्या जलप्रवाहांत औषध भरलेलें आहे, त्याचा उपयोग मनुष्यानें करणें उचित आहे. हा नदीच्या जलप्रवाहाचा तसेंच सागराच्या पाण्याचाहुद्धां गुण होऊं शकतो.

पाण्याचा उपयोग कशाप्रकारें केला पाहिजे ही गोष्ट यांत स्पष्ट केलेली नाहीं. तथापि जलचिकित्सेविषयीं शोध करतांना या सूक्ताचा पुष्कळ उपयोग होऊं शकतो.

जल

कांड ३, सूक्त १३

(ऋषिः - भृगुः । देवता - वरुणः; सिन्धुः ।)

यद॒दः सं॑प्रय॒तीरहा॒वन॑दता ह॒ते । तस्मा॒दा न॒द्यो॒३ नाम॑ स्थ ता वो॒ नामा॑नि सिन्धवः ॥ १ ॥
यत्प्रेषि॑ता वरु॑णे॒नाच्छीभं॑ स॒मव॑ल्गत । तदा॑प्नो॒दिन्द्रो॑ वो य॒तीस्तस्मा॒दापो॒ अनु॑ ष्ठन ॥ २ ॥
अ॒प॒का॒मं स्यन्द॑माना॒ अवी॑वरत वो॒ हि क॑म् । इन्द्रो॑ वः॒ शक्ति॑भिर्देवी॒स्तस्मा॒द्वार्नाम॑ वो हि॒तम् ॥ ३ ॥

अर्थ— हे (सिन्धवः) नद्यांनो ! (सं-प्र-यतीः) उत्तमप्रकारें नेहमीं चालणाऱ्या तुम्हीं (अहौ हते) मेघाचें हनन होण्यानंतर (अदः यत् अनदत) हा जो मोठा अवाज तुम्हीं करीत आहांत (तस्माद् आ नद्यः नाम स्थ) त्यामुळें तुमचें नांव ' नदी ' पडलें आहे (ताः वः नामानि) तें तुम्हांसच योग्य नांव आहे. [१]

(यत् आत् वरुणेन प्रेषिताः) जेव्हां दुसऱ्या वरुणद्वारा प्रेरित होणाऱ्या तुम्ही (शीभं समवल्गत) त्वरित मिळून चालूं लागल्या, (तत् इन्द्रः यतीः वः आप्नोत्) तेव्हां इन्द्रानें गतियुक्त अशा तुम्हांस ' प्राप्त ' केलें, (तस्मात् अनु आपः स्थन) त्यानंतर तुमचें नांव ' आपः ' (पाणी) असें झालें. [२]

(स्यन्दमानाः वः) वहाणाऱ्या तुमच्या गतीचें (इन्द्रः हि अप-कामं कं अवीवरत) इन्द्रानें विशेष कार्यासाठीं सुखपूर्वक नि ' वारण ' केलें (तस्मात् देवीः वः वार् नाम हितं) तेव्हांपासून देवीनों तुम्हांस ' वारि ' नांव प्राप्त झालें. [३]

भावार्थ— मेघाच्या वृष्टीनें अथवा बर्फ विरघळल्यानें जेव्हां नद्यांना महापूर येतात, तेव्हां पाण्याचा मोठा नाद होतो. हा ' नाद ' होतो म्हणून या जलप्रवाहाला ' नदी ' (नाद करणारी) असें म्हटलें जातें. [१]

जेव्हां वरुणराजानें प्रेरित केलेलें जल त्वरित गतीनें वाहूं लागतें, तेव्हां इंद्र त्याला प्राप्त करतो. ' प्राप्त ' होण्यामुळेंच पाण्याला ' आपः ' (प्राप्त होण्यायोग्य) असें नांव प्राप्त होतें. [२]

जेव्हां वेगानें वहाणाऱ्या जलप्रवाहांचा मार्ग इन्द्रानें विशेष कारणानें सुखानें वहाण्याच्या हेतूनें विशिष्ट मार्गानें चालण्यासाठीं निवारण केला, तेव्हां त्यामुळें पाण्याचें नांव ' वार् ' (वारि=निवारण केलेलें) असें झालें. [३]

एको वो देवोऽप्यतिष्ठत् स्यन्दमाना यथावशम्। उदानिषुर्महीरिति तस्मादुदकमुच्यते ॥ ४ ॥
आपो भद्रा घृतमिदाप आसन्नग्नीषोमौ बिभ्रत्याप इत्ताः।
तीव्रो रसो मधुपृचामरंगम आ मा प्राणेन सह वर्चसा गमेत् ॥ ५ ॥
आदित्पश्याम्युत वा शृणोम्या मा घोषो गच्छति वाङ् मासाम्।
मन्ये भेजानो अमृतस्य तर्हि हिरण्यवर्णा अतृपं यदा वः ॥ ६ ॥
इदं व आपो हृदयमयं वत्स ऋतावरीः। इहेत्थमेत शक्वरीर्यत्रेदं वेशयामि वः ॥ ७ ॥

अर्थ—(एकः देवः यथावशं स्यन्दमानाः वः) एकट्या एका देवानें वाटेल तशा वहाणाऱ्या तुम्हांला (अपि आतिष्ठत्) अधिकारानें पाहिलें आणि म्हटलें कीं (महीः उदानिषुः) महान् शक्ति वर श्वास घेतात. (तस्मात् उदकं उच्यते) त्यामुळें तुमचें नांव ' उदक ' (उत्-अक) असें म्हटलें जातें. [४]

(आपः भद्राः) पाणी कल्याण करणारें आहे आणि (आपः इत् घृतं आसन्) पाणी निःसंशय तेज वाढविणारें आहे. (ताः इत् आपः अग्नीषोमौ बिभ्रतः) तें पाणीच अग्नि आणि सोमास धारण करतात. (मधुपृचां अरंगमः तीव्रः रसः) मधुरतेनें परिपूर्ण तृप्ति करणारा तीव्ररस (प्राणेन वर्चसा सह) जीवन आणि तेजासह (मा आगमेत्) मला प्राप्त होवो. [५]

(आत् इत् पश्यामि) मीं खात्रीपूर्वक पहातों (उत् वा शृणोमि) आणि ऐकतों. (आसां घोषः वाक् मा आगच्छति) त्याचा घोष आणि शब्द मजजवळ येतो. हे (हिरण्यवर्णाः) चमकणाऱ्या रंगांनीं युक्त ! (यदाः वः अतृपं) जेव्हां मीं तुमच्या सेवनानें तृप्ति प्राप्त केली (तर्हि अमृतस्य भेजानः मन्ये) तेव्हां अमृताचें भोजन करण्यासारखें मला वाटलें. [६]

हे (आपः) जलांनों ! (इदं वः हृदयं) हें तुमचें हृदय आहे. हें (ऋतावरीः) जलधारांनों ! (अयं वत्सः) हा मीं तुमचा बालक आहें. हे (शक्वरीः) शक्ति देणाऱ्यांनों ! (इत्थं इह आ इत) अशाप्रकारें येथें या. (यत्र वः इदं वेशयामि) येथें मीं तुमच्यामध्यें प्रवेश करतों. [७]

भावार्थ— स्वच्छंदानें वहाणाऱ्या जलप्रवाहांना जेव्हां एका देवानें काबूंत आणलें आणि त्यांना ऊर्ध्वगतीनें वर चलित केलें, तेव्हां त्या जलाचें नांव ' उदक ' (उत्-अक=प्राणाची गति वर करणें.) असें झालें. [४]

हें पाणी निःसंशय कल्याणकारक आहे. तें निश्चयें करून तेज आणि पुष्टि वाढविणारें आहे. अग्नि आणि सोम त्यास धारण करतात. हा जल नांवाचा रस असा मधुर आहे कीं त्याचें पान करण्यामुळें तृप्ति होते आणि जीवनाच्या तेजानें युक्त करतें. [५]

मनुष्य पाणी दृष्टीनें पाहूं शकतो आणि दूरून जलाचा अवाज ऐकूंसुद्धां शकतो. शुद्ध निर्मल जल स्फटिकासारखें चमकतें. मनुष्य जेव्हां तें पितो तेव्हां त्याला अमृतपान केल्याप्रमाणें आनंद होतो. [६]

पाण्याचें हें आंतरिक तत्त्व आहे, मनुष्य पाण्याचा पुत्र आहे. पाणी मनुष्यांवर पडतें आणि मनुष्य पाण्यांत डुबकी मारतो. [७]

जल

पाण्याचे प्रवाह

या सूक्तांत पाण्याच्या प्रवाहांचें वर्णन आहे. पाण्याचीं अनेक नांवें आहेत. त्यांतील कोणतें नांव कशाप्रकारच्या पाण्यास लागूं पडतें तें या सूक्तांत सांगितलें आहे.

मेघांतून वृष्टि होते आणि नद्यांना महापूर येतो. नद्या भरण्याचें हें एक कारण आहे. नद्यांच्या पूराचें दुसरेंहि एक कारण आहे, तें बर्फ विरघळणें हें होय. दगडवाचक ग्रावा इत्यादि जे शब्द मेघवाचकसुद्धां समजले जातात, ते वस्तुतः मेघवाचक नाहींत. परंतु डोंगरावर अथवा जमिनीवर पडणाऱ्या बर्फाचे अथवा गारांचे वाचक आहेत. त्याच प्रकारचा अहि शब्दसुद्धां आहे. म्हणून त्याचा अर्थ डोंगरी बर्फ असें समजणें योग्य होईल आणि तो विरघळण्यामुळें नद्या भरून वहाण्याचा संभव खरा.

याप्रमाणें वर सांगितलेल्या दोन्हीं कारणांनीं महापूर येण्यानें पाण्याच्या प्रवाहाचा मोठा अवाज होतो. त्यामुळें नाद करीत वहाणें या कारणानें ' नदी ' असें नांव झालें म्हणजे ज्या प्रवाहाचा मोठा नाद होतो त्यास नदी म्हटलें पाहिजे.

नदीचा प्रवाह अत्यंत वेगानें चालत असला आणि त्या वेगांत पाणी कांहीं युक्तीनें वर दुसऱ्या स्थानांत खेंचून घेण्याची योजना केली तर त्या जलाला ' आप् ' असें म्हणतात.

स्वेच्छेनें वहाणाऱ्या जलप्रवाहास, कालवे इत्यादि कृत्रिम उपायांनीं शेती वगैरे विशिष्ट कार्य सिद्ध करण्यासाठीं आपल्या इच्छेप्रमाणें प्रवाह बदलतां येतो, त्यास ' वारि ' (वार् वारं) असें म्हणतात.

जें पाणी सूर्यकिरणांनीं झालेल्या वाफेनें अथवा अग्निमुळें बनलेल्या वाफेनें—प्रथम वाफ होऊन पुनः त्या वाफेस थंडी लागल्यानें पाणी बनतें त्यास ' उदक ' म्हणतात. (उत्) वाफेनें वर जाऊन जें (आनिषुः) जे वरच्या प्राणाशीं मिळून परत येतें त्याचें नांव उदक होय. मेघवृष्टींतून प्राप्त होणाऱ्या पाण्याचें मुख्यतः हें नांव आहे. कृत्रिमप्रकारें शुभ यंत्रानें तयार केलेल्या पाण्यालासुद्धां गौणवृत्तीनें हें नांव देतां येतें.

विविध प्रकारच्या पाण्यांचीं हीं नांवें आहेत हें या सूक्तांतच सांगितलें आहे. म्हणून त्या त्या शब्दांचे ते ते अर्थ घेणेंच योग्य होईल. यद्यपि संस्कृतभाषेंत हे सर्व उदकवाचक शब्दपर्याय (एकाच अर्थाचे) शब्द समजले जातात आणि पर्याय शब्द समजून उपयोजिले जातात तथापि संस्कृतभाषेंत एक वस्तूचे वाचक शब्द वस्तुतः त्या वस्तूचे अंतर्गत भेदांचे वाचक असतात. ही गोष्ट या सूक्ताच्या विवरणानें स्पष्ट होत आहे.

हें पाणी भद्राः (मं. ५) कल्याण करणारें, बलपुष्टि आणि तेज देणारें आहे. तसेंच जीवनाचें तेज वाढविणारें आहे. (मं ५)

शुद्ध स्फटिकासारखें निर्मल पाणी पीण्यानें अशी तृप्ति होतें की जी अमृत भोजनानें मिळूं शकते.

प्राणिमात्र पाण्यामुळें जिवंत राहूं शकतात, जलापासूनच त्यांची उत्पत्ति समजली पाहिजे. म्हणजे ते जलाचे पुत्र झाले. जल या सर्वांची माता आहे त्यामुळें वेदांत अन्यत्र जलास ' माता ' म्हटलें आहे. या मातेचा आश्रय घेण्यानें मनुष्य आरोग्यसंपन्न, पुष्ट आणि बळवान् होऊं शकतो.

मनुष्यानें जलांत प्रविष्ट होऊन नित्य स्नान करावें अथवा याप्रमाणें तरणें वगैरे शक्य नसेल तर अन्यप्रकारें जल प्राप्त करून अवश्य स्नान करावें. असें जलस्नान महान् आरोग्यप्रद असतें वगैरे उपदेश पांचव्या आणि सहाव्या मंत्रांत केला आहे त्याच्या मननानें चांगला बोध प्राप्त होतो.

जलसूक्त

कांड १, सूक्त ३३

(ऋषिः – शन्तातिः । देवता – आपः, चंद्रमा ।)

हिरण्यवर्णाः शुचयः पावका यासु जातः सविता यास्वग्निः ।
या अग्निं गर्भं दधिरे सुवर्णास्ता न आपः शं स्योना भवन्तु ॥ १ ॥

अर्थ— जें (**हिरण्य-वर्णाः**) सुवर्णाप्रमाणें चमकणाऱ्या रंगानें युक्त (**शुचयः पावकाः**) शुद्ध आणि पवित्रता वाढविणारें (**यासु सविता जातः**) ज्यामध्यें सविता झाला आणि (**यासु अग्निः**) ज्यामध्यें अग्नि आहे, (**याः सुवर्णाः**) जें उत्तम वर्णाचें (रंगाचें) पाणी आहे (**अग्निं गर्भं दधिरे**) अग्नीस गर्भात धारण करतें (**ताः आपः**) तें पाणी (**नः शं स्योनाः भवन्तु**) आम्हां सर्वांस शांति आणि सुख देणारें होवो. [१]

भावार्थ— अंतरिक्षांत संचार करणारें मेघमंडलांतील तेजस्वी, शुद्ध आणि पवित्र जल आहे. ज्या मेघांतून सूर्य दिसतो ज्यांत विद्युद्रूपी कधीं व्यक्त तर कधीं अव्यक्तरूपानें असतो, तें जल आम्हांस शांति आणि आरोग्य देणारें होवो. [१]

यासां राजा वरुणो याति मध्ये सत्यानृते अवपश्यन् जनानाम् ।
या अग्निं गर्भं दधिरे सुवर्णास्ता न आपः शं स्योना भवन्तु ॥ २ ॥
यासां देवा दिवि कृण्वन्ति भक्षं या अन्तरिक्षे बहुधा भवन्ति ।
या अग्निं गर्भं दधिरे सुवर्णास्ता न आपः शं स्योना भवन्तु ॥ ३ ॥
शिवेन मा चक्षुषा पश्यतापः शिवया तन्वोप स्पृशत त्वचं मे ।
घृतश्चुतः शुचयो याः पावकास्ता न आपः शं स्योना भवन्तु ॥ ४ ॥

अर्थ— (यासां मध्ये) ज्या जलामध्यें रहाणारा (वरुणः राजा) वरुण राजा (जनानां सत्यानृते अवपश्यन्) लोकांच्या सत्य आणि असत्यकर्मांचें अवलोकन करीत (याति) चालतो, (याः सुवर्णाः) जें उत्तम रंगाचें जल अग्नीला गर्भांत धारण करतें तें जल आम्हां सर्वांस शांति आणि सुख देणारें होवो. [२]

(देवाः दिवि) देव द्युलोकांत (यासां भक्षं कृण्वन्ति) ज्याचें भक्षण करतात आणि जे (अन्तरिक्षे बहुधा भवन्ति) अंतरिक्षांत अनेकप्रकारें रहातात आणि जें अनेक उत्तम वर्णाचें जल अग्नीस गर्भांत धारण करतें तें आम्हां सर्वांस शांति आणि सुख देणारें होवो. [३]

जला ! (शिवेन चक्षुषा मा पश्यत) कल्याणकारक दृष्टीनें मजकडे पहा. (शिवया तन्वा मे त्वचं उपस्पृशत) आपल्या कल्याणमय शरीरानें माझ्या त्वचेस स्पर्श कर. जें (घृतश्चुतः) तेज देणारें (शुचयः पावकाः) शुद्ध आणि पवित्र (आपः) जल आहे (ताः नः शं स्योनाः भवन्तु) तें जल आम्हांसाठीं शांति आणि सुख देणारें होवो. [४]

भावार्थ— ज्यांतून वरुणराजा फिरत असतो आणि जातां जातां मनुष्याच्या सत्य आणि असत्य विचारांचें निरीक्षण करतो, ज्या मेघांनी विद्युत्‌रूपी अग्नीला गर्भांत धारण केलें आहे त्या मेघांचें उदक आम्हांस सुख आणि आरोग्य देवो. [२]

द्युलोकांतील देव ज्याचें भक्षण करतात आणि जें विविध रंगरूपयुक्त अंतरिक्षस्थानीय मेघांत असणारें तसेंच जे विद्युत् धारण करतात त्या मेघांतील जल आम्हांस सुख आणि शांति देणारें होवो. [३]

जल आमचें कल्याण करो आणि त्याचा आमच्या शरीरास होणारा स्पर्श आम्हांस आल्हाद देणारा प्रतीत होवो. मेघांचे तेजस्वी आणि पवित्र जल आम्हांस शांति आणि सुख देणारें होवो. [४]

वृष्टीचें जल

या चार मंत्रांत वृष्टीच्या जलाचें काव्यमय वर्णन आहे. या मंत्रांचें वर्णन एवढें काव्यमय आहे आणि छंदसुद्धां असा उत्तम आहे कीं एक स्वरानें त्याचा पाठ केला असतां वाचकास एक अद्भुत आनंदाचा अनुभव येतो. या मंत्रांत पाण्याला ' शुचि, पावक, सु-वर्ण ' वगैरे शब्दांचीं विशेषणें लावलीं आहेत, तीं वृष्टि जलाची शुद्धता दाखवतात. पावसाचें पाणी जितकें शुद्ध असतें, तितकें दुसरें कोणतेंहि असत नाहीं. शरीराची शुद्धि करूं इच्छिणारे दिव्यलोक या जलाचें पान करोत आणि आरोग्य प्राप्त करोत. त्याच्या पानानें शरीर पवित्र आणि निरोगी होतें. सामान्यपणें वृष्टि जल शुद्धच असतें परंतु ज्या वृष्टींत सूर्यकिरणें सुद्धां प्रकाशतात त्याची विशेषता अधिक असते. त्याचप्रमाणें चंद्राच्या किरणांचा परिणाम सुद्धां होत असतो.

या सूक्ताच्या चौथ्या मंत्रांत उत्तम स्वास्थ्याचें लक्षण दाखविलें आहे तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ' पाण्याचा स्पर्श आमच्या कातडीस आल्हाद देवो. ' जोपर्यंत शरीर आरोग्ययुक्त असतें तोपर्यंतच शीत जलाचा स्पर्श आनंदकारक प्रतीत होतो. परंतु शरीर रुग्ण होतांच हा जलस्पर्श वाईट वाटतो.

जल-सूक्त

कांड १, सूक्त ४

(ऋषिः - सिन्धुद्वीपः । देवता - अपांनपात्, सोमः, आपः ।)

अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम् । पृञ्चतीर्मधुना पयः ॥ १ ॥
अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह । ता नो हिन्वन्त्वध्वरम् ॥ २ ॥
अपो देवीरुप ह्वये यत्र गावः पिबन्ति नः । सिन्धुभ्यः कर्त्वं हविः ॥ ३ ॥
अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजम् ।
अपामुत प्रशस्तिभिरश्वा भवथ वाजिनो गावो भवथ वाजिनीः ॥ ४ ॥

अर्थ— (अध्वरीयतां) यज्ञ करणाऱ्यांच्या (जामयः) बहीणीसमान आणि (अम्बयः) मातांसमान पाण्याच्या नद्या (अध्वभिः यन्ति) आपल्या मार्गानें जातात, ज्या (मधुना) मधासह (पयः) दूध अथवा पाणी (पृञ्चन्तीः) मिसळतात. [१]

(याः) ज्या (अमूः) या नद्या (उप सूर्ये) सूर्या सन्मुख होतात अथवा (याभिः) ज्यांच्यासह सूर्य असतो त्या सर्व आम्हा सर्वांचें (अध्वरं) यज्ञ (हिन्वन्ति) यथासांग करतात. [२]

(यत्र) जेथें आमच्या (गावः) गाई पाणी (पिबन्ति) पीतात त्या (देवीः आपः) दिव्य पाण्याच्या (सिन्धुभ्यः) नद्यांसाठीं हवि करण्यामुळें (उपह्वये) मीं प्रशंसा करतों. [३]

(अप्सु अन्तः) पाण्यांत अमृत आहे, (अप्सु भेषजं) पाण्यांत औषधि आहेत (उत) आणि (अपां प्रशस्तिभिः) पाण्याच्या प्रशंसनीय गुणधर्मांनीं (अश्वाः वाजिनः) घोडे बळवान् (भवथ) होतात आणि गाई बलयुक्त होतात. [४]

भावार्थ — पाणी त्यांच्यासाठीं माता आणि बहिणीप्रमाणें हितकारक होतें, जो त्याचा उत्तम उपयोग करूं जाणतो. पाण्याच्या नद्या वहात आहेत जणूं त्या दुधांत मध मिसळत आहेत. जें जल सूर्यकिरणांनीं शुद्ध होतें अथवा ज्याला सूर्य पवित्र करतो, तें जल आमचें आरोग्य सिद्ध करो. ज्या नद्यांत आमच्या गाई पाणी पीतात आणि ज्यांच्यासाठीं हवि तयार केला जातो, त्यांच्या पाण्याची स्तुति केली पाहिजे. पाण्यांत अमृत आहे, पाण्यांत औषध आहे, पाण्याच्या शुभ गुणांनीं घोडे बळवान् होतात आणि गाईसुद्धां बळवती होतात. [१-४]

जलसूक्त

कांड १, सूक्त ५

(ऋषिः - सिन्धुद्वीपः । देवता - अपांनपात्, सोमः, आपः ।)

आपो हि ष्ठा मयोभुवस्ता न ऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे ॥ १ ॥

अर्थ- हे (आपः) पाण्यांनों ! (हि) कारण कीं तुम्ही (मयोभुवः) सुखकारक (स्थ) आहांत म्हणून (ताः) अशे तुम्ही (नः ऊर्जे) आमच्या बळासाठीं तसेंच (महे रणाय चक्षसे) उत्तम सुंदर दर्शनासाठीं आम्हांस (दधातन) पुष्ट करा. [१]

यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः । उशतीरिव मातरः ॥ २ ॥
तस्मा अरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ । आपो जनयथा च नः ॥ ३ ॥
ईशाना वार्याणां क्षयन्तीश्चर्षणीनाम् । अपो याचामि भेषजम् ॥ ४ ॥

अर्थ— (यः) जो (वः) तुम्हांमध्यें (शिवतमः रसः) अत्यंत कल्याणकारक रस आहे (तस्य) त्याचे (नः इह भाजयत) येथें आम्हांस भागीदार करा. (इव) ज्याप्रमाणें (उशतीः मातरः) इच्छा करणाऱ्या माता करतात. [२]

हे पाण्यानों ! ज्याच्या (क्षयाय) निवासासाठीं तुम्हीं (जिन्वथ) तृप्ति करतां (तस्मै) त्याच्यासाठीं आम्हीं (वः अरं गमाम) तुम्हांस पूर्णपणें प्राप्त करूं आणि तुम्ही (नः) आम्हांस (जनयथ) वृद्धिस पोहोंचवा. [३]

(वार्याणां) इच्छा करण्यायोग्य सुखांचा (ईशाना) स्वामी म्हणून (चर्षणीनां) प्राणिमात्रांच्या (क्षयन्तीः) निवासाचा हेतू असा (अपः) पाण्यापासून (भेषजं याचामि) औषधाची याचना करतों. [४]

भावार्थ— पाणी सुखकारक आहे त्यानें बल वाढतें, रमणीयता प्राप्त होते आणि पुष्टिसुद्धां होते. ज्याप्रकारें पुत्राला मातेच्या दुधापासून पुष्टि मिळते, त्याप्रमाणें पाण्यामध्यें उत्तम सुखवर्धक रस आहेत ते आम्हांस प्राप्त होवोत. ज्यामुळें प्राणिमात्राची स्थिति होते, तो रस आम्हांस प्राप्त होवो आणि त्या रसानें आमची वृद्धि होत राहो. पाण्यानें इष्टसुख प्राप्त होतें आणि प्राणिमात्राचें अस्तित्व राहतें, त्या जलानें आम्हांस औषधरस प्राप्त होत रहातो. [१-४]

जल-सूक्त

कांड १, सूक्त ६

(ऋषिः - सिन्धुद्वीपः । देवता - अपांनपात् आपः, आपः सोमः अग्निश्च ।)

शं नो देवीरभिष्टय आपो भवन्तु पीतये । शं योरभि स्रवन्तु नः ॥ १ ॥
अप्सु मे सोमो अब्रवीदन्तर्विश्वानि भेषजा । अग्निं च विश्वशंभुवम् ॥ २ ॥
आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे३ मम । ज्योक् च सूर्यं दृशे ॥ ३ ॥

अर्थ— (देवी आपः) दिव्यजल (नः शं) आम्हांस सुख देवो. आणि (अभिष्टये) इष्ट प्राप्तिसाठीं तसेंच (पीतये) पीण्यासाठीं आणि आम्हांवर शांतीचा (अभि स्रवन्तु) प्रवाह चालवो. [१]

(मे) मला (सोमः अब्रवीत्) सोमानें सांगितलें कीं, (अप्सु अन्तः) पाण्यांत (विश्वानि भेषजा) सर्व औषधि आहेत आणि अग्नि (विश्व-शं-भुवं) सर्व कल्याण करणारा आहे. [२]

(आपः) पाण्या ! (भेषजं पृणीत) औषध द्या आणि (मम तन्वे) माझ्या शरीरास (वरूथं) संरक्षण द्या ज्यामुळें मीं सूर्याला (ज्योक् दृशे) दीर्घकाळपर्यंत पहावें. [३]

भावार्थ— दिव्य जल आम्हांस पीण्यास प्राप्त होवो आणि तें आमचें सुख वाढवो. [१]

पाण्यांत सर्व औषधें रहातात आणि अग्नि सुख वाढविणारा आहे. [२]

पाण्यानें आमची चिकित्सा होवो आणि शरीराचें रोगापासून रक्षण होवो. आमचें आयुष्य दीर्घ होवो. [३]

शं न आपो धन्वन्याः शमु सन्त्वनूप्याः ।
शं नः खनित्रिमा आपः शमु याः कुम्भ आभृताः शिवा नः सन्तु वार्षिकीः ॥ ४ ॥

अर्थ-(नः) आम्हांसाठीं (धन्वन्याः आपः) मरुभूमीतील जल, (शं) सुखकारक होवो, (अनूप्याः) जलपूर्ण प्रदेशाचें जल सुखकारक होवो, (खनित्रिमाः) खोदलेल्या विहीरी वगैरेंचे जल सुखदायक होवो, (कुंभे) घड्यांत भरलेलें जल सुखदायक होवो, (वार्षिकीः) वृष्टीचें जल सुखदायक होवो. [४]

भावार्थ— मरुदेशातील, जलमय देशांतील, विहीरीचें, वृष्टीचें तसेंच घड्यांत भरलेलें पाणी आमचें सुख वाढवो. [४]

जलसूक्त

या तीन सूक्तांत जलाचें वर्णन केलेलें आहे. तीन सूक्तें एकत्र असल्यानें तीनहि सूक्तांचें विवरण एकत्रच करूं.

जलाची भिन्नता

पाणीखालीं दिल्याप्रमाणें असतें, ही गोष्ट पूर्वं सूक्तांत सांगितली आहे—

१ **देवीः (दिव्याः) आपः** (४।३)– आकाशांतून म्हणजे मेघांपासून प्राप्त होणारें जल, यालाच ' **वार्षिकी** ' असेंहि नांव आहे.

२ **वार्षिकीः आपः** (६।४)– वृष्टीपासून प्राप्त होणारें जल.

३ **सिन्धुः** (४।३)– नदी तसेंच समुद्रापासून प्राप्त होणारें जल.

४ **अनूप्याः आपः** (६।४)– जलमय प्रदेशांत प्राप्त होणारें जल.

५ **धन्वन्याः आपः** (६।४)– मरुदेश, रेतीचे प्रदेश, थोडा पाऊस होणाऱ्या देशांत प्राप्त होणारें पाणी.

६ **खनित्रिमाः आपः** (६।४)– खोदून तयार केलेल्या विहीरींतील प्राप्त होणारें पाणी.

वृष्टिपासून प्राप्त होणारें पाणीसुद्धां रेतीचें स्थान, चिखल होणारें मातीचें स्थान इत्यादि ठिकाणीं पडण्यामुळें भिन्न गुणधर्मानें युक्त होतें. ज्या स्थानीं वर्षानुवर्षं चिखल होतो त्याठिकाणीं पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची अवस्था भिन्न असते आणि रेतीमधून प्राप्त होणाऱ्या पाण्याची अवस्था गुणधर्म दृष्ट्या भिन्न असते. या कारणानेंच ही सर्व जलें भिन्न गुणधर्मयुक्त असतात. पाण्याचा उपयोग आरोग्यासाठीं करावयाचा असला तर प्रथम सर्वांत उत्तम शुद्ध आणि पवित्रजल प्राप्त करणें आवश्यक आहे.

वर सांगितलेलें जल जें बाहेर प्राप्त होतें तें घड्यांत भरून घरांत ठेवल्यानें त्याचे गुणधर्मांत फेर पडतो. अर्थात् विहीरीचें पाणी ताजें असतां त्याचा जो गुण असेल तो घरांत (**कुंभे आभृताः** ६।४) घड्यांत कित्येक दिवस ठेवल्यानें भिन्न गुणधर्मयुक्त होण्याचा संभव आहेच. तसेंच प्रवाही नदीचें पाणी आणि स्थिर विहीरीचें पाणी यांचे गुणधर्म सुद्धां भिन्न असूं शकतात.

त्याचप्रमाणें एकच जल विभिन्न स्थानीं आणि विभिन्न गुणधर्मानें युक्त होतें, हें दर्शविण्यासाठीं खालीं दिलेल्या मंत्रात म्हटलें आहे...

अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह । (४।२)

' तें जल जें सूर्यासन्मुख रहातें अथवा ज्याच्या सन्मुख सूर्य रहातो. ' म्हणजे सूर्यकिरणांचा स्पर्श होणारें जल भिन्न गुणधर्म युक्त होतें आणि नेहमीं अंधारांत रहाण्यामुळें ज्यावर सूर्यकिरण कधींच पडत नाहींत त्या जलाचे गुणधर्म भिन्न असतात. ज्या विहीरीवर वृक्षादिकांची छाया नेहमीं असते आणि ज्यावर नसते त्यांच्या पाण्याचे गुणधर्म भिन्न असतात. तसेंच—

अम्बयो यन्त्यध्वभिः । (४।१)

'नद्या आपल्या मार्गानें जातात,' यांत पाण्याच्या गतीचें वर्णन आहे. असें गतियुक्त जल आणि स्थिर जल विभिन्न गुणांनीं युक्त असतात. स्थिर जलांत कृमिकीटक अथवा कुजणें (सडलेल्या वस्तू कुजणें) शक्य आहे, त्याचप्रमाणें गतीची मंदता आणि तीव्रता यांच्यामुळें सुद्धां पाण्याच्या गुणधर्मांत भेद होतात तसेंच—

पृञ्चन्तीर्मधुना पयः । (४।१)

' मध म्हणजे पुष्प–पराग वगैरे पाण्यांत मिसळले गेले आहेत. ' यामुळें सुद्धां पाण्याचे गुणधर्म बदलतात. नदी–तलाव इत्यादींच्या कांठावर वृक्ष वगैरे असतात आणि त्या पाण्यांत वृक्षवनस्पतींपासून फूल, फुलाचे परागकण, पानें वगैरे पाण्यांत

पडतात आणि सडतात. यामुळें पाण्याचे गुणधर्म बदलतात. तसेंच—

यत्र गावः पिबन्ति । (४।३)

'ज्या जलाशयांत गाई पाणी पितात.' जेथें गाई, म्हशी, वगैरे जनावरें जातात आणि पाणी पितात, त्या पाण्याची अवस्था-सुद्धां बदलून जाते.

पाणी वापरण्यास घेतांना या गोष्टींचा विचार केला पाहिजे. पाण्याच्या ज्या अवस्था वर्णन केल्या आहेत, त्यांतील उत्तम स्थितींत असलेलें पाणी पिणें वगैरेस योग्य होय. प्रत्येक अवस्थेंत प्राप्त होणारें पाणी चांगलें नाहीं. वेदानें या सर्व पाण्याच्या अवस्थांचें वर्णन करून ही गोष्ट स्पष्ट केली आहे कीं पाण्यांत सुद्धां उत्तम, मध्यम, अधम अवस्थेचें जल असतें आणि जर उत्तम आरोग्य प्राप्त करणें असेल तर उत्तमांत उत्तम पवित्र जलच घेतलें पाहिजे. वाचकांनीं या अवस्थांचा उत्तम विचार करावा.

पाण्यांत औषध

जलाचें नांव अमृत आहे अर्थात् जीवनरूपी रस हेंच जल होय हीच गोष्ट मंत्र सांगत आहे—

अप्सु अमृतम् । (४।४)
अप्सु भेषजम् । (४।४)

'पाण्यांत अमृत आहे, पाण्यांत औषध आहे.' पाणी अमृतमय आणि औषधिमय आहे. मरणापासून वाचवितें त्याला अमृत म्हणतात आणि शरीराच्या दोषांना धुवून शरीराची निर्दोषता सिद्ध करण्यास औषध म्हणतात. पाणी या गुणांनीं युक्त आहे. म्हणून पाण्यास म्हटलें आहे कीं—

शिवतमः रसः । (५।२)

'जल अत्यंत कल्याण करणारा रस आहे.' केवल '**शिवः रसः**' म्हटलें नाहीं, परंतु '**शिवतमः रसः**' म्हटलें आहे. यावरून स्पष्ट होतें कीं यानें अत्यंत कल्याण होण्याचा संभव आहे. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांनीं वेद स्पष्ट करीत आहे—

आपः मयोभुवः । (५।१)

'जल हितकारक आहे.' येथील '**मयस्**' शब्द सुख, आनंद, समाधान, तृप्ति इत्यादि अर्थांचा बोधक आहे. जर पाणी पूर्ण आरोग्यदायक नसलें तर त्यानें आनंद वाढणें अशक्य आहे. म्हणून जल अमृतमय आहे हें स्पष्ट सिद्ध होतें. म्हणून म्हटलें आहे—

अप्सु विश्वानि भेषजानि । (मं. ६।२)

'पाण्यांत सर्व औषधें आहेत.' पाण्यांत फक्त एकाच रोगाची नव्हे तर सर्व प्रकारचीं औषधें आहेत. म्हणून प्रत्येक रोगाचा जलचिकित्सेनें इलाज करता येतो. योग्य वैद्य आणि पथ्य पालन करणारा रोगी असेल तर आरोग्य निःसंदेह प्राप्त होईल. म्हणून म्हटलें आहे—

आपः पृणीत भेषजम् । (६।३)
अपो याचामि भेषजम् । (५।४)

'पाणी औषध (इलाज) करतें. पाण्याजवळ औषधाची मागणी करतों.' म्हणजे पाण्यानें चिकित्सा होते. रोगाचें निवारण जलचिकित्सेनें होऊं शकतें. रोगामुळें जी विषमता शरीरांत निर्माण होते ती दूर करून सधातूंत समता स्थापन करणें जल-चिकित्सेनें संभवनीय आहे.

समता आणि विषमता

शरीराची समता हें आरोग्य आणि विषमता हा रोग होय. समता स्थापन करण्याची सूचना वेदाच्या '**शं, शांतिः**' इत्यादि शब्दांवरून मिळते आणि विषमता दूर करण्याचा भाव '**योः**' शब्द वेदांत करीत आहे. दोन्ही मिळून '**शं-योः**' शब्द तयार होतो. त्याचें संयुक्त तात्पर्य 'समतेची स्थापना आणि विषमता दूर करणें' असें आहे. म्हणून म्हटलें आहे—

शं योरभि स्रवन्तु नः । (६।१)

'समतेची स्थापना आणि विषमतेस दूर करणें आमच्यासाठीं जलधारा करोत.' किंवा जलधारा वर सांगितलेले दोन्ही प्रभाव आम्हांवर सोडोत. पाण्यानें वर सांगितलेल्या दोन्हीं गोष्टी सिद्ध होतात ही गोष्ट येथें सिद्ध आहे. तसेंच—

शं नो देवीरभीष्टय आपो भवन्तु । (६।१)

'दिव्यजल आमच्यासाठीं शांतिकारक होवो.' यामध्यें तोच भाव आहे. (सू. ६, मं. ४) हा मंत्र तर शांति अथवा समतेचा उल्लेख कित्येक वेळ करीत आहे. समतेची स्थापना आणि विषमतेस दूर करणें हीं दोन कार्यें होण्यानें उत्तम रक्षण होतें. म्हणून मंत्रांत म्हटलें आहे कीं—

वरूथं तन्वे मम । (६।३)

'माझ्या शरीराचें रक्षण पाण्यानें होवो.' '**वरूथ**' चा अर्थ 'संरक्षक कवच' असा आहे. पाण्याचें वर्णन 'संरक्षक कवच' असें केलें आहे म्हणजे जल कवचाप्रमाणें रक्षण करणारें आहे. हा भाव स्पष्ट आहे.

बलाची वृद्धि

वर सांगितल्याप्रमाणें आरोग्य प्राप्त झाल्यानंतर शरीराचें बल वाढविण्याचा प्रश्न येतो. याविषयीं मंत्र म्हणतो—

नः ऊर्जे दधातन । (५।१)

'आम्हांस बलासाठीं पुष्ट करा.' म्हणजे पाण्यानें धारण-पोषण होऊन उत्तमप्रकारें बल वाढणें सुद्धां शक्य आहे. विषमता दूर होऊन समतेची स्थापना झाली तर बल वाढूं शकतें. पाण्यानें शरीराचें सौंदर्यसुद्धां वाढतें. पहा—

महे रणाय चक्षसे । (५।१)

'मोठ्या (रणाय) रमणीयतेसाठीं' पाण्याचा उपयोग होतो. पाण्यानें शरीराची रमणीयता वाढते. शरीराची बाह्यशुद्धि होऊन जशी सुंदरता वाढते त्याप्रमाणांत जल अंतःशुद्धि करतें. म्हणून आरोग्य वाढल्यानें शरीराचें सौंदर्य वाढीस सहाय्य होतें, आरोग्याशीं सुंदरतेचा विशेष संबंध आहे. तात्पर्य हें पाणी मनुष्याच्या येथील सुस्थितीस कारण होतें. म्हणून म्हटलें आहे—

क्षयाय जिन्वथ । (५।३)
क्षयन्तीश्चर्षणीनाम् । (५।४)

'निवासासाठीं तृप्ति करतें. प्राण्यांच्या निवासाचें कारण आहे.' या मंत्रांचे सांगणें स्पष्ट आहे कीं पाणी मनुष्यादि प्राण्यांची येथील सुस्थिति साधण्याचें मुख्य साधन आहे. म्हणून म्हटलें आहे कीं-

ईशाना वार्याणाम् । (५।४)

'स्वीकारण्यायोग्य गुणांचा अधिपति पाणी आहे.' म्हणजे प्राण्यांस ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यांचें अस्तित्व जलांत आहे. यामुळें जल निवासाचा हेतू होतें.

दीर्घायुष्याचें साधन

मनुष्यादि प्राण्यांच्या दीर्घायुष्याचें साधक पाणी आहे, ही गोष्ट या भागांत पहा—

ज्योक् च सूर्यं दृशे । (६।३)

'पुष्कळ दिवसापर्यंत सूर्याचें दर्शन करूं.' ही एक प्रकारची म्हण, वाक्प्रचार आहे. त्याचा अर्थ असा कीं—

मी दीर्घकालपर्यंत जिवित राहीन म्हणजे प्राण्याच्या उपयोगानें दीर्घायुष्य प्राप्त होण्याचा संभव आहे. 'ज+ल' तें कीं जें जन्मापासून लयापर्यंत उपयोगी आहे.

प्रजनन-शक्ति

पाण्याचें नांव वीर्य आहे. याची सूचना निरनिराळ्या मंत्रभागांतून मिळते--

आपो जनयथा च नः । (५।३)

'पाणी आम्हांस उत्पन्न करतें' म्हणजे याच्यामुळें आम्हांत आणि प्राणीमात्रांत प्रजनन शक्ति येते. आरोग्य, बल, वीर्य, दीर्घायुष्य, धातूंची समता वगैरे प्रजनन शक्तिशीं निकट संबंध आहे, ही गोष्ट वाचक जाणूं शकतात, म्हणून त्याविषयीं येथें जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. या प्रजननशक्तीचें नांव वाजीकरण आहे आणि याचें वर्णन मंत्रांत खालीं दिल्याप्रमाणें आहे—

अपामुत प्रशस्तिभिरश्वा भवथ वाजिनो
गावो भवथ वाजिनीः । (४४)

'पाण्याच्या प्रशस्त गुणांनीं अश्व (पुरुष) वाजी होतात आणि गाई (स्त्रिया) वाजिनी होतात. वाजी शब्द प्रजनन-शक्तीनें युक्त होण्याचा भाव दर्शवीत आहे. अश्व आणि गौ शब्द येथें पुरुष आणि स्त्रीजातीचे वाचक आहेत. पाण्याच्या प्रयोगानें वाजीकरणाची सिद्धि येथें सांगितली आहे. तसेंच आणखी पहा—

अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयोऽध्वरीयताम् । (४।१)

'यज्ञकर्त्यांच्या माता आणि बहिणी आपल्या मार्गानें जातात.' स्त्रिया जो उचित मार्ग आहे तोच अनुसरतात. म्हणजे नियमानुकूल वर्तन करीत प्रगति करतात. स्त्री-पुरुष आपणांस योग्य नियमानुरूप वर्तन करतील तर उत्तम प्रजनन होणें संभवनीय आहे. या गोष्टीची सूचना येथें मिळते.

अशाप्रकारें या तीन जलविषयक सूक्तांत पाण्याविषयीं महत्त्वपूर्ण ज्ञानाचा उपदेश दिला आहे.

व्यापारानें धनाची प्राप्ति

कांड ३, सूक्त १५

(ऋषिः – अथर्वा । देवता – विश्वेदेवाः; इन्द्राग्नी ।)

इन्द्रमहं वणिजं चोदयामि स न ऐतु पुरएता नो अस्तु ।
नुदन्नरातिं परिपन्थिनं मृगं स ईशानो धनदा अस्तु मह्यम् ॥ १ ॥
ये पन्थानो बहवो देवयाना अन्तरा द्यावापृथिवी संचरन्ति ।
ते मा जुषन्तां पयसा घृतेन यथा क्रीत्वा धनमाहराणि ॥ २ ॥
इध्मेनाग्न इच्छमानो घृतेन जुहोमि हव्यं तरसे बलाय ।
यावदीशे ब्रह्मणा वन्दमान इमां धियं शतसेयाय देवीम् ॥ ३ ॥
इमामग्ने शरणिं मीमृषो नो यमध्वानमगाम दूरम् ।
शुनं नो अस्तु प्रपणो विक्रयश्च प्रतिपणः फलिनं मा कृणोतु ।
इदं हव्यं संविदानौ जुषेथां शुनं नो अस्तु चरितमुत्थितं च ॥ ४ ॥

अर्थ— (अहं वणिजं इन्द्रं चोदयामि) मीं वणिक् इंद्रास प्रेरित करतों. (सः नः ऐतु) तो आमचेकडे येवो, (नः पुरः-एता अस्तु) आमचा नेता होवो. (परिपंथिनं मृगं अरातिं नुदन्) मार्गांत लूट करणाऱ्या पाशवी भावांनीं युक्त शत्रूला वेगळा करीत (सः ईशानः मह्यं धनदा अस्तु) तो समर्थ मला धन देणारा होवो. [१]

(ये देवयानाः बहवः पन्थानः) जे देवांस जाण्याचे पुष्कळ योग्यमार्ग आहेत (द्यावापृथिवी अन्तरा संचरन्ति) द्यावापृथिवीमध्यें चालत राहतात, (ते पयसा घृतेन मा जुषन्तां) ते तूप आणि दुधानें मला तृप्त करोत. (यथा क्रीत्वा धनं आ हरामि) ज्यामुळें क्रयविक्रय करून मी धन प्राप्त करीन. [२]

हे अग्ने ! (इच्छमानः इध्मेन घृतेन तरसे बलाय हव्यं जुहोमि) मीं लाभाची इच्छा करणारा इंधन आणि तुपानें संकटांतून वाचण्यासाठीं आणि बलप्राप्तिसाठीं हवन करतों. (यावत् इमां देवीं धियं ब्रह्मणा वन्दमानः शत-सेयाय ईशे) ज्यामुळें या बुद्धीचा ज्ञानानें सन्मान करीत मीं शेंकडों सिद्धि प्राप्त करण्यायोग्य व्हावें. [३]

हे (अग्ने) अग्ने ! (नः इमां शरणिं मीमृषः) या आमच्या अशुद्धीची क्षमा कर. (यं दूरं अध्वानं अगाम) ज्या दूरच्या रस्त्यापर्यंत आम्हीं आलों आहोंत, (नः प्रपणः विक्रयः च शुनं अस्तु) तेथील आमचा क्रयविक्रय लाभकारक होवो. (प्रतिपणः फलिनं नः कृणोतु) प्रत्येक व्यवहार मला लाभदायक होवो. (इदं हव्यं संविदानौ जुषेथां) हा हवि जाणून सेवन करा. (नः चरितं उत्थितं च शुनं अस्तु) आमचा व्यवहार आणि आमचें उत्थान लाभदायक होवो. [४]

भावार्थ— मीं वाणिज्य करणाऱ्या इंद्राची प्रार्थना करतों की तो आम्हांत येऊन राहो आणि आमचा नेता होवो. तो प्रभू आम्हांस धन देणारा होवो आणि तो आमच्या शत्रूंना म्हणजे लुटारू, वाटमारे आणि पाशवीशक्तीनें आम्हांस त्रास देणाऱ्यांना आमच्या मार्गांतून दूर करो. [१]

द्युलोक आणि पृथ्वीच्या मध्यें जाण्यायेण्याचे जे दिव्यमार्ग आहेत ते आमच्यासाठीं दूध आणि तुपानें भरपूर असोत. ज्या मार्गानें जाऊन आणि व्यापार करून आम्ही पुष्कळ फायदा प्राप्त करूं शकतों. [२]

मीं लाभ तसेंच बल प्राप्त करूं आणि संकटास दूर करूं इच्छितों. म्हणून मीं तूप आणि समिधांनीं हवन करतों. त्यामुळें मीं ज्ञानप्राप्तिपूर्वक उत्तम बुद्धीनें प्रशस्त कर्म करीत अनेक व्यापारांत सिद्धि प्राप्त करून लाभ प्राप्त करीन. [३]

आम्हीं आमच्या घरापासून फार दूर परदेशांत आलों आहोंत. हे प्रभो ! येथें आमच्याकडून कांहीं दोष घडला तर क्षमा कर. येथें जो व्यापार आम्हीं करीत आहोंत, त्यामध्यें आम्हांस पुष्कळ लाभ प्राप्त होवो. आम्हांस क्रयामध्यें लाभ होवो आणि विक्रयामध्यें आम्हांस पुष्कळ धन प्राप्त होवो, प्रत्येक व्यवहारांत आम्हांस फायदा होवो. आमचें येणेंजाणें आणि आमचें अभ्युत्थान म्हणजे स्पर्धेची चढाई करणेंसुद्धां आम्हांस लाभकारी होवो. यासाठीं आम्ही हें करीत आहोंत त्याचें सेवन कर. [४]

येन धनेन प्रपणं चरामि धनेन देवा धनमिच्छमानः ।
तन्मे भूयो भवतु मा कनीयोऽग्ने सातघ्नो देवान्हविषा नि षेध ॥ ५ ॥
येन धनेन प्रपणं चरामि धनेन देवा धनमिच्छमानः ।
तस्मिन्म इन्द्रो रुचिमा दधातु प्रजापतिः सविता सोमो अग्निः ॥ ६ ॥
उप त्वा नमसा वयं होतर्वैश्वानर स्तुमः ।
स नः प्रजास्वात्मसु गोषु प्राणेषु जागृहि ॥ ७ ॥
विश्वाहा ते सदमिद्भरेमाश्वायेव तिष्ठते जातवेदः ।
रायस्पोषेण समिषा मदन्तो मा ते अग्ने प्रतिवेशा रिषाम ॥ ८ ॥

अर्थ-हे (देवाः) देव हो ! (धनेन धनं इच्छमानः) मूळ धनानें लाभाची-प्राप्तिची इच्छा करणारा मीं (येन धनेन प्रपणं चरामि) ज्या धनानें व्यापार करतों, (तत् मे भूयः भवतु) तें मजसाठीं अधिक होवो आणि (मा कनीयः) थोडा होवूं नये. हे अग्ने ! (हविषा सातघ्नः देवान् निषेध) हवनानें युक्त होऊन लाभाचा नाश करणाऱ्या खेळाडूंचा तूं निषेध कर. [५]

हे देव हो ! (धनेन धनं इच्छमानः) पैशानें पैसा मिळविण्याची इच्छा करणारा मीं (येन धनेन प्रपणं चरामि) ज्या धनानें व्यापार करतों (तस्मिन् मे रुचिं) त्यामुळें माझी रुचि (इन्द्रः प्रजापतिः सविता सोमः अग्निः) इन्द्र, प्रजापति, सविता, सोम, अग्निदेव (आदधातु) स्थिर करोत. [६]

हे (होतः वैश्वानर) याजक वैश्वानरा ! (वयं नमसा त्वा उपस्तुमः) आम्हीं नमस्कारानें तुझें स्तवन करतों. (सः नः आत्मसु प्राणेषु प्रजासु गोषु जागृहि) असा तूं आमचा आत्मा, प्राण, प्रजा आणि गाईमध्यें रक्षणासह जागृत रहा. [७]

हे (जातवेदः) जातवेदा ! (विश्वाहा ते इत् सदं भरेम) प्रतिदिन तुझ्याच स्थानांस आम्हीं भरूं. (तिष्ठते अश्वाय इव) ज्याप्रमाणें स्थानावर बांधलेल्या घोड्याला अन्न देतात. (रायः पोषेण इषा सं मदन्तः) धन, पुष्टि आणि अन्नानें आनंदित होत (ते प्रतिवेशा मा रिषाम) तुझे उपासक आम्हीं कधीं नष्ट न होऊं. [८]

भावार्थ— मीं मूळ धनानें व्यापार करून पुष्कळ लाभ प्राप्त करूं इच्छितों, म्हणून जेवढ्या धनानें मीं हा व्यवहार करीत आहें तेवढें धन माझ्या कार्यासाठीं पुरेसें होवो आणि कमी न होवो. मीं जें हवन करीत आहे यानें संतुष्ट होऊन, हे प्रभो ! तूं माझ्या व्यवहारांत लाभाचा नाश करणारे जे कोणी असतील त्यांस दूर कर. [५]

माझ्या मूळ भांडवलावर व्यापार करून मीं पुष्कळ धन मिळवूं इच्छितों. यासाठीं पैसा गुंतवून मीं जो व्यापार करूं इच्छितों त्यांत प्रभूकृपेनें लाभ प्राप्त होईपर्यंत माझी रुची स्थिर होवो. [६]

हे प्रभो ! मीं तुला नमस्कार करतों आणि तुझी स्तुति करतों, तूं संतुष्ट होऊन आमचे आत्मा, प्राण, प्रजा आणि गाय वगैरे पशुंचें रक्षण कर. [७]

हे प्रभो ! ज्याप्रकारें अश्वशाळेमध्यें एका स्थानावर ठेवलेल्या घोड्यांना खाऊं घालण्याची व्यवस्था दररोज करितात, त्याप्रमाणें आम्ही तुला उद्देशून दररोज हवन करतों. तुझ्या कृपेनें आम्हीं पुष्कळ धन, पुष्टि आणि अन्न प्राप्त करूं, पुष्कळ आनंदित होऊं आणि कधींहि दुःखानें त्रस्त न होवूं. [८]

व्यापारानें धनाची प्राप्ति

वाणिज्य व्यवहार

वाणी जो खरेदी विक्रीचा व्यवहार करतात त्याचें नांव व्यापार अथवा वाणिज्य व्यवहार. व्यापारासाठीं कांहीं वस्तू एका ठिकाणाहून खरिदावयाच्या आणि अन्यत्र विकावयाच्या. या खरेदी विक्रींत योग्य नफा मिळवणें याचें नांव व्यापार व्यवहार असें आहे. हुशार वाणी यांत चांगला असा फायदा करून घेतात.

जुना वाणी

या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत सर्व जगाचा प्रभू (**इंद्र भगवान्**) ला '**वणिजं इंद्रं**' (**वणिक् इंद्र**) म्हटलें आहे, हें उत्तम काव्यमय वर्णन आहे आणि यांत अद्भुत उपदेश आहे. परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे आणि प्रयत्न करूनहि दिसत नाहीं. म्हणून त्यास एका मंत्रांत (**तायु** । ऋ. १।६५।१) चोरसुद्धां म्हटलें आहे. हा जसा एक अद्भुत अलंकार आहे, त्याचप्रमाणें प्रभूला वाणी म्हणणें हा सुद्धां एक अलंकार आहे.

ज्याप्रमाणें वाणी एक रुपया घेऊन त्याच्या किंमती इतकेंच धान्य वगैरे देतो, जास्त अथवा कमी नाहीं, त्याप्रमाणेंच हा '**जुना सर्वांत महान् वाणी**' मनुष्यांना सुखदुःख मनुष्य जेवढें बरें वाईट कर्म करतो, त्या प्रमाणांतच देतो अथवा जितकें ते परोपकारार्थ अर्पण करतात, तितकेंच पुण्य त्यांना मिळतें. याप्रकारें इंद्र वाण्यानें जगाचे सुरवातीपासून आपला व्यापार चालविला आहे. हा कधीं पक्षपात करीत नाहीं किंवा उधारीचा धंदा करीत नाहीं. अशाप्रकारें हा पुराणपुरुष वाण्याचा व्यवहार करीत आला आहे, त्यास जितकें द्यावें तेवढेंच परत मिळतें. म्हणून मनुष्यानें यज्ञयागादि कर्में केलीं पाहिजेत. कांहीं देऊन येथें पुण्य खरेदी करतां येतें, हा उपदेश येथें मिळतो.

व्यापाराचा व्यवहार सांगतांनासुद्धां वेदानें त्यांत परमात्म्याच्या सत्य व्यवहाराचा उपदेश केला आहे, कीं व्यापारसुद्धां सत्यस्वरूप परमेश्वराच्या निष्ठेनें व्हावयास-करावयास हवा आणि छळ, कपट, लबाडी, लुच्चेगिरी तसेंच दगलबाजी त्यांत कधीं करूं नये.

हवनाचा निर्देश मं. ३ आणि मं. ५ या दोन मंत्रांत आहे. हवनाचा अर्थ '**आत्मसमर्पण**' असा आहे. आपल्याजवळचें सर्वस्व परमार्थासाठीं अर्पण करणें आणि स्वार्थाचा भाव कमी करणें हाच यज्ञ होय. अशा यज्ञानेंच जगावर उपकार होतात आणि अशीं सत्कर्में परमात्म्यास पोहोंचतात आणि त्याचें यश कर्त्यांस मिळतें. म्हणून व्यापार-व्यवहारानें धन प्राप्त केल्यावर त्याचा योग्य भाग परोपकारासाठीं समर्पण केला पाहिजे म्हणजे तो यज्ञासाठीं खर्चला पाहिजे. धन मिळविणाऱ्यांनीं याचा योग्य विचार करावा. जो मिळविलेलें धन स्वतः वापरतो तो पापी होतो, म्हणून मिळविलेल्या धनांतून योग्य भाग परोपकारांत खर्च करणें योग्य होय.

व्यापाराचें स्वरूप

या सूक्तांत व्यापार विषयक जे शब्द आले आहेत, ते आतां पहा—

१ **धनं**- भांडवल, मूळधन, ज्याच्या सहाय्यानें व्यापार करण्यांत येतो. (मं. ५,६)

२ **धनं**- लाभ, फायदा, नफा वगैरे द्वारा प्राप्त होणारें धन. (मं. ५,६)

३ **वणिक्**- व्यापारी, खरेदी विक्री करणारा. (मं. १)

४ **धनदा**- व्यापारासाठीं धन-पैसा देणारा सावकार, धनपति, ज्याच्या जवळून पैसा घेऊन दुसरे लहान लहान व्यापारी आपला कामधंदा करतात. (मं. १)

५ **प्रपणः**- सौदा, खरेदी. (मं. ५)

६ **विक्रयः**- विक्री, खरेदी केलेला माल विकणें. (मं. ४)

७ **प्रतिपणः**- प्रत्येक व्यवहार, सौदा, खरेदी अथवा विक्री. (मं. ४)

८ **फली**- (**फलिन्**)- लाभयुक्त होणें. (मं. ४)

९ **शुनं**- कल्याणकारक, लाभकारक, हितकारक. (मं. ४)

१० **चरितं**- व्यवहार करण्यासाठीं जरूर ती हालचाल करणें. (मं. ४)

११ **उत्थितं**- उठाव, चढाई. प्रतिस्पर्ध्याशीं स्पर्धेसाठीं चढाई करणें. (मं. ४)

१२ **भूयः** (**धनं**)- व्यापारासाठीं पुरेसें भांडवल, धन असणें. (मं. ५)

हे बारा शब्द व्यापारविषयक नीति सुचवितात. यांच्या मननानें

वाचकांस कळून येईल की वाण्याच्या व्यापारी कार्यात कोण-कोणते विभाग असतात आणि त्या त्या विभागांत काय कार्य केलें पाहिजे.

प्रथम मूळ भांडवल व्यापारांत वापरलें पाहिजे. जर आपणा-जवळ नसलें तर एखाद्या सावकारापासून (**धन-दा**) घेऊन त्या धनावर आपला व्यापार सुरू केला पाहिजे. ज्या वस्तूचा व्यापार करावयाचा त्या वस्तूचा ' **क्रय** ' म्हणजे खरेदी केली पाहिजे आणि नंतर त्याचा ' **विक्रय** ' म्हणजे विक्री कोठें केल्यानें जास्तींत जास्त फायदा होऊं शकेल याचा विचार केला पाहिजे. कोणत्या मोसमांत कोणत्या वस्तूची कोणत्या देशांत खरेदी आणि कोणत्या स्थानीं विक्री (**प्रतिपण**) केल्यानें अधिक लाभ होण्याचा संभव आहे याचा योग्य विचार केल्यानें निःसंशय नफा होऊं शकतो. याचेंच नांव वर ' **चरितं** ' असें दिलें आहे.

यावर दिलेल्या सर्व शब्दांत ' **उत्थितं** ' शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. उठाव, उठणें, चढाई करणें इत्यादि त्याचे प्रसिद्ध अर्थ आहेत. मालाचा उठाव करण्याचें तात्पर्य तर सर्वांस माहित आहेच. या उत्थानाचे दोन भेद असतात. एक ' **वैयक्तिक उत्थान** ' आणि दुसरें ' **सामुदायिक उत्थान** ' एक व्यक्ति चढाईच्या नीतीनें व्यापार करते त्यास वैयक्तिक उत्थान म्हण-तात आणि जेथें अनेक व्यापारी आपला संघ करून चढाई करतात त्यास ' **संभूय समुत्थान** ' असें म्हणतात. व्यापारांत केवळ वर सांगितलेलें ' **चरित** ' च कार्य करीत नाहीं परंतु हें दोन्ही प्रकारचें उत्थान सुद्धां महान कार्यकर होत असतें. वाचकांनीं याचा उत्तम विचार करावा.

व्यापाराचे विरोधी

१ **सातघ्नः**– (सात) लाभाचा (घ्न) नाश करणारे. ज्यांच्यामुळें व्यवहारांत हानि होते. (मं. ५)

२ **सातघ्नः देवः**– लाभाचा नाश करणारे जुगारी, (**दिव्** = जुगार खेळणें) या धातुवरून देव शब्द झाला आहे. व्यवहारांत हानि करणाऱ्या संबंधी असणारा मनुष्य. (मं. ५)

३ **परिपन्थिन्**– वाटमारे, लुटारू, चोर, रस्त्यावर थांबून येणाऱ्या जाणाऱ्यांस लुटतात. (मं. १)

४ **मृगः**– पशु, जनावरें, पशूचा भाव असणारा मनुष्य. (मं. १)

५ **अ-रातिः**– कंजूस, दान न देणारा (मं. १)

६ **कनीयः (धनं)**– व्यापारासाठीं जेवढें धन पाहिजे तितकें नसणें, धनाचा अभाव. (मं. ५)

यावरील कारणांनीं व्यापारांत हानि होते. म्हणून यांपासून सुरक्षित रहाण्याचा उपाय केला पाहिजे.

व्यापार-व्यवहार करण्यांत जीं विघ्नें येतात त्याचा विचार या शब्दांनीं या सूक्तांत केला आहे. विघ्न करणारे प्रथम ' **सातघ्न देव** ' आहेत. वाचकांस येथें देव विघ्न करणारा आहे हें वाचून आश्चर्य वाटेल, परंतु तशी भीति वाटण्याचें कारण नाहीं. ' **देव** ' शब्दाचा अर्थ, जुगारी, जुगार खेळण्यांत वेळ घालवि-णारे असा सुद्धां होतो. हा अर्थ ' **दिव** ' धातुचा ' जुगार खेळणें ' असा आहे, त्या धातूपासून सिद्ध झालेला शब्द आहे. जो व्यापारी आपला वेळ अशा कुकर्मांत खर्च करतो, तो आपलें नुकसान करून घेतो आणि आपल्या भागीदारांस, साथीदारांस सुद्धां बुडवतो. हें चिन्ह समजून जो जो व्यवहार व्यापारांत हानि करणारा असेल, तो व्यवहार करणारे ' **सातघ्न देव** ' समजणें योग्य होईल. (**सात**) लाभाचा नाश (**घ्न**) करणारे (**देव**) व्यवहार करणारे लोक असा याचा अर्थ आहे. ' **देव** ' शब्द ' व्यवहार करणारे ' या अर्थानें येथें प्रचलित आहे.

' **परिपंथि** ' शब्दाचा प्रसिद्ध अर्थ वर दिला आहे. त्याचा दुसरा अर्थ ' जे लोक कुमार्गानें जातात ते ' असा होतो. सरळ राजमार्गानें न जातां अन्य कुमार्गानें जाणें पुष्कळ वेळां हानि-कारक होतें. विशेष करून हा अर्थ येथें अभिप्रेत आहे असें आम्हांस वाटतें.

व्यापाराचें मूळ धन म्हणजे भांडवलसुद्धां कमी होतां कामा नये, नाहून सर्व गोष्टी चांगल्या असूनसुद्धां व्यापारांत लाभ होणार नाहीं. म्हणून पांचव्या मंत्रांत सूचना दिली आहे की (**मा कनीयः** । मं. ५) ती अत्यंत ध्यानांत घेण्यासारखी आहे. पुष्कळ व्यवहार लाभकारक होत असूनसुद्धां आवश्यक धनाच्या अभावीं नुकसानकारक ठरतात. अशाप्रकारें जें नुकसान होतें तें कांहीं दुसऱ्या मार्गानें, युक्तीनें अथवा बुद्धीच्या कुशलतेनें पूर्ण भरून येऊं शकत नाहीं. कारण की हा धनाचा अभाव प्रत्येक प्रसंगीं हरकती उत्पन्न करणारा होतो. व्यापार करणाऱ्या वाचकांनीं यापासून जरूर तो बोध घ्यावा.

दोन मार्ग

व्यापारासाठीं देशांतरास जाणें जरूरीचें असतें, नाहून मोठा

व्यापार होणें शक्य नाहीं. अन्य देशांस अथवा द्वीपांस जाण्यास मार्ग सुरक्षित असले पाहिजेत. अन्य देशांस जाण्याचे कांहीं मार्ग सुरक्षित असतात तर कांहीं भयजनक असतात. जे सुरक्षित मार्ग असतात त्यांस **' देवयानाः पन्थानः '** (मं. २) म्हटलें आहे. ज्या मार्गावरून देव-देवतां सारखीं मनुष्यें जातात येतात, त्यामुळें ते मार्ग रक्षित असतात, अशा मार्गावर लूट होत नाहीं. व्यापारी मनुष्यें आपला माल सुरक्षितपणें घेऊन जातात व घेऊन येतात, त्यांस देवयान मार्ग म्हणतात. जेथें जाण्याचे येण्यास मार्ग सुरक्षित असतात तेथेंच व्यापार करणें लाभदायक होतें.

इतर मार्ग राक्षस, असुर आणि पिशाचांचे असतात. या मार्गावरून हे निशाचर ये-जा करीत असतात. हेच **'परिपन्थी'** म्हणजे वाटमारे, लुटारू, चोर, डाकू होऊन सार्थवाह म्हणजे व्यापारी तांड्यास लुटतात. या मार्गानें जाण्यानें व्यापार-व्यवहार लाभदायक होत नाहीं. म्हणून जेथील मार्ग सुरक्षित नसतील तेथील मार्ग सुरक्षित करण्यासाठीं प्रयत्न होणें आवश्यक आहे. व्यापाराची वृद्धि करण्यासाठीं हे अत्यंत आवश्यक कर्तव्य आहे.

व्यापार चांगला होण्यासाठीं दुसऱ्या अशा गोष्टीची आवश्यकता असते कीं रस्त्यांत जेथें जेथें मुक्काम करणें आवश्यक तेथें तेथें खाण्यापीण्याचे पदार्थ मनास अनुकूल, सुगमतेनें मिळाले पाहिजेत. राहण्या उतरण्याची व खाण्यापीण्याची सर्व व्यवस्था अनायास व्हावयास हवी. याविषयीं दुसरा मंत्र पहा—

ते (पन्थानः) मा जुषन्तां पयसा घृतेन ।
तथा क्रीत्वा धनमाहरामि । (मं. २)

' ते देशदेशांतरास जाणारे मार्ग मला भरपूर प्रमाणांत दूध, तूप वगैरे उपभोगाचे पदार्थ देणारे होवोत. त्यामुळें मी क्रय-विक्रय करून धन मिळविण्याचा व्यवहार करूं शकेन. ' ही गोष्ट तर स्पष्ट आहे कीं जर दूरदूरच्या निरनिराळ्या देशांत भ्रमण करणाऱ्यांस जेवणखाणाची व्यवस्था चांगली मिळाली नाहीं आणि त्यांस स्वतः त्यासाठीं व्यवस्था करण्यास मेहनत करावी लागली तर त्यांचा सर्व वेळ त्यांतच निघून जाईल, अनेक कष्ट पडतील, विदेशांत स्थानांचा परिचय नसल्यानें सर्व जरूर तें सरसामान एकत्र करण्यांत व्यर्थ वेळ निघून जाईल. म्हणून मंत्रांत सांगितल्याप्रमाणें ' रस्ताच जर उपभोगाच्या पदार्थांनीं सज्ज राहील ' तर उत्तमच. हा उपदेश पुष्कळच महत्त्वपूर्ण आहे आणि व्यापारवृद्धीसाठीं सर्वत्र अशी व्यवस्था होणें आवश्यक आहे.

ज्ञानयुक्त कर्म

प्रत्येक कार्य ज्ञानपूर्वक केलें पाहिजे. याविषयीं तिसऱ्या मंत्राचें कथन अत्यंत विचार करण्यासारखें आहे--

देवीं धियं ब्रह्मणा वन्दमानः शतसेयाय ईशे ।
(मं. ३)

' दिव्य बुद्धि आणि कर्मशक्तींचा ज्ञानानें सत्कार करीत मीं शेंकडों सिद्धि प्राप्त करण्याचा अधिकारी होईन. '

येथील ' धी ' शब्द ' प्रज्ञा, बुद्धि आणि कर्मशक्तिचा ' वाचक आहे. ज्ञानपूर्वक प्रत्येक कर्म केलें पाहिजे. जें काम करावयाचें त्या विषयाचें जितकें ज्ञान प्राप्त करणें आवश्यक आहे, तितकें प्रथम करून आणि नंतर त्या कार्याचा आरंभ केला पाहिजे, तरच सिद्धि प्राप्त होऊं शकेल, हा सिद्धीचा सरळ मार्ग आहे. दुसरी गोष्ट जी सिद्धिसाठीं आवश्यक आहे ती ही कीं आरंभ केलेल्या कार्यांत रुचि स्थिर व्हावयास हवी–

तस्मिन् रुचिं आ दधातु । (मं. ६)

' या कार्यांत रुचि स्थिर होवो. ' ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. एरवीं कित्येक लोकांची अशी चंचलवृत्ति असते कीं ते आज एक कार्य करतात, उद्यां तिसरेंच हातीं घेतात तर परवा आणखी चौथ्या पांचव्याचा विचार करीत असतात. असे चंचल मनोवृत्तीचे लोक सिद्धि कधींच प्राप्त करूं शकत नाहींत.

परमेश्वर भक्ति

सर्व कार्यांच्या सिद्धिसाठीं परमेश्वराची भक्ति केली पाहिजे. याविषयीं सातव्या-आठव्या मंत्राचें कथन मोठें मननीय आहे. ' ईश्वराची नम्रतापूर्वक प्रार्थना केली पाहिजे. ' कारण कीं तोच एक शरण जाण्यायोग्य आहे आणि त्याच्या शक्तिनेंच सर्वांचें रक्षण होतें. दररोज नेमल्यावेळीं त्याची उपासना केली पाहिजे. त्यामुळें तो सर्व व्यवहारांत यशस्वी करील आणि धन, पुष्टि, सुख वगैरे प्राप्त होईल आणि कधीं पतन होणार नाहीं. ईश्वर उपासना तर सर्वांच्या उन्नतिसाठीं अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण सिद्धिसाठीं तिची फार आवश्यकता आहे.

चंद्र आणि पृथ्वीची गति

कांड ६, सूक्त ३१

(ऋषिः - उपरिबभ्रवः) देवता - गौः ।)

आयं गौः पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः । पितरं च प्रयन्त्स्वः ॥ १ ॥
अन्तश्चरति रोचना अस्य प्राणादपानतः । व्यख्यन्महिषः स्वः ॥ २ ॥
त्रिंशद्धामा वि राजति वाक्पतङ्गो अशिश्रियत् । प्रति वस्तोरहर्द्युभिः ॥ ३ ॥

अर्थ— (अयं गौः) हा गतियुक्त चंद्रमा (मातरं पुरः असदत्) स्वतःची माता भूमीला पुढें करीत आहे आणि (पितरं स्वः च प्रयन्) आपल्या पितारूपी स्वयंप्रकाशी सूर्याच्या चारी बाजूस भ्रमण करीत (पृश्निः आ अक्रमीत्) आक्रमण करीत आहे. [१]

(अस्य रोचना) याची ज्योति (प्राणात् अपानतः) प्राण आणि अपान करणाऱ्यांच्या (अन्तः चरति) आंत संचार करते आणि ती (महिषः स्वः वि अख्यत्) महान् स्वयं प्रकाशी सूर्यालाच प्रकाशित करते. [२]

(वस्तोः त्रिंशत् धामा) अहोरात्रीचे तीस धाम म्हणजे मुहुर्त (अहः द्युभिः प्रतिविराजति) निश्चयानें याच्या प्रकाशानें प्रकाशित होतात, त्याच्या प्रशंसेसाठीं (वाक् पतंगः आशिश्रियत्) आमची वाणी सूर्याचा आश्रय करते. [३]

चंद्र पृथ्वीच्या चारी बाजूस फिरतो आणि भूमिसहित चंद्र सूर्याच्या चारी बाजूस फिरतो. याप्रकारें भूमिसहित चंद्र सूर्याची प्रदक्षिणा करतो आणि आपल्या मार्गानें आकाशांत संचार करतो.

त्याचे किरण सर्व स्थावर जंगमावर प्रकाशित होतात आणि ते सूर्यप्रकाशाचें महत्त्व व्यक्त करतात.

अहोरात्रीच्या तीस मुहूर्तांत याचा प्रकाश सर्वांत तेजस्वी होतो. म्हणून या सूर्याची प्रशंसा आमच्या वाणीनें करणें योग्य आहे.

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग पांचवा)

मेधाजनन, संगठन आणि विजय

सुभाषितें

कांड १; सूक्त १

१. श्रुतेन संगमेमहि, श्रुतेन मा वि राधिषि- (४) आम्ही सर्व ज्ञानानें युक्त व्हावें. आम्ही ज्ञानाबरोबर कधींहि विरोध करणार नाहीं.

कां. ६; सू. १०८

२. मेधे त्वं नः प्रथमा यज्ञिया असि- (१) तूं आमच्याजवळ प्रथम स्थानीं पूजनीय आहेस.

३. ब्रह्मजूतां ऋषिस्तुतां मेधां देवानां अवसे हुवे- (२) मीं ज्ञान्याकडून सेविली गेलेली आणि ऋषींनीं जिची स्तुति केली आहे, अशा मेधाबुद्धीला इन्द्रियांच्या रक्षणासाठीं प्रार्थना करतों.

कां. ७; सू. ६१

४. तपसा श्रुतस्य प्रियाः आयुष्मन्तः सुमेधसः भूयास्म- (१) तपश्चर्येनें आम्हीं ज्ञानप्रिय, दीर्घायु आणि उत्तम बुद्धिशाली होऊं.

कां. २; सू. १२

५. यः अस्माकं इदं मनः हिनस्ति, सः दुरिते पाशे बद्धः नियुज्यताम्- (२) जो हें आमचें मन बिघडवितो, त्यास पापाच्या पाशांनीं बांधून नियमबद्ध ठेवण्यात यावें.

६. यः अस्माकं इदं मनः हिनस्ति, तं वृक्षं कुलिशेन इव, वृश्चामि- (३) जो हें आमचें मन बिघडवितो, त्याला झाडास कुऱ्हाडीनें कापण्याप्रमाणें, मीं कापून टाकतों.

७. अपकामस्य कर्ता पापं आ ऋच्छतु- (५) अनिष्ट कार्य करणारा पापास प्राप्त होवो.

कां. ६; सू. ६३

८. यत् अविमोक्यं दाम ते ग्रीवासु आबबन्ध, ते आयुषे बलाय वर्चसे वि स्यामि- (१) जें सहज न सुटणारें बंधन तुझ्या गळ्यांत बांधलें आहे, ते तुझें आयुष्य, शक्ति आणि तेजस्वितेसाठीं मीं सोडून टाकतों.

९. तस्मै यमाय मृत्यवे नमः अस्तु- (२) त्या नियामक मृत्यूला माझा नमस्कार असो.

१०. अग्ने ! अर्यः, सः नः वसूनि आ भर- (४) हे अग्निदेवा ! तूं सर्वांहून श्रेष्ठ आहेस, असा तूं आम्हांस धन प्राप्त करून दे.

कां. ६; सू. ४२

११. धन्वनः ज्यां इव, ते हृदः मन्युं अवतनोमि, यथा संमनसौ भूत्वा सखायौ इव सचावहै- (१) धनुष्यावरून दोरी काढून टाकण्याप्रमाणें तुझ्या हृदयापासून क्रोध दूर करतों, ज्यामुळें एक मनानें युक्त होऊन मित्राप्रमाणें परस्पर मिळून मिसळून राहूं.

१२. ते मन्युं प्रपदेन अभितिष्ठामि, यथा अवशः न अवादिषः- (३) तुझ्या क्रोधाला पायानें दाबून टाकतों, ज्यामुळें तूं पारतंत्र्याच्या गोष्टी करणार नाहींस.

कां. ५; सू. २७

१३. अयं अग्निः देवेषु देवः देवः- (२) हा अग्नि सर्व देवांत मुख्य देव आहे.

१४. तनू-न-पात्, असु-रः, भूरि-पाणिः- (१) हा अग्नि शरीरास न पडूं देणारा, जीवन देणारा आणि अनेक हातांनीं म्हणजे ज्वालांनीं युक्त आहे.

१५. नराशंसः सुकृत् विश्ववारः अग्निः मध्वा यज्ञं प्रेणानः नक्षति- (३) मनुष्यांकडून प्रशंसित झालेला, उत्तम कर्म करणारा, सर्वांकडून स्वीकारलेला हा अग्नि मधुरतेनें यज्ञास प्रेरित करीत जात आहे.

१६. इडा, सरस्वती, भारती, मही तिस्रः देवीः इदं बर्हिः सदन्तां- (९) मातृभाषा, मातृसभ्यता-

संस्कृति आणि पोषण करणारी मातृभूमि या तीन देवी या यज्ञांत येऊन शोभोत.

कां. २; सू. ६

१७. यानि सत्या त्वा वर्धयन्तु- (१) जे सत्यधर्म आहेत, ते सर्व तुला वाढवोत.

१८. ते उपसत्तारः मा रिषन्, यशसः सन्तु, मा अन्ये- (२) हे अग्ने ! तुझे उपासक नष्ट होत नाहींत, ते यशयुक्त होवोत, दुसरे न होवोत.

१९. सपत्नहा अभिमातिजित् स्वे गये जागृहि- (३) वैऱ्यांचा नाश करणारा तसेंच अभिमान्यांना जिंकणारा हा अग्नि स्वतःच्या घरांत नेहमींच जागृत राहतो.

२०. मित्रेण मित्रधा यतस्व- (४) स्वतःच्या मित्रांशीं मित्राच्या रीतीनें व्यवहार केला पाहिजे.

कां. २; सू. ७

२१. देवजाता शपथ-योपनी वीरुत् सर्वान् शपथान् मत् अवैक्षीत्- (१) देवांकडून उत्पन्न केली गेलेली, शापास दूर करणारी औषधि सर्व शापांना माझ्याकडून धुवून टाको.

२२. अरातीः नः मा तारीत्- (४) अनुदार शत्रु आमच्या पुढें न जावो.

कां. १; सू. २२

२३. हरिमा गो-रहितस्य वर्णेन त्वा परि दध्मसि- (१) तुझा पिवळा रंग सूर्य अथवा गाईच्या रंगानें तुला सर्वप्रकारें हृष्टपुष्ट करतो.

२४. रोहितैः वर्णैः त्वा दीर्घायुत्वाय परि दध्मसि- (२) लाल सूर्याच्या रंगानें तुला दीर्घायुष्यासाठीं वेढून टाकतों.

कां. ८; सू. ७

२५. सहमानाः औषधीः यत् वः सहः वीर्यं बलं, तेन इमं पुरुषं अस्मात् यक्ष्मात् मुंचत- (५) हे रोगनाशक औषधींनों ! जें तुमचें सामर्थ्य आणि वीर्य व बळ आहे, त्यांनीं या पुरुषाला यक्ष्मारोगापासून वांचवा.

२६. मधोः संभक्ता वीरुत् अमृतस्य भक्षः- (१२) मधानें भरपूर भरलेली ही औषधी अमृताचेंच अन्न आहे.

२७. ताः सहस्रपर्ण्यः मा अंहसः मृत्योः मुंचन्तु- (१३) त्या हजार पानांच्या औषधि मला पापरूपी मृत्युपासून वांचवोत.

२८. वीरुधां वैय्याघ्रः मणिः अभिशस्ति-पाः त्रायमाणः- (१४) औषधींपासून तयार केलेला वाघासारखा प्रतापी मणि विनाशापासून वांचविणारा संरक्षक आहे.

२९. अश्वत्थः दर्भः सोमः हविः अमृतं व्रीहिः यवः अमर्त्यौ भेषजौ- (२०) पिंपळ, दर्भ, सोम, अन्न, पाणी, तांदूळ व जव अमर औषधि आहेत.

३०. तस्य अमृतस्य इमं बलं इमं पुरुषं पाययामसि, यथा शतहायनः असत्- (२२) त्या अमृताची ही शक्ति या पुरुषाला पाजतों, ज्यामुळें तो शतायु होईल.

३१. पुष्पवतीः फलिनीः अस्मै अरिष्टतातये संमातरः इव दुह्राम्- (२७) फुलें आणि फळानें युक्त या औषधि याच्या सुखशांतीसाठीं उत्तम मातेप्रमाणें रसप्रदान करोत.

कां. २; सू. २५

३२. पृश्निपर्णी हि उग्रा कण्व जम्भनी- (१) पृश्निपर्णी औषधि प्रचंड रोगबीज नाशक आहे.

कां. ७; सू. ६५

३३. यत् दुष्कृतं यत् शमलं यत् वा पापया चेरिम, त्वया तत् अप मृज्महे- (२) जो दोष व कलंक मीं केला किंवा पाप्यांशीं व्यवहार केल्यानें माझ्याकडून आचरला गेला असेल, तो तुझ्या सहाय्यानें आम्हीं दूर करतों.

कां. ४; सू. १७

३४. या शपनेन शशाप, या मूरं अघं आदधे- (३) जो ओरडून दुष्ट शब्द बोलतो, जो मूर्खत्व पदरीं आणणारें पाप धारण करतो, त्याला आम्हीं या औषधीनें निष्पाप बनवितों.

३५. दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं अस्मत् नाशयामसि- (५) वाईट स्वप्न पडणें, दुःखदायक जीवन जगावें लागणें हें आमच्यापासून नाश पावोत.

३६. क्षुधामारं तृष्णामारं अ-गो-तां, अन्-अपत्यतां अप मृज्महे- (६) भूकेनें तहानेनें मरणें, इंद्रियाचे अथवा वाणीचे दोष, संतति न होणें अथवा नपुंसकता हे सर्व दोष अपामार्गानें आम्हीं दूर करतों.

कां. ४; सू १८

३७. अनया ओषध्या सर्वाः कृत्याः अदूदुषम्- (५) या औषधीनें सर्व दुष्ट कृत्यांचा मी नाश करतों.

कां. ४; सू. १९

३८. नारू-सदेन कण्वेन परि उक्ता आसि- (२) मनुष्यांच्या परिषदेंत बसणाऱ्या विद्वान् ब्राह्मणांनीं या अपामार्ग औषधीचें वर्णन केलें आहे.

३९. यत्र प्राप्नोषि, तत्र भयं न अस्ति- (३) जेथें ही औषधि प्राप्त होते, तेथें कोणतें ही भय रहात नाहीं.

कां. ६; सू. १०९

४०. पिप्पली क्षिप्तभेषजी, उत अतिविद्धभेषजी, इयं जीवितवै अलम्- (१) पिंपळी ही औषधि उन्माद रोगासाठीं आणि महाव्याधीवर सुद्धां औषधि आहे, ही औषधि जीवनासाठीं पुरेशी आहे.

४१. यं जीवं अश्नवामहै सः पुरुषः न रिष्याति- (२) जो या पिंपळीचें भक्षण करतो, तो पुरुष मरत नाहीं.

कां. ४; सू. १२

४२. छिन्नस्य अस्थ्नः रोहणी- (१) ही रोहिणी औषधि तुटलेल्या अस्थींस जोडणारी आहे.

कां. ५; सू. ४

४३. सुपर्ण सुवने गिरौ हिमवतः परिजातः वीरुधां बलवत्तमः- (२) जेथें गरुड पक्षी राहतात अशा हिमालयाच्या शिखरावर जी उत्पन्न होते, ती कुष्ठ औषधि सर्व औषधींमध्यें जास्त बळ देणारी आहे.

४४. देवेभ्यः अधिजातः सोमस्य सखा- (७) ही औषधि देवांपासून उत्पन्न झाली आहे व विद्वानांची मैत्रिण आहे.

कां. ५; सू. ५

४५. यः त्वा पिबति जीवति- (२) जो लाक्षा औषधीचें पान करतो, तो जिवंत राहतो.

कां. ६; सू. ५२

४६. विश्वदृष्टः आदित्यः अदृष्टहा सूर्यः- (१) सर्वांना पाहणारा, सर्वांस आदान करणारा आणि अदृष्ट दोषांचा नाश करणारा हा सूर्य आहे.

कां. २; सू. ४

४७. दीर्घायुत्वाय बृहते रणाय वयं बिभृमः- (१) दीर्घायुष्य प्राप्तिसाठीं तसेंच मोठ्या आनंदासाठीं आम्हीं या मणीला धारण करतों.

४८. जंगिडः मणिः जम्भारात् शरात् स्कंधात् शोचनात् परिपातु- (२) हा जंगिडमणि जांभया रोगापासून, शरीर क्षीण करणाऱ्या रोगापासून, शरीरास शुष्क करणाऱ्या शोषक रोगापासून सर्वांचें रक्षण करतो.

४९. सहस्वान् जंगिडः नः आयूंषि तारिषत्- (६) हा बलवान् जंगिड मणि आमचें आयुष्य वाढवो.

५०. वर्चसे, बलाय आयुषे दीर्घायुत्वाय शतशारदाय बध्नामि- (७) मी या मणीला तेज, बल, आयुष्य, जीवन व शंभर वर्षांचें पूर्ण आयुष्य प्राप्त होण्यासाठीं बांधतों.

कां. ८; सू. ५

५१ जगतां अनड्वान् इव, श्वापदां व्याघ्रः इव औषधीनां उत्तमः असि- (११) गतिशील प्राण्यांत बैलाप्रमाणें, श्वापदामध्यें वाघाप्रमाणें ही औषधि उत्तम आहे.

५२. अयं प्रतिसरो वीराय बध्यते- (१) हा शत्रूवर आक्रमण करणारा मणि, वीर्ययुक्त वीर मणि वीर पुरुषाला बांधण्यांत येतो.

५३. य इमं मणिं बिभर्ति, स व्याघ्रः भवति, अथो सिंहः अथो वृषः अथो सपत्नकर्शनः- (१२) जो हा मणि धारण करतो तो खरोखर वाघासारखा होतो. अथवा सिंहासारखा, बैलासारखा व शत्रुचें दमन करणारा होतो.

५४. नः अधरात्, उत्तरात्, पश्चात् असपत्नं ज्योतिः पुरः कृधि- (१७) आमच्या खालून, वरून व मागून अविरोध प्रकाश आमच्यासमोर दाखव.

५५. तत् उग्रः बहुलं ऐन्द्राग्नं बृहत् वर्म मे तन्वं सर्वतः आयतां, यथा जरदष्टिः आयुष्मान् असानि – (१९) ते मोठें इन्द्र आणि अग्नीचें मोठें कवच माझ्या शरीराचें सर्व बाजूनीं रक्षण करो, म्हणजे मी वृद्धावस्थेंमध्यें सुद्धां कार्य करण्यास दीर्घायु होईन.

कां. ११; सू. ८

५६. देवेभ्यः दश देवाः साकमजायन्त, यो वै तान् प्रत्यक्षं विद्यात्, स वै अद्य महत् वदेत्- (३) देवांपैकीं दहा देव एकाच वेळीं जमले, जो निश्चयें करून त्यांना प्रत्यक्ष जाणतो, तोच निश्चयें करून महान् ब्रह्माचें ज्ञान सांगूं शकतो.

५७. तप कर्म एव च महति अर्णवे आस्ताम्- (६) तप आणि कर्म मोठ्या संसाररूपी समुद्रांत होते.

५८. कर्मणः ह तपः जज्ञे- (६) कर्मांपासून तप उत्पन्न झालें.

५९. **ते तत् ज्येष्ठं उपासते-** (६) तप आणि कर्म करणारे सर्व त्या श्रेष्ठ ब्रह्माची उपासना करतात.

६०. **ते देवा संसिचः नाम-** (१३) ते देव 'संसिच्' म्हणजे सिंचन करणारे या नांवाचे आहेत.

६१. **सर्वं मर्त्यं संसिच्य देवाः आविशन्-** (१३) सर्व मरणधर्माने युक्त अशा शरीरांत सिंचन करून हे देव पुनः पुरुषांत प्रविष्ट झाले.

६२. **सर्वे देवाः उपाशिक्षन्, तत् सती वधूः अजानात्-** (१६) जो सर्व देवांनीं उपदेश दिला, तो सती वधूनें म्हणजे बुद्धीनें ग्रहण केला.

६३. **या वशस्य ईशा जाया, सा अस्मिन् वर्ण आभरत्-** (१७) जी सर्वांस ताब्यांत ठेवणारी ईश-शक्ति नांवाची पत्नी आहे, तिने या शरीरांत रंग भरला,

६४. **त्वष्टा यदा व्यतृणत्, मर्त्यं गृहं कृत्वा देवाः पुरुषं आविशन्-** (१८) त्वष्टानें जेव्हां या शरीरांत छिद्रें केलीं, तेव्हां मरण धर्मयुक्त घर करून देवांनीं पुरुष शरीरांत प्रवेश केला.

६५. **ऋचः साम अथो यजु ब्रह्म शरीरं प्राविशत्-** (२३) ऋग्वेद, सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद आणि ब्रह्मवेद यांनीं शरीरांत प्रवेश केला.

६६. **अस्थि कृत्वा समिधं तुष्ट आपः असादयन्-** (२९) त्या हाडांच्या समिधा करून आठ प्रकारच्या पाण्यानें सर्व शरीराची रचना केली आहे.

६७. **रेतः आज्यं कृत्वा देवाः पुरुषं आविशन्-** (२९) वीर्याचें तूप करून सर्व देवांनीं पुरुषांत प्रवेश केला.

६८. **आपः देवताः विराट् ब्रह्मणा सह ब्रह्म शरीरं प्राविशत्-** (३०) पाणी, देवता आणि ब्रह्मासह विराट् यांच्याबरोबर ब्रह्मानें शरीरांत प्रवेश केला.

६९. **पुरुषस्य चक्षुः सूर्यः प्राणं वातः विभेजिरे-** (३१) पुरुषाची दृष्टि सूर्य आणि प्राण वायु आहे.

७०. **तस्माद्वै विद्वान् पुरुषं इदं ब्रह्म इति मन्यते-** (३२) त्यामुळें खात्रीनें ज्ञानी विद्वान् पुरुषाला हें ब्रह्म नांव आहे.

७१. **सर्वाः देवताः अस्मिन्, गावः गोष्ठे इव, आसते-** (३२) सर्व देव या शरीरांत, ज्याप्रमाणें सर्व गायी गोशाळेंत रहातात, त्याप्रमाणेंच रहातात.

कां. ४; सू. ९

७२. **पर्वतस्य जीवं त्रायमाणं अक्ष्यं जीवनाय कम्-** (१) हें पर्वतापासून उत्पन्न होणारें अंजन, जीवाचें रक्षण करणारें, डोळ्यांस लाभदायक आणि जीवनासाठीं सुखकारक आहे.

७३. **पुरुषाणां गवां परिपाणं-** (२) हें अंजन पुरुषाचें आणि गाईचें रक्षक आहे.

७४. **यः त्वा बिभर्ति, एनं शपथः, कृत्या, अभिशोचनं न अश्नुते-** (५) जो या अंजनाला धारण करतो, त्याला दुष्ट भाषण, हिंसक कर्म आणि शोक प्राप्त होत नाहींत.

७५. **तस्मात् घोरात् चक्षुषः नः पाहि-** (६) हे अंजना ! या भयंकर नेत्रविकारापासून आमचें रक्षण कर.

कां. ७; सू. २९

७६. **अग्नाविष्णू ! दमे दमे रत्ना दधानौ-** (१) हे अग्नि आणि विष्णु हो ! तुम्हीं प्रत्येक घरांत सात रत्नें धारण करता.

कां. ११; सू. ५

७७. **ब्रह्मचारी उभे रोदसी चरति, दिवं पृथिवीं दाधार-** (१) ब्रह्मचारी पृथ्वी आणि द्युलोक या दोन्हींमध्यें जातो आणि पृथ्वी व द्युलोक यांस धारण करतो.

७८. **तस्मिन् सर्वे सम्मनसः भवन्ति-** (२) त्या ब्रह्मचार्यांत सर्व देव अनुकूल मनानें राहतात.

७९. **सः सर्वान् देवान् तपसा पिपर्ति-** (२) तो ब्रह्मचारी सर्व देवांचें स्वतःच्या तप सामर्थ्यानें पालन करतो.

८०. **घर्मं वसानः उत् अतिष्ठत्-** (५) तो ब्रह्मचारी उष्णता धारण करीत तपानें उन्नत होतो.

८१. **ब्राह्मणं ज्येष्ठं ब्रह्म जातं-** (५) त्याच्याकडून ब्रह्मविषयीं श्रेष्ठ ज्ञान प्रसिद्ध होतें.

८२. **लोकान् संगृभ्य पूर्वस्मात् उत्तरं समुद्रं सद्यः एति-** (६) तो लोकांस एकत्र करून पूर्वेपासून उत्तर समुद्रापर्यन्त भ्रमण करतो.

८३. **ब्रह्मः अपः लोकं प्रजापतिं विराजं परमेष्ठिनं जनयन्-** (७) तोच ज्ञान, कर्म, जनता, प्रजापालक, राजा आणि विशेष तेजस्वी परमेष्ठी परमात्म्याला प्रकट करतो.

८४. **ब्राह्मणस्य गुहा निधी निहितौ, तौ तपसा रक्षति-** (११) ज्ञान्याच्या बुद्धींत दोन खजिने ठेवले आहेत, त्या खजिन्यांचें रक्षण ब्रह्मचारी स्वतःच्या तपानें करतो.

८५. **ब्रह्मचर्येण तपसा राजा राष्ट्रं वि रक्षति**– (१८) ब्रह्मचर्यरूपी तपश्चर्येनें राजा राष्ट्राचें संरक्षण करतो.

८६. **ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युं अपाघ्नत**– (१९) ब्रह्मचर्यरूपी तपानें देवांनीं मृत्यु दूर केला.

८७. **ब्रह्मचारिणि आभृतं ज्ञानं सर्वान् रक्षति**– (२२) ब्रह्मचार्यामध्यें राहिलेलें ज्ञान सर्वांचें रक्षण करतें.

८८. **सलिलस्य पृष्ठे तप्यमानः स्नातः बभ्रुः पिंगलः**– (२६) ज्ञान समुद्रांत तप्त होणारा हा ब्रह्मचारी स्नातक होऊन अत्यन्त तेजस्वी असल्यामुळें पृथ्वीवर फार चमकतो.

कां. ११; सू. १

८९. **इयं नाथिता आदितिः पुत्रकामा ब्रह्मौदनं पचाति**– ही प्रार्थना करणारी अदीन माता पुत्रांची इच्छा करीत ज्ञान वाढविणारें अन्न शिजवित आहे.

९०. **सं इध्यस्व, यज्ञियान् देवान् आवक्षः, उत्तमं नाकं अधिरोहय**– (४) यज्ञ कर, पूज्य देवांना बोलव आणि उत्तम स्वर्गास प्राप्त कर.

९१. **पयसा सजातैःसाकं एधि**– (७) तूं दुधानें स्वजातीयांसह उन्नत हो.

९२. **इयं देवी सुमनस्यमाना चर्म प्रति गृह्णातु**– (८) ही देवी शुभ विचारांनीं युक्त होऊन चामड्याची ढाल स्वतःच्या रक्षणासाठीं घेवो.

९३. **ये इमां पृतन्यवः निजहि**– (९) जे या स्त्रीवर हल्ला करतात त्यांचा नाश कर.

९४. **यतमाः याज्ञियाः असन् गृह्णीतात्, धीरी इतराः जहीतात्**– (१३) जे पूजनीय व यज्ञासाठीं योग्य ज्ञानी आहेत, त्यांना स्वीकार आणि बुद्धिनें मूर्ख व अपूजनीयांना दूर करून त्यांचा त्याग कर.

९५. **अयं यज्ञः गातुवित्, नाथवित्, प्रजावित्, उग्रः पशुवित्**– (१५) हा यज्ञ मार्गदर्शक, ऐश्वर्यवर्धक, प्रजा देणारा, उग्रता देणारा आणि पशु देणारा आहे.

९६. **ओदनस्य पक्ता सुकृतां लोकं एतु**– (१७) अन्नास शिजविणारा पुण्य लोकांस प्राप्त होतो.

९७. **ब्रह्मणा शुद्धाः उत घृतेन पूताः तण्डुलाः, पक्त्वा सुकृतां लोकं एत**– (१८) ज्ञानानें पवित्र झालेले तांदूळ आहेत, यांना शिजविण्यानें मनुष्य पुण्यवंत लोकांत जातो.

९८. **सोमेन पूतं प्राशितारः मा रिषन्**– (२५) सोमानें पवित्र झालेल्या अन्नाचे प्राशन करणारे दुःखी होत नाहींत.

कां. १२; सू. ३

९९. **पुंसः पुत्रान् अधितिष्ठ**– (१) मनुष्यांत वीर्यवान् असा तू इतरांचा अधिष्ठाता होऊन रहा.

१००. **अस्मिन् लोके सं एतं**– (३) या लोकांत मिळून मिसळून रहा.

१०१. **ब्राह्मणेन द्यौः, पृथिवी, अन्तरिक्षं त्रयः लोकाः संमिताः**– (१९) ब्राह्मणाच्या ज्ञानानें द्यु, अन्तरिक्ष, पृथ्वी हे तीनही लोक प्राप्त होतात.

१०२. **निधिपाः षष्ट्यां शरत्सु पक्वेन अश्नवाते स्व अभीच्छात्**– (३४) अन्नाचा पालक, दाता साठ वर्षांत शिजविलेल्या अन्नाच्या दानानें स्वर्गप्राप्तीची इच्छा करावी.

१०३. **यत् विदेवं रक्षः अग्निः तपतु**– (४३) जे ईश्वर विरोधी राक्षस आहेत, त्यांना अग्नि तापवो.

१०४. **क्रव्यात् पिशाचः इह मा प्रपास्त**– (४३) रक्त मांस भक्षक लोक येथें पाणी सुद्धां न घेवोत.

कां. ११; सू. ३

१०५. **यत् ओदनः एतत् वै ब्रध्नस्य विष्टपं**– (५०) जें अन्न आहे, तें खरोखर स्वर्गधाम आहे.

१०६. **तेषां प्रज्ञानाय यज्ञं असृजत्**– (५३) त्यांच्या ज्ञानासाठीं यज्ञ निर्माण केला.

१०७. **सः यः एवं उपद्रष्टा भवति, जरसः पुरा एनं प्राणः जहाति**– (५६) तो जो हें जाणणाऱ्याचा निंदक असतो, वृद्धावस्था प्राप्त होण्यापूर्वीच त्याचे प्राण त्याला सोडून जातात.

१०८. **तृष्टा तृष्टिका विषातकी**– (१) तृष्णा लोभमयी आणि विषानें युक्त आहे.

कां. ७; सू. ८०

१०९. **पौर्णमासं अक्षितां अनु उपदस्वतीं रयिं ददातु**– (२) पौर्णमासाचें हवन अक्षय आणि अविनाशी धन देतें.

११०. **प्रजापते ! त्वत् अन्यः एतानि विश्वा रूपाणि परिभूः न जजान**– (३) हे प्रजापते ! तुझ्याशिवाय दुसरा या सर्व रूपांत सर्वत्र व्यापून त्यांस कोणी निर्माण करूं शकत नाहीं.

१११. यत् कामाः ते जुहुमः, तत् नः अस्तु- (३) ज्याची इच्छा करीत आम्हीं तुम्हें यजन करतों, ते आम्हांस प्राप्त होवोत.

११२. वयं रयीणां पतयः स्याम- (३) आम्हीं सर्व धनांचे स्वामी व्हावें.

कां. ७; सू. २०

११३. इमं सुजातं यज्ञं अस्याः प्रमतिः भद्रा बभूव- (५) या प्रसिद्ध सत्कर्माला करणाऱ्याची श्रेष्ठ बुद्धि कल्याण करणारी झाली आहे.

११४. अनुमतिः विश्वं पजाति- (६) अनुमति सर्वांस चालवत आहे.

कां. ३; सू. २४

११५. शतहस्त समाहर, सहस्रहस्त सं किर- (५) हे शंभर हाताच्या मनुष्या ! तूं धन संग्रह कर आणि हजार हातांनीं दान कर.

कां. २; सू. १३

११६. नः इमं वर्चसा धत्त, दीर्घं आयुः जरा-मृत्युं कृणुत- (२) आमच्या या पुरुषाला तेजानें युक्त कर, याचें दीर्घायुष्य कर तसेंच त्याला वृद्धावस्थेनंतर मृत्यु येवो.

११७. ते तनूः अश्मा भवतु, विश्वे देवाः ते आयुः शरदः शतं कृणवन्तु- (४) तुझें शरीर दगडाप्रमाणें सुदृढ होवो. सर्व देव तुझें आयुष्य शंभर वर्षांचें करोत.

कां. ६; सू. १८

११८. ते ईर्ष्यायाः शोकं अग्निं निर्वापयामसि- (१) तुझ्या ईर्ष्येच्या त्या शोकरूपी अग्निला आम्हीं दूर करतों.

कां. ११; सू. १०

११९. केतुभिः सह उत्तिष्ठत, अमित्रान् अनु-धावत- (१) हे सैनिकांनो ! स्वतःचे ध्वज हातांत घेऊन उठा व शत्रूंवर हल्ला करा.

१२०. तत्र रुदिते पुरुषे हते विकेशी, अश्रुमुखी, प्रतिघ्नाना क्रोशतु- (७) हे शत्रूचा नाश करणाऱ्या वीरा ! तुझा हल्ला झाला असतां शत्रूचे वीर मेल्यामुळें त्यांच्या स्त्रिया केंस मोकळे सोडून अश्रूंनीं मुख भरून जाऊन रडत, छाती बडवीत मोठा आक्रोश करोत.

१२१. देवजनाः ! उत्तिष्ठत, इमं संग्रामं संजित्य यथालोकं वितिष्ठध्वं- (२६) हे देवजन हो ! उठा, तयार व्हा, या युद्धांत उत्तमप्रकारें जय प्राप्त करून स्वतःच्या देशांत जाऊन सुखी व्हा.

कां. १; सू. ३४

१२२. मे जिह्वायाः अग्रे मधु, जिह्वामूले मधूलकं- (२) माझ्या जिभेच्या टोंकावर मधुरता राहो, माझ्या जिभेच्या मुळाशीं सुद्धां मधुरता असो.

१२३. मम क्रतौ इत्- (२) माझ्या कर्मांतही मधुरता असो.

१२४. मे निक्रमणं, परायणं मधुमत्- (३) माझें वर्तन आणि दूर जाणें सुद्धां मधुर असो.

१२५. मधुसन्दृशः भूयासं- (३) मीं मधुरतेची मूर्तिच होऊन रहावें.

कां. १; सू. १५

१२६. प्र दिवः मे इमं यज्ञं जुषन्तां, संस्राव्येना हविषा जुहोमि- (१) उत्तम दिव्यजन या माझ्या यज्ञाचें सेवन करोत, कारण की मीं संगठनाच्या समर्पणानें दान करीत आहें.

कां. ६; सू. ९४

१२७. वः मनांसि व्रता सं- (१) तुमचीं मनें व कार्यें एक विचारानें होवोत.

कां. ६; सू. ६४

१२८. मंत्रः समानः समितिः समानी, व्रतं समानं, समानं चेतः- (२) तुमचे विचार, तुमची सभा, तुमचीं व्रतें, तुमचीं मनें समान होवोत.

१२९. वः आकूतिः समानी, वः हृदयानि समाना- (३) तुमचा संकल्प एक असो, तुमचीं हृदयें समान असोत.

कां. ३; सू. ३०

१३०. वः सहृदयं सांमनस्यं अविद्वेषं कृणोमि- (१) तुमच्यासाठीं मीं सहृदयता, शुभ विचारांनीं युक्त मन व परस्पर निर्वैरता करतों.

१३१. अन्यः अन्यं अभि हर्यत- (१) प्रत्येकजण एकमेकांवर प्रेम करा.

१३२. **पुत्रः पितुः अनुव्रतः मात्रा सं मनाः भवतु-** (२) पुत्र पित्यास अनुकूल कर्म करणारा आणि मातेशीं उत्तम मनानें रहाणारा होवो.

१३३. **जाया पत्ये मधुमतीं शान्तिवां वाचं वदतु-** (२) पत्नी पतीशीं मधुर आणि शांतीयुक्त भाषण करो.

१३४. **भ्राता भ्रातरं स्वसा स्वसारं मा द्विक्षत्-** (३) भाऊ भावाशीं आणि बहिण बहिणीशीं परस्पर द्वेष न करोत.

१३५. **सम्यं च सव्रताः भूत्वा भद्रया वाचं वदत-** (३) एकमताचे आणि एक कर्म करणारे, होऊन उत्तम रीतिनें भाषण करा.

१३६. **वः प्रपा अन्नभागः सह-** (६) तुमची पाणी पिण्याची जागा व तुमच्या अन्नाचा भाग एक असो.

कां. ५; सू. १२

१३७. **इडा मनुष्यवत् यज्ञं चेतन्ती इह-** (८) मातृभाषा मनुष्यांशीं मिळून यज्ञाची प्रेरणा देत येथें येवो.

१३८. **सरस्वतीः सु अपसः आ सदन्तां-** (८) मातृसभ्यता उत्तम कर्म करणाऱ्यांना जवळ करो.

कां. ४; सू. ३४

१३९. **पवनेन शुद्धाः पूताः शुचयः शुचिं लोकं यन्ति-** (२) प्राणायामानें शुद्ध आणि पवित्र झालेले लोक शुद्ध लोकांस प्राप्त होतात.

१४०. **ये विष्टारिणं ओदनं पचन्ति एनान् कदाचन अवर्तिः न सचते-** (३) जे या विस्तार करणाऱ्या अन्नाला शिजवितात, त्यांस कधींच दारिद्र्य प्राप्त होत नाहीं.

१४१. **एष यज्ञानां बहिष्ठः विततः-** (५) हा अन्नदानाचा यज्ञ सर्व यज्ञांत श्रेष्ठ आणि विस्तृत आहे.

१४२. **स्वर्गे लोके मधुमत् पिन्वमानाः समन्ताः पुष्करिणीः-** (५) जो अन्नदानाचा यज्ञ करतो त्याच्याजवळ स्वर्गलोकांत मधुर रस देणाऱ्या सर्व नद्या येऊन मिळतात.

कां. ६; सू. ११४

१४३. **देवासः वयं देवाः यत् देवहेडनं चकृम, यूयं तस्मात् नः ऋतस्य ऋतेन मुंचत-** (१) हे देव हो ! आम्हीं स्वतः दैवीशक्तिनें युक्त होऊन जो देवाचा अनादर करतो, तुम्हीं सर्व त्याच्यापासून आम्हांस यज्ञाच्या सत्यानें सोडवा.

१४४. **यज्ञं शिक्षन्तः न उपशेकिम, न ऋतेन ऋतस्य मुंचत-** (२) जर आम्हीं यज्ञाचें शिक्षण प्राप्त करूनहि यज्ञ करावा तसा करूं शकलों नाहीं, तर आम्हांस यज्ञाच्या सत्य परिणामांतून मुक्त करा.

कां. ६; सू. ५

१४५. **हे अग्ने ! एनं उत्तरं उन्नय, वर्चसा संसृज, प्रजया च बहुं कृधि-** (१) हे यज्ञाच्या अग्ने ! या मनुष्याला अधिक उच्च कर, तेजानें संयुक्त कर आणि प्रजेनें समृद्ध कर.

१४६. **सजातानां वशी असत्-** (२) हा यज्ञ करणारा स्वजातियां मधील सर्वांना वश करणारा होवो.

कां. ३; सू. १७

१४७. **देवेषु धीराः कवयः सुम्नयौ सीरा युंजन्ति-** (१) देवांवर विश्वास ठेवणारे कवि सुख प्राप्त करण्यासाठीं नांगर जोडतात.

कां. ७; सू. १०

१४८. **यः ते शशयुः, मयोभूः सुम्नयुः, सुहवः, सुदत्रः, स्तनः येन विश्वा पुष्यसि वार्याणि तं इह धातवे कः-** (१) हे सरस्वते ! जो तुझा शांति देणारा, सुख देणारा, शुभ मन देणारा, प्रार्थनीय आणि उत्तम पुष्टि देणारा स्तन आहे, ज्यामुळें तूं सर्व वरणीय पदार्थांस पुष्ट करतेस, त्याला येथें आमच्या पुष्टिसाठीं आमच्याकडे आण.

कां. ६, सू. १२४

१४९. **अभ्यंजनं, सुरभिः, हिरण्यं, वर्चः सा समृद्धिः-** (३) तेलाचें मर्दन, सुगंध, सोनें, शरीराचें तेज ही सर्व समृद्धि आहे.

मेधाजनन, संगठन आणि विजय

उपमासूची

पृष्ठ

ऱ्या मातेकडे जातात, त्याप्रमाणें तो हिंसकविधि त्याच्या जवळच परत फिरो. ४१

१८. **कृत्याकृतः प्रजां वार्षिकं नडं इव छिन्धि-** (४।१९।१) हिंसा कर्म करणाऱ्या संततीला पावसामुळें उत्पन्न होणाऱ्या गवताप्रमाणें दूर कर. ४१

१९. **त्विषीमती सेना इव एषि-** (४।१९।२) हे औषधि! तूं तेजस्वी लष्कराप्रमाणें रोगरूपी शत्रूवर हल्ला करतेस. ४३

२०. **ज्योतिषा इव ओषधीनां अग्रे एषि-** (४।१९।३) तेजाप्रमाणें इतर सर्व औषधींच्या पुढें जातेस. ४३

२१. **ऋभुः रथस्य अंगानि इव परुषाः परुः संदधत्-** (४।१२।७) सुतार ज्याप्रमाणें रथाचे भाग जोडतो, त्याप्रमाणें सांधे सांध्याशीं पूर्ववत् जुळून जावोत. ४९

२२. **वृषण्यन्ती कन्यला इव वृक्षं वृक्षं आरोहसि-** (५।५।३) पुरुष इच्छिणाऱ्या कन्येप्रमाणें प्रत्येक वृक्षावर तूं चढतेस. ५३

२३. **जगतां अनड्वान् इव, श्वापदां व्याघ्रः इव औषधीनां उत्तमः असि-** (८।५।११) गतिशील प्राण्यांत बैलाप्रमाणें आणि श्वापदांमध्यें वाघाप्रमाणें औषधिमध्यें तू श्रेष्ठ आहेस. ७४

२४. **सर्वाः अस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते-** (११।८।३२) ज्याप्रमाणें सर्व गायी गोशाळेंत रहातात, त्याप्रमाणें सर्व देवता या शरीरांत वास्तव्य करतात. ८१

२५. **मलगः वस्त्रा इव ग्रावा शुम्भाति-** (१२।३।२१) ज्याप्रमाणें धोबी वस्त्रांस शुद्ध करतो, तसेंच धुण्याचे दगड तो शुद्ध करतो.

२६. **जनित्री सूनुं इव त्वा प्रति हर्यासि-** (१२।३।२८) माता ज्याप्रमाणें स्वतःच्या पुत्रास घेते, तसेंच तुजवर प्रेम करते. १३१

२७. **योषा पतिं दृष्ट्वा ऋत्वियाय संभवति, एतैः तण्डुलैः संभवतः-** (१२।३।२९) ज्याप्रमाणें उत्सुक स्त्री पतीला पाहून ऋतुकर्मासाठीं एकत्र येते, त्याप्रमाणें या तान्दुळाशीं हें पाणी मिळून जावो. १३१

२८. **स्तनस्युं तरुणं वाश्रा उस्रा इव अभि हिंकृणोत-** (१२।३।३७) स्तन पिणाऱ्या वासरावर गाय जशी प्रेम करते-इच्छिते, तसेंच देव या हवीला प्रसन्नतेच्या शब्दानें स्वीकार करोत. १३३

२९. **श्रान्तसदौ गावौ इव, कूजन्तौ कुर्कुरौ इव उत अयन्तौ वृकौ इव अहं एनौ अतिक्षिपं-** (७।९५।२) थकलेल्या गाई अथवा बैलाप्रमाणें, भुंकणाऱ्या कुत्र्याप्रमाणें, हल्ला करणाऱ्या लांडग्याप्रमाणें मी त्या दोघांस ओलांडून जातों. १५२

३०. **ऋषभस्य वशा इव परिवृक्ता असि-** (७।११३।२) बैलासाठीं जशी गाय असते, तसेंच हे तृणे! तूं धरण्यालायक आहेस. १५५

३१. **वृष्टेः नदीः शापं इव, इह स्फातिं समावहान्-** (३।२४।३) ज्याप्रमाणें पाऊस पडल्यामुळें नद्या कांठावरचें सर्व कांहीं ओढून आणतात, त्याप्रमाणें माणसांच्या पांच जाती येथें वृद्धीस प्राप्त करोत. १६१

३२. **पुत्र इव पितरं गच्छ-** (५।१४।१०) हे घातक प्रयोगा! ज्याप्रमाणें पुत्र पित्याजवळ जातो, त्याप्रमाणें तूं प्रयोग करणाऱ्या जवळ परत जा. १७०

३३. **स्वज इव अभिष्ठितः दश-** (५।१४।१०) वेंटाळून टांकणाऱ्या सापाप्रमाणें घात करणाऱ्यास चाव. १७०

३४. **बन्ध इव अवक्रामी-** (५।१४।१०) बंधनाजवळ जाण्याप्रमाणें जा. १७०

३५. **वारणी एनी इव कर्त्तारं कृत्या उद् ऋच्छतु-** (५।१४।११) ज्याप्रमाणें हत्तीण हरणीवर हमला करते, त्याप्रमाणें घातकप्रयोग करणाऱ्याकडे घातक प्रयोग परत जावोत. १७०

३६. **मृगः इव तं कृत्याकृतं गृह्णातु-** (५।१४।१२) ज्याप्रमाणें पारधी हरिणाला पकडतो, त्याप्रमाणें घातकप्रयोग करणाऱ्यासच पकडो. १७०

३७. **अग्निः इव प्रतिकूलं उदकं इव अनुकूलं एतु-** (५।१४।१३) अग्निप्रमाणें प्रतिकूलतेनें आणि पाण्याप्रमाणें अनुकूलतेनें तो घातकप्रयोग चलो. १७०

३८. **सुखः रथः इव कृत्याकृतं पुनः वर्तताम्-** (५।१४।१३) सुखकारक रथाप्रमाणें घातकप्रयोग करणाराकडेच परत फिरोत. १७०

पृष्ठ

३९. पिता पुत्रान् इव, अग्ने ! इयं अभिरक्षतात्– (२।१३।१) पिता ज्याप्रमाणें पुत्राचें रक्षण करतो, तसा हे अग्ने ! तूं याचें चारी बाजूंनी रक्षण कर. १७१

४०. ते तनूः अश्मा भवतु– (२।१३।४) तुझें शरीर दगडाप्रमाणें दृढ होवो. १७१

४१. पत्या नुत्ता जाया कर्तारं बन्धुं इव कर्त्तारं ऋच्छतु– (१०।१।३) पतीनें सोडलेली स्त्री ज्याप्रमाणें पित्याजवळ अथवा भावाजवळ जाते, तद्वत् कृत्या प्रयोग करणाऱ्याकडे परत जावो. १७५

४२. ऋभुः धिया रथस्य परूंषि संदधौ– (१०।१।८) ज्याप्रमाणें सुतार स्वतःच्या बुद्धीनें रथाचे निरनिराळे भाग तयार करतो, तसेच मीं तुझे अवयव निर्माण करतों. १७६

४३. विनद्धा गर्दभी इव नानदती अप, क्राम– (१०।१।१४) हे कृत्ये ! बंधनातून सुटलेल्या गाढवीप्रमाणें शब्द करीत दूर निघून जा. १७६

४४. अनस्वती विश्वरूपा कुरूटिनी वाहिनी इव अभि याहि– (१०।१।१५) रथयुक्त अनेक रूपाचे भयंकर शब्द करीत ज्याप्रमाणें सेना जाते, तद्वत् हे कृत्ये ! तूं ही पुढें जा. १७७

४५. वातः वृक्षान् इव कर्तॄन् नि मृणीहि– (१०।१।१७) ज्याप्रमाणें वारा झाडें तोडतो, त्याप्रमाणें तूं हिंसा करणाऱ्यांचा नाश कर. १७७

४६. तत्र अश्वः इव वर्तताम्– (१०।१।१९) ही कृत्या प्रयोग करणाऱ्यांमध्येंच घोड्याप्रमाणें विचरो. १७८

४७. दुहिता स्वं पितरं इव, कर्त्तारं जानीहि–(१०।१।२५) ज्याप्रमाणें कन्या स्वतःच्या पित्यास जाणते त्याप्रमाणें तूं स्वतःच्या कर्त्यास जाण. १७८

४८. विद्धस्य इव पदं नय– (१०।१।२६) घायाळ झालेल्या जनावराजवळ ज्याप्रमाणें शिकारी जातो, तद्वत हे कृत्ये ! तूं स्वतःच्या स्थानीं पोहोंच. १७८

४९. जालेन अभिहिता इव सर्वाः कृत्याः इतः प्र हिण्मसि– (१०।१।३०) जाळ्यांत गुरफटल्याप्रमाणें तुझ्यासह सर्व घातकप्रयोग परत कर्त्याजवळ पाठवितों. १७९

५०. यथा सूर्यः तमसः परि मुच्यते, रात्रिं उषसः केतून् जहाति, एवं अहं कृत्याकृतां कृतं दुर्भूतं कत्र्रं जहामि– (१०।१।३) ज्याप्रमाणें सूर्य अंधारातून सुटतो, रात्र उषेच्या किरणांस टाकते, त्याप्रमाणें मीं घातकप्रयोगांनीं केलेल्या दुष्ट कृत्यांचा त्याग करतों. १७९

५१. हस्ती रजः इव– (१०।१।३२) ज्याप्रमाणें हत्ती धूळ उडवतो, त्याप्रमाणें मी घातकप्रयोगांस दूर करतों. १७९

५२. दृतेः ऊष्माणं इव, ईर्ष्यां नि मुंचामि– (६।१८।३) ज्याप्रमाणें भात्यांतील हवा काढून टाकावी, त्याप्रमाणें मत्सरास दूर करतों. १८०

५३. मही द्यौः इव, तस्य बलं अप तिर– (६।६।३) ज्याप्रकारें महान् द्युलोक स्वतःच्या प्रकाशानें अंधकारास दूर करतो, त्याप्रकारें त्या दुष्ट मनुष्याच्या बलाला दूर कर. २०१

५४. मधुमतीं शाखां इव, मां इत् त्वं वनाः(१।३४।४) ज्याप्रमाणें मधुर रसानें युक्त शाखेवर वृक्ष प्रेम करतात, त्याप्रमाणें माझ्यावरच तूं प्रेम कर. २०७

५५. अभितः नाभिं अराः इव– (३।३०।६) सर्वबाजूंनीं केंद्राशीं सर्व ज्याप्रमाणें चाकाच्या आऱ्या जोडलेल्या असतात, त्याप्रमाणें सर्व मिळून रहा. २१३

५६. विद्धस्य पदनीः इव– (११।२।१३) घायाळ झालेल्याच्या पावलें टाकण्याप्रमाणें हे रुद्रा ! त्याचा तूं पाठीमागून सूड घेतोस. २३१

५७. तुन्ना कन्या इव ग्लहा एजाति– (६।२२।३) ज्याप्रमाणें दुःखी कन्या पित्यास कंपित करते, त्याप्रमाणेंच मेघांचा शब्द सर्वांस कंपित करतो. २६१

५८. पत्या जाया इव एरं तुन्दाना– (३।२२।३) ज्याप्रमाणें पतिसह रहाणारी धर्मपत्नी गृहस्थाच्या संसारांत प्रेरणा करते, त्याप्रमाणेंच तो शब्द मेघांस प्रेरित करो. २६१

५९. गौः स्वं जरायुः इव कपिः तेजनं बभस्ति– (६।४९।१) ज्याप्रमाणें गाय आपल्या जरायुस घेते, त्याप्रमाणें क म्हणजे जल त्याचें पान करणारे मेघ प्रकाश धारण करतात. २७३

६०. मेघः इव सं अच्यसे– (६।४९।२) खात्रीनें मेढ्याप्रमाणें तूं एकत्रित होतोस. २७४

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग पांचवा) ' मेधाजनन, संगठन आणि विजय '

कांडक्रमानुसार सूक्तांची

अनुक्रमणिका

कांड	सूक्त	मंत्रसंख्या	पृष्ठ
६	५७	३	२८०
	६३	४	१३
	६४	३	२१३
	७६	४	१५८
	७७	३	२५९
	९०	३	२०३
	९१	३	२७९
	९२	३	१६८
	९३	३	१६०
	९४	३	२१३
	९५	३	५२
	१०८	५	४
	१०९	३	४७
	११२	३	८८
	११४	३	२५०
	१२४	३	२७६
७	६	४	२१५
	७	१	२१६
	१०	१	२७४
	११	१	२७५
	२०	६	१५५
	२९	२	८९
	३९	१	२७६
	६१	२	५
	६५	३	३९
	६८	३	२७५
७	७९,	४	१५३
	८०	४	१५४
	८९	४	२७७
	९५	३	१५१
	९६	१	२७
	९७	८	२३६
	९८	१	२४३
	९९	१	२४३
	१०३	१	१८१
	१०७	१	५७
	१०९	७	२२७
	११२	२	२०३
	११३	२	१५२
	११४	२	२०१
८	५	२२	७३
	७	२८	२९
१०	१	३२	१७५
	५	५०	१९५
	६	३५	५८
११	१	३७	११३
	२	३१	२३०
	३	५६	१४२
	५	२६	९१
	८	३४	७७
	९	२६	१८८
	१०	२७	१८२
१२	३	६०	१२४

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद (भाग पांचवा)

मेधाजनन, संगठन आणि विजय

कांड-सूक्त-विषय-मंत्रसंख्या-ऋषि-देवतांची

अनुक्रमणिका